

# ।। श्रीमद् भागवत ।।

निरुपण : ब्रह्मर्षि प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

महर्षि वेदव्यासरचित

# ॥ श्रीमद् भागवत ॥

मराठी निरुपण – द्वारा

ब्रह्मर्षि प. पू. महामहोपाध्याय पंडित दत्तमहाराज कवीश्वर

श्रीभगवती प्रकाशन, पुणे

०९८२२० २७७०४, ०२०–२५४६ ९०६०

- ७ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

- प्रकाशन दिवस :
  २७ फेब्रुवारी, २०१०
  फाल्गुन शुद्ध चतुर्दशी
  प. पू. दत्तमहाराज कवीश्वर जन्मशताब्दी वर्ष

- प्रकाशक :
  श्री भगवती प्रकाशन
  ६/१ ब, साई विहार (फेज II)
  कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२
  फोन : २५४६९०६० मोबाईल : ९८२२० २७७०७
  E-mail : kavishwar@vsnl.com
  URL : www.dattamaharajkavishwar.org

- रंगीत चित्रे :
  सौ. गौरी निहार आङ्कर

- मुद्रक :
  के. जोशी आणि कंपनी
  भिकारदास मारुतीमंदिराजवळ, सदाशिव पेठ, पुणे ३०
  फोन : २४४७१४०९, २४४८२७४८
  E-mail : kjoshipress@gmail.com

- किंमत : रु. ४००/-

# ऋणनिर्देश

ब्रह्मर्षि प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या अमृतवाणीतून साकारलेला श्रीमद्भागवत निरूपण ग्रंथ त्यांच्याच जन्मशताब्दी वर्षात प्रकाशित होत आहे, ही गोष्ट भक्ताधीन असलेल्या ईश्वरेच्छेचं प्रमाण आहे. आपल्या भक्ताने केलेले श्रीहरीनिरूपण त्याच्याच जन्मशताब्दीच्या आनंदोत्सवात प्रकट करावे असा संकल्प भगवंताने केला आणि हा एक सुवर्णयोग साधला गेला.

या ग्रंथाकरिता प. पू. श्री विद्याशंकर भारती स्वामी महाराज श्रीजगद्गुरू शंकराचार्य करवीर पीठ, कोल्हापूर आणि प. पू. श्री भानुदास महाराज देगलूरकर, पंढरपूर यांनी विनंती केल्यावर लगेचच आशीर्वादपत्र या कार्याला दिले. तसेच प. पू. श्री पंडितराज राजेश्वरशास्त्री उप्पीनबेटगिरी, धारवाड यांनीही या ग्रंथाला उत्तम अशी प्रस्तावना दिली. याबद्दल श्री भगवती प्रकाशन त्यांचे कायमचे ऋणी आहे. या श्रेष्ठ पुरूषांचा प. पू. दत्तमहाराजांशी अतिशय आत्मिय संबंध होता. तेव्हा यानिमित्ताने आचार्य संप्रदाय, वारकरी संप्रदाय आणि वैदिक संप्रदाय यांचा आशीर्वाद या कार्याला मिळाला असे म्हणता येईल आणि प. पू. दत्तमहाराजांबद्दल या सर्व ठिकाणी असलेलं प्रेमही अनुभवास आले.

डॉ. सौ. माधुरीताई पणशीकर या तर प. पू. दत्तमहाराजांच्या संप्रदायातीलच. त्यांनीही नेहमीच्याच आत्मियतेने या ग्रंथाकरिता भूमिका लिहून दिली याबद्दल त्यांचे हार्दिक आभार !

या ग्रंथाकरिता प. पू. दत्तमहाराजांच्या मुलीची (सौ. शैलाताईंची) सूनबाई सौ. गौरी निहार आडकर हिने दोन लहान मुलांना सांभाळून व घरातले काम सांभाळून उत्तम अशी तेरा चित्रे काढून दिली याबद्दल ती विशेष अभिनंदनास व ईश्वरकृपेस पात्र आहे. या कामाकरिता तिला घरातल्या मंडळींचेही बहुमोल सहाय्य झालेले आहे.

या पुस्तकाचे मुद्रक श्री. अनिल जोशी, श्री. अण्णासाहेब जोशी आणि त्यांचे सहकारी हे श्री भगवती प्रकाशनाचे काम नेहमीच आपल्या घरचं काम समजून करतात. इतकं सुंदर बांधणीचं व उत्कृष्ट छपाईचं काम केल्याबद्दल या सर्वांचे विशेष आभार !

आणि ज्यांच्या अनुकंपेमुळे, संकल्पामुळे व अनुग्रहामुळे हा अद्वितीय ग्रंथ साकार झाला. त्या प. पू. भगवतीस्वरूप ताईमहाराजांचे आभार कसे मानावेत ? रूक्मिणीदेवीने त्या ब्राह्मणाला सांगितले की, 'भूदेवा, तुम्ही साक्षात भगवंताला माझ्या विवाहाकरिता घेऊन आलात, याबद्दल मी तुम्हाला काय देणार ? मी फक्त तुम्हाला शिरसा वंदन करते.' तशीच काहीशी भावना आमची झाली आहे. ज्यांनी प. पू. दत्तमहाराजांचे प्रेम सतत प्रसृत केलं, एवढंच नव्हे तर ते अनंतपटीने वाढविलं आणि प. पू. दत्तमहाराजांना श्रीदत्ताश्रमात प्रतिष्ठापित केलं त्या प. पू. भगवतीस्वरूप ताईमहाराजांना आमचे लक्ष लक्ष प्रणाम !

सगुण रूप देवाचंही कायम राहत नाही, माणसाचं तर नाहीच नाही. परंतु ईश्वराची विभूती म्हणून इथे आलेल्या प. पू. दत्तमहाराजांसारख्या व्यक्ती त्यांच्या जीवनकालात जे प्रेम प्रसारित करतात तेच प्रेम अनुकूल लोकांना एकत्र बांधून ठेवतं आणि पुढे अनेक जन्म शिदोरी म्हणूनही पुरतं. असंच प्रेम सर्वांना मिळावं आणि अशा श्रेष्ठ पुरूषांची, सद्भक्तांची संगती सर्वांना मिळावी हीच भगवान गोपालकृष्णांच्या चरणी प्रार्थना आहे.

।। गोपालकृष्ण भगवान की जय ।।

ट

# ।। श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

ह्या सगळ्या विश्वाच्या निर्मितीचा हेतू काय ? कशासाठी हे सारे विश्व निर्माण झाले आणि याचा शेवट किंवा पर्यवसान कशात होणार आहे ? मी कोण ? माझ्या जन्माचे प्रयोजन कोणते ? माझ्या अस्तित्वाला ह्या विश्व चक्रात अर्थ आहे का ? परिवर्तनीय असलेल्या ह्या जगाच्या मागे काही अपरिवर्तनीय, चिरंतन, स्थिरसत्य आहे का ? ह्या विश्वाच्या अफाट पसाऱ्यामागे काही मूलतत्त्व असेल का ? हे आणि अशा प्रकारचे प्रश्न संवेदनाशील मनापुढे पुरातन काळापासून उभे आहेत. त्यांची उत्तरे माणूस निरनिराळ्या अंगांनी सारखा शोधतोच आहे. ज्ञानाच्या कक्षा आज विविध दिशांनी विस्तारत चालल्या आहेत. ज्ञानेंद्रियांच्या कक्षेत येणाऱ्या प्रश्नांना विज्ञान भिडले. अचंबा वाटावा असे शोध माणसाने लावले. आणि तरी मनात वर उपस्थित केलेल्या प्रश्नांची घुसळण चालूच राहिली.

विज्ञानाने विश्वाच्या मूळाशी असलेल्या शक्तीचा शोध विज्ञानाच्या अंगाने घेतला. त्यात प्रत्यक्ष, वस्तूनिष्ठता आणि कार्यकारणभाव ह्याला महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीत पुरातन काळापासून वर उपस्थित केलेल्या प्रश्नांचा शोध विचारवंतांनी चिंतनाच्या अंगाने घेतलेला दिसतो. वेद, उपनिषदे, गीता इ. ग्रंथांनी लौकिकाचा आणि जीवनाच्या पलीकडच्या अलौकिकाचा कसोशीने शोध घेतला. ऋषी–मुनींनी त्यावर भरपूर चिंतन केले. अशा चिंतनगर्भ परंपरेतील एक

महान व्यक्तिमत्त्व म्हणजे प. पू. दत्तमहाराज कवीश्वर. श्री वासुदेव निवासातील योगिराज गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी. नाथ महाराजांच्या जीवनात जसा प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय दिसतो, तसाच समन्वय प. पू. दत्त महाराजांच्या जीवनात होता. षड्दर्शनांचा अभ्यास केलेले कोणत्याही विषयाची खोल जाणारी सूक्ष्म, मर्मग्रही दृष्टी असलेले, भक्तीमार्गाचे पुरस्कर्ते. नम्रता, विनयशीलता, ज्ञान, भक्ती आणि शास्त्रशुद्ध आचरण ही ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची अंगे होती असे दत्तमहाराज कवीश्वर !

'शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।' ह्या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे प. पू. दत्त महाराजांचा जन्म पिढ्यान्‌पिढ्या निष्ठा ठेवणाऱ्या कवीश्वराच्या घराण्यात झाला. कवीश्वरांचे मूळ आडनाव सप्तर्षी. प. पू. दत्तमहाराजांचे पणजोबा श्री. दाजी दीक्षित हे व्युत्पन्न पंडित होते आणि त्यांचा रामायण–महाभारताचाही चांगला अभ्यास होता. नरसोबावाडीला ते रोज पाच श्लोक करून श्री दत्तप्रभूंच्या चरणी अर्पण करीत असत. त्यांच्या जवळ असलेल्या प्रतिभासंपन्नतेमुळे लोक त्यांना 'कवीश्वर' नावाने ओळखू लागले. (ह्याच प्रतिभेचा अविष्कार पुढे प. पू. दत्तमहाराजांच्या ठायी झालेला दिसतो.) ह्यांचे चिरंजीव श्री. वक्रतुंड महाराज ह्यांचाही रामायण–महाभारताचा व्यासंग होता. त्यावर ते प्रवचने करीत. त्यांच्या पत्नी सौ. सावित्रीबाई ह्यांची वीस बाळंतपणे झाली पण फक्त दोन मुली जगल्या. नंतर श्री. गोविंदस्वामींच्या कृपाप्रसादाने त्यांना पुत्ररत्न झाले. ते म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वडील श्री. धुंडिराज शास्त्री. त्यांचा न्यायशास्त्राचा अभ्यास होता. त्यांना सद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांचा सहवास खूप लाभला, त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई वाडीला रोज प्रदक्षिणा घालत असत. त्यांच्या पोटी बुधवार दि. २ मार्च १९१०, माघ वद्य शके १८३१ रोजी प. पू. दत्तमहाराजांचा जन्म झाला. त्यांचे बालपण कृष्णामाईच्या नयनरम्य परिसरात गेले. ७ वी पर्यंतचे शिक्षण वाडीलाच झाले. त्यानंतर वाडीलाच श्री. दीक्षित स्वामी महाराजांचा मंत्रोपदेश मिळाला. प. पू. महाराजांचा पहिला भागवत सप्ताह श्री दीक्षितस्वामी महाराजांच्या प्रेमळ कृपादृष्टीखाली सिद्ध झाला. सप्ताहसमाप्तीनंतर स्वामी महाराजांनी प. पू. दत्तमहाराजांच्या अंगावर शाल पांघरली आणि त्यांना चांदीचे फुलपात्र दिले. कृष्णेच्या एका तीरावर वाडी आणि दुसऱ्या तीरावर दत्तअमरेश्वराचे मंदिर आहे. ते जागृत असून चौसष्ट योगिनींचा तिथे निवास आहे. दीक्षित स्वामी महाराज तेथे वस्तीला होते.

धारवाड इथे पं. नागेशशास्त्री उप्पन बेट्टीगिरी यांच्या साक्षेपी नजरेखाली प. पू. महाराजांनी

न्यायशास्त्राचे धडे गिरवले. पुढे विद्वज्जनांच्या अनेक सभांमध्ये त्यांची विद्वता निखालसपणे सिद्ध झाली. कांची कामकोटीला सद्गुरु शंकराचार्य श्री चंद्रशेखर सरस्वती यांनी आयोजित केलेल्या विद्वत सभेत प. पू. दत्त महाराजांनी वेदान्त विशद करून त्यांची वाहवा मिळविली. धारवाडच्या अद्वैत ब्रह्मविद्या परिषदेतील प. पू. दत्तमहाराजांनी केलेल्या वेदान्तावरील अप्रतिम विवेचनाचा वृत्तांत कांची कामकोटीच्या श्रीमद् शंकराचार्यांना कळल्यावर त्यांनी श्री. दत्तमहाराजांसाठी आदरपूर्वक सुवर्णकंकण, वस्त्र आणि श्रीफळ पाठवले. १९३० मध्ये बार्शी येथील श्री. भगवंतराव पाठक यांच्या कन्येशी प. पू. दत्तमहाराजांचा विवाह झाला. योगिराज गुळवणी महाराजांनी त्यांच्यावर अपरंपार प्रेम केले. त्यांचा सहवासही खूप दिला. १९३७ साली पुण्याला नातूंच्या वाड्यात प. पू. दत्तमहाराजांचे बिऱ्हाड झाले. पुढे १९५७ साली इन्फ्लूएंझाच्या साथीत प. पू. महाराजांची शोभा नावाची मुलगी दगावली. त्यावेळेस दत्तमहाराज औखाडला सप्ताहासाठी गेले होते. ह्या सर्व काळात प. पू. गुळवणी महाराजांनी कवीश्वर कुटुंबियांना अत्यंत ममतेने सांभाळले. मुलीच्या मृत्युचा आघात प. पू. दत्तमहाराजांनी अत्यंत धीराने सहन केला. कसोटीचे प्रसंग संतांच्या आयुष्यातही येतात आणि तिथेच त्यांच्या स्थिर विवेकशील मनाचा प्रत्यय येतो.

योगिराज गुळवणीमहाराज गोवईकरांच्या चाळीत राहत होते. त्यावेळेस पानशेतचे धरण फुटले, पुण्यात हाहाःकार झाला आणि चाळीत पाणी शिरले. लोकांनी प. पू. गुळवणीमहाराजांना बाहेर काढले परंतु त्यांचे देव, पोथी वगैरे बाहेर आणता आली नाहीत. दुसऱ्या दिवशी मातीतून लोकांनी देव बाहेर काढले. देवांसाठी आश्रमासारखी वास्तू असावी असे. प. पू. दत्तमहाराजांना वाटत होतेच आणि त्यांचा संकल्प पूर्ण झाला आणि 'वासुदेव निवास' ही वास्तू आकाराला आली. ह्या वास्तूला 'वासुदेव निवास' हे नावही प. पू. दत्तमहाराजांनीच सुचवले. अनेक नावे येत होती. पण हे नाव निश्चित करण्यामागे प. पू. दत्तमहाराजांचा काही विचार होता. त्यांनी सांगितले, 'वासुदेव याचा अर्थ सर्वांना धारण करणारा असा आहे. ह्या आश्रमाचे कार्य व्यापक स्वरूपाचे असेल, सर्व जगाच्या कल्याणाचे कार्य इथून होईल.' ह्या जाणीवेतून 'वासुदेव निवास' हे त्या वास्तूला नाव सुचवले गेले. ह्या वासुदेव निवासात प. पू. गुळवणी महाराजांच्या आज्ञेनुसार पहिला सप्ताह प. पू. दत्त महाराजांच्या भागवताचा झाला.

एकदा सज्जनगडावरून प. पू. श्रीधरस्वामींनी दासनवमीच्या उत्सवाला प. पू. दत्तमहाराजांना बोलावले. त्यावेळी दत्तमहाराजांची प्रकृती ठीक नव्हती. ताप येत होता तरी प. पू. गुळवणी

महाराजांच्या आज्ञेवरून ते गेले, गडाच्या पायथ्याशी आल्यावर 'प्रकृती अस्वस्थ आहे' असा त्यांनी श्रीधरस्वामींना निरोप पाठवला. 'डोली करून या' असा उलटा निरोप आला. पण प. पू. दत्तमहाराज तसेच वरती गड चढून गेले. आणि तिथे पहाटे त्यांना शक्तिपात दीक्षा झाली. ' ते कुंडलिनी जगदंबा । चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जिथे विश्वबिजाचिये कोंभा । साऊली केली ।।' असे ज्या शक्तीच्या अनन्यसाधारण शक्तीचे वर्णन ज्ञानेश्वरांनी केले तिचा उत्सव प. पू. दत्तमहाराजांच्या ठायी मूर्त झाला.

दीक्षा मिळाली तरी प. पू. गुळवणी महाराज सगुणात होते. तोपर्यंत आपल्या गुरूविषयी अपरंपार प्रेमादराची भूमिका असणाऱ्या प. पू. दत्तमहाराजांनी इतर साधकांना दीक्षित केले नाही. १५ जाने. १९७४ ला प. पू. गुळवणी महाराजांची इहलोकीची यात्रा संपली. त्यांच्या अस्थि कलशाचे विसर्जन प्रयागला झाल्यावर त्यांनी दीक्षा द्यायला सुरूवात केली.

योगिराज गुळवणी महाराजांच्या अधिकारसंपन्न दृष्टीखाली प. पू. दत्तमहाराजांचा षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा झाला. नंतर २५ मे ते ३१ मे १९८१ ह्या सात दिवसांत अमृत महोत्सव साजरा झाला. ११ मे ते १८ मे १९९० ह्या काळात सहस्रचंद्रदर्शन शांती महोत्सव, २३ एप्रिल ते २९ एप्रिल १९९७ ह्या काळात देऊळगावराजा–बुलढाणा इथे आणि २० मे ते २३ मे १९९४ पुणे येथे रौद्रीशांती महोत्सव झाला. भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, श्री. वराहगिरी गिरी आणि श्री. शंकरदयाळ शर्मा यांच्याकडून त्यांच्या विद्वत्तेचा गौरव झाला. आयुष्यभर महाराष्ट्राच्या खेडोपाडी हिंडून त्यांनी भागवत सप्ताह केले. तिथेही अनेक भाविक, विद्वानांकडून त्यांचे सत्कार समारंभ झाले.

प. पू. दत्तमहाराजांनी बरेच लेखनही केले. सद्गुरु टेंबे स्वामी महाराजांचे समग्र वाङ्मय १९५४ मध्ये श्री. स्वामी महाराजांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून त्यांनी १२ खंडांत प्रकाशित केले. १९६५ मध्ये टिळक विद्यापीठाने त्यांच्या द्वैताद्वैतवादी निम्बार्काचार्यांच्या ब्रह्मसूत्रावरील भाष्याचा अनुवाद प्रदीर्घ अभ्यासपूर्ण प्रस्तावनेसह 'वेदान्तपारिजात सौरभ' या नावाने प्रसिद्ध केला. श्री. वासुदेवानंद सरस्वतींचे चरित्र 'गुरुदेवचरित्र' ह्या शीर्षकाने प्रसिद्ध केले. गुण गाईन आवडी, चांदणे कैवल्याचे, संतसंग, नारायण नमोस्तुते इ. पुस्तकातून प्रकाशित झालेली त्यांची प्रवचने साधकांना मार्गदर्शन करणारी आहेत. 'विवेकचूडामणि' हा त्यांचा प्रिय ग्रंथ ! त्यातील १२५ श्लोकांचे त्यांनी केलेले विवरणही प्रसिद्ध झाले आहे.

'वामन निवास' ही भव्य वास्तू त्यांनी अथक परिश्रमाने उभी करून आपल्या गुरूंच्या संदर्भातील कृतज्ञता व्यक्त केली. ह्याच वास्तूत 'तुळजाभवानी आरोग्यधाम' उघडले. इथे स्त्रियांसाठी औषधोपचाराची व्यवस्था आहे. वाडीच्या पैलतीराला श्री दत्तअमरेश्वराचे जे स्थान आहे, त्याचा जीर्णोद्धार त्यांनी केला. तिथे एका भव्य वास्तूत प. पू. स्वामी महाराजांच्या आणि प. पू. दीक्षित स्वामी महाराजांच्या पादुका आहेत. स्वामी महाराजांनी अभिमंत्रित केलेले यंत्र आहे. त्या शिवाय प. पू. दीक्षित स्वामी महाराजांच्या पूजेतील देव, फोटो वगैरे गोष्टींचा सांभाळ तिथे पावित्र्याने केला जातो. श्री दत्तअमरेश्वराची मूर्ती आणि योगिनी असून ती वास्तू अत्यंत पवित्र व मंगल वातावरणाने भारलेली आहे. ते कृष्णेच्या काठावरचे जागृत देवस्थान आहे.

प. पू. दत्तमहाराजांनी विविध प्रकारची कार्ये करून आपल्या कृतार्थ जीवनाची सांगता १ मार्च १९९९ फाल्गुन शुक्ल चतुर्दशीला केली. तत्पूर्वी त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. लक्ष्मीबाई कवीश्वरांनी १० जानेवारी १९९९ रोजी ह्या जगाचा निरोप घेतला. करुणावतार अशा प. पू. दत्त महाराजांच्या अस्थींचे विसर्जन ज्या कृष्णेच्या काठावर त्यांचा जन्म झाला त्या कृष्णामाईच्या पवित्र जलात झाले.

संतांच्या लौकिक जीवनाचा आलेख रेखाटता रेखाटता त्यांच्या अंतर्यामीही थोडेसे उतरण्याचा प्रयत्न करायला हवा. चिमणीच्या किलकिल्या डोळ्यांनी अनंत अवकाशात भरारी घेणाऱ्या गरुडाची झेप थोडीशी न्याहाळायला हवी. पण कशी ? संतांच्या अलौकिक विचारसरणीचा मागोवा त्यांच्या शब्दांतून घेता येतो. त्यांच्या अंतरंगात वसणाऱ्या असीम शांतीचे थोडेफार तरंग अनुभवता येतात.

षड्दर्शनांचा मन:पूर्वक अभ्यास करणाऱ्या प. पू. दत्तमहाराजांना भागवत पुराण अत्यंत प्रिय होते. त्यातल्या कथा, सिद्धांत सांगताना त्यांचा आवाज भक्तीरसात चिंब भिजलेला असायचा. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांनी भागवत सप्ताह केले. भागवत सांगून शुकाचार्य महाराजांनी परीक्षित राजाला मृत्यूच्या भयापासून मुक्त केले. आणि तेच भागवत कथन करून प. पू. दत्त महाराजांनी अनेक आर्त जीवांच्या दुःखावर फुंकर घातली. भागवत पुराणाच्या केंद्रस्थानी भक्तिविचार आहे. प. पू. महाराज ज्ञानी पंडित होते, तरी त्यांचा ओढा भक्तीकडे होता. प्रल्हादजी अकामभक्त म्हणून त्यांना परमप्रिय होते. प्रल्हादजींनी ईश्वराकडे काहीच मागितले नाही. मन निर्वासन व्हावे, कुठलीच कामना मनात राहू नये अशी प्रल्हादजींनी इच्छा होती, हा त्यांचा विशेष प. पू. महाराज

आवर्जून सांगत असत. पद्मपादाचार्यांच्या कथेचाही ते अनेकदा उल्लेख करत. श्रेष्ठ भक्त आपल्या इष्ट दैवताचे ध्यान करता करता त्याच्याशी कसा एकरूप होऊन जातो हे सांगायला त्यांना आवडे. पद्मपादाचार्य हे आद्य शंकराचार्यांचे परमभक्त ! ते नरसिंहाची उपासना करीत असत. त्याचे ध्यान करताना ते एकदा इतके तद्रूप झाले की जगद्गुरु शंकराचार्यांना मारायला आलेल्या कापालिकावर ते नरसिंह रूपाने धावून गेले आणि त्याचा त्यांनी निःपात केला. ही कथा प. पू. महाराजांना फार आवडत असे. कर्मज्ञानभक्तीयोग ह्या चारही ईश्वराप्रत जाण्याच्या मार्गात भक्तीमार्गाचे श्रेष्ठत्व त्यांनी परत परत सांगितले. कारण प्रारब्ध भोगूनच संपवायचे असते, अज्ञान हे ज्ञान झाल्यावर नाहीसे होते पण मन निर्वासन होत नाही तोवर, पुनरपि जननं पुनरपि मरणं । पुनरपि जननी जठरे शयनम् ।' हे चक्र चालूच राहते. भक्तीने मन निर्वासन होते हे भक्तीचे महत्त्व आहे.

नित्य ईश्वराची आठवण मनात रहायला हवी हे त्यांचे सततचे सांगणे होते. महाभारतातील 'कुंती' विषयी ते आत्मियतेने विचार मांडत. भारतीय युद्धात पांडवांना विजय मिळाला. श्रीकृष्ण हस्तिनापुराहून परत जायला निघाले तेव्हा कुंतीने त्यांच्याकडे मागणे मागितले की, 'सुखात तुझी आठवण आम्हाला राहील का ? ती रहावी म्हणून तू आम्हाला सदैव दुःखात ठेव.' ईश्वरावरील प्रेमाचा, भक्तीचा उत्कट स्पर्श कुंतीच्या शब्दांना आहे. दुःखात बुडून गेलेल्या भक्तांनी दुःख बाजूला सारून ईश्वराचे स्मरण केले आहे, असे तुकारामांच्या ज्या एका अभंगात वर्णन आलेले दिसते, तो अभंग महाराजांना फार प्रिय होता. तो असा –

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ।
प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनी नारायण ।
सुदामा ब्राह्मण दारिद्र्ये पिडला । नाही विसरला पांडुरंगा ।
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर आले तरी ।।

कृष्ण भक्तीमध्ये अंतर्बाह्य रंगून गेलेले पितामह भीष्म आणि विदुर ही सुद्धा प. पू. महाराजांना अंतःकरणापासून प्रिय असलेली माणसे ! कृष्ण शिष्टाईच्या वेळेस विदुरजींच्याकडे जाऊन राहिला तेव्हा विदुरजी आणि त्यांच्या पत्नीला विलक्षण आनंद होऊन, आपल्या ह्या प्रिय दैवतासाठी काय करू आणि काय नको असे त्यांना झाले. अतिशय प्रेमाने विदुरजींची पत्नी श्रीकृष्णाला फळे सोलून देऊ लागली, पण त्याच्या श्रीमुखाकडे बघताना ती इतकी तन्मय झाली की, फळे स्वतः खाऊन फळाची साल कृष्णाला भरवू लागली. भक्तीभावनेची उत्कटता दाखविणारी

ही कथा त्यांना फार आवडायची. रामभक्तीमुळे हनुमानजीही त्यांना प्रिय होते. गीत रामायणातले, 'कधी न चळावे चंचल हे मन । श्रीरामा ह्या चरणापासून' हे गीत त्यांनी अनेकदा आवर्जून ऐकले.

श्रेष्ठ महात्मे, संत, ज्ञानीपुरूष याविषयी प. पू. महाराज नेहमीच अत्यादाराने बोलत असत. नुसते बोलत नसत, तर स्वत:च्या कृतीतून तो आदर व्यक्त करीत असत. एकदा आश्रमात करवीरचे शंकराचार्य आलेले असताना, त्यांना उच्चासनावर बसवून, त्यांचा गौरव करून प. पू. महाराज त्यांच्या पायांशी बसले. अध्यात्माच्या क्षेत्रात 'आत्मज्ञान' कसे प्राप्त होईल ? हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. प. पू. महाराजांनी जडभरताची गोष्ट सांगताना हे स्पष्ट केले. रहूगण राजा जडभरताला प्रश्न करतो, 'व्यवहारापासून निवृत्त व्हायचं, संसार सोडून जायचा तर संसार खोटा आहे असं कुठे आहे ? संसार खरा आहे की !' जडभरतांनी उत्तर दिले, 'तू हा प्रश्न विचारलास पण ही ज्ञानी माणसाची दृष्टी नाही, केवळ अध्ययनाने ज्ञान होत नाही. महात्मे जे आहेत त्या महात्म्यांना शरण गेल्याशिवाय, त्यांची कृपादृष्टी झाल्याशिवाय ज्ञान होत नाही.' आणखी एका ठिकाणी ते म्हणतात की, 'आत्मज्ञानासाठी बुद्धीची स्थिरता हवी. बुद्धीची स्थिरता संपादन करणं हे मुख्य आहे. बुद्धीस्थैर्य हे आत्मज्ञानाला अत्यंत उपयोगी आहे. ही स्थिरता ईश्वरप्रणिधानाने येते तशीच, ती वीतराग महात्म्यांच्या संकल्पाने सुद्धा होऊ शकते.' पूर्ण बुद्धीचे महात्मे म्हणजे साक्षात् ईश्वरस्वरूपच झालेले असतात. अशा महात्म्यांचा जो संकल्प आहे, त्यांची दृष्टीसुद्धा इतकी शक्तीसंपन्न असते की ती ज्याच्यावर पडेल त्याचा सर्व ही पापक्षय होतो.' 'मन एकाग्र होण्यासाठी संत चरित्रे वाचावीत.' असे ते नेहमी म्हणत असत.

एकदा प. पू. महाराजांजवळ गीतेविषयी काही चर्चा करताना विचारले, 'शेवटी ज्ञान होणं हे महत्त्वाचं आहे..' त्यावर प. पू. महाराज क्षणभर शांत राहिले आणि म्हणाले, 'नाही. त्या ज्ञानातून शांतीची अवस्था प्राप्त होणं महत्त्वाचं आहे. गीतेत एक श्लोक आहे,

'विहाय कामन्य: सर्वान्पुमांश्चरति निस्पृह: ।
निर्ममो निरहंकार: सशान्तिमधि गच्छति ॥'

शेवटी शांती अनुभवणं हेच महत्त्वाचं आहे.' आपण जगताना प्रत्येक गोष्टीचे कर्तृत्व स्वत:कडे घेण्यासाठी धडपडत असतो. त्यातून आपल्या अहंकाराचे छानपैकी पोषण होत असते. आणि मग तोच अहंकार आपल्याला आपल्या शुद्ध रूपापासून, मूळे रूपापासून दूर नेत असतो. ईश्वराची साधनाही आपणच करतो हा अहंभाव आपल्यापाशी असतो. यावर प. पू. महाराजांनी

अतिशय सोप्या पण ठाम भाषेत महत्त्वाचे भाष्य केले आहे. ते लिहितात, 'उपासना पक्की होणं याचा अर्थ त्याचा भ्रम गेला पाहिजे. 'मी उपासना करतो आहे, एकच आहेत ते दोघेही. उपासनेचं कर्तृत्व जोपर्यंत मनात आहे तोपर्यंत उद्धार नाही. 'मी उपासना करणारा आहे.' असं जर वाटत असेल तर त्यामुळेही अध:पात होतो.' (दैवी संपदा पृ. ७४)

प. पू. महाराजांची कृती–उक्ती एकरूप होती. साधकांना दीक्षा मिळाल्यावर साधक प. पू. महाराजांना म्हणत, 'आपण मला दीक्षा दिलीत. तो आनंद काही विलक्षणच आहे.' प. पू. महाराज त्यावर उत्तर देत, 'आम्ही कुठे काय केलं. पोस्टमन पत्र नेऊन टाकतो, आम्ही पोस्टमनचं काम केलं.' ज्यांच्या वृत्ती तदाकार झाल्या आहेत, असे महाराज कसलेच कर्तृत्व स्वत:कडे घेत नसत. ज्ञानेश्वरीतल्या काही ओव्यांचा ह्या दृष्टीने ते अनेकदा उल्लेख करत त्या अशा –

परी मने वाचा देहे । जैसा जो व्यापारू आहे ।
तो मी करीत आहे । ऐसे न म्हणे ।।
करणे वा न करणे । हे आघवे तोचि जाणे ।
विश्व चळतसे जेणे । परमात्मेनी ।।

एकदा प. पू. महाराज गावाला गेलेले असताना त्यांच्या चिरंजीवांनी सुंदर शोकेस बनवून त्यात वेळोवेळी झालेल्या त्यांच्या सत्कारातली मानपत्रे, भेटवस्तू वगैरे मांडून ठेवले. प. पू. महाराज गावाहून आल्यावर त्यांनी तिकडे क्षणभर दृष्टी टाकून म्हटले, 'अहो, हे ज्ञानेश्वर महाराजांनी जे सांगितलं त्याच्या अगदी विरूद्ध झालं. त्यांनी काय सांगितलं आहे ?'

पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ति कानी नायकावी ।
हा अमुक ऐसा हे नोहावी, सेची लोकी ।। श्री ज्ञानेश्वरी ।।

ज्या विभूतींचा 'मी' विश्वाकार झाला त्यांची ही अमृतमयी वाणी ! त्याच्या उदात्त विचार सरणीचा प्रत्यय त्या शब्दातून येतो.

शब्दांचा अन्वय सांगण्याची त्यांची पद्धतीही अशीच उदात्त होती. 'गृहेषु अतिथीवद् वसेत्।' याचा अर्थ सांगताना ते एकदा म्हणाले होते, 'गृह' या शब्दाचा अर्थ 'शरीर' असाही घ्यावा. शरीरात आपण अतिथी आहोत हा विचार पक्का झाला तर देहाविषयी ममत्व राहणार नाही.'

'ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।

जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।'

ह्या ज्ञानेश्वरीच्या पहिल्या ओवीचा अर्थ सांगताना ते म्हणाले होते, 'ज्ञानेश्वर महाराजांनी आत्मस्वरूपच सगळीकडे आहे हे मांडले. आधी तर्क केला, ज्याअर्थी सृष्टी निर्माण झाली त्याअर्थी कर्ता हा असणारच. न्यायशास्त्र तर्काच्या मार्गाने जाते. नंतर वेदांनी सांगितले म्हणजे शब्दप्रचिती आहे आणि शेवटी 'स्वसंवेद्या' म्हटल्यामुळे आत्मप्रचिती आहे. म्हणजेच तिन्ही प्रमाणांनी त्याचे अस्तित्व सिद्ध होते. अशा रितीने पहिल्याच ओवीत आत्मरूप सिद्ध करून मगच त्यांनी ज्ञानेश्वरीला आरंभ केला.' १९९५ मध्ये बार्शी येथे पंचागकर्ते धुंडिराजशास्त्री दाते यांच्या वर्धापन दिनानिमित्त बोलताना प. पू. महाराज म्हणाले की, 'शास्त्राच्या अभ्यासानंतर संतवाङ्मय जास्ती स्पष्ट झाले असे श्री. धुंडामहाराज देगलूरकर म्हणाले होते.'

पितामह भीष्मांचे चरित्र त्यांना आवडायचे. उत्तरायण लागल्यावर देह विसर्जनाच्या वेळेस, भीष्मांनी कृष्ण स्तुती केली ती अशी –

इति मति रूपकल्पिता वितृष्णा ।
भगवति सात्वत पुङ्गवे विभूम्नि ।
स्वसुखमुऽपगते क्वचिद् विहर्तुं ।
प्रकृतिमुपेयुषि यद् भवप्रवाहः ।।

याचे स्पष्टीकरण करताना प. पू. महाराज म्हणायचे की, 'तुम्हाला वाटते तेव्हा तुम्ही सृष्टी निर्माण करता, प्रकट होता, नाही तर निर्गुणातच असता. हा भवप्रवाह सगळा प्रकृतीमुळे निर्माण झाला आहे.'

ज्ञानेश्वर महाराजांचा 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे' हा अभंग ह्याच अर्थाचा आहे.' 'भीष्म शरपंजरी पडले होते तरी त्यांची सर्व इंद्रिये शेवटपर्यंत त्यांच्या ताब्यात होती.' असे ते सांगत. प. पू. महाराजांनी शेवटच्या आजाराच्या आधीच्या आजारपणात महाभारत वाचून घेतले. पण भीष्मांनी देह ठेवला, तिथून पुढे ऐकले नाही. भीष्मांनी शेवटी वाणी बंद करून चित्त केवळ परमात्म स्वरूपावर स्थिर केले. प. पू. महाराजांनीही १३ फेब्रुवारीपासून मौन धारण केले ते अखेरपर्यंत सोडले नाही.

प. पू. महाराजांसारख्या श्रेष्ठ पुरूषांविषयी खूप काही सांगितले तरी खूप काही सांगायचे

राहून जाते. कारण शब्दांच्या अतीत असलेले हे महात्मे असतात. तरी शब्दांच्या सहाय्याने त्यांचा मागोवा अंतर्मुखपणे जेवढा घेता येईल तेवढा घ्यावा, शब्दांच्या पलीकडच्या नि:शब्दांच्या प्रांतात त्यांच्याच कृपेने पाऊल पडेल ही आशा मनी ठेवावी. या संदर्भात दासबोधातील त्यांची आवडती ओवी आठवते,

मनी धरावे ते होते । विघ्न अवघे नासोनि जाते ।
कृपा केलिया रघुनाथे । प्रचिती येते ।।

डॉ. माधुरी पणशीकर
अ–११ गुडविल बिल्डिंग, मनमाला टँक रोड, माहिम.
मुंबई – ४०००१६, फोन – २४३०५३९६

ट

# विषय सूचि

## व गोकर्ण माहात्म्य व


१. श्रीमद्भागवत माहात्म्य ........ २२
२. गोकर्ण कथा ........ ३२


## व दिवस पहिला व


१. नैमिषारण्यात शौनकादिक मुनींचा सूतांना प्रश्न ........ ४६
२. नारद – व्यास संवाद ........ ५२
३. नारद पूर्वजन्म कथा वृत्तांत ........ ५३
४. श्रीव्यास द्वारा श्रीमद्भागवत लिखाण आरंभ ........ ५५
५. कुंती स्तुति ........ ६१
६. भीष्म स्तुति ........ ६३
७. परीक्षित जन्मोत्सव ........ ६८
८. परीक्षिताला शाप ........ ७४
९. शुकाचार्यांचे आगमन ........ ७६
१०. ध्यानविधी ........ ७८
११. सृष्टिविषयक प्रश्न ........ ८१
१२. विराटस्वरूप वर्णन ........ ८२
१३. चतु:श्लोकी भागवत ........ ८४

| | | |
|---|---|---|
| १४. | श्रीमद्भागवत कथा आरंभ | ८६ |
| १५. | विदुरजी – उद्धव संवाद | ८८ |
| १६. | विदुरजी – मैत्रेय संवाद | ९० |
| १७. | वराह अवतार आणि हिरण्याक्ष वध | ९३ |
| १८. | सनकादिकांचा जय – विजयांना शाप | ९५ |

## व दिवस दुसरा व

| | | |
|---|---|---|
| १. | मनुवंश वर्णन | १०४ |
| २. | कर्दम व्याख्यान | १०४ |
| ३. | कपिलावतार | ११४ |
| ४. | सांख्ययोग वर्णन | ११७ |
| ५. | देवहुतिला मोक्षप्राप्ती | १२० |
| ६. | सति आख्यान | १२७ |
| ७. | ध्रुव चरित्र | १३८ |
| ८. | पृथुराजा चरित्र | १५० |
| ९. | ऋषभदेव चरित्र | १६० |

## व दिवस तिसरा व

| | | |
|---|---|---|
| १. | भरत आख्यान | १६७ |
| २. | भूगोलवर्णन | १८३ |
| ३. | अजामेळ आख्यान | १९९ |
| ४. | इंद्र – वृत्रासुर युद्ध – वध | २०९ |
| ५. | मरुद्गणांची उत्पत्ति | २२२ |
| ६. | प्रल्हादजी चरित्र | २२४ |

## व दिवस चौथा व

| | | |
|---|---|---|
| १. | नारद – युधिष्ठिर संवाद | २४१ |
| २. | अवधूत – प्रल्हादजी संवाद | २४४ |
| ३. | गजेंद्रमोक्षाख्यान | २६१ |

४. समुद्रमंथन ................ २६४
५. भगवंतांचा मोहिनी अवतार ................ २६९
६. वामनावतार चरित्र ................ २७३
७. मत्स्यावतार कथा ................ २८८
८. सूर्यवंशवर्णन ................ २८९
९. अंबरीष कथा ................ २९५
१०. हरिश्चंद्र कथा ................ २९९
११. भगीरथ कथा ................ ३००
१२. प्रभु श्रीराम चरित्र ................ ३०३
१३. चंद्रवंशवर्णन ................ ३१९
१४. श्रीपरशुराम चरित्र ................ ३२०
१५. ययाति चरित्र ................ ३२३
१६. भरतवंश वर्णन ................ ३२६

## व दिवस पाचवा व

१. श्रीकृष्ण चरित्र ................ ३३३
२. पूतनावध ................ ३४६
३. गर्गाचार्यांकडून नामकरण संस्कार ................ ३५१
४. यमलार्जुनांचा उद्धार ................ ३५४
५. ब्रह्मस्तुति ................ ३६०
६. कालियामर्दन ................ ३६३
७. गोवर्धन लीला ................ ३७१
९. मथुरा आगमन आणि कंसवध ................ ३८८
१०. उद्धव – गोपी संवाद ................ ३९८

## व दिवस सहावा व

१. द्वारका नगरी निर्माण ................ ४११
२. रुक्मिणीहरण – विवाह ................ ४१६
३. स्यमन्तकोपाख्यान ................ ४२६

४. भौमासुरवध ........ ४३३
५. श्रीकृष्ण – रुक्मिणी संवाद ........ ४४०
६. पौण्ड्रक, काशिराज कथा ........ ४४६
७. नारदांकडून श्रीकृष्णांची गृहचर्या पाहणे ........ ४५०
८. जरासंध कथा ........ ४५७
९. शिशुपाल कथा ........ ४६०
१०. शाल्व कथा ........ ४६४
११. सुदामा आख्यान ........ ४६७
१२. वेदस्तुति ........ ४८७

## व दिवस सातवा व

१. ऋषींचा यदुकुलाला शाप ........ ४९९
२. वसुदेवाला नारदांचा उपदेश ........ ५००
३. नवयोगींद्रांचे संभाषण ........ ५०१
४. श्रीकृष्ण उद्धवजी संवाद ........ ५२१
५. चोवीस गुरुंचे कथन ........ ५२२
६. ज्ञान – कर्म – भक्ति यांचे वर्णन ........ ५३०
७. भिक्षुगीत ........ ५३९
८. यदुकुल संहार वर्णन ........ ५४३
९. भगवान परमधामाला जातात ........ ५४३
१०. कलिधर्माचे निरुपण ........ ५४५
११. परीक्षिताचा देहत्याग ........ ५४६
१२. श्रीमार्कण्डेय आख्यान ........ ५४७
१३. श्रीमद्भागवत अवतरणिका ........ ५४९
१४. श्रीमद्भागवत माहात्म्य ........ ५५१

ट

# ।। श्रीमद्भागवत गोकर्ण माहात्म्य ।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा।।
तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ।।
तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण। स्तवावे ते कवणे कवणालागी।।

यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम्।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो। मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम्। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम्।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्। संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन्। प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम्।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम्।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम्।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम्।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं। तत्र तत्र कृत मस्तकांजलिम्।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं। मारुतिं नमत राक्षसान्तकम्।।
पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम्।।

श्रीगणेशाय नमः

श्रीगुरूचरणारविन्दाभ्याम् नमः।

शौनक उवाच,

नैमिषारण्यामध्ये शौनकादि महर्षींचा निवास आहे. यज्ञयागादि अनेक कर्मं ते करताहेत. मध्येमध्ये भगवंताच्या कथा श्रवण करण्याचीही त्यांना अत्यंत आवड आहे. पुराणांचा अभ्यास करणारे सूत ऋषी हे त्या अरण्यामधे आलेले असताना, एकदा प्रसंगाने त्या महर्षिंनी सूतांना विचारलं, महाराज,

भक्तिज्ञानविरागाप्तो विवेको वर्धते कथम्।
मायामोहनिरासश्च वैष्णवैः क्रियते कथम्॥१.५॥ माहात्म्य

सर्वसंग परित्याग करून अरण्यामधे राहताहेत ऋषी, पण सर्वही समाजाचं कल्याण व्हावं, अशी त्यांची इच्छा आहे. त्यामुळे त्यांचा संवाद चाललेला आहे. त्यांनी विचारलं, सूतांना,

विवेको वर्धते कथम्?

प्रत्येक व्यक्तिच्या मनामधे, समाजाच्या मनामधे विवेक हा वाढला पाहिजे. सारासार विवेक. योग्य कर्म कोणतं, अयोग्य कोणतं, पाप कोणतं, पुण्य कोणतं सगळा विवेक प्रत्येक व्यक्तिच्या मनामध्ये असला पाहिजे, तो वाढला पाहिजे, तो कसा वाढेल ? हा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि त्याला सहाय्यक म्हणजे, भगवंताची भक्ती, प्रेम अंतःकरणामध्ये पाहिजे, ज्ञान पाहिजे आणि विराग म्हणजे अनासक्त मनाची वृत्ती पाहिजे, निर्लोभ वृत्ति पाहिजे. हा जर विवेक प्रत्येकाच्या मनामधे वाढीला लागेल तर मोह सगळा दूर होईल, सर्व सुखी होतील. असा प्रश्न त्या ऋषींनी केलेला आहे. त्यावेळी सूत हे त्यांना बोलताहेत, ''ऋषिमहाराज, विवेक प्रत्येकाच्या मनामधे उत्पन्न झाला पाहिजे. विषयाची आसक्ती, लोभवृत्ती दूर झाली पाहिजे. खरं-खोटं याचं ज्ञान झालं पाहिजे, आणि भगवंताबद्दल नितांत प्रेम चित्तामधे उत्पन्न झालं पाहिजे. याच्याकरता शुकाचार्य महाराजांनी संपूर्ण भागवत, हे कलियुगामधे सर्वांना समाधान, शांती मिळावी म्हणून सांगितले आहे.

कालव्यालमुखग्रासत्रासनिर्णाशहेतवे।
श्रीमद्‌भागवतं शास्त्रं कलौ कीरेण भाषितम्॥१.११॥ माहात्म्य

जगामधे सर्वही जेवढे जीव म्हणून आहेत, त्या सर्वांनाही कालाची मर्यादा आहे काही. प्रत्येकाचा काल ठरलेला आहे. ब्रह्मदेवांचं आयुष्यसुद्धा ठरलेलं आहे ना. इतर मानवांच्यापेक्षा, देवांच्यापेक्षा अधिक असेल. पण कायम राहणारे ब्रह्मदेवसुद्धा नाहीयेत. त्यामुळे आपला जो काल आहे, त्या कालामध्ये आपण सुखी व्हावं असं प्रत्येकाला वाटतं. त्याकरता जी साधनं आहेत जगामध्ये, व्यवहारामध्ये तीच साधनं खरी आहेत, सुखाची तीच साधनं आहेत, अशीही कल्पना झालेली आहे.

जगामधे अविनाशी सुख आहे अशी कल्पनासुद्धा नाहीये कोणाला. त्यामुळे खरं एकंदर सुख कोणतं आहे, आनंद, पूर्ण आनंद कोणता आहे आणि अपूर्ण आनंद हा जगामधे असलेला कसा

आहे, हे सर्व दाखवण्याकरता, हे भागवतशास्त्र शुकाचार्य महाराजांनी मुद्दाम सांगितलेलं आहे. याच्यामध्ये सगळ्या विषयांचा विचार त्यांनी केलेला आहे. मनाची शुद्धी करणारं हे एक मोठं साधन आहे. अनेक जन्मांचं जर पुण्य असेल तरच भागवताचं श्रवण घडतं.

परीक्षित राजाला भागवत कथा सांगण्याकरता शुकाचार्य महाराज आपल्या आश्रमातून बाहेर पडले हे देवांना समजले. परीक्षित राजाचा मृत्यू जवळ आलेला आहे. सातव्या दिवशी त्याचा देहांत होणार आहे. शुकाचार्य महाराज आपणहून त्याला सांगण्याकरता निघाले. देवमंडळी स्वर्गलोकातून आली. शुकाचार्य महाराजांना नमस्कार केला आणि बरोबर येताना स्वर्गामधे जे अमृत आहे, त्या अमृताचा एक घडा भरून आणला.

त्यांनी शुकाचार्य महाराजांना विनंती केली, ''महाराज, आम्हाला आपल्याजवळ भागवत कथारूपी जे अमृत आहे ते द्या आणि हे आम्ही आणलेले अमृत आहे ते तुम्ही घ्या. हे अमृत त्या परीक्षित राजाला तुम्ही पाजा म्हणजे त्याला मृत्यू येणार नाही. आम्हाला भागवत ऐकायचंय''.

हसले शुकाचार्य. ''तुमच्या स्वर्गातले अमृत तुम्ही रोज पिता पण तुम्ही कुठे अमर आहात? तुमचंही पुण्य संपल्याबरोबर तुम्हाला खाली यावं लागतं.'' तेव्हा भागवताला अमृताने विकत घ्यायचं किंवा अमृत द्यायचं आणि भागवत ऐकायचं ही त्यांची इच्छा शुकाचार्यांना पसंत पडली नाही. हे खरे भक्त नाहीत म्हणाले.

त्यांनी सांगितलं, ''पाहू सध्या सवड नाही.'' त्यांना सोडून दिलेलं आहे, निघून गेलेले आहेत. फक्त परीक्षित राजाला भागवत सांगण्याकरता आलेले आहेत.

सनकादिक ऋषि यांनी नारदांना हे भागवत सांगितले. भागवताचं श्रवण कसं करावं हा सगळा विधी सनतकुमारांनी सांगितला. नारदांची आणि सनतकुमारांची भेट कुठे झाली हा प्रश्न ऋषींनी केलेला असताना ती कथा सांगताहेत सूत.

नारदमहर्षि हे बद्रिकाश्रमामध्ये आलेले आहेत, काही प्रसंगाने आणि त्याच ठिकाणी ब्रह्मदेवांचे जे पूर्ण ज्ञानी मानसपुत्र आहेत सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार. त्यांची आणि नारदांची भेट झाली. नारदांचं मुख अगदी खिन्न पाहिलं त्या सनतकुमारांनी आणि त्यांनी विचारलं ''नारदा, काय झालं तुम्हाला? खिन्न होण्याचं कारण काय ? खेद किंवा अशांती कोणाला होते ? संसारामधे आसक्त झालेला जो आहे, त्याला खेदाचा प्रसंग येतो. तुम्ही तर सर्व

संग सोडून दिलेला आहे. तेव्हा तुम्हाला कशाबद्दल खेद वाटतो आहे ?'' नारदांनी आपली हकीकत सांगण्याला आरंभ केला.

अहं तु पृथिवीं यातः ज्ञात्वासर्वोत्तमामिति ।।१.२८ ।। माहात्म्य

नारदमहर्षिंना सर्व ठिकाणी संचार करण्याची शक्ती होती. मृत्यूलोकामध्ये फिरावं, स्वर्गलोकामध्ये, ब्रह्मलोकामध्ये कुठेही, पाताललोकामध्ये कुठेही जाऊ शकत होते, मोठे योगी होते.

नारद म्हणाले, ''ऋषीमहाराज मी या पृथ्वीवर गेलो फिरण्याकरता, मला पहायचं होतं मृत्युलोक कसा आहे ? आणि सर्व ठिकाणी मी फिरलो. प्रयाग क्षेत्र आहे, काशी क्षेत्र आहे, त्याचप्रमाणे गंगा, गोदावरी यांच्या तीरावर फिरलो. सगळ्या तीर्थांमध्ये मी फिरलो पण माझ्या मनाचं समाधान काही झालेलं नाहीये.'' आत्ता कलियुग सुरू झालेलं आहे. नारदांची आणि सनतकुमारांची भेट होऊन हजार वर्ष होउन गेलेली आहेत. त्यावेळची हकीकत नारद सांगताहेत. आत्ता कलियुगाला किती दिवस झाले आणि किती आता बिघडलेलं आहे, हे काही सांगण्याची आवश्यकता नाही.

माझ्या मनाचं समाधान काही झालं नाही. हा जो कली आहे, कलियुग, त्याने अधर्माला बरोबर घेतलं, पृथ्वीवर आपलं साम्राज्य त्याने स्थापन केलेलं आहे.

सत्यं नास्ति तपः शौचं दया दानं न विद्यते ।<br>
उदरम्भरिणो जीवा वराकाः कूटभषिणः ।।१.३१ ।। माहात्म्य

कुठेही मला सत्य दिसलं नाही, तपश्चर्या नाही, पवित्रपणा नाही, दया नाही, दान नाही, धर्म नाही. पोट भरण्याचं कार्य मात्र सर्व जीवांचं चाललेलं आहे. असत्य भाषण करणारे आहेत. नास्तिक मार्गाकडे त्यांची बुद्धी गेलेली आहे. ईश्वर नाही, स्वर्ग नाही, नरक नाही, धर्म नाही, अधर्म नाही. नाहीनाही सगळे म्हणताहेत. सर्व पवित्र नद्या, देव, मंदिरे सर्व ठिकाणी अशा प्रकारचा अधर्म चाललेला आहे म्हणाले. कोणी योगी नाही, ज्ञानी नाही, कोणी कर्म करणारा चांगला दिसला नाही. अशी स्थिती या कलीने जगामध्ये करून टाकलेली आहे. मी निघालो. फिरत फिरत आणि यमुना नदीच्या तीरावरती आलेलो आहे. भगवान श्रीकृष्णप्रभूंनी यमुना नदीच्या तीरावर गोकुळामध्ये राहून, वृंदावनामध्ये राहून पवित्र लीला केलेल्या आहेत. तिथं मला एक आश्चर्यकारक घटना पहायला मिळाली म्हणाले. एक तरूण स्त्री खाली मान घालून स्वस्थ बसलेली होती. तिच्या

दोन्ही बाजूला दोन वृद्ध पडलेले होते आणि ती तरूण स्त्री रडत होती. कोण आपल्याला या संकटातून मुक्त करणारा भेटेल काय? अशी पाहती आहे. शेकडो स्त्रिया तिला वारा घालताहेत. तिचं समाधान करण्याचा प्रयत्न करताहेत. मी गेलो तिथं. मला पाहिल्याबरोबर ती उठून उभी राहिली. म्हणाली, ''साधूमहाराज थोडं थांबा, माझ्या मनाची अशांती, दुःख तुम्ही दूर करा. आपल्यासारखे सत्पुरूष हे सर्व पापक्षय करणारे आहेत.''

नारद म्हणाले, बाई तू आहेस कोण? तुझी सेवा करणाऱ्या या स्त्रिया कोण आहेत? तुला कसलं दुःख झालेलं आहे सांग मला.

त्यावेळेला त्या स्त्रीने आपला परिचय करून दिलेला आहे

अहं भक्तिरिति ख्याता इमौ मे तनयौ मतौ।
ज्ञानवैराग्यनामानौ कालयोगेन जर्जरौ ॥१.४५॥ माहात्म्य

मला भक्ती म्हणतात म्हणाली. आणि हे दोन माझे पुत्र आहेत. ज्ञान आणि वैराग्य त्यांना म्हणतात. या माझी सेवा करणाऱ्या स्त्रिया म्हणजे गंगा, गोदावरी, नर्मदा नद्या माझी सेवा करताहेत. मी अशीच आणखी सर्वत्र संचार करीत असताना कलियुगाला आरंभ झाला आणि माझी सगळी शक्ती, सामर्थ्य नाहीसे झालं. वृंदावनामध्ये मी आल्यानंतर माझं सामर्थ्य थोडंसं उत्पन्न झालं, तारूण्य मला मिळालं. परंतु ही माझी दोन मुलं मात्र म्हातारी, मूर्च्छित पडलेली आहेत. यांची अवस्था काही चांगली नाहीये. माता तरूण आहे आणि मुलं वृद्ध आहेत असं कुठंतरी पहायला, ऐकायला मिळतं का? नारदा, काय कारण आहे, आपण विचार करा. माझं दुःख एवढं आहे.''

नारद सांगताहेत, कलीला सुरवात झालेली आहे. अधिकार कलीकडे मिळालेला आहे आता. ब्रह्मदेवांनीच दिलेला आहे म्हणाले. कृतयुग झालं, त्रेतायुग झालं, द्वापरयुग झालं. कली सुरू झाल्याबरोबर त्याचा सर्वाधिकार याठिकाणी आहे आणि अधर्माचाच प्रसार त्याला करायचा आहे. म्हणून या ठिकाणी योग नाही, तपश्चर्या नाही, सदाचार नाही, काहीही याठिकाणी पहायला मिळत नाही.

इह सन्तो विषीदन्ति प्रहृष्यन्ति ह्यसाधवः ॥१.५८॥ माहात्म्य

थोडक्यात सांगताहेत नारद. कलियुगामध्ये खरे जे भगवद्भक्त सज्जन असतील त्यांना दुःख

भोगावं लागणार आहे आणि दुर्जन जे असतील, अधर्माने वागणारे त्यांना आनंदाचे दिवस आहेत. हे कलीचं सामर्थ्य आहे. अशाही स्थितीमधे धैर्य धारण करून भगवान श्रीहरीची भक्ती करण्याकडं ज्याची प्रवृत्ती आहे त्याचं संरक्षण भगवंताच्या कृपेनं होतं म्हणाले. सर्व लोकांनी तुझी उपेक्षा केलेली आहे. भक्तिदेवीला सांगताहेत नारद. विषयाची आसक्ती मनामध्ये उत्पन्न झाल्यामुळे कोणाचंच लक्ष नाहीये. वृंदावनामधे तू येऊन पोहचलीस, तारूण्य तुला मिळालेलं आहे. ज्ञान, वैराग्याकडे कोणाचंही लक्ष नाही. सर्वांनी त्यांची उपेक्षा केल्यामुळे यांची अशी दशा झालेली आहे.

हे ऐकल्यानंतर त्या भक्तिदेवीने विचारले, नारदा,

कथं परीक्षिता राज्ञा स्थापितो ह्यशुचिः कलिः ।।१.६३ ।। माहात्म्य

सध्या परीक्षित राजा राज्य करतो आहे ना! 'राजा कालस्य कारणम्' हा सिद्धांत आहे. राजाने इकडे लक्ष देऊ नये? कलीने येऊन आणखी वाटेल तसा अधर्माचा प्रसार करावा. राजा कलीला शासन करू शकत नाही? भक्तिदेवीची ती अपेक्षा आहे. बरं राजा राहू दे, सर्व सृष्टी ज्याने निर्माण केली त्याचंही लक्ष इकडे नाही म्हणाली. भगवान श्रीहरी दयाळू आहेत आणि त्यांच्या डोळ्याला हा अधर्म पडत नाही का? काय कारण आहे सांगा.'' नारद सांगतात, ''भक्तिदेवी, भगवंतांनी व्यवस्था केलेली आहे. काय आहे, भगवान् श्रीहरींनी, गोपालकृष्णांनी या भूमीचा ज्या दिवशी त्याग केला आणि ते वैकुंठलोकाला निघून गेले, त्यादिवशी कलीचा अधिकार सुरू झाला. तोपर्यंत काही कली येऊ शकला नाही. सध्या राज्य करणारा परीक्षित राजा, यानेसुद्धा कलीला शिक्षा का केली नाही, आवरलं का नाही असं तुझं म्हणणं आहे. पण कलियुगामध्ये असा एक मोठा गुण आहे. साधन अगदी सोपं आहे. कलियुगामधे जन्माला आलेले जे जीवात्मे आहेत, त्यांना सुख मिळालं पाहिजे. आणि ते सुख मिळवण्याकरता मोठेमोठे यज्ञ करणं, दानधर्म करणं, योगाभ्यास करणं हे शक्य नाहीये. ही शक्ति कलियुगातल्या जीवांच्याकडे नाहीये. भगवंताची भक्ति करावी, कथा श्रवण कराव्यात, लीला श्रवण कराव्यात. त्या भक्तीनं आपला उद्धार हे कलियुगातले जीवात्मे करून घेतील. हा एक उपाय त्या परीक्षित राजाच्या दृष्टीला पडल्यामुळे कलीचा विरोध त्याने केला नाही. कलियुगाचा अधिकार, सामर्थ्य जास्ती आहे का, भगवंताच्या कथेचं सामर्थ्य जास्ती आहे, हे पहायला मिळेल. संपूर्ण पदार्थ हे साररहित झालेले आहेत, कलीच्या प्रभावामुळे. सर्वही खरं ज्ञान, खरं कर्म काही दिसत नाही''.

नारदांनी याप्रमाणे भक्तिदेवीचं समाधान केलं. तिला थोडीशी शांती मिळाली. या मुलांना

आपण सावध करा, त्यांचा वृद्धपणा दूर करा अशी तिने प्रार्थना केली. नारद म्हणाले कलियुग फार चांगलं आहे, कारण या कलियुगामध्ये भक्तीचा प्रसार होऊ शकतो. भक्तीचा प्रसार झाल्याबरोबर कलीचं सामर्थ्य आपोआप कमी होईल. म्हणून मी प्रतिज्ञा करतो म्हणाले, की सर्वही एकंदर घराघरातून किंवा सर्वही देशातून भक्तीचा प्रसार मी करीन असं नारदांनी सांगितले. ऋषींचा जो पहिला प्रश्न आहे, विवेक वाढला पाहिजे समाजामध्ये, वैराग्य म्हणजे निर्लोभ वृत्ती वाढली पाहिजे तर सुख होणार. त्याशिवाय एकता होणार नाही. त्याकरता भगवद्भक्ती हा मार्ग नारदांनी शोधून काढला आहे.

ईश्वराबद्दल प्रेम जर अंतःकरणामध्ये निर्माण झालं तर सर्वही पातकं, तर जातीलच, पण ज्या पापवासना मनामधे असतील, उत्पन्न होतील त्या वासनाही नाहीशा होतील. अनेक जन्मामध्ये फिरत असताना संतांच्या आणि श्रीहरीच्या कृपेने भगवद्भक्ती अंतःकरणामधे निर्माण होते म्हणतात, ती टिकणं फार कठीण आहे. या मुलांना सावध करा अशी प्रार्थना भक्तीदेवीने केल्यानंतर नारदांनी, त्यांच्याजवळ जाऊन वेदमंत्रपठण केलेलं आहे, उपनिषदांचा पाठ केलेला आहे, गीता पाठ केलेला आहे. पण काहीही उपयोग झाला नाही. ते सावध झाले नाहीत. डोळे उघडावेत, पुन्हा डोळे झाकून पडून रहावं, नारदांचा प्रयत्न फुकट गेलेला आहे. इतक्यात आकाशवाणी झाली –

एतदर्थं तु सत्कर्म सुरर्षे त्वं समाचर।
तत्ते कर्माभिधास्यन्ति साधवः साधुभूषणाः ।।२.३२।। माहात्म्य

नारदा, ज्ञान वैराग्यांना सावध करायचंय म्हणजे त्याचा प्रसार जगामधे करायचा आहे, भक्तीचा प्रसार तुम्हाला करायचा आहे, चांगली इच्छा आहे. पण त्याच्याकरता एक मोठं पुण्यकर्म तुम्हाला करायला लागेल. म्हणजे भक्तीचा, ज्ञानाचा, वैराग्याचा प्रसार सर्वत्र होईल. साधूंची भेट तुम्हाला झाली म्हणजे ते ज्ञानी महात्मे तुम्हाला काय करायचं ते सांगतील. आकाशवाणीनं काही स्पष्ट खुलासा केलाच नाही. नारदांनी विचार केला आता कोणाला विचारावं, कोणतं पुण्यकर्म केलं म्हणजे भगवद्भक्ती, ज्ञान, वैराग्य यांचा प्रसार होईल. तिथून निघाले नारद. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे ज्ञानी लोक भेटले, त्यांना ही आकाशवाणी सांगितली. भक्तीचा, ज्ञानाचा, वैराग्याचा प्रसार हा जर लोकांमध्ये झाला तर सर्व पापक्षय होणार आहे. पापक्षय झाल्यानंतर सर्वांचं कल्याण होणार आहे, सर्वांना शांती प्राप्त होणार आहे.

पण कुणी सांगू शकलं नाही. कोणतं कार्य आहे? त्यांच्या कोणाच्याही लक्षात आलेलं नाही. चिंताग्रस्त झाले नारदमहर्षि, त्यांनी विचार केला, बद्रिकाश्रमामधे जावं, भगवान नारायणानांच विचारावं. अशा रितीने आले तिथे तपश्चर्या करण्याकरता आणि अशावेळेला हे सनतकुमार त्यांना भेटलेले आहेत. त्यांना सर्व वृत्तांत त्यांनी सांगितलेला आहे.

सांगा म्हणाले काय करायचं? आकाशवाणी म्हणजे भगवंताचीच वाणी आहे. त्यांनी जे पुण्यकर्म मला करायला सांगितलं आहे ते कोणतं पुण्यकर्म आहे ज्यायोगाने भक्तीची वाढ होईल, कलीचा वेग थांबणार आहे. आपण श्रेष्ठ आहात. तेव्हा आम्हाला सांगा काय करावं? भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा प्रसार झाला पाहिजे लोकांमध्ये.

सनक, सनंदन, सनातन, सनतकुमार यांचा जन्म सृष्टीच्या आरंभाला झालेला आहे. पण भगवंताच्या कृपेने आपलं शरीर ताब्यात आहे. त्यामुळे कितीही काल गेला तरी यांचं वय पाच वर्षांचंच आहे. पण पूर्ण ज्ञानी आहेत. सनतकुमार म्हणाले, ''देवर्षी नारदा, सोपा उपाय आहे, काही काळजी करू नका. आपणही मोठे विरक्त आहात. मोठे भगवद्भक्त आहात. भक्तीची वृद्धी व्हावी, भगवत भक्ती सर्वत्र सर्वांच्या मनामध्ये उत्पन्न व्हावी अशी तुमच्या मनामध्ये इच्छा उत्पन्न झालेली आहे. आपण कृष्णभक्त आहात, भक्तीची स्थापना करण्याचा संकल्प आपला उत्तम आणि योग्य आहे. अनेक मार्ग ऋषीमंडळींनी दाखवलेले आहेत. योगमार्ग आहे, कर्ममार्ग आहे, ज्ञानमार्ग आहे. पण प्रत्येक मार्गामधे श्रम आहेत, कष्ट फार आहेत. भगवत्कृपा प्राप्त होण्याकरता जो मार्ग आहे तो फार दुर्लभ आहे. आकाशवाणीने आपल्याला जे पुण्यकर्म करायला सांगितलेलं आहे, ते पुण्यकर्म म्हणजे

श्रीमद्भागवतालापः स तु गीतःशुकादिभिः ।।२.६० ।।

भागवतसप्ताह करणं, पारायण करणं हाच एक मार्ग आहे. हा यज्ञ आहे, शुकाचार्यांसारखे ज्ञानी भगवद्भक्त जे आहेत त्यांनी याचा पुरस्कार केलेला आहे. या भागवताच्या पठणाने भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांना जास्ती बल प्राप्त होईल. कलियुगाचं बल, कलीचं बल कमी होईल. भागवत कथेच्या श्रवणाने कलीचे सर्व दोष दूर होत आहेत आणि ज्ञान, वैराग्य, भक्तीही अंतःकरणामधे उत्पन्न होते''. नारदांनी सांगितले, ''ऋषीमहाराज, त्या ज्ञान, वैराग्यांना जागं करण्याकरता, सावध करण्याकरता मी पुष्कळ वेदमंत्र म्हणालो, उपनिषद पाठ केला, गीतापाठ केला तरी ते सावधच झाले नाहीत. भागवतामुळे ते सावध कसे होतील? भागवत तर एक पुराण

आहे''. हा एक संशय नारदांनी व्यक्त केला. त्यावेळी सनतकुमार म्हणाले, ''नारदा, सर्वही वेद, उपनिषदे वगैरे सार ग्रहण करून ही भागवतकथा व्यासांनी निर्माण केलेली आहे. उसामधे रस आहे म्हणाले, त्या रसामधे साखरही आहे. पण ती काढायला पाहिजे वेगळी. नुसता उसाचा रस प्यायला म्हणजे काही साखर मिळत नाही. दुधामध्येच तूप आहे. पण दही केलं पाहिजे, लोणी काढलं पाहिजे, ते तापवलं पाहिजे म्हणजे तूप मिळतं. तसं ही भागवतकथा ही सर्व वेद, उपनिषदं या सर्वातून निराळी काढलेली अशाप्रकारची सारभूत आहे. आणि आपणच व्यासांना सांगितलं नाही का? भगवद्गुण वर्णन करा, भागवतकथा तयार करा, तुम्हीच सांगितलं व्यासांना, आणि तुम्हालाच संशय कसा उत्पन्न झाला?''

मग नारदांचं समाधान झालेलं आहे.

ज्ञानयज्ञं करिष्यामि शुकशास्त्रकथोज्ज्वलम् ॥३.१॥ माहात्म्य

आपण ज्ञानयज्ञ करावा अशी त्यांना इच्छा उत्पन्न झाली. कुठं करायचा हा ज्ञानयज्ञ? भागवतसप्ताह यज्ञाचं स्थान कोणतं हे विचारलं आणि या भागवताचा महिमा, माहात्म्य आपण सांगा. किती दिवसामधे भागवतकथा ऐकावी? काय विधी आहे त्याचा हे सगळं मला सांगा.

कुमार सांगतात नारदा –

गङ्गाद्वारसमीपे तु तटं आनन्दनामकम् ॥३.४॥ माहात्म्य<br>
नानाऋषिगणैर्जुष्टं देवसिद्धनिषेवितम् ॥३.५॥ माहात्म्य

हरीद्वार क्षेत्र आहे गंगातीरावर. त्याठिकाणी ऋषीमंडळी राहताहेत. अत्यंत सात्विक अशी ऋषीमंडळी, रम्य स्थान आहे ते. ज्याठिकाणी राहणाऱ्या जीवांच्या अंतःकरणामधे परस्पर वैरही नाही.

त्या स्थानाचंही महत्व आहे. स्थानात गेल्यावर वैरभाव निघून जातो. असं ते स्थान आहे. त्याठिकाणी तुम्ही हा ज्ञान यज्ञ ठरवा. आणि ह्या ज्ञान यज्ञाला सुरवात झाल्याबरोबर ते ज्ञान, वैराग्य, ती भक्तीदेवी त्याठिकाणी तुमचं भागवताचं कथन सुरू झाल्याबरोबर येऊन पोहोचतील. त्यांची सगळी दुःखं दूर होतील''.

याप्रमाणे सनतकुमारांची आज्ञा झाल्याबरोबर नारद निघाले. नारदांनी त्या कुमारांनाही बरोबर घेतलं आणि गंगातीरावर हरीद्वार क्षेत्रामधे ते येऊन पोहोचले. ही बातमी सगळीकडे

समजली. नंतर सर्व ऋषीमंडळी, देवमंडळी, सिद्धमंडळी, मोठेमोठेज्ञानी, योगी सर्व मंडळी त्याठिकाणी प्राप्त झाली. भृगु ऋषि आहेत, वसिष्ठ ऋषि आहेत, च्यवन, गौतम, परशुराम, दत्तात्रेय, विश्वामित्र अशी सगळी मोठीमोठी मंडळी प्राप्त झाली. सर्व शास्त्रांच्या देवता, सर्व वेदांच्या देवता, त्याठिकाणी आलेल्या आहेत. गंगादिक सर्वही नद्या याही त्याठिकाणी येऊन पोहचलेल्या आहेत, प्रत्यक्ष रूप धारण करून. मग नारदांनी आसनावरती ब्रह्मकुमारांना बसायला सांगितलं. सनतकुमारांची पूजा केली. वंदन केलं सर्वांनी. विष्णुभक्त, विरक्त, संन्यासी हे समोर बसलेले आहेत. नारद मुख्य श्रोते म्हणून बसले. एका बाजूला ऋषीमंडळी, दुसऱ्या बाजूला देवमंडळी. स्त्रिया एका बाजूला अशी योजना श्रोत्यांची झाली. जयजयकार झालेला आहे, वाद्यं वाजताहेत. विमानामध्ये बसून देवांनी कल्पवृक्षाच्या पुष्पांचा वर्षाव केलेला आहे. सगळे अगदी एकाग्र चित्ताने भागवत श्रवणाकरता बसलेले आहेत. त्यावेळेला नारदांना भागवताचं महत्व सांगायला सनतकुमारांनी आरंभ केला.

अथ ते वर्ण्यतेऽस्माभिः महिमा शुकशास्त्रजः।
यस्य श्रवणमात्रेण मुक्तिः करतले स्थिता ।।३.२४।। माहात्म्य

भागवताच्या महिम्याचंही मोठं वर्णन आहे.

सदा सेव्या सदा सेव्या श्रीमद्‌भागवती कथा।
यस्याः श्रवणमात्रेण हरिश्चित्तं समाश्रयेत् ।।३.२५।। माहात्म्य

भागवताचं महत्त्व सांगताहेत सनतकुमार. भागवतकथा ही नेहमी ऐकावी म्हणे. नेहमी वाचावी. नेहमी चिंतन करावं. वेळ असेल त्याप्रमाणे. या भागवतकथा श्रवणाने भगवान श्रीहरी आपल्या चित्तामधे वास्तव्य करतात. अठराहजार श्लोक या भागवतामधे आहेत. बारा स्कंधविभाग आहेत. शुकाचार्यांनी परीक्षित राजाला हे भागवत सांगितले. पुष्कळ शास्त्रं आहेत, पुराणं आहेत पण केवळ भागवत हेच मुक्ती देणारं, समर्थ अशाप्रकारचं आहे.

कथा भागवतस्यापि नित्यं भवति यद्गृहे।
तद्गृहं तीर्थरूपं हि वसतां पापनाशनम् ।।३.२९।। माहात्म्य

म्हणून सांगताहेत कुमार, भागवतकथा ही ज्या घरामधे नेहमी चाललेली असेल, चिंतन म्हणा, वाचन म्हणा, ते गृह तीर्थरूप बनते. तीर्थस्थानं आहेत पुष्कळ. परंतु स्वतःचं घरसुद्धा तीर्थाप्रमाणे पवित्र होऊन जातं. राहाणाऱ्यांची सर्व पातकं नष्ट होताहेत. अनेक यज्ञ आहेत परंतु या भागवताची बरोबरी त्यांना येत नाही. अर्थपूर्ण भागवतशास्त्र निरंतर आणखी वाचणारा, चिंतन

करणारा, त्याच्या अनेक जन्मांच्या पातकांचा नाश होतो.

असं पुष्कळ वर्णन केलं त्यांनी आणि ज्याच्या कानावर ही भागवतकथा जन्म असेपर्यंत पडली नाही, त्याचा जन्म व्यर्थ गेलेला आहे. त्याने केवळ आपल्या जननीच्या नऊ महिने उदरात राहून तिला त्रास, दुःख दिलेलं आहे असं म्हणायला हरकत नाही.

तर याप्रमाणे सनतकुमार सांगताहेत, पण याच्याकरता नियमही सांगताहेत

दिनानां नियमो नास्ति सर्वदा श्रवणं मतम् ।।३.४५ ।। माहात्म्य

भागवत इतक्या दिवसात ऐकावं असं नाहीये, नेहमी ऐकावं. चांगलं आहे. रोज घरातला केर आपण काढतो की नाही, रोज काढायला पाहिजे. शरीराला स्नान करणं, रोज शरीराची शुद्धी करावी लागते, त्याचप्रमाणे सर्वदा कथाश्रवण जर केलं तर मनाची शुद्धी रोज होते. सत्य भाषण करणं, ब्रह्मचर्याने राहणं. असे काही नियम सांगितलेले आहेत. इंद्रियनिग्रहादि या दृष्टीने जर आणखी ऐकलं तर त्या श्रवणाचं विशेष फल सांगितले आहे. म्हणून सात दिवसामधे ऐकावं असा नियम शुकाचार्यमहाराजांनीच करून ठेवलाय याचं कारण काय?

मनसश्चअजयाद् रोगाद् पुंसां चैव आयुषः क्षयात् ।
कलेर्दोषबहुत्वाच्च सप्ताहश्रवणं मतम् ।।३.४९ ।। माहात्म्य

सात दिवसामधे भागवत ऐकावं असं का ठरवलं त्यांनी? मनोजय राहत नाही. चार महिने ऐकू, वर्षभर ऐकू. पण वर्षभर मन स्थिर राहील की नाही संशय आहे. हा एक दोष आहे कलीचा. रोग कोणता शरीरामधे उत्पन्न होईल आणि आपली प्रकृती बंद होईल, शरीर आरोग्यरहित होईल, आयुष्य केव्हा संपेल याचाही भरवसा नाही, म्हणून सात दिवसांमध्ये ऐकायचा संकल्प करून सात दिवसामधे ऐकावं, असा शुकाचार्यमहाराजांनी नियम घालून दिलेला आहे.

त्यावेळेला शौनक ऋषी म्हणाले, ''सूता ज्ञान, वैराग्य योगाभ्यास हे सगळे बाजूला करून आपण या भागवत पुराणाचंच महत्त्व सांगायला लागलात. इतकं महत्त्व या भागवताचं काय आहे? त्याचं कारण सांगताहेत सूतजी. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याजवळ सर्व देव निमंत्रण करण्याकरता आले, ''भगवन, आपण आता वैकुंठलोकामध्ये या. आता आपलं इथलं काम झालेलं आहे. आमच्याही स्थानामधे येऊन आमची पूजा घेऊन चला, अशी प्रार्थना केली''. तसा विचार ठरवला गोपालकृष्णांनी, जावं आता इथून. एकादशस्कंध सबंध त्यांनी उद्धवजींना सांगितला.

कर्मयोग सांगितलेला आहे, ज्ञानयोग सांगितला, भक्तीयोग सांगितला, ब्रह्मचारी, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ, संन्यासी, यांची सर्व कर्मं, कर्तव्यकर्मं कोणती आहेत ही सगळी त्यांना सांगितली. उद्धवजींना हे सगळं मार्गदर्शन केलं. शेवटी उद्धवजींनी विनंती केली, ''भगवंता, आपण आता वैकुंठलोकाला जाण्याचा निश्चय केला म्हणाले, पण मला एक मोठी चिंता उत्पन्न झाली,

आगतोऽयं कलिर्घोरो भविष्यन्ति पुनः खलाः ।।३.५६।। माहात्म्य

हा कली आता म्हणाले सुरवात झाली आहे. त्या कलीमध्ये उत्पन्न होणारे सज्जनसुद्धा दुर्जन होतात. अशी याची स्थिती आहे. आपण निघून गेल्यानंतर भूमीला या दुर्जनांचा भार होईल. ही भूमी कुणाला शरण जाईल? सज्जनांनी कोणाला शरण जायचं? त्यांचं संरक्षण कोणी करायचं याकडे तुम्ही लक्ष द्या आणि माझी प्रार्थना आहे की आपण भक्तांच्याकरता सगुण झालेले आहात. निराकार असून आकार धारण केलेला आहे. आपण जर निघून गेलात तर भक्तांचे रक्षण कोण करील. म्हणून इथेच रहा आपण. उद्धवांची विनंती ऐकल्यानंतर, भगवंतानीही विचार केला, काहीतरी केलं पाहिजे. सज्जनांना आधार पाहिजे काहीतरी मी गेल्यानंतर. म्हणून त्यांनी असा विचार केला

स्वकीयं यद्भवेत्तेजस्तच्च भागवतेऽदधात्।<br>
तिरोधाय प्रविष्टोऽयं श्रीमद्भागवतार्णवम् ।।३.६१।। माहात्म्य

स्वतःचे जे दिव्य तेज ते त्यांनी भागवत पुराणामध्ये ठेवलेलं आहे. गुप्तरूपानी राहातात. भागवत म्हणजे भगवान श्रीहरींची वाङ्मयमूर्ती आहे. तिची सेवा करणं, नुसतं भागवत पुस्तकाचं दर्शन घेणं, प्रदक्षिणा घालणं हे सगळं करावं, कारण भगवंताचं तेज त्याच्यामधे आहे. सप्ताहश्रवणाने अधिक फल सांगितलेलं आहे. अशारितीने सनतकुमार सांगत असताना एक आश्चर्यकारक घटना घडली. ती भक्तिदेवी आपल्या दोन मुलांना, ज्ञान वैराग्यांना घेऊन जी तरूण झालेली आहेत आणि

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव<br>
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।।

भगवंतांचं नामस्मरण करीत, त्या सभेमध्ये प्रविष्ट झालेली आहे. सगळे लोक विचारताहेत. ही आली कशी. सनतकुमार म्हणाले ती भागवतातूनच उत्पन्न झाली. भागवतामध्येच भक्तीदेवी आहे. ज्ञान आहे, वैराग्य आहे. सगळ्या देवता त्याठिकाणी आहेत. त्या भक्तीदेवीने सगळ्यांना सांगितले तुम्ही आहे सज्जनमंडळी, भगवद्भक्त आहात म्हणून मला याप्रमाणे शांती मिळाली,

माझी मुलं तरूण झाली, त्यांची मूर्च्छा दूर झाली. तेव्हा आपल्यासारखे जे भगवद्भक्त आहेत त्यांचीच कृपा सर्व लोकांच्यावर निरंतर रहावी एवढीच भगवंताजवळ प्रार्थना आहे.

आनंद झाला सर्वांना आणि मग नारदांनी विचारलं सनतकुमारांना, ''महाराज या सप्ताहयज्ञांनी भागवतश्रवणाने कोणाकोणाची कोणतीकोणती पापं जातात एवढं मला सांगा.''. आता कितीतरी पापं आहेत. महापापं आहेत, उपपातकं आहेत, ब्रह्महत्या, सुरापान, त्याचप्रमाणे गुरूपत्नीगमन अशी पातकं आहेत. आणखी सुवर्णस्तेय. हेही पापच आहे. यांचा संबंध ठेवणारा हा एक महापापी आहे. आता याच्यापासून दूर रहायचं कसं? संबंधीसुद्धा महापापामध्ये जातो आहे, अशी अनेक पापं आहेत म्हणाले, ही सगळीही पातकं, उपपातकं आहेत, संकरीकरण आहे, मलीनीकरण आहे, कितीतरी आहे. पन्नास माणसांचं काम करणारं यंत्र निर्माण करू नये. हे उपपातकांमध्ये घातलेलं आहे. इतकी मंडळी उपाशी रहाणार आहेत. धर्मशास्त्रकारांनी अगोदरच सांगून ठेवलेलं आहे. नंतर काय व्हायचं ते होतंच पुढं. काम मिळायला लागल्यावर ज्यांना नोकरी मिळाली तेच संप करताहेत. कारखाने बंद पडताहेत, हे सगळे पुढचे दोष आहेत. परंतु इतक्या मंडळींचं अन्न कमी होणारं आहे असं यंत्र तयार करू नये, करता आलं नसतं असं नाही, पूर्वीच्या लोकांना. पण धर्मशास्त्राची आज्ञा आहे, की लोकांची उपजिविका बंद होणार आहे. अशी अनेक पापं आहेत

सप्ताहयज्ञेन कलौ पुनन्ति ते ।।४.११।। माहात्म्य

शरीराने पातकं घडतात, वाणीने घडतात, मनाने घडतात, इच्छेने घडतात, इच्छा नसतानाही घडतात. ही सगळीही पातकं, सप्ताहयज्ञाने, सप्ताहश्रवणाने निघून जातात.

याबद्दलचा एक इतिहास नारदांना सनतकुमारांनी सांगितला.

आत्मदेवः पुरे तस्मिन् सर्ववेदविशारदः ।।४.१७।। माहात्म्य

तुंगभद्रानदीच्या तीरावर दक्षिण प्रांतामधे एका नगरात आत्मदेव नावाचा ब्राह्मण रहात होता. उत्तम वेदशास्त्र ज्ञान आहे. सूर्यासारखा तेजस्वी आहे. सर्व लोकांच्याकडून त्यांने कर्म करवावीत, त्यांना जे जे फल आहे ते ते फल त्यांना मिळवून द्यावं. कुणाला संतती नाही, कुणाला संपत्ती नाही, कुणाला रोग आहे हे सर्व त्याने दूर करावं. असा तो ब्राह्मण प्रसिद्ध होता, पुष्कळ संपत्ती त्याला मिळायची लोकांकडून, त्याला मिळालेली स्त्रीही अशाच प्रकारची चांगल्या कुळात उत्पन्न झालेली होती. असे दोघेही ते पतीपत्नी आपल्या घरामध्ये रहात असताना, संपत्ती आहे पुष्कळ काही कमी नाही, परंतु घरामध्ये त्यांना काही संतती झाली नाही, मुलगा नाहीये. त्या

ब्राह्मणाने दुसऱ्याकडून यज्ञ करवावेत, चांगली पुण्यकर्मं करवावीत, त्यांना मुलं व्हावीत आणि याच्या घरामधे मुलगा नाही. मग त्याने पुण्यकर्म करायला सुरवात केली. दानधर्म करायला सुरवात केली, गाईंचं दान, भूमीचं दान, सुवर्णाचं दान, वस्त्रांचं दान अशी अनेक प्रकारची दानं त्यानी केली. पुष्कळ द्रव्य दानाकरता खर्च केलं. पण मुलगा नाही किंवा मुलगी नाही. चिंताग्रस्त झाला आत्मदेव ब्राह्मण. निराश झालेला आहे आणि अत्यंत दुःखाने वनामधे निघून गेला, तहान लागली होती. एक मोठा तलाव आहे. त्यातलं पाणी प्याला आणि झाडाखाली बसला असताना थोड्याच वेळात एक संन्यासी महात्मा त्याठिकाणी आलेला आहे. तोही पाणी पिऊन झाडाखाली बसला. ब्राह्मणाला वाटलं हा मोठा महात्मा आहे. याला आपण शरण जावं. जवळ गेलेला आहे. त्यांच्या पायावर मस्तक ठेवलेलं आहे. डोळ्यातून अश्रुधारा त्या आत्मदेव ब्राह्मणाच्या सुरू झाल्या. त्या संन्याशाने विचारले, ''बाबा का रडतोस? काय तुला दुःख झालेलं आहे?'' ब्राह्मण म्हणाला, ''महाराज काय सांगू माझं दुःख. मी देवांना काही दिलं, पितरांना काही दिलं तर ते माझ्याकडून काहीही ग्रहण करत नाहीत. मला संतती नाही ना? माझे सबंध जीवीत हे व्यर्थ झालेलं आहे. काय माझं पाप आहे, सांगता येत नाही. एखादी गाय जर मी घरात आणली तर तिलाही वासरू होत नाही, माझ्या पापामुळे. एखादं आंब्याचं झाड उत्तम लावावं. दुसऱ्यानं लावलेले दुसऱ्याच्या शेतातलं, त्याला पुष्कळ आंबे येतात. पण माझ्या झाडाला फळंच येत नाहीत. अशा प्रकारचं माझं पाप आहे, त्यामुळे मला संतती नाहीये. काही आपणच कृपा करा''. त्या संन्यासी महाराजांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाली. ते मोठे ज्योतिषशास्त्रज्ञ होते. योगशास्त्रज्ञही होते. त्याचं काय एकंदर जातक आहे, पुढे काय होणारआहे, हे त्यांच्या लक्षामध्ये आलेलं आहे. त्यांनी त्याला उपदेश केला. ब्राह्मणा, काय करतोस हे मुलं-बिलं घेऊन. संसार वासना काय मनामधे आणतोस?'' ''काय झालं महाराज?'' ब्राह्मण म्हणाला. संन्यासी म्हणाला, ''अरे तुझं प्रारब्ध मी पाहिलं. तुला या जन्मात तर नाहीच पण पुढचे सात जन्म मुलगा होणार नाही. तेव्हा माझं सांगणं असं आहे ही इच्छा तू सोडून दे, वासना टाकून दे''.

संन्यासे सवर्था सुखम् ।।४.३६।। माहात्म्य

आमच्याबरोबर यायचं असलं तर ये म्हणाले, तीर्थयात्रा आपण करू. चांगलं होईल. संन्यासमार्गामधे सुख आहे. पण ब्राह्मणाला तो मार्ग कसा पटणार? अनुभव आल्याशिवाय गृहस्थाश्रम चांगला आहे अशीच त्याची भावना असणार. त्यांनी सांगितलं, ''महाराज, तुम्ही हा उपदेश मला करून काय करता? संन्यास घेऊन काय करायचं? मुलगा नाही काही नाही.

तुमच्यासारख्या संन्याशांना आमच्या घरी भिक्षेला यावं लागतं ना? आम्हीच भिक्षा घालतो ना संन्याशांना? मुलं, बाळं, नातू, पणतू असा संसार सुखाचा आहे. संन्यास कसला सुखाचा आहे? मला मुलगा आपण द्या. ब्राह्मणाचा आग्रह पाहिलेला आहे. शास्त्रदृष्टीने त्याला मुलगा नाही हे त्यांना कळलेलं आहे. पण आता काय करायचं? आग्रही आहे, प्राण त्याग करीन म्हणतो आहे. त्यांनी एक फळ घेतलं, त्याच्या हातात दिलं. हे म्हणाले असं कर तुझ्या घरी जाऊन तुझ्या पत्नीला हे भक्षण करायला सांग म्हणजे मुलगा होईल. पण एक वर्षपर्यंत तिने नियमाने राहिले पाहिजे. खरं बोललं पाहिजे. पवित्रपणे राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे एकवेळ भोजन करून राहिलं पाहिजे. असं एक वर्षभर जर तुझ्या पत्नीने केलं तर चांगला मुलगा होईल. सात जन्म मुलगा होणार नाही म्हणून त्यांनीच सांगितलेलं आहे. पण आग्रहामुळे फळ दिलेलं आहे. शास्त्र खरं, प्रारब्ध खरं का प्रयत्न खरा ह्याचा आणखी विचार चालू झालेला आहे. आनंद झाला ब्राह्मणाला. बरं झालं म्हणाला, या स्वामीमहाराजांच्या कृपेने मला मुलगा होणार. आला घरी आणि आल्याबरोबर त्या स्त्रीला ते फळ दिलं. ''हे फल मिळालेलं आहे. एका सन्यासी महात्म्याने दिलेलं आहे हे तू भक्षण कर.एक वर्षभर नियमाने रहा''. आता ती बाई जी आहे त्याला मिळालेली, तिचा याच्यावर विश्वास होता की नाही कुणाला ठाऊक? काही तिच्या मैत्रिणी घरी आलेल्या आहेत. तिची एक बहिण गावामधे होती गरीब. त्या सगळ्या घरी जमल्यानंतर त्या सर्वांच्यासमोर त्या स्त्रीने सांगितले, ''काय बाई ह्यांनी हे फळ आणलेलं आहे. हे फळ भक्षण केल्यावर मला गर्भधारणा होणार, शक्ती शरीरातली कमी होणार, मग घरातली कामं धामं कुणी करायची? अन्न जाणार नाही''. असे तर्क कुतर्कच ती करू लागली''. ''बरं, कदचित नऊ महिने पूर्ण झाले आणि तो गर्भ आडवा आला तर? आणि मलाच मरण आलं तर?'' असे सगळे विचार तिच्या मनात यायला लागले. त्या बायकांच्या समोर तिने बोलून दाखविले आहे. आणि वर्षभर सगळं खरं बोलायचं, कोणालाही रागवायचं नाही हे सगळे नियम कसे शक्य आहेत? बरं मुलगा झाला तरी काय सुख आहे?

लालने पालने दुःखं प्रसूतायाश्च वर्तते ।
वन्ध्या वा विधवा नारी सुखिनी चेति मे मतिः ।।४.४९ ।। माहात्म्य

ब्राह्मणाला मुलगा पाहिजे. पण ही सांगते आहे त्याचं लालन पालन करणं किती दुःखाचं आहे. त्यापेक्षा ज्या स्त्रीला मुलगा झाला नाही ती स्त्री जास्त सुखी आहे असं माझं मत आहे. त्या बायकाही म्हणाल्या बरं आहे काही खाऊ नकोस तू हे फळ. तुझ्या घरात जी गाय आहे तिला खायला घाल. म्हणजे त्या संन्यासी महात्म्याने जे सांगितलं ते खरं होण्याची पाळी आली. त्या

तपाने, त्याच्या संकल्पाने झाला असता मुलगा. पण ह्याच बाईच्या तर्ककुतर्काने तिने फल खाल्लं नाही. गाईला घातलं ते फळ. पतीला खोटंच सांगितलं. एकदा खोटं बोलायला सुरूवात केल्यानंतर, पतीने विचारलं खाल्लं का फळ? हो खाल्लं म्हणाली. माझे नियम, धर्म सगळे चालू आहेत तुमच्या सांगण्याप्रमाणे. तिची बहिण त्या गावामधे होती. गरीब होती मात्र. त्या बहिणीने त्या स्त्रीला सांगितलं, तू आता गर्भिणी स्त्रीचे सोंग घेऊन रहा म्हणाली. गर्भिणी आहे असं दाखव लोकांना. मी ही गर्भिणी आहे. माझ्या पतीला, दरिद्री आहे, त्याला द्रव्य देत जा. तू श्रीमंत आहेस. मला मुलगा झाल्याबरोबर घराच्या पाठीमागच्या दरवाजाने तुझ्या घरामध्ये मी आणून देईन. मग तुला मुलगा झाला असं तू जाहीर कर. हे या दोघींचं बहिणीबहिणींचं ठरलेलं आहे. झालं. ठरल्याप्रमाणे त्या बहिणीचा मुलगा हिच्या घरामधे आला. हिने सांगितलं की मला मुलगा झालेला आहे. आनंद झाला. आत्मदेव ब्राह्मणाला काय माहिती आहे? संन्यासी महाराज म्हणाले, सात जन्म मुलगा होणार नाही मग झाला कसा मुलगा? पण संन्यासी महात्म्याचं सामर्थ्य आहे हे कळून चुकले. प्रारब्ध आहे, ज्योतिषशास्त्र आहे पण त्या शास्त्राच्या विरूद्ध यांच्या संकल्पाने झाला म्हणाले मुलगा. खरं याला काही माहित नाही. याचा मुलगा कुठे होता तो. याला मुलगा नाही. हे शास्त्रही खरं झालेलं आहे. आला दुसऱ्याचाच मुलगा. ब्राह्मणाला आनंद झालेला आहे आणि त्याचे संस्कार सगळे, जातकर्म संस्कार केले, पुष्कळ दानधर्म केलेला आहे. पुढे तीन महिन्यांनंतर त्या गाईपासून एक मुलगा झाला. त्या महात्म्याचं फल तिच्या उदरामधे गेलेलं होतं. अत्यंत सुंदर, दिव्य अशा प्रकारचा तो मुलगा होता. ब्राह्मणाला आनंद झाला. सगळी मंडळी पहाण्याकरता आली की या ब्राह्मणाला एकही मुलगा आजपर्यंत नव्हता, आता गाईनेही मुलगा दिला. कुणालाही काही माहिती नाही. त्या मुलाचे कान गाईसारखे लांब असल्यामुळे गोकर्ण त्याचं नाव ठेवलं. आणि हा जो मुलगा बाहेरचा आलेला, धुंधुकारी त्याचं नाव आहे. हा मात्र दुराचारी निघालेला आहे. चोरी करणं, सर्वांचा द्वेष करणं, दुसऱ्यांच्या घराला आग लावणं, मुलांना धरून विहिरीमधे ढकलून देणं, अशा प्रकारची दुष्ट कर्मं तो करतो आहे. वेश्यासंगतीमधे सापडून त्याने सर्व द्रव्य नाहीसे केले. मातापित्यांना मारायला सुद्धा त्याने कमी केलं नाही. धन पाहिजे त्याला. मग आत्मदेव ब्राह्मणाचे डोळे उघडलेले आहेत. संन्यासी महाराज सांगत होते, 'संन्यासे सर्वथा सुखम्' हे खरं आहे. मी मात्र आग्रहाने बोललो. मुलं, नातू, पणतू असा संसार सुखाचा आहे गोकुळासारखा. संन्याशावर माझा विश्वास नाही. पण तेच खरे आहे म्हणाले. तेच खरं आता मला अनुभवायला आलेलं आहे म्हणाले. मला मुलगा झाला नसता तर बरं झालं असतं. पूर्वीसारखा मी निःसंग आणि संततीरहित राहणं

हेच चांगलं होतं. अतिशय दुःख झालं. तो जो दुसरा मुलगा गाईपासून झालेला तो मोठा ज्ञान वैराग्य संपन्न होता. त्याने आपल्या पिताजींना उपदेश केला, ''पिताजी, कशाला दुःख करता? संसारामधे सुख आहे अशी कल्पना तुमची होती. ती गेला ना आता? कुणाचा मुलगा आणि कोणाचं द्रव्य म्हणाले. अज्ञान आहे सगळं, मोहामधे पडलेलं आहे सगळं. वनामध्ये जा आपण आणि भगवान श्रीहरीची आराधना करा. भगवद्भक्ती करा आणि शांती प्राप्त करून घ्या''. त्यांनी विचारलं, ''बाबा, काय करू मी वनामधे?'' त्याने थोडक्यात उपदेश केला.

देहेऽस्थिमांसरुधिरेऽभिमतिं त्यज त्वं
जायासुतादिषु सदा ममतां विमुञ्च।
पश्यानिशं जगदिदं क्षणभङ्गनिष्ठं
वैराग्यरागरसिको भव भक्तिनिष्ठः ।।५.७९।। माहात्म्य

पहिल्याप्रथम हा जो अस्थि मांस रूधिराने भरलेला जो देह आहे, शरीर आहे तो देह मी आहे ही बुद्धी सोडून द्या. देहापेक्षा तुम्ही निराळे आहात. आणि देहाचे संबंधी असलेले स्त्रीपुत्रादिक जे आहेत, ते माझे आहेत ही ममता सोडून द्या. संपूर्ण विश्व हे विनाशी आहे, हे टिकणारं नाही, कोणीही चिरंजीव नाही, कोणीही राहाणार नाही. ही आसक्ती मनातून काढून टाका आणि भगवंताचं नामस्मरण करा. गुणचिंतन करा. भागवतधर्माचं श्रवण करा. व्यवहार कमी करा. सत्पुरूषांची संगती करा. मनातल्या वासना कमी करा. दुसऱ्याच्या दोषगुणाचा विचार करू नका.स्वतःचे दोष काय आहेत याचा विचार करा आणि भगवत् सेवा करा, भगवत्कथा ऐका यानी तुमचा उध्दार होईल.

मुलाचा उपदेश ऐकल्याबरोबर आनंद झाला त्या आत्मदेव ब्राम्हणाला. साठ वर्षं वयाला झालेली होती. अरण्यात निघून गेलेला आहे आणि भगवान श्रीकृष्णांची भक्ती म्हणजे भागवतामधील दशमस्कंध जो आहे. रोज त्याने संपूर्ण कृष्णचरित्र वाचन करावं, चिंतन करावं, त्यामुळे त्याचा उध्दार झालेला आहे.

सूत सांगतात, ऋषीमहाराज, पिता निघून गेला वनामधे, ती आई उरली. हा आला आता मुलगा. याच्यावर नियंत्रण करणारा कोणीच नाही. त्यानी आईला मारावं, कुठंय, पैसा कुठंय ? पैसा पाहिजे. अतिशय त्रासली ती बिचारी. वाड्यामधे असलेल्या पाठिमागच्या विहिरीमधे तिने देहत्याग केलेला आहे, आत्महत्या केलेली आहे. तो गोकर्ण जो आहे, तो पूर्वीच घरातून बाहेर

पडलेला होता. त्याला काही सुख नाही व दुःखही नाही, शत्रू नाही, मित्र नाही. भगवंताचं चिंतन करणं, तीर्थयात्रा करणं, सज्जनांच्या भेठीगाठी घेणं, विचार करणं, असं त्याचं चाललेलं आहे. घरामधे धुंधुकारी राहीलेला आहे. वेश्यास्त्रियांना त्याने घरामध्ये, वाड्यामध्येच आणून ठेवलं. आता कोण त्याला विचारणार आहे? आई नाही, बाप नाही. त्या स्त्रियांनी त्याला सांगितलं की, आम्हाला पुष्कळ अलंकार पाहिजेत. चांगली चांगली वस्त्रं पाहिजेत. हे सांगितल्यावर तो गेला बाहेर आणि पुष्कळ अलंकार, वस्त्रे वगैरे आणली. चोरी करून आणलेली आहेत आता ती. त्या स्त्रियांनी, वेश्या स्त्रिया त्या. त्यांनी विचार केला की हा चोरी करतो आहे रोज म्हणाले. याला केव्हातरी राजा धरणार, तुरूंगात टाकणार आणि आम्हालाही धरणार म्हणाल्या. तेव्हा आज इतका पैसा मिळालेला आहे. तो पैसा घेऊन आपण निघून जाऊ या. जाण्यापूर्वी याला मारून जाऊ या. ठार मारू या. असा विचार त्या चार–पाच स्त्रियांनी केलेला आहे आणखी रात्रीच्या वेळी त्याला झोप लागल्याबरोबर त्याला गळफास बांधलेला आहे. मृत्यू लवकर येईना त्याला. निखारे, पेटलेले निखारे त्याच्या अंगावर टाकले त्यांनी आणखी तडफड तडफड करून त्याचा प्राण गेलेला आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या स्त्रियांनी सर्वांना सांगितलं, हा कुठेतरी दुसरीकडे व्यापाराकरता निघून गेलेला आहे, द्रव्य आणण्याकरता गेलेला आहे. सर्व द्रव्य घेऊन त्या निघून गेल्या आपल्याघरी.

तो धुंधुकारी पिशाच्च झालेला आहे. वायुरूपधारी असल्यामुळे अन्न नाही, पाणी नाही, अशा स्थितीमधे अत्यंत कष्ट त्याला होत आहेत. गोकर्ण हा तीर्थयात्रेला गेलेला, त्याला गावचे लोक भेटले. त्यांनी सांगितलं, तुझा बंधू मेलेला आहे म्हणाले. आपला बंधू अनाथ आहे बिचारा, कोणी नाही म्हणून त्या गोकर्णाने गया क्षेत्रामधे जाऊन त्याचा उद्धार होण्याकरता विष्णुपदावर जाऊन पिंड प्रदान केलेलं आहे. स्नान केलेलं आहे. तीर्थयात्रा करीत करीत तो गोकर्ण आपल्या गावामधे प्राप्त झाला. रात्रीच्या वेळेला तो आलेला आहे. आपल्या वाड्याबाहेरच एका कट्ट्यावर बसून राहिला. पुष्कळ दिवसांनी आलेला आहे. तो निजल्यानंतर हा आपला बंधू आहे, हे पिशाच्चरूपी धुंधुकारीने ओळखलं. तो तिथं आला. हा जागा झाला गोकर्ण. एकदम त्यानी वेगळीवेगळी रूपं घ्यायला सुरवात केली. मोठा मेष आहे, बोकड दिसायला लागला, एकदम मोठा हत्ती दिसायला लागला, एक रेडा दिसायला लागला. एकदम मोठा अग्नी पेटलेला आहे असं दिसायला लागलं. गोकर्ण मोठा धैर्यशाली. हा दुर्गतीला, पिशाच्चगतीला गेलेला कोणीतरी जीवात्मा आहे. त्याने विचारलं, ''कोण आहेस तू? अशी दशा तुझी का झाली? असं त्या गोकर्णाने विचारल्यानंतर तो रडायला लागलेला आहे. मला काही बोलता येत नाही म्हणाला, खूण केली. हातामधे जल घेऊन

अभिमंत्रण करून त्याच्या अंगावर गोकर्णाने टाकल्याबरोबर त्याला वाणी उत्पन्न झाली. तो बोलायला लागला.

अहं भ्राता त्वदीयोऽस्मि धुन्धुकारीति नामतः।
स्वकीयेनैव दोषेण ब्रह्मत्वं नाशितं मया ।।५.२७।। माहात्म्य

''बाबा, मी तुझाच भाऊ आहे धुंधुकारी. माझ्याच पापाने ब्राह्मणजन्मासारखा चांगला जन्म मिळालेला असताना, तो जन्म मी फुकट घालवलेला आहे. माझ्या पापाला संख्या नाही. किती लोकांना मी मारलेलं आहे! शेवटी त्या वेश्या स्त्रियांनीच मला मारलं, म्हणून ही माझी दुर्दशा झालेली आहे.''

गोकर्ण म्हणाला, ''तुझा उद्धार होण्याकरता गया क्षेत्री श्राद्ध केलं, पिंड प्रदान केलं आणि अजून तू पिशाच्च कसा राहिलास?'' तो म्हणाला, ''शंभर वेळा जरी गया श्राद्ध केलीस तरी मला मुक्ती मिळणार नाही अशी माझी पापं इतकी आहेत''. गोकर्ण म्हणाला, ''तू आता जाऊन स्वस्थ रहा तुझ्या स्थानात''. तो गेलेला आहे पिशाच्च. सकाळी प्रातःकाल झाल्यानंतर गोकर्ण आपल्या वाड्यामधे आलेला आहे ही बातमी गावातल्या लोकांना समजली. मोठा महात्मा आहे हा. पहिल्यापासूनच त्याच्याबद्दल मोठा आदरभाव होता. सगळी मंडळी गावातली, विद्वान मंडळी, सगळी मंडळी त्याला भेटण्याकरता आली. रात्रीच्या वेळेला ही अशी अशी भेट झाली म्हणाले, बंधूची, तो पिशाच्च झालेला आहे. गया श्राद्ध करूनही तो मुक्त झाला नाही. काय करावं आता. सर्व विद्वान मंडळींनी सांगितलं, पण त्यांना काही कळेना. त्यांनी सांगितलं बाबा तू सूर्यनारायणांना विचार. काय सामर्थ्य संपन्न हे लोक होते. गोकर्णाचं सामर्थ्य किती आहे. सूर्यनारायणांना विचारून तू हे मार्गदर्शन घे म्हणाले, ते सांगतील त्याप्रमाणे कर म्हणाले. सूर्यनारायणांना नमस्कार केला त्यांनी. सूर्याचा रथ थांबवलेला आहे. रथ पुढे जाईना. ''जगत्साक्षी आहात आपण नारायणा, सगळ्यांची पापं पुण्यं आपल्याला माहिती आहेत. माझ्या बंधूला पिशाच्च योनीतून मुक्त करण्याकरता मी काय करावं ते आपण सांगा.'' त्यांनी लगेच सांगितलं.

श्रीमद्भागवतान्मुक्तिः सप्ताहे वाचनं कुरु ।। ५.४१ ।। माहात्म्य

''भागवतसप्ताह यज्ञ तुझ्या बंधूला पिशाच्च योनीतून मुक्त होण्याकरता तू केलास की तो मुक्त होईल''. गोकर्णाने निश्चय केलेला आहे भागवतकथा सप्ताह करण्याचं त्यानी ठरवलेलं आहे.

अनेक देशातून, गावातून मंडळी सगळी ऐकण्याकरता तिथे आली. पापक्षय व्हायला पाहिजे

आपला. मोठा समाज जमलेला आहे. आसनावरती गोकर्ण बसलेला आहे. कथाकथन करण्याकरता. तो पिशाच्चही आलेला आहे. वायुरूपधारी. रहावं कोठे, सप्ताह ऐकायचा आहे. एक वेळू मोठा वाढलेला आहे, वेळवाचं बेट आहे. त्या एका वेळवात छिद्रातून आत शिरलेला आहे. पिशाच्चाला वायवीय शरीर असतं. शास्त्रकारांनी सांगितलेलं आहे. या मृत्युलोकावरती, भूलोकावरती पार्थीव शरीर आहे. म्हणजे पृथ्वीचा भाग जास्ती आहे. सूर्यलोकामधे तैजस शरीर म्हणजे तेजाचा भाग जास्ती आहे. वरूण लोकामधे जलाचा भाग जास्ती आहे. हे वायवीय शरीर, पिशाच्चयोनी म्हणजे डोळ्यानी दिसत नाही, कारण वायु डोळ्याने दिसत नाही. त्याचं शरीर हे वायुप्रधान आहे. तो त्या छिद्रामधे जाऊन बसलेला आहे. आतल्याबाजूला. सगळी इंद्रिये वगैरे आहेतच त्याला. आणि गोकर्णाने कथा सांगायला आरंभ केला. सायंकाळपर्यंत कथा सांगितली. त्या पिशाच्चानेही ती कथा ऐकली. सात त्याला छिद्रे, गाठी होत्या. एक गाठ फुटलेली आहे. आवाज झालेला आहे. दुसऱ्या दिवशी दुसरी ग्रंथी फुटलेली आहे. सात दिवस श्रवण केलं त्या पिशाच्चाने. त्या वेळवाचे दोन तुकडे झाले आणि आतून तो धुंधुकारी शंख, चक्र, गदा, पद्म धारण करून भगवंताच्या स्वरूपामध्ये बाहेर पडलेला आहे. त्याने आपल्या बंधूला साष्टांग नमस्कार घातलेला आहे.

त्वयाहं मोचितो बन्धो कृपया प्रेतकश्मलात् ।।५.५२ ।। माहात्म्य

''काय उपकार माझ्यावर तुझे झाले आहेत. या पिशाच्च योनीतून तू मला मुक्त केलंस. अन्न खाता येत नाही, पाणी पिता येत नाही, हे सगळे कष्ट माझे दूर झाले. काय दिव्य ही भागवत कथा. सबंध माझी पीडा दूर झाली. असं त्याने पिशाच्चाने पुष्कळ वर्णन केलेलं आहे. आणि याच्या योगानेच सर्वांचं दुःख दूर होईल असा स्वतःचा अनुभव सांगितला असताना त्याला नेण्याकरता विमान आलेलं आहे वैकुंठलोकातून. ते हरीदास आले. गोकर्णाने त्यांना विचारलं, ''याला एकट्याकरताच तुम्ही विमान कसं आणलं? इथे सगळ्या लोकांनी ऐकलंय की. मग यांना नेण्याकरता तुम्ही विमानं का आणली नाहीत?'' सर्वांनी जर श्रवण सारखं केलेलं आहे तर असा फलभेद का झाला? एकट्यालाच वैकुंठलोक!'' हरीदास म्हणाले या लोकांना येण्याची इच्छा आहे का हे तरी विचारा. या सगळ्या लोकांची इच्छा कुठय म्हणाले. वासनाक्षय झाल्याशिवाय काही आणखी वैकुंठलोक मिळणार नाही. आणखी दुसरी गोष्ट, हा पिशाच्च म्हणजे दिवसभर याने ऐकावं आणि रात्रभर त्याचं मनन करावं. ते ज्ञान त्याच्या चित्तामधे अगदी पूर्ण संक्रांत झालेलं आहे. अन्न नाही, पाणी नाही अशा स्थितीमधे त्याने श्रवण केलेलं आहे आणि त्याचं मनन केल्यामुळे, पक्कं त्याच्या चित्तामधे बिंबल्यामुळे आणखी तो अधिकारी झालेला आहे. आणखी एकदा आपण

भागवद्सप्ताह करा असं सांगितलं त्या हरीदासांनी. म्हणजे हे मुक्त होतील. पहिल्यांदा आषाढ महिन्यामधे ही कथा सांगितली गोकर्णाने. त्या हरीदासांच्या सांगण्याप्रमाणे पुन्हा श्रावण महिन्यामधे भागवत सप्ताह यज्ञ केला गोकर्णाने. सगळी मंडळी ऐकायला होती. त्यावेळेला असं झालेलं आहे, हजारो विमानं आलेली आहेत. भगवान् श्रीहरीही साक्षात आलेले आहेत. आणि त्या गोकर्णाला आलिंगन देऊन आपलं स्वरूप त्याला प्राप्त करून दिलं. सगळेही श्रोते पीतांबरधारी, शंख, चक्र, गदा, पद्म धारण करणारे विमानात बसून गोकर्णाच्या कृपेनं हरीलोकाला निघून गेलेले आहेत. त्रेतायुगामधे भगवान रामचंद्र अयोध्येहून आपल्या वैकुंठलोकाला जाताना अयोध्यावासी सर्वही लोकांना बरोबर घेऊन गेले. हा गोकर्ण जो आहे त्याने कलियुगामधे आपल्या गावातल्या सर्व लोकांचा उद्धार केलेला आहे. तर अशा प्रकारचं भागवत कथेचं माहात्म्य सनतकुमारांनी नारदांना सांगितलेलं आहे.

आता यानंतर थोडासा विधी, नियम काय ते सांगताहेत.

सहायैर्वसुभिश्चैव प्रायः साध्यो विधिः स्मृतः ।।६.१।। माहात्म्य

भागवत सप्ताह यज्ञाला पुष्कळ सहाय्य करणारी मंडळी पाहिजेत आणि द्रव्याचीही जरूर आहे. योग्य दैवज्ञाकडून आणि उत्तम मुहूर्त विचारून आणि याला आरंभ करावा.

विवाहे यादृशं वित्तं तादृशं परिकल्पयेत् ।।६.२।। माहात्म्य

हे मुद्दाम सांगताहेत. ज्यांना ज्यांना मुली आहेत त्यांच्या लक्षात राहण्याकरता हे आहे. विवाहाला, कन्याविवाहाला जेवढं द्रव्य लागेल तितक्या द्रव्याची अगोदर तयारी पाहिजे म्हणाले, सप्ताहयज्ञ करायचा म्हणजे. म्हणजे तात्पर्य काय की द्रव्यापेक्षा याला प्राधान्य आहे. त्याचप्रमाणे श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, आषाढापासून हे सर्व महिने त्यांनी सांगितले परंतु सर्वही, कोणत्याही वेळेला करायला हरकत नाही. त्याचप्रमाणे सर्वत्र ही वार्ता सगळ्यांना समजून सांगावी. या ठिकाणी असा यज्ञ होणार आहे. आपण सहकुटुंब याठिकाणी या. सात दिवसपर्यंत आपल्याला सवड नसेल तर एखादा दिवस तरी आपण येऊन श्रवण करा. असं सर्वांनाही कळवावं म्हणाले. पत्र वगैरे लिहून कळवावे. आणखी अशारितीने येणाऱ्यांची सर्व व्यवस्था करणं, त्याशिवाय इतकं द्रव्य कसं लागणार आहे. तेव्हा सगळी येणाऱ्यांची राहण्याची व्यवस्था, ही सगळी करावी आणखी विशाल स्थान जिथे असेल तिथे कथास्थान असावं म्हणतात. सर्व मंडळींना बसण्याकरता मंडप वगैरे घालावा. त्याचप्रमाणे सर्वही एकंदर जे लोक आहेत त्यांची

सर्व व्यवस्था करावी, राहण्याची व्यवस्था वगैरे. पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख असं वाचन करावं. त्याचप्रमाणे आरंभाला अरूणोदयाच्या वेळेला स्नान संध्यादिक सर्व कर्म करून भगवान गणेशांची पूजा आरंभाला करावी. विघ्नं कोणतीही येऊ नयेत म्हणून. पितरांचं तर्पण वगैरे करावं, आणखी भगवान श्रीहरींची स्थापना करून, कृष्णांची, भगवंतांची पूजा करावी आणि प्रार्थना करावी की संसारसागरात मी मग्न झालेलो आहे. माझा उद्धार आपण करा. भागवत ग्रंथाचीही पूजा करावी. आणखी श्रीफल त्याठिकाणी ठेऊन नमस्कार करून भागवत म्हणजे साक्षात गोपालकृष्ण आहेत.या संसारबंधनातून सर्व कर्मबंधनातून मला मुक्ती प्राप्त व्हावी याकरता मी आपल्याला शरण आलेलो आहे. माझी इच्छा आपण पूर्ण करा. अशा रितीने हे सर्वही सांगितलेले आहे. सूर्योदयापासून याला आरंभ करावा. मध्यानकाली भगवंताचं नामसंकिर्तन करावं, भजन वगैरे करावं, आणखी आहार अत्यंत सात्विक अशा प्रकारचा, हविष्यान्न वगैरे जे सांगितलं आहे, तेलकट, तुपकट वगैरे घेऊ नये. शक्तीसामर्थ्य असेल तर उपोषण करून आणखी श्रवण करावं. नुसतं तूप किंवा नुसतं दूध घेऊनही श्रवण करावं. फलाहार घेऊन श्रवण करावं किंवा एकवेळ भोजन करून श्रवण करावं. जे आपल्या प्रकृतिला मानवेल तसं करावं. परंतु मुद्दाम त्यांनी सांगितलंय सूतांनी, सनतकुमारांनी,

> भोजनं तु वरं मन्ये कथाश्रवणकारकम् ।
> नोपवासो वरः प्रोक्तः कथाविघ्नकरो यदि ।।६.४३ ।। माहात्म्य

कोणी एखाद्याला प्रकृति चांगली आहे, त्याने आणखी उपोषण केलं म्हणून आम्ही जर उपोषण करायला लागलो आणखी आमच्या प्रकृतिमधे जर विघ्न आलं तर! श्रवणच बंद होणार ना! त्यापेक्षा भोजन करायला हरकत नाही अशीही संमती त्यांनी दिली आहे. पत्रावलीमधे भोजन करावं. त्याचप्रमाणे मनाचा निग्रह, काम, क्रोध, गर्व, अहंकार वगैरे विकार मनामधे उत्पन्न होऊ नयेत. श्रेष्ठ पुरूषांची निंदा कोणाचीही करू नये. त्याचप्रमाणे काही वर्ज्य पदार्थ जे सांगितलेले आहेत ते भक्षण करू नयेत. आणखी वाणीचा सुद्धा निग्रह करून सत्य वाणी आहे त्याचप्रमाणे सरळ वाणी, विनित वाणी असावी. असं सगळंही त्यांनी, मनाचे नियम, वाणीचे नियम आणखी शरीराचे नियम वगैरे सगळं सांगितलेलं आहे. अशा रितीनं हे सर्व यथाविधी जर केलं तर त्याचं फल प्राप्त होतं. समाप्त झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे आठव्या दिवशी भगवद्गीता वाचावी. आणि सर्व दोष जे काही न्यूनाधिक दोष दूर होण्याकरता विष्णुसहस्त्रनामाचंही पठण करावं हे ही त्यांनी सांगितलं. तशी इच्छा असेल तर भागवत दशम स्कंधाचा आणखी स्वाहाकार, हवनही करावं असाही एक विधी सांगितला आहे.

सनतकुमार सांगतात, ‘‘नारदा हे सर्व माहात्म्य तुम्हाला सांगितलेलं आहे. यामुळे तुमची इच्छा पूर्ण होईल. भक्तीमार्गाचा प्रसार झाला पाहिजे. लोकांची बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. भगवद्भक्तीशिवाय ती होणार नाही. त्याकरता तीही तुमची इच्छा पूर्ण होईल’’. नारदांना अत्यंत आनंद झालेला आहे.

इतक्यात शुकाचार्य महाराज त्याठिकाणी आले फिरत फिरत. सोळा वर्षाचं वय आहे. ‘ज्ञान महाब्धिचंद्रमाः’ त्यांना म्हटलेलं आहे. ज्ञान समुद्रातले चंद्र, अखंड भागवताचं पठण, सारखं मुखाने चाललेलं आहे. अठराहजार श्लोकांचं भागवत पण सबंध पाठ आहे. ह्या भागवताचं माहात्म्य त्यांनी सांगितलेलं आहे. स्वर्गलोकामधे, ब्रह्मलोकामधे, कैलासपर्वतामधे हा रस नाही आहे त्याकरता या भागवताचं तुम्हा सेवन करा अशी सूचना त्यांनी केलेली आहे. भगवान श्रीहरी त्याठिकाणी प्रगट झाले. सगळी ऋषीमंडळी, सगळी देवमंडळी होती आणखी मग तिथे कीर्तनाला आरंभ झालेला आहे. शुकाचार्य महाराज कीर्तन करताहेत. प्रल्हाद स्तालधारी. टाळ धरण्याचं काम प्रल्हादजी करताहेत. इंद्राने मृदंग वाजिवण्याचं काम सुरू केलेलं आहे. कार्तवीर्य अर्जुनाने गायनाचं काम केलेलं आहे. शुकाचार्य महाराज भगवंताचं कीर्तन करताहेत. ब्रह्मदेव आहेत, शंकर भगवान आहेत. वैकुंठपती श्रीकृष्णपरमात्मा तर बसलेलेच आहेत. सर्वांना आनंद झाला. आणि भगवंताने त्या सर्व लोकांना सांगितलं. तुमची भक्ती पाहून मला समाधान झालेलं आहे. काय तुम्हाला मागायचा तो वर मागून घ्या. त्यानी प्रार्थना केली देवाला, ‘‘भगवंता,

नगाहगाथासु च सर्वभक्तैः एभिस्त्वया भाव्यमिति प्रयत्नात्।
मनोरथोऽयं परिपूरणीयः तथेति चोःत्वान्तरधीयताच्युतः ।।६.८९ ।। माहात्म्य

भागवत सप्ताह यज्ञ ज्याठिकाणी चालू झालेला असेल त्याठिकाणी आपल्या या सर्व भक्तमंडळींना घेऊन आपण इथे वास्तव्य करावं ही आमची इच्छा आहे. तथास्तु म्हणून भगवंतांनी सांगितलं. गुप्त झाले. नारदांनी सर्व ऋषीमंडळींचा सत्कार केला आहे. नमस्कार सर्वांना केला. भक्ती, ज्ञान, वैराग्य यांना अत्यंत शांती मिळालेली आहे. त्यांच्या मनाचं समाधान झालेलं आहे. हे नारदांचं काम आहे. शौनकांनी विचारलं, शुकाचार्यांनी परीक्षित राजाला हे भागवत केव्हा सांगितलं? गोकर्णानं केव्हा भागवतसप्ताह केला? आणि देवर्षि नारदांना ब्रह्मकुमारांनी, सनतकुमारांनी केव्हा सांगितलं?

सूत सांगताहेत,

आकृष्णनिर्गमात्त्रिंशद्वर्षाधिकगते कलौ ।
नवमीतो नभस्ये च कथारम्भं शुकोऽकरोत् ।।६.९४।। माहात्म्य

भगवान गोपालकृष्ण हे वैकुंठलोकाला निघून गेल्यानंतर तीस वर्षं परीक्षित राजाने राज्य केलेलं आहे. तेव्हा तीस वर्ष गेल्यानंतर भाद्रपद शुद्ध नवमीपासून पौर्णिमेपर्यंत शुकाचार्यांनी परीक्षित राजाला ही कथा सांगितली. परिक्षीत राजाचं श्रवण झाल्यानंतर कलियुगाचा दोनशे वर्षांचा काल गेला. त्यावेळेला आषाढ शुद्ध नवमीपासून पौर्णिमेपर्यंत गोकर्णाने ही कथा सांगितली. त्यानंतर तीस वर्षांचा कलीचा काल गेला असताना कार्तिक शुद्ध नवमीपासून पौर्णिमेपर्यंत सनतकुमारांनी ही कथा नारदांना सांगितली. असा एक कालनिर्णयही त्यांनी दिलेला आहे. अशी ही भागवत्‌कथा भवरोग दूर करणारी आहे. भगवान श्रीकृष्णांना अत्यंत प्रिय आहे. सर्व आणखी पातकांचा नाश करणारी आहे. यमनगरातून आणि यमाच्या आज्ञेने पापी मनुष्याला नरकात आणण्याकरता यमदूत निघाले असताना यमधर्म त्यांना बोलावतो आहे. आणि त्यांच्या कानामधे सांगतोय,

परिहर भगवद्कथासुमत्तान् प्रभुरहमन्यनृणां न वैष्णवानाम् ।।

''भगवत्‌कथा अत्यंत प्रेमाने श्रवण करणारे श्रद्धेने असतील. त्यांच्याकडे तुम्ही जाऊ नका बाबांनो. त्यांच्यावर माझा अधिकार नाहीये. पापी लोकांवरती माझा अधिकार आहे''. अशा रितीने त्यांनी हे सांगितलेलं आहे. तेव्हा असं हे एकंदर सर्वशास्त्रांचा विचार करून शुकाचार्यांनी सांगितलेली कथा किती निर्मल आहे. शुद्ध आहे, पापक्षय करणारी आहे हे सगळंही आणखी सूतांनी शौनकादिक महर्षींना सांगितलेलं आहे. आणि मग त्यांचे प्रश्न, त्या प्रश्नांप्रमाणे संपूर्ण भागवत हे सूतांनी निवेदन केलेलं आहे.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा। बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात्।।
करोति यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेत् तत्।।११.२.३६।। भा.
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।

।।गोपालकृष्ण भगवान् की जय।। ।।श्रीमद्भागवत गोकर्ण माहात्म्य समाप्त।।

ट

# ।।श्रीमद्भागवत पहिला दिवस।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा।।
तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ।।
तुची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण। स्तवावे ते कवणे कवणालागी।।

यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम्।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः ।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो। मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः ।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम्। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम्।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्। संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्याश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन्। प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम्।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम्।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम्।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम्।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं। तत्र तत्र कृत मस्तकांजलिम्।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं। मारुतिं नमत राक्षसान्तकम्।।
पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम्।।

श्रीगणेशाय नमः

श्रीगुरूचरणारविन्दाभ्याम् नमः।

भगवान वेदव्यास महर्षि, अनेक पुराणग्रंथाची रचना त्यांनी केली. वेदांचे चार विभाग केले. महाभारतासारखा मोठा इतिहास ग्रंथ लिहिला. पण चित्ताला काही शांती लाभेना. नारदमहर्षींच्या मार्गदर्शनाप्रमाणे भागवत महापुराण करावं अशी त्यांना इच्छा उत्पन्न झाली. आरंभाला त्यांनी परमेश्वराचं स्मरण केलेलं आहे. मंगलाचरण. ईश्वर हाच सद्गुरूरूप आहे. ईश्वराची दोन रूपं त्यांनी या श्लोकामधे आरंभाच्या दाखिवलेली आहेत. संपूर्ण सृष्टीचं कार्य करणारा परमात्मा आहे. ईश्वराचं ज्ञान करून देण्याकरता त्याचं लक्षण आरंभाला सांगताहेत. सर्व जगाची उत्पत्ती, स्थिती आणि

प्रलय ही कार्य त्या परमेश्वराची आहेत. त्याच्यापासून होताहेत. सर्वज्ञान ज्याला आहे. स्वयंप्रकाश अशा प्रकारचा हा परमात्मा आणि त्यांनीच आरंभाला ब्रह्मदेवाला सर्वही वेदज्ञानाचा उपदेश केलेला आहे. म्हणजे गुरूस्थानीही भगवान आहे. आणि सृष्टी करण्याचं सामर्थ्य असल्यामुळे सृष्टीकर्ताही तो आहे. तोच सर्वरूप बनलेला आहे. तेच समजून घ्यायचं ज्ञान होणं मोठं कठीण आहे. सूर्याचे किरण पसरलेले असताना पाणी आहे असा भास होतो त्या मृगाला. मृगजल! त्याप्रमाणे त्रिगुणात्मक ही जी मायासृष्टी, हे जे विश्व आहे हे, सच्चिदानंद परमात्मा त्याच्या स्वरूपावर हे भासतं आहे. असत्य मिथ्या आहे. त्याला अधिष्ठानभूत जे सत्यतत्व आहे, परब्रह्मरूप त्याचं ज्ञान झालं म्हणजे हे सर्वही आभास, विश्वाभास मावळून जातो आहे. त्या आणखी आनंदस्वरूप परमेश्वराचं आम्ही चिंतन करतो, ध्यान करतो अशी प्रार्थना आरंभाला व्यासांनी केलेली आहे.

भागवत ग्रंथामधे कोणता विषय सांगितलेला आहे? मुख्य काय सांगितलेलं आहे तर परमेश्वराची भक्ती, आराधना, उपासना हाच मार्ग याच्यामधे सांगितलेला आहे. ईश्वराची भक्ती करावी सर्वांनी. निर्मत्सर म्हणजे मनामधे कामक्रोधादिक विकार ज्यांच्या मनामध्ये नाही आहेत. असे जे आहेत सत्पुरूष, साधू त्यांच्याकरता याठिकाणी ईश्वराची आराधना हा धर्म सांगितला. ईश्वराची आराधना केल्यानंतर ते जे आहे अधिष्ठानभूत, मूलतत्त्व जे आहे परमात्मा, भगवान, परब्रह्म ज्याला म्हणतात त्यांचं ज्ञान होतं. आणि सर्वही मिथ्या, आभास निघून जातात. तापत्रय सर्वही नाहीसं होतं आहे. असं हे भागवत, वेदव्यास मुनींनी केलेलं आहे. ईश्वराच्याच कृपेनेच याचं श्रवण जर घडलं तर तो परमात्मा चित्तामध्ये अभिव्यक्त होतो. असं सर्वही वेदांचं सारभूत हे आहे. हे सर्वांनीही ऐकावं, चिंतन करावं असं आवाहन करून कथेला आरंभ केलेला आहे वेदव्यासांनी.

नैमिष्यारण्यामधे, शौनकादिक ऋषिंचं वास्तव्य आहे. यज्ञयाग चालू आहेत त्यांचे. ईश्वराची उपासनाच ती आहे. त्या यज्ञयागामधे एकदा पुराणांचा ज्यांनी अभ्यास केलेला आहे, अशा प्रकारचे सूत तिथे आलेले आहेत, वेदव्यासांचे शिष्य. आनंद झाला सर्व ऋषिंना. त्यांचं स्वागत केलं, सत्कार केला त्यांनी आणि बोलायला सुरूवात केली, ''सूतजी, वेदव्यासांच्याजवळ राहून आपण सर्वही पुराणांचा अभ्यास केलेला आहे. धर्मशास्त्र सर्व आपण शिकलेले आहात. व्यासमहर्षींची आपल्यावर मोठी कृपा झालेली आहे, सर्वज्ञान आपल्याजवळ आहे. तर आम्हाला आपण सांगा, अनेक शास्त्रं आहेत, अनेक पुराणग्रंथ आहेत, या सर्वांमध्ये, मानवाने जे करावं, मुख्य जे आहे

मानवांना करण्यासारखं ते आम्हाला आपण सांगा. सर्व ऐकण्याला इतकं आयुष्य आता कुणाजवळ आहे. आता कलियुग सुरू झालेलं आहे. अल्प आयुष्य आहे. बुद्धीही अल्प आहे आणि भाग्यही अल्प आहे. ऐकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी असतील, सर्वांचं सार, प्रधान साधन कोणतं आहे तेवढं आपण आम्हाला सांगा''. हा एक प्रश्न आहे. असे पाचसहा प्रश्न ऋषींनी केलेले आहेत. दुसरा प्रश्न त्यांनी विचारला, ''महाराज, देवकी आणि वसुदेव यांचे पुत्र झाले भगवान, श्रीकृष्णांचा अवतार कशाकरता झाला, हेतू काय? श्रीकृष्णअवताराचा हेतू त्यांनी विचारलेला आहे. भगवंताची लीला ऐकणारे अशा प्रकारचे जे आहेत, मोठेमोठे ऋषी हे सगळ्या जगाला सुद्धा पवित्र करतात. उद्धार करू शकतात. त्या भगवान श्रीकृष्णांचं चरित्र आम्हाला सांगा. त्यानंतर भगवंतांनी मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम पुष्कळ अवतार, दहाच अवतार नाही, आणखीही अवतार या भागवतामधे सांगितलेले आहेत. त्या सर्वही अवतारांच्या कथा आपण आम्हाला सांगा. भगवंताच्या कथा कितीही ऐकल्या तरी आमच्या मनाचं समाधान होत नाही. बलरामाच्यांसह भगवान गोपालकृष्ण अवतार घेऊन आले आणि, फार मोठ्या लीला त्यांनी केल्या. त्या श्रीकृष्णांचं संपूर्ण चरित्र आम्हाला आपण सांगा. आम्ही त्याकरता इथे बसलो आहोत. आपण इथे आम्हाला भेटण्याकरता आला ही देवाची कृपा आम्ही समजतो आहे. आपल्या मुखातून ईश्वराचं चरित्र आम्हाला ऐकायचंय''. आणखी एक प्रश्न असा आहे, ''योगेश्वर श्रीकृष्ण भगवान हे निजधामाला गेले, वैकुंठलोकाला गेल्यानंतर ह्या धर्माचं संरक्षण कोणी केलं? धर्मरक्षक कोण आहे?''

याप्रमाणे सूतांनी ऋषींचे प्रश्न ऐकले, त्यांची उत्कंठा, आस्थाही पाहिली. आणि त्यांनी आपले जे गुरूमहाराज शुकाचार्यमहाराज यांना वंदन केलेलं आहे. आणि सांगायला आरंभ केला. नरनारायण देवता आहे भारतवर्षाची. त्या नरनारायणांनाही नमस्कार केला सूतांनी. आणि विद्यादेवी सरस्वतीला वंदन करून आरंभ करताहेत.

''ऋषिमहाराज, आपण फार चांगले प्रश्न मला विचारलेले आहेत. सर्व लोकांचं कल्याण यामुळे होणार आहे. श्रीकृष्णांचं चरित्र, आणखी अवतारांची चरित्रं, सगळी आपण विचारलेली आहेत. पहिला प्रश्न म्हणजे सर्व साधनांमधे श्रेष्ठ साधन कोणतं? सार काय सर्व ग्रंथांचं. ते सांगताहेत :

स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे।
अहेतुकी अव्यवहिता ययाऽऽत्मा सम्प्रसीदति ।।१.२.६ ।। श्री. भा.

साधनं जी सांगितलेली आहेत, त्या साधनांचं फल काय म्हणाले? भगवान श्रीहरीविषयी अंतःकरणामधे अत्यंत प्रेम निर्माण झालं पाहिजे. तरच त्या साधनांचा उपयोग आहे. ती भक्ती अशी निर्माण झाली पाहिजे की अहेतुकी भक्ती पाहिजे. संसारामध्ये असणाऱ्या जीवांना अहेतुक बनताच येत नाहीये. काही मनामधे हेतू नाही आणि देवावर प्रेम करायचं. कोणकोणावर प्रेम करतोय? प्रत्येकाच्या मनामध्ये काही हेतू असल्याशिवाय कोणी प्रेम करत नाही. ईश्वराची भक्ती निर्हेतुक पाहिजे आणि अप्रतिहत पाहिजे. अखंड चालू पाहिजे. सात दिवस आपल्याला भागवत श्रवण करायला मिळतंय. तसं नाही अखंड श्रवण झालं पाहिजे. म्हणजे चित्ताला प्रसन्नता प्राप्त होते. आणि त्या भक्तीच्या योगाने ज्ञान आणि वैराग्य यांचाही लाभ होतो.

परब्रह्म परमात्मा ज्याला म्हणतात, त्याचं ज्ञान होतं, साक्षात्कार होतो आहे. म्हणून भगवंताच्या कथा, लीला निरंतर श्रवण कराव्यात, चिंतन कराव्यात. मोठे मोठे ऋषि, महात्मे भगवान श्रीहरीच्या कथा श्रवण करून, अंत:करणामध्ये भगवत्‌भक्ति ज्यांच्या निर्माण झाली आहे, असे ते महात्मे, भगवत भक्त, काम क्रोधादि विकार सर्वही त्यांच्या चित्तातले नाहीसे झालेले आहेत. प्रसन्न चित्त आहे आणि भगवंताचे ज्ञान, साक्षात्कार त्यांना होतो, आणि कृतार्थ ते होताहेत.

अशा प्रकारचा हा भगवान श्रीहरी, अनेक रूपं त्यानी धारण केलेली आहेत. विश्व निर्माण केलं पण विश्वाचं संरक्षण करण्याचं कार्यही त्यांनाच करायचं आहे. अनेक अवतार त्यांनी धारण केलेले आहेत. मोठमोठ्या महर्षींनी, भगवान श्रीहरीची उपासना केली आणि आपलं कार्य त्यांनी करून घेतलेलं आहे. भगवान वासुदेव हा सर्वांना ध्येय आहे. ज्ञान, तप, धर्माचरण सर्वाचं फल शेवटी म्हणजे भगवान वासुदेवाची कृपा प्राप्त होणे हे मुख्य आहे. त्याच भगवंताने ही सृष्टी निर्माण केली. आपल्या मायाशक्तिने सामान्य जीवाप्रमाणे तो कार्य करतो आहे, लीला करतो आहे. सर्वही विश्वामधे तो भरून राहिलेला आहे. अनेक जीवरूपेही त्यानेच धारण केलेली आहेत. आरंभाचे मुख्यरूप म्हणजे विराट स्वरूप आहे.

चतुर्दश भुवनात्मक एक ब्रह्मांड अशी अनेक ब्रह्मांडं म्हणजे विश्व आहे. ते विश्वरूप त्यांनी धारण केलं, आणि असा विराटरूपी, विश्वरूपी जो परमात्मा आहे, त्याचं ज्ञान हे, उपासना सामर्थ्याने आणि उपासना बलाने ऋषीमंडळी करून घेतात. त्यांच्याच नाभीकमलातून ब्रह्मदेव निर्माण झाले आणि त्यांनी सगळी सृष्टी पुढे ईश्वराच्या आज्ञेने केलेली आहे. हे विराट स्वरूप

म्हणजे, पुढे झालेले जे अनेक अवतार आहेत त्यांचं मूल कारण आहे. यापासूनच पुढची सगळी रूपं तयार झाली आहेत. म्हणून काही भगवंताची स्वरूपं, अवतार सांगताहेत.

स एव प्रथमं देवः कौमारं सर्गमास्थितः ।।१.३.६।। श्री. भा.

ब्रह्मदेव निर्माण झाले, आणि त्यांना आज्ञा केली परमेश्वरांनी, तुम्ही सृष्टी करा आता, त्यांना ज्ञानाचा उपदेश केला, वेदज्ञान दिलं त्यामुळे सर्व सृष्टीरचनेचे ज्ञानही त्यांना झालेलं आहे. त्यांनी आपल्या संकल्पानेच आरंभाला सृष्टी करण्याला आरंभ केला. मनामध्ये संकल्प झाल्याबरोबर सनक, सनंदन, सनतकुमार आणि सनातन चार पुत्र उत्पन्न झाले.आणि चौघेही ब्रह्मचारी, तपस्वी अशाप्रकारचे भगवंताच्या चिंतनामध्ये निमग्न झाले. तोही भगवंतांचा अवतार आहे, भगवंतानीच ब्रह्मदेवाच्या संकल्पाने हे रूप धारण केलं. त्यानंतर ही पृथ्वी रसातलामध्ये गेलेली होती. तिला वर काढण्याकरता वराहरूप आणि वराह अवतार धारण केला. देवर्षि नारदांचे रूपही त्यांनी धारण केलं. भक्तिमार्गही प्रगट केलेला आहे. नरनारायण हेही अवतार त्यांनीच धारण केलेले आहेत. कपिल अवतार धारण केलेला आहे. अत्रीऋषींचे पुत्र झाले दत्तात्रेय रूपांनी, प्रल्हाद, अलर्क, कार्तिवीर्यार्जुन या सर्वांनाही त्यांनी उपदेश करून कृतार्थ केलेलं आहे. यज्ञ नावाचा भगवंतांनी अवतार धारण केला. मनुराजाचं संरक्षण त्यांनी केलं. नाभी राजाचे पुत्र म्हणजे ऋषभ देव, ऋषभ अवतारही भगवंतांचा झालेला आहे. या सर्वही अवतारांची चरित्र सूत हे पुढे सांगणार आहेत. आरंभाला नुसता उल्लेख करताहेत. हे पृथूराजाचं स्वरूपही भगवंतांनीच धारण केलेलं आहे. सर्वांचं संरक्षण केलं. मस्त्यावतार धारण केला. समुद्रमंथन देव दैत्य करीत असताना, कूर्मावतार धारण केलेला आहे. धन्वंतरी अवतार धारण केला, आयुर्वेद त्यांनी प्रकट केलेला आहे. सर्व दैत्यांना मोहामध्ये पाडून अमृत आपल्या ताब्यात घेण्याकरता मोहिनीरूप धारणं केलं भगवंतांनी. वामन अवतार घेतलेला आहे. परशुराम अवतार धारण करून उन्मत्त झालेले, अशा प्रकारचे क्षत्रिय राजे यांना शासन त्यांनी केलं. सत्यवतीपासून वेदव्यास रूपानी भगवान हे अवतीर्ण झाले. वेदाचे अनेक भाग केले त्यांनी, पुराणांची रचना केली. पुढं देवाचं कार्य करण्याकरता, अयोध्येमध्ये रामचंद्र रूपाने भगवान प्रकट झालेले आहेत. कलियुग सुरू झालेलं असतांना यदुकुलामध्ये श्रीकृष्ण रुपाने भगवान प्रकट झाले आणि भूमीचा भार त्यांनी हलका केलेला आहे. पुढे बुद्धांचं रूप त्यांनी धारण केलेलं आहे आणि शेवटी कलियुगामध्ये कलंकि नावाने भगवान प्रकट होणार आहेत. असे अनेक अवतार आहेत म्हणाले. पण त्या सर्वही अवतारांचे स्वरूप काय आहे, लीला काय आहे, सामर्थ्य आहे हे समजून घेणं म्हणजे अत्यंत कठीण आहे. हे त्याच्या कृपेनेच व्हायचं.

ही भगवंतांची मायाशक्ति सर्वांनाही मोहामध्ये टाकणारी आहे. त्या भगवंताची कृपा होण्याकरता त्याच्या लीला अत्यंत श्रद्धेने ऐकल्या पाहिजेत, चिंतन केल्या पाहिजेत.

इदं भागवतं नाम पुराणं ब्रह्मसम्मितम् ।
उत्तमश्लोकचरितं चकार भगवानृषिः ।।१.३.४० ।। श्री. भा.

वेदव्यास महर्षींनी हे वेदतुल्य भागवत पुराण हे सर्व लोकांच्या कल्याणाकरता म्हणून याची रचना केलेली आहे आणि आपल्या मुलाला म्हणजे शुकाचार्यांना हे भागवत सगळं शिकवलेलं आहे. सर्व वेद, उपनिषदं याचं सार काढून हे भागवत तयार केलेलं आहे. शुकाचार्य महाराजांनी गंगातीरावर प्रायोपवेशन करून बसलेल्या परीक्षित राजाला सांगितले हे भागवत. शुकाचार्य महाराज परीक्षित राजाला भागवत कथन करत असताना ईश्वर कृपा माझ्यावर झाली, मी तिथं होतो म्हणाले. मलाही ऐकायला मिळालेलं आहे. ते संपूर्ण भागवत मी आपल्याला सांगणार आहे. भगवान श्रीकृष्ण निजधामाला गेल्यानंतर भागवत हाच पुराणसूर्य सर्वांच्या रक्षणाकरता म्हणून प्रकट झालेला आहे.

हे ऐकलं शौनकादिक महर्षींनी आणि आनंद झाला त्यांना. त्यांनी सागितलं, ''सूतजी ही भागवतकथा आम्हाला अवश्य ऐकायची इच्छा आहे, आपण सांगा. कोणत्या युगामध्ये हे भागवत तयार झालेलं आहे? वेदव्यासांना कोणी प्रेरणा केली आणि व्यासांनी हे केलेलं आहे''. त्यांचे पुत्र जे शुकाचार्य, नेहमी आत्मसमाधीमध्ये निमग्न असणारे, देहाचं सुद्धा ज्यांना भान नाही. शुकाचार्य पुढे निघालेले आहेत, घरदार सोडून आणि व्यास महर्षी त्यांना आणावं म्हणून पाठीमागे चाललेले आहेत. तरुण वयामध्ये असलेले शुकाचार्य महाराज, रस्त्यामध्ये एका सरोवरात काही अप्सरा स्नान करीत होत्या, त्यांच्या समोरून तरूण अशा प्रकारचे तेजःपुंज शुकाचार्य गेले पण त्यांच्या मनावर काही परिणाम झाला नाही. त्यांचं स्नानाचं कार्य चाललेलं आहे. पाठीमागून हे वेदव्यास महर्षी आले. त्यांना पाहिल्याबरोबर त्या स्त्रिया वर आल्या, वस्त्र नेसून त्या खाली मान घालून उभ्या राहिल्या. व्यासांना आश्चर्य वाटले. व्यासांनी विचारले, ''बायकांनो, माझा तरुण मुलगा तुमच्या समोरून गेला, वस्त्रसुद्धा त्याच्या अंगावर नाही, त्याला पाहून तुम्हाला लज्जा वाटली नाही, काही नाही. आणि मी म्हातारा, मला पाहिल्याबरोबर तुम्हाला लाज वाटली ?'' त्या बायका म्हणाल्या, ''व्यास महर्षी, हे तुम्ही विचारता नां, हेच कारण आहे. तुमच्या मनामध्ये, स्त्री आणि पुरुष ही भेददृष्टी आहे. तुमच्या मुलात हा भेद गेलेला आहे, संपलेला आहे. एकमेव, अद्वितीय जे परमात्म

तत्त्व आहे. तेच मी आहे, या समाधीमध्ये निमग्न असलेले आपले पुत्र, त्यांना पाहून, आमच्या मनावर काही परिणाम झाला नाही.'' शौनक ऋषी विचारतात, ''अशा उच्च भूमिकेवर गेलेले शुकाचार्य यांनी संपूर्ण भागवताचा अभ्यास केला कसा? समाधी काही त्यांनी सोडली काय? ते कोठेही एका ठिकाणी रहात नाहीत शुकाचार्य. संचार नेहमी चालू आहे. कोणाच्याही घरामध्ये थोडावेळ थांबायचं, पुढे जायचे. त्यांनी संबंध भागवत कसं सांगितलं, सात दिवस थांबून. परीक्षित राजानी प्रायोपवेशन करून नदीतीरावर बसण्याचं काय कारण घडले? पराक्रमी राजा असताना मोठा भगवत भक्त असताना त्याने राज्य का सोडले? हे सर्वही आम्हाला सांगा''.

सूत सांगतात, ''ऋषिमहाराज,

द्वापरे समनुप्राप्ते तृतीये युगपर्यये।
जातः पराशराद्योगी वासव्यां कलया हरेः ।।१.४.१४।। श्री. भा.

सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग, कलियुग असा सारखा काल चाललेला आहे, पुन्हा कृतयुग, त्रेतायुग....... तिसरं द्वापरयुग जेव्हा चालू झाले, त्या तिसऱ्या द्वापर युगामध्ये वेदव्यासांचा जन्म झाला. वेदव्यास महर्षी एकेदिवशी आपल्या आश्रमामध्ये प्रातःकालच्या वेळेला विचार करण्याकरता बसले. एकांत आहे, आणि समाधी त्यांची लागली. काय एकंदर, विश्वाची स्थिती कशी आहे हे पाहू लागले ते ऋषी. सर्व एकंदर शक्ति क्षीण झालेली आहे जगाची हे त्यांना दिसून आले. कोणाच्याही मनामध्ये श्रद्धा राहिली नाही, बल राहिलेलं नाही, बुद्धी नाही, आयुष्य नाही. सगळं कमी कमी होत चाललेलं आहे. ही स्थिती ज्या वेळेला वेदव्यासांच्या लक्षामध्ये आली, आरंभाला त्यांनी हा यज्ञमार्ग व्यवस्थित चालू रहावा, वेदाचे चार भाग करून ठेवले कारण पूर्वी एकच वेद होता. त्याचं सबंध अध्ययन कसं करता येईल, आयुष्य पाहिजे, बुद्धी पाहिजे. सोईकरता म्हणून त्यांनी चार भाग केले. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद आणि इतिहास पुराण हाही पाचवा वेदच आहे म्हणे. पैलऋषिंनी ऋग्वेदाचा अभ्यास केला, जैमिनींनी सामवेदाचा अभ्यास केला, वैशंपायनांनी यजुर्वेदाचा अभ्यास केलेला आहे, सुमंतूनी अथर्ववेदाचा अभ्यास केलेला आहे. इतिहासपुराणांचा अभ्यास आमचे पिताजी रोमहर्षण यांनी वेदव्यासांच्या जवळ केलेला आहे. सर्व ज्ञान या शिष्यांना अर्पण केलं वेदव्यासांनी. त्याही शिष्यांनी आपल्या वेदाचे भाग केले, पुराणांचे भाग केले, आपल्या आपल्या शिष्यांना शिकवले आहेत. अशी ही ज्ञानाची परंपरा पुढे चालू राहिलेली आहे. सर्वांनाच काही यज्ञयागाचा अधिकार नाही आहे, वेदाध्ययनाचा अधिकार नाही,

त्यांनाही ईश्वराचे ज्ञान झाले पाहिजे, भक्ति उत्पन्न झाली पाहिजे. म्हणून वेदव्यासांनी महाभारताची रचना केली. किती वाङ्मय त्यांनी तयार केलेले आहे. असं कार्य चाललेलं आहे. सर्व लोकांना मार्गदर्शन घडावे हा उद्देश आहे. आपल्याला योग्य मार्ग कोणता हे समजून घेऊन त्याप्रमाणे त्यांनी जावं. असं सर्व कल्याणाकरता प्रयत्न करताहेत वेदव्यास महर्षी. परंतु त्यांच्या चित्ताला समाधान काही मिळालं नाही, काय झालं म्हणाले, माझ्या मनाला शांती का नाही आहे? महाभारताची रचना केली, महापुराणांची, अनेक पुराणांची रचना केली, सर्व देवतांचे जे अवतार आहेत ते सर्व वर्णन केले, तरीही काय न्यूनता काय आहे? अद्यापी काय करायचं राहिलं आहे? अशा विचारामध्ये वेदव्यास महर्षी असताना, ब्रह्मदेवांच्या आदेशाप्रमाणे, नारद महर्षी त्यांच्या आश्रमात येवून पोहोचलेले आहेत. नारद महर्षी मोठे अधिकारी, ब्रह्मर्षी ब्रह्मज्ञानी. यथाविधी त्यांची पूजा केलेली आहे. बसले आसनावर नारद महर्षी आणि नारदांनीच बोलायला सुरुवात केली.

पाराशर्य महाभाग भवतः कच्चिदात्मना ।
परितुष्यति शारीर आत्मा मानस एव वा ।।१.५.२ ।। श्री. भा.

''वेदव्यास महाराज काय आपल्या मनाचं समाधान आहे की नाही, शांती आहे ना तुमच्या मनाला, दुसरं काय विचारायचं. महाभारतासारखं ग्रंथ आपण केलेला आहे की ज्याच्या मध्ये सर्व ज्ञान आहे, धर्म अर्थ काम मोक्ष चारही पुरुषार्थांच विवेचन,

यद् इहास्ति तदन्यत् यन्नेहास्ति न च क्वचित् ।।

व्यासांनीच प्रतिज्ञा केली, महाभारतामध्ये चार पुरुषार्थासंबंधी जेवढं आहे तेच बाहेर मिळेल ऐकायला. जे यात नाही ते बाहेर नाही आहे. एवढा मोठा ग्रंथ आपण केलात. परमेश्वर स्वरूपाचं ज्ञान करून आपण घेतलेलं आहे आणि आपल्याला काही समाधान दिसत नाही. काय कारण आहे सांगा ?'' वेदव्यास म्हणाले, ''नारदा, तुम्ही बोलला असं, मला काही समाधान शांती नाही काय कारण आहे आपण सांगा, आपण सर्वज्ञ आहात. त्रैलोक्यामध्ये सर्वत्र आपला संचार आहे. सर्वांचा गुणदोष आपल्याला माहिती आहे. माझं काय न्यून, काय माझं शिल्लक राहिलं आहे तेवढं सांगा आणि माझ्या मनाला शांती प्राप्त करून द्या''. नारद म्हणाले, ''वेदव्यास महर्षी,

यथा धर्मादयश्चार्था मुनिवर्यानुकीर्तिताः ।
न तथा वासुदेवस्य महिमा ह्यनुवर्णितः ।।१.५.९ ।। श्री. भा.

धर्म, अर्थ, काम, मोक्ष चारही पुरुषार्थ सर्व जीवांना आवश्यक आहेत. पण या चार

पुरुषार्थासंबंधी जेवढं आणखी महाभारतामध्ये आपण सांगितले आहे, भगवान वासुदेवाचा महिमा, मात्र तेवढा तसा वर्णन केलेला नाही. पुरुषार्थाला प्राधान्य दिलेलं आहे. भगवंताच्या लीला ऐकणारे जे आहेत, चिंतन करणारे, त्यांना पूर्ण शांती प्राप्त होती आहे. म्हणून वेदव्यास महर्षी आपण ज्ञानी आहात. भगवान श्रीहरींनी काय काय लीला केलेल्या आहेत हे तुम्हाला कोणाला विचारायला जायला नको आहे. समाधी लावून आपण बसल्याबरोबर आपल्याला, सर्वही भगवंताचे अवतार, त्यांनी केलेली सर्व चरित्रे आपल्या डोळ्यासमोर येतील. आणि त्याप्रमाणे स्मरण करून तो ग्रंथ, ते पुराण पूर्ण करा, भगवंताचं ज्याच्यामध्ये वर्णन आहे, अशी पुराण रचना आपण करा''.

हे सांगितलं नारदांनी आणि भगवंताच्या भक्तिचा प्रभाव कसा आहे हे सांगण्याकरता आपल्या पूर्वजन्माचा वृत्तांत नारद सांगताहेत.

अहं पुरातीतभवेऽभवं मुने।
दास्यास्तु कस्याश्चन वेदवादिनाम् ।।१.५.२३ ।। श्री. भा.

पूर्व जन्मामध्ये मी एका खेड्यागावात एका दासीचा मुलगा म्हणून जन्माला आलो होतो. पाच वर्षाचा मी झालो. आमच्या गावामध्ये काही संतमंडळी आली. त्यांच्या दर्शनाकरता मी रोज जाऊ लागलो. त्यांच्या मुखातून हरीकथा मला ऐकायला मिळाल्या. रोज प्रसाद मला त्याठिकाणी मिळत असे. तिथच भोजन करणं, तिथंच त्यांची सेवा करणं, कथा ऐकणं, त्यामुळे माझ्या अंत:करणामध्ये भगवतकथा श्रवण करून, भगवत प्रेम निर्माण झाले. त्या सर्व ऋषिमंडळीच्या कृपेने, भगवत् भक्तिच्या प्रभावाने, ज्ञानही मला झाले. हे सर्व विश्व हे मिथ्या आहे. भासणारं आहे, खरंही नाही आणि खोटंही नाही. भासतंय, दिसतंय म्हणून खोटंही म्हणता येणार नाही. विनाशी आहे, एकरूपाने राहू शकत नाही म्हणून सत्यही म्हणता येत नाही. असं काही तरी आहे. त्यालाच मिथ्या म्हणतात. हे मला पक्कं समजलं. चार महिने मुक्काम त्या ऋषींचा झाला, रोज मला हरीकथा श्रवण करण्याचा लाभ झालेला आहे. चातुर्मास संपल्यानंतर ती ऋषिमंडळी निघाली. मला मात्र जाता आलं नाही. माझी आई जिवंत होती. तिला सोडून मला जाता आलं नाही. माझं कर्तव्य आहे. त्यांच्या उपदेशाने मला शांती मिळाली. आपल्या पूर्वजन्माचा वृत्तांत इतकाच नारदांनी सांगितला आणि वेदव्यासांना सांगताहेत. ही भक्ति सर्व लोकांना समजावी, त्यांना मिळावी, ती वाढावी याकरता हा ग्रंथ करा. वेदव्यास विचारतात, ''नारदा, पुढे तुमचा जन्म कसा गेला हे सांगा ना. सर्व चरित्र ऐकवा मला. कसं आयुष्य आपलं गेलं. शरीर तुमचं कसं पडलेलं आहे. पूर्वीचं स्मरण

आपल्याला कसं राहिलं, सगळं सांगा.''

नारद सांगतात, ''ऋषिमहाराज ती सर्व संतमंडळी निघून गेली.

एकात्मजा मे जननी योषिन्मूढा च किंकरी ।
मय्यात्मजेऽनन्यगतौ चक्रे स्नेहानुबन्धनम् ।।१.६.६ ।। श्री. भा.

एकुलता एक मी मुलगा माझ्या मातेला होतो. माझ्यावर अतिशय प्रेम त्या माऊलीचं. परतंत्र आहे. दुसऱ्याची कामंधामं करण्याकरता तिला जावे लागे. अशा रितीने माझा काल चाललेला आहे. मला काही त्या ऋषींच्या पाठीमागे जाता येईना. ते निघून गेले. एके दिवशी माझी माता आपल्या स्वामीच्या घरी गेली कामा करता. परत येताना सर्पदंश तिला झाला आणि तिचे प्राणोत्क्रमण झालेलं आहे. मला समजले हे.

तदा तदहमीशस्य भक्तानां शमभीप्सतः ।
अनुग्रहं मन्यमानः प्रातिष्ठं दिशमुत्तराम् ।।१.६.१० ।। श्री. भा.

तळमळ माझ्या मनामध्ये लागली होती. ते महात्मे कुठे गेले असतील. त्यांना गाठले पाहिजे. त्यांच्या सान्निध्यामध्ये राहिले पाहिजे. पण एक पाश होता माझ्या पाठीमागे आईचा, मला सोडून जाता येईना. सर्पदंश झाला आणि ती गेल्यामुळे ईश्वरांनी मोठी कृपा केली माझ्यावर असे मला वाटलं. म्हणजे आईला मृत्यू यावा असं मला वाटलं असा अर्थ नाहीये. सर्व पाशातून मला मुक्त केलं. कारण मी आता तिकडे वळलेलोच आहे, ईश्वरा शिवाय मला दुसरं काही नाही. निघालो, मी गाव सोडलं, उत्तर दिशेला निघालेलो आहे. अनेक गावं लागली, नगरं लागली, वनं लागली, जाता जाता एका ठिकाणी अरण्यामध्ये मी आलेलो आहे. भूक लागलेली आहे. तहान लागलेली आहे. नदीमध्ये स्नान केलं त्या ठिकाणी. पाणी प्यालो आणखी एका अश्वत्थ वृक्षाखाली डोळे झाकून आसनामध्ये बसलेलो आहे. शांतपणे भगवंताचं चिंतन करू लागलो. ईश्वराच्या कृपेने ते भगवंताचं स्वरूप माझ्या चित्तामध्ये प्रकट झालं. मला अत्यंत तन्मय अवस्था प्राप्त झाली. डोळ्यातून अश्रुधारा वाहताहेत. अंगावर रोमांच उत्पन्न झालेले आहेत. आनंद मला वाटला. इतक्यात काय झालं कुणाला ठाऊक. मी एकदम उठून उभा राहिलो, आसन सोडून दिलं, डोळे उघडले, ते रूप सगळं अदृश्य झालेलं आहे. तो आनंद गेला माझा. पुन्हा मी आसन घालून बसलो आणि पुन्हा मी प्रयत्न करू लागलो. ध्यान करावं, पुन्हा ते रूप मनामध्ये यावं. तो आनंद मिळावा, पण नाही, पुन्हा काही नाही. एवढ्यात आकाशवाणी झाली,

हन्त अस्मिन् जन्मनि भवान् मा मां द्रष्टुमिहार्हति ।।१.६.२२।। श्री. भा.

''बाळ, या जन्मामध्ये माझ्या दर्शनाला तू अधिकारी नाहीस. जोपर्यंत अंत:करणामध्ये अनेक वासना भरलेल्या आहेत, शुभाशुभ वासनांनी अंत:करण अगदी भरून गेलेलं आहे. त्यांना माझं दर्शन होत नाही''. एकदा कसं दाखवलं रूप, तेही सांगताहेत, ''माझं रूप तुला एकदा दाखवल्यामुळे मी नाही असं तुला कधीच वाटणार नाही. तू नास्तिक होणार नाहीस. तुझी श्रद्धा कायम रहावी, म्हणून तुला मी दिसलो. सज्जनांची संगती, सेवा तुला घडलेली आहे. माझ्याबद्दल दृढ प्रेम, तुझ्या चित्तामध्ये उत्पन्न झालेलं आहे. हे शरीर ज्या वेळेला तुझं पडेल, त्या वेळेला पुढच्या जन्मामध्ये साक्षात्कार संपन्न तू होशील. आणि माझ्या कृपेने तू मुक्त होशील''. आकाशवाणी मी ऐकली, वेदव्यास महर्षी, त्या जन्मामध्ये मला काही दर्शन नाही. ईश्वरचिंतन करतो आहे, नामस्मरण करतो आहे. त्या महात्म्यांनी सांगितलेल्या भगवंताच्या कथांचही चिंतन करतो आहे, असा माझा काळ गेला. प्रलयकाल संपत आलेला आहे. पुन्हा सृष्टी रचना करायची आहे. ब्रह्मदेव जागे झाले. त्यांच्या श्वासाबरोबर मी त्यांच्या शरीरामध्ये गेलो होतो. पुन्हा सृष्टी रचनेच्या वेळेला, श्वासातून बाहेर आलो आणि मला हे रूप मिळालेलं आहे. जन्माबरोबर भगवंताचं पूर्ण ज्ञान मला आहे आणि भगवंताच्या कथा निरंतन ऐकाव्या, सांगाव्या लोकांना, लोकांच्याही मनामध्ये प्रेम निर्माण करावे, हे माझे कार्य चाललेलं आहे. माझ्या जन्माचे रहस्य मी तुम्हाला सांगितलं. पण मला हा जो अधिकार मिळाला तो भगवंताच्या भक्ति प्रभावाने मला मिळालेला आहे. त्या भक्तिचा प्रसार होण्याकरता आपण चांगला एखादा ग्रंथ, पुराण एखादं करा''. असं सांगून देवर्षी नारद महर्षी, भजन करीत निघून गेलेले आहेत.

नारदांच्या आदेशाप्रमाणे ही न्यूनता भरून काढण्याकरता वेदव्यास महर्षींनी ठरवलेलं आहे की भगवंताचं चरित्र सर्व वर्णन करायचं. आपल्या आश्रमामध्ये प्रात:कालच्या वेळेला ध्यानस्थ बसले व्यास महर्षी. शुद्ध अंत:करण आहे. ज्ञान संपन्न महात्मे, साक्षात भगवंतांचे हे अवतारच आहेत. भगवंतांची मायाशक्ती कशी आहे, जीवात्मा कसा अनर्थ, संसार दु:ख भोगतो आहे. सर्व दु:ख दूर करण्याकरता भगवंत, भक्तियोग म्हणजे काय आहे, हा सगळा विचार त्यांनी केला. आणि हे सर्व लोकांना समजावून सांगण्याकरता भागवत संहिता त्यांनी तयार केली.

वेदव्यास महर्षी समाधी अवस्थेमध्ये असताना हे भागवत त्यांच्या मुखातून बाहेर पडलेलं आहे. सगळं पाहून लिहिलेलं आहे.

यस्यां वै श्रूयमाणायां कृष्णे परमपूरुषे।
भक्तिरूत्पद्यते पुंसः शोकमोहजरापहा ।।१.७.७।। श्री. भा.

भागवताचं महत्त्व सांगताहेत श्रृती. जे भागवत श्रवण केलेलं असताना भगवान श्रीहरी संबंधी अंत:करणामध्ये भक्ति निर्माण होते आणि त्या भक्तिने काय होते, सगळे शोक मोह दूर होतात. म्हातारपणही निघून जाते म्हणजे शरीराचे जे काही विकार आहेत ते सगळे विकार दूर होताहेत. अशी ही भागवत संहिता तयार करून, शुकाचार्य जे आपले पुत्र आहेत, ज्ञानी, ब्रह्मज्ञानी त्यांनाही त्यांनी शिकवून ठेवली. प्रसार झाला पाहिजे ना!

शौनकांनी पुन्हा विचारले, ''अहो पण शुकाचार्यांनी अभ्यास केला कसा? बाहेर त्यांचं लक्षच नाही आहे ना? समाधीमध्ये नेहमी असणारे. सूतजी सांगतात, ''यतीमहाराज हे जे आत्मज्ञानी महात्मे आहेत, त्यांच्या अंत:करणामध्ये भगवत् भक्ति ही नैसर्गिक असली पाहिजे. भगवंताचे गुण त्या शुकाचार्यांच्या कानावर पडले, कृष्णाचरित्र त्यांनी थोडसं ऐकलं. वेदव्यासांच्या शिष्यांपासून आणि एकदम त्यांची समाधी उतरली. त्या शिष्यांच्या जवळ गेले, शुकाचार्य. असे कुणी तुम्हाला शिकविले. मला घेऊन चला, मला अभ्यास करायचा आहे.

हरेर्गुणाक्षिप्तमतिर्भगवान् बादरायणि: ।।१.७.११।। श्री. भा.

हरीगुण श्रवण केल्याबरोबर ती निर्गुण निराकार ब्रह्मसमाधी सुटली त्यांची आणि आले ते शिष्यांच्याबरोबर वेदव्यासांच्या जवळ. व्यासांपासून सर्व अभ्यास त्यांनी केलेला आहे. उत्तम बुद्धी आहे ज्ञान आहे.

शुकाचार्य भागवताचे वक्ते कसे झाले हे सांगितलं. आता श्रोता परीक्षित राजा याचं चरित्र सांगताहेत.

यदा मृधे कौरवसृञ्जयानां।
वीरेष्वथो वीरगतिं गतेषु ।।१.७.१३।। श्री. भा.

कौरव पांडवांचं युद्ध समाप्त झालेलं आहे अठरा दिवसांनी. सर्वही वीरांचा संहार झाला. दोन्ही पक्षाला जमलेले एकंदर अठरा अक्षौहिणी सैन्य नाहीसे झाले. शेवटच्या दिवशी भीमाने दुर्योधनाचाही नाश केला. मांडीवर गदा प्रहार करून दुर्योधनही खाली पडलेला आहे. अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा यादव हे तिघे दुर्योधनाच्या सैन्यापैकी शिल्लक राहिले होते. अश्वत्थाम्याला पांडवांच्या बद्दल अत्यंत राग आलेला आहे. त्यांच्या सेनापतीने आपल्या बापाला मारलेलं आहे,

त्या सेनापतीला तर मारायचंच आहे. पण त्या पांडवांचाही नाश करायचा आहे. असं अश्वत्थाम्याने ठरवलेले आहे, शेवटच्या दिवशी रात्री वेळ मिळालेला आहे. आपल्या आपल्या शिबिरामध्ये स्वस्थ झोपलेले आहेत. पांडवांना घेऊन गोपालकृष्ण दुसरीकडे गेलेले होते. त्या शिबिरात राहिले नाहीत. दोन्ही दरवाज्यांवरती कृपाचार्य व कृतवर्मा या दोघांना राहण्यास सांगितले अश्वत्थाम्याने. आपण आत शिरलेला आहे. मध्यरात्रीच्या वेळेला. त्याने अगोदर धृष्टद्युम्नाच्या शिबिरामध्ये जाऊन त्याला लाथ मारून जागा केला. लाथा बुक्क्या घालून त्याला मारलं. तुला शस्त्राने मरण येणार नाही म्हणाला, तुला नरकातच पाठवायला पाहिजे. मारलं त्याला. अठरा दिवसपर्यंत हा पांडवांचा सेनापती सुरक्षित राहिला होता. कौरवांचे बदलले सेनापती. भीष्म गेले, द्रोण गेले, कर्ण गेला. हा राहिला होता. तो शेवटी मारला त्याने. याप्रमाणे त्याच ठिकाणी त्या दिवशी द्रौपदीची पाचही मुलं त्या शिबिरामध्ये होती. त्यांनाही ठार मारले अश्वत्थाम्याने. पांडवांच्या वंशाला कोणीही ठेवायचं नाही. निर्वंश पांडव करायचे, हा त्याचा निश्चय झालेला आहे.

दुसरे दिवशी सकाळी ही बातमी समजली. पांडव दुसरीकडे होते, कृष्ण त्यांना दुसरीकडे घेऊन गेले होते आणि हे झालं. सगळे सैन्य राहिलेलं मारलं अश्वत्थाम्याने. सेनापती मारला आणि आपली पाचही मुलं मारलेली आहेत. धर्मराजांच्या मनावर इतका परिणाम झाला, विजय कोणाचा झाला म्हणाले, कौरव विजयी झाले की पांडव विजयी झाले. काय विजय घेऊन करायचंय, सगळी मुलं गेली आता. अभिमन्यू पूर्वीच गेला होता युद्धामध्ये. द्रौपदीला अत्यंत दुःख झालेलं आहे, बिचारी रडत बसलेली आहे. सबंध आयुष्य अपमान आहे, दुःख आहे. अरण्यामध्ये रहावं लागलेलं आहे, आणि अत्यंत अपमान सहन करावा लागलेला आहे. शेवट तरी चांगला होईल, मुलं आहेत आता, आपलं राज्य करतील आता, आपण आनंदात राहू, सगळं गेलं, सगळा आनंद गेला. कृष्णार्जुन तिच्या जवळ आलेले आहेत. अर्जुनाने सागितलं, ''द्रौपदी, आत्ता जाऊन मी त्या अश्वत्थाम्याचा शिरच्छेद करतो आणि मग तुझं समाधान करण्याकरता येतो म्हणाले. निघाले कृष्णार्जुन, रथामध्ये बसून. अश्वत्थाम्याला धरून आणण्याकरता निघाले. तोही आणखी, बाहेर पडलेला आहे, हस्तिनापूर सोडून. तो पुढे जातो आहे आणि त्याला गाठले त्या कृष्णार्जुनांनी. त्याने पाहिले आता आपलं संरक्षण काही यांच्याकडून होणार नाही, मारणार हे आता. म्हणून प्राण रक्षणाकरता त्याने पाणी हातामध्ये घेऊन ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला.

अजानन् उपसंहारं प्राणकृच्छ्र उपस्थिते ।।१.७.२०।। श्री. भा.

सूत सांगताहेत, ''ब्रह्मास्त्राचा उपसंहार कसा करावा हे त्याला ज्ञान मिळालेलं नाही आहे. प्रयोग फक्त ज्ञात आहे. उपसंहाराचं ज्ञान नाही आहे. अर्धवट ज्ञान आहे. तरीसुद्धा त्याने ते सोडले. चारी बाजूला अत्यंत तेज पसरलेलं आहे. सर्व लोकांचा नाश होण्याची पाळी आलेली आहे. अर्जुनाने भगवंतांना विचारले हे कुठले तेज आले म्हणाले, भगवान म्हणाले, हे ब्रह्मास्त्र सोडलेलं आहे, अश्वत्थाम्याने, तूही ब्रह्मास्त्राचा प्रयोग कर. तुला पूर्ण ज्ञान आहे. अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्र सोडलं, अर्जुनानेही आपल्या ब्रह्मास्त्राचा प्रयोग केलेला असताना, सर्व प्रजाजनांचा संहार होऊ लागला. मग भगवंतांनी अर्जुनाला सांगितलं, दोन्हीही अस्त्रांचा उपसंहार तू कर. त्याने लगेच दोन्हीही अस्त्रं शांत केलेली आहेत. आणि रथातून खाली उडी मारून अश्वत्थाम्याला धरलेलं आहे. त्याचे हात दोन्ही बांधून टाकलेले आहेत. आणि त्याला घेऊन निघाले, द्रौपदीच्याकडे त्याला न्यायचे आहे. त्याची परीक्षा पाहताहेत भगवान गोपालकृष्ण, ''का रे अर्जुना त्या द्रौपदीच्याकडे कशाला घेऊन जातोस याला, इथल्या इथे ठार का मारत नाहीस? निजलेल्या मुलांना ज्यांनी मारलेलं आहे, हा किती क्रूर आहे. कशाला जिवंत ठेवतोस याला.'' परंतु आपल्या गुरुजींचा मुलगा आहे, मोठा गुरुभक्त होता अर्जुन. त्याने काही मारलं नाही त्याला. द्रौपदीच्या समोर आणून उभं केलेलं आहे. ती आपली मान खाली घालून रडती आहे बिचारी. काय करावे.

''द्रौपदी हा तुझा अपराधी आणलेला आहे, तू सांगशील ती शिक्षा मी याला करणार आहे.'' वर डोकं उचलून तिने पाहिले. खाली मान घालून अश्वत्थामा उभा राहिलेला आहे. हात बांधलेले आहेत. एकदम उठली. पुत्रशोक नाही, काही नाही, संसार सगळा, पुत्रशोक विसरून गेलेली आहे. आणि अश्वत्थाम्याच्या जवळ जाऊन तिने नमस्कार केला त्याला. मोठा ज्ञानी महात्मा आहे तो. आपल्या गुरुजींचा मुलगा आहे. लगेच तिने अर्जुनाला सांगितले,

मुच्यतां मुच्यतां एष ब्राह्मणो नितरां गुरुः ।।१.७.४३।। श्री. भा.

सामान्य शास्त्र सांगती आहे. विशेष शास्त्र सांगती आहे. हे सगळंही तिने सांगितले आहे. आणि द्रौपदी जे जे सांगेल ती शिक्षा करायची यांनी ठरविले आहे. द्रौपदीने सांगितले याला सोडून द्या. जीवदान द्या याला. हा ब्राह्मण आहे. सर्व धर्म, वेदाचा याने अभ्यास केलेला आहे. आणखी दुसरं कारण तिने अर्जुनाला सांगितले की, ''त्याचा पित्याजवळ तुम्ही अभ्यास केला, त्यांची सेवा केली, द्रोणाचार्यांची, आणि सर्व ज्ञान तुम्ही मिळवलं धनुर्विद्येचं. देवांनाही, सर्वांना अजिंक्य आपणं झालात. तेच द्रोणाचार्य तुमच्यासमोर अश्वत्थाम्याच्या रूपाने उभे राहिले आहेत. हे तुमच्या लक्षात येत नाही. अश्वत्थाम्याला मारायचे म्हणजे द्रोणाचार्यांना मारण्याचा दोष लागेल.'' हेही

कारण सांगितले. आणखी शेवटी हे कारण सांगती आहे ती, अत्यंत दयाभाव मनामध्ये आहे.

मा रोदीत् अस्य जननी गौतमी पतिदेवता।
यथाहं मृतवत्साऽऽर्ता रोदिमि अश्रुमुखी मुहुः ।।१.७.४७।।

''याची माता अजून जिवंत आहे. तिला पुत्रशोक व्हावा अशी माझी इच्छा नाही. पतिव्रता स्त्री आहे. पति गेला, ती या मुलाकडे पाहून जिवंत राहिलेली आहे. यालाही तुम्ही मारून टाकल्यावर जन्मभर तिला दुःख करावं लागेल. मला पुत्रशोकाचा अनुभव येतो आहे. माझ्यासारखं दुःख याच्या माऊलीला देऊ नका एवढीच माझी प्रार्थना आहे.

केवढा दयाभाव मनामध्ये आहे. भगवंतांनी गीतेमध्ये जे सांगितले आहे.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यन्ति योऽर्जुन।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ।।६.३२।। श्री.भगवद्गीता

हा अधिकार श्रेष्ठ योगी पुरुषांचा आहे. आपल्या प्रमाणे सर्वही सुखी असावेत. आपल्याला जी दुःख भोगावी लागतात ती आणखी कोणालाही मिळू नयेत. सगळे दुःखरहित असावेत. ज्याची ही मनोभूमिका आहे तो मोठा योगी आहे. महान भगवत्भक्त, कृष्णभक्त द्रौपदी, सर्व मुलं ज्याने मारलेली आहेत त्या अश्वत्थाम्याला मारू नका म्हणून सांगते. ही आत्मोपम्य बुद्धी जी आहे ही ईश्वराची कृपा आहे. गेली मुलं आता काय करणार? राहिली असती तरी हे मिळालं असतं का ? सर्व मंडळी आश्चर्यचकित झालेली आहेत, द्रौपदी रागाने काही तरी बोलेल, पण राग नाही आहे. सोडून द्या म्हणते. धर्मराजाला सुद्धा आश्चर्य वाटले, की काय ही द्रौपदी, अरण्यामध्ये मला रागावून बोलायची की तुमच्या धर्मामुळे हे सगळं गेलं, राज्य गेलं, दुर्योधनाने सगळं घेतलं आणि आता, केवढा धर्म आहे. भगवान गोपाल कृष्णांनी, सर्व ऋषीमंडळींनींही आणखी फार चांगली आहे द्रौपदी असं सांगितलं. भीमाला मात्र राग आलेला आहे, तो म्हणाला नाही, मी याला जिवंत सोडणार नाही. पुत्र शोकामुळे ही अशी वाटेल तशी बोलती आहे. हिला काही भान नाही आहे. शुद्ध नाही आहे. मी याला जिवंत सोडणार नाही.

भगवान गोपालकृष्ण म्हणाले, अर्जुना, द्रौपदीची मुलं ज्याने मारली, ती द्रौपदी सांगती आहे की याला जिवंत सोडून द्या. तुझा ज्येष्ठ बंधू भीम म्हणतो सोडणार नाही. काय करायचं तुझं तू ठरव बाबा. कितीही दुर्वर्तन करणारा ब्राह्मण असला तरी त्याला देहदंड देऊ नये, अशी माझी आज्ञा आहे.

ब्रह्माबन्धुर्न हन्तव्य आततायी वधार्हणः ।।१.७.५३ ।। श्री. भा.

घर जाळणारा, सर्वांचा नाश करणारा जो आहे त्याला तात्काळ ठार मारावे ही माझी आज्ञा आहे. तू विचार कर मनाने आणि योग्य ते कर. द्रौपदीचीही इच्छा पूर्ण झाली पाहिजे आणि भीमाचंही समाधान झालं पाहिजे. अर्जुन मोठा, ईश्वरभक्त, गुरुभक्त. भगवंताचा अभिप्राय त्याच्या लक्षामध्ये आलेला आहे. ते जरी स्पष्ट बोलले नाही तरी लक्षामध्ये आलेला आहे. त्याने लगेच तलवार उपसली, अश्वत्थाम्याचे सर्व केस कापून टाकले. जन्मापासून त्याच्या मस्तकामध्ये एक दिव्य मणी होता, तो काढून घेतलेला आहे. बालहत्या केल्या त्याने. त्याचं सगळं तेज गेलेलं आहे. त्याला लगेच आज्ञा केली, आमच्या हद्दीमध्ये तू राहू नकोस. दुष्ट ब्राह्मणांना हाच दंड शास्त्रांनी सांगितलेला आहे. देहदंड नाहीये. अश्वत्थामा निघून गेला. सर्वही पांडव पुत्र शोक झाल्यामुळे अत्यंत दुःखी झालेले आहेत. द्रौपदीला बरोबर घेऊन गंगातीरावर गेलेले आहेत आणि जलांजली सर्वांना दिलेली आहे.

इकडे धृतराष्ट्र, गांधारी दुःखामध्ये पडलेले आहेत. सगळी शंभरच्या शंभर मुलं या भीमाने मारून टाकलेली आहेत. तिकडे त्यांना पुत्रशोक झाला. इकडे द्रौपदी, पांडव हेही पुत्रशोकामध्ये व्याकूळ झालेले आहेत. भगवंतांनी सगळ्या ऋषीमंडळींना सांगितलं, यांचं सांत्वन करा, यांना सांगा काहीतरी. कालगती आहे म्हणाले, कालाने कोणत्या वेळेला काय होईल काही सांगता येत नाही. पूर्ण सुख आहे आपल्याला असं वाटता वाटता एकदम दुःखाचा भाग उत्पन्न होतो आहे. अशी काही विलक्षण कालाची स्थिती आहे.

पांडवांच्याकडून यज्ञयाग केले पुष्कळ दिवस झाले. म्हणून त्यांची अनुज्ञा घेऊन द्वारकेला जाण्याकरता भगवान गोपालकृष्ण रथामध्ये जाऊन बसले. आता रथ निघणार इतक्यात ती अभिमन्यूची पत्नी उत्तरा धावत धावत आली.

पाहि पाहि महायोगिन्देवदेव जगत्पते ।।१.८.९ ।। श्री.भा.

''हे योगीश्रेष्ठ, योगीश्वरा, श्रीकृष्णा माझं आपण रक्षण आता करा. दुसरा कोणीही माझं रक्षण करणार नाही. माझ्या पाठीमागे हा बाण आलेला आहे. मी मरणार म्हणाली, मी जिवंत रहाणार नाही. मला जिवंत रहाण्याची इच्छा नाही. पण माझ्या गर्भामध्ये पांडवांचा वंश आहे. त्याचा नाश होवू नये.'' थांबवायला सांगितला रथ. आणि रथातून खाली उतरले गोपालकृष्ण.

अपाण्डवमिदं कर्तुं द्रौणेरस्त्रमबुध्यत ।।१.८.११ ।। श्री. भा.

त्यांच्या लक्षात आले. अश्वत्थाम्याला निदान बंदीखान्यात ठेवायला हवे होते म्हणाले चुकले आमचे. जीवदान दिलं. द्रौपदीच्या समाधानाकरता. त्याला सोडायला नको होतं. त्याच अश्वत्थाम्यानं आणि या उत्तरेच्या गर्भावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग केलेला आहे. ब्रह्मास्त्राचा प्रयोग कोणावर करायचा, कोणावर नाही, केव्हा करायचा, हे सगळे शास्त्रीय नियम आहेत. धर्मयुद्ध लक्षातच नाहीये. क्रोध मनामध्ये उत्पन्न झाल्यामुळे त्याला काही विचार राहिलेला नाहीये. पांडवांच्या अंगावरही पाच बाण आले, ब्रह्मास्त्रामुळे. सुदर्शन अस्त्राने सर्व बाणांचा नाश केला. उत्तरेला सांगितलेलं आहे, जा म्हणाले तू. अंत:पुरामध्ये आनंदात रहा. तुझ्या गर्भाचा नाश होणार नाही. निश्चिंत रहा म्हणाले. हा तुझा मुलगा होणार आहे, तुम्हां सगळ्यांना सुखी करणार आहे. तिला पाठवून दिलेलं आहे आणि भगवान श्रीहरींनी त्या उत्तरेच्या गर्भामध्ये प्रवेश केलेला आहे, सूक्ष्मरूपाने. ब्रह्मास्त्र म्हणजे अमोघ आहे. त्याचा प्रतिकार कोणीही करू शकत नाही. त्याच्यावरती अर्जुनाला ब्रह्मास्त्रंच सोडावं लागलं. असं हे ब्रह्मास्त्र आणि ते गर्भामध्ये गेलेलं आहे. तिथं दुसऱ्या अस्त्राचा प्रयोग करणं म्हणजे धोक्याचं आहे. अर्जुनसुद्धा काही करू शकणार नाही. त्यामुळे भगवान श्रीहरींनी त्या उत्तरेच्या गर्भामध्ये प्रवेश केलेला आहे. नऊ महिने ते त्या गर्भामध्ये राहिलेले आहेत. त्या मुलाचं संरक्षण करताहेत. सर्व बाजूला पसरलेलं ते ब्रह्मास्त्राचं तेज आपल्या गदेने नाहीसं करताहेत. मुलाला त्या तेजाचा स्पर्श होऊ नये म्हणून. हे काय मातेला तरी करता येईल काय ? तो महात्मा परीक्षित राजा केवढा पुण्यवान असला पाहिजे की ज्याच्याबरोबर भगवान श्रीहरी नऊ महिने गर्भात राहिलेले आहेत. ज्यांना गर्भवास नाहीये, भगवंताला कर्म नाही म्हणून जन्म नाही. ही जन्म कर्मं दाखविली ही दिव्यं आहेत. जीवांच्या प्रमाणे नाहीये. ही सगळी व्यवस्था लावून दिलेली आहे. आणखी निघाले पुन्हा द्वारकेला जाण्याकरता. आपली आत्याबाई कुंतीच्या जवळ आले. आता येतो म्हणाले, पुष्कळ दिवस झाले म्हणाले. तुमची मुलं आता राज्यकारभार करतील. तुम्हालाही आनंद दिसेल सगळा. आता जातो म्हणाले मी द्वारकेला. गोपालकृष्ण कोण आहेत ह्याचे ज्ञान कुंतीला उत्तम होते. हा आपला भाचा आहे असं नाही. भावाचा मुलगा असं ती समजतं नाही. त्या कुंतीने स्तुती केलेली आहे.

नमस्ये पुरुषं त्वाऽऽद्यं ईश्वरं प्रकृतेः परम् ।
अलक्ष्यं सर्वभूतानां अन्तर्बहिरवस्थितम् ।।१.८.१८।। श्री. भा.

हे ईश्वराचं स्वरूप आहे. आदि पुरुष आपण आहात, सृष्टी रचना आपल्यापासून झालेली आहे. प्रकृतीचं नियंत्रण करणारे, कोणालाही आपल्या स्वरूपाचं ज्ञान होत नाही. आत बाहेर

असून सुद्धा कोणी ओळखू शकत नाही. मायेचा पडदा आहे. पण असं आपलं स्वरूप अदृश्य असताना सुद्धा सर्व ऋषीमंडळींना श्रेष्ठ मंडळींना भक्ति शिकवण्याकरता आपण प्रगट झालात.

भक्तियोगविधानार्थं कथं पश्येम हि स्त्रियः ।।१.८.२० ।। श्री. भा.

कृष्णावताराचा हेतू काय ? म्हणून एक ऋषींचा प्रश्न आहे. ह्या कुंतीच्या स्तुतीमध्ये तो हेतू आलेला आहे. आपण अवतार घेऊन कशाकरता आलात तर मोठे मोठे महर्षी आपली भक्ति करणारे त्यांना भक्ति कशी करावी हे शिकवण्याकरता आपण आलेले आहात.

कृष्णाय वासुदेवाय देवकीनन्दनायच ।
नन्दगोपकुमाराय गोविन्दाय नमो नमः ।।१.८.२१ ।। श्री. भा.

देवकीला कंसाने कारागृहामध्ये टाकलेलं होतं. आपणही तिच्याजवळ राहिला नाही, राहाता आलं नाही आपल्याला. अत्यंत शोकाकुल झालेली देवकी, आपली माता, तिला त्या कंसाचा नाश करून काराग्रहातून, बंदीखान्यातून सोडविले आपण, पण मातेपेक्षासुद्धा आमच्यावर तुमची कृपा जास्ती आहे. किती संकटं आमच्यावर आली म्हणाली. भीमाला विष पाजलं त्यांनी, अग्नीमध्ये आमचा नाश करण्याचा प्रयत्न केला. अनेक राक्षस आम्हाला भेटले, वनवासामध्ये. त्या सभेमध्ये आणखी दुर्जनांनी द्रौपदीची विटंबना केली. वनवासातली संकटं आम्हाला भोगायला लागली आणि या भारतीय युद्धामध्ये अनेक मोठमोठ्या अस्त्रांचा उपयोग केलेला आहे. या अश्वत्थाम्यानेही पुष्कळ अस्त्रांचा प्रयोग केलेला आहे. पण या सर्वही संकटांपासून आपण आमचं रक्षण केलेलं आहे. तेव्हा ती कुंतीदेवी भगवंताच्या जवळ मागती आहे.

विपदः सन्तु नः शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो ।
भवतो दर्शनं यत्स्याद् अपुनर्भवदर्शनम् ।।१.८.२५ ।। श्री. भा.

खरी विचारी आहे कुंती. भगवान श्रीकृष्णांनी सर्व संकटातून मोकळं केलेलं आहे आम्हाला पण माझी इच्छा अशी आहे की नेहमी संकटाचे प्रसंग आम्हाला यावेत, असं ती मागती आहे. कारण काय ? आम्हाला संकटं आली, आम्हाला दुःखं झाली म्हणजे आपल्याला आमची आठवण होईल. आपण आम्हाला येऊन भेटाल. आपलं दर्शन आम्हाला होईल. चांगल्या कुळामध्ये जन्म आलेला आहे. पुष्कळ संपत्ती मिळालेली आहे. सत्ता मिळालेली आहे. ज्ञान मिळालेलं आहे. याचा परिणाम म्हणजे अंतःकरणामध्ये अहंकार, गर्व निर्माण होतो. आपलं नामही त्याच्या मुखातून येत नाही आणि आपलं स्मरणही कधीच घडणार नाहीये. म्हणून ही संकटस्थिती, दुःखाची स्थिती

आम्हाला असावी हे कुंतीने सांगितले. आणखी तिने सांगितले देवा हे जे माझ्या मनामध्ये स्नेह पाश आहे, ममता, यादव माझे आहेत. ही माहेरची मंडळी, पांडव आहेत. ही सगळी मंडळी सासरची मंडळी ही माझी मंडळी म्हणून जी कृती माझ्या मनामध्ये उत्पन्न झाली हा मोठा पाश आहे. ही ममता आपण तोडून टाका. हा पाश. एवढी माझी इच्छा आहे. आणखी काही दिवस आपण राहिला तर बर होईल. प्रार्थना केली कुंती देवीनं. आणि भगवान गोपालकृष्ण रथातून खाली उतरले. ''जा बाबा रथ घेऊन जा. आज काही आत्याबाईंची इच्छा नाही.'' सगळ्या आपल्या मंडळींना पाठवून दिलं द्वारकेला. काही दिवस तिथं राहिलेले आहेत. धर्मराजाच्या मनाला शोक झालेला आहे ना. मला राज्य करायचं नाही. अरण्यात जाणार असा एक परिणाम झाला त्याच्या मनावर. त्याला घेऊन भीष्माचार्यांच्याकडे गोपालकृष्ण गेलेले आहेत. अर्जुनाला गीता सांगितली त्यालाही असा शोक झाला होता. आपलेच लोक, आपलेच गुरू मोठीमोठी मंडळी आपणच मारायची. काय करायचंय, नको लढाई नको. त्याला उपदेश करून, त्याच्याकडून युद्ध करवलं. विजय त्याला मिळवून दिला पण इथे धर्मराजाला आपण बोध केला नाही. पांडव, गोपालकृष्ण हे भीष्माचार्य ज्या ठिकाणी पडलेले होते त्या ठिकाणी आलेले आहेत. शरशैयेवर पडलेले आहेत भीष्माचार्य. अनेक मोठेमोठे ऋषी, ब्रह्मर्षी, देवर्षी सगळी मंडळी इथे जमलेली आहेत. गोपालकृष्णही त्याठिकाणी आलेले असताना, पडल्या पडल्या हात जोडले भीष्माचार्यांनी आणि त्यांचं स्वागत केलेलं आहे. भगवान श्रीकृष्ण कोण आहेत हे जाणणारे भीष्माचार्य आहेत. हा साक्षात जगदीश्वर आहे. मायेने शरीर धारण करून आलेला आहे. परंतु अनंतरूप आहे. सच्चिदानंदघन आहे. तेव्हा पांडवही आलेले आहेत. त्यांनीही सगळ्यांनी नमस्कार केला भीष्माचार्यांना. पांडवांच्या बद्दल अत्यंत प्रेम भीष्माचार्यांच्या मनामध्ये होतं. भीष्म बोलू लागले, ''धर्मराज, पांडूराजा तुमचा पिता गेल्यानंतर ही जी तुमची माता आहे, तुम्ही लहान होता, तुम्हाला घेऊन ती इथे येऊन राहिलेली आहे. पुष्कळ क्लेश तिने सहन केले. तुम्हालाही पुष्कळ क्लेश भोगावे लागले. काय तुमच्या बाजूला कमी होतं म्हणाले, तुम्हाला दुःख यावीत याचं कारण काय ? धर्मराजासारखा पूर्ण धर्मज्ञ आणि धर्म पालन करणारा आचरण करणारा राजा या बाजूला आहे. गदा हातामध्ये घेऊन भीम एकदा युद्धामध्ये गेल्यानंतर त्याच्यासमोर कोणीही उभा राहू शकणार नाही. ही शक्ति तुमच्या बाजूला आहे. हा नराचा अवतार गांडीव धनुष्य घेऊन आणखी युद्धाला उभा राहिलेला असताना देव दैत्य कोणीही याच्या समोर उभं राहू शकणार नाही. ही अस्त्र शक्ति तुमच्या बाजूला आहे. सर्वांपेक्षा महत्वाचं म्हणजे सुहृद तुमचा मित्र हा भगवान गोपालकृष्ण आहे म्हणाले. असं असताना

तुम्हाला ही दु:ख संकटं भोगावी लागावी, काय कारण काही कळत नाही म्हणाले, विचार करताहेत.

तस्मादिदं दैवतन्त्रं व्यवस्य भरतर्षभ ।।१.९.१७।। श्री. भा.

शेवटचा निर्णय त्यांनी दिला. दैववाद मानावा लागतो. कौरवांच्या पेक्षा तुमची बाजू फार मोठी आहे. तुमच्या बाजूला धर्म आहे, तुमच्या बाजूला शक्ति आहे, अस्त्र शक्ति आहे, भगवान गोपालकृष्ण तुमच्या बाजूला आहेत. तरीसुद्धा तुम्हाला दु:ख भोगावं लागलं म्हणजे दैव म्हणून काहीतरी आहे. दैव याचा अर्थ, जीवानी केलेलं पूर्वीच कर्म म्हणजे त्याचेच फल, म्हणजे दैव आहे.

पूर्वजन्मकृतं कर्म तद्दैवमिति कथ्यते ।।

जीवाचंच कर्म आहे, त्या कर्माचे फल भोगून तुमचं संपलेलं आहे म्हणाले. भगवान गोपालकृष्णांच्या आज्ञेमध्ये रहा म्हणजे तुम्ही सुखी व्हाल. तुम्ही ओळखलं नाही म्हणाले गोपालकृष्णांना, आपला मामेभाऊ आहे. अर्जुनाला वाटलं आपला मित्र आहे, वाटेल ती कामं सांगतो म्हणे यांना. रथ घेऊन ये. घोडे जुंपा, आपलं ऐकतो म्हणाले अर्जुनाचं. प्रेम आहे भक्तावरती. परंतू आज माझं सुदैव आहे मी समजतो. भीष्माचार्य म्हणताहेत, ''माझा शरीर त्याग करण्याचा संकल्प झालेला आहे.'' इच्छा मरणी होते भीष्माचार्य, यमधर्म तुझ्याकडे येणार नाही म्हणून बापाने वर दिलेला आहे. तुला आणखी शरीर सोडण्याची इच्छा झाल्याशिवाय हे शरीर पडणार नाही, असा पित्याचा वर मिळालेला आहे. भीष्म सांगाताहेत, धर्मराज, मला आता शरीर सोडायचंय म्हणाले. यावेळेला मला दर्शन देण्याकरता परमेश्वर गोपालकृष्ण आलेले आहेत. हे केवढं भाग्य आहे.

भः त्याऽऽवेश्य मनो यस्मिन् वाचा यन्नाम कीर्तयन् ।
त्यजन् कलेवरं योगी मुच्यते कामकर्मभिः ।।१.९.२३।। श्री. भा.

शेवटी शरीर पात होण्याच्या वेळेला, अंत:करणामध्ये भगवंताचं स्वरूप धारण करणारा आणि मुखाने त्याचं पवित्र नाम नामस्मरण करणारा जो योगी आपल्या शरीराचा त्याग करतो तो सर्व कर्मातून, कर्मवासनेतून मुक्त होतो, सर्वातून मुक्त होतो. म्हणजे पुन्हा त्याला जन्म घ्यावा लागत नाही.माझी एवढीच विनंती आहे. भगवान गोपालकृष्णांनी थोडा वेळ इथे थांबावे. मी आता शरीर टाकणार आहे. शरीर माझं पडेपर्यंत गोपालकृष्णांचं दर्शन माझ्या दृष्टीसमोर भगवंतांनी रहावं म्हणाले. ही शेवटची इच्छा भीष्माचार्यांनी बोलून दाखविली. मग धर्मराजांनी अनेक प्रश्न

केले, मोठे ज्ञानसंपन्न भीष्माचार्य होते ना. पराक्रमीही होते. सर्व कुरूकुलाचं संरक्षण त्यांनी केलेलं आहे. अनेक प्रश्न केले, दानासंबंधी विचारलेलं आहे. राजधर्म कोणता, मोक्षधर्म कोणते आहेत, स्त्रियांचे धर्म कोणते आहेत. भगवत् भक्ताचे धर्म कोणते आहेत. सगळं विचारले. आणि भीष्माचार्यांनी त्या शरशय्येवर निजूनच ते सगळं सांगितले. उत्तर दिलेली आहेत. महाभारतातलं ''शांतीपर्व'' म्हणजे भीष्माचार्यांचं ज्ञान किती होतं हे दाखविलं आहे. सर्व एकंदर विवेचन केलं, अनेक प्रकारच्या कथा सांगितलेल्या आहेत. सर्व एकंदर साधनांचा विचार त्या धर्मराजाला समजावून सांगितलेला आहे. उत्तरायण सुरू झालं. मकरसंक्रांत लागलेली आहे. त्याचीच वाट पाहात होते भीष्माचार्य.

मकर संक्रांतीला सूर्यनारायण आल्याबरोबर त्यांनी बोलणं बंद केलेलं आहे. धर्मराजाला सांगितले, पुरे बाबा आता. पुष्कळ झालं. मला आता पुढे काही सांगायचं नाही. भीष्माचार्यांनी आपला देहत्याग कसा केला हे सांगताहेत, सूतजी.

तदोपसंहृत्य गिरः सहस्रणी
र्विमुक्तसङ्गं मन आदिपूरूषे।
कृष्णे लसत्पीतपटे चतुर्भुजे
पुरःस्थितेऽमीलितदृग्व्यधारयत्।।१.९.३०।। श्री. भा.

वाणी अगोदर बंद केली. मृत्यू कसा यावा, हे सांगताहेत. भीष्माचार्यांच्या शेवटच्या कालात, वाणी बंद केली अगोदर. मनामध्ये काहीच संग नाही, कुठेही मन गुंतलेलं नाही. भगवान पितांबरधारी गोपालकृष्ण समोर उभे आहेत. चतुर्भुज. त्यांच्याकडे दृष्टी लावलेली आहे. डोळे झाकलेले नाहीत. झाकून ध्यान नाहीये. समोर परमात्मा आहे. शुद्ध धारणा आहे. चित्ताची धारणा करण्याला भगवंताचं स्वरूप साक्षात समोर आहे. कोणती तरी मूर्ती मनामध्ये आणायची नाहीये. साक्षात भगवंताचीच मूर्ती स्वरूप साक्षात आहे. त्यामुळे सर्व पापे नष्ट झालेली आहेत. भगवंतांच्या कृपादृष्टीने सर्वही क्लेश नाहीसे झालेले आहेत. अंगामध्ये बाण रुतलेले आहेत. काही नाही. क्लेश नाहीयेत. इंद्रिय वृत्ती अत्यंत सावध आहे. अशा स्थितीमध्ये आपलं शरीर विसर्जन करण्याची इच्छा झालेले भीष्माचार्य महाराज ह्यांनी भगवान गोपालकृष्णांची स्तुती केलेली आहे.

इति मतिरुपकल्पिता वितृष्णा
भगवति सात्वतपुङ्गवे विभूम्नि।

स्वसुखमुपगते क्वचिद्विहर्तुं
प्रकृतिमुपेयुषि यद्भवप्रवाहः ।।१.९.३२ ।। श्री. भा.

भीष्माचार्य सांगतात देवा, आपल्याला आता मी काय द्यायचं म्हणाले मी असा पराधीन आहे, फक्त माझी बुद्धी, मति जी आहे ती आपल्याला दिलेली आहे. मन आपल्याला दिलेलं आहे.

वितृष्णा मतिः ।।

पूर्ण आत्मविश्वास आहे. आपल्या बुद्धीमध्ये कोणतीही तृष्णा, वासना शिल्लक नाहीये. शुद्ध अशा प्रकारची बुद्धी मी आपल्याला अर्पण केली आहे. आपण कसे आहात.

स्वसुखमुपगते।।

निजानंदामध्ये निमग्न आहात. सृष्टी नाही काही नाहीये. आनंदरूप असे आपण आहात. पण एखाद्या वेळेला, काही आणखी विश्व निर्माण करण्याचा संकल्प आपला झाला की, या प्रकृती शक्तिचा स्वीकार करून अनंत ब्रह्मांडं आपण निर्माण करता. हे आपलं रूप आहे. निर्गुण, सगुण, एकच आहे. ही भावना आहे भीष्माचार्यांची.

मग या भगवंताच्या सगुण रूपाचंच वर्णन पुष्कळ केलेलं आहे.

त्रिभुवनकमनं तमालवर्णं
रविकरगौरवराम्बरं दधाने।
वपुरलककुलावृताननाब्जं
विजयसखे रतिरस्तु मेऽनवद्या ।।१.९.३३ ।। श्री. भा.

त्रिभुवनामध्ये अत्यंत सुंदर रूप आहे. शामवर्ण आहे. पितांबर नेसलेलं आहे आपण. काळेभोर केस आणखी पसरलेले आहेत आपले कपाळावरती. असे आपण विजयाचे मित्र आहात. अशा आपल्या स्वरूपाच्या ठिकाणी शुद्ध प्रेम हे माझ्या मनामध्ये रहाते. पुष्कळ वर्णन आहे. भीष्माचार्यांची स्तुती आठ दहा श्लोक आहेत. पण कितीतरी त्यात भाव आहे. आणि शेवटी त्यांनी एवढीच प्रार्थना केली. असा अनंत लीला करणारा भगवान गोपालकृष्ण सर्वही जीवांच्या शरीरामध्ये आणि बुद्धीमध्ये त्याचं वास्तव्य आहे. बुद्धीसाक्षी तो आहे. आणखी त्या परमेश्वराला मी शरण गेलेलो आहे. म्हणजे त्याच्याच चिंतनामध्ये मी हे शरीर विसर्जन करतो आहे. सगुण रूपही मनामध्ये आहे आणि निर्गुण निराकार सर्वव्यापी परमेश्वर स्वरूपाचे चिंतन चाललेलं आहे. याच ध्यानामध्ये

असतानाच भीष्माचार्यांच्या शरीरातून प्राण उत्क्रमण झालेले नाहीत, त्याच ठिकाणी सर्व प्राण विलीन होऊन गेलेले आहेत.

याचसाठी केला होता अट्टाहास
शेवटचा दिवस गोड व्हावा.

भगवान गोपालकृष्णांच्या ठिकाणी सर्व आपलं चित्त स्थिर करून भीष्माचार्यांनी आपलं शरीर, शेवटचं शरीर टाकलेलं आहे. शेवटचा जन्म आहे. सर्व ऋषीमंडळी स्वस्थ बसलेली आहेत, काही वेळाने आकाशातून पुष्पवर्षाव झालेला आहे, भीष्माचार्यांच्यावर. पुढे, धर्मराजांनी त्याचं सर्व और्ध्वदेहिक वगैरे केलेलं आहे. अशा रितीने धर्मराजाला उपदेश मिळाला. भगवान गोपालकृष्णांनीही त्याच्याकडून अश्वमेध यज्ञ करविलेले आहेत. पाप झालं, इतके मी लोक मारले आणि केवळ राज्याच्या लोभानी मी मारले. राजा असतो मी आणि कोणी पराक्रमी कोणी शत्रु आले असते तर युद्ध काही केलं तर भागेल. पण राजा कुठे होतो मी ? म्हणजे लोभामुळे माझ्या हातून ही अशी हिंसा घडली आहे, म्हणून अत्यंत दुःखी झालेला धर्मराज, श्रीकृष्णांनी त्यावेळेला त्याचं समाधान केलं, यज्ञयाग करविले, त्याचं पाप गेलं म्हणून सांगितलं, त्याचा राज्यभिषेक केला, नंतर भगवान निघून गेलेले आहेत.

धर्मराजाला राज्याभिषेकझाला, धर्मराज राज्य करू लागले, नंतर भगवान श्रीहरीने धर्मराजाच्या मनाची आणखी सुधारणा केली, शांती झाली आणि तो राज्य करू लागला हे पाहून भगवंताला समाधान झाले. धर्मराजाचं राज्य म्हणजे अत्यंत आनंददायक सर्व प्रजाजनांना झालेलं आहे. पर्जन्यवृष्टी, वेळच्या वेळेला अगदी होत होती. त्याचप्रमाणे दुध-दुभतं पुष्कळ झालेलं आहे त्या वेळेला. अशी सर्व व्यवस्था लावून दिली भगवंतांनी आणि त्या धर्मराजाची अनुज्ञा घेऊन द्वारकेला जाण्याकरता भगवान श्रीकृष्ण निघाले आहेत. विरह भगवंताचा सहन झाला नाही सर्वांना. वाद्य वाजताहेत. सर्व मंडळी आणखी त्यांना पोहचविण्याकरता निघालेली आहेत. छत्र आपल्या हातामध्ये घेतलं, अर्जुनाने, देवावर छत्र धरलेले आहे. उद्धव, सात्यकी दोघांनीही, दोन पंखे हातामध्ये घेतले. सर्वही आणखी कौरवांच्या, पांडवांच्या स्त्रिया यांनाही अत्यंत आनंद झाला, हाच भगवान गोपालकृष्ण श्रीहरी सर्वांच्या संरक्षणाकरिता सज्जनांचं संरक्षण करण्याकरता अवतार घेऊन आलेला आहे. अधार्मिक लोकांना यांनी शासन केले आहे. यादवाचं कुल मोठं धन्य आहे. असं त्या सर्व स्त्रिया म्हणताहेत. पुष्कळ दूर ही मंडळी पोहचविण्याकरता आलेली पाहून कृष्णांनी त्यांना सांगितले

थांबा आता तुम्ही. त्यांना पाठवून दिलेलं आहे. गोपालकृष्ण पुढे निघालेले आहेत. आपल्या देशाजवळ आल्याबरोबर त्यांनी आपला पांचजन्य शंख वाजविला, आपण आलो आहोत ही वार्ता समजावी म्हणून. तो आवाज कानावर पडल्याबरोबर द्वारकेमध्ये असलेले सर्वही स्त्रीपुरुष, भगवंताच्या दर्शनाबद्दल अत्यंत उत्सुक झालेले होते. सर्व बाहेर पडलेले आहेत. सर्वांनी नमस्कार केला श्रीहरींना. पुष्कळ दिवस झाले म्हणाले. आपण हस्तिनापूरला गेला होतात, पांडवांच्या कल्याणाकरिता. आतापर्यंतचा आमचा काल म्हणजे मोठा दुःखामध्ये गेलेला आहे. प्रजाननांनी सांगितलं. सर्वही स्त्रिया त्या आणखी आपल्या दरवाज्यामध्ये, माड्यांवरती भगवंताच्या दर्शनाकरता आणखी उभ्या होत्या. सर्व मंडळींना भेटले भगवान, वडील मंडळींना नमस्कार केला. मित्रमंडळींच्याही गाठीभेटी झालेल्या आहेत. आपल्या ज्या सर्व स्त्रिया होत्या त्याही वाड्यामध्ये भगवान जाऊन आले. देवकी आणि त्या स्वरूप ज्या माता होत्या त्यांना नमस्कार केला, त्यांनाही मोठं समाधान वाटलेलं आहे.

शौनक ऋषी म्हणतात, सूतजी, जो परीक्षित राजा जन्माला आलेला आहे. परमेश्वरांनीच त्याला पुन्हा जीवन दिलेलं आहे, अश्वत्थाम्याचं ब्रह्मास्त्र दूर करून. त्याने काय काय कर्मं केली त्याचं चरित्र आपण सांगा. सूत सांगतात ऋषी महाराज, धर्मराजाचं राज्य अगदी उत्तम चालू आहे. धर्माचंच राज्य होतं ते. स्वत: काहीही मनामध्ये इच्छा न ठेवता भगवान श्रीकृष्णाची सेवा करायची, भक्ति करायची आणि प्रजाननांचं पित्याप्रमाणे पालन करायचं. त्यांची कीर्ती स्वर्गलोकापर्यंत जाऊन पोहचलेली आहे. उत्तरेच्या गर्भामध्ये असणारा तो जो बालक आहे. त्याला आपल्या सभोवती म्हणजे, आपण जिथे गर्भात आहोत तिथे कोणी एक दिव्य पुरुष आहे आणखी आपल्याला ते तेज लागू नये, आपलं संरक्षण व्हावं म्हणून तो प्रयत्न करतो आहे, असं त्याला दिसलं गर्भामध्ये असताना. त्याचप्रमाणे आपलं तेज सर्व ठिकाणी पसरलेलं आहे. हातामध्ये गदा घेऊन फिरवितो आहे, ते तेज बालकाला लागू नये म्हणून. पूर्ण झाले नऊ महिने. ब्रह्मास्त्र सर्व शांत झालेलं आहे. आणि भगवानही गुप्त झालेले आहेत. तो पांडू राजाचा वंश वाढवणारा मुलगा हा जन्माला आलेला आहे. आनंद झाला धर्मराजाला. जात कर्म केलेलं आहे. सर्व ब्राह्मण मंडळींना अनेक प्रकारची दानं केलेली आहेत. सर्व ब्राह्मण मंडळीनी त्या मुलाचं नाव विष्णूरात असे ठेवले. विष्णूंनी संरक्षिले आहे. विष्णूनी दिलेलं आहे म्हणून विष्णूरात. हा आपला नातू आपल्या पूर्वजांप्रमाणे पराक्रमी, धार्मिक, भगवत भक्त असा होईल की नाही? काय याचं चरित्र आहे ? धर्मराजांनी सर्व ब्राह्मण मंडळींना विचारले. त्यांनी त्याचं जातक सांगितलेलं आहे.

ईश्वाकू राजा प्रमाणे मोठा प्रजापालन दक्ष हा राजा होईल. सत्यप्रतिज्ञा आहे. दाता आहे मोठा. सर्व धनुर्धारी पुरुषांमध्ये अग्रणी. कार्तवीर्य अर्जुन किंवा अर्जुन यांच्याप्रमाणे. तितिक्षु, पृथ्वी प्रमाणे सहनशील राहील हा. असा सर्व सद्गुण संपन्न हा तुझा नातू आहे. वेगवेगळे यज्ञ करील. कलीचा सुद्धा निग्रह करील. कलीला बंधनामध्ये टाकील. आणि ब्राह्मणपुत्राच्या शापाने आपला मृत्यू जवळ आलेला आहे असं समजल्याबरोबर, सर्वसंग परित्याग करून, शुकाचार्य महाराजांच्या, मार्गदर्शनाप्रमाणे वागून, त्यांच्या मुखातून सर्व भगवंतांच्या लीला श्रवण करून आणि हा उत्तम गतीला जाणार आहे. आनंद झाला धर्मराजाला. तो मुलगा बाहेर जन्माला आल्याबरोबर, जमलेल्या सगळ्या मंडळीकडे सारखा पाहायला लागलेला आहे. आपण आईच्या उदरात असताना जो पुरुष आपल्याला दिसला, तो याच्यामध्ये कोणी आहे का ? असं सारखं पाहातो आहे, परीक्षण करतो आहे. सर्व बाजूला पाहणारा म्हणून परीक्षित या नावाने तो प्रसिद्ध झाला. त्याचं पालनपोषण करताहेत सर्व मंडळी वाढतो आहे तो. धर्मराजाला अश्वमेध यज्ञ करण्याची इच्छा झालेली असताना, भगवान श्रीकृष्णांच्या सांगण्याप्रमाणे, उत्तर दिशेला जे काही पुष्कळ धन पडलेलं होतं, ते भीम, अर्जुनांनी वगैरे सर्व बंधूनी आणून दिलं. तीन अश्वमेध यज्ञ त्यांनी केले, भगवान श्रीहरीच्या इच्छेने. काही दिवस भगवान गोपालकृष्ण राहिले तिथे आणि पुन्हा द्वारकेला निघून गेले. विदूरजी युद्ध होण्याच्या पूर्वीच आणखी हस्तिनापुरातून बाहेर पडले. तीर्थयात्रा कराव्यात, सत्संगती करावी, भगवत भक्ति करावी, भजन करावे म्हणून ते बाहेर पडले. सर्व पांडवांचा जय झालेला आहे हे त्यांना समजलं. मैत्रेय महर्षींची भेट झाली, त्यांची संगती झाली. त्यांच्याबरोबर संवाद झालेला आहे आणि हस्तिनापुरामध्ये विदूरजी पुन्हा आले. धर्मराजालाही मोठा आनंद झाला. धृतराष्ट्र, गांधारी सर्वांनाही समाधान झालेलं आहे. भोजन वगैरे झालेलं आहे. विदुरांची विश्रांती झाली आणि धर्मराज विचारताहेत, ''विदुरजी, लहानपणी आपण आमचं संरक्षण केलंत, आपलं आमच्याकडे लक्ष असल्यामुळे पुष्कळ संकटातून आम्ही मोकळे झालो म्हणाले. आपण कोणत्या कोणत्या तीर्थयात्रा केल्या, कुठं जाऊन आलात, येताना आपण द्वारकेला गेला होतात का ? सर्व यादव कुशल आहेत ना ?''

धर्मराजांनी विचारल्यामुळे सर्व विदुरजींनी सांगितलं, यदुकुलसंहाराची गोष्ट सोडून.

इत्युक्तो धर्मराजेन सर्वं तत् समवर्णयत् ।
यथानुभूतं क्रमशो विना यदुकुलक्षयम् ।।१.१३.१२ ।। श्री. भा.

त्यांना ते समजलं होतं, उद्धवजींची भेट झाल्यावर सर्व यदुकुलाचा संहार झाला आहे, हे समजलं. पण हे तेवढं धर्मराजाला त्यांनी सांगितलं नाही. ऐकल्या बरोबर दुःख होईल समजेल तेव्हा समजेल म्हणाले. काही दिवस मुक्काम विदुरजींनी केला. धृतराष्ट्राला उपदेश करून त्याचा उद्धार करायची त्यांची इच्छा होती. विदूरजी म्हणजे मांडव्य ऋषींच्या शापाने या शूद्र जन्माला ते आलेले होते. यमधर्म शंभर वर्ष इथे राहिलेले होते. पुष्कळ काल गेलेला आहे. एके दिवशी रात्री विदुरजींनी धृतराष्ट्राला सांगितलं ''राजे साहेब, आता किती दिवस तुम्हाला या घरात रहायची इच्छा आहे. तुमचा काल जवळ आलेला आहे. विचार करा. ज्या पांडवांचा संहार करून, नाश करून, आपण सुखी व्हावं म्हणून पुष्कळ प्रयत्न केले तुम्ही आणि तुमच्या मुलांनी म्हणाले, काय मिळालं शेवटी त्यांचं अन्न खाऊन राहण्याची पाळी तुम्हाला आलेली आहे. म्हातारा झालेला आहात तुम्ही आणि या शत्रूच्या घरामध्ये राहाता आहात तुम्ही, तुम्हाला काही वाटत नाही म्हणाले. केव्हा बाहेर पडणार ? विचार करा.''

धृतराष्ट्राच्या मनावरती परिणाम झालेला होता. आता कोणीच शिल्लक राहिलेलं नाही. मुलगा, मुलं नाही, काही नाही. त्यांनीही विदूरांना सांगितलं, बाबा तूच आता आम्हाला घेऊन जा तुझ्याबरोबर. आम्ही यायला तयार आहोत. रात्री धृतराष्ट्र, गांधारी दोघेही विदूरजींच्या बरोबर राजवाड्याबाहेर पडलेले आहेत. प्रातःकाल झाल्यानंतर रोजच्या नियमाप्रमाणे, धृतराष्ट्र, गांधारी, विदूर यांना नमस्कार करून सभेमध्ये जाण्याकरता धर्मराज निघाले. इथे येऊन पाहताहेत तर कोणीच नाही. संजय तेवढा बसलेला होता एका बाजूला. त्याला विचारलं धर्मराजांनी, हे आमचे पिताजी कुठं गेले, माता गांधारी कुठं गेली बाबा. यांनी आजपर्यंत आमचं संरक्षण केलं म्हणाले. संजयाला सुद्धा काही माहिती नाही. तो म्हणाला, ''मला सुद्धा काही माहित नाही. कुठं गेले. कुणाला ठाऊक.'' इतक्यात नारद महर्षी आले. त्यांची पूजा करून धर्मराजांनी त्यांना विचारले, ''हे गेले कुठे म्हणाले हे तिघेही.'' नारद म्हणाले, ''बाबा, शोक कशाला करतोस. त्यांचं संरक्षण तू करतोस का म्हणाले. ईश्वरच, सर्वांचं संरक्षण करणारा आहे.

स संयुनक्ति भूतानि स एव वियुनक्ति च ।।१.१३.४० ।। श्री. भा.

प्रेमळ मंडळींना एकत्र आणणे पुन्हा एकत्र आणणे आणि पुन्हा बाजूला करणे हे कार्य त्या परमेश्वराचं आहे. तेव्हा मनामध्ये तू आता दुःखी होऊ नकोस. देह हा पंचभौतिक आहे, कालाच्या आधीन असलेला. तो दुसऱ्याचं संरक्षण कसा करू शकेल म्हणाले. देवाचं कार्य सगळं भगवंतांनी

केलेलं आहे. काही थोडं शिल्लक राहिलेलं आहे.'' तोपर्यंतच तो परमात्मा याठिकाणी रहाणार आहे असे नुसतं सूचक बोलले आहे. प्रत्यक्ष सांगितलेलं नाही. आणखी सांगताहेत, ''धर्मराज, धृतराष्ट्र हा आपल्या पत्नीला, गांधारीला बरोबर घेऊन, विदूरजींच्या बरोबर हिमालयामध्ये गेलेला आहे. गंगानदीचे सात प्रवाह त्याठिकाणी झालेले आहेत, सप्तस्रोततिर्थ, त्याठिकाणी ते जाऊन राहिलेले आहेत. नित्य स्नान करताहेत, तिथं केवळ जलाचा आहार आणि भगवान श्रीहरीचं चिंतन त्यांच चाललेलं आहे. आसनाचा जय झालेला आहे, प्राणवायूचा जय झालेला आहे. इंद्रियांचा जय झालेला आहे. हरीचिंतनामुळे रजोगुण, तमोगुण सगळे दूर झालेले आहेत. केवळ आत्मचिंतनामध्येच त्यांचा काळ चाललेला आहे. माया मोहातून ते मुक्त झालेले आहेत. आजपासून पाचव्या दिवशी त्यांच्या झोपडीला आग लागणार. धृतराष्ट्राचं शरीर दग्ध होऊन जाणार आहे आणि त्या अग्नीमध्ये साध्वी गांधारीही आपला देह अर्पण करणार आहे. विदूरजी दुसरीकडं तीर्थयात्रेकरता निघून जाणार आहेत. तू आता जाऊन त्यांना काही त्रास देऊ नकोस आणि काही उपयोगही नाही. हे नारदांनी धर्मराजाला सांगितलं.

यादवांचं एकंदर क्षेमकुशल समजून घेण्याकरता, अर्जुनाला धर्मराजांनी द्वारकेमध्ये पाठविलेलं आहे. सहा सात महिने झाले तरी अर्जुन परत आलेला नाही, काल बदललेला आहे. त्याच्या दृष्टीला पडले. अर्जुन परत आलेला नाही पाहून धर्मराज भीमाला म्हणाले, ''बाबा अर्जुनाला द्वारकेला पाठवून पाच सात महिने झाले, अजून काही तो परत आलेला नाही. नारद महर्षी काही तरी बोलले खरं सूचक, काय श्रीहरी निजधामाला गेले काय ? काय भयंकर अपशकून होत आहेत. काय करावं, काय स्थिती आहे काही समजत नाही'', मोठा दुःखी झालेला आहे धर्मराज. इतक्यात अर्जुन येऊन पोहचलेला आहे. पायावर मस्तक ठेवलं, नमस्कार केला. एका बाजूला खाली मान घालून, अर्जुन उभा राहिलेला आहे. डोळ्यातून अश्रुधारा सारख्या चाललेल्या आहेत. धर्मराजालाही एकदम काहीतरी धक्का बसला, काय झालं, अर्जुनाला विचारलं त्यांनी, ''बाबा, काय आहे स्थिती, वसुदेव देवकी, त्याचप्रमाणे रामकृष्ण प्रद्युम्न त्यांची मुलं सर्वही यादव मंडळी त्यांच्या स्त्रिया मुलंबाळं सर्वांच कुशल क्षेम आहे ना बाबा. काय स्थिती झाली. तुला दुःख का झालं. तुझा कोणी अपमान केला काय ? कोणाचं तरी संरक्षण करण्याची प्रतिज्ञा करून तुझ्याकडून त्यांच संरक्षण केलं गेलं नाही काय ? काय आहे ते सांग मला.'' याप्रमाणे धर्मराजांनी अर्जुनाला विचारलेलं असताना फार दुःख झालेलं आहे, कृष्ण वियोग झाला. बराच वेळ आणखी अश्रुधारा चाललेल्या आहेत. थोडा वेळाने ते दुःख कमी झाल्यानंतर, डोळे पुसले अर्जुनाने, भगवान श्रीहरीचे

ते प्रेम आहे, मैत्री आहे, हे सर्व आठवण झाली आणि अर्जुन बोलू लागला,

वञ्चितोऽहं महाराज हरिणा बन्धुरूपिणा ।
येन मेऽपहृतं तेजो देवविस्मापनं महत् ।।१.१५.५ ।। श्री. भा.

भगवान श्रीहरींनी मलाही शेवटी फसविले म्हणाले, गेले निघून, माझं तेजही घेऊन गेले. ज्याच्या आश्रयामुळे प्रसादामुळे, द्रौपदीच्या स्वयंवराच्या वेळेला तो मत्स्यभेद करण्याचा पण जिंकून द्रौपदीला मी मिळविलं. खांडववन अग्नी नारायणाला पाहिजे होतं. पण भगवान गोपालकृष्ण रथामध्ये बसलेले होते. आणि सबंध ते वन अग्नीनारायणाला दिलेलं आहे. तृप्त झाले, अग्नीनारायण. त्याचप्रमाणे आपला बंधू, भीमसेन, आम्ही तिघे गेलो होतो, जरासंधाच्या राजधानीमध्ये. जरासंधाबरोबर युद्ध करून त्या भीमाने शेवटी त्याचा नाश केला, गोपालकृष्णांची कृपादृष्टी होती म्हणून हे घडलेलं आहे. द्रौपदीच्या केशपाशाला धरून त्या दुःशासनाने आणले होते, तिचा अपमान करण्याचा प्रयत्न केला, ह्या सर्वही कौरवांचा नाश त्या भगवंतांच्या कृपेमुळेच आम्हाला करता आला. अशी पुष्कळ संकटं आली त्या संकटातून आम्ही मुक्त झालो. आज भगवान श्रीहरी आम्हाला सोडून गेलेले आहेत. रस्त्यातून येता येता, काही यादवांच्या स्त्रिया, लहान मुलं, म्हातारी मंडळी घेऊन येत असताना मला काही भिल्ल लोकांनी गाठलं, माझा पराभव केला. असा पराभूत होवून मी आलेलो आहे. विप्रशाप झाला यादवांना. मदिरापान करून अत्यंत उन्मत्त झालेल्या यादवांचं युद्ध झालेलं आहे. सर्वांचा नाश झालेला आहे. चार पाच यादव शिल्लक राहिले. त्या परमेश्वराचीच इच्छा आहे म्हटले पाहिजे. संरक्षणही एकमेकांचं करतात आणि नाशही करतात. यादवांच्या कडूनच यादवांचा नाश केला भगवंतांनी. भूभार दूर केलेला आहे. अशा रितीने भगवान कृष्णांचं स्मरण करतो आहे. अर्जुन सांगतो आहे. त्या भगवंताच्या भक्तिमुळे, त्याचं चित्त अत्यंत निर्मळ झालेलं आहे. संग्रामाच्या आरंभी जे ज्ञान भगवंतांनी त्याला दिलेलं होतं ते आत्ता एकदम त्याच्या चित्तामध्ये प्रकट झालेलं आहे. त्या ज्ञानाच्या प्रभावाने, सर्व शोक दूर झालेला आहे.

भगवान श्रीहरी वैकुंठलोकाला गेले हे धर्मराजाने ऐकल्याबरोबर त्यांनीही ठरविले, आपणही प्रयाण करावे म्हणाले, उत्तर दिशेला निघून जावे. कुंतीनेही हे सर्व ऐकले. भगवंताचं चिंतन करीत तिनेही तसेच ठरवून तीही संसार बंधनातून मुक्त झालेली आहे. धर्मराज, शुध्द ज्यांचं चित्त झालेलं आहे, सिंहासनावरून खाली उतरलेले आहेत. परीक्षित राजा वयामध्ये आलेला होता, त्यालाच राज्यभिषेक केला त्यांनी आणि निघाले. सर्व अलंकार, वस्त्रं काढून टाकलेली आहेत. कोणाबरोबरही

भाषण केलं नाही आणि लगेच नगरातून बाहेर पडले, निघाले हिमालयाकडे. त्याचे चारही बंधू, द्रौपदी हेही त्यांच्या पाठीमागून निघालेले आहेत. विदूरजींनी आपला देह प्रभास क्षेत्रामध्ये टाकलेला आहे, आणि ते आपल्या यमलोकात निघून गेलेले आहेत. द्रौपदीचाही उध्दार झाला. भगवंतांच्या कृपेने पांडवांचे हे कार्य उत्तम झालेलं आहे. परीक्षित राजा सर्व ऋषिमंडळीच्या मार्गदर्शनाप्रमाणे उत्तम राज्यकारभार करू लागला. जनमेजय वगैरे त्याला चार मुलं होती. उत्तराची कन्या इरावती हिच्याबरोबर त्याचा विवाह झाला. अश्वमेधादिक यज्ञ त्यांने केलेले आहेत, कृपाचार्यांना गुरु करून. तो एकदा रथामध्ये बसून आपल्या राष्ट्रामध्ये अवलोकन करण्याकरता निघालेला आहे. कोण कोण मंडळी कशी आहेत, कोणाला काय काय दुःख आहे. असा तो निघालेला असताना प्रत्येक ठिकाणी सर्व लोकांनी त्याचा मोठा सत्कार केलेला आहे. हा कृष्णांचा भक्त मोठा आहे आपला राजा. याचे पिताजी वगैरे, पांडवही मोठे कृष्णभक्त होते, कृष्णांनी त्या पांडवांचं संरक्षण केलेलं आहे. सर्व लोकांच्या मुखातून हे सर्व परीक्षित राजाला ऐकायला मिळाले. असं जाता जाता एका ठिकाणी, नदीतीरावरती एक बैल आहे, एक गाय आहे. आणि त्या बैलाला काठीने मारणारा एक कोणीतरी आहे, राजवेष धारण करून त्याला मारतो आहे. त्या परीक्षित राजाने त्या वृषभाला विचारले, वृषभ म्हणजे बैल, धर्मच या वृषभरूपाने होता. आणि गोरूपी पृथ्वी होती. त्यांनाही अत्यंत दुःख झालेलं आहे, कृष्णवियोगामुळे संरक्षण करणारा कोणी नाही. आणि तो मारणारा म्हणजे कली होता. तेव्हा अत्यंत दुःखामध्ये ते आहेत, अत्यंत कष्ट त्यांना होत आहेत. पृथ्वीला दुःख आहे, त्या धर्माला दु;ख आहे. परीक्षित राजाच्या दृष्टीला हा प्रकार पडलेला आहे. हा कोणीतरी क्षुद्र हातामध्ये काठी घेऊन मारतो आहे या वृषभाला. रथ थांबवला परीक्षित राजाने आणि विचारले,

कस्त्वं मच्छरणे लोके बलाध्दंस्यबलान् बली ।। १.१७.५ ।। श्री. भा.

अरे या माझ्या देशामध्ये ह्या दुर्बल अशा प्रकारच्या या जीवांना त्रास देणारा तू कोण आहेस ? श्रीकृष्ण दूर गेले, अर्जुन सुध्दा दूर गेलेला आहे म्हणून तू या ठिकाणी या लोकांना त्रास देतोस ? त्या धर्मालाही विचारलं, आपले पाय असे का झाले ? तीन पाय नसताना, एकाच पायाने आपण चालता, कोण आहे आपल्याला त्रास देणारा ? आपण सांगा. ज्याच्या राष्ट्रामध्ये प्रजानन संकटात राहतात त्याची कीर्ति, आयुष्य संपून जाते आहे. कोण आहे तुम्हाला त्रास देणारा ? तो धर्मच होता तो कसं सांगेल, तो म्हणाला कोणी दुःख दिलं, कसं सांगायचं बाबा ? कर्मांनी दुःख होतं, असं काही लोक म्हणतात दुर्जन दुःख देतात असं काही लोक सांगतात. तूच विचार करून ठरव

म्हणाले. परीक्षित राजाच्या लक्षामध्ये आलं, की हा साक्षात धर्म पुरुष आहे. दुसऱ्याचे दोष सुचविणं म्हणजे हाही दोषच आहे. शेवटी धर्माचे चार पाय जे आहेत, तप, शौच, दया आणि सत्य हे धर्माचे चार पाय म्हणजे चार रूप आहेत. अधर्माचरणाने तीन पाय नाहीसे झाले होते, फक्त सत्य तेवढा राहिला होता, आणि त्यात कलि त्रास देतो आहे. ही गोरुपी पृथ्वी आहे. हा कलि आहे हे लक्षात आल्याबरोबर परीक्षित राजाने आपली तलवार म्यान्यातून बाहेर काढली आणि त्या कलीला मारून टाकायचं ठरवलं, शासन करायचं आहे. तोही शरण आलेला आहे, पायावर डोकं ठेवलं त्या कलीने, राजेसाहेब मी आपल्याला शरण आलेलो आहे. मला आपण मारू नका. त्यांनी त्याला सांगीतले, माझ्या या देशात तुला राहता येणार नाही. तू ज्या ठिकाणी राहाशील त्या ठिकाणी लोभ, असत्य, हे दुर्गुण जे आहेत, दोष जे आहेत ते वाढणारे आहेत. तू माझ्या देशात राहू नकोस. या ब्रह्मावर्त क्षेत्रामध्ये अनेक ऋषी मंडळी यज्ञयाग वगैरे करताहेत, ईश्वराच्या प्राप्तीकरता. इथे तुला राहता येणार नाही. कलीने सांगितले राजेसाहेब कुठं तुम्ही मला सांगाल तिथे मी राहतो. त्याने काही स्थानं त्या कलीला दिलेली आहेत. द्यूतगृह आहे, मद्यपानाचे गृह आहे, हिंसा ज्या ठिकाणी चाललेली आहे त्या ठिकाणी, शेवटी सुवर्ण हे एक स्थान त्या कलीला राहाण्याकरता दिलेलं आहे. त्या सुवर्णामुळेच सर्व विकार मनामध्ये निर्माण होतात. परीक्षित राजाच्या आज्ञेप्रमाणे इतरत्र कली दुसरीकडे कोठे जाऊ शकत नाही. तो असे पर्यंत कलीला अधर्माचा प्रसार करता आलेला नाही. धर्मपुरुषाचे चारही पाय त्याने योग्य रितीने केले म्हणजे स्थापना केली. तप आहे, शुचिता आहे, दया आहे यांचा प्रचार सर्वत्र झालेला आहे. असा हा राजा, राज्य करतो आहे. सूत सांगताहेत ऋषींना तुम्ही त्याच्याच राज्यामध्ये यज्ञ-याग वगैरे चालू ठेवा. परीक्षित राजाला शुक्राचार्यांच्या मुखातून भागवत ऐकायला मिळाले, आणि त्याने आपल्या शरीराचं विसर्जन केलेलं आहे. ज्या दिवशी परीक्षित राजाने देहत्याग केला, किंवा तो या देहातून मुक्त झालेला आहे त्यादिवशीच एकदम कलीचा प्रभाव वाढलेला आहे. चांगली कर्मे जर केली, सत्कर्मे जर केली तर त्याचं फळ मिळतं, असा या कलीचा एक गुण आहे.

परीक्षित राजाचं चरित्र आपल्याला सांगताहेत. परीक्षित राजा एके दिवशी शिकारीकरता अरण्यामध्ये गेला. पुष्कळ शिकार केली, मध्यान्ह काल झालेला आहे. भूक लागली, तहान लागली, राजधानीकडे येण्याकरता निघाला वाटेत ऋषींचा आश्रम त्यांनी पाहिला. पाणी पिण्याकरता म्हणून आला आतमध्ये. ते ऋषी डोळे मिटून ध्यानस्थ बसले होते. शमीक ऋषी, सर्व इंद्रिय, प्राण मन वगैरेंचा निग्रह करून समाधी अवस्थेमध्ये असताना परीक्षित राजाला अतिशय तहान लागलेली

आहे. पाणी–पाणी म्हणतो आहे. सार्वभौम राजा होता, परंतु त्या आश्रमामध्ये त्याला पाणी कोणीही दिलेलं नाही. कोणी नव्हतंच तिथे. आश्रमामध्ये नोकरचाकर कोण असणार ? मुलं कोठेतरी गेली होती, खाली नदीवर खेळायला. राजाला वाटलं आपला अपमान केला मुद्दाम यांनी. राग आलेला आहे त्याला. पाणी तर मिळालंच नाही. राजधानीला जाता जाता एक साप मरून पडलेला होता. तो त्यानी उचलला आणि त्या ऋषींच्या गळ्यामध्ये अडकवला. खरंच समाधी लावून बसले का खोटं आहे, ही परिक्षा करण्याकरता, त्या ऋषींना काहीच कल्पना नाहीये. इतक्यात ते कोणीतरी पाहिलं, खाली नदीतीरावर त्या ऋषींचा कुमार जो आहे, खेळत होता लहान मुलांबरोबर बालक्रिडा चाललेल्या आहेत. तुझ्या बापाच्या गळ्यामध्ये राजाने साप अडकवलेला आहे, साप जिवंत आहे का मेला हे या सागणाऱ्यांनीही पाहिले नाही. त्या मुलाने हे ऐकल्याबरोबर त्याला अत्यंत राग आलेला आहे. मुंज नुकतीच झाली होती. आचरण, मंत्र–जप नित्य चालू आहे. लाल डोळे झाले त्या बालकाचे. श्रीकृष्ण हे आपल्या स्थानामध्ये गेल्यामुळे हे राजे लोक अत्यंत उन्मत्त झालेले आहेत त्यांना शासन केले पाहिजे. पहा माझं बल कसं आहे ? हातामध्ये पाणी घेतलं आहे. नदीचं जल आणि विधिवत त्यांनी सोडलं.

आपली मर्यादा ज्या राजाने सोडलेली आहे आणि ज्याने माझ्या पित्याचा उपमर्द केला त्याला आजपासून सातव्या दिवशी नागराज तक्षकाने दंश करून त्याचा नाश करावा. पाताल देशाचा राजा आहे तक्षक. हा बालक आपल्या आश्रमात राहतो आहे आणि सार्वभौम राजाचा नाश करण्याची आज्ञा त्या तक्षकाला करतो आहे. काय वाणीचं सामर्थ्य आहे, तपोबल आहे. आला, वर आलेला आहे तो बालक. बापाच्या गळ्यामध्ये साप पाहून त्याला वाटलं, पित्याचा नाश झालेला आहे, रडू लागला तो बालक. सावध झालेले आहेत ते ऋषीमहाराज. डोळे उघडले, तो गळ्यामध्ये असलेला साप त्यांनी टाकून दिला. कोणी घातला, काही चौकशी केली नाही. मुलाला विचारलं बाळ काय झालं, रडतोस का ? कोणी तुला त्रास दिलेला आहे ? सगळा घडलेला वृत्तांत त्या ऋषींना सांगितला आहे की असं असं समजलं म्हणाला, तुम्हाला त्रास दिला असं समजलं. त्याला शाप दिला, यासाठी, अरे अरे म्हणाले – आपल्या मुलाबद्दल त्यांना फार राग आलेला आहे, काय म्हणाले केलंस ? अपराध किती थोडा त्याबद्दल दंड किती केलास ? देहदंडाची शिक्षा तू दिलीस. अपरिपक्व बुद्धी. या मुलाची बुद्धी परिपक्व नाही. सामर्थ्य मिळालेलं आहे. पण संयम नाही. परमेश्वराची क्षमा मागितली. राजाला हे लगेच सांगितले पाहिजे. काही पुढची व्यवस्था करेल. स्वतःचा उध्दार करेल, म्हणून आपल्या शिष्यांना, राजधानीमध्ये त्यांनी

पाठवून दिलेलं आहे. परीक्षित राजा राजधानीमध्ये, राजवाड्यात आलेला आहे आणि त्याला पश्चाताप झाला आहे. आपल्या हातून हे असं कसं घडलं ? असे श्रेष्ठ तपस्वी पुरुष त्यांचा अपमान मी केलेला आहे. ईश्वराने काहीतरी शासन मला केलं पाहिजे. असा तो विचार करतो आहे, इतक्यात ऋषींचे शिष्य तिथे आलेले आहेत. त्यांनी सांगितलं, राजे साहेब ऋषीकुमारांचा शाप आपल्याला झालेला आहे, सातव्या दिवशी आपल्याला मृत्यू येणार आहे. एकदम त्याला वैराग्य उत्पन्न झालं. पूर्वीपासूनच होतं. भगवतभक्ती अंतःकरणामध्ये वंशपरंपरेने प्राप्त झाली. मुलाच्या स्वाधीन राज्य केलं. बाहेर आला राजा, गंगातीरावर आसन घालून बसलेला आहे. काय ईश्वर इच्छा असेल, ईश्वर आपला कसा उध्दार करणार, ईश्वरावर सर्व भार घालून तिथे बसून राहिला आहे. सर्व ऋषीमंडळी मोठी मोठी त्या ठिकाणी आली, हा राजा मोठा धर्मशील होता. सात दिवस या ठिकाणी बसून रहाणार आहे, आपणही याला काही कथा सांगू, असं मनाचं समाधान करण्याकरता सर्व ऋषीमंडळी आली. परीक्षित राजाने त्यांना विचारले, ऋषीमहाराज, ज्याचा मृत्यू जवळ आलेला आहे. त्यांनी काय करावे ? आणि काय करू नये ? एवढेमला सांगा. ऋषी मंडळींच्यामध्ये वाद–विवाद सुरू झाले. कोणी म्हणाले यज्ञ करावे, कोणी म्हणाले दानधर्म करावा, कोणी म्हणाले समाधीचा अभ्यास करावा. निर्णय काही यातून मिळेना.

इतक्यात शुकाचार्य महाराज त्या ठिकाणी येवून पोहचलेले आहेत. परीक्षित राजाचं मोठ पूर्वसुकृत आहे, अनेक जन्मांचं पुण्य आहे. आपणहून ब्रह्मज्ञानी, भगवत्भक्त शुकाचार्य तिथे आलेले आहेत. सोळा वर्षाचं वय आहे, अत्यंत सुंदर शरीर आहे. दिगंबर अवस्था ! वस्त्र नाही, काही नाही. अंतःकरणामध्ये भगवंताचे अखंड चिंतन चाललेलं आहे. शामवर्ण आहे. सर्व ऋषीमंडळी शुकाचार्यांना पाहिल्याबरोबर एकदम उठून उभी राहिली आहेत. राजानं त्यांची पूजा केली. आसनावर ते बसलेले आहेत. त्यांनाही त्यांनी हाच प्रश्न विचारलेला आहे. अनायासे आपली संगती मला लाभली, ईश्वरकृपेने, मला काही मार्गदर्शन करा. मृत्यू जवळ आलेला आहे माझा. काय करावं, माझं कर्तव्य मला समजवून सांगा. कोणाचं स्मरण करावं, कोणाचं भजन करावं. हे सगळं सांगा. आपण जास्त वेळ गृहस्थाश्रमी पुरुषाच्या घरामध्ये रहात नाही असं मला समजले. गाईची धार काढायला जेवढा वेळ लागेल तेवढा वेळ थांबायचे.

समर्थांनी सुद्धा हाच मार्ग घालून दिलेला आहे. ते मनाचे श्लोक म्हणत घराबाहेर उभे रहायचे, तो श्लोक म्हणे पर्यंत कोणी भिक्षा दिली तर घ्यायची, नाहीतर पुढचा रस्ता, म्हटलं तर

अयाचित वृत्ती आहे. नाहीतर याचनाही आहे, देवाच्या कार्याकरता.

शुक्राचार्य महाराज मुद्दाम त्याच्या उध्दाराकरताच आलेले आहेत. त्यांचा नियम वगैरे असला तरी अशा वेळेला नियमाला अपवाद आहे. संपूर्ण भागवत त्याला सांगण्याकरता ते आलेले आहेत.

त्यांनी बोलायला आरंभ केला, राजा,

वरीयानेष ते प्रश्नः कृतो लोकहितो नृप ।
आत्मवित्सम्मतः पुंसां श्रोतव्यादिषु यः परः ।। २.१.१ ।। श्री. भा.

मृत्यू जवळ आलेल्या जीवांनी काय करावे ? मृत्यू जवळच आहे नेहमी, पण तुला आज जाणीव झालेली आहे. काय करावं ? मृत्यूच्या भितीने, अगोदर जितकं करता येईल तितकं करावं म्हणून तू प्रश्न विचारतो आहेस. चांगले आहे. पुष्कळ ऐकण्यासारख्या गोष्टी आहेत. आत्मतत्वाचं जोपर्यंत ज्ञान झालेलं नाही, तोपर्यंत पुष्कळ ऐकलं काय आणि काही केलं काय, त्याचा काही उपयोग नाहीये. शंभर वर्षांपैकी दिवसा अर्थार्जन करणं, संसार करणं, व्यवहार करणं याच्यात काल जातो. रात्रीमध्ये विषय भोग आहे. झोप आहे. याच्यामध्ये रात्रीचा काल जातो. आपला स्वतःचा देहसुद्धा स्थिर नाही. त्याला माहिती आहे, सर्व परिवार सर्वही आणखी विनाशी आहे. पण माणसाचं याकडे लक्ष जात नाही. असा विचारही मनामध्ये येत नाही. याकरता बाबा

तस्मात् भारत सर्वात्मा भगवान् ईश्वरो हरिः ।
श्रोतव्यः कीर्तितव्यश्च स्मर्तव्यश्चेच्छताभयम् ।। २.१.५ ।। श्री. भा.

सर्वात मोठी भिती मृत्यूची आहे. सर्व भिती दूर होण्याकरता, भगवान श्रीहरीच्या लीला ऐकल्या पाहिजेत, त्याचं स्मरण अखंड केलं पाहिजे. हेच सर्व शास्त्राचे सार आहे.

जन्मलाभः परः पुंसामन्ते नारायणस्मृतिः ।। २.१.६ ।। श्री. भा.

अंतकाळी नारायणाचे स्मरण केलं पाहिजे म्हणजे जन्मभर तो अभ्यास केला पाहिजे. जन्मभर विषयाचा आणि व्यवहाराचा अभ्यास आणि अंतःकाळी स्मरण कशाचं होणारं त्याचंच होणार. मोठे मोठे महात्मे विधीनिषेधातीत झालेले, परंतु भगवान श्रीहरीचे गुण वर्णन करणं, श्रवण करणं याच्यामध्येच त्यांचा काल जातो. हे भगवंताचे अनंत गुण ज्याच्यामध्ये आहेत, अशा प्रकारचं भागवत नावाचं पुराण, वेदतुल्य, याचा अभ्यास मी पिताजींपासून केलेला आहे. गुणातीत अशा प्रकारचं ब्रह्मतत्व जे आहे, निर्गुण निराकार त्याचं चिंतन करणारा मी पण भगवंताची लीला

माझ्या कानावर पडल्याबरोबर मी इकडे वळलेलो आहे. याचा अभ्यास केला.

तदहं तेऽभिधास्यामि महापौरुषिको भवान् ।
यस्य श्रद्दधतामाशु स्यान्मुकुन्दे मतिः सती ।। २.१.१० ।। श्री. भा.

हे भागवत तुला सांगण्याकरता मुद्दाम मी आलेलो आहे राजा. मोठा भगवत भक्त तो आहे. भगवान श्रीहरींच्या कृपेने अंत:करण प्रेममय होवून जातं आहे याच्या श्रवणामुळे. पुष्कळ आयुष्य मिळालं म्हणाले. परमेश्वराकडे बिलकुल लक्ष नाही. काय उपयोग त्या आयुष्याचा. थोडं जरी आयुष्य मिळालं तरी आपण तेवढ्या कालामध्ये आपल्याला भगवंताचं स्मरण जर घडलं तर आपलं कल्याण होईल. 'खट्वांग' नावाचा एक राजऋषी होता. देवांनी त्याला सांगितले, तुझं आयुष्य एक मुहूर्त राहिलेलं आहे, दोन घटका म्हणजे एक घंटा, एक तास सुद्धा नाही. पण त्याचं मन त्याच्या ताब्यामध्ये होतं. शुद्ध मन असल्यामुळे, त्या तेवढ्या कालामध्ये भगवंताचं ध्यान त्यांनी सुरू केलं. त्यासमाधी अवस्थेमध्ये देहपात झाला. मुक्त झाला तो. तुला तर सात दिवस आहेत अजून म्हणाले. तुला भिण्याचे काय कारण आहे? अंतकाल जवळ आलेला असताना, निर्भयपणाने मनातल्या सर्वही कामना, वासना दूर करून, परमेश्वराचे चिंतन केलं पाहिजे. एकांत स्थानामध्ये बसून मनाने भगवंताचं ध्यान करायला आरंभ करावा. विषयाकडे जाणारे इंद्रियही आवरावीत. बुध्दीच्या सहाय्याने, कर्माने, विषयाकडे जाणारे जे मन आहे, ते शुभ ठिकाणी, भगवंताच्या स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर करावे. भगवंताच्या चरणापासून मुखापर्यंत सर्वही अवयव जे आहेत त्या अवयवांचे ध्यान करावे. मनातले विषय सगळे दूर करावे. रजोगुण, तमोगुण ध्यानाच्या अभ्यासामुळे कमी होतात.

राजाने विचारले महाराज, ध्यान करताना मनाची धारणा कशी असावी ? ध्यान करताना मन कुठे असावं ? कोणाचं ध्यान करावं सांगा ? शुकाचार्य सांगताहेत

जितासनो जितश्वासो जितसङ्गो जितेन्द्रियः ।
स्थूले भगवतो रूपे मनः सन्धारयेध्दिया ।। २.१.२३ ।। श्री. भा.

ध्यानाचा अभ्यास करण्यापूर्वी, काय काय एकंदर, योग्यता कशी पाहिजे ? आसनजय प्रथम झाला पाहिजे. कमीत कमी तीन तास तरी एका आसनावर बसता आलं पाहिजे. प्राण जय झाला पाहिजे. पूरक-रेचक बंद होवून कुंभक फक्त राहिलं पाहिजे. मनामध्ये कोणाबद्दलही संग उपयोग नाही. नि:संग मन झालं पाहिजे. इंद्रियाचा जय झाला पाहिजे. असा अधिकार प्राप्त झाल्यानंतर

हे भगवंताचं स्थूल रूप जे आहे, विश्वरूप, त्याचंच ध्यान करायला सांगितलं आहे. सूक्ष्मरूपाचं ध्यान करण्याचा अधिकार मिळायला फार वेळ आहे. पांचभौतिक जे विश्व दिसतं आहे, हा परमेश्वराचा देह आहे, शरीर आहे. पाताललोकापासून, सत्यलोकापर्यंत म्हणजे ब्रह्मलोकापर्यंत हे सगळे त्याचे अवयव आहेत. हे चिंतन करायचं आहे. सर्व ही एकंदर जिवात्मे, सर्व शरीरे जीवांची देव काय, गंधर्व काय, मानव काय, दानव काय सगळेही त्याचचं स्वरूप आहे. अशा रितीने चिंतन करायचं आहे, ध्यान करायचं आहे. म्हणजे यासाठी मन स्वस्थ पाहिजे, स्थिर पाहिजे. ही विश्वरूपाच्या ठिकाणी चित्ताची धारणा ज्यांनी केली, ब्रह्मदेवाने हा अभ्यास केलेला आहे. विश्वरूपी परमेश्वराचंच ध्यान केलं. स्थूल रूपाचं ध्यान, त्यांना सवय झालेली आहे मनाला. सूक्ष्मरूपाकडे ध्यान जात नाही. त्या मूर्त रूपाचंच ध्यान करायचंय. त्या ध्यानामध्ये मन स्थिर होण्याकरता, विषयाची इच्छा बंद झाली पाहिजे, वैराग्य झालं पाहिजे. देहाची चिंता राहून उपयोग नाही. हे सगळं त्यांनी सांगितलं. भगवंताचं हे जे दुसरं रूप आहे, चर्तुभुज रूप, सगुणरूप याचंही ध्यान करणारे काही काही मंडळी आहेत. शंख चक्र गदा पद्म धारण करणाऱ्या परमेश्वराचं मुख प्रसन्न आहे. कमलाप्रमाणे मोठे नेत्र आहेत. पीतांबरधारी, त्या स्वरूपाचं चिंतनही काही काही लोक करतात. तेही सगुणरूप सुद्धा स्थूलच आहे. मूर्त नाही. आपल्या मनामध्ये खरा भक्तीयोग निर्माण होईपर्यंत हे भगवंताचं स्थूल रूप जे आहे त्याचं ध्यान करावं.

क्रियावसाने प्रयतः स्मरेत ॥ २.२.१४ ॥ श्री. भा.

यावन्न जायेत परावरेऽस्मिन विश्वेश्वरे द्रष्टरि भक्तियोगः ।<br>
तावत् स्थवीयः पुरुषस्य रूपं क्रियावसाने प्रयतः स्मरेत ॥ २.२.१४ ॥ श्री. भा.

कर्तव्य कर्म पुष्कळ आपली असतात म्हणाले. मधे जर वेळ मिळाला तर या भगवंताच्या स्वरूपाच्या ध्यानाचा अभ्यास त्यांनी करावा. मनाला विषयापासून बाजूला करण्याचा अभ्यास या ध्यानाच्या योगाने होतो. असा हा अभ्यास झालेला असताना, शरीर त्याग करण्याची त्याला जर इच्छा झाली, तर तो योगीमहात्मा, ध्यानयोगी, तो आपल्या शरीरातून जो प्राणवायू शरीरात वाहणारा आहे, त्या प्राणवायूच्या आधाराने सगळी इंद्रियं आहेत, मन वगैरे आहे, त्याला उर्ध्वगती तो देतो आहे. मूलाधार चक्र आहे सर्वात खाली, त्याच्यावरती असलेलं स्वाधिष्ठान जे चक्र आहे, लिंगस्थानात असणारं त्या प्राणवायूला तो तिथंपर्यंत नेतो. त्याच्याही वर नाभीस्थानात मणिपूर चक्र म्हणून आहे. तिथपर्यंत तो प्राण येतो. नंतर ह्दयामध्ये अनाहत चक्र आहे. या चक्रातून वक्षस्थलामध्ये विशुद्धी चक्र आहे. आणि हळू हळू तो वायू वरती गेलेला असताना आपल्या टाळू

स्थानामध्ये सहस्त्रदल चक्र आहे. तिथपर्यंत तो वायू येतो आहे. तिथून पुन्हा खाली भ्रूमध्यामध्ये आज्ञा चक्र आहे त्याठिकाणी तो वायू येवून पोहचतो. थोडा वेळ तो तिथं राहतो आणि एकदम ब्रह्मरंध्राचा भेद करून शरीराच्या बाहेर म्हणजे सगळी इंद्रियं वगैरे घेऊन तो प्राणवायूबाहेर पडतो. हा मुक्तीचा मार्ग आहे. ब्रह्मलोकापर्यंत सूर्यकिरणांच्या सहाय्याने तो जावून पोहचतो आहे. त्याला, साधकाला, दिव्य असे विषयभोग मिळावे अशी वासना इच्छा असेल तर त्याला अष्टमहासिद्धी प्राप्त होतात. तपोलोक आहे, जनलोक आहे, महत्तलोक आहे, ब्रह्मलोकांपर्यंत तो त्याच्या स्थानामध्ये जातो आहे. शरीर निर्माण करतो आहे. अनंत विषयभोग घेतो आहे. हा जो योगी महात्मा, ध्यानयोगी, कुठेही त्रैलोक्याच्या आत–बाहेर कुठेही जातो आहे. केवळ कर्मयोगी आहेत त्यांना मात्र असं गमन करता येत नाही. त्या सुषुम्ना नाडीच्या द्वाराने रंध्रातून बाहेर पडलेला आहे. हा योगी महात्मा पहिल्या प्रथम अग्नीलोकाला जातो.

अग्निर्ज्योतिरहःशुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ।। ८.२४ ।। श्री. भ.गीता.

भगवतगीतेमध्ये भगवान सांगतात. अग्नीलोकात तो जातो. असे पुढचे ज्योतीर्लोक, अशा क्रमाने तो ब्रह्मलोकात जावून राहातो आहे. ब्रह्मलोकामध्ये तीन प्रकारचे पुण्यशील लोक जातात. अश्वमेधादिक यज्ञ करून, पुण्य संपादन करून ब्रह्मलोकाला जाता येतं म्हणाले असे जे पुण्यात्मे ब्रह्मलोकात जाऊन राहिले, ते पुढच्या सृष्टीच्या वेळेला, त्या सृष्टीमध्ये अधिकारी जीव होतात. सूर्य आहे, चंद्र आहे, वरूण आहे, यमधर्म आहे. अधिकारावर त्यांची नेमणूक ईश्वराकडून केलेली आहे. भगवान हिरण्यगर्भांची भक्ती करून आराधना करून जे ब्रह्मलोकाला गेलेले आहेत ते ब्रह्मदेव तिथे असेपर्यंत तिथे राहतात. पुन्हा काही त्याला इथे जन्माला यावे लागत नाही. ब्रह्मदेवांबरोबरच ते गुप्त होतात. तिसरे जे भगवत् भक्त आहेत. ते आपल्या इच्छेने ब्रह्मलोकात जातील, दुसरीकडे कुठेही जातील, विष्णू लोकांनाही जातील. असा भगवत्भक्त आपल्या योगसामर्थ्यानी ह्या मायाबंधनातून मुक्त होतो आहे. परीक्षित राजा, हरीभक्ती हा मोठा मार्ग आहे. कल्याण याच्या योगाने होत आहे. सर्वांची एकंदर वेदांचा पूर्ण विचार ब्रह्मदेवांनी केला अणि हरीभक्ती हेच साधन श्रेष्ठ आहे, असा त्यांनी आपल्या बुद्धीने निर्णय केलेला आहे. सर्वही जीवांचा अंतर्यामी भगवान् श्रीहरी आहे. सर्वांना प्रेरणा करणारी त्याची शक्ती आहे. त्याचं चिंतन करणं, त्याचं ध्यान करणं, याने तो हरीकृपेला प्राप्त होतो. शुकाचार्य म्हणतात राजा हे मार्गदर्शन तुला केलेलं आहे. हेच करायचंय आता. शरीर पडणार आहे वगैरे तू लक्षामध्ये आणू नकोस, शरीर पडलं काय ? राहिलं काय ?

तोपर्यंत तुझ्या मनामध्ये भगवंताचे स्मरण कर. अनेक देवतांच्या उपासनेचे काय फल आहे ते शुकाचार्य महाराजांनी सांगितलेलं आहे. शेवटी तीव्र भक्तियोग झाला पाहिजे. त्या भक्तिमुळे, भगवत् प्रेमामुळे मनामध्ये कोणताही दुसरा विचार येत नाही. संसार सगळा विसरला पाहिजे. हा अभ्यास त्यांनी सांगितला आहे. आयुष्य चाललेलं आहे हा विचार केला पाहिजे. श्वासोच्छ्वास घेतला म्हणजे जिवंत राहिला असे नाहीये. पुष्कळ वर्ष झाडाचं आयुष्य असतं. शे-पाचशे वर्ष मोठीमोठी झाडं राहतात. काय त्याचा उपयोग आहे म्हणाले. तेव्हा भगवान श्रीहरीच्या लीला श्रवण करणं, त्याचं चिंतन करणं आणि ते प्रेम अंत:करणामध्ये निर्माण करून घेणं हे महत्त्वाचं.

परीक्षित राजाच्या मनावरती परिणाम झालेला आहे. शुकाचार्य महाराज सांगताहेत, त्याचा उध्दार झाला पाहिजे. असा त्यांचा संकल्प आहे. भगवत् स्वरूपाचं चिंतन झालं पाहिजे. भगवत् कथा या स्मरणपूर्वक ऐकायला पाहिजेत. असं त्यांनी ठरविले. सर्व एकंदर ममता पाश मनातून काढून टाकले. शरीर माझं नाही, माझं काही नाहीये. सर्वत्र संग दूर केलेला आहे. कृष्णकथा श्रवण करण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यानी शुकाचार्य महाराजांना सांगितलं महाराज, भगवान श्रीहरी हे विश्व उत्पन्न करतात, रक्षण करतात आणि पुन्हा त्याचा संहार करतात ही त्यांची कार्य आहेत. काल पुष्कळ जातो त्याच्यामध्ये तेव्हा हे त्याचे कार्य एकदम चालू आहे की क्रमाने चालू आहे. कसं कसं चालू आहे ? त्यांची शक्ति कशी आहे ? हे मला सांगा.

शुकाचार्य महाराजांनी आरंभाला भगवान श्रीहरीची प्रार्थना केलेली आहे, की त्या परमेश्वराचे गुणवर्णन, लीलावर्णन मला करायचं आहे. त्यानी मला आणखी प्रेरणा करावी. माझ्या बुद्धिला प्रेरणा करून, माझ्या वाणीच्या द्वारांनी आपले गुण वर्णन करून घ्यावेत अशी प्रार्थना करून शुकाचार्य महाराजांनी बोलायला आरंभ केला. शुकाचार्य म्हणाले राजा असाच प्रश्न नारदांनी विचारला. ब्रह्मदेव एकदा ध्यानस्थ बसलेले होते. ध्यानातून सावध झाल्यावर नारदांनी विचारलं, पिताजी, सर्व विश्व निर्माण करणारे आपण आहात, तर आपण कोणाचं ध्यान करता आहात ? आमची कल्पना आपणच विश्व निर्माण करणारे, विश्व पालन करणारे, विश्वाचा उपसंहार करणारे आहात. आपल्यापेक्षा कोणी श्रेष्ठ ही कल्पनाही आमच्या मनामध्ये नाहीये. तेव्हा आपला हा ध्यानयोग आम्ही पाहिला. आम्हाला आश्चर्य वाटले कोणाचं ध्यान करता ? ब्रह्मदेव म्हणाले, नारदा बरं झालं तू आज हा प्रश्न विचारलास, भगवंताचं सामर्थ्य काय आहे हे तुला समजावून सांगितले पाहिजे. स्वयंप्रकाश तो परमात्मा आहे. तो सर्व विश्वाला प्रकाशित करतो. सूर्य चंद्रादिक प्रकाश देणारे त्यांनाही प्रकाश देणारा तो परमात्मा आहे. त्याच्या कृपेने ही सृष्टी, विश्व निर्माण

करण्याचे कार्य मी करतो आहे. ह्या नारायणाच्या सामर्थ्याचे वर्णन सर्वही वेदामध्ये शास्त्रांमध्ये, पुराणांमध्ये केलेलं आहे.

कालं कर्म स्वभावं च मायेशो मायया स्वया ।
आत्मन् यदृच्छया प्राप्तं विबुभूषुरुपाददे ।। २.५.२१ ।। श्री. भा.

भगवान श्रीहरी एकटे आहेत. सृष्टी झाल्यानंतरही ते एकटेच आहेत. पूर्वी ते एकच होते. आणि अनेकरूप व्हावं. विविध रूप आपण व्हावं असा त्यांचा संकल्प झाला आणि सृष्टीला सुरवात झाली. पंचभूतं तयार झाली. सृष्टी करण्याकरता त्यांनी कालाचं साहाय्य घेतलं. कालही त्यांचंच स्वरूप आहे. जीवांची सर्व कर्मं जी आहेत ती कर्म पाहून सृष्टी केली. कालाचा उपयोग म्हणजे सत्व, रज, तम हे त्रिगुण जे आहेत, हे सर्व व्यापक विचार आहेत.

सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रलयः ।

त्या त्रिगुणांची समस्थिती असणं म्हणजे प्रलय आहे. यालाच प्रकृती म्हणतात. प्रलय म्हणजे विश्व संपलं. त्या गुणांमध्ये विषमता सुरू झाली. त्याप्रमाणे स्वभावाप्रमाणे परिणाम म्हणजे रूपांतर होय. कर्मामुळे महत् तत्व म्हणून जे पहिले तत्व आहे ते निर्माण झालं. बुद्धितत्व त्यालाच म्हणतात. त्या महत्‌तत्वापासून अहंकारतत्व निर्माण झालं. हे सात्विक, राजस, तामस या तीन प्रकारच्या अहंकारा मध्ये आहे. तामस अहंकाराच्या भागापासून पंचभूतं उत्पन्न झाली. आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी ही पंचभूतं क्रमाने निर्माण झाली. त्या पंचभूतांच्या सत्वांशापासून पंच ज्ञानेंद्रियं निर्माण झाली. प्रत्येक जीवांची इंद्रियं आहेत. म्हणजे किती इंद्रियं निर्माण झाली असतील सृष्टीत ! जीव अनंत आहेत. केवळ मनुष्यालाच इंद्रियं आहेत असं नाही. पशूंना आहेत, पक्ष्यांना आहेत. जलचर प्राणी, सस्तन प्राणी आहेत. प्रत्येकांची इंद्रियं तयार झालेली आहेत. तसेच राजस अंशापासून कर्मेंद्रियं तयार झाली. ती सगळी तत्वं पूर्वी भिन्न भिन्न होती म्हणाले. भगवान श्रीहरींनी सर्व तत्वांचं एकत्रीकरण केलेलं आहे. त्यापासून ब्रह्मांड निर्माण झालं. सगळे लोक तयार झाले. पाताल आहे, रसातल आहे, सप्तपाताल क्रमाने निर्माण झाले, पृथ्वी तयार झाली. भूलोक, स्वर्गलोक, गोलोक, जनलोक, सत्यलोकापर्यंत सर्व सृष्टी, ब्रह्मांड वगैरे तयार झाले. सृष्टीरचना संकल्पाने झालेली आहे हे सर्वही परमेश्वराच्या कृपेने, संकल्पाने निर्माण झाले. सर्व जीवांकरता विविध रूप तोच परमात्मा झालेला आहे. हे समजून घेणं मोठं कठिण आहे म्हणाले. अहंकार जो सर्वत्र व्यापलेला आहे. अहंकाराचं कार्य म्हणजे सगळी सृष्टी



आहे. त्या अहंकारापासूनच सर्व जीवांची बुद्धी आहे ती व्यष्टी बुद्धी त्याच्यापासूनच आहे. त्या बुद्धीमध्ये अहंकाराचा संबंध असल्यामुळे ईश्वराच्या शक्तीकडे त्या बुद्धीचं लक्ष जात नाही, मनाचं लक्ष जात नाही. आपण वेगळे आहोत, आपण समर्थ आहोत, आपल्या सामर्थ्यानी आपण सर्व सुखी होवू, कल्याण आपलं प्राप्त करून घेवू, इतरांचंही कल्याण करून घेवू असे सगळेही विचार, त्या अहंकारामुळे मनामध्ये येतात. त्या अहंकाराची शक्ती बाजूला करणं हे फार कठीण आहे म्हणाले, इतका तो अहंकार बुद्धिशी तादात्म्य झालेला आहे. ईश्वराच्या कृपेनेच हे व्हायचं म्हणाले. परमेश्वराने मला आज्ञा केल्यामुळे, हे सृष्टी कार्य झालेलं आहे.

मग ब्रह्मदेवाने ईश्वराचे अवतार किती झाले हे संक्षेपाने नारदांना सांगितले.

यत्रोद्यतः क्षितितलोध्दरणाय बिभ्रत् ।
क्रौडीं तनुं सकलयज्ञमयीमनन्तः ।। २.७.१ ।। श्री. भा.

पृथ्वी पाण्यामध्ये बुडालेली आहे तिला वर काढण्याकरता वराहरूप भगवंतानी धारण केलं. त्यांनी रूची ऋषींचे पुत्र म्हणजे यज्ञ हे रूपही धारण केलं. कर्दमांच्या गृहामध्ये त्यांची पत्नि देवहूतिपासून, कपिल हा अवतार धारण केलेला आहे. ज्ञानमार्गाचा उपदेश त्यांनी केला. अत्री ऋषींना पुत्राची इच्छा उत्पन्न झाली. भगवंतांची आराधना त्यांनी केली आणि भगवंतांनी आत्मदान त्यांना केलं.

दत्तो मयाहमिति यद् भगवान् स दत्तः ।। २.७.४ ।। श्री. भर.

भगवंतांनी सांगितलं तुमची भक्ति पाहून मी माझेच दान तुम्हाला केलेलं आहे. मी दत्त आहे. तुम्हाला दिला गेलेलो आहे. तुमचा मी आहे म्हणून दत्त हे नाव प्राप्त झाले. कार्तवि‍र्यार्जुन आहे, यदूराजा, अनेक मोठेमोठे ऋषी भगवंतांच्या कृपेने योगसिद्ध झालेले आहेत. पुढं सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार हेही रूप भगवंतांनी धारण केलेलं आहे. असे पुष्कळ अवतार झालेले आहेत. पृथूराजा हेही भगवंतांनी रूप धारण केलं. ऋषभ देव अवतार हेही भगवंताचे स्वरूप आहे. माझ्या

यज्ञामध्ये ब्रह्मदेव सांगताहेत, हयग्रीवरूपाने भगवंत प्रकट झालेले आहेत. मत्स्यावतार, कूर्मावतार, नरसिंह अवतार, हिरण्यकश्यपूचा नाश करण्याकरता धारण केला. मगराने पायाला धरले आहे. गजेंद्रावर कृपा करण्याकरता भगवंतांनी अवतार धारण केला, त्याला मुक्त केलेलं आहे. अदितीचे पुत्र वामनरूप झाले, बलीराजाकडून सर्वराज्य घेवून इंद्राला त्यांनी अर्पण केलं. तुमच्यावरतीही नारदा त्या भगवंतांनी कृपा केलेली आहे. तुम्हाला योगाचा, ज्ञानाचा उपदेश त्याच वासुदेवाने केलेला आहे.

धन्वन्तरिश्च भगवान् स्वयमेव कीर्ति:
नाम्ना नृणां पुरुरुजां रुज आशु हन्ति ।। २.७.२१ ।। श्री. भा.

भगवान धन्वंतरी रूप घेऊन आलेले आहेत, सर्वांच्या रोगांची निवृत्ती करण्याकरता त्यांचं मार्गदर्शन आहे. उन्मत्त क्षत्रियांना शासन करण्याकरता भार्गवराम रूपाने भगवान प्रकट झालेले आहेत. रामचंद्र रूप धारण केलं, रावणादिकांचा संहार केला. कृष्णावतार धारण करणार आहेत, असं पुढचं सांगताहेत त्या वेळेला नारदाला. संपूर्ण कृष्णचरित्र संक्षेपाने ब्रह्मदेवाने नारदांना सांगून दिले. हे सगळं कृष्णचरित्र संक्षेपाने ब्रह्मदेवांच्या मुखातून नारदांनी ऐकलं. व्यासांच्या आश्रमामध्ये येवून त्यांना ते सांगितले. तुम्ही विचार करून तुम्हाला आठवेल तसे ते लिहा म्हणून सांगितले. तर असे अनेक अवतार भगवान श्रीहरींनी धारण केले. लोकरक्षणाकरता हे आहेत. सृष्टी झाली पण संरक्षण करणं हेही जबाबदारीचं कामं आहे ना. ते संरक्षण करण्याकरता म्हणून धर्मशील अशा प्रकारचे महात्मे, त्यांना विरोध करणारे अधार्मिक लोक यांना शासन करून, धर्मशीलांचे रक्षण करणं म्हणजे धर्माचं संरक्षण आणि विश्वाचं संरक्षण होतं. असे अनेक अवतार भगवंतांचे झालेले आहेत म्हणाले त्याचा काही अंत लागणार नाही.

ब्रह्मदेवांनी याप्रमाणे नारदांना सर्व समजावून सांगितले. शुकाचार्य सांगतात राजा, ही परमेश्वराची मायाशक्ती जी आहे; त्या मायाशक्तीने सर्व जीव मोहामध्ये पडलेले आहेत. ईश्वराचे आपण अंश आहोत अथवा ईश्वररूप आहोत हे काही त्यांना स्मरण राहिलेलं नाही. भगवंतांची कृपा संपादन करण्याकरता प्रयत्न करणारे, सत्संगती ज्यांना घडलेली आहे, अशा प्रकारचे जे महात्मे आहेत. तेच या मार्गाकडे जात आहेत. कठीण मार्ग जरी असला तरी तो सुलभ होतो आहे. त्यांना मार्गदर्शक जे महात्मे त्यांच्या संकल्पाने ते ईश्वरकृपासंपन्न होतात.

आपल्याला ईश्वराची कृपा झाली हे ब्रह्मदेवांनी नारदांना सांगितलं. त्यांच्या नाभिकमलातून

मी उत्पन्न झालो म्हणाले. चार दिशेला चार मुखं ब्रह्मदेवांना आहेत. बाहेर सगळं पाणीच पाणी आहे, वर आकाश आहे. आपला जन्म कोठून झाला. त्या कमलातून आत प्रवेश केला व शोध घेतला पण मला काही कळलं नाही. कोण आपला स्रष्टा, जन्मदाता कोण आहे ? एकदम त्या जलातून आवाज आलेला आहे. तप म्हणजे तपश्चर्या करा, आलोचन करा, स्मरण करा. आणि मग मी तपश्चर्या केली, पुष्कळ दिवसपर्यंत. मग भगवंतांचे दर्शन मला झालं म्हणाले. आणि त्यांनी मला उपदेश केला. थोडक्यात चतु:श्लोकी भागवत त्याला म्हणतात,

अहमेवासमेवाग्रे नान्यद् यत् सदसत् परम् ।
पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोऽस्म्यहम् ।। २.९.३२ ।। श्री. भा.

भगवान सांगतात, ब्रह्मदेवा प्रथम सृष्टीच्या पूर्वी मीच आहे म्हणाले, दुसरं काही नाही. कार्य नाही, कारण नाही काही नाही. सृष्टीचा विनाश झाला, प्रलय झाल्यानंतरही मीच आहे. आत्ताही मीच आहे. पण मी एकटाच आदि अंती मध्ये असताना माझ्याशिवाय जे पदार्थ दिसताहेत हीच माझी माया आहे म्हणाले. खरा पदार्थ नाहीये. खरा पदार्थ म्हणजे भगवंताचं स्वरूप आहे, परमात्मा आहे. त्याच्याशिवाय काही काल दृष्य, काही काल नष्ट होणारे असे पदार्थ ही परमेश्वराची माया आहे. सर्वही पंचमहाभूतं ही सर्व भौतिक पदार्थामध्ये प्रविष्ट आहेत, त्यांचे अंश सगळीकडे आहेत. आणि अप्रविष्टही आहे. भूतांनी त्यांच्यामध्ये प्रवेश केला म्हणजे पूर्वी त्याठिकाणी नव्हते असे म्हणले पाहिजे, प्रवेश केल्यानंतर आले, असं नाहिये. प्रविष्ट आहे याचा अर्थ दिसताहेत, उपलब्ध आहेत. त्याप्रमाणे सर्व ठिकाणी माझा संबंध आहे आणि नाही. हाच विचार तत्वजिज्ञासू पुरुषांनी निरंतन करायचांय. सर्व कालामध्ये अनवृत्ति कोणाची आहे ? काही काल राहणारं आणि काही काल नसणारं असं कोण आहे ? सगळा विचार करून निरंतर ज्याची अनवृत्ति आहे तेच खरं तत्व आहे असं समजून घ्यायचं आहे. हा तुम्ही विचार करा आणि सृष्टी रचना करा, म्हणजे तुम्हाला काहीही अहंकारादिक विकार बाधा करू शकणार नाही. हे मला सांगितलं परमेश्वरांनी आणि त्याच्याच कृपेने सर्व हे झालेलं आहे. या भागवत पुराणामध्ये शुकाचार्य सांगताहेत परीक्षित राजाला याची दहा लक्षणं आहे, दहा विषय आहेत.

अत्र सर्गो विसर्गश्च स्थानं पोषणमूतय: ।
मन्वन्तरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रय: ।। २.१०.१ ।। श्री. भा.

सर्ग हा पहिला विषय आहे.

भूतमात्रेन्द्रियधियां जन्म सर्ग उदाहृत: ।। २.१०.३ ।। श्री.भा.

पंचभूतं, इंद्रियं, बुद्धी यांची उत्पत्ती कशी झाली याचं वर्णन याला सर्ग म्हणतात. त्रिगुणांच्या विषमतेमुळे पुढची सगळी सृष्टी जी आहे त्याला विसर्ग म्हणतात. स्थिती-स्थान हा तिसरा विषय आहे. ईश्वराचा सर्वत्र विजय कसा आहे, उत्कर्ष कसा आहे, हे वर्णन केलेलं आहे काही काही कथा रूपांनी त्याला स्थान हे विषय म्हणतात. पोषण नावाचा विषय म्हणजे ईश्वराने कोणाकोणावर अनुग्रह केला कसा उध्दार केला, हा एक विषय आहे. मन्वंतर म्हणजे सदाचार. सज्जनपुरुष कसं आचरण करतात याकरता मन्वंतर हा विषय आहे. कर्मवासना म्हणजे या वासनांच फल कसं मिळतंय ? रजोगुणी, तमोगुणी दैत्यांचा नाश कसा झाला, सात्विक वृत्तीने रहाणारे, भगवत भक्त प्रल्हादिक यांचा उद्धार, संरक्षण कसं झालं ? हे वासनांचं निरूपण आहे. सूर्यवंश, चंद्रवंश यांच्यामध्ये झालेले जे अवतार हरीचे आहेत त्यांचं चरित्र. भगवत् भक्तांचं चरित्र हे ईशानु कथा म्हणून एक आहे. निरोध म्हणजे प्रलय म्हणजे काही शक्तींचा निरोध करणं आणि पूर्ण शक्तींचा निरोध म्हणजे महाप्रलय होय. हे सगळं वर्णन आलेलं आहे. आश्रय मुक्ती म्हणजे या सर्वातून मुक्त होणं. मायाशक्तीच्या पलिकडे गुणत्रयातीत होणं म्हणजे मुक्ती होय. आश्रय म्हणजे ह्या सर्वही कार्याला अधिष्ठान भूत जो परब्रह्मरूप परमात्मा आहे, तो आश्रय आहे. अशा प्रकारे सगळे विषय भागवत पुराणामध्ये सांगितलेले आहेत.

शुकाचार्य महाराजांनी हे संपूर्ण भागवत परीक्षित राजाला संक्षेपाने सांगितले.

आता सविस्तर विषय सांगण्याला त्यांनी आरंभ केला.

एवमेतत्पुरा पृष्टो मैत्रेयो भगवान् किल ।
क्षत्त्रा वनं प्रविष्टेन त्य:त्वा स्वगृहमृध्दिमत् ।। ३.१.१ ।। श्री. भा.

शुकाचार्य सांगतात राजा, आपल्या घराचा त्याग करून विदूरजी बाहेर पडले. मैत्रेय महर्षि आणि त्यांची गाठ पडलेली असताना, त्यांच्या बरोबर संवाद झाला. विदुरजीही मोठे अधिकारी, यमधर्माचाच अवतार होते. राजाने विचारले, कोठे संवाद झाला, विदूरजींनी घरदार सोडून बाहेर पडण्याचे काय कारण झाले ? शुक सांगतात राजा, धृतराष्ट्र आपल्या मुलांना काही आवरू शकत नाहीये. दुर्योधन उन्मत्त झालेला आहे. अहंकाराचं तो रूप आहे. त्या सर्व दुर्जन मुलांचा निग्रह करणं याच्या हाताबाहेर गेलेलं आहे. शेवटी आपल्या जेष्ठ बंधूची मुलं म्हणजे पांडवांचा नाश करण्याचा

प्रयत्न केला. लाक्षागृहामध्ये त्यांना राहण्यास सांगितलं. त्या गृहाला अग्नी लावून त्यांचा नाश करण्याचे त्यांनी ठरवले. भगवान श्रीहरी व विदूरजी यांच्या कृपेमुळे लाक्षागृहाखाली नवीन भुयार तयार केलं, त्यातून ते पांडव आपल्या मातेला बरोबर घेऊन बाहेर पडले. आणखी अपराध कौरवांनी केला, द्रौपदीच्या केसाला धरून तिला भर सभेत ओढून आणलेलं आहे. विवस्त्र करण्याचा प्रयत्न दुर्योधन, दुःशासन यांनी केला पण धृतराष्ट्र काहीही बोलला नाही. द्यूतक्रीडा झाली, कपटाने धर्मराजाला व पांडवांना जिंकलेलं आहे. परंतु तो सत्यनिष्ठ धर्मराज वनामध्ये निघून गेला. आपल्या बंधूंना, पत्नीला बरोबर घेऊन तेरा वर्ष संपल्यानंतर त्यांनी आपला दायभाग मागितला. माझं राज्य अर्धं असेल ते मला द्या. कृष्ण भगवान हे शिष्टाई करण्याकरता गेले. पण दुर्योधनाने त्यांचेही ऐकले नाही. विदूरजींनी सांगितलं, सगळ्यांनी सांगितलं. धृतराष्ट्रांनी सांगितलं, गांधारीनी सांगितलं, भीष्माचार्यांनी सांगितलं, द्रोणाचार्यांनी सांगितलं. सर्व ऋषीमंडळींनी दुर्योधनाला पुष्कळ सांगितलं, युद्ध नको आता. नाही म्हणाला, युध्दाशिवाय राज्य मी देणार नाही. एके दिवशी धृतराष्ट्रांने आपल्या बंधूंना म्हणजे विदुरजींना विचारले, मोठ राजनितिज्ञ विदुरजी होते. काय करायचं आता आपलं कुल सुरक्षित राहण्याकरता काय करावे ? भर सभेमध्येच धृतराष्ट्रांनी हे विचारलं. विदुरजींनी त्यांना सांगितलं, हा तुमचा मुलगा, या सर्वांसाठी कारण आहे. कृष्णाकडे याचं बिलकुल लक्ष नाहीये. ह्याचं ऐश्वर्य सगळं नष्ट झालेलं आहे. तुमचं कुल सुरक्षित राहावं अशी तुमची इच्छा असेल तर या दुर्योधनाला राज्यातून बाहेर घालवून दिलं पाहिजे. तरच कुल सुरक्षित राहिल. पण फार वेळ झाला याला. दुर्योधनाच्या ताब्यात सर्वही आलेलं आहे. सर्व राज्यसभा सर्व मंडळी साम, दाम, भेद सर्व दृष्टीने त्याने ताब्यात घेतलेलं आहे. सभेमध्ये आपल्या पित्याला हा विदूर असा सल्ला देतो आहे. ह्यालाच अगोदर इथून हाकललं पाहिजे. म्हणून दुर्योधन उठून उभा राहिला आणि विदूरजींचा त्यांने अपमान केला. आमच्या या राजसभेमध्ये या दासीपुत्राला कोणी बोलावले म्हणाला. आमच्या राजसभेत येवून बसण्याचा याला काय अधिकार आहे ? यांनीच हद्दपार व्हावं, इथून निघून जावं. यालाच घालवून द्या. दुर्योधनाने इतका विदूरजींचा अपमान केला, पण सर्व, गप्प बसलेले आहेत. हे ऐकल्याबराबेर विदूरजी उठलेले आहेत. राजेसाहेब मी आता निघालो म्हणाले, मला आता इथे राहाणे शक्य नाही. तुम्हीही काही प्रतिकार करत नाही, तुमच्याही मनामध्ये काही विचार येत नाही, मुलाला आवरत नाही, तुम्ही. तेव्हा तुम्ही व तुमची मुलं काय ते पाहून घ्या. चाललो मी. निघून गेले विदूरजी. तीर्थयात्रा करताहेत. सत्संगती करताहेत, मोठ्या महात्म्यांची भेट घेत आहेत. असे तीर्थयात्रा करता करता प्रभास क्षेत्रात ते येवून

पोहचले. त्यावेळेला धर्मराजाला राज्य मिळालेलं आहे असं त्यांना समजले. सर्वही कौरवांचा संहार झालेला आहे हेही समजले. दुःख झाले त्यांना पण शोक आवरला त्यांनी. त्यांच्या कर्माचे फल त्यांना मिळाले म्हणाले.

नंतर सर्व तीर्थक्षेत्रात फिरता फिरता यमुना नदीच्या तीरावर वृंदावनात येवून विदूरजी पोहचले. त्याठिकाणी महान भगवत्‌भक्त उध्दवजींची भेट झाली. शांत आहेत उध्दवजी, वासुदेवाचे भक्त. साक्षात देवगुरू बृहस्पतिचे शिष्य आहेत. सर्व राजनीतीचा अभ्यास बृहस्पतिंच्याकडून केलेला आहे. प्रेमाने आलिंगन दिलं त्यांना. विदूरजींनी विचारलं उध्दवजी रामकृष्ण हे कुशल आहेत ना महाराज ? वसुदेव, देवकी सगळ्यांचं कल्याण आहे ना ? सर्वही यादवांचं कुशल आहे ना ? पुष्कळ प्रश्न केले. दुर्योधनाला सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न केला म्हणाले मी. भगवान श्रीकृष्णांनीही त्याचे डोळे उघडावे म्हणून पुष्कळ प्रयत्न केला. पण तो शुद्धीवर आला नाही आणि त्याचा नाश झालेला आहे. गोपालकृष्णांचं सर्व कुशल मला सांगा.

उध्दवजींनी हे ऐकल्याबरोबर प्रथम त्यांना काही बोलताच येईना. सगळी आठवण झाली द्वारकेतील. पाच वर्षाच्या वयापासून उध्दवजी भगवत्‌भक्ती करत होते. पाच वर्षाचे असताना काही तरी मूर्ती मांडलेली आहे. पूजा करताहेत, ध्यानस्थ बसलेले आहेत. त्यांची माता जवळ आलेली आहे, अरे भूक लागलेली आहे, जेवणाची वेळ झाली, चल उध्दवा. पण ते तहान भूक सगळं विसरून गेले. अशा लहानवयापासून त्यांचं मन भगवत्‌भक्तीमध्ये तल्लीन झालेले आहे आणि शेवटी तर भगवंतांची संगती अखंड घडलेली आहे. श्रीकृष्ण कोण आहेत याची जाणीव बाळगून त्यांची संगती करणारे, उध्दवजी एकटे आहेत. अक्रूरजी एक होते. पण हे उध्दवजी श्रेष्ठ आहेत. त्यांना काही बोलता येईना. स्मरण झालं कृष्णाचं. थोड्यावेळाने अश्रू पुसून त्यांनी बोलायला आरंभ केला.

कृष्णद्युमणिनिम्लोचे गीर्णेषुअजगरेण ह ।
किं नु नः कुशलं ब्रूयां गतश्रीषु गृहेष्वहम् ।। ३.२.७ ।। श्री. भा.

विदूरजी, भगवान श्रीकृष्णचंद्रांचा अस्त झालेला आहे. सर्व यादव कालसर्पाच्या मुखामध्ये गेलेले आहेत. कोणाचं कुशल सांगायचं ? ह्या मृत्यूलोकात राहाणारे यादव अत्यंत दुर्दैवी आहेत, असं मी समजतो. इतकी वर्षं त्या भगवंतांच्या सान्निध्यामध्ये राहून, भगवान श्रीहरीला या यादवांनी कोणी ओळखलं नाही. आमच्या प्रमाणेच हाही एक मनुष्य आहे. पांचभौतिक शरीर आमच्या

प्रमाणेच याचेही आहे. हा यादवांच्यामध्ये एक पुढारी आहे आमचा. बुद्धिवान आहे, एवढीच कल्पना यादवांची आहे. भगवंतांनी आपण असेपर्यंत त्यांचं संरक्षण केलं. आपल्या अनेक शक्तींचं त्यांनी उद्‌घाटन केलेलं आहे. शक्ती प्रकाशित केली आणि अदृष्य झाले भगवान. भगवंतांनी कितीतरी लीला केलेल्या आहेत. लहानपणापासून उध्दवजींनी भगवंताचं चरित्र वर्णन केलेलं आहे. रुक्मिणी हरण कसं केलं ? जांबवतीबरोबर विवाह कसा झाला ? सगळं उध्दवजी सांगताहेत कारण अखंड स्मरण आहे ना. भगवंताच्या लीला वर्णन करण्यापलिकडे दुसरा कोठलाही विषय मनामध्ये नाहीये. असा बराच काल गेलेला आहे. यादवांच्या मुलांनी अपमान केल्यामुळे रागावलेल्या ऋषीमंडळींनी त्यांना शाप दिलेला आहे, यादवांच्या कुलाचा क्षय होईल. पुढं सगळ्या यादवांना बरोबर घेऊन गोपालकृष्ण प्रभास क्षेत्रामध्ये येवून पोहचले आहेत. दानधर्म केलेला आहे, सर्वांच अर्चन केलेलं आहे. पुढं सर्वांनी भोजन केलं व यथेच्छ मद्यप्राशन केलं. वेळ आलेली आहे शेवटची. बोलाचाली सुरू झाली. त्यांच्यामध्ये सगळे विरोधी लोक होतोच ना. सर्वांना एकत्र करण्याचं काम बलरामजी करत होते. संकर्षण असेच त्यांचं नाव आहे. कोणाच्याही मनात विरोध राहू नये हे ते काम करत होते. प्रयत्न ते करत होते. पण विरोध जाणार कसा ? त्याचं पर्यवसान म्हणजे प्रत्यक्ष युध्दाला सुरवात झाली. सूर्यास्ताच्या वेळेला सर्व यदुकुलाचा संहार झालेला आहे. हे आपल्या मायाशक्तीचे कार्य त्यांनी पाहिलं. सृष्टी-स्थिती-प्रलय तीनही मायाशक्तीचीच कार्य आहेत. आपल्या डोळ्यादेखत सर्वही यादव परस्परात युध्द करून मरून गेलेले आहेत. भगवंतांनी मला सांगितलं उध्दवा,

बदरीं त्वं प्रयाहीति स्वकुलं संजिहीर्षुणा ।। ३.४.४ ।। श्री. भा.

अगोदरच सांगितलं होतं हे सगळं करण्यापूर्वी मला सगळा उपदेश केला, आत्मस्वरूप कसं आहे हे सांगितलं तू आता बद्रिकाश्रमाला जा, मलाही आता वैकुंठ लोकाला जायचं आहे. मला ज्या वेळेला उपदेश केला त्यावेळेला मैत्रेय महर्षि, व्यासांचे मित्र, तेही त्याठिकाणी आलेले होते. त्यांच्या समक्ष, ते असताना, सर्व मार्गदर्शन भगवंतांनी केलेलं आहे. त्यांच्याच आज्ञेने आता मी बद्रिकाश्रमाला जाण्याला निघालो आहे. त्याचं स्मरण झाल्यामुळे मला अत्यंत वियोग दुखः झालेलं आहे. विदुरांनी विनंती केली महाराज, उध्दवजी प्रत्यक्ष भगवंतांनी तुम्हाला ज्ञानाचा उपदेश केला, म्हणजे भगवानच तुमचे गुरू आहेत. ते आत्मज्ञान कसं आहे, आत्मस्वरूप कसं आहे, आपण सांगता का ? उध्दवजी म्हणाले, बाबा तुमची आठवण झाली त्यावेळेला, देवांनी मैत्रेयांना सांगितले, मैत्रेय महर्षि, विदुरांची ज्या वेळेला भेट होईल त्यावेळेला हे ज्ञान विदूरांना तुम्ही सांगा.

तेव्हा तुम्ही त्यांच्या आश्रमामध्ये जा. असा रात्रभर विदूरजी आणि उध्दवजी यांचा संवाद चाललेला आहे. भगवंतांच्या कथा सांगण्यामध्ये सबंध रात्र कशी गेली हे कळले नाही. भगवंताच्याच कृपेमुळे उध्दवजी मात्र जिवंत राहिले. सर्व यादव गेले विप्रशापामुळे, रामकृष्णांनीही आपलं शरीर विसर्जन केलं, पण उध्दवजी, राहू देत, त्यांनीच संकल्प केला. माझ्या जवळचं ज्ञान सुरक्षित ठेवणारा, योग्य व्यक्तीला उपदेश करणारा हा उध्दवजी मोठा अधिकारी आहे. याप्रमाणे, दुसऱ्या दिवशी उध्दवजी बद्रिकाश्रमाला निघून गेले. आणि विदुरजीही हरीद्वार क्षेत्रात मैत्रेयऋषिंच्या आश्रमामध्ये प्राप्त झाले. तिथे त्यांचा आणि मैत्रेयांचा संवाद सुरू झालेला आहे. विदुरजींसारखे मोठे जिज्ञासू अधिकारी भगवत भक्त विचारणारे आहेत. आत्ममाया म्हणजे काय आहे ? मायेने मोह कसा उत्पन्न झाला ? सगळेही पुष्कळ विचार झालेले आहेत. भगवंतांनी ब्रह्मदेवांना दर्शन देवून ब्रह्मदेवांना आदेश कसा दिला ही पूर्वी सांगितलेली ब्रह्मदेवाची कथा, तिचं मैत्रेय महर्षिंनी वर्णन केलं. आणि सृष्टी रचना भगवंतांनी कशी केली हेही सगळं त्यांनी सांगितलेलं आहे. विदुरांनी मध्येच एक प्रश्न केलेला आहे की भगवंतांनी ही सृष्टी कशाकरता केली ? नित्य तृप्त असणारा भगवान, स्वयंप्रकाश असणारा, अज्ञानाने तो आवृत्त झाला कसा आणि सृष्टीची रचना झाली कशी ? हे आश्चर्यच वाटले आहे. ईश्वर हा आहे, जगताचा कर्ता आहे हेच आणखी मान्य करता येत नाही असा आक्षेप आहे. तोच कर्ता झाला, तोच सुखी, तोच दु:खी हे कशाकरता सृष्टी केली म्हणाले काय आवश्यकता आहे.

मैत्रेय म्हणतात विदूरजी यालाच आम्ही माया म्हणतो. असंभवनीय आहे. एक सच्चिदानंद असलेला स्वयंप्रकाश परमात्मा यामध्ये सापडला कसा ? शक्य नाही सापडणं. पण दिसतंय म्हणाले, अनुभव मात्र वेगळा आहे. ते अज्ञानाचं, अविद्येचं कार्य आहे. त्या अनुभवामुळे असं द्वैत कुठून आलं हे काही सांगता येत नाही. हे असंभवनीय आहे म्हणून ईश्वराची मायाशक्ती आहे असं मानावं लागलं म्हणाले. स्वप्नं, वाटेल तशी पडतात. स्वत:चं शरीर छिन्न-विच्छीन्न करून टाकलेलं पाहतो स्वप्नामध्ये तशी स्थिती ईश्वराच्या मायाशक्तीमुळे झालेली आहे. भगवान वासुदेवाची अनुकंपा, कृपा ज्या वेळेला होईल त्या वेळेला ही माया हळूहळू नाहीशी होती आहे.

कशी सृष्टी केली हे मैत्रय ऋषींनी, विदुरजींना क्रमाक्रमाने सांगितले. त्यानंतर, भागवत पुराण सांगायला मैत्रय महर्षिंनी सुरवात केली. ही भागवताची परंपरा याठिकाणी थोडी वेगळी दाखवलेली आहे. भगवान शेष, संकर्षण परमात्मा जे आहेत यांनी सनतकुमार यांना भागवताचा उपदेश केला. त्यानंतर त्यांनी सांख्यायन ऋषींना सांगितले. सांख्यायन ऋषींनी आमचे गुरु जे

आहेत पराशर ऋषी आणि बृहस्पति यांना याचा उपदेश केला. त्यांनी मला हे सगळं भागवत सांगितलेलं आहे. तेव्हा ते भागवत तुम्हाला मी सांगतो. असं सांगून, कशी सृष्टी झाली, ब्रह्मदेवांना भगवान कसे भेटले हे सगळंही क्रमाने पूर्वीप्रमाणेच वर्णन केलेलं आहे. विश्वसृष्टी भगवंताच्या मायेने निर्माण झाली, पुढे सगळे कार्य सुरू झालेलं आहे. ब्रह्मदेवाना सृष्टीची आज्ञा केली, पंचमहाभूतं अगोदरच भगवंतांच्या संकल्पाने निर्माण झाली. भौतिक सृष्टी कशी तयार करायची आहे ? सर्व ब्रह्मांड निर्माण करायचयं हे पुढचं कार्य भगवंताच्या आज्ञेप्रमाणे ब्रह्मदेवांनी केलेलं आहे. त्यांचीही संकल्प शक्ती मोठी आहे. हे सर्वही मैत्रेय महर्षिंनी क्रमाक्रमाने सर्व वर्णन केलेलं आहे.

भगवान ब्रह्मदेव जे आहेत त्यांचं सृष्टीकार्य सुरू झालेलं आहे. तपश्चर्या केल्यामुळे परमेश्वराची कृपा झालेली आहे. भगवत् स्वरूप साक्षात्कार ब्रह्मदेवांना झाला. आणि मग सर्व सृष्टी केलेली आहे. ते सांगताहेत मैत्रेय महर्षि. तपाचा प्रभाव आहे हा. या तप प्रभावामुळे सबंध विश्व त्यांनी निर्माण केलं. त्या कमलातून ते उत्पन्न झालेले होते, त्या कमलाचेच विभाग करून त्यांनी सर्व सृष्टी, विश्व निर्माण केलं.

आरंभाला त्यांनी महत्तत्व निर्माण केलं आहे. महत्तत्वाला बुध्दितत्वही म्हणतात किंवा समष्टी म्हणतात. त्यापासून अहंकार तत्व निर्माण झालं, पंचभूतं निर्माण झाली. इंद्रिय सृष्टी झालेली आहे. ही सगळी क्रमाक्रमाने निर्माण झालेली आहे. वनस्पती निर्माण झाल्या त्याप्रमाणे पशु–पक्षी वगैरे यांचीही सृष्टी निर्माण झालेली आहे. देवांची सृष्टी हीही ब्रह्मदेवांनी केली. देव, पितर, गंधर्व, अप्सरा, सिध्द, यक्ष, विद्याधर ही सगळी देवसृष्टी आहे. यानंतर मनु सगळे उत्पन्न झाले. प्रसंगाने क्रिया विभाग कसा झाला. सृष्टीची रचना लक्षात येण्याकरता, क्रिया कशी तयार झाली, त्या क्रियेपासून कालाचे परिमाण कसे तयार झालं हे सांगितले. सूर्यकिरण हे चाललेले आहेत, सूर्यनारायणाच्या गतीमुळे, एक अत्यंत सूक्ष्म जो कण आहे, किरणामध्ये दिसणारा, ते सूर्यकिरण त्या कणाच्या पलिकडे गेले की त्याला परमाणू काल म्हणतात. क्रियेवरून कालाची कल्पना आहे. पुढे ते वाढत जात एक तास झालेला आहे, प्रहर झाला एक दिवस झालेला आहे, सहा महिने झाले उत्तरायण, दक्षिणायन. संवत्सर म्हणजे वर्षाचा काल तयार झालेला आहे. कालाची गणना त्या सूर्यकिरणांच्या गती वरून ठरवलेली आहे.

प्रत्येकाचे काल म्हणजे आयुष्य वेगळे वेगळे आहेत. कृतयुग, त्रेतायुग, द्वापर युग, कलियुग

ही कालाचीच गणना आहे. बाराहजार देवांची वर्षं ह्याच्यात चार युग होवून जातात. कृतयुगामध्ये पूर्ण धर्माचं आचरण असतं. हळूहळू तो धर्म कमी होत जातो. अशी सृष्टी ब्रह्मदेवांच्या संकल्पाने निर्माण झालेली आहे.

त्यानंतर तमोगुण जो आहे त्यापासून सर्व सृष्टी केली. तामीस्त्र, अंधतामीस्त्र, मोह, महामोह ही सगळी सृष्टी निर्माण केली. ही तामसी सृष्टी त्यांना पसंत पडली नाही. आपल्या शुद्ध मनाने दुसरी सृष्टी त्यांनी केली. सनक सनंदन वगैरे निर्माण केले.भगवत् भक्त मोठे ज्ञानी. त्या मुलांना ब्रह्मदेवांनी सांगितलं तुम्ही गृहस्थाश्रमी व्हा. विवाह करा. चांगली संतती निर्माण करा. यज्ञयाग करा. त्यांना काही हे मान्य नाही. भगवंताचे भक्त होते ते. त्यांनी सांगितलं पिताजी आम्हाला गृहस्थाश्रम करायचा नाही. राग आला ब्रह्मदेवांना आणि तो क्रोध जो आहे तो त्यांच्या भ्रूमध्यातून बाहेर पडला. तो क्रोध रुद्र रूपाने प्रकट झालेला आहे. सगळ्याच वृत्ती अशा प्रकारचं कार्य करणाऱ्या आहेत. त्याला स्त्रिया दिलेल्या आहेत. त्यालाही सृष्टी करायला सांगितली. त्याने पुष्कळ सृष्टी केली, त्याला नंतर ती बंद करायला सांगितली. पुढं मरिची, अत्री, पुलस्त पुलह, अंगिरा, भृगू, कृतू, वसिष्ठ अशी मुलं त्यानी निर्माण केली, आपल्या संकल्पाने. त्यानंतर काम, क्रोध, लोभ वगैरे हेही विकार निर्माण झालेले आहेत. याप्रमाणे अशी सृष्टी ब्रह्मदेवांची चालू आहे. आपल्या चार मुखातून चार वेद त्यांनी प्रकट केले. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. त्या प्रत्येकाचे उपवेद म्हणून आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्व वेद आणि स्थापत्यशास्त्र हेही निर्माण केलं. इतिहास पुराणात्मक पंचमवेद जो आहे तो सर्वांना स्पष्टीकरण व्हावं म्हणून निर्माण केला. यज्ञाच्या अनेक शाखा त्यांनी निर्माण केल्या. कितीतरी प्रकारचे यज्ञ आहेत. सर्व एकंदर आश्रम निर्माण केले. संन्यासाचे, वानप्रस्थाचे किती विभाग आहेत हे ब्रह्मदेवांनी निर्माण केले. याप्रमाणे सृष्टीचे कार्य अखंड चालू आहे.

त्यानंतर मनु नावाचा एक पुत्र निर्माण केला. आपल्या शरीराचे दोन भाग केले ब्रह्मदेवांनी. एका पासून तो मनुराजा उत्पन्न झाला, दुसऱ्या भागापासून त्याची स्त्री शतरूपा नावाची निर्माण झाली. मनुराजाला त्या स्त्रीपासून प्रियंवद व उत्तानपाद हे दोन पुत्र झाले. आकृती, देवहूती, प्रसूती या तीन कन्या झाल्या आहेत. रूची ऋषींना आकृती ही कन्या दिली. कर्दमांना देवहूती दिली. दक्षप्रजापतीला प्रसूती ही कन्या दिलेली आहे. त्यांच्यापासूनही पुष्कळ सृष्टी झालेली आहे. मनुराजापासून पुढची सृष्टी स्त्री–पुरूष संभोगाच्या रूपाने झालेली आहे. तोपर्यंत ब्रह्मदेवाने आपल्या

मानस संकल्पानेच सर्व सृष्टी केली होती.

विदुरजी विचारतात, स्वयंभू सम्राट राजा मनू जो आहे ब्रह्मदेवांचा पुत्र, त्याचं चरित्र आपण सांगा म्हणाले. मोठा भगवत् भक्त, योगी पुरुष आहे, मनुराजा.

ऋषी सांगतात, विदुरजी, मनुराजा, आपल्या पित्याला, ब्रह्मदेवांना प्रार्थना करतो आहे की पिताजी, आपण सर्वही सृष्टीरचना केलेली आहे. आमचे स्वामी आपण आहात, आम्ही आपले प्रजाजन आहोत. तेव्हा काय आज्ञा आहे. आम्ही आपली सेवा कशी करावी हे आपण आम्हाला सांगा. ब्रह्मदेवाने आपल्या पुत्राला, मनुला सांगितलं ही स्त्री तुला मिळाली, या स्त्रीपासून चांगली संतती तू निर्माण कर. धर्ममार्गाचा प्रसार कर हीच माझी पूजा आहे. मनुराजाने विचारले महाराज हे सगळं मी करायला, आपली सेवा करायला तयार आहे पण आम्हाला रहायला जागा नाही म्हणाले. कुठे रहायचं आम्ही, कारण पृथ्वीही पाण्यामध्ये बुडून गेलेली आहे. ती पृथ्वी वर काढली पाहिजे, म्हणजे त्या पृथ्वीवर आम्हाला राहता येईल, राज्य करता येईल. ब्रह्मदेवांचे या सृष्टीरचनेकडे लक्ष असल्यामुळे. पृथ्वी पाण्यामध्ये गेली याकडे त्यांचं लक्ष नव्हतं. मनु राजाने लक्षात आणून दिल्यावर त्यांच्या लक्षात आलं, ही तर भूमी गेली म्हणाले. अतल, सुतल, वितल, तलातल सहाव्या लोकापर्यंत रसातलापर्यंत ती गेलेली आहे. काय करायचं, हिला वर कसं आणायचं. परमेश्वराचं चिंतन करू लागले, प्रार्थना करताहेत. त्यांच्या नासिकेतून एक लहानसा वराह बाहेर पडला. अंगुष्ठ मात्र आणि तो एकदम हत्ती एवढा मोठा झालेला आहे. त्याचं स्वरूप फार वाढलेलं आहे. सर्व ऋषी मंडळींनी भगवंताचं जे वराह रूप आहे त्याची पुष्कळ स्तुती केलेली आहे. यज्ञरूपी आपण आहात. त्या यज्ञानेच सर्व ऋषीमंडळी आपली पूजा, अर्चन करताहेत. आपण सर्वांचं संरक्षण करावं, अशी प्रार्थना केलेली आहे. वराह भगवान त्या पाण्यामध्ये गेले. रसातलाला गेलेली पृथ्वी त्यांनी आपल्या दाढेवर धारण केली. एवढी संपूर्ण विशाल पृथ्वी ते ज्या दाढेवर घेऊन आले ते केवढं वराहाचं रूप असेल. कल्पनाच करता येणार नाही. स्थूल रूप मूलत: कसं आहे हे आपल्या मनामध्ये येवू शकत नाही. बाहेर आणली ती पृथ्वी. वरच्या बाजूला आणलेली आहे. आपल्या शक्तीने पाण्यावरच तिची स्थापना भगवान वराहांनी केलेली आहे. त्यावेळेला तो हिरण्याक्ष दैत्य युद्ध करण्याकरता आलेला असताना, युध्द करून त्याचा नाश भगवान वराहांनी केलेला आहे.

विदुरजींनी प्रश्न केला हा दैत्य जो हिरण्याक्ष त्याचा नाश भगवान श्रीहरींनी वराहरूपांनी केला, ते चरित्र आम्हाला सांगा. तो हिरण्याक्ष कोणाचा पुत्र आहे. त्याचा नाश कसा केला

भगवंतांनी हे सांगा.

सांगताहेत मैत्रेय महर्षि, मोठा इतिहास आहे म्हणाले. ब्रह्मदेवांनीच हा इतिहास सर्व देवांना सांगितला. गृहस्थाश्रम कसा असला पाहिजे, हे सांगताहेत मैत्रय महर्षि.

दितिर्दाक्षायणी क्षत्तर्मारीचं कश्यपं पतिम् ।
अपत्यकामा चकमे सन्ध्यायां हृच्छयार्दिता ।। ३.१४.७ ।। श्री. भा.

मरिची ऋषींचे पुत्र म्हणजे कश्यप आहेत. ह्या कश्यपांची पत्नि दिती नावाची होती. त्यांच्या पुष्कळ स्त्रिया होत्या. त्यापैकी दिती नावाची एक स्त्री होती. तिची मुलं म्हणजे सर्व दैत्य झालेले आहेत. देव-दैत्याचं निरंतन युध्द व्हावं, देवांनी दैत्यांचा संहार करावा हे सगळंही तिने पाहिलेलं आहे. आपल्याला असा मोठा चांगला मुलगा झाला पाहिजे जो देवांचा सुध्दा पराजय करेल. अशी तिला इच्छा उत्पन्न झाली. अंत:करण मोहाने व्याप्त झालेलं आहे. संध्याकाळच्या वेळेला त्या अग्नीशाळेमध्ये, ते कश्यप ऋषी बसलेले असताना ती आलेली आहे. मला आपल्यापासून पुत्र झाला पाहिजे. अशी प्रार्थना करती आहे. माझ्या सवतींना चांगली मुलं झाली, मला मात्र चांगला मुलगा नाही म्हणाली. मोठा पराक्रमी मुलगा व्हावा. आपल्या जवळ राहून मला अशा प्रकारचा पुत्र होणार नाही तर काय उपयोग ? मी शरण आलेली आहे. ही इच्छा आपण पूर्ण करा. कश्यपांनी सांगितलं दिती संध्याकाळची वेळ आहे ही, हा काळ जाऊ दे. आता होम-हवन करायचंय म्हणाले. तुझी इच्छा पूर्ण होईल, तुझ्या इच्छेप्रमाणे तुला पुत्र होईल. परंतु त्या दितीच्या मनामध्ये जो मोह उत्पन्न झाला, तो तिला आवरता आला नाही. आपलं मन काही आवरता आलं नाही. शेवटी तिचा आग्रह पाहून, भगवान कश्यप महर्षींनी तिची इच्छा पूर्ण केली. पुन्हा स्नान वगैरे करून आपल्या नित्यकर्माकडे प्रवृत्त झालेले आहेत. अग्निशाळेमध्ये येवून राहिले. त्यावेळेला त्या दितीला पश्चाताप झालेला आहे. त्या दितीने विनंती केली. कश्यपही रागावलेले होते. इंद्रिय निग्रह तुझ्याजवळ नाहीये. तू कालाचा विचार केला नाहीस, माझी आज्ञा मान्य केली नाहीस. हा दोष आहे, काल दोष आहे. तुझं मन तुझ्या ताब्यामध्ये नाही. देवांचा अनादर तू केलेला आहेस त्यामुळे तुझ्या गर्भातून दोन दैत्य निर्माण होतील. भगवान श्रीहरी अवतार धारण करून तुझ्या मुलांचा नाश करतील. असं सगळं सागितलं. दितीने विचारले महाराज काही हरकत नाही, देवाच्या हातून माझ्या मुलांना मृत्यू येणार म्हणजे त्यांचा उध्दारच होईल. पुन्हा कश्यप ऋषी संतुष्ट झाले. त्यांनी सांगितले तुझा नातू मात्र उत्तम भगवत्भक्त होईल. भगवंताच्या कृपेने तो कीर्तिसंपन्न होईल.

याप्रमाणे दितीला हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू असे दोन पुत्र झाले.

वराहानी ती पृथ्वी वर आणून स्थापन केली. मनू राजाला राहण्याचं स्थान मिळालेलं आहे. तो राज्य करण्याला प्रवृत्त झालेला आहे. त्याची व्यवस्था भगवत्कृपेने झाली.

ती दिती गर्भिणी झालेली असताना ब्रह्मदेव सांगताहेत, दितीचा गर्भ पुष्कळ वर्ष पर्यंत राहिलेला आहे. अंधार जिकडे तिकडे पडलेला आहे. सर्व देव ब्रह्मदेवांना शरण गेलेले आहेत. काय झालं काय ? तेव्हा ब्रह्मदेवांनी सर्व कथा, इतिहास त्यांना सांगितला – कश्यप ऋषींची पत्नि दिती, तिच्या मनामध्ये मोह उत्पन्न झाला त्यामुळे अशा प्रकारची गर्भधारणा तिला झाली. तिच्या उदरात हे दोन जिवात्मे आलेले आहेत. कोण आहेत हे सांगताहेत. ब्रह्मदेवांचे जे मानसपुत्र आहेत, सनक सनंदन, सनातन आणि सनत्कुमार हे मोठे भगवत् भक्त आहेत. ब्रह्मदेवांनी त्या मुलांना भगवान श्रीहरींचा वैकुंठ लोक कसा आहे, तिथं भगवान कसे राहतात हे सगळे सांगितले. त्यांना एकदा भगवंताचं दर्शन करावं, त्याठिकाणी वैकुंठ लोकामध्ये जावून यावं, दर्शन करून यावं अशी इच्छा उत्पन्न झाली आणि ते वैकुंठ लोकामध्ये आले. मोठे योगी होते. ब्रह्मदेवांचेच पुत्र असल्यामुळे ते कोठेही जावू शकत होते. वैकुंठ लोकामध्ये आलेले आहेत. जिकडे तिकडे विमानामध्ये बसून सर्वही देवगण, भगवतभक्त फिरताहेत. मोठी मोठी विमानं आहेत. मोठी मोठी उद्यानं आहेत. उपवनं आहेत, ही सगळी वैकुंठ लोकाची रचना त्यांनी पाहिली. श्रीहरींचे निवासस्थान, त्याला सात दरवाजे होते. एक एक दरवाजा ओलांडून सातव्या दरवाज्यावरती जय विजय दोघे द्वारपाल उभे होते दोन्ही बाजूला. यांना आत जायचं होतं, कुमारांना. भगवंताचं दर्शन करण्याकरता ब्रह्मलोकातून ते तिथे आले होते. पण वय लहान आहे. पहिल्या पासूनच पाच वर्षाचं शरीर आहे. शरीर काही वाढलेलं नाही. जय विजयांना वाटले की ही लहान मुलं आत कशाला जात आहेत. त्यांनीही त्यांना ओळखलं नाही. त्यांनी आत जायचं नाही म्हणून सांगितलं. मज्जाव आत जाण्यासाठी केलेला आहे. त्यामुळे त्यांना थोडासा राग आलेला आहे. सनत्कुमारांनी त्यांना लगेच सांगितले.

को वां इहैत्य भगवत्परिचर्ययोच्चै:<br>
तद्धर्मिणां निवसतां विषम: स्वभाव: ।<br>
तस्मिन् प्रशान्तपुरुषे गतविग्रहे वां<br>
को वाऽऽत्मवत्कुहकयो: परिशमनीय: ।।३.१५.३२।। श्री.भा.

वैकुंठ लोकामध्ये भगवंताच्या भक्तावर सनतकुमार रागावलेले आहेत. त्यांनी सांगितलं,

अनेक जन्म भगवंताची सेवा करून तुम्हाला या वैकुंठ लोकामध्ये रहायला मिळालं म्हणाले. देवाच्या जवळ येऊन तुम्ही राहिलात. सलोकता, समीपता, सरूपता तुम्हाला मिळालेली आहे. भगवंतासारखं रूप आहे. चर्तुभुज, शंख, चक्र, गदा, पदम् सगळं आहे. विष्णूरूपामध्ये तुम्ही राहिलात, इतकी उच्च भूमिका तुम्हाला मिळालेली असताना तुमची अशी बुद्धि काही चांगली नाही. हा लहान आहे, याला आत सोडायचं नाही ही विषम बुद्धि अद्यापि तुमची राहिली म्हणाले. भगवान श्रीहरी कित्ती शांत आहेत, आणि त्याचे भक्त म्हणविणारे तुम्ही असे रागावता कोणावरही, कोणालाही जाऊ देत नाही. तुम्ही या वैकुंठ लोकाला राहाण्याला अपात्र आहात. निर्णय झाला, त्यांनी घेतला. ज्या मृत्यू लोकामध्ये अशी विषमबुद्धी आहे, हा योग्य, हा अयोग्य, हा चांगला हा वाईट, त्या लोकामध्ये तुम्ही चला म्हणाले. इथे राहाण्याला तुम्ही पात्र नाहीये. हा ब्राह्मणांचा शाप झाला त्यांना. आणि नंतर त्यांचे डोळे उघडले, हे कोणीतरी महात्मे आहेत. पायावर मस्तक त्यांनी ठेवलेले आहे. हात जोडताहेत. क्षमा करा महाराज, प्रार्थना करताहेत. हे सगळं आत भगवंतांना कळलं. त्या जय-विजयांनी प्रार्थना केली. आम्हाला असुर जन्म येणार, मृत्यूलोकामध्ये, आपण शाप दिल्यामुळे. परंतु भगवान श्रीहरीची स्मृती आपली नष्ट होवू नये. आपलं स्मरण रहावे. एवढी तरी कृपा रहावी. भगवंतांना समजल्याबरोबर ते आले बाहेर, जय विजय हात जोडून प्रार्थना करताहेत. सन्तकुमारांना दर्शन द्यायचं होतं मुद्दाम ते आलेले आहेत. दर्शन झालं भगवान श्रीहरीचं. आपल्या पिताजींनी जे रूप वर्णन केलेलं आहे, ते रूप आज आपल्याला पहायला मिळालेलं आहे. आनंद झाला कुमारांना, पीतांबरधारी भगवान श्रीहरी, प्रसन्न मुखकमल आहे. बाहेर आलेले आहेत. समाधान झालं कुमारांचं. त्यांनी सांगितलं, भगवंता आपण अव्यक्त रूपांनी सर्वत्र राहाता. ज्याची बुद्धी शुध्द नाही त्यांना आपलं दर्शन होत नाही म्हणाले. आज आमच्या दृष्टीला हे रूप पडलेलं आहे. आमच्या पिताजींनी आपलं सगळं वर्णन केलेलं होतं, ते आम्ही ऐकलं. आज आपल्याला प्रत्यक्ष पाहण्याचा योग आलेला आहे. आपल्याला आम्ही शरण आलेलो आहोत. आपली भक्ति ज्यांच्या अंतःकरणामध्ये उत्पन्न झालेली आहे, त्यांच्या चित्तातले अज्ञान हे सगळं दूर होते. अशी प्रार्थना त्यांनी केली. भगवान श्रीहरी बोलायला लागले. ऋषीमहाराज, हे जे माझे भक्त आहेत, द्वारपाल जे आहेत, जय-विजय यांनी आपला अपमान केला आहे. असं मला समजलयं. तुम्हाला आंत येऊ दिले नाही. तुम्हालाही राग आला, तुम्ही त्यांना दंड केला, शाप दिला, तुम्ही असुर जन्माला जावा, मृत्यूलोकात जावा म्हणून शाप दिला, याला माझी संमती आहे. तुम्ही दिलेला शाप मला मान्य आहे. कारण यांनी तुमच्या सारख्या श्रेष्ठ पुरुषांचा

अपमान म्हणजे फार मोठं पाप केलेलं आहे. यांच्या अपराधाबद्दल मी आपली क्षमा मागतो. आपल्यासारखे जे तपस्वीपुरुष, ब्राह्मण आहेत ते माझे दैवत आहेत, हे यांना माहिती नाही म्हणाले. तुमच्या कृपेने चंचल असलेली ही जी लक्ष्मी देवी माझ्या घरामध्ये राहाती आहे, ती स्थिर राहिलेली आहे. ही तुमची कृपा आहे. त्यांनी आपला अपमान केला म्हणून तुम्ही यांना शाप दिलात परंतु त्यांच्यावर आपण दया करा, दोन-तीन जन्मानंतर यांना इथे येण्याला परत आपण परवानगी द्या. अत्यंत नम्रपणाने भगवान श्रीहरींनी भाषण केलेलं आहे. ब्रह्मदेव सांगतात, देव हो, काय शांती आहे, भगवान श्रीहरींची, सत्वमूर्ती भगवान आहेत. त्यांची ती वाणी ऐकली त्या सनत्कुमारांनी. त्यांनीही हात जोडलेले आहेत ते म्हणतात, भगवन् काय आपण बोलता म्हणाले, माझ्यावर अनुग्रह करा, यांना उःशाप द्या, सर्वेश्वर आपण आहात. आमचे दैवत आपण असताना, आम्हालाच आपण देव समजता, सर्वांना मार्गदर्शन करण्याकरता, सनातन धर्माचं संरक्षण हे आपल्या या कृतीने सर्वत्र होते. तेव्हा झाली गोष्ट घडून गेली म्हणाले. आम्ही दिलेल्या शापाला आपण संमती द्या किंवा आपल्याला आम्हाला शाप द्यायचा असेल तर द्या, आपण समर्थ आहात, काहीही करू शकता आपण. दंड आम्हाला करायचा असेल तर करा म्हणाले. भगवान सांगताहेत, हे आता असुर जन्माला जातील म्हणाले आणि तीन जन्म त्या असुर योनीमध्ये राहून, पुन्हा या ठिकाणी ते येतील. तुम्ही काही मनाला लावून घेऊ नका. याला कारण मीच आहे म्हणाले, माझ्याच संकल्पाने हे सर्व झाले आहे. भगवंताचं दर्शन झालेलं आहे, संभाषण झालेलं आहे. त्यांचा आदर केलेला आहे. भगवंतांना प्रणाम करून सनत्कुमार ब्रह्मलोकामध्ये पुन्हा प्राप्त झाले. जय-विजयांना वाटलं देवांनी आमच्याकडे लक्ष दिलं नाही. त्या ऋषींनाच संमती दिली, त्यांनी दिलेला शाप, आम्ही इतकी सेवा केली, इतकी सेवा करतो, आमच्याकडे लक्ष दिलं नाही. भगवान म्हणाले तुम्ही पूर्वी एकदा लक्ष्मीला अडवले होते. तुम्हाला ही जी सवय लागलेली आहे, अहंकार, आम्ही द्वारपाल आहोत आम्ही कोणालाही आत सोडू नाहीतर सोडणार नाही. एकदा लक्ष्मीदेवी आली होती, तिलाही तुम्ही अडवून ठेवलं. तिने शाप दिलाय तुम्हाला. तो शाप आता भोगला पाहिजे. तुम्ही आता मृत्यूलोकावर जन्म घ्याल, माझा द्वेष कराल म्हणाले,

मयि संरम्भयोगेन ।।३.१६.३१।। श्री.भा.

तुम्ही द्वेष माध्यमातून माझे अखंड स्मरण कराल. ही ब्राह्मणांची अवहेलना, ब्राह्मणांचा अपमान जो झालेला आहे, त्यांच्यातून तुम्हाला मुक्त व्हायचं असेल, तर तीन जन्म तुम्हाला राक्षस

जन्मात, दैत्य जन्मात रहावं लागेल. हे चरित्र सांगितले आहे, ब्रह्मदेवांनी देवांना त्याचा बोध असा आहे, भगवंताचा भक्त मी आहे, असा जर अहंकार उत्पन्न झाला, तर त्या अहंकारामुळे, संत महात्म्यांचा अपमान होण्याचा संभव आहे. तो अपमान घडला यांच्याकडून. भगवत्‌भक्तांचा, श्रेष्ठ पुरुषांचा अपमान झाल्याबरोबर, तो भक्त जरी असला तरी त्याचा अध:पात होतो. भक्तिमार्गामध्ये हे मोठं पथ्य आहे. ''कोणाही जीवांचा न घडो मत्सर, वर्म सर्वेश्वर पूजनाचे,'' तुकाराम महाराज सांगताहेत. खरी भक्ति, खरी ईश्वर पूजा म्हणजे ही आहे, कोणाचाही द्वेष मनामध्ये राहू नये. रागवायचं नाही, द्वेष नाही, तर भक्तिंच फळ मिळतं. संतांचा अपमान झाल्यामुळे, वैकुंठलोकामध्ये प्रत्यक्ष भगवंतांच्या सन्निध राहणारे, नेहमी रोज दर्शन होतयं, रोज भाषण होतयं, इतक्या मोठ्या उच्च भूमिकेवर गेलेले, जय–विजय पण संतांचा, भक्तांचा, महात्म्यांचा अपमान केल्यामुळे त्यांना या मृत्यूलोकावर पुन्हा यावं लागलं. सर्वात अत्यंत वाईट झालेली गोष्ट म्हणजे, देवावर प्रेम करणारे, भक्ति करणारे जय–विजय ते देवाचे शत्रू बनून त्यांना तीन जन्म घ्यावे लागले. देवाचं प्रेम गेलं, प्रेमातून ते बाहेर पडलेले आहेत.

तेव्हा ब्रह्मदेव सांगताहेत, देवहो, ते दोघे ह्या दितीच्या गर्भामध्ये आलेले आहेत. भगवंताला काळजी आहे. सर्वांची आपण कशाला काळजी करायची. सर्वांचं कल्याण करायला तो समर्थ आहे. मग सर्व देव मंडळी आपल्या स्थानाला निघून गेली.

पुढं त्या दितीला दोन पुत्र झालेले आहेत. भयंकर अपशकून झाले त्या वेळेला. त्यानंतर कश्यप ऋषींनी त्यांचं नामकरण केलेलं आहे. प्रथम जन्माला आलेला हिरण्यकश्यपू आणि मागाहून जन्माला आलेला हिरण्याक्ष अशी नावं ठेवली. हिरण्यकश्यपूने तपश्चर्या केली, ब्रह्मदेवांचा वर मिळवलेला आहे. सर्व देवादिकांना आपल्या ताब्यामध्ये घेतलेलं आहे. असुर वृत्तीने तो वागतो आहे. देवांचा द्वेष करतो आहे. भक्ति, वैकुंठ लोकामध्येच राहिली, त्याची आठवणसुध्दा नाहीये. दुसरा हिरण्याक्ष जो आहे, त्याला युध्दाची आवड आहे. राज्य वगैरे नको आहे. हिरण्यकश्यपूनेच सर्व राज्य मिळवले, त्रैलोक्याचा ताबा घेतलेला आहे. सर्व देवांना अधिकारावरून काढून टाकलेलं आहे. सगळे दैत्य नेमलेले आहेत आणि तो राज्य करतो आहे. हा एक हिरण्याक्ष, हातामध्ये एक मोठी गदा घेऊन हिंडतो आहे. माझ्याबरोबर लढाई करणारा कोण आहे, याचा शोध चाललेला आहे. सगळे देव बाजूला निघून गेले, कोण याच्यासमोर उभं रहाणार ? भीतीग्रस्त सर्वही झालेले आहेत. पुढं वरूणाने काही राजसूय यज्ञ केला असं त्याने ऐकलं. वरूणलोकामध्ये गेलेला आहे तो

हिरण्याक्ष. त्याला सांगितलं वरूणा तू मोठा पराक्रमी आहेस. असं मला समजलं, म्हणून मी आलेलो आहे. माझ्याबरोबर युध्द कर म्हणाले. त्या वरूणाने सांगितलं बाबा, तुझ्याबरोबर युध्द करणारा जन्माला आलेला आहे. मी आता युध्द वगैरे काही करणार नाही. सगळं सोडून दिलेलं आहे. पण तुला शासन करणारा एक समर्थ वीर असा निर्माण झालेला आहे. जा तू शोध करून त्याच्याबरोबर लढाई कर. आलेला आहे बाहेर तो हिरण्याक्ष, कुठे आहे ? हरी आहे म्हणाले त्याचे नांव. नारद ऋषी समोर आले. काय नारदा, तो हरी म्हणे उत्पन्न झालेला आहे. कुठे आहे तो हरी ? चल म्हणाले नारदऋषी. दाखवतो मी तुला. त्याला घेऊन आले. वराह नुकतेच त्या पृथ्वीला घेऊन वर आलेले होते. ती जलावर स्थापन करण्याचं त्याचं कार्य चाललेलं होतं. हिरण्याक्ष मोठी गदा घेऊन आलेला आहे. त्याच्याकडे पाहिल्याबरोबरच तो हसायला लागला, हा तर रानात राहणारा एक पशू आहे म्हणाले. हा काय लढाई करणार ? काही निमित्त पाहिजे म्हणून तो म्हणतो आहे, अरे ही पृथ्वी आमची आहे. जेवढं मिळालेलं आहे ते सगळं आमचंच आहे, असं समजणाऱ्यापैकी हा दैत्य एक आहे. सर्वही स्थान आमचं आहे असं समजतो आहे हिरण्याक्ष. देवांचं काही नाहीये. सर्व स्थानावर आमचा अधिकार आहे ही पृथ्वी मुकाट्याने सोडून दे. नाहीतर तुझा नाश करावा लागेल. आजपर्यंत अनेक दैत्यांचा तू नाश केलेला आहेस, असं मी ऐकलेलं आहे. आज माझ्यासमोर तू आलेला आहेस. उभा रहा इथे, तुझा मी नाश करणार आहे. सगळ्या बांधवांच्या ऋणातून मी मुक्त होणार आहे. वराह भगवान ऐकताहेत नुसते. त्यांचं पृथ्वीची स्थापना हे काम व्हावयाचे होते. पृथ्वीची स्थापना झाल्यानंतर वर आले ते. उभे राहिले आणि बोलायला लागले, ''काय बाबा,

सत्यं वयं भो वनगोचरा मृगाः ।
युष्मद्विधान्मृगये ग्रामसिंहान् ॥३.१८.१०॥ श्री.भा.

काय हिरण्याक्षा, आम्ही रानात रहाणारे पशू असं तू म्हणतो आहेस. बरं आहे, पशू आहोत. पण तुमच्यासारखे जे गावठी सिंह जे आहेत, ते आम्ही पुष्कळ मारलेले आहेत. तुला माहिती नाही. काय तुझं सामर्थ्य आहे ते दाखवं, म्हणाले. आम्ही काय केलेलं आहे, तुमचं काय घेतलेलं, आहे. ही जमीन तुमची कशी ? कोणी घेतली ? कोणी तुम्हाला दिली होती जमीन ? तुम्ही रसातलामध्ये रहाणारे, ईश्वराने तुम्हाला रसातल निर्माण करून दिलेलं आहे. स्वर्गासारखं राज्य तिथं आहे, सर्व सुखसमृध्दी असताना ते रसातल आहेच आहे. पुन्हा स्वर्गलोक तुम्हाला पाहिजे, पुन्हा भूमी पाहिजे, म्हणजे जिथं तिथं तुमचंच साम्राज्य ? सर्व स्थानं तुमची. काय तुझा पराक्रम आहे तो दाखव म्हणाले. झालं, दोघांचं गदायुध्द सुरू झालेलं आहे. हिरण्याक्षाने रागाने ती गदा जोराने

मारली. वराह एकदम बाजूला झालेला आहे. वराहाची शिकार करणं फार कठीण आहे म्हणाले. एकदम ते जातात जोराने. भगवान श्रीहरीने तो गदावेग चुकविलेला आहे. पुन्हा गदा घेतो आहे, फिरवतो आहे, गर गर फिरवतो आहे. हरीला मारण्याकरता. हिरण्याक्षाने मारली ती गदा. काही झालं नाही. त्यांनीही गदा घेतली. यांनीही गदा घेतली, त्या दोघांचं गदायुध्द सुरू झालेलं आहे. मायाशक्तीने वराहरूप धारण करून आलेले भगवान श्रीहरी हिरण्याक्षाबरोबर युध्द करताहेत. संध्याकाळची वेळ झाली, यांचं आपलं युध्द चालूच आहे. वेगळ्यावेगळ्या प्रकारांनी गदायुध्द सुरूच आहे. ब्रह्मदेव आले. देवांच्या देवांना त्यांनी विनंती केली. भगवंता, हा म्हणजे सगळ्या विप्रांचा, गाईंचा अत्यंत नाश करणारा आहे, दैत्य आहे. लवकर याला मारा म्हणाले. रात्रीला सुरवात झाली म्हणजे हे निशाचर आहेत, रात्री यांच बल वाढतं आहे. तेव्हा रात्र होण्याच्या पूर्वीच याचा नाश आपण करा. लवकर नाश करा.

भगवंतांनी त्यांना सांगितलं, करतो म्हणाले नाश. दोघांचं ते गदायुध्द सुरू झालेलं आहे. त्या हिरण्याक्षाने एकदम आपली ती गदा भगवंताच्या हातावर फेकली. आणि भगवंतांच्या हातामध्ये असलेली गदा एकदम खाली पडली. निशःस्त्र भगवान आहेत. हिरण्याक्षानेही युध्द थांबवलेलं आहे. धर्मयुध्द आहे, तो सुध्दा धर्मयुध्द मानणारा होता. शत्रूच्या हातात शस्त्र नाही तर आपण कसं मारायचं, थांबला तो.

सुनाभं चास्मरद्विभुः ।।३.१९.५।। श्री.भा.

आपल्या सुदर्शन चक्राचं स्मरण भगवंतांनी केलं. ते चक्र त्या ठिकाणी आलेलं आहे. सर्वही मंडळी, देवगण, लवकर याचा नाश करा अशी प्रार्थना करताहेत. त्यांनी आपल्या अनेक माया निर्माण केल्या. असुराने सुध्दा शक्ती पुष्कळ मिळवलेली आहे. प्रयत्नवाद म्हणजे विलक्षण आहे, ईश्वर मानत नाहीत काही नाही. पण शास्त्रीय प्रयत्न जे सर्व आहेत ते करतात. तपश्चर्या करायची, मंत्रशक्ति मिळवायची, योगशक्ती मिळवायची. त्यामुळे यांनी मंत्रानी अनेक प्रकारच्या मायाशक्ती मिळवलेल्या होत्या. एकदम त्याठिकाणी युध्दभूमीवर सगळीकडे अंधार पडलेला आहे. आकाशातून दगडाची दृष्टी व्हायला लागली. भगवंतांनी आपल्या सुदर्शन चक्रानी त्या सर्व मायांचा नाश केलेला आहे. रागावला तो हिरण्याक्ष. त्याची गदाही सगळी फुटून गेलेली आहे, मोडून गेलेली आहे. धावत, धावत तो आला त्यांनी एकदम वराहांच्या छातीवर मूठ मारलेली आहे. हेही रागावले ह्यांनीही त्याच्या थोबाडित मारलेली आहे. कानावर ती जोरात बसल्यामुळे त्याला चक्कर आली

आणि तो हिरण्याक्ष खाली पडला. मरण आलेलं आहे. मृत्यू त्याला आलेला असताना सगळे ब्रह्मादिक देव आणखी त्याचीच स्तुती करायला लागले. काय म्हणाले याचं भाग्य आहे. भगवंताचं दर्शन शेवटी झालं, त्यांच्या हातून मृत्यू आला. आणि या भगवंताचं स्वरूप पाहता पाहता याचे प्राण गेले. केवढा भाग्यवान आहे. उत्तम गतीला हा गेलेला आहे. सर्वांनीही  भगवान वराहांची प्रार्थना केली.  पृथ्वीही तो घेऊन जाणार होता ना ? रसातलातून आणलेली पृथ्वी त्याला पाहिजे होती. तेव्हा ती पृथ्वी मनुराजाकरता आहे. धार्मिक राजाने राज्य केलं पाहिजे, त्याकरता ब्रह्मदेवाने ती निर्माण केलेली आहे. तुमच्या-तुमच्या रसातलात तुम्ही रहा. इकडे येऊ नका. असा दैत्य तो हिरण्याक्ष. या हिरण्याक्षाचा भगवान वराहांनी, श्रीहरींनी याप्रमाणे नाश केलेला आहे. असं हे दिव्य चरित्र, मैत्रेय ऋषींनी विदूरजींना सांगितलेलं आहे. शुकाचार्य महाराजांनी हे परीक्षित राजाला सांगितलेलं आहे. याचं जर श्रवण केलं श्रध्देने, तर सर्वही पातकांचा नाश होतो आहे. असा हा कथा भाग इथे समाप्त होतो.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा। बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात्।।
करोति यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेत् तत्।।११.२.३६।। भा.

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।

।।गोपालकृष्ण भगवान् की जय।।
।। श्रीमद्भागवत पहिला दिवस समाप्त ।।

ट

# ।। श्रीमद्भागवत दुसरा दिवस ।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा।।

तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ ।।
तुची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन । सर्व होणे जाणे तुझे हाती ।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण । स्तवावे ते कवणे कवणालागी ।।
यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम् ।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः ।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः । तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो । मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः ।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम् । तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने ।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम् ।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम् । संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना ।
अन्याश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन् । प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम् ।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम् ।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं । तत्र तत्र कृत मस्तकांजलिम् ।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं । मारुतिं नमत राक्षसान्तकम् ।।
पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते ।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम् ।।

श्रीगणेशाय नमः
श्रीगुरूचरणारविन्दाभ्याम् नमः ।
महीं प्रतिष्ठामध्यस्य सौते स्वायम्भुवो मनुः ।
कान्यन्वतिष्ठद् द्वाराणि मार्गाय अवरजन्मनाम् ॥३.२०.१॥ श्री.भा.

शुकाचार्य महाराज परीक्षित राजाला सांगताहेत. विदूरजी मैत्रेय ऋषींचा संवाद चालू आहे. हिरण्याक्ष वध वराहाने केला. पुढं काय झालं ? मनू राजाने राज्य कसं केलं ? त्याची मुलं मुली वगैरे त्यांच्यापासून काय काय संतती झाली हे विदूरजींनी विचारलेलं आहे. ब्रह्मदेवांचे जे मानसपुत्र सर्व ऋषीमंडळी, त्यांचा गृहस्थाश्रम कसा झाला ? प्रवृत्ती मार्गाकडे कोण गेले, निवृत्ती मार्गाकडे कोण गेले ? हे सर्वही सांगा म्हणून विदूरजींनी प्रार्थना केली. ब्रह्मदेवांनी जी सृष्टी केलेली आहे, त्या सृष्टीचं वर्णन थोडक्यात मैत्रेयांनी केलं, सर्वही देवांना निर्माण केलं गंधर्व आहेत. देवयोनी दहा प्रकारच्या सांगितल्या आहेत. देव, गंधर्व, विद्याधर, किन्नर, भूत–पिशाच्च हे सुद्धा देवयोनीमध्येच सांगितलं आहे. तेही ब्रह्मदेवांनी निर्माण केले. नंतर हा मनुराजा आणि त्याची स्त्री, आपल्या शरीराचे दोन भाग करून त्या दोघांना त्यांनी गृहस्थाश्रम हा उत्तम प्रकाराने करा, राज्यकारभार करा, धर्मप्रसार करा अशी आज्ञा केली. सर्व ऋषीमंडळीही त्यांनी निर्माण केली. त्या ऋषीमंडळीचंही कार्य चालू आहे. विद्याभ्यास, ज्ञानसंपादन, यज्ञयाग वगैरे करणं, स्वायंभुव मनूचा वंश सांगा म्हणून विदूरजींनी विनंती केल्यावर ते सांगायला आरंभ केलेला आहे. प्रसंगाने मनूची कन्या देवहूती कर्दम ऋषींना दिलेली आहे. तो कथा भाग सांगताहेत.

प्रजाः सृजेति भगवान् कर्दमो ब्रह्मणोदितः ।
सरस्वत्यां तपस्तेपे सहस्राणां समा दश ॥ ३.२१.६ ॥ श्री.भा.

प्रपंच सुध्दा फार कठीण आहे. योग्यरितीने संसार होणं हे देखिल कठीण आहे. ब्रह्मदेवाने आपल्या मुलाला, कर्दम ऋषींना आज्ञा केली तू विवाह करून घे. गृहस्थाश्रमी हो, संसार कर आणि उत्तम प्रकारची संतती निर्माण कर. चांगली मुलं झाली पाहिजे. कर्दम ऋषींना पित्याची आज्ञा मान्य झाली. त्यांना ईश्वराची भक्ति करावी, समाधिचा अभ्यास करावा, अशी इच्छा होती. संसार करू नये असं वाटत होतं. पण पित्याने आज्ञा केल्यावर त्यांनी ठरवले. आयुष्य पुष्कळ होतं त्या वेळेला. काही दिवस आपण गृहस्थाश्रम करू नंतर जाऊ वनामध्ये. विवाह करायचाय. पण योग्य स्त्री मिळाली पाहिजे. ही इच्छा मनामध्ये धरून कर्दम ऋषींनी तपश्चर्येला आरंभ केलेला आहे. मोठे तपस्वी ऋषी. ध्यान करताहेत भगवंतांचं. मंत्र जप चालू आहे. दहा हजार वर्षपर्यंत

तपश्चर्या केली, चांगली गृहिणी मिळाली पाहिजे. त्याशिवाय गृहस्थाश्रम हा योग्य ठरणार नाही. ब्रह्मदेवांची आज्ञा आहे. अखंड भगवंतांचं ध्यान आहे, जप आहे, पूजा चालू आहे. एक दोन दिवस नाही तर दहा हजार वर्षपर्यंत चालू आहे. कृतयुगाचा काल, आयुष्य भरपूर आहे. हे ऋषी म्हणजे, यांच्या तपाने आयुष्य वाढतं आहे. भगवान विष्णू परमात्मा प्रसन्न झाले. गरूडावर बसून आकाश मंडलामध्ये आलेले आहेत. कर्दम ऋषींनी त्यांचं दर्शन घेतलं. कौस्तुभ मणी आहे कंठामध्ये. किरीट, कुंडलं धारण केलेली आहेत. शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेलं आहे. गरूडावर बसून आलेले आहेत. साष्टांग नमस्कार घातला कर्दम ऋषींनी. आपली इच्छा पूर्ण झालेली आहे. भगवंताचं दर्शन व्हावं आणि त्यांनी मार्गदर्शन करावं. संसार कसा करायचा हे देवांनी सांगितलं पाहिजे. त्याकरता इतकी तपश्चर्या केली. कर्दम ऋषींनी सांगितलं देवा आज माझ्या नेत्राचं साफल्य झालेलं आहे. मला डोळे तुम्ही जे दिलेत त्या डोळ्यांनी आपलं रूप मला दिसलं म्हणजे डोळे मिळाल्याचं फळं मला मिळालं. आपल्या माया–मोहामध्ये सापडलेले जे जीव आहेत त्यांना काही आपली उपासना घडत नाही म्हणाले. भक्ति करणारेही पुष्कळ लोक आहेत. परंतु देवाची भक्ति, आपली इच्छा पूर्ण करावी, देवाने कृपा करावी या करता करतात. त्यांच्या इच्छा आपल्या कृपेने पूर्ण होतात. आपण त्यांना काही नाही म्हणत नाही. पण ते मोहामध्ये सापडलेले आहेत. आपल्या जवळ येऊ शकत नाहीत, राहू शकत नाहीत ना. त्या मायामोहातच गुंतून राहतात.

तथा स चाहं परिवोढुकामः ।।३.२१.१५।। श्री.भा.

त्यापैकीच मी आहे. सकाम भक्त आहे आपला. मला गृहस्थाश्रम करण्याची पित्याची आज्ञा झालेली आहे. योग्य पत्नि मिळावी या इच्छेने मी आपले ध्यान केलं. आपली तपश्चर्या केलेली आहे. सर्वावर अनुग्रह करणारे आपण आहात. सर्व सृष्टीचे कार्य हे आपल्या इच्छेने चाललेलं आहे. ईश्वर इच्छेशिवाय झाडाचं पान सुद्धा हलत नाही. असा या संतांचा, महात्म्यांचा दृढ विश्वास आहे. अहंकार नाहीये. तेव्हा आपण माझ्यावर कृपा करावी. अशी प्रार्थना केल्यानंतर, भगवान सांगतात

विदित्वा तव चैत्यं मे पुरैव समयोजि तत् ।। ३.२१.२३ ।। श्री.भा.

ऋषिमहाराज तुमची इच्छा मला समजलेली आहे. सगळी योजना केलेली आहे. तुमची इच्छा पूर्ण होणार आहे. माझी सेवा ज्यांनी केली मग ती सकाम असो वा निष्काम. ती सेवा केव्हाही फुकट जाणार नाही. सम्राट राजा मनू या ब्रह्मावर्तामध्ये राहून राज्य करतो आहे. सप्तद्विपयुक्त पृथ्वीचं राज्य करतो आहे. तो आपल्या स्त्रीला आणि आपल्या मुलीला घेऊन तुम्हाला भेटण्याकरता

आपल्या आश्रमामध्ये येणार आहे. आपली कन्या तुम्हाला समर्पण करेल. सम्राट राजाची ही कन्या ह्या कर्दम ऋषींना द्यावी म्हणून मध्यस्थ कोणीतरी पाहिजे. योग्य मध्यस्थाने सगळं कार्य होतं. इथे प्रत्यक्ष भगवानच मध्यस्थ आहेत. त्याला जाऊन सांगितलं तुझी मुलगी त्या ऋषींना तू दे. आणि तो राजा त्यांच्याकडे येणार हे सांगायलासुद्धा भगवान आले. तो राजा येणार आहे, त्या विवाहाला तुम्ही मान्यता द्या आणि विवाह करा. तुम्हाला योग्य मुलगी आहे. असं स्वतः भगवान सांगताहेत. तुमचा विवाह झाल्यावर आरंभाला तुम्हाला मुली होतील. नंतर मी स्वतः तुमचा मुलगा होईन म्हणाले मलाही सर्वांना मार्गदर्शन करायचं आहे. त्याकरता मी येणार आहे. असं ऋषींना सांगून निघाले भगवान तिथून. बिंदू सरोवर म्हणून आहे. मातृगया ज्याला म्हणतात, सिद्धपूर सध्या अहमदाबाद जवळ आहे. सिद्धगण ज्यांची स्तूती करताहेत असे भगवान गरूडावर बसून निघालेले आहेत, वर प्रदान करून. कर्दम ऋषींची केवढी तपश्चर्या आहे. विवाहाची इच्छा नाहीये पण पित्याची आज्ञा मान्य करायची आणि देवांनी जी स्त्री दिलेली आहे तिच्याबरोबरच विवाह झाला पाहिजे. त्यांच्या आज्ञेप्रमाणे सर्व चालायचं आहे. त्या कर्दम ऋषींची दृढ निष्ठा पाहून, त्यांचं प्रेम पाहून श्रीहरींच्या डोळ्यामध्ये प्रेमाश्रू उत्पन्न झाले आणि ते अश्रूबिंदू त्या सरोवरामध्ये पडले म्हणून बिंदूसरोवर हे नाव पडलेलं आहे. मनुराजाला आज्ञा झाल्याप्रमाणे तो आपल्या स्त्रीला आणि कन्येला देवहूतीला घेऊन रथामध्ये बसून त्या ऋषींच्या आश्रमामध्ये आलेला आहे. अत्यंत शांत आश्रम आहे. ऋषींची तपश्चर्या तिथे चाललेली आहे. हरणं फिरताहेत. सिंह, वाघही फिरताहेत. काही कोणी कोणाला त्रास देत नाही. सर्वांची मनोवृत्ती चांगली आहे. राजाला सुद्धा असं शक्य नाहीये. सर्व मानवांना निर्वैर करणं हे राजाला सुद्धा शक्य नाही. तिथे पशु सुद्धा निर्वैर झालेले आहेत. हे एका ऋषींच्या तपश्चर्येमुळे आहे. आश्रमामध्ये मनुराजे आलेले आहेत. ऋषी महाराजांचा अग्निमध्ये होम नुकताच संपलेला आहे. सकाळची वेळ आहे आणि ते तिथे बसलेले आहेत. तेजस्वी शरीर आहे तपाचं तेज आहे. प्रेमळ दृष्टी आहे. अजानबाहू आहे. कमलाप्रमाणे नेत्र आहेत. जटा आहेत. वल्कलं पांघरलेले, नेसलेलं आहे. राजेसाहेब आलेले आहेत पाहिल्याबरोबर कर्दम ऋषी उठून उभे राहिले. त्यांचे स्वागत करून त्यांना आसनावर बसवलेले आहे. पूजा त्यांची केली ऋषींनी. आपण ऋषी आहोत, राजा आपणहून न बोलवता आला, पण ऋषींना काही अहंकार नाही. कारण राजाही परमेश्वराचं रूप आहे ना. अशी दृष्टी आहे. भगवंतांनी काय सांगून ठेवलं होतं त्यांची आठवण झाली. पण ते काही अगोदर बोलले नाहीत. राजाची स्तुती ते करताहेत.

नूनं चङ्क्रमणं देव सतां संरक्षणाय ते ।
वधाय चासतां यस्त्वं हरेः शक्तिर्हि पालिनी ।।३.२१.५०।। श्री.भा.

आपण जे देशात संचार करता त्याचा हेतू म्हणजे सज्जन जे असतील त्यांना संरक्षण मिळालं पाहिजे आणि दुष्ट जे असतील त्यांना नुसतं शासन नाही वधाय् म्हणतात. त्यांचा नाश करायचा. हे आपलं कार्य आहे. श्रीहरींची संरक्षण शक्ती जी आहे ती आपण आहात. सूर्य, चंद्र, अग्नि, वायू, यमधर्म, वरूण सर्वांची शक्ति आपल्या ठिकाणी आहे. हे सर्व देवरूपी आपण आहात. राजा एकटा राज्य करत होता. हुकूमशाही होती. आता लोकशाही चांगली असा बुद्धिवाद करतात लोक. पण राजा एकटा नाहीये. चारित्र्यसंपन्न, ज्ञानसंपन्न, राजनीतीचे संपूर्ण शिक्षण घेतलेलं, या सर्व देवतांचं रूप असलेलं, सर्व देवता याला मार्गदर्शक आहेत, असे आपण आहात. मी आपणाला नमस्कार करतो. असे कर्दम ऋषींनी सांगितले. विचारलं महाराज, कोणत्या कामाकरता आपण आलेले आहात. आपण सम्राट राजे आमच्या सारख्यांच्या आश्रमात कशाकरता आलेला आहात. काय आपली इच्छा असेल ती सांगा. असं अगदी नम्रपणाने, विनयाने ऋषिंचं भाषण झालेलं आहे ते ऐकून राजालासुद्धा लज्जा उत्पन्न झाली, काय बोलावे या ऋषीसमोर, एवढा महात्मा, की ज्याच्यावर भगवान श्रीहरीचं प्रेम इतकं आहे की त्यांनी मला आज्ञा केली की तुझी मुलगी याला दे. केवढा या ऋषिंचा अधिकार आहे. काय बोलू यांच्याबरोबर. वधुपित्याला आपली इच्छा पूर्ण होईपर्यंत काय होईल कोणाला ठाऊक. मुलीला पसंत करतील की नाही, सगळीच काळजी असते ना. मनुराजाने अगोदर ऋषिमहाराजांची स्तुती केली. सृष्टीकर्ता ब्रह्मदेवाने आपल्या मुखापासून आपल्याला म्हणजे तपस्वी ब्राह्मणांना उत्पन्न केलेलं आहे. त्यांनी तपश्चर्या करावी. ज्ञान संपादन करावं, योगाभ्यास करावा आणि मनामध्ये कोणतीही आसक्ति ठेवू नये. अलंपट राहिलं पाहिजे. निर्लोभ राहिले पाहिजे. प्रथम ब्राह्मणांना निर्माण केलं आणि तुमच्या संरक्षणाकरता आम्हा क्षत्रियांना निर्माण केलं.

हे विचार ऐकण्यासारखे आहेत. समाजशुद्धी, समाजाचं कार्य करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवलं पाहिजे. ब्राह्मणांना सृष्टीकर्त्यांनी निर्माण केलं. पण ब्राह्मणांची कर्तव्य वेगळी आहेत. त्यांचं संरक्षण करण्याकरता क्षत्रियांना निर्माण केलं.

हृदयं तस्य हि ब्रह्म क्षत्रमङ्गं प्रचक्षते ।।३.२२.३।। श्री.भा.

सम्राट राजा मनू, प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ तो सांगतो आहे, आपण ब्राह्मण म्हणजे त्या

सृष्टिकर्त्या परमात्म्याचे हृदय आहात आणि बाकीचं शरीर म्हणजे आम्ही क्षत्रिय आहोत. म्हणून दोघांनीही एकमेकांचं संरक्षण करावं, अशी इच्छा आहे देवांची' तुमची ज्ञानशक्ति, तपशक्ति आम्हाला मिळावी, उपयोगी पडावी आणि आम्ही तुमचं रक्षण करावं. आपलं दर्शन झालं ऋषिमहाराज, समाधान झालं, धर्म रक्षण करणाऱ्या भगवान श्रीहरींनी मला आज्ञा केलेली आहे. आपल्या रूपानी आज मला भगवंतांचं दर्शन घडलेलं आहे. मी आपल्याला काही विनंती करण्याकरता आपल्या आश्रमात आलेलो आहे. आपण ती ऐकून घ्यावी.

प्रियव्रतोत्तानपदोः स्वसेयं दुहिता मम ।
अन्विच्छति पतिं युक्तं वयः शीलगुणादिभिः ।।३.२२.९।। श्री.भा.

मला दोन मुलं आहेत. प्रियंव्रत आणि उत्तानपाद. त्यांची बहिण, दुहिता माझी मुलगी ही देवहूती आहे. ''कन्यम् भ्रातृमति'' ज्योतिषशास्त्रामध्ये, धर्मशास्त्रामध्ये बंधु असलेली कन्या असावी असं सांगताहेत. काय त्यांचा उद्देश असेल कोणास ठाऊक. म्हणजे मुलीला माता–पित्यांच छत्र तसं बंधूंच प्रेम असलं पाहिजे. आता कायद्यानुसार मुलाप्रमाणे मुलीलापण वाटणी पित्याने दिली पाहिजे म्हणजे भगिनीबद्दल प्रेम कसं राहिल. वाटणी आपली ही मुलगी घेऊन जाणार हे विचार मनात असताना, प्रेम रहाणार कसं. ही माझी मुलगी आता विवाहाला योग्य झालेली आहे. आपल्याला योग्य पति मिळावा अशी हिची इच्छा आहे. नारद महर्षि एके दिवशी आमच्या राजवाड्यात आले आणि त्यांनी आपलं वर्णन केलं. मुलीने हे सर्व ऐकलं. आपल शील श्रेष्ठ आहे, आपलं ज्ञान आहे, आपलं रूप आहे, आपले गुण आहे, सगळे नारदांनी वर्णन करून सांगितले. नारद ब्रह्मचारी आहेत. मोठे भगवत् भक्त आहेत. पण अशी काम करतात ते. योग्य असताना नको कोणी म्हणणारच नाही. श्रीकृष्णांचा आणि रुक्मिणीचा विवाह त्यांनीच जमवून दिला. तेव्हा नारदांच्या मुखातून आपलं तप, आपले गुण हिने ऐकल्याबरोबर आपल्या बरोबरच विवाह व्हावा असं हिने मला सांगितलं. आम्ही दोघांनी अत्यंत प्रेमाने, श्रद्धेने ही कन्या अर्पण करण्याकरता घेऊन आलेलो आहोत. हे सर्व सांगितले मनुराजाने. पुन्हा आणखी तो म्हणतो आहे. एखाद्या मनुष्याला आपल्यासारखे तपस्वी पुरूष की ज्यांना काहीही इच्छा नाही. काही नको आहे. सर्व संग परित्याग करून राहिलेले आहेत. पण आमच्यासारखे जर कोणी संसारी त्याच्याकडे गेले, महाराज आमची एवढी सेवा करायची इच्छा आहे, एवढं आपल्याला घ्या, एवढं देतो म्हणाले, तर त्याने नको म्हणू नये. आपणहून जर याचना न करताना कोणी जर देण्याला आला आणि ते नाही म्हटलं तर त्याचाच आणखी दोष आहे. त्याचं यश जातं आहे. मी असं ऐकलं की आपल्याला

विवाह करायची इच्छा आहे. हे माझ्या कानावर पडलं म्हणून मी माझ्या कन्येला घेऊन आलो. तुम्हाला विवाहाची इच्छा आहे, कन्येला सुद्धा नारदांनी आपले गुण वर्णन केल्यामुळे आपल्याबरोबर विवाह करावा अशी इच्छा आहे. आम्ही तिचे आई–बाप अत्यंत श्रद्धेने आदराने आपल्याला ती कन्या अर्पण करावी म्हणून आलेलो आहोत. तेव्हा तुम्ही हिचा स्विकार करा.

तो मोठा राजनितीज्ञ राजा त्यांनी सबंध अशाप्रकारे भाषण केलं. कर्दम ऋषी बोलू लागले हो म्हणाले.

बाढं उद्वोढुकामोऽहं अप्रत्ता च तवात्मजा ।। ३.२२.१५ ।। श्री.भा.

राजेसाहेब, मला विवाह करायची इच्छा आहे हे खरं आहे म्हणाले. आपली कन्याही चांगली आहे, श्रेष्ठ आहे, गंधर्व सुद्धा तिला पाहून मोहित होतात. तिची इच्छा आहे. आपणही आदराने आलेले आहात. कोण नाही म्हणेल. परंतु माझाही काही उद्देश, माझंही काही ध्येय आहे ते तुम्हाला सांगून ठेवतो. यावर तुम्ही आणि तुमच्या कन्येने विचार करावा. पसंत असेल तर करा विवाह.

अतो भजिष्ये समयेन साध्वी
यावत्तेजो बिभृयात् आत्मनो मे ।
अतो धर्मान् पारमहंस्यमुख्यान्
शुक्लप्रोक्तान् बहु मन्येऽविहिंस्रान् ।।३.२२.१९ ।। श्री.भा.

राजेसाहेब मी काही जन्मभर संसार करणार नाही हे अगोदरच सांगताहेत. संसार केव्हा सोडणार हेही अगोदरच सांगताहेत. हिला मुलमुली झाल्यानंतर मी लगेच संसार सोडून देणार आहे. परमहंस जे आहेत, सर्व संग परित्याग करून भगवान श्रीहरीचं चिंतन निश्चिंत मनाने करणारे महात्मे त्यांच्या मार्गाने मला जायचं आहे. आत्ताच मला जायचं होतं पण पिताजींची आज्ञा झाल्यामुळे थांबलो मी. संपूर्ण विश्वाचं संरक्षण करणारा, उत्पन्न करणारा, संहार करणारा जो परमात्मा आहे त्याचीच सेवा मला करायची आहे. दुसरी मला इच्छा नाहीये. आपलं अंत:करण कित्ती दृढ आहे हे त्यांनी सांगितलं. दुसरं मला मान्य नाहीये. संसार केला तरी मी तो अशा बुद्धिने करणार आहे.

मैत्रय सांगतात विदूरजी, मनुराजाला सगळं माहिती होतचं. करणार आहेत संसार. नंतर मुलं बाळं झाल्यावर संन्यास घेणार आहेत, घेईनात का पुढचं कोणी पाहिलयं. ऋषिंची अनुज्ञा मिळाली

एवढं समजलं आहे, विवाहाला. सम्राट राजाची मुलगी तिचा विवाह त्या अरण्यामध्ये आश्रमात झालेला आहे. राजवाड्यात बोलवून सगळे इकडचे पाहुणे लोक तिकडचे पाहुणे लोक, आणखी काही लोक हे नाही, शास्त्र एवढंच आहे. यथाविधी कार्य करायचं. कन्यादान आहे ते. अर्पण केली कन्या. देवहूतीची माता शतरूपा पुष्कळ तिने वस्त्रं काय, अलंकार काय कितीतरी आपल्या मुलीला, जावयाला दिलेलं आहे. कार्य झाल्यानंतर मनुराजा आपल्या स्त्रीला बरोबर घेऊन राजधानीकडे जाण्याकरता निघालेला आहे. कन्येचा विरह होणार आता. मुलीला या अरण्यामध्ये ऋषिंच्या आश्रमामध्ये ठेवून जावं लागणार आपल्याला. डोळ्यातून अश्रुधारा चाललेल्या आहेत. दोघाही राजाराणीच्या डोळ्यातून प्रेमाश्रू उभे राहिले. चांगली सेवा तू आपल्या पतिची कर आणि आपलं कल्याण करून घे असं त्या मुलीला त्यांनी सांगितलं. ऋषिमहाराजांनाही सांगितलं, महाराज, ही कन्या आपल्याला दिलेली आहे. संरक्षण करा आपण. आता ती आपली आहे, आमचा संबंध संपलेला आहे. त्यांचीही अनुज्ञा घेऊन राजे निघालेले आहेत. जाता–जाता नदीतीरावर अनेक ऋषिमंडळींचे आश्रम होते त्या प्रत्येक आश्रमामध्ये जाऊन त्यांची पूजाअर्चा त्यांची विचारपूस राजाने केली. सर्व प्रजाजनांनाही राजाबद्दल अत्यंत आदरभाव वाटतो आहे. सगळे सामोरे गेलेले आहेत, राजधानीमध्ये राजेसाहेब आल्यानंतर बर्हिष्मती नावाची राजधानी त्याची होती. अनेक यज्ञ त्या नगरीमध्ये मनुराजाने केलेले आहेत. सम्राट राजाला काय कमी आहे. सम्राट राजाचा जो आनंद आहे तो पहिला आनंद आहे सांगतात, उपनिषदांमध्ये त्यापेक्षा पुढचे आनंद मोठे मोठे आहेत. देवांचा, गंधर्वांचा सर्व समृद्धि आहे. संपूर्ण पृथ्वीचा राजा आहे तो. त्यामुळे संसारात काहीही कमी नाही. पण मनावर त्याचा परिणाम नाही. हे माझं आहे, अशी बुद्धिच नाहीये. ईश्वरांनी दिलेलं हे वैभव ईश्वराचं आहे. अशी वृत्ती असल्यानंतर आसक्ति कशाला निर्माण होईल. माझं आहे हे वाढलं पाहिजे, टिकलं पाहिजे वगैरे विचार हे माझं आहे अशी समजूत असल्यानंतर होणार आहेत ना. अनेक यज्ञ याग केलेले आहेत. संसारसुखाचा भोग पुष्कळ घेतलेला आहे. अनासक्त जीवन आहे तो मनुचा काल

युगानां एकसप्ततिम् ।।३.२२.३६ ।। श्री.भा.

मैत्रय ऋषि सांगतात. एक्काहत्तर युग एवढं मनु राजाचं राज्य झालेलं आहे. म्हणजे किती काल त्याला आयुष्य मिळालेलं आहे, राज्य मिळालेलं आहे. भगवान वासुदेवाची भक्ति अखंड चाललेली आहे. कथाश्रवण चाललेलं आहे. काही काळ ठराविक रोजचा त्याकरता ठेवलेला आहे. संचार देशामध्ये असला तरी हे सगळं चालू आहे. भगवंताच्या कथा श्रवण करणं, पूजाअर्चा करणं.

ऋषिमंडळींनी त्यांच्याकडे येऊन त्यांना विचारलं, राजेसाहेब सर्वांचे धर्म आम्हाला समजावून सांगा. मनुराजा मोठा धर्मज्ञ. ऋषिंच्या प्रार्थनेप्रमाणे मनुराजाने सर्वांचे धर्म समजावून सांगितले. चार वर्ण, चार आश्रम, राजधर्म सांगितले, राजदूताचे धर्म सांगितले. राजदूत कसा असला पाहिजे. परप्रांतामध्ये परदेशामध्ये राहाणाऱ्या राजदूताचे एकंदर गुण कोणते आहेत हे सगळं त्यांनी समजावून सांगितले. आता कर्दम ऋषि आणि देवहूती यांचं चरित्र सांगताहेत.

पितृभ्यां प्रस्थिते साध्वी पतिमिङ्गितकोविदा ।
नित्यं पर्यचरत्प्रीत्या भवानीव भवं प्रभुम् ।।३.२३.१।। श्री.भा.

माता-पिता हे आपल्या राजधानीला निघून गेले. एकटी देवहूती त्या आश्रमामध्ये अरण्यामध्ये राहिलेली आहे. सेवा करती आहे पतिची ''इंगित कोविदा'' म्हणून म्हणतात मैत्रेय ऋषि. इंगित म्हणजे, पतिच्या मनामध्ये काय आलेलं आहे, लगेच समजायचं तिला. सांगण्याची वाट पाहायची नाहीये. हे ज्ञान आहे, प्रेम इतके विलक्षण आहे. आदरभाव इतका आहे की ते इंगित समजून येतं. हे सगळं समजून घेऊन सेवा करती आहे. पूर्ण विश्वास पतिच्या तपप्रभावावर आहे. शरीर, वाणी, मन हे अत्यंत पवित्र ठेवण्यामध्ये तिचं लक्ष आहे. इंद्रियांचा निग्रह आहे. मधुर वाणी आहे. काम, क्रोध, मोह, अहंकार, लोभ, दंभ काहीही नाही. आपण केलेले जे सत्कर्म आहे, ते लोकांच्या पुढं आपल्या तोंडाने सांगणे याला दंभ म्हणतात. हा नाही. केलेलं झालं, कर्तव्य आहे ते होऊन गेलं. सावध आहे, दक्ष आहे कर्तव्य कर्मामध्ये. बराच काल गेलेला आहे. ऋषिमहाराज जायचे नदीतीरावर जाऊन समाधी लावून बसायचे. यायचे पाणी आणायचं, सडासंमार्जन करायचं, सगळी व्यवस्था ही करत होती. संतुष्ट झाले कर्दम ऋषि. पुष्कळ काल गेलेला आहे. ही राजकन्या इथे सेवा करती आहे, म्हणजे हिचं शरीर कृश झालं. हाताखाली माहेरी कितीतरी नोकर चाकर असायचे पण इथे कोणीच नाही. ऋषिंच्या मनामध्ये दया निर्माण झाली की ही स्त्री खरोखर श्रेष्ठ आहे. चांगली आहे. कर्दम ऋषि बोलू लागले.

तुष्टोऽहमद्य तव मानवि मानदायाः ।
शुश्रूषया परमया परया च भक्त्या ।।३.२३.६।। श्री.भा.

हे मनुकन्ये तुझी जी सेवा चालली आहे. अंतःकरणामध्ये तुझ्या जी भक्ति आहे, प्रेम आहे यामुळे माझ्या मनाला खरोखर समाधान झालेलं आहे. कारण असं आहे. सर्वांना आपला देह जितका प्रिय आहे तितकं काहीच प्रिय नाही. शरीरावर जास्ती प्रेम आहे सर्वांचं. पण त्या

शरीराकडेही तू लक्ष दिलं नाहीस. शरीरही तुझं कृश झालेलं आहे. शरीराकडेही न पाहताना तू सेवा केलीस. स्वधर्माचरण करून, भगवंताचा जो कृपाप्रसाद मला मिळालेला आहे. तुलाही तो मिळेल म्हणाले. तूही त्याला योग्य आहेस. सिद्ध झालेली आहेस तू. तुझ्या धर्माचं पालन तू केलेलं आहेस. मानवांना जे भोग मिळणारं नाहीत, स्वर्ग लोकामध्येही जे विषय नाहीयेत ते दिव्य विषय तुला प्राप्त होतील. काय तुझी इच्छा आहे सांग म्हणाले.'' आजपर्यंत काहीच भाषण झाले नाही, काही विचारले नाही. आनंद झाला देवहूतीला तिने बोलायला आरंभ केला महाराज

राध्दं बत द्विजवृषैतदमोघयोग –

मायाधिपे त्वयि विभो तदवैमि भर्तः ।।३.२३.१०।। श्री.भा.

आपण योगेश्वर आहात महाराज. आपली शक्ती फार मोठी आहे. आपण काहीही करू शकाल. विवाहाच्या वेळेला आपण बोलून गेलेला आहे. गृहस्थाश्रम करणार आहे. केव्हा करणार आपण. तेवढीच माझी इच्छा आहे. संसार सुख मिळावं आणि त्यात तिने सांगून टाकले.

भवनं सदृशं विचक्ष्व ।।३.२३.११।।श्री.भा.

राहाण्याकरता एक घर पाहिजे म्हणाले. त्याशिवाय कसा संसार करायचा ? सर्व सामग्री त्याच्यामध्ये आहे असं स्थान पाहिजे. हे समजलं कर्दमांना, मोठे योगी होते. त्यांनी आपल्या संकल्पशक्तिने दिव्य विमान निर्माण केलेलं आहे. त्या अरण्यामध्येच एक मोठं विमान तयार झालं. त्या विमानाचं वर्णन सात आठ श्लोकामधे भागवतात केलेलं आहे.

सर्वकामदुघं दिव्यं ।।३.२३.१३।।श्री.भा.

विमानामध्ये बसणारा जो आहे त्याच्या मनामध्ये जी इच्छा उत्पन्न होईल त्याप्रमाणे पदार्थ त्याला मिळतो. भूक लागली की अन्न मिळेल. इच्छा करण्याचा अवकाश सर्व इच्छा सिद्धी होती आहे. सर्व प्रकारची समृद्धी आहे. सगळी साधनं आहेत. कित्ती रत्नांची कपाटं भरलेली आहेत. वस्त्र भरलेली आहे. संसाराची सर्व साधनं सामुग्री याला काहीही कमी नाही. सम्राट राजाने जरी मनामध्ये आणलं तरी त्याला इतकं देता आलं नसतं, आपल्या मुलीला इतकी सामग्री आहे. ही नुसत्या संकल्पाने निर्माण झालेली आहे. आणि त्याच्याबद्दल काही आस्थाही नाही. झाली आहे घ्या, देवहूतीला पाहिजे होती म्हणून केली. रेशमी वस्त्र आहेत, जरीची वस्त्र आहेत. अलंकाराने भरलेली कपाटं आहेत. सगळं आहे. विमान इतके मोठे होते, हंसादिक पक्षी इकडून तिकडे जात आहेत. उद्यान आहेत आत. हे पाहिलं देवहूतीने. समाधान व्यक्त केलं. हे ऋषि तिचे इंगित

जाणणारे होते. सांगायला कशाला पाहिजे. एवढ्या मोठ्या विमानात आपण दोघांनीच रहायचं का ? असं तिने विचारले. नोकरचाकर कोणी नकोत का ? असे बोलून दाखवले नाही तिने. पण यांना समजलं. त्यांनी सांगितले देवहूती जा या सरोवरात जाऊन स्नान करून ये. लवकर आपण निघू या विमानातून. निघालेली आहे. अंगावरती मलीन वस्त्र आहे. सगळे केस कसे तरी बांधलेले आहे. शरीर सगळं मलीन झालेलं आहे. सरस्वती नदीच्या त्या तीरावरती सरोवराच्या जवळ ती आली. इतक्यात त्या सरोवरातून एक हजार विद्याधर कन्या, अत्यंत तरूण अशा, उत्तम वस्त्र नेसलेल्या, सबंध शरीराला सुगंध सुटलेला आहे. अलंकार घातलेल्या त्या सर्व कन्या वर आल्या, बाईसाहेब आम्ही आपल्या दासी आहोत. काय सेवा करायची ते सांगा. नमस्कार सगळ्यांनी केला. सर्व त्या स्त्रियांनी तिला न्हायला घातलेलं आहे. तेल लावून स्नान घातलं आहे. उत्तम रेशमी वस्त्र तिला दिलेले आहेत, अलंकार दिलेले आहेत. उत्तम प्रकारचं भोजन झालेलं आहे. अमृत पाजलेलं आहे. आरशामध्ये आपलं ते दिव्य रूप पाहिलं त्या देहहूतीने. ती मुळची राजकन्याच होती. अत्यंत तेजस्वी असं रूप पाहून तिलाही समाधान झालेलं आहे. रत्नखचित कमरपट्टा लावलेला आहे. रत्नाचा हार गळ्यामध्ये घातलेला आहे. आपल्या पतिचं स्मरण केल्याबरोबर ती विमानामध्ये येऊन पोहचली. आपले पतिदेव आहेत आणि या सहस्त्र स्त्रिया आहेत. ते विमान किती मोठं असेल, याची कल्पना येईल. एक हजार दासी तिच्या हाताखाली आहेत. अशी देवहूती त्या विमानामध्ये राहिली आहे. प्रत्येक दासीला राहाण्याकरता वेगळी खोली. सगळं वेगळं, स्वतंत्र. काय हे विलक्षण सामर्थ्य आहे, आपल्या पतिमहाराजांचं असं तिच्या मनात आले. कर्दम ऋषि निघालेले आहेत. ते विमान चालू झालेलं आहे. एक सहस्त्र विद्याधर दासी तिची सेवा करताहेत. अशा आपल्या पत्निला बरोबर घेऊन ते ऋषि आकाश मंडळामध्ये निघालेले आहेत. स्वर्गादिक लोकामध्ये ते गेलेले आहेत. वरूण लोक आहे, कुबेराचा लोक आहे. सर्व लोकामध्ये फिरून आले. सर्वही उपवनामध्ये त्यांनी विहार केलेला आहे. तेजस्वी असं ते विमान आहे. विमानामध्ये बसून पुष्कळ देवही हिंडत होते पण त्यांनाही कोणाचं हे विमान आहे, कोण आहे हा महात्मा, इतकं दिव्य विमान कसं आहे, इतकं मोठं हे कसं आहे याच त्यांना आश्चर्य वाटले. मैत्रेय महर्षि सांगतात विदूरजी

किं दुरापादनं तेषां पुंसां उद्दामचेतसाम्।
यैराश्रितस्तीर्थपदश्चरणो व्यसनात्यय: ।।३.२३.४२ ।। श्री.भा.

ज्यांनी भगवान श्रीहरींच्या चरणांचा आश्रय केलेला आहे त्यांना न मिळणारी गोष्ट जगामध्ये

नाहीये. दुर्लभ असं त्यांना काहीही नाहीये. संपूर्ण भूमंडळ विमानामध्ये बसून आपल्या पत्निला दाखवलेलं आहे, कोणती कोणती स्थानं आहेत, तीर्थयात्राही झाल्या त्याच वेळेला. आश्रमामध्ये हे सर्व झाल्यावर परत आलेले आहेत. पुढं काही दिवसांनी देवहूतीला नउ कन्या झालेल्या आहेत. सगळी समृद्धी आहे. दुःखाचा अंश सुद्धा नाहीये. संपूर्ण सुख त्या देवहूतीला मिळतं आहे. इतका काल गेला, शंभर वर्ष होऊन गेली. काही याकडे लक्ष नाहीये. त्या सर्व कन्या अत्यंत सुंदर अशा प्रकारच्या, अत्यंत सुगंधीत शरीर याचं आहे.

हे सर्व झाल्यावर कर्दम ऋषिंनी बोलायला सुरवात केली. झालं म्हणाले माझं काम झालं. संसार संपलेला आहे. ठरल्याप्रमाणे मला संन्यास घेऊन आता बाहेर जायचे आहे, देवाची भक्ती करायची आहे. ज्यांना आपलं आयुष्य निश्चित इतकं आहे हे माहिती आहे त्यांनी देवाची भक्ति पुढं करू असं म्हणायला हरकत नाही. कर्दम हे त्यापैकी नव्हते. त्यांना त्याचं वेळेला ईश्वर भक्ति करायची होती. नको, संसार नको होता, पण पिताजींची आज्ञा झाल्यामुळे करावा लागला. आयुष्यही भरपूर आहे. संसारही उत्तम झालेला आहे. तो संपला पाहिजे ना. पुन्हा त्या संसारामध्ये आसक्ति उत्पन्न होऊन जर वासना वृद्धि झाली तर पुन्हा जन्म घ्यायला पाहिजे. ज्ञानी भगवत्भक्तांच्या मनाची स्थिती ही वेगळी आहे. विषयभोग झाल्यानंतर पुरे म्हणतात. पुन्हा इच्छा नाहीये. हे खरं वैराग्य आहे. जेवल्यानंतर तृप्ति व्हायला पाहिजे का नको. पण किती वेळ, दोन तीन तास झाले की लागली पुन्हा भूक. अगदी पुष्कळ पोट भरलेलं आहे, सगळं मनासारखे झालेलं आहे. नको त्यावेळेला म्हणतो. पण पुन्हा भूक लागते. सर्वही विषयांचा भोग घेऊन, आता पुरे असं केव्हाही मानवाला वाटत नाही. जीवांना, देवांनासुद्धा वाटत नाही. पण हे महात्मे फार वेगळे आहेत. भगवत्भक्त आहेत. कर्दम ऋषी म्हणतात, झालं सगळं झालं, संसारही केला म्हणाले. पित्याची आज्ञा पालन केलेली आहे. आता आम्हाला जायचयं म्हणाले. देवहूतीच्या मनाला एकदम धक्का बसलेला आहे. तिला आठवण झाली पूर्वीची, ऋषिमहाराजांनी सांगितलेलं आहे संसार सुरू करायच्या वेळेलाच, संसार केव्हा सोडायचा हेही निश्चित केलेलं आहे. हे इतरांना सांगता येणार नाही. खाली मान घातलेली आहे. डोळे अश्रूंनी भरून गेलेले आहेत. प्रार्थना करती आहे.

सर्वं तद्भगवान् मह्यं उपोवाह प्रतिश्रुतम् ।।३.२३.५१।। श्री.भा.

आपण जे बोलला होतात, ते सर्वही संसार सौख्य मला आपणापासून मिळालेलं आहे. काहीही संसारात कमी नाही माझ्या. पण माझी एक प्रार्थना, विनंती ऐका. आता या मुली

मोठ्या झाल्या. ह्या मुलींचा विवाह करण्याचं कर्तव्य आपलं नाही का ? कुठे या मुलींकरता योग्य वरसंशोधन करायचं ? ह्या मुली एकदा योग्य स्थळी पडल्या की माझ्या मनाला समाधान वाटेल. हे कार्य आपलं राहिलेलं आहे, असं आपल्याला वाटत नाही का ? दुसरी गोष्ट म्हणजे आपण संन्यास घेऊन निघून गेल्यानंतर, मुलीही आपल्या-आपल्या घरी जाणार आणि मी एकटी घरात रहाणार, मला एखादा मुलगा जर झाला तर तेवढंच माझ्या मनाला समाधान होईल. ह्या विषयाच्या ठिकाणी आसक्ति माझ्या मनामध्ये उत्पन्न झाली आणि माझ्या हिताकडे माझं लक्ष गेलं नाही.

साहं भगवतो नूनं वञ्चिता मायया दृढम् ।
यत्वां विमुक्तिदं प्राप्य न मुमुक्षेय बन्धनात् ।। ३.२३.५७ ।। श्री.भा.

ईश्वराच्या मायेचं आवरण इतकं माझ्या चित्तावर पडलेलं आहे, की मला माझं कल्याण कसं करून घ्यावे हे समजले नाही. आपल्या सारख्यांकडे मोक्ष मागितला असता तर मुक्तही आपण करू शकाल. पण आत्तापर्यंत संसारातच राहाण्याची माझी इच्छा हीच वासना माझ्या मनामध्ये राहिली. हे माझं दुर्दैव आहे. खिन्न झाली, निराश झाली. ऋषिमहाराज निघून जातात की काय असं तिला दुःख झालेलं आहे. दया आली कर्दम ऋषिंना. देवांनीही सांगून ठेवलं होतं त्यांना. त्यांनीही सांगितलं राजकन्ये, का दुःख तू करते आहेस. भगवान श्रीहरी तुझे पुत्र होणार आहेत. त्यांनीच सांगितलंय म्हणाले. तूही पतिव्रता स्त्री आहेस. इंद्रिय निग्रह आहे, ईश्वराची भक्ति आहे, सर्व व्रते तू करती आहेस म्हणाले. दान-धर्म तुझ्या हातून झालेला आहे. ईश्वराच्या भजनाकडे अधिक अधिक लक्ष दे म्हणजे झालं. म्हणजे तोच परमात्मा तुला उपदेश करून तुला मुक्त करिल.

देवहूतिने आपल्या पतिची आज्ञा मान्य केली, भगवान श्रीहरींची भक्ति करण्याकडे तिचं जास्तीत जास्त लक्ष लागलेलं आहे. बराच काल गेल्यानंतर तिच्या गर्भामध्ये भगवान श्रीहरी प्राप्त झालेले आहेत. योग्य वेळी कपिल मुनींचा अवतार झालेला आहे. भगवान श्रीहरी त्या देवहूतीपासून प्रकट झाले, अवतीर्ण जाले. अप्सरांचे, गंधर्वांचं नृत्य गायन झालेलं आहे. ब्रह्मदेव हे स्वतः ऋषिमंडळींना बरोबर घेऊन कर्दम ऋषिंच्या आश्रमामध्ये त्यांना भेटण्याकरता आलेले आहेत. भगवंतांनी अवतार घेतलेला आहे, हे त्यांना माहिती आहे, ब्रह्मदेवांनी त्या कर्दमांची स्तुती केलेली आहे.

त्वया मेऽपचितिस्तात कल्पिता निर्व्यलीकतः ।
यन्मे सञ्जगृहे वाक्यं भवान्मानद मानयन् ।। ३.२४.१२ ।। श्री.भा.

कर्दमा, माझी पूजा तू केलीस म्हणाले, पूजा म्हणजे काय, मी सांगितल्याप्रमाणे तू वागलास. माझी आज्ञा मान्य केलीस, संसार केलास तू. हिच माझी पूजा आहे. पित्याला पुत्रांनी पूजा करावी अशी इच्छा नाहीये. आज्ञा पालन करणं हिच पित्याची पूजा आहे. तू माझी आज्ञा पूर्ण पालन केलीस. शास्त्राज्ञेचे पालन केलेस. आता या मुली तुझ्या विवाहाला योग्य झालेल्या आहेत. त्यावेळेला ठरावीक जास्ती वय झाले असावे असा कायदाही नव्हता आणि इच्छाही लोकांची तशी नव्हती. तशा त्या मुली विवाह योग्य झालेल्या आहेत. हे ऋषी माझ्याबरोबर आणलेले आहेत म्हणाले. देवहूतीला काही काळजी करावी लागली नाही. स्वतःच्या लग्नाकरताही काळजी करावी लागली नाही आणि हे पति निघून गेल्यावर या मुलीचे लग्न कोण करील ही पण काळजी करावी लागली नाही. ब्रह्मदेवच सगळी योजना करताहेत. ब्रह्मसूत्र लिहून ठेवतात म्हणे ब्रह्मदेव. ही मुलगी कोणत्या मुलाला द्यायची हे सगळं आधीच ठरवून ठेवलं आहे. जन्माला आल्याबरोबरच लिहून ठेवतात म्हणे. हे ऋषि आलेले आहेत. त्या ऋषिंना या कन्या तू अर्पण कर. देवहूतिला सांगितलं देवहूती, प्रत्यक्ष भगवान श्रीहरी तुझ्या उदरातून अवतार घेऊन आलेले आहेत. तुझा सर्व अविद्यारूपी जो पाश आहे त्या पाशातून तुला मुक्त करणार आहे. हा सर्व सिद्धांचा अधिपती कपिल या नावाने प्रसिद्ध होणार आहे. देवहूतिच्याही मनाचं समाधान केलं ब्रह्मदेवांनी. कर्दम ऋषिंचही समाधान केलेलं आहे. ब्रह्मदेव निघून गेले.

त्यांच्या आज्ञेप्रमाणे आपल्या नऊही कन्या त्या नऊ ऋषींना देऊन टाकल्या.

कला नावाची कन्या मरिचींना दिली. अनसूया अत्री ऋषिंना दिली. अङ्गिरा ऋषींना श्रद्धा, पुलस्त्यांना हर्विभू, पुलहांना गति, क्रतुंना क्रिया, भृगु ऋषींना ख्याती आणि वसिष्ठांना अरूंधती, अथर्वांना शांती नावाची कन्या दिली. सर्व ऋषिमंडळी अनुज्ञा घेऊन आपल्या स्त्रियांना बरोबर घेऊन आपल्या आश्रमामध्ये निघून गेले. एक काम झालं. देवहूतिचे समाधान झालेलं आहे. आपले पतिदेव ज्याप्रमाणे तपस्वी मोठे, योगी आहेत तसे आपल्याला मिळालेले जावईही योगी आहेत. वाटेल तितकी समृद्धी निर्माण करून अनासक्त रहाणारे आहेत. हे मोठं सामर्थ्य आहे. संपत्ती मिळवणारा जावई याला प्राधान्य नाहीये. तेही आहे. संपत्ती, लक्ष्मी राहिली हे सुद्धा उगाच राहत नाही. ते पुण्य आहे, पण त्याच्यापेक्षा हे अधिक पुण्य आहे. कोणाला अपेक्षा असेल तितकी संपत्ती देणारे आपण त्याच्या पासून अलिप्त रहाणारे हे जावई मिळाले म्हणून समाधान झालेलं आहे. तपसामर्थ्य, योगसामर्थ्य आहे.

कपिलमुनींचं लहान वय आहे. कर्दम ऋषिंचं काम संपलेलं आहे. संसाराचं काम झालं. पत्निची इच्छा पूर्ण झाली. आता संन्यास घेऊन बाहेर पडायला हरकत नाही. संन्यास घेतला म्हणजे त्या शास्त्रकारांनी असं सांगितलं आहे.

जर संन्यास घेतला, पत्निने किंवा मातेने त्याला अनुज्ञा दिली संन्यास घ्यायला आणि त्यांनी संन्यास घेतला तर पुढच्या जन्मामध्ये पत्नि आणि मातेला पुरूष जन्म प्राप्त होतो. पुरूष जन्म मिळाला पाहिजे किंवा पुरुषाप्रमाणे सगळी कामं करण्याची जबाबदारी आपल्याला मिळाली पाहिजे अशी इच्छा आहे ना स्त्रियांची पण जन्म पुरुषाचा मिळावा हे मात्र कोणाला करता येणार नाही. हेही शास्त्रीय फल त्यांनी दाखवलेलं आहे.

कर्दम ऋषि आलेले आहेत. कपिल मुनींना, भगवंतांना त्यांनी नमस्कार केला. प्रार्थना करताहेत महाराज. अनेक जन्म, मनोनिग्रह करून आपले चिंतन करणारे महात्मे त्यांना कितीतरी जन्मानंतर आपलं दर्शन होतं. सानिध्य लाभतं म्हणाले. ते आपण आमच्या अपराधाकडे लक्ष न देता, आम्ही अज्ञानी आहोत, अपराध अनेक आहेत. ‘अपराध सहस्त्राणी’ एक अपराध काय अनेक अपराध आमच्या हातून घडतात. असे आम्ही संसारी जीव आमच्या अपराधाकडे लक्ष न देता आपण आमच्या गृहामध्ये येऊन राहिलेले आहात, प्रकट झालेला आहात. तुम्हीच वचन दिलेलं होतं, ते स्वत:चं वचन सत्य करण्याकरता आपण आलेले आहात. आमची पुण्याई नाहीये. आपल्या लोकांना, भक्तांना जे जे रूप आवडतं त्याप्रमाणे रूप घेऊन आपण भक्तांना दर्शन देता. आपली सेवा करणारे अनेक मोठे मोठे भक्त आहेत. त्यांच्या कामना आपल्या कृपेने पूर्ण होतात. मलाही आपली अनुज्ञा, अनुमती घेऊन संन्यास दीक्षा धारण करून जायचं आहे. वनामध्ये जाऊन आपली सेवा करायची आहे. संपवायचंय सगळं. आधीपासून संसाराची आसक्ती जर असती तर संन्यास घेऊन वनामध्ये गेल्यानंतर संसार सुटलाय का राहिलाय याचा विचार करावा लागतो. इथे ते काहीच नाही. अगोदरपासूनच तो सुटला आहे. केव्हा बाहेर पडायचंय. कपिल मुनींना सांगताहेत कर्दम ऋषि. आपली आज्ञा मागण्याकरता आलेलो आहे मी. अखंड आपलं चिंतन करण्याकरता मी बाहेर पडतो आहे. भगवान म्हणाले कर्दमा, तुम्हाला मी बोललो होतो, त्याप्रमाणे तुमच्या घरामध्ये मी आलेलो आहे. तत्व किती आहेत हे सगळ्या लोकांना समजावून सांगायचं आहे.

प्रसंख्यानाय तत्त्वानां सम्मताय आत्मदर्शने ।।३.२४.३६ ।। श्री.भा.

तत्वज्ञान झाल्याशिवाय आत्मदर्शन होणार नाही. व्यावहारीक तत्व का असेना ती समजली पाहिजेत, मग पारमार्थिक तत्वाचं ज्ञान, स्वरूपाचं ज्ञान नंतर होईल. ही जी व्यावहारिक तत्वं म्हणा. मूल आणि सृष्टीला कारण असणारी सगळी, तीच समजली नाहीत. दुसरचं काहीतरी मनामध्ये येतं. हा आत्मवाद, पुष्कळ काल गेला असल्यामुळे नष्ट झालेला आहे. तो मला प्रवृत्त करायचा आहे. म्हणून मी देह धारण करून आलेलो आहे. आपली इच्छा असेल तर जा आपण वनामध्ये जायला हरकत नाही. मृत्यूला जिंका आणि ''अमृतत्त्वाय माम् भज'' हेच पुन्हा सांगून ठेवलं. आता तुम्हाला जी तपश्चर्या करायची ती मोक्षाकरता करा. पूर्वी केलेली तपश्चर्या ही पित्याची आज्ञा होती म्हणून केली. ते काही हा दोष म्हणत नाहीयेत. स्त्री प्राप्त व्हावी, संसार चांगला व्हावा म्हणून तपश्चर्या तुम्ही केलीत तसं आता फक्त मोक्षाकरता तपश्चर्या करा. बाकी काही मनामध्ये ठेवू नका. निर्वासन अंत:करणाने भजनामध्ये निमग्न रहा. सर्वव्यापी माझं स्वरूप कसं आहे. स्वयंप्रकाश, सर्वांच्या अंतर्यामी मी कसा आहे हे सगळं पहा म्हणजे तुमचा शोक, मोह, सगळा दूर होईल आणि निर्भय जे आत्मस्वरूप त्याची प्राप्ती होईल.

मात्रे आध्यात्मिकीं विद्यां शमनीं सर्वकर्मणाम् ।
वितरिष्ये यया चासौ भयं चातितरिष्यति ।।३.२४.४०।। श्री.भा.

देवहूतीचीही काळजी करण्याचं तुम्हाला कारण नाही, यतिमहाराज मी त्याकरता आलेलो आहे. सर्व लोकांना तत्वदर्शन करून दायचं आहे, आत्मदर्शनाचा उपाय म्हणून, पण पहिलं काम माझं हे आहे. माझ्या मातेला ही अध्यात्मविद्या मी सांगणार आहे. म्हणजे सर्वही कर्मांचा क्षय होऊन जाईल.''

ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ।।४.३७।। श्री.भा.

कर्म संपल्यानंतर जन्म संपलेला आहे. सर्व दु:खं संपलेली आहेत. निर्भय होऊन पुर्नजन्म नाही, पुन्हा दु:ख नाही. स्वत: देवांनीच त्या आपल्या मातेची जबाबदारी पत्करली. पती गेल्यानंतर मला कोण आहे, त्या देवहूतीला काळजी करण्याचं कारण नाहीये आणि यांचही मन गुंतून रहायला नको. गुंतलेलं नव्हतंच पूर्वीही. पण तेही भगवंतांनी सांगून टाकलं. तुम्ही मनामध्ये कोणतीही इच्छा ठेवू नका. निर्वासन व्हा आणखी भजन करा म्हणाले. कर्दम ऋषींनी भगवान कपिलांना प्रदक्षिणा केली, नमस्कार केला आणखी अरण्यामध्ये गेले. काही व्यवस्था नाही. केवढी संपत्ती आहे, विमानामध्ये, इंद्रादिक देवांनासुद्धा हे विमान आपल्याला मिळावं अशी इच्छा

आहे. काय वाटेल तितकी संपत्ती आहे. पण तिकडे बिलकुल लक्ष नाहीये. ही व्यवस्था लावायची याचाही विचार नाही. व्यवस्था कशाला. काही दिवस राहिल अथवा जाईल. असलं काय आणि गेलं काय. तेव्हा पहिल्या प्रथम स्त्रीचा त्याग केलेला आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीहरी आलेले आहेत. त्यांच्याजवळ राहून त्यांना काय भक्ति करता आली नसती पण नाही वनामध्ये जाण्याचं कारण काय ? नाही, पुन्हा मोह उत्पन्न होण्याचा संभव आहे. पुन्हा आपला मुलगा आहे असं वाटलं तर ईश्वर भाव गेला. संसार संबंधी काहीही मनामध्ये राहीला नको. पुत्र नको, स्त्री नको, मुलीची व्यवस्था झालेली आहे. ही संपत्ती आहे. कोणाला न्यायची असेल ते घेऊन जातील आपल्याला काय करायचंयं. याप्रमाणे अंत:करणपूर्वक सर्व त्याग केलेला आहे. मग बाहेर पडले. संन्यास याशिवाय होऊ शकत नाही. संसाराबद्दल थोडी जरी इच्छा, लोभ मनामध्ये आसक्ति असली तर संन्यास घेता येणार नाही. अध:पात होईल.

प्रत्यःप्रशान्तधीर्धीरः प्रशान्तोर्मिरिवोदधिः ।।३.२४.४४।। श्री.भा.

समुद्र जसा लाटा शांत झालेल्या आहेत. तसा समुद्र शांत आहे. किती गंभीर आहे, ओळखता येणार नाही. त्याप्रमाणे सर्व वासनांचा क्षय झालेला आहे, पूर्ण वैराग्य भगवत् कृपेने उत्पन्न झालेलं आहे. पित्याची, ब्रह्मदेवांची कृपा आहे. भगवान वासुदेव सर्वव्यापक आहे.

वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।७.१९।। श्री.भा.

हे ज्ञान अनेक जन्मांनी मिळतं. भगवान सांगताहेत, ते त्यांना मिळालेलं आहे. पराभक्ती ज्यांना प्राप्त झाली, आत्मरूप, सर्व ठिकाणी आणखी भगवान भरून राहिलेले आहेत. अंतर्यामीही तोच आहे, बाहेरही तोच आहे.

सकलमिदं अहं च वासुदेवः ।।

हे ज्ञान पूर्ण झालेलं आहे. कोणतीही इच्छा राहिलेली नाहीये. शत्रू नाही, मित्र नाही सर्वव्यापी परमेश्वराच्या कडे लक्ष लागलेलं आहे, चिंतन चाललेलं आहे.

प्राप्ता भागवती गतिः ।।३.२४.४७।। श्री.भा.

जन्म संपलेला आहे कर्दम ऋषिंचा. पुढं कपिल मुनींनी उपदेश काय केला म्हणून विचारताहेत शौनक ऋषि. मैत्रेय म्हणतात विदूरजी,

पितरि प्रस्थितेऽरण्यं मातुः प्रियचिकीर्षया ।
तस्मिन् बिन्दुसरेऽवात्सीद्भगवान् कपिलः किल ॥३.२५.५॥ श्री.भा.

पिताजी निघून गेले अरण्यात. मातेची इच्छा पूर्ण करायची, आईचा उद्धार करायचाय. भगवान कपिल हे राहिले तिथे मुद्दाम. काही कर्म नाही काही नाही. कोणतंही कर्मानुष्ठान नाही, काही नाही. अखंड आत्मचिंतन आहे. सांख्यशास्त्रकारांनीही आत्मचिंतनाला प्राधान्य दिलेलं आहे. आत्मस्वरूपामध्ये जीव ईश्वर असा भेदही त्यांनी सांगितला नाही. केवळ आत्मस्वरूपाचा विचार केलेला आहे. बाकीची तत्वं त्याला अनुसरून सांगितली आहेत. कपिल मुनी, कर्म काही नाही, स्नान-संध्या काही नाही, स्वस्थ बसून अखंड चिंतन चाललेलं आहे. बरं उपदेश करायचा म्हणजे देवहूतीने विचारल्याशिवाय, तिची इच्छा खरी आहे की नाही पाहिल्याशिवाय कसा उपदेश करायचा. उपदेश करण्याकरता तर ते राहिले आहेत. पण एके दिवशी त्या देवहूतीला वाटलं ब्रह्मदेवांनी सांगितलेलं आहे, हा तुझा मुलगा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आहे, याची आठवण झाली तिला. हात जोडून ती म्हणती आहे.

निर्विण्णा नितरां भूमन् असदिन्द्रियतर्षणात् ।
येन सम्भाव्यमानेन प्रपन्नान्धं तमः प्रभो ॥ ३.२५.७॥ श्री.भा.

हे प्रभू ही जी इंद्रियं आहेत, या इंद्रियांचा अभिलाष, इच्छा विषयाची ही संपत नाही. त्यामुळे मी अगदी खिन्न झालेली आहे. अंधःकारामध्ये मी पडलेली आहे. या अंधःकारातून तुम्ही मला बाहेर काढा. सर्व लोकांचा उद्धार करण्याची शक्ति फक्त आपली आहे महाराज. माझा हा मोह दूर करा. हे विषय चांगले आहेत असं मला का वाटतं, समजत नाही. त्यातून माझं मन बाजूला करा.

जिज्ञासयाहं प्रकृतेः पूरुषस्य ।
नमामि सद्धर्मविदां वरिष्ठम् ॥३.२५.११॥ श्री.भा.

तीही ऋषिपत्नी होती. तिलाही पुष्कळ ऐकायला मिळालं असेल. राजकन्या आहे. त्यावेळेलासुद्धा पुष्कळ ऐकलं असेल. आत्मानात्म विचार तिला माहिती नाही, असं नाही, म्हणून प्रकृती म्हणजे काय आहे आणि पुरुष म्हणजे काय आहे हे मला कळावे अशी माझी इच्छा आहे. मोठे आपण धर्मज्ञ आहात, श्रेष्ठ आहात. आपण मला हे समजावून सांगा. शिष्यांनी इच्छा व्यक्त केल्याशिवाय गुरू काही सांगत नाही. माता आता खऱ्या तळमळीने विचारते आहे. सांगायला आता हरकत नाही. भगवान सांगताहेत,

योग आध्यात्मिकः पुंसां मतो निःश्रेयसाय मे ।। ३.२५.१३ ।। श्री.भा. ।

आत्मस्वरूपाच्या ठिकाणी मनाचा योग झाला पाहिजे, संबंध झाला पाहिजे. अनात्म पदार्थापासून मन बाजूला झालं पाहिजे. तर सर्व दुःखाची निवृत्ती आहे. पूर्ण सुखाची प्राप्ती आहे, तो योग कसा असावा, कसा करावा, हे तुला सांगतो म्हणाले. मनाची एकंदर शक्ति कशी आहे, हे सांगताहेत. दोन्ही प्रकारच्या शक्ती मनामध्ये आहेत. विषयाच्या ठिकाणी मन आसक्त होऊन राहिलं म्हणजे, दुःख आहे बंध आहे. आणि परमेश्वराच्या ठिकाणी ते मन स्थिर झालं तर मुक्ति आहे. मनानीच मुक्ति मिळते, मनानीच बंध मिळतो. बंधनामधे पडणारं मन, जीवाला त्या बंधामध्ये घेऊन पडणारं जे मन आहे, काम क्रोधादिक अनेक विकार त्याच्यामध्ये आहेत. दोष आहेत. हे सगळे दोष त्या मनातून निघून गेले पाहिजे. त्यावेळेला ते मन शुद्ध झालं असं समजता येईल. दुःखाकडे लक्ष नाही, सुखाकडेही लक्ष नाही, फलाकडेच जिचं लक्ष नाहीतर त्याच्या साधनाकडे तिचं कशाला लक्ष जाईल. ती वासना कशाला उत्पन्न होईल. अशी ज्यावेळेला मनाची शुद्ध अवस्था प्राप्त होईल. त्यावेळेला आपण कोण आहोत हे जिवात्म्याला समजून येते.

प्रकृतेः परम् ।।३.२५.१७ ।। श्री.भा. ।

प्रकृतीचा संबंध आपल्याला नाहीये. स्वयंप्रकाश आपण आहात. अत्यंत सूक्ष्म आपलं रूप आहे. त्याकरता ज्ञान वैराग्य, भक्ति, भगवत् भक्ति ही अंतःकरणामध्ये असली पाहिजे. म्हणजे आपण उदासीन आहोत. साक्षी आहोत आपण. हे ज्ञान होतं. मी कर्ता आहे, मी भोक्ता आहे. मी अमुक सत्ताधीश आहे. श्रीमंत आहे, मी अमुक घरांचा मालक आहे, हे सगळे मी पणाचे दोष निघून जातात. प्रकृतीचं सामर्थ्य संपलेलं आहे. प्रकृती त्याला काही करू शकत नाही. ईश्वराच्या ठिकाणी चित्त स्थिर करणं, त्याचं चिंतन करणं याच्याशिवाय दुसरा श्रेष्ठ मार्ग नाही, दुःख मुक्तीसाठी. या विषयसंगामध्ये सापडणं म्हणजे कधीही न निघणारा बंध आहे हा. कधीही न सुटणारा आहे. पण साधूंचा संग जर झाला, भगवत् भक्तांचा तर मोक्षाचा दरवाजा उघडला जातो म्हणतात. ते घेऊन जातात, त्या दरवाजातून. असे साधू अनन्य भावाने भगवंतांचं चिंतन निरंतन करीत असतात. कर्माकडे लक्ष नाही, आप्तइष्टांकडे लक्ष नाही, घरादाराकडे लक्ष नाही, माझ्या कथा ऐकताहेत, सांगताहेत. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे ताप होत नाहीत. त्यांची संगती मिळावी, हे देवाजवळ मागितले पाहिजे. विषयसंगामुळे उत्पन्न होणारे जे दोष आहेत ते सर्व दोष दूर करण्याचं सामर्थ्य त्या संतांच्या जवळ आहे. मनामध्ये कोणते–कोणते दोष अधिक प्रधान प्रभावामध्ये आहेत, कमी किती झालेले आहेत, सगळं त्यांचं निरीक्षण करतात आणि ते काढून

टाकतात. हे सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. देवहूतिने नंतर विचारले महाराज आपली भक्ति म्हणजे काय हे मला समजावून सांगा. भक्त आपले कसे असतात तेही सांगा. मी म्हणाली स्त्री आहे, अज्ञानी आहे, सुखाने बोध होईल असा आपण उपदेश करा. भक्तिचं स्वरूप सांगताहेत, भगवान कपिल.

देवानां गुणलिङ्गानां आनुश्रविककर्मणाम्।
सत्त्व एव एकमनसो वृत्तिः स्वाभाविकी तु या ।।३.२५.३२ ।। श्री. भा.
अनिमित्ता भागवती भक्तिः सिद्धेर्गरीयसी ।।
जरयत्याशु या कोशं निगीर्णं अनलो यथा ।।३.२५.३३ ।। श्री. भा.

शुद्ध भक्तिचं लक्षण सांगताहेत. ज्याचं चित्त केवल भगवंताकडे लागलेलं आहे अशा मनुष्याची वेदविहित कर्मामधे निमग्न असणारी आणि विषयांचं ज्ञान करून देणारी इंद्रियांची आणि मनाची वृत्ती सत्वमूर्ती श्रीहरीच्या ठिकाणी स्वाभाविकरित्या स्थिर होणं, यालाच भगवत्भक्ति म्हणतात. विषयापासून मन सुटल्याशिवाय ईश्वरस्वरूपाशी स्थिर होणार नाही. हाच योग आहे. मनाचा संबंध परमेश्वर स्वरूपाच्या ठिकाणी असतो. ही भक्ती मुक्तीपेक्षासुद्धा श्रेष्ठ आहे असं म्हणतात. कारण लिंग शरीराचा नाश या योगाने होतो असेही सांगताहेत कपिलमुनी. कारण त्या भक्तीचंच पर्यवसान आत्मज्ञानामधे होतं शेवटी. भक्तीने मोक्ष मिळाला हा सिद्धान्त नाही हा आक्षेप घेण्याचं कारण काय? अंतःकरण हे सर्व इंद्रियांसहीत परमेश्वराच्या चिंतनामधे निमग्न झाल्यानंतर त्या मनाचे परिवर्तन आत्मज्ञानामधे का नाही होणार? तीच भक्ती ज्ञानरूपात पर्यवसित होते आणि सर्व कोषत्याग, कोषनाश लिंगशरीर नाश होतो. अशी भक्ती ज्यांना मिळालेली आहे त्यांना कशाचीही इच्छा रहात नाही म्हणाले. माझं सायुज्य त्यांना नको आहे. सारूप्य नको आहे. सरूपता, समीपता, सलोकता कोणत्याही मुक्तीची त्यांना इच्छा रहात नाहीये. माझ्या अनंत स्वरुपाचं चिंतन करतात, गुणांचं चिंतन करतात. त्याच्यामधेच त्यांचा काल जातो आहे. माझ्या अनेक विभूती आहेत. त्या सर्व विभूतींचं स्मरण करत आहेत. इतर कशाकडेही त्यांचं लक्ष जात नाहीये. त्यामुळे सर्वांना नियामक असणारा कालसुद्धा काही करू शकत नाही. कालातीत ते होतात. गुणातीत ते होताहेत. त्याकरता असे जे भगवत्भक्त आहेत त्यांची संगती जर घडली तर संसारातून मन बाजूला होणं शक्य आहे म्हणाले. भगवंताच्या ठिकाणी मनाचा योग झाला पाहिजे, स्थिर झालं पाहिजे, लय झाला पाहिजे. त्याकरता सज्जनांच्या संगतीने ज्ञान वैराग्य, भक्ती यांची प्राप्ती झाली म्हणजे पुनरावृत्ती नाही, जन्ममरण नाही. दुःखं कायमची संपलेली आहेत. हा

योग सांगितला भगवंतांनी. परमेश्वरस्वरूपाच्या ठिकाणी चित्ताचा लय होणं, स्थिर होणं, अनात्मपदार्थाचा योग सुटून आत्मयोग झाला पाहिजे. त्याकरता सत्संगती घडली पाहिजे. आत्म्याच्या ठिकाणी चित्त स्थिर होणं, साक्षात्कार होणं त्याला संतांची संगती पाहिजे. भगवत्गुण ऐकायला मिळताहेत त्यांच्या मुखातून. त्यामुळे अंतःकरणामधे प्रेमाचा आविर्भाव होतोय. ती भक्ती पराभक्तीस्वरूप होऊन जाते. आत्मज्ञानामधे पर्यवसित होते.

त्यानंतर सांख्यमार्ग म्हणजे काय, हे सांगताहेत. एकच आहे. सांख्यमार्ग काय योगमार्ग काय, फलदृष्ट्या एक आहे म्हणतात. तत्वं किती आहेत, ही सगळी सांगायला त्यांनी सुरूवात केली. पुष्कळ मोठा विषय आहे. एकंदर आत्मस्वरूपासह पंचवीस तत्वं सांख्यशास्त्रकार सांगतात. ती सगळी तत्व सांगितली, कशी कशी उत्पन्न झाली. सृष्टीची उत्पत्ती कशी झाली. महत्तत्व आहे, अहंकारतत्व आहे. अहंकारतत्वापासून पंचभूतं आहेत. ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय त्यांच्या देवता हे सगळं वर्णन केलं. पंचभूतांपासून सगळी भौतिक सृष्टी झालेली आहे. हे सर्वही पुढं तत्वविचार मांडलेला आहे. द्वैत ऐकून घ्यायचं, समजून घ्यायचं आणि पुसून टाकायचं. अध्यारोप आणि अपवाद आहे. कपिलांनी सांगितलेलं जे सांख्य आहे, त्यात तत्वज्ञान आहे आत्मस्वरूपाचाही विचार आहे. आत्मा उदासीन आहे. ज्ञानस्वरूप आहे हे त्यांनी मांडलेले आहे.

कपिल सांगताहेत, माते, हा जो जीवात्मा आहे तो या शरीरामधे सापडलेला आहे. तादात्म्य सर्वत्र झालेले आहे. बुद्धी तादात्म्य आहे, शरीर तादात्म्य आहे. सगळीकडे आहे. वस्तुतः त्या प्रकृतीमधे असूनसुद्धा त्याला कोणताही विकार नाही. संग नाहीये, सर्वत्र असून असंग आहे. आकाश सर्व ठिकाणी आहे. पण असंग आहे. पावसाचा संबंध नाही, उन्हाचा संबंध नाही, वाऱ्याचा संबंध नाही. आहे मात्र सगळीकडे. तसा हा जीवात्मा आहे. 'जलार्कवत्' पाण्यामधे सूर्याचं प्रतिबिंब पडलेलं आहे. पाणी हालायला लागलं की ते प्रतिबिंब हालतं. पाणी जास्त वाढलं की तेही वर येतं. मूळ बिंबाला त्याचा काही संबंध नाही. पण ज्यावेळेला हा प्रकृतीच्या गुणांमधे आसक्त होऊन जातो, तन्मय होतो आहे. अध्यास त्याला मिळतो आहे, मीच कर्ता आहे अशा प्रकारची समजूत करून घेऊन संसारात तो पडतो म्हणाले. कर्मदोष अनेक प्रकारचे होत आहेत. संगतीमुळे बऱ्यावाईट जन्मामधे, योनीमधे त्याला जावं लागत आहे आणि संसार काही त्याच्या पाठीमागचा सुटत नाही.

स्वप्ने अनर्थागमो यथा ।। ३.२७.४ ।। श्री. भा.

स्वप्नामधे कितीतरी संकटाचे प्रसंग आपण पाहतो म्हणाले. काहीही खरं नाही पण दिसतंय मात्र खरं आणि त्यामुळे सुखदुःखाचा अनुभव त्यावेळेला येतो. तसा विषयाचा अखंड ध्यास मनामधे असल्यामुळे त्या विषयाच्या संबंधांमुळे निर्माण होणारी सुखदुःखं, जन्ममृत्यु हे सर्व मला आहेत असं तो समजतो. म्हणून हे जे विषयाकडे जाणारं जे चित्त आहे त्याला हळूहळू ताब्यामधे आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुष्कळ काल लागला तरी प्रयत्न सोडून उपयोग नाही, सांगताहेत कपिलमुनी,

भक्तियोगेन तीव्रेण विरक्त्या च नयेद्वशम् ।। ३.२७.५ ।। श्री. भा.

मनाला ताब्यामधे आणण्याकरता तीव्र भक्तियोग निर्माण झाला पाहिजे. तेवढ्यापुरता नाही. भूक लागल्याबरोबर पदार्थाची, खाण्याची आठवण होते. भूक लागल्यावर आहे. नेहमी काही भूक नाहीये. ही भगवंतांची नेहमी आठवण पाहिजे. नेहमी तळमळ पाहिजे. तीव्र भक्ती उत्पन्न झाली पाहिजे. तरच ती विरक्तीही तीव्र होईल. परमात्म स्वरूपाचं चिंतन अखंड घडावं अशी जर तळमळ उत्पन्न झाली तर विषयाचं चिंतन आपोआप कमी होतं. त्याकरता यमनियमादिक मार्ग आहेत. त्याचाही अभ्यास केला पाहिजे. सर्वभूतांच्या ठिकाणी समदृष्टी निर्माण झाली पाहिजे.

सर्वभूतसमत्वेन निर्वैरेण अप्रसङ्गतः ।।३.२७.७ ।। श्री. भा.

माझ्या कथा निरंतर श्रवण करणं, चिंतन करणं, सर्वही प्राणीमात्रांच्या ठिकाणी समबुद्धी ठेवणं, हा श्रेष्ठ, हा कनिष्ठ, हा शत्रु, हा मित्र ही बुद्धी नाही. एक ईश्वरभाव आहे. कोणाशीही वैर नाही. ब्रह्मचर्य पालन करणं, वाणीचा निग्रह करणं, याचना न करता जे मिळेल त्यात संतोषाने रहाणे, मित आहार करून रहाणं, एकांतामधे राहून भगवंताचं नामस्मरण, गुणस्मरण करणं, हा जो देह आहे, परिवार वगैरे सर्वत्र त्याठिकाणी खरा आहे असं कधीही न समजणं. आणखी प्रकृतीपुरूष जे आहेत त्यांचा विचार करून तेही समजून घेणं. अशा प्रकारचा हा जो अभ्यास आहे त्याच्यामुळे मन हे स्थिर होऊ लागतं आहे. भगवत्प्रेम संपन्न होतं आहे. अहंकारादिक विकार हळूहळू दूर होतात. आणखी पूर्ण शांती त्याला प्राप्त होते. प्रकृती पुरूषाचा विवेक देवहूतीच्या इच्छेप्रमाणे पुन्हा करून दाखविलेला आहे. पुन्हा भगवान सांगताहेत, निर्गुण ब्रह्माचं ध्यान करणं हाच एक निर्बिज योग आहे. आणि सबीज म्हणजे सगुण साकार परमात्म्याचं ध्यान करणं. तो सुलभ आहे. निर्गुण ब्रह्माचं ध्यान करणं कठीण आहे. त्याकरता सर्वही साधन सांगताहेत. कोणती कोणती साधनं केली म्हणजे सगुण परमात्म्याचं ध्यान करता येईल.

स्वधर्माचरणं शक्त्या विधर्माच्च निवर्तनम् ।

दैवाल्लब्धेन सन्तोष आत्मविच्चरणार्चनम् ।।३.२८.२।। श्री. भा.

यथाशक्ती स्वधर्माचरण झालं पाहिजे.परधर्मापासून दूर झालं पाहिजे. दैवाने जे मिळेल त्यामध्ये संतोष मानता आला पाहिजे. श्रेष्ठ पुरूषांची सेवा घडली पाहिजे. पवित्र आहार घेतला पाहिजे. अहिंसा, सत्य, अस्तेय हे जे यमनियम आहेत, यांचं पालन झालं पाहिजे. आणि असे सर्व नियम झाल्यानंतर त्यांनी प्राणायामाचाही अभ्यास सांगितला आहे. योग्य मार्गदर्शकांच्या सान्निध्यामधे त्याचाही अभ्यास करून मनाचे सगळे दोष दूर करायचे आहेत. त्याकरता प्राणायाम आणखी धारणा हे मुद्दाम सांगितले आहेत. सगळे चित्तदोष दूर झाल्यानंतर स्थिर झालेलं जे अंतःकरण आहे, त्याने भगवंताच्या स्वरूपाचं ध्यान करावं असं कपिलमुनी सांगताहेत. ध्यानयोगाचा पुरस्कार त्यांनी केलेला आहे. भगवंताचं साकार मूर्तीचं ध्यान आहे.

प्रसन्न मुख आहे. त्याचप्रमाणे शामवर्ण आहे. शंख,चक्र, गदा, पद्म धारण केलेले आहेत. अलंकार धारण केलेले आहेत, तरूण वय आहे. अशा स्वरूपाचं पायापासून मुखापर्यंत अखंड चिंतन करायला सांगितलेलं आहे. ते सगळं वर्णन केलेलं आहे. चरण कसे आहेत, बाहु कसे आहेत, हस्तातील आयुधं कशी आहेत. त्या सर्वांचं चिंतन करायचं आहे. या सगळ्यासाठी ठराविक काल असा नाही. इतका वेळ भजन करायचं, इतका वेळ चिंतन करायचं असं ठरवून चिंतनाला सुरूवात केली म्हणजे, त्यात त्यापेक्षा कमीच होतं. तेवढा वेळही ते होत नाही. कालाचं भान आधी नाहीसं झालं पाहिजे. पुढे नाहीसं होणारच आहे. पण अगोदरसुद्धा कालाचं भान न ठेवता अखंड ध्यान करायला सांगितलं आहे. या ध्यानाच्या प्रभावाने हृदयग्रंथीचा भेद होतो आहे.

भिद्यते हृदयग्रन्थिः ।।

पहिली गाठ आहे ही. आत्मा आणि अंतःकरण जे आहे याचा अध्यास इतका पक्का आहे. पक्की गाठ मारलेली आहे की तीच बाजूला होत नाही. ज्ञान झालं तरीसुद्धा ते दृढ होईपर्यंत हा ग्रंथीभेद होत नाही. ती ध्यानाची अवस्था जर सिद्ध झाली, सगुणातून निर्गुणामधे अंतःकरण गेलेलं आहे आणि याप्रमाणे अंतःकरणाने आत्मध्यान सारखं चालू असताना प्रकृतीपुरूषाचा विवेक झालेला आहे. म्हणजे बुद्धीचा अंतःकरणाचा, आत्म्याचाही विवेक झाला. गाठ सुटली याचा अर्थ विवेक होणं. मी वेगळा आहे, उदासीन आहे मी. कर्ता भोक्ता नाहीये मी. अंतःकरणाचे धर्मच मी समजून घेतलेले होते. आता त्याचा माझा संबंध नाही. हे मोठं फळ आहे. आत्मसाक्षात्कार झालेला आहे परंतु साक्षीभूत होऊन राहिलेला आहे. अद्यापि साक्ष आहे. ध्यानाच्याही पुढे समाधी

अवस्था आहे. नंतर साक्षात्कार अवस्था आहे. त्यात सर्वच द्वैताचा उपसंहार होऊन जातो. हेही ध्यानयोगाचं फल कपिलमहामुनींनी देवहूतीला समजावून सांगितलेलं आहे. पुष्कळ सांगितले. प्रत्यक्ष भगवानच गुरू मिळालेले आहेत. काय संशय रहाणार त्या देवहूतीला. मनाची सुधारणा करून उपदेश करताहेत. नुसता उपदेश आपण पुष्कळ ऐकतो, बोलतो पुष्कळ, वाचतो. पण दोषयुक्त मन राहिलेलं असताना त्या उपदेशाचा उपयोग काय म्हणाले. घागर पालथी ठेवली आहे आणि वर नळ सोडलेला आहे. काय उपयोग ? पाणी काय त्यात एक थेंबभर तरी जाईल काय ? पण इथे जे हे भाग्य आहे देवहूतीचं पतीदेवही मोठे मिळाले. साक्षात भगवान पुत्ररूप झाले, ज्ञानी गुरू म्हणून मिळालेले आहेत. ते मनाची शुद्धी करून त्यामधे गुण संक्रमण करताहेत. ध्यानाचा अभ्यास करावा म्हणून नुसतं सांगत नाहीयेत. देवहूतीला सर्व उपदेश करून झाल्यानंतर सांगितलं त्याप्रमाणे तू सर्व कर म्हणाले, साधनाभ्यास आणि तू मुक्त होशील.

कपिलमुनी दुसरीकडे निघून गेले. देवहूती लगेच ध्यानाभ्यासामधे निमग्न झाली. किंचित थोडावेळ वाईट वाटले. उद्धवजींनाही वाईट वाटलं, भगवंताचा वियोग झाल्यावर. 'पुत्रविश्लेषणातः' परंतु त्यांनी सांगितल्याप्रमाणे हे भगवत्स्वरूपाच्या ठिकाणी अगोदर पुत्राचंच ध्यान केलं. भगवानच आहेत ते, मग आत्मस्वरूपाचं ध्यान केलं. तत्वज्ञान झालेलं आहे. त्या तत्वापासून आत्मस्वरूप कसं वेगळं आहे हे ही समजून आलेलं आहे. सगुण साकार भगवत्स्वरूपाचं ध्यानही अखंड चाललेलं आहे. त्यामुळे समाधी अवस्था प्राप्त झाली. देहभान नाहीसं झालेलं आहे. शरीरावर वस्त्र आहे किंवा नाही. केस मोकळे आहेत का बांधलेले आहेत कुठेही लक्ष नाही. अखंडध्यान आहे, नुसतं आसनावर बसून तेवढंच ध्यान नाहीये. ही अप्रतिहत भक्ति आहे, पराभक्ति. थांबायचं नाही कधी. तिच्या दासी होत्या त्यांनी सुटलेले केस बांधावे, वस्त्र अंगावरचं बाजूला झालेलं पुन्हा घालावं, असं त्या शरीराचं संरक्षण करताहेत. याप्रमाणे कपिलमुनींची पूर्ण कृपा झाली. देवहूतीच्या मनाचं पूर्ण समाधान झालेलं आहे. संसारही झाला परमार्थ शेवटी पूर्ण झालेला आहे. तिच्या शरीरापासून एक दिव्य नदी निघाली म्हणतात.

याप्रमाणे कपिलमुनीसुद्धा आपल्या मातेची आज्ञा घेऊन उत्तरदिशेला गेले. समुद्राने त्यांना रहाण्याला जागा दिली. तिथं रहात आहेत. गंगासागर संगमावर त्यांचा आश्रम आहे असे सांगतात. मकरसंक्रातिला तेथे पाणी बाजूला होते आणि आजही लोक दर्शनाला जातात

अशा प्रकारचं कर्दमऋषिंचं, देवहूतीचं चरित्र आहे. ते स्थान आज भारतामधे आहे. स्थानाबद्दल

अंतःकरणामधे अत्यंत आदरबुद्धी असणं, प्रेम असणं, हे त्या स्थान महात्म्याच्या ज्ञानाचं महत्त्व आहे. ज्या स्थानामधे कर्दमांनी तपश्चर्या केली, देवहूती सारखी पतिव्रता स्त्री ज्या स्थानामधे राहिलेली आहे. तिनेही तपश्चर्या केली. भगवान श्रीहरींना त्यांच्याजवळ येऊन जन्म घ्यावा लागला. ते राहिले त्या ठिकाणी उपदेश केला असं अत्यंत पवित्र श्रेष्ठ स्थान ज्याठिकाणी आहे, त्या श्रेष्ठ स्थानासंबंधी पुष्कळ ज्ञान असल्यामुळे आदरबुद्धी आहे. हे स्थान आज भारतामधे आहे. भारताचं केवढं भाग्य आहे. मातृगया, मातेकरता म्हणून त्याठिकाणी श्राद्ध करायचंय, पंधरा-सोळा पिंड द्यावे लागतात तिथे असं सांगतात. मातेचे उपकार किती किती आहेत त्या एक एक उपकाराचा उपचार करून एक एक पिंड द्यावा लागतो. गर्भात धारण केल्यापासून शेवटपर्यंत लक्ष आहे मुलाकडे. इतरत्र कोठेही लक्ष नाही. म्हणून पित्यापेक्षा माता श्रेष्ठ आहे असं सांगताहेत शास्त्रकारसुद्धा. संन्यास घेतलेल्या पुत्राला पित्याने नमस्कार केला पाहिजे. पण आपली माता समोर आल्याबरोबर त्या संन्याशी मुलाने तिच्या चरणावर मस्तक ठेवलं पाहिजे. अशी ही मातृगया स्वतंत्र आहे. पितृगया निराळी असली तरी मातेकरीता स्वतंत्र एक शास्त्रकारांनी स्थान करून ठेवलेलं आहे. आणि ते आज भारतात आहे. अशा आपल्या स्थानांचं महत्त्व कायम रहावं अशी इच्छा मनामध्ये येणं आणि त्याकरता प्रयत्न करणं हा काही राष्ट्रद्रोह होऊ शकत नाही. मनाची शुद्धी झाली पाहिजे. त्याशिवाय राष्ट्राचं कल्याण होऊ शकणार नाहीये. कितीही राजशासन मोठं ठरलं तरीसुद्धा. त्याकरता हा महात्म्यांनी उपदेश केला. हे देवहूतीचं आणि कपिलमुनींचं चरित्र इथे समाप्त होतं आहे.

विदुर उवाच
भवे शीलवतां श्रेष्ठे दक्षो दुहितृवत्सलः ।
विद्वेषमकरोत्कस्मादनादृत्यात्मजां सतीम् ।।४.२.१।। श्री. भा.

मैत्रेय आणि विदुरजी यांचा संवाद चालू आहे. शुकाचार्य महाराज सांगतात, परीक्षित राजाला. भागवतच सांगताहेत मैत्रेय महर्षी. कर्दमऋषिंच्या कन्या ब्रह्मदेवांच्या आज्ञेप्रमाणे सर्व ऋषींना दिलेल्या आहेत. त्यांच्यापासून संतती कायकाय झाली हे सर्व मैत्रेयांनी निवेदन केलं. त्यामधे दक्ष प्रजापतीने आपली कन्या ही भगवान शंकरांना दिली होती, ब्रह्मदेवांच्या सांगण्याप्रमाणे. दक्षप्रजापती आणि शंकर यांचा बराच मतभेद झालेला आहे. परस्परांचा द्वेष भाव वाढलेला आहे. त्या द्वेषामुळे शंकरांची पत्नी सती हिला देहत्याग करावा लागला. विदुरजी म्हणाले, हे असं घडलं

कसं म्हणाले. दक्षाचंही आपल्या मुलीवर प्रेम असणार आणि भगवान शंकरही मोठे सुशिल आहेत. सर्वांचं कल्याण करणारे आहेत. त्यांचा परस्परांचा द्वेष भाव हा का निर्माण झाला? शंकर हे सर्व विश्वाचे गुरू आहेत. निर्वैर आहेत, शांत आहेत त्या शंकरांचा द्वेष दक्ष प्रजापतीने का केला हे सर्वही आपण सांगा.

पुरा विश्वसृजां सत्रे समेताः परमर्षयः।
तथामरगणाः सर्वे सानुगा मुनयोऽग्नयः ।।४.२.४।। श्री. भा.

मैत्रेय सांगतात विदुरजी सर्वही प्रजापती ऋषीमंडळी यांचा एक याग चालू होता. त्या यज्ञामधे सर्वही देवमंडळी प्राप्त झाली. ऋषीमंडळी आलेली आहेत. त्या यज्ञामधे दक्षप्रजापती येऊन पोहोचले. दक्ष हा ब्रह्मदेवांचा पुत्र. ब्रह्मदेवांनी त्याला अधिकारी नेमलेलं आहे. तो त्या यज्ञसभेमधे आल्याबरोबर सगळी देवमंडळी, ऋषीमंडळी उठून उभी राहिली, त्याचा आदर करण्याकरता. ब्रह्मदेवांना उठण्याचं कारण नाही. त्यांचाच तो मुलगा होता. ते आपले बसलेलेच होते आणि त्यांच्याजवळ शंकरही बसले होते. तेही काही उठले नाहीत. त्यांचही लक्ष गेलं नाही. सर्वांनी त्या दक्षप्रजापतीचा सत्कार केला . ब्रह्मदेवांना नमस्कार करून दक्षप्रजापती आपल्या आसनावर बसले. त्यांची दृष्टी शंकरांच्याकडे गेली. आपण आत येण्यापूर्वी जसे बसले होते तसेच बसून आहेत. सर्व उठून उभे राहिले. आपला आदरसत्कार केला पण शंकरांनी काही केला नाही. शंकरांच्याबद्दल दक्षप्रजापतीची कल्पना वेगळी आहे. हे आपले जावई आहेत. इतरांप्रमाणेच तो शंकरांच्याकडे पहातो आहे. रागावला आहे. देवबुद्धी नाही. हा विश्वेश्वर आहे. 'सर्व विद्यानाम् ईश्वरः' असं ज्यांचं प्रतिपादन केलेलं आहे, सर्वही विद्या, परंपरा या शंकरांच्यापासून चालू आहेत इकडे दक्षाचं लक्ष नाहीये. आपला अपमान केला यांनी असं वाटलं आणि रागाने उठून उभा राहिला. ब्रह्मदेव समोर आहेत, मोठेमोठे ऋषि आहेत, देव आहेत आणि त्यांच्या समक्ष तो रागाने बोलायला लागला. ऋषीमंडळीहो, देवहो मी काय सांगतो ते ऐका तुम्ही.

अयं तु लोकपालानां यशोघ्नो निरपत्रपः।
सद्भिराचरितः पन्था येन स्तब्धेन दूषितः ।।४.२.१०।। श्री. भा.

काय म्हणाले, ह्या शंकरांनी आपला मार्ग सोडून दिला. सज्जन ज्या मार्गाने जातात सर्वांचा मानसन्मान करणं, आदरभाव व्यक्त करणं, काही नाही यांच्याजवळ. मर्यादा नाही. माझ्या मुलीचं पाणीग्रहण यांनी केलं, देवब्राह्मणासमक्ष आणि हा माझा शिष्य झालेला म्हणाले. मी आल्यानंतर

उठून उभं राहिलं पाहिजे. सासरा आल्यानंतर जावयाने उठून उभे राहिले पाहिजे. त्यावेळची ती पद्धती आहे. याच्या मनाला काही वाटले नाही याबद्दल. धर्ममर्यादा यांनी सगळ्या सोडून दिलेल्या आहेत. माझी मुलगी देण्याची इच्छा नव्हती म्हणाले पण आमचे पिताजी ब्रह्मदेव, त्यांचा आग्रह झाल्यामुळे याला मी मुलगी दिली. स्मशानामधे जाऊन रहातो. ते भस्म सगळं स्मशानातील अंगाला लावतो. शिव म्हणतात पण ते अशीव आहे.

अशाप्रकारे पुष्कळ निंदा केली दक्षाने शंकरांची आणि शाप दिला त्याने

अयं तु देवयजन इन्द्रोपेन्द्रादिभिर्भवः ।
सह भागं न लभतां देवैर्देवगणाधमः ।।४.२.१८।। श्री. भा.

कोणत्याही देवांच्याबरोबर यज्ञामधे याला हविर्भाग मिळणार नाही. यज्ञामधे यांचा अधिकार नाही. असं रागानं बोलून निघून गेला तो दक्ष आपल्या घरी. शंकर आपले स्वस्थ बसून राहिले. ऐकून घेतलं त्यांनी. नंदीकेश्वर, शंकरांचे शिष्य, त्यांनाही अतिशय राग आलेला आहे. हा म्हणे दक्ष प्रजापती अधिकार मोठा मिळाल्यामुळे उन्मत्त झालेला आहे. शंकरांचा द्वेष करायला लागला. संसारामधे गुंतलेला हा दक्षप्रजापती. त्या कर्माकडेच त्याचं लक्ष आहे. भगवान शंकरांची योग्यता याला समजली नाही. तेव्हा त्यांचा अपमान करणारा हा जो दक्षप्रजापती याला तत्वज्ञान होणार नाही. असाच हा ही संसारामधे गुंतून राहिल. याला ज्या ऋषिंनी संमती दाखवलेली आहे, दक्षप्रजापतीला शंकरांची निंदा करण्याची संमती दिली आहे. तेही सगळे ऋषि याचक होतील, भक्षक होतील, वाटेल तसे अनाचारी होतील. त्या ऋषींनाही शाप दिला. त्याप्रमाणे ते ऋषीही रागावले. भृगुनेही शाप दिला. तुम्ही असे शिवसेवक, शिवदूत हे असा वाटेल तसा आचार करणारे व्हाल म्हणाले. शंकर तिथून उठले आणि कैलासपर्वतावर निघून गेले. असा बराच काल गेला. जावई आणि सासरा यांचा हा द्वेष त्यावेळेपासून सुरू झाला. शंकरांनी सोडून दिलेले आहे. दुर्लक्ष केलेलं आहे तिकडे, लक्ष दिलं नाही.

दक्षप्रजापती सृष्टीतला एक अधिकारी म्हणून नेमलं ब्रह्मदेवांनी. ज्ञानी आहे, वेदशास्त्रादिकाचं ज्ञान चांगलं आहे. कर्मांचही ज्ञान चांगलं आहे. पण हा एक अहंकार आहे. वाजपेय यज्ञ त्यांनी केला. त्यानंतर करण्याचा जो यज्ञ बृहस्पतीसव नावाचा यज्ञ करायला त्यांनी आरंभ केला. सर्व ऋषी, देव सगळ्यांना निमंत्रण केलं. सगळी मंडळी त्या यज्ञाकरता निघालेली आहेत. देव मंडळी विमानात बसून जाताहेत. कैलासपर्वतावरून ती विमानं निघालेली असताना या सतीने दक्षाची

मुलगी, तिनं चौकशी केली असताना आपल्या बापाच्या घरी यज्ञ आहे त्याकरता ही मंडळी निघालेली आहेत हे तिला समजले. यांना काही निमंत्रण नाहीये. दक्षाचं शंकरांना निमंत्रण नव्हते. तिला इच्छा उत्पन्न झाली. आपल्या पित्याच्या घरी यज्ञ आहे तिकडेआपणही जावं. भगवान शंकर स्वस्थ बसलेले आहेत. त्यांच्याकडे ती आली आणि प्रार्थना करती आहे, महाराज आपल्या श्वशुरांच्याकडे मोठा यज्ञ होणारआहे. आपल्याला समजले आहे की नाही. आपण जाऊ या तिकडे. सर्व देवमंडळी निघालेली आहेत तिकडे. ही विमाने निघालेली आहेत कैलास पर्वतावरून. माझ्या सगळ्या बहिणी वगैरे भेटतील. आई आहे, मावशी आहे पुष्कळ सगळ्यांची भेट होईल. लवकर आपण जाऊ या. जन्मभूमीला जावं, माहेरी जावं अशी माझी इच्छा आहे. असं ती सांगती आहे. आपल्याला याच्याबद्दल काही वाटणार नाही म्हणाली. सर्वत्र आपण परमात्म दृष्टी ठेवणारे. पण मी स्त्री आहे. मला आपली जन्मभूमी पहावी असं वाटतयं म्हणाली. कोणत्या मुलीला आपल्या पित्याच्या घरी जावं असं वाटणार नाही? बरं आमंत्रण नाही. गुरूंच्या घरी, पित्याच्या घरी, पतीच्या घरी आमंत्रणाची काही वाट पहायची नाही. तेव्हा लवकर आपण चला म्हणाली. निघुया आपण. आत्तापर्यंत शंकरांनी, दक्षाने आपला पूर्वी किती अपमान केला, शाप दिला हे त्यांनी सतीला सांगितलं नव्हतं. कशाला उगीच सांगायचं, काय उपयोग काय? पण आता तिची इच्छा आहे, जायचं आहे तेव्हा तिला कल्पना दिली पाहिजे म्हणून  तिला शंकरांनी सांगायला आरंभ केला

त्वयोदितं शोभनमेव शोभनेअनाहुता अप्यभियन्ति बन्धुषु ।
ते यद्यनुत्पादितदोषदृष्टयो बलीयसानात्म्यमदेन मन्युना ।।४.३.१६।। श्री. भा.

तुझं भाषण काही अयोग्य नाहीये. आपल्या आप्तबांधवांच्याकडे जाण्याकरता आमंत्रणाची वाट पाहू नये हे योग्य आहे. पण ते कसे पाहिजेत आपले आप्तबांधव, कोणी घरी गेलं की त्याच्याकडेरागाने पाहणे, बोलणे, त्यांचा आदर न करणे, असे जर क्रोधी असतील तर त्यांच्या घरी जाऊन काय करायचं म्हणाले. ज्यांना कोणाचाही अपमान करायला मनाला काही वाटत नाही. अशा लोकांच्या घरी कधीही जाऊ नये म्हणाले. शत्रूने बाण मारला तरी दुःख होणार नाही पण असे जे लोक असतील, त्यांच्या वाणीने  मनाला अत्यंत दुःख होतं. तुझ्यावर तुझ्या पित्याचं प्रेम असेल पण आज जर तू माहेरी जाशील तुझ्या पित्याकडे तर तुझा अपमान होईल हे लक्षात घे.



त्याला काही विवेक नाहीये. सर्वठिकाणी श्रीकृष्णपरमात्मा व्यापून राहिलेला आहे अशी दृष्टी त्याची नाहीये. पूर्वी एका यज्ञामधे काय माझ्याहातून अपराध झाला माहित नाही, उगाच वाट्टेल तसं बोलला, निंदा केली माझी, शाप दिला. तेव्हा अशा ठिकाणी तुझा अपमान झाला तर तुला ते मरणप्राय दुःख होईल. तेव्हा तूही न जाणे हे योग्य आहे. मला तर जायचं नाही, मला आमंत्रणही नाहीये. पत्नी त्या ठिकाणी गेल्यानंतर तिचा अपमान होणार. मानी स्त्री आहे ही. अपमान झाल्याबरोबर देहत्याग करणार. थांबवावं तिला. पण त्या सतीचाही विनाशकाल आलेला आहे जवळ. तिला उलट राग आला. काही नाही, जायचं जन्मभूमीकडे. माहेरी जायचं, शंकर येत नाहीत तर आपणच जाऊच्या, बाहेर पडली ती. पण शंकरांची आज्ञा नसताना बाहेर पडणं हे बरं नाही. पुन्हा ती घरात आली. पुन्हा निघाली. असं एकदोनदा केलेलं आहे. ठरविले तिने, यज्ञाला जाण्याला काय हरकत आहे? म्हणून एकटीच ती सती निघालेली असताना शंकरांचे जे गण होते नंदीकेश्वर वगैरे तेही तिच्याबरोबर निघाले. तिला घेऊन सगळी मंडळी त्या यज्ञमंडपापर्यंत येऊन पोहोचलेली आहेत. वेदघोष चालू आहे ऋषीमंडळींचा. त्या यज्ञमंडपामध्ये सतीने प्रवेश केलेला आहे. दक्षाने तिच्याकडे पाहिले सुद्धा नाही. दुसरीकडेच बोलत राहिले. मुलगी आल्याबरोबर तिच्याशी भाषण नाही आणि काही नाही. मुख्य यजमानच जर असा वागतो तर बाकीचे कोण येणार. पण तिच्या बहिणी, आई, मावशी वगैरे पुढे आल्या. जवळ जाऊन म्हणाल्या, ये बाई आलीस तू बरं झालं. कुशलवार्ता, कुशलप्रश्न वगैरे केलेले आहेत. तिची भेट झाली सगळ्यांची.

पण ती थांबली नाही. शंकरांनी सांगितलेले हे सत्य आहे. दक्ष प्रजापती शंकरांचा द्वेष करणारा अत्यंत अज्ञानी आहे. राग आला तिला. कोणाशीही भाषण न करताना ती अगोदर यज्ञमंडपात येऊन पोहोचलेली आहे. हविर्भाग सर्व देवांचे मांडून ठेवले होते. इंद्र आहे, वरूण आहे, सगळ्या देवांचे. विष्णु, ब्रह्मदेव सगळ्यांचे भाग आहेत पण शंकरांचा भाग नाहीये. केवढा मोठा यज्ञ. पण शंकरांना बाजूला करून चाललेला आहे. मग मात्र त्या सतीला राग आवरलेला नाही. ती रागाने आपल्या पित्याला बोलती आहे.

न यस्य लोकेऽस्त्यतिशायनः प्रियः
तथाप्रियो देहभृतां प्रियात्मनः ।।४.४.११ ।। श्री. भा.

ज्या भगवान शंकरांना शत्रु किंवा मित्र कोणीही नाही. सर्वत्र जे समदृष्टीने पाहात आहेत. कोणतंही वैर ज्यांनी कधीही केलेलं नाही. अशा भगवंतांचा शंकरांचा तुझ्याशिवाय द्वेष करणारा जगात दुसरा कोणीही दिसत नाही. पित्याला उद्देशून बोलतीय. पिता आणि कन्या हे नातं तिनं सोडून दिलेलं आहे.

दोषान् परेषां हि गुणेषु साधवः
गृहणन्ति केचिन्न भवादृशा द्विज ।
गुणांश्च फल्गून् बहुलीकरिष्णवः
महत्तमाः तेषु अविदद् भवानघम् ।।४.४.१२ ।। श्री. भा.

दक्षा, संतमहात्मे श्रेष्ठ सत्पुरुष जे आहेत ते लोकांचे दोष जरी असले तरी गुण म्हणून पाहतात. तुला ही बुद्धी सुचायची नाही. लोकांच्या गुणालाही तुझी दोषदृष्टीच आहे. थोडेजरी कोणाचे गुण असले तरी ते फार मानतात. 'पर्वती कृत्य नित्या' अशा महात्म्यांना मान्य असणारे श्रेष्ठ ज्ञानी, भगवान शंकर यांचा तू द्वेष करतो आहेस. तुझ्यासारख्या यज्ञ करणाऱ्या दुर्जनांच्या सभेमधे श्रेष्ठ पुरूषांची निंदाच होत राहणार. यात काहीच आश्चर्य नाहीये. भगवान शंकरांचं दोन अक्षरांचं शिव हे नाव मुखातून घेतलं गेलं तर सर्व पातकांचा नाश होतो. असा हा, ज्याची कीर्तिपवित्र आहे, ज्याची आज्ञा कोणीही उल्लंघन करत नाही, अशा या भगवान शिवांचा तू द्वेष करतो आहेस. ज्यांची सेवा करणारे असे तपस्वी पुरुष यांना ब्रह्मज्ञान प्राप्त होते. असा तो विश्वबंधू परमात्मा यांचा तू द्वेष करतो आहेस. मी आता परत जाणार नाही म्हणाली. दक्षाची कन्या म्हणूनच मला शंकर हाक मारणार. तुझं नाव सुद्धा मला नको आहे आता. याप्रमाणे त्या सतीने

देव ऋषी यांच्या सर्वांच्या सभेमधे आपल्या पित्याची निर्भत्सना केली. हे शरीर आता मला ठेवायचं नाही. माझ्या शरीराशी तुझा संबंध असल्यामुळे हे शरीर मला नाहीसं करायचं आहे. असं रागाने ती सती बोललेली आहे. त्या मंडपामधे आसन घालून बसून राहिलेली आहे. योगमार्ग तिला पूर्ण माहिती आहे. भगवान शंकरांची ती पत्नी आहे. शरीर विसर्जन कसं करायचं? सगळं तिला माहिती आहे. आचमन केलं तिने. पितांबर नेसलेली होती. डोळे झाकून घेतलेले आहेत. सर्व ऋषीमंडळी, देवमंडळी पाहताहेत. काय करणार आहे ही सती. शरीरामधे असणारा जो अग्नी आहे तो अग्नी तिने प्रदीप्त केला. ज्ञानेश्वर महाराजांनीही तो अग्नी प्रदीप्त केला होता म्हणतात पाठीवर. त्यांना मुक्ताबाईंनी मांडे भाजून दिले. तसं आहे. तो अग्नी प्रदीप्त केला. प्राणवायुलाही उर्ध्वगती प्राप्त झाली. एकदम तो अग्नी भडकलेला आहे आणि त्या सतीचं शरीर भस्म होऊन गेलेलं आहे.

मग मात्र सर्व मंडळी घाबरलेली आहेत. सतीचा देह भस्म झाला, सर्व देवमंडळींना भीती उत्पन्न झाली की हा दक्षप्रजापती काय म्हणतो आहे, ब्रह्मदेवाने त्याला सृष्टीचा अधिकारी काय नेमलेलं आहे. मुलीकडे आपल्या प्रत्यक्ष पोटच्या मुलीकडे लक्ष नाही. मुलीने प्राणत्याग केला तरी याच्या मनावर काही परिणाम नाही. शंकरांचे गण होते ते रागाने दक्षाला मारण्याकरता धाऊन गेले असताना भृगुऋषींनी दक्षिणाग्निमधे होम केला. त्या होमबलाने होमातून पुष्कळ सैन्य बाहेर पडलं. त्यांनी शंकरांच्या गणांचा पराभव केला. ते कैलासपर्वतावर पळून गेले. मैत्रेय सांगतात विदुरजी,

भवो भवान्या निधनं प्रजापतेः।
असत्कृतायाः अवगम्य नारदात् ।।४.५.१।। श्री. भा.

नारद गेले कैलास पर्वतावरती, शंकरांना त्यांनी हा वृतान्त सांगितला. प्रत्यक्ष बापाने, प्रजापतीने सतीचा अपमान केल्यामुळे त्या सतीने योगबलाने आपल्या देहाचं विसर्जन केलेलं आहे, योगसामर्थ्याने. आत्महत्या म्हणत नाहीत याला. योगसामर्थ्याने शरीर टाकता आलं पाहिजे किंवा शत्रुबरोबर लढाई करताना शरीर टाकता आलं पाहिजे म्हणजे त्याला उत्तम गती मिळते. तुमच्या सैन्याचा पराभव झालेला आहे. हे ऐकल्यावर शंकरांना राग आलेला आहे. त्यांनी आपली जटा भूमीवर टाकली. त्या जटेपासून एक मोठा पुरूष निर्माण झालेला आहे. सहस्त्रबाहू ज्याला आहेत. वीरभद्र नावाचा आणि त्याने प्रार्थना केली, विनंती केली, काय आज्ञा आहे महाराज,

शंकरांनी सांगितलं,

'दक्षं सयज्ञं जहिमद्भटानां त्वमग्रणी रुद्र भटांशको मे ।।४.५.४।। श्री. भा.

जा तो दक्ष आणि त्याचा यज्ञ सर्वांचा नाश करून ये. तू माझाच अंश आहेस म्हणाले. निघाला तो वीरभद्र. शंकरांचे गणही त्याच्याबरोबर निघालेले आहेत. त्रिशूल हातामध्ये घेतलं आणि तो यज्ञाचा नाश करण्याकरता, दक्षप्रजापतीचा नाश करण्याकरता निघालेला आहे. मोठा ध्वनी उठलेला आहे. ते सैन्य येतं आहे. ही मंडळी, देवमंडळी भीतीग्रस्त झाली. काय होणार कोणाला ठाऊक. सर्व विश्वाचा प्रलय करण्याचं सामर्थ्य या भगवान शंकराचं आहे. त्याच्या पत्नीचा नाश झाला. काय या दक्षप्रजापतीला शिक्षा होणार ? घाबरले सगळे. अशी सगळी मंडळी भीतीग्रस्त झालेली असताना, शंकरांचे सैन्य, गणसैन्य त्या यज्ञामंडपामधे घुसलेलं आहे. यज्ञमंडपात आल्याबरोबर आधी सगळ्या ऋषींना बांधून ठेवलं. पुन्हा मंत्रानी यज्ञकुंडातून सैन्य त्यांनी निर्माण करू नये म्हणून. दक्षाला बांधून ठेवलेलं आहे वीरभद्राने. यज्ञकुंड सगळी मोडून तोडून टाकलेली आहेत. असं सर्व लोकांना त्रास झाला. देवांवर शस्त्रास्त्र प्रहार केलेले आहेत. देव पळून गेले यज्ञमंडपातून ब्रह्मदेवांच्याकडे. दक्षप्रजापतीला मारण्याचा प्रयत्न केला तो काही मरू शकला नाही. वीरभद्राने त्या दक्षाचा कंठ दाबून प्राण घेतला. त्याचा शिरच्छेद करून मस्तक अग्नीकुंडामधे टाकून दिलेलं आहे. सर्व यज्ञमंडप जाळून टाकलेला आहे आणि तो वीरभद्र सर्व सैन्य बरोबर घेऊन कैलासपर्वतावर निघून गेला.

मैत्रेय सांगतात विदुरजी, सर्व देव जखमी झालेले आहेत. कोणाचं डोकं फुटलं, कोणाचे हात मोडले, पाय मोडले. ब्रह्मदेवांना हे सर्व शरण आलेले आहेत. सर्व देव या यज्ञाकरता आले होते. पण ब्रह्मदेव आणि विष्णु मात्र आले नव्हते. यांना अशी घटना होणार आहे याची कल्पना असावी. ब्रह्मदेवांच्या लोकामध्ये जाऊन सर्वांनी हा घडलेला वृतान्त सांगितला. ब्रह्मदेव देवांना म्हणताहेत, दक्षप्रजापतीपेक्षा खरे तुम्ही दोषी आहात. तुम्हाला त्यांनी बोलावलं होतं. शंकरांना बोलावले नाही. तुम्ही त्याला सांगायला नको होतं की शंकरांना तू बोलावून आण. त्यांची क्षमा माग. तर आम्ही तुमच्या यज्ञातला हविर्भाग घेऊ नाहीतर घेणार नाही. स्वार्थी म्हणाले तुम्ही. शंकर आले काय आणि नाही आले काय ? तुमचीच याला संमती होती असं झालं. तुम्हाला जर हा यज्ञ पुन्हा व्यवस्थित व्हावा असं वाटत असेल, तर शंकरांची क्षमा तुम्ही मागितल्याशिवाय हे काही होणार नाही. सर्व देवांना आज्ञा केली. त्या देवांना बरोबर घेऊन ब्रह्मदेव हे कैलासपर्वतावर जाण्याकरता निघालेले आहेत.



कैलासपर्वताच्या जवळ आले आहेत. सर्वांनी पाहिला तो. अनेक मोठीमोठी सिद्धमंडळी याठिकाणी आहेत. जन्मतः सिद्धी कोणाला आहे. बृहस्पतीमुळे सिद्धी आहेत. वनस्पतीमुळे सिद्धी आहे, तपाने आहे, मंत्राने आहे, योगाने आहेत. अनेक मोठेमोठे योगीपुरूष आहेत, गंधर्व आहेत, अप्सरा आहेत. अशा त्या कैलासपर्वताच्याजवळ देवमंडळी, ब्रह्मदेव येऊन पोहचलेले आहेत. मोठेमोठे वृक्ष आहेत, अरण्यं आहेत. त्याचप्रमाणे कुबेराची नगरी, अलकावती या नगरीजवळ आलेले आहेत. पुष्प, कमलाचं वन त्या ठिकाणी त्यांनी पाहिलेलं आहे. नंदा, अलकनंदा दोन नद्या वाहात आहेत बाहेर. असं ते सर्व पाहून त्या पलिकडे कैलास पर्वतावर ते सर्व येऊन पोहचलेले आहेत. मोठा वटवृक्ष आहे, विशाल वृक्ष आहे. त्या वृक्षाखाली भगवान शंकर बसलेले आहेत. सर्वही मोठे मोठे सनतकुमार, सनातन, सनक, सनंदन, नारद सर्वही मोठी मोठी मंडळी भगवान शंकरांच्याजवळ बसलेली आहेत. काहीतरी संभाषण चाललेलं आहे. त्यांना मार्गदर्शन करताहेत भगवान शंकर. सर्व विद्या आहे, योग आहे, तप आहे. सर्वही भगवान शंकरांच्याजवळ आहे. असा तो विश्वामित्र त्यांना पाहिलेलं आहे. मांडी घालून बसलेले आहेत. नारदांच्या बरोबर काही भाषण करताहेत शंकर. हे पाहिल्याबरोबर सर्व देवांनी शंकरांना साष्टांग नमस्कार केलेला आहे. शंकरांनी पाहिले, ब्रह्मदेव आले. एकदम उठून उभे राहिले. या देवा, केव्हा आलात तुम्ही ? या बसा म्हणाले. त्यांचा सत्कार केला. ब्रह्मदेव म्हणतात सर्व विश्व निर्माण करण्याची, पालन करण्याची, संहार करण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. विश्व उत्पन्न करणं, पालन करणं, संहार करणं हे सामर्थ्य

आपलं आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष सर्व पुरूषार्थ देण्याचं सामर्थ्य आपल्याजवळ आहे. सर्वही पुण्यकर्म जी चालू आहेत जगामधे त्या सगळ्याला आपलं सहाय्य आहे, प्रेरणा आपली आहे. तेव्हा आपली मोठी शक्ती आहे. हा जो दक्षप्रजापतीचा यज्ञ बंद पडलेला आहे, तो यज्ञ पुन्हा सुरू व्हावा या इच्छेने सर्व देव आपल्याला शरण आलेले आहेत. प्रार्थना करताहेत, क्षमा मागताहेत. यज्ञातला शिल्लक राहिलेला जो भाग आहे तो हविर्भाग सगळा आपला आहे. कोणत्याही यज्ञामधे शिल्लक राहिलं म्हणजे आपलं असं समजायचं नाही. यज्ञातला शिल्लक राहिलेला भाग शंकरांचा आहे. ब्रह्मदेवानं ठरवून टाकलेलं आहे. लवकर चला आमची विनंती मान्य करा. आपण जाऊ या त्या यज्ञस्थानामधे दक्षप्रजापती तर  मेलेला आहे. त्याला जिवंत करावं लागेल तुम्हाला. आणि हा यज्ञ पुन्हा पूर्वीप्रमाणे चालू करून द्यावा लागेल. प्रत्यक्ष ब्रह्मदेवांनी प्रार्थना केली. हसले भगवान शंकर

नाघं प्रजेश बालानां वर्णये नानुचिन्तये ।
देवमायाभिभूतानां दण्डस्तत्र धृतो मया ।।४.७.२ ।। श्री. भा.

ब्रह्मदेवा, दक्षासारखी मंडळी म्हणजे अगदी अज्ञानी आहेत. त्यांनी काय केलं? कसं वागावं? याचा विचार करण्याची मला काही जरूर नाही. फार उन्मत्त झाला होता तो. आपली मुलगी गेली डोळ्यादेखत तरी त्याच्या मनावर काही परिणाम झाला नाही. आता आपण आला आहात तर जाऊ या. यज्ञाला आरंभ करू या. पण त्या दक्षाचं मस्तक जळून गेलेलं आहे. तेव्हा

भवतु अजमुखं शिरः ।।४.७.३ ।। श्री. भा.

त्याठिकाणी जो अज आहे, बोकड आहे त्याचं मस्तक त्याला जोडा म्हणाले. भृगुऋषींचे डोळे गेलेले आहेत. दुसऱ्याच्या नेत्राने त्याला पाहता येईल. अशी काही व्यवस्था केली आणि शंकर निघालेले आहेत. यज्ञ मंडपात जाऊन पुन्हा यज्ञ सुरू करायचा. ब्रह्मदेव सर्व देवांना शंकरांना बरोबर घेऊन त्याठिकाणी आलेले आहेत. त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्या पशूचं मस्तक त्या दक्षाच्या धडाला जोडलेलं आहे. शंकरांनी अमृतदृष्टीने त्याच्याकडे पाहिल्याबरोबर एकदम तो जिवंत झालेला आहे. समोर पहातो आहे. भगवान शंकर समोर आहेत. पश्चात्ताप झाला त्याला. आपली कन्याही, आणखी देहत्याग तिने केलेला आहे. याची आठवण झाली आणि पश्चात्ताप झालेला आहे. शंकरांना नमस्कार केला. क्षमा मागतो आहे. देवा, आपण मला दंड केला असं मी समजत नाही. माझ्यावर कृपा आपली झालेली आहे. माझा अहंकार सगळा दूर झालेला आहे. विद्या, तप यांनी संपन्न झालेले जे महात्मे आहेत त्या सर्वांचं संरक्षण करणारे आपण आहात. त्या सर्वांना मार्गदर्शन

करणारे आहात. आपली निंदा माझ्याकडून झालेली आहे. अतिशय मी पापी आहे. दोषी आहे. क्षमा करावी अशी प्रार्थना त्यांने केली. मग ब्रह्मदेवांच्या आज्ञेप्रमाणे पुन्हा पहिल्यापासून यज्ञाला आरंभ झालेला आहे. भगवान विष्णूंचं आवाहन ब्राह्मणांनी केलं. त्यांना हविर्भाग द्यायचा आहे. ते आले नव्हते. आतापर्यंत त्यांचा तो पुरोडाश त्यांना देण्याकरता तयार केला आणि त्यांचे आवाहन केल्याबरोबर श्रीहरी त्या यज्ञमंडपामधे प्रकट झालेले आहेत. त्यावेळी सर्वही मंडळी उठून उभी राहिली, देव ऋषी सर्वांनीही भगवान विष्णूंची पुष्कळ स्तुती केलेली आहे. सर्व ऋषी मंडळी दक्ष प्रजापतींनी स्तुती केली. भगवान रूद्राने स्तुती केली. ब्रह्मदेव, इंद्र, यज्ञपत्नी सर्व एकंदर यज्ञातले ब्राह्मण, सर्वांनीही भगवान श्रीहरींची स्तुती केली. भगवंतांनी आपला हविर्भाग ग्रहण केलेला आहे. दक्ष प्रजापतीला थोडासा उपदेश केला. सर्व मंडळी ऐकताहेत –

अहं ब्रह्मा च शर्वश्च जगतः कारणं परम् ।
आत्मेश्वर उपद्रष्टा स्वयंदृगविशेषणः ।।४.७.५० ।। श्री. भा.

दक्षा, सर्वही विश्वाचं कार्य करणारे आम्ही तिघे आहोत म्हणाले. पण तिघे असूनसुद्धा एकच आहोत. उत्पन्न करण्याचं कार्य करणारे ब्रह्मदेव, रक्षण करण्याचं कार्य करणारे विष्णू, संहार करण्याचं कार्य करणारे शंकर. म्हणजे तिघेही भिन्न नाहीत. आम्ही तिघे एकच आहोत. विश्वाचं कार्य करतो आहे. या तिघांच्या ठिकाणी एक ईश्वरबुद्धी ज्याची आहे त्यालाच शांती प्राप्त होते.

यथा पुमान्न स्वाङ्गेःषु शिरःपाण्यादिषु क्वचित् ।
पारक्यबुद्धिं कुरुते एवं भूतेषु मत्परः ।।४.७.५३ ।। श्री. भा.

तिघे म्हणजेच ईश्वर आहे असं नाही. तर सर्व विश्व, सर्व प्राणीमात्र म्हणजे ईश्वररूप आहे, ही भावना असली पाहिजे. स्वतःचं शरीर स्वतःचं आहे म्हणाले. हात वेगळे, पाय वेगळे, डावा हात निराळा, उजवा हात निराळा, मस्तक आहे, डोळे आहेत कितीतरी अवयव आहेत. पण हे सर्व अवयव मिळून एक शरीर आहे. ही बुद्धी ठेवली म्हणजे सर्व कार्य व्यवस्थित होतं. हात प्रधान आहे, पायाचा काही संबंध नाही असं जर भिन्न भिन्न भावना जर ठेवली तर व्यवहार कसा होईल? सर्व अवयव मिळून एक शरीर आहे ही दृष्टी उत्पन्न झाली पाहिजे. तरच व्यवहार चांगला होतोआणि शांती रहाते. तसं त्रिमूर्ती ब्रह्मा, विष्णु, महेश हे ही एक ईश्वररूप आहेत, ही भावना धारण केली पाहिजे म्हणाले. तू मोठा अधिकारी, सृष्टीतला अधिकारी म्हणून नेमलं तुला ब्रह्मदेवांनी तुझी अशी बुद्धी! शंकरांच्याबद्दल इतका तिरस्कार उत्पन्न होण्याचं काय कारण आहे? विष्णूची भक्ति

करणारे शंकरभक्तांचा द्वेष करतात. शंकरांची भक्ती करणारे विष्णूभक्तांचा द्वेष करतात. ह्याला काय भक्तीमार्ग म्हणतात का? सर्व ठिकाणी ईश्वरदृष्टी पाहिजे. तरच शांती आणि फल मिळतंय.

याप्रमाणे दक्षप्रजापतीचं समाधान केलं. सर्वांच्या समक्ष हे भाषण विष्णूंनी केलेलं आहे. सर्वांच्याही मनामधे शंकरांच्याबद्दल आदरभाव निर्माण केलेला आहे. आम्ही आणि शंकर वेगळे नाहीयेत हे सांगितले.

अशा रितीने सतीचं चरित्र मैत्रेय महर्षींनी विदुरजींना निवेदन केलेलं आहे. ती सती शंकरांची आज्ञा नसताना यज्ञाला आलेली आहे, माहेरी आलेली आहे. पण तिला पश्चात्ताप झाला. प्राणत्याग तिने केला. ती पुन्ही हिमालयाची कन्या झाली आहे, पार्वती या नावानं. अपर्णा तिला म्हणतात. शंकरच पती प्राप्त व्हावेत म्हणून तिनं तपश्चर्या केली. शंकरांनी परीक्षा तिची केली आणि मग तिचा स्विकार केलेला आहे. असं हे सतीचं पवित्र चरित्र, भगवान शंकरांचं महात्म्य वर्णन केलेलं आहे. हे श्रवण केलं असताना सर्वही पातकांचा क्षय होतो आहे असं मैत्रेयांनी विदुरजींना वर्णन केलेलं आहे.

यानंतर आता एका बालकाचं चरित्र आहे. भारतामधे स्त्रियाही मोठ्या झालेल्या आहेत, पतिव्रता. ते सांगण्याकरता सतीचं चरित्र सांगितलं. आता धृव चरित्र सांगताहेत मैत्रेय महर्षी.

स्वायंभुव मनूच्या वंशामधे त्याचे दोन पुत्र म्हणजे प्रियंव्रत आणि उत्तानपाद हे दोघे, संरक्षण करण्याचं राज्य करण्याचं कार्य पित्याच्या आज्ञेप्रमाणे करताहेत. उत्तानपाद राजाची कथा प्रथम सांगताहेत. उत्तानपाद राजाला सुनीती आणि सुरूची अशा दोन स्त्रिया होत्या. नावाप्रमाणे उत्तम नीतीसंपन्न, धर्माधर्माचा पूर्ण विचार करणारी, संसाराबद्दल जिच्यामनामधे काहीही आसक्ती नाहीये, अशी सुनीती होती. तिचा मुलगा म्हणजे धृव आहे. आणि दुसरी सुरूची. संसारसुखाकडेच जिचं लक्ष आहे. योग्यायोग्य विचार करण्याचं काही तिला काही साधलेलं नाही. अशा प्रकारची ती आहे. पण पतीला ती प्रिय आहे. सुनीती मात्र नावडती आहे. उत्तानपाद राजा सिंहासनावर सभेमधे बसलेला आहे, सुरूची त्याच्याजवळ बसलेली आहे. अशावेळेला त्या सुरूचीचा मुलगा उत्तम नावाचा, तोही पाच वर्षाचा आहे. तो बाहेरून आला. मुलं खेळत होती. तिथून धावत धावत आत आला. सिंहासनावर चढून आपल्या बापाच्या मांडीवर जाऊन बसला. त्या धृवालाही वाटलं आपणही पित्याच्या मांडीवर जाऊन बसावे. तोहो आला धावत. सिंहासनाच्या जवळ येण्याअगोदर ती सुरूची त्याची सापत्न माता आहे. हा काही आपला सख्खा मुलगा नाही. तिनं

त्याला सांगितलं, धृवा थांब म्हणाली. या सिंहासनावर बसण्याचा तुला अधिकार नाही. बालवय आहे. अधिकार, अनाधिकार, मान, अपमान, योग्य, अयोग्य हे सगळं वय मोठं झाल्यावर. त्या मोठ्या वयामधे मनात विचार येतात. योग्य असतात की नाही हा निराळा विषय आहे. बालबुद्धी आहे. सर्वठिकाणी त्याची प्रेमबुद्धी आहे. आदरबुद्धी आहे. ही पण आपली आई आहे. या माझ्या भावाला येण्याला परवानगी दिली. मलाही मिळेल. मला देवाने दोन माता दिलेल्या आहेत. असं तो समजत होता. सावत्र किंवा सख्खी ही त्याची बुद्धी नाहीये. ती सुरूची म्हणाली या सिंहासनावर तुला बसता येणार नाही. अधिकार नाही तुला. कारण काय सांगते आहे. माझ्या गर्भातून माझ्या उदरातून तुझा जन्म झालेला नाही. हे कारण आहे त्याला. तुला हे कळायचं नाही म्हणाली. दुसऱ्या स्त्रीपासून तुझा जन्म झालेला आहे तेंव्हा या सिंहासनावर बसण्याचा तुला अधिकार नाही. तुला जर या सिंहासनावर बसायची इच्छा असेल तर भगवान श्रीहरीची उपासना कर. प्रार्थना कर. त्यांचा वर मिळव. माझ्या उदरातून जन्म घे आणि मग या सिंहासनावर बस. ध्रुव, पाच वर्षाचा मुलगा, तो नुसता बसला असता तर सिंहासन त्याच्या मालकीचं झालं असतं काय? पण काय विलक्षण अहंकार आहे. ह्या अहंकारामुळे काय आपण बोलतो, कोणाला बोलतो, योग्य कसं आहे काही विचार नाहीये.

थांबला ध्रुव बिचारा, त्याने आपल्या पिताजींकडे पाहिले. त्याला जसं जवळ घेतलं तसं उत्तानपाद राजानं याला जवळ घेतलं असतं तर ती काय करणार होती? पण तोही गप्प बसून राहिलेला आहे. हाही अपराध दोष होतो आहे. मोठेपणा जरी असला तरी मोठेपणा कुठे वापरायचा. स्पष्टपणा कुठे दाखवायचा, निग्रही कुठे व्हायचं, अनुग्रह कोठे करायचा, हे सर्व समजले पाहिजे ना. तोही विवेक त्या उत्तानपाद राजाच्या मनात आला नाही. तोही गप्प बसून राहिला. एकदा वाट पाहिली थोडी. डोळ्यातून अश्रुधारा त्या बालकाच्या सारख्या चालू झाल्या. नाही पिताजींचीही इच्छा दिसत नाही. परतला बिचारा. आईकडे निघालेला आहे. त्याच्या आईला हा सर्व प्रकार कोणीतरी जाऊन सांगितला. तुमच्या मुलाचा अपमान केलेला आहे त्या सुरूचीने. रडू लागली. तो मुलगा रडत आलेला आहे. त्याला पोटाशी धरलेलं आहे. तीही रडती आहे आणि तो ध्रुवही रडतो आहे. पण ती सुनीती अत्यंत धैर्यसंपन्न होती. धर्माचरणावर परमेश्वरावर तिचा विश्वास होता. आपला शोक तिने आवरलेला आहे. तिने सांगितले, ध्रुवा, खरं आहे म्हणाली. तुझी जी माता आहे तिनं तुला सांगितलं ना, सिंहासनावर बसण्याचा तुझा अधिकार नाहीये. खरं आहे हे. माझ्यासारख्या दुर्दैवी स्त्रीच्या गर्भातून तुझा जन्म झालेला आहे. राजेसाहेबांचंही आमच्याकडे लक्ष

नाही. तुझ्याकडे लक्ष नाहीये. जाऊ दे म्हणाली. तुझ्या सावत्र आईने सांगितलेले आहे की तू वनामधे जाऊन हरीची आराधना कर. चांगलं आहे म्हणाली. तिने मार्गदर्शनच केलेलं आहे. अरण्यामधे जाऊन परमेश्वरावर सर्व भार घाल म्हणाली. तुझं कार्य होईल. काही काळजी करण्याचं कारण नाही. ब्रह्मदेवांनी श्रीहरीची आराधना केली आणि त्यांनी ब्रह्मलोकाचं स्वामित्व मिळवलेलं आहे. तुझे पितामह राजेसाहेब मनु यांनीही अनेक यज्ञ भगवंताच्या प्रसादाकरता केले. त्यांनाही हे सबंध पृथ्वीचं राज्य मिळालेलं आहे. त्या परमेश्वराला तू शरण जा. भक्तवत्सल परमात्मा आहे, अनन्य भावाने आपल्या धर्ममर्यादेचं पालन करणारा जो भक्त आहे त्याच्या सर्वही इच्छा पूर्ण करण्याला भगवान समर्थ आहे. त्याच्याशिवाय दुसरा कोणीही मला या संकटातून मुक्त करणारा दिसत नाही. सर्वही जिची इच्छा करतात ती लक्ष्मीदेवी भगवंताच्या चरणाची सेवा करत त्या ठिकाणी राहिलेली आहे.

मैत्रेय सांगतात, विदुरजी, पाच वर्षांचा बालक आहे तो, अद्यापी मुंज नाही काही नाही. अपमान झालेला आहे आणि आईनेही त्याला प्रोत्साहन दिलेलं आहे. जा म्हणाली वनामधे जा. सर्व भार त्या ईश्वरावर टाक. लहान वयामधे त्या बालकाची मनाची तयारी केवढी आहे. ईश्वर म्हणजे काय वगैरे काही कल्पना त्या वयामधे नसणार. आईचं मार्गदर्शन आहे. आईचा संकल्प आहे की ईश्वराच्या कृपेनेच काय मिळायचं ते मिळेल दुसरे काही नको आता. निघालेला आहे ध्रुव. बाहेर पडला. आईला नमस्कार केला. आज्ञा घेऊन तो बाहेर पडला. अरण्याचा रस्ता धरला. नारद महर्षींना ते समजले. नारद सामोरे आले. ध्रुवा कोठे निघालास? प्रेमाने जवळ आले. मस्तकावर हात ठेवला. काय म्हणाले, क्षत्रियांचं तेज किती विलक्षण आहे. थोडासुद्धा अपमान क्षत्रियांना सहन होत नाही. हा लहान बालक आहे. पण सावत्र आई बोलली काय आणि याच्या मनावर इतका परिणाम झाला काय? अरण्यामधे हा निघाला आपल्या आईला सोडून.

नारद म्हणतात, ध्रुवा अरे, कोठे निघालास तू? या वयामधे मान अपमानाची कल्पना तुला कशी आली म्हणाले. हे काय मान अपमानाच्या कल्पनेमधे जर मन गुंतून राहीलं तर त्याला शांती कधीही मिळणार नाही. जी जी स्थिती आहे त्याप्रमाणे समाधान मानून राहिलं पाहिजे. कोणी सांगितलं तुला जायला वनामधे? आईने सांगितले आहे म्हणाला. आईला काय समजते काय? इतक्या लहान वयात तू वनात जाऊन काय करणार? मोठेमोठे ऋषी तपश्चर्या करतात, हजारो वर्षं. त्यांना देवाचं दर्शन होत नाही म्हणाले. तू जाऊन काय करणार? तपश्चर्या म्हणजे काय



करणार ? त्याची परीक्षा पाहताहेत नारदमहर्षी. चल म्हणाले माझ्याबरोबर. मी सांगतो तुझ्या बापाला. सिंहासनावर बसण्याची तुझी इच्छा असेल तर बैस म्हणाले. व्यवहारामधे कसं वागावं हे शिकलं पाहिजे. व्यवहार सोडून जाता येत नाहीये. निश्चय आपला टिकणारा आहे की नाही हे पाहिलं पाहिजे ना. अपमानामुळे तुला राग आलेला आहे. तर हा निश्चय तुझा टिकेल की नाही हा विचार तू केलास का ? व्यवहारामधे आपल्यापेक्षा श्रेष्ठ काही मंडळी असतात. आपल्या बरोबरीची मंडळी असतात. आपल्यापेक्षा कमी दर्जाची मंडळी असतात. तीन प्रकारची माणसं असतात. श्रेष्ठ मनुष्य भेटल्याबरोबर अत्यंत नम्रपणाने आणि आदरभावाने त्याच्याजवळ वागावं. आपल्याबरोबरीचा जो आहे त्याच्याशी प्रेमाने वागावं आणि आपल्यापेक्षा कमी दर्जाचे जे आहेत त्यांच्याशी दयावृत्तीने वागावे, त्यांना सहाय्य करावं. त्यांची संकटे दूर करण्यासाठी प्रयत्न करावा. असं जर वागणं आपलं ठेवता आलं तर कशाला त्रास होईल म्हणाले. घरदार सोडून अरण्यात जाण्याची गरज काय आहे म्हणाले. तेव्हा माझ्याबरोबर चल. तुला मी घेऊन जातो. पण ध्रुवाचा निश्चय झालेला आहे. हा निश्चय होण्याकरताच अनेक जन्म घ्यावे लागतात. ईश्वराचं दर्शन झालं पाहिजे. मागायचं आहे. काही न मागणं ही गोष्ट फार मोठी आहे. पण मागायचं झालं तर देवाशिवाय कोणालाही मी मागणार नाही. हाही मोठा निश्चय आहे. दाता एक रघुनंदन, तोच एक

समर्थ आहे. तोच एक आपल्या भक्ताची काळजी वाहण्यास योग्य आहे. सर्वच प्रकारांनी भक्ताला मुक्त करणारा समर्थ आहे. याप्रमाणे नारदांनी ध्रुवाला सर्व सांगितलं. माझ्याबरोबर चल म्हणाले. त्याला भीतीही घातली. अरण्यात जाऊन तू काय करणार? किती दिवस तुझा हा निश्चय राहिल म्हणाले. पण त्याचा पक्का निश्चय झालेला आहे. त्यानी सांगितलं की ऋषीमहाराज, आपण जो काही शांतीचा मार्ग मला दाखवलेला आहे, योग्य आहे. सुखदुःखामधेच जे गुंतलेले लोक आहेत अशा संसारी जीवांना हा मार्ग बरोबर आहे. त्यांनी असंच वागून समाधान मानलं पाहिजे. पण मला मात्र हे पटत नाहीये. ती सुरूची मला बोललेली आहे. माझा अधिकार नाही म्हणाली. मला परत यायचं नाही.

पदं त्रिभुवनोत्कृष्टं जिगीषोः साधु वर्त्म मे ।
ब्रूहि अस्मत् पितृभिर्ब्रह्मन् अन्यैरपि अनधिष्ठितम् ।।४.८.३७।। श्री. भा.

त्रिभुवनामधे जे सर्वश्रेष्ठ स्थान आहे ते मला मिळावं या इच्छेने मी निघालो आहे. आमच्या पित्याने किंवा बंधूंनी आपला अधिकार त्या स्थानावर सांगून उपयोग नाही. माझ्या मालकीचं स्थान मला मिळालं पाहिजे. हे उष्टंराज्य मी घेणार नाही. हे सिंहासन याच्यावर मला बसायचं नाही. अपमान झाला तरी तो अपमान इतका मनाला जाणवला पाहिजे की तिकडे लक्षसुद्धा नाही. हे एकप्रकारे वैराग्यच आहे. हे राज्य मी घेणार नाही म्हणाला. सांगा आपण. मार्गदर्शन तुम्ही करा. तुम्ही समर्थ आहात. तुम्ही मनावर घेतल्यावर मला अशक्य काय आहे? मैत्रेय सांगतात विदुरजी, नारदांना समाधान झाले. हा अधिकारी आत्मा आहे. ईश्वराचं दर्शन याला होणार. सांगितलं बाळ तुझ्या आईने जो मार्ग सांगितला तोच मार्ग आहे.

धर्मार्थकाममोक्षाख्यं य इच्छेच्छ्रेय आत्मनः ।
एकमेव हरेस्तत्र कारणं पादसेवनम् ।।४.८.४१।। श्री. भा.

संसारात राहून अपमान सहन केलाच पाहिजे. कोणाबरोबर कसं वागावं सगळं नारदांनी सांगितलं. नारद सांगताहेत, धर्म, अर्थ, काम, मोक्ष चारही पुरूषार्थ, हे परमात्म्याच्या कृपेने चालू आहेत. नारदांची पूर्ण कृपा झाली त्याच्यावर. आपल्या संकल्पाने त्या बालकाचा निश्चय जास्त दृढ केलेला आहे. आणि त्याला मार्गदर्शन केलेलं आहे. मधुवनामधे जा, यमुनातीरावर, त्रिकालस्नान करत जा आणि आसन घालून प्राणायाम वगैरे करून मन शुद्ध स्थिर करून घे. भगवान श्रीहरींच्या स्वरूपाचं ध्यान तू कर. सगळं सांगत गेलेले आहेत नारद. शब्दामधे केवढी शक्ती आहे. त्या

बालकावर कृपा नारदांनी केली. असे सद्गुरू, समर्थ सद्गुरू भेटणं हे कित्ती जन्माचं त्या ध्रुवाचं पुण्य आहे. ध्यान करत जा रोज म्हणाले. भगवंताचं स्वरूप त्यांनी वर्णन केलं. त्या स्वरूपाचं अखंड ध्यान तू सुरू केलंस की पूर्ण शांती तुला मिळेल. समाधान मिळेल. मंत्रदीक्षा त्याला दिली. द्वादशाक्षरमंत्राचा उपदेश त्याला केलेला आहे. याचा जर तू जप करशील तर सात दिवसामधे आकाशमंडलात संचार करणारे जे सिद्ध महात्मे त्यांची भेट तुला होईल. दर्शन होईल. काही मूर्ती, शीलामूर्ती, धातुची मूर्ती म्हणा कोणत्या तरी मूर्तींची पूजा तू करत जा. जे अरण्यामधे उपचार मिळतील, तुलसीपत्र, बेल, फुलं जे मिळेल त्यांनी देवाची पूजा करावी हेही त्याला सांगितले आहे. शरीराने, मनाने, वाणीने अखंड देवाची सेवा करण्याकडे तुझं लक्षं राहू दे. तू सेवा कर. म्हणजे भगवंताची तुझ्यावर कृपा होईल असा त्याला आशिर्वाद दिलेला आहे. जा म्हणाले. पूर्ण आशिर्वाद दिला नारदमहर्षींनी. निघून गेले नारद. राजधानीमधे गेले. ध्रुव बालकही अरण्यात निघून गेलेला आहे.

राजधानीमधे राजवाड्यात नारदमहर्षी आले. राजा अगदी खिन्न होऊन चिंताक्रांत होऊन बसलेला आहे. राजाला पश्चात्ताप झालेला आहे. ऋषीमहाराज माझा बालक तुम्हाला कुठे दिसला का? आपण कोठून आलात? अनाथ, कुठेतरी झोप लागली आणि हिंस्त्र पशूंनी खाऊन टाकले तर काय करायचं? काय माझा अपराध कित्ती झाला. ती स्त्री त्याला बोलली, मी तिकडे लक्षही दिले नाही. बिचारा माझ्या मांडीवर बसण्याची इच्छा करत होता. काही नाही तिकडे मी लक्ष दिले नाही. नारदांनी सांगितले, राजेसाहेब शोक करण्याचं तुम्हाला काय कारण आहे? तुमच्या मुलाचं संरक्षण तुम्ही करू शकला नाही ना? कोणीही कुणाचं संरक्षण करत नाही. तुमच्या मुलाचं संरक्षण करायला परमात्मा समर्थ आहे. त्याची कीर्ति जगामधे सर्वत्र पसरणारी आहे. तो लवकरच तुम्हाला येऊन भेटेल. राज्याकडे लक्ष नाही त्या उत्तानपाद राजाचं. पश्चात्ताप झालेला आहे. केव्हा आपला मुलगा परत येईल याची वाट पहातो आहे.

इकडे धृव बालक अरण्यामधे गेलेला आहे. संध्याकाळ झाली. मधुवनामधे यमुनानदीच्या तीरावर पोहोचलेला आहे. ऋषीमहाराजांनी काय काय सांगितले याचा मनामधे विचार केला. दुसरे दिवसापासून तपश्चर्येला आरंभ करण्याचं त्याने ठरविले. पहाटे उठलेला आहे. स्नान केलेलं आहे. परमेश्वराची पूजा त्याने केली. काही मूर्ती प्रतीक म्हणून पाषाण ठेऊन पूजा केली. त्याने आपला आहाराचा नियम ठरवलेला आहे.

त्रिरात्रान्ते त्रिरात्रान्ते कपित्थबदराशनः ।
आत्मवृत्ति अनुसारेण मासं निन्येऽर्चयन्हरिम् ।।४.८.७२ ।। श्री. भा.

शरीर आहाराशिवाय राहाणं शक्य नाही. अशी वस्तुस्थिती आहे. हा जो निश्चयी अशाप्रकारचा महात्मा जो आहे, ईश्वरदर्शनाची ज्याला तळमळ लागलेली आहे, त्याचं शरीराकडे लक्ष नाही. शरीराकडे लक्ष दिलं पाहिजे ही भावना अधिक जर झाली तर शरीराकडेच लक्ष रहाणार. औषध घ्यायला पाहिजे, पथ्यपाणी सांभाळायला पाहिजे, उत्तम चांगले पदार्थ खाल्ले पाहिजेत तरच शरीर राहिल. इकडेच जास्तीतजास्त लक्ष गेल्यानंतर ईश्वराचं चिंतन होणार केव्हा? ईश्वराच्या सामर्थ्याची कल्पना येणार कशी त्याला? संरक्षण करणारा ईश्वर आहे ही पक्की भावना कशी तयार होणार? औषधाने शरीर चांगलं राहील इकडेच लक्ष रहाणार. ध्रुवाने पहिल्या महिन्यामधे असा निश्चय केला, तीन दिवसांनी फलाहार करायचा. अन्न तर संपलेलं आहे. राजवाड्यातून ज्यावेळेला बाहेर पडला तो, त्यावेळेपासून अन्न मिळाले नाही त्याला. अरण्यामधे आल्यानंतर फळं वगैरे मिळत होती. पण त्याने ठरवले तीन दिवसानंतर चौथ्या दिवशी फलाहार करायचा. म्हणून नुसतं रोज फळं खाऊन राहिला नाही तो. एक महिना झालेला आहे. पूजा चालु आहे. ध्यान चालू आहे. मंत्रजप चालू आहे. सगळं चाललेलं आहे. तीन दिवसानंतर एकदा आहार आहे. तरीसुद्धा शरीरातील सामर्थ्य कमी झालेलं नाही. उत्साह, शक्ती आहे. मानसिक शक्ती याला कारण आहे. दुसऱ्या महिन्यामधे त्याने आहाराचा काल थोडा पुढे नेलेला आहे.

षष्ठे षष्ठे अर्भको दिने ।
तृणपर्णादिभिः शीर्णैः कृतान्नो अभ्यर्चयद्विभुम् ।।४.८.७३ ।। श्री. भा.

फल घेत होता ते सोडून दिलं. झाडावरून खाली पडलेली पानं वगैरे आहेत ती भक्षण करायची ती सुद्धा सहाव्या दिवशी. तिसऱ्यादिवसाऐवजी सहाव्या दिवशी. पाच दिवस काही नाही. आणि पुन्हा पूजाअर्चा, ध्यानधारणा सगळं चालू आहे. तिसरा महिना सुरू झाला. निश्चय आणखी वाढत गेलेला आहे. 'तपसंतापे' तप याचा अर्थ शरीर कष्ट पुष्कळ, वाट्टेल तितके झाले तरी शरीराची आस्था कमी कमी झाली पाहिजे. त्याशिवाय भक्ती नाही, कर्म नाही, ज्ञान नाही काही नाही. शरीरात्मभाव आपण अनेक जन्म पक्का केलेला आहे. शरीर म्हणजे मी आहे हे कमी झालं पाहिजे. शरीरापेक्षा निराळा कोणी आहे, सर्व चालक तो आहे. ही भावना उत्पन्न होण्याकरता हा प्रयत्न आहे. तिसऱ्या महिन्यामधे त्याने ठरविले फल नाही, पानं नाही काही घ्यायचं नाही. पाणी

तेवढं घ्यायचं. ते सुद्धा नवव्या दिवशी घ्यायचं. आठ दिवस पाणीसुद्धा नाही. सर्व कामं चालू आहेत व्यवस्थितपणाने. तपश्चर्या चालू आहे.

चतुर्थमपि वै मासं द्वादशे द्वादशेऽहनि ।
वायुभक्षः जितश्वासः ध्यायन्देवमधारयत् ।।४.८.७५।। श्री. भा.

चवथा महिना चालू झाला. पाणीही चौथ्या महिन्यात बंद केलं. बारा दिवसानंतर एकदा वायूचा आहार करायचा. वायूचा आहार करता येतो. त्यामुळे शरीर रहातं याची कल्पनासुद्धा आम्हाला नाहीये. वायु आत घ्यायचा म्हणजे श्वासोच्छ्वास बारा दिवस बंद असला पाहिजे. बाराव्या दिवशी श्वास घ्यायचाय. म्हणजे ही भूमिका त्याला मिळालेली आहे. कुंभक सिद्ध झालेलं आहे. प्राण स्थिर झालेला आहे. मनही स्थिर झालेलं आहे. बारा दिवसापर्यंत काही नाही. श्वासोच्छ्वास जोपर्यंत चालू आहे, प्राणवायूची क्रिया जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत शरीराला अन्न आणि पाणी याची जरूरी आहे. त्याशिवाय राहू शकत नाही. प्राणवायूचं चोवीस तास काम चाललेलं आहे. म्हणून भूक लागते, तहान लागते. ती प्राणाची क्रिया ज्यांची बंद झालेली आहे त्याला तहान कुठली व भूक कुठली ? नऊ दिवसांनी काय बारा दिवसांनी काय ? किंवा महिन्याने काय, त्याला कशाची अपेक्षाच नाहीये. श्वासजय झालेला आहे, प्राणजय झालेला आहे. परमेश्वराचं ध्यान अखंड चालू आहे. मन स्थिर झालेलं आहे. पाचवा महिना सुरू झाला. सर्व विश्वाला आधारभूत जो परमात्मा आहे त्याचं चिंतन चाललेलं आहे. दुसरं काही नाही, लक्ष कुठेही नाहीये. भगवंताच्या स्वरूपाचं अखंड चिंतन आहे.

आधारं महादादीनां प्रधानपुरूषेश्वरम् ।
ब्रह्म धारयमाणस्य त्रयो लोकाश्चकम्पिरे ।।४.८.७८।। श्री. भा.

सर्वही विश्वाला आधारभूत परमात्मा जो आहे तिकडे त्याचं चित्त गेले. अत्यंत शुद्ध चित्त झाल्यामुळे त्या सूक्ष्मस्वरूपाचं तो चिंतन करू शकतो.

श्वास बंद झालेला आहे. सर्व देवांचे श्वासोच्छ्वास बंद होण्याची पाळी आलेली आहे. समष्टीशी एकरूप त्यांचं चित्त झालं,त्याचा परिणाम समष्टीवर झालेला आहे. देव सगळे घाबरले वैकुंठ लोकाला गेले. भगवंतांना प्रार्थना करताहेत. काय झालं आम्हाला माहिती नाही म्हणाले आम्हाला काही श्वासोच्छ्वास घेता येईना. भगवंतांनी सांगितले, मी निघालो म्हणाले आता. त्या बालकाचा श्वास बंद झाल्यामुळे तुमचे बंद झाले म्हणाले. स्वतःशी एकरूप त्याचं चित्त झालेलं

आहे. भिऊ नका, त्याला मी वरप्रदान करण्याला निघालो, म्हणून भगवान निघाले आहेत. सर्व देवमंडळी आपल्या लोकांना निघून गेली. मधुवनामधे भगवान श्रीहरी प्राप्त झालेले आहेत. हा डोळे झाकून उभा राहिलेला आहे. चिंतन चाललेलं आहे अखंड. सगुण स्वरूप काय, निर्गुण स्वरूप काय जे मनामधे येईल तिथं चित्त स्थिर आहे. मनात कोणती वासना नाहीये ना. हे योग्य हे अयोग्य आहे काही नाही, त्या मनाची सगळी एकंदर वासना संपलेली आहे. निर्वासन अंतःकरण झालं, पूर्ण स्थिर झालं. कोणत्याही स्वरूपाचं ध्यान जरी मनाने केलं तरी त्याबद्दल काही नाही. चित्त स्थिर आहे. डोळे झाकून उभा राहिलेला आहे.

भगवान समोर येऊन उभे राहिलेले आहेत. काही लक्ष नाही. भगवंतांनी त्याच्या बुद्धिमध्ये प्रवेश केला. आत जे स्वरूप होतं ते एकदम नाहीसे झाले,दिसेनासे झाले. ज्या सगुण स्वरूपाचं ध्यान तो करीत होता यावेळेला, ते स्वरूप दिसेनासं झाल्याबरोबर एकदम त्याने डोळे उघडले. बाहेर तेच स्वरूप आहे. आनंद झाला. साष्टांग नमस्कार त्या ध्रुवाने केलेला आहे. भगवंतांनी आपल्या हातातला शंख त्याच्या गालाला लावलेला आहे. स्पर्श केला थोडासा. त्या स्पर्शामुळे त्याला दिव्य ज्ञान उत्पन्न झालेलं आहे. त्या अवस्थेमध्ये त्या ध्रुवाने पुष्कळ स्तुती केलेली आहे. तपश्चर्या झाली, पण तपश्चर्येचा कर्ता परमात्मा आहे. मी तपश्चर्या केलेली नाही, ही पहिली भावना त्यानी व्यक्त केली. शरीर आहे, इंद्रिय आहे, वाणी आहे, प्राणवायू आहे ही सगळी साधनं पाहिजेत ना तपश्चर्येलाअनुकूल, त्याशिवाय तपश्चर्या कशी होणार ? पण ही सगळीही साधनं, यांचे सगळे व्यवहार बंद करून वृत्ती सगळी यांची बदलून आपल्याकडंसर्व आपण लावून घेतलं हे! ही आपली शक्ती आहे! अंतर्यामी आपण आहात, शरीरामध्ये प्रवेश करून सर्व इंद्रियांना मनाला, प्राणवायूला सगळ्यांना प्रेरणा आपण केलीत. त्यामुळे ही तपश्चर्या घडलेली आहे. हे कर्तृत्व आपलं आहे, हे दिव्य ज्ञान आहे, हे खरं ज्ञान आहे. अहंकार पूर्ण गेलेला आहे त्या ध्रुवाचा! आपले जे भक्त आहेत, त्या भक्तांची संगती मला निरंतर घडावी आणि आपली भक्तिही दृढ व्हावी, अशी पुष्कळ स्तुती त्याने केलेली आहे. भगवान श्रीहरी सांगताहेत त्याला, ध्रुवा, तुझी इच्छा मला समजलेली आहे. तुला काय उच्च स्थान पाहिजे ना रहायला ? ती सगळी योजना झालेली आहे बाळ! सर्व सप्तर्षी, नवग्रह, सर्व नक्षत्रमंडळ हे ज्या स्थानाला प्रदक्षिणा करताहेत, फिरताहेत सारखे. असं जे ध्रुवपद आहे, ध्रुव म्हणजे स्थिर रहाणारं. सर्वांना क्रिया आहे. ध्रुवपद मात्र निष्क्रिय आहे, स्थिर आहे. शेतामधे खांब असावा, त्याला बैल बांधलेलेत, मळणी चाललीय, ते त्याच्यासमोर फिरताहेत. तो खांब आपला पक्का आहे. तसं जे ध्रुवपद आहे, सर्व त्या ध्रुवपदाला प्रदक्षिणा करताहेत, फिरताहेत.

ते स्थान तुझ्याकरता आहे म्हणाले. तू जाऊन तिथे रहा. तुझा बंधू उत्तम जो आहे, सावत्र भाऊ, तो शिकारीकरता गेलेला असताना, एक यक्ष त्याला ठार मारणार आहे. आपल्या मुलाचा शोध घेण्याकरिता त्याची माता तुला जी बोललेली आहे सुरूची, ती त्याचा शोध करण्याकरता वनामधे जाईल आणि चारी बाजूला पेटलेल्या दावाग्निमधे तिचं शरीर भस्म होऊन जाईल. तुझा पिता, हाही वनामधे जाईल. जाताना हे सगळं राज्य तुलाच अर्पण करून जाईल. तुला कोणालाही काही मागावं लागणार नाही. हे राज्यही तुलाच मिळणार आहे आणि शेवटी ध्रुवपद आहे त्या मधे जाऊन तू रहा. माझं चिंतन कर. म्हणजे तुला शांती प्राप्त होईल. वरप्रदान करून भगवान अंतर्धान झाले.

हा ध्रुव राजधानीकडे जाण्याकरता निघाला. परंतु त्याच्या मनाला अत्यंत पश्चात्ताप झालेला आहे, नारदांनी मला सांगितलं होतं. माझ्या लक्षामधे आलं नाही. सावध रहा ध्रुवा, तुझ्या बुद्धीचा भेद करतील हे सगळे देव! बुद्धी बदलून टाकतील. देवाजवळ काय मागायचे? यावेळेला सावध रहा. पण माझी बुद्धी बदलली, काय मागून घेतलं मी? संसारबंधनातून मुक्त करणारा परमात्मा दर्शन देण्याकरता, वर देण्याकरता आलेला असताना मी संसारच त्याच्याजवळ मागून घेतला म्हणाले, काय आता! शांत अविनाशी अशा प्रकारचं ध्रुवपद झालं तरी ते जाणारच आहे ना! तेच मी मागून घेतलं. मायेचा मोह मोठा कठीण आहे. आईने सांगितलं होतं निघताना, नारदांनीही सांगितलं होतं. कुणाच्याबद्दल मनामधे मान–अपमान, काहीही विचार ठेऊ नको दुसरा. निर्विकार मनाने, शुद्ध मनाने परमेश्वराची सेवा तू कर! आईने सांगितले, हेही माझ्या लक्षात राहिलं नाही. आता काय करायचं काय? हा जन्म असेपर्यंत इथं रहायला पाहिजे. पुण्य झालं तरी पुण्यात्मक पाप म्हणतात ज्ञानेश्वर महाराज. पापात्मक पाप आणि पुण्यात्मक पाप असे दोन भाग त्यांनी पापाचेच केले आहेत. पुण्य सुद्धा पापच आहे. तपश्चर्या एवढी मोठी केली ध्रुवाने, किती पुण्य असेल, पण शेवटी शरीर धारण करून त्याला संसारातच राहण्याची पाळी आली आहे, म्हणजे पापच झालं. निघालेला आहे, राजधानीच्या बाहेर आला आहे. ध्रुव आलेला आहे ही बातमी येऊन त्या नोकरांनी सांगितली. राजेसाहेबांना आनंद झाला. सर्व मंडळींना बरोबर घेऊन राजेसाहेब बाहेर पडलेले आहेत. हत्तीवर अंबारीमधे ध्रुवाला बसवलेले आहे. त्याला घेऊन आलेले आहेत. सर्व मंडळी त्याचा जयजयकार करताहेत. मातेचं दर्शन झालं. ध्रुवाने आल्याबरोबर, आपल्या दोन्हीही मातांना नमस्कार केला. सावत्र – सख्खी हे काही मनामधे आणलं नाही. त्या सुरूचीने सुद्धा त्याला प्रेमाने जवळ घेतलं, आशिर्वाद दिलेले आहेत त्याला. भगवान श्रीहरी ज्याच्यावर प्रसन्न झाले, त्याच्याबद्दल त्या सुरूचीच्या मनात तरी कशाला ईर्षा, द्वेष राहिल? सर्वही त्याच्यावर अगदी

प्रेम करणारे आहेत. भाऊ-भाऊ भेटले, उत्तम-ध्रुव. याप्रमाणे, पुष्कळ काळ गेलेला आहे. सर्वांनी त्याचा सत्कार केला.

बराच काल गेल्यानंतर. उत्तम शिकारीला गेला असताना एका यक्षाने त्याला मारलं, त्याची माता त्याचा शोध करण्याकरिता गेली, तिचाही नाश झालेला आहे. राज्य ध्रुवाला दिलं, आणि उत्तानपादराजा, विरक्त होऊन वनामधे भगवंताची आराधना निरूपाधिक रितीने करण्याकरता बाहेर पडलेला आहे. ध्रुवाचा विवाह झाला. शिशुमार प्रजापतीची कन्या, भ्रमी हिच्याबरोबर विवाह झाला. दुसरा विवाह वायूकन्या इला हिच्याबरोबर विवाह झाला. उत्कण नावाचा त्याला पुत्र झाला. उत्तमाचा अद्यापि विवाह झालेला नव्हता. तो अरण्यामधे गेलेला असताना कुबेराचा सेवक एका यक्षाने त्याला ठार मारलं. ती सुरूचीही दावाग्नीमधे जळून गेली. हे ध्रुवाला समजल्याबरोबर ध्रुवाला राग आलेला आहे. तो बाहेर पडला. कुबेराच्या नगराजवळ तो आलेला आहे. आपल्या बंधूला ज्या यक्षाने मारलं त्या सर्व यक्षांचा संहार करायचा असा त्याने निश्चय केलेला आहे. सगळे यक्षही बाहेर आलेले आहेत. लाख-सव्वालाख यक्ष बाहेर आले. त्यांचं आणि ध्रुवाचं युद्ध सुरू झालेलं आहे. ध्रुवानेही अनेक अस्त्रांचा प्रयोग करून पुष्कळ यक्ष मारलेले आहेत. त्याचे पितामह म्हणजे मनुराजा, त्या रणभूमीवर आलेले आहेत आणि ध्रुवाला त्यांनी सांगितलं, ''बाळ, काय चालवलंय तू हे? पाच वर्षाच्या वयामधे अरण्यामधे जाऊन, धैर्याने, निश्चयाने भगवंतांना तू प्रसन्न करून घेतलंस आणि आता रागाने इतक्या लोकांना मारतोस? काही विचार केलायसं का तू? अरे हे यक्ष. यक्षांचा जो स्वामी आहे कुबेर, हा जर रणभूमीवर आला तर? त्याच्याशी युद्ध तू करू शकशील काय? कारण कुबेराचे मित्र कोण आहेत तुला माहिती आहे की नाही? भगवान शंकर मित्र आहेत. कुबेरही युद्धामधे गेल्यानंतर शंकरही त्याच्याबरोबर त्याला सहाय्य करण्याकरता येणार, तुझी काय अवस्था होईल? हा विचार कर. हा द्रोह मनामधे उत्पन्न होणे हे भक्तिमार्गाला मोठं प्रतिबंधात्मक आहे, विघ्न आहे. तेव्हा हे सोडून दे तू.'' असा उपदेश केला नातवाला, त्या मनुराजाने. ध्रुवानेही युद्ध थांबवलेलं आहे. मनुराजा निघून गेलेला आहे. ध्रुवाने युद्ध बंद केलेलं ऐकल्याबरोबर तो कुबेर बाहेर आलेला आहे. येऊन भेटला. ध्रुवाला त्याने सांगितलं, तुझ्या पितामहाच्या आज्ञेप्रमाणे आमचं वैर तू सोडलंस. बरं झालं म्हणाले, चांगलं झालं. मला समाधान झालं. काय पाहिजे तो वर मागून घे माझ्यापासून. कुबेराने सांगितलं, बाबा, मनामधे जर द्वेष उत्पन्न झाला तर त्याचं कारण म्हणजे ही द्वैत बुद्धी कारण आहे! तू आमच्या यक्षांना मारलेलं नाहीस आणि आमच्या यक्षांनी तुझ्या भावाला मारलेलं नाही हे अगोदर मनामधे पूर्ण आण. कोणी

मारलं मग ?

काल एव हि भूतानां प्रभुः अप्ययभावयोः ।। ४.१२.३ ।। श्री.भा.

सगळ्याला उत्पन्न करणारा, सगळ्यांना मारणारा तो कालात्मा श्रीहरी आहे – त्याच्या इच्छेनं जन्म येतो, त्याच्या इच्छेनं मृत्यू आहे. कोणीही मारणारा नाही आणि कोणीही तारणारा नाही. एक परमेश्वर आहे. ही भावना तू मनामधे ठेवलीस म्हणजे वैर नाहीये. कोणाचाही द्वेष उत्पन्न होणार नाही. जा म्हणाले, राज्य वगैरे कर. ध्रुवाने अंतःकरणामध्ये भगवद्भक्ति स्थिर रहावी, भक्तांची संगती मला व्हावी, असा वर मागितला. कुबेराने तो वर दिलेला आहे आणि कुबेर निघून गेला. ध्रुव आपल्या राजधानीमधे आला. अनेक यज्ञ त्याने केलेले आहेत. शेवटी मुलांच्या स्वाधीन राज्य केलं. बद्रिकाश्रमामधे ध्रुव येऊन पोहोचलेला आहे. भगवंतांची उपासना चालू आहे. संसार करून सोडलेला आहे. अगोदर सोडलेला नाही. दुसऱ्याचा संसार, दुःख पाहून सोडणं आणि स्वतः त्याचा अनुभव घेऊन सोडणं ह्याच्यामधे पुष्कळ अंतर आहे. त्यामुळे, संसाराची आसक्ती चित्तामधे नाही. आता भगवंताकडे लक्ष लागलेलं आहे. मनामधे काही वासना राहिलेली नाही. अशी त्याची उपासना चालू असताना, एके दिवशी, एक विमान, आकाशमंडलातून खाली आलेलं आहे. नंद, सुनंद दोन हरीदास ते विमान घेऊन आलेले आहेत. त्यांनी सांगितलं, राजेसाहेब, आपल्याला ध्रुवपदाला पोहोचविण्याकरिता हे विमान भगवान श्रीहरींनी पाठवलं आहे. आम्हाला पाठवलेलं आहे. चला आपण, तुम्हाला तिथे नेऊन पोहोचवितो. आपण स्वतः प्रयत्न करून भगवद्भक्तिच्या प्रभावानी आपण हे ध्रुवपद मिळवलेलं आहे म्हणाले, त्याच भगवंताची सेवा आम्ही करतो, त्याचे सेवक आहोत, आपल्याला नेण्याकरता आलेलो आहोत. हे विमान आणलेले आहे. बसा ह्याच्यामध्ये. मग ध्रुवाने स्नान केलं, त्याठिकाणी असलेल्या सर्व ऋषीमंडळींना वंदन केलेलं आहे. त्यांचे आशीर्वाद ग्रहण केले. ते जे हरीदास दोघे आलेले होते. त्यांनाही वंदन केलं. विमानालाही वंदन केलेलं आहे. त्याच्यामध्ये बसण्याकरता ध्रुव आलेला आहे. त्यावेळेला, तो मृत्यु आला जवळ, राजेसाहेब, हे शरीर माझं आहे म्हणाला, हे शरीर घेऊन कसं जाता? ऐकून घेतलं ध्रुवाने

मृत्योर्मूर्ध्नि पदं दत्त्वा आरुरोहाद्भुतं गृहम् ।। ४.१२.३० ।। श्री.भा.

त्या मृत्यूच्या डोक्यावर पाय ठेऊनच तो त्या विमानामधे चढलेला आहे. सामर्थ्य आहे ना! मृत्यु मुकाट्याने निघून गेलेला आहे. देवांची दुंदुभी वगैरे वाजलेल्या आहेत, पुष्पवर्षाव सर्वांनी त्याच्यावर केलेला आहे. ते विमान निघालेलं आहे. एकदम त्याला आपल्या आईची आठवण

झाली. सुनीतीही तिथं असली पाहिजे. त्याच्याबरोबर बद्रिकाश्रमामधे आलेली असली पाहिजे. आपल्या आईला बरोबर घ्यायचं विसरलो म्हणाले मी! काय करावं आता? ते जे नंद-सुनंद हरीदास होते, त्यांनी सांगितलं, राजेसाहेब दुसरं एक विमान समोरून निघालेलं आहे, ते पहा. त्यात आपल्या माताजी आहेत. आपल्याबरोबरच त्या येणार आहेत. आनंद झालेला आहे त्याला. असं ते विमान निघालेलं आहे. सर्व लोकामध्ये आलेलं आहे. सर्व देवांनी त्याचा सत्कार केलेला आहे. मधे मधे, ज्या ज्या पुण्यशील लोकांमधे तो गेला, तिथे सर्वांनी त्याचा सत्कार केला आणि सर्वांच्या उच्चस्थानी असलेलं, जे ध्रुवपद त्या ठिकाणी येऊन हा ध्रुव बालक रहायला आलेला आहे. त्याची माताही त्याच्या सन्निध आहे. नारदांनी आपल्या त्या शिष्याचा प्रभाव स्वतः वर्णन केला. पतिव्रता सुनीती माता त्या ध्रुवाची, काय हिचं पुण्य आहे! काय तप आहे! त्यामुळे तिच्या मुलाला अशा प्रकारचं स्थान मिळालं, भगवंताची कृपा झालेली आहे. हे स्थान दुसऱ्या कोणाला मागून मिळणार नाही. पाच वर्षाच्या वयामधे अपमान झाल्यामुळे घरदार सर्व सोडून देऊन, सर्वांचा स्नेह टाकून देऊन, जो हरीच्या कृपेकरता बाहेर पडलेला आहे, भगवंताची आराधना करून त्याची कृपा ज्याने संपादन केली, असा हा ध्रुव बालक, हा ही मोठा पुण्यशील आहे. ह्याच्यासारखं तप करणारा कुणीही मला दिसला नाही असं नारदांनी एका यज्ञामधे उद्गार काढलेले आहेत. असं हे ध्रुवाचं चरित्र मैत्रेय महर्षींनी विदुरजींना निवेदन केलं.

ह्याच्यानंतर आता पृथु राजाचं चरित्र सांगताहेत, बालकाचं चरित्र झालं. तरूण अशा प्रकारच्या पृथु राजाचं चरित्र सांगताहेत. वेनराजा नावाचा अधार्मिक राजा झालेला आहे, अंगराजाचा मुलगा. अत्यंत अधर्माने वागणारा, सर्वांना त्रास देणारा, ऋषीमंडळींच्या शापाने तो गतप्राण होऊन पडलेला आहे. पुन्हा सर्वांच्या आग्रहाने ऋषीमंडळी राजवाड्यामधे आली. त्याच्या दोन्ही बाहूंचं, हस्ताचं मंथन करून पृथु राजा आणि अर्चि नावाची स्त्री, हे दोघेही निर्माण झाले. कोणी राज्याला अधिकारी पाहिजे होता ना! ऋषी मंडळींच्या मंत्रप्रभावाने परमेश्वरानीच हा अवतार धारण केला. सर्वांना आनंद झाला, पृथु राजाला राज्याभिषेक त्या सर्व ऋषींनी केलेला आहे. सर्व मंडळी, प्रजाजन मंडळी पृथु राजाच्या जवळ आलेली आहेत. त्यांनी प्रार्थना केली, राजेसाहेब, आम्हाला अन्न नाहीये, धान्य नाहीये, काहीतरी व्यवस्था आपण करा. अशी प्रार्थना सर्व प्रजाजनांनी केलेली असताना, पृथु राजाने विचार केला की ह्याला कारण कोण आहे म्हणाले, धान्य का निर्माण होत नाही? ही पृथ्वीच ह्याला कारण आहे. धान्य देत नाही म्हणाले. वसुमती हिला म्हणतात. सर्व धनधान्य हिच्यापासून मिळायचं, आणि तिनं धान्य देऊ नये? राग आलेला आहे. पृथु राजा

धनुष्यबाण घेऊन पृथ्वीला शासन करण्याकरता बाहेर पडलेला आहे. काय राजाचं सामर्थ्य किती विलक्षण आहे. पंचभूतं ही सुद्धा जीवच आहेत. पृथ्वी म्हणजे नुसती जमीन असं नाहीये. त्याची देवता आहे ती भूदेवी आहे. सीतादेवीची माता आहे. सीतादेवीचा अपमान झाला, कैकेयी बोलली म्हणे शेवटी! सगळं झालं होतं. त्याग झाला होता, अरण्यामधे वाल्मिकी ऋषींनी तिला ठेऊन घेतलं, दोन मुलं झाली, मोठी झाली. त्यांना सगळं वाल्मिकी ऋषींनी सगळं शिकविलेलं आहे, त्यांच्या सांगण्याप्रमाणे, पुन्हा सीतेचा स्विकार केलेला आहे. भावार्थ रामायणामध्ये एकनाथ महाराजांनी सगळं दिलेलं आहे. असं सगळं व्यवस्थित चालू असताना भर सभेमधे ती कैकेयी बोलली. ती म्हणाली, रावणाच्या घरात राहून आलेली, तिला कशाला घेतलं म्हणाले या रामाने ? काय जरूर होती आता? अतिशय वाईट वाटलं सीतादेवींना. आपल्या मातेला हाक मारती आहे ती. ती भूदेवी, भूमीतून वर आलेली आहे, सिंहासन घेऊन. आपल्या मुलीला बरोबर घेतलं अन् गेली. म्हणजे, केवळ भौतिक नाहीये. भूतांचाही असलेला एक जीवात्मा निराळा आहे. ईश्वराने त्याची नेमणूक केली आहे. पंचमहाभूतांचं स्वामित्व धारण करणारे, पंचमहाभूतं हे ज्यांचं शरीर आहे, अशा प्रकारचे ते पुण्यवान जीवात्मे आहेत. पण मोठे समर्थ आहेत. यांच्यावरही या राजे लोकांचा अधिकार आहे. अन्याय जर झाला, तर त्या पंचमहाभूताला सुद्धा शासन करण्याचं सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. त्यांच्या चारित्र्याने, तपाने सगळं सामर्थ्य आहे.

पृथ्वीला शासन करण्याकरता राजा निघालेला आहे. ती गाईचं रूप धारण करून पळती आहे पुढं राजा तिच्या पाठीमागं लागलेला आहे. देव लोकामधे ती गेली, इंद्रालाही तिच्याकडं लक्ष देता आलं नाही, शासन करणाऱ्यांच्या विरूद्ध कोण वागणार ? सर्व एकंदर लोकामधे ती फिरून आलेली आहे. शेवटी त्या भूमीनं प्रार्थना केली, राजेसाहेब, देव आहात आपण, परमेश्वर आहात, पूर्वी वराह अवतार आपणच धारण केलात. मी रसातळामधे गेलेले होते. मला आपणच बाहेर काढलंत, हिरण्याक्षाबरोबर युद्ध केलंत, त्याचा आपण नाश केलात. माझं संरक्षण केलंत आणि आज आपणच मला मारणार ? मी स्त्री आहे हाही विचार तुमच्या मनामधे नाही ? राजाकडून स्त्री-हत्या झाली, हे शास्त्राच्या विरूद्ध नाही का होणार ? पृथु राजा म्हणाला, स्त्री-पुरूष हा भेद मी मानत नाही. अन्यायी जो आहे त्याला शासन करणं माझं कर्तव्य आहे. तिनं सांगितलं, मला तुम्ही मारल्यानंतर पाण्यावर तुम्ही कसे रहाल ? पृथ्वीच्या आधाराने तुम्ही राहू शकता ना ? त्याने सांगितलं, माझं सामर्थ्य आहे, माझ्या योग सामर्थ्याने मी माझ्या प्रजाजनांसह वर्तमान पाण्यावर सुद्धा राहू शकतो. तुला काय करायचंय ते? तुला मी शासन केल्याशिवाय राहाणार नाही. अन्याय

करतेस, संपूर्ण बीज सगळं तुझ्यामधे टाकताहेत ते. त्याचं धान्य तू त्यांना देत नाहीस. मग भूदेवीनं सांगितलं हे सगळे दैत्य उत्पन्न झाले. त्यांनी सगळं धान्य बीज न्यायला सुरूवात केली, यज्ञाकरता पाहिजे म्हणून, माझ्या ठिकाणी ते सगळं बीज आणखी विलीन झालेलं आहे. दुधाच्या रूपाने मी तुम्हाला देते म्हणाली, घ्या. ह्या रूपाने तुम्ही माझं दोहन करा. एक वासरू पाहिजे आणि धार काढणारा एक पाहिजे. म्हणून मग त्यांनी मनुराजाला बोलावलं. मनुराजा तिथे आलेला आहे. धार काढली आहे. दुग्ध रूपानी घेतलं. पुष्कळ लोकांनी, देवांनी, ऋषींनी, दैत्यांनी सगळ्यांनी आपल्याला जे जे पाहिजे ते दुग्धरूपाने त्या पृथ्वीपासून ग्रहण केलेलं आहे. आणखी एक कारण त्या भूदेवीनं सांगितलं की, डोंगर पुष्कळ झाले म्हणाली, माझ्या ठिकाणी पावसाचं पाणी स्थिर रहात नाही शेतामधे. त्यामुळे धान्य होत नाही. मग त्याने आपल्या अनुष्ठानाने सबंध डोंगर वगैरे साफ केलेले आहेत. उत्तम जमीन तयार केली. धान्य वगैरे उत्पन्न व्हायला लागलेलं आहे. लोकांना रहाण्याकरता उत्तम प्रकारची नगर रचना करून दिली. लहान-मोठी गावं बांधून दिलेली आहेत. पूर्वी कुठेतरी लोक अरण्यात वगैरे रहात होते. पृथु राजाने सर्व योजना ही केली. सर्व प्रजाजनांना धान्य मिळतंय. त्यांची सगळी व्यवस्था झालेली आहे. सर्वांना अत्यंत आनंद झाला.

मग पृथुराजाने शंभर अश्वमेध यज्ञ करण्याचं ठरवलेलं आहे. भगवान श्रीहरी प्रसन्न व्हावे, त्यांची कृपा मिळावी याकरता. पण इंद्राला भीती उत्पन्न झाली. शंभर अश्वमेध यज्ञ ज्यांनी केले, तो इंद्र होतो. त्यावेळी जो इंद्रपदावर होता त्या इंद्राला भीती उत्पन्न झाली, हा पृथु राजा शंभर अश्वमेध यज्ञ करणार आणि हा जर माझ्या आड आला तर, हा इंद्र झाला तर मला लगेच या पदावरून खाली यावं लागेल. अशी काही भिती उत्पन्न झाली. वास्तविक पृथु राजा काही इंद्रपदाकरता यज्ञ करत नव्हता. त्या यज्ञातला अश्व इंद्राने हरण केलेला आहे. इंद्र अश्व घेऊन निघाला. अत्रि ऋषिंची दृष्टी त्याच्यावर पडली. पृथु राजाच्या मुलाला त्यांनी सांगितलं, हा अश्व घेऊन ये म्हणाले, यज्ञ बंद पडेल. मुलगा त्याच्या पाठीमागे लागलेला आहे. एका अरण्यामधे, तो अश्व फिरतो आहे. एक ऋषीमहाराज डोळे झाकून बसलेले आहेत. त्या मुलांने तो अश्व घेतला. यज्ञमंडपामधे आणून तो ऋषींच्या स्वाधीन केला. अत्रिऋषींना सांगितलं, महाराज अश्व चोरणारा कोणी तिथं मला भेटलं नाही. तिथं कोणी ऋषी डोळे झाकून स्वस्थ ध्यान करत बसले होते. अत्रि ऋषी म्हणाले, तोच चोर आहे. तू फसलास म्हणाले, तोच इंद्र आहे. तुला त्याने आपलं रूप ऋषींच्या रूपात दाखवलं. असा बऱ्याच वेळा त्या इंद्राने प्रयत्न केलेला आहे. एकदा मिळाला नाही अश्व, पुन्हा अश्व घेऊन गेला. पुन्हा अत्रिऋषींनी त्या मुलाला पाठविले. पृथु राजाच्या कानावर ही

बातमी गेली. इंद्र आमच्या यज्ञामधे गडबड करतो आहे. त्याला राग आलेला आहे. तुमचा तुमचा अधिकार सांभाळून रहायचं. आम्ही मृत्युलोकामधे येऊन यज्ञ करतो, आमच्या कार्यामधे प्रतिबंध करण्याचं कारण काय? देवांचा राजा असला म्हणून काय झालं? इंद्राला शिक्षा करायची. राजा उठला धनुष्यबाण घेऊन. ऋषीमंडळी म्हणाली, राजेसाहेब, तुम्ही यज्ञाची दीक्षा घेतलेली आहे. तुम्हाला याठिकाणी दुसऱ्याची हत्या करता येणार नाही. आम्हाला सांगा तुमचा कोण शत्रु आहे. आम्ही या यज्ञकुंडामधे आणून टाकतो. ऋषीमंडळी मंत्रबलाने इंद्राला त्या अग्निकुंडात आणून टाकणार असा प्रसंग आलेला आहे.

भगवान श्रीहरी यज्ञमंडपामधे प्रगट झालेले आहेत. पृथु राजाला सांगितलं, राजा, कशाला आहे यज्ञाचा आग्रह तुला. शंभर अश्वमेध यज्ञ झाले पाहिजेत हा आग्रह करायचा तरी कशाला? पाप झालं पाहिजे हाही आग्रह उपयोग नाही, पुण्य झालं पाहिजे हाही आग्रह उपयोग नाही. जे घडेल ते घडेल. तर ते कर्म शुद्ध कर्म होते. ईश्वरार्पण बुद्धीने पाप होऊ दे की पुण्य होऊ दे. शंभर अश्वमेध यज्ञ करून तुला काय इंद्र व्हायचं आहे का? मग कशाला हे करतो? त्या इंद्रालाही बरोबर आणलं होतं भगवंतांनी. इंद्राने क्षमा मागितलेली आहे. पृथु राजाही त्याला भेटलेला आहे. दोघे मित्र झाले आहेत. भगवंतांची मोठी भक्ती पृथु राजाच्या अंतःकरणामधे आहे. भगवंतांनी त्याला वर दिलेला आहे. सनत्कुमारांचं मार्गदर्शन तुला मिळेल. त्यामुळे तू मुक्त होशील. यज्ञ समाप्त झालेला आहे. शंभर अश्वमेध यज्ञ पूर्ण झालेले आहेत त्याचे. राज्य उत्तम चाललेलं आहे. म्हणजे इंद्रालासुद्धा शासन करू शकणारा समर्थ राजा पृथ्वीवर रहाणारा होता. धर्ममर्यादा पालन करणारा जो आहे, तो कुणालाही शासन करू शकतो. अन्यायाचं शासन त्याच्याकडून होतं. भगवंतांच्या आदेशाप्रमाणे एकेदिवशी राजवाड्यामधे आकाशमंडलातून सनक, सनंदन, सनतकुमार चौघे कुमार आलेले आहेत. राजानी त्यांची पूजा केली. सुवर्णसिंहासनावर चौघेही बसलेले आहेत. त्याने प्रार्थना केली असताना त्या कुमारांनी त्याला उपदेश केलेला आहे. राजा, भगवंताच्या भक्तीकडे तुझं अंतःकरण स्थिर झालेलं आहे, चांगला मार्ग आहे. ती भगवद्भक्ती तू करत रहा. काय पाहिजे म्हणाले, संसारबंधनातून मुक्त होण्याकरता दोनच गोष्टींची जरूरी आहे, ते सनतकुमार सांगताहेत,

शास्त्रेष्वियानेव सुनिश्चितो नृणां
क्षेमस्य सध्र्यग्विमृशेषु हेतुः ।
असङ्ग आत्मव्यतिरिक्त आत्मनि
दृढा रतिर्ब्रह्मणि निर्गुणे च या ।। ४.२२.२१ ।। श्री. भा.

दोन साधनं आहेत मुक्त होण्याकरता. परमात्म स्वरूपापेक्षा जे निराळं आहे ते सर्व पंचभौतिक, याच्याबद्दल कुठेही मनाची आसक्ती उत्पन्न होऊ नये, असंग पाहिजे. आणि सगुण असो किंवा निर्गुण असो त्या परमात्म रूपाच्या ठिकाणी पूर्ण प्रेम अंतःकरणामध्ये उत्पन्न झालं पाहिजे. ही दोनच साधनं आहेत म्हणाले, त्यामुळे मुक्ति प्राप्त होते. असा उपदेश त्यांनी केलेला आहे आणि त्याला आशिर्वाद देऊन ते सगळे कुमार निघून ब्रह्मलोकाला गेले. पुढं, पृथु राजाने पुष्कळ दिवस राज्यकारभार केला. वार्धक्य आलेलं आहे, मग मुलाच्या स्वाधीन राज्य करून वनामधे गेलेला आहे पृथु राजा. अर्ची, पत्नीही त्याच्याबरोबर आलेली आहे. वानप्रस्थाश्रम म्हणजे अत्यंत मोठी तपश्चर्या आहे, तितिक्षा ज्याला म्हणतात तो अभ्यास आहे. शरीराकडे लक्ष नाही, बाहेर रहायचं आपण, मोकळ्या जागेत आणि अग्नीचं तेवढं संरक्षण होण्याकरता एखाद्या झोपडीमधे किंवा गुहेमधे अग्नी सुरक्षित ठेवायचा. आपण मात्र थंडी, वारा, ऊन, पाऊस सगळं सहन करून रहायचं. काही काळ अशी तपश्चर्या त्यांनी केली. नंतर भगवान श्रीहरींचं चिंतन करता करता आपल्या शरीराचं विसर्जन केलेलं आहे. त्याची पत्नी अर्ची हिलाही मोठं दुःख झालेलं आहे. नंतर स्नान वगैरे करून चिता तयार केलेली आहे त्या अर्चीनं. पृथु राजाचं शरीर त्या चितेवर ठेवलेलं आहे. अग्निनारायणाची पूजा करून अग्नि प्रदीप्त केलेला आहे. आपलं शरीरही त्या अग्निमधे तिने अर्पण केलं. सहगमन केलं पतीबरोबर आणि ती विष्णुलोकामधे गेली. पृथु राजा मूळ विष्णुरूपच होता. तो विष्णुस्वरूपामधे विलीन झाला. अर्ची ही लक्ष्मीस्वरूपामधे विलीन झाली आहे. सर्व देवस्त्रिया त्या अर्चीची स्तुती करताहेत, काय ही पतिव्रता स्त्री आपल्या पतीला घेऊन उत्तम लोकाला गेलेली आहे. याप्रमाणे हे पृथु राजाचं चरित्र हे ही त्यांनी सांगितलेलं आहे.

यानंतर, प्राचीनबर्ही नावाचा राजा, याचं चरित्र मैत्रेय महर्षी सांगताहेत. प्राचीनबर्ही राजाने यज्ञयाग करावेत, कर्मामधेच त्याची बुद्धी आसक्त झालेली आहे, भक्तिमार्गाकडे लक्ष नाही, ज्ञानाकडे लक्ष नाही, काही नाही. एक यज्ञ झाला की दुसरा यज्ञ सुरू करायचा लगेच. ऋषीमंडळीही तयारच होती. जिकडं-तिकडं सबंध भूमीवर दर्भ अंथरले गेले आहेत. कारण, एक यज्ञ संपला की दुसरा यज्ञ. बर्ही म्हणजे दर्भ. जिकडेतिकडे दर्भ पसरलेले आहेत प्राचीनात, म्हणून त्याचं नाव प्राचीनबर्ही असं पडलेलं आहे. तो प्राचीनबर्ही राजा, कर्मामधे आसक्त झालेला आहे, त्याला त्या मार्गातून पुढं मार्ग दाखविला पाहिजे, असं नारदांनी ठरविलेलं आहे. नारद महर्षी हे त्याच्या वाड्यामधे आलेले आहेत. प्राचीनबर्ही राजानेही त्यांचा आदरसत्कार केलेला आहे. नारदांनी विचारलं, राजेसाहेब, हे जे यज्ञ सारखे करता ह्याचं काय फळ तुम्हाला पाहिजे? काय मिळणार

आहे ह्याचं फळ तुम्हाला. खरं फल म्हणजे की सर्व दुःख संपली पाहिजेत आणि पूर्ण आनंद, अविनाशी सुख मिळालं पाहिजे. हे खरं फल आहे म्हणाले. याचीच इच्छा करायची. पण हे ह्या तुमच्या यज्ञांनी मिळणार नाही. पुण्य मिळेल. पण पुण्यामुळे देवलोकाला स्वर्गलोकामधे जावं लागेल. स्वर्गलोकातही कायम रहाता येत नाही. पुण्य संपलं की पुन्हा याठिकाणी यायचं, पुन्हा यज्ञ करायचे, पुन्हा स्वर्गाला जायचं, काय उपयोग नाही. अविनाशी आनंद जो आहे सुख आहे आणि सर्व दुःख निवृत्ती हे यज्ञाचं फळ नाहीये. हा विचार तुम्ही करा.

नारदांनी एक कथा रूपक म्हणून सांगितली. एक पुरंजन नावाचा राजा पूर्वी होऊन गेला. याचा खुलासा त्यानी पुढं केलेला आहे. त्यांनी आपल्या मित्राला सोडून दिलं. चांगला मित्र, समर्थ असलेला, त्याला सोडून देऊन एकटाच हा राजा निघाला. हिमालयाच्या बाहेर पलिकडे आलेला आहे. एक उत्तम नगर त्याला दिसलेलंआहे. कुठंतरी त्याला रहायचं होते. इतक्यात बाहेरून एक दिव्य तरूण स्त्री आलेली आहे. तिच्याबरोबर सगळीही दहा मंडळी तिचे नोकर होती. एक मोठा नाग होता बरोबर. राजाने विचारले बाई हे नगर कोणाचं आहे? ती म्हणाली, माझंच नगर आहे. आपण राहू या, या नगरामधे जाऊन. पुष्कळ आपल्याला सुख भोगता येईल. हे माझे नोकर आहेत, हा नागही माझा सेवक आहे. चला आपल्याला इच्छा असेल तर. म्हणून त्या स्त्रीला बरोबर घेऊन राजा त्या नगरामधे जाऊन राहिला. नऊ दरवाजे त्या नगराला होते. अशा त्या नगरामधे राजा राहतो आहे, त्याला मुलबाळं झाली, पुष्कळ यज्ञ-याग वगैरे केले, नारद सांगताहेत राजाला! तुमच्याप्रमाणेच यज्ञ करायचे. दुसरीकडे कुठे लक्ष नाही. असे अनेक यज्ञयाग केलेले असताना एक गंधर्वांचा अधिपती, आपलं सैन्य बरोबर घेऊन आलेला आहे. आणि त्या सैन्यासह वर्तमान त्या नगराला त्यांनी वेढा दिलेला आहे. पुरंजन राजाला कैद करण्याचे त्यांनी ठरविले. त्याला अत्यंत त्रास होऊ लागला. या नगरामधे, नऊ दरवाजे होते. शरीरालाच नगराची कल्पना केलेली आहे. ह्या शरीराला नऊ दरवाजे आहेत. त्या नवद्वारयुक्त नगरामधे हा जीवात्मा राहतो. वरच्या बाजूला दोन नेत्र आहेत, दोन नासिका आहेत, दोन कान आहेत आणि मुख आहे. हे सात दरवाजे वर आहेत आणि मलमूत्रविसर्जन करण्याचे दोन असे नऊ दरवाजे आहेत. असा त्या नगराला वेढा पडलेला आहे. त्या सैनिकांनी या नऊ दरवाज्यातून आत प्रवेश केला. त्या पुरंजन राजाला बांधून बाहेर काढण्याचा प्रयत्न त्यांचा चाललेला आहे. आपल्या स्त्रीकडे त्याचं लक्ष गेलं. मी गेल्यानंतर ह्या स्त्रीचं संरक्षण कोण करील? अशा वासनेमधे शेवटी हीच वासना स्त्री बुद्धी त्याच्या मनामधे उत्पन्न होऊन त्याला बाहेर काढलं गेलं. त्यामुळे पुन्हा दुसऱ्या जन्मामधे त्याला स्त्री रूप प्राप्त झालेलं आहे. स्त्रीचा जन्म

त्याला आलेला आहे. मोठी राजकन्याच तो झालेला आहे. एका उत्तम दुसऱ्या राजपुत्राबरोबर त्याचा विवाह झाला. उत्तम प्रकारचं संसारसौख्य त्याला मिळालेलं आहे. आणि या आपल्या स्त्रीला घेऊन अरण्यामधे गेलेला आहे, मुलाला राज्य देऊन. त्यांनी आपलं शरीर योगमार्गाने सोडून दिलं.

ती स्त्री म्हणजे पुरंजन राजा. तिला दुःख झालेलं आहे. आपले पती गेलेले आहेत. चिता तयार केली. आपला देह अर्पण करण्यासाठी ती उद्युक्त झालेली असताना हा पुरंजन राजा आपल्या ज्या मित्राला सोडून देऊन एकटाच निघून आला होता त्याचा तो मित्र ब्राह्मणरूपाने त्याच्याजवळ आलेला आहे. त्यांनी त्याला उपदेश केला, बाबा, तू काही राजकन्या नाहीयेस. तू कोण आहेस, पूर्वजन्मामधे तू कोण होतास त्याचे स्मरण कर. तु पुरंजन आहेस . मी तुझा मित्र आहे. तुला यातून सोडवण्याकरता आलेलो आहे. पूर्वजन्माचं स्मरण तू कर, म्हणजे या दुःखातून तू मुक्त होशील. तू आणि मी एकच आहोत म्हणाले. वस्तुतः आनंदरूप आपण आहोत. सहा अहम्, अहम् सहः हा उपदेश केलेला आहे, सोहम्चा. त्यावेळेला त्या पुरजंनाला ज्ञान झालं आणि सर्व दुःखं त्याची दूर झाली. नारदांनी ही कथा त्या प्राचीनबर्ही राजाला सांगितली, प्राचीनबर्ही राजा म्हणाला, महाराज, काय तुमची गोष्ट मला काही कळली नाही. कोण पुरंजन राजा, त्याला भेटलेली स्त्री कोण, त्याला वेढा कोणी दिला, कोण तो राजा आला, काही कल्पना नाही. मग त्याचा खुलासा त्यानी केला.

पुरुषं पुरञ्जनं विद्यात् यद् व्यनःत्यात्मनः पुरम् ।।४.२९.२ ।। श्री. भा.

हा जो पुरूष म्हणजे जीवात्मा आहे हाच पुरंजन आहे. आपल्या मित्राला म्हणजेच ईश्वराला बाजूला टाकून तो एकटाच बाहेर पडलेला आहे. ते नगर म्हणजे नवद्वारयुक्त शरीर आहे. मनुष्यशरीर! आणि त्याला भेटलेली स्त्री म्हणजे

बुद्धिं तु प्रमदां विद्यान्ममाहमिति यत्कृतम् ।।४.२९.५ ।।श्री. भा.

ती बुद्धी ती त्याला भेटली स्त्री. आणि त्या बुद्धीनं त्याला या शरीरामधे आणून ठेवलेलं आहे, बांधून ठेवलेलं आहे. ईश्वरभक्ति नाही, आत्मानात्म विचार नाही, ज्ञान मार्ग नाही, काही नाही. केवळ कर्मामधे निमग्न झाला, संसारामधे आसक्त झाला पुरंजन राजा. पुन्हा त्याला स्त्रीजन्म घ्यावा लागला. त्याने जरी मित्राला सोडून दिलं होतं तरी मित्राने त्याला सोडलं नाही. परमेश्वराने येऊन, उपदेश करून त्याचा उद्धार केलेला आहे. नारद सांगतात, राजेसाहेब, तुम्हीही काही हा विचार करा. काय करता यज्ञ करून काय करणार ? तुम्ही यज्ञामधे जेवढे पशू मारलेले आहेत, ते सगळे

तुमची वाट पहातायत वरती. केव्हा हा राजा येतो. आपल्या शिंगानी त्याचं शरीर केव्हा फाडून टाकावं. वाट पहाताहेत. काय करता हे कर्म करून ? असा त्याला उपदेश केला आणि नंतर त्याला ज्ञान प्राप्त झालं. त्यांने सांगितलं नारद महाराज हे आमच्या ह्या उपाध्यायांना हे काही माहिती नाही असं दिसतंय. त्यांनी एक यज्ञ झाला की दुसऱ्या यज्ञाची यादी लगेच माझ्यापुढे आणावी. तुम्ही दाखविलेला जो मार्ग आहे त्या मार्गाने जाण्याची मला इच्छा उत्पन्न होणंच शक्य नाहीये. कर्मामधे आसक्त झालेला आहे. कर्माच्या फलामधे आसक्त बुद्धी झालेली आहे. ते किती विनाशी आहे किंवा अविनाशी आहे इकडं लक्ष जात नाही. प्रयत्न करायचा, पुन्हा फल मिळवायचं, पुन्हा प्रयत्न करायचा, यात एक जन्म नाही, अनेक जन्म जातात. ईश्वराच्या भक्तिकडे लक्ष जाणं, ज्ञानमार्गाकडे लक्ष जाणं, कोणीतरी असा महात्मा भेटल्याशिवाय हे होत नाही. प्राचीनबर्ही राजा हा सत्संगती करण्याकरता बाहेर पडलेला आहे. संतांच्या मार्गदर्शनाने त्याने आपला उद्धार करून घेतला आहे.

मैत्रेय महर्षी सांगतात, राजा, देवर्षी नारदांनी त्या प्राचीनबर्ही राजाचा उद्धार केलेला आहे. त्याला कथारूपी बोध करून त्या कथेचा खुलासाही केला.

यानंतर, मैत्रेय महर्षी आणि विदुरजी यांचा संवाद संपलेला आहे. पुष्कळ आणखी विचार झाला. दोघेही जिज्ञासू ! विदुरजी आणि मैत्रेय दोघांचा संवाद म्हणजे अत्यंत विचार करण्यासारखा आहे. त्यात भक्तिमार्ग आहे, कर्ममार्ग आहे, पतिव्रता धर्म आहे, सकाम भक्ति आहे, निष्काम भक्ति आहे, सगळं आहे. सनतकुमारांनी याठिकाणी पृथु राजाला उपदेश केलेला आहे. हे सगळे अनेक प्रकारचे विषय त्याच्यामधे आलेले आहेत. ते सगळेही विदुरजींनी ऐकलेलं आहे आणि त्यांना वाटलं आता पुष्कळ झालं. ऐकलं इतकं पुरे झालं. निश्चित मार्ग समजलेला आहे. आणि त्यांची आज्ञा घेऊन वंदन करून विदुरजी हस्तिनापूरला आले. धृतराष्ट्र राजालाही उपदेश करून त्यालाही घेऊन गेलेले आहेत. त्याचाही उद्धार केला आणि नंतर विदुरजी पुन्हा यमलोकाला निघून गेलेले आहेत.

आता, मनुराजाचा दुसरा पुत्र म्हणजे प्रियंव्रत नावाचा. त्याचंही राज्य कसं होतं वगैरे चरित्र सांगताहेत, शुकाचार्य महाराज. परीक्षित राजाने विचारलं, महाराज, प्रियव्रत राजा नारदांचा भक्त आहे. नारदांच्या आश्रमात राहाणारा. तो पुन्हा संसारात कसा गुंतला, राज्य कशाकरता त्याने केलं ? हे असे सर्वसंगपरित्याग करणारे भगवत्कृपासंपन्न जे महात्मे आहेत त्यांचं मन संसारामधे कधीही गुंतून रहात नाही. काय आहे हे चरित्र अशी प्रार्थना केली असताना शुकाचार्य महाराज

सांगतात –

राजा, भगवान श्रीहरींची सेवा करण्याचा ज्यांच्या मनामध्ये, निश्चय झालेला आहे, भगवद्भक्तिने! असे जे भगवद्भक्त आहेत, त्यांचं अंतःकरण विषयसुखाकडे कधीही जाणार नाही. हे योग्य सांगितलंस. प्रियंव्रत राजपुत्र हा मनुराजाचा मुलगा. हाही असाच होता म्हणाले, मोठा भगवद्भक्त! नारद ऋषींच्या आश्रमामधे राहून नारदांची सेवा, गुरूभक्ती करतो आहे. परमार्थ मार्गाची पूर्ण कल्पना त्याला आलेली आहे. म्हणून संसारापासून त्याचं मन बाजूला झालेलं आहे. मनुराजाने त्याला सांगितलं, प्रियंव्रता हे राज्य तू आता सांभाळ. आमचं काम झालेलं आहे. तुझं कर्तव्य आहे राज्य करणं. पण प्रियंव्रताने सांगितलं, पिताजी मला राज्य करायचं नाहीये. मला आमच्या गुरूमहाराजांची सेवा करायची आहे. त्यांच्याजवळच मला रहायचं आहे. मी राज्य करणार नाही. हे ब्रह्मदेवांना समजले. त्यांचा नातूच होता प्रियंव्रत म्हणजे. ब्रह्मदेव त्याला भेटण्याकरता आले सत्यलोकातून, विमानात बसून. ब्रह्मदेव आल्याबरोबर प्रियंव्रतने नमस्कार केला. ब्रह्मदेवांनी त्याला थोडासा उपदेश केला. भगवान ब्रह्मदेव सांगतात –

निबोध तातेदमृतं ब्रवीमि ।<br>
मासूयितुं देवमर्हस्यप्रमेयम् ।।<br>
वयं भवस्ते तत एष महर्षिः ।<br>
वहाम सर्वे विवशा यस्य दिष्टम् ।।५.१.११ ।। श्री.भा.

प्रियंवदा, तू रागावू नकोस म्हणाले, मी, भगवान शंकर, हा तुझा पिता मनुराजा हे सगळेही त्या परमेश्वराच्या आज्ञेमध्ये आहोत. त्याच्या आज्ञेने जे काही आमचं कर्तव्य आमच्या वाट्याला आलेलं आहे ते आम्ही करतो आहोत. तपाने, विद्येने, योगसामर्थ्याने परमेश्वराची प्राप्ती होणार नाही. त्याची इच्छा, परमेश्वराचा जो संकल्प झालेला आहे, त्याच्या विरूद्ध कोणीही वागू शकत नाही. सुख मिळालं पाहिजे, म्हणून संसारात पडायचं नाही. नारदांची सेवा करायची आहे, असं तू ठरविले असशील पण तू जन्माला कुठं आलेला आहेस? राजपुत्र होऊन जन्माला आलेला आहेस. तुझं कर्तव्य देवांनी नेमून दिलेलं आहे. त्याच्या विरूद्ध तुला वागता येणार नाही. तुझा संकल्प सिद्ध होणार नाही म्हणाले. ईश्वराची आज्ञा आम्ही सुद्धा मान्य करून राहतो. प्रियंवदा, मला वाटत नाही का बाबा की नुसती ईश्वराची उपासना करावी ? पण मला काम नेमून दिलंय देवाने? सर्व जीवांची कर्मं तपासून त्यांना त्यांच्या त्यांच्या योग्य शरीरामधे घालायचं, जन्म द्यायचा. काय झोप आहे

काय, अहोरात्र काम चाललेलं आहे. लक्षावधी जीव जन्माला येतात, लक्षावधी जातायत. चाललेलं आहे कार्य. पुरे झालं असं मलाही वाटतं म्हणाले. पण त्याची आज्ञा आहे. त्याने नेमून दिलेलं आहे. ते करायला पाहिजे. तेव्हा तुझं कर्तव्य म्हणजे ईश्वराने नेमून दिलेलं राज्य करणं आहे. ते तुला करावं लागेल. राज्य कर, पित्याची आज्ञा आहे, ईश्वराची आज्ञा आहे. काही काल तू राज्य कर. गृहस्थाश्रम उत्तमरितीने करून मग जाऊन रहा नारदांच्याजवळ. पित्याची आज्ञा मान्य करायला नको का तुला? आणखी ब्रह्मदेव सांगतात, घरदार सोडून अरण्यामधे गेलं म्हणजे आपलं कल्याण होतं हे तुला कोणी सांगितलें?

भयं प्रमत्तस्य वनेष्वपि स्यात्
यतः स आस्ते सहषट्सपत्नः ।।५.१.१७।। श्री. भा.

ब्रह्मदेवांचा उपदेश आहे, कर्म सोडू नये असं त्यांचं म्हणणं आहे. संयमाने राहिलं पाहिजे. मनावर ज्याचा ताबा नाही, वाटलं मला सोडून द्यावं हे घरदार आणि जावं वनामधे, अरण्यामधे देवाची उपासना करावी, पण त्याला भीती आहे. इंद्रियांच्यावर ज्याचा ताबा नाही असा जर अरण्यामधे निघून गेला तर सहा शत्रू बरोबर घेऊन तो गेला आहे, इकडे त्याचं लक्ष नाही. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर सगळे शत्रू आहेत. अरण्यामधे जाऊनसुद्धा त्याचा तिथं अधःपात होतो आहे. विश्वामित्रांनी साठ हजार वर्षं तपश्चर्या केली. ब्रह्मर्षी होण्याकरता वसिष्ठांशी स्पर्धा केलेली आहे. ती मेनका अप्सरा भेटली, सगळं नाहीसं झालं. तो वनामधे सगळे शत्रु बरोबर घेऊन गेलेला असतो. संसारात राहाणारा, गृहस्थाश्रमात संयमाने वागणारा जो आहे तो त्याला

गृहाश्रमः किं नु करोत्यवद्यम् ।।५.१.१७।। श्री. भा.

गृहस्थाश्रम त्याचं काय वाकडं करणार आहे म्हणाले, हा विचार करून तू वाग. काही काल संसार कर म्हणाले, राज्य कर. पित्याच्या मनाचंही समाधान होऊ दे. आम्हालाही समाधान वाटेल. आणि नंतर जाऊन नारदांची सेवा कर म्हणाले. याप्रमाणे ब्रह्मदेवांनी त्याला मार्गदर्शन केलं. त्याला पटलेलं आहे. त्या प्रियंवद राजाने राज्य करण्याचे ठरवले आहे. मनुराजाने त्याच्या ताब्यात राज्य दिलं. असा ईश्वराचा संकल्पच होता. नारदांनी ध्रुवालाही उपदेश केला, पण तो परत फिरला नाही. संसार केला, राज्य केलं ध्रुवाने. पण ईश्वरदर्शनाकरता आत्ता निघालोय मी परत फिरणार नाही हा निश्चय ध्रुवाने केला. प्रियंवदाने आत्ताच नाही जाणार मी, माझं काम झाल्यानंतर मी संसार करीन, असं सांगितल नाही. हा ईश्वराचा संकल्प ठरलेलाच आहे. त्याप्रमाणे त्याने कबूल केलं आणि राज्य

करायला आरंभ केलेला आहे. भगवंतांचं चिंतन तो निरंतर करतो आहे. त्याच्यावर नारदांची कृपा आहे. ईश्वरार्पण बुद्धीने त्याचा सर्व कारभार चाललेला आहे.

प्रियंवद राजा राज्य करू लागलेला असताना सूर्यनारायणाच्या फिरण्यामुळे, गतीमुळे दिवस–रात्र हा व्यवहार होतो आहे. रात्रीच्या वेळेला सूर्यकिरण इकडे पडत नाहीत, म्हणून प्रियंवद राजा एका तेजस्वी रथामधे बसून सूर्याबरोबर फिरतो आहे. आपल्या राज्यामधे निरंतर प्रकाश पाहिजे ही इच्छा आहे. त्यावेळेला त्याच्या रथचक्रांनी भूमीमधे सात द्वीपं तयार झाली आणि सात समुद्र तयार झालेले आहेत. असा पराक्रमी राजा, समर्थ होता. त्याला नंतर अग्निदृढ नावाचा पुत्र झालेला आहे. बाकीचीही मुलं झालेली आहेत त्याला. त्या सप्तद्वीपाच्या ठिकाणी सात मुलांची योजना केली. प्रियंवद राजा नंतर नारदमहर्षींच्या आश्रमामधे जाऊन राहिलेला आहे. ब्रह्मदेवांची आज्ञा पालन केली. पित्याची आज्ञा पालन केली. संसार केला आणि अरण्यामधे जाऊन गुरूसेवा करण्यामधे निमग्न झालेला आहे.

अग्निदृढ राजा, जंबुद्वीपाचा अधिपति. तो तपश्चर्या करण्याकरता अरण्यामधे गेलेला असताना ब्रह्मदेवांनी सभेमधे गायन करणाऱ्या पूर्वचित्ती नावाची अप्सरेला आज्ञा केली की त्या अग्निदृढ राजाला संसारात घे म्हणाले. ती प्राप्त झाली आहे. तिचं ते स्वरूप पाहून अग्निदृढ राजा तपश्चर्या करण्याचं विसरलेला आहे. पुन्हा राजधानीमधे परत आला. त्याचा संसार सुरू झाला. पुन्हा त्याला नऊ मुलं झाली. जंबुद्वीपाचे नऊ विभाग त्याने केले. नऊ खंड ज्याला म्हणतात. त्या विभागांमधे नऊ मुलांची स्थापना केली. मेरूच्या कन्या नऊ, ह्यांचा विवाह त्यांच्याबरोबर झालेला आहे.

त्याचा मुलगा नाभी नावाचा होता. मोठा भगवद्भक्त होता. यज्ञेश्वराच्या तृप्तीकरता त्याने यज्ञाला सुरूवात केलेली आहे. आपल्याला परमेश्वर साक्षात् पुत्र मिळाला पाहिजे म्हणून तो यज्ञ करतो आहे. भगवान प्रसन्न झाले. अग्निकुंडातून भगवान प्रकट झालेले आहेत. सर्व ब्राह्मण मंडळींनी त्यांची पूजा केली. त्यांनी स्तुती केली, भगवंता, आपली सेवा करणारा हा राजा ह्याच्यावर आपली कृपा होण्याचा योग आज आलेला आहे. ह्या राजाची इच्छा हीच आहे, की आपणच त्याचे पुत्र व्हावं. अशी राजाची इच्छा आहे. म्हणून त्याने हा यज्ञ केलेला आहे. आपली त्याच्यावर कृपा व्हावी. अशी प्रार्थना सर्वही मंडळींनी केलेली आहे. भगवान म्हणाले, आता, तुम्ही सर्व मंडळी प्रार्थना करत आहात. तुमची इच्छा मोडणं प्रशस्त नाही. राजाची इच्छा तीच आहे. माझ्यासारखा दुसरा कोण आणायचा, तेव्हा मलाच आता पुत्र व्हायला पाहिजे. या राजाची इच्छा

पूर्ण होईल असा आशिर्वाद देऊन भगवान गुप्त झालेले आहेत. नाभी राजाची स्त्री जी मेरूदेवी हिच्यापासून भगवान प्रकट झालेले आहेत. तेज मोठं आहे, वैराग्य आहे. नियामक शक्ती आहे. सर्वही गुणसंपन्न अशा प्रकारचा तो मुलगा झालेला आहे. सर्व ब्राह्मण मंडळींना अत्यंत आनंद झाला. ऋषभ म्हणजे श्रेष्ठ. सर्व एकंदर गुणांनी श्रेष्ठ म्हणून ऋषभ याप्रमाणे मुलाचं नाव ठेवलेलं आहे. राजाची इच्छा पूर्ण झालेली आहे. त्या मुलाचं पालन–पोषण तो करतो आहे. राजाला आनंद झालेला आहे. ऋषभदेव मोठे झालेले आहेत. त्यांचं उपनयन झालेलं आहे वेदाध्ययन त्यांनी केलेलं आहे. ब्रह्मचर्याश्रमाच्या धर्माचं सर्व आचरण करून दाखवलेलं आहे. पुढं इंद्राने आपली कन्या जयंती, ही त्यांना दिली. तिच्याबरोबर त्यांचा विवाह झालेला आहे. गृहस्थाश्रम चालू झालेला आहे. उत्तम प्रकारचं राज्य ऋषभदेव करताहेत. पर्जन्यवृष्टी वेळच्यावेळी होती आहे, सर्व धनधान्य समृद्धी आहे. काही कमी नाहीये. त्यांनाही मुलं झाली. त्या मुलांमधे  भरत नावाचा ज्येष्ठ पुत्र होता. बाकीचे एकंदर शंभर पुत्र झाले म्हणतात. नऊ ब्रह्मज्ञानी पुत्र झालेले आहेत. कवी, हरी, अन्तरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस, करभाजन

जन्मतःच ज्ञानसंपन्न. सर्व पृथ्वीवर संचार करणारे. काही बाकीचे तपस्वी ब्राह्मण वगैरे झालेले आहेत. एकदा ब्रह्मावर्तामधे यज्ञ समाप्त झाल्यानंतर ऋषभदेवांनी आपल्या मुलांना उपदेश केला, सर्व प्रजाजनांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने मुलांना त्यांनी उपदेश केला. त्यांनी सांगितले, मुलांना की, तुम्ही उत्तम राज्य करा. श्रेष्ठ महात्म्यांची संगती करा.

नायं देहो देहभाजां नृलोके
कष्टान् कामान् अर्हते विड्भुजां ये ।।५.५.१।। श्री. भा.

त्या मुलांना ऋषभदेव सांगतात , हा जो मनुष्यदेह तुम्हाला मिळालेला आहे, केवळ विषयसुख भोगण्याकरता नाहीये. सगळे पशु–पक्षीही विषयसुखाकडे निमग्न झालेले आहेत. तप करणं, आपलं चित्त शुद्ध करून घेणं, अनंत जे ब्रह्मसुख आहे, ब्रह्मानंद प्राप्त करून घेणे याकरता हा देह आहे. ब्रह्मानंद प्राप्त करून घेण्याला सत्पुरूषांची संगती, सेवा घडली पाहिजे.

महत्सेवां द्वारमाहुर्विमुक्तेः तमोद्वारं योषितां सङ्गिसङ्गम्  ।। ५.५.२  ।। श्री.भा.

महापुरूषांची सेवा हेच मोक्षाचं द्वार आहे. विषयी लोकांच्या, संसारी लोकांच्या संगतीमधेच निमग्न राहून विषयभोग घेणं हे नरकाचं द्वार आहे. समचित्त असणारे, शांत, क्रोधरहित जे आहेत तेच आणखी महात्मे आहेत. त्यांची संगती करून त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ह्या सर्वही परिवाराच्या

ठिकाणी आपल्या मनाची आसक्ती कमी करणं, ममता कमी करणं ह्याकरता प्रयत्न केला पाहिजे. असा पुष्कळ उपदेश ऋषभदेवांनी आपल्या मुलांना केला. भरतराजा जो आहे, ज्येष्ठ पुत्र त्याला अभिषेक केला. उत्तम प्रकाराने राज्य करण्याचा त्याला आदेश दिलेला आहे. ऋषभदेव बाहेर पडले.

शेवटचं आता काय कर्म करायचं, तर लोकांच्यापुढं आदर्श ठेवायचा आहे त्यांना. ब्रह्मचर्याश्रम झाला, गृहस्थाश्रम झाला, राज्यकारभारही व्यवस्थित झाला, मुलंही झाली. चांगली मुलं आहेत त्यांनाही मार्गदर्शन झालं. शरीरविसर्जन कसं करायचं? हे एक शिल्लक राहिलेलं आहे. ज्ञानी महात्मा जो आहे त्याच्या मनामधे शरीरही येऊन उपयोग नाही. शरीराच्या पलिकडे मन गेलं पाहिजे. शरीराचं भान नाहीये. अशी स्थिती झाली पाहिजे. बाहेर पडलेले आहेत. अंगावर वस्त्रसुद्धा नाहीये. समाधी अवस्थेमधे निमग्न आहेत. सर्व लोक निंदा करताहेत. अपमान करताहेत पण तिकडं लक्ष नाहीये त्यांचं. दुष्ट लोक, दुर्जन लोक अंगावर माती टाकणं, दगड मारणं, असे सगळे अनेक प्रकारांनी त्यांना त्रास देताहेत पण शुकाचार्य सांगतात, राजा

परिभूयमानः मक्षिकाभिरिव वनगजः ।।५.५.३०।। श्री. भा.

रानातला मोठा हत्ती आहे पण त्याच्या अंगावर पुष्कळ मधमाश्या वगैरे बसलेल्या आहेत, चावत आहेत, पण त्या हत्तीचं तिकडं लक्षही जात नाही. दुःखाकडे लक्षच गेलं नाही तर दुःख कोठून होणार? मान-अपमान जर मनामधे आले तर ते होणार. नाही तर काही नाही. असे ते आपल्या आत्मसमाधिमधे आनंदामधे निमग्न आहेत. शेवटचं शरीर आहे. अत्यंत सुंदर शरीर आहे. त्यांच्या शरीराचा सुगंध सर्वत्र सुटलेला आहे. योगाभ्यासाच्या सगळ्या सिद्धी त्यांच्याजवळ आलेल्या आहेत. पण त्या सिद्धींना त्यांनी परत लावून दिलेलं आहे. नको आम्हाला सिद्धी म्हणाले. राजाने विचारलं, महाराज, काय ऋषभदेवांना सिद्धींची भिती वाटली काय म्हणाले. ज्ञानी महात्म्यांनी सिद्धीला भिऊन सिद्धीला दूर लोटणं काय कामाचं आहे. पुष्कळ बुद्धीवादी लोक म्हणतात, हे मोठे मोठे योगी लोक झाले, ऋषी लोक झाले, त्यांनी आपल्या योगसामर्थ्याने समाजकार्य का केलं नाही. काय समाजकार्य काय करायचंय? समाजकार्य म्हणजे मनाची शुद्धी झाली पाहिजे ना? हे मुख्य कार्य आहे. ते चालूच आहे त्यांचं. सिद्धींचा उपयोग आणखी काय करायचा? सिद्धी घ्यायच्या आणि त्याच्यामधे गुंतून राहायचं त्यामुळे परमेश्वराकडचं लक्ष बाजूला व्हायचं. मग संसार होता तोच बरा होता की. व्यक्तीचा संसार असो वा समुदायाचा संसार, त्यामधे हा चांगला वागणार,

हा वाईट वागणार. पुन्हा सगळ्या द्वंद्वामधे बुद्धी गढूनच जाणार आहे. समाजकार्यात तरी काय द्वंद्वापासून दूर रहाता येतं का? हा विचार करून ऋषभदेवांनी त्या सिद्धींचा त्याग केलेला आहे. मनाचा निग्रह केला पाहिजे.

शुकाचार्यांनी याचं उत्तर दिलेलं आहे. होय म्हणाले, हे श्रेष्ठ महात्मे, ऋषभदेवांसारखे सिद्धीचा परिग्रह करीत नाहीत. सिद्धी दूर लोटून दिल्या त्यांनी. ह्याचं कारण म्हणजे मनावर विश्वास नाही. मनाचा निग्रह करण्याकरिता शरीर पडेपर्यंत प्रयत्न केला पाहिजे. मन ताब्यात आलेलं आहे असं समजून राहिलं की ते केव्हा बिघडेल हे सांगता येत नाही. हे सांगण्याकरता, दाखवण्याकरता त्या सिद्धी त्यांनी लोटून दिलेल्या आहेत. कुठेही संग उपयोग नाही. मन सिद्धीमधे गुंतून राहिल्यानंतर त्याचं कल्याण काय होणार? भक्ती सुटली, ज्ञान सुटलं. सगळं सुटलेलं आहे. ह्याकरता नित्य आपल्या समाधिअवस्थेमधे ऋषभदेव राहिलेले आहेत. असा बराच काल गेलेला आहे. ते असेच अरण्यामधे कोठेही फिरायचे. असेच फिरता फिरता कर्नाटक प्रांतामधे एका डोंगरावरून अरण्यातून निघालेले असताना शरीराचं भान नाही, शरीर म्हणजे मी आहे ही तर बुद्धी केव्हाच गेलेली आहे. त्या शरीराकडे लक्ष नाही तेव्हा शरीराचं संरक्षण व्हावे हा तरी विचार त्यांना कशाला येईल. चाललेले आहेत. जिकडे देह जाईल तिकडे हे चाललेले आहेत. आनंदामधे, समाधिमधे निमग्न आहेत. समोर मोठा दावाग्नि पेटलेला आहे, चारही बाजूंनी अरण्य पेटलेलं आहे. पण तिकडे यांचं लक्ष नाही. त्या अग्नीमधे यांचा देह भस्म होऊन गेलेला आहे. संपलं. देहाची अवस्था काय होणारं काही लक्ष नाही. काळजी कशाला, देहाचीच जिथं काळजी नाही तिथं संसाराची, परिवाराची काळजी कुठली असणार? निश्चिंत रहाणं हे ज्ञानी मनुष्याचं मुख्य लक्षण आहे. कोणाचीही चिंता नाही. स्वार्थी मनुष्य जो आहे, त्याला देहाची तरी चिंता असते. नास्तिक आहे कोठेही लक्ष देणार नाही, पण देहाकडे लक्ष देईल. हे त्यांचं होतं. देहाची ज्यांची चिंता गेलेली आहे, मग बाकीची अहंता नाही आणि ममता नाही. त्यामुळे मुक्त झालेले आहेत हा मार्ग जो आहे, अध्यात्मविद्या काय आहे, त्याची साधना कशी आहे, ती सगळी आचरण करून ऋषभदेवांनी दाखवली आहे. भगवंतांनीच हा अवतार धारण करून सर्वांना उपदेश केलेला आहे.

भगवंतांची अशी कृपा आहे की भजन करणारे जे भक्त आहेत त्यांची परीक्षा पहाताहेत भगवान. काय पाहिजे बाबा, मुक्ति, घेऊन जा म्हणतात मुक्ति. मुक्ति मागितली तरी मुक्ति देऊन त्याला मुक्त करतात ज्ञान देऊन. पण एखादा भक्त म्हणाला की मला तुमची मुक्ति नकोय तर

तुमची भक्ती पाहिजे. मग मात्र ते विचार करतात. भक्ति द्यावी का याला, हा राहिल का त्या भूमिकेवर योग्य रितीने ? इतका भक्तियोग दुर्लभ आहे. आपल्या निजानंदामधे निमग्न असणारे, सर्व लोकांना हा मार्ग दाखविण्याकरता ज्यांनी याप्रमाणे आचरण करून दाखविले, असे भगवान ऋषभदेव यांना आमचा नमस्कार असो. असं शुकाचार्य महाराज म्हणतात आणि अशारितीने हे चरित्र समाप्त झालेलं आहे.

ह्यानंतर  भरत राजा जो आहे, ऋषभदेवांचाच तो पुत्र आहे. तोही मोठा अधिकारी आहे, कर्मयोगी आहे. कर्माचं आचरण कसं करावं हे त्यांनी दाखवून दिलेलं आहे. त्यांचं चरित्र आता शुकाचार्य महाराज परीक्षित राजाला सांगणार आहेत.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा। बुद्‍ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात्।।
करोति यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेर्त् तत्।।११.२.३६।। भा.
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।

।।गोपालकृष्ण भगवान् की जय।।

।। श्रीमद्‌भागवत दुसरा दिवस समाप्त ।।

ट

# ।। श्रीमद्भागवत तिसरा दिवस ।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा।।
तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ।।

तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण। स्तवावे ते कवणे कवणालागी।।
यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम्।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो। मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम्। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम्।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्। संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन्। प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम्।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम्।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम्।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम्।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं। तत्र तत्र कृत मस्तकांजलिम्।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं। मारुतिं नमत राक्षसान्तकम्।।
पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम्।।
श्रीगणेशाय नमः
श्रीगुरूचरणारविन्दाभ्याम् नमः।
श्रीशुक उवाच
भरतस्तु महाभागवतो यदा भगवता
अवनितलपरिपालनाय सञ्चिन्तितः
तदनुशासनपरः पञ्चजनीं विश्वरूपदुहितरं
उपयेमे ।।५.७.१।। श्री. भा.

शुकाचार्य महाराजांनी प्रियव्रत राजाचा वंश सांगायला सुरूवात केलेली आहे. या वंशामधे भगवंतांनी ऋषभावतार धारण केला. मुलांना उपदेश केला. ज्येष्ठ मुलगा जो भरत आहे याला राज्याभिषेक करण्याची आज्ञा केलेली आहे. पित्याच्या आज्ञेप्रमाणे भरताने विश्वरूपाची कन्या पंचजनी हिच्याबरोबर विवाह केला. सुमति, राष्ट्रभृत, सुदर्शन, आवरण आणि धूम्रकेतु असे पाच पुत्र त्याला झाले. या देशाला पूर्वी अजनाभ वर्ष असं म्हणत होते. भरत राजा राज्य करू लागल्यानंतर त्याच्या कीर्तिमुळे भारतवर्ष हे नाव या देशाचं पडलं आहे. कर्मयोगी होता मोठा. यज्ञयागादिक जी कर्मं वेदरूपाने ईश्वराने दाखविलेली आहेत ती सगळी कर्मं आपण करायची असं त्याने ठरवलं. पुष्कळ ज्ञानसंपन्न होता तो. आपल्या पूर्वजांनी ज्याप्रमाणे राज्य केलं. अत्यंत प्रेमाने प्रजाजनांचं संगोपन केलं, त्याप्रमाणेच तो पालनपोषण करतोय. लहान–मोठे अनेक यज्ञ श्रद्धेनं त्याने केलेले आहेत. यज्ञकर्म करण्याच्या वेळेला त्याची भावना, बुद्धी, कशी होती सांगताहेत आचार्य महाराज –

सम्प्रचरत्सु नानायागेषु विरचिताङ्गक्रियेषु अपूर्वं
यत्तत्क्रियाफलं धर्माख्यं परे ब्रह्मणि यज्ञपुरुषे
सर्वदेवतालिङ्गानां मन्त्राणां अर्थनियामकतया
साक्षात्कर्तरि परदेवतायां भगवति वासुदेव एव
भावयमान आत्मनैपुण्यमृदितकषायः हविःषु
अध्वर्युभिर्गृह्यमाणेषु स यजमानः यज्ञभाजो
देवांस्तान् पुरुषावयवेषु अभ्यध्यायत् ।।५.७.६ ।। श्री. भा.

यज्ञयाग वगैरे वेदामधे सांगितले आहेत. ते यज्ञ सुरू झालेले असताना, यज्ञाचं फल म्हणजे जे पुण्य, ते पुण्य त्यांनी भगवान वासुदेवाला समर्पण करावं. अर्पण करणं याचा अर्थ आपण कर्ता नसून ईश्वर कर्ता आहे ही बुद्धी धारण करणं म्हणजे समर्पण आहे. कर्तृत्व अभिमान आपल्याला होतो. कारण फल आपल्याला पाहिजे असतं. फलाची कामना असते. फल भोगणारा जर मी आहे तर कर्ता मीच आहे, अशा अभिमानाने कर्म जर झालं तर ते कर्म बंधक ठरतं आहे. त्या कर्माचं फल भोगण्याकरता त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागतो. म्हणून भगवान वासुदेवालाच कर्मफल समर्पण करावं. फलभोक्ता वासुदेव आहे. हे माझं फल नाही. कर्ता हा आहे आणि भोक्ता वासुदेव कसा होईल ? ज्यांने कर्म केलं त्याला त्याचं फल मिळायचं, तर त्याची जी बुद्धी आहे, मी कर्ता नाही. यज्ञातल्या सर्वही देवतांचा नियामक तो आहे परमेश्वर. बुद्धीचा नियामकही तोच आहे. यज्ञ

करण्याला लागणारी जी माझी बुद्धी मी म्हणतो ती बुद्धी ही त्याचीच आहे. त्याच्या हातात आहे. आपुलीया बळे, नाही बोलवत, सखा कृपावंत, वाचा त्याची। ही बुद्धी तुकाराम महाराजांनी दाखविलेली आहे. वाणी, इंद्रियं, मन हे सर्वही त्याच्या आधीन आहे. म्हणजे बुद्धीला जर प्रेरणा झाली, इच्छा ही बुद्धीलाच होणार आणि इच्छेनंतर कृती होणार. इच्छा करणं हे कार्य बुद्धीचं नसून त्याला प्रेरक शक्ति ही ईश्वराची आहे. अर्थात खरा कर्ता तोच ठरलेला आहे. हा जरी एक प्रतिनिधी म्हणून म्हणजे प्रेरणेमुळे सांगितल्यामुळे करतो आहे, तरी मुख्य कर्तृत्व परमेश्वराचे आहे. साक्षात कर्ता तो आहे. म्हणजे अहंकार नाही. कर्तृत्व अभिमान गेला. तोच कर्ता आणि तोच भोक्ता आहे. सगळं यज्ञाचं पुण्य त्या परमेश्वराचं आहे. त्याच्याकडे देऊन टाकलं आपण काही नाही घेतलं. यज्ञामधे ज्या इंद्रादिक देवता आहेत त्या सर्व इंद्रादिक देवता म्हणजे विश्वरूपी जो परमात्मा आहे त्याच्या शरीरामधे अंतर्गत आहेत. त्याच्या अवयवामधे देवता आहेत, हीच भावना आहे. देवता निराळ्या नाहीयेत. देवतास्वरूप तोच आहे. कर्ता तोच आहे आणि फलभोक्ता तोच आहे. म्हणजे कर्म किती शुद्ध झालेलं आहे हे सांगताहेत आचार्यमहाराज. अशा त्या शुद्ध कर्माचरणामुळे त्याच्या चित्तामधे भगवद्भक्ति निर्माण झाली. ती भक्ति रोज वाढती आहे. हजारो वर्षपर्यंत राज्य केलेलं आहे. अनेक यज्ञ केले. प्रजापालन उत्तम प्रकाराने केलेलं आहे. सर्वांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे आणि अरण्यात जाण्याचं त्यांने ठरविले. जे काही राज्य त्याच्या वाट्याला आलेलं होतं ते सर्व त्यांने आपल्या मुलांना वाटून दिलेलं आहे. आपल्या राजवाड्यातून भरत राजा बाहेर पडला.

पुलहऋषींचा आश्रम ज्या बाजूला होता तिथं येऊन राहिलेला आहे. गंडकी नदी त्या ठिकाणी वहात आहे. भगवान श्रीहरी तिथे राहात आहेत. ज्या गंडकी नदीमध्ये शाळीग्राम शीला प्राप्त होतात. रोज राजाने त्रिकाल स्नान करावं. आता काही राज्याचा भार नाही, चिंता नाही. सगळं मुलांवर सोपवलेलं आहे. निश्चिंत मनाने, शांत मनाने भगवंताची पूजा करावी. कंद, मूल, फल वगैरे आणावी अरण्यातून. विषयवासना मनातून दूर झालेल्या आहेत. सगळं विसरून गेलेला आहे. राज्य, राजवाडा, मुलं, सगळे आप्तइष्ट सगळ्यांना विसरून गेलेला आहे. अशा रितीने त्याचं पूजन चालू आहे. नामस्मरण चालू आहे. ध्यान चालू आहे, त्यामुळे अत्यंत आनंद, शांती त्याला मिळाली. भगवंताची भक्ति, प्रेम मनामध्ये जास्तीत जास्त वाढायला लागलेलं आहे. आनंदाश्रु नेत्रातून वहावे, अंगावर रोमांच उत्पन्न व्हावेत. सात्विक जे अष्टभाव आहेत ते सगळे उत्पन्न झाले आहेत. भगवंताच्या चरणाचे चिंतन करतो आहे. ध्यान करतो आहे. पूजा झाली तरी पूजा विसरून जावी त्यांनी –

क्रियमाणां भगवत्सपर्यां न सस्मार ।।५.७.१२।। श्री. भा.

पूजा झाली की नाही काही भान नाही. असं त्यांने व्रत धारण केलेलं आहे. भगवंताची पूजा, भक्ति सगळा काल त्याच्यामधे चाललेला आहे. प्रत्येक दिवशी प्रातःकाली स्नान झाल्यानंतर सूर्योदय झाला म्हणजे सूर्यमंडलामधे जे भगवंताचं तेज आहे त्या नारायणाची स्तुती त्यांने करावी. नमस्कार करावा, असा कार्यक्रम चाललेला आहे. सर्व संसार सोडून दिलेला आहे आणि निरूपाधिक झाला, काहीही पाठीमागे उपाधी नाही. भगवंताची भक्ती चालू आहे. त्या भक्तीची वृद्धि आहे. प्रगती आहे. पण त्याचं प्रारब्ध कर्मआड आलं. एके दिवशी सकाळी स्नान केलं त्याने नदीमधे. नदीतीरावरच जप करीत बसलेला आहे रोजच्याप्रमाणे. इतक्यात एक हरिणी त्याच्या वरच्या बाजूला पाणी पिण्याकरता आलेली आहे. गर्भिणी होती. ती पाणी पिऊ लागलेली असताना जवळच अरण्यामधे एका सिंहाने गर्जना केली. ती गर्जना ह्या हरिणीच्या कानावर पडली. घाबरली. नदीवरून पलिकडे उडी मारण्याचा तिने प्रयत्न केला. तिच्या उदरातून तो गर्भ बालक पाण्यामधे पडलेला आहे. तीही पलिकडे गेली धावत धावत आणि तिचंही प्राणोत्क्रमण झालेलं आहे. तो हरिण बाळ नदीतून वहात चाललेला आहे. भरत राजा बसला होता. त्यांनी डोळे उघडले होते. समोर तो हरिण बालक वहात चाललेला आहे. त्याला दया उत्पन्न झाली. उठला लगेच जप सोडून, नदीमधे जाऊन त्या हरिणाला त्याने वर आणलेलं आहे. अंग पुसलेलं आहे. थोपटलेलं आहे. डोळे उघडले त्या बालकाने. त्याला घेऊन भरत राजा आपल्या आश्रमामधे आला. लहान आहे. बिचाऱ्याला आई नाही. बाप नाही. माझ्यावरच देवाने याचं संरक्षण करण्याची जबाबदारी सोपवली आहे. अशी कल्पना याची झालेली आहे. देवाला काय संरक्षण करता येत नव्हतं काय ? ह्याच्यावर सोपवायला कशाला पाहिजे. ती एक कर्तव्यबुद्धी निर्माण झाली. दया मनामधे आहे. दया वगैरे हासुद्धा एक विकार आहे. पालन पोषण करणं त्याचं चाललेलं आहे. हळू हळू तो हरिण बालक मोठा होतो आहे. स्नानाला जाताना, कुठेही अरण्यामधे जाताना त्याला खांद्यावर घेऊन जावं त्याने. कारण पाठीमागे अरण्यामधे सिंह–वाघ कोणी प्राणी येतील आणि या हरणाला मारून टाकतील ही आणखी ममता त्याच्या मनामधे निर्माण झाली. आत पूजा करीत असताना बाहेर त्याने डोकावून पहावं आहे की नाही, का गेला. एकटा गेला म्हणजे कोणीतरी त्याला मारतील हे विचार मनामधे येत आहेत.

चोवीस तास भगवंतांचं नामस्मरण आहे, ध्यान आहे, पूजन आहे. असा याचा काल चाललेला होता. त्या भरतराजाचा सगळा काल आता त्या हरणाच्या पालन–पोषणामधे जायला

लागलेला आहे. हे अर्थात प्रारब्ध आहे. प्रयत्न त्याचा कित्ती झालेला आहे. सर्व संग परित्याग करून येऊन राहिलेला आहे. मुलंबाळं सगळी सोडून दिली. राज्य संपत्ती सोडून दिलेली आहे. पण इथं या हरणाच्या रूपाने ते प्रारब्ध त्याला आडवं आलेलं आहे. असा बराच काल गेला. राजर्षी भरताचा मृत्युकाल जवळ आलेला आहे. तो हरिण जो होता, त्याच्या मनामधेही प्रेम उत्पन्न झालेलं आहे. तोही त्याच्याजवळ नेहमी बसायचा, रहायचा. भरतराजा पडलेला आहे, मृत्यु जवळ आलेला आहे. तो हरिण बालक समोर बसलेला आहे. त्याच्याविषयी त्याच्या मनामधे विचार सुरू झाले. मी गेल्यानंतर आता याचं कसं होईल ? कोण याचं संरक्षण करील एवढ्या अरण्यामधे? ईश्वराची प्रार्थना करतो आहे. मृगाच्या ठिकाणी मन असताना त्याचं प्राणोत्क्रमण झालेलं आहे आणि त्याला दुसरा जन्म हरणाचाच घ्यावा लागला. पण हरिणाच्या जन्माला गेलेल्या भरतराजाला पूर्व जन्माचं स्मरण राहिलेलं आहे. विसरला नाही. मृत्यू म्हणजे सगळं विसरून जायचंय. पण याला याच्या भक्तीमुळे, कर्मामुळे स्मरण राहिले आहे आणि पश्चात्ताप झाला. अरे, अरे, काय म्हणाले, मी माझ्या मार्गातून भ्रष्ट झालो, परमेश्वरापेक्षा या हरिणालाच मी जास्त समजलो. त्याचं पालनपोषण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे ह्यात अभिमान आहे मला. अभिमानाने आणि त्याचं पोषण करण्यामधे माझा सगळा काल गेला. भगवंताची भक्ती सुटली आणखी मला हरिणाच्या जन्माला यावं लागलं. लगेच त्याने आपल्या आईला सोडून दिलेलं आहे आणि तो हरिणाच्या जन्माला गेलेला भरतराजा तिथून निघाला. पूर्वजन्मामधे ज्या आश्रमात रहात होता. गंडकी नदीच्या तीरावर तिथं आलेला आहे. त्याही जन्मामधे त्याची भक्ती चाललेली आहे. स्नान करावं, त्रिकाल स्नान त्या हरिणाने, नारायणाचे स्मरण करावं, भगवंतांचे चिंतन करावे असा त्याचा काल गेला. तोही जन्म संपलेला आहे. हरिणाच्या जन्मातून भरतराजा मुक्त झाला.

> अथ कस्यचिद् द्विजवरस्य अङ्गिरः प्रवरस्य शमदमतपः ॥ ५.९.१ ॥ श्री. भा.
> यस्तु तत्र पुमांस्तं परमभागवतं राजर्षिप्रवरं भरतमुत्सृष्टमृगशरीरं
> चरमशरीरेण विप्रत्वं गतमाहुः ॥ ५.९.२ ॥ श्री. भा.

एक ब्राह्मण मोठा वेदशास्त्राचा अभ्यास केलेला, उत्तम कर्मानुष्ठान करणारा, सदाचार संपन्न, आत्मगुणही ज्याच्याजवळ आहे असा एक ब्राह्मण. त्याला दोन स्त्रिया होत्या. एका स्त्रीपासून त्याला नऊ पुत्र झाले. दुसऱ्या स्त्रीपासून एक मुलगा आणि एक मुलगी झाली. तो जो मुलगा झाला दुसऱ्या स्त्रीपासून तो म्हणजे हरिण जन्म ज्याचा संपलेला आहे असा भरतराजा ब्राह्मणरूपाने जन्माला आलेला आहे. या जन्मामधे मुक्त होणार आहे परंतु हरिणाच्या मोहात अडकल्यामुळे

भरतराजाला दोन जन्म घ्यावे लागलेले आहेत.

या जन्मामध्ये मुक्त व्हायचंय पण पुन्हा नवीन शरीरं घ्यावी लागली. परंतु स्मृती आहे. अशी स्थिती आपली का झाली, पुन्हा जन्माला का यावं लागलं सगळं माहिती आहे. आत्मज्ञानसंपन्न आहे. पूर्ण ज्ञान आहे. त्यामुळे व्यवहारातल्या कोणत्याही विषयाची इच्छा नाही. जेवायला मिळालं काय, न मिळालं काय चाललेलं आहे कार्य. कोणाचीही संगती करायची नाही. असं त्याने निश्चित ठरवून टाकलं. हरिण जन्मामध्येही सगळं सोडून दिलेलं आहे. आईला सोडून दिलेलं आहे. एकट्यानेच जन्म काढलेला आहे. झाडावरून खाली पडलेली पानंच फक्त घ्यायची. पाणी प्यावं आणि भगवंताचे चिंतन करावे. आता जन्माला आलेला आहे कोणाचीही संगती असू नये. कोणीही आपल्याला प्रेम करू नये. अशाकरता आपली वृत्ती, दुसऱ्यांना दाखवण्याकरता, कोणीही हाक मारली तरी ऐकायला आलं नाही असं दाखवणे. दाखविण्यासाठी नाही तर याला खरंच ऐकायला यायचंच नाही. लक्ष जर नाही बाहेरच्या शब्दाकडेतर बाहेरच्या व्यवहाराचे ज्ञान होणार कसे? दिसत नाही असं दिसावं. कसंतरी वागायचं. कोणी काम करून घेतलं पुढं उभे राहून तर तेवढं काम करायचं अशी त्याची वृत्ती पाहून लोकांची कल्पना झाली की हा वेडा मुलगा आहे. जडभरत त्याचं नाव ठेवलं. जड म्हणजे अज्ञानी वेडा. त्याचं रूपाने सगळे त्याच्याकडे पहायला लागले. काम मात्र त्यांच्याकडून सगळ्यांनी करून घ्यावीत आणि याने करावीत. कोणी बोलावून न्यावे आपापल्या घरी, खायला द्यावं. कामं सांगावी, पाणी भरावं, काहीही कामं मोठीमोठी सांगावीत त्याला. असं त्याचं चाललेलं आहे.

त्याची आठव्या वर्षी पित्याने मुंज केलेली आहे. वेदाभ्यास त्याने करावा म्हणून पिता प्रयत्न करतो आहे. मोठा ज्ञानी पिता आहे. पण याचं कुठं लक्ष आहे. कशाला वेदाभ्यास करायचा. आता शिकायचं काय राहिलंय म्हणाले. बोलून दाखविलेलं आहे त्याने. पुष्कळ प्रयत्न केला पित्याने पण त्याला काही समजले नाही. ज्ञान नाही काही नाही. काहीच समजत नव्हते. पिता निराश झालेला आहे. काही दिवसांनी पित्याला मृत्यू आलेला आहे. जडभरताची माता जी आहे तिला एक मुलगी आहे. तिची जी सवत होती, जडभरताची सावत्र आई, तिलाही मुलं होती. या जडभरताच्या आईने ती दोन मुले तिच्या सवतीच्या ताब्यात दिली. सांगितले, बाई, तू या दोन मुलांचां सांभाळ कर. मी पतीबरोबर सहगमन करणार आहे, म्हणून तिने सहगमन केलं. जडभरताला आता पिताही नाही आणि माताही नाही. अपेक्षाही त्याला कोणाचीच नाही. आत्मानंद मिळालेला आहे. पण

सगळे त्याचे बंधू व्यवहारात आसक्त झालेले आहेत. त्या सर्वांना व्यवहार खरा आहे, संसार खरा आहे, अशी कल्पना आहे. अध्यात्मविद्या, भगवद्भक्ती इकडे लक्ष नाहीये. चांगला धष्टपुष्ट भाऊ मिळालेला आहे. घरातली सगळी कामं त्याच्याकडून करून घ्यावीत. त्या भाऊ-बहिणींनी, धुणं-भांडी सर्व करायचे, रात्री जेवणं झाल्यावर उरलेले अन्न खा म्हणायचे व भांडी घासायला सांगायचे. यानेही काही तक्रार न करता सर्व कामे करायची. हा जन्म आपला शेवटचा आहे. कशाला तक्रार करायची. संपणार आहे या जन्मी सगळं. पुढे जन्म नाही मृत्यू नाही काही नाही. हा ही पूर्ण विश्वास आहे. अशा प्रकारचं कार्य चाललेलं आहे. शेतामध्ये पाठवावं बंधूंनी. शेत राखायचं काम त्याला सांगावं. तिथंही बसून राहायचं याने. थंडी, वारा, पाऊस यात पांघरायला वस्त्र आहे की नाही याकडे लक्ष नाही. शरीर धष्टपुष्ट आहे. आत्मानंद मिळालेला आहे. चिंता कशाचीच नाही. देह म्हणजे मी आहे या अज्ञानाने देहाची आस्था निर्माण होते. देहासंबंधित सगळे आप्तेष्ट माझे आहेत, ही ममता निर्माण झाली की त्यांचीही चिंता निर्माण होते. जितकी ममता वाढेल तितकी चिंता अधिक आहे. काही नाही, अहंकार नाही आणि ममता नाही. मी आनंद स्वरूप आहे. चिदानंद रूपः शिवोहम् शिवोहम्. कोणाशीही माझा संबंध नाहीये. कोणीही माझे संबंधी नाहीयेत. जगच कुठेय? सगळ्या त्या बंधूंनी कामं करवून घ्यावीत. लोकांनीही कामं करवून घ्यावीत. त्याला काही तरी खायला द्यावं. त्यानेही समाधान मानून घ्यावं. शेतातली कामं करण्याकरता बंधूंनी त्याला पाठवावं. सगळी कामं त्यांनी करावी. कोठे जमीन उकरायची, कोठे काय करायचे हे उभे राहून मात्र सांगायला लागायचं. सांगितल्यानंतर थोडा वेळ गेल्यावर बसला की बसला. समाधी लागलेली आहे.

एके दिवशी जडभरत शेत राखण्याकरता शेतात बसलेला आहे. डोळे झाकून बसलेला आहे. धान्य पक्ष्यांनी नेलं काय, पक्षी आले काय, गेले काय, याचं लक्ष फक्त ईश्वराकडेच आहे. कबीरजींच्या आईने त्यांना सांगितलं अरे कबीरा शेला विणायला बस त्या मागावर. त्यांनी जाऊन बसावे, मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्राचं स्मरण झाल्याबरोबर काम बंद झालेलं आहे. शेले विणायचे, विकायचे परंतु हे ध्यानामध्ये निमग्न झाले असतानासुद्धा ते माग चालत होता. शेला विणला जात होता. त्या शेल्याला बाकीच्या शेल्यापेक्षा जास्त किंमत येत होती बाजारामध्ये. कोण करत होतं हे सगळं? तशीच स्थिती आहे. शेतामध्ये बसून राहिलेला आहे जडभरत. तहान नाही, भूक नाही काही नाही. त्या बाजूला एक चोरांचा राजा होता. त्याची मोठी टोळी होती. त्याला मुलगा नव्हता. त्यानी नवस केला होता देवीला की मला जर मुलगा झाला तर मी तुला नरबळी देईन. त्याला

मुलगा झालेला आहे. नवस फेडण्याकरता त्या चोरांनी  एका मनुष्याला धरून आणलेलं आहे. रात्रीची वेळ आहे. नजर चुकवून तो मनुष्य पळून गेला. राजदूत शोध करायला निघाले. वेळेला तो बळी देण्यासाठी मिळाला पाहिजे.

शोध करता करता ते त्या शेतामध्ये जडभरत ज्याठिकाणी बसले होते डोळे झाकून, तिथे आले. त्यांची दृष्टी या जडभरतावर पडलेली आहे. काय धष्टपुष्ट शरीर आहे, असे वाटले. त्यांना वाटले की बरंय की म्हणाले तो मनुष्य पळाला तर जाऊ दे तो मिळाला नाही तर याला बळी देऊ म्हणाले. चला हो उठा म्हणाले. उठले. कोठे जायचे काही पत्ता नाही. शेतातलं काम माझ्याकडं दिलेलं आहे, काही नाही. कर्म सुटलं पाहिजे. सोडून उपयोग काही. विसरून गेलं पाहिजे म्हणजे खरा संन्यास आहे. कोणतं आपलं कर्म आहे, काय आहे, काही जाणीव नाहीये. कर्माच्या अतित आहे. सर्व एकंदर धर्माच्या, साधनांच्या अधीन झालेलं आहे. ते राजदूत यांना घेऊन आलेले आहेत. गुहेमध्ये मोठं मंदिर बांधलेलं आहे. भद्रकाली देवीची पूजा झालेली आहे. जडभरताला स्नान घातलं. भोजन उत्तम प्रकारचं दिलेलं आहे. शांतपणे भोजन केलं. उत्तम वस्त्र नेसायला दिली. गळ्यामध्ये सुगंधीत पुष्पाच्या माला घातलेल्या आहेत. देवीच्या समोर, महापूजा संपल्यानंतर, एक कट्टा होता तिथे त्याला बसा म्हणाले. बसलेले आहेत. काही चौकशी नाही. त्यांना कळलेलं नसेल असं नाही. कशाकरता आणलेले आहे वगैरे मनामध्ये काहीही नाही. मला मृत्यू येणार आहे मला मारणार आहे. कोणाला मारणर आहेत?

नैनं छिन्दन्ति शस्त्राणिनैनं दहति पावक: ।<br>
न चैनं क्लेदयक्त्यापो न शोषयति मारुतः ।।२.२३ ।। भ.गी. ।।

ही जी स्थिती आत्मस्वरूपाची, भगवान सांगताहेत, त्या आत्मस्वरूपाचं चिंतन चाललेलं आहे. मला काही शस्त्राचा आघात होणार नाही, काही नाही. कोणत्याही पंचमहाभूतांकडून किंवा कोणत्याही कारणाने मला मृत्यू नाही. नैसर्गिक अमर मी आहे. हे प्रत्यक्ष ज्ञान झालेलं आहे नुसतं गीता वाचून, श्रद्धेनं गीता वाचून आचरण करणारे लोक फाशी जाताना सुद्धा नैनं छिन्दन्ति शस्त्राणि अशी भावना ठेवतात. अमर आहे मी. इतकी श्रद्धा ठेवून फासावर जाणारे,  मृत्यूची भीती त्यांना वाटली नाही. या महात्म्यालासुद्धा कशाचीही भीती वाटत नाहीये. शांतपणाने मांडी घालून बसलेले आहेत. तो जो चोरांचा पुरोहित होता, त्याने ठरवलं की याचा आता शिरच्छेद करायचा, याचं मस्तक तोडून देवीच्या पायावर टाकायचं. त्या खड्गाचं अभिमंत्रण केलं. ते खड्ग, तलवार

उचलली त्यांनी. देवीला हे सहन झालं नाही. माझ्यासमोर एका ब्रह्मज्ञानी महात्म्याला मारतायत हे लोक. हिंसेचं या लोकांना काहीच वाटत नाही. कोणाचाही प्राण घ्यायचा म्हणजे यांना काही वाटतच नाही. कोणाचा प्राण घेत आहेत? देवीला राग आलेला आहे. ती देवी त्या मूर्तीतून एकदम प्रकट झाली. त्याच्या हातातली तलवार काढून घेवून त्याचाच शिरच्छेद देवीने केलेला आहे. सर्व चोर जमलेले होते त्या सर्वांचा शिरच्छेद केलेला आहे. देवी अदृश्य झाली. त्याचंही काही नाही.

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।।५.२० ।। भ.गी.

हर्षामर्षभयोद्वेगैःमुक्तो यः स च मे प्रियः ।।१२.१५ ।। भ.गी.

आपलं मरण टळलं, आपण सुटलो म्हणून आनंद नाहीये. आपल्याला मृत्यू येणार आहे याबद्दल भीतीही नाही, विषादही नाही. म्हणून देवीला यावं लागलं. शुकाचार्य सांगतात हे राजा, जडभरत उठलेले आहेत. बाहेर पडलेले आहेत. श्रेष्ठ पुरुषांना त्रास देणारे त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न करणारे जे आहेत, त्यांचाच नाश होतो. जडभरत यामधून मुक्त झालेले आहेत.

परीक्षित राजा, यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नाही. कारण स्वत:चा शिरच्छेद होणार आहे हे माहित असतानासुद्धा चित्तामध्ये कोणतीही गडबड नाहीये. शांत प्रेक्षक म्हणून पाहत आहेत. हे केवढं सामर्थ्य आहे. देहात्मभाव, देहाची आसक्ती हे पूर्ण गेलेले आहे. आपल्या शिराचा, मस्तकाचा छेद होणार आहे, हे पाहत आहेत. सर्वत्र ज्यांची मैत्री आहे. त्यांच्या कामाकरता माझा शिरच्छेद करत आहेत. करेनात का! असं निर्वैर अंतःकरण आहे. म्हणून साक्षात भगवान हे यांचे संरक्षण करत असतात. निर्भय अशा प्रकारच्या भगवंतांला जे शरण गेलेले आहेत, त्यांचं संरक्षण भगवंत करतात. बाहेर पडलेले आहेत गुहेतून. जिकडे रस्ता दिसेल तिकडे निघाले. आपल्या घरी जायचंय, आपल्या गावात जायचंय काही नाही. सगळं विसरले. आले समोर कोणी तर आपले आहेत. नाहीतर कोणी आपलं नाही. हे निघालेले आहेत रस्त्याने. त्या देशाचा राजा रहूगण नावाचा होता. त्याने मुलांच्या स्वाधीन राज्य केलं आणि कपिल मुनींच्याकडे जाऊन काही ज्ञान मिळवावं अशा उद्देशाने तो निघालेला होता. पालखीमधे बसून चाललेला आहे राजा. पालखी वाहण्याकरता रस्त्यामध्ये जे लोक दिसले त्यांना धरून आणलेलं आहे दूतांनी. कामं करून घ्यायची. एक मनुष्य कमी पडलेला आहे. इतक्यात समोरून हे जडभरत येत आहेत हे त्यांनी पाहिले. त्यांना आनंद झाला. हा एकटा मनुष्यसुद्धा पालखी घेऊ शकेल म्हणाले. चांगला धष्टपुष्ट मनुष्य दिसतो. आले, चला महाराज काम आहे. चला म्हणाले घ्या ही पालखी खांद्यावर घ्या. बाकीचे लोक होतेच.

यांनीही पालखी खांद्यावर घेतली. मान अपमान काही नाही.

मानापमानयोस्तुल्यः तुल्यो मित्रारिपक्षयोः ।।१४.२५।। भ.गी.

मान अपमान हे दोन्हीही सारखे आहेत. हे दोन्ही करणारे लोकही सारखे आहेत. काही नाही. शत्रू मित्र भावना नाहीये. पालखी वाहण्याचे काम चाललेले आहे पण खाली बघून चालत आहेत. कोणताही कीडा मुंगी आपल्या पायाखाली मरू नये. मध्ये काही कीडा मुंगी आली तर एकदम त्यांनी उडी मारावी पलिकडे. पायाखाली त्यांचा नाश होऊ नये म्हणून जपावे. शरीराकडून होणारी कार्यं, वाणीने होणारी, इंद्रियाकडून होणारी कार्यं, मनाने होणारी कार्यं अत्यंत भगवत् स्मरणपूर्वक आहेत. यांनी उडी मारल्याबरोबर पालखीला धक्का बसावा, त्या रहूगणराजाला त्रास व्हावा. त्यांनी सांगितलं अरे बाबा सावकाश चाला, मला त्रास होतो आहे. एकदा झालं, दोनदा झालं. त्यांनी सांगितलं राजेसाहेब आम्ही अगदी सावकाश चाललेले आहोत. कोणी नवीन मनुष्य आलेला आहे. हा मध्येच एकदम उडी मारतो, त्याला तुम्ही काहीतरी सांगा म्हणाले. राजाला राग आलेला आहे. एकामुळे सगळेच आणखी दोषी ठरण्याचा प्रसंग आलेला आहे. म्हणून राजा त्या जडभरताला उद्देशून मुद्दाम मनाला लागेल असं बोलतो आहे.

अहो कष्टं भ्रातः व्यक्तं ऊरु परिश्रान्तः दीर्घं
अध्वानं एक एव ऊहिवान् सुचिरं नातिपीवा न
संहननाङ्गः जरसा च ऊपद्रुतो भवान् सखे नो
एव अपरे एते सङ्घट्टिनः इति बहु विप्रलब्धोपि
अविद्यया रचितद्रव्यगुणकर्माशय स्वचरमकलेवरे
अवस्तुनि संस्थानविशेषे अहंममेति
अनध्यारोपित मिथ्याप्रत्ययः ब्रह्मभूतः तूष्णीं
शिबिकां पूर्ववद् उवाह ।।५.१०.६।।श्री. भा.

राजा म्हणतो आहे, अरे हा दमलेला दिसतो आहे. तुझ्या एकट्यावरच पालखीचा भार पडलेला दिसतो आहे. म्हातारा झालेला आहे वाटतं. तरूण होते जडभरत, पण मुद्दाम त्याला लागेल असं बोलले. फार वेळ हा भार तुझ्या खांद्यावर झाल्यामुळे तू दमलेला दिसतो आहेस. हे बाकीचे लोक दमलेले दिसत नाहीत. तुलाच फार श्रम झालेले दिसतात. सावकाश चल म्हणाले. असं मुद्दाम त्याला टोचून बोलतो आहे राजा. पण त्या शब्दाकडे त्याचं लक्ष नाहीये. स्वतःच्या

शरीराकडे ज्याचं लक्ष नाहीये त्या शरीराला उद्देशून जे शब्द उच्चारले जातात, तिकडे कसं लक्ष जाईल. शेवटचं शरीर आहे. संपणार आहे. जगाचा माझा संबंध संपणार आहे. कशाला रागवायचं, बोलेना बिचारा. अविद्येने तयार झालेले हे शरीर खरं नाही, खोटं आहे. त्या शरीराला मी कशाला समजायचं. शिरच्छेद होण्याच्या वेळेला ज्यांना काही वाटलं नाही त्यांना राजा थोडं बोलला तर काय वाटणार आहे. इतकी मनोभूमिका तयार झालेली आहे. शांतपणाने पालखी वाहण्याचे काम चाललेले आहे. पुन्हा धक्का बसला पालखीला. अतिशय रागावलेला आहे राजा. आणि रागाने म्हणतो आहे अरे तू जिवंत आहेस का मृत झालेला आहेस. मी कोण आहे माहित आहे काय ? मी राजा आहे. तुला चांगली शिक्षा मी करीन, दंड करीन. वाटेल तसं बोलतो आहे राजा. महापुरूषांच्याकडून उपदेश मिळवण्याकरता निघालेला आहे. आश्चर्य वाटलं जडभरतांना. थोडेसे याचे डोळे उघडावे, त्याचं प्रारब्धंच उदयाला आलं म्हणून यांना बोलण्याची बुद्धी झाली. त्यांनी बोलायला आरंभ केलेला आहे.

त्वयोदितं व्यक्तमविप्रलब्धं
भर्तुः स मे स्याद् यदि वीर भारः ।
गन्तुर्यदि स्याद् अधिगम्यमध्वा
पीवेति राशौ न विदां प्रवादः ।।५.१०.९ ।। श्री. भा.
स्थौल्यं कार्श्यं व्याधय आधयश्च
क्षुत्तृड्भयं कलिरिच्छा जरा च ।
निद्रा रतिर्मन्युरहंमदः शुचः
देहेन जातस्य हि मे न सन्ति ।।५.१०.१० ।। श्री. भा.

काय राजेसाहेब काय बोलला आपण. दमला आहेस, श्रम झालेले आहेत. कोणाला उद्देशून बोलला आपण. मला तरी भार झाला नाही तर श्रम कुठले? कुठं जायचं, कसं जायचं, काय काही माहीत नाही म्हणाले. तू मोठा कृश झालेला आहेस, म्हातारा झालेला आहेस. कोणाला म्हणालास तू. स्थूल किंवा कृश हे देह धर्म आहेत राजेसाहेब. आधी–व्याधी सर्व देहाची स्थिती आहेत. प्रेम करणं त्याचप्रमाणे रागावणं, निद्रा वगैरे हे सर्वही देहधर्म आहेत. मला काही नाही. देह जन्माला आलेला आहे. त्या देहाबरोबर मी जन्माला आलो आहे असं आजपर्यंत मी समजत नाही. मला जन्म नाही किंवा मृत्यू नाही. मला कोणतेही देहाचे विकार नाही आहेत. कृशता नाही, स्थूलता नाही, श्रम नाही काही नाही. दमलेला आहे घाम आलेला आहे दिसतो आहे म्हणून राजा म्हणाला

श्रम झाले असावेत. जिवंत किंवा मृत हे सगळे या देहालाच आहे. आदि–अंत असा हा देह आहे. आपण राजे आहात आणि हे सगळे आपले नोकर आहेत, हे सुद्धा खरं कशावरून मानायचं. खरं आहे स्वामी–सेवक असं कोण आहे? ते तत्वज्ञान आहे. तुम्ही राजे आणि आम्ही सेवक हे जर खरं असेल तर तुम्ही शिक्षा करू शकाल आम्हाला. काय संबंध आहे. व्यवहारात कोणी राजे समजावे कोणी कोणाचा नोकर समजावे, काही संबंध नाही. आत्मस्वरूपाची प्राप्ती मला झाली. मी कोण आहे हे मला समजले आहे. मला आता शिक्षा काय देणार तुम्ही, दंड करून काय शिकवणार तुम्ही. काही आता शिकायचं राहिलं नाही म्हणाले. थोडसं भाषण केलेलं आहे. त्यांचा अनुभव त्यांच्या वाणीतून प्रकट झालेला आहे.

राजाच्या मनावर परिणाम झाला. हा कोणी ज्ञानी महात्मा आहे. पालखीतून खाली उतरला राजा. त्यांच्या खांद्यावरची पालखी काढून घेतलेली आहे. आणि त्यांच्या पायावर मस्तक ठेवलेलं आहे. अनेक योगशास्त्राचे मोठे मोठे जे ग्रंथ आहेत, त्या ग्रंथामध्ये जे वर्णन केलेलं आहे, ज्ञानी महात्म्यांचं, त्याप्रमाणे यांच्या मुखातून सर्व ग्रंथाचे सार निघालेले आहे. कोण आहात आपण महाराज सांगा. कोठून आलेले आहात, कोठे निघालेले आहात. इंद्राच्या वज्राची तुम्हाला भीती वाटत नाही, शंकराच्या त्रिशूलाची, यमदंडाची भीती वाटत नाही. पण आपल्यासारख्या ज्ञानी, ब्रह्मर्षी महात्म्याचा अपमान आज माझ्या हातून झाला. कोण आहात आपण सांगा. सामान्य जड, वेड्यामाणसाप्रमाणे बाहेरून आपण दिसता पण केवढं ज्ञान आपल्यापाशी आहे. आपली वाणी ही समजून घेणं हे आम्हाला माहिती नाही. व्यवहार खरा आहे. त्या व्यवहार दृष्टीने आपल्या वाणीचा अर्थ लावतो आहे. जन्म नाही. मृत्यू नाही. रोग नाही काही नाही, हे आम्हाला खरं कसं वाटणार? सांगा, आपण समजावून सांगा. श्रम झालेले दिसत आहेत आपल्याला. नाही कसं म्हणता आपण? चालताना खाली पाहून चालता आपण, आम्हाला जे दिसतं आहे ते खरं मानायला काय हरकत आहे.

स्थाल्यग्नितापात्पयसोऽभिताप<br>
स्तत्तापतस्तण्डुलगर्भरन्धिः।<br>
देहेन्द्रियास्वाशयसन्निकर्षात्<br>
तत्संसृतिः पुरुषस्य अनुरोधात् ।।५.१०.२२।। श्री. भा.

व्यवहार सत्य आहे ही बुद्धी झाल्यामुळे राजा प्रश्न मांडतो आहे. आत्मा हा कर्ताभोक्ता नाही.

देहधर्माचा संबंध आत्म्याला होत नाही म्हणे. आत्मा तर सर्वव्यापी आहे. सर्वव्यापी असणारा आत्मा सर्वांशी बद्ध आहे. मग सर्वांची सुख दुःखं त्याला नाही कसं म्हणता. चूल पेटलेली आहे, जाळ लावलेला आहे. त्याच्यावर पातेले ठेवलेले आहे, पाणी टाकलेले आहे त्याच्यामध्ये. खाली अग्नी आहे. ते पात्र तापल्याबरोबर आतलं पाणी तापलेलं आहे. पाण्यामध्ये टाकलेले तांदूळही शिजायला लागलेले आहेत अग्निच्या सामर्थ्यामुळे. अग्नी त्या पात्राच्या सहाय्याने तांदूळापर्यंत पोहचला आहे आणि तांदूळाचा भात तयार झालेला आहे. देह आहे. मी आहे. अंत:करण आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, ज्ञानमय, आनंदमय यात सर्वत्र आत्मा आहे. पलिकडेआहे याचा अर्थ इथे नाही असे नाही. अन्नमय कोषापासून आहे. या सर्वांशी संबंध असणारा असा जो आत्मा आहे. त्याला या देहादिकांचे धर्म का नसावेत. कर्तृत्व भोक्तृत्व त्याला का नसावं? तो सुखीदुःखी आहे असे का मानू नये? हे जसं खरं आहे तसं राजाही खरा आहे आणि सेवकही खरा आहे. हा स्वामी-सेवक भावही खरा आहे. हे जर जगामध्ये नाही असं मानलं तर जगामध्ये अव्यवस्था होईल म्हणाले. कोणीही वाटेल तसा वागायला लागेल. म्हणून स्वामी सेवक भावही योग्य असला पाहिजे. ते मला समजावून सांगा म्हणाले. काय आहे, तुम्हाला काही नाही हे दिसतंय. तुमच्या खांद्यावर पालखी दिली तरी तुमच्या मनात कोणताही विकार नाहीये. मानाकरता किती प्रयत्न करावा लागतो. किती वैर उत्पन्न होते, काही नाही. निर्विकार आपले मन आहे. परंतु आम्ही कसं हे समजून घ्यायचं. आत्मा हा अकर्ता-भोक्ता आहे. कोणत्याही क्रियेचा त्याला संबंध नाही. हे आम्हाला जाणून घ्यायचयं.

जडभरताने बोलायला सुरुवात केली आहे. राजासुद्धा जिज्ञासू आहे. पश्चाताप झालेला आहे. जडभरताची योग्यता त्याला पूर्ण समजली आहे. पण आपलीही शंका त्यांनी मांडली. ज्ञानी महात्माच त्या शंकेचं समाधान करू शकतो. त्यांनी सांगितले बाबा

न सूरयो हि व्यवहारमेनं
तत्त्वावमर्शेन सहामनन्ति ।।५.११.१।। श्री. भा.

तू मोठा बोलका आहेस म्हणाले. बोलायला तुला चांगलं येतं. पण ज्ञान तुला बिल्कुल नाही. खरे ज्ञानी महात्मे सर्वच व्यवहार हा मिथ्या समजत आहेत. तत्वज्ञानाच्या बरोबर व्यवहार नाहीये. आत्मज्ञान झाल्यावर व्यवहार संपलेला आहे. व्यवहारच जिथे नाही तिथे हे खरे आहे वगैरे

कोण समजणार ? त्या तत्वज्ञानी माणसाच्या मनामध्ये काही नाही. सगळे धर्म जे आहेत, वर्णधर्म आहे, आश्रमधर्म आहे, राजधर्म आहे हे सगळेही व्यवहारात येतात. तत्त्वज्ञान होण्याकरता या वाणीचा काहीही उपयोग नाही. कर्माचा काहीही उपयोग नाही. स्वप्नामध्ये सुद्धा सर्व सुख दुःख भोगायला लागतं म्हणाले. म्हणून स्वप्नातलं खरे होत नाही. मनामध्ये रजोगुण, तमोगुण जोपर्यंत आहे, तोपर्यंत सगळा व्यवहार दिसतो आहे. भासतो आहे. सुख मिळालं, दुःख मिळालं. दुःख गेलं, सुख जास्ती झालं ह्या सगळ्या वासना चित्तामध्ये उत्पन्न होतात. हे सर्वही फल वासनांमुळे मिळतं, फल भोगतो आणि संसार यामुळे खरा वाटतो म्हणाले.

तावान् अयं व्यवहारः सद् आविः
क्षेत्रज्ञसाक्ष्यो भवति स्थूलसूक्ष्मः ।।५.११.७।। श्री. भा.

जोपर्यंत त्या आत्मस्वरूपाचं ज्ञान होत नाही, तोपर्यंत हा व्यवहार सर्व खरा वाटतो आहे म्हणाले. त्याला कारण म्हणजे मन आहे. मनानेच खरं वाटून घेतलेलं आहे आणि तोच मनाचा अभ्यास कितीतरी जन्माचा आहे. त्यामुळे खोटं म्हटलं ज्ञानी माणसाने, ते खरं कसं वाटेल ? या त्रिगुणामध्ये जोपर्यंत विषयात आसक्त मन आहे तोपर्यंत संकट आहेत. दुःखं आहेत. गुणातीत अवस्था ईश्वरकृपेने प्राप्त झाली तर त्याचं पूर्ण कल्याण होते, शांती त्याला प्राप्त होते. असा पुष्कळ उपदेश जडभरताने राजाला केलेला आहे. हे मत आत्मस्वरूपाचे ज्ञान करून देणारं आहे.

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यम् अतीन्द्रियम् ।।६.२१।। भ.गी.

बाकीचं प्रमाण त्याला काही समजावून सांगू शकत नाहीये. संसारताप दूर करणारं मन आहे. यामधील दोष जर सगळे दूर करता आले तर मात्र आपलं पूर्ण कल्याण होतं. मन हा खरा शत्रू आहे. सद्गुरुची, श्रीहरीची उपासना हे शस्त्र तू मिळव आणि त्या शस्त्राने मनाला शासन कर म्हणाले. रहूगण राजाच्या मनाचे समाधान झालेले आहे. देहाभिमानी मी आहे म्हणाले त्यामुळे अमृतासारखं आपलं भाषण माझ्या चित्तामध्ये स्थिर रहात नाहीये. हा अध्यात्मयोग आहे, आत्मसंबंधी जो उपाय आपण सांगितलात त्याचं स्पष्टीकरण करून आपण सांगा महाराज.

उपदेश करताना सर्वत्र जे आत्मतत्व आहे हे त्याला समजावून सांगायचं आहे. त्याकरता पृथ्वी, भूतदया आहे हे घेतले  दृष्टांताकरता म्हणून. सर्वही लोक या पृथ्वीवर रहातात म्हणाले. पार्थिव आश्रय घेऊन रहातात. त्या पृथ्वीपासूनच हे शरीर झालेले आहे. द्वैत सांगतात आणि अद्वैतही दाखवतात. शरीर पृथ्वीपासून तयार झालेले आहे. पण शरीरामध्ये पाय निराळे, हात

निराळे, गुढघे निराळे, मांड्या निराळ्या, धड निराळे, मस्तक निराळे, कान निराळे, नेत्र निराळे कित्ती विविधता आहे पण सगळं एक आहे म्हणाले. हा भेद जरी असला तरी वस्तुत: अभेद आहे. म्हणून अभेदाकडे गेलं पाहिजे, मूळ चिंतन झालं पाहिजे. केवळ बाह्य कार्यदृष्टी उपयोग नाही. कारणदृष्टी निर्माण झाली पाहिजे. तरच शांती आहे. हे शरीर, शरीराचे अवयव अनेक आहेत. खांदा हे पार्थिव आहे. खांद्यावर दिलेली पालखीही पार्थिव आहे आणि पालखीत बसलेला पण पार्थिवच आहे. पालखी घेणारेही पार्थिव आहेत. राजा समजतो आहेस की मी राजा आहे, हे नोकर आहेत आणि म्हणून मी सांगितलेली आज्ञा यांनी मान्य केली पाहिजे. कुठला राजा आहेस तू. तूही पार्थिव आणि आम्हीही पार्थिव. वाटेल त्याला धरून आणतोस आणि त्याला पालखी देतोस, पालखीमध्ये बसून जातोस आणि आज्ञा करतोस आणि ज्ञान मिळवण्याला जातोस तू. कसं तुला ज्ञान मिळेल? अहंकार नष्ट झाल्याशिवाय आत्मस्वरूपाजवळ येत नाही म्हणाले. काय या बिचाऱ्या लोकांना धरून आणून तू त्रास देतोस. सर्व चराचर हे पृथ्वीमधे अंतर्भूत आहे. सगळं पार्थिव आहे. पृथ्वीशिवाय दुसरं काही नाही. तुम्ही वाटेल ते समजा मी राजा आहे, मी पंतप्रधान आहे. मी राष्ट्रपती आहे. समजून नुसतं काय उपयोग? असा हा व्यवहार आहे.

अभेद असताना, अद्वैत असताना, द्वैत मानून त्यामध्ये सुद्धा मी श्रेष्ठ मी कनिष्ठ हे सगळे द्वैत तुम्ही निर्माण केलेलं आहे. ही संपूर्ण पृथ्वी हिचेही मूलतत्व जे आहे, मूल कारण परमाणू म्हणून सांगताहेत त्याचंही मूल जे आहे. क्रमाने विचार केला तरी हरकत नाही. पृथ्वी आहे, तेज आहे, वायू आहे. आकाश आहे, जल आहे. महत्तत्व आहे, अव्यक्त प्रकृती आहे. पुन्हा आणखी अव्यक्त जे आत्मस्वरूप त्या ठिकाणी प्रकृतीचा संबंध संपतो. मूलापर्यंत अगदी आत्मस्वरूपापर्यंत गेल्यानंतर सगळी कार्यदृष्टी संपून जाते अपवाद होऊन जातो आहे. दागिने ही दृष्टी जोपर्यंत आहे तोपर्यंत हा दागिना चांगला आहे, हा मला मिळाला पाहिजे असा विचार येतो. पण सगळं सोनं आहे. तो दागिना विकणारा त्याच्यादृष्टीने हा दागिना चांगला हा वाईट ही दृष्टी नाही. लोकांना जसं पाहिजे तसं तो दागिने करून देतो. पण त्याच्याजवळ जर दागिना दिला तर तो दागिना मोडून, जाळून त्यापासून निव्वळ सोनं मिळवतो. त्याला त्या दागिन्याबद्दल मोह नाहीये. म्हणून शुद्ध अशा स्वरूपाचं आत्मस्वरूप जे आहे, ते सत्य आहे मूलतत्व आहे. त्या मूलतत्त्वांचा सगळा आविर्भाग झालेला आहे. मनोवासनेमुळे, कर्मामुळे ईश्वराने हा आविर्भाग दाखवलेला आहे. ईश्वराने केलेलं आहे म्हणून हे सत्य आहे, हेही नाही. ईश्वराने दाखवलेलं आहे. तुम्ही ते सत्य समजता त्याला

ईश्वराचा काय दोष? हे जे आत्मस्वरूप आहे ईश्वरस्वरूप याची प्राप्ती कोणत्याही साधनाने होत नाही.

तपसा न याति

न चेज्यया निर्वपणाद् गृहाद्वा ।।५.१२.१२।। श्री. भा.

दानधर्म करा. तपश्चर्या करा, योगाभ्यास करा.

विना महत्पादरजोऽभिषेकम् ।।५.१२.१२।। श्री. भा.

आत्मज्ञानी महात्म्यांच्या चरणांचे रजःकण जोपर्यंत आपल्या मस्तकावर पडले नाहीत, म्हणजे इतकी नम्रता, निरहंकार वृत्ती जोपर्यंत झाली नाही तोपर्यंत कोणत्याही साधनांनी आनंदरूपी आत्मा मिळणार नाही. भगवान श्रीहरी वासुदेवाबद्दल शुद्ध भावना जर अंत:करणामध्ये निर्माण झाली तर सर्व व्यवहार संपून जातो आहे.

यत्रोत्तमश्लोकगुणानुवादः प्रस्तूयते ग्राम्यकथाविघातः ।।५.१२.१३।। श्री. भा.

त्या परमेश्वराच्या कृपेनंच अशी शुद्ध बुद्धी उत्पन्न होते. जडभरत सांगतात रहूगण राजा मी सुद्धा पूर्वी तुझ्यासारखा राजा होतो म्हणाले. परंतु हे सगळं मी ऐकलं, विचार केला मार्गदर्शन मला मिळालं. केवळ भगवंताची आराधना करावी म्हणून सर्वसंग परित्याग करून अरण्यामध्ये आलो असताना एका हरिणाच्या बालकामध्ये माझे मन गुंतून राहिलं आणि मला हरिणजन्म घ्यावा लागला. पण मृगशरीर आलं तरी अद्यापी याचे स्मरण मला भगवंताच्या कृपेने आहे. म्हणून कोणाचीही संगत करायची नाही असं मी ठरवलंय. असंग रितीने मी सर्वत्र संचार करतो आहे. म्हणून जो आत्मजिज्ञासू आहे त्याने असंग राहण्याचा प्रयत्न करावा. असंगता अंगामध्ये बाणण्याकरता म्हणून संतांची, महात्म्यांची संगती करावी. म्हणजे हे विवेक, ज्ञान उत्पन्न होते. नित्यानित्य विवेक आहे, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहे, हेयोपादेय विवेक आहे सगळे विवेक हे चित्तामध्ये उत्पन्न झाल्यानंतर आत्मस्वरूपाची ओळख होती आहे आणि तो मुक्त होतो आहे. जडभरताने त्याला आणखी थोडा उपदेश केला. संसार हे अरण्य आहे.

दुरत्ययेऽध्वन्यजया निवेशितो रजस्तमः सत्त्वविभक्तकर्मदृक्।

स एष सार्थोऽर्थपरः परिभ्रमन् भवाटवीं याति न शर्म विन्दति ।।५.१३.१।। श्री. भा.

ह्या मार्गावर आणून सोडलेलं आहे त्या ईश्वराच्या मायेने. सगळ्या लोकांनी या अरण्याचा रस्ता धरलेला आहे. सुखाच्या इच्छेने सगळे या रस्त्यांनी चाललेले आहेत. ही भवाटवी म्हणजे संसार

अरण्य आहे. या अरण्यामध्ये सहा चोर राहत आहेत म्हणले. त्यांचं राज्य आहे. स्पष्टीकरणही शुकाचार्य महाराजांनी केलेलं आहे. ते चोर म्हणजे काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हे चोर आहेत. हा जो अरण्यातून चाललेला प्रवासी आहे, त्याने जे काही पुण्यधन मिळवलेलं असेल, चांगली कर्मं करून, हे चोर सगळं त्यांचं पुण्यं हिरावून नेतात. कोठल्यातरी मोहात ते त्याला टाकून जातात, मग संपते सगळे. अरण्यातल्या लांडग्या–कोल्ह्यासारखे आप्तइष्ट सगळं धन समक्ष डोळ्यादेखत घेऊन जातात. पुष्कळ गवत याठिकाणी वाढलेलं आहे म्हणाले. पुष्कळ मधमाशा वगैरे चावत आहेत. सगळे लोक अरण्यातून चाललेले आहेत. कोणत्या दिशेनं आपण निघालो काही त्याला समजत नाहीये. त्याप्रमाणे मधमाशा म्हणजे हे सगळे दुर्जन लोक. शुकाचार्य महाराजांनी स्पष्टीकरण केलं. दुर्जनांचीही गाठ पडली. एकदम याचं सर्वस्व हरण करतात, दुःख देतात. सुवर्ण जे आहे त्याठिकाणी आसक्त झालेला जो आहे बंधू असो, गुरू शिष्य असो पिता पुत्र असो कोणीही जरी असलं तरी त्यांच्या मनातील प्रेमभाव नाहीसा होतो, त्या सुवर्णाच्या लोभामुळे. अजगर मोठा आहे या ठिकाणी. निद्रा हा अजगर आहे म्हणतात शुकाचार्य महाराज. ह्या निद्रा अजगराने ह्याला गिळून टाकलेलं आहे. ह्याला काही समजत नाही. ज्ञान नाही, अज्ञानही नाही. हे अज्ञान आहे हे त्यावेळेला समजत नाही. नंतर जागा झाल्यावर म्हणतो मी अगदी काही समजू शकलो नाही. अज्ञानाचं अनुमान करावं लागतं. अज्ञानाचा अनुभव साक्षात नाहीये. त्या अजगराच्या पोटामध्ये हा जातो.

अशा रितीने चालले आहेत या अरण्यातून सगळे. हंस पक्षी भेटतात यांना. चांगले वागणारे म्हणजे सत्पुरुष, त्यांची संगती धरावी असे वाटते. त्यांनी सांगितलेले सर्व ऐकावे असे वाटते. पण पुन्हा या हंसांची संगती सोडून देतो. पुन्हा माकडांची संगती धरतो. सत्पुरुषांची संगती सोडून देऊन चांचल्य बुद्धीने नेणारे वानरासारखे विषयी लोक यांच्या संगतीने जातो. संकटं येतात. दुःखं येतात त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करतो. ईश्वराला शरण जातो आणि दुःखं नाहीशी झाली की पूर्ण सुख आपल्याला मिळालं अशी समजूत करून घेतो म्हणाले. डोक्यावर घेतलेला भार जड झाला म्हणून खांद्यावर घेतला त्यांनी किती हलके वाटले. पण भार आहेच ना! डोक्यावरचा भार खांद्यावर आला. याप्रमाणे मनामध्ये उत्पन्न होणारे अनेक विकल्प जे आहेत त्यामुळे सगळं हे खरं वाटतं. दुःखं झाली तरी त्याचे स्मरण रहात नाही. निदान दुःखाचं स्मरण तरी रहायला पाहिजे. सगळं खरं आहे. मग दुःखही खरीच आहेत की पण दुःखाची आठवण रहात नाही ना! ती आठवण राहिली तरी यातून बाजूला व्हावं असं वाटेल. पण ते स्मरणच रहात नाही. रहूगण राजा तुझे मन कोठेही

आसक्त होऊन देऊ नको. भगवान श्रीहरीची सेवा भक्ती तू कर. त्याच्या कृपेने विवेक ज्ञानरूपी शस्त्र प्राप्त करून घे आणि यातून बाहेर पड म्हणाले. रहूगण राजाला ज्ञान व्हावं, या दयेतून त्याला उपदेश केलेला आहे. राजाने अपमान केला हे मनामध्ये सुद्धा नाहीये. ज्ञानी मनुष्याला फक्त दया आहे, इतरांना नाहीये. राजा म्हणजो महाराज मानवाचा जन्म किती चांगला आहे, दुसऱ्या जन्मापेक्षा. आपल्यासारख्या महात्म्यांची संगती या जन्मामध्येच घडती आहे. आपल्या थोड्यावेळाच्या समागमाने माझ्या अंतःकरणामध्ये भगवद्भावना उत्पन्न झाली. माझ पाप सगळं गेलेलं आहे. आपल्याला मी नमस्कार करतो. शुक सांगतात राजा ब्रह्मर्षि जडभरत हे त्या सिंधू राजाला आत्मतत्वाबद्दल मार्गदर्शन करत आहेत. अत्यंत दयाळू आहे. रहूगण राजानी त्यांच्या पायावर मस्तक ठेवलेलं आहे.

आपूर्ण अर्णव इव निभृतकरणोर्म्याशयः
धरणिमिमां विचचार ।।५.१३.२४।। श्री. भा.

संपूर्ण जलाने भरलेला समुद्र जसा गंभीर आहे. कोणाला उपदेश केला, कोणाचा उद्धार झाला इकडे काही लक्ष नाही. ते त्याचं प्रारब्ध आहे. निघालेले आहेत जडभरत पुढे. कोठे जायचे काही माहित नाही. हे विश्वची माझे घर , ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपणची जाहला।। सगळेच माझे आहे. त्यांची ममता हा गुण आहे. आमची ममता हा दोष आहे. मर्यादित आहे ममता. हे घर माझे आहे. ही मंडळी माझी आहेत. एवढीच ममता आहे. सर्वच माझं आहे अशी ममता उत्पन्न झाली तर तो ज्ञानी ठरेल. याप्रमाणे जडभरताने केलेला उपदेश आणि त्याचे स्पष्टीकरणही शुकाचार्य महाराजांनी केलेलं आहे. परीक्षित राजाच्या मनाचे पूर्ण समाधान झालेलं आहे. निवृत्तीमार्ग कसा आहे? भगवद्भक्तीनं खरी निवृत्ती प्राप्त होते, हे सगळं शुकाचार्य महाराजांनी त्याला समजावून सांगितलेले आहे.

पुढे राजाने विचारले महाराज, प्रियंवद राजाचे चरित्र सांगताना आपण या भूमंडलाचे वर्णन केले, सप्तद्वीपं झाली तो रथामधे बसून फिरल्यामुळे आणि सात समुद्र झाले. हे पृथ्वीचे वर्णन मी आपल्या मुखातून ऐकले पण हेच सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे. सप्तद्वीपं कोणती आहेत, सप्तसमुद्र कोणते आहेत, त्या द्वीपामध्ये कोण कोण रहात आहेत, ते कसं वागताहेत हे समजून घेण्याची माझी इच्छा आहे. भूगोल सगळा समजावून सांगा.

सात दिवसाचे आयुष्य ठरलेलं आहे. सातव्या दिवशी जायचं आहे आणि राजा म्हणतोय भूगोल मला समजावून सांगा. पण राजानेच याचा खुलासा केला.

भगवतो गुणमये स्थूलरूपे आवेशितं मनो हि
अगुणेऽपि सूक्ष्मतमे आत्मज्योतिषि परे ब्रह्मणि
भगवति वासुदेवाख्ये क्षमं आवेशितुं तदु हैतद्
गुरोऽर्हस्यनुवर्णयितुमिति ।।५.१६.३ ।। श्री. भा.

राजा काही भूगोल समजून घेणार नाहीये. हे संपूर्ण बाह्य जे जगत आहे ते परमेश्वराचे रूप आहे. हेच विश्वरूप झालेलं आहे. विश्वकर्ताही तो आहे आणि विश्वरूपही तो आहे. हे स्थूल रूप एकदा बुद्धीमध्ये स्थिर झाले म्हणजे सूक्ष्म जे सच्चिदानंद, अधिष्ठान रूप ते समजून घेण्याची योग्यता प्राप्त होते. म्हणून मला हे सांगा अशी प्रार्थना करतोय. शुकाचार्य महाराज म्हणतात राजा, परमेश्वराचं रूप म्हणजे विश्व आहे ते किती अनंत आहे. मनाने, वाणीने याचे आकलन होणे कठीण आहे. कितीही आयुष्य असले तरी याचे वर्णन करता येत नाही, आकलन होत नाही. मुख्य मुख्य जेवढं आहे तेवढं मी तुला सांगतो. जसं आमच्या गुरुमहाराजांच्या मुखातून मला कळलेलं आहे, तसं मी तुला सांगतो.

जंबुद्वीपापासून त्यांनी सांगायला आरंभ केलेला आहे. जंबु, तक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच असे सगळे सात द्वीपांचे ते वर्णन करणार आहेत. पृथ्वी गोल आहे–मध्यभागी जंबूद्वीप त्याच्या सभोवती एक समुद्र, त्याच्या सभोवती एक द्वीप, त्याच्या सभोवती एक समुद्र अशी रचना वर्तुळाकार आहे. दहा लक्ष योजने विस्तीर्ण असा वर्तुळ असलेला हा जंबूद्वीप आहे. नऊ खंड याच्यामध्ये आहेत. त्याची मर्यादा घालणारे त्याचे पर्वतही आहेत. या जंबूद्वीपाच्या मध्यभागी इलावृत्त नावाचे खंड आहे आणि ज्याच्या मध्यभागी मेरु पर्वत आहे. मोठा उंच आहे, लांब आहे. त्याच्याही सभोवती लहान लहान अशा प्रकारचे पर्वत आहेत. इलावृत्ताच्या दक्षिणेला हिमालय पर्वत आहे. निषद, हेमकुंड हे पर्वत आहेत. ते समुद्रापर्यंत पसरलेले आहे. दुसऱ्या दिशेला माल्यवान, गंधमादन असेही पर्वत आहेत. चारी दिशांना पर्वत आहेत. ह्या मेरु पर्वतावर देवांची उपवनं आहेत. नंदन, चैत्ररथ, वैभ्राजक, सर्वतोभद्र या उपवनामध्ये सर्व देव आपापल्या स्त्रियांसहवर्तमान विहार करत आहेत. मोठी मोठी फळं या वृक्षातून खाली पडतात. त्या फळाच्या रसापासूनही नदी निर्माण झालेली आहे. इलावृत्त खंडातून ती वहात जात आहे. अनेक पर्वत या



खंडात आहेत. अनेक नद्या आहेत. या ठिकाणी जे काही रहाणारे लोक आहेत, ते भगवंताची उपासना करत आहेत. मुख्य म्हणजे या इलावृत्त खंडामध्ये भगवान शंकर परमात्मा राहात आहेत. ईश्वराची उपासना ते करत आहेत. भगवंतांच्या चरणापासून निघालेली गंगा नदी वहात वहात हिमालयातून आलेली आहे.

यापैकी जंबूद्वीपापैकी भारतवर्ष म्हणून एक खंड आहे. ती कर्मभूमी आहे. बाकीची सगळी खंड म्हणजे स्वर्गाचे स्थान म्हणजे पुण्याचे फल भोगण्याकरता म्हणून ती स्थानं केलेली आहेत. भूमीवरचे स्वर्गच त्यांना म्हणतात. हजारो वर्ष आयुष्य त्यांना आहे. त्याठिकाणी राहणारे लोक. दहा दहा हजार हत्तींचे सामर्थ्य त्यांना आहे. असा पुष्कळ सुखाचा काल त्यांना येतो आहे. तिथं राहणारी मंडळी पुष्कळ सुखाचा उपभोग घेत आहेत. इलावृत्त खंडामध्ये भगवान शंकर परमात्मा हे एकच पुरुष आहेत. बाकी सर्व पार्वतीच्या सख्या-दासी वगैरे आहेत. त्या इलावृत्ताच्या प्रदेशात प्रवेश करणारा पुरुष त्याला स्त्रीरुप प्राप्त होते. ते काय चरित्र आहे ते पुढे राजा तुला सांगू. भगवान शंकर, पार्वती माता आणि तिच्या सर्व दासी, सखी या सर्वांशी सहवर्तमान, श्रीहरींचे जे संकर्षण रूप आहे त्याचे चिंतन करतात, ध्यान करतात, प्रार्थनाही करतात. एक खंडाचे वर्णन झालेले आहे.

यापुढे भद्राश्ववर्ष म्हणून इलावृत्त खंडानंतर आहे. त्या ठिकाणी हयग्रीव नावाचे परमेश्वराचे रूप आहे. त्या ठिकाणचे जे राजपुत्र आहेत त्या हयग्रीव परमेश्वराची उपासना करत आहेत, प्रार्थना नित्य करत आहेत. तिथे रहाणारी बाकीची मंडळीही हयग्रीव परमेश्वराची उपासना करत आहेत.

तिसरे खंड हरिवर्ष आहे. या हरिवर्षामध्ये भगवान नरसिंह रूपाने वास्तव्य करतात. नरसिंह अवतार कशाकरता घेतला, हे सगळं पुढे सांगू. त्यांची सेवा दैत्यराज प्रल्हाद हे मोठे भगवद्भक्त आहेत, हे भगवान नरहरींची सेवा करत आहेत. प्रार्थना करतात, नरसिंह मंत्राचा जप करतात.



स्वस्त्यस्तु विश्वस्य खलः प्रसीदतां
ध्यायन्तु भूतानि शिवं मिथो धिया।
मनश्च भद्रं भजतात् अधोक्षजे
आवेश्यतां नो मतिरप्यहैतुकी ।।५.१८.९ ।। श्री. भा.

प्रल्हादजी प्रार्थना करतात, सर्व विश्वाचे कल्याण व्हावे. खलः प्रसीदताम्, जे खळांची व्यंकटी सांडो ज्ञानेश्वर महाराजांनीही ही प्रार्थना केली. खलाचे मन प्रसन्न व्हावे, त्याचे विकार सर्व दूर व्हावेत आणि सर्वही प्राण्यांनी एकमेकांचे कल्याण, चिंतन करावे. सौहार्द भावनेने रहावे. भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे। हीच प्रार्थना ज्ञानेश्वर महाराज करताहेत. भगवद्भक्तांची संगती आम्हाला घडावी, त्याचे मार्गदर्शन आम्हाला घडावे, स्त्री पुत्र आप्त इष्ट, मित्र, घरदार इथे आमचे अंतःकरण राहू नये, गुंतू नये अशी पुष्कळ प्रार्थना प्रल्हादजी करताहेत. त्या खंडामध्ये रहाणारी जी मंडळी आहेत, प्रजाजन आहेत त्यांना बरोबर घेऊन नरसिंहाची उपासना करण्यामध्ये ते निमग्न आहेत.

त्यानंतर चौथे केतूमाल वर्ष. कामदेव रूपाने भगवान राहाताहेत. भगवती लक्ष्मी देवी,

स्त्रीपुरुष जे प्रजाजन आहेत यांना बरोबर घेऊन ती कामदेवांची उपासना करत आहे. प्रार्थना, नामस्मरण करत आहे.

पुढेरम्यक वर्ष. त्या रम्यकवर्षामध्ये मत्स्यरूपी परमात्म्याची उपासना मनुराजा करतो आहे. सर्वही प्रजानन त्या मस्त्यरूपी परमात्म्याची भक्ति करण्यामध्ये निमग्न आहेत.

त्यानंतर हिरण्यमय वर्षामध्ये कूर्म रूपाने भगवंतांचा निवास आहे. पितरांचे अधिपती आर्यमान हे त्या कूर्मरूपी परमेश्वराची उपासना सर्व प्रजाजनांना घेऊन करताहेत. प्रार्थना करताहेत.

उत्तरकुरु नावाचा एक खंड आहे. भगवान वराहरुपी परमात्मा त्या ठिकाणी राहत आहेत. ही भूदेवी सर्व प्रजाजनांना घेऊन त्या वराहांची भक्ती करण्यामध्ये निमग्न आहे. मंत्रजप चालू आहे. प्रार्थना चालू आहे.

त्यानंतर किम् पुरुषवर्ष आठवं, भगवान रामचंद्र हे त्याठिकाणी रहात आहेत. रामभक्त हनुमान हे त्यांची उपासना करताहेत. सर्व प्रजाजनांना सांगत आहेत त्यांना घेऊन उपासना करत आहेत.

मर्त्यावतारस्त्विह मर्त्यशिक्षणं
रक्षोवधायैव न केवलं विभोः ।
कुतोऽन्यथा स्याद्रमतः स्व आत्मनः
सीताकृतानि व्यसनानीश्वरस्य ।।५.१९.५।। श्री. भा.

हनुमान सांगताहेत, हे जे मनुष्यरूप धारण केलं भगवान श्रीहरींनी, रामरूप हे काय रावण, कुंभकर्णांना मारण्याकरता केलं असेल ? ते काय सहज मेले असते. परंतू मर्त्यांना शिक्षण द्यायचंय. संसार खरा आहे. संसारसुख खरं आहे. स्त्री पुत्रादिक सर्व संसार योग्य आहे असे हे सुख खरं आहे अशा समजूतीने जे संसारात आसक्त झालेले आहेत, त्यांना दुःख भोगावे लागते. हे सांगायचंय, दाखवायचंय त्यांना. अरण्यात काय गेले, मारीचं राक्षस आलेला आहे सुवर्णमृग रूपाने. सीतादेवीच्या सांगण्याप्रमाणे त्याला धरून आणून त्याचे कातडे मिळवण्याकरता पाठीमागे गेले. मारीच राक्षस रामाप्रमाणे आवाज काढून ओरडला. लक्ष्मणांना जावं लागलं. इकडे सीतादेवींना रावण घेऊन गेलेला आहे. रामचंद्र दुःख करत बसले, कुठे गेली सीता. संसारामध्ये आसक्ती ही दुःखदायक आहे हे दाखवण्याकरता लोकांना सर्व दुःख भोगून दाखवली आहेत रामचंद्रानी. मारुतीराय सांगतात,

त्यांना कोठले दुःख, त्यांना काही नाही. पण शिक्षण द्यायचंय.

शेवटचं खंड नववं खंड म्हणजे भारतखंड. याठिकाणी नर–नारायण देवता आहे भारतवर्षाची. नारदमहर्षी भारतीय प्रजाजनांसहवर्तमान नर–नारायणांची भक्ती करत आहेत. प्रार्थना करत आहेत. सर्व लोकांच्या कल्याणाकरता नर–नारायण हे तपश्चर्या अखंड करत आहेत. 'सर्वेऽपि सुखिनःसन्तु', देवाला तपश्चर्या करावी लागते. भारतवर्षामध्ये सुद्धा पुष्कळ मोठे मोठे पर्वत आहेत. नद्या पुष्कळ आहेत. याठिकाणी ज्यांना जन्म प्राप्त झालेला आहे. त्यांच्याकडून होणारी पुण्य पाप वगैरे नित्यकर्म, त्या कर्माप्रमाणे त्यांना पुढे फलं मिळतं आहे. स्वर्गलोकाला कोणी जातात, कोणी नरकाला जातात पाप करणारे. दोन्ही समान झाल्यानंतर पुन्हा मनुष्यजन्म प्राप्त होतो आहे. असं हे कर्म करणं आणि त्याचे फल मिळवणे याकरता भारतवर्ष आहे.

असे एकंदर जंबूद्वीपाचे वर्णन झालेले आहे. नऊ खंड, त्या नऊही खंडावर स्थापन केलं आपल्या नऊ पुत्रांना अग्निदृढ राजानी.

याच्यानंतर क्षार समुद्रआहे. एक लक्ष योजने विस्तीर्ण. जंबूद्वीप आणि त्याच्या सभोवती खाऱ्या पाण्याचा समुद्र आहे. त्याच्या पलिकडे प्लक्षद्वीप आहे. प्लक्षद्वीपाच्या सभोवती समुद्र आहे. मोठा एक वृक्ष आहे प्लक्ष नावाचा. त्याचेच नाव या द्वीपाला पडलेलं आहे. दुप्पट मोठा आहे. अग्निनारायण त्या वृक्षाच्या आश्रयाने तिथे रहात आहेत. प्रियंवदाच्या मुलाने इंद्रद्वीप याने खंडाचे सात विभाग केले आणि आपल्या मुलांना दिले. मोठ्या मोठ्या नद्या सात आहेत. पर्वतही सात आहेत. त्या द्वीपामध्ये राहणारी जी मंडळी आहेत, चार वर्ण त्या ठिकाणीही आहेत. भारवर्षामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही नावे आहेत. हंस, पतंग, उर्ध्वायन, सत्यांग असे चार वर्ण त्या प्लक्षद्वीपामध्ये आहेत. हजारो वर्ष आयुष्य आहे त्यांना. स्वर्गाप्रमाणे सुख भोगत आहेत. ते प्लक्षद्वीप निवासी जे आहेत, ते सूर्यनारायणाची उपासना करत असतात. या पुढच्या द्वीपामध्ये रहाणारे जे आहेत जन्माला आलेले जीव, जन्माला आल्यावरच त्यांना सर्व प्रकारचे सौख्य, सामर्थ्य हे प्राप्त झालेलं आहे. त्या प्लक्षद्विपाच्या सभोवती इक्षुरसाचा समुद्र आहे. उसाच्या रसाप्रमाणे गोड असलेला हा समुद्र तिथे आहे.

त्याच्यानंतर शाल्मली द्वीप आहे. तिसरं द्वीप प्लक्षद्विपाच्या दुप्पट आहे. त्याच्या सभोवती सुरा समुद्र आहे. मद्याचा समुद्र आहे. शाल्मली नावाचा एक वृक्ष आहे मोठा, त्या वृक्षावर गरुड हे रहात आहेत. गरुडांचं निवासस्थान ते आहे. तेच नाव त्या द्वीपाला पडलेले आहे. त्याच द्वीपाचे

अधिपती प्रियंवदाचे पुत्र आहेत. तिथेही राहणारे जे चार वर्ण आहेत, श्रुतधर, वीर्यधर, वसुंधर, इषन्धर हे भगवान चंद्राची उपासना त्याठिकाणी करत आहेत. त्याची प्रार्थना ते करताहेत. मंत्रजप करताहेत. त्यानंतर त्या शाल्मली द्वीपाच्या सभोवती सुरा समुद्र आणि त्याच्या पलीकडं कुशद्वीप आहे. त्याच्या सभोवती घृतसमुद्र आहे. तुपाचा समुद्र आहे. त्या ठिकाणीही प्रियंवद राजाची मुलं राज्य करत आहेत. नद्या आहेत, पर्वत आहेत. तिथे राहणारे सर्व लोक आहेत चतुर्वर्णाचे, भगवान अग्निनारायणांची उपासना ते करत आहेत. त्याच्या पुढे घृतसमुद्र त्या द्वीपाच्या सभोवती. त्याच्या पलिकडे क्रौंच द्वीप आहे. क्रौंच नावांचा मोठा पर्वत आहे त्या द्वीपामध्ये. हेच नांव त्याला पडलेलं आहे. त्यानंतर तिथेही प्रियंवदाचे पुत्र राज्य करत आहेत. प्रियवंदाने तिथेही सात सात विभाग करून दिलेले आहेत. त्या ठिकाणी रहाणारी जी मंडळी आहेत, प्रजानन आहेत ते सर्वही जलदेव जो आहे त्या वरुणाची उपासना करत आहेत. सर्वही द्वीपामध्ये उपासना चालू आहे. त्या क्रौंच द्वीपाच्या सभोवती क्षीर समुद्र आहे. ईश्वराची सृष्टी ही पुराणामध्ये आलेली आहे. भूगोल हा पुराणामध्ये आलेला आहे. सध्याचा भूगोल हा रचलेला आहे. तयार केलेला आहे. हा ईश्वराने केलेला भूगोल हा वेदव्यासांनी सांगितलेला आहे. क्षीरसमुद्र म्हणजे दुधाचाच समुद्र आहे. काही कमी नाही. त्याच्या पलीकडं शाकद्वीप आहे. शाक नावाचा एक मोठा वृक्ष आहे. त्याचेच नाव या द्वीपाला पडलेलं आहे. तिथेही प्रियंवदाचा पुत्र आहे. त्यानीही आपल्या मुलांना सात विभाग करून दिलेले आहेत. नद्या, पर्वत, मर्यादा पर्वत आहेत. या शाकद्विपात रहाणारे लोक भगवान वायूची उपासना करतात. वायू हा फार मोठा देव आहे. वायुमध्ये सगळ्यांचा अंतर्भाव होतो. सर्वव्यापी तो आहे. त्याची उपासना त्या द्वीपामध्ये चाललेली आहे. आता याच्यापुढं हा दहीसमुद्र आहे. शाकद्वीपाच्या सभोवती दहीसमुद्र आणि समुद्राच्या पलीकडे पुष्करद्वीप आहे. पुष्करद्वीपाच्या सभोवती गोड्या पाण्याचा समुद्र आहे. चौसष्ठ लक्ष योजने विस्तीर्ण, सर्वापेक्षा मोठं हे द्वीप आहे. तो समुद्रही तितका विस्तीर्ण आहे. मोठं पुष्कर म्हणजे एक कमल. या कमलातून ब्रह्मदेव निर्माण झाले. त्याचेच नाव त्याला पडलेलं आहे.

जंबूद्वीपामध्ये मेरु पर्वत आहे. आणि या पुष्करद्वीपामध्ये मानसोत्तर नावाचा एक पर्वत आहे. मोठा पर्वत आहे. या दोन पर्वतावर सूर्याच्या रथाचा अक्ष जो आहे तो ठेवलेला आहे आणि त्या अक्षामध्ये सूर्याचा रथ बसवलेला आहे. तो सूर्य फिरतो आहे त्या मानसोत्तर पर्वताच्या सभोवती. त्याच द्वीपाचा अधिपती प्रियंवदाचा पुत्र वीतिहोत्र यांनी त्याचे दोन विभाग केले. रमणक आणि धातकि या मुलांना दिलेले आहेत. त्या द्वीपात रहाणारी सर्व मंडळी ब्रह्मदेवांची

उपासना करत आहेत. ब्रह्मदेवांना दुसऱ्या द्वीपात स्थान नाहीये. भारतवर्षामध्येही नाही. त्या पुष्कर क्षेत्रात फक्त ब्रह्मदेवाचं मंदिर आहे. मानसोत्तर पर्वत आणखी मेरू पर्वत यामध्ये जेवढी भूमी गेलेली आहे तितकीच भूमी त्या सातव्या समुद्राच्या पलिकडं आहे. सुवर्णमय भूमी आहे. त्या भूमीवर पडलेला पदार्थ सुवर्णतेजामुळे दिसतही नाही. कोणीही त्या भूमीवर रहात नाही. निर्जन भूमी आहे ती. त्याच्या पलिकडे लोकालोक नावाचा उंच पर्वत आहे. सूर्य चंद्रापेक्षाही उंच आहे. त्रैलोक्याची मर्यादा म्हणून तो पर्वत ईश्वराने निर्माण केला आहे.

अशा रितीने हा लोकालोक पर्वत शेवटचा आहे. भूमीची मर्यादा संपलेली आहे तिथे. अशा रितीने सप्तद्वीपं, आणि सप्तसमुद्र, शेवटचा लोकालोक पर्वत ही सर्वही भूमंडलाची रचना परीक्षित राजा तुला सांगितली आहे. वर असलेलं जे ब्रह्मांड आहे, सत्यलोक वगैरे स्वर्गादिक लोक हे सबंध भूमंडळाचे वर्णन संपले शुकाचार्य महाराज सांगताहेत.

आता आकाशमंडळ. अर्धा भाग हा भूमंडळ आणि वरचा भाग तो आकाशमंडळ. हरभऱ्याचे जसे बरोबर दोन तुकडे होतात, तसं ब्रह्मांडाचा अर्धा भाग भूमंडळाचा आहे. त्याच्या वरचा अर्धा भाग म्हणजे द्युलोक आहे. मध्यभागी अंतरिक्ष  म्हणतात. या दोन्ही लोकांमध्ये सूर्यनारायणांचा संचार आहे. आपल्या रथामध्ये बसून ते संचार करताहेत. उत्तरायण आहे. दक्षिणायन आहे, समगती आहे, द्रुतगती आहे, मंदगती आहे. मकरादिग्रहाच्या मार्गाने सूर्याचा रथ चाललेला आहे. मेष व तुला या राशीवरून सूर्याचा रथ चाललेला असताना त्या दोन राशीच्या वेळेला दिवस आणि रात्र समान असतात. वृषभादिक पाच राशीला सूर्य संचार असताना दिवस मोठे आहेत आणि रात्र एक एक घटका कमी होते आहे. वृश्चिकादिक राशींना संचार असताना दिवस लहान आणि रात्री मोठ्या होतात कारण गती कमी होते त्यावेळेला. दक्षिणायन असेपर्यंत दिवस मोठे उत्तरायणामध्ये रात्री मोठ्या. असं हे सबंध सूर्याचं भ्रमण चाललेलं आहे. त्या मेरु पर्वतावरती, मानसोत्तर पर्वतावरती देवांच्या सगळ्या नगरी आहेत. वरुणाची आहे, कुबेराची आहे, यमाची आहे सगळ्यांच्या नगरी आहेत. सूर्याचा रथ त्या  नगरीकडून जातो आहे. इंद्रनगरीच्या ठिकाणी तो रथ आला म्हणजे सूर्यउदय झाला असे म्हणतात. पुढे दक्षिणेला तो माध्यान्ह झालेला आहे. वरुण नगरीकडे गेला असता अस्तमय झालेला आहे. पुन्हा कुबेर नगरीकडे गेला असता मध्यरात्र झाली असं सगळ्यांना दिसते आहे. मेरुपर्वतावर नेहमी सूर्यप्रकाश आहे. असा वेगाने तो रथ चाललेला आहे. याप्रमाणे सूर्याच्या रथाचे जे चक्र आहे, संवत्सर वर्ष त्याला म्हणतात. मेरूच्या शिखरावर एक भाग आहे

त्याच्या अक्षाचा आणि मानसोत्तर पर्वतावर दुसरा भाग. त्याच्यामध्ये सूर्याच्या रथाचे एक चाक आहे. सूर्यरथाला एकच चाक आहे. एक चक्र रथातून सूर्यनारायण सर्व आकाशमंडळामध्ये भ्रमण करताहेत. त्याला एक वर्षाचा काल लागतो आहे, सबंध राशी फिरून यायच्या म्हणजे. अरुण नावाचा सारथी त्या रथामध्ये बसलेला आहे. वालखिल्य ऋषी सूर्यनारायणांच्या बरोबर असतात, त्यांची स्तुती करतात.

काही ऋषीमंडळी आहेत, काही गंधर्व आहेत, काही अप्सरा आहेत, नाग आहेत, यक्ष आहेत. प्रत्येक महिन्याला भिन्न भिन्न अशा प्रकारची सूर्यनारायणांची स्वरूपं, त्यांच्याबरोबर असलेला हा सर्व परिवार, ह्या सर्वांसहित भ्रमण चाललेलं आहे. भूमंडलातून भ्रमण करणारा, आकाशातून फिरणारा सूर्यनारायण यांचा रथ चालू आहे. सूर्यनारायणाला गती आहे किंवा सगळ्या राशींना, नक्षत्रांना गती आहे. हे समजायचं कसे? राजाने विचारले. शुकाचार्य सांगतात राजा, सूर्याला गती आहे हे आपल्याला प्रत्यक्ष दिसले जरी नाही. एका राशीतून दुसऱ्या राशीला सूर्य गेलेला आहे, त्याला क्रिया असल्याशिवाय गती असल्याशिवाय तो कसा जाईल. आकाशमंडळाचा जो राशीरुपी रस्ता आहे. एका राशीतून तो दुसऱ्या राशीला गेलेला आहे म्हणजे त्याचे भ्रमण झालेलेच आहे, गति त्याला आहे हे अनुमानाने ठरवले नाही. कुंभाराचे चाक आहे. त्या चाकावरती मडकं तयार करतो आहे. ते चाक सारखे फिरते आहे, त्याच्यावरच्या मुंग्या इकडच्या तिकडे दिसायला लागल्या तर त्यांनाही गती आहे असे म्हणता येते. चक्रालाही गती आहे. त्यामुळे त्यावर असणाऱ्या मुंग्या यांनाही गती आहे. कालचक्र जे आहे परमेश्वराचं ते सारखं फिरते आहे. गुणत्रयात्मक. त्या चक्राबरोबर सर्वही सूर्यादिक ग्रह काय सप्तर्षि काय, नक्षत्र मंडलं काय हे सगळेही फिरताहेत. ध्रुवाला प्रदक्षिणा करत आहेत. भगवान नारायण हा सर्वांना मार्गदर्शक आहे.

अशा रितीने हे सूर्यभ्रमण चाललेलं आहे. संपूर्ण आकाशमंडलामध्ये सूर्यनारायण फिरून आला. एक भ्रमण पूर्ण झाले की एक वर्ष म्हणतात. बारा राशी फिरून यायला सूर्यनारायणांना एक वर्षाचा काल लागतो. अर्ध भ्रमण त्याचे झाले की दक्षिणायन म्हणतात. पुढचं अर्ध भ्रमण म्हणजे उत्तरायण म्हणतात. हा देवांचा एक दिवस आहे. सहा महिने माणसांचे म्हणजे देवांचा एक दिवस.

एवं चन्द्रमा अर्कगभस्तिभ्यः उपरिष्टाल्लक्षयोजनतः
उपलभ्यमानः अर्कस्य संवत्सरभुक्तिं पक्षाभ्यां

मासभुक्तिं सपादर्क्षाभ्यां दिनेनैव पक्षभुक्तिं
अग्रचारी द्रुततरगमनो भुङ्क्ते ।।५.२२.८।। श्री. भा.

सूर्यनारायणाच्या वरच्या बाजूला एक लक्ष योजनं अंतरावरती चंद्रलोक आहे. अंतर्सृष्टी आहे. परमेश्वराने विश्व निर्माण केलेलं आहे. कितीतरी चंद्र आहेत, कितीतरी सूर्य आहेत. वैज्ञानिक सुद्धा अवकाशमंडल अनंत आहे म्हणतात. हा चंद्र सूर्याच्यावर आहे. अतिशय वेगवान आहे तो. सूर्यनारायणाला सर्व राशी फिरून येण्याला एक वर्षाचा काळ लागतो. चंद्र एका महिन्यामध्ये सर्व राशी फिरून येतो. सर्वांना आनंद देणारा शांती देणारा हा ग्रह आहे. त्याच्यावरती तीन लक्ष योजने अंतरावर नक्षत्रमंडळ आहे. त्यालाही गती आहे. तेही सारखे फिरते आहे. अठ्ठावीस नक्षत्रं आहेत. अभिजीत नक्षत्र घेऊन अठ्ठावीस नक्षत्रं. तेही सारखे फिरते आहे. त्याच्या वरच्या बाजूला बुध नावाचा ग्रह आहे. दोन लक्ष योजने अंतरावरती तो अनुकूल ग्रह समजला जातो. त्यानंतर त्याच्यावरती दोन लक्ष योजने अंतरावरती अंगारक म्हणजे मंगळ आहे. एकेका राशीतून दुसऱ्या राशीला जाण्याला मंगळाला तीन पक्ष म्हणजे दीड महिन्याचा काळ लागतो. चंद्रापेक्षा कमी गती आहे. हा अशुभ ग्रह समजला जातो. त्या मंगळाच्या दोन लक्ष योजनेवरती बृहस्पती म्हणजे गुरु ग्रह आहे. हे फार मंद आहेत. एका राशीतून दुसऱ्या राशीला जाण्याला यांना एक वर्षाचा काळ लागतो. सबंध आकाशमंडल फिरून यायचं म्हणजे बारा वर्ष लागतात. अनुकूल ग्रह हा समजला जातो. या गुरुच्यावरती दोन लक्ष योजने अंतरावर शनैश्वर आहेत. ते सर्वात मंद ग्रह आहेत. एका राशीतून दुसऱ्या राशीला जाण्याला तीस महिने म्हणजे अडीच वर्षाचा काळ लागतो. सबंध आकाशमंडळ फिरून येण्याला यांना तीस वर्ष लागतात. सगळ्यापेक्षा मंद गती आहे यांची. हे शनैश्वर म्हणजे सर्वांना अशांती देणारे आहेत, अशी लोकांची समजूत आहे. शनैश्वरांच्या वरच्या बाजूला एकादश लक्ष योजनं अंतरावर सप्तर्षींचे मंडल आहे. त्यांचाही संचार चालू आहे. ध्रुवपदाला हे सर्वही प्रदक्षिणा करत आहेत. हा ध्रुव मात्र स्थिर आहे मध्यभागी. सूर्यनारायणाचे जे मंडळ आहे, दहाहजार योजने विस्तीर्ण आहे. त्याच्या खाली राहू नावाचा ग्रह आहे. बाकीचे सगळे ग्रह सूर्यमंडळाच्या वर आहेत अंतरिक्षामध्ये. राहू मात्र खाली आहे. त्याचा जन्म कसा झाला. हा कथाभाग पुढे येणार आहे.

सूर्यनारायणाचे मंडल हे दहा हजार योजनं विस्तीर्ण आहे. चंद्राचं बारा हजार योजने विस्तीर्ण आहे. राहूचे मंडल हे तेरा हजार योजने विस्तीर्ण आहे. पूर्वीचे वैर लक्षात येऊन तो राहू, चंद्र-सूर्याच्या अंगावर धावून जातो. त्यावेळेला हे ग्रहण लागले असे लोक समजतात. राहूच्या खाली

सिद्धचारण, विद्याधर वगैरे रहातात. त्याच्या खाली यक्ष, पिशाच्च वगैरे यांचे स्थान अंतरिक्ष लोक ज्याला म्हणतात तो आहे. त्याच्याखाली शंभर योजने अंतरावर हा गोलोक आहे. हंसादिक पक्षी जोपर्यंत वर जाऊ शकतात ती भूलोकाचीच मर्यादा आहे. भूमीची रचना कशी आहे तुला राजा सांगितलेलं आहे. या भूमीच्या खाली आणि जलाच्या मध्ये सात लोक आहेत. अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल आणि पाताल दहा-दहा हजार योजने अंतरावर हे लोक आहेत. त्या ठिकाणी हे सगळे असूर राहताहेत. नाग, सर्प वगैरे सगळे त्याठिकाणी राहताहेत. त्या सगळ्यालाही सप्तपाताल म्हणतात. प्रत्येकाची नावं निराळी आहेत. पाताललोक एकच आहे. त्या सगळ्या लोकामध्ये पहिला जो लोक अतल नावाचा. मयासुराचा मुलगा बल नावाचा तो इथे राहतो आहे. असुरांनी बरेचसे लोक ताब्यामध्ये घेतलेले आहेत. अनेक स्त्रिया त्यांनी निर्माण केलेल्या आहेत. त्या अतल लोकामध्ये जाणारे जे जीवात्मे त्यांना त्या स्त्रिया उत्तम रसायन देतात, विषयभोग घेताहेत. त्यापुढे दुसरा लोक म्हणजे वितल लोक. हटकेश्वर भगवान शंकर त्याठिकाणी रहात आहेत. मोठी नदी वहाती आहे हटकी नावाची. त्या नदी तीरावर असलेली मृत्तिका, वाळू सुवर्णरूप आहे. त्या सोन्याचे दागिने वगैरे बनवून असुर स्त्रियांना देत आहेत. तिसरा लोक सुतल नावाचा आहे. दानवेंद्र बळी राजा तिथे रहातो आहे, भगवंतांच्या आज्ञेप्रमाणे. इंद्राला स्वर्गलोकाचे राज्य देऊन टाकले बळी राजाकडून आणि बळी राजाला राहण्याकरता ही जागा भगवंतांनी दिली. वामन त्यांचे द्वारपाल म्हणून रहातात. त्याच्याखाली तलातल नावाचा लोक आहे. मयासुर तेथे रहातो आहे. पहिल्या अतल लोकामध्ये मयासुराचा मुलगा रहातो. या तलातल लोकामध्ये स्वत: मयासुर राहतो आहे. मोठा शिल्पकार आहे. देवांचा शिल्पकार विश्वकर्मा त्यापेक्षाही अधिक मोठा शिल्पकार मयासुर आहे. असुरांचा शिल्पकार आहे तो. मयसभा धर्मराजाला त्यानेच बांधून दिली. जमीन जिथे आहे तिथे पाणी वाटावे आणि पाणी जिथे आहे तिथे जमीन वाटावी. अशा प्रकारचे विलक्षण शिल्प मयासूराने निर्माण केले. भगवंतांची प्रार्थना करतो आहे. सुदर्शनाची भीती त्याला नाही. महादेव त्याचं संरक्षण करत आहेत.

त्याच्याखाली महातल नावाचा लोक आहे. अनेक सर्प राहत आहेत तिथे. पुष्कळ मोठी शरीर त्यांची आहेत. आपल्या परिवाराला घेऊन ते तिथे रहात आहेत. त्याच्याही खाली रसातल लोक आहे. तोही दैत्यांचा आहे. देवांचा जसा स्वर्गलोक तसा दैत्यांचा रसातल. म्हणजे जवळ जवळ सात लोकांपैकी पहिल्या लोकात मयासुराचा मुलगा. पाचव्या लोकात तो मयासूर आणि सातव्या लोकात बाकीचे दैत्य. तीन लोक यांच्या ताब्यात आहेत. तरी यांना पूर्णता वाटत नाही. स्वर्गलोक



आम्हाला का नाही. तपश्चर्या करतात. देवांचा पराजय करतात. स्वर्गलोग आपल्या ताब्यात घेतात. निर्वासित करून सर्व देवांना बाहेर घालवतात. देवांनी पुन्हा अवतार घेऊन त्यांचा पराजय करावा हे चाललेले आहे.

सर्वात खालचा लोक म्हणजे पाताललोक आहे. अनेक साप, नाग तिथे रहातात. एका फण्यापासून हजार फणे असलेले नाग आहेत. प्रत्येकाच्या फण्यावर प्रकाश देणारे दिव्यमणी आहेत. त्यामुळे तिथे जरी सूर्यचंद्राचा प्रकाश नसला तरी अंधार नाहीये. त्यांच्या मण्याच्या प्रकाशामुळे सर्व व्यवहार चालतात. त्याच्याही खाली वीस हजार योजने अंतरावर भगवान श्रीहरी शेषरूपाने रहातात. सहस्त्रफणा त्यांना आहे. त्यांच्या एका फण्यावर ही संबंध भूमी जी आहे, भूमंडल ही त्या फण्यावर राहिलेली आहे. एखादी मोहरीप्रमाणे ती पृथ्वी त्यांच्या फण्यावर वाटती आहे. केवढं तरी मोठं प्रचंड रूप आहे शेषरूप. शेवटी प्रलयाच्या वेळेला त्यांच्या मुखातून अग्नी उत्पन्न होतो आहे. खालून सगळं दग्ध होतं आहे. आणि वरचं सूर्यनारायणांच्यामुळे दग्ध होते अशी सर्व पृथ्वी व्यवस्था आहे

सर्व नाग स्त्रिया भगवान संकर्षण म्हणजे शेषभगवंतांची पूजा करत आहेत, प्रार्थना करत

आहेत.

अशा रितीने ही सगळी रचना सप्तअधोलोक, सप्त उर्ध्वलोक, भूमि हे सगळंही त्यांनी सांगितले. त्यानंतर राजाने विचारले महाराज,

नरका नाम भगवन् किं देशविशेषा अथवा
बहिस्त्रिलोक्या आहोस्वित् अन्तराल इति ।।५.२६.४।। श्री. भ.

नरक नरक म्हणून आम्ही ऐकतो म्हणाले, हे काही देश आहेत का? त्रैलोक्याच्या आत आहेत की बाहेर आहेत? कुठे आहेत? आचार्य सांगताहेत, राजा त्रैलोक्यामधेच आहेत. दक्षिण दिशेला हे सगळे लोक आहेत. भूमि आणि जल यांच्यामधे नरकलोकाची रचना परमेश्वरांनी केलेली आहे. तिथे सगळे पितृगणांचे अधिपती हे राहाताहेत. यमधर्म जे आहेत, पितरांचे अधिपती सूर्यकुमार यमधर्म हे त्या नरकाचे स्वामी आहेत. ज्या ज्या जीवाकडून जसं जसं कर्म झालेलं असेल त्याप्रमाणे त्याला शासन करण्याकरता यमधर्म त्या नरकलोकामधे राहताहेत. एकवीस किंवा अठ्ठावीस नरक त्यांनी सांगितले. मुख्य बाकीचे अवांतर कितीतरी नरक आहेत. त्याचे वर्णन करताहेत शुकाचार्य महाराज, आपल्या एकंदर धर्माचा त्याग करणारा, दुसऱ्याचे द्रव्य हरण करणारा स्त्री-पुत्रादिकांचे हरण करणारा, तो या तामिस्त्र नरकामधे जातो, तो या अंधतामिस्त्र नरकामधे रहातो आणि त्याला अनेक यातना भोगाव्या लागतात. मी आणि माझा अशा प्रकारची वृत्ती धारण करून सर्व भूतांचा द्रोह करणारा जो आहे तोही या रौरव नरकामधे जातो. त्यांनी ज्यांना ज्यांना पिडा दिलेली असेल ते त्या नरकामधे सापापेक्षाही भयंकर जे प्राणी आहेत, रूरू नावाचे, ते ह्या पिडा देणाऱ्या जिवात्म्याला तिथे आल्याबरोबर, त्याच्या शरीराचा छेद-विच्छेद करत आहेत, चावत आहेत त्याला. नरकामधे गेलेल्या जीवाला फक्त दुःख वेदना भोगाव्या लागतात. प्राण जात नाही. प्राण गेला तर सुटला की तो, पण त्याची सगळी शिक्षा पूर्ण झाली पाहिजे. केलेले जितके दोष आहेत त्या सगळ्या दोषांबद्दल शिक्षा मिळाली पाहिजे. सर्व शिक्षा मानवांच्या व्यवहारामधे दिली जात नाही. खून करणाऱ्या मनुष्याला न्यायाधीश फाशीची शिक्षा देतो. एक खून केला त्याला फाशी दिली आणि ज्यांनी आठ-दहा खून केले त्यांनी? एकदा फाशी दिली की तो गेला. एका खूनाची शिक्षा मिळते. पण बाकीचे खून त्याला माफ झाले असे समजायचे काय? अशाप्रकारची शिक्षा इथे नरकामधे पूर्ण मिळते. नरकामधे तो जातो. इथे शरीर कायम आहे. अग्निमधे टाकलं, तापलेल्या कढईत टाकलं तरी शरीर नष्ट होत नाही. तडफड होत आहे. वेदना, क्लेश होत आहेत,

यातना देह म्हणून निराळा आहे. यातना फक्त भोगाव्या लागतात. देहाचा नाश होत नाही.

पशुपक्ष्यांचा नाश करणारे, मांसभक्षण करणारे, सर्वांना त्रास देणारे त्यांना यमदूत कुंभिपाक नरकामधे टाकत आहेत. तापलेल्या तेलाच्या अनेक कढ्या तिथे आहेत. त्याच्यामधे त्याला टाकून देत आहेत.

मातापितरांचा द्वेष करणारा तो कालसूत्र नावाच्या नरकामधे पडतो आहे. तांब्याची भूमी आहे. सगळी तप्त झालेली भूमी आहे आणि त्या भूमीवर त्याला चालायला सांगताहेत. पाठीवर कोरडे ओढताहेत. संबंध शरीराची आग होत आहे.

आपला वेदमार्ग आपत्ती नसताना ज्यांनी सोडला. आपत्तीमधे एखाद्या वेळेला सुटला तरी तो धर्म अधर्म समजला जाईल. नास्तिक धर्माचा ज्यांनी स्विकार केला त्याला मृत्यूनंतर यमदूत हे असिपत्र वनामधे टाकतात. 'असी' म्हणजे तलवार, सबंध तलवारीचीच जमीन आहे. याला सांगतात जा, या रस्त्याने चालत जा पुढं. तलवारीवरून चालत जायचं. किती जखमा होत असतील, पण काही नाही ते क्लेश भोगावे लागतात. स्वधर्म त्याग आणि नास्तिक मार्गाच्या स्विकारामुळे असिपत्र वनामधे त्याला पडावं लागतं.

जो राजा किंवा राजाचा अधिकारी निरपराधी माणसाला दंड करेल, मारेल त्याला सूकरमुख नावाच्या नरकामधे टाकतात. उसाचा घाणा जसा असतो तसे अनेक घाणे तिथे आहेत. ऊस जसा घाण्यामधे जावून पिळून निघतो तसं याला घाण्यामधे घालतात. निरपराधी माणसाला सत्ताबलाने त्रास देणारा, सूकरमुख नरकामधे जातो. प्राण जात नाही. शरीरातले रक्त जाईल, पुन्हा त्याला पहिल्यासारखे शरीर मिळेल, पुन्हा घाण्यात घालतील. तो ओरडतो आहे, रडतो आहे पण काहीही इलाज नाहीये.

सर्व भूतांच्या वृत्तीला उपरोध करणारा, त्यांना लुटणारा जो आहे तो अंधकूप नरकामधे जातो आहे. आपण मिळवलेले द्रव्य आपणच जो उपभोग घेतो, अन्नधान्य वगैरे दुसऱ्या कोणालाही देत नाही, किडीभोजन नावाच्या नरकामधे जातो. किड्यांनी भरलेली कुंड असतात त्याच्यामधे याला टाकून देतात. सगळे किडे त्याच्या शरीरातले मांस वगैरे घेतात. चोरी करून किंवा बलात्काराने दुसऱ्याची सुवर्ण, रत्न वगैरे हरण करणारा, संकट नसताना चोरी करणे अक्षम्य आहे. संकट असताना एखाद्यावेळेस चोरी केली, खरे म्हणजे चोरी करू नये, पण अशी चोरी क्षम्य आहे.

अशाप्रकारे चोरी करणाऱ्याला यमदूत हे सदंश नावाच्या नरकामधे टाकतात. लोखंडी चिमटे तापलेले असतात. त्या चिमट्यामधे त्याला धरतात. सबंध शरीर तप्त, दग्ध होतं आहे.

कोणत्याही पुरूषाशी समागम करणारी स्त्री किंवा कोणत्याही स्त्रीबरोबर समागम करणारा पुरूष या दोघांना मृत्यूनंतर यमदूत हे तप्तसूर्मी नावाच्या नरकामधे टाकतात. येथे पुरूषांचे, स्त्रीयांचे असे त्रिशुल-शूल उभे केलेले आहेत. मोठ्यामोठ्या, लाल तापलेल्या शूलांना स्त्री-पुरूषांना बांधून टाकतात.

वैतरणी नदी त्या नरकलोकात आहे. रक्त, मांस यांनी भरलेला हिचा प्रवाह आहे. त्याच्यामधे या पापी लोकांना टाकून देत आहेत. तेच नदीतले सगळे त्या लोकांच्या पोटामधे जातं आहे, ते बुडतात पण पुन्हा वर येत आहेत, पुन्ही बुडतात. अशा प्रकारची ही वैतरणी नदी आहे.

साक्ष देण्याच्या वेळेला कोर्टामधे जाऊन जो खोटी साक्ष देईल, पैशासाठी खोटी साक्ष देणारा, त्याला अविचीमान नावाच्या नरकामधे टाकतात. म्हणजे इथे एक मोठा कडा आहे त्याला त्या कड्यावरून खाली ढकलतात. पुन्हा वर आणतात, पुन्हा कडेलोट करतात. डोकं फुटतंय, सर्व शरीराला जखमा होत आहेत.

सुरापान करणारा जो आहे, त्याच्या मुखात अग्निने तापवलेला लोहरस घालतात. क्षारकर्दम नावाचा नरक आहे हा. निरपराधी अशा लोकांना त्रास देणारे त्यांना दंन्दशुक नावाच्या नरकामधे टाकतात.

आपल्या घरी कोणीही अतिथी, अभ्यागत आलेले असताना, गृहस्थाश्रम स्विकारलेला जो असेल त्यानी जर त्याच्याबद्दल आदरभाव दाखवला नाही, रागाने पहातो आहे, कशाला आला? मलाच कमी पडते आहे तर याला कोठून घालणार? अशी वृत्ती धरणाऱ्या पापी माणसाला नरकामधे गेल्याबरोबर गिद्ध पक्षी एकदम त्याचे डोळे फोडून टाकत आहेत.

अहंकार धारण करणारा, आपले द्रव्य हे आपल्या जवळच राहिलं पाहिजे, खर्च होऊ नये म्हणून नेहमी त्या धनाच्या चिंतेमधे निमग्न असणारा जो आहे त्याला मृत्युनंतर सूचीमुख नावाच्या नरकामधे यमदूत टाकतात. मोठी मोठी शिवण्याची यंत्रे तिथे आहेत. ती यंत्र सारखी चालू असतात. त्या यंत्रामधे याला घालतात. जसे वस्त्र शिवावे तसे याचे शरीर शिवतात, सबंध शरीरामधे सुया घुसतात.

अशा प्रकारचे अनेक नरक आहेत. यमधर्म या ठिकाणी राहत आहेत. अधार्मिक लोकांना शासन करण्याकरता ईश्वराने त्यांना नेमले आहे. दया वगैरे काही नाही. फक्त शिक्षा, शासन द्यायचे. दुःख भोगल्यानंतर त्यांचे सर्व पापक्षालन झाले म्हणजे मग पुन्हा या मृत्युलोकावर त्यांना जन्म येतो आहे. काही पूर्वीचे चांगले संस्कार घेऊन जन्माला आले तर चांगले कर्म करतात, पुण्यकर्म करतात, मृत्युनंतर स्वर्गलोकाला जातात. पुण्य संपल्यानंतर पुन्हा या ठिकाणी यावे लागते. असे हे ईश्वरांनी सृष्टीची व्यवस्था, सृष्टी निर्माण केली आणि ती व्यवस्था करण्याकरता हे सगळे नियम घालून दिलेले आहेत. अधिकारी नेमले आहेत, ते कार्य करण्याकरता. तेव्हा राजेसाहेब भूमी, भूमीवरची सप्तद्विप, सप्तपाताल, नरकलोक हे सर्वही ईश्वरसृष्टीचे वर्णन तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्हाला सांगितले आहे. आणखी तुम्हाला काय ऐकण्याची इच्छा आहे असे शुकाचार्य महाराजांनी विचारल्यानंतर त्यांनी पुढील कथाभाग सांगावा अशी विनंती केली.

शुकाचार्य महाराजांनी परीक्षित राजाच्या इच्छेप्रमाणे सर्वही भूगोलाचे वर्णन त्याच्याजवळ केले ईश्वराने काय काय एकंदर सृष्टिरचना कशी केलेली आहे हे त्याला समजावून सांगितले. शेवटी त्यांनी नरकलोक म्हणजे कुठे आहे? त्याठिकाणी अधिकारी जे यमधर्म आहेत ते पापी जीवांना आणून दंड कसा करतात? हे सगळं सांगितले. परीक्षित राजांनी विचारले, महाराज, हे जे भयंकर नरक आपण सांगितले, त्यात किती यातना जीवांना भोगाव्या लागतात. त्या नरकाला जावं लागू नये याकरता काही उपाय असेल तर सांगा. शुकाचार्य महाराज म्हणतात, राजा, पाप केल्यानंतर नरकाला गेलंच पाहिजे. मृत्युच्या पूर्वीचं, केलेलं पाप नाहीसे करण्याकरता शास्त्रानी सांगितल्याप्रमाणे प्रायश्चित कर्म केलं पाहिजे. पापक्षय झाला की मग काही नरकाची भिती नाही. राजानी ऐकून घेतलं. महाराज प्रायश्चित्ताने पापाचा नाश होतो आपण म्हणता, पण कसं शक्य आहे. पुन्हा पापकर्म करण्याकडे प्रवृत्ती होतेच म्हणाले. शिक्षा झाली, तुरूंगामधे जावं लागलं तरी सुटून आल्यानंतर चोरी पुन्हा करतोच. मग त्या प्रायश्चित्ताचा उपयोग होणार नाही. एखाद्यावेळी पापकर्मापासून बाजूला होईल मनुष्य, पण पुन्हा पाप करतो आहे. हे मान्य केलं शुकाचार्य महाराजांनी केवळ कर्मानी कर्मक्षय होत नाही. खरं प्रायश्चित्त म्हणजे आत्मज्ञान हेच आहे. 'क्षीयंतेचास्यकर्माणि' परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यानंतरच सर्व कर्माचा क्षय होतो. परंतु ज्याप्रमाणे पथ्यानी वागणाऱ्या मनुष्याला रोगाची पीडा ही सहसा होत नाही, त्रास होत नाही. तसं नियमानी वागणारा जो आहे, शास्त्रीय कर्म करणारा, हळू हळू समर्थ होतो. आत्मज्ञानापर्यंत जातो म्हणाले. पापक्षय करण्याकरता अनेक मार्ग आहेत. तो पापक्षय तपाने होतो, इंद्रिय दमन करणे,

दानधर्म करणे, यमनियम हे सगळे मार्ग पापक्षयाकरता म्हणून सांगितलेले आहेत. आणखी एक मार्ग म्हणजे,

केचित्केवलया भःत्या वासुदेवपरायणाः ।
अघं धुन्वन्ति कारत्स्न्र्येन नीहारमिव भास्करः ।।६.१.१५।। श्री.भा.

केवल भक्ति भगवंताची आहे. ज्ञानही नाही आणि कर्मही नाही. केवळ भगवंताचे प्रेम अंतःकरणामधे आहे. गोपींनी जशी भक्ति केली, केवळ भक्ति आहे. ज्ञान मिश्र नाही, कर्म मिश्रही नाही. अशा केवळ भगवंताच्या भक्तिनं सर्व पापक्षय होतो. ईश्वराचं चिंतन अखंड जर घडलं तर तो पवित्र होऊन जातो. त्याला नरकाला जावं लागत नाही. श्रीकृष्णांचे अंतःकरणानी जर चिंतन घडलं, अनुराग, प्रेम जर निर्माण झालं तर यमदूत त्याला नेऊ शकत नाहीत. याकरता एक घडलेला इतिहास राजा तुला सांगतो –

विष्णूदूत आणखी यमदूत यांचा संवाद घडलेला आहे

कान्यकुब्जे द्विजः कश्चिद्दासीपतिरजामिलः ।
नाम्ना नष्टसदाचारो दास्याः संसर्गदूषितः ।।६.१.२१।। श्री.भा.

एक ब्राह्मण अजामेळ नावाचा, आपला संबंध आचरण धर्म, ब्राम्हण धर्म सोडून देऊन एका दासीच्या संगतीमधे सापडलेला आहे. जुगार खेळणं, चोरी करणं असे वाटेल त्या मार्गांनी पैसा मिळवतो आहे. कुटुंबपोषण करतो आहे. असा त्याचा बराच काळ गेला. अठ्ठयाएंशी वर्ष वयाला झाली. त्याला दहा मुलं झाली होती. त्यामधे लहान मुलाचे नाव नारायण असे होते. मोठा प्रिय आहे, माता–पित्यांना. त्या अजामेळाचे या मुलावर जास्त प्रेम आहे. त्यामुळे त्याचे अंतःकरण सारखे त्याच्याकडेजाते आहे. नेहमी तिकडेलक्ष आहे. त्या अजामेळाचा मृत्युकाल जवळ आलेला आहे. वयही बरंच झालेलं आहे. यमदूत त्याला नेण्याकरता आले. ठरलेल्या वेळेला तीन यमदूत आले. भयंकर स्वरूप त्यांचं आहे. त्यांना आलेले अजामेळाने पाहिले. त्यावेळेला त्या नारायण नावाच्या मुलाकडे लक्ष होतेच. यमदूतांना पाहिल्याबोबर घाबरून ओरडू लागले 'नारायणा, नारायणा' मुलाला हाका मारू लागले. नारायण हे नाव मृत्यूच्या वेळेला अजामेळाच्या मुखातून बाहेर पडलेलं आहे, त्यावेळेला विष्णूदूत त्याठिकाणी प्राप्त झाले आहेत. अजामेळाला ते बाहेर काढत आहेत. त्याला पाशामधे बांधून ठेवले आहे. नरकलोकाला त्याला घेऊन जाणार आहेत यमदूत. यांनी त्यांचे निवारण केले, थांबा घेऊन जाता येणार नाही अजामेळाला. यमदूतांनी

विचारले, कोण आहात आपण? पितांबरधारी, किरीट कुंडले वगैरे सगळी, चार हस्तामध्ये शंख, चक्र, गदा, पद्मधारी असे आपण कोण आहात?

त्या यमदूतांनी सांगितले की आम्ही धर्मराजाच्या आज्ञेने याला नेण्याकरता आलेलो आहोत. आम्हाला प्रतिबंध तुम्ही का करता? विष्णूदूतांनी विचारले, धर्मराजांचे तुम्ही सेवक आहात. धर्म म्हणजे काय सांगा आम्हाला म्हणाले. हा दंड तुम्ही कोणत्या आधारावर करता? याला कोणता आधार आहे? अमुक जीवाला दंड करायचा आणि अमूक जीवाला दंड करायचा नाही हे तुम्ही कसे ठरवता सांगा. काही लोकांनाच दंड करायचा, का सर्व लोकांना सर्व जीवांना दंड करायचा याबद्दल काय ठरले आहे सांगा.

वेदप्रणिहितो धर्मो ह्यधर्मस्तद्विपर्ययः ।। ६.१.४० ।। श्री.भा.

वेदांनी जे करायला सांगितले आहे, कृष्ण भजन करावं, सत्य भाषण करावं, दान करावं हे जे सगळं सांगितलेलं आहे, 'करावं' म्हणून त्याला धर्म म्हणतात. जे करू नये असं सांगितलेलं आहे, त्याचा निषेध केलेला आहे. कोणाचीही हिंसा करू नये, मनाला उद्वेग उत्पन्न करण्यासारखं भाषण करू नये, असत्य बोलू नये हे सगळे अधर्म आहेत. वेद म्हणजे साक्षात नारायणाचेच स्वरूप आहे. त्यानीच हे धर्माधर्म पुढे मांडलेले आहेत. त्या वेदाने सांगितल्याप्रमाणे कर्म करणारे त्यांच्याकडे आम्ही जात नाही. विरुद्ध वागणारे जे आहेत त्यांना आम्ही घेऊन जातो. याने वेदाच्या विरुद्ध कर्म केलेली आहेत त्याला नरकाला न्यायचंय. याला साक्षीपुरावे म्हणून सांगताहेत. साक्षी पुष्कळ आहेत. सूर्यनारायण, अग्नि, आकाश, वायू, चंद्र, रात्र, दिवस, दिशा हे सगळे देवतारूप आहेत. हे सगळेही जीवानी काय काय कर्म केले याचे साक्षी आहेत. त्यांच्याकडूनही ह्यांनी केलेला अधर्म समजतो आणि यांना दंड केला जातो. चांगलीही कर्म घडतात आणि पापकर्मही घडतात म्हणाले. जसं ज्याच्या हातून कर्म झालेलं असेल त्याला आणखी दंड करावा लागतो. कोणतंही कर्म केलं नाही किंवा करायचं नाही असं शक्यच नाही. कोणीही देहधारी कोणत्या ना कोणत्या कर्मामधे सापडलेला आहे. धर्म अधर्म काय केल असेल त्याने त्याप्रमाणे त्याचं फळ मिळतंय. ही ईश्वराची योजना आहे म्हणाले. सृष्टीचक्र व्यवस्थित चालू रहाण्याकरता ही कर्मशक्ति त्यांनी निर्माण केलेली आहे.

हा जो अजामेळ आहे हा चांगला होता पूर्वी. वेदाध्ययन झालेलं आहे, माता-पित्यांची सेवा करतो आहे. पुण्यशील होता. एके दिवशी अरण्यामधे समीधा दर्भ, पुष्प, वगैरे आणण्याकरिता

गेलेला आहे. पित्याला जे पाहिजे ते आणण्याकरिता आणि परत येताना एक दासी त्याच्या नजरेला पडलेली आहे. क्षुद्र योनीमधे जन्माला आलेली, मद्यपान केलेलं आहे. मत्त झालेली आहे. आणखी त्या दासीला पाहून याच्या मनाचा ताबा गेलेला आहे. मोहित झाला. मनोनिग्रह करण्याचा प्रयत्न करूनही मनाचा निग्रह झालेला नाही. पुष्कळ ज्ञान आहे पण काही उपयोग नाही. स्वधर्म त्यानी टाकून दिला आणि घरामधे असलेलं सर्व द्रव्य त्या स्त्रीला देऊन तिच्याच घरामध्ये जाऊन राहिलेला आहे. उत्तम पतिव्रता स्त्री मिळालेली आहे. लहान लहान मुलं आहेत, माता–पिता आहेत. सर्वांना टाकून दिलेलं आहे. आणि त्या दासीच्या संगतीमधे निमग्न झाला. कुठूनही न्याय–अन्याय काही विचार न करता धन मिळवून आणायचं आणखी पालन–पोषण करायचं. तेव्हा आजपर्यंत त्या अजामेळाकडून असं पाप घडलेलं आहे. त्याकरिता दंडपाणि जे यमधर्म आहेत त्यांच्या आज्ञेने आम्ही याला नेण्याकरिता आलेलो आहोत. त्याठिकाणी याला यातना भोगाव्या लागतील आणि हा शुद्ध होईल. यमदूतांनी एकंदर सृष्टिकार्य कस चाललेलं आहे, कोणतं प्रमाण आहे पाप–पुण्याकरता साक्षी कोण आहे हे सगळं सांगितलं आणि अजामेळ काय दोषी आहे अपराधी आहे हेही सांगीतलं. यमदूतांचं भाषण आणि विष्णुदूतांनी ऐकून घेतलं आणि ते बोलू लागले.

अहो कष्टं धर्मदृशां अधर्मः स्पृशते सभाम् ।। ६.२.२ ।। श्री.भा.

तुमचे स्वामी यमधर्म हे चांगले धर्मज्ञ आहेत याबद्दल वाद नाही म्हणाले. पण या अजामेळाला तुम्ही नेण्याकरता आलेले आहात हा तुमच्याकडून मोठा अधर्म होतो आहे. धर्मज्ञ जे आहेत त्यांची नेमणूक ईश्वरानी केलेली आहे. जीवांना आणि योग्य मार्गदर्शन करावं, दंड करावा, सगळं तुम्हाला अधिकार दिलेले आहेत. तुमच्याकडूनच जर असं शास्त्रविरुद्ध वर्तन व्हायला लागलं मग लोकांनी कुणाकडं पाहायचं म्हणाले. सामान्यत: सर्व लोक जे आहेत (जीव) त्यांना धर्माधर्माचं ज्ञान इतकं नसतं म्हणाले. श्रेष्ठ पुरूष जसं वागतात, सांगतात त्याप्रमाणे ते वागत आले. तेव्हा अजामेळाला तुम्ही नेणं हे विरूद्ध आहे. पाप केलेलं आहे आणि नरकाला नेता येत नाही हे कसं म्हणता तुम्ही ? पाप केलेलं होतं म्हणाले. पण पाप राहिलं नाही. शिल्लक राहिलं नाही.

अयं हि कृतनिर्वेशो जन्मकोट्यंहसामपि ।<br>
यद् व्याजहार विवशो नाम स्वस्त्ययनं हरेः ।।६.२.७।। श्री.भा.

याची सगळी पाप नाहीशी झालेली आहेत. केली असतील पूर्वी पण आता एकही पाप

शिल्लक राहिलेलं नाही. एकाच जन्माचं नाही अनेक जन्माची पातकं याची नष्ट झालेली आहेत. कारण अगदी मृत्यूच्या वेळेला याच्या मुखातून देवाचं नाव आलेल आहे. 'नारायण' हे चार अक्षर नाव हे याच्या मुखातून शेवटच्या वेळेला निर्माण झालेलं आहे. कितीही चोरी करू देत, सुरापान करू देत, मित्रद्रोह करू देत. महापापं, सगळी अनेक पापं जरी घडली असली तरी ईश्वराच्या नामस्मरणाने सर्वही पातकांचा क्षय होतो. हे फार मोठं प्रायश्चित्त आहे. सर्व पापक्षय होण्याचे हे मोठं साधन आहे म्हणाले. पुष्कळ आणखी कर्म असतील, व्रतवैकल्ये आहेत, दानधर्मादिक अनेक कर्म सांगितलेत पण त्या सर्वांपेक्षा पापक्षय करून त्याची वासनाशुद्धि करणारं हे साधन आहे. हे भगवंताचं नाव आहे. नामामधे फार मोठं महात्म्य आहे, नामात सामर्थ्य आहे म्हणाले. तेव्हा अजामेळाच्या मुखातून नारायण हे नाव आलेलं आहे. हे तुम्हालाही माहिती आहे. 'नारायणा' म्हणून त्यांनी हाक मारलेली आहे म्हणून तर आम्ही आलोत. त्यांनी सांगितलं, ''अहो, याने नारायण म्हणजे नाव नारायण आहे पण ते मुलाचं नाव आहे. ह्याचं मन मुलाच्या ठिकाणी आहे आणि वाणीतून हे नाव निघालेलं आहे. याचंही फल आहे?'' ''हो म्हणे याचंही फल आहे. हरीचं नाव मुखातून आलं कि त्याचा पापक्षय होतो.''

सामेत्यं पारिहास्यं वा स्तोभं हेलनमेव वा ।
वैकुण्ठनामग्रहणं अशेषाघहरं विदुः ।। ६.२.१४ ।। श्री.भा.

शुकाचार्य महाराजांनी कलियुगामधे घडणाऱ्या अनंत पातकांचा क्षय होण्याकरता हे एक मोठं साधन सांगतलेलं आहे, प्रगट केलेलं आहे. संकेत म्हणजे मुलाचं नाव ठेवणं, ईश्वराचं नाव जर मुलाचं ठेवलं आणि जर ते नेहमी मुखातून आलं, मुलाच्या उद्देशानी का होईना पण तेच नाव त्या नावानीच आपण हाक मारणार. पण त्या नामस्मरणानी किंवा त्या नावाने ते नाव उच्चारलं गेल्यानीसुद्धा पापक्षय होतो आहे. ईश्वराचा उपहास करताना जरी नाव उच्चारलं, निंदा करायची आहे, कोणत्याही उद्देशानी ईश्वराचं नाव मुखातून आल्यानंतर पापक्षय होतो आहे. कितीही पातकी जरी असला तरी हरीच्या नामाने त्याला यमयातना कधीही भोगाव्या लागत नाहीत. लहानमोठ्या पातकांचा नाश करण्याकरता ऋषीमंडळींनी अशी प्रायश्चित कर्म सांगितलेली आहेत. पण त्या कर्मानी पापाचा तेवढा नाश होतो. केलेली पापं जातात. पुन्हा पाप करण्याची बुद्धि बंद होत नाही. ती वासना शिल्लक राहती आहे.

नाधर्मजं तद्धृदयं तदपीशाङ्घ्रिसेवया ।। ६.२.१७ ।। श्री.भा.

अधार्मिक असलेल्याचं हृदय शुद्ध होत नाही पण ईश्वराची भक्ती, ईश्वराचं नामस्मरण जर घडलं तर त्याचं हृदयही शुद्ध होऊन जातं. अज्ञान किंवा ज्ञानपूर्वक भगवंताचं नाव जर मुखातून आलं तर सर्वही पातकं नष्ट होतात. औषध घेताना औषधाचं काय आणखी त्याच्यामधे सामर्थ्य आहे हे कोणाला कळतंय म्हणाले. औषध देणारा जो आहे, त्या वैद्याला, डॉक्टरला माहिती आहे की औषधामधे इतकं सामर्थ्य आहे. रोगी जो आहे त्याला काही माहिती नाही. पण अज्ञानानी औषधं घेतलं गेलं म्हणून त्याचं फळ मिळाल्यावाचून रहात नाही. तसं हे औषध आहे. हे तुमच्या लक्षात आलं नाही म्हणाले. विष्णुदूत सांगताहेत हा भागवत धर्म आहे. भगवंतांनी हे मुद्दाम सांगून दिलेलं आहे. सर्वांना हे माहिती नाहीये. तेव्हा अजामेळाला नरकलोकाला नेता येणार नाही. यमदुतांनी बांधलेले पाश सोडून टाकले. त्याला मुक्त केलं आणि विष्णुदूत निघून गेलेले आहेत. यमदूतही परत आले यमधर्माच्या जवळ. त्यांनीही घडलेला वृत्तान्त त्यांना सांगितला. अजामेळ यमदूतांच्या पाशातून मुक्त झालेला आहे आणि त्याच्या मनावर. पश्चाताप झाला पुष्कळ. विष्णुदूतांचं दर्शन झालं. त्या दोघांचं संभाषण ऐकलेलं आहे आणि केवढा भागवतधर्म आहे भगवंताच्या नामस्मरणामधे किती सामर्थ्य आहे हे त्यानी अनुभवाने आणखी सगळं पाहिलेलं आहे. आपण यमदूतांच्या पाशामधे बांधलो गेलो होतो शरीरातून आपल्याला जायचं होतं तरीसुद्धा नामस्मरणानी त्यातून मुक्त झालो आपण. काही बोलावं असं त्याला वाटलं पण विष्णुदूत थांबले नाहीत ते अदृश्य झाले. पश्चात्ताप झाला अजा मेळाला आणि आजपर्यंत माझ्या हातून किती अपराध, पापं किती घडलेली आहेत. माता-पितरांचा त्याग केला, पतिव्रता स्त्रीचा मी त्याग केला आणखी सुरापान करणाऱ्या या स्त्रीच्या संगतीमधे येऊन सापडलो म्हणाले मी. अशा भयंकर नरकामधेच मला जाण्याची पाळी आली होती. पण आज मला त्या विष्णुदूतांनी मुक्त केलं. कुठे गेले ते मला मुक्त करून? माझं काहीतरी भवितव्य चांगलं आहे, भाग्य चांगलं आहे म्हणून हा प्रसंग घडलेला आहे. नाहीतर या मृत्यूच्या वेळेला माझ्या मुखातून नारायणाचं नाव तरी कसं आलं? आता या पुढचा काल मात्र आणखी भगवंताची भक्ति करण्यामधे घालवायचा असा त्यानी निश्चय केलेला आहे. आणि घरातून बाहेर पडला. वयोवृद्ध आहे पण नाही राहिला नाही. मनामधे निश्चय झालेला आहे. आणखीन हरीद्वार क्षेत्रामधे आलेला आहे गंगातीरावर. योगाभ्यास त्याचा पूर्वीच झालेला होता. पुन्हा आता त्यानी तिकडं लक्ष देऊन प्राणायाम, प्रत्याहारादिकांनी आपल्या इंद्रियांचं दमन केलेलं आहे. सगळी इंद्रियं आणखी ताब्यामधे आणली आणि भगवंताचं स्मरण करतो आहे. भगवंतांच्या स्वरूपाचं ध्यान करण्याला तो प्रवृत्त झालेला असताना एके दिवशी ते

विष्णुदूत त्याला दिसलेले आहेत, दर्शन झालेलं आहे. नमस्कार त्या सर्वांना केला. आपलं शरीर त्या गंगाजलामधे टाकून दिलेलं आहे आणि भगवंतांच्या दूताचं स्वरूप त्याला मिळालं चतुर्भुज किरीट, कुंडल धारी भगवत्स्वरूप तो झालेला आहे. त्या सगळ्या भगवत्भक्तांच्या बराबेर विमानामधे बसून आणि वैकुंठलोकाला अजामेळ पोहोचलेला आहे. सर्व धर्म ज्यांनी टाकलेले होते, एक दासी पती म्हणून सर्व आणखी मार्ग भ्रष्ट झालेला असा जो पतीत झालेला अजामेळ तो,

सद्यो विमुक्तो भगवन्नाम गृह्णन् ।।६.२.४५।। श्री.भा.

भगवंताचं नाव मुखातून आल्याबरोबर तो मुक्त झालेला आहे. कर्मबंध हे आणखी तोडून टाकणार असं हे साधन मोठं श्रेष्ठ आहे. मोठे मोठे वेदाभ्यास करणारे असे जे मोठे ज्ञानी आहेत, त्यांचा याच्यावरती विश्वास बसत नाही. नामस्मरण काय साधन आहे असं त्याना वाटतं म्हणाले पण हे त्याचं उदाहरण आहे. मुलाचं ठेवलेल नाव मुखातून आलेलं आहे. पण ते नाव नारायणाचं आहे, भगवंताचं आहे. अज्ञानानी घेतलं गेलेलं हरीनाम या नामाच्या उच्चारानी अजामेळ तरून गेलेला आहे. श्रद्धेनं, विश्वास ठेवून आणखी हरीनामस्मरण ज्याचं चाललेलं आहे त्याला किती फळ मिळेल राजा.

राजानी विचारलं, ''महाराज, यमदूत परत गेले. आपल्या स्वामींना त्यानी सांगितलं. यमधर्मानी पुढं काय केलं म्हणाले. आजच आम्ही ऐकलं म्हणाले. यमधर्माची आज्ञा आणखी उल्लंघन केली. यमदूत आदराने परत गेले. मृत्यूजवळ आलेला असतानासुद्धा तो पुन्हा जिवंत झाला म्हणा किंवा उठून बसला गेला बाहेर. हे आज नवीन ऐकलं. यमदूत त्या विष्णूदूतांनी प्रतिबंध केल्यामुळे यमलोकामधे गेले. त्या यमदूतानी आणखी आपल्या स्वामीला यमधर्माला आणखी सांगितलं, विचारताहेत,

कति सन्तीह शास्तारो जीवलोकस्य वै प्रभो ।।६.३.४।। श्री.भा.

महाराज, या मृत्यू लोकावरती किती अधिकारी नेमलेले आहेत? आमची कल्पना आपण एकटेच अधिकारी आहात अशी आत्तापर्यंत कल्पना होती. अनेक अधिकारी अशा उच्चपदावरती जर असले तर सर्व गोंधळ होणार. यानी एक सांगायचं, यानी दुसरं सांगायचं. एक कुणीतरी अधिकारी असला पाहिजे आणि तो अधिकार आपल्या जवळच आहे. असा आमचा विश्वास आहे. आज आम्ही आपल्या आज्ञेप्रमाणे एका पापी मनुष्याला आणण्याकरता गेलो. मृत्यूलोकावर आणि त्याच्या मुखातून 'नारायण' हे नाव निघालं. मुलाचंच नाव त्याचं आहे. त्यानी ठेवलं होतं.

पण नारायण नाव मुखातून बाहेर पडल्याबरोबर ते भगवंताचे सेवक आले. त्यांनी आमचे पाश ओढून टाकले आणि त्याला मुक्त केलं. परत जावं लागलं आम्हाला. हे ऐकून यमधर्मसुद्धा त्यांच्याही मनामध्ये भगवत्प्रेम भरलेलं आहे. पूर्ण भगवद्भक्त आहेत. माझ्यापेक्षाही सर्वांचं नियमन करणारा एक परमात्मा श्रीहरी आहे सांगताहेत यमधर्म. ज्याच्या आज्ञेने आम्ही सर्व काम करतो आहोत. भगवंताचं नाम उच्चारून आणखी त्याची सेवा करणारे जे आहेत त्यांना कुणाच्याही बंधनामधे पडावं लागत नाही. सर्वही आम्ही मी आहे, इंद्र आहे, वरूण आहे, चंद्र, अग्नी, वायू हे सगळेही ब्रह्मादिक देव सुद्धा आणि त्या भगवंताची आज्ञा पालन करतो. आम्हाला त्याच्या आज्ञेप्रमाणे वागावं लागतं. सर्वव्यापी तो आहे. स्वतंत्र आहे. मायेचा नियंता आहे. त्याचेच दूत सर्वत्र फिरत असतात. विष्णूदूत हे सर्वत्र संचार करत असतात. विष्णुभक्त कोण आहेत, कोण संकटात आहेत हे ते बघत असतात. त्यांची सुटका कशी करायची हे सगळं त्या विष्णुदूतांना माहिती आहे. साक्षात भगवंताने खास आज्ञा केलेली आहे. कोणाला नरक आहे आणि कोणाला नाही हे त्यांनी ठरवलेलं आहे. नरकाची रचनाही त्याने केली. आम्हाला शिक्षा करण्याचा अधिकारही त्यानेच दिलेला आहे. पण त्याने त्याच्यामधे अपवादही केलेला आहे. भगवद्भक्ति ज्याच्याजवळ नाही त्याचा उद्धार व्हायचा कसा? ब्रह्मदेव, नारद, शंकर, सनतकुमार, कपिल, मनु, प्रल्हाद, जनक, भीष्माचार्य, बलि, शुकाचार्य आणि आम्ही अशा फक्त बारा लोकांना भगवंताची ती आज्ञा माहिती आहे. भागवतधर्म ज्याला म्हणतात, तो आम्हाला माहिती आहे. अत्यंत दुर्बोध आहे, शुद्ध आहे हा भागवतधर्म. सर्व पापक्षय करणारा कसा आहे याबद्दल इतरांना शंका उत्पन्न होते. आम्हाला त्याचं महात्म्य माहित असल्यामुळे शंका उत्पन्न होत नाही. तुम्ही आज भगवंताच्या नामामधे किती शक्ती आहे हे प्रत्यक्ष पाहून आलेले आहात. अजामेळासारखा पापी तुमच्या पाशातून मुक्त झालेला आहे. यापेक्षा आणखी कोणतं उदाहरण पाहिजे नामाचं महत्व समजायला? सामान्य श्रेष्ठ, ज्ञानी म्हणवणारे जे लोक आहेत, त्यांना हे नामसाधन माहिती नाही. मायामोहामधे पडलेले आहेत. वेदांनी सांगितलेली तेवढीच कर्म करायची, असं त्यांना वाटतंय. नामसाधन हे वेदांनी सांगितलं नाही असं नाही. भगवंताच्या नामामधे काय महात्म्य आहे हे ही वेदामधे सांगितलेलं आहे. तेव्हा यापुढं तुम्हाला जेव्हा मृत्युलोकामधे जायची वेळ येईल तेव्हा प्रथम चौकशी करत चला की हा जीवात्मा हा भगवद्भक्त आहे काय? याचं नामस्मरण नित्य चालू आहे काय? सगळा पूर्ण विचार करून आणि मग त्याला घेऊन जा. यमधर्मानी यमदूतांना सर्व समजावून सांगितलं आणि भगवंताची क्षमा त्यांनी मागितली. 'देवा, आमच्या दूतांनी आज फार मोठा

अपराध केलेला आहे. त्याची आपण क्षमा करा. त्यांना काही माहिती नाही.'

शुकाचार्य सांगतात, राजा,

तस्मात् समीर्तनं विष्णोर्जगन्मङ्गलमंहसाम् ।
महतामपि कौरव्य विद्ध्यैकान्तिकनिष्कृतिम् ।।६.३.३१।। श्री.भा.

भगवंताचं नामसंकीर्तन हे सर्वही पातकांचा निश्चित नाश करणारं साधन आहे. एवढं समजून रहा. भगवद्भक्तांचं संरक्षण भगवान कसं करतात हा विषय या सहाव्या स्कंधामधे आहे. देवाचा अनुग्रह कसा असतो हे सांगितलेलं आहे. अजामेळासारखा पापी मनुष्य परंतु भगवद्भक्त आहे. त्याचं पूर्व सुकृत काही असलं पाहिजे ना! शेवटच्या क्षणी भगवंताचं नाम मुखातून उच्चारलं गेलं हे काहीतरी पूर्व सुकृत आहे. त्याशिवाय मुखात नाम येणार नाही. इंद्राचाही असाच उद्धार केलेला आहे. तोही भगवत्भक्त आहे.

पुढं ब्रह्मदेवांनी अनेक प्रकारची सृष्टीरचना केलेली आहे. देव, असुर, गंधर्व, पशु-पक्षी हे सगळे निर्माण केले. दक्षानेही ब्रह्मदेवांच्या आदेशाप्रमाणे अशाच प्रकारची सृष्टी केली. आपल्या इच्छेप्रमाणे सृष्टीची वाढ झाली नाही म्हणून दक्ष प्रजापतीने अघमर्षण तीर्थावर जाऊन पुष्कळ तपश्चर्या केली. हरीची आराधना केली. नित्य प्रार्थना तो करतो आहे. भगवंतांची स्तुती करतो आहे. भगवान प्रकट झाले. गरूडावर बसून आलेले आहेत. त्या परमेश्वराचं दर्शन झाल्याबरोबर दक्षाला अतिशय आनंद झाला आणि त्याने त्यावेळेला पुष्कळ स्तुती केलेली आहे. भगवान म्हणाले, 'दक्षा, तुझी तपश्चर्या सफल झालेली आहे. तुझ्यावर मी प्रसन्न झालो आहे. तुझी इच्छा पूर्ण होईल. सर्वही ब्रह्मादिक देवही माझ्याच विभूती आहेत. तप हे माझं हृदय आहे. ज्याच्याजवळ तप आहे तो श्रेष्ठ होतो. समर्थ होतो. सृष्टीच्या पूर्वीही मी आहे. मध्येही मी आहे. अंतीही मी आहे. आता तू पंचजन प्रजापतीची कन्या आसिनी हिच्याबरोबर विवाह कर आणि संतती उत्पन्न कर. स्त्री-पुरुष समागमाने सृष्टी निर्माण कर असं भगवंतांने सांगितलं. आत्तापर्यंत ब्रह्मदेवानी, दक्षाने नुसत्या संकल्पाने सृष्टी निर्माण केली होती. दक्षाला आज्ञा करून भगवान गुप्त झालेले आहेत.

दक्षाने विवाह केला आणि हर्यश्व नावाचे दहाहजार पुत्र निर्माण केले. संकल्पसिद्धीही आहेच. धर्मशील अशाप्रकारचे ते दक्षकुमार पित्याच्या आज्ञेप्रमाणे तपश्चर्या करण्याकरता पश्चिम दिशेला गेलेले आहेत. तपश्चर्या करून आपल्या पुत्रांनी सामर्थ्यसंपन्न व्हावं, आणि परत येऊन राज्यकारभार सांभाळावा, प्रजाजनांचं संरक्षण करावं अशी त्या दक्ष प्रजापतीची इच्छा होती. समुद्र

आणि नदीचा संगम जिथे झालेला अशा नारायण तीर्थाजवळ ते आलेले आहेत. आणि तपश्चर्या करू लागले. नारदमहर्षि तिथे आले आणि त्यांनी दक्षपुत्रांना काही कूट प्रश्न विचारले.

अदृष्ट्वान्तं भुवो यूयं बालिशा बत पालका: ।।६.५.६ ।। श्री.भा.

हे जे उत्पन्न होणारं आहे किंवा ही जी भूमी आहे, हिचा अंत कुठे आहे हे तुम्हाला माहिती आहे काय?

एकपुरुषं राष्ट्रम् ।।६.५.७ ।। श्री.भा.

राष्ट्रांमधे नियमन करणारा एकच पुरूष आहे. एका बिळामधे गेल्यानंतर बाहेर पडता येत नाही ते कोणतं बिळ आहे? कोणतं स्थान आहे की याचकाने तिथे गेल्यानंतर पुन्हा बाहेर येत नाही? अनेक रूपं धारण करणारी एक स्त्री आहे ती कोण आहे? तिचा पती कोण आहे? अशी एक नदी आहे कि दोन्ही बाजूला जिचे प्रवाह वाहताहेत ती कोणती नदी आहे? पंचवीस पदार्थ ज्याठिकाणी राहताहेत ते कोणतं स्थान आहे? एक स्वयंचलित सारखं फिरणारं असं चक्र कोणतं आहे? हंस पक्षी कोण आहे? हे सगळं जर तुम्हाला माहिती असेल तर तुम्ही तपश्चर्या करा किंवा आणखी काही कार्य करायचं असेल तर करा. हे सगळं माहिती नसताना तुमच्या तपश्चर्येचा काय उपयोग आहे? हे अगोदर ज्ञान संपादन करा असं नारदांनी सांगितलं आणि निघून गेले. जन्मत:च चांगली व विवेकसंपन्न बुद्धि त्या राजपुत्रांची होती. देवर्षिंच्या भाषणाचा विचार ते करू लागले.

भू: क्षेत्रं जीवसंज्ञम् ।।६.५.११ ।। श्री.भा.

भू म्हणजे प्रगट होणारं. जन्माला येणारा जीवात्मा तोच भू आहे. त्याचा अंत म्हणजे त्याचा विलय केव्हा होणार आहे. जीवदशा केव्हा संपणार आहे हे मुख्य समजून घेतलं पाहिजे. नुसती कर्मं करून तपश्चर्या करून काय उपयोग आहे? 'एकपुरुषं राष्ट्रम्' ।। असा एक नियामक पुरूष म्हणजे परमेश्वर आहे. त्यालाही जाणलं पाहिजे. ज्याठिकाणी गेलं की परत बाहेर पडता येत नाही असं स्थान म्हणजे परब्रह्म, परमात्मा आहे. त्याला जाणलं, त्याच्याशी ऐक्य झालं की जीवदशा संपली. कर्म संपली. त्याचा काल संपलेला आहे. परमात्म्यामधे एकदा विलीन झाल्यावर जीवाला पुनरावृत्ती नाही. अनेक रूपं धारण करणारी स्त्री म्हणजे ही बुद्धि आहे. त्रिगुणांनी संपन्न आहे. कधी क्रोध आहे, कधी काम आहे. बुद्धि कशी आहे हे ही समजून घेतलं पाहिजे आणि तिच्या संगतीमुळे आपलं ऐश्वर्य विसरून गेलेला, भ्रष्ट झालेला हा जीवात्मा आहे. दोन्ही बाजूला प्रवाह असणारी नदी म्हणजे मायानदी आहे. लक्षावधी जीव रोज जन्माला येतात, लक्षावधी जीव रोज मरण पावतात,

हे दोन प्रवाह आहेत, हेही लक्षात ठेवलं पाहिजे. पंचवीस तत्वांचं स्थान म्हणजे परमात्मा आहे हे समजून घेतलं पाहिजे. ईश्वराने निर्माण केलेलं शास्त्र हा हंसपक्षी आहे. तो सांगतो आहे, मार्गदर्शन करतो आहे. सारखं फिरणारं म्हणजे हे कालचक्र आहे. रजोगुण आहे. त्यामुळे सारखी क्रिया चालू आहे. अशाप्रकारे मनानेच विचार करून दक्षकुमारांनी ठरवलं की आता कर्म करून काय करायचंय? राज्य कशाला करायचं? भगवत्भक्तिचा मार्ग धरून आपण आत्मकल्याण करून घ्यावं असं त्यांनी ठरवलं आणि ते काही पुन्हा राजधानीत परत आले नाहीत. दक्षाला हे समजलं, वाईट वाटलं. त्याला पुन्हा शबलाश्व एक हजार पुत्र झाले. त्यांनाही पित्याने आज्ञा केली की श्रीहरीचा प्रसाद संपादन करा, शक्तिसंपन्न व्हा. उत्तम गृहस्थाश्रम करा. राज्यकारभार करा. ते पुत्रही नारायणतीर्थापाशी आलेले आहेत. भगवंतांचं चिंतन चालू आहे. मंत्रजप चालू आहे. नारदमहर्षिंनी तिथे येऊन पूर्वीसारखंच त्यांना सांगितलं. तुमच्या बंधूंनी कोणता मार्ग पत्करला ते बघून तुम्ही त्यांच्याप्रमाणे वागा म्हणजे तुमचं कल्याण होईल. असं सांगून नारद निघून गेले आणि त्या दक्षकुमारांनी आपल्या बंधूंचाच मार्ग पत्करलेला आहे. इकडे दक्षाच्या राजधानीमधे अपशकून व्हायला लागले. याही पुत्रांना नारदांनी परमार्थ मार्गाला लावून दिलं. गृहस्थाश्रमापासून वंचित केलं हे कळल्याबरोबर दक्ष अतिशय रागावला. त्याचवेळी नारदमहर्षी त्याला भेटण्याकरता राजवाड्यात आले. त्यांना पाहिल्याबरोबर दक्षाने बोलायला सुरवात केली.

> अहो असाधो साधूनां साधुलिङ्गेन नस्त्वया ।
> असाध्वकार्यर्भकाणां भिक्षोर्मार्गः प्रदर्शितः ।।६.५.३६।। श्री.भा.

काय नारदा, साधूचा वेष धारण करून हे तुम्ही हे काय चालवलंय? लहान वय असलेल्या या मुलांना तुम्ही संन्याशाचा मार्ग दाखवला? तीन ऋणातून जे मुक्त झालेले नाहीत, कर्माचा विचारही अजून ज्यांनी केलेला नाही, आचरणही केलं नाही, त्यांचा बुद्धिभेद तुम्ही केला. यांचा इहलोकही गेला आणि परलोकही गेला. काय तुमच्या मनामधे दया वगैरे नाही? भगवद्भक्त दयाळू असतात असं आम्ही समजत होतो पण आपण तर त्याविरूद्धच वागता आहात! विषय हे किती दुःखदायक आहेत हे जर अनुभव घेऊन मनाला पटलं तर खरी विषयविरक्ती होते, खरं वैराग्य येतं. केवळ दुसऱ्याच्या सांगण्याने येणारं वैराग्य हे टिकाऊ होत नाही. आम्ही कर्ममार्गी, प्रवृत्तमार्गी आहोत. आणि आमचा सर्व वंशच तुम्ही नाहीसा केला. सगळे परमार्थमार्गाकडे वळलेले आहेत. तेव्हा लोकांचा बुद्धिभेद करणारे तुम्ही आहात. तुम्ही एका जागी कधीही राहाणार नाही. सारखा संचार तुम्हाला करावा लागेल असा शाप दक्षाने नारदांना दिलेला आहे. नारद काही बोलले नाहीत.

त्यांनाही शाप देता आला असता. पण काही न बोलता, भजन करत निघून गेले.

नंतर त्या दक्षाला साठ कन्या झालेल्या आहेत. धर्माला त्याने दहा कन्या दिल्या. सत्तावीस कन्या चंद्राला दिलेल्या आहेत. कश्यपांनाही काही कन्या दिल्या. त्यांची नावंही सांगितली शुकाचार्यांनी आणि त्या कन्यांच्यापासून काय काय संतती झाली हे ही सर्व सांगितलं. तार्क्ष्यनाम कश्यपांच्या पत्नी विनता, कद्रू वगैरे आहेत. विनतेपासून गरूड झालेला आहे. सूर्यसारथी अरूण झालेला आहे. कद्रूपासून सर्व नाग वगैरे झालेले आहेत. कश्यपांपासून पुष्कळ सृष्टी झालेली आहे. कश्यपांच्या दिती, अदिती, दनु, काष्ठा, अरिष्टा, सुरसा, इला वगैरे तेरा स्त्रिया होत्या. तिमी नावाच्या स्त्रीपासून सर्व जलचर प्राणी निर्माण झाले. सुरभि नावाच्या स्त्रीपासून गाय, म्हैस वगैरे पशू उत्पन्न झाले. ताम्रा नावाच्या स्त्रीपासून गिधाड वगैरे शिकारी पक्षी निर्माण झाले. मुनि नावाच्या स्त्रीपासून अप्सरा उत्पन्न झाल्या. क्रोधवशा नावाच्या स्त्रीपासून सर्व सर्पगण निर्माण झाले. इला नावाच्या स्त्रीपासून वृक्षजाती निर्माण झाल्या. अरिष्टेपासून गंधर्व निर्माण झाले. दनु नावाच्या स्त्रीपासून मोठेमोठे दानव निर्माण झाले. देवांना त्रास देणाऱ्या दानवांचा संहार तुझा पितामह अर्जुन याने इंद्राच्या आज्ञेप्रमाणे केलेला आहे. आता अदिती जी आहे देवमाता तिचा वंश सांगताहेत शुकाचार्य. विवस्वान, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरूण, मित्र, इंद्र आणि त्रिविक्रम म्हणजेच वामन असे बारा पुत्रं त्या आदितीला झाले. विवस्वान म्हणजे सूर्यनारायण हा पहिला पुत्र झाला कश्यपांचा. त्याच्यापासून श्राद्धदेव नावाचा मनु झाला. तोच वैवस्वत मनु. यमधर्म आणि यमुना ही दोन मुलं झाली. अश्विनीवेष धारण केलेला असताना संज्ञेला सूर्यापासून अश्विनीकुमार झालेले आहेत. अशी संतती झालेली आहे.

अदितीचा त्वष्टा नावाचा मुलगा होता. त्याची स्त्री रचना नावाची ही दैत्यांची भगिनी होती. तिच्यापासून विश्वरूप आणि संनिवेश असे पुत्र झालेले आहेत. एकदा बृहस्पतींनी देवांचा त्याग केल्यामुळे, कोणीतरी गुरू पाहिजे म्हणून सर्व देव विश्वरूपाकडे गेले आणि आपल्या गुरूस्थानावर त्याची योजना देवांनी केली. परीक्षित राजाने विचारलं, महाराज, देवगुरू बृहस्पतींनी देवांचा त्याग करण्याचं काय कारण घडलेलं आहे? शुक सांगतात राजा,

इन्द्रस्त्रिभुवनैश्वर्यमदोल्लङ्घितसत्पथः ।।६.७.२।। श्री.भा.

ऐश्वर्य मिळावं, मिळू नये असं नाही परंतु ते ऐश्वर्य मिळाल्यानंतर मनाची अवस्था केव्हा बदलेल, मनामधे अहंकार केव्हा जास्ती वाढेल, काही सांगता येत नाही. म्हणून भगवद्भक्त

म्हणतात, आम्हाला संपत्ती नको, मुक्ति नको. फक्त आपलं स्मरण तेवढं नित्य असावं. इंद्र त्रैलोक्याचा राजा आहे. परंतु सन्मार्गापासून तो भ्रष्ट झालेला आहे. सभेमधे एके दिवशी सर्व देवमंडळी बसलेली आहेत. इन्द्रपत्नी शचीही त्याठिकाणी आहे. इतक्यात देवगुरू बृहस्पती त्याठिकाणी आले. त्यांना पाहिल्याबरोबर सर्व देवमंडळी आदराने उठून उभी राहिली.

नोच्चचाल आसनात् इन्द्रः
पश्यन्नपि सभागतम् ।।६.७.८।। श्री.भा.

सभेमधे गुरूमहाराज आलेले आहेत. हे डोळ्याने पाहूनही इंद्र आपल्या आसनावरून उठला सुद्धा नाही. नमस्कार तर नाहीच. ही त्याची वृत्ती पाहिल्याबरोबर देवगुरू पाठीमागे वळले आणि आपल्या आश्रमात निघून गेले. सामर्थ्य मिळाल्यानंतर आता हे सामर्थ्य टिकणारं आहे अशीच त्याची कल्पना आहे. ज्यांच्या आश्रयाने, कृपाप्रसादाने हे सगळं ऐश्वर्य मिळालं त्या गुरूमहाराजांना इंद्र विसरून गेलेला आहे. बृहस्पती निघून गेल्यावर मात्र इंद्राच्या मनावर परिणाम झाला. आपली चूक झाली हे त्याच्या ध्यानात आलं. सर्व देवांना सांगतो आहे. अहंकारामुळे माझ्या हातून गुरूमहाराजांचा उपमर्द झालेला आहे. त्यांचा सत्कार माझ्या हातून घडला नाही. ही लक्ष्मी, हे ऐश्वर्य मिळावं अशी इच्छा कोणीही करू नये. कुणाचाही अनादर त्यामुळे घडण्याची शक्यता असते. मन बिघडून जातं. तेव्हा गुरूमहाराजांची क्षमा मागण्याकरता इंद्र बृहस्पतींच्या आश्रमात आला. पण त्याला दर्शन झालं नाही. इंद्र निराश झाला आणि ही बातमी दैत्यांना समजली. त्यांचेही हेर असायचे स्वर्गलोकामधे. दैत्यांना आपले गुरू शुक्राचार्यांबद्दल अतिशय आदर होता. त्यांनी शुक्राचार्यांची कृपा संपादन करून, देवांचा पराभव केला आणि स्वर्गाचं राज्य ते करू लागले. एका इंद्रामुळे सगळ्या देवांवर असा प्रसंग आला. इंद्राने अपराध केल्यानंतर जर शासन झालं नसतं तर इतरही देवांना असं वाटायची शक्यता होती की गुरूमहाराजांचा अपमान केला तरी चालतंय. म्हणून सर्वांनाच शासन झालं पाहिजे ही योजना ईश्वराच्या संकल्पाने झालेली आहे. इंद्र स्वर्गाचा राजा आहे. यज्ञयागादिक कर्म करून इथपर्यंत येऊन पोहोचलेला आहे. तरीपण त्यातून बाहेर पडण्याची वेळ येते. आचरण कायम ठेवलं पाहिजे. इंद्रपद मिळाल्यामुळे आता आपण कसंही वागलं तरी चालतंय असं नाहीये. ईश्वराला अमान्य आहे. एकदम देवांचं सर्व सामर्थ्य काढून घेतलं. सर्व देवमंडळी ब्रह्मदेवांना शरण गेली. ब्रह्मदेव म्हणाले, इंद्रा हे चांगलं केलं नाहीस, तुमच्या हातून अपराध घडलेला आहे. ज्ञानी महात्मा तुम्हाला गुरू म्हणून मिळाला असताना नुसता त्याचा आदर तुम्हाला करता आला नाही? काय तुझं राज्य मागत होता तो? किती सहाय्य त्यांचं होत होतं,

मार्गदर्शन होतं. ते दैत्य पहा किती बलवान झालेले आहेत. आपल्या गुरूंच्या कृपेमुळे त्यांनी स्वर्गाचं राज्य जिंकलं आणि मलासुद्धा ब्रह्मलोकातून घालवून देण्याचं सामर्थ्य त्यांच्याकडे आहे. कोणी मार्गदर्शन करणारा, ज्ञानी महात्मा तुमच्या गुरूस्थानामधे अवश्य पाहिजे. तेव्हा तुम्ही आता त्वष्ट्याचा मुलगा विश्वरूप जो आहे त्याला तुमचं गुरूपद द्या. तो तुमची इच्छा पूर्ण करील. तो मोठा ज्ञानी आहे, तपस्वी आहे, योगी आहे. पण तो कसा वागतो हे मनामधे आणायचं नाही. आपलं काम करून घ्यायचं. सर्व देव त्या विश्वरूपाच्या आश्रमामधे आलेले आहेत. त्यांनी विनंतीपूर्वक प्रार्थना केली, आम्ही अतिथी म्हणून आपल्याकडे आलेलो आहोत. आमचं गुरूपद आपण घ्या आणि आमचं संरक्षण करा. आमची गेलेली स्थानं आम्हाला तुम्ही मिळवून द्या. विश्वरूपाने सांगितलं, देव हो,

विगर्हितं धर्मशीलैर्ब्रह्मवर्च उपव्ययम् ।
कथं नु मद्विधो नाथा लोकेशैरभियाचितम् ।।६.७.३५।। श्री.भा.

पौरोहित्य करणं, कुणाचाही उपाध्याय होणं हे मला पसंत नाही. ब्राह्मतेज सगळं संपून जातंय. यजमानाच्या पातकांचं संक्रमण आमच्यामधे होतं. मला याची इच्छा नाहिये केवळ तपश्चर्या करत रहावं असं मला वाटतं. परंतु आपण आता माझ्या दरवाज्यामधे अतिथी म्हणून आलेले आहात. तेव्हा तुमची इच्छा पूर्ण करणं हेही माझं कर्तव्य आहे. तुमच्या इच्छेप्रमाणे तुमचा मी गुरू होतो आणि योग्य मार्गदर्शन करतो असं आश्वासन विश्वरूपाने देवांना दिलं. विश्वरूप मोठा ज्ञानी होता. त्याने इंद्राला नारायणवर्म म्हणून जे आहे, नारायणकवच ती विद्या शिकवली. समर्थ झालेल्या देवांनी दैत्यांचा पराजय करून आपलं राज्य परत घेतलेलं आहे. सगळी समृद्धी देवांना परत मिळाली. नारायणकवचाचं प्रतिपादनही शुकाचार्यांनी केलेलं आहे.

त्या विश्वरूपाला तीन मुखं होती. यज्ञातला सोमरस एका मुखाने त्याने घ्यावा, एका मुखाने अन्नभक्षण करावं आणि तिसऱ्या मुखानी सुरापान करावं.त्याची माता रचना ही दैत्यवंशातली होती. त्यामुळे त्याचं दैत्यांकडेही लक्ष होतं. देवगुरू म्हणून सर्वाधिकार मिळाल्यामुळे यज्ञातील हविर्भाग देवांना कळणार नाही अशा रितीने विश्वरूपाने दैत्यांनाही देण्यास आरंभ केला. इंद्राच्या कानावर ही गोष्ट गेली. इंद्र विचार करतोय, हा आपला गुरू तर आपल्या शत्रूला सामील दिसतोय. आज आमच्या नकळत हविर्भाग देतोय, उद्या आम्हाला बाजूला सारून दैत्यांनाच फक्त हविर्भाग देईल हा! असा विचार मनात आल्याबरोबर इंद्र अतिशय रागावला आणि त्याने आपल्या वज्राने त्या

विश्वरूपाची तीनही मस्तके तोडून टाकली. ब्रह्महत्या झाली. इंद्राने त्या ब्रह्महत्येचे विभाग केले. भूमीला एक चतुर्थांश दिला, जलाला एक चतुर्थांश, वृक्षांना एक चतुर्थांश आणि स्त्रियांना एक चतुर्थांश भाग दिलेला आहे. अशाप्रकारे त्या पातकाचे विभाग करून त्यातून तो मुक्त झाला. हे सगळे विभाग करून देताना सगळ्यांना वर द्यावे लागले. भूमीला कितीही खणलं, उकरलं तरी पुन्ही भरून येईल असा वर दिला. भूमीवर मलमूत्र विसर्जन जे केलं जातं, सगळा कचरा जो टाकला जातो हे ब्रह्महत्येचं स्वरूप आहे. वृक्षांनाही तोडल्यानंतर पुन्हा वाढण्याचा वर दिला. झाडातून जो चिक बाहेर पडतो, डिंक वगैरे हे ब्रह्महत्येचं स्वरूप आहे. शास्त्रोक्त पुरूष डिंक वगैरे खात नाहीत त्याचं कारण हे आहे. स्त्रियांना नेहमी पुरूष सहवास मिळेल असा वर दिला. स्त्रियांचं मासिक रजोदर्शन आहे त्या रूपाने ब्रह्महत्येचं स्वरूप दिसतं. जलाला खर्च झाल्यानंतरही निर्झररूपाने वाढण्याचा वर दिला. पाण्यावर फेस, बुडबुडे जे येतात ते ब्रह्महत्येचं स्वरूप आहे. याप्रमाणे त्या गुरूंना बोलावून आणून आपणच त्यांचा नाश इंद्राने केला. पुन्हा गुरू नाही. मार्गदर्शक नाही. इकडे तो त्वष्टा जो होता, विश्वरूपाचा पिता, त्याला अतिशय राग आलेला आहे. वास्तविक त्वष्टा हा ही अदितीचा मुलगा म्हणजे इंद्राचा भाऊच झाला! तोही मोठा तपस्वी होता. दक्षिणाग्नीमधे हवन केलं, इंद्राचा नाश व्हावा म्हणून. त्या अग्नीकुंडातून एक भयंकर असुर बाहेर पडलेला आहे. वृत्रासुर त्याचं नाव. त्याचं शरीर वाढत वाढत मेघमंडलापर्यंत गेलं. महाप्रचंड आकाराचा तो असुर, काळ्या रंगाचा होता आणि हातामधे एक भयंकर त्रिशूल त्याने धारण केलेलं होतं. त्वष्ट्याने इंद्राला मारण्याकरता अशी व्यवस्था केली. स्वर्गलोकामधेही अशी भाऊबंदकी चालू आहे. तो वृत्रासुर निर्माण झाल्यावर सर्व दैत्यांनी त्याला आपला सेनापती नेमला आणि स्वर्गावर हल्ला केला. देवांनीही आपापली शस्त्रं वृत्रासुरावर टाकली परंतु त्याने ती शस्त्रं गिळून टाकलेली आहेत. त्याच्यावर काहीही परिणाम झाला नाही. देव घाबरले आणि भगवान श्रीहरींची प्रार्थना करण्याकरता क्षीरसमुद्राच्या तीरावरती ते आलेले आहेत. प्रार्थना करताहेत, ''आपण सर्वेश्वर आहात. सर्वांचं संरक्षण करणं हे आपलंच कार्य आहे. आजपर्यंत अनेक दैत्यांपासून आमचं संरक्षण आपण केलेलं आहे. आम्ही आपल्याला शरण आलेलो आहोत.'' अशी प्रार्थना केल्यानंतर भगवान श्रीहरी प्रकट झालेले आहेत. देवांनीही वंदन केलेलं आहे. भगवान सांगताहेत, ''देवहो, तुम्ही केलेली स्तुती ऐकून मला संतोष झालेला आहे. माझा जो भक्त आहे त्याची जी इच्छा असेल ती पूर्ण होते. तुम्ही आता दधीचि ऋषिंच्या आश्रमात जाऊन त्यांचं शरीर मागून घ्या. विद्या आहे, तपस्या आहे, योगसामर्थ्य आहे. त्यामुळे त्यांचं शरीर अत्यंत समर्थ आहे. नारायणकवचाच्या सतत पठणामुळे

त्यांच्या अस्थि अतिशय अभेद्य झालेल्या आहेत. त्या अस्थिंपासून वज्र नावाचं शस्त्र विश्वकर्म्याकडून तुम्ही करून घ्या आणि त्या शस्त्राने इंद्रा तुला वृत्रासुराचा नाश करता येईल. काही घाबरू नका. तुमचा नाश कोणीही करू शकणार नाही''. असं आश्वासन देऊन भगवान गुप्त झाले.

सगळे देव दधीचि ऋषिंच्या आश्रमात आलेले आहेत. ऋषिंनीही त्यांचा सत्कार केला. देवांनी विनंती केली, ऋषिमहाराज, आम्ही मोठ्या संकटात सापडलेलो आहोत. वृत्रासुर निर्माण झालेला आहे. त्याचा नाश करण्याकरता एक शस्त्र तयार करायचंय आणि त्याकरता आपलं शरीर आम्हाला पाहिजे आहे. ऋषिंनी थोडी परीक्षा पाहिली. काय म्हणाले, काय मागावं आणि काय नाही हे तुम्हाला कळत नाही? शरीर कोण देऊ शकेल तुम्हाला? सर्व जीवांना शरीर किती प्रिय असतं आणि मला तुम्ही शरीर मागता? देव म्हणाले, ऋषिमहाराज आपल्यासारखे ब्रह्मज्ञानी महात्मे जे आहेत ते लोककल्याणाकरता काहीही करू शकतात. आमचं एवढं कार्य व्हावं अशी प्रार्थना आहे. दधीचि ऋषिंनी सांगितलं, हेच मला ऐकायचं होतं. शरीर हे अस्थिर आहे. केव्हातरी पडणारच आहे. मृत झाल्यावर आपलं शरीर दान करावं असं काहीजण लिहून ठेवतात. त्यांच्या शरीराची किंमत ती काय? पण इथं दधीचि ऋषि आपलं समर्थ असं जिवंत शरीर द्यायला तयार झालेले आहेत. घ्या म्हणाले, देवकार्य होण्याकरता माझं शरीर खर्ची पडतं आहे, चांगलं आहे. दधीचिऋषि आसन घालून बसले आणि भगवान श्रीहरीचं चिंतन करता करता, योगमार्गाने त्यांनी आपल्या शरीराचा त्याग केलेला आहे. विश्वकर्म्याने त्यांच्या अस्थिंपासून एक वज्र नावाचं आयुध तयार करून दिलं. सर्व देव वृत्रासुराचा नाश करण्याकरता युद्धभूमीवर आलेले आहेत. त्रेतायुगाच्या आरंभी नर्मदा तीरावर देव-दैत्यांचं भयंकर युद्ध झालेलं आहे. नमुचि, शंबर, अनर्वा, द्विमूर्धा असे मोठे मोठे असुर तिथे आहेत आणि पराक्रमी देवगणही आहेत. वृत्रासुर हा इंद्राचा शोध करतो आहे. दैत्यांचा आरंभाला पराभव झाला. ते पळून जाऊ लागले. वृत्रासूर त्यांना धीर देत बोलू लागला, अरे, पळून कशाला जाताय? युद्धामधे मृत्यु आला तर सद्गती मिळते. पुण्य केवढं आहे. परत फिरा. असं सांगून त्या वृत्रासुराने देव सैन्यात जाऊन पुष्कळसे देव पायाखाली चिरडून मारलेले आहेत. आणि शेवटी त्याने इंद्राला गाठलं. इंद्र ऐरावत हत्तीवर बसलेला होता. इंद्राने आपली गदा वृत्रासुरावर टाकली. ती गदा चेंडूप्रमाणे झेलून वृत्रासुराने ऐरावताच्या गंडस्थळावर मारली. तो ऐरावत त्या गदाप्रहाराने त्रस्त होऊन पाठीमागे सरकू लागला. इंद्राने आपला अमृतस्पर्श त्या ऐरावताला करून त्याला शांत केलेलं आहे. इंद्राला पाहिल्याबरोबर तो वृत्रासुर बोलू लागला.

दिष्ट्या भवान् मे समवस्थितो रिपु:

यो ब्रह्महा गुरुहा भ्रातृहा च ।। ६.११.१४।। श्री.भा.

इंद्रा, आज माझ्यासमोर तू आलेला आहेस. एका ब्राह्मणाची तू हत्या केलेली आहेस. गुरूची हत्या केलीस. आज दैवयोगाने माझ्यासमोर तू आलेला आहेस. तुला मी जिवंत ठेवणार नाही. माझ्या त्रिशूलाने तुझ्या शरीराचे मी तुकडे करणार आहे. एका आत्मज्ञानी महात्म्याला गुरूपदावर बसवून त्याचा शिरच्छेद तू केलास. तुला काही लज्जा नाही? स्वर्गाचं राज्य मिळवून त्याचा उपयोग काय आहे? मनावर ताबा नाही. तुझ्या शरीराचे तुकडे करून गिधाडांना मी वाटून टाकणार आहे. जे जे माझ्या अंगावर धावून येतील त्यांचाही मी नाश करणार आहे. हे आरंभाला सांगितलं वृत्रासुराने, पण तो मोठा विचारी होता. पुन्हा म्हणतोय –

अथो हरे मे कुलिशेन वीर ।
हर्ता प्रमथ्यैव शिरो यदीह ।।६.११.१८।।श्री.भा.

तुझ्या हातात जे वज्र आहे त्यामधे एका तपस्वी ब्राह्मणाची तपःशक्ति आहे आणि भगवान श्रीहरींचा कृपाप्रसाद तुम्हाला मिळालेला आहे. हे मी जाणून आहे. त्या वज्राने जर तू माझा शिरच्छेद केलास तर हे माझं शरीर भूतगणांना अर्पण करून मी भगवंताजवळ जाईन. भगवंताची प्रार्थना तो करतोय. इंद्रालाही सांगतो आहे लवकर ते वज्र टाक. तुझी गदा फुकट गेली म्हणून हे वज्र फुकट जाणार नाही. बरं होईल, भगवंताचं स्मरण करता करता माझा देह पडेल. भगवंताची कृपा फक्त मला पाहिजे आहे. स्वर्गाचं राज्य नको आहे. कोणतीही राजसत्ता मला नको आहे. आमचा स्वामी, त्याची कृपा कोणती आहे ऐक इंद्रा,

त्रैवर्गिकायासविघातमस्मत्
पतिर्विधत्ते पुरुषस्य शक्र ।
ततोऽनुमेयो भगवत्प्रसादो
यो दुर्लभोऽकिञ्चनगोचरोऽन्यैः ।। ६.११.२३ ।। श्री.भा.

खरा भगवद्भक्त आहे वृत्रासुर. तो सांगतो आहे, आमचा स्वामी भगवान! आम्ही धर्माचरण केलं, अर्थार्जन केलं, विषयसेवन केलं. धर्म, अर्थ, कामाकरता आम्ही प्रयत्न करू लागलो तर ते सर्व प्रयत्न तो निष्फळ करतो. यावरून, भगवंताचा प्रसाद आमच्यावर आहे असं आम्ही अनुमान करतो. या अर्थार्जनात, विषयसेवनातच आमची बुद्धि अडकून राहू नये अशी देवाची इच्छा आहे अशी आमची कल्पना होते. असा प्रसाद दुसऱ्याला मिळणार नाही. अकिंचन करून टाकतो ना

देव! धर्माचरण व्यवस्थित झाल्यानंतर, तोही एक अभिमान उत्पन्न होतो. मी धर्माचरण करतोय. उगीच काय देवाची माझ्यावर काही कृपा काय. म्हणजे देवापेक्षा धर्मच मोठा वाटायला लागतो. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्मपालन करायचं पण प्राधान्य फलदात्याला दिलं पाहिजे. भगवंत हा मुख्य आहे. तेव्हा असा प्रसाद आमच्या स्वामींचा आमच्यावर असल्यामुळे, मला कशाचीही इच्छा नाही. आणि जे होणार आहे ते त्याच्या इच्छेने होणार आहे. भगवंताची प्रार्थना तो वृत्रासुर करतो आहे, की मला आपला दासानुदास करा. आपल्या गुणांचं अखंड स्मरण माझ्या मनामधे रहावं. माझ्या शरीराने आपली अखंड सेवा घडावी. वाणीनं आपलं नामस्मरण घडावं. स्वर्गाचं राज्य मला नको, कोणत्याही सिद्धी नकोत. नुकतीच जन्मलेली पक्ष्याची पिलं जशी आपल्या आईवडिलांची वाट पाहतात तसं मी आपल्या दर्शनाची वाट पहातोय. आपल्या भक्तांची संगती मला नेहमी घडावी. संसारचक्रामधे अजून मला किती काळ फिरावं लागतंय याचा काही नियम नाही. याकरता मला आपल्या भक्तांची संगती घडावी म्हणजे माझा उद्धार होईल अशी प्रार्थना रणभूमीवरून तो वृत्रासुर करतो आहे. आपल्याला विजय मिळण्यापेक्षा आपला देह पडावा अशीच इच्छा वृत्रासुराची आहे. त्याशिवाय भगवंताच्या जवळ जाता येणार नाही. त्याचं दर्शन होणार नाही. नंतर त्याने एक भयंकर त्रिशूल इंद्राच्या अंगावर फेकला, म्हणाला, 'इंद्रा आता तू मेलास.' इंद्र सावध होता. इंद्राने आपल्या वज्राने त्या त्रिशूलाचे तुकडे केले आणि त्या वृत्रासुराचा एक हात तोडून टाकलेला आहे. वृत्रासुराने दुसऱ्या हातात शस्त्र घेऊन इंद्राच्या हातावर टाकलं. जोराचा झटका बसला आणि इंद्राच्या हातातून ते वज्र खाली पडलं. इंद्र मोठा संकटात सापडला. तेव्हा तो वृत्रासुर त्याला सांगतो आहे. ''इंद्रा, हा काही विषादाचा समय नाही. ते वज्र उचलून घे. युद्ध करायची इच्छा आहे. या जय-विजयाचा निर्णय शेवटपर्यंत नाही. हे सर्वही विश्व ज्याच्या ताब्यात आहे तो परमात्माच केवळ नित्य विजयी आहे. आपण सगळे कधी विजयी होतो, कधी पराजित होतो. तू मला मारण्याकरता प्रयत्न करतो आहेस तेव्हा ते वज्र उचलून घे.'' इंद्राने ते वज्र उचलून घेतलं आणि त्या वृत्रासुराची स्तुति केलेली आहे. इंद्र म्हणाला, ''हे दानवा, तू खरोखरच श्रेष्ठ महात्मा आहेस. भगवंताचा खरा भक्त तू आहेस. सर्व जगाला मोहामधे टाकणारी भगवंताची माया तू जिंकलेली आहेस. रजोगुण, तमोगुण तुमचे प्रकृतिस्वभाव बनत असतात पण तुझ्या मनात केवढी भक्ति निर्माण झाली.''

शुकाचार्य सांगतात, ''राजा, दोघांचं असं संभाषण झालेलं आहे आणि युद्धाला पुन्हा सुरवात झाली. वृत्रासुराने परीघ नावाचं शस्त्र डाव्या हातामधे घेतलं आणि इंद्रावर टाकलं, त्यावेळी

इंद्राने तो हातही तोडून टाकलेला आहे. वृत्रासुराने मग आपलं ते महा अजस्त्र तोंड उघडलं आणि इंद्राला हत्तीसहित गिळून टाकलेलं आहे ! हातही नकोत आणि शस्त्रंही नकोत. सर्व देव घाबरलेले आहेत. इंद्र आता याच्या पोटात गेला म्हणजे आता आपलाही नाश होणार असं सर्व देवांना वाटू लागलं. असुराच्या पोटामधे जरी इंद्र गेला होता तरी त्याचं नारायण कवचाचं पठण अखंड चालू होतं त्यामुळे तो सुरक्षित होता. इंद्राने आपल्या वज्राने वृत्रासुराचं पोट फाडलं आणि तो पुन्हा बाहेर आलेला आहे. इंद्राने आपलं वज्र त्या वृत्रासराच्या मस्तकावर टाकलं. तो असुर इतका महाभयंकर आणि अजस्र होता की त्याचा शिरच्छेद करायला एक वर्ष लागलेलं आहे. सर्व देव संकटातून मुक्त झालेले आहेत. सर्वांचं समाधान झालं पण इंद्राचं समाधान झालं नाही. वृत्रासुर जन्माला आल्याबरोबर सर्व देव, ऋषि यांनी इंद्राला सांगितलं की याचा नाश करा. इंद्र त्यावेळेला म्हणाला होता, ''मी काहीही हत्या करणार नाही. आधीच एका ब्रह्महत्येच्या दोषातून आत्ताच कुठे मुक्त होतो आहे ही पुन्हा ब्रह्महत्या होईल, हा ब्राह्मणाचाच मुलगा आहे. शरीर असुराचं असलं म्हणून काय झालं.'' मग ऋषिंनी सांगीतलं, ''सर्वांच्या संरक्षणाकरता तू याचा नाश कर. तुझ्याकडून अश्वमेध यज्ञ करवून आम्ही तुला ब्रह्महत्येच्या पातकातून मुक्त करू'' ऋषिंच्या वचनावर विश्वास ठेवून इंद्राने वृत्रासुराला मारले. आणि ती ब्रह्महत्या त्याच्या पाठीमागे लागली. कुठेही मनाला स्वास्थ्य नाहीये. इंद्र मग सूक्ष्म रूप घेऊन एका कमलामधे जाऊन बसलेला आहे; आणि विचार करतोय की कसं आपण या ब्रह्महत्येतून मुक्त होऊ. त्यावेळेला आयु राजाचा मुलगा नहुष राजा जो आपल्या तपाने, ज्ञानाने, श्रेष्ठ ठरलेला आहे तो तात्कालिक इंद्रपदावर आरूढ झालेला आहे कारण खरा इंद्र तिथे नाहिये. त्याच्याही हातून ऋषिंचा अपमान घडल्यामुळे, अगस्ति ऋषिंच्या शापाने तो अजगर जन्माला गेलेला आहे. पांडव वनवासात असताना त्या अजगराने भीमाला धरलं. धर्मराज तिथे गेलेले आहेत आणि त्यांनी त्या अजगराच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिल्यावर त्याने भीमाला मुक्त केलं आणि तो अजगरही शापातून मुक्त झालेला आहे. ऋषिंनी इंद्राकडून अश्वमेध यज्ञ करवला आणि इंद्राला ब्रह्महत्येचा दोषातून मुक्त केलेलं आहे.

परीक्षित राजाने विचारलं, ''महाराज,

रजस्तमः स्वभावस्य ब्रह्मन् वृत्रस्य पाप्मनः ।
नारायणे भगवति कथमासीद् दृढा मतिः ।।६.१४.१।। श्री.भा.

दैत्याचा स्वभाव हा राजस किंवा तामस असतो. अशा व्यक्तिंमध्ये भगवद्भक्ति सहसा दिसत

नाही. हा वृत्रासुर असुर जातीत जन्माला आलेला आणि त्याच्या अंत:करणात इतकी ईश्वरभक्ति कशी निर्माण झाली ? देवांनासुद्धा अशी भक्ति मिळत नाही. काही मंडळी ईश्वरार्पण बुद्धीने कर्मानुष्ठान करत असतात. ज्ञान संपादन करायला त्यांना पुष्कळ काळ लागतो. ज्ञान मिळालं तरीसुद्धा भगवंताची भक्ति करण्याकडे प्रवृत्त होणारे फार अल्प असतात. असं असताना हा वृत्रासुर इतका हरीभक्त झाला कसा ? शुकाचार्य महाराज सांगताहेत, ''राजा एक पूर्वीचा इतिहास तुला सांगतो. व्यासमहर्षि, नारदमहर्षि यांच्याकडून मी हे ऐकलेलं आहे. पूर्वी एक चित्रकेतू नावाचा सर्वभौम राजा होऊन गेला. मोठा राजा आहे, प्रजाजनांच पालन उत्तम रितीने करतो आहे. सर्व समृद्धि आहे. अनेक स्त्रिया त्याला होत्या. पण एकाही स्त्रीपासून त्याला संतती झाली नाही. त्याच्या मनाला समाधान नाहिये. संपत्ति आहे, ऐश्वर्य आहे पण राज्याला वारस नाही. एके दिवशी ब्रह्मकुमार अंगिरा ऋषि त्याच्या वाड्यामधे आलेले असताना, त्याने त्यांची यथासांग पूजा केली, राजाने ऋषिंना विनंती केली , ''महाराज मला संतती नाही आहे. मला आपण पुत्र द्या.'' अंगिरा ऋषि राजाला उपदेश करून मुक्त करायला आले होते पण राजाची वासना मुलामध्ये होती. संसार चांगला झाला पाहिजे, संतती झाली पाहिजे अशी इच्छा आहे. म्हणून अंगिरा ऋषि थांबले. त्यांनी राजाला काही विधान सांगितलं, त्याच्याकडून यज्ञ करवला, आणि यज्ञाचा प्रसाद पत्नीला देण्यास राजाला सांगून अंगिरा ऋषि निघून गेले तो प्रसाद ग्रहण केल्यानंतर त्याची पत्नी कृतद्युति तिला गर्भधारणा झालेली आहे. नऊ महिन्यानंतर एक उत्तम मुलगा तिला झालेला आहे. आनंदातिशयाने राजाने पुष्कळ दानधर्म केला आणि त्याला एवढा एकच आनंद कमी होता तो मिळाल्यामुळे समाधान झालेलं आहे. संसारामध्ये आनंद मिळत नाही. सुखसाधनं जरी मिळाली तरी त्याचवेळी दु:खाची साधनंही अज्ञातरूपाने असतात. त्या एकट्याच स्त्रीला मुलगा झाला, बाकीच्या स्त्रियांना काही अपत्य झालं नाही. आता हिच्यावर राजाचं प्रेम बसणार या मत्सर भावनेने त्या बाकीच्या स्त्रिया त्या बालकाचा नाश करण्यास टपलेल्या आहेत. बाहेरून त्यांनी प्रेम दाखवावं, मुलाला घ्यावं, खेळवावं, त्या राणीलाही वाटावं, त्या सवती आपल्या किती प्रेम करतात, म्हणून तिनेही मुलाला त्यांच्या ताब्यात द्यावं. एकदा त्या स्त्रियांच्या मनातला द्वेष इतका वाढला की मुलाला दुधातून विष त्यांनी पाजलं आणि त्या निघून गेल्या. बराच वेळ झाला. मुलाने हालचाल केली नाही म्हणून त्या राणीने दासीला त्याला आणायला सांगितलं. ती दासी पाळण्याजवळ जाऊन पाहती आहे तो मुलगा गतप्राण झालेला आहे. ती दासी मूर्च्छित पडलेली आहे. ती राणी धावत धावत गेली आणि ते दृश्य पाहिल्यावर तीही मूर्च्छित पडलेली आहे. राजाला ही बातमी समजली. तोही

शोक करू लागला. ज्या स्त्रियांनी विष पाजलं होतं, त्याही रडायला लागल्या. संसारातलं प्रेम उत्तम प्रकारे दाखवता आलं की तो प्रेम करतो एवढीच समजूत आपली असते. कुणाचंही अंत:करण कुणी ओळखू शकत नाही. खरं प्रेम हे फार वेगळं आहे. तो राजा शोकाकूल होऊन पडलेला आहे. आता हा उपदेशाला पात्र झालेला आहे, याला काही सांगून याचा आता उद्धार करावा या हेतूने अंगिरा ऋषि आणि नारद ऋषि राजवाड्यात येऊन पोहोचले. त्या अत्यंत शोकग्रस्त झालेल्या राजाला नारद विचारताहेत,

कोऽयं स्यात् तव राजेन्द्र भवान् यमनुशोचति ।
त्वं चास्य कतमः सृष्टौ पुरेदानीमतः परम् ।।६.१५.२।। श्री.भा.

राजा ज्याच्याबद्दल तुला शोक वाटतोय तो कोण आहे तुझा ? तू याचा कोण आहेस आणि हा तुझा कोण आहे ? तुमचा संबंध पूर्वजन्मापासून आहे काय ? प्रवाहांच्या कडेने वालुकांचे खडे वाहात जातात, बाजूला होतात, पुन्हा एकत्र येतात, त्याप्रमाणे ईश्वराच्या मायाशक्तिने काही जीव एकत्र येतात. संसार करतात आणि पुन्हा त्यांच्या कर्माप्रमाणे बाजूला निघून जातात. सगळे जण, आम्ही, तुम्ही या जन्म मृत्यूमध्ये सापडलेलो आहोत, सर्वांना उत्पन करणं, पालन करणं, संहार करणं हे देवाचं कार्य सारखं चाललेलं आहे. हा माझा मुलगा आहे असं तू समजतो आहेस. हे पिता पुत्राचं नातं कसं निर्माण झालं ? पित्याच्या शरीरापासून मातेच्या शरीराच्या माध्यमातून पुत्राचं शरीर निर्माण झालेलं आहे. तुझ्या शरीरापासून देह उत्पन्न झाला त्या देहाला मुलगा म्हणावं आणि ज्याच्या शरीरापासून देह उत्पन्न झाला त्याला जनक म्हणावं हे नातं कोणी ठरवलं ? उत्तम पैकी बियाणं लावलेलं आहे. त्याच्यापासून कणिस तयार झालेलं आहे. त्यालाही पुष्कळ धान्य आलेलं आहे. मग जे जन्माला आलेलं कणिस आहे त्याला मुलगा म्हणायचं का आणि ज्याच्यापासून ते जन्माला आलं त्या पेरलेल्या धान्याला पिता म्हणायचं का ? तुझा देह जनक आहे, त्याचा देह जन्य आहे. मग माझा मुलगा, माझा मुलगा म्हणून काय दु:ख करत बसला आहेस ? तेव्हा राजा, वस्तुस्थिती काय आहे हे समजून घे आणि विचार कर. राजाचं समाधानं झालेलं आहे. तो उठून उभा राहिला हात जोडले,

कौ युवां ज्ञानसम्पन्नौ महिष्ठौ च महीयसाम् ।। ६.१५.१० ।। श्री.भा.

महाराज, आपण कोण आहात ? आपल्यासारखे ज्ञानसंपन्न महात्मे, माझ्यासारख्या विषयासक्त माणसाला बोध करून, त्याचा उद्धार करण्याकरता सर्वत्र संचार करत असतात. सनत्कुमार आहेत,

नारद आहेत, यापैकी आपण कोण आहात ? मला आपण बोध करा आणि माझा शोक दूर करा. अज्ञान अंध:कारात मी सापडलेलो आहे यातून मला वर काढा.'' अंगिरा ऋषि म्हणताहेत, ''पूर्वी एकदा मी तुला येऊन भेटलो होतो तोच अंगिरा ऋषि मी आहे. त्यावेळेलाच तुला उपदेश करायचा होता पण मुलगा पाहिजे अशी तुझी वासना होती. हा तुझा अभिनिवेश आहे. संसारामधे मुलगा झाला म्हणजे आपण सुखी होऊ असं तुला वाटत होतं. पण त्याचवेळी तुला सांगीतलं होतं की हा मुलगा तुला सुखही देईल आणि दु:खही देईल. हे नारद महर्षि आहेत. पुत्रशोकामुळे अज्ञानात तू सापडलेला असल्याने तुला वर काढलं पाहिजे असं आम्हाला वाटलं म्हणून आम्ही येथे आलो. सर्व नश्वर आहे, राजा. तू तरी कुठे राहाणार आहेस ? हे राज्य तरी कुठे राहाणार आहे ? स्वस्थ शांत चित्ताने हे आत्मस्वरूपाचं चिंतन करून, द्वैत सगळं मिथ्या आहे आणि सत्यस्वरूप परमात्मा केवळ शाश्वत आहे हे लक्षात आलं म्हणजे शांती प्राप्त होते.'' नारदांनी त्याला मंत्रदीक्षा दिलेली आहे. या मंत्रजपाने भगवान संकर्षण शेषांचं दर्शन तुला होईल आणि तू कृतार्थ होशील असं सांगितलं. त्याच्या मनातील शोक दूर करण्याकरता नारदांनी आणखी एक घटना त्याला दाखवली. त्या मुलांच प्रेत तिथे पडलेलं होतं. तिथं नारदऋषि गेले आणि त्या जीवात्म्याला त्यांनी हाक मारली.

जीवात्मन् पश्य भद्रं ते मातरं पितरं च ते ।
सुहृदो बान्धवास्तप्ता: शुचा त्वत्कृतया भृशम् ।। ६.१६.२ ।। श्री. भा.

अरे जीवात्म्या, तू या शरीरातून निघून गेल्यामुळे सगळ्या तुझ्या आप्तबांधवांना दु:ख झालेलं आहे. ये, या शरीरामध्ये राहा, पुष्कळ राज्य, संपत्ति तुझ्या वाट्याला आलेली आहे. त्याचा उपभोग घे. नारदांनी आवाहन केल्याबरोबर तो जीवात्मा त्या शरीरात आला आणि तो मुलगा उठून बसलेला आहे, जीव म्हणतोय, महाराज, कस्मिञ्जन्मन्यमी मह्यं पितरं मातरोऽभवन् ।

कर्मभिर्भ्राम्यमाणस्य देवतिर्यङ्नृयोनिषु ।। ६.१६.४ ।। श्री.भा.

हे माझे माता पिता कोणत्या जन्मात होते ? किती माझे जन्म झालेले आहेत. माझ्या कर्मानुसार मी सारखा या जन्म-मृत्यू चक्रात अडकलेलो आहे. किती माता झाल्या, किती पिता झाले त्यापैकी हे कोण आहेत मला काही आठवण नाही. मी आपला सारखा फिरतो आहे. सर्वही आपले संबंधी त्या जन्मापुरते होतात आणि पुन्हा निघून जातात आपल्या कर्माने. यांचा माझा काही संबंध नाही. उदासीन मी आहे. कर्माच्या स्वाधीन झालेलो, कर्मपरतंत्र मी आहे. असं सांगून

तो जीवात्मा त्या शरीरातून निघून गेलेला आहे. त्या राजाचाही शोक कमी झाला. हा जीवात्मा म्हणतोय ते खरं आहे, उगीच मी माझा मुलगा म्हणून शोक करतोय. चित्रकेतूने त्या मुलाचं और्ध्वदेहिक केलं. बाकीच्या राण्यांनीही आपण बालहत्या केल्याचं कबूल करून त्याच्या करता प्रायश्चितविधी केलेला आहे. नारद महर्षि निघून गेले. चित्रकेतू राजाने विचार केला, शेवटी तरी सोडूनचं जायचंय हे राज्य, अनायासे या महात्म्यांचा उपदेश झालेला आहे, आत्ताच त्याग केला पाहिजे. असं ठरवून तो राजा राज्यत्याग करून बाहेर पडला आणि कालिंदी नदीच्या तीरावर जाऊन तो तपश्चर्या करू लागलेला आहे. नारदमहर्षिंच्या कृपेमुळे आणि त्यांनी दिलेल्या मंत्राच्या सामर्थ्याने सात दिवसात तो राजा विद्याधरांचा अधिपती झालेला आहे. आणि काही दिवसांनी, उपासनेमुळे तो भगवान शेषांच्या समीप प्राप्त झालेला आहे. प्रसन्न आहेत भगवान शेषनारायण. त्यांचं दर्शन झाल्यावरच सगळी कर्मं संपून गेलेली आहेत. पुन्हा जन्म नाही. सर्व पापक्षय झालेला आहे. अंत:करण निर्मळ झालेलं आहे. नेत्रातून प्रेमाश्रू वाहताहेत. त्याने साष्टंग नमस्कार केलेला आहे. आणि स्तुति करतोय,

अजित जित: सममतिभि:
साधुभिर्भवान् जितात्मभिर्भवता ।
विजितास्तेऽपि च भजतां
अकामात्मतां य आत्मदोऽतिकरुण: ।। ६.१६.३४ श्री.भा.

भगवन् आपण अजित आहात. पण समबुद्धि झालेले, इंद्रियनिग्रह केलेले, मनोनिग्रह केलेले, आपलं अखंड चिंतन करणारे असे जे साधूजन आहेत त्यांनी आपल्याला जिंकलेलं आहे. आपलं स्वातंत्र्य राहिलं नाही. आणि आपणही त्यांना जिंकलेलं आहे. तेही आपली इच्छा असेल तसे राहातात. त्यांच्या अंत:करणात कोणतीही वासना राहिली नाही. आपण त्यांना आत्मस्वरूप देऊन टाकलेलं आहे. अत्यंत दयाळू आपण आहात. शेष भगवान म्हणताहेत, ''हे चित्रकेतू राजा, तू सिद्ध झालेला आहेस. भक्तिमुळे तुझं अंत:करण शुद्ध झालेलं आहे. आता सर्व ठिकाणी माझी व्याप्ती कशी आहे हे तुला समजून येईल. नारदांच्या कृपेने माझ्यापर्यंत येऊन तू पोचलेला आहेस. कोणताही संकल्प जीवात्म्याने करू नये. संकल्प केला की त्याच्याकरता प्रयत्न आले, आणि कितीही प्रयत्न केले तरी शेवटी दु:खच आहे. म्हणून जितक्या इच्छा कमी कमी होतील तितकी चित्ताला शांती प्राप्त होते आहे.

संकल्पात् विरमेत् कविः ।।६.१६.५९।। श्री.भा.

कोणतीही वासना मनामध्ये ठेऊ नये. आपल्याला सुख मिळावं, सर्वही दुःखं आपली दूर व्हावीत म्हणून सर्व स्त्री–पुरुष प्रयत्न करताहेत. जगाचा व्यवहार हा असा आहे. पण त्यांच्या प्रयत्नानंतरही दुःखं जात नाहीत आणि पाहिजे तितकी सुखं मिळत नाहीत, हा ही विचार मनुष्याने करायला पाहिजे आणि व्यावहारिक प्रयत्न मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करावा. श्रद्धेने उपासना तू कर. ज्ञान, विज्ञान तुला प्राप्त होईल आणि तू मुक्त होशील.'' असं सांगून भगवान गुप्त झालेले आहेत. तो विद्याधरांचा अधिपती चित्रकेतू त्याला दिव्य विमान भगवंताच्या कृपेने मिळालेलं आहे, त्याच्यात बसून तो सर्वत्र संचार करतो आहे. लक्षावधी वर्ष गेली तरी सामर्थ्य कायम आहे. सर्व ऋषिमंडळी सुद्धा त्याची स्तुति करताहेत. मोठा योगी महात्मा आहे. संचार करत असताना एकदा तो कैलास पर्वतावर आलेला आहे. त्याठिकाणी महादेव बसलेले आहेत. ऋषिमंडळी आहेत. देवमंडळी आहेत. पार्वतीमाता शंकरांच्या अगदी जवळ मांडीला मांडी लावून बसलेली आहे. चित्रकेतूने विमानातून ते पाहिलं आणि तो हसायला लागला. काय म्हणाला, हे महादेव म्हणवतात, सर्वांना मार्गदर्शन करतात आणि या भर सभेमधे इतक्या जवळ स्त्रीला घेऊन बसतात ? सामान्य लोकसुद्धा असं करणार नाहीत. भगवान शंकरांनी त्यांची ती वाणी ऐकली पण ते काही बोलले नाहीत. पूर्ण ज्ञानसंपन्न ते आहेत. त्यांना काही राग आला नाही. पार्वतीला मात्र राग आलेला आहे. ती म्हणाली, ''आम्हाला शिकवणारा हा आज कोण आला आहे ? इथे बसलेल्या ऋषिमंडळींना काय कळत नाही हे ? हे कोणी महादेवांची निंदा करत नाहीत आणि आज हा कोण नविन आला आहे ? भगवंताचा भक्त म्हणवतो आहे आणि श्रेष्ठ महात्म्यांचा उपहास करतो आहे ? तू या तुझ्या पापकर्मामुळे राक्षसजन्माला जाशील'' असा शाप पार्वतीमातेने त्याला दिलेला आहे. तो लगेच विमानातून खाली उतरला. पार्वतीच्या चरणावर त्याने मस्तक ठेवलं आणि आपल्या अपराधाची क्षमा मागीतली. इतके जन्म झाले, अजून एक जन्म दैत्याचा आला तर आला असा विचार करून तो चित्रकेतू राजा न रागावता विमानामध्ये बसून निघून गेला. भगवान शंकरांनी पार्वतीला सांगीतलं, ''पार्वती, हा केवढा मोठा आहे तुला माहिती नाही ? तुला राग यायचं काय कारण होतं ? तो मला बोलला होता. तुला राग येण्याचं आणि शाप देण्याचं काय कारण आहे ? असं करत जाऊ नकोस. एवढ्या मोठ्या भगवद्भक्ताला तू शाप दिलास ! भगवंताने याची क्षमा करावी अशी प्रार्थना आहे.'' अविवेक उपयोगी नाही, वासुदेवाची भक्ति करणारे जे आहेत ते कुणालाही बोलू शकतात. त्यांना कुणाचीही भिती वाटत नाही. ते निर्भय असतात.

तेव्हा असा तू विचार कर आणि अशा महात्म्यांच्याबद्दल मनामधे राग येऊ नये असा प्रयत्न कर.'' तो चित्रकेतू पार्वतीलाही शाप द्यायला समर्थ होता परंतु त्याने राग आवरलेला आहे. शुक सांगताहेत, ''हे परीक्षित राजा, तो विद्याधर चित्रकेतू राजा पार्वतीच्या शापाने दक्षिणाग्नीतून उत्पन्न होऊन दानव झालेला आहे. वृत्रासुर नावाने तो ओळखला गेला. महान भगवद्भक्त असल्यामुळे असुर योनी प्राप्त होऊन सुद्धा त्याचं ज्ञान, भक्ति हे कायम राहिलेलं आहे. महान विष्णुभक्तांचही माहात्म्य याच्यावरून कळून येतं. श्रद्धेने याचं श्रवण करणारा जो आहे तो सर्व पातकांपासून मुक्त होतो. अशा रितीने हे सर्व चरित्र शुकाचार्य महाराजांनी परीक्षित राजाला कथन केलेलं आहे.

कश्यपांची पत्नी दिती ही एकदा विशेष हेतूने कश्यपांची सेवा करू लागली. आपल्याला पतीपासून वर प्राप्त व्हावा अशी तिची इच्छा होती. अन्न नाही, पाणी नाही अशा अवस्थेत ती तप करत असताना कश्यप प्रसन्न झाले आणि वर माग म्हणून सांगीतलं. तिने 'इंद्राला मारणारा मुलगा मला व्हावा' असा वर मागीतला. आता हे मोठं धर्मसंकट आलं. इंद्रही कश्यपांचाच मुलगा. आता काय करायचं ? त्यांनी दितीला सांगीतलं, तुझी इच्छा पूर्ण होईल. पण त्याकरता मी सांगतो ते व्रत तुला एक वर्षपर्यंत करावं लागेल. सर्व कामना पूर्ण करणारं हे व्रत आहे. लक्ष्मीनारायणाची सेवा तुला वर्षभर करावी लागेल. सर्व नियम पाळून जर तू हे व्रत केलंस तर तुला तुझ्या इच्छेप्रमाणे मुलगा होईल. त्याच्यामधे काही न्यूनता आली, काही चुकलं तर तो मुलगा देवांचा बंधू होईल, हे ही सांगून ठेवतो. दितीने कश्यपांच्या सांगण्याप्रमाणे व्रताचरण सुरू केलं. इंद्राला ही बातमी समजली. आपली मावशी आपला जीव घेणार आहे. इंद्र वेषांतर करून सेवक म्हणून त्या आश्रमात येऊन राहीला. सगळी कामं तो करतोय. एके दिवशी सायंकाळच्या वेळेला ती दिती दमून झोपलेली होती. कश्यपांनी सांगीतलं होतं, सायंकाळी निजायचं नाही. इंद्राने आपल्या योगसामर्थ्याने तिच्या उदरामधे प्रवेश केला आणि त्या गर्भाचे सात तुकडे केले. पण त्या गर्भाला मृत्यू आला नाही. पुन्हा इंद्राने आपल्या वज्राने त्या सात तुकड्यांचे प्रत्येकी सात तुकडे केले. असे ते एकंदर एकोणपन्नास मरुद्गण त्यावेळी जन्माला आलेले आहेत. दितीही जागी झाली. ती विचार करतीय, ही इतकी मुलं कशी झाली. तो इंद्रही आपल्या खऱ्या स्वरूपात तिथे प्रकट झाली. तिने इंद्रालाच खर खोटं काय ते विचारलं. इंद्राने सांगीतलं, ''मला माझ्या प्राणाची भिती असल्यामुळे मी येथे सेवक म्हणून येऊन राहिलो आणि आज तुमच्या हातून व्रताचा नियमभंग झाल्यामुळे मीच त्यांचे एकोणपन्नास तुकडे केले. परंतु तुमच्या पुण्याईमळे या जीवांना मृत्यू आला नाही.'' दितीने सांगीतलं, ''हे तुझे बंधूच आहेत आता. यांना आता स्वर्गलोकाला तू घेऊन जा.'' त्याप्रमाणे इंद्र

त्या मरूद्गणांना घेऊन स्वर्गलोकाला निघून गेला. इच्छा जरी झाली तरी ती इच्छा सात्विक पाहिजे. सात्विक वासना पाहिजे. वस्तुत: सात्विक वासनाही जायला पाहिजे शेवटी, पण निदान सुरवातीला सात्विक वासनेमुळे राजस, तामस वासना कमी होऊ शकतात.

परीक्षित राजा विचारतोय शुकाचार्यांना, ''महाराज, भगवान श्रीहरी हे पक्षपाती दिसताहेत, इंद्रादिक देवांचा पक्ष घ्यायचा आणि अवतार घेऊन दैत्यांना मारायचं हे सामान्य माणसासारखंच झालं !

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रिय: ।।९.२९ ।। भ.गी.

सांगताहेत एक आणि वागताहेत एक. मला शत्रु, मित्र कुणी नाही म्हणतात आणि देवांचं संरक्षण करण्याकरता दैत्यांना मारतात हे काय आहे ? नारायणाच्या गुणाबद्दल मला संशय उत्पन्न झाला आहे ! ही विषम बुद्धि ईश्वराची कशी झाली ?'' शुकाचार्य सांगताहेत, ''परमात्मा हा सम आहे. सर्वत्र समबुद्धी आहे हे कळण्याकरता एक पूर्वीचा इतिहास तुला सांगतो. धर्मराजाच्या राजसूय यज्ञात, शिशुपालाने श्रीकृष्णांची निर्भत्सना केल्यावर, श्रीकृष्णांनी त्याचा शिरच्छेद केला. त्याच्या शरीरातून तेज बाहेर पडून ते कृष्णशरीरामध्ये विलीन होऊन गेले. हे पाहून धर्मराजाला आश्चर्य वाटलं. त्याने नारदांना विचारलं, ''नारदमहर्षि, हा शिशुपाल नभघोषाचा मुलगा, जन्माला आल्यापासून कृष्णांचा द्वेष करतो आहे. शिशुपाल आणि दंतवक्र दोघेही कृष्णाचा द्वेष करत. असं असताना निरंतर ईश्वरनिंदा करणारा हा पापी मनुष्य खरं म्हणजे नरकाला जायला पाहिजे. पण नरक राहिला बाजूला, याला तर श्रीकृष्णांची सायुज्यमुक्ति मिळाली, कृष्णरूप हा होऊन गेला, हे कसं काय ? पाप आणि पुण्याची काही कल्पनाच करता येत नाही. नारद सांगताहेत, ''

निन्दनस्तवसत्कारन्यक्कारार्थं कलेवरम् ।
प्रधानपरयो राजन् अविवेकेन कल्पितम् ।।७.१.२२ ।। श्री. भा.

हे शरीर जे आहे, ह्या शरीरात आलेला जीवात्मा कुणाचा शत्रू होतो, मित्र होतो. मान, अपमान सगळं ह्या शरीराच्या माध्यमाने होतं. प्रधान आणि परमात्मा यांचा अविवेक झाल्यामुळे हे शरीर निर्माण झालेलं आहे. आणि या शरीरात आल्यानंतर पाप घडतं, पुण्य घडतं हे कार्य चाललेलं आहे. म्हणून मानव शरीर मिळाल्यानंतर भगवंताची भक्ति करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. निर्वैर अंत:करण झालं पाहिजे. प्रेम निर्माण झालं पाहिजे. भक्तियोग हा श्रेष्ठ आहे पण

या शिशुपालाच्या उदाहरणावरून असं दिसतंय ही ईश्वराचं वैर करणारा सुद्धा मुक्त होतो. द्वेषामुळे त्याच्या मनामधे सतत परमेश्वर आहे. त्यामुळे हा शिशुपाल मुक्त झालेला आहे. द्वेषामुळे त्याचं अंतःकरण कृष्णाशी तन्मय झालेलं आहे. शिशुपाल आणि दंतवक्र, मामेभाऊच होते कृष्णांचे, पूर्वजन्मात मोठे विष्णुभक्त होते, ब्राह्मणांच्या शापाने या जन्मात आल्यानंतर भगवंताने त्यांना मुक्त केलेलं आहे. भक्तांचा उद्धारच भगवंताने केलेला आहे, त्यांचा नाश करून. धर्मराजाने विष्णुभक्तांना शाप कसा झाला, ते कसे जन्माला आले हे सर्व आम्हाला सांगा असं विचारल्यावर नारद ही कथा सांगताहेत. एकदा विष्णुलोकामधे, ब्रह्मदेवांचे मानसपुत्र सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार हे श्रीविष्णूंच्या दर्शनाकरता आले. पाच सहा वर्षांचच वय आहे त्यांचं पण ज्ञानी आहेत. ते आले दरवाजामधे, तिथे जय–विजय होते द्वारपाल. त्यांनी ब्रह्मपुत्रांना आत जायला प्रतिबंध केला. ब्रह्मकुमारही रागावले, त्यांनी सांगीतलं, ''तुम्ही विष्णुलोकात राहायला अपात्र आहात. रजोगुण, तमोगुणाचं इथं काही काम नाही. शुद्ध सत्वात्मक वैकुंठलोक आहे आणि तुमच्या मनात मात्र उच्चनीच भेदभाव आहे. तेव्हा तीन जन्म तुम्ही असुरयोनीत घ्याल.'' असा शाप त्यांनी दिलेला आहे. तीन जन्मानंतर तुम्ही परत याल असा उःशाप दिलेला आहे. ते दोघे पहिल्यांदा दितीच्या गर्भातून जन्माला आले. हिरण्यकश्यपू आणि हिरण्याक्ष नावाने, हिरण्यकश्यपूचा नाश नरसिंह अवतार धारण करून भगवंताने केला आणि पृथ्वीचा उद्धार करण्याच्या वेळेला वराहरूपाने हिरण्याक्षाचा नाश केला. ते दोघे दुसऱ्या जन्मात रावण आणि कुंभकर्ण झालेले आहेत. भगवान रामचंद्रांनी त्यांचा नाश केलेला आहे. तिसऱ्या जन्मात ते शिशुपाल आणि दंतवक्राच्या रूपाने जन्माला आले आणि भगवान श्रीकृष्णांच्याकडून उद्धार होऊन आता ते शापातून मुक्त झालेले आहेत आणि जय–विजय म्हणून वैकुंठलोकाला प्राप्त झालेले आहेत.

धर्मराज विचारताहेत, ''नारद ऋषे, हिरण्यकश्यपूने आपल्या मुलाचा द्वेष केला याला काय कारण आहे ?'' पित्याने मुलाचा द्वेष केला असं आत्तापर्यंत आम्ही ऐकलं नाही. फार तर प्रतिकूल वागणाऱ्या मुलाला काही शासन करावं इथपर्यंत ठीक आहे. पण आपल्या मुलाला मारायचा प्रयत्न त्याने केला याला काय कारण आहे ?'' नारद सांगतात, ''वराहअवतार घेऊन हिरण्याक्षाचा नाश भगवंताने केला. हिरण्यकश्यपू रागावलेला आहे. हरीने माझ्या भावाला मारलं, या हरीला मारलं पाहिजे. त्याच्या मनामधे हरीबद्दल वैरभाव निर्माण झाला. हरीस्वरूप त्याला माहिती नाहिये. हिरण्यकश्यपूने राक्षसांना सांगीतलं, 'हे सर्व ऋषि ईश्वरार्पण बुद्धिने आपलं कर्माचरण करताहेत. आपलं सर्व कर्मफल हे ईश्वराला अर्पण करत असल्यामुळे हा हरी बलवान

झालेला आहे तेव्हा तुम्ही पृथ्वीवर जाऊन सगळ्या ऋषिचं हे कर्म बंद पाडा. आश्रमांचा, यज्ञशाळांचा विध्वंस करा,' सर्व दैत्य त्या आज्ञेप्रमाणे सर्व सज्जनांना त्रास देऊ लागले. त्यानंतर हिरण्यकश्यपूने आपल्या मातेचं, हिरण्याक्षाच्या पत्नीचं, मुलांचं सांत्वन केलेलं आहे आणि तो तपश्चर्येसाठी बाहेर पडला.

अजरामरम् आत्मानं अप्रतिद्वन्द्वं एकराजं व्यधित्सत ।।७.३.१।। श्री.भा.

आपण अजरामर व्हावं, अजिंक्य व्हावं आणि सर्वांचं स्वामी व्हावं ही इच्छा धरून तो तपश्चर्येला गेलेला आहे. मंदार पर्वतावर गुहेमधे त्याची तपश्चर्या चाललेली आहे. वर हात केलेले आहेत, दृष्टी आकाशाकडे केलेली आहे आणि पायाच्या अंगठ्यावर उभा राहून तो तप करतोय. पुष्कळ काल गेलेला आहे. जटा वाढलेल्या आहेत. त्याच्या मस्तकातून अग्नि बाहेर पडलेला आहे. देवांना अत्यंत त्रास होऊ लागला. ते सर्व ब्रह्मदेवांकडे गेले आणि त्यांना विनंती केली की हिरण्यकश्यपूला काय वर पाहिजे तो द्या पण आम्हाला या संकटातून सोडवा, आम्हाला त्याच्या तपाचं तेज काही सहन होत नाही. देव सांगताहेत, आम्ही असं ऐकलंय की, ज्या ब्रह्मदेवांनी आपल्या तपाने सर्वोच्च स्थान मिळवलं आणि सर्व सृष्टी निर्माण केली त्या सृष्टीतले सगळे नियम बदलून टाकायचे असा संकल्प हिरण्यकश्यपूने केलेला आहे. ब्रह्मदेवांनी ज्यांना देव केलेलं आहे त्यांना दैत्य करायचं आणि ज्यांना दैत्य केलेलं आहे त्यांना देव करायचं. असा त्याचा संकल्प आहे. तुम्हाला सुद्धा भीती आहे, तेव्हा लवकर त्याचं तप बंद करा. ब्रह्मदेव आले हिरण्यकश्यपूजवळ. शरीराभोवती वारूळ वाढलेलं आहे. रक्त, मांस आटून गेलेलं आहे. मोठी तपश्चर्या आहे. ब्रह्मदेवांचही समाधान झालं. त्यांनी कमंडलूतील पाणी त्याच्या अंगावर टाकताच त्याला दिव्य शरीर प्राप्त झालेलं आहे. हिरण्यकश्यपूने ब्रह्मदेवांची स्तुति केली आणि काय पाहिजे, वर माग अस विचारल्यावर तो सांगतो आहे, ''आपण ज्या ज्या जीवांना उत्पन्न केलं आहे त्या कोणत्याही भूतापासून मला मृत्यू येऊ नये.'' अजून त्यात सुधारणा करतोय. आपली बुद्धि जास्ती जास्ती चालवली की असा घोटाळा होतो. घराच्या आत मृत्यू येऊ नये, घराच्या बाहेर मृत्यू येऊ नये. म्हणजे उंबऱ्यावर मारलं तरी चालतं हे त्यानेच कबूल केल्यासारखं झालं. दिवसा मृत्यू येऊ नये, रात्री मृत्यू येऊ नये, संध्याकाळी त्याचा नाश झालेला आहे. भूमीवर मृत्यू येऊ नये, अंतराळात येऊ नये. माणसापासून येऊ नये, पशूपासून येऊ नये. युद्धामधे मी अजिंक्य व्हावं, सर्वांवर माझं स्वामित्व असावं. सर्व इंद्रादिक लोकपालांचं सामर्थ्य मला प्राप्त व्हावं. असे वर त्याने मागीतले, अत्यंत दुर्लभ परंतु त्याने तपश्चर्याच तशी केली होती. ब्रह्मदेवांनी सांगीतलं, तुझी इच्छा पूर्ण होईल आणि ते अंतर्धान

पावले.

हिरण्यकश्यपूने श्रीहरीचा द्वेष करायला आरंभ केला. सर्व त्रैलोक्य जिंकलं त्याने, स्वर्गातून देवांना घालवून दिलं आणि स्वर्ग लोकात राहून तो राज्य करू लागला. महेंद्रभवनात जाऊन राहिलेला आहे. स्वर्गलोकात, मृत्यूलोकात सगळीकडे अनेक दैत्य त्याच्या हाताखाली आहेत. सर्व देवांनी, ऋषिंनी त्याची प्रार्थना करावी, त्याच्या मनाप्रमाणे वागावं असा काळ आलेला आहे. धनधान्याची समृद्धि आहे, काही कमी नाही. समुद्राने अनेक रत्नं त्याला अर्पण केली. असं त्याचं राज्य चाललेलं आहे पण कडक शासन आहे. इंद्रादिक लोकपाल भीतीने बाहेर पडलेले आहेत आणि संकटग्रस्त झाल्यामुळे ते श्रीहरींना शरण गेले. अन्नपाणी सोडून देऊन ते ध्यान करताहेत. आकाशवाणीच्या माध्यमातून भगवान त्यांना सांगताहेत, ''भिऊ नका देवहो. तुमचं कल्याण होईल. लवकरच त्या हिरण्यकश्यपूचा मी नाश करणार आहे. तोपर्यंत वाट पाहा. वेदांचा, देवांचा, गाईंचा, विप्रांचा, धर्माचा, सत्पुरुषांचा जो द्वेष करतो त्याचा नाश लवकर होतो. त्याचा मुलगा प्रल्हाद हा निर्वैर आहे. शांत आहे. मोठा भक्त आहे माझा. ज्यावेळेला हिरण्यकश्यपू प्रल्हादाचा द्वेष करायला लागेल त्यावेळी ब्रह्मदेवांनी कितीही वर याला दिले असले तरी मी याचा नाश करीन.''

दैत्यराज हिरण्यकश्यपूला चार मुलं होती. प्रल्हाद हा सगळ्यात लहान पण गुणांनी मोठा होता. त्याची सत्यप्रतिज्ञा आहे. कधीही खोटं बोलायचं नाही. इंद्रिय ताब्यामधे आहेत. अत्यंत नम्रपणाने श्रेष्ठ, गुरुजनांपाशी वागतो आहे. सर्वांशी प्रेमाने वागतो आहे. त्याच्या अंतःकरणामधे हरीभक्ति ही जन्मापासूनच आहे. कोणत्याही अवस्थेत, केव्हाही भगवंताचं स्मरण आहे. जेवायला बसलं असताना भगवंताचं स्मरण झालं की जेवण बंद होतंय. भावावस्थेमधे रडतो आहे, हसतो आहे, देहभान त्याला राहात नाहिये. अशा मुलाबद्दल त्या हिरण्यकश्यपूच्या मनामधे वैर निर्माण झालं. नारद सांगताहेत,

पौरोहित्याय भगवान् वृतः काव्यः किलासुरैः ।।७.५.१।। श्री. भा.

दैत्यांचे गुरू म्हणजे शुक्राचार्य. त्यांची मुलं म्हणजे शंड आणि अमर्क. हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला त्यांच्या स्वाधीनं केलं आणि त्याला सगळं शिकवायला सांगितलं. आणखीही पुष्कळ दैत्यांची मुलं त्यांच्याजवळ शिकण्याकरता राहिली होती. पण प्रल्हादाला काही त्या गुरूंनी शिकवलेलं पटेना ! त्यांनी सांगावं, तुम्ही दैत्य आहात, देव आपले शत्रू आहेत वगैरे पण प्रल्हादाला ते काही पटलं नाही. एकदा ते गुरु प्रल्हादाला घेऊन राजवाड्यामधे आले. हिरण्यकश्यपू सिंहासनावर

बसलेला होता. प्रल्हादाने आल्याबरोबर आपल्या पित्याला साष्टांग नमस्कार केला. त्याला उचलून हिरण्यकश्यपूने आपल्या मांडीवर घेतलं, आणि विचारलं, ''बाळ प्रल्हादा, तुला काय करावसं वाटतं ? तुझ्या मनाने अत्यंत योग्य असं तू काय ठरवलं आहेस ?'' लगेच प्रल्हादजी म्हणाले,

तत्साधु मन्येऽसुरवर्य देहिनां
सदा समुद्विग्नधियां असद्ग्रहात् ।
हित्वाऽऽत्मपातं गृहमन्धकूपं
वनं गतो यद् हरिमाश्रयेत् ।।७.५.५।। श्री.भा.

''राजेसाहेब, रागावू नका, पण माझ्या मनाने अत्यंत योग्य म्हणजे हरीभक्ति करावी. घरदार सोडून वनामधे जावं. हेच उत्तम आहे असं मला वाटतं. कारण घरात राहाणारे हे सगळे संसारी जीव नेहमी उद्विग्न असतात. त्यांच्या मनाचं पूर्ण समाधान झालेलं कधीही दिसत नाही. या असत्य, मिथ्या अशा प्रकारच्या विषयांमधे त्यांची बुद्धि गुंतून राहिलेली आहे. त्यांच्या मनाप्रमाणे सगळं त्यांना काही मिळत नाही आणि म्हणून ते नेहेमी दुःखी असतात. त्यामुळे हे सर्व सोडून देऊन, वनामधे जाऊन भगवान श्रीहरीची भक्ति करावी हे मला उत्तम वाटतं. हे माझं ध्येय आहे.'' पहिलीच भेट झाली प्रल्हादाची आणि तो म्हणतोय हरीची भक्ति करावी ?'' हिरण्यकश्यपू हसला. लहान मुलगा आहे म्हणाला. गुरुजींना सांगीतलं, ''गुरुजी तुम्ही लक्ष द्या बरं ! सगळी दैत्यांची मुलं तुमच्या ताब्यात आहेत. त्यांच्या मनात हे असले विचार उत्पन्न होऊ नयेत इकडं तुमचं लक्ष पाहिजे.'' गुरुजी प्रल्हादाला घेऊन घरी आले. त्याला विचारताहेत, ''का रे प्रल्हादा, हरीची भक्ति करावी असं तुला कोणी सांगीतलं ? दैत्यकुलामधे जन्माला येऊन अशी बुद्धि तुला कशी झाली ? हा तुझा बुद्धिभेद कोणी मुद्दामून येऊन केला आहे का तुला स्वतःलाच असं वाटतं ?'' प्रल्हादजी म्हणाले, ''गुरुजी, हा माझा आणि हा शत्रुपक्षाचा हे माझ्या मनामधे कधीही येत नाही. भगवंताच्या मायेचा हा प्रभाव आहे. भगवंताकडे ज्याचं लक्ष लागलं त्याच्या मनामधे हा भेद येत नाही. सर्वांचा आत्मा परमात्मा आहे. ब्रह्मादिक देवसुद्धा ज्याच्या आज्ञेचं पालन करताहेत, तो सर्वांतर्यामि भगवान श्रीहरी माझा बुद्धिभेद करतो आहे. माझं अंतःकरण त्याच्याकडे त्याच्या इच्छेने जातंय. माझ्या प्रयत्नानेही जात नाही किंवा दुसरा कोणीही मला सांगत नाही.'' असं उत्तर त्यानी दिलेलं आहे. पूर्ण ज्ञान आहे आणि भक्ति आहे. ज्ञानी भक्त आहे प्रल्हाद. ध्रुवही मोठाच आहे पण त्याच्या मनात ती वासना होती, अढळ पदाची त्यामुळे नंतर पश्चाताप होऊनही त्याला त्या ध्रुवपदावर जाऊन राहावं लागलं. प्रल्हादजी जन्मापासूनच ज्ञानी भक्त आहेत, निष्काम आहेत.

गुरुजींनी त्याला धाक दाखवण्याकरता इतर शिष्यांना सांगीतलं, ''कोण आहे रे तिकडे, ती छडी घेऊन या. आज याला शिक्षा करायची आहे. दैत्यांच्या चंदनासारख्या वंशात जन्माला येऊन हा कुळाच्या विरुद्ध बोलतो आहे ?'' रागावले, त्याला थोडी भीती दाखवली आणि पूर्वीप्रमाणे त्याला शिक्षण देण्याचं काम सुरू केलं. धर्म, अर्थ आणि काम. तीन पुरुषार्थच फक्त दैत्यांच्या समोर आहेत. मोक्षमार्गाचा विचारच नाहिये. कारण सगळं खरंय, जग सत्य आहे. आपण प्रयत्न करायचा आणि आपण सुख मिळवायचं. दुःख सुद्धा आपल्या प्रयत्नांनी दूर करायची एवढंच त्यांना माहिती आहे. सुख विनाशी आहे. असेना. पुन्हा प्रयत्न केला की पुन्हा मिळवू शकतो आम्ही. देवांना पुन्हा जिंकायचं, पुन्हा स्वर्ग मिळवायचा. याचा त्यांना कंटाळा येत नाही.

पुन्हा एकेदिवशी गुरुजी प्रल्हादाला घेऊन राजवाड्यामधे आले. आल्याबरोबर त्याने पित्याला साष्टांग नमस्कार केला. मातृदेवो भव, पितृदेवो भव हे सगळं त्यांच्या लक्षात आहे. हिरण्यकश्यपूने उचलून त्याला मांडीवर घेतलं आणि विचारलं, ''इतके दिवस तू गुरूजींकडे शिक्षण घेतलंस. तुझं उत्तम शिक्षण आजपर्यंत कुठलं झालं हे मला सांग.'' प्रल्हादजींना काही भीती नाही. ते म्हणाले, ''राजेसाहेब,

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ।।७.५.२३।। श्री. भा.
इति पुंसार्पिता विष्णौ भक्तिश्चेन्नवलक्षणा ।
क्रियते भगवत्यध्दा तन्मये अधीतमुत्तमम् ।।७.५.२४।। श्री.भा.

कोणता अभ्यास उत्तम आहे, सांगू पिताजी ! भगवान विष्णूंची नवविधा भक्ति करता आली पाहिजे. नऊही प्रकारची भक्ति करण्याकडे ज्यांचं लक्ष लागलेलं आहे ते मोठे भक्त आहेत. आणि ती सुद्धा ईश्वरार्पण बुद्धिने झाली पाहिजे. बुद्धिला प्रेरणा करणारा श्रीहरी आहे आणि त्याच्या इच्छेप्रमाणे माझ्याकडून ही भक्ति घडते आहे. जन्माला येऊन हे एवढंच शिकायचं आहे, तेवढंच मी शिकलो पिताजी.'' हिरण्यकश्यपू अतिशय रागावलेला आहे. माझ्या भावाला मारणारा, माझा शत्रू हरी आणि त्याची भक्ति माझा मुलगा करतोय ! तो त्या गुरुजींवर रागावला, ''का हो गुरुजी, हे काय माझ्या मुलाला शिकवलं तुम्ही ? तुम्हाला पूर्वी एकदा ताकीद केली होती. शत्रूपक्षाचे हेर याठिकाणी येत असतील. तुमचं लक्ष नाहिये. या मुलाची बुद्धि बिघडलेली आहे.'' त्या गुरुपुत्रांनी सांगीतलं, ''राजेसाहेब, रागावू नका, मी यांना काय शिकवणार ? तुम्ही बाकीच्या

मुलांना विचारा. त्याप्रमाणे यालाही मी शिकवलं. ही जी भगवद्भक्ति करावी अशी त्याची बुद्धि आहे ती नैसर्गिक आहे. जन्मापासून आहे.'' हिरण्यकश्यपूने मग प्रल्हादाला विचारलं,

वध्यतां आश्वयं वध्य: ।।।७.५.३४।। श्री. भा.

''हे तुला गुरुजींनी शिकवलं नाही ना ? मग ही तुला ईश्वराची भक्ति करायची अमंगल बुद्धि आली कुठून ?'' प्रल्हादजी म्हणाले, ''राजेसाहेब, भगवंताची भक्ति स्वत:च्या इच्छेने होत नाही किंवा दुसऱ्याच्या सांगण्यानेही होत नाही. घरामधे, इंद्रियांमधे, विषयांमधे ज्यांचं चित्त अडकलेलं आहे. मनावर, इंद्रियावर ज्यांचा ताबा नाही पुन:पुन्हा तेच विषय भोगायचे, पुन्हा तेच सुख घ्यायचं इकडं ज्यांचं लक्ष आहे त्यांची बुद्धि कृष्णभक्तिकडे जात नाही खरा स्वार्थही त्यांना समजत नाही. ईश्वराची भक्ति केल्यानंतर किती स्वार्थ सिद्ध होतो हे त्यांना समजत नाही. बाह्य विषयांकडेच त्यांचं लक्ष जातं. एका आंधळ्याच्या मागून त्याच्या खांद्यावर हात ठेऊन दुसरा आंधळा निघाला, तिसरा आंधळा निघाला तशी स्थिती या सर्व जगाची झालेली आहे. परमेश्वराची सेवा करण्याची बुद्धि त्यांना कधीही उत्पन्न होणार नाही. श्रेष्ठ भगवद्भक्तांची संगती झाली, त्यांचा अनुग्रह झाला तरच भगवद्भक्ति चित्तामधे उत्पन्न होते.'' अतिशय रागावला हिरण्यकश्यपू आणि त्याने प्रल्हादाला समोरच्या चौकात फेकून दिलेलं आहे. राक्षसांना आज्ञा केली,

वध्यतां आश्वयं वध्य: ।।७.५.३४।। श्री. भा.

राक्षसहो, याला ठार मारा. माझ्या बंधूचा ज्याने नाश केला, आपल्या चुलत्याला ज्याने मारलं त्याची भक्ति हा करतोय ! हा आमच्या विरुद्ध वागणारा आमचा नाहिये. केवढा अहंकार आहे ! पुत्रप्रेम आहे पण तीव्र अहंकाराने व्याप्त झाल्यामुळे मुलाचं प्रेम निघून गेलेलं आहे. पाच वर्षाचं हे कार्टं, आमच्या प्रेमाची जर याला कदर नाही तर आम्हालाही याची जरूर नाही, याला मारून टाका म्हणाला. वाटेल ते उपाय करा. ते सर्व राक्षसच आहेत. दया वगैरे काही त्यांच्याजवळ नाहिये. त्रिशूल, खड्ग, वगैरे शस्त्रं आहेत आणि आता स्वामीची आज्ञा झालेली आहे. ते दैत्य धावत आले आणि त्यांनी प्रल्हादाच्या अंगावर तलवारीने गदेने, त्रिशूलाने, भाल्यांनी प्रहार करायला सुरवात केली.

परे ब्रह्मणि अनिर्देश्ये भगवत्यखिलात्मनि ।
युक्तात्मनि अफला आसन् अपुण्यस्येव सत्क्रिया: ।। ७.५.४१ ।। श्री.भा.

प्रल्हादजींचं परमात्मस्मरण अखंड चाललेलं आहे. मृत्यूची भीती नाही मग हिरण्यकश्यपूची कसली भीती ? इतके शस्त्रप्रहार होऊन केसालाही धक्का लागला नाही. शेवटी दैत्य दमले परंतु प्रल्हादाचा नाश झाला नाही. प्रल्हादजी उठून बसलेले आहेत. ईश्वराचं अखंड नामस्मरण चाललेलं आहे.

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव ।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ । मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।।

त्रैलोक्यधिपती असलेला दैत्यराज, कुणीही त्याची आज्ञा आजपर्यंत उल्लंघीली नाही त्याला आपण शस्त्रप्रहाराने प्रल्हादाचा नाश करू शकू असं वाटत होतं. पण प्रल्दादावर काहीही परिणाम झालेला नाही. आपल्या शक्तिपेक्षा मोठी शक्ति कुठली आहे काय ? अशी थोडीशी जाणीव त्याच्या मनामधे झाली. पण ती टिकली नाही. श्रीमंत, अहंकारी पुरुषांना सद्‌बुद्धि होते पण ती टिकत नाही. लगेच त्या गुरुपुत्रांनी येऊन सांगीतलं, ''राजेसाहेब, चिंता कशाला करता आपण. सगळं त्रैलोक्य आपण जिंकलेलं आहे. हा लहान बालक काय करणार आहे ? शुक्राचार्य महाराज थोड्याच दिवसात येतील ते आले की आपण पुढील उपाययोजना करू. ह्याला वरुणपाशामधे बांधून ठेवा. हिरण्यकश्यपूने सांगीतलं, ''ह्याला तुमच्याच वाड्यामधे घेऊन चला. माझ्या डोळ्यासमोर नको हा. काहीतरी पाहा उपदेश करून. याची बुद्धि बदला.'' प्रल्हादजी नम्र आहेत. पित्यावरही रागावले नाहीत आणि गुरुजींवरही रागावले नाहीत. पण त्यांचं शिक्षण मात्र पसंत नाही. ईश्वरभक्तिकडे यांचं लक्ष नाही हे पाहून त्यांना विषाद वाटायचा. एके दिवशी गुरुजी काही कामाकरता बाहेर गेले असताना, सर्व मुले खेळण्याकरता बाहेर पडली. प्रल्हादजींच्या मनामधे दया उत्पन्न झाली. कित्ती जन्म घेताहेत म्हणाले आणि पुन्हा खेळण्याकडे लक्ष आहे ? त्यांना काहीतरी मार्गदर्शन करावं, त्यांचा उद्धार व्हावा या हेतूने प्रल्हादजी सांगताहेत, ''मित्रहो माझ्याजवळ येऊन बसा. तुम्हाला काही सांगाचयंय.'' सगळ्या मुलांना प्रल्हादजींबद्दल शस्त्रप्रहाराचा काहीही परिणाम झाला नाही हे पाहून भीतीने का होईना आदर उत्पन्न झाला. सर्व मुलं येऊन बसली आणि प्रल्हादजी त्यांना उपदेश करताहेत, हरीभक्तीचं माहात्म्य त्यांना सांगितलं, आत्मानात्मविवेक सांगितला आणि हरीभक्ति तुम्ही करा असं त्यांनी सांगितलं. नंतर करायची ही गोष्ट नाही.

कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान् भागवतान् इह ।
दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ।। ७.६.१ ।। श्री.भा.

हा मनुष्यजन्म अत्यंत दुर्लभ आहे. तुम्ही असावध राहू नका. हे शरीर केव्हा पडेल सांगता येत नाही परंतु परमपुरुषार्थ मोक्ष देण्याचं सामर्थ्य या शरीरामधे आहे.

मी मातेच्या उदरामधे होतो. इंद्र माझ्या मातेला स्वर्ग लोकाला घेऊन जाऊ लागला. ती घाबरली तेवढ्यात नारद महर्षि तिथे आले आणि त्यांनी इंद्राला विचारलं, ''का रे, हिरण्यकश्यपू तुमचा शत्रू आहे. या स्त्रीने तुझं काय केलं आहे ? हिला कशाला धरलंस. हिला सोडून दे.'' इंद्राने सांगितलं, ''ऋषिमहाराज, ही गर्भिणी आहे. हिच्या उदरामधे दैत्यांचा गर्भ आहे. ही प्रसूत होईस्तवर मी हिला स्वर्गलोकात ठेवणार आहे आणि प्रसूत झाल्यावर त्या अपत्याला मारून मग हिला सोडणार आहे.'' देवांचा राजा इंद्र त्याचे हे विचार आहेत. कुणीही असला तरी स्वार्थापुढे काहीही सुचत नाही. सद्विचार कोणाच्या मनात येतील, दुर्विचार कोणाच्या मनात येतील काही सांगता येत नाही. नारद म्हणाले, ''इंद्रा, हा कोण आहे तुला माहिती आहे का ? अत्यंत पुण्यशील असा भगवंताचा भक्त आहे हा. याचा तू नाश करू शकणार नाहीस. सोडून दे या स्त्रीला.'' देवर्षिंची आज्ञा झाली. माझ्या मातेला सोडून दिलं इंद्राने आणि नारदांना प्रदक्षिणा, नमस्कार करून तो स्वर्ग लोकाला निघून गेला. नारदमुनी माझ्या मातेला घेऊन आश्रमात आले आणि तिला सांगीतलं, ''बाई, आनंदाने, निर्भयपणाने तू येथे राहा. तुझा पती परत आल्यानंतर तू स्वग्रही जा.'' माझी माता तिथे निर्भयपणाने नारदांची सेवा करत राहिलेली आहे. ऋषिसेवा करत असताना नारदांनी माझ्या मातेला उपदेश केला आणि तिच्या माध्यमातून मलाच तो उपदेश केला. त्यांना दया उत्पन्न झाली की हा जीवात्मा, ही स्त्री माझ्या आश्रयाला आलेले आहेत. यांच हित यांना सांगीतलं पाहिजे. अज्ञान बंधनातून हे मुक्त झाले पाहिजेत. नारदांनी मला आत्मानात्मविवेक शिकवला. आत्मा नित्य आहे, अविनाशी आहे, शुद्ध आहे, स्वयंप्रकाश आहे बाकी सगळे शरीरादिक जे पदार्थ आहेत ते विनाशी आहेत. जागृति स्वप्न, सुषुप्ती या अवस्थातून जावं लागतं जीवाला. आणि या अवस्थांना साक्षी असणारा जो आहे तोच परमात्मा आहे आणि तोच मी आहे हे ज्ञान शेवटी झालं पाहिजे.

गुरुशुश्रूषया भः्त्या सर्वलब्धार्पणेन च ।
सङ्गेन साधुभक्तानां ईश्वराराधनेन च ।।७.७.३० ।। श्री.भा.

गुरूसेवा करावी. जे काही आपल्याला मिळालेलं आहे ते सगळं ईश्वराला अर्पण करावं. श्रेष्ठ भगवद्भक्तांची संगती करावी भगवद्कथा श्रद्धेने श्रवण कराव्यात, वर्णन कराव्यात, निरंतर

त्याच्या रूपाचं चिंतन करावं. सर्वठिकाणी परमेश्वर आहे ही भावना ठेऊन, सर्वांच्याबद्दल आदरबुद्धि ठेवावी. अशी वासुदेवाची भक्ति करणारा जो आहे तो त्याच्या कृपेने अज्ञानबंधनातून मुक्त होतो. अंतःकरणामधे ही भक्ति जशी जशी वाढत जाते तसं देहभान हरपतं, प्रेमाश्रू डोळ्यातून वाहातात, नाचतो काय, गातो काय, काही भान त्याला राहात नाही, ही श्रेष्ठ अवस्था आहे. संपत्ती आहे, नोकरचाकर आहेत, स्त्री–पुत्र आहेत पण त्यांच्यापासून काय सुख मिळणार ? फाशी द्यायला माणसाला घेऊन जाताना त्याला उत्तम खायला प्यायला दिलं, संपत्ती दिली त्याचा उपयोग काय आहे. त्याला काय त्याच्यात आनंद वाटणार आहे ? मी जाणार आहे, नश्वर आहे ही वृत्ति बाणल्यानंतर बाहेरची कितीही सुखाची साधनं असली तरी त्याकडे लक्ष जात नाही त्याचप्रमाणे यज्ञयाग करून मिळवलेले स्वर्गादिक लोकसुद्धा विनाशी आहेत. एकमेकांपेक्षा कमीजास्तीपणा त्याठिकाणीही आहे. म्हणून कोणत्याही सुखाची इच्छा करू नये. फक्त भगवंताची भक्ति करावी, त्याची कृपा संपादन करण्याकरता निरंतर प्रार्थना करावी. सर्व भूतांचा अंतर्यामी श्रीहरी आहे, सर्वव्यापी आहे, सर्वज्ञ आहे. देव असो, दैत्य, मनुष्य, गंधर्व कोणीही त्याची सेवा केली की त्याचं कल्याण होतेय. भगवंताला दान नको, तप नको. पूजा नको, सेवा नको

प्रीयते अमलया भःत्या हरिः अन्यद् विडम्बनम् ।। ७.७.५२ ।। श्री.भा. ।

शुद्ध प्रेम त्याला पाहिजे. रामचंद्र वनात येणार आहेत हे कळल्यावर ती मातंग ऋषिंची शिष्या शबरी रानामधे बोरं गोळा करते आहे. झाडावरनं बोरं काढायची आणि थोडी खाऊन बघायची, आंबट नाहीत ना ! मग द्रोणामधे तिने ठेवावीत. प्रभूला आंबट बोरं कशी देणार ? रामचंद्र आल्यावर विनंती केली, ''प्रभो, ही बोरं आपल्याकरता आणली आहेत. आपण घ्या.'' लक्ष्मणही पाहताहेत. ; प्रत्येक फळावर दात उठलेले आहेत ! रामांच्या मनामधे काहीही शंका नाही. त्यांनी बोरं घेतली आणि खायला सुरवात केली. भक्त जर सर्व विसरून गेलाय तर आपल्याला सर्व विसरायला नको का ! उष्टी बोरं हा विचारसुद्धा रामांच्या मनात नाहिये. केवल त्या शुद्ध भक्तिला भगवंत भुललेला आहे. म्हणून मित्रांनो, तुम्ही श्रीहरीची भक्ति करा. आजपर्यंत अनेक भक्त होऊन गेलेले आहेत. मनुष्य जन्माला येऊन हेच मिळवायचं आहे. आत्मानात्म विचार प्रल्हादजींनी मांडला, भगवद्भक्तिचं महात्म्य सांगीतलं, आणि बालमन आहे, शुद्ध आहे. त्या सगळ्याही मुलांच्या मनावर परिणाम झाला आणि हरीभजन ते सर्व करायला लागले. गुरुजी बाहेरून आले आणि त्यांना हे विलक्षण दृश्य दिसलं. आत्तापर्यंत एकटेप्रल्हादजीच भजन करायचे, तिकडे हे लक्ष द्यायचे नाहीत. आज सर्व शाळाच भजन करायला लागली.'

हिरण्यकश्यपूने आज्ञा केली, ''आणा प्रल्हादाला'' प्रल्हादजी आले, नमस्कार करून उभे राहिले. हिरण्यकश्यपूने ठरवलं, आज मुलाला मारायचं. तो विचारतोय, ''अरे प्रल्हादा आपल्या कुळाचा नाश करतोस ? हरीभक्ति करून सगळ्यांना करायला लावतोस ? माझी आज्ञा तुला मान्य नाहीतर, तुलाही मी जिवंत ठेवणार नाही. मी रागावलेलो असताना सगळ्या त्रैलोक्यातले लोक मला घाबरतात आणि तुला माझी भीती वाटत नाही ? तुझ्याजवळ कोणाचं बल आहे ? कुणामुळे तू इतका निर्भय झालेला आहेस ?'' प्रल्हादजीही मोठे स्पष्टवक्ते होते,

न केवलं मे भवतश्च राजन्
स वै बलं बलिनां चापरेषाम् ।
परेऽवरेमी स्थिरजङ्गमा ये
ब्रह्मादयो येन वशं प्रणीताः ।।७.८.८।। श्री.भा.

''राजेसाहेब, माझ्याजवळ कुणाचं बल आहे असं तुम्ही विचारता आहेत. तुमच्याजवळ कुणाचं बल आहे हा विचार तुम्ही केला काय ? तुमचंही बल तुमचं नाहियेे. सर्व बल हे त्या परमेश्वराचं आहे. ब्रह्मादिक देव ज्याच्या ताब्यात आहेत त्याचं बल हे सामान्य नाहिये. तोच परमात्मा सर्व विश्वाचं नियमन करणारा आहे. राजेसाहेब, ही आसुरी वृत्ति तुम्ही टाकून द्या. मन शांत ठेवा. काय जिंकलं आपण ? स्वतःचं मन तुम्हाला ताब्यात ठेवता येत नाही. आणि त्रैलोक्य जिंकलं म्हणून सांगता ? हे चांगलं नाही. तुम्ही आपल्या मनाला आवरा. मनाचे विकार सोडून द्या.'' असं बोलले प्रल्हादजी पण उपयोग काय ? हिरण्यकश्यपू म्हणाला, ''तुझं मरण जवळ आलेलं आहे असं दिसतंय, मलाच उपदेश करतो आहेस तू ! तुझं संरक्षण करणारा हरी कुठे आहे ?'' प्रल्हादजी म्हणाले, ''सर्व ठिकाणी आहे.'' हिरण्यकश्यपू म्हणाला, ''या खांबात का दिसत नाही ?'' प्रल्हादजी म्हणाले, ''आहे, त्या खांबातही परमात्मा आहे. तुम्हाला दिसत नाही त्याला काय करायचं ? सिंहासनावरून हिरण्यकश्यपू उठला आणि त्या खांबाजवळ येऊन जोराने मुष्टीप्रहार त्याने केलेला आहे. बघू या म्हणाला, तुझा हरी कुठे आहे. एकदम भयंकर गर्जना ऐकायला आली, सभेमधले सगळे लोक घाबरले, कुठून हा आवाज आला काही कळलं नाही.

सत्य विधातुं निजभृत्यभाषितं
व्याप्तिं च भूतेष्वखिलेषु चात्मनः ।



अदृश्यतात्यद्भुतरूपमुद्वहन्
स्तम्भे सभायां न मृगं न
मानुषम् ।।७.८.१८।। श्री.भा.

आपला भक्त प्रल्हाद याची सर्वठिकाणी परमात्मा आहे अशी भावना आहे आणि तो सांगतो आहे की या स्तंभामधेसुद्धा माझा हरी आहे. त्याचं भाषण खरं करण्याकरता, आणि त्याच्या संरक्षणाकरता एकदम तो स्तंभ दुभंगला आणि त्यातून नरसिंह प्रगटझालेले आहेत. शरीर माणसाचं आणि मुख सिंहाचं असं रूप धारण करून श्रीहरी आलेले आहेत. हिरण्यकश्यपू पाहातो आहे ते भयंकर रूप. डोळे लाल झालेले आहेत, केस पसरलेले आहेत, मोठ्या दाढा आहेत. कान मोठे झालेले आहेत. हिरण्यकश्यपूच्या लक्षात आलं की आपला नाश करण्याकरता हरीने हे रूप धारण केलेलं आहे. एकदम तो धावून गेला नरसिंहाच्या अंगावर. त्यांनी धरलं त्याला पण तो त्यांच्या हातातून सुटलेला आहे. सर्व देवांना आश्चर्य वाटलं की नरसिंहाच्या हातातून हा कसा काय सुटला ? तलवार, ढाल घेऊन तो नरसिंहाना मारण्याकरता धाऊन गेला असताना, त्यांनी धरलं त्याला. संध्याकाळची वेळ होती. दिवसा मृत्यू नको, रात्री नको. ते ब्रह्मदेवांचे वर सगळे खरे करायला पाहिजेत ना ! नियमभंग करून मारायचं नाही. संयम आहे. घराच्या आत मृत्यू नको, बाहेर नको, हे उंबऱ्यामधे येऊन बसले. जमिनीवरती मृत्यू नको, अंतरीक्षात मृत्यू नको, त्याला आपल्या मांडीवर घेतलेलं आहे. शस्त्राने मृत्यू नको, अस्त्राने मृत्यू नको, आपल्या नखांनी त्याचं पोट फाडून टाकलं, त्याची आतडी गळ्यामधे अडकवली आणि ते शरीर फेकून दिलेलं आहे.

हिरण्यकश्यपूचा नाश झाल्यावर सर्व देवांनी पुष्प वृष्टी केली आणि भगवंताची पुष्कळ स्तुति केलेली आहे. शंकर भगवान आहेत, ब्रह्मदेव आहेत, सगळ्यांनी ईश्वर स्तुति केलेली आहे. नरसिंह हे सिंहासनावर जाऊन बसले. अत्यंत क्रोधायमान झालेल्या त्यांच्याजवळ जाण्याचं धैर्य कुणाचंच नाहिये. लांबूनच सगळे स्तुति करताहेत. देवाचा राग शांत कसा करायचा हा प्रश्न उत्पन्न झाला. ब्रह्मदेव सर्व देवांसह लक्ष्मीदेवीकडे गेले आणि विनंती केली, ''आईसाहेब, आपण या आणि

देवांचा राग शांत करा.'' लक्ष्मीने लांबूनच ते रूप पाहिलं. जन्मामधे असं कधी रूप पाहिलं नव्हतं म्हणाली. हे माझं काम नाही, तुम्ही काय वाटेल ते करा, हे मला जमणार नाही म्हणाली. मग ब्रह्मदेवांनी प्रल्हादाला सांगीतलं, ''बाळ तू भगवंताजवळ जा. तुझ्या पित्याबद्दल त्यांना अत्यंत राग आलेला आहे. तू त्यांचा राग शांत करा.'' प्रल्हादजींना काही भीती वगैरे काही नाही. देव रागावतच नाही अशी निश्चित बुद्धि असल्याशिवाय उपासना होतच नाही. काही प्रतिकूल घटना घडली म्हणजे देव रागावला म्हणून असं घडलं, म्हणजे देवाचा दोषच आमच्या लक्षात येतो. देव नेहेमी अनुकूल आहे, नेहेमी कृपा करणारा आहे. प्रल्हादजींनी नरसिंहांच्या चरणावर साष्टांग नमस्कार घातलेला आहे. गेला, देवाचा राग गेला. आपल्या चरणावर हा बालक पडलेला आहे हे पाहिल्यावर दया उत्पन्न झाली. त्याला उठवलं नरसिंहानी आणि त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवलेला आहे. ध्रुवाच्या गालाला नुसता शंख लावला होता, याच्या मस्तकावर हात ठेवलेला आहे. भगवंतांचा हस्तस्पर्श होण्याबरोबर आत्मदर्शन झालेलं आहे, आत्मज्ञान झालेलं आहे. सर्व पापक्षय झालेला आहे. नेत्रातून अश्रूधारा वाहताहेत आणि प्रल्हादजींनी भगवान नरसिंहाची स्तुति करण्याला आरंभ केलेला आहे. पुष्कळ मोठी स्तुति आहे. प्रेम आहे, ज्ञान आहे सगळं त्याच्यामधे आहे. आरंभाला ते म्हणताहेत, ''ब्रह्मादिक देव जिथे आपली स्तुति करू शकत नाहीत तिथे मी दैत्यकुळात जन्माला आलेला बालक कसा आपली स्तुति करू शकेल ? आपली भक्ति करणारा जो आहे तो सर्वांमधे श्रेष्ठ आहे. त्याच्यावरच आपली कृपा होते.

आपली भक्ती करणारा जो आहे तो सर्वांमध्ये श्रेष्ठ आहे. त्याच्यावरच आपली कृपा होते आहे. कोणीही भक्त आपली सेवा करणारा तो स्वत:करताच करतो आहे. आपल्याला काही वस्त्र देणं, अलंकार देणं हे सगळं स्वत:करताच हे भक्त करतात. त्यांनी एक ज्ञानसिद्धांत सांगितलेला आहे. सर्व जीव म्हणजे परमेश्वराचे प्रतिबिंब आहे. बुद्धिमध्ये पडलेले प्रतिबिंब म्हणजे जीव आहे. प्रतिबिंबवाद. तेव्हा जीवाला जर पाहिजे असेल तर बिंबाला दिले पाहिजे. आरशामध्ये जे प्रतिबिंब आहे त्या प्रतिबिंबाच्या गळ्यात जर आणखी सोन्याच्या हार पाहिजे असेल तर हे जे बाहेर असलेलं बिंब त्याच्या गळ्यामध्ये तो हार घातला पाहिजे. त्या बिंबाला अर्पण केल्यानंतर तेच प्रतिबिंबालाही मिळतयं. तसे सगळे भक्त सेवा करतात म्हणाले सगळे स्वार्थी आहेत. निष्काम कोणी नाहीये. सिद्धांतही सांगितलाय आणखी कार्य जीवाचं कसे होते हेही दाखवलेलं आहे. देव काही आपल्याकडे ठेऊन देत नाही. सगळं जीवांना देऊन टाकतात. आपण अवतार अनेक घेतले देवा हे काय लोकांना भीती दाखवण्याकरता घेतले का भीतीतून मुक्त करण्याकरता घेतले म्हणाले, हे सगळे

लोक भ्यालेले आहेत. लक्ष्मीदेवीही घाबरलेली आहे. राग कशाला आपल्याला. ज्याच्याबद्दल राग आलेला तो तर गेला. आता कशाला राग पाहिजे? आपला राग आपण आवरा सर्व लोक आता आनंदात आहेत, समाधान सर्व लोकाचं झालेलं आहे. मला मात्र आपल्या रागाची भीती वाटते. या संसारातून आपण लवकर माझा उद्धार करा आणि सर्वांचा उद्धार करा. मला एकट्याचा नकोय. सर्व लोकांचाही आपण उद्धार करा. अशी प्रार्थना केली. आपली दास्यभक्ती मला मिळावी हेही त्यांनी सांगितलेलंय. आपल्याला नमस्कार करावा. वाणीनी आपली स्तुती करावी, सेवा शरीरानी घडावी, पूजा घडावी, आपल्या दिव्य चरित्राचं अखंड स्मरण व्हावं. आणि आपल्या कथांचं श्रवण नित्य व्हावं अशी भक्ती त्यांनी मागितली.

भक्तांनी या प्रमाणे स्तुती केल्यानंतर नारद सांगतात, भगवान प्रसन्न झाले. प्रल्हाद, काय पाहिजे तुला मागून घे बाळ. माझं दर्शन झाल्यानंतर काहीही इच्छा मानवाची राहात नाही. सर्व इच्छा पूर्ण होतात. मागून घे तू. परंतु खरे निष्काम भक्त होते प्रल्हादजी, त्यांनी काही मागितले नाही. भक्तियोगाचा हा प्रतिबंध आहे म्हणाले. काही मागणं देवाजवळ म्हणजे. प्रल्हादजी सांगतात, देवा, मला त्या लोभामध्ये टाकता काय? वर मागून घे अमुक घे. मी असा लोभी नाही. मी मुमुक्षु आहे. मला बाकी कोणातीही इच्छा नाही. आपल्यासारखे मला स्वामी मिळालेले आहेत आणि मी आपला भक्त आहे अनन्य भक्त. मागणारा हा खरा भक्त होत नाही म्हणे. तेव्हा मला काहीही इच्छा नाहीये. जर आपल्याला काही देण्याची इच्छा असेल तर माझ्या मनामध्ये कोणतीही वासना राहू नये एवढा मला वर द्या.

यदि रासीश मे कामान् वरांस्त्वं वरदर्षभ ।
कामानां हृद्यसंरोहं भवतस्तु वृणे वरम् ।। ७.१०.७ ।। श्री.भा.

माझ्या मनामध्ये कोणतीही इच्छा उत्पन्न होऊ नये सर्व कामनिवृत्ती ही मुक्ती आहे. मुक्तीचं स्वरूप आहे. हे प्रल्हादजींनी मागितलं. कोणतीही इच्छा राहू नये. याचा अर्थ जीवभाव संपलेला आहे. तो प्रत्यक्ष परमेश्वर झालेला आहे. आणखी एक वर मागतो म्हणाले. माग म्हणाले, तुला कुणी नाही म्हटलं. प्रल्हादजी सांगताहेत, आमच्या पिताजींनी आपला द्वेष केला, वैर केलं, पण अज्ञानाने केलं. आपलं स्वरूप न जाणताना त्यांनी वैर केलेलं आहे, निंदा केली, त्यांचाही उद्धार व्हावा अशी माझी इच्छा आहे. केवढं मोठं अंतःकरण आहे. 'पिता मे पूयेत' , त्यांच्या पातकापासून पिता मुक्त व्हावा. भगवान सांगतात, प्रल्हादा ! तुझ्या पित्याचा तर उद्धार झालेलाच आहे. पण

पित्याच्या पूर्वीच्या एकवीस पिढ्यांचा उद्धार झालेला आहे आणि कारण नरसिंह सांगतात.

त्रि:सप्तभि: पिता पूत: पितृभि: सह तेऽनघ
यत् साधोऽस्य गृहे जातो भवान्वै कुलपावन: ।। ७.१०.१८ ।। श्री.भा.

की याच्या घरामध्ये तुझ्यासारखा सर्व कुळाला पवित्र करणारा मोठा भक्त निर्माण झालेला आहे. तुझ्यासारखा भक्त या कुळामध्ये उत्पन्न झाल्यामुळे सर्व कुल पवित्र होऊन गेलेलं आहे. भक्तांनी देवाला मोठं म्हणायचं. देवही भक्तालाच मोठेपणा देताहेत. ज्या ज्या देशांमध्ये माझे भक्त असतील ते सर्व देश पवित्र होऊन जातात. जा आता हे राज्य वगैरे सांभाळ तू. सर्व भक्तांचा आदरभाव धारण करून राज्य कर म्हणाले. पित्याचं और्ध्वदेहिक सगळं करून टाक. राग शांत झाल्यानंतर ब्रह्मदेव जवळ आले, देवा, आपण या असुराचा नाश करून या बालकाचं संरक्षण केलं, फार चांगलं झालं म्हणाले. माझ्याजवळ याने वर मागितले, आणि सर्वांना याने त्रास दिलेला आहे. मुलालाही त्रास दिलेला आहे. नरसिंह म्हणाले, ''ब्रह्मदेवा ! तुम्ही आता यापुढे वर देताना विचार करून वर देत चला म्हणाले. काय हे ? असुरांनी वर काय मागितले, तुम्ही प्रत्येक वेळेला तथास्तु म्हणत गेलात आणि हा असुर आपल्या स्वभावाप्रमाणे सर्वांना आणि त्रास देणाराच निर्माण झाला ना ? मुलाबद्दल द्वेष करणारा असुर, इतरांचा द्वेष किती केला असेल ?'' बजावलेलं आहे ब्रह्मदेवांना, आणखी भगवान नरसिंह गुप्त झालेले आहेत.

प्रल्हादजींना राज्यभिषेक केला ब्रह्मदेवांनी, आणि सर्वांचा सत्कार प्रल्हादजींनी केला. आपल्याआपल्या लोकांना सर्व ब्रह्मादिक देव निघून गेले. हेच दोघे हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू हे पुढे रावण आणि कुंभकर्ण झाले. त्यांचा नाश रामावतार धारण करून भगवंतानी केला. पुढे हेच शिशुपाल दंतवक्र झाले. भगवान श्रीकृष्णांनी त्यांचा नाश केला. त्यांना मुक्त केलेलं आहे. ही सगळी कथा, हा इतिहास धर्मराजाला नारदांनी सांगितला आहे शेवटी त्याला सांगितलं बाबा, तुम्ही पांडव म्हणजे खरे पुण्यवान आहात, भाग्यवान आहात. कारण तुमच्या घरी आम्हाला सगळ्या ऋषींना यावं लागतं म्हणाले. तुमच्या घरामध्ये भगवान श्रीहरी वास्तव्य करताहेत. केवढं तुमचं पुण्य आहे. प्रल्हादाला एकदा दर्शन दिलं. त्याच्या पित्याचा नाश केला. त्याचं संरक्षण केलं, त्याला वर प्रदान केला आणि भगवान नरसिंह गुप्त झाले. हा द्वारकेचा राणा पांडवाघरी राहतो आहे. आम्हाला यावं लागतं म्हणाले. केवढं भाग्य तुमचं आहे. पण तुम्ही याला जाणून आहात ना ! हा आपला मामेभाऊ आहे, अर्जुनाला वाटतं हा आपला मित्र आहे. वाटेल ती काम सांगता तुम्ही

याला आणि करतो हा. काही मानापमान काही नाही. याचं स्वरूप काय आहे, हा प्रत्यक्ष परमेश्वर आहे. हे समजून घेऊन आता याच्याबद्दल वागा याची आज्ञा पालन करा. याच भगवान गोपालकृष्णांनी पूर्वीही त्रिपुरासुराचा नाश करायचा होता त्यावेळेला एकाच बाणाने त्या तीन विमानांचा नाश झाला पाहिजे. जाळून टाकली पाहिजेत विमानं. मग भगवान विष्णूंनी बाणाचं रूप धारण केलं, शंकर भगवंतांनी तो बाण हातामध्ये घेतला आणि त्या एकाच बाणाने त्रिपूर दहन करून टाकलेला आहे. त्यावेळी सर्व राक्षसांचा नाश झाला म्हणजे भगवंतांनी शंकरांनाही साह्य केलं आणि ते कर्म केलेलं आहे. अशा प्रकारचा हा भगवान श्रीहरी, त्याची सेवा तुम्ही जितकी ज्ञानपूर्वक कराल तितकं तुमचं आणखी कल्याण होणार आहे. असं नारदांनी सांगितल्यानंतर मग नारदांना त्यांनी सवर्ण आश्रम यांचे धर्म विचारले. चार वर्णांचे, चार आश्रमांचे धर्म कोणते आहेत ? ते मला समजावून सांगा. धर्मजिज्ञासू धर्मराज, आचरण करणारे आणि नारदांनी त्यांना सर्व उपदेश केला.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा। बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात्।।
करोति यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेतं तत्।।११.२.३६।। भा.
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।

।।गोपालकृष्ण भगवान् की जय।।
।। श्रीमद्भागवत तिसरा दिवस समाप्त ।।

ट

# ।। श्रीमद्भागवत चौथा दिवस ।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा।।

तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ ।।
तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन । सर्व होणे जाणे तुझे हाती ।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण । स्तवावे ते कवणे कवणालागी ।।
यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम् ।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः ।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः । तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो । मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः ।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम् । तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने ।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम् ।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम् । संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना ।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन् । प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम् ।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम् ।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं । तत्र तत्र कृत मस्तकांजलिम् ।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं । मारुतिं नमत राक्षसान्तकम् ।।
पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते ।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम् ।।

श्रीगणेशाय नमः
श्रीगुरुचरणारविन्दाभ्याम् नमः ।
भगवञ्छ्रोतुमिच्छामि नृणां धर्मं सनातनम् ।
वर्णाश्रमाचारयुतं यत् पुमान्विन्दते परम् ।। ७.११.२ ।। श्री.भा.

शुकाचार्य महाराज सांगताहेत राजा, दैत्यराज हिरण्यकश्यपूचे चरित्र नारदांच्या मुखांतून धर्मराजाने ऐकलं, आनंद झाला त्याला आणि नंतर त्याने नारदांना विचारले, ''महाराज ! मानवांचा जो धर्म आहे 'आचारधर्म' वर्णाश्रमांचा आचार; तो आचारधर्म आपल्या मुखातून ऐकण्याची मला इच्छा आहे. साक्षात् भगवान ब्रह्मदेवांचे आपण पुत्र आहात! आपल्या सारखे नारायणांचे जे भक्त आहेत त्यांनाच खरं धर्मरहस्य हे माहिती असेल. धर्मराजांचा प्रश्न ऐकून नारदांनाही समाधान वाटलं.

नारद सांगताहेत, 'धर्मराज, भगवान नारायणांच्या मुखातूनच मी ऐकलेलं आहे हा धर्माचार! हा मी तुला सांगतो. आरंभाला दाक्षायणीपासून ज्यांनी अवतार घेतला बद्रिकाश्रमामध्ये, ज्यांचं वास्तव्य आहे, तप चालू आहे. धर्माचं मुख्य प्रमाण म्हणजे वेदरूपी परमात्मा आहे 'श्रीहरी'. वेदाभ्यास करणारे जे काही ऋषी आहेत त्यांनी करून ठेवलेल्या स्मृती याही धर्माचं प्रमाण आहेत. सामान्य धर्म, सर्वसाधारण, तो अगोदर सांगताहेत, सत्य, दया, तप, शुचिता, तितिक्षा, विचार, आंतरेंद्रिय निग्रह, बहिईंद्रिय निग्रह, संतोष, श्रेष्ठ पुरुषांची सेवा, व्यावहारिक जे विषय आहेत त्या विषयांच्या करिता प्रयत्न कमी करणं, मानवांच्या प्रयत्नांचं इष्टफल कसं प्राप्त होत नाही हे पहाणं, आत्मानात्म विचार करणं, अन्नधान्य, धन वगैरे जे आपलं असेल याचा विभाग करणं सर्व भूतांना आणखी त्यातून ते यथाशक्ती देणं, सर्वांच्या ठिकाणी परमात्म भावना धारण करणं, आणि ईश्वराची श्रवणकीर्तनादिक नवविधाभक्ती हा तीस प्रकारचा सामान्य धर्म आहे. कुणालाही, चारी वर्ण, चारी आश्रम, स्त्री, पुरुष, बाल, वृद्ध सर्वांना हा करता येण्यासारखा आहे.

आता वर्ण धर्म सांगताहेत. ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य आणि शूद्र.

गर्भाधानादिक संस्कार ज्या ठिकाणी अविछिन्न चालू आहेत, त्यालाच द्विज म्हणायचं. यज्ञ करणं, अध्ययन करणं, दान करणं, ही द्विजांची कर्म आहेत. आश्रमांचे वेगवेगळे धर्मही त्यांना आहेत. विप्रांनी अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, आणि प्रतिग्रह ही सहा कर्म विप्राला सांगितलेली आहेत. त्यापैकी याजन, प्रतिग्रह आणि अध्यापन ही उपजिविकेची साधनं म्हणून सांगितलेली आहेत.

उत्तम वर्णाची वृत्ती इतरांनी घेऊ नये, आपत्ती नसेल तर घेऊ नये. आणखी काही सांगितलेली आहेत. ऋतवृत्ती म्हणजे उंच आणि शिलवृत्ती त्याला म्हणतात. शेतात पडलेले धान्य कण पुष्कळ असतात. ते गोळा करून आणणं आणि त्याच्यावर उदरनिर्वाह करणं ही उंच वृत्ती आहे. मोठा

बाजार ज्या ठिकाणी असेल तिथेही धान्य पुष्कळ सांडलेलं असत ते कण गोळा करून आणून त्याच्यावर निर्वाह करण ही शीलवृत्ती! अयाचित राहून आपलं कर्म करणं ही अमृत वृत्ती आहे. नित्य याचना करणं ही मृतवृत्ती आहे. कृषीकर्म करणं ही प्रमृतवृत्ती आहे. सत्यानृत म्हणजे वाणिज्य वृत्ती, व्यापार करणं, आणि नीच सेवा करणं ही श्वानवृत्ती आहे. ती कधीही विप्राने करू नये, क्षत्रियाने करु नये.

बाह्य इंद्रियांचा निग्रह, आंतरइंद्रिय निग्रह, तप, शुचिता, संतोष, क्षमा, ज्ञान, दया, भगवत भक्ती ही ब्राह्मणाची लक्षणं सांगितलेली आहेत. पराक्रम आहे, धैर्य आहे, तेज आहे. त्याग आहे, चित्ताचा निग्रह आहे, आणखी सर्वांचं रक्षण करण्याची प्रवृत्ती आहे, हे क्षत्रियांचं लक्षण आहे. देव गुरु भगवान यांची भक्ती करणं, धर्म, अर्थ काम या तीन अर्थांचे आचरण करणं. आस्तिक्य बुद्धी असणं आणि नित्य उद्योगशील असणं हे वैश्याचं लक्षण आहे. चतुर्थ वर्ण जो शूद्र आहे, सर्वांशी नम्रतेने वागणं, पवित्रपणानी रहाणं, स्वामी सेवा करणं, अमंत्र यज्ञ करणं, चोरी वगैरे कोणाचीही न करणं, गायींचं, विप्रांचं संरक्षण करणं, सत्य भाषण करणं हा शूद्राचा धर्म आहे. पतिव्रता स्त्रिया ज्या आहेत, त्यांनी पतीची सेवा करणं, पतीचे जे आप्तबांधव आहेत त्यांच्याबद्दलही अनुकुल वृत्ती ठेऊन राहाणं, गृहसंमार्जन करणं, झाडून काढणं, स्वत:ही उत्तम आणखी वस्त्रालंकाराने संपन्न राहणं, प्रेमभाषणाने, मधुर भाषणाने, नम्रतेनं सर्वांच्याही मनाला समाधान देणं अशी ही पतिव्रता स्त्री आहे. आपल्या कर्तव्यामध्ये दक्ष रहाणारी ही हरीलोकामध्ये पतीला बरोबर घेऊन लक्ष्मीप्रमाणे सुखाचा उपभोग घेत राहातीय.

संकर जातीमध्ये उत्पन्न झालेले जे आहेत, त्यांचा धर्म म्हणजे त्यांचा कुलामध्ये जो चालत आलेला आहे, तो त्याप्रमाणे त्यांनी आचरण करावा. असे प्रत्येकाच्या स्वभावाला अनुसरून हे धर्म सगळे सांगितलेले आहेत. कर्तव्य वेदांनी सांगितलेली आहेत.

अनंत वासना मनामध्ये असतात. अधिकाधिक विषयसेवनाने त्या वासना जास्ती जास्ती वाढतात. म्हणून त्या कमी करण्याचा प्रयत्न करताहेत.

यानंतर आता आश्रम धर्म सांगताहेत नारद, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ आणखी संन्यासी

ब्रह्मचारी गुरुकुले वसन्दान्तो गुरोर्हितम् ।
आचरन्दासवन्नीचो गुरौ सुदृढसौहृद: ।। ७.१२.१ ।। श्री. भा.

ब्रह्मचाऱ्याने उपनयन झाल्यानंतर गुरुकुलामध्ये जाऊन रहावं; आणखी गुरुची सेवा करावी. अत्यंत प्रेम, श्रद्धा, भक्ती असावी, अंतःकरणामध्ये. सायंकाली आणि प्रातःकाली सद्गुरुंची, अग्नीची, सूर्यनारायणांची, देवतांची भक्ति, सेवा करावी. मौन धारण करून दोन्ही वेळेला संध्योपासना करावी. गायत्री मंत्राचा जप करावा आणि गुरुंनी बोलावल्यावर जवळ जाऊन, आरंभी आणि शेवटी त्यांच्या चरणाला वंदन करून वेदाचा अभ्यास करावा. कृष्णाजीन, जटा, दंड, कमंडलू, यज्ञोपवीत हे सगळं त्याने धारण करावे. दोन्ही वेळेला भिक्षा मागून ते भिक्षान्न गुरुला निवेदन करावं त्यांची अनुज्ञा झाली तर मग भोजन करावं नाहीतर उपोषित रहावं. सुशील, मिताहारी, श्रद्धावान, जितेंद्रिय असं त्यांनी रहावं. स्त्रियांच्या बद्दल आवश्यक तेवढाच व्यवहार त्यांनी करावा. जास्ती संपर्क करू नये. हे नियम ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी सर्वांनाच आहेत. याप्रमाणे आणखी वेदाभ्यास शेवटपर्यंत करायचा असेल तर शेवटपर्यंत ब्रह्मचर्य आश्रम धारण करून त्याने वेदाभ्यासामध्येच आपलं सगळं आयुष्य खर्च करावं. काही काळ आपल्या शाखेचं अध्ययन झाल्यानंतर आणि गुरुंना दक्षिणा यथाशक्ती देऊन गृहस्थाश्रमाचा स्विकार करावा; अथवा वानप्रस्थाश्रम किंवा इच्छा असेल तर संन्यासाश्रमाचाही स्विकार त्या ब्रह्मचाऱ्याने करावा.

अग्नीनारायण, सद्गुरु, परमात्मा, सर्वही प्राणीमात्र यांच्या ठिकाणी परमेश्वराची व्याप्ती आहे हे लक्षात ठेवावं. अशा आश्रम धर्माप्रमाणे वागणारा ब्रह्मचारी, वानप्रस्थ, गृहस्थाश्रमी, संन्यासी यांना ईश्वरकृपेने आत्मज्ञान होतं आणि ते मुक्त होताहेत.

वानप्रस्थाचे धर्म सांगताहेत नारदमुनी. ऋषीलोकाला तो जातोय. जे काही सूर्य किरणांनी पक्व झालेलं धान्य म्हणा, अग्नीमध्ये शिजलेलं धान्य हेही त्यांनी ग्रहण करावं. नवीन धान्य प्राप्त झाल्यानंतर, जुनं धान्य आणि त्याचा त्याग करावा. देऊन टाकावं कुणाला तरी, संग्रह करू नये. अग्नी सुरक्षित रहाण्याकरता, एखाद्या गुहेमध्ये किंवा झोपडीमध्ये अग्नीला ठेवावं आणि आपण मोकळ्या जागेमध्ये रहायचं. थंडी वारा, पाऊस, सूर्यकिरण वगैरे सगळं त्यानं सहन करायचं. त्याने जटा धारण कराव्यात. दंड, कमंडलु आपल्याजवळ ठेवावेत. बारा वर्षं, आठ वर्षं, चार, दोन किंवा एक वर्षपर्यंत वानप्रस्थ आश्रमाचे नियम पालन करून विचारी माणसाने तितिक्षेचा अभ्यास करावा. आपलं कर्म करण्याचं सामर्थ्य राहिलं नाही, व्याधी म्हणा, किंवा म्हातारपणामुळे म्हणा, सामर्थ्य जर शरीरातलं नाहीसं झालं तर आहारत्याग त्याने करावा, आणि मूलतत्त्व जे परमात्मरूप, त्याचं चिंतन करून आपल्या शरीराचं विसर्जन त्यांनी करावं.

संन्यासी, त्यांनी कसं वागावं हे सांगताहेत. वानप्रस्थामध्ये असणारा जो आहे. जीव, याला जर सामर्थ्य असेल शरीरामध्ये, संचार करण्याकरता, तर त्याने संन्यासाश्रम दीक्षा घ्यावी. फक्त देह तेवढा शिल्लक राहिलेला आहे. बाकी कशाचाही संग्रह त्याने करू नये. निरपेक्ष वृत्तीनं कोणत्याही गावामध्ये एक रात्र फक्त त्याने मुक्काम करावा, लगेच दुसऱ्या दिवशी दुसऱ्या गावाला, असं सारखं फिरावं म्हणाले. एक पांघरण्याच वस्त्रं आहे, दंड कमंडलू, एकट्यानं संचार करायचा आहे. सर्वही भूतांच्या बद्दल अत्यंत प्रेमभावना आहे. नारायणाची भक्ती अंत:करणामध्ये आहे. संपूर्ण विश्व हे नारायणस्वरूप आहे, असा त्याने अभ्यास करावा. मृत्यु वगैरे याची भीती बाळगण्याचं काही कारण नाही. देहाला सगळे हे विकार आहेत. जी काही नास्तिक शास्त्रं असतील त्या ठिकाणी आसक्त होऊ नये वादविवाद कोणाबरोबरही करू नये. शिष्य संग्रह त्याने करू नये. जास्ती ग्रंथाचा अभ्यासही करू नये. संन्यासाश्रमाचे हे धर्म सांगताहेत. संन्यासाश्रमामध्ये सुद्धा आत्मज्ञान होण्याकरता घेतलेला एक संन्यास आहे. ज्ञानाच्या इच्छेनं घेतलेला आणि ज्ञान झाल्यानंतर होणारा संन्यास नैसर्गिक संन्यास, विद्वत संन्यास तो फार मोठा आहे म्हणाले. विद्वान संन्यासीबुवा आहे तो काय करतो, कसा वागतो कोणत्या वर्णाचा आहे काही समजत नाही. याबद्दल पूर्वी घडलेला इतिहास तुला सांगतो, धर्मराज. भगवान अवधूत दत्तात्रेय आणि प्रल्हादजी जे आहेत यांचा संवाद झालेलाय. पृथ्वीवर संचार करण्याकरता प्रल्हादजी बाहेर पडलेले आहेत. राजधानीतून फिरता फिरता त्यांनी पाहिलं, कावेरी नदीच्या तीरावर, एका झाडाखाली एक महात्मा फक्त पडलेला आहे. जमिनीवर पडलेला आहे. विलक्षण तेज आहे. पण काही कळत नाही हा कोण आहे, त्याचा वर्ण कोणता, त्याचा आश्रम कोणता, काही समजून येत नाही. स्वस्थ आहे. प्रयत्न नाही, कर्म नाही, काही नाही. प्रल्हादजींनी त्यांना नमस्कार केला. पायावर मस्तक ठेवलेलं आहे. आणि जिज्ञासू बुद्धीनं त्या भगवद्भक्त असुराने विचारलं, ''महाराज !

बिभर्षि कायं पीवानं सोद्यमो भोगवान्यथा ।
वित्तं चैवोद्यमवतां भोगो वित्तवतामिह ।।
भोगिनां खलु देहोऽयं पीवा भवति नान्यथा ।। ७.१३.१६ ।। श्री. भा.

व्यवहारामध्ये जो कार्यकारण भाव मानून आपण वागतो त्याप्रमाणे प्रल्हादजी विचारताहेत, आपलं शरीर महाराज, इतकं धष्टपुष्ट कस राहिलं ? एखादा प्रयत्न करणारा, धनधान्य मिळविणारा जो आहे त्याचं शरीर चांगलं असतं. उद्योग केला तर द्रव्य मिळतं. द्रव्य मिळाल्यानंतर खाण्यापिण्याची

व्यवस्था करता येतो, आणि अशी व्यवस्था ज्यांची झालेली आहे त्यांचाच देह असा चांगला असतो, असं आम्ही पहातो. आपण तर स्वस्थ झाडाखाली पडून राहिलेले आहात काही उद्योग करीत नाही. तुमच्या जवळ अर्थ नाही, संग्रह नाही, मग खाण्यापिण्याची व्यवस्था कशी आहे ? आणि काहीही व्यवस्था नसताना तुमचा देह इतका चांगला कसा आहे ? हा प्रश्न आहे. समर्थ आहात आपण, आपण कोणालाही ज्ञान देऊ शकाल किंवा कोणताही उद्योग करून आपल्याला पुष्कळ द्रव्य मिळविता येईल. जिज्ञासू म्हणून प्रल्हादजींनी हे विचारल्यानंतर नारद सांगतात, हसले थोडे अवधूत, म्हणाले बाबा, तू मोठा भगवद्भक्त आहेस. तू आता विचारलंस म्हणून, माझा अनुभव, मी कसा वागतो, माझं काय वर्तन, काय आचरण आहे. तुला मी सांगतो, म्हणाले,

तृष्णया भववाहिन्या योग्यैः कामैरपूरया ।।
कर्माणि कार्यमाणोऽहं नानायोनिषु योजितः ७.१३.२३ ।। श्री.भा.

कितीही प्रयत्न करून अर्थार्जन केलं, विषयभोग घेतले, तरी मनाची तृप्ती कधीही होत नाही. अशा व्यवहारामध्ये आसक्त झालेल्या माणसाचे विचार, त्यांचे कार्यकारणभाव हे प्रल्हादजींनी मांडले. असा नित्य तृप्त झालेला महात्मा, त्याची बुद्धी कशी आहे? दोन बुद्धिवाद आहेत – संसारी लोकांचा एक बुद्धिवाद प्रल्हादजींनी मांडलेला प्रयत्नवाद. कर्म केल्याशिवाय धन मिळणार नाही, खाण्यापिण्याची सोय होणार नाही. शरीर रहाणार नाही. हे ज्ञानी महात्मे सांगताहेत, यांचा बुद्धिवाद वेगळा आहे – मी म्हणाले कर्म करत नाही. विचारांनी सोडलेलंय कर्म. ही जी आहे तृष्णा म्हणजे आशा मनामध्ये, हे करावं ते करावं. हे मिळवावं ते मिळवावं धन आहे, संपत्ती, त्याचप्रमाणे सत्ता आहे. कीर्ति आहे, अनेक वासना मनामध्ये उत्पन्न होतात. कितीही विषय मिळाले तरीसुद्धा त्या वासना पूर्ण होत नाहीत. ती तृष्णा पूर्ण होत नाही, आणि त्या तृष्णेमळे कर्मं घडतात म्हणाले, हे करावं, ते करावं असं वाटतं. आणि त्या कर्मामुळे अनेक प्रकारची शरीरं धारण करावी लागतात. अनेक योनीमध्ये मी फिरून आलो म्हणाले. दैवयोगाने या मृत्यूलोकात माझा जन्म झाला. मनुष्य जन्म मला मिळाला. स्वर्ग किंवा मोक्षाचा हा दरवाजा आहे. मनुष्य शरीर म्हणजे पुण्य कर्म केली, यज्ञयागादिक, तर स्वर्गाला जाता येईल. कायमचं रहाता येणार नाही किंवा सर्वसंग परित्याग करून भगवत्भक्ती जर केली तर त्याला मुक्ति म्हणजे मोक्षही मिळेल. जन्ममरणाच्या बंधनातून कायमची सुटका होईल. अशा या योनीमध्ये मी आलोय. याठिकाणी मी निरीक्षण पुष्कळ केलं म्हणाले. स्त्री–पुरुष सारखी कर्मं करतात, प्रयत्न करताहेत. सुख मिळावं आणि दुःख

जावीत सगळी. पण उलटंच त्यांच्या पदरात फळ मिळतयं म्हणे. असलेली सुखे जातात. नसलेली दुःखे येतात. हे पुष्कळ ठिकाणी ज्यावेळेला मी पाहिलं, अनुभव घेतला त्या वेळी 'निवृत्तोस्मि' । काहीही करायचं नाही असं मी ठरविलं. पण ठरविलं म्हणजे मनामध्ये कोणतीही तृष्णा राहिलेली नाही हे त्याचं पाठीमागचं कारण आहे. काही करायचं नाही असं ठरविलं तरी कोणीही तसा राहू शकत नाही.

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ।। ३.५ ।। भ.गी.

भगवान सांगताहेत अर्जुनाला, युद्ध करणार नाही तू म्हणतोयस. तुला करावं लागेल. कोणीही कर्मत्याग करू शकत नाही. त्रिगुणात्मक सृष्टीमध्ये बांधला गेलेलाय. अवधूत सांगतात, मी सगळं सोडून दिलं. लोकांना कर्म करून, प्रयत्न करून, इच्छेप्रमाणे फळ पदरात पडत नाही. पण हे सोडून दिलं याचा अर्थ मनामध्ये कोणातीही तृष्णा राहिलेली नाही, हे मुख्य कारण आहे. मग हे शरीर इतकं चांगलं राहिलं कसं? प्रयत्नाशिवाय द्रव्य नाही. द्रव्याशिवाय खाण्यापिण्याची व्यवस्था नाही. विषयभोग नाहीत. मग शरीर चांगलं कसं राहिलं? सुख मिळालं पाहिजे ना! सुख मिळालं म्हणजे शरीर चांगल रहातं. त्याच उत्तर देताहेत अवधूत दत्तात्रेय !

सुखमस्यात्मनो रूपं सर्वेहोपरतिस्तनुः ।
मनःसंस्पर्शजान् दृष्ट्वा भोगान्स्वप्स्यामि संविशन् ।। ७.१३.२६ ।। श्री. भा.

सुख, सुख म्हणून जे समजलं जातं म्हणाले ते सुख खरं म्हणजे आत्मरूप सुख आहे. आत्माच आनंदरूप आहे. स्वतःच मी आनंदरूप आहे. हे ज्या वेळेला मला समजलं त्या वेळेला प्रयत्नांनी द्रव्य मिळवायचं त्यांनी सुख मिळवायचं, हे थांबलं. द्रव्य म्हणजे सुख नाहीये. सुखाचं साधन म्हणून समजलं गेल्यामुळे द्रव्य मिळविण्याकरता प्रवृत्ती होतेय. बाह्य सुखाची इच्छा आहे. विषयेंद्रिय संबंध झाला म्हणजे सुख मिळतं. ते सगळं विषय मिळविण्याकरता कर्म केलं पाहिजे. ते सुख मिळालं पाहिजे. अशी तृष्णा मनामध्ये असते. पण सुख म्हणजे खरं मी स्वतःच आनंदरूप आहे. 'नाथांच्या घरची उलटीच खूण, पाण्यासी लागली तहान'. नाथमहाराज सांगताहेत. तहान लागल्यानंतर तहान शांत होण्याकरता पाणी प्यायलं म्हणजे झालं. पाण्यालाच तहान लागली तर? दुसऱ्याची तृष्णा, तहान शांत करणारं पाणी, ते म्हणालं मला तहान लागलेली आहे. त्याची तहान कशी जायची कशी ? तुला तहान नाही बाबा! आपण स्वतःच सुखरूप आनंदरूप असताना, विषयांच्यामध्ये

सुख आहे. ते मिळविले पाहिजे, त्यांचा संग्रह केला पाहिजे तो किती, काही ठरत नाहीये. कार्यकारणभाव जरी ठरविला, विषयाशिवाय, विषयसंबंधाशिवाय, सुख नाही. विषय किती संपादन करायचे ? हेच निश्चित नाहीये. वाढत जातं ते, तृष्णा वाढत जातीये. मृग, त्याला तहान लागलेली आहे. दुपारची वेळ आहे. हरिणाला तहान लागलीये. समोर सूर्यकिरण पडलेले आहेत; लांब मैलभर आणि त्या किरणामध्ये पाण्याचा आभास झाला. पाणी आहे, धावत निघाला हरिण. रस्त्यामध्ये एका ठिकाणी झाडी होती आणि तिथे जलाशय होता पाण्यानी भरलेला एक आहे तलाव. पण त्याच्यावर शेवाळ आलेलं आहे पाण्यावर. हा त्याच रस्त्यानं गेला, पाहिलं त्यानी तिथं काही पाणी नाही म्हणाले आणि समोर दिसणारं जे आहे मृगजळ, त्याला जल म्हणून दिसतयं तिथपर्यंत आला. पुन्हा त्याच्यापुढं एक मैलभर तसच दिसायला लागलं. कितीही फिरला, पळाला, तरी पाणी मिळालं नाही तशी स्थिती झालेली आहे. आनंदरूप आपण असताना तो आनंद आवर्त झालेला आहे.

अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ।। ५.१५ ।। भ. गी.

भगवान सांगताहेत आणि त्यामुळे बाहेर सुख आहे. विषयापासून सुख मिळणार आहे. त्याकरता प्रयत्न केला पाहिजे, अहोरात्र. अशी समजूत होऊन प्रयत्नाकडं लागतो आहे आणि सर्वही प्रयत्न व्यर्थ होऊन जातात. प्रयत्नाप्रमाणे त्याच्या पदरात सुख पडत नाहीये. दुःख तरी जातं? किती दुःख आहे, आध्यात्मिक दुःख आहे. शरीरामध्ये व्याधी उत्पन्न झाल्यानंतर होणारी दुःखं, मनाच्या विरुद्ध गोष्टी घडल्यानंतर मनामध्ये उत्पन्न होणारी मानसिक दुःखं, त्याला अध्यात्मिक दुःख म्हणलेले आहे, ती चालूच आहेत. एक ना दोन काहीतरी असतील. भौतिक दुःख आहे. अतिवृष्टी झाली, अनावृष्टी झाली, टोळधाड आली, धान्य गेलं, असे प्रसंग आहेत काही देवता कोपाने होणारी दुःखं आहेत. भूकंप झाला, अमुक झालं, तमुक झालं वगैरे अशी, एकापाठोमाग एक कोणती तरी दुःखं ठरलेली आहेत. त्याचा प्रतिकार करता येतो का? म्हणाले. हा कोण विचार करणार ? धनाकरता तुम्ही सांगता प्रल्हादजी, पण धनार्जन करणारे लोक सुखी आहेत का? मी पाहिलं म्हणाले, नाही कोणी सुखी नाही.

पश्यामि धनिनां क्लेशं लुब्धानां अजितात्मनाम् ।
भयाद् अलब्धनिद्राणां सर्वतोऽभिविशमिनाम् ।। ७.१३.३१ ।। श्री. भा.

श्रीमंत झालेले जे लोक आहेत, प्रयत्न करणारे, त्यांना किती क्लेष आहेत ? पैसा मिळतो

आहे तरीसुद्धा लोभ वाढतो आहे. अजून मिळालं पाहिजे, हे कमीच आहे. हे मोठं दुःख आहे. पैसा समोर आहे, घरात आहे तरी लोभ वाढल्यामुळे कमी वाटलं. कमी वाटलं की झालं दुःख. मिळालेलं जे द्रव्य आहे त्यातलं हे द्रव्य सुरक्षित कसे राहील ? ही भीती वाटती आहे. रात्री झोप लागत नाही त्यांना, सर्वांच्याबद्दल अविश्वास त्यांच्या मनामध्ये असतो. अगदी आप्त, इष्ट, पुत्र, सर्वांच्या बद्दल अविश्वास आहे. माझं द्रव्य नेतील काय ? राजाची भीती आहे, चोरांची भिती आहे, शत्रूची भिती आहे, आप्तेष्टांची भीती आहे. याचक येणारे ते काहीतरी मागतील मला त्यांची भिती आहे. आपल्या प्राणाची भीती, द्रव्याची भीती ही दोन भीती द्रव्यार्जन करणारे, प्रयत्न करणारे जे आहेत त्यांच्या मनात या भीती आहेत. शरीर चांगलं राहिलं पाहिजे. मला सगळे आणखी भोग मिळाले पाहिजेत. तेव्हा या वासना सर्व अगोदर कमी झाल्या पाहिजेत. अर्थवासना गेली पाहिजे आणखी प्राणाबद्दलही तितकी आस्था उपयोग नाही. याकरता मी दोन गुरु केले म्हणाले. संतोषाने रहाणे.

मधुकारमहासर्पौ लोकेऽस्मिन्नो गुरूत्तमौ ।
वैराग्यं परितोषं च प्राप्ता यच्छिक्षया वयम् ।। ७.१३.३४ ।। श्री.भा.

मधमाश्या आणि अजगर दोघांना गुरु केलं म्हणाले. मधमाशा पुष्कळ फुलांवर हिंडतात. रस गोळा करतात. एक मधाचं पोळं तयार करतात. मध साठवितात. संग्रह करतात. स्वतःही भोग घ्यायचा नाही, दुसऱ्यालाही द्यायचा नाही. त्यांनी साठवून ठेवलेला सगळा मध दुसराच कोणीतरी घेऊन जातो. त्या अंगावर आल्या तर त्यांना मारून टाकतात. म्हणजे संग्रहापेक्षा वैराग्य हे चांगलं म्हणाले. इच्छाच जर केली नसती तर संग्रहाकरता प्रयत्न कसा केला असता ? आणि सर्व संग्रह जातो त्यामुळे पुन्हा दुःखामध्ये निराश व्हावं लागतं. त्यामुळे हा प्रयत्नवाद जो पाहिला मी, त्यामुळे इच्छाच नको, इच्छा करून प्रयत्न करायचा ते मिळवायचे अन् ते जायचं, काय उपयोग आहे? इच्छा करायची नाही तर मग आपल्याला सर्व व्यवस्था कशी होणार ? रहायला पाहिजे घर, त्याचप्रमाणे अन्न, वस्त्र, सगळं पाहिजे. तर त्याच्याकरता अजगराला गुरु केले म्हणाले. संतोष त्याच्याजवळ आहे, तो काही प्रयत्न करत नाही. पडून राहिलेला असतो अजगर. जवळ कोणी आल्यानंतर त्याला घेतोय. क्षुधा शांत करतोय. नाहीतर स्वस्थ पडून रहातो. त्याच्यापासून मी संतोषाचं शिक्षण घेतलं. मूळ कारण आणखी निराळंच आहे. आनंदरूप मी आहे हे प्रत्यक्ष समजून आल्यामुळे प्रवृत्तीच बंद झाली. तृप्ती झालेली आहे. दुःखाचा काही प्रसंगच नाहीये. संग्रह केल्यानंतर तो कोणीतरी नेला तर दुःख होणार. संग्रह नाही, प्रयत्न नाही. आनंद मिळालेला आहे. हे प्रथमपासूनच अगदी सगळी अशी स्थिती आहे. कार्यकारणभाव यांचा वेगळा आहे. व्यवहारामध्ये प्रयत्न करत

नाही म्हणजे मी मनापासून काही करत नाही. कारण हा आमचा कार्यकारणभाव अनुभवसिद्ध झालेला आहे. प्रयत्नाचं फळ पदरात पडत नाही. अन्न एखादे वेळेला थोडं मला मिळते तेही मी घेतो. एखाद्यावेळेला भरपूर अगदी पोटभर मिळतं. तरी त्यावेळेलाही संतोष आहे. चांगलं पक्वान्न मिळालं, भाजीभाकरी मिळाली तरी दोन्ही वेळेला अंतःकरणाची स्थिती बिघडत नाहीये. एवढंच का? तेवढंच का? काही वाटत नाही. कोणी श्रद्धेनं, आदराने, आणून देतात. कोणी काय बुवा आमच्या इथे गावात राहिला इथे जवळ आलेलाय, द्या याला. कोणी. अपमान करून देतात. तिकडे लक्ष द्यायचं नाही. यदृच्छेने जे प्राप्त होईल, अयाचित वृत्तीनं ते घेतो मी. वस्त्राबद्दल – उत्तम भरजरीची वस्त्रं, रेशमी वस्त्रं मला एखाद्या वेळेला कोणीतरी देतात. त्याच्याबद्दलही काही वाटत नाही मला. एखाद्यावेळेला, वस्त्रं मिळतही नाहीत, वल्कलं धारण करावी लागतात.

।। दिष्टभुक् तुष्टधीरहम् ।। ७.१३.३९ ।। श्री. भा.

हे सांगताहेत अवधूत जे काही पूर्वीचं संचित असेल, कर्म केलेलं असेल. त्या कर्माचं जे फल मिळतं आहे. त्याला सामोरं जाणं, संतुष्ट रहाणं, हे मी ठरविलेलं आहे. मनालाही शिकवण दिलेली आहे. 'आत्ता मी इथं झाडाखाली पडलेलोय म्हणाले. असा मी एखाद्या वेळेला जमिनीवरही पडून राहीन.

क्वचित् प्रासादपर्यमे कशिपौ वा परेच्छया ।। ७.१३.४० ।। श्री. भा.

एखाद्या वेळेला पूर्व कर्माने मोठ्या राजवाड्यामध्ये मोठ्यामोठ्या गाद्यागिरद्यांवर निजण्याचा मला प्रसंग येतो. पलंगावरही मी पडून राहतो. पण हेच माझं रहावं असं मला कधी वाटत नाही. अरण्यामध्ये जाऊन पडण्याचा प्रसंग आला तरी ते सुख गेलं, राजवाड्यात होतो, बरं होतं हे कधीही नाही. स्नान उत्तम प्रकारचं मला घालतात लोक, वस्त्रं देतात, अलंकार घालतात, रथामध्ये, घोड्यावर सगळ्या अशा रीतीनं मी संचार करतो हत्तीवर बसून. कुठंएखाद्या वेळेला काही वस्त्रं सुद्धा नाही, पडून रहातो. ही शरीराची जी स्थिती आहे, पूर्वकर्माप्रमाणे, हे सगळे सिद्धांत पक्के झालेले आहेत ज्ञानी मनुष्याचे. हा एक बुद्धिवाद, विचार करण्यासारखा आहे. पूर्वकर्म मान्य केलं पाहिजे. पूर्वजन्मही मला होता, आत्ताही आहे. पुढेही येणार आहे. हे सगळं मान्य करून त्यांनी कार्यकारण भाव ठरविलेला आहे. कोणाचीही निंदा मी करीत नाही. कुणाचीही स्तुती करीत नाही. त्यात पडायचंच नाही. शत्रु–मित्र भाव निर्माण करण्यासाठी ही साधनं आहेत. सर्वांचं कल्याण ईश्वराने करावं सर्वत्र एक तोच परमात्मा आहे. दुसरा आहे कोण? अशा वृत्तीनं मी वागतो म्हणाले.

व्यवहारामध्ये सुद्धा जे काही मिळेल त्याला वैराग्य म्हणजे अतिरेक नाही. काहीच मला नको आहे. मी घेणार नाही. तेही घेतो जे मिळेल त्याच्यामध्ये. असा माझा आचार आहे प्रल्हादा!

हे लोकांनाही मान्य होणार नाही आणि शास्त्रामध्येही असं सांगितलेलं नाही. पण मनाची भूमिका स्थिर करावी एवढं शास्त्र सांगतेय. ती स्थिर करण्याकरिता मी ही मनाची वृत्ती अशी ठेवलेली आहे. वर्णाश्रमी याला म्हणतात. वर्णधर्मही नाही, आश्रमधर्मही नाहीत. कसेही वागतात. असं लोक मला म्हणाले. परमहंस, ज्ञानी महात्मा, त्याचे धर्म कसे असतात हे प्रल्हादजींना समजलेलं आहे. ते मोठे राजे होते प्रल्हादजी आणि भक्त होते. आनंद झाला, अवधूतांची पूजा केली प्रल्हादजींनी आणखी त्यांची अनुज्ञा घेऊन ते राजधानीमध्ये परत आलेले आहेत.

धर्मराज विचारतात नारदा, ''आमच्यासारखे गृहस्थ जे आहेत यांनी कसं आचरण करावं ते आम्हाला सांगा. संन्यासी लोक कसे कसे वागतात, कसे कसे आनंदाने रहातात, शरीर असेपर्यंत आनंद आहे. शरीर गेलं तरी पुन्हा जन्म नाही, पुन्हा देह नाही, सगळी दुःखं जातात. शरीर असलं तरी सुद्धा दुःख त्यांना होत नाही. सर्वही मान्य करण्याची सवय मनाला झालेली आहे. दुःखाची स्थितीही मान्य आहे. सुखाची स्थितीही मान्य आहे. सुख अधिक व्हावं अशीही इच्छा नाही दुःख गेलं पाहिजे असंही नाही. जाणार आहे सगळंच जाणार आहे. हा सिद्धांत पूर्ण पक्का आहे. दुःखही कायमच रहाणार नाही पण सुखही कायमच रहाणार नाही. हि मात्र मनाची तयारी होत नाहीये. सुख मिळाल्याबरोबर जास्तीत जास्त आपण सुखी आहोत, अहंकारादिक विकार वाढतात, ते ही नाही.

हे संन्याशांचं बरोबर सांगितलं म्हणाले, आमच्यासारख्या गृहस्थाश्रमी पुरुषाला असं कसं वागता येईल? नारद सांगताहेत धर्मा,

गृहेषु अवस्थितो राजन् क्रियाः कुर्वन्गृहोचिताः ।
वासुदेवार्पणं साक्षात् उपासीत महामुनीन् ॥ ७.१४.२ ॥ श्री. भा.

गृहस्थाश्रमी पुरुषाला कर्मत्याग करता येत नाही म्हणाले, अनेक कर्मं आहेत. सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत अनेक प्रकारची कर्मं शास्त्राने सांगितलेली आहेत. जबाबदारी आहे, पत्नी आहे, पुत्र आहे, आप्त इष्ट आहेत. समाजाचे कार्य आहे. सगळीकडे त्याला लक्ष द्यायला पाहिजे. त्यांनी कर्म करायची. आपल्या गृहस्थाश्रमाला योग्य जे काही कर्तव्यकर्मं आहेत, ती त्यांनी करायची पण ईश्वरार्पण बुद्धी ठेवावी म्हणे. म्हणजे तो त्यातून मुक्त होतो.

श्रेष्ठ महात्मे जे आहेत, ज्ञानी महात्मे त्यांची संगती करावी, त्यांची सेवा करावी. भगवंताच्या दिव्य कथा, दिव्य लीला त्याने ऐकाव्यात श्रद्धेनं, आणि सत्संगतीच्या योगाने स्त्री-पुत्र, आप्त इष्ट, सर्व आणखी क्षेत्रबित्र, सर्व ठिकाणचा जो संग आहे आसक्ती जी आहे, ती कमी करण्याचा प्रयत्न करावा. सोडायचं नाही. पण मानसिक आसक्ती कधी धरायची नाही. आसक्तीमुळे भीती उत्पन्न होते. हे राहील कसं? राजा येइल काय? कोणाचा छापा येईल काय? ही भीती आसक्तीमुळे उत्पन्न होते. सर्वही ईश्वराचं आहे. ही ईश्वरार्पण बुद्धी आहे. ही जर खरी पक्की झालेली असेल तर भीती नाही. त्याचप्रमाणे आणखी एक नारद सांगताहेत, पुष्कळ आप्त इष्ट मंडळीही आपली आहेत आई बाबा आहेत, मुलं आहेत, बंधू आहेत, मित्र आहेत. जे जे सांगतील ते लोक अशी सगळी आपली मंडळी त्यांची जी जी इच्छा असेल, जे जे ते आणखी बोलून दाखवत असतील. 'अनुमोदेत निर्ममः' त्या सर्वांना अनुमोदन देण्याचा एक अभ्यास आहे. चांगलंय, तुमचं म्हणणं योग्य आहे. काय व्हायचं ते क्रमाने होईल म्हणा. म्हणजे आग्रह उपयोग नाही. आग्रहरहित बुद्धी जर ठेवली, तो एक अभ्यास झाला तर संसारी मनुष्यालाही काही दुःखं होणार नाहीत. जे जे काही द्रव्य आहे, त्या द्रव्याचा उपयोग जो आहे. आपण त्याचा भोग घ्यायला हरकत नाही. परंतु अधिक संग्रहाचा प्रयत्न करू नये. आपलं पोषण झालं, तेवढंच आपलं आहे. अधिक मिळालं पाहिजे नुसतं ठेवण्याकरता काय करायचंय? तो स्वतः मालक असून तो चोर ठरतो म्हणाले. साम्यवाद नवीन आत्ता आलेला नाहीये आणि कायद्याने तो सिद्ध होणार नाहीये. हा साम्यवाद आहे खरा. अधिक संग्रह करणारा तोच चोर आहे, असं शास्त्रकार म्हणतात. हे कुणी वाचलेलं आहे आणि कुणी समजून घेतलं आहे? सर्वही प्राणी, केवळ मानवाबद्दल दया आहे असं नाही. केवळ मानवालाच सहाय्य करणार असं नाही. पशु, पक्षी सर्वही आपलेच आहेत. जो जीव आहे त्या जीवाची दुःखं दूर करण्याचा प्रयत्न किंवा त्यांच्याबद्दल दया मनामध्ये असली पाहिजे. धर्म, अर्थ आणि काम तीन पुरुषार्थ आहेत. त्या तीनही पुरुषार्थाचा स्वीकार त्याने करावा. अर्थार्जनही करावं. विषय सेवनही करावं आणि सर्वांनाही आपल्या जवळ जे काही असेल त्यातला विभागही सर्वांनाही द्यावा त्याने. आपणही अतिथीची सेवा करावी. आपल्या स्त्रीलाही आणि अतिथीची सेवा करण्याचा आदेश द्यावा. शरीर हे किती काल आहे म्हणाले. ते पडणार आहे, जाणार आहे. त्या शरीराचा असा उपयोग झाला पाहिजे. यज्ञयागादिक कर्म झाल्यानंतर शिल्लक राहिलेलं जे द्रव्य आहे, धनधान्य वगैरे त्याने आपली उपजिवीका त्याने करावी, सर्व द्रव्य आपलं आहे, सर्व ठिकाणी आपली स्वत्व बुद्धी ठेवू नये. देवांच्या करता, ऋषींच्या करता, मानवांच्या करता, पितरांच्या करता जे द्रव्य मिळविलं असेल त्या

द्रव्याचा उपयोग या सर्वांच्या करता करावा. कदाचित ईश्वरकृपेनं दैवयोगे पुष्कळ संपत्ती मिळाली तर त्या योगाने यज्ञ याग, वगैरे करावेत. आधिदैविक विभाग जो आहे शास्त्रकारांनी सांगितलेला. अनेक देवता आहेत, त्या सर्व देवताही परमेश्वररूपच आहेत. त्यांच्या संतोषाकरता अग्निहोत्र करणं, ऋषीपूर्णमास याग करणं, सोमयाग करणं असे अनेक याग सांगितले आहेत. अग्नीच्या द्वाराने सर्व देवतांना हविर्भाग मिळतो, परमेश्वरालाही तोच भाग मिळतो आहे. यानंतर गृहस्थाश्रमी पुरुषावरती दुसरी एक जबाबदारी आहे, देवता तृप्त होण्याकरता अशी कर्म करावीत. वेदोक्त कर्मं आहेत, स्मार्त स्मृतींनी सांगितलेली कर्मं आहेत, ती करावीत. दुसरा एक विभाग म्हणजे पितरांचा विभाग आहे. ज्या गोत्रामध्ये आपण उत्पन्न झालेलो आहोत, ते जे ऋषी आहेत किंवा आपले पूर्वज पिता, पितामह, प्रपितामह वगैरे हे सगळेही पूर्वज देवता स्वरूपामध्ये विलीन झालेले आहेत. तेव्हा भाद्रपद कृष्ण पक्षामध्ये त्यांच्या तृप्तीकरता त्याने श्राद्ध वगैरे करावे. पुष्कळ श्राद्धाचे काळ आहेत. देवभक्तीप्रमाणे, पितृभक्ती करावी, ती वाढवी म्हणजे त्यांच्या आशिर्वादाने त्यांच्या कल्याण चिंतनाने आपलं कल्याण होतंय. म्हणून पितरांच्या करताही श्राद्ध एकदिवशी आपण करतो. ते सुद्धा झालं तर झालं नाही तर नाही. विसरून राहिलं तर राहिलंच आहे. दक्षिणायन सुरू झालं. उत्तरायण सुरू झालं की त्या दिवशी श्राद्ध करायला सांगितलेलंय. व्यतीपात असलेल्या दिवशी श्राद्ध आहे. क्षयतिथी असलेल्या दिवशी श्राद्ध आहे. चंद्रग्रहणाच्या वेळेला, सूर्यग्रहणाच्या वेळेला. अशी अनेक प्रकारची श्राद्धं आहेत म्हणाले. तर या दिवशी आपल्या पितरांचे आशिर्वाद प्राप्त व्हावेत. कृतज्ञता बुद्धीने श्राद्ध कर्म करायचं आहे. श्राद्धाला काय अमुक इतकंच झालं पाहिजे, असंही नाहीये. पुष्कळ त्यांच्यातही बरेच प्रकार आहेत. यथाशक्ती सगळं आहे तर अशा पवित्र दिवशी स्नान करणं, जप करणं, दान करणं, देवद्विजांचं पूजन वगैरे करणं, पितरांचं वगैरे, हे सगळंही पुण्यसंपादक आहे. त्यानंतर आता तीर्थयात्रेचंही सांगताहेत. गृहस्थाश्रमी पुरुषाला तीर्थयात्रा ही सांगितलेलीय, संन्यासी तर नेहमीच फिरत असतात.

स वै पुण्यतमो देश: सत्पात्रं यत्र लभ्यते ।। ७.१४.२७ ।। श्री. भा.
बिम्बं भगवतो यत्र सर्वमेतच्चराचरम् ।। ७.१४.२८ ।। श्री. भा.

तीर्थं म्हणजे अशी काही ठरलेली आहेत असं नाही म्हणाले. अत्यंत श्रेष्ठ महात्मा ज्या ठिकाणी आहे, तेच तीर्थ आहे. पुण्य देश तो आहे. भगवंताचं स्वरूप आहे. सर्व चराचर भगवत्स्वरूपच आहे. अमुक स्थान चांगलं, अमुक स्थान वाईट असं नाही. ज्या ठिकाणी तपस्वी महात्मे, भगवद्भक्त महात्मे राहाताहेत, हरीच्या मूर्ती वगैरे शिवलिंग, वगैरे ज्या ज्या ठिकाणी असेल त्या

देशामध्ये जावं, पूजन वगैरे करावं गंगादिक नद्या ज्या प्रांतामध्ये वहाताहेत. पुष्कळ सरोवर आहेत. कुरुक्षेत्र आहे, गया आहे, प्रयाग आहे, नैमिषारण्य आहे. त्याचप्रमाणे प्रभासक्षेत्र आहे, वाराणसी आहे, मथुरा आहे, बिंदुसरोवर आहे. नरनारायणानंद आश्रम ही सगळी पवित्र स्थानं आहेत. त्या पवित्र स्थानामध्ये जाऊन आपलं कल्याण होण्याकरता म्हणून त्याने अर्चन करावं, दान करावं, जपजाप्य उपासनाही त्या ठिकाणी करावी. अशी पवित्र स्थानं म्हणजे तीर्थयात्रा ती ही याला सांगितलेली आहे. पितरांचं अर्चन करण्याकरता आणखी थोडसं सांगताहेत नारद. काही कर्मनिष्ठ असतात ब्राह्मण, आपलं आपलं जे काही आचरण असेल ते करत असतात. काही तपस्वी आहेत. वेदाध्ययन करण, वेदप्रवचन करणं, अशा ज्ञानामध्येच निमग्न झालेले काही असतात. ज्ञाननिष्ठांना बोलावून श्राद्ध वगैरे विधी करावा. देवस्थानी दोन ब्राह्मण अथवा पितृस्थानी तीन ब्राह्मण हा एक प्रकार आहे. अथवा दोन्हीकडे एक एक ब्राह्मण म्हणजे दोन ब्राह्मणांना बोलावून श्राद्ध करता येतं. पुष्कळ संपत्ती आहे तरी श्राद्धाच्या वेळेला जास्ती विस्तार नाही. जेवढा विधी असेल तेवढंच व्यवस्थित करायचं. ब्राह्मणाचं पूजन, अन्नदान एवढंच करायला सांगितले आहे. अधिक दाखवण्याकरता संपत्तीचा विनियोग करायचा नाही. विस्तार करायचा नाही. योग्य देशामध्ये योग्य कालामध्ये अन्नदानही करायला सांगितलेलं आहे. म्हणजे धान्य जे आहे त्या धान्याचंच अन्न बनवून ते द्यायला सांगितलेलं आहे. अन्नाचा विभाग देव ऋषी, पितर, सर्व प्राणी, आपण स्वत:, आपले लोक, या सर्वांच्या करता सांगितलेलाय. श्राद्धाच्या वेळेला किंवा इतरही वेळेलाही मांसाहार करू नये. हे ऋषींचं धान्य जे आहे, धान्याने जितकं आणखी परमेश्वराला प्रीति आहे तशीच प्रीती पशु हिंसा करून आणखी मांसग्रहण करून प्रीती नाहीये. अहिंसा हा मोठा धर्म आहे. सधर्मक पुण्य ज्यांना पाहिजे आहे, त्याने हिंसा कधीही करू नये. अधर्माचे पाच प्रकार सांगताहेत नारद महर्षी, विधर्म, परधर्म, आभास, उपमा आणि छल हे अधर्म आहेत. ते धर्मासारखे वाटतात.

धर्मबाधो विधर्मः स्यात् परधर्मो अन्यचोदितः ।
उपधर्मस्तु पाखण्डो दम्भो वा शब्दभिच्छलः ॥ ७.१५.१३ ॥ श्री.भा.

विधर्म म्हणजे आपल्या धर्माचा त्याग. काही अर्थ नाहीये. धर्माचरण करून काय उपयोग आहे. नास्तिक बुद्धी उत्पन्न होऊन धर्मत्याग केला म्हणजे तो अधर्म झालेला आहे. धर्मत्याग केला म्हणजे काही होत नाही असं नाहीये. धर्मत्याग म्हणजे पाप आहे. जास्ती पाप. घोर पातक हा एक अधर्म परधर्म म्हणजे दुसऱ्याला जे काही सांगितलेलंय वागायला, भिक्षा मागावी संन्याशाला सांगितलं आहे. ब्रह्मचाऱ्याला सांगितलं आहे ते गृहस्थाश्रमी पुरुषांनी करू नये. तो अधर्म आहे.

त्यानंतर नास्तिक धर्म जो आहे, आभासात्मक, चांगलं बरं वाटतयं. तो वागतो तसं आपण वागावं पण तो अधर्म होतोय.

शब्दाचे अर्थ वेगळे वेगळे करून आपल्याला अनुकुल असा अर्थ त्यातून काढून वागणे हा ही एक अधर्म आहे. आभासात्मक धर्म म्हणजे आपल्या बुद्धीला जसं वाटेल त्याप्रमाणे धर्म कार्य करणं तो अधर्म आहे. पित्याच्या श्राद्धाकरता घरी काही करत नाही. सध्या ही सवय झाली आहे लोकांना. तुमच्या विद्यालयामध्ये विद्यार्थी जे आहेत, त्यांना अमुक दिवशी तुम्ही जेवायला घाला त्याकरता इतके पैसे मी तुमच्याजवळ ठेवतो. अन्नदान झालं ते पुण्य झालं. पण श्राद्ध गेलेलंय. ते पापही झालं. त्याला श्राद्ध म्हणत नाही. इच्छेने केलेलंय, विद्यार्थ्यांना जेवायला घातलं म्हणजे पित्याला मिळालं हे तुम्ही कस ठरवलं? हा ही आभास म्हणजे अधर्म आहे. असे अधर्म जे आहेत ते सोडले पाहिजेत. त्याचप्रमाणे मला पुण्य कर्म करायचे आहे. मला यज्ञ करायचा आहे. मला उत्सव करायचा आहे. मला यात्रा करायचीय म्हणून कोणाजवळूनही द्रव्य घेऊ नये. याचना करू नये. जायचं नाही यात्रेला. यात्रेला जायचंय म्हणून द्रव्य दुसऱ्याकडून घेऊन जाणं म्हणजे पुण्य तुम्हाला काय लागणार? सगळंच पुण्य त्याला जाणार. संतोषाने निरिच्छ वृत्तीनं रहाणारा जो आहे त्याला जे सुख आहे ते सुख आशा धारण करून सारखा दशदिशेला धावणारा आणि सारखा आणखी कर्म करणारा त्याला बिल्कुल नाही.

सदा सन्तुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः ।। ७.१५.१७ ।। श्री. भा.

नेहमी अंतःकरणामध्ये ज्याच्या संतोष आहे. जैसी स्थिती आहे तैशापरी राहे। ही संतोष वृत्ती. हा अभ्यास ज्याचा आहे, त्याला सर्वही दिशा सुखकारक आहेत. पाणी मिळालं तरी त्याचा संतोष होतोय ना! समाधान मिळतयं. हे विषय जे आहेत हे विषय भोगणं, यामुळे हा जो विषयासक्त झालेला याची अवस्था म्हणजे कुत्र्याप्रमाणे होतो म्हणतात.

'गृहपालायते जनः,' आसक्ती ज्याच्या मनामध्ये आहे त्याच्यामध्ये आणि श्वानामध्ये काही अंतर नाही. असंतुष्ट विप्राचं तेज, विद्या, तप सगळं नष्ट होतंय. काम जो आहे, इच्छा, ह्या इच्छा संपविता येत नाहीत. भूक लागल्याबरोबर खायला मिळावं, व तहान लागल्याबरोबर पाणी मिळावं व हे सगळं जर व्यवस्था उत्तम असेल तर काही इच्छा होणार नाही, कोणी इच्छेला प्रतिबंध केला, की लगेच क्रोध उत्पन्न होतो. पण आपल्या इच्छेप्रमाणे मिळत आहे ना, मग क्रोध तरी कशाला येईल? हे दोन विकार हे असे शांत करता येण्यासारखे आहेत म्हणाले. पण लोभाचा अंत मात्र

कधीही होणार नाही. दशदिशा जिंकलेल्या आहेत. सगळी सत्ता मिळालेली आहे, सगळं धन मिळालेलं आहे. तरीसुद्धा लोभ हा जास्तीत जास्त वाढतो आहे तो थांबविता येणार नाही. या सर्व विकारांना कसं जिंकावं? या करता नारद महर्षी हे धर्मराजाला सांगताहेत.

असमल्पाज्जयेत् कामं क्रोधं कामविवर्जनात् ।
अर्थानर्थेक्षया लोभं भयं तत्त्वावमर्शनात् ।। ७.१५.२२ ।। श्री. भा.

मनामध्ये संकल्प होतो. संकल्प म्हणजे चांगलाय बुवा, हा पदार्थ बरा आहे. हा संकल्प झाल्याबरोबर तो मला मिळावा, न्यायाने नाही तर अन्यायाने. हे सगळं वाढत जातं. संकल्पच कमी झाला तर चांगलं अन् वाईट म्हणायचा काय अधिकार? मनाची ती सवय आहे. इंद्रियांनी डोळ्यांनी फक्त तो दिसतो तो चांगला आहे. संपादन केला पाहिजे, मिळविला पाहिजे. ही सगळी मनाची काम आहेत. त्या मनातला संकल्प जर बंद करता आला तर , काम बंद होतो. इच्छाच संपल्या आहेत आणि काम कमी झाला म्हणजे क्रोध कमी होईल. इच्छा बलवत्तर झाली आणि कोणी प्रतिबंध केल्याबरोबर 'कामात् क्रोधो भी जायते' माझ्या इच्छेच्या विरुद्ध वागणारा त्याच्याबद्दल राग येतोच. ठरलेलंय. काम कमी झाल्यानंतर क्रोधही कमी होतो.

लोभाचंही त्यांनी निवारण करण्याचं साधन सांगितलेलंय.

अर्थ चांगला आहे. संकल्प कमी झाला परंतु चांगला आहे असं नाही. त्याच्यापासून अनर्थ फार आहे. हे पाहिलं पाहिजे. हा विचार केला पाहिजे. किती अनर्थ, झोप नाही, भीती आहे, एकमेकांबद्दल अविश्वास आहे. हे सगळे अनर्थ अर्थापासून उत्पन्न होताहेत. हे जर मनाला पटलं तर लोभ कमी होतो. भीती आहे खरं काय आहे? तत्वचिंतन केलं पाहिजे.

'वाजे पाऊल आपले, म्हणे मागे भूत आले'. समर्थ सांगताहेत. आपलीच पावलं वाजताहेत आणि भूत आलं म्हणून वाटतं. काय खरं काय आहे ? याचा विचार केला म्हणजे भीती हीन होते. शोक, मोह, दंभ. हा दंभ जो आहे – आपण केलेलं पुण्य हे आपल्या मुखानी सांगणं, आत्मधर्म आपल्या मुखानी सांगणं, चांगलं आपण केलेलं आपल्या मुखानी सांगणं, याला दंभ म्हणतात. हा दंभ जाण्याकरता 'महदुपासया' श्रेष्ठ महात्मे यांची संगती धरावी. कितीही परोपकार, कितीही मोठी कामं त्यांच्याकडून घडत असतात सारखी, परंतु कधीही वाणीतून एक शब्द येत नाही. आम्ही इतक याला दिलं. आम्ही इतका उपकार केला. देवाच्या कृपेनं झालेलंय. अशी ही महापुरुषांची संगती झाली की दंभ कमी होतो म्हणाले. आपल्याला लाज वाटते काय मी एवढंस

केलं आणि सांगायला लागलो सगळ्यांना. मी तीर्थयात्रेला जाऊन आलो. मी वारी केली. मी अमुक दान केलं. योगामध्ये येणारी जी विघ्नं आहेत, ती विघ्नंही दूर करता येतात. दयावृत्तीचा अभ्यास झाल्यानंतर भौतिक दुःखं दूर होताहेत. योगाभ्यासाने आध्यात्मिक दुःखं दूर होताहेत. सात्विक आहार विहार ठेवल्यानंतर निद्राही कमी होते. असे सगळे उपाय सांगितले. ह्या प्रत्येक विकृती आहेत, विकार आहेत. कामक्रोध लोभादिक सगळ्या विकारांना या उपायांनी, या अभ्यासाने जिंकता येतं म्हणतात. पण शेवटी नारद सांगताहेत.

एतद् सर्वं गुरौ भक्त्या पुरुषो ह्यञ्जसा जयेत् ।। ७.१५.२५ ।।

गुरुभक्ती, ईश्वरभक्ती जर अंतःकरणामध्ये दृढ उत्पन्न झाली तर त्या भक्तीच्या योगाने हे सर्वही विकार जिंकता येतात. गुरुकृपेनं, ईश्वराच्या कृपेनं ज्ञान देणारे, मार्गदर्शन करणारे जे आहेत श्रेष्ठ ज्ञानी महात्मे सद्गुरु, यांच्याबद्दल ज्याला माझ्यासारखेच हे आहेत शरीरधारी, मलाही शरीर आहे, यांनाही शरीर आहे. यांनाही जेवायला लागतं, मलाही जेवायला लागतं. आपल्याप्रमाणे त्याला मर्त्य समजणारा जो आहे त्यांनी पुष्कळ ऐकलं, पुष्कळ वाचलं, तरीसुद्धा सर्व आणखी व्यर्थ आहे. 'कुञ्जरशौचवत्' सांगताहेत नारद. हत्तीला पुष्कळ स्नान घातलं नदीमध्ये जाऊन त्या माहूताने, स्वच्छ केलं आणि परत येताना एका ठिकाणी चिखल होता. तो चिखल त्या हत्तीने आपल्या सोंडेमध्ये घेतला. आपल्या अंगावर टाकला. त्या स्नान घालणाऱ्याच्या अंगावरही टाकला. काय उपयोग त्याला स्नान घालून ? तसं व्यर्थ आहे. तर अशा प्रकारे चित्तविजय करावा, चित्ताचा निग्रह करण्याकरता हे सगळे गृहस्थाश्रम धर्म आहे. उपोषण आहेत. व्रतं आहेत. वेगळीवेगळी सांगितलेली आहेत. हे निग्रहपर्यवसायी सगळे आहेत.दान आहे. लोभादिक आसक्ती कमी होण्याकरता दान आहे. मिळवायचं, सगळचं माझ असं समजून उपयोग नाही. त्याग हा आसक्तीला प्रतिबंध करतो. प्राणायामाचाही अभ्यास त्याने सांगितलेला असे कुणी भेटले तर त्यांच्याकडून योगाभ्यासाचंही शिक्षण घ्यावं म्हणाले. आत्मचिंतन करण्याचा अभ्यास करावा. वेळ मिळेल तर आणि त्या आत्मचिंतनाने हे विचार शांत करावेत. आणखी सांगताहेत उपाय –

भावाद्वैतं क्रियाद्वैतं द्रव्याद्वैतं तथाऽऽत्मनः ।<br>
वर्तयन्स्वानुभूत्येह त्रीन्स्वप्नान्धुनुते मुनिः ।। ७.१५.६२ ।। श्री भा.

अद्वैत बुद्धीचा अभ्यास, 'भावाद्वैत' हे पहिलं अद्वैत आहे. 'क्रियाद्वैत' आहे आणि 'द्रव्याद्वैत' आहे. याचं स्पष्टीकरण करताहेत.

कार्यकारणवत्स्वैक्यमर्शनं पटतन्तुवत् ।
अवस्तुत्वाद् विकल्पस्य भावाद्वैतं तदुच्यते ।। ७.१५.६३ ।। श्री. भा.

भौतिक पदार्थ सगळे जगामध्ये पुष्कळ आहेत. पंचभूतांपासून तयार झाले. कार्य आणि कारण असे दोन भाग त्यात आले. पंचभूतं मूळ कारण आहेत आणि त्यांच्यापासून सर्वही सृष्टीमध्ये दिसणारे सर्व पदार्थ कार्यात्मक दिसतात पण कार्य निराळे नाहीच, कारणच कार्यरूप झालेलं आहे ना! सोनंच अलंकार बनलेलं आहे. अलंकार वेगळे आहेत. अलंकार चांगले आहेत ही दृष्टी कशाला पाहिजे? कार्य कारण एकच आहे. कारणरूप पहाणं ह्याला भावाद्वैत म्हणतात. मनाच्या समाधानाकरिता, शांतीकरता हा एक अभ्यास उपयोगी आहे. क्रियाद्वैत सर्वही क्रिया एकरूप होतात. पाप पुण्य हा भेद रहात नाही हा एक अभ्यास सांगताहेत.

यद् ब्रह्मणि परे साक्षात् सर्वकर्मसमर्पणम् ।
मनोवाक्तनुभिः पार्थ क्रियाद्वैतं तदुच्यते ।। ७.१५.६४ ।। श्री. भा.

शरीराने, मनाने, वाणीने सारखी कर्मं चालू आहेत अखंड. अनेक जन्म झाले तरी कर्मं बंद होत नाहीत. पण तीच कर्मं त्यांच्यात चांगली असतात, पापही होतं, पुण्यही होतं पण हा भेद केव्हा जातो? तर जी जी कर्मं आपल्या हातून घडताहेत ही सगळी कर्म त्याच्याच प्रेरणेने होताहेत. कर्ता तो आहे. पुण्याच्या वेळेला मात्र मी कर्ता आहे. पापाच्या वेळेला मी नाही. देवाने बुद्धी दिली म्हणून तसं केलं म्हणून आम्ही मोकळे होतो. असं चालणार नाही. सर्वही कर्म त्याची आहेत. ही जर बुद्धी उत्पन्न झाली तर जी कर्मं होताहेत ती सगळी अद्वैत होताहेत. पापपुण्य हा विभाग त्यात रहात नाहीये. चांगले दागिने, चांगला दागिना आणून दिला सोनाराजवळ किंवा सराफाजवळ, वाईट सोन्याचाही दिला, त्याला काही नाही. ते सगळं एक त्या मुशीमध्ये घालून ते सगळं वितळवून पुन्हा नवीन दागिना बनवतोय. त्याला त्याच्याबद्दल काही नाहीये. तिथं चांगलं आणि वाईट सोनं राहिलेलं नाहीये. सगळ एक सोनं होऊन जातं. असं ईश्वराला अर्पण करणारी पापं आणि पुण्यं ही वेगळी राहातंच नाही. शुद्ध होऊन जातं. द्रव्याद्वैत सांगताहेत. हा एक अभ्यास बुद्धिवादी लोकांना करण्यासारखा आहे. आणि पूर्वीची प्राचीन विचारी माणसं कशी होती? हे ही दिसतंय,

आत्मजायासुतादीनां अन्येषां सर्वदेहिनाम् ।
यत् स्वाथकामयोः ऐक्यं द्रव्याद्वैतं तदुच्यते ।। ७.१५.६५ ।। श्री. भा.

मी नोकरी करतो आहे, मी अमूक काम करतो आहे. मी सगळा पैसा मिळविलेला आहे. मी प्रमुख आहे. ही भावना झाली की संघर्ष निर्माण झाला. संपत्ती मिळविणाऱ्या मनुष्याने स्वतःकरताही या द्रव्याचा उपयोग आहे, स्त्रीकरताही आहे, पुत्राकरताही आहे. बाकीचे जे आणखी गरीब असतील, दुःखी असतील त्यांच्याकरताही हे द्रव्य आहे. माझ्या एकट्याच्या प्रयत्नाने मिळालं असं नाही. प्रयत्न आणि प्रारब्ध या दोघांचाही संबंध आहे. प्रयत्नांनी सगळ्यांनाच द्रव्य कुठे मिळतं? एखादाच लक्षाधीश होतो. सगळे का होत नाहीत? प्रयत्न सगळेच करतात. मिळालेलं जातं एखाद्याचं. तर याला कारण एक प्रारब्ध म्हणजे चांगलं कर्म जे आहे पुण्यकर्म, हेही कारण आहे. ही बुद्धी असली पाहिजे. ते पुण्यकर्म माझं एकट्याचचं आहे असा पुन्हा अहंकार उत्पन्न होतो. ही जी सगळीही मंडळी आहेत, प्रपंचामध्ये असलेली घरातली, बाहेरची या सर्वांचंही प्रारब्ध मला अनुकूल झालेलं नाही कशावरून? त्या करता ह्या द्रव्याचं स्वामित्व म्हणा विनियोग सर्वांच्याकरिता व्हायला पाहिजे. ही जर मनामध्ये बुद्धी उत्पन्न झाली तर त्याप्रमाणे आणखी विनियोग होईल. कायद्यानं होणार नाही ते. ही द्रव्याद्वैत भावना मुद्दाम करायला सांगितली आहे शास्त्रकारांनी गृहस्थाश्रमी पुरुषाला. द्रव्य मिळवणारा तो आहे. त्याने ही भावना ठेवली तर समाजाचं कार्य, राष्ट्राचं कार्य आपोआप होऊन जातंय. अशा रितीनं या तीन अद्वैत वृत्तींचा जर अभ्यास झाला संसारातून तो मुक्तच झाला. जागृती स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थेच्या पलीकडे तो गेलेला आहे. तीन अवस्था म्हणजेच संसार आहे. चौथी अवस्था म्हणजे समाधी अवस्था आम्हाला माहितीच नाहीये. तीन अवस्थेमध्येच आपण आहोत. दमल्यानंतर रात्रीच्या वेळेला झोप आहे. स्वप्नावस्था आहे. निद्रा आहे. गाढ झोप आहे. पुन्हा जागृती आहे. याच्यामध्येच आम्ही पडलेलो आहोत. त्याच्यापेक्षा पलीकडची अवस्था प्राप्त करण्याकरता द्रव्याची आसक्ती कमी करावी. सर्वांचं समाधान करावं. त्या समाधानाने सुद्धा पुष्कळ अनुकूलता निर्माण होतीयं. त्याकरता अनुमोदन देण्याची बुद्धी गृहस्थाश्रमी पुरुषांनी शिकावी हे आधीच सांगितलेलंय नारदांनी. संघर्ष करू नये, आग्रह करू नये, आग्रह धरू नये. आपल्या मनानी ठरविलेलं ते योग्य आहे हे कशावरून ? 'बालादपि सुभाषितम्' ही भारतीय संस्कृती आहे. लहान मुलांनी सांगितलेलं ते सुद्धा मान्य करण्याची तयारी पाहिजे. मग दुसरा एखादा त्यागी जर असला, आपल्या राष्ट्राचं काम करणारा त्याच्याबद्दलही आत्मीयता का असू नये? हे एक मानसशास्त्र आहे. स्वतंत्र आहे. भारतीयांचं. त्या शास्त्राचा पूर्ण विचार करा आणखी बुद्धिवाद कोणता योग्य आहे ते विचाराने ठरविता येतयं.

नारद सांगताहेत धर्मराज

एतैरन्यैश्च वेदोक्तैर्वर्तमान: स्वकर्मभि: ।

गृहेऽपि अस्य गतिं यायाद् राजंस्तद् भक्तिभाङ्नर: ।। ७.१५.६७ ।। श्री. भा.

गृहस्थाश्रम स्विकारून रहाणारा जो आहे, त्याने याप्रमाणे वागावं. आणखीही शास्त्राने सांगितलेलं आहे. श्रेष्ठ महापुरुषांनी जसं मार्गदर्शन केलेलंय त्याप्रमाणे वागणारा जो आहे तो आपल्या गृहस्थाश्रमात राहून सुद्धा संन्याशाला जी गती प्राप्त होते, ती त्याला प्राप्त होते. संन्यास न घेता भगवत्भक्तीच्या प्रभावाने. तुमचं उदाहरण आदर्श घेण्यासारखं आहे. नारद सांगताहेत. नारद स्वत: ब्रह्मचारीच आहेत. संन्यासीच आहेत. पण या पांडवांची आणखी प्रशंसा करताहेत. तुम्ही प्रभूंच्या कृपेनं या सगळ्या संकटातून तरून गेलेले आहात. अनेक यज्ञ तुझ्या हातून झाले धर्मराज तेव्हा ही सत्कर्म करावीत. भगवत्भक्ती करावी आणखी मनाचा, इंद्रियांचा निग्रह त्या योगाने होतोय. आणि आपली उन्नती करून घ्यावी. सज्जनांचा उपमर्द कधीही करू नये. श्रेष्ठ पुरुषांच्या गुणाकडे लक्ष द्यावं, दोषाकडे देऊ नये. मी ही पूर्वजन्मामध्ये गंधर्व होतो म्हणाले. उपबर्हण नावाचा गंधर्व. एकदा आणखी देवांचा यज्ञ चालू असताना हरीकथा गायन करण्यासाठी मला बोलावलं पण मी मात्र त्यामुळे सगळ्या स्त्रियांना बरोबर घेऊन मोठ्या उन्मत्त अशा स्थितीमध्ये गेलो. प्रजापति, सृष्टीकर्ते, सृष्टीचे नियंत्रण करणारे त्यांना राग आला, काय म्हणाले नम्रपणाने सगळी मंडळी आली हा आपला उन्मत्त. सगळ्या स्त्रियांच्याबरोबर असा उन्मत्तपणे. त्यानी मला शाप दिला. तू दासी पुत्र होशील. त्याप्रमाणे दासीपुत्र म्हणून मी जन्माला आलो. पण ईश्वरकृपेमुळे त्याही जन्मात मला सज्जनांची संगती मिळाली. आणि त्याही जन्मातून मी मुक्त झालो. ब्रह्मदेवांचा पुत्र म्हणून मी जन्माला आलो. तेव्हा गृहस्थाश्रमी पुरुषाचा जो धर्म आहे. आचारधर्म राजा तुला सांगितलेलाय. पापनाश या योगाने होतोय. संन्याशाला जे फळ मिळतं, जी गती, ती गती गृहस्थाश्रमी पुरुषाला सुद्धा मिळतीय. तुम्ही अत्यंत भाग्यवान आहात पांडव. आम्ही सगळे ऋषी तुमच्या घरी मुद्दाम येतो. भगवंतांचं दर्शन आम्हाला या ठिकाणी होतयं. साक्षात् भगवान परब्रह्म परमात्मा, मनुष्य शरीर धारण करून आलेला आहे. तुमच्याजवळ तो रहातो. तुमच्याबद्दल त्याला फार प्रेम वाटतंय कारण तुम्ही धार्मिक आहात. धर्माचरण करणारे आहात. म्हणून देवाचं प्रेम तुमच्यावरती आहे. ब्रह्मदेव, लक्ष्मी सनतकुमारादिक वगैरे यांनासुद्धा परमेश्वराचं काही कळत नाही म्हणाले. त्याची तुम्ही भक्तीनं आणि पूजा करता, त्याचा प्रसाद तुम्ही संपादन केलेला आहे.

शुकाचार्य सांगताहेत राजा, देवऋषी नारदांनी चार वर्णाचे आणि चार आश्रमाचे आचारधर्म धर्मराजाला याप्रमाणे त्याला कथन केले. पूजा केली धर्मराजाने त्यांची. अत्यंत आदरबुद्धी मनामध्ये उत्पन्न झालेली आहे. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याची, धर्मराज यांची अनुज्ञा घेऊन नारदमहर्षी निघून गेले. धर्मराजालाही अत्यंत समाधान झालेलंय. याप्रमाणे दक्षकन्यांचे वंश. कोण कोण मोठे मोठे झाले हे सगळं खुलासा घेतलेला आहे.

स्वायंभुव मनुचा वंश राजाने ऐकला त्यांच्या कन्या काय झाल्या? त्यांच्यापासून काय झालं हे सगळं ऐकलंय. आता आणखी जे मनु आहेत झालेले हा आदिराजा मनु याचं चरित्र सांगितलं. आणखीही मनु पुष्कळ झालेलेत. ब्रह्मदेवांचा एक दिवस म्हणजे चार हजार युगं इतका काळ आहे. इतकं दीर्घ आयुष्य ब्रह्मदेवांना मिळालेलं आहे. काम करण्याकरता नेमलेली जी मंडळी आहेत, ईश्वराने, त्यांची व्यवस्थाही अशी करून ठेवली आहे. एकदम हृदयक्रिया बंद पडली आणखी गेला असं नाही. अधिकारी मोठा, कायम रहाणारा पाहिजे. ब्रह्मदेवांना सृष्टी करण्याचं काम दिलेलं आहे. त्यांना इतकं आयुष्य दिलेलंय. एक शतकं आयुष्य दिलेलंय.एक्काहत्तर युगं इतका एकेक मनुला काल आहे म्हणाले. असे चौदा मनु होताहेत. पहिल्या मनुचं चरित्र सांगून दिलेलंय. त्याच्यानंतर त्याची कन्या देवहुती यांच्यापासून भगवंतांनी जन्म घेतला, कपिलमुनींचं चरित्र आधी सांगीतलेलं आहे. दुसरा अवतार म्हणजे यज्ञ नावाचा अवतार आहे. मनुराजा हा तपश्चर्या करण्याकरता आपल्या पत्नीला बरोबर घेऊन वनामध्ये गेला. तपश्चर्या चालू आहे. भगवंताची प्रार्थना चालू आहे. चिंतन चालू आहे. इतक्यात काही राक्षस, दैत्य हे त्याला मारण्याकरता धाऊन आले. मनुराजाचा नातू, मुलीचा मुलगा यज्ञ हा अवतार भगवंताचा, त्यानी लगेच त्याठिकाणी येऊन त्या दैत्यांचा नाश केलेलाय. सर्वही देवांना संरक्षण दिलेलं आहे. आणखी मनुराजाचही संरक्षण केलं.

दुसरा मनु झालेलाय स्वारोचिष. त्यालाही मुलं झाली. रोचन नावाचा इंद्र त्या ठिकाणी त्या मन्वंतरामध्ये झालेलाय. आणखी विभू नावाचा भगवंतांचा अवतार त्या मन्वंतरामध्ये झाला. प्रत्येक मन्वंतरामध्ये एक एक इंद्र आहे. एक एक भगवंतांचा अवतार आहे. इंद्राला साहाय्य करणं, सर्व देवांचं संरक्षण करणं ही कार्यं ते करतात. हा विभू नावाचा जो अवतार झाला त्यांच्याजवळ राहून ८८ हजार ऋषिंनी ब्रह्मचर्य व्रत कसं आहे? त्याचं फल काय आहे? त्याचं साधन काय आहे? स्वरूप काय आहे? हा सगळा अभ्यास केला म्हणे. ब्रह्मचर्य म्हणजे यज्ञ आहे. हा सगळा अभ्यास त्यांच्याजवळ केला.

तिसरा मनु उत्तम नावाचा आहे. प्रियव्रताचा पुत्र. वसिष्ठाची सात मुलं. हे ऋषी त्यावेळेला आहेत. प्रत्येक मन्वंतरामध्ये सप्तऋषी वेगवेगळे आहेत. एक्काहत्तर युगं मनुराजा आहे. त्याचे पुत्र आहेत. इंद्र आहे. हे सप्तऋषी प्रत्येक मन्वंतरामध्ये वेगवेगळे असतात. सत्यसेन नावाचा भगवंतांचा अवतार त्या मन्वंतरामध्ये झाला. अनेक यक्ष, राक्षस जे आहेत दुर्जन, सर्वांचा द्रोह करणारे त्यांचा त्यांनी नाश केलेलाय. इंद्राला सहाय्य केलेलंय. चौथा उत्तमाचा बंधू मनु तामस नावाचा झालेला आहे. त्या मन्वंतरामध्ये देवही अनेक झाले. इंद्र झाले. आणखी हरी नावाचा अवतार त्या मन्वंतरामध्ये झाला.

'येन गजेन्द्रो मोचितो ग्रहात्' ।। ८.१.३० ।। श्री. भा.

त्या हरींनी त्या मन्वंतरामध्ये गजेंद्र संकटामध्ये सापडलेला असताना मगरापासून त्याचं संरक्षण केलं. हे ऐकल्याबरोबर परीक्षित राजाने विचारलं, महाराज हे गजेंद्रमोक्षआख्यान मला सांगा. कसं हे पुण्यकारक आख्यान आहे. त्याला मुक्त कसं केलं? हे सर्व मला सांगा. शुकाचार्य म्हणतात.

आसीद् गिरिवरो राजंस्त्रिकूट इति विश्रुतः ।
क्षीरोदेनावृतः श्रीमान्योजनायुतमुच्छ्रितः ।। ८.२.१ ।। श्री.भा.

क्षीरसमुद्रामध्ये एक त्रिकूट नावाचा मोठा पर्वत आहे. चारी बाजूला क्षीरसमुद्र आहे. मोठा उंच आहे. पसरलेलाय सर्व बाजूंनी. अनेक रत्नं त्याच्यामध्ये आहे. त्याच्यावरती आणखी मोठी मोठी अरण्यं आहेत. त्यापैकी एका अरण्यामध्ये एक मोठा गजेन्द्र राहतो आहे. तिथे पुष्कळ हत्ती आहेत. हत्तीणी आहेत. लहान लहान हत्ती आहेत. पुष्कळ त्याचा कळप होता. तो त्या अरण्यामध्ये गजेन्द्र फिरतो आहे. सगळीही हरीणं वगैरे जी आहेत ही त्याच्या जवळ येऊन राहिलेली आहेत. सिंहाची, वाघाची त्यांना काहीही भीती नसायची. गजेन्द्राच्या भीतीनं सिंह, वाघ दुसरीकडं पळून जात होते. असा त्याचा धाक होता. तो गजेन्द्र एकदा उन्हाळा असल्यामुळे त्याला तहान लागलेली आहे. मोठं एक सरोवर त्याला समजलेलं आहे. त्या सरोवरामध्ये पाणी पिण्याकरीता तो गजेन्द्र आलेला आहे. आत उतरून तो पाणी प्याला. पाणी प्यायल्यानंतर वर यायचं. तिथच पाण्यामधे राहून आपल्या सोंडेमध्ये पाणी घ्यावं आणि तीरावर उभे राहिलेले हत्ती, लहान हत्ती, स्त्रिया वगैरे हत्तीणी सगळ्यांच्या अंगावर तो पाणी टाकायला लागला. काय संकट आपल्यावर आलेलं आहे इकडं त्याचं लक्ष गेलेलं नाही. त्याच सरोवरामध्ये मोठा एक मगर रहात होता. हत्ती पाण्यामध्ये उभा

आहे. सोंडेनं पाणी टाकतो आहे. त्या मगराने जाऊन एकदम त्याचा पाय आपल्या मुखामध्ये धरला आणि त्याला आत ओढायला सुरुवात केलेली आहे. तो मोठा बलवान मगर आहे. हत्तीनेही वर येण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. हत्तीही बलवान आहे. तो मगरही बलवान आहे. एखाद्या वेळेला हत्तीने बरच वर यावं. पुन्हा त्या मगराने त्याला आत ओढून न्यावं. तीरावर उभे राहिलेले सगळे हत्ती, हत्तीणी, ती लहान–लहान हत्तीची मुलं सगळी दुःखी झालेली आहेत. ह्याची सुटका आता कशी करायची ? बाहेर येण्याचा प्रयत्न तो गजेन्द्र करतो आहे. आत त्याला ओढून नेण्याचा प्रयत्न तो मगर करतो आहे. किती काळ गेला असेल राजा ?

समाः सहस्रं व्यगमन् महीपते ।।८.२.२९ ।। श्री. भा.

एक हजार वर्षाचा काळ गेलेला आहे. दोघेही शक्तिसंपन्न आहेत. सर्व देवांनासुद्धा आश्चर्य वाटलं की काय याचं बल आहे. सामर्थ्य आहे. परंतु शेवटी गजेन्द्र हा काही जलचर प्राणी नाहीये. बाहेर राहणारा आहे. त्याची शक्ति कमी कमी झाली. आणखी तो आत आत ओढू लागलेला आहे मगर. आणि हा आत जायला लागला. बाहेर येण्याची शक्ति त्याची संपलेली आहे. आपण आपली सुटका करून घेऊ शकत नाही ही खात्री त्या गजेन्द्राला झाली. हे माझ्या बरोबर आलेले हे गज मोठे मोठे आहेत पण तेही मला मुक्त करू शकत नाहीत. हा मगर म्हणजे सृष्टीकर्त्याचा पाशच आहे. तो मला घेऊन जाणार आहे. सर्वही विश्वाला उत्पन्न करणारा, संरक्षण करणारा, सर्व सत्ताधीश जो आहे त्यालाच आपण शरण गेलं पाहिजे. तोच माझं संरक्षण करण्याला समर्थ आहे. असा अत्यंत आर्त झालेला भक्त आहे. संकटामध्ये सापडलेला. त्याने भगवंताची स्तुती त्यावेळेला केली. मनामध्ये भगवंताचं स्वरूप आणलेलं आहे. आणि तो स्तुती करतोय.

ॐ नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ।
पुरुषाय आदिबीजाय परेशाय अभिधीमहि ।।८.३.२ ।। श्री. भा.

भगवान श्रीहरी जो परमात्मा आहे, सर्वव्यापी, सर्व विश्वाला कारण असणारा, त्या परमेश्वराचं मी ध्यान करतो आहे, चिंतन करतो आहे, आवाहन करतो आहे. संपूर्ण विश्व ज्याच्या अधिष्ठानामध्ये आहे, ज्याच्या आधाराने चाललेलं, सर्व लोकांना सर्व विश्वाला उत्पन्न करणारा संरक्षण करणारा, संहार, पुन्हा उपसंहार करणारा असा तो परमात्मा आहे. त्याच्या कृपेने मी या संकटातून मुक्त व्हावं असंही तो सांगतो आहे. त्यांनी माझ्यावर दया करावी आणि मला या मगराच्या पाशातून मुक्त करावं. तो अत्यंत दयाळू आहे. सर्वांचं संरक्षण करणारा आहे. हे या संसारामध्ये आसक्त झालेले

लोक त्यांना त्याची प्राप्ती होत नाही. मुक्त ज्यांचं चित्त आहे त्यांच्या हृदयामध्येच तो परमात्मा प्रकाशित होतो आहे. त्याला माझा नमस्कार असो. अशी पुष्कळ स्तुती केलेली आहे. परमेश्वराची स्तुती गजेन्द्राने केली. पुनर्जन्म मानल्याशिवाय आपल्याला याचा विचार करता येत नाही. हत्तीनं स्तुती कशी केली ? आणि ही अशी स्तुती ? सर्व विश्वाला जो आधार आहे; सर्वांचं काय करणारा सर्वव्यापी, सर्वज्ञ हे ईश्वराचं स्वरूप जाणून तो करतो आहे. म्हणजे गजेन्द्राला ही बुद्धी कशी उत्पन्न झाली ? त्यांनी अशी स्तुती केल्यामुळे देव कुणी आले नाहीत. प्रत्येकाला आपल्या नावाचा, रूपाचा अभिमान आहे. माणसालाच आहे असं नाही. देवांनाही आहे. कारण देवही जीवच आहे. त्यांना वाटलं आपल्याला कुठे यानं बोलावलेलं आहे. ते आले असते तर ते याला मुक्त करू शकले असते. आम्हाला बोलावलं नाही म्हणाले आम्ही कशाला जायला पाहिजे. याने सामान्य आवाहन केलं. सर्व स्वरूपी जो परमात्मा आहे त्याने मला मुक्त करावं. मग सर्वरूपी सर्वात्म स्वरूप असणारा परमात्मा श्रीहरी गरुडावर बसून आलेले आहेत. आकाश मंडळामध्ये आलेले आहेत. मगराने त्या गजेन्द्राला आत घेतलेलं आहे. आता बुडून जाणार गजेन्द्र. इतक्यात आकाश मंडळामध्ये भगवान श्रीहरी आलेले पाहिले. त्या सरोवरामध्ये असलेलं कमळ आपल्या सोंडेनं घेतलं त्याने आणखी नारायणाला अर्पण केलेलं आहे.

नारायणा अखिलगुरो भगवन् नमस्ते ।।८.३.३२ ।। श्री. भा.

शेवटचा नमस्कार देवा मी आपल्याला करतो आहे. हे कमलपुष्प आपण घ्या. लगेच भगवंतानी त्याला उचलून वर ठेवलं. गजेन्द्राला उचलल्या बरोबर तो मगरही वर आला. त्याचा पायच धरला होता त्याने. तीरावर ठेवलं आणि सुदर्शन चक्राने त्या मगराचा नाश केला. गजेन्द्रालाही भगवंतांचा हस्तस्पर्श झाल्यामुळे तो ही हत्तीच्या जन्मातून मुक्त झाला आणि विष्णुदूताचं स्वरूप त्याला प्राप्त झालेलं आहे. तो मगरही त्या जन्मातून मुक्त झालेला आहे. तो गंधर्व होता पूर्वी. हूहू नावाचा गंधर्व. त्याने सांगितलं देवा पूर्वी एकदा ऋषी स्नान करीत असताना त्या ऋषींना मी पाण्यामध्ये जाऊन पाय ओढले त्यांचे. त्यांच्या नाकातोंडातून पाणी गेलं. त्यांनी मला शाप दिला की तू मगर होशील. त्या शापातून आपण मला मुक्त केलेलं आहे. गजेन्द्रही मुक्त झालेला आहे. त्या गजेन्द्राला बरोबर घेऊन भगवान श्रीहरी वैकुंठ लोकाला गेलेले आहेत. असं हे आख्यान निवेदन केलेलं आहे. त्याच्या पुढं रैवत मन्वंतर आहे.

पंचमो रैवतो नाम मनुः ।।८.५.२ ।। श्री. भा.

त्याही वंशामध्ये त्या मन्वंतरामध्ये 'वैकुंठ' नावाचा अवतार भगवंतांनी धारण केलेला आहे. आणि त्यांनीच लक्ष्मीच्या इच्छेप्रमाणे 'वैकुंठ' लोकाची रचना केली. वैकुंठ लोक म्हणतात. परंतु 'वैकुंठ' हे परमेश्वराचं नाव आहे. त्याच्यामुळे वैकुंठ लोक असं नाव झालं. त्यांनी काय काय केलं? सनत्कुमारांनी येऊन जयविजयांना शाप दिला. त्या वैकुंठलोकि. भगवान विष्णूंनी सनत्कुमारांनाही आश्वासन दिलं आणि तीन जन्मांनी पुन्हा ते जयविजय आले. पूर्वी त्यांचे चरित्र राजा सांगितलेलं आहे.

सहावा मनू 'चाक्षुष' नावाचा आहे. या चाक्षुष मन्वंतरामध्ये इंद्र झालेला आहे, मंत्रद्रुम नावाचा. सप्तऋषीही त्या ठिकाणी आहेत. वैराजाची संभूती नावाची स्त्री. तिच्यापासून भगवंतांचा जो अवतार झाला तो 'अजित' नावाचा अवतार झालेला आहे. त्या अजित परमात्म्याने देवदैत्यांना एकत्र करून समुद्रमंथन केलेलं आहे. समुद्रमंथन करीत असताना तो डोंगर समुद्रामध्ये बुडू लागला. पुन्हा कूर्मरूप धारण केलं. आपल्या पाठीवर तो पर्वत घेतलेला आहे. आणि समुद्र मंथन करून अमृत प्राप्त करून दिलं देवांना. राजानी विचारलं, महाराज हे समुद्रमंथनाचं जे आख्यान आहे, चरित्र आहे भगवंताचं ते आपण मला सांगा म्हणाले. ऐकायचं आहे. भगवंतांची लीला कितीही ऐकली तरी मनाचं समाधान होत नाही. सांगा.

शुक सांगतात राजा, देवदैत्यांची लढाई नेहमी असायची. कोणाचा विजय व्हायचा. कोणाचा पराजय व्हायचा. पराजय झाल्यानंतर पुन्हा त्यांनी प्रयत्न करून पुन्हा लढाई करायची. एकदा देवांचा पराजय दैत्यांनी केलेला आहे. दुर्वासऋषींचा शापही देवांना झाला. आणि आपल्या गुरूंना म्हणजे शुक्राचार्यांची सेवा करून बलवान झालेल्या दैत्यांनी देवांचा पराजय केला. निःस्तब्ध झाले सगळे, तेजोहीन सगळे देव झालेले आहेत. भगवान श्रीहरींची कृपा संपादन करावी म्हणून तिकडं गेले. देवाची प्रार्थना करताहेत. मेरुपर्वतावरती ब्रह्मदेवांच्या सभेमध्ये जाऊन त्यांनी सर्व वृत्तांत निवेदन केला. मग ब्रह्मदेव त्यांना घेऊन आलेले आहेत. भगवान श्रीहरीची स्तुती ब्रह्मदेवांनी केलेली आहे. ती मोठी स्तुती आहे. सर्वांना आणखी ज्याच्या कृपेनं आणखी पूर्ण संपन्नता लाभते आहे. सर्वही एकंदर मोठी मोठी देवरूप काय? गंधर्वरूप काय? मानव. सगळी रूपं तो झालेला आहे. त्यांनी आमच्यावरती प्रसन्न व्हावं आमची संकटं दूर करावीत.

प्रसीदतां नः स महाविभूतिः ।।८.५.३६ ।।श्री. भा.

अशी मोठी स्तुती आहे. प्रसन्न झाले भगवान. त्यावेळेला दर्शन त्यांचं झालं. सर्व देवांना, ब्रह्मदेवांना आनंद झाला. पुन्हा ब्रह्मदेवांनी स्तुती केली. आणि भगवान श्रीहरी बोलू लागले. 'देवहो मी सांगतो त्याप्रमाणे आपण वागा म्हणाले.

यात दानवदैतेयैस्तावत् सन्धिर्विधीयताम् ।।८.६.१९ ।। श्री. भा.

तुम्ही दैत्यांच्याकडे चला आणि त्यांच्याबरोबर संधी करा. तह करा. युद्ध थांबवा. काल अनुकूल आहे दैत्यांना. आज तुम्हाला काल अनुकूल नाहीये. तुम्ही नम्रपणाने त्यांच्याजवळ जाऊन युद्ध बंद करा. शत्रुबरोबर सुद्धा संधी करायला पाहिजे म्हणाले, राजनीती आहे. आपलं कार्य हे सिद्ध होण्याकरता, कार्य पूर्ण होण्याकरता, शत्रुबरोबरही मैत्री करावी लागते. काम झाल्यावर पुढे कसं वागायचं ते ठरवायचं. आता प्रथम असं करा. सर्व दैत्यांशी तुम्ही मैत्री करा आणि तुम्ही दोघांनी मिळून अमृत उत्पन्न करण्याचा प्रयत्न करा. कसं अमृत उत्पन्न करायचं ? याची कर्तव्यता सांगातहेत. क्षीरसमुद्रामध्ये सर्वही औषधी वनस्पती टाका, मंदारपर्वत घेऊन या, घुसळण्याकरता. वासुकी नागराज त्याला वेष्टन करा. आणि तुम्ही दोघांनी मिळून हे अमृत उत्पन्न होण्याकरता समुद्रमंथन करा. माझं तुम्हाला सहाय्य आहेच म्हणाले. त्यांना अमृत मिळणार नाही. तुम्हालाच मिळेल. दैत्य जी जी इच्छा प्रकट करतील त्याला तुम्ही अनुमोदन द्या. समुद्रातून उत्पन्न झालेल्या कोणत्याही वस्तूबद्दल मला पाहिजे असं म्हणू नका. दैत्यांनी नेलं तर नेऊ दे. साममार्गाने कार्यसिद्धी ही फार उत्तम होते. क्रोधाने सिद्धी होत नाहीये हे लक्षात ठेवा. कदाचित समुद्रातून कालकूट विषही वर येण्याचा संभव आहे. पण भिऊ नका. असं सगळं समजाऊन सांगितलं भगवंतांनी. गुप्त झाले. ब्रह्मदेवांनी सर्व देवांना सांगितले. भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे करा. सर्वही इंद्रादिक देव बळीराजा आपल्या दैत्य सैन्यासह ज्या ठिकाणी तळ ठोकून बसला होता तेथे आलेले आहेत. इंद्रादिक देवांना आलेले पाहिल्याबरोबर ते दैत्य एकदम उठले. बरं झालं म्हणाले. कैद करू या इंद्राला. दैत्य राजा बळी हा मोठा नीतीशास्त्रज्ञ होता. हे नि:शस्त्र आलेले आहेत देव. अर्थात हे काही युद्धाकरता आलेले नाहीत. त्यांनी आपल्या सर्व दैत्यांना सांगितलं स्वस्थ रहा. हे आता नि:शस्त्र आलेत त्या अर्थी संधी करण्याकरता आलेले आहेत. युद्धाकरता आलेले नाहीत. हे लक्षात घ्या. आणि स्वस्थ रहा. या म्हणाले त्यांनी सर्वांचा आदर केलेला आहे. मग इंद्रांने बोलायला आरंभ केलेला आहे. आणि सगळं त्याने सांगितलं. आपण दोघे मिळून क्षीरसमुद्राचं मंथन केलं म्हणजे आपल्याला अमृत मिळेल म्हणाले. दोघांनाही अमृत मिळेल. तुमचीही शक्ती वाढेल. आमचीही वाढेल. सर्वांना पसंत पडलं ते. मग देव-दैत्यांनी त्याप्रमाणे ठरवून मंदरपर्वत त्यांनी उपटलेला आहे आणि घेऊन निघाले

समुद्राकडे. पण एवढा मोठा पर्वत तो घेऊन जायचा म्हणजे काय किती श्रम झाले? पडला तो खाली नेताना. त्याच्या खाली काही सापडले. कोणाचे हात पाय मोडले. भगवान त्या ठिकाणी प्रकट झालेले आहेत. सर्वांना आणखी पुन्हा जीवन दिलेलं आहे. तो पर्वत उचलून गरुडावर ठेवलेला आहे. आणि समुद्रतीरावर येऊन तो समुद्रामध्ये सोडून दिलेला आहे. नागराज वासुकीला देव–दैत्यांनी बोलावलेलं आहे. तुम्हालाही काही अमृताचा भाग देऊ म्हणाले. आला तो वासुकी. तो सबंध त्या पर्वताला गुंडाळलेला आहे. समुद्राचं मंथन करायचंय. त्याला लागणारा रवी म्हणजे मंदरपर्वत आणि रवीला बांधलेली, गुंडाळलेली दोरी म्हणजे नागराज एवढा मोठा वासुकी. तो गुंडाळल्यानंतर त्या नागाच्या मुखाची बाजू भगवान श्रीहरींनी सर्व देवांना बरोबर घेऊन गेले आणि मुखाची बाजू आपल्या हातात घेतली आणि पुच्छाची, शेपटाची बाजू दैत्यांनी घ्यावी म्हणून ते मुखाकडे जाऊन उभे राहिले. ते म्हणाले हे सापाचं पुच्छ आम्ही हातामध्ये घेणार नाही. अमंगल आहे. आम्हाला मुखाची बाजू पाहिजे. प्रत्येक वेळेला तक्रारी स्वभाव दैत्यांचा आहे.

देवांना ताकीद केली होती अगोदर भगवंतांनी. जी जी इच्छा प्रकट करतील दैत्य त्याप्रमाणे वागा तुम्ही. तुमचे काम होईल. आम्ही म्हणाले कश्यप ऋषींची मुलं आहोत. तपस्वी आहोत आम्ही, वेदाध्ययन केलेलं आहे. ते सापाचं पुच्छ आम्ही हातात घेणार नाही. लगेच त्या मुखाची बाजू भगवंतांनी सोडली. देवांना घेऊन ते लगेच पुच्छाच्या बाजूला गेले. हातामध्ये मुख धारण केलं दैत्य त्या मुखाच्या बाजूला, पुच्छाच्या बाजूला देव राहिलेले आहेत. मंथनाची तयारी झाली. आणि मंथनाला सुरुवात झालेली आहे. पण ते दैत्य म्हणजे अविचारी. ते मंथन, घुसळण्याचं काम सुरू झाल्याबरोबर त्या नागाच्या मुखातून श्वासोच्छ्वास बाहेर पडायला लागले. तो विषारी वारा त्या दैत्यांच्या अंगावर गेला. दैत्य मूर्च्छित पडलेले आहेत. आता आम्हाला ही बाजू नको असं म्हणताही येत नाही ना. अहंकार आहे. पूर्वीच त्यांना पुच्छाची बाजू दिली होती. मग भगवंतांच्या कृपेनं. वारा सुटला गार. पर्जन्यवृष्टी झाली. सगळे सावध झाले दैत्य. ते मंथन सुरू झाले असताना भगवान स्वत: ते त्यांनी हातामध्ये घेतलं. सहस्त्रबाहुरूप धारण केलं आणि मंथन चालू आहे. त्या वेळेला एकदम समुद्रातून वरच्या बाजूला विष आलेलं आहे. त्या विषाचा वारा अंगावर आल्याबरोबर देव, दैत्य मूर्च्छीत पडले. त्यांनी हातातला साप सोडून दिला आणि लांब पळून गेलेले आहेत. काय करायचे आता? आरंभालाच ही परिस्थिती. अमृत राहिले बाजूला आणि विषच वर आले. जाताही येईना समुद्राच्या जवळ. मग ऋषीमंडळी, देवमंडळी कैलास पर्वतावर गेलेली आहेत. महादेवांना नमस्कार केला. देवा आम्ही सगळे शरण आलेले आहोत तुला. हे त्रैलोक्याला दग्ध करणारे विष उत्पन्न

झालेले आहे. या विषापासून आपण याचे रक्षण करा. त्रैलोक्याचे रक्षण करा. अमृतमंथनाच्या वेळेला शंकरांची आठवण झाली नाही. विष उत्पन्न झाल्यानंतर आठवण झाली. पण आलेले आहेत महादेव. त्यांचे दुःख दूर करायचे म्हणून शंकर उठलेले आहेत. पार्वतीला विचारले, जाऊ का? यांचे हे संकट दूर करायचे म्हणजे विष खायचे आहे. रक्षण करायचे आहे. ते अमृत नाहीये. पार्वती कशाला प्रतिबंध करते. शंकर म्हणजे मोठे योगी आहेत. मृत्युंजय आहेत. त्यांना विषाची काही बाधा होणार नाही. खात्री आहे. तिनेही संमती दिलेली आहे. दीन जनांचं संरक्षण करणं हा श्रेष्ठ पुरुषांचा धर्म आहे. भगवान शंकर सांगतात. आलेले आहेत. हे विष मी घेणार आहे. सर्व प्रजाजनाचं कल्याण होऊ दे. ते विष घेतलं हातामध्ये आणि संबंध विष भक्षण केलेलं आहे. काही थोडं खाली पडले. त्याच्या विषारी वनस्पती, मोठे मोठे विंचू, सर्प झालेले आहेत. त्या भयंकर हलाहल विषाने शंकरासारख्या योगीश्वरालादेखील आपला प्रभाव दाखवलेला आहे. त्या विषाने ते भक्षण करीत असताना त्यांचा कंठ काळा झाला म्हणतात. त्यामुळे 'नीलकंठ' हे नाव झालेले आहे. कर्पूरगौर भगवान आहेत.

कर्पूरगौरं करुणावतारम्

गौरवर्ण भगवान शंकरांचा आहे, भगवान विष्णूंचा वर्ण श्यामवर्ण आहे. विषाचं संकट भगवंतांनी दूर केलेलं आहे. पुष्पदंतांनी त्या महिम्न स्त्रोत्रामध्ये ह्या चरित्राचं वर्णन केलेलं आहे.

अकांड ब्रह्मांड क्षय चकीत देवासुरगणा।

ब्रह्मांडाचा क्षय होण्याची पाळी आलेली आहे. हे आपल्याला शरण आले सगळे देव आणि आणि आपण ते विष भक्षण केलं आणि सर्व देवांचं सर्व जगाचं रक्षण आपण केलेलं आहे.

विधेयस्यासीघस्त्रिनयन विषं संहृतवतः।
स कल्माषः कण्ठे तव न कुरुते न श्रियमहो॥
विकारोऽपि श्लाघ्यो भुवनं भयभङ्गव्यसनिनः॥ महिम्नस्तोत्र॥

पुष्पदंत म्हणताहेत, भगवंता, देवांच्या संरक्षणाकरता आपण गेलात. काही आशा नाही. देव दैत्य अमृत मिळवणारेत. पण तिकडे आपलं लक्ष नाही. त्यांचं संकट दूर करणार. ते विष आपण भक्षण केलं पण त्या विषाने आपला कंठ काळा केला म्हणाले पण ते पोषण झालेलं आहे.

विकारोऽपिश्लाघ्यो भुवनभयभङ्गव्यसनिनः।

सर्व त्रैलोक्याचं संकट दूर करावं हे तुम्हाला व्यसन आहे म्हणाले. शंकर परमात्मा संहार

करणारे आहेत. अशी समजूत आहे. अत्यंत दयाळू आहेत. त्यांनी सगळ्या जगाचं संरक्षण केलेलं आहे. तुमचा कंठ काळा झाला हे तुमचं भूषण आहे. सगळ्या लोकांच्या पुढं हे चरित्र आपलं येतय ना! की एका वेळी जगाला तुम्ही वाचवलं. संकट दूर झाल्यानंतर सर्व देव-दैत्य पुन्हा गेले समुद्रतीरावर. पुन्हा त्यांनी मंथनाला सुरुवात केली. एक कामधेनू वर आलेली आहे. ऋषी मंडळींनी ती कामधेनू आपल्या जवळ घेतली. आम्हाला सगळं अग्नीहोत्र वगैरे करण्याला दूध, दही, तूप वगैरे लागतं म्हणाले. त्यांनी ती घेतलेली आहे. उच्चैश्रवा नावाचा मोठा अश्व वर आलेला आहे. तो उत्तम अश्व पाहिल्याबरोबर बळीराजाला इच्छा उत्पन्न झाली की हा अश्व आपल्या सानिध्यामधे असावा. इंद्र स्वस्थ बसलेला आहे. काही बोलला नाही. बळीराजाने तो अश्व घेतलेला आहे. ऐरावत नावाचा मोठा हत्ती उत्पन्न झालेला आहे. चार दात ज्याला आहेत. पांढरा शुभ्र हत्ती आहे. कौस्तुभरत्न उत्पन्न झालेलं आहे. पारिजात वृक्ष उत्पन्न झाला. स्वर्गलोकाचं भूषण कल्पवृक्ष. अप्सरा सगळ्या उत्पन्न झालेल्या आहेत. स्वर्गलोकातल्या सर्व त्या स्त्रिया. आणि नंतर लक्ष्मीदेवी उत्पन्न झाली. समुद्रातून बाहेर पडलेली आहे. सर्व देव दानव मोहीत झालेले आहेत; लक्ष्मीचं स्वरूप पाहिल्यानंतर कुणी तिला आसन आणून दिलेलं आहे. कोणी आणखी तिला अभिषेक करण्याकरता जल सर्व नद्यांनी आणून दिलेलं आहे. सर्व ऋषी मंडळींनी, देवांनी तिला अभिषेक केलेला आहे. अलंकार दिलेले आहेत विश्वकर्म्याने. तिची पूजा-अर्चा सर्वांनी केली. लक्ष्मीदेवी आता आपण कोणाच्या गळ्यात माळ घालावी, कोणाचा स्वीकार करावा, असा विचार करतीय.

निराश्रया न शोभन्ते पण्डिता वनिता लता ।।

हा मनूचा सिद्धांत आहे. आश्रयाशिवाय स्त्रियांना शोभा नाहीये. संबंध राहू शकतील पण शोभा नाहीये. हे मुद्दाम सांगितलेले आहे. न शोभन्ते म्हणताहेत. न जीवन्ती म्हणत नाहीत. जिवंत राहतील त्या पैसा मिळवून पण नाही. आपल्याला योग्य कोण आहे? आश्रय शोधण्याकरता पुष्पमाला हातामध्ये घेऊन लक्ष्मीदेवी निघालेली आहे. पहिल्याप्रथम दुर्वास ऋषी तिच्या दृष्टीला पडले देवीच्या. काय तपश्चर्या आहे. सगळे जग बदलून टाकण्याचं सामर्थ्य आहे. कुंतीला नुसते मंत्र दिलेले आहेत. सूर्यमंत्राचा जप केल्याबरोबर सूर्यनारायण आलेले आहेत. लगेच मुलगा झालेला आहे. इतकी सिद्धी आहे. तपश्चर्या मोठी आहे. पण

नूनं तपो यस्य न मन्युनिर्जयः ।।८.८.२० ।। श्री. भा.

विचार केला लक्ष्मीदेवीनं, हे मोठे तपस्वी आहेत पण राग मोठा आहे. राग काही हे जिंकू

शकले नाही. शेवटपर्यंत त्यांच्याजवळ राहणे म्हणजे कठीण आहे म्हणाली. अगोदरच परीक्षा करून हे नंतर तक्रार करायची नाहीये नको म्हणाली. चांगले ज्ञान आहे. दुर्वासादिकांना क्रोध जय नाही म्हणून सोडून दिलेले आहे. शुक्राचार्य, बृहस्पती ज्ञान आहे. परंतु विषयासक्ती आहे. असं सगळं पहात पहात ती चाललेली आहे. शंकराचं दर्शन झालं. सामर्थ्य आहे. मृत्युंजय आहे. पण काय, स्मशानामध्ये काय रहातात. भस्म अंगाला लावतात. हे पसंत पडलं नाही. भगवान श्रीहरींच्यावर दृष्टी पडलेली आहे.

वव्रे वरं सर्वगुणैः अपेक्षितम् ।।८.८.२३ ।। श्री. भा.

सुमंगल आहेत. भगवान श्रीहरी उत्तम आहेत. अलंकार आहेत. शक्ती आहे. सर्व सामर्थ्य आहे. पण आपल्याकडे त्यांची दृष्टी सुद्धा नाही. माझी इच्छा नाही म्हणाले. पण, 'न मागे तयाची रमा होय दासी ।। लक्ष्मीनं विचार केला. सर्व गुण संपन्न भगवान श्रीहरी आहेत. त्यांना इच्छा नसली तरी हरकत नाही. आपण त्यांची सेवा करू. म्हणून भगवंतांच्या कंठामध्ये माला घातलेली आहे. अशा रीतीने मग सर्व देवतांनी लक्ष्मीचाही सत्कार केलेलाय. भगवंतांचाही सत्कार केलेलाय. पुन्हा समुद्रमंथनाला सुरुवात झालेली असताना त्या समुद्रातून धन्वंतरी नावाचा भगवंतांचा अंश अमृतकलश घेऊन वरच्या बाजूला आलेलाय. ह्या दैत्यांनी लगेच ते मंथन करायचं सोडून दिलं. धावत गेले आणि तो अमृताचा घडा आपल्या ताब्यामध्ये घेतला आणि निघून गेले. देव पहात राहिले. काय ठरलं होतं काय म्हणाले आपलं. दोघांनी प्रयत्न करायचा, अमृत दोघांनीही घ्यायचं आणि हे सगळं अमृत घेऊन गेले. निराश झाले सगळे देव. परमेश्वरानी योजना केली. त्या दैत्यांमध्ये कलह सुरू झाला. मी अगोदर घेणार. मी समर्थ आहे. मोठा आहे. तुमचा नेता आहे. जो तो बोलायला लागला. जे दुर्बल दैत्य होते त्यांनी सांगितलं अरे आपण पूर्वी देवांना कबूल केलंय देवांना यातला भाग द्यायचा.आणि तुम्ही एकटेच घेता ? तुमचा आम्ही निषेध करतो. काय निषेध करतो. ठराव करून काय होणार आहे. दुर्बल दैत्य याप्रमाणे त्यांना सांगू लागले आणि त्यांच्यामध्ये कलह सुरू झाला मी अगोदर घेणार. इतक्यात एक दिव्य स्त्री उत्पन्न झालेली आहे. मोहिनी तिचं नाव. सर्वांना मोहात टाकणारी. कंठामध्ये उत्तम अलंकार आहेत. पुष्पमाला सुगंधित केसामध्ये घातलेली आहे. उत्तम शुभ्र वस्त्र धारण केलेलं आहे. कमरपट्टा आहे. अशी अत्यंत सुंदर स्त्री. ही दैत्य ज्या बाजूला गेले होते तिकडं जाऊ लागलेली आहे. दैत्यांना भेटण्याकरीता म्हणे. त्यांचं भांडण चालू आहे. माझ्या ताब्यात पाहिजे हे भांडं. जो तो म्हणतो आहे. इतक्यात ही मोहीनी जवळ आलेली पाहून सर्व दैत्य तिच्या जवळ आले.

ब्रह्मदेवांनी, सृष्टीकर्त्याने दोन ठिकाणी भ्रम निर्माण केलेले आहेत. कांता आणि कनक. या दोन्हीही ठिकाणी ज्याच्या मनामध्ये मोह होत नाही, अनासक्त जो आहे. तो साक्षात भगवान शंकर आहे म्हणाले. मनुष्य जरी असला तरी तो शंकर आहे. हे दैत्य कनक आणि कांता याशिवाय काही नाही. आले लगेच त्या मोहिनीला पाहिल्याबरोबर. कुठून आलात बाईसाहेब आपण? काय तुमचं नाव काय? आजपर्यंत आपल्या सारखी स्त्री आम्हाला पाहायला सुद्धा मिळाली नाही. बरं झालं. देवांनी तुम्हाला आमच्याकडे पाठवलं. आज आमचं भांडण सुरू झालंय. आम्ही सगळी कश्यपऋषींची मुलं भाऊ असताना आमच्यामध्ये या अमृताकरीता भांडण चाललेलं आहे. हे अमृताचं भांड घ्या म्हणाले. तुमच्या ताब्यात आम्ही देतो आणि आम्हाला सगळ्यांना व्यवस्थित वाटून द्या. म्हणजे भांडणाचं काम रहाणार नाही. मोहिनी हसलेली आहे. भगवान हसले. भगवान म्हणताहेत कश्यपांची मुलं तुम्ही म्हणाले आणि मी कोण आहे? कुठून आले? काही विचार न करता एकदम माझ्यावर तुम्ही विश्वास ठेवताय. असं एकदम स्त्रियांवर विश्वास टाकणं बरं नाही. ऋषीपुत्र, ऋषीकुमार तुम्ही. काय आमचं अंत:करण कसं असेल काही तुम्हाला कळलेलं नाही म्हणाले. जास्तीच त्यांच्या मनावर परिणाम झाला. नाही म्हणाले तुमच्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. हे घ्या भांडं तुमच्या ताब्यात घ्या. ते अमृताचं पात्र ताब्यामध्ये घेतलेलं आहे. आणखी पुन्हा ताकीद केली. मी सांगेन त्या प्रमाणे तुम्हाला वागावं लागेल. कुठं बसायचं, कसं बसायचं. काय करायचं. मी काय करेन याला तुमची संमती पाहिजे तर हे काम करेन नाहीतर हे तुमचं अमृताचं भांड घेऊन चला. मला जरूर नाही. ताब्यात आलेलय घेऊन जा असं म्हणायचं. हे काय आता घेताहेत थोड्येच. नाही नाही. आपण सांगाल ती आज्ञा मान्य आहे. जा म्हणाले. स्नान वगैरे करा. दानधर्म करा. अमृत प्राशन करायचंय आणि त्या बाजूला जाऊन बसा. तुमची दैत्यांची पंगत स्वतंत्र एका बाजूला असू दे. त्यांना घालवून दिलं. स्नान, दान वगैरे करून एका बाजूला दैत्यांची पंगत बसलेली आहे. इकडे देवांचीही पंगत बसायला सांगितलं सगळ्या देवांना. अमृतपात्र आणलेलं आहे. सगळ्यांना आणखी अमृत वाटण्याचं काम सुरूही झालेलं आहे. ते दैत्य वाट पहाताहेत. काही दैत्य म्हणाले उगीच त्या बाईवर आपण विश्वास ठेवला म्हणाले. ओळख नाही. पण ज्यांनी विश्वास दाखविला ते म्हणाले नाही हो तशी बाई ती नाही. येईल म्हणाले थोड्या वेळाने येईल. देवांना देत असेल. देऊ दे थोडं. सर्व देवांना अमृत वाटलेलं आहे. त्यात तो राहू नावाचा दैत्य आहे त्याला काही संशय उत्पन्न झाला. देवरूप धारण करून सूर्यचंद्राच्या मध्ये तो बसलेला आहे. त्यालाही ते अमृत मिळालं. पिऊन टाकलं त्यानी. इतक्यात सूर्य-चंद्रानी हा आपल्यापैकी नाही म्हणून त्या मोहिनीला

सांगितल्याबरोबर सुदर्शन चक्राने त्याचा शिरच्छेद केलेला आहे. ते अमृत खाली उतरलेच नाही. फक्त मस्तक तेवढं राहिलं. ग्रह झालेला आहे. त्याच्याकरता एक लगेच ग्रहमंडल निर्माण झालं. ग्रहामध्ये त्याला अधिकार दिला. म्हणजे इतक्या जलद निर्णय घेता आला पाहिजे नेत्याला. शत्रुलासुद्धा आपलं करून घ्यायचयं. नुसतं मारून टाकलं नाही त्याला. ग्रहमंडलावरती त्याची नियुक्तीही करून टाकली. नवग्रहापैकी एक स्थान आहे. शिवभक्त आहे. राहू ग्रहाला फक्त मस्तक आहे. बाकि शरीर नाही. ते अमर झालेले आहे. सर्व देवांना अमृत मिळालेलं आहे. त्यांचं तेज, बल वाढलेलं आहे. भगवंतांनी मोहिनीरूप गुप्त केलं. पुन्हा आपल्या मूळ रूपामध्ये भगवान प्रकट झालेले आहेत.

राजा, देव–दैत्यांनी प्रयत्न सारखेच केले, दोघांनीही अमृत प्राप्तीकरीता. पण फल मात्र देवांना मिळालं, दैत्यांना फल मिळाले नाही. भगवंताचा आश्रय ज्यांनी केलेला आहे. पूर्ण विश्वास भगवंता वर ज्यांनी टाकला, त्यांनाच ते अमृत मिळाले. आपल्याच बुद्धीने निर्णय करणारे, स्वार्थ आणि स्वार्थामध्ये बुद्धी ज्यांची आहे त्यांना ते फल मिळालं नाही. स्वतःचा प्रयत्न मोठा आहे. ईश्वर वगैरे काही मानायला तयार नाहीत. वाट पाहिली दैत्यांनी, ती बाईही गेली, अमृतही गेलं. देव मोठे उत्साही झालेले आहेत. तेजस्वी झालेले आहेत. त्यांना अमृत मिळालं. विश्वासघात झाला. काय म्हणून उपयोग काय?

'शठम् प्रति शाठ्यम्' ही नीती आहे भगवंतांची. दयाळूही आहेत. पण वाटेल त्यावर दया नाहीये. पाहून दया आहे. अगोदर सांगितले देवांना तुम्ही जाऊन संधी करा. आणि दोघेही प्रयत्न करा. हे ठीक आहे. पुढंजसं ते विरुद्ध वागायला लागले. तक्रार करायला लागले, त्यावेळेला त्यांनी ठरवून ठेवले यांच्या हातात अमृत मिळायचे नाही. गेलेले त्यांनी आणून दिले ना. सर्व एकंदर दैत्य रागावलेले आहेत. युद्ध करण्याकरता दैत्य आले. नर्मदा तीरावरती देव–दैत्यांमधे भयंकर युद्ध झालेले आहे. अनेक दैत्यांचा नाश देवांनी केलेला आहे. दैत्यांचा मुख्य सेनापती, बलीराजा हा ही विमानामध्ये बसून आलेला आहे. इंद्र त्याच्याबरोबर युद्ध करण्याकरता आलेला आहे. त्यांनी वज्रप्रहार करून बलीराजाचे विमान खाली पाडले. बलीराजा मूर्च्छीत पडलेला आहे. पुष्कळ दैत्य मारले गेले. मग नारद महर्षींना ब्रह्मदेवांनी पाठवलेले होतं. नारदांनी तिथे येऊन देवांना सांगितले, तुम्हाला अमृत मिळालेलं आहे. तुम्हाला विजय मिळालेला आहे. तुम्ही दैत्यांचा व्यर्थ संहार करू नका. ब्रह्मदेवांची आज्ञा आहे. बंद करा युद्ध. इकडे दैत्यांना जाऊन सांगितले. बलीराजाला

सांगितलं, बलीराजा, तुम्ही आता सर्व त्या अस्तगिरीवर जाऊन रहा. शुक्राचार्यांची सेवा करा. काही काळांनी शुक्राचार्यांचा प्रसाद तुमच्यावर होईल. पुन्हा तुमची उन्नती होईल. त्यांनाही सांगून पाठवून दिलेले आहे. आणि हे युद्ध बंद झालेलं आहे.

याप्रमाणे देव-दैत्यांचं युद्ध थांबलेले आहे. देव सर्व आपल्या स्वर्गलोकाला प्राप्त झाले. ही बातमी कैलास पर्वतावर शंकरांना समजली. मोहिनीरूप धारण करून ते अमृत दैत्यांकडून घेऊन देवांना दिले भगवंतांनी. ते वैकुंठ लोकांमध्ये आले. पार्वतीमाता बरोबर आहे. गणमंडळी आहेत. भगवंतांनी त्यांचा सत्कार केला. म्हणाले या महादेवा. काय कशाकरता आलात? महादेव म्हणाले देवा, तुम्ही आजपर्यंत मोठे मोठे अवतार धारण केलेत. सगळे मी पाहिले. आज तुम्ही हा स्त्री वेष धारण केला असं ऐकलं मी. हे कशाकरता केलंत? हे मी पाहण्याकरता आलेलो आहे. भगवान म्हणाले प्रसंगच तसा होता. जर देवांना सांगून युद्धाला आम्ही आरंभ केला असता तर दैत्य ते अमृत पिऊन युद्धाला आले असते. आधी अमृत त्यांच्याकडून काढून घ्यायचे. मग युद्ध ठरलेलंच आहे. नाश करायचा. म्हणून हे रूप घ्यावं लागलं म्हणाले. त्या सगळ्या दैत्यांना मोहीत करण्याकरीता हे रूप घेतले आहे. पहा, तुमची इच्छा आहे तर. एकदम भगवान अदृश्य झाले. एक दिव्य पुष्पाची बाग, तिथे तयार झालेली आहे. एक अत्यंत सुंदर स्त्री चेंडू खेळण्याचं काम तिथे करती आहे. आणखी काही स्त्रिया, तिच्या मैत्रीणी तिथे आहेत. शंकरांना काही देहभान राहिले नाही. कोण स्त्री आहे ही? सगळं विसरून गेले ते. ती कोण आहे हे विचारण्याकरता त्या स्त्रीजवळ गेले असताना एकदम ते सगळं नाहीसे झाले. पुन्हा भगवान श्रीहरी तिथे अवतीर्ण झाले. पुष्पबाग नाही, ती मोहिनी नाही. भगवान शंकरांना त्याच्याबद्दल काही वाटले नाही. ज्ञानी आहेत. ईश्वराच्या मायेचे असे हे कार्य होणारच म्हणाले. पार्वतीला त्यांनी बोलून सुद्धा दाखवले. भगवंतांची माया किती मोहात टाकणारी आहे. माझ्यासारखा योगी म्हणवणारा सुद्धा मोहात पडला. मग बाकीचे जीव किती मोहात पडले असतील? त्याबद्दल आपल्या हातून असे घडले असा मनावर कोणताच परिणाम नाही. पाप पुण्यातीत झालेले महात्मे आहेत.

अशा रीतीने महादेव कैलास पर्वतावर पुन्हा निघून आलेले आहेत. हे सगळेही समुद्रमंथनाचे भगवंताचे चरित्र, हा जो मन्वंतरामध्ये झालेला भगवंतांचा अवतार, अजित नावाचा अवतार. त्यांनी सर्व देव-दैत्यांना एकत्र करून हे कार्य करवून घेतलं. पुढची मन्वंतरे सांगितली. चौदा एकदंर मनू. त्यांचे कार्य सगळं सांगितले. भावी मनू कोणते होणार आहेत याचेही शुकाचार्य महाराजांनी

वर्णन केलेले आहे.

त्यानंतर वामन अवतार मन्वंतरामध्ये झालेला आहे. बलीराजाचे राज्य अतिथी रूपाने जाऊन हरण केलं. ते चरित्र आपण मला सांगा असं परीक्षित राजाने सांगितले. त्या वामन अवताराचे संपूर्ण चरित्र शुकाचार्य महाराज सांगणार आहेत.

राजोवाच
बलेः पदत्रयं भूमेः कस्माद् हरिरयाचत।
भूत्वेश्वरः कृपणवल्लब्धार्थोऽपि बबन्ध तम् ।।८.१५.१ ।। श्री. भा.

वामन अवताराचं चरित्र परीक्षित राजाने विचारलेलं आहे. अतिथी म्हणून बलीराजाच्याकडे भगवान गेले. तीन पावले भूमीची त्यांनी याचना केली. त्यांनी दान केलं असतानाही बलीराजाला बांधून ठेवलं. काय हे ईश्वराचं चरित्र आपण सांगा. शुक सांगतात राजा, देवांनी पराजय केलेला आहे बलीराजाचा. सर्व दैत्य सैन्य बरोबर घेऊन अस्तगिरीवरती जाऊन राजा राहिला. आपले गुरुमहाराज शुक्राचार्य यांची सेवा करतो आहे. शुक्राचार्यांनी आपल्या दिव्य संजीवनी विद्येच्या प्रभावाने युद्धात मृत झालेल्या बलिराजाला जिवंत केलं होतं. ते उपकार स्मरून बलिराजाने त्यांची तन, मन अर्पण करून अत्यंत निष्ठापूर्वक सेवा केली. त्यामुळे शुक्राचार्य संतुष्ट झाले. त्यांनी बलिची इच्छा पाहून विश्वजीत यज्ञ त्याच्याकडून करवला. विश्वाला जिंकण्याची शक्ती यावी या करता. अग्नीकुंडातून एक मोठा रथ बाहेर पडला सुवर्णाचा. घोडे उत्तम आहेत. सिंहध्वज आहे. दिव्य धनुष्य मिळाले. बाणाने अखंड भरलेले असे दोन भाते मिळाले. कवच मिळालेलं आहे. शुक्राचार्यांनी विजयाची सर्व व्यवस्था त्याची करून दिली. पितामह म्हणजे प्रल्हादजी यांनी बलीराजाच्या कंठामध्ये एक पुष्पांची माळ घातली. कधीही फुले सुकणार नाहीत या माळेची. अशी सगळी सामग्री तयार करून दिली शुक्राचार्यानी. जा म्हणाले. अमरावती ही इंद्राची नगरी ताब्यामधे घे. गुरुमहाराजांना प्रदक्षिणा केली, नमस्कार केला. शुक्राचार्यांनी दिलेल्या दिव्य रथामध्ये बसून आणि तो स्वर्गाची राजधानी अमरावतीजवळ येऊन पोहचलेला आहे. त्याच्याबरोबर मोठे मोठे पराक्रमी दैत्यही होते. शुक्राचार्यांनी दिलेला दिव्य शंख त्यांनी वाजवला. तो आवाज नगरीमध्ये असलेल्या इंद्राच्या कानावर पडलेला आहे. बलीराजाच्या शंखाचा आवाज ऐकल्याबरोबरच त्याची कल्पना झाली की हा मोठा सामर्थ्य मिळवून आलेला आहे. आपले गुरुमहाराज बृहस्पती यांना विचारले त्यांनी, या बलीराजाने मोठा प्रयत्न केलेला दिसतो म्हणाले. कोणाचेतरी तेज याला

मिळालेलं आहे. नाहीतर पराजय केलेला. मूर्च्छित पडलेला बलीराजा, इतका समर्थ कसा झाला? त्यावेळी बृहस्पतींनी सांगितले याची इतकी उन्नती झाली याच कारण

शिष्याय उपभृतं तेजो भृगुभिर्ब्रह्मवादिभिः ।।८.१५.२८।। श्री. भा.

याचे गुरूजी काही सामान्य नाहीयेत. भृगुऋषी, शुक्राचार्य महाराज, यांनी आपलं तेज याला दिलेले आहे. शक्ती ज्याला म्हणतात ती तपशक्ती आपल्याजवळची याला दिलेली आहे. प्रत्यक्ष परमेश्वराशिवाय याचा पराजय कोणीही करू शकणार नाही. तुम्ही मुकाट्याने तुमचे राज्य सोडून गुप्तपणाने बाहेर चला. युद्ध करण्याच्या भानगडीत पडू नका. आज यांनी शुक्राचार्यांची पूजा केली. आदर सत्कार केला. पण थोड्याच कालामध्ये हा त्यांचा अपमान करणार आहे आणि त्यांचा शाप याला होणार आहे. शाप झाल्यामुळे याचे राज्य, ऐश्वर्य जाणार आहे. आज तुम्ही बाहेर पडा. इच्छीत रूप धारण करणारे देव होते. देव नुसते बाहेर पडले असते तर पकडले असते बलीने त्यांना. दुसरे रूप धारण करून बाहेर पडलेले आहेत. युद्ध नाही, काही नाही. ही राजधानी ताब्यात आली बलीराजाच्या. त्यानंतर सर्व राज्य स्वर्गाचे मिळाले, भूमीचे मिळाले. बलीराजाला त्यानंतर सर्व विश्व जिंकण्याची इच्छा होती. शुक्राचार्यांनी शंभर अश्वमेध यज्ञ त्याच्याकडून करून घेण्याचा संकल्प केलेला आहे. त्रैलोक्यामध्ये त्याची कीर्ति झालेली आहे. मोठी समृद्धी, ऐश्वर्य मिळालेलं आहे. गुरूकृपेमुळे. आपण पूर्ण सुखी झालो अशी कल्पना बलीराजाची झालेली आहे. शुकाचार्य सांगतात, राजा सर्व देव निर्वासित होऊन बाहेर पडले. आपले राज्य सोडून द्यावे लागले त्यांना. देवमाता अदितीला अतिशय दु;ख झालेले आहे. काय करावं? आपल्या मुलांचे राज्य गेले. एके दिवशी कश्यप महर्षी त्या अदितीच्या आश्रमात प्राप्त झाले. तिथे सगळे खिन्न झालेले आहेत. आनंद नाही काही नाही. बरेच दिवस समाधी लावून बसले होते. पत्नीही अगदी खिन्न मुख झालेले आहे. आसनावर बसले. सत्कार केला अदितीने. आणखी कश्यपऋषी बोलू लागले.

अपि अभद्रं न विप्राणां भद्रे लोकेऽधुनाऽऽगतम्।
न धर्मस्य न लोकस्य मृत्योश्छन्दानुवर्तिनः ।।८.१६.४।। श्री. भा.

सर्व सामर्थ्य या तपस्वी महापुरुषाचे आहे. पहिला प्रश्न अदितीला विचारलेला आहे की सर्व तपश्चर्या करणारे जे ऋषी आहेत, त्यांच्यावर काही संकटाचा प्रसंग आला नाही ना? धर्माचरण वगैरे सर्व लोकांचं व्यवस्थित चालू आहे की नाही? या तुझ्या गृहामध्ये, आश्रमामध्ये धर्म, अर्थ, काम वगैरे त्यांचे व्यवस्थित आचरण चालू आहे की नाही? अतिथीगृहामध्ये आलेले असताना

सांसरिक कामाकडं लक्ष देऊन त्या अतिथींचा अनादर तुझ्याकडून झाला नाही ना? पूजा न करता त्यांना परत जावे लागले आहे काय? वेळेला होमहवन अग्निमध्ये चालू आहे की नाही? हे सगळं विचारलं आणि नंतर प्रश्न आहे

अपि सर्वे कुशलिनस्तव पुत्रा मनस्विनी ।।८.१६.१०।। श्री. भा.

अदिती, तुझी मुलं सुखामध्ये आहेत ना? काहीतरी तुझे मन अस्वस्थ दिसतं आहे. काय आहे सांग. ती बोलू लागली, महाराज आपण जिला मार्गदर्शन करता, अशा माझ्या आश्रमात धर्म, अर्थ, काम वगैरे पुरुषार्थाचं आचरण व्यवस्थित चालू आहे. अतिथींचे पूजन चालू आहे. अग्नीची सेवाही चालू आहे. आपली कृपा असल्यामुळे मला काहीही कमी नाहीये. पण आज असा प्रसंग आलेला आहे. देवही आपलेच पुत्र आहेत. दैत्यही आपलेच पुत्र आहेत. आपली सर्वत्र समदृष्टी आहे. देवांचा पक्षपात वगैरे असं कोठेही नाहीये. मी आपली सेवक आहे. आमचं रक्षण आपण करा. आम्हाला देवांना शत्रूंनी बाहेर घालवलेलं आहे. राज्यत्याग करून, ही माझी मुलं बाहेर पडलेली आहेत. त्यांचं राज्य त्यांना मिळावं अशी इच्छा आहे माझी. कृपा करा आपण. कश्यपऋषीनांही आश्चर्य वाटले.

अहो मायाबलं विष्णोः स्नेहबद्धमिदं जगत् ।।८.१६.१८।। श्री. भा.

सर्व जग हे या स्नेहपाशामध्ये बद्ध झालेलं आहे. काय भगवंताची माया आहे. मुलांच्या शरीरालाच मुलगा समजून, माझा मुलगा समजून ही अदितीसुद्धा दुःख करती आहे. काय कुणाचा संबंध आहे म्हणाले. बरं, काही हरकत नाही म्हणाले. भगवंताची तू उपासना कर. सर्वव्यापी तो परमेश्वर आहे. सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारा तो आहे वासुदेव. दीनांच्या वरती दया करणारा आहे. त्याची उपासना तू केलीस म्हणजे परमेश्वर तुझी इच्छा पूर्ण करेल. भगवत्भक्ती अमोघ आहे. अदिती विचारती आहे, कशी उपासना करू? काय करायला पाहिजे मला सांगा. माझा संकल्प खरा व्हायला पाहिजे. कश्यपांनी सांगितले, भगवान ब्रह्मदेवांनी मला एक व्रत करायला सांगितले आहे. ईश्वराच्या संतोषाकरता. फाल्गुन शुद्ध पक्षामध्ये बारा दिवस हे व्रत करायचं आहे. श्रीहरीची पूजा करायची आहे. आदल्या दिवशी म्हणजे माघ अमावस्येला स्नान करून भूदेवीची पूजा करायची. आदिवराहांनी रसातलातून भूमीला वर आणलेले आहे. माझ्या सर्व पातकांचा नाश करावा, अशी भूदेवीची प्रार्थना करावी. फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपासून भगवंताच्या मूर्तीच्या ठिकाणी अथवा अग्नीच्या ठिकाणी सूर्य, जल कुठेही आणखी परमेश्वराचे अर्चन करावं. त्या मंत्रांचा उच्चार

करून उपचार अर्पण करावे. त्या मूर्तीला आवाहन त्याचप्रमाणे आसन, पाद्य, अर्घ्यस्नान हे सगळे उपचार अर्पण करावेत. गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य सर्वही द्यावेत. द्वादशाक्षर मंत्राचा जप करावा. दुधामध्ये शिजविलेले असे जे अन्न म्हणजे भात आहे. ज्याच्यामध्ये तूप आहे, गूळ घातलेला आहे. त्याचे मंत्रांनी हवन करावं. देवाला दिलेलं अर्पण केलेलं त्याच्या भक्ताला द्यावं किंवा आपण तो प्रसाद घ्यावा. अष्टोत्तरक्षर ह्या मंत्राचा जप करावा. प्रदक्षिणा नमस्कार करून विसर्जन करावं. ब्राह्मणांना अन्नदान करावं नंतर आपण भोजन करावं. फक्त दूध घ्यायचंय बारा दिवसांपर्यंत. पयोव्रत याला म्हणतात. असे रोज पूजा व्हावी बारा दिवसपर्यंत. तेराव्या दिवशी, त्रयोदशीला भगवंताची महापूजा करावी. बारा दिवसपर्यंत त्रिकाल स्नान करणं. असत्य भाषण वगैरे काहीही न करणे. कोणाचीही हिंसा, कोणालाही उद्वेग, त्रास न देणं हे सगळे नियम पाळावेत. त्रयोदशीला भगवान विष्णूंना अभिषेक, स्नान वगैरे करून सर्व पूजा वगैरे समाप्त करावी. आचार्य जे आहेत त्यांनाही वस्त्र, अलंकार, धेनू हे द्यावं, अर्पण करावं. त्यांना अन्नदान करावं. इतरांनाही अन्नदान करावं, दक्षिणादान करावं. इतरही जी मंडळी आहेत, श्वान, चांडाल वगैरे सगळ्यांनाही अन्नदान करावं. नंतर आपण भोजन करावं तेराव्या दिवशी. रोज परमेश्वराची स्तुती, गायन वगैरे करावं. नृत्य, वादन हे सर्व करावं म्हणाले. दुसरे कोणी कलाकार असले त्यांचेकडून हे करून घ्यावं. हे पयोव्रत नावाचे व्रत आहे. पितामह ब्रह्मदेवांनी मला सांगितलेलं आहे. तू हे व्रत कर म्हणाले. भगवान संतुष्ट होतील आणि तुझी इच्छा पूर्ण करतील. अदितीला, कश्यप ऋषींनी आशिर्वाद दिलेला आहे आणि ते निघून गेले. श्रद्धा, भक्ती अंत:करणामध्ये धारण करून अदितीने हे पयोव्रत केलं. बारा दिवस पूजा केली भगवंतांची, फाल्गुन महिन्यामध्ये शुद्ध पक्षात आणि भगवान प्रसन्न झाले. दर्शन दिलेलं आहे. एकदम भगवंताचं ते स्वरूप पाहिल्याबरोबर उठून उभी राहिली अदिती. आनंदाश्रू नेत्रातून वाहत आहेत. गद्‌गद् वाणीने हरीची स्तुती तिने पुष्कळ केली.

यज्ञेश यज्ञ पुरुषाच्युत तीर्थपाद
तीर्थश्रवः श्रवणमङ्गलनामधेय।
आपन्नलोकवृजिनोपशमोदयाद्य
शं नः कृधीश भगवन्नसि दीननाथः ।।८.१७.८।। श्री. भा.

आपण यज्ञेश्वर आहात. यज्ञपुरुष आपण आहात. पवित्र आपले चरणकमल आहेत. आपली कीर्ति, कथाही पवित्र आहे. आपलं नावही अत्यंत पवित्र आहे. आपत्तीमध्ये सापडलेल्या लोकांची सर्व संकटं दूर करण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. आमचं आपण मंगल करावे. आमचं

कल्याण आपण करावं अशी प्रार्थना अदितीने केलेली आहे. भगवान संतृष्ट झाले. आणखी सांगताहेत देवमाते, तुझी इच्छा मला समजलेली आहे म्हणाले. शत्रूने तुझ्या मुलांचं सर्व ऐश्वर्य काढून घेतलेलं आहे. त्यांना बाहेर घालविलेलं आहे. त्यांचा पराजय व्हावा आणि आपल्या मुलांचं राज्य आपल्या मुलांना मिळावं अशी तुझी इच्छा म्हणाले. पण आज अशी स्थिती आहे. असुरांच्या बरोबर युद्ध करून त्यांचा पराजय करता येणार नाही. त्यांना काल अनुकूल आहे. त्यांच्या गुरुंनी त्यांना शक्ती दिलेली आहे. पण तू काही काळजी करू नको. आजपर्यंत हे व्रत तू केलंस. माझी पूजा केलीस. त्या पूजेचं फल तुला मिळेल म्हणाले. काळजी करू नकोस. मी तुझा मुलगा होईन. तुझ्या पुत्रांचे, इंद्रादिक देवांचे संरक्षण मी करीन. पतीची सेवा करत रहा. हे सांगू नकोस कोणालाही असंही त्यांनी सांगितलं. भगवान स्वत: आपले पुत्र होणार हे ऐकून तिला अत्यंत आनंद झालेला आहे. पतीची सेवा ती करते आहे कश्यपांची. कश्यपांच्या शरीरामध्ये हरीचा अंश प्राप्त झालेला आहे. तेज प्राप्त झालं आणि ते तेज त्यांनी अदितीच्या ठिकाणी स्थापन केलं. भगवान गर्भातून प्रकट झाले. ब्रह्मदेव आलेले आहेत. त्यांनीही त्यांची स्तुती पुष्कळ केली.प्रकट झाले म्हणजे चर्तुभुजरूपामध्ये प्रकट झाले. आरंभाला शंख, चक्र, गदा, पद्म, पितांबरधारी असे प्रकट झाले. त्यांच्या तेजाने घरातला सर्व अंध:कार दूर झालेला आहे. भाद्रपद शुद्ध द्वादशीचा दिवस आहे, विजयाद्वादशी त्या दिवशी मध्यानकाली वामन प्रकट झालेले आहेत. वाद्य वाजवताहेत देव वगैरे. अप्सरांचं नृत्य, गंधर्वांचं गायन चाललेले आहे. अदितीला आनंद झालेला आहे. ते स्वरूप गुप्त झाले आणि एकदम लहान बालक, आठ वर्षाचा बटू ब्रह्मचारी दिसू लागला. त्यांचे सर्व संस्कार केले. सूर्यनारायणांनी गायत्री मंत्राचा उपदेश केला. ब्रह्मसूत्र बृहस्पतींनी दिलेलं आहे. भूमीने कृष्णायन त्यांना दिले. कमंडलू वगैरे ब्रह्मदेवांनी दिले. उपनयन झाले. यक्षराज कुबेर यांनी भिक्षेचे पात्र दिले. साक्षात भगवती उमादेवी, अंबिकादेवी, पार्वती हिने त्या पात्रात त्याला भिक्षा घातलेली आहे. ते ब्रह्मतेज चमकते आहे. दिसते आहे. ब्रह्मर्षी मोठे मोठे हे सगळे त्या सभेमध्ये आहेत. अग्नी प्रदीप्त केलेला आहे आणि मंत्रांनी अग्निमध्ये हवन केलं. ब्रह्मचाऱ्याने अग्नीची सेवा केली पाहिजे. होम संपल्यानंतर वामन निघाले. अश्वमेध यज्ञ बलीराजाचे चालू आहेत. तिकडे जायचंय म्हणाले. भृगुऋषी म्हणजे शुक्राचार्य त्याचा यज्ञ करताहेत. शंभर अश्वमेध यज्ञ संपत आलेले होते. नर्मदानदीच्या उत्तरतीरावरती हा यज्ञ चालू होता. मुख्य शुक्राचार्य आहेत. बाकीचे ऋषी, पुष्कळ ऋत्विज मंडळी आहेत. त्या यज्ञमंडपामध्ये वामनांनी प्रवेश करण्याबरोबर सर्व ऋषीमंडळी उठून उभी राहिली. सूर्य किंवा अग्नी नारायण साक्षात आला काय म्हणाले. शुक्राचार्यही

विचार करताहेत. बलीराजाने समोर जाऊन नमस्कार केला. आसनावरती बसायला सांगितलं. पाय धुतलेले आहेत बलिराजांनी वामनांचे. ते पवित्र जल आपल्या मस्तकावर धारण केलं. बलिराजा म्हणाला, या महाराज आपले स्वागत असो, ब्रह्मर्षींचे तप आपल्या रूपात मी पाहातो आहे. तपमूर्ती आपण आहात. आज आमचे सर्व पितर संतुष्ट झाले असे मी समजतो आहे. आमचे कुल पवित्र झालेले आहे आणि हे यज्ञकर्म माझे चालू झाले त्याचे फळ मिळाले असे मी समजतो. आपण काही मागण्याकरता आलेले आहात असं मला वाटतं. 'अतिथी देवो भव' असा वागणारा तो बलिराजा होता. आल्याबरोबर त्यांनी काय पाहिजे आपल्याला ते सांगा म्हणाला, गाय पाहिजे? सुवर्ण पाहिजे? घर पाहिजे? कन्या पाहिजे? काय लागेल ते घ्या म्हणाले. याप्रमाणे विरोचनाचा पुत्र बलीराजा याचे भाषण उत्तम आहे. धर्मयुक्त भाषण आहे. भगवानही प्रसन्न झाले. त्यांनी बोलायला सुरुवात केली. दैत्य हे शत्रु आहेत अशी भावना नाहीये भगवंताची.

शत्रोरपि गुणावाञ्छा: ।।

हे मोठ्यांचे लक्षण आहे. भगवान सांगताहेत राजा, तुझं भाषण हे फार उत्तम, धर्मयुक्त आहे. तुझ्या कुळाला शोभण्यासारखं आहे. तुम्हाला या भृगुऋषीचं म्हणजे शुक्राचार्यांचं मार्गदर्शन मिळालेलं आहे म्हणजे तुमची प्रवृत्ती ही धर्माकडेच आहे. तुमच्या कुळामध्ये कृपण मनुष्य कोणी झाला नाही. एखादा अतिथी आलेला आहे आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे त्याला मी देतो कबूल केलं आणि पुन्हा नाही बाबा माझ्या हातून काही होणार नाही असे सांगणारा एकही नाहीये. तुमच्या कुलामध्ये प्रल्हाद जो आहे मोठा भगवद्भक्त. स्वत:च भगवान वर्णन करताहेत. केवढा कीर्तिसंपन्न झालेला आहे. या तुमच्या कुलामध्ये हिरण्याक्ष नावाचा मोठा वीर उत्पन्न झालेला होता. हातामध्ये गदा घेऊन तो बाहेर पडला. विष्णूंनी त्याला जिंकले. नाश केला त्याचा. पण आपला पराक्रम सफल झाला. आपल्या पराक्रमांनी हिरण्याक्षाला मारलं अशी विष्णूंची कल्पना नाहीये. हिरण्याक्षाच्या पराक्रमाची अद्यापि विष्णूला आठवण आहे. आपल्या बंधूचा वध केलेला आहे हे समजले हिरण्यकश्यपूला, तोही हरीचा नाश करायला बाहेर पडला. वैकुंठलोकामध्ये गेला. भगवान गुप्त झालेले आहेत. त्याच्या हृदयामध्ये जाऊन बसलेले आहेत. सापडले नाहीत. परत गेला हिरण्यकश्यपू.

तुझा पिता विरोचन, हा मोठा तपस्वी. ब्राह्मणांबद्दल आदर बाळगणारा होता. एके दिवशी देव त्याच्या राजसभेमध्ये आले आणि त्यांनी सांगितलं, राजेसाहेब, तुमच्या राहिलेल्या आयुष्याचं दान आम्हाला द्या.तसं पाणी सोडा. आणि सोडलं त्याने. आपलं आयुष्य दिलं. शरीर टाकलं. अशा

कुळामध्ये जन्माला आलेला आहेस बलिराजा! हे सगळं भाषण त्याची भूमिका तयार करण्याकरता आहे. कारण शुक्राचार्य सगळं जाणणारे आहेत. हा कोण अतिथी आहे त्यांनी ओळखलेलं आहे. बलिराजाने अजून ओळखलं नाही.

तेव्हा तुझ्यासारख्या दात्याकडून मला थोडीशी जमिन पाहिजे आहे. माझ्या पायाने तीन पावलं भरतील एवढी जमिन तू मला दे. बलीराजा म्हणाला, काय तुम्ही मागता आहात? फक्त तीन पावलं भूमी? माझ्यासारख्याच्याकडे आलेला आहात तुम्ही. एकदा माझ्याकडे आलेल्याला पुन्हा याचना करावी लागणार नाही आणि तीन पावलं भूमी तुम्हाला कशी पुरेल? मोठी तरी जमिन मागून घ्या. भगवान सांगताहेत राजा, जगामध्ये जेवढे विषय आहेत, ते सगळे जरी मिळाले तरी मनुष्याची तृप्ती होणार नाही. तीन पावलांनी व्यापलेल्या जमिनीने ज्याला संतोष होत नाही त्याला कितीही मोठी जमिन मिळाली तरी संतोष होणार नाही. मोठे मोठे राजे पूर्वी या भूमीच्या लोभानेच गेले. त्यांची तृष्णा संपली नाही. यदृच्छेने प्राप्त झालेल्यात संतृष्ट राहणाऱ्या माणसाला जे सुख आहे ते सुख इतरांना नाही. संसारमोह पाठीमागे लागलेला आहे त्याला कारण म्हणजे असंतोष आहे. कितीही अर्थ मिळाला, कितीही विषय मिळाले तरी ज्याला असंतोष वाटतो तो नेहमी संसारात राहातो. आणि जे मिळेल त्याच्यात संतोष मानणारा जो आहे तो मुक्त होतो. अग्नीमध्ये जास्तीत जास्त तूप घालायला लागल्यावर अग्नी शांत कसा होईल? संतुष्ट रहाणाऱ्या ब्राह्मणाचं तेज वृद्धिंगत होत असतं.

त्रीणि पदान्येव वृणे ।।८.१९.२७।। श्री. भा.

तुझ्यासारख्या दात्याजवळ तीन पावलं भूमीच मला मागायचीय. जास्ती नको. राजाने सांगितलं तुम्हाला तीन पावलं भूमी दिली. तुम्ही स्वतः मोजून घ्या. आणि आता संकल्प सोडायचा आहे. पाणी सोडायचं आहे. हे शुक्राचार्यांनी ओळखलं.

विष्णवे क्ष्मां प्रदास्यन्तं उशना असुरेश्वरम् ।।८.१९.२९।। श्री. भा.

हा विष्णू आहे म्हणाले आणि याला आपला हा शिष्य देऊन टाकणार आहे. विष्णूंची इच्छा शुक्राचार्यांना समजली आणि ते बोलू लागले. बलिराजा, कोणाला दान करतो आहेस तू? हा साक्षात भगवान विष्णू आहे. कश्यपापासून अदितीपोटी वामन म्हणून याने जन्म घेतला. देवांचं काम करण्याकरता हा आज तुझ्याकडे आलेला आहे. तू याला जो शब्द दिलास, बोलून गेलास, दान देतो म्हणून ते चांगलं नाही. तुझं सर्व राज्य, सर्व स्थान हा घेणार आहे. आणि ते सगळं घेऊन

इंद्राला देणार आहे, तुझ्या शत्रूला. मायेनं ब्रह्मचाऱ्याचा वेष धारण करून अतिथी म्हणून हा तुझ्याकडे आलेला आहे. हा विश्वमूर्ती आहे, विश्वरूप आहे. त्याचं विराट रूप जर याने प्रगट केलं तर तुझं सर्वस्व जाणार नाही का? एका पावलाने संबंध भूमंडल व्यापून टाकणार. दुसऱ्या पायाने स्वर्गलोक व्यापून टाकणार. आपल्या संबंध शरीराने संपूर्ण आकाशमंडल व्यापून टाकणार आहे. दोन पावलातच तुझं सगळं हरण होणार. तिसरा पाय ठेवायला जागा कुठंय? म्हणजे सर्वस्व दान करून सुद्धा कबूल केल्याप्रमाणे त्रिपादभूमीचं दान देता न आल्यामुळे दान पूर्ण होणार नाही आणि तू नरकाला जाशील. त्यापेक्षा अगोदरच सांगून टाक, की माझी काही शक्ती नाही. तू रहाणार कुठं? खाण्यापिण्याची व्यवस्था काय? उद्या जर याने सांगितलं, की माझ्या जागेमधे राहू नको तर जाणार कुठं तू ? जिवंत राहिलो, आपली योगक्षेमाची व्यवस्था नीट असेल तर पुढं कार्य करता येतं. जीवनाची व्यवस्था नीट असेल तर धर्माचरण करता येईल. सर्वस्व देऊन टाकणं हे काही दान नव्हे. हे बरं नाही. शास्त्रज्ञांचं मत तुला सांगतो.

धर्माय यशसेऽर्थाय कामाय स्वजनाय च।
पंचधा विभजन्वितं इहामुत्र च मोदते ।।८.१९.३७ ।। श्री. भा.

आपण मिळवलेल्या द्रव्याचे पाच भाग करावेत. एक पंचमांश द्रव्याचा धर्माकरता विनियोग करावा. एक पंचमांश धनाचा कीर्तिकरता, यशाकरता विनियोग करावा. लोकांनी चांगलं म्हणावं, बरयं घरी गेलं की फराळ-पाणी व्यवस्थित मिळतं. काही नाही असं नाही. याच्याकरता करावं लागते. एक पंचमाश धन शिल्लक ठेवायला पाहिजे. एक पंचमांश धन आपल्या लोकांकरता ठेवावं आणि एक पंचमांश विषयभोगाकरिता ठेवावं. असा धनाचा विनियोग करून वागणारा जो आहे त्याला इहलोकातही सुख मिळतं आणि परलोकातही सुख मिळतं. धर्माचरण होतंच. काही द्यायचं नाही असं नाही. आणखी तुला मार्ग दाखवतो. शास्त्रज्ञांचच म्हणणं आहे. सत्य आणि अनृत यांची व्यवस्था शास्त्रज्ञांच्या दृष्टीने अशी आहे.

सत्यं पुष्पफलं विद्यात् आत्मवृक्षस्य गीयते ।।८.१९.३९ ।। श्री. भा.

शरीररूपी वृक्ष जो आहे त्याचं मूळ हे अनृत आहे आणि सत्य हे फल किंवा पुष्पाप्रमाणे आहे. अनृत हे मूळ आहे. असत्य मूळ राहीलं तर हे शरीररूपी झाड रहाणार आहे. फुलं, फळं तोडून घेतली म्हणून झाड काही पडत नाही. तेव्हा असत्य अगदी बोलायचं नाही असं ठरवलं तर शरीर रहाणारच नाही. मूळ शिल्लक ठेव. एखाद्या वेळेला असत्य झालं तर होऊ दे. हा विचार तू कर.

कुणीही घरी अतिथी आला आणि त्याला सांगितलं, घ्या महाराज, तुमचंच घर आहे. आणि त्यानं घराबाहेर काढलं तर बाहेर पडावं लागेल. याला काही दान म्हणत नाहीत. कोणी आला सांगितलं आमच्या घरी काही मिळायचं नाही चला पुढं हे ही चूक आहे. हा सगळा विचार करून दान करावं. तेव्हा कबूल केलं तरी माझ्या हातून दान होत नाही असं सांगून दे. सत्य हे पालन करता येणार नाही.

स्त्रीषु नर्मविवाहे च वृत्यर्थे प्राणसंकटे।
गोब्राह्मणार्थे हिंसायां नानृत्तं स्याज्जुगुप्सितम् ।।८.१९.४३ ।। श्री. भा.

इतक्या ठिकाणी असत्य बोललं तर चालतं. स्त्रियांच्या बरोबर असत्य बोलायला हरकत नाही. नेहमी असा अर्थ नाही. प्रसंगाने काही कार्य होण्याकरता बोलावं. थट्टेमध्ये असत्य भाषण होऊन जातं. एखाद्याचा विवाह जमवायच्या वेळी असत्य बोललं तरी चालतं. आपण जिवंत रहाण्याकरता आपला योगक्षेम चालण्याकरता असत्य बोललं तर चालतं. गाय, ब्राह्मणांची हिंसा होतेय ती थांबवण्याकरता असत्य बोललं तर चालतं. शुक्राचार्यांनी सगळं त्याच्यापुढे मांडलं आणि जमत नाही असं सांगून टाकून याला जाऊ दे म्हणाले. केवढा प्रसंग निर्माण झालेला आहे. साक्षात विश्वेश्वर परमात्मा याचक म्हणून आलेला आहे. दान सामान्याला करायचं नाहीये. हे दान जर झालं बलिराजाकडून तर तो मुक्तच होईल. संसार संपून जाईल. पण गुरुमहाराज विरुद्ध आहेत. आता तेही कदाचित परीक्षा पहाताहेत का काय कुणास ठाऊक?

बलीराजा थोडावेळ स्वस्थ बसलेला आहे. त्याने थोडा विचार केला आणि तो गुरुमहाराजांना म्हणाला,

सत्यं भगवता प्रोक्तं धर्मोऽयं गृहमेधिनाम् ।।८.२०.२ ।। श्री. भा.

गृहस्थाश्रमी माणसानं कसं वागावं हे तुम्ही सांगितलं महाराज. ते योग्यच आहे. अर्थ पाहिजे. काम पाहिजे. कीर्ति पाहिजे. आपलं जीवन व्यवस्थित पाहिजे हे सगळं मला मान्य आहे. पण या वृत्तीच्या मोहाने मी जिवंत राहिलं पाहिजे. माझा परिवार जिवंत राहिला पाहिजे या लोभाने मी एका तपस्वी ब्राह्मणाला दान नाही कसं म्हणू? माझ्याजवळ आहे तोपर्यंत मी देईन. आणि मी कबूल केलेलं आहे.मग आता नाही कसं म्हणायचं? असत्य हा मोठा अधर्म आहे महाराज. भूदेवी सांगतीय मला सगळं सहन होईल पण असत्य बोलणाऱ्याचा भार मला सहन होत नाही. आपण म्हणाला दान पूर्ण झालं नाही तर मला नरकात जावं लागेल. मला नरकाची भीती वाटत नाही.


दधिची ऋषी

मी स्थानभ्रष्ट झालो तरी मला त्याची पर्वा नाही कारण एका ब्राह्मणाचा विश्वासघात करणं मला पसंत नाही. जे जे आपण दान देतो त्याच्यामुळे जास्ती समाधान वाटायला पाहिजे. श्रेष्ठ पुरुष दुसऱ्याचं कल्याण करण्याकरता आपले प्राणसुद्धा देतात. दधिची ऋषी आहेत. शिबी राजा आहे. जमिन, राज्य काय करायचंय? याचा उपयोग काय आहे? आजपर्यंत ज्यांनी राज्य केलं, वाढवलं ते स्वत: शिल्लक राहिले काय? ज्यांनी त्याग केलेला आहे त्यांची कीर्ति जगामध्ये वाढलेली आहे. युद्धामध्ये आपला प्राणत्याग करणारे पुष्कळ मिळतील पण तपस्वी पुरुष आला असताना त्याला दान करणारा मिळणं फार कठीण आहे. द्रव्याचा मोह फार मोठा आहे. दाता भवति वानवा। आपल्यासारख्या ब्रह्मज्ञानी महात्म्यांची इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न आमच्यासारख्या गृहस्थाश्रमी पुरुषांनी केला पाहिजे. ह्या ब्रह्मचाऱ्याला जी इच्छा आहे ते देण्याचं मी ठरवलेलं आहे. विष्णू असले तरी आज माझे अतिथी म्हणून आलेले आहेत. असे अतिथी मला कोणत्या जन्मात मिळतील? यावेळेलाच मला हे कार्य करायचं आहे. माझं दान पूर्ण झालं नाही म्हणून यांनी मला बांधून ठेवलं तरी मी यांना प्रतिकार करणार नाही.

शुक्राचार्य सांगतात, राजा आपण ज्याच्यावर इतके उपकार केले. इंद्रपद मिळवून देण्याकरता शंभर अश्वमेध यज्ञ करवले. आणि हा शिष्य आपलं ऐकत नाही. शुक्राचार्यही रागावले. दैवयोग आहे बलीराजाचा.

दृढं पंडितमानी अज्ञः स्तब्धोऽस्यस्मदुपेक्षया।
मच्छासनातिगो यस्त्वं अचिराद् भ्रश्यसे श्रियः ।। ८.२०.१५ ।। श्री. भा.

स्वत:ला तू पंडित समजायला लागलास काय? आमच्या सांगण्याची तुला किंमत नाही. तुझ्या हिताचं मी सांगतो आहे. इतकी खटपट करतोय. माझी आज्ञा तुला मान्य नसेल, तर तुझं सर्व ऐश्वर्य नष्ट होईल. शुक्राचार्यांनी बलिराजाला शाप दिला आणि यज्ञमंडपातून बाहेर जाऊन एका झाडाखाली स्वस्थ बसले.

बलीराजाने वामनांना आसनावर बसवून त्यांचे पाय धुतले. त्याची स्त्री विंध्यावली पाणी घालते आहे. चरण प्रक्षाळण केलं. ते विश्वाला पवित्र करणारं तीर्थ मस्तकावर घेतलं. त्याला वंदन

केलं. सर्व देवमंडळीसुद्धा प्रशंसा करताहेत. पुष्पवृष्टी करताहेत. केवढा त्यागी महात्मा हा आहे. आपला शत्रू आपलं सर्वस्व हरण करण्याकरता आलेला असतानासुद्धा हा विलक्षण दान करतोय. हे मोठं दान आहे. हातावर पाणी सोडलं. प्रतिगृह्यताम्. घ्या महाराज आपली जमिन घ्या. नमस्कार केलेला आहे. वामनांचं रूप एकदम मोठं व्हायला लागलं. विराट विश्वरूप धारण केलं वामनांनी. भूमंडल आहे. आकाशमंडल आहे. स्वर्गलोक, सप्तपाताल सगळं त्यांच्या रूपामध्ये दिसायला लागलं. सर्व एकंदर ब्रह्मांड त्या स्वरूपामध्ये दिसतंय. हे दर्शन झालं हे दानाचं फळ आहे. मनापासून दान झालेलं आहे. एका पायामध्ये सगळी जमिन व्यापून गेली. दुसऱ्या पायामध्ये सगळा स्वर्गलोक व्यापून गेलेला आहे. बलीराजाचं राज्य संपलेलं आहे. तिसरा पाय कुठं ठेवायचा? तो पाय वाढता वाढता ब्रह्मलोकापर्यंत गेला. ब्रह्मदेवांनी त्या पायावर पाणी घालून पुजा केली. तीच गंगानदी उत्पन्न झालेली आहे, हरीचरणांपासून. दैत्य मंडळींच्या दृष्टीला हे विश्वरूप दिसलं.ते म्हणाले, हा काही खरा ब्राह्मण नाही. ब्राह्मणांचं रूप घेऊन देवांचं कार्य करायला आलेला हा विष्णू दिसतोय. ब्रह्मचाऱ्याचा वेष घेऊन काय आला, स्तुती काय केली आमच्या राजेसाहेबांची आणि शेवटी त्यांचं सर्वस्व हरण केलं म्हणाले. आमच्या राजेसाहेबांनी यज्ञदीक्षा घेतलेली आहे तेव्हा असत्य भाषण बोलायचं नाही हा नियम आहे. अशावेळी याने येऊन यजमानाला फसवलं. तेव्हा याला जिवंत ठेवायचं नाही असं ठरवून ते बलीचे सेवक वामनांवर धावून गेले. बलीची इच्छा नाहीये. इतक्यात विष्णूंचे दूत तिथे आले. नंद, सुनंद, जय, विजय, बल, प्रबल असे बरेच दूत ज्यांना दहा हजार हत्तींचं बळ आहे अशा त्या दूतांनी राक्षसांचं बरचसं सैन्य मारलं. बलिराजाने पाहिलं की आपले दैत्य मरताहेत. गुरुमहाराजांचाही शाप झालेला आहे. त्याने दैत्यांना सांगितलं थांबा, युद्ध करू नका. हा काल आम्हाला प्रतिकूल आलेला आहे. त्यामुळे तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी यश मिळणार नाही. या देवांना कितीतरी वेळा आम्ही जिंकलय परंतु आज तेच आमचा पराजय करताहेत आणि यशस्वी होतात. काल जेव्हा आम्हाला अनुकूल होईल तेव्हा पुन्हा आपण यांना जिंकू. तुम्ही तोपर्यंत रसातलात निघून जा. सर्व दैत्य रसातलात निघून गेले. गरुडाने भगवंतांची इच्छा जाणून बलिराजाला वरूणपाशाने बांधून ठेवलं आहे. भगवान विचारताहेत,

पदानि त्रीणि दत्तानि भूमेर्मह्यं त्वयासुर ।
द्वाभ्यां क्रान्ता मही सर्वा तृतीयं उपकल्पय ।।८.२१.२९ ।। श्री. भा.

दान घेणारे ब्राह्मणही समर्थ होते. तुम्ही कबूल केलं इतकं दान आम्हाला मिळालं पाहिजे असं म्हणता येत नाही ब्राह्मणांना. हे तसे नाहीयेत. राजा, तीन पावलं भूमी द्यायचं तू वचन दिलेलं

आहेस. दोन पावलामध्येच मी तुझं सर्वस्व हरण केलेलं आहे. तिसरा पाय कुठं ठेवायचा सांग. तुझ्या हातून पूर्ण दान झालेलं नाही. तुझ्या गुरूंनी तुला वस्तुस्थितीची कल्पना दिली होती. तू अभिमानाने म्हणालास, तीन पावलं जमिन काय मागता, मोठी जमिन मागून घ्या. गुरुंचंही तू ऐकलं नाहीस आणि दानही पूर्ण केलं नाहीस. त्याकरता तुला नरकात जावं लागेल. हा प्रसंग आलेला आहे. सर्वस्व गेलं. धर्मही गेला आणि अर्थही गेला. पण बलिराजा मोठा सत्यनिष्ठ होता. सत्वबल हे सगळ्यात मोठं बल आहे. अंत:करणाचं जे बल आहे. धर्माचा निश्चय, मनाचा निश्चय मोठा होता बलिराजाचा. काहीही त्याने विचार केला नाही. भगवंताला त्याने सांगितलं, देवा, मी काय खोटं बोललो. मी त्रिपाद भूमी द्यायचं कबूल केलं. त्यावेळी तुम्ही कोणत्या रूपात आला होतात? ते रूप पाहून मी भूमी दिली असं कबूल केलं.

तरीसुद्धा माझं वचन सत्य करण्याकरता मी माझं शरीरदेखील आपल्याला अर्पण करतो आहे.

पदं तृतीयं कुरु शीर्ष्णि मे निजम् ।।८.२२.२ ।। श्री.भा.

तिसरा पाय माझ्या मस्तकावर आपण ठेवा. नरकाची मला भीती वाटत नाही. माझं स्थान गेलं, मला तुम्ही बांधून ठेवलं तरी मला काही वाटणार नाही. श्रेष्ठ पुरुषाने आम्हाला दंड करण्यामधे आमचं कल्याण आहे असं मी समजतो माता, पिता, मित्रमंडळी एखादेवेळी असं करतात पण त्यात हितच असतं. आम्ही असुर जरी असलो तरी परोक्ष रितीने आमचं कल्याण करणारे गुरू आपण आहात. आपण आमचे शत्रू नाही आहात. या ऐश्वर्याच्या मदाने अंध झालेल्या आम्हाला दंड करून आपण मार्गदर्शनच करत असता. आपलं वैर करून अनेक दैत्य मुक्त झालेले आहेत. मोठे मोठे ऋषि, योगी आपली सेवा करत असतात, अशा आपण मला बांधून ठेवलं म्हणून मी तक्रार करायचं कारण काय ? आमचे पितामह प्रल्हादजी यांनी जन्मभर आपली भक्ति केलेली आहे, कितीतरी दु:ख सोसलेलं आहे. त्यांच्या पित्यानेच त्यांना दु:ख दिलं पण आपण त्यांना मुक्त केलं. काय करायचंय हा संसार करून ? स्त्री आहे, पुत्र आहे, राज्य आहे पण त्याचा काय उपयोग आहे. हा सगळा विचार प्रल्हादजींना केला आणि आपलं सर्वस्व आपल्याला त्यांनी अर्पण केलं. सर्व भाव आपल्या चरणी ठेवला. शेवटी ते निर्भय झाले आणि आपल्या कृपेने संकटातून मुक्त झाले. दैवयोगाने आपलं दर्शन मला आज झालं. माझी संपत्ती, ऐश्वर्य बलात्काराने आपण काढून घेतलं ही दयाच आपली माझ्यावर झालेली आहे. हे जीवन कृतांताच्या आधीन आहे. यम केव्हा घेऊन जाईल याचा नियम नाही. अशा स्थितीमधे माझी बुद्धि स्थिर राहाण्याकरता

आपण माझ्यावर अनुग्रह केलेला आहे. ''प्रल्हादजींना हे समजलं. ते आले तिथे. भगवान श्रीहरीचं दर्शन त्यांना झालेलं आहे. बलिराजाला गरुडाने बांधून ठेवलं होतं. त्याला उठता आलं नाही, आपल्या आजोबांची पूजा करता आली नाही. मान खाली घालून तो बसून राहिलेला आहे. प्रल्हादजींनी भगवंताला नमस्कार केला आणि सांगताहेत,

त्वयैव दत्तं पदमैन्द्रमूर्जितं
हृतं तदेवाद्य तथैव शोभनम् ।
मन्ये महान् अस्य कृतो ह्यनुग्रहो
विभ्रंशितो यच्छ्रिय आत्ममोहनात् ।।८.२२.१६।। श्री.भा.

भगवंता, बलिराजाला इंद्रपद आपणच दिलेलं आहे. हा काय घेणार आहे ? आणि आज ते दिलेलं इंद्रपद आपणंच काढून घेतलं हे फार चांगलं झालं. मोहामधे टाकणारी, गर्व निर्माण करणारी ही जी श्री आहे तिच्यापासून आपण याला भ्रष्ट केलं, बाहेर काढलं हे फार चांगलं झालं. अशीच कृपा या सर्वांवर ठेवा.

त्या बलिराजाची स्त्री विंध्यावली ही अतिशय भीतीग्रस्त झालेली आहे. आपल्या पतीचं राज्य गेलं, संपत्ती गेली, आता नरकात टाकतात की काय कुणास ठाऊक अशा विचाराने ती घाबरून गेली. ती भगवंताला प्रार्थना करतेय.

क्रीडार्थमात्मन इदं त्रिजगत् कृतं ते
स्वाम्यं तु तत्र कुधियोऽपर ईश कुर्युः ।
कर्तुः प्रभोस्तव किमस्यत आवहन्ति
त्यक्तह्रियस्त्वदवरोपित कर्तृवादाः ।।८.२२.२०।। श्री.भा.

परमेश्वरा, हे जे आमचे पतीदेव आहेत, यांची बुद्धि अद्यापि सुधारली नाही. तिसरा पाय माझ्या मस्तकावर ठेवा, माझं शरीर आपल्याला अर्पण करतो, अद्यापि माझं माझं म्हणतात. त्यांच तरी शरीर कुठे आहे ? संपूर्ण विश्व ज्याने निर्माण केलं त्याचं हे शरीर आहे. असं असताना, माझं शरीर आहे, मी तुम्हाला देतो असं म्हणणं योग्य नाही. हे काही खरं दान नाही. केवढी अधिकारी स्त्री असली पाहिजे यांचा अभिमान अद्यापी गेला नाही. आपण यांना क्षमा करा अशी प्रार्थना ती करते आहे.

ब्रह्मदेव म्हणतात, ''भगवान, याने आपलं सर्वस्व आपल्याला दिलं. आपला देहदेखील अर्पण केला. आपल्याला भक्ताने पत्र, पुष्पं, फलं, तोयं यातलं काहीही जरी दिलं तरी तो उत्तम गतिला जातो आणि याने सर्वस्व देऊन सुद्धा याला बंधनात ठेवलं आहे ? याला आपण सोडा.''

ब्रह्मन् यमनुगृण्हामि तद्विशो विधुनोम्यहम् ।
यन्मद: पुरुष: स्तब्धो लोकं मां चावमन्यते ।। ८.२२.२४ ।। श्री.भा.

ज्याच्यावर खरी कृपा करावीशी मला वाटते त्याचं सर्वस्व मी हरण करतो. जोपर्यंत संपत्ती आहे, बुद्धि आहे तोपर्यंत तो सर्व लोकांचा अपमान करतो, माझाही अपमान करतो. हा जीवात्मा आपल्या कर्माने सारखा जन्ममरणाच्या फेऱ्यामधे पडलेला असतो. केव्हातरी मनुष्यजन्म याला मिळतो आणि अशावेळेला, याला जर धनाचा, ज्ञानाचा अभिमान उत्पन्न झाला तर याचा मनुष्यजन्म फुकट जाईल. पुन्हा मनुष्यजन्म केव्हा मिळेल याचा नियम नही. पण माझा जो खरा भक्त आहे तो या अभिमानामधे कधीही पडत नाही. हा दानवांचा सेनापती राजा अत्यंत कीर्तिसंपन्न आहे. माझ्या मायेच्या मोहातून तो बाजूला झालेला आहे. इतक्या संकटात पडलेला असताना सुद्धा याला दुःख नाहिये. याचं राज्य गेलं, संपत्ती गेली, आप्तबांधव निघून गेले, गुरुंनी याला शाप दिला. पण अशाही स्थितीमधे आपलं सत्य त्याने सोडलेलं नाही. कितीही याची परीक्षा घेतली तर सत्यवाणी सोडलेली नाही

एष मे प्रापित: स्थानं दुष्प्रापं अमरैरपि ।।८.२२.३१ ।। श्री.भा.

देवांनासुद्धा जे स्थान मिळणार नाही ते याला द्यायचंय. पुढं सावर्णि मन्वंतरामधे याला इंद्र व्हायचं आहे. लक्षात ठेवा ब्रह्मदेवा. तुमच्या नियमाप्रमाणे शंभर अश्वमेध यज्ञ याचे आता पूर्ण झाले परंतु याची योग्यता किती आहे. हा दैत्य असला तरी श्रेष्ठ महात्मा आहे. दैत्यांनी स्वर्गाचं राज्य करू नये हा तुमचा नियम असेल सृष्टीमधे, पण मी सांगतो आहे. हा इंद्र होणार आहे. आत्ता याला राहायला जागा नाही. हे सर्व घेतलेलं इंद्राकडे द्यायचं आहे ना याला सुतल लोकामधे जाऊ दे. त्याठिकाणी आधि, व्याधि काहीही नाहिये. बलिराजाला सांगीतलं, ''बलिराजा तू आनंदाने सुतललोकात जा. स्वर्गापेक्षासुद्धा अत्यंत सौख्य त्याठिकाणी आहे. सगळ्या आपल्या ज्ञातीबांधवांना बोलव आणि तिथं राहा. तुला कोणीही त्रास देऊ शकणार नाही. इंद्रादिक देवसुद्धा तुला काहीही करू शकणार नाहीत. मी स्वत: तुझा द्वारपाल म्हणून राहीन आणि तुझं रक्षण करीन. माझ्या सहवासाने, दर्शनाने तुझी आसुरी वृत्ति पूर्ण शांत होईल.''

शुक सांगतात, ''राजा, भगवंताचं ते भाषण ऐकलं बलिराजाने, नेत्रातून अश्रुधारा वाहताहेत. हात जोडून तो म्हणतोय, ''भगवंता, आपण आल्यापासून मी आपल्याला प्रणामदेखील केला नाही. दान द्यायचं का नाही, गुरूंचा दोष यातंच सगळा वेळ गेला. त्याने मग श्रीहरींना, शंकरांना, ब्रह्मदेवांना प्रणाम केला आणि तो सुतललोकात जाण्याकरता निघाला. प्रल्हादजी म्हणाले, ''देवा, या बलिराजावर केवढी कृपा आपण केलेली आहे. बाकी कुणावरही अशी कृपा नाहिये. आपण स्वत: याचे द्वारपाल म्हणून राहाणार ही केवढी कृपा आहे. आपण विश्ववंद्य असताना, आमचे द्वारपाल म्हणून राहायचं म्हणजे आमचं पुण्य म्हणायचं का आपली कृपा ? भगवान सांगताहेत, प्रल्हादा, तू ही जा आपल्या नातवाबरोबर, माझं दर्शन होईल. सगळी मंडळी निघालेली असताना, एक काम बाकी राहिलंय असं लक्षात आलं. तो शंभरावा अश्वमेध यज्ञ अजून पूर्ण झालेला नव्हता. हे वामन आल्याबरोबर तो बंद पडला. ते शुक्राचार्य रागावून दूर एका झाडाखाली बसले होते. वामनांनी आपलं मूळ बटुरूप धारण केलं आणि ते गेले शुक्राचार्यांकडे. ''गुरूमहाराज नमस्कार, शिष्यावर इतकं रागावणं बरं नाही. आपणच त्याला वाढवलं आणि आपणंच त्याला आता शाप देताय ?

विषवृक्षोऽपि संवर्ध्य: स्वयं छेत्तुं असाम्प्रतम् ।

विषाचं झाड स्वत: लावलेलं असेल तरीही स्वत: तोडू नये म्हणतात. बलिराजा किती गुणी आहे महाराज. केवढा सत्यनिष्ठ आहे. त्याचं तुम्ही कौतुक करायला पाहिजे. इतके यज्ञ त्याच्याकडून करवले तुम्ही आणि शंभरावा यज्ञ अर्धवटच सोडून देताय ? हा पूर्ण करायला पाहिजे. तुम्ही या. चला. आम्ही आल्यामुळे हे विघ्न उत्पन्न झालं. करा. यज्ञ पूर्ण करा. शुक्राचार्यांच्या लक्षात आलं ते. कायद्याप्रमाणे सगळं झालं पाहिजे. शंभर अश्वमेध यज्ञ झाल्याशिवाय इंद्रपद कसं मिळेल ? भगवान असले तरी लोक विचारणार ! शुक्राचार्य म्हणाले, ''भगवंता, आपण आल्यामुळे हे उत्तम कर्म झालेलं आहे. आपण साक्षात यज्ञेश्वर याठिकाणी येऊन त्याचं दान घेतलं म्हणजेच ते कर्म पूर्ण झालेलं आहे. आपली आज्ञा आहे तर यज्ञ पूर्ण करू.'' यज्ञ पूर्ण झालेला आहे. पूर्णाहुति झालेली आहे आणि बलिराजा प्रल्हादजींसह सुतललोकात राहायला गेलेला आहे. मग इंद्राला बोलावून त्याला ते राज्य दिलेलं आहे. अदितीलाही सांगीतलं, ''आई साहेब, हे राज्य तुमच्या मुलाला दिलंय बरं. तुम्ही सुद्धा आपल्या मुलांजवळ जाऊन राहा. आता काही दु:ख करू नका, काळजी करू नका. इंद्राने राज्य घेतलं पण काही जाणीव नाहीये. वामनांनी इतका प्रयत्न केला, बलिराजाकडे याचक म्हणून गेले, म्हणून व्यवहारदृष्टीने का होईना परंतु वामनांचा सत्कार करणे

वगैरे काही नाही. इंद्राला काही लक्षात आलं नाही. ब्रह्मदेवांनी पुढाकार घेतला आणि वामनांचा सत्कार सर्व देवांकडून करवलेला आहे.

उपेन्द्रं कल्पयाञ्चक्रे पतिं सर्वविभूतये ।।८.२३.२३ ।। श्री.भा.

इंद्रस्थान जसं आहे तस एक उपेंद्र म्हणून स्थान वामनांना दिलेलं आहे, काहीतरी कृतज्ञता म्हणून. सर्व मंडळी आपापल्या स्थानाला निघून गेलेली आहेत.

राजानं विचारलं, ''महाराज, मला मत्स्यावताराचं चरित्र सांगा. देव कुठलंही रूप धारण करतात ! मस्त्यावतार काय, कूर्मावताय काय, वराहावतार काय ही असली रूपं कशाला धारण करायची ?'' शुक सांगतात, ''राजा, देवाचा अवतार कशाकरता होतो. तुला माहिती आहे का ?

गोविप्रसुरसाधूनां छन्दसामपि चेश्वर: ।
रक्षां इच्छंस्तनूर्धत्ते धर्मस्य अर्थस्य चैव हि ।। ८.२४.५ ।। श्री.भा.

गाई, विप्र, देव, साधू, वेद, धर्म या सर्वांचं रक्षण करण्याकरता भगवंताचा अवतार होत असतो. कोणतंही रूप धारण केलं तरी देवाला काही कमीपणा नाही. वायु हा सगळ्यांच्या ठिकाणी आहे. पशु, पक्षी, मानव, देव सगळ्यांच्या ठिकाणी वायु आहे म्हणून वायूला काय कमी जास्तपणा मानायचा का ? तो नेहमीच समर्थ आहे. पूर्वी एकदा, ब्रह्मदेव निद्रीस्त झालेले होते नैमित्तिक प्रलय झाला होता. त्रैलोक्य सगळं जलामधे विलीन झालं. झोपलेल्या ब्रह्मदेवांच्या मुखातून वेद बाहेर पडले आणि हयग्रीव नावाच्या दैत्याने ते हरण केले. ते वेद पुन्हा आणून ब्रह्मदेवांना द्यायचे आहेत त्याकरता हा मत्स्यावतार झालेला आहे.

एकदा एक राजर्षि, सत्यव्रत नावाचा, मोठा नारायणभक्त होता. तोच सत्यव्रत हा पुढे सूर्यनारायणांचा पुत्र, वैवस्वत मनू म्हणून जन्माला आलेला आहे. तो एकदा नदीतीरावर तर्पण करत असताना त्याच्या हातामधे एक लहानसा मासा येऊन पडला. त्याने तो मासा पुन्हा नदीत टाकून दिला, तेव्हा तो मासा बोलू लागला, ''राजेसाहेब, इथे मोठे मोठे मासे, मगर आहेत. इथं मला ठेऊ नका, माझं रक्षण करा.'' त्या माशाला आपल्या तांब्यामधे राजाने घेतलं आणि तो आपल्या राजवाड्यामधे आला. त्या माशाने आपल्या शरीराचा विस्तार केला त्यामुळे तो तांब्या पुरेना, मग त्याला एका मोठ्या रांजणात ठेवलं. परत तो मासा मोठा झाला मग त्याला एका तलावात ठेवलं. तेही पुरेना म्हणून राजाने त्याला पुन्हा समुद्रात टाकून दिलं. पुन्हा तो मासा म्हणाला, ''अहो इथे मला टाकू नका. माझ्या जीवाला धोका आहे.'' तो राजा विचारतोय,

''बाबा, तू आहेस तरी कोण ? कितीही मोठी जागा तुला दिली तरी तुला पुरत नाही, हे काय आहे ?'' भगवान म्हणाले, ''राजा, दैत्याने हरण केलेले वेद हे ब्रह्मदेवांना पुन्हा आणून देण्याकरता मी हा देह धारण केलेला आहे. सध्या प्रलयकाल आहे. ब्रह्मदेव निद्रीस्त आहेत तोपर्यंत हे सगळं त्रैलोक्य जलामधे विलीन होणार आहे. आजपासून सातवे दिवशी हा प्रलय होणार आहे. त्यावेळेला एक मोठी नाव इथे येईल. सप्तर्षिंना घेऊन तुम्ही त्याच्यात बसा. मी त्याठिकाणी प्रगट होईन. नागराज वासुकीला घेऊन माझ्या शिंगाला ती नाव बांधून टाका. मी त्या नावेला घेऊन त्या जलामधे विहार करीन. मी कोण आहे, माझं सामर्थ्य काय आहे हे सगळं तिथं आपण बोलू. ऋषिमंडळीही असतील तिथे. ब्रह्मदेव जागे होईपर्यंत आपल्याला हेच काम करायचंय.'' याप्रमाणे त्याला सांगितलं. पुढे पर्जन्यवृष्टी सुरू झाली. हत्तीच्या सोंडेप्रमाणे धारा पडायला लागल्या. समुद्राने मर्यादा सोडली. जिकडेतिकडे पाणीच पाणी झालं. सप्तर्षि आले म्हणाले, ''चला राजेसाहेब, ही नाव आलेली आहे. आपण जाऊन बसू या. भगवान आपलं संरक्षण करणार आहेत.'' सर्व ऋषिंना बरोबर घेऊन राजा त्या नावेत जाऊन बसला. एक अजस्त्र मत्स्य प्रगट झालेला आहे त्याला एक शिंग आहे, त्याचं शरीर सुवर्णमय आहे आणि दहालक्ष योजनं लांब आहे. वासुकीच्या साहाय्याने त्या मत्स्याच्या शिंगाला ती नाव बांधली आणि त्या नावेला घेऊन मत्स्यमूर्ती श्रीहरी समुद्रातून निघालेले आहेत. ऋषिमंडळी विचारताहेत, आपण कोण आहात, सृष्टीरचना कशी आहे, प्रलयरचना कशी आहे ! अनेक प्रश्न विचारताहेत. त्याची उत्तरं भगवान देताहेत. असं चाललेलं आहे. भरपूर वेळ उपलब्ध आहे. असा बराच काळ गेला. सृष्टीनिर्मिती काल आलेला आहे. भगवंताने त्या हयग्रीव दैत्याला मारून ते वेदज्ञान, जागृत झालेल्या ब्रह्मदेवांना अर्पण केलेलं आहे. सत्यव्रत राजावर मत्स्यरूपी परमेश्वराची पूर्ण कृपा झालेली आहे. असं हे मत्स्यावताराचं चरित्र शुकाचार्य महाराजांनी परीक्षित राजाला निवेदन केलेलं आहे.

आता याच्यानंतर राजाने विचारलं, ''महाराज, सर्व मनूराजांचं चरित्र, त्यांचा काल किती वगैरे हे सगळं ऐकलं. सत्यव्रत राजाला भगवंतांच्या कृपेने ज्ञान मिळालं आणि तो सूर्यनारायणांचा पुत्र विवस्वान म्हणून प्रसिद्ध झाला हे आपण सांगितलं. श्रेष्ठ अशा प्रकारचे भगवद्भक्त तपस्वी, उत्तम धर्मशील राजे लोक कोणते झालेले आहेत त्यांच्या कथा मला आपण सांगा. पूर्वी होऊन गेलेले, आत्ता असलेले, पुढे होणार असलेले अशा सर्व राजांची चरित्रं आपण सांगा. राजे आहेत म्हणून चरित्र ऐकायची असं नाही तर हे राजे म्हणजे भगवंताच्या विभूतीच आहेत म्हणून त्या कथा सांगा.

शुकाचार्य सांगताहेत, ''मनुराजाचा वंश पुष्कळ आहे. ब्रह्मदेव हे श्रीहरीच्या नाभीकमलातून उत्पन्न झाले. त्यांचे प्रथम पुत्र म्हणजे मरिची ऋषि. हे मन:संकल्पाने उत्पन्न झाले. त्यांचे पुत्र कश्यप आहेत. आणि कश्यपांपासून दक्षकन्या अदितीच्या ठिकाणी विवस्वान म्हणजे सूर्यनारायण हा पुत्र झाला. सूर्यनारायणांपासून श्राद्धदेव मनू किंवा वैवस्वत मनू झालेला आहे. सध्या त्यांचाच काल चालू आहे. बरेच दिवस वैवस्वत मनूला संतती नव्हती. आपल्या गुरूंना, वसिष्ठ ऋषिंना त्याने पुत्रप्राप्तीकरता उपाययोजना करण्याची विनंती केली. वसिष्ठ महर्षिंनी मित्रावरूण देवतांच्या प्रसादाकरता यज्ञ केला. तो यज्ञ चालू असताना मनूची पत्नी ऋषिंजवळ आली आणि तिने सांगीतलं की मला मुलगी पाहिजे आहे. ऋषिंनी मंत्रप्रयोग वेगळा केला. शेवटी राजाला मुलगी झालेली आहे. राजाला हे माहिती नाही. राजाने आश्रमात जाऊन गुरूंना विचारलं, ''काय ऋषिमहाराज, हे असं कसं झालं ? तुमच्यासारख्या तपस्वी पुरुषांनी पुत्र होण्याकरता माझ्याकडून यज्ञ करवला आणि कन्या कशी झाली ? वसिष्ठ ऋषिंना खरं काय ते कळलं तरी त्यांना सांगता येईना. तुझ्या पत्नीनेच हे सांगीतलं असं सांगून त्या दोघात काय भांडण लावायचंय ? वसिष्ठ म्हणाले, काळजी करू नकोस, तुला मुलगा पाहिजेना, आपण प्रयत्न करू. त्यांनी भगवान श्रीहरींची प्रार्थना केली, ही मुलगीच मुलगा व्हायला पाहिजे. दुसरा मुलगा कशाला, राजाची इच्छा आहे, पुन्हा यज्ञ करा, पुन्हा वाट पाहा. प्रसन्न झाले भगवान. ती इला नावाची कन्या, ती पुरुषरूप झाली, सुद्युम्न नाव त्याचं ठेवलं. राजपुत्र मोठा होतो आहे. एकदा आपल्या सवंगड्यांसह तो राजपुत्र शिकारीला गेलेला असताना, मेरूपर्वताच्या एका स्थानामधे ती मंडळी गेली. त्या स्थानामधे भगवान शंकर पार्वतीमातेसह राहात होते. त्या स्थानामधे राजपुत्राने आपल्या मित्रांसोबत प्रवेश करताच सगळ्यांना स्त्रीरूप प्राप्त झालं. राजा म्हणतोय याचं कारण काय आहे! शुकाचार्य सांगताहेत, ''शंकर परमात्मा तिथे राहात असताना एकदा काही ऋषिमंडळी दर्शनाकरता तिथे आली. त्यावेळी पार्वतीमाता, तिच्या दासी यांना लज्जा उत्पन्न झाली. गडबड झाली. ऋषिमंडळींनी पाहिलं आणि ते निघून गेले. त्यावेळी सहज भगवान शंकर बोलून गेले.

स्थानं य: प्रविशेत् एतत् स वै योषिद् भवेदिति ।।९.१.३२।। श्री.भा.

या स्थानामधे माझ्याशिवाय जो पुरुष प्रवेश करेल त्याला स्त्रीरूप प्राप्त होईल. त्यावेळेपासून ज्यांना माहिती आहे असा कोणीही पुरुष तिथे जात नाही. तो राजपुत्र आणि त्याचे मित्र स्त्रीरूप झाले आणि फिरताहेत तिथे. ती राजकन्या म्हणजे तो स्त्रीरूप झालेला राजपुत्र फिरत फिरत बुधाच्या आश्रमात आलेला आहे. बुधाने तिच्याबरोबर विवाह केलेला आहे आणि ती तिथेच

राहिलेली आहे. पुरुरवा नावाचा मुलगा त्यांना झालेला आहे. वसिष्ठांना हे समजलं. भगवान शंकरांना ते शरण गेले. ''तुमच्या वचनामुळे आमचा राजपुत्र स्त्री झालेला आहे. त्याच्यावर कृपा करा. पुरुषरूप करा त्याला.'' शंकर म्हणाले, ''बाबा, माझंही वचन खरं ठरलं पाहिजे, तुमचीही इच्छा पूर्ण झाली पाहिजे. त्यामुळे असं करू, एक महिना हा पुरुष राहील आणि एक महिना स्त्री होईल.'' कबूल करावं लागलं वसिष्ठांना. परत आलेले आहेत. पण त्या राजाकडे कुणाचंही लक्ष नाहिये. एक महिना पुरुष काय, एक महिना स्त्री काय ? हा असला राजा आम्हाला नको म्हणाले लोक. शेवटी त्या सुद्युम्नाने राज्यत्याग केला. आपल्या मुलाला पुरुरव्याला राज्याभिषेक करून तो वनात निघून गेला.

यानंतर वैवस्वत मनूने तपश्चर्या केली आणि ईक्ष्वाकू, शर्याती वगैरे दहा मुलं त्याला नंतर झालेली आहेत. त्यापैकी पृषध्र नावाचा जो मुलगा होता त्याला वसिष्ठांनी आपल्या गाईंचं रक्षण करण्याची आज्ञा केली. कितीतरी गाई असायच्या. त्यावेळी दान हे रुपया-पैशात नव्हतं तर गाईंच्या रूपाने असायचं. ब्राह्मणांना, ऋषिंना गाईंचं दान दिलं जायचं. त्यांच्याही आश्रमात अनेक शिष्य शिकायला असायचे, तिथे उपयोग व्हायचा.

अटवी पर्वताश्चैव वनानि उपवनानि च ।
एतानि अस्वामिकान्याहु: ।। मनुस्मृती ।।

मोठे मोठे पर्वत, अरण्यं, वृक्ष, वनं यांच्यावर कोणाचंही स्वामित्व नाही. सगळं मोकळं होतं. राजाचंही स्वामित्व नाही असं मनूराजाने सांगून ठेवलेलं आहे. सगळ्या गाईंनी त्याच्यावर चरावं. कशावर बंदी नाही. आता प्रत्येक झाडावर नंबर घातलेले आहेत. सगळंच आमचं आहे अशी वृत्ति उत्पन्न झाली आहे. तो राजपुत्र गाईंचं संरक्षण करतो आहे. एकेदिवशी संध्याकाळी त्या गाई परत आल्यानंतर त्यांचं दूध काढलेलं आहे, त्यांना बांधून ठेवलं. थोडासा अंधार पडलेला असताना एक वाघ गोठ्यामधे शिरला आणि त्या गाईला त्याने धरलं. ती ओरडायला लागली. हा पृषध राजपुत्र तलवार उपसून तिथे गेला. त्याला अंधारात नीट दिसलं नाही. वाघाचा कान तुटला आणि गाईचं मस्तक तुटलेलं आहे. वाघ पळून गेला. दुसरे दिवशी सकाळी हा प्रकार सर्वांना समजला. वसिष्ठ रागावलेले आहेत. गोहत्या तू केलेली आहेस. जा निघून जा म्हणाले, वनामधे. तू शूद्र होशील. तुला राज्य करण्याचा अधिकार नाही. तो निघून गेला. ब्रह्मचर्यव्रत धारण करून भगवान वासुदेवाची भक्ति करून तो मुक्त झालेला आहे.

मनूराजाचा शर्याति नावाचा एक मुलगा होता. उत्तम वेदाध्ययन त्याने केलेलं आहे. यज्ञामधे त्याने काम करावं, असा तो मोठा अधिकारी होता. त्याला एक सुकन्या नावाची कन्या होती. एकदा त्या कन्येला बरोबर घेऊन तो शर्याति राजा अरण्यामधे शिकारीला गेला. मधे विश्रांतिकरता च्यवन ऋषिंचा आश्रम होता तिथे तो आपल्या सैन्यासह थांबलेला आहे. ती सुकन्या आपल्या मैत्रिणींसह त्या अरण्यामधे फिरू लागलेली आहे. मधे एक मोठ वारूळ लागलं, आत कुणीतरी बसलं आहे असं तिला वाटलं. तिने एक काठी घेऊन त्या वारुळात घातली. आत च्यवन ऋषि बसलेले होते, त्यांच्या डोळ्याला ती काठी लागली. डोळे गेलेले आहेत. त्यांच्या शापामुळे सर्व सैनिकांचा, सर्वांचा मलमूत्रनिरोध झाला. त्या शर्यातिने सगळ्यांना विचारलं, ''कुणी या आश्रमात ऋषिंचा अपमान केला आहे काय ? खरं सांगा.'' त्या सुकन्येने येऊन सांगीतलं की असा असा अपराध माझ्या हातून झालेला आहे. मला काही कळलं नाही. मुलीला घेऊन शर्याति राजा च्यवन ऋषिंना शरण गेलेला आहे. प्रार्थना केली. आता ऋषि अंध झालेले आहेत. त्यांचं कोण संरक्षण करणार ? त्यांनी सांगीतलं, ''बाबा, तुझी कन्या मला अर्पण कर. ती माझं संरक्षण करेल.'' राजाची इच्छा नव्हती. आपली एकुलती एक मुलगी अंध, वृद्ध ऋषिला द्यायची त्याची इच्छा नव्हती. राणीचीही इच्छा नव्हती. परंतु ती सुकन्या तयार झाली. लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न होता. मग त्या शर्यातिने आपल्या कन्येला च्यवन ऋषिंना अर्पण केलं. विवाह झाला. राजा परत गेलेला आहे.

एके दिवशी ती सुकन्या पाणी आणण्याकरता गेलेली असताना, सूर्यनारायणांचे पुत्र अश्विनीकुमारांची दृष्टी तिच्यावर पडली. तिची चौकशी केली त्यांनी. तिनेही सांगितलं की आपण शर्याति राजाची कन्या असून, च्यवन ऋषि माझे पती आहेत. ते म्हणाले, ''काय तू राजकन्या असून ही कामं करत बसली आहेस ? अलंकार नाहीत, उंची वस्त्रं नाहीत, तू आमच्याबरोबर स्वर्गलोकाला चल.'' नाही म्हणाली सुकन्या, ''मी यांची सेवा करत राहाणार आहे. मोठे तपस्वी महात्मे आहेत.'' त्यांना स्नान घालणं, अन्न तयार करणं, जेवायला घालणं, पूजेची तयारी करून ठेवणं अशी सगळी कामं ती सुकन्या करत होती. अश्विनीकुमार आश्रमामधे च्यवन ऋषिंना भेटण्याकरता आले. ऋषि म्हणाले, ''तुम्ही देववैद्य आहात. मला तारूण्य प्राप्त करून द्या आणि नेत्र प्रदान करा. हे जर तुम्ही काम केलं तर मी तुम्हाला यज्ञातला हविर्भाग मिळवून देईन. सोमरसपायी मी तुम्हाला करीन.'' अश्विनीकुमार च्यवनऋषिंना घेऊन बाहेर आले. मोठा एक तलाव होता. त्या तिघांनीही जलाशयात प्रवेश केला. ती सुकन्या वाट पाहात तीरावर थांबलेली

आहे. थोड्याच वेळात तीन दिव्य पुरुष बाहेर आले. सगळ्यांचं सारखं रूप आहे. अश्विनीकुमारांनी तिला सांगीतलं होतं की तुझा पति ओळखून तू घे. आता कसं ओळखायचं ? कुणाला तरी पसंत केलं आणि ते अश्विनीकुमार निघाले तर ? ती देवीभक्त होती. तिने स्मरण केलं देवीचं आणि काही खूण म्हणून ती म्हणाली, संध्याकाळ झाली महाराज, संध्यावंदनाची वेळ झाली. असं म्हणल्याबरोबर जे ऋषि होते ते अर्घ्यप्रदान करायला लागले. हेच आपले पति आहेत हे तिने ओळखलं. अश्विनीकुमारांनींही तिची प्रशंसा केली आणि ते स्वर्गलोकाला निघून गेले.

तरूण झालेल्या च्यवनऋषिंबरोबर सुकन्येचा संसार चालू आहे आता काही पराधीनता नाही. डोळे आलेले आहेत, सामर्थ्य आलेलं आहे. शर्याति राजाला यज्ञ करण्याची इच्छा झाली आणि आपल्या जावयांना बोलावण्याकरता तो आश्रमात आला. मोठे अधिकारी होते च्यवनऋषि. आश्रमात प्रवेश केल्यावर तो राजा पाहातो आहे की आपली कन्या एका तरूण पुरुषाबरोबर बोलत बसलेली आहे. त्याची कल्पना झाली की सुकन्येने अंध, वृद्ध च्यवन ऋषिंना कुठेतरी घालवून दिलं किंवा नदीमधे ढकलून दिलं आणि या तरूणाला घेऊन ही बसलेली आहे. तो रागावलेला आहे. च्यवन ऋषिही ऐकताहेत. तो म्हणतोय, ''तुझं नाव मी सुकन्या ठेवलं आणि तू मात्र आपल्या वृद्ध पतिला घालवून देऊन या तरूणाला घेऊन बसली आहेस. आपल्या कुलाला कलंक लावलास तू.'' सुकन्येने सांगीतलं, ''या, या पिताजी, अहो हेच आपले जावई च्यवनऋषि आहेत. उगाच काय रागावता ?'' मग तिने सगळी घडलेली हकीकत सांगीतली.

राजाने च्यवनऋषिंना विनंती केली आणि त्या दोघांना घेऊन तो राजधानीमधे आलेला आहे. यज्ञ सुरू झालेला आहे. सोमवल्लीचा रस काढला आणि प्रत्येक देवाची पात्रं भरलेली आहेत. त्यापैकी च्यवनऋषिंनी कबूल केल्याप्रमाणे अश्विनीकुमारांच्या नावचं पात्र भरलेलं आहे. च्यवनऋषिंनी त्यांना ते पात्र घ्यायला सांगीतलं. इंद्र उठून उभा राहिला, ''नाही, यांना यज्ञात अधिकार नाही. यांना सोमरस घेता येणार नाही.'' च्यवनऋषि म्हणाले, ''का घेता येणार नाही ? ते तुमच्यापैकीच देव आहेत ना. मला त्यांनी नवजीवन प्रदान केलेलं आहे. लोकोपकारक विद्या त्यांची आहे. वैद्यांना सोमरस देता येत नाही, कुणी सांगीतलं ?'' इंद्र रागावला आणि शर्याति राजाला मारण्याकरता त्याने हातात वज्र घेतलं. च्यवन ऋषिंनी रागाने पाहिल्याबरोबर त्याचा हातच हलेना. वज्र घेतलेला हात तसाच वरच्यावर राहिला. मग इंद्राने कबूल केलं. ऋषिंनी, देवांनी कबूल केलं. इंद्राचा आग्रह ! सगळे देवच असताना हे वैषम्य कशासाठी ? च्यवनऋषिंनी ते वैषम्य दूर केलं आणि अश्विनीकुमारांना यज्ञातला भाग मिळवून दिला.

याच वंशामधे रेवत नावाचा राजा झालेला आहे. समुद्रामधे मोठी नगरी त्याने निर्माण केली. राज्य करतो आहे. त्याला ककुद्मि नावाचा मुलगा झाला. त्याला रेवती नावाची मुलगी झाली. त्या मुलीला घेऊन तो ककुद्मि राजा ब्रह्मलोकात गेला, तिला कुठला वर ब्रह्मदेवांनी योजलेला आहे हे जाणून घ्यायला. हे एवढं कुणाला करता येत नाही. नाही तरी लग्नं लवकर झाली असती. राजा गेला ब्रह्मदेवांच्याकडे तेव्हा तिथं गायन चाललं होतं. त्यावेळेला काही बोलणं झालं नाही. गायन संपल्यावर तो ब्रह्मदेवांपाशी गेला, नमस्कार केला आणि विचारलं ह्या मुलीचं लग्न कुणाबरोबर करायचं ? ब्रह्मदेव हसले, म्हणाले, ''तुमच्या भूमीवर कितीतरी काळ उलटून गेलेला आहे. तुझी मुलं, त्यांची मुलं कुणीही शिल्लक राहिलेलं नाही. सत्तावीस युगं इतका काळ गेलेला आहे आता तुझ्या वेळचं कोणीही शिल्लक नाही. आता सध्या शेषांचा अवतार बलराम आहेत, मथुरेमधे त्यांना तुझी कन्या देऊन टाक.'' राजाने येऊन आपली कन्या रेवतीला बलरामांना अर्पण केली आणि तो तपश्चर्या करण्याकरता बद्रिकाश्रमात निघून गेलेला आहे.

मनूराजाचा एक मुलगा नभग नावाचा होता. त्याचा पुत्र नाभाग नावाचा. त्याने पुष्कळ दिवस गुरूकुलात राहून अभ्यास केला. त्याच्या इतर भावांना वाटलं हा आता ब्रह्मचारीच राहाणार आहे, आपण आपली वाटणी करून घेऊ. त्याप्रमाणे त्यांनी ते आपापसात वाटून घेतलं. काही कालाने नाभाग परत आला. माझा दायभाग मला द्या म्हणाला. तुझ्या वाटणीला फक्त हा बाप शिल्लक राहिलेला आहे. त्याला तू घेऊन जा. त्याची सेवा कर. त्याने येऊन पित्याला सांगीतलं सर्व. नभग म्हणाला, बोलू देत त्यांना, आपण प्रयत्न करू. इथे जवळंच ऋषिमंडळींचे आश्रम आहेत. तिथे यज्ञ चाललेले आहेत. तू आत्ताच शिकून आलेला आहेस. तिथे जाऊन तू मंत्रपठण कर म्हणजे यज्ञातलं राहिलेलं द्रव्य ते तुला देतील, त्याच्यावर तुझा निर्वाह होईल. बंधूना कशाला दुखवितोस ? नाभाग गेलेला आहे. त्याच्या मंत्रपठणाने ऋषिमंडळी प्रसन्न झाली आणि यज्ञातलं सर्वही द्रव्य त्याला देऊन ती स्वर्ग लोकाला निघून गेली. ते द्रव्य घेऊन तो घरी निघाला असताना एक दिव्य पुरुष त्याठिकाणी आला आणि त्याने सांगितलं हे माझं द्रव्य आहे. नाभाग म्हणाला, मला आत्ताच ऋषिंनी हे दिलेलं आहे ते तुमचं कसं होईल ? तो पुरुष म्हणाला तू तुझ्या पित्याला जाऊन विचार आणि नंतर मला सांगायला ये. त्याने पित्याला जाऊन सांगीतलं की कोणी एक पुरुष आलेला आहे आणि यज्ञातला राहिलेला भाग माझा असतो. असं तो म्हणतोय. पित्याने सांगितलं, बरोबर आहे, यज्ञात राहिलेला अवशिष्ट भाग रुद्राचा असतो. शास्त्र सांगतं आहे. आपण आणखी पुन्हा प्रयत्न करू. त्याचा भाग त्याला देऊन टाक. देवाच्या कृपेने कसाही आपला

योगक्षेम चालेल. परत आला तो राजपुत्र. त्या रुद्राला नमस्कार केला. मला माहिती नव्हतं म्हणाला. पित्याने मला सांगीतलं, हे आपलं द्रव्य आपण घ्या. भगवान शंकर संतुष्ट झाले. पित्याच्या सांगण्यावरून केवढी सत्यनिष्ठा आहे. आपल्या उदरनिर्वाहाचीही चिंता नाही. शंकर म्हणाले, ''नाभागा, हे सर्व द्रव्य मी तुला दिलेलं आहे आणि तुला ज्ञानही दिलेलं आहे. तू नित्यतृप्त राहाशील. मुक्त होशील.'' असं सांगून भगवान शंकर अंतर्धान पावलेले आहेत. सत्याचं फळ त्या नाभागाला मिळालं. काही दिवस त्याने राज्य केलेलं आहे आणि त्याला अंबरीष नावाचा मुलगा झालेला आहे. मुलाच्या स्वाधीन राज्य करून नाभाग वनात निघून गेलेला आहे.

अंबरीष राजा मोठा हरीभक्त होता. नित्य हरीची सेवा त्याने करावी. पुष्कळ यज्ञ त्याने केले. द्रव्यदान पुष्कळ केलेलं आहे. सर्व देवगण त्याच्या यज्ञामधे हविर्भाग घेऊन तृप्त झालेले आहेत. अशी त्याची भक्ति चाललेली आहे. पुष्कळ संपत्ती आहे, स्त्रिया, पुत्र, आप्तबांधव, राज्य आहे, पण हे सर्व विनाशी आहे ही जाणीव पक्की झालेली आहे मनामधे. आहे तोपर्यंत भोगायचं. अशा आपल्या भक्ताचं रक्षण करण्याकरता श्रीहरींनी आपल्या सुदर्शनचक्राला त्याच्यापाशी अव्यक्तरूपाने ठेवलेलं आहे. त्याने एकदा द्वादशीव्रत केलं. एकादशीला निराहार राहायचं, द्वादशीला लवकर पारण्याच्या वेळेप्रमाणे, ब्राह्मणांची पूजा करायची आणि त्यांना भोजन द्यायचं. अस एक वर्षभरपर्यंत त्याने केलं. कार्तिक द्वादशीला, सगळी मंडळी जमलेली आहेत. ताटं, पाट, वाट्या सगळं मांडलेलं आहे. भोजनाची सर्व सिद्धता झालेली आहे. इतक्यात दुर्वास ऋषि त्याठिकाणी आले. अंबरीषाने त्यांची पूजा केली आणि विनंती केली की पानं तयार आहेत, जेवायला बसावं. दुर्वासऋषि म्हणाले स्नानसंध्या करून येतो असं म्हणून ते नदीतीरावर गेले. त्यांना यायला वेळ लागला, बाकीची ब्राह्मण मंडळी तर पानावर येऊन बसली. पारण्याची वेळ टळू नये म्हणून आणि ब्राह्मणांचा अपमान होऊ नये म्हणून अंबरीषाने मनाने ठरवलं की नुसत पाणी पिऊन द्वादशी सोडायची. म्हणजे भोजन केलं असंही होणार नाही आणि पारणं केली नाही असंही होणार नाही. पाणी पिऊन त्याने बाकीच्या ब्राह्मणांना जेवायला बसवलं. वर्षभर व्रत केलं होतं, थोड्क्याकरता व्रतभंग होऊ नये म्हणून त्याने असं केलं. दुर्वासऋषि आले आणि त्यांनी ओळखलं की राजाने द्वादशी सोडलेली आहे. मला काही त्याने विचारात घेतलं नाही आणि माझा उपमर्द केलेला आहे. पण राजा थोडाच जेवला होता. पण विचार नाहिये. शासन करायचंय. अतिशय रागावलेले आहेत दुर्वास, म्हणताहेत, 'अरे अंबरीषा, फार उन्मत्त झाला आहेस तू. ही काय विष्णुभक्ति म्हणायची ? अतिथीला सोडून पारणं करतोस ?'' राजा हात जोडून काकुळतीने उभा आहे. दुर्वास ऋषिंनी

आपली एक जटा उपटली आणि भूमीवर टाकलेली आहे. त्यातून एक राक्षसी निर्माण झाली आणि तलवार हातात घेऊन त्या अंबरीष राजाला मारण्याकरता धावून गेली.

प्राग्दिष्टं भृत्यरक्षायां पुरुषेण महात्मना ।
ददाह कृत्यां तां चक्रं क्रुद्धाहिमिव पावकः ।।९.४.४८।। श्री.भा.

सुदर्शनचक्राला आज्ञा केली होती भगवंतानी याचं रक्षण तुला करायचंय. अंबरीषाचा शरीररक्षक तू आहेस. त्याप्रमाणे ते चक्र एकदम तिथे प्रकट झालं. त्या राक्षसीला त्याने जाळून टाकलं आणि दुर्वास ऋषिंच्या मागे ते लागलेलं आहे. दुर्वास ऋषिंना त्या चक्राचं भयंकर तेज काही सहन होईना, ते पुढे पळताहेत आणि ते चक्र पाठीमागे चाललेलं आहे. दुर्वास ऋषि ब्रह्मलोकात गेले, कैलास पर्वतावर गेले. ब्रह्मदेव, शंकरांनी सांगीतलं हे काही आमचं काम नाही. तुम्ही वैकुंठलोकात परमेश्वराला शरण जा. वैकुंठलोकात येऊन ऋषिंनी भगवंताचे पाय धरले, म्हणाले, ''माझं रक्षण करा, तुमचं चक्र काढून घ्या. अज्ञानाने माझ्या हातून हा दोष घडलेला आहे, मी क्षमा मागतो'', भगवान म्हणाले,

अहं भक्तपराधीनः ह्यस्वतन्त्र इव द्विज ।
साधुभिर्ग्रस्तहृदयो भक्तैर्भक्तजनप्रियः ।।९.४.६३।। श्री.भा.

''काय ऋषिमहाराज, तुम्हाला मी कोण क्षमा करणार ? मी स्वतंत्र कुठे आहे. मी भक्तांच्या आधीन आहे. साधूंनी माझं हृदय ताब्यामधे घेतलेलं आहे. माझं माझ्यावर स्वामित्व नाही. ज्यांनी आपल्या स्त्रीपुत्रादिकांना सोडून दिलेलं आहे आणि मला जे शरण आलेले आहेत त्यांना मी सोडून देऊ असं तुम्ही म्हणता. हे साधूलोक माझी केवल भक्ति करताहेत, त्यांनी संपूर्ण त्याग केलेला आहे. माझ्याशिवाय त्यांना दुसरं काहीही सुचत नाही. तुम्हाला जर या चक्रापासून सुटका पाहिजे असेल तर एकच उपाय आहे. त्या अंबरीष राजाकडे जाऊन त्याची प्रार्थना करा तेव्हा ते चक्र थांबेल. मी काही याला सांगणार नाही.'' आत्तापर्यंत भगवंताचं असं रूप पाहिलेलं नाही. ब्राह्मणाविषयी केवढा आदर भगवंताला ! भृगुऋषिंनी लाथ मारली छातीवर तर उलट त्यांनाच विचारलं की आपल्या पायाला काही लागलं कां म्हणून. पण इथे क्षमा नाहिये. भगवंतानी सांगीतलं.

तपो विद्या च विप्राणां निःश्रेयसकरे उभे ।
ते एव दुर्विनीतस्य कल्पेते कर्तुरन्यथा ।।९.४.७०।। श्री.भा.

ब्राह्मणाचं पूर्ण कल्याण तपाने आणि ज्ञानाने होतं. जे असे अत्यंत रागीट आहेत, अविनयाने वागणारे आहेत त्यांना उलट फळ मिळतं. त्यांच्या तपाचा, विद्येचा काही उपयोग होत नाही. नाभागाचा पुत्र अंबरीष राजाला तुम्ही शरण जा, त्याची क्षमा मागा तरंच ते चक्र शांत होईल. नाईलाज झालेला आहे. धावत धावत दुर्वास ऋषि आले. अंबरीष राजा वाट पाहातो आहे. एक वर्षाचा काळ गेला. दुर्वास ऋषि जेवल्याशिवाय आपण जेवायचं नाही असा निश्चय करून तो राजा उपोषित राहिलेला आहे. दुर्वास ऋषि आले आणि त्यांनी एकदम अंबरीषाचे पाय धरले, म्हणाले सोडव मला या संकटातून, राजालाही लज्जा वाटली, एवढ्या मोठ्या ऋषिंनी पाय धरले म्हणून. त्याने त्या चक्राची पुष्कळ स्तुति केलेली आहे. सर्व तेजोरूपी आपण आहात. सर्व अस्त्रांचा संहार करणारे आपण आहात. आपण शांत व्हा आणि या ऋषिमहाराजांना त्रासातून मुक्त करा. आजपर्यंत जर माझ्या हातून धर्माचरण यथास्थित झालेलं असेल, कुणिही अतिथी जर आजपर्यंत माझ्या दारातून विन्मुख गेलेला नसेल तर, ह्या ब्राह्मणाचा त्रास बंद होईल.'' तरी ते चक्र शांत होईना. मग त्याने असं सांगीतलं,

यदि नो भगवान् प्रीत एकः सर्वगुणाश्रयः ।
सर्वभूतात्मभावेन द्विजो भवतु विज्वरः ।।९.५.११।। श्री.भा.

सर्वात्मभाव धारण करून, सर्वठिकाणी परमात्मा आहे अशी भावना ठेऊन जर भगवंताची सेवा माझ्याहातून झालेली असेल, भगवंताची कृपा जर माझ्यावर असेल तर हे चक्र शांत होईल. भगवंताची कृपा होती म्हणूनच तर ते चक्र राजाच्या नगरीत होतं. लगेच ते चक्र अदृश्य झालेलं आहे. दुर्वास ऋषि तापातून मुक्त झालेले आहेत. ऋषिचं सर्वांग तप्त झालेलं आहे. राजा म्हणाला, ''चला, महाराज, बराच उशीर झालेला आहे.'' आदराने पूजा करून त्यांना भोजन दिलेलं आहे. दुर्वास ऋषिही संतुष्ट झाले, म्हणाले, ''बाबा, माझ्यावर तू दया केलेली आहेस. तू खरा भगवद्भक्त आहेस. तुझं हे चरित्र सर्व लोकांमधे देव गायन करतील. इतकी तुझी कीर्ति आहे.'' नंतर दुर्वास ऋषि आकाशमार्गाने ब्रह्मलोकाला निघून गेलेले आहेत. एवढं सगळं झाल्यावरसुद्धा अंबरीषाला अहंकार नाहिये. ही देवाची इच्छा आहे. मला मोठेपणा देवाने दिला आहे म्हणजे काय ते माझं कर्तृत्व आहे का? परमेश्वराच्या इच्छेने हे घडलेलं आहे. दुर्वास ऋषिंना देखील काही मार्गदर्शन करायचं असेल त्यांना. आपलं सामर्थ्य नाही. अशा निरभिमान वृत्तिने त्याने भगवद्सेवा केली. मुलांच्या ताब्यात राज्य देऊन, तो वनात गेला आणि अखंड ईश्वरभक्ति करून तो मुक्त झालेला आहे.

यानंतर अनेक लहानमोठे राजे झालेले आहेत. यौवनाश्व नावाच्या राजाला संतती नव्हती. तेव्हा ऋषिमंडळींनी इंद्र याग त्याच्याकडून करवला. रात्रीच्या वेळी सगळी मंडळी निजलेली असताना राजाला तहान लागली. यज्ञमंडपामधे राजा गेला आणि तिथे एक पात्र भरून ठेवलं होतं ते पाणी राजा प्यायला आणि जाऊन झोपला. सकाळी सर्व ऋषिमंडळी येऊन पाहातात तर पात्रात पाणी नाही. ते पाणी अभिमंत्रण करून राणीला प्यायला ठेवलं होतं तेच पाणी राजा प्याला. राजाने सांगीतलं, मला काही माहित नव्हतं, तहान लागल्यामुळे मी ते पाणी प्यालो. ऋषि म्हणाले, काय नशीब आहे पाहा, आता राजालाच गर्भ राहाणार. त्याच्या उदरातून तो मुलगा जन्माला आला. आता त्या मुलाला दूध कोण पाजणार ? माता नाहिये ना ! मग ज्याचा यज्ञ केला होता, तो इंद्र प्रसन्न झाला. त्याने आपली अमृतयुक्त अंगुली त्या मुलाच्या तोंडात घालून त्याला तृप्त केलं. तो राजाही इंद्राच्या कृपेने जिवंत झालेला आहे.

असा तो यौवनाश्वपुत्र मांधाता राजा, इंद्राला देखील त्याने साहाय्य केलेलं आहे. रावणासारखे राजेदेखील त्याला भिऊन राहात. कार्तवीर्य अर्जुन, वाली वगैरे राजांना रावण भिऊन राहात होता. तो मांधाता राजा सप्तद्वीप युक्त पृथ्वीचं राज्य करतो आहे. परमेश्वराच्या प्रसादाकरता अनेक यज्ञ त्याने केले. त्याला तीन मुले, आणि पन्नास मुली झाल्या. यमुनेच्या जलामधे एक सौभरी नावाचे ऋषि जाऊन राहिले होते, बाहेरच्या लोकांचा संबंध नको म्हणून. बापाने सांगीतलं तरी गृहस्थाश्रम करायचा नाही असं त्यानी ठरवलं. सर्वसंगत्याग करून जलामधे राहून तपश्चर्या करत असताना, मत्स्यराजाचा परिवार, गृहस्थाश्रम यांनी पाहिला आणि यांच्याही मनात इच्छा झाली की आपणही गृहस्थाश्रम करावा. बाप सांगत होता ते ऐकलं नाही. पण आता वेळ आलेली आहे. सौभरी ऋषि, मांधाता राजाच्या राजवाड्यात आले आणि त्यांनी राजाला सांगीतलं की 'मला विवाह करायचा आहे, तुझी कन्या मला दे.' म्हाताऱ्या ऋषिला कन्या द्यायला राजाचं मन काही तयार होईना. पण नाहीही म्हणता येईना, हे ऋषि रागावले तर शाप देतील. त्याने सांगीतलं, ''ऋषिमहाराज, राजकन्या या स्वयंवर करत असतात आपल्याला माहिती आहे. आपण या कन्यांच्या अंतःपुरात जा. जी कन्या आपल्या गळ्यात माळ घालेल ती कन्या मी तुम्हाला अर्पण करीन. म्हणजे मुलींच्यावर तो निर्णय राजाने सोडला. राजाने असं का सांगीतलं याचं कारण ऋषिंच्या लक्षात आलं आणि अत्यंत सुंदर तरुणाचं रूप घेऊनच ते अंतःपुरात गेले. राजाने निरोप पाठवला होता, 'हे ऋषि आलेले आहेत. कोणाला यांच्याबरोबर विवाह करायचा असेल तर करावा. सर्व कन्या म्हणाल्या यांच्याबरोबर आमचा विवाह व्हावा. मग राजाने आपल्या सर्वही कन्यांचा विवाह

ऋषिंबरोबर करून दिलेला आहे.

मोठे योगी होते सौभरी ऋषि. तितके वाडे, तितके नोकर चाकर निर्माण झाले, तितकी रूपं धारण केली सौभरी ऋषिंनी आणि त्यांचा संसार सुरु झाला. मांधाता राजा आपल्या मुलींचा संसार बघण्याकरता त्यांच्या आश्रमात आला. केवढी अपार संपत्ति आहे. कशाचीही ददात नाही. राजाला वाटलं, मी श्रेष्ठ आहे का हे ऋषि श्रेष्ठ आहेत !अशा तऱ्हेने सौभरी ऋषिंनी पुष्कळ काळपर्यंत विषयभोग घेतला. अनेक शरीरं धारण करून त्यांनी आपली कर्म संपवली. योगी पुरुषांना असं करता येतं. अनेक शरीरांनी सुख दुःखांचा उपभोग घेऊन ते प्रारब्ध कर्म संपवू शकतात. त्या मत्स्याच्या संगतीमधे राहून त्यांना गृहस्थाश्रम करायची इच्छा झाली. शेवटी त्यांचे विचार बदलले. पश्चाताप झाला. काय म्हणाले, व्यर्थ मी या मोहात सापडलो, मुलं झाली. नातू झाले, सगळं आयुष्य फुक्कट गेलं. मग त्यांनी निश्चय केला आणि आपल्या स्त्रियांना सांगितलं की मी आता इथं राहाणार नाही. सर्व ऐश्वर्य सोडून सौभरी ऋषि अरण्यात निघून गेले. त्या स्त्रियाही त्यांच्याबरोबर गेलेल्या आहेत. सर्वांना उत्तम गती प्राप्त झाली.

याच वंशामधे सत्यव्रत राजा होऊन गेला. त्याला त्रिशंकूम्हणतात. त्याला सशरीर स्वर्गाला जाण्याची इच्छा झाली. विश्वमित्रांना तो शरण गेला. विश्वमित्रांनी त्याला आश्वासन दिलं. आणि त्याला सशरीर स्वर्गात पाठवलं. देव काही त्याला त्या शरीराने स्वर्गात घ्यायला तयार होईनात. तुझं हे शरीर पडल्यावर तू ये म्हणाले. त्यांनी त्याला खाली ढकलून दिलं. विश्वमित्रांनी पुन्हा त्याला आपल्या सामर्थ्याने वर पाठवलं. शेवटी समेट झाला. त्याला दिव्य शरीर मिळालं आणि त्या शरीराने त्रिशंकूराजा स्वर्गात गेलेला आहे.

त्याचा मुलगा हरिश्चंद्र आहे. हरिश्चंद्राला मुलगा नव्हता. वरूणाला तो शरण गेला आणि त्याने सांगीतलं; 'महाराज, मला जर मुलगा झाला तर तो मी तुम्हाला अर्पण करीन.' नरमेध यज्ञ पूर्वी करत होते म्हणे. त्याला मुलगा झाला. लगेच वरूण ब्राह्मणवेषात आला. आणि त्याने मुलगा मागितला. राजा म्हणाला, आताच मुलगा झालाय, थोडा काळ तरी जाऊ दे. थोडा मोठा होऊ दे. त्याला दात येऊ दे. दात आल्यावर पुन्हा वरूण आला. पुत्रप्रेमामुळे पुढं पुढं तो काल ढकलतो आहे राजा. मुंज होऊ दे म्हणाला. रोहित त्याचं नाव, तो मोठा झालेला आहे. त्याला कुणीतरी सांगितलं, तुला तुझा पिता वरूणाला बळी देणार आहे. हे कळल्याबरोबर तो रोहित अरण्यात निघून गेला. वरूण आल्यावर हरिश्चंद्राने सांगीतलं की मुलगा कुठे गेला हे माहित नाही. वरूण रागावलेला

आहे आणि त्याने हरिश्चंद्राला शाप दिला की तुला जलोदर रोग होईल.' त्या रोगामुळे अतिशय त्रास हरिश्चंद्राला होऊ लागला. रोहीतला हे समजलं आपल्या पित्याला असा असा त्रास होऊ लागलाय. तो परत यायला निघाला. वाटेत चार-पाच वेळा इंद्राने त्याला राजधानीत जाण्यापासून परावृत्त केलं. 'कशाला जातोस म्हणाला, मरायला, तो वरूण आणि तुझा पिता बघून घेईल.

इकडे वसिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे राजाने मुलगा विकत घ्यायचा ठरवलं. त्याप्रमाणे राजाचा प्रधान एका ब्राह्मणाकडे गेला. त्याला तीन मुलं होती. ब्राह्मण म्हणाला, मोठा मुलगा माझी परंपरा सांभाळणारा आहे त्यामुळे हा देता येणार नाही. त्या ब्राह्मणाची पत्नी म्हणाली कनिष्ठ मुलगा माझा आहे. मी देणार नाही. मधला मुलगा जो शुनःशेप याला प्रधानाने आणलेलं आहे. त्या बदल्यात काही द्रव्य त्या दरिद्री ब्राह्मणाला दिलं. राजाने शुनःशेपाला यज्ञपशू म्हणून वरूणाला अर्पण करायचं ठरवलं. तो शुनःशेप अतिशय भीतीग्रस्त झाला. विश्वमित्र ऋषिंना दया आली. त्यांनी राजाला विनंती केली की याला मारू नकोस, घाबरलाय हा. राजा म्हणाला, 'माझा जीव जाणार आहे. तिकडे आधी बघू का याच्याकडे लक्ष देऊ. विश्वमित्र रागावले. त्यांनी त्या शुनःशेपाला वरूणाची प्रार्थना करण्याचा मंत्रोपदेश केला. शुनःशेपाने वरूण आल्यावर त्याची प्रार्थना केली. वरूण संतुष्ट झाला आणि त्याने शुनःशेपाला मुक्त केलेलं आहे. जा, म्हणाला, माझा यज्ञ पूर्ण झालेला आहे. आता तो मुलगा कोणाचा ? कुणाकडे जाणार ? काही ऋषि म्हणाले बापाने पैसे घेऊन मुलाला विकलं, त्याचे प्राण वाचविले नाहीत म्हणून मुलाने बापाकडे जायचं नाही. हरिश्चंद्र राजाही तसाच. तो मारायला तयार झालेला त्यामुळे त्याच्याकडेही मुलाने जायचं नाही. मग वसिष्ठांनी सांगीतलं, खरा पिता याचा विश्वमित्र आहे. त्याने दयेने याला वरूणाच्या संकटातून सोडवलं. त्यामुळे याने विश्वमित्राकडे जावं. विश्वमित्र ऋषि शुनःशेपाला घेऊन आपल्या आश्रमात आले आणि त्यांनी त्याला उत्तम उपदेश केलेला आहे. हरिश्चंद्र राजाही रोहितला आपल्या मुलाला राज्य सोपवून वनात गेला आणि भगवद्भक्ति करून तो मुक्त झालेला आहे.

याच वंशामधे बाहुक नावाचा राजा झालेला आहे. शत्रूने त्याचं राज्य घेतल्यामुळे तो वनात गेला. वृद्धावस्थेमुळे त्याला मृत्यू आला. त्याची स्त्री सहगमन करायला निघाली असताना ती गर्भिणी आहे असं कळल्यावर तिला तसं न करण्याविषयी इतर जनांनी सांगीतलं. बाकीच्या सवतींना हे समजल्यावर त्यांनी तिला विष पाजलेलं आहे. पण तिला काही बाधा झाली नाही. तो मुलगाही विषासह बाहेर पडला आहे. गर म्हणजे विष. विषासहित म्हणून सगर असं त्याचं नाव

पडलं आणि और्वऋषिंच्या कृपेने तो चक्रवर्ती राजा झालेला आहे. त्याने गुरूंच्या आज्ञेनुसार, यवन आणि दुर्जन लोकांना मारलं नाही. नुसतं शासन करून त्यांना त्यांच्या त्यांच्या भागात राहायला सांगीतलं. त्यानंतर सगर राजाने अश्वमेध यज्ञ केला आणि त्याचा अश्व इंद्राने हरण केला. इंद्राने तो अश्व कपिलमुनींच्या आश्रमात सोडून दिला. सगर राजाला साठ हजार पुत्र होते. एका स्त्रीच्या उदरातून एवढी मुलं होणं शक्य नाही. काही मंत्र प्रयोग असतील. गर्भ कसा व्हावा, कसा वाढावा याकरता बाहेरही काही त्यांचे मंत्रप्रयोग असतील. गांधारीलाही शंभर मुलं अशी प्रयोगानेच झाली असणार. ते साठ हजार सगरपुत्र अश्व शोधण्याकरता निघाले आणि कपिलमुनींच्या आश्रमात येऊन पोहोचले. यांनीच आपला अश्व चोरला असं समजून ते कपिलमुनींना मारायला गेले असताना, मुनींच्या शरीरातून अग्नि उत्पन्न झाला आणि ते साठ हजार सगरपुत्र जळून भस्म होऊन गेलेले आहेत.

सगराने आपल्या अंशुमान नावाच्या नातवाला आपल्या चुलत्यांचा शोध घेण्याकरता पाठवलं. तो कपिलमुनींच्या आश्रमात आला. कपिलांना त्याने वंदन केलेलं आहे. कपिलांनी सांगीतलं की हा तुझ्या पितामहाचा अश्व घेऊन जा. हे तुझे पितर दग्ध होऊन गेलेले आहेत. गंगादेवीच्या जलाचा स्पर्श जर यांच्या भस्माला होईल तर हे मुक्त होतील. तो अंशुमान अश्व घेऊन परत आला. सगर राजाने अश्वमेध यज्ञ पूर्ण केला आणि अंशुमनाला राज्य सोपवून तो वनात निघून गेला. अंशुमानाने गंगादेवीची तपश्चर्या केली पण त्याच्या आयुष्यकालात काही ती प्रसन्न झाली नाही. त्याचा मुलगा दिलीप नावाचा त्यानेही गंगादेवीची उपासना केली. पण त्यालाही यश आलं नाही. त्याचा मुलगा भगीरथ यानेही मोठी खडतर तपश्चर्या केल्यानंतर गंगादेवीने त्याला दर्शन दिलेलं आहे. गंगादेवीने विचारलं, ''काय पाहिजे ?'' त्याने सांगीतलं, ''आपण स्वर्ग लोकातून या पृथ्वीवर यावं. आमचे जे पितर भस्म झालेले आहेत त्यांच्या भस्मावरून आपलं पाणी गेलं की ते मुक्त होऊन स्वर्गलोकाला जातील.'' गंगादेवीने दोन अडचणी सांगीतल्या. म्हणाली, ''मी भूमीवर येणार म्हणजे माझा प्रवाह कुणीतरी धारण करून सोडला पाहिजे नाहीतर मी भूमीचा भेद करून पातालात जाईन. ही एक अडचण आहे. आणि दुसरी अडचण म्हणजे, या तुमच्या मृत्यूलोकात सगळे दुर्जन आहेत. मला यायची इच्छाच नाही. चांगली सोय झाली की त्यांची, माझ्या जलामधे स्नान करून सर्व पापं टाकून देतील आणि पुन्हा पाप करायला मोकळे ! ती पापं मी कुठं टाकू?'' भगीरथ मोठा बुद्धिमान होता. तो म्हणाला, ''आईसाहेब, भगवान शंकर आपला प्रवाह आपल्या जटेमधे धारण करायला समर्थ आहेत की नाहीत ?'' ''हो, म्हणाली. जा त्यांना

प्रार्थना कर. पण ही दुसरी गोष्ट ? भगीरथ राजा म्हणाला, ''जगामधे काय सगळेच पापी लोक आहेत काय ? पुण्यवान, मोठेमोठे भगवद्भक्त, ज्ञानी महात्मेही आहेत. दुर्जनांनी जरी आपलं पापं तुमच्या जलामधे टाकली तरी भगवद्भक्त महात्मेही आपल्या जलात स्नान करून तुम्हाला पुन्हा पवित्र करतील. त्यांच्या हृदयामधे भगवंताचा निवास नेहमी आहे. त्यांच्या स्नानानं तुमचं जल पवित्र होईल का नाही ?'' कबूल करावं लागलं गंगेला. भगवान शंकर प्रसन्न झाले. त्यांनी आपल्या जटेमधे तो प्रवाह धारण केला आणि भूमीवर सोडून दिला. तो भगीरथ राजा रथातून वेगाने पुढे जातो आहे आणि गंगा पाठीमागून वाहात येते आहे. ज्याठिकाणी भगीरथाचे पितर भस्म होऊन पडले होते त्याच्यावरून गंगेला प्रवाह गेल्याबरोबर त्यांना दिव्य देवरूप प्राप्त झालं आणि ते स्वर्ग लोकाला निघून गेले.

शुक सांगताहेत, ''परीक्षित राजा, भगवंतांच्या चरणापासून निर्माण झालेली गंगादेवी, तिच्या जलाचं किती सामर्थ्य वर्णावं ? नुसत्या भस्मावरून जल गेलं तर त्यांचा उद्धार झाला. मग अत्यंत भक्तिभावाने, प्रेमाने गंगादेवीच्या जलामधे स्नान करणाऱ्यांना केवढं फल मिळेल ? मृत्यूलोकामधे ईश्वराने पापक्षयाची पुष्कळ योजना करून ठेवली आहे.

याच वंशामधे खट्वाङ्ग नावाचा राजा झालेला आहे. मोठा पराक्रमी राजा होता. देवांवर एकदा संकट आलेलं असताना त्यांनी राजाला विनंती केली की तुम्ही आमचे सेनापती व्हा आणि हे परचक्र दूर करा. त्याने दैत्यांचा पराभव केला. पुष्कळ दिवस तो सेनापती म्हणून राहिलेला आहे. कार्तिकस्वामी देवांना सेनापती म्हणून मिळाल्यावर देवांनी खट्वाङ्ग राजाला त्याच्या राजधानीमधे परत पाठवलं आणि सांगितलं की राजा पुष्कळ कालपर्यंत तू इथे राहिल्यामुळे तिकडे तुझे सगळे आप्तबांधव नाश पावलेले आहेत. तुला काय हवं ते सांग. आम्ही काही तुला ज्ञान देऊ शकत नाही. ते सामर्थ्य फक्त श्रीहरीचं आहे. त्याने विचारलं, 'माझं आयुष्य किती राहिलंय सांगा.'' देव म्हणाले, 'एक मुहूर्त आयुष्य शिल्लक आहे म्हणजे पुरता एक तासदेखील नाही.' त्या राजाचं अंतःकरण पहिल्यापासूनच तयार असलं पाहिजे. भगवान श्रीहरींचं ध्यान करायला त्याने सुरवात केली आणि हृदयस्थ नारायणांचं ध्यान करता करता तो मुक्त झालेला आहे.

खट्वाङ्ग राजाचा मुलगा दीर्घबाहू. दीर्घबाहूचा पुत्र रघुराजा. रघुराजाचा पुत्र अज म्हणून आहे आणि अजाचा पुत्र दशरथ राजा आहे. भगवान श्रीहरी प्रसन्न झाले दशरथावर आणि त्यांनी राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न या चार रूपांनी त्याच्या पोटी अवतार घेतलेला आहे. भगवान रामचंद्रांचं

चरित्र पुष्कळ ऋषिंनी वर्णन केलेलं आहे.

शुकाचार्य महाराज रामचंद्रांचं चरित्र सांगताहेत. राम, लक्ष्मण मोठे झाले. पंधरा सोळा वर्षांचं वय असेल. एकदा विश्‍वमित्र ऋषि राजवाड्यामधे आले. दशरथाने त्यांची पूजा केली आणि विचारलं, आपली काय आज्ञा आहे ? विश्वमित्र म्हणाले, ''मी यज्ञाला सुरवात केल्यावर हे दैत्य येतात. रक्त मांस फेकून यज्ञ अपवित्र करतात आणि बंद पाडतात. यज्ञाच्या रक्षणाकरता या दोन मुलांना मागण्याकरता मी आलो आहे. हे राम, लक्ष्मण मला पाहिजेत.'' दशरथाला पुत्र स्नेहामुळे वाटलं, की लहान मुलं आहेत. दैत्यांपुढे यांचा काय निभाव लागणार ? तो म्हणाला, ''महाराज, मी स्वत: सैन्य घेऊन येतो आणि आपल्या यज्ञाचं रक्षण करतो.'' विश्वमित्र म्हणाले, ''नाही, या दोन कुमारांनाच मी नेणार.'' वसिष्ठांनी दशरथाची समजूत घातली, म्हणाले, ''राजा, प्रत्यक्ष विश्वमित्र यांची जबाबदारी घेताहेत तर तू काळजी कशाला करतोस ? यांचं सामर्थ्य तुला माहित आहे ना ? देऊन टाक मुलांना.'' राम, लक्ष्मणांना घेऊन विश्‍वमित्र ऋषि आपल्या आश्रमाकडे जाण्यास निघाले. मधे एका नदीतीरावर विश्रांतीकरता थांबलेले असताना विश्वमित्रांनी राम, लक्ष्मणांना बला आणि अतिबला या विद्या दिल्या. मंत्र दिले. ज्या मंत्रांचं सामर्थ्य असं आहे की क्षुधा आणि तृषा संपून गेलेल्या आहेत. काही खायला, प्यायला नाही मिळालं तरी शक्ति कायम आहे. जाताना अरण्यामधे ताटिका राक्षसी समोर आली. विश्‍वमित्रांच्या आज्ञेने श्रीरामांनी ताटिकेचा वध केलेला आहे. राक्षसांच्या वधाला आरंभ तिथूनच झालेला आहे.

विश्‍वमित्रांचा यज्ञ सुरू झाला. ताटिकेचा मुलगा सुबाहू आणि मारिच राक्षस हे दोघे आकाशामधे येऊन रक्तमांस वृष्टि करू लागले. एका बाणाने श्रीरामांनी त्या सुबाहूला मारलं आणि दुसऱ्या बाणाने त्या मारिचाला समुद्रापलिकडे फेकून दिलेलं आहे. रामांचा पराक्रम काय विलक्षण आहे याची जाणीव त्याला कायम राहिली. तो पुन्हा या दैत्यांच्या मधे गेला नाही. आश्रम बांधून तो राहिलेला आहे. रावणाने शेवटी गाठलंच त्याला. 'सुवर्णमृगाचं रूप घेऊन जा म्हणाला आणि सीतेला मोहात पाड. मला सीतेला न्यायचंय. 'मारिच म्हणाला,' रामबाणाचा विलक्षण प्रभाव मी अनुभवलेला आहे. असं दुष्कृत्य तू काही करू नकोस. मी हे काम करणार नाही.' रावण म्हणाला. मग मीच मारतो तुला मारिचाने विचार केला, रावणाच्या हातून मरण्यापेक्षा रामांच्या हातून मेलो तर सद्‍गती मिळेल. म्हणून मारिच आला, नाहीतर आला नसता. विश्वमित्रांचा यज्ञ निर्विघ्न पार पडला. राम, लक्ष्मणांना घेऊन ते निघाले. मधे गौतमाश्रमात शिळारूप होऊन पडलेल्या

अहिल्यादेवीचा उद्धार श्रीरामांनी केला. गौतमऋषिंचा सबंध आलेला आहे. त्यांचीही कृपा झाली. पुढे तिथून मिथीला नगरीमधे आलेले आहेत. सीतादेवीचं स्वयंवर ठरलेलं होतं. बरेच राजे लोक आलेले आहेत. तीनशे लोकांनी गाड्यावर ओढून आणलेलं शिवधनुष्य राजसभेत ठेवलं गेलं. पुरोहिताने सांगीतलं, ''हे शिवधनुष्य उचलून, त्याला प्रत्यंचा लावून जो सज्ज करेल त्या पराक्रमी पुरुषाला राजेसाहेब सीतादेवी अर्पण करतील.'' हा पण आहे, कोण येणार पुढं ? रावणही आला होता तिथे, ते धनुष्य त्याच्या अंगावर पडलं मग तो तिथून निघून गेला. मग विश्वमित्रांच्या आज्ञेने रामचंद्र गेले. त्यांनी तो धनुष्य सहज उचललं, आणि त्याला दोरी लावायला थोडंसं वाकवल्याबरोबर ते तुटून गेलेलं आहे. फेकून दिले दोन्ही तुकडे आणि आपल्या जागेवर ब्राह्मणांमधे येऊन बसले. सीतादेवीला आनंद झालेला आहे. तिने त्यांच्या कंठात पुष्पमाला घातली आता विवाह व्हायला पाहिजे. सीता ही भूमीकन्या आहे. शेतामधे एका पेटीमधे ती मिळाली. दुसरी स्वत:ची कन्या उर्मिला म्हणून होती ती लक्ष्मणांना द्यायचं जनकाने ठरवलं. आणि आपल्या बंधूच्या दोन कन्या भरत शत्रुघ्नांना द्यायच्या ठरवलं. अयोध्येला जाऊन सर्वांना निमंत्रण पाठवलं. दशरथराजा सर्व वऱ्हाडासह, परिवारासह आलेला आहे आणि चारी विवाह उत्तम रीतीने पार पडलेले आहेत. याकरता विश्वमित्रांनी राम लक्ष्मणांना आणलं होतं. हे सगळं जोडून द्यायचं आहे ना !

सगळं वऱ्हाड निघालं अयोध्येला. परशुरामांच्या कानावर बातमी गेली. शिवधनुष्याचा भंग करणारा कुणीतरी एक क्षत्रिय वीर निर्माण झालेला आहे. एकाही क्षत्रियाला जिवंत ठेवायचं नाही. ही त्यांची प्रतिज्ञा होती. एकवीस वेळा त्यांनी पृथ्वी नि:क्षत्रिय केली होती. ही सगळी मंडळी निघाली असताना समोर परशुरामजी आलेले आहेत. त्यांनी विचारलं, ''राम कोण आहे ? शिवधनुष्याचा भंग करणारा राम कुठे आहे ?'' रामचंद्र पुढे आले, ''काय ऋषिमहाराज, मीच राम आहे.'' परशुरामजी म्हणताहेत, ''काय ते शिवधनुष्य तोडलं म्हणजे मोठा पराक्रम गाजवला असं तुला वाटतंय ? ते जुनं झालं होतं. हे माझ्या हातातील धनुष्य घेऊन त्याला बाण जोडून दाखव.'' एकदम रामचंद्रांनी त्यांचं धनुष्य काढून घेतलं. त्यांचं सर्व तेजच काढून घेतलं. धनुष्याला बाण लावलेला आहे. आणि सांगताहेत रामचंद्र,'' ऋषिमहाराज, हा बाण परत भात्यात ठेवता येणार नाही कोणत्यातरी कामाकरता याचा उपयोग झाला पाहिजे. माझी प्रतिज्ञा तुम्हाला माहिती आहे का ?

द्वि:शरं नाभिसंधत्ते द्वि: पीडयति नोऽकरन् ।
द्विर्ददाति न चार्थिभ्यो रामो द्विर्नाभिभाषते ।।



राम एक बाण दोन वेळेला लावत नाही. एकदां पाणीग्रहण केल्यानंतर दुसऱ्या पत्नीबरोबर राम विवाह करत नाही. याचक आला असताना राम दोन वेळेला देत नाही. एकदा दिलेलंच त्याला जन्मभर पुरतं. आणि रामांच्या मुखातून दोन वेळा भाषण होत नाही. एकदा निघालेले शब्दच सत्य होतात. आता काय करू सांगा, तुमची गति बंद करू, इथंच तुम्हाला थांबवू का तुमचा स्वर्गाचा दरवाजा बंद करू ? परशुरामजींनी ओळखलं की हा सामान्य क्षत्रिय नाहिये. प्रत्यक्ष परमेश्वर आहे ते म्हणाले, ''रामा मला स्वर्गाची काही इच्छा नाही तेव्हा तू स्वर्गाचा दरवाजा बंद करून टाक. पण सत्संगती मिळण्याकरता मी अनेक तीर्थक्षेत्रात हिंडत असतो तेव्हा माझी गति तेवढी बंद करू नको.'' रामांनी बाण सोडून विश्वमित्रांचा स्वर्गाचा दरवाजा बंद केलेला आहे. परशुरामजी निघून गेले. सर्व परिवारासह दशरथ राजा अयोध्येला आलेला आहे.

रामांची कीर्ति पसरलेली आहे. रामांवर सर्व प्रजानन अत्यंत मनापासून प्रेम करताहेत. सर्वांची इच्छा जाणून रामांना राज्याभिषेक करण्याचं दशरथाने ठरवलं. तयारी चाललेली आहे. वसिष्ठ ऋषिंनी मुहूर्त तयार केलेला आहे. नगरामधे मांडव घातलेले आहेत. रस्त्यावर चंदनाचे खडे टाकलेले आहेत. जमिनीवर मोठमोठ्या रांगोळ्या काढताहेत. कैकयीच्या दासीने मंथरेने चौकशी

केली आणि तिला कळलं की रामाला अभिषेक होणार आहे.

निष्कारणो वैरिणो जगति

असं सांगताहेत सुभाषितकार निष्कारण वैर करणारे लोक आहेत.

मृगमीनसज्जनानां तृणजलसंतोषवृत्तीनाम् ।
लुब्धकधीवरपिशुना: निष्कारणौ वैरिणो जगति ।।

रानामधे हरिण गवत खाऊन शांतपणे राहातात. पण हे पारधी लोक त्यांना पकडून घेऊन जातात. पाण्यामधे मासे शांतपणे विहार करत असतात. हे कोळी लोक त्यांना घेऊन जातात. आणि सज्जन मंडळी संतोषाने भगवद्भजन करत असताना दुर्जन लोक त्यांचा छळ करतात. निष्कारण वैर करायचं.

ही मंथरा दासी विचार करतेय, हा रामाचा अभिषेक नाही झाला पाहिजे. तो आता तिच्या प्रयत्नाने बंद झाला का त्याला आणखी कारण आहे हा निराळा आहे विचार. पण तिला तरी समाधान मिळवायचंय की आपण बंद केला. कैकेयी आपल्या पलंगावर पडलेली आहे. मंथरा येऊन सांगतीय, ''बाईसाहेब, रामाला युवराजपदाचा अभिषेक होणार आहे.'' कैकेयीला अतिशय आनंद झाला. तिचं रामावर अतिशय प्रेम ! आपल्या गळ्यातील रत्नांची माळ मंथरेला देत कैकेयी म्हणाली, ''अगं किती चांगली बातमी सांगितलीस.'' आता हिचं मन बदलायचं कसं? पण ती मंथरासुद्धा मोठी बुद्धिमान होती. दुर्जनसुद्धा मोठे प्रयत्नवादी असतात. त्यांचे प्रयत्न फुकट जातात पण सारखे ते प्रयत्न करत राहतात. मंथरा म्हणतीय, ''तुम्हाला कळवलं तरी का दशरथ राजाने? आणि तयारी सुरू पण झाली.'' तरीपण परिणाम नाही. कैकेयी म्हणतीय, ''अग तयारी सुरू होईना. आपण अभिषेक पाहायला जाऊ म्हणजे झालं.'' शेवटी ती मंथरा म्हणाली, ''बाईसाहेब, काय अनर्थ होणार आहे तुम्हाला माहिती आहे का ? तुमच्या मनात देखील येणार नाही. राम जर राजा झाला तर कौसल्येच्या हातात सर्व सत्ता जाणार नाही का ? मग तुम्हाला कोण विचारणार ?'' हा बाण लागू पडला. एकदम कैकेयीचं मन बदलून गेलेलं आहे. ती तशी विधीघटनाच होती. ठरलेलंच होतं. नाहीतर रावणाचा नाश कसा झाला असता? कैकेयी सावध झाली. आणि विचारतीय की काय करायला पाहिजे?'' मंथरा म्हणाली, ''मी सांगते, तुम्हाला दशरथ राजाने दोन वर दिलेले आहेत ना आणि वाटेल त्यावेळी माग असं सांगीतलंय ना ? हीच ती वेळ आहे. एका वराने रामाला चौदा वर्षं वनवास मागून घ्या आणि दुसऱ्या वराने भरताला राज्यभिषेक

मागा.'' कैकेयी म्हणतीय, ''भरताला राज्यभिषेक एक वेळ योग्य आहे म्हणजे आईला तसं वाटणं ठीक आहे. पण रामाला वनवास कशाला?'' काय तिला वाटलं असेल की हे सगळे लोक रामाला अनुकूल आहेत म्हणून ते भरताला राज्यावरून काढतील की काय ? त्याप्रमाणे दशरथ राजा तिच्या वाड्यामधे आला असताना तिने सांगितलं, मला आत्ताच्या आत्ता हे दोन वर पाहिजेत. काय प्राणच जाण्यासारखी अवस्था आहे. रामाला वनवासात पाठवायचं ? खिन्न झाला दशरथ राजा, काही बोलला नाही. इतक्यात वसिष्ठांचा निरोप रामाला आला की मुहूर्ताची वेळ जवळ येत चाललीय.

त्याप्रमाणे दशरथ राजा कैकयीच्या महालामध्ये आलेला असताना तिने सांगितले, आत्ताच्या आत्ता मला दोन वर पाहिजेत. रामाला वनवासात पाठवायचं आणि भरताला राज्यभिषेक करायचा. काहीही दशरथ राजा बोलला नाहीये. खिन्न झालेला आहे. इतक्यात रामचंद्रांना वसिष्ठांचा निरोप आला की लवकर आता ये, अभिषेकाची वेळ होती आहे. निघाले रामचंद्र, इतक्यात कैकयीचा निरोप आला, तुला बोलावले आहे राजेसाहेबांनी. वसिष्ठांनी रामांचं वर्णन केलेलं आहे. काय केवढा नेता आहे हा मोठा. हा जर नेता समाजाला मिळाला तर काय कल्याण होईल सर्वांचं !

आहूतस्य अभिषेकाय प्रस्थितस्य वनाय च ।।

अभिषेकाला बोलावले गुरुमहाराजांनी तरी मनामध्ये हर्ष नाहीये. बरंय, गुरुमहाराजांची आज्ञा आहे. दुसरी आज्ञा झाली, वनामध्ये जायचंय. त्याचीही तयारी आहे, हर्ष नाही, विषाद नाही निर्विकार अंतःकरण आहे. हा नेता समाजाला मिळाला पाहिजे. त्याचे चरित्र लोकांनी समजाऊन घ्यावे याकरता वाल्मिकी महर्षिंनी हे चरित्र लिहिलेले आहे. याचा विचार कोणी करत नाही हे दुर्दैव आहे भारतवर्षाचे. सांगितले सगळे कैकयीने. राजेसाहेबांची इच्छा आहे, की तू चौदा वर्ष वनामध्ये रहावे. बर आहे निघालो म्हणाले लगेच रामचंद्र. कैकयी म्हणाली, सर्व दागदागीने काढून ठेव म्हणाली. सगळे काढून ठेवलेलं आहे. लक्ष्मणाला समजले. लक्ष्मण रागावला म्हणाला मी राजाला कैद करून ठेवतो. रामचंद्र म्हणाले पित्याला कैद करून ठेवतोस असा विचार तुझ्या मनात येणं हे चांगलं आहे का बाबा. मग मला बरोबर न्या वनामध्ये, लक्ष्मण म्हणाला. मुद्दामच रामचंद्र त्याला बरोबर घेऊन गेले. पुन्हा हा रागावला आणि त्रास दिला पित्याला तर काय करायचे म्हणून बरोबर नेले. सीतादेवीच्या मंदिरामध्ये गेले, तिला सांगितले असं असं ठरलंय. तू इथे रहा, सासूची सेवा कर. किंवा माहेरी जा आपल्या आई बाबांच्याकडे तिथे रहा. ती म्हणाली मला कोठेही जायचे नाही. तुमच्या बरोबर वनामध्ये यायचंय. वनामध्ये काय नोकर-चाकर आहेत काय म्हणाले. अरण्यामध्ये

वेळेला जेवायला सुद्धा मिळणार नाही, काही नाही. पण ती म्हणाली असू दे. ठरलेले आहे. सीतादेवीसह सर्व वंदन करण्याकरता आले. सीतादेवींनासुद्धा कैकेयीने सांगितले तुझी वस्त्र-दागदागिने काढून ठेव म्हणाली. वसिष्ठ रागावले म्हणाले, सीतेने काय केलयं तुझं ? रामाने वनवासात जावे ही आज्ञा आहे आणि सीतेचे सर्व दागिने काढून घेतेस. सौभाग्यवती ती स्त्री आहे. काही काढून ठेवू नकोस दागिने सीते. अलंकार घालूनच तू वनामध्ये जा म्हणाले. गप्प बसलेली आहे कैकेयी. दशरथ राजा काहीही बोलू शकत नाही. प्राण जाण्याची वेळ आलेली आहे. रामाने आईबापांना, कैकेयीलाही नमस्कार केला. कौसल्येची समजूत केली. सुमित्रेने आपल्या मुलाला लक्ष्मणाला सांगितले, बाबा,

रामं दशरथं विध्दि । मां विधिद जनकात्मजाम् ।
अयोध्यां अटवीं विध्दि ।।

ही बुद्धि ठेव बरं लक्ष्मणा. राम म्हणजे प्रत्यक्ष दशरथ आहे, आपला पिता आहे. ही भावना ठेवून तू वाग सीतादेवी म्हणजे प्रत्यक्ष मी आहे ही भावना ठेव आणि सीतेची सेवा कर. अरण्य म्हणजेच अयोध्या आहे अशा समजुतीने तू सेवा कर. तुझे कल्याण होईल.

तिघेही आलेले आहेत. अरण्यामध्ये गंगातीरावर उतरलेले आहेत. सुमंतांना रथ घेऊन परत पाठवलेले आहे. तो आलेला आहे अयोध्येमध्ये. दशरथ राजाने विचारले काय राम गेला काय ? गेले म्हणून समजल्याबरोबर प्राणोत्क्रमण झालेलं आहे.

राज्यभिषेक थांबलेला आहे. पुढे रामचंद्र निघून गेले आणि चित्रकूट पर्वतावर जाऊन राहिले. लक्ष्मणाने झोपडी बांधलेली आहे. तिथे ते वास्तव्य करत आहेत. भरतालाही बोलावून आणले. पित्याचे अंतिम कर्म करायचे होते ना. राम लक्ष्मण वनात गेल्यामुळे ते सर्व भरतालाच करायचे होते. भरत, शत्रुघ्न दोघेही मामाच्या घरी गेले होते. दोघे आलेले आहेत. भरताला कैकेयीने सांगितले की बाबा हे आता तुझं राज्य आहे. राम गेला आहे वनवासात. हे सगळं समजले त्याला. कैकयीचे हे कारस्थान आहे. रामाला वनवासात पाठवलेलं आहे. राग आलेला आहे भरताला. आईला ठार मारावं अशी त्याला इच्छा उत्पन्न झाली. परंतु रामचंद्रांची मूर्ती त्याच्यासमोर उभी राहिली. जर आईला शासन केलं तर राम माझं तोंड पहाणार नाही. रामाचे प्रेम पाहिजे आहे. काय नेत्याची योग्यता आहे, राम जवळही नाही, समोरही नाही. भरताला आलेला राग रामाचे स्मरण केल्याबरोबर आवरावा लागला. फक्त मातेपासून तो दूर राहिलेला आहे. और्ध्वदेहिक झालेलं आहे.

राज्यभिषेक मी करून घेणार नाही, रामचंद्रांना मी परत घेऊन येणार आणि त्यांनाच राज्यभिषेक होईल म्हणाला भरत. सर्व अयोध्यावासी लोकांना बरोबर घेऊन भरत चित्रकूट पर्वतावर आलेला आहे. रामांचे दर्शन झालेले आहे. भरतांनी सांगितले रामचंद्रा माझ्या मनातसुद्धा राज्याची इच्छा नाही. राजा आपण आहात. राम म्हणाले भरता, तुझी योग्यता, तुझे प्रेम मला माहित आहे. तू राज्याचा अभिलाषी नाहीस. खरं आहे. भरत म्हणाला चला मग परत आपण. रामचंद्र नाही म्हणाले, पित्याची आज्ञा मला आहे आणि तुलाही आहे. दोघांनी पालन केली पाहिजे. मला वनात राहाण्याची आज्ञा आहे चौदा वर्षं. तुला राज्य करण्याची आज्ञा आहे. आज्ञेचे पालन रामचंद्रांनी असे केलेले आहे की चौदा वर्षं ते अरण्य सोडून कोणत्याही नगरात, राज्यात गेले नाहीत. सुग्रीवांना राज्यभिषेक करण्याचे ठरले, वालीचा नाश केला, राज्यभिषेकाला आपण या म्हणून सुग्रीवाने विनंती केली, मला येता येत नाही, नगरात मला यायचे नाही, लक्ष्मणाला सांगितले तू जाऊन त्यांना राज्यभिषेक करून ये. लंकेचे राज्य बिभीषणाला दिले, तसेच परत आलेले आहेत. इतकं त्यांनी शब्दाचे, आज्ञेचे पालन केले. भरताला सांगत आहेत, तुलाही आज्ञा पालन केली पाहिजे. राज्य करावं लागेल. भरत मोठा अत्यंत शुद्ध बुद्धिचा होता त्यांनी सांगितले, तुमच्या पादुका मला द्या. दिल्या पादुका. त्या पादुकांना मी सिंहासनावर ठेवणार आहे. त्यांची सेवा म्हणून मी राज्य करणार. केवढी ईश्वराची कृपा भरतावर आहे. भरताचा त्याग केवढा मोठा आहे. चौदा वर्षांपर्यंत भरताने रामाचे राज्य सेवक म्हणून केलेलं आहे. रामाला सांगितले, तुमची वाट मी चौदाव्या वर्षाची शेवटची रात्र होईपर्यंत पाहिन. पंधराव्या वर्षी सूर्योदय होईपर्यंत भरत जिवंत राहिल, नंतर तुमचे तुम्ही राज्य सांभाळा. हा संसार आहे. अशा त्यागी माणसाला संसार बाधक कसा होईल. रामांनी भरताची प्रशंसा केली, बाबा रामाचा त्याग जास्ती का तुझा त्याग जास्ती हा विचार करायला लागलेला असताना, मला अभिषेक होण्यापूर्वीच मी वनात आलो. म्हणजे मी राज्य त्याग केला असे कसे म्हणता येईल. परंतु तुझ्या आईने तुझ्या नावाने राज्य मिळवून ठेवलेलं आहे. माझीही संमती आहे त्याला. असे असताना, तू अनासक्त रितीने हे राज्य केलं. असे त्यागी आदर्श वाल्मिकी महर्षिंनी पुढे मांडलेले आहेत. त्याचा विचार करणारी जर जनता असेल तर राष्ट्राचा उत्कर्ष व्हायला वेळ लागणार नाहीये. ईश्वराची कृपा आहे. रामचंद्रांनी विचार केला इतक्या जवळ आपण राहून उपयोग नाही, हा भरत वरचेवर येणार, सर्व प्रजानन भेटायला येणार. इथून लांब दंडकारण्यामध्ये जाऊन राहिले. त्याठिकाणी शूर्पणखा आलेली आहे त्रास द्यायला. लक्ष्मणाने तिचे नाक, कान कापून टाकलेलं आहे. तिचे बंधू, रावणाचे सैन्य दंडकारण्यात ठेवलेले होते. लंका

ताब्यात आहे त्याबरोबर दंडकारण्य तसेच संपूर्ण भारतवर्ष आपल्या ताब्यात असावे अशी त्यांची इच्छा आहे. खर, दूषण, त्रिशिरा हे तीन सेनापति, चौदाहजार राक्षस, रामांचा नाश करण्याकरता आलेले आहेत. लक्ष्मणाला सांगितले सीतेला घेऊन तू पर्वताच्या वर गुहेमध्ये जाऊन रहा. मी या असुरांचा समाचार घेतो. संरक्षण योजना काय करायची ती केलेली आहे. संरक्षण फक्त अस्त्राने–शस्त्राने नाहीये, ती मंत्रविद्या आहे. अस्त्रविद्या वेगळी आहे. आपल्या संरक्षणाची व्यवस्था केलेली आहे. आपल्या आपण ठरवून दिलेल्या आत त्या शस्त्राचा प्रवेश नाही. एकटे रामचंद्र उभे राहिले आणि एक दिड प्रहरामध्ये चौदा हजार राक्षस आणि त्यांचे सेनापती ठार मारलेले आहेत. संबंध दंडकारण्य संकटरहित केलं. सगळ्या ब्राह्मणांना बोलावून हे तुम्हाला घ्या दान केलं सर्वांना, हे तुमचं आहे, निर्भयपणाने तुम्ही रहा. सर्वही राक्षसांचा संहार मी करणार आहे. अशी प्रतिज्ञाच त्यांनी केली. पुढे रावणाने सीतेचे हरण केलेले आहे. मारिचाला मारलं रामांनी, लक्ष्मणही निघून आला. सगळी योजनाच होती. सगळा दैवयोग आहे. सीताही काही बोलली म्हणून लक्ष्मण निघून आलेला आहे. रावणाने सीतेला नेताना जटायूने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण जटायूना मारलं रावणांनी. दोघे बंधू सीतादेवीचा शोध करण्याकरता निघालेले आहेत. निराश झालेले नाहीयेत. कोण आहे असा, परस्त्री हरण करणारा, कोण आहे ? त्याचे नाव माहित नाही. तो किती लांब रहातो, त्याची शक्ती कशी आहे, काहीही माहिती नाही. पण मनामध्ये प्रतिकार करायचा आहे. याचा प्रतिकार, याला शासन करायचं आहे हा निश्चय झालेला आहे. हे दोघेच आहेत. जवळ सैन्य नाही. सहाय्यक कोणी नाही. हे सगळं असं असताना सुद्धा त्यांचा दुर्दम्य आशावाद आहे की याला शिक्षा करायची आहे, त्या दुर्जनाना जिवंत ठेवायचे नाही. निघालेले आहेत, मध्ये विराट कबंध राक्षसाचा नाश केलेला आहे. पंपासरोवराजवळ आलेले आहेत. सुग्रीव आपल्या काही प्रधानांसह डोंगरावर रहात होते वालीच्या भितीने. वालीनेच यांना पाठवलेले आहेत काय ? अशी त्याला भीती उत्पन्न झाली. हनुमान यांना चौकशी करण्याकरता पाठवले. बटूवेष धारण करून हनुमान, रामचंद्रांच्या जवळ आलेले आहेत. संस्कृत भाषेमध्ये सर्व त्यांनी विचारणा केली. कोण आहात आपण ? कोठून आलात ? आमची परिस्थिती अशी आहे. सुग्रीवाला बंधूंनी राज्याबाहेर घालवले आहे आणि राज्य ताब्यात घेतलेले आहे. सर्व आणखी कथन केले. चला म्हणाले आपण. सुग्रीवाशी मैत्री करा. सुग्रीव आपले सर्व सैन्य आणून रावणाचा नाश करून तुम्हाला सीतादेवी परत आणून देईल म्हणाले. हनुमानजी गेलेले आहेत. रामाने लक्ष्मणाला सांगितले, हा कोणी तरी मोठा उत्तम ज्ञान संपन्न दिसतो. यांनी संपूर्ण व्याकरण शास्त्राचा अभ्यास

केला असावा म्हणाले.

बहुव्याहरतानेन न किंचिदपभाषितम् ।।

इतका वेळ तो बोलत राहिला संस्कृत भाषेमध्ये, पण एकही चूक याच्या भाषणात मला आढळली नाही. गेले रामलक्ष्मण, सुग्रीवाशी सख्य झालेले आहे. वालीचाही नाश केलेला आहे. सुग्रीवाला राज्याभिषेक झाला. सर्वही ठिकठिकाणच्या वानरांना बोलावून घेतलं सुग्रीवाने. अगोदर मारूतीरायाला शोध घेण्याला पाठवले. चारही दिशांना वानरांना शोध घेण्यासाठी पाठवले. तो रावण दक्षिणेकडे गेलेला आहे. हे त्या वानरांनी पाहिले. सुग्रीव हनुमान वगैरे पर्वतावर बसलेले असताना आकाशातून रावण ह्या सीतादेवींना खांद्यावर घेऊन जात आहे, असे दिसले होते. सीतादेवीला वाटले राम लक्ष्मण शोध करीत कदाचित इथे आले तर आपण इकडून गेलो हे त्यांना समजावे म्हणून तिने भराभरा आपल्या अंगावरचे दागिने काढले. पांघरण्याच्या वस्त्रात बांधून तिने ते खाली टाकलेले आहेत. सुग्रीवाच्या वानरांनी ते गाठोडे घेतले. रामलक्ष्मण आल्यावर त्यांना ते सांगितले की एक राक्षस हा एका स्त्रीला घेऊन गेला इकडून, त्या स्त्रीने हे अलंकाराचे गाठोडे टाकलेले आहे. हे कोणाचे सीतेचे आहेत का पहा म्हणाले. ते गाठोडे सोडल्याबरोबर रामांना अत्यंत शोक झालेला आहे. ते सर्व अलंकार सीतेचे होते. लक्ष्मणाला त्यांनी विचारलं. लक्ष्मणा या दागिन्यांची ओळख तुला आहे काय ? लक्ष्मण तरी काय सांगणार रामचंद्राला, बाहू मध्ये घालण्याची भूषणे, वाक्या माझ्या ओळखीच्या नाहीत, कानातली कुंडले माझ्या ओळखीची नाहीत.

नाहं जानामि केयूरे । नाहं जानामि कुण्डले ।। नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनम् ।।

पायातले पैंजण माझ्या ओळखीचे आहेत. सीतादेवीच्या चरणावर नित्य मस्तक ठेवण्याच्या वेळेला नित्य हे दिसत होते. एवढे मी ओळखतो म्हणाला. केवढी आदर बुद्धि आहे. शास्त्राज्ञेचे पालन किती आहे. म्हणून लक्ष्मणाने इंद्रजिताला मारलेलं आहे. रामाने सुद्धा हे टाळलं. झालं सगळ्या वानरांना पाठवलेलं आहे. दक्षिणेला मात्र उत्तम प्रकारची बुद्धिवान वानरं पाठवलेली आहेत कारण रावण दक्षिणेला गेलेला आहे, इतका पत्ता लागला. हनुमानांच्या वरती विश्वास आहे. उत्तम ज्ञान संपन्न आहे. भाषणामध्ये परिचय झालेला आहे, हनुमंतांचा, हा मोठा आहे. 'जितेंद्रियम बुद्धिमतांवरिष्ठम्' त्याला बोलावून घेतलं. आपल्या हातातील अंगठी काढून त्याच्याजवळ

दिली ही सीतेला दाखव म्हणाले म्हणजे तुझ्यावर तिचा विश्वास बसेल. नाहीतर रावणच या वानरांच्या वेषात आला नसेल कशावरून. ती बोलणारसुद्धा नाही. हनुमान सीतादेवीच्या शोध निश्चित करून येणार, अशी खात्री रामचंद्रांची होती. सुग्रीवाने आज्ञा केली, एक महिन्याच्या आत सर्वांनी परत आलं पाहिजे. शोध लागलां किंवा न लागला काय असेल ते येवून सांगितले पाहिजे. एक महिन्यापेक्षा जास्त एक दिवस जरी लागला तरी त्याचा शिरच्छेद केला जाईल. सगळी वानरं मंडळी सर्व दिशेने आलेली आहेत. दक्षिणेची मंडळी मात्र महिना झाला तरी आली नाहीयेत. सगळे त्या समुद्राच्या तीरावर येवून बसले. पलिकडे कसे जायचे. शंभर योजने समुद्राच्या पलिकडे लंका आहे ती काही इथून दिसू शकत नाही. महिना होवून गेला. परत आपण तसेच गेलो तर शिरच्छेद होणार त्यापेक्षा आपण इथेच समुद्रतीरावर प्राणत्याग करावा. प्रायोपवेशन करून, आसन घालून सर्व वानरमंडळी बसली. जटायूचा भाऊ संपाती त्याठिकाणी आलेला आहे. त्याने सागितले ती समोर सीता दिसती आहे. ईश्वराने सृष्टीमध्ये सगळ्यांना सारखी शक्ती दिलेली नाही. चक्षु नेत्र हे प्रमाण आहे. पण दूरदर्शन मनुष्याला होवू शकत नाहीये. अंधारात मनुष्य पाहू शकत नाही. त्याच्या डोळ्याची शक्ति मर्यादित आहे. तो संपाती गृध्रपक्षी, लांबचे पाहाण्याची योग्यता त्याच्या डोळ्यामध्ये आहे. ती समोर सीता आहे म्हणाले. अशोक वनामध्ये एका वृक्षाच्या खाली सीतादेवी बसलेली आहे, तिच्याभोवती सर्व राक्षसींचा पहारा आहे. कोणाला जायचे असेल तर तिला जाऊन भेटून या म्हणाले. हे कसं मान्य करायचे कसे ? हाही प्रश्न आहे ना. संपाती सांगतोय, तो पाहून सांगतोय. वानराने म्हटले तर, आम्हाला दिसत नाही. आम्हाला तुझ्या म्हणण्यावर विश्वास बसत नाही. असे म्हटले असते तर, पण जो प्रत्यक्ष पाहून सांगतो त्यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवायला पाहिजे का नाही. आमच्या नेत्राची योग्यता कमी आहे हे मानायला पाहिजे की नाही. त्याप्रमाणे त्यांचे शब्द प्रमाण मानलेले आहेत. हा ज्ञानी महात्मा आहे, तो दूरचे पाहू शकतो आणि आम्हाला सांगतो. विश्वास ठेवला म्हणून सीतेचा शोध लागलेला आहे. उगाच काहीतरी बुद्धिवाद पुढे आणून, हे खरं कसं मानायचं ह्याला दिसते हे खरे कशावरून, हा कदाचित फसवत नसेल कशावरून असे तर्ककुतर्क मनामध्ये आणले असते तर सीतेचा शोध लागला नसता. सर्वानुमते मारुतीराय एक समर्थ आहेत असा निर्णय झालेला आहे. मारूतींना आठवण करून द्यावी लागत होती. अहंकार बिल्कुल नाहीये. सर्व विसरून रामचिंतन चाललेलं आहे. नामस्मरण अखंड चाललेलं आहे. त्यामुळे आपल्या शक्तिची सुद्धा आठवण नाहीये. जवळ गेले सगळे वानर अहो हनुमान, उठा लवकर सीतेचा शोध तुम्ही करून या. तुम्ही समर्थ आहात. शंभर योजने विस्तीर्ण समुद्राच्या

पलिकडे जायचंय. लंका राजधानी मोठी आहे. कडेकोट बंदोबस्त असणार. शोध करण्याचे सामर्थ्यही तुमचेच आहे. अशी पुष्कळ त्यांची स्तुती केली. उठले हनुमान. मोठे रूप धारण केलेलं आहे. योगाभ्यासही त्यांचा चांगला होता. वानर मंडळी जरी असली तरी उत्तम अभ्यास. निरनिराळ्या शिल्पाचा अभ्यास, योगांचा अभ्यास आहे, विद्यांचा अभ्यास आहे. सगळा अभ्यास आहे. सूर्यनारायणाच्या बरोबर राहून व्याकरणाचा अभ्यास केला मारूतीरायाने. उपेक्षा नाहियेे. महेंद्र पर्वतावरून, आकाशामध्ये उड्डाण केलेलं आहे. मारुतीराज संध्याकाळच्या वेळेला लंकेमध्ये येऊन पोहचले. मारुतीची कथा मोठी आहे. वाल्मिकी रामायणातील सुंदरकांड हे सर्व मारूतींचाच महिमा आहे. त्या नुसत्या सुंदरकांडाचे पठण केले असता कार्यभाग होतो. संध्याकाळी आल्याबरोबर एकदम लहान झालेले. मोठे रूप धारण करून लंकेमध्ये गेले तर सगळं सैनिक पाहणार, युद्धाचा प्रसंग येणार. रात्रीभर सगळीकडे फिरून सूक्ष्मरूपाने सगळ्यांच्या अंत:पुरामध्ये सगळीकडे जाऊन त्यांनी शोध केला. रावणाच्या अंत:पुरामध्ये रावणाचे आणि मंदोदरीचे भाषण त्यांना ऐकायला मिळाले गुप्त रूपाने. सीतादेवी अशोकवनामध्ये आहे हा पत्ता लागलेला आहे. आले तिथे. सीतादेवीचे दर्शन झाले. झाडावर बसलेले आहेत. त्या सगळ्या राक्षसी होत्या तिथे. इतक्यात रावणही तिथे आलेला आहे. तिला वश करण्याकरता पुष्कळ त्यांने आमिष दाखवलेलं आहे. तू सर्वश्रेष्ठ राणी होशील. देवांना मिळालेलं नाही असं ऐश्वर्य तुला मिळेल. पण काहीही भाषण तिने केलेलं नाही. राम येतील आणि तुझा समाचार घेतील, असे सांगून गप्प बसलेली आहे. नंतर रावण निघून गेलेला आहे. मध्यरात्रीच्या वेळेला सीतादेवी निराश झालेली आहे. कोण सांगणार मी इथे आहे. रामचंद्रांना समजायचे कसे ? पत्ताच जर नाही, माझा शोध लागला नाही तर रावणाला शासन कसे होईल ? सुटका नाही होणार. रडती आहे, शोक करती आहे. सर्व राक्षसी निजलेल्या आहेत. मारूतीरायाने रघुवंशाचे वर्णन केलेलं आहे. रामचंद्र असे आहेत. रामलक्ष्मण असे आहेत. सुग्रीवांचे त्यांचे सख्य झालेलं आहे. सुग्रीवाने सर्व वानर मंडळींना दशदिशांना सीतेचा शोध करण्याकरता पाठवलेलं आहे. त्यांच्यापैकी एक रामदूत मी या ठिकाणी येवून पोहचलेलो आहे. सीतादेवीचे दर्शन झालेलं आहे. कृतार्थ झालो आहे. वृक्षावरून भाषण त्यांनी केलं. ती रामांची मुद्रिका तिच्यासमोर टाकली. कोण आहे ? मुद्रिका पाहिल्या बरोबर आनंद झालेला आहे. रामचंद्रांना जाऊन आता कळवेल म्हणाले. रामचंद्र येतील. आले मारूतरीराय. नमस्कार केला. आश्वासन दिलेलं आहे. तुम्हाला वाटत असेल तर तुम्हालाही बरोबर घेऊन जातो म्हणाले. राक्षसांची पर्वा करण्याचे कारण नाही. मी त्यांचा समाचार घेऊ शकतो. नाही म्हणाली सीता.

बलात्कारानी रावणानी मला आणले आहे. त्याचा स्पर्श झालेला आहे. आता दुसऱ्या कोणी पुरुषाचा स्पर्श मला नको आहे. मारूती म्हणाले मी ब्रह्मचारी आहे जन्मापासून. नाही म्हणाली सीता. रामाची कीर्ति वाढायला नको का बाबा. तिने हे कारण सांगितले, तू आहेस ब्रह्मचारी. मला तुझ्याबद्दल कोणताही संदेह नाही. पण माझी सुटका अशी केली तर हा रावण जिवंत राहीलना. याला काही शासन व्हायला पाहिजे. सर्वांना अजिंक्य ठरलेला रावण रामांनीच मारला पाहिजे त्याकरता मी येत नाही. जाऊन सांग, रावणांने सांगितलय, तो माझा नाश करणार आहे मी त्याला वश झाले नाही तर. निघाले मारुतीराय, पण ते राजदूत होते. परप्रांतामध्ये, परदेशामध्ये रहाणारा जो दूत आहे त्याला त्या देशातील सगळी माहिती पाहिजे. आणि त्यांने आपल्या देशातल्या अधिकाऱ्यांना दिली पाहिजे. मारूतीरायाने विचार केला हा जो शत्रू आहे त्याचे सामर्थ्य किती आहे हे पाहून जायचे आहे. सीतेची भेट झाली काम झालं म्हणाले. सांगकाम्या असून उपयोग नाही राजदूत. सीतेचा शोध करून ये सांगितले, झाला शोध, आता परत जावे, नाही. रावणाचे सामर्थ्य पाहून जायचंय. निर्भय वृत्ती आहे. सामर्थ्यावर पूर्ण विश्वास आहे. आपण वागतो ते अत्यंत न्याय आहे हा पण आत्मविश्वास आहे. अभिमान अशा प्रकारचा चांगला आहे. सीतादेवीला म्हणाले मारूतीराय मला भूक लागलेली आहे. ही इथली फळं घेऊन का मी ? चांगली उत्तम फळं आहेत. सीता म्हणाली हे त्या राक्षसांचं, रावणाचे अत्यंत प्रिय वन आहे. ऐंशी हजार राक्षसी याचे संरक्षण करण्याकरता त्यांनी ठेवलेल्या आहेत. तू फळं तोडायला लागलास तर कसे ? असं कर झाडावरून खाली पडलेली जी फळं आहेत ती तू भक्षण कर. अगोदर तिने असे केले, आपल्या हातातली सोन्याची बांगडी काढून दिली आणि सांगितले हे विकून जे मिळेल त्यातून तू खा म्हणाली. हनुमान म्हणाले मी असं विक्रीचे काही खात नाही. नैसर्गिक माझा आहार आहे. फळ पाहिजेत मला. पडलेली फळे खा म्हणाली. 'पडत्या फळाची आज्ञा' ही म्हण मारूतीपासून पडलेली आहे. पडलेली घ्यायची ना, एक एक झाड उपटायचे, धोपटायचं आणि पडलेली फळ घ्यायची. सुरवात झाली त्यांची. रावणाला कोणी तरी सांगितले, असा एक वानर आलेला आहे. आणि त्याने अशोक वनाचा विध्वंस केलेला आहे. संरक्षणाकरता ठेवलेले राक्षस मारूतीने मारून टाकलेले आहेत. रावणाने सैनिक पाठवलेले आहेत. तेही सैन्य मारलेले आहे. इंद्रजित आलेला आहे. रावणाच्या सभेमध्ये जाण्यासाठी इंद्रजिताचा ब्रह्मपाश मारुतीने मान्य केला. ब्रह्मदेवांनीही आज्ञा केली. हनुमानाला बांधून आणले इंद्रजिताने रावणाच्या समोर आपले उच्चासन घालून मारुती उंच बसलेला आहे. त्याने सांगीतलं, मी रामदूत आहे, तुझा समाचार

घेण्याकरता आम्ही लवकर सैन्य घेऊन याठिकाणी येणार आहोत. तू आणि तुझा परिवार, दैत्य सगळे मारले जाणार आहेत. तर लक्षात ठेव. रावणाची पत्नी मंदोदरी ही सांगत होती रावणाला, कशाला आणली सीता, तुम्हाला काय कमी आहेत काय स्त्रिया. ही देऊन टाका रामाला. इंद्रजिताने सांगितले ही देऊन टाका रामाला. पिताजी हिला ठेऊन घेऊ नका. सगळ्या परिवाराचा नाश होईल. त्रास होईल. कुंभकर्णांने सांगितले कशाला आणले हिला. जातो म्हणाला, तुझी इच्छा असेल तर रामाबरोबर लढायला. असे सगळे, प्रधान वगैरे सगळे विरुद्ध होते. पण याचा आग्रह आहे, हट्ट आहे. त्याप्रमाणे रामचंद्रांचे काय सामर्थ्य आहे सगळे सांगितले. वालीला एका बाणानी मारले. तुझी त्यामुळे काय कथा आहे. वालीची शक्ती तुला माहित आहेना ? वालीच्या पुढे तुझी काही किंमत नाहीये. तुला मारायला काही वेळ लागणार नाही. काही परिणाम झाला नाही. शेवटी त्याचे पुच्छ जाळायचे ठरले. पुच्छ गेलं म्हणजे मारूती गेला. सगळी वस्त्रं आणून त्याला गुंडाळलेलं आहे, ते पेटवून दिलेलं आहे. मारूती ब्रह्मपाशातून मोकळे झालेले आहेत. संपूर्ण लंकानगरी जाळून टाकलेली आहे. रावणाचा वाडा, प्रधानांचा वाडा, सगळे वाडे जाळून टाकलेले आहेत. ते पुच्छ समुद्रामध्ये विझवले. त्यांना वाटले या अग्निमध्ये सीता देवींना काही त्रास झाला, इजा झाली काय ? वाईट वाटले. मारुतीरायाचे पुच्छ पेटवून दिले, त्यांना मारत आहेत असे सीतादेवींना समजले. अग्निनारायणाची ती प्रार्थना करत आहे.

शीतो भव हुताशनः ।।

रामदूत आलेला आहे. अत्यंत पराक्रमी आहे, श्रेष्ठ आहे. रामभक्त आहे. याला तुम्ही दाह करू नका. अग्नि नारायणाने दाह कमी केलेला आहे. मारूतीरायांना वाटले पुच्छाला इतकी वस्त्रं लावली, इतके पेटवून दिले तरी त्याचा दाह कसा मला होत नाही. सर्व लंका दहन झालेलं आहे. सीतादेवीची भेट घेतली शेवटी. नमस्कार केला. तुमची काही खूण माझ्याजवळ द्या म्हणाले हनुमान. सीतादेवीला पाहून आलो म्हणून नुसते सांगितले तर कोण विश्वास ठेवेल ? आपल्या केसातील दिव्य मणी सीतेने त्यांना दिला. रामांना सांग म्हणाली इंद्राला दशरथराजाने सहाय्य केल्यामुळे इंद्राने हा मणी दशरथ राजांना दिला. दशरथ राजाने हा मणी कौसल्येला दिला आणि माझा विवाह झाल्यावर हा मणी कौसल्या मातेने मला दिला. हे रामांना सांग आणि हा मणी त्यांना दाखव म्हणजे तू सीतेला पाहून आलेला आहेस हे त्यांना खरं वाटेल.

मारूतीराज समुद्राचे उल्लंघन करून आलेले आहेत. सर्व वानरांना त्यांनी सीता पाहून आलो म्हणून सांगितले. सगळी मंडळी परत आलेली आहे. सगळा वृत्तांत रामचंद्रांना सांगितला. रावणाचे

सर्व सामर्थ्य पाहून आलो असे सुग्रीव राजाला सांगितले. राजनीतीचे उत्तम ज्ञान मारूतीरायांना आहे. रावणाच्या राजधानीमध्ये एकटे मारूतीराय गेले आणि हे सगळे माहिती करून आले. सत्वबल आहे.

सर्व वानरसैन्य निघालेलं आहे. समुद्रतीरापर्यंत आलेले आहे. समुद्रावर सेतूबंधन केलेलं आहे. एकनाथ महाराजांनी भावार्थ रामायणामध्ये कितीतरी वर्णन केलेलं आहे. पहिल्या दिवशी दहा-पंधरा मैलाचा सेतू तयार झाला म्हणे. दुसऱ्या दिवशी सव्वीस योजनांचा तयार झाला. शेवटी मारूतीरायाने सात आठ पर्वत एकट्यानेच आणून पन्नास योजनांचा सेतू बांधून टाकला. सेतूबंधन करून सर्व वानर त्या सेतूवरून रामचंद्रासह लंकेमध्ये येऊन पोहचलेले आहेत. रावणाला हे समजले. त्यांनी सर्व सेनापतींना सांगितले. रामचंद्रांचे सैन्य समुद्रकिनारी असताना, बिभीषणाने एक प्रयत्न केला. त्याच्या आईने त्यांला सांगितले की रावणाला जाऊन सांग, ऐक माझे म्हणावं, सीतेला देऊन टाक. तरच तुमचे कूळ शिल्लक राहिल. तू जाऊन स्वत: सांग असे म्हणल्यावर बिभीषण राजसभेमध्ये आला. त्यांने रावणाला पुष्कळ बोध केला. बिभीषणाने रामाचे सामर्थ्य वर्णन केले. इंद्रजित रागावला. काय म्हणाले रामाचेच वर्णन तू करतो आहेस, आमच्याजवळ काय शक्ती नाही का ? तू गप्प बस म्हणाले, तुला काय कळतयं, तू बोलू नकोस. शेवटी रावण रागावलेला आहे. त्यांने लाथ मारली बिभीषणाला. पडला खाली, उठला, नमस्कार केला रावणाला. आता मी जातो म्हणाला रामाकडे. तुझी बुद्धी बदलण्याचा प्रयत्न मी केला, पण नाही, तुझं नशीब. तुझा नाश होणार आहे. चार प्रधान मंडळींना बरोबर घेऊन आप्तमंडळींना घेऊन आकाशमार्गाने बिभीषण रामाच्या सैन्याजवळ आलेला आहे. सर्वांचा अविश्वास त्याच्यावर आहे. रामचंद्र स्वस्थ बसलेले आहेत. सुग्रीवाला विचारले काय याला घ्यायचं का आपल्याबरोबर ? नको म्हणाला सुग्रीव, शत्रूच्या भावाला तुम्ही आपल्या सैन्यामध्ये घेता ? ही सगळी बातमी तिकडे देणार नाही कशावरून ? नाही आमची यासाठी संमती नाही. मारूतीरायांना विचारा याबद्दल. मारूतीराय म्हणाले हा चांगला सात्विक आहे. याचा आपल्याला झाला तर उपयोग होईल. कारण तुमची कृपा झाल्यावर राज्य याला मिळणार आहे, हे त्याला माहिती आहे. मारूतींच्या सांगण्यावरून त्याला बोलावलेले आहे आणि त्याला लगेच राज्यभिषेक केला, त्याला सांगितले, लंकेचे राज्य तुला दिलेले आहे. बिभीषणाचे पुष्कळ सहाय्य त्या युद्धाच्या वेळेला झालेले आहे. लंकेपर्यंत येऊन सर्व पोहचलेले आहेत. आरंभाला अंगदाला शिष्टाई करण्याकरता रामचंद्रांनी पाठविले तोपर्यंत युद्धाला सुरवात केली नाही. जाऊन सांग माझा निरोप अंगदा, सीता पुन्हा मला अर्पण कर म्हणते तू जिवंत

रहाशिल, आम्ही निघून जाऊ, आम्ही युद्ध करणार नाही. पण हे काही रावणाने ऐकले नाही. अंगद रागाने तिथून निघाला आणि जाताना रावणाचा एकदम महालच उचलून घेऊन गेला. पराक्रमी होता वालीचा पुत्र. पुन्हा रामांच्या सांगण्याप्रमाणे तिथे परत ठेवून टाकला.

युद्धाला सुरवात झालेली आहे. अनेक राक्षसांचा नाश केलेला आहे. वानरांनी पुष्कळ राक्षस मारले. तसेच रामचंद्रांनीही राक्षस मारले. प्रधान सगळे मारले गेलेले आहेत. कुंभकर्णाला उठविलेलं आहे. त्याला युद्धाला पाठविलेलं आहे. कुंभकर्ण अगोदर म्हणाला रावणाला की परत देऊन टाक सीतेला रामचंद्रांना, रावण म्हणाला, मी आणलेली आहे आणि मी परत करणार नाही. कोणी देव जरी आले तरी मी त्यांचे ऐकणार नाही. मग कुंभकर्ण म्हणाला तू सीतेला रामाचे रूप घेऊन भेटायला का जात नाहीस ? ती लगेच तुला वश होईल. नाही, सीतादेवी काय ओळखू शकत नाही काय ? रामाच्या रूपामध्ये जरी रावण आला असता तरी तो जाऊ शकलाच नसता अगोदर. सीतेने त्याचा प्रतिकार केला असता. मग कुंभकर्ण युद्धाला गेला. त्याचा नाश रामचंद्रांनी केलेला आहे. इंद्रजिताचा नाश लक्ष्मणाने केलेला आहे. रावणाचा नाश शेवटी भगवान रामचंद्रांनी केला. बिभीषणाला राज्य करण्याची आज्ञा केली. सीतादेवीला भेटीसाठी पालखीत बसून चला असे सांगितले पण सीतादेवी म्हणाली मी चालतच येणार आहे. चालत आलेली आहे सीतादेवी. रामाने तिच्याशी भाषणसुद्धा केलेलं नाही. मारूतीराज रामचंद्रांना रागावले, इतकी पतिव्रता स्त्री अन्न नाही, पाणी नाही, अत्यंत निर्मल मनाने तुमची सेवा करणारी, चिंतन करणारी, तिच्याबरोबर बोलतही नाही तुम्ही. तिने दिव्य करून दाखवले पाहिजे असे रामचंद्र म्हणाले. लोक काय म्हणतील मला. शत्रूच्या घरात रहाणाऱ्या पत्निला परत घेतलं, रामाने. हे मला मान्य नाही. सीता शुद्ध आहे हे तिने सिद्ध करून दाखवावे. रामराज्याचे नियम आहेत. कोणीही अपराध करणारा मनुष्य कोणाचा कोण आला आणि कोर्टाने त्याला निर्दोष म्हणून सोडून दिला. असं नाहीये. ज्यानी अपराध केला त्यांनी आपल्या योग्यता स्वत: दिव्य करून सिद्ध केली पाहिजे. सीतादेवी असो किंवा कोणी असो. कबूल केलं सीतादेवीने. अग्नि प्रदिप्त केला. अग्निनारायणांची प्रार्थना केली. काय, वाचा, मनाने रामाशिवाय दुसऱ्या कोणाकडेही माझं अंत:करण गेलेलं नसेल. तर माझं संरक्षण करा आपण. नाहीतर जाळून टाका मला.उडी मारली अग्निकुंडामध्ये. अग्निनारायण प्रकट झाले. सीतादेवीला घेऊन बाहेर आले. तुमची पत्नि निर्दोष आहे रामा. तिचा स्विकार करा तुम्ही. अग्निची साक्ष झालेली आहे. आनंदाने रामचंद्र सीतादेवीला बरोबर घेऊन पुष्पक विमानामध्ये बसून मुख्य मुख्य मंडळींना घेऊन पुढे गेले. त्या सेतूवरून सर्व वानरमंडळी पलीकडे आलेली आहेत. नंतर ती सगळी मंडळी अयोध्येला

आलेली आहेत. भरताची भेट झाली. त्या पादुका रामचंद्रांच्या पुढे ठेवलेल्या आहेत. हे तुमचे राज्य तुम्ही सांभाळा, माझा आता याबद्दलचा संबंध संपलेला आहे. सेवक सुद्धा मी नाही. राज्य पहाणार नाही. वसिष्ठ महर्षिंनी रामचंद्राना राज्यभिषेक केलेला आहे. आपल्या सर्व बंधूंच्याकडेही मुख्य मुख्य कामे नेमून दिलेली आहेत. सेनापति शत्रुघ्नाला केलेलं आहे. भरताच्याकडेमुख्य मंत्रीपद दिलेलं आहे. लक्ष्मणाने सांगितले. मला काही नको आहे, मला अधिकारच नको आहे. फक्त रामचंद्रांची घडेल तेवढी सेवा मी करीन. राज्य उत्तम सुरू झालेलं आहे सीतादेवी गर्भिणी झालेली आहे. तिला डोहाळे विचारत आहेत राम. काय तुझी इच्छा आहे सीते. सीता म्हणाली आपण ज्या अरण्यात पूर्वी रहात होतो त्या अरण्यामध्ये सगळे पहावे, ती वनभूमी पहावी, अशी इच्छा आहे म्हणाली. दुपारी हे बोलणं झालं. त्याच दिवशी रात्रीच्या वेळेला गुप्तहेर आलेला आहे, राजवाड्यामध्ये काय म्हणतात लोक, माझ्या एकंदर राज्याबद्दल. चांगलं आहे, रामाचे राज्य उत्तम आहे म्हणतात. हे फक्त गुण सांगू नकोस तर लोकांनी दोष काय सांगितले, आक्षेप काय लोकांनी घेतले ते सांग म्हणाले. एक मोठा आक्षेप भयंकर आहे. एका रजकाने आपल्या स्त्रीबरोबर भांडण करत असताना तिला सांगितले, माझ्या घरात मी तुला घेणार नाही. रामाने आपल्या सीतेला आपल्या बरोबर घेतलं तसं मी तुला घरात येणार नाही हे मी ऐकलंय. काय करावं. हे सगळं ऐकले रामांनी लगेच लक्ष्मणाला आज्ञा केली, उद्या रथामधे सीतादेवीला घेऊन जा आणि नदीतीरावर आश्रमामध्ये सोडून ये म्हणाले. वाईट वाटले लक्ष्मणाला, पण काय रामाची आज्ञा आहे.

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकस्य मुञ्चतो नास्ति मेञ्जसा ।।

रामचंद्रांचे सांगणे आहे. कोणाचाही स्नेहभाव मैत्री मी सोडून देईन. लोकांची आराधना मला करायची आहे. लोकांचे संरक्षण करायचे आहे. दयाही मी टाकून सर्व सौख्य मी टाकून देईन अथवा जानकी मला सर्वप्रिय आहे, जानकीचा त्याग करण्याचा प्रसंग आला तर मी तो करणार आहे. एकही मनुष्य माझ्या विरुद्ध आक्षेप घेणारा असा नसावा. एकही मत विरुद्ध जाऊ नये. असा नेता आहे. जास्ती मतं मिळाली म्हणजे निवडून आलो अशी समजूत आहे लोकांची, विरुद्ध पुष्कळ मतं असतात.

लक्ष्मण घेऊन गेलेला आहे सीतादेवींना. तिला वाटले, त्यांनी सांगितले तुम्हाला वनाची भूमी पाहाण्याची इच्छा होती ना अरण्य पहायची म्हणून रामाने सांगितले तुम्हाला घेऊन जा. तिथे

आल्याबरोबर उतरले दोघेही. आणि नंतर सांगितले तुमचा त्याग गेला आहे रामांनी. मी जातो आता. वाईट वाटले प्रथमतः परंतु सीतादेवीने सांगीतले, राजाचे कर्तव्य केलं रामचंद्रांनी, ते मला मान्य आहे, माझा नमस्कार सांगा रामचंद्रांना, कौसल्यादेवी, तसेच सर्वांना माझा नमस्कार सांगा. राज्य उत्तम प्रकारांनी करायला सांगा. वाल्मिकी महर्षीना सीतेला आपल्या आश्रमात घेऊन आलेले आहेत. ऋषीपत्निंनी तिचे संरक्षण केलेलं आहे. प्रसूत झाली सीतादेवी, तिला लवकुश हे दोन पुत्र झालेले आहेत. त्यांना सर्व विद्या ऋषिंनी शिकवल्या. गायन, संगीत विद्याही शिकवलेल्या आहेत, रामकथेचे गायन रामांच्या यज्ञामध्ये जाऊन लवकुशांनी केलेलं आहे. काही घ्यायचं नाही. आज्ञा केली. तसेच परत आलेले आहेत. कोणाची मुलं आहेत. वाल्मिकी महर्षींनी सांगितले रामचंद्रा ही सीतेची मुलं आहेत. तुमचीच मुलं आहेत. सीतादेवी आमच्या आश्रमामध्ये आहे. निर्दोष आहे ती. तिचा स्विकार तुम्ही करा. मग लवकुशांना, सीतादेवींना रामचंद्रांनी आणलेलं आहे. पुष्कळ दिवस आनंदात गेले. एके दिवशी कैकेयी भर सभेमध्ये सीतेच्या विरुद्ध बोलली. तिचा विरूद्ध स्वभाव गेलाच नाही, शेवटपर्यंत. काय म्हणावे रामा या स्त्रीला कशाला आणलस म्हणाली. रावणाच्या घरी राहिलेली सीता आणलीस तू. वाईट वाटले सीतेला. इतकं होऊन सुद्धा माझ्यावरती अजून आरोप आहेत म्हणाली. आपल्या मातेचे स्मरण केलं, भूमीदेवी मला घेऊन जा म्हणाली. ती भूदेवी वर आलेली आहे. आपल्या मुलीला तिने बरोबर घेतलं. पुन्हा भूमी मध्ये ती अदृश्य झालेली आहे. सीता गेलेली आहे. रामचंद्र आपल्या मुलांचं संरक्षण करत आहेत. भावांना राज्य करण्याला सांगताहेत. यज्ञयाग वगैरे करताहेत. तेरा हजार वर्षपर्यंत अयोध्येमध्ये राहिले. नंतर शेवटी आपल्या अयोध्यावासी सर्वही लोकांना बरोबर घेऊन आपल्या वैकुंठ लोकाला रामचंद्र निघून गेलेले आहेत. लोकापवाद येणारचं, तो न यावा याकरता राजाने कसे वागले पाहिजे हे दाखवलेलं आहे.

नंतर कुश हा राजा झालेला आहे. त्याचंही राज्य झालं. अशा प्रकारचे सूर्यवंशामध्ये हा राम अवतार झालेला आहे. हे सूर्यवंशाचे वर्णन झालेलं आहे. आता चंद्रवंशामध्ये कोण राजे झाले हे सांगत आहेत शुकाचार्य.

श्रुतायु, सत्यायु, रय, विजय आणि जय चंद्रवंशामध्ये गाधी नावाचा एक राजा झाला. त्या राजाला सत्यवती नावाची कन्या होती. ऋचिक ऋषींनी तिला येऊन मागणी घातली. राजाने सांगितले मला एक हजार शामकर्णअश्व जर आणून दिले तर माझी कन्या मी तुम्हाला देईन. ऋचिक ऋषिंनी आपल्या तपः सामर्थ्याने वरुणलोकातून ते अश्व आणून दिले. सत्यवती बरोबर

ऋचिक ऋषींचा विवाह झालेला आहे. तिची आई, गाधी राजाची पत्नि तिलाही मुलगा नव्हता. सत्यवतीने आपल्या पतिची प्रार्थना केली, महाराज मलाही मुलगा झाला पाहिजे, माझ्या आईलाही मुलगा झाला पाहिजे. अशी आपण कृपा करा. त्यांनी पत्निला देण्याचा भाग कोणता तोही अभिमंत्रण करून ठेवला. सासूला द्यायचा भाग कोणता तोही अभिमंत्रण करून ठेवला. स्नानादिक कर्म करण्याकरता ऋचिक ऋषी नदीवर गेले. ह्या दोघी मायलेकी यांनी आपल्या बुद्धिने असे ठरवले, ती आई म्हणाली तुझा भाग मला दे म्हणाली. तिलाही वाटले. आई मागती आहे. देऊन टाकावा. अशी अदलाबदल झाली. आईचा भाग मुलीला मिळाला आणि मुलीचा भाग आईच्या उदरामध्ये गेलेला आहे. ऋचिक ऋषी आल्यानंतर त्यांना हे समजले. पत्निला त्यांनी सांगितले, काय केलंस हे. शास्त्राच्या विरुद्ध असे आपल्या बुद्धिने निर्णय घेऊ नये म्हणाले. तुला क्षत्रियासारखा भयंकर शौर्य संपन्न युद्ध करणारा मुलगा होणार. आणि तुझ्या आईला ब्राह्मणासारखा तपस्वी पुरुष होणार. योग्य योजना केली होती. परंतू तुम्ही उलटापालट केली म्हणाले. काही तरी करा म्हणाली सत्यवती. मला असला क्षत्रिय मुलगा नको आहे. ऋषि समर्थ आहेत. त्यांनी सांगितलं. तुला मुलगा चांगला होईल परंतु तुझा नातू मात्र असे भयंकर कर्म करणारा होईल. तेज त्या नातवात तरी येणार म्हणाले. ते जाणार नाही. मग त्या सत्यवतिला जमदग्निनावाचे पुत्र झालेले आहेत. गाधी राजाच्या स्त्रीला विश्वमित्र पुत्र झालेले आहेत. ऋचिक ऋषींच्या मंत्रप्रभावाने विश्वामित्रांनी वसिष्ठांचे ते ब्रह्मतेज पाहून आपणही ब्रह्मतेज संपादन करण्याकरता तपश्चर्या केली आणि ते ब्रह्मर्षि झालेले आहेत. जमदग्नि ऋषींचा विवाह रेणू राजाची कन्या रेणुका हिच्याबरोबर झालेला आहे. त्यांना चार मुलं झाली. त्या मुलांपैकी भार्गवराम, परशुराम ज्यांना म्हणतात, हा एक मुलगा झालेला आहे जमदग्नी ऋषींना रेणुकेमासून. क्षत्रियांनी काही अपराध केलेला आहे. म्हणून सर्वही क्षत्रियांचा परशुरामाने एकवीस वेळा भारतवर्षामध्ये नाश केलेला आहे. रामांच्या भितीने, मोठे मोठे क्षत्रिय स्त्रियांची वस्त्रं नेसून अंत:पुरामध्ये लपून बसलेले असायचे. राम गेल्यावर बाहेर यायचे. राजाने विचारले, क्षत्रियांनी काय अपराध केला ? शुक सांगतात राजा, हैहय राजवंश होता. त्याचा अधिपती म्हणजे कार्तवीर्यार्जुन नावाचा होता. भगवान नारायणांचा अवतार दत्तात्रेय, यांची कृपा संपादन करून तो मोठा पराक्रमी राजा झालेला आहे. तो एकदा शिकारी करता गेलेला आहे, सैन्य बरोबर घेऊन, सतरा अक्षौहिणी सैन्य होते. एवढ्या सैन्याची खाण्यापिण्याची व्यवस्था कशी होत असेल, भारत भूमिमध्ये कोणतीही न्यूनता नाहीये. धान्यही पुष्कळ आहे, धनही पुष्कळ आहे. जमदग्निंचा आश्रम त्यांनी पाहिला. ऋषिमंडळींना नमस्कार करून त्यांचा आशिर्वाद घेऊन पुढे

जावे म्हणून कार्तवीर्यार्जुन राजा जमदग्नि ऋषींना भेटलेला आहे. नमस्कार केलेला आहे. जातो म्हणाले आता. जमदग्नी म्हणाले अरे आता मध्यान्न कालची वेळ आहे. तुझ्यासारखा सार्वभौमराजा इथे आला असताना उपाशी जाणे मला पसंत नाही. राजा म्हणाला मी एकटा नाही. सतरा अक्षौहिणी सैन्य आहे. थोडा वेळ थांब म्हणाले. कामधेनू होतीच त्यांच्याकडे. कामधेनू मातेची प्रार्थना केल्याबरोबर एकदम मोठा मांडव तयार झाला. चांदीची ताट पात्रे पाट, सगळं मांडलेलं आहे. सर्व सैन्याचे भोजन झालेलं आहे. कार्तवीर्यार्जुन राजाचे भोजन झाले आणि त्याची बुद्धि फिरलेली आहे. मला सुद्धा इतक्या वेळेत, इतक्या लोकांना जेवायला घालता आलं नसतं म्हणाला. हे कामधेनूचे सामर्थ्य आहे. कामधेनू मागायची म्हणजे हे ऋषी कसे देणार ? तिला बलात्काराने घेऊन कार्तवीर्यार्जुन निघून गेलेला आहे. जमदग्नी काही बोलले नाहीत. काही वेळाने परशुरामजी वनातून परत आले. तेव्हा त्यांना समजले कार्तवीर्याने आपली गाय नेलेली आहे. राग आलेला आहे आणि तसेच परतले. कार्तविर्यार्जुनाबरोबर युद्ध केलेलं आहे. त्याचे सर्व सैन्य मारलेलं आहे. त्याला ठार मारलेले आहे आणि ती गोमाता घेऊन आश्रयामध्ये आलेले आहेत. एक हजार हात होते, कार्तविर्यार्जुनाला. पाचशे हातात पाचशे धनुष्य आणि पाचशे हातानी बाण जोडायचे आणि मारायचे. परशुरामाला दोनच हात आहेत. पण काही टिकू शकला नाही. कार्तविर्यार्जुन राजा. नाश झाला. त्याची मुले त्यावेळेला पळून गेली. तेवढी सुटली. परशुरामानी गाईला बरोबर घेऊन आश्रमामध्ये परत आल्याबरोबर जमदग्नि रागावून त्यांना म्हणाले. परशुरामा आमच्या आश्रमात तुला रहाता येणार नाही. एका सार्वभौमराजाचा तू नाश केलेला आहेस म्हणाले. सर्व प्रजाजनांचे संरक्षण करणारा ईश्वरअंश राजा, याच्या वधाचा दोष तुला लागलेला आहे. हे पाप झालेलं आहे. सर्व तीर्थामध्ये स्नान करून नंतर माझ्या आश्रयामध्ये तू ये. जमदग्नी ऋषी रागीट आहेत अशी कल्पना आहे लोकांची. तू जमदग्नी आहेस, तू दुर्वास आहेत असा उल्लेख रागीट माणसाबद्दल करतात. जमदग्नी ऋषी रागीट नाहीयेत. लोकांची सुधारणा करण्यापेक्षा आपल्या घरातल्या लोकांची सुधारणा झाली पाहिजे, इकडे त्यांचे मुख्य लक्ष आहे. रेणुकादेवी पाणी आणण्याकरता गेलेली आहे. काय पातिव्रत्य त्या रेणुकेचे होते ते वर्णन करताहेत. वस्त्राची पिशवी, त्या पिशवीमध्ये ती पाणी आणत होती म्हणे. पाणी गळायचं नाही. एकदा नदीतीरावर गेलेली असताना, चित्ररथ गंधर्व आपल्या स्त्रियांसहवर्तमान क्रीडा करतो आहे हे ती पहात उभी राहिली. किंचित तिचे चित्त विचलीत झालेले आहे. ती आश्रमात आल्याबरोबर जमदग्नी म्हणाले बाहेर उभी रहा, आत यायचं नाही. मनोदोष सुद्धा उपयोग नाही. स्त्रियांचे दोष जाण्याकरता मनूने सांगितलेले आहे.

रजसा स्त्री मनोदृष्टा नदीवेगेन शुध्यति

असे काही शुद्धिकरणाचे मनूने उपाय सांगितलेले आहेत. मासिक रजस्त्राव झाल्यानंतर ती स्त्री शुद्ध होते. पण नुसते हे एक वाक्य घेऊन निर्णय करायचा नाही. दुसरे स्तुतीकार सांगतात

रजसा स्त्री मनोदृष्टा ।।

मनाने दूषित झालेली स्त्री रजस्राव झाल्यानंतर शुद्ध होते. नाहीतर वाटेल तसे वागायचे आणि रजस्राव झाला म्हणजे शुद्ध झाली असे नाहीये. हा सगळा एकवाक्यतेने विचार करायचा आहे. मनोदुष्ट आहे ही आपली पत्नी. तिला सांगितले बाहेर उभी रहा. मुलांना सांगितले हिचा शिरच्छेद करा. कोणी ऐकले नाही. परशुराम आले बाहेरून. हे तुझे बंधू आणि माता या सगळ्यांचा शिरच्छेद करून टाक. कुऱ्हाड होतीच ती खांद्यावर, ती उचलून सर्वांचा शिरच्छेद केला.

पितुर्विद्वांस्तपोवीर्यम् ।।९.१६.८।। श्री. भा.

पित्याचे तपसामर्थ्य किती आहे, हे परशुरामजींना माहिती होते. माताही मोठे दैवत आहे. काही बोलले नाहीत ते, मातेचा शिरच्छेद केला. जमदग्नि प्रसन्न झाले. काय पाहिजे म्हणाले परशुरामा. त्यांनी सांगितले पिताजी, हे सगळे जिवंत व्हावे अशी माझी इच्छा आहे. मी यांना मारलेले आहे अशी यांना आठवण राहू नये हे मागून घेतले. घरात रहायचं आहे. हा मारणारा आहे आपला वैरी आहे असं जर समजले तर घरात कसे रहायचं ? हेही करून टाकले जमदग्निंनी. स्मरणसुद्धा नाहीये. म्हणजे मनाने सुद्धा सर्वांनी शुद्धरूपाने राहिले पाहिजे. मुलाने काय, स्त्रीने काय सगळ्यांनीच. परशुरामाला त्यांनी आज्ञा केली, राजवधाचा दोष तुला लागलेला आहे, जा तू. राग तुला आवरता येत नाही परशुरामा.

वयं हि ब्राह्मणास्तात क्षमया अर्हणतां गताः ।<br>
यया लोकगुरुर्देवः पारमेष्ठ्यमगात् पदम् ।।९.१५.३९।। श्री.भा.

जमदग्नींचे विचार आहेत. परशुरामांना सांगतात बाबा, ब्राह्मण जे आम्ही आहोत, सर्वांना आम्हाला मान देतात सगळे याचे कारण तुझ्या लक्षात आलेले नाही.

क्षमया अर्हणतां गताः ।।

केवळ क्षमा आहे. कोणीही कितीही त्रास दिला तरी सहन करायचा आहे. या क्षमावृत्तीमुळे आम्ही सर्वमान्य आहोत. ब्रह्मदेव जसे मान्य झाले.

क्षमया रोचते लक्ष्मी: ।।९.१५.४०।। श्री.भा.

लक्ष्मीदेवी घरामध्ये आहे पण क्षमा पाहिजे. ज्याच्याजवळ क्षमा आहे, तितिक्षा आहे त्याच्यावर भगवान श्रीहरीचा कृपाप्रसाद आहे ज्याच्या मस्तकावर मंत्राभिषेक झालेला आहे, अशा राजाचा तू वध केल्यामुळे तू पापी आहेस, तीर्थस्नान करून मग तू या आश्रमामध्ये परत ये. बाहेर उभे आहेत, आत घेतलं नाही त्यांना. परशुरामजी तीर्थयात्रा करून परत आलेले आहेत. एक वर्षाच्या काळाने परत आलेले आहेत. पुढे कार्तवीर्यार्जुनाची मुलं पळून गेली होती. कार्तविर्यार्जुनाला तर मारले परशुरामाने. या मुलांच्या मनामध्ये परशुरामाचा सूड घेण्याचे आलं. याच्याही बापाला मारायचे. परशुरामजी वनामध्ये जायचे, दुपारी परत यायचे. ते वनात निघून गेल्यानंतर कार्तवीर्यार्जुनाची मुलं एकदम त्या जमदग्निंच्या आश्रमामध्ये शिरलेली आहेत, जमदग्निंना मारण्याकरता. जमदग्नि ऋषी होमशाळेत बसलेले आहेत. त्यांनी जाऊन एकदम शस्त्रानी त्यांचा शिरच्छेद केला. रेणुकामाता मध्ये पडलेली आहे, मारू नका म्हणून. काही उपयोग झाला नाही. तिच्याही अंगावर बाण मारले त्यांनी. जमदग्निंना मारून ती मुलं निघून गेली. काही वेळाने परशुरामजी परत आले, त्यांनी हे पाहिले. वाईट वाटले त्यांना आणि रागही आलेला आहे. लगेच जाऊन त्यांनी कार्तवीर्यार्जुनाच्या मुलांना ठार मारलेलं आहे. यांच्या वंशातला कोणीही क्षत्रिय जिवंत ठेवायचा नाही. सगळेच क्षत्रिय दोषी आहेत. एकवीस वेळा क्षत्रिय संहार करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. त्याचेही कारण गणेश पुराणात सांगितलेलं आहे. ती रेणुकादेवी प्रार्थना करती आहे पण त्या मुलांनी रेणुकेच्या अंगावरही बाण मारलेले आहेत. पायापासून मस्तकापर्यंत एकवीस बाण मारले होते. परशुरामाने तीच प्रतिज्ञा केली. एकवीस वेळेला संचार करून, एकही क्षत्रिय जिवंत ठेवायचा नाही, ब्राह्मतेज त्यांनी त्यावेळेला दाखवून दिलेलं आहे. नंतर सर्व क्षत्रियांचा संहार झाला. सर्वांच्या मनात भीतीने का होईना धर्माबद्दल आदरभाव निर्माण झाला. मग यज्ञ केला मोठा परशुरामजींनी आणि सर्वही राज्य ब्राह्मणांना अर्पण केलेलं आहे.जमदग्नी हे सप्तर्षी मंडळामध्ये एक ऋषी होऊन राहिलेले आहेत. परशुरामजी हेही महेंद्र पर्वतावर दंड त्याग करून शांतपणाने तिथे वास्तव्य करत आहेत. या भृगु कुलामध्ये विश्वात्मा श्रीहरींनी अवतार धारण करून क्षत्रिय संहार म्हणजे भूमिचा भार हरण केलेला आहे.

शुक्राचार्य महाराज हे दैत्यराज वृषपर्वा यांचे गुरू होते. ते तिथे रहात होते. त्यांची कन्या देवयानी. तिला आई नसल्यामुळे शुक्राचार्यांचे प्रेम तिच्यावर अधिक होते. ते तिचे सगळे ऐकायचे, तिची सर्वही इच्छा पूर्ण करायचे. वृषपर्वा दैत्यराजाची कन्या शर्मिष्ठा आणि तिच्या एक सहस्त्र दासी,

देवयानी सगळ्याही एकदा बाहेर एका मोठ्या जलाशयामध्ये स्नान करण्याकरता गेल्या. वस्त्र तीरावर काढून ठेवली आणि स्नान करताहेत. कोणी नाही असे त्यांना वाटले. इतक्यात भगवान शंकर हे त्या वनामधून निघालेले त्यांच्या लक्षात आल्यावर गडबडीने सर्व मुली वर आल्या आणखी एकमेकींची वस्त्र चुकून त्या नेसल्या. देवयानीचे वस्त्र राजकन्या शर्मिष्ठा ही नेसलेली आहे. ते देवयानीला सहन झाले नाही. माझं वस्त्र तू नेसलीस ? हट्टी होती, एकुलती एक मुलगी आणि वडिलांचे प्रेम आहे. बाप म्हणजे काय सामान्य नाहिये. आपण जे सांगेल ते बाप ऐकतो आहे, ही कल्पना त्या देवयानीची आहे. देवयानी म्हणाली, आम्ही ब्राह्मण आहोत आणि तुम्ही क्षत्रिय, कळत नाही तुम्हाला ? शर्मिष्ठा राजकन्या होती. तिला ते कसं सहन होणार ? ती म्हणाली, तुम्ही भिकारी आमच्या राज्यात येऊन राहिलात आणि तू मला बोलतेस ? तिच्या दासींनी देवयानीचं वस्त्र काढून घेतलं आणि तिला एका विहिरीत ढकलून दिलं. विहीरीत फारसे पाणी नव्हते. सगळ्या मुली राजवाड्यामध्ये परत आलेल्या आहेत. ययातीराजा हा शिकारीकरता आला असताना त्याला तहान लागलेली आहे. पाण्याचा शोध करत, ज्या विहीरीमध्ये देवयानी पडली होती तिथे आला. पाणी कमी होतं, पण कोणीतरी स्त्री पडलेली आहे, वस्त्र नाही तिच्या अंगावर हे लक्षात आले. त्यांनी आपल्या अंगावरचे वस्त्र काढून तिला दिले आणि तिच्या हाताला धरून वर काढलेलं आहे. देवयानी म्हणाली, आपण माझं पाणीग्रहण केलेलं आहे. मला कचाने शाप दिलेला आहे, तुला ब्राह्मण पति मिळणार नाही. आपण आता अनायासे आलेले आहात. आपण माझा स्विकार करा. हेही शास्त्र विरुद्ध आहे. क्षत्रियांनी ब्राह्मणाच्या कन्येबरोबर विवाह करायचा कसं शक्य आहे. कोणी कोणाबरोबर विवाह करायचा हे शास्त्रानी नियम घालून दिलेले आहेत. ते कोणाच्या मनाला दुखवण्याकरता नाहीयेत. त्यांचे पूर्ण कल्याण, हित झालं पाहिजे. हिताकडे दृष्टी आहे. तात्कालिक प्रिय होईल आपल्याला. जो प्रिय वाटेल आपल्याला त्याच्या बरोबर कोणीही मुलीने विवाह करावा ; मुलाने कोणत्याही मुलीबरोबर विवाह करावा. तेवढ्यापुरते प्रिय होते पण हित नाही साधत. ययाती राजाने सांगितलं तुझ्या पित्याला विचार, त्यांची संमती असेल तर मी विवाह करीन. मग त्यांनी संमती दिली. देवयानी बरोबर विवाह झालेला आहे. देवयानीने सांगितले माझी सेवा करण्याकरता ही शर्मिष्ठा आणि तिच्या सर्व दासी माझ्याबरोबर आल्या पाहिजेत. राजाला कबूल करावे लागले. शुक्राचार्यांची, आपल्या गुरूमहाराजांची कन्या आहे. शर्मिष्ठेने मान्य केलं. जाते म्हणाली. शुक्राचार्यांनी सांगितले तू या स्त्री बरोबर संबंध ठेवू नकोस. तुझी पत्नि ही माझी मुलगी आहे. आलेले आहेत सगळे. व्हायचे ते झाले, शर्मिष्ठा राजकन्या आहे. देवयानीला दोन मुले

झाली आणि शर्मिष्ठेला तीन मुले झाली. हे देवयानीला समजले आणि ती ययाती राजाला सोडून आपल्या पित्याकडे आली. घडलेले सर्व सांगितले तिने शुक्राचार्यांना, त्या स्त्रीशी संबंध ठेवणारा राजा म्हणाली, तिने ययातीचा त्याग केलेला आहे. रागावले शुक्राचार्य त्याला रागाने सांगितले.

त्वां जरा विशतां मन्द ।।९.१८.३६।। श्री.भा.

तू म्हातारा होशील म्हणाले. झाला म्हातारा ययाती राजा. प्रार्थना करतो आहे, क्षमा मागतो आहे. ययाती राजा म्हणाला महाराज अजून माझी विषय वासना संपलेली नाही. आपल्या कन्येबरोबर विहार व्हावा आणि विषयभोग घ्यावा ही इच्छा अजून अतृप्त आहे. आणि मला तुम्ही म्हातारं केलंत. शुक्राचार्य म्हणाले, तुझ्या मुलांना विचार, जो मुलगा आपलं तारुण्य तुला देऊन तुझं म्हातारपण घ्यायला कबूल असेल. त्याचं तारुण्य तुला घेता येईल आणि तुझं म्हातारपण त्याला देता येईल.

वाचमर्थमभिधावति ।।

वाणीमधून जे निघेल ते घडण्याचे सामर्थ्य आहे. थोरला मुलगा यदुराजा देवयानीचा त्याला विचारले, असे तुझ्या मातामहांनी सांगितले आहे त्याप्रमाणे माझं म्हातारपण तू घे आणि तुझे तारूण्य मला दे. यदू म्हणाला महाराज म्हातारपणाचं नुसत नाव ऐकलं तरी आम्ही घाबरतो म्हणाले. म्हातारपण तुमचे घ्यायचं, त्या पराधीन स्थितीमध्ये रहायचं दिसत नाही, ऐकायला येत नाही हे शक्य कसं आहे. मी काही तुमचे म्हातारपण घेणार नाही. दुसरा मुलगा देवयानीचा, त्यानीही तसेच सांग्तिले. शर्मिष्ठेच्या दोन्ही मुलांनीही तसेच सांगितले. शेवटचा मुलगा पुरू नावाचा होता. मोठा पितृभक्त आहे. पित्याची इच्छा समजल्याबरोबर त्यांनी सांगितले पिताजी तुमचे म्हातारपण मला द्या आणि माझे तारूण्य तुम्हाला घ्या आणि राज्य करा.

उत्तमश्चिन्तितं कुर्याद् प्रोक्तकारी तु मध्यम:<br>
अधम: अश्रद्धया कुर्याद् ।।९.१८.४४।। श्री.भा.

उत्तम पुत्र कोणता, मध्यम पुत्र कोणता, अधम् पुत्र कोणता हे पुरूने सांगितले. पित्याच्या मनामध्ये जो विचार आलेले आहे तो जाणून त्याप्रमाणे वागणारा उत्तम पुत्र आहे. सर्व देवांची, ईश्वराची त्याच्यावर पूर्ण कृपा असते. शंतनूला त्या मत्स्यकन्येबरोबर विवाह करण्याची इच्छा झाली. तिच्या बापाने सांगितले तुमचा मुलगा भीष्म आहे, त्याला तुम्ही राज्य दिले तर, माझ्या मुलींच्या मुलांना राज्य मिळाले पाहिजे. भीष्माचार्यांनी सांगितले मी राज्य करणार नाही. तू राज्य करणार

नाहीस, तुला झालेला मुलगा जर राज्यावर अधिकार सांगू लागला तर, तो म्हणाला मी विवाहच करणार नाही, प्रतिज्ञा केली भीष्माचार्यांनी आपल्या पित्याला सुखी करण्याकरता. पित्यानेही त्याला सांगितले की यमधर्म तुझ्या बाजूला येणार नाही. शरीर त्याग करण्याची तुझी इच्छा होईपर्यंत यमधर्म तुला पाहाणारही नाही. त्याला आपोआप वर मिळालेला आहे. तसा हा पुरू राजा चांगला होता. लहान सगळ्यांच्या मध्ये पण गुणांनी मोठा होता. वार्धक्य घेतलं त्यांनी आपल्या पित्याचं आणि पित्याला तारूण्य दिलेलं आहे. पुष्कळ कालपर्यंत ययाती राजाने सुखभोग घेतलेला आहे. शेवटी त्याच्याच मनामध्ये वैराग्य निर्माण झाले. त्यांनी सांगितलं देवयानी.

यत् पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः ।
न दुह्यन्ति मनः प्रीतिं पुंसः कामहतस्य ते ।।९.१९.१३ ।। श्री.भा.

आपल्या आपणच मनानी ठरवले पाहिजे. पृथ्वीवरती जेवढं सुवर्ण आहे, जेवढ्या स्त्रिया आहेत, जेवढं धन धान्य आहे तेवढं सगळंही एका मनुष्याला मिळालं, तरी त्याच्या मनाचा संतोष होणार नाही म्हणाले. हा विचार करून प्रत्येकाने वासनाक्षय करण्याकरता आपल्या वासना टाकण्याचा प्रयत्न करून, ईश्वर चिंतनाकडे लक्ष दिले पाहिजे. मी हा आता संसाराचा त्याग करणार आहे. पुरे झाला आता संसार. पुरूचे तारूण्य त्याला देऊन टाकलेलं आहे. आपलं वार्धक्य त्याने परत घेतलेलं आहे. सर्वात लहान जरी पुरू होता, त्याला मुख्य सार्वभौम राज्य दिलेलं आहे, अभिषेक केला आणि त्याचे चौघे भाऊ त्याच्या हाताखाली मांडलिक म्हणून नेमलेले आहेत. तुमची योग्यताही नाही राज्य करण्याची. वनामध्ये निघून गेलेला आहे, बरोबर देवयानी वगैरेही गेली. असा हा ययाती राजा याचे चरित्र चंद्रवंशामध्ये झालेलं आहे.

पुढे पुष्कळ असे राजे झालेले आहेत. त्यापैकी दुष्यंत राजाची कथा सांगताहेत शुकाचार्य महाराज. दुष्यंत राजा शिकारी करता गेलेला आहे. येता येता कण्व ऋषींचा आश्रम लागलेला आहे. तिथे थांबला दुष्यंत राजा. ऋषींचे दर्शन करावे आणि जावं. सगळ्या सैनिकांना आज्ञा केली शांत रहा, गडबड काही करू नका. ऋषी महाराज कुठे बाहेर गेले होते. त्यांनी पालन केलेली कन्या शकुंतला, विश्वमित्रांची कन्या, ही त्याठिकाणी होती. राजाच्या मनामध्ये मोह उत्पन्न झालेला आहे. परंतु राजाने आपले मन आवरलेलं आहे. ही ऋषी कन्या आहे. हिच्यावर आपले मन जाणे योग्य नाहीये. मनाला आवरलेलं आहे. पुन्हा त्यांनी विचार केला की माझं पवित्र मन आहे म्हणाले, माझं पवित्र मन ज्या अर्थी या कन्येवर गेलेलं आहे त्या अर्थी ही ऋषीकन्या नसली

पाहिजे, ही क्षत्रियाची कन्या असली पाहिजे.

मनानीच निर्णय करून, कोणती मुलगी करावी वगैरे करता येते पण मन असे पवित्र पाहिजे. मनाने केलेला निर्णय शास्त्रविरुद्ध होऊन उपयोग नाही. माझं मनं आर्य आहे, श्रेष्ठ आहे. माझ्या मनाला जर ही कन्या पाहिजे असे वाटते आहे. तर ती क्षत्रियाचीच मुलगी असली पाहिजे. तिला विचारले, कोणाची मुलगी आहेस तू. विश्वमित्रांची मुलगी, मेनका अप्सरेपासून झालेली, बरोबर ठरले. गांधर्व विवाह झाला. राजा निघून गेलेला आहे. त्या शकुंतलेला मुलगा झालेला आहे. भरत त्याचे नांव. मोठा पराक्रमी भरत आहे. लहान वयामध्ये सुद्धा त्यांनी वाघ सिंहाना बांधून ठेवावे. काही दिवसांनी कण्व ऋषींनी शकुंतलेला आणि तिच्या मुलाला राजधानी मध्ये पाठवलेलं आहे. बरोबर तिच्या आपल्या शिष्यमंडळींना दिलेलं आहे. राजाला सांगा ही तुझी पत्नि आहे. हा मुलगा तुझा आहे. यांचा स्विकार तू कर. आणि एवढं सांगा,

आम्ही शमप्रधान आहोत, शांतीने रहाणारे आहोत. सगळं सहन करणारे आहोत म्हणाले. म्हणून आमच्यासुद्धा मनामध्ये तेज आहे म्हणाले. तपःतेज आहे म्हणाले. केव्हा बाहेर पडेल याचा नेम नाही. आमच्या मनाच्या विरुद्ध शास्त्राच्या विरुद्ध जो वागणारा आहे. त्याचा प्रतिकार आमच्या तेजाने आम्ही करू शकत असतो असे राजाला ऐकवा म्हणाले.

सूर्यकांत मणी हातामध्ये घेता येतो. पण सूर्याचे तेज त्याच्यामध्ये पडल्याबरोबर त्यातूनही तेज बाहेर पडते म्हणाले. तसे आमचे तेज. तुम्ही जर शास्त्र विरुद्ध वागायला लागलात. तर तुमचाही प्रतिकार करू हे त्यांना समजाऊन सांगा म्हणाले.

शकुंतला आणि भरत या दोघांना घेऊन आलेले आहेत, ऋषींचे शिष्य. त्यांनी राजाला सांगितले. ही तुमची पत्नि आहे, आकाशवाणीही झाली. दुष्यंताने तिचा स्विकार केलेला आहे. भरत हा शेवटी राजा झाला. भरताने पुष्कळ यज्ञ केले. दानधर्म पुष्कळ केलेला आहे. त्यांनी दैत्यांनी नेलेल्या देवांच्या स्त्रिया, त्या सर्व स्त्रियांना सोडवून आणलं आणि देवांकडे पाठवलेलं आहे. मृत्यूलोकात राज्य करणारे राजे सुद्धा, धर्मबल त्यांच्याजवळ इतकं होतं की दैत्यांना सुद्धा ते भारी झालेले आहेत. अशा रितीने ही पण कथा त्यांनी सांगितलेली आहे.

पुढे यदुचे जे कुल आहे, यादवांच्या कुलाचे वर्णन करताहेत, शुकाचार्य महाराज. यदु राजा हा मूळ आहे, यदुवंशाचा. त्याच्यापासून पुढेही सर्व संतती झालेली आहे. कौरवांचे जे कुल आहे

त्याचे थोडे प्रतिपादन केलं त्यांनी. भीष्माचार्यांनी एका राजकन्येच्या स्वयंवरामध्ये जाऊन सर्व राजांना जिंकून दोन मुली आणल्या त्याच्या आणि आपल्या भावांना त्या दिल्या. तो जो आहे विचित्रवीर्य हा सावत्र मुलगा होता. त्या मुलाला क्षय रोग झाला. आणि त्याला मरण आलेलं आहे. आईच्या आज्ञेवरून वेदव्यासांपासून त्या दोघींना मुले झाली. धृतराष्ट्रपत्नि गांधारी हिला शंभर पुत्र झालेले आहेत. दुःशला नावाची एक कन्या झाली. पांडूराजा कुंतीसह आणि माद्रीसह अरण्यामध्ये रहात होता. त्याला शाप झालेला आहे. स्त्री समागम झाल्याबरोबर त्याचे प्राणोत्क्रमण झालेलं आहे. माद्रीने कुंतीच्याजवळ आपली दोन मुले दिली. कुंतीला दुर्वास ऋषींची सेवा केल्यामुळे मंत्र प्राप्त झाले. त्या मंत्रापासून, यमधर्मापासून धर्मराज, वायूपासून भीम, इंद्रापासून अर्जुन, हे तीन कुंतीला झाले. अश्विनीकुमारांपासून दोन मुलं नकुल, सहदेव हे त्या माद्रीला झालेले आहेत. पाच पांडवांपासून पाच मुलं द्रौपदीला झालेली आहेत. अशा रितीने तोही यदुकुलाचा व्याप मोठा वाढलेला आहे. महाभारतामध्ये ही सर्व कथा वर्णन केलेली आहे. यानंतर परीक्षित राजा याच वंशामध्ये तुझा जन्म झालेला आहे. तुझा मुलगा जनमेजय हा तू गेल्यानंतर राज्य करील. पुष्कळ यज्ञयाग वगैरे तो करणार आहे. अशा रितीने हा तुमचा वंश पुढे चालू रहाणार आहे. शेवटी यदू राजाचा वंश सांगायला त्यांनी सुरवात केली. ययाती राजाचा जेष्ठ पुत्र यदू. ह्या यदूराजाचा वंश, ह्या वंशामध्येच भगवंतांनी अवतार धारण केलेला आहे. सहस्त्रजित हा यदूराजाचा मुलगा आहे. आणखी काही मुलं त्याला झाली. याच वंशामध्ये कृत्तवीर्य हा राजा झाला. त्या कृत्तवीर्याचा मुलगा कार्तवीर्यार्जुन याने दत्तात्रेयांपासून सर्व योगसामर्थ्य मिळवले. सर्व पृथ्वीचे राज्य केलेलं आहे. अनेक यज्ञ त्यांनी केले. पंचाऐंशी हजार वर्ष पर्यंत अप्रतिहत राज्य केलेलं आहे. त्यालाही पुष्कळ मुलं झाली. त्या सर्वांचा नाश परशुरामाने केला. चार-पाच मुलं शिल्लक राहिलेली आहेत. अशा रितीने हा यदुवंश वाढत वाढत गेलेला आहे. याच वंशामध्ये मथुरा राजधानीमध्ये देवक नावाचा यादव आणि उग्रसेन हे होते. वसुदेवही त्याच वंशामध्ये जन्माला आलेला आहे. वसुदेवाला देवकाने आपली कन्या देवकीही दिली. त्या पूर्वी त्याचे विवाह झालेले होते. आणखीही त्याचे विवाह पुष्कळ झाले. देवकीपासून वसुदेवाला आठ मुलं झालेली आहेत. ती सहा मुलं कंसानी मारली. सातवा गर्भ हा रोहिणीच्या गर्भामध्ये मायादेवीने नेऊन ठेवला. साक्षात श्रीहरी देवकीचा आठवा मुलगा म्हणून जन्माला आलेले आहेत. मायादेवी हीही जन्माला आली देवीपासून. भगवंतांनी भूमीचा भार दूर करण्याकरता हा कृष्णावतार धारण केलेला आहे. हजारो दैत्य त्यावेळेला राजांच्या रूपांनी जन्माला आलेले होते. अतिशय त्रास सर्वांना देत होते. त्यांचा संहार

करून भूभार दूर करण्याकरता हा अवतार भगवंतांनी घेतलेला आहे. पुष्कळ कार्य केलं त्यांनी. जन्माला आल्याबरोबर गोकुळामध्ये जाऊन राहिले. त्याठिकाणी अनेक दैत्य मारले. पुढे मथुरेमध्ये आलेले आहेत. कंसादिकांचा नाश केला. जरासंधादिकांचा पराभव केला. पुष्कळ विवाह झालेले आहेत, मुलं बाळ झालेली आहेत. पृथ्वीचा भार सर्वही दूर केला. कौरव–पांडवामध्ये परस्पर कलह निर्माण करून त्या युद्धाच्या निमित्तानेही पृथ्वीचा भार पुष्कळ हलका केला. जाताना उद्धवजींना पुष्कळ ज्ञान सांगितले. सगळी साधनं सांगितली आणि आपण निजधामाला गेलेले आहेत. असे संक्षिप्त कृष्णचरित्र त्यांनी सांगितले.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा । बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात् ।।
करोति यद्यत् सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयेतं तत् ।।११.२.३६ ।। भा.
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।
।।गोपालकृष्ण भगवान् की जय ।।
।। श्रीमद्भागवत चवथा दिवस समाप्त ।।

ट



# || श्रीमद्भागवत पाचवा दिवस ||



## || भगवान् श्रीकृष्ण चरित्र ||

ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।

प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे ।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते ।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा ।।
तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ ।।
तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती ।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण। स्तवावे ते कवणे कवणालागी ।।
यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम्।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः ।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो। मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः ।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम्। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः ।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम् ।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्। संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन्। प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम्।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम्।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम् ।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं। तत्र तत्र कृत मस्तकांजलिम्।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं। मारुतिं नमत राक्षसान्तकम् ।।

पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम् ।।
श्रीगणेशाय नमः
श्रीगुरुचरणारविन्दाभ्याम् नमः।
कथितो वंशविस्तारो भवता सोमसूर्ययोः ।
राज्ञां चोभयवंश्यानां चरितं परमाद्भुतम् ।। १०.१.१ ।।
यदोश्च धर्मशीलस्य नितरां मुनिसत्तम ।।
तत्रांशेनावतीर्णस्य विष्णोर्वीर्याणि शंस नः ।।१०.१०.२। श्री.भा.

परीक्षित राजाने संपूर्ण कृष्णचरित्र सांगा अशी प्रार्थना केलेली असताना शुकाचार्य महाराजांनी कृष्णचरित्र सांगितलेलं आहे.

परीक्षि राजा विचारतो महाराज, चंद्रवंश आणि सूर्यवंश या दोन्हीही वंशामध्ये उत्पन्न झालेले राजे यांचे अद्भूत चरित्र आपण सांगा. यदूराजाचेही चरित्र सांगितले. त्या यदुराजाच्या वंशामध्ये भगवान महाविष्णूंनी अवतार धारण करून, ज्या लीला केल्या त्या सर्व आम्हाला सांगा.

जे जे चरित्र भगवान श्रीहरींचे आहे ते सविस्तर मला सांगावं. आपल्यासारखे भक्त हेही भगवत गुण वर्णन करतात. संसाररूपी रोगाचे हे औषध असल्यामुळे मुमुक्षुंनाही हे अत्यंत चांगले, अनुकूल आहे. विषयी, संसारी जीवांनाही ऐकायला, त्याप्रमाणे मनालाही आनंद देणारे असल्यामुळे सर्वही लोक या भगवंताच्या गुणानुवादांबद्दल अत्यंत उत्सुक आहेत. माझे पितामह पांडव, भीष्मद्रोणादि, मोठे मोठे जलचर प्राणी त्या कौरवे सैन्य समुद्रामध्ये आहेत पण ज्या भगवंताच्या चरणाचा आश्रय करून ते पांडव यातून तरून गेले, विजयी झाले. आईच्या उदरामध्ये असलेलं माझं शरीर नष्ट करण्याकरता अश्वत्याम्याने ब्रह्मास्त्र प्रयोग केला. पांडवांच्या वंशाला मी एकटाच आधार होतो. पण माझ्या मातेच्या उदरामध्ये प्रवेश करून ज्या भगवंतांनी माझे संरक्षण केलेलं आहे, सर्वांच्या अंतर्बाह्य सर्वत्र व्यापून रहाणारा भगवान त्याचे चरित्र आपण सांगा. रोहिणीचा पुत्र बलराम असं आपण म्हणालात पूर्वी. तोच देवकीच्या गर्भामध्ये आला हे कसं आहे. मथुरेचा त्याग करून गोकुळामध्ये भगवान श्रीहरी का गेले ? त्याठिकाणी राहून त्यांनी काय काय लीला केल्या, मथुरेमध्ये आल्यावर काय काय लीला केल्या. आपल्या मातेचा बंधू कंस याला कशाकरता त्यांनी

मारले ? मनुष्य देह धारण करून किती वर्षं या भूमीवर त्यांचा निवास झाला ? त्यांच्या स्त्रिया किती होत्या. हे सर्वही कृष्णचरित्र सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे. अशी श्रद्धा उत्पन्न झालेली आहे. मला क्षुधा, तृषा याची बाधा नाहीये. आपल्या मुखातून हे भगवंताचे चरित्ररूपी अमृत मला मिळतं आहे. त्यामुळे क्षुधा, तृषा याच्यातून मुक्त झालो. परीक्षित राजा आरंभाला मृगया करून येत असताना शमीक ऋषींच्या आश्रमामध्ये तहान लागल्यामुळे गेला, पाणी मिळालं नाही म्हणून रागावला, म्हणजे त्यावेळेला प्राणमय कोषाचा अभ्यास होता असे दिसते आहे. प्राणमय कोषाचा अभ्यास असल्यामुळे क्षुधा, तृषा आहे. पण आत्ता चारपाच दिवस प्रत्यक्ष शुकाचार्य महाराजांच्या मुखातून हे चरित्र ऐकल्यामुळे त्यांच्या कृपेमुळे तो या कोषातून बाहेर पडलेला आहे. क्षुधा, तृषेची बाधा मला होत नाही म्हणून सांगतो आहे. हरीकथामृत मिळतयं म्हणून क्षुधा, तृषा गेलेली आहे. हरीकथा श्रवणाने हे मोठे मोठे कोषाध्यासही दूर होतात, असे समजायला हरकत नाहीये.

राजाची अत्यंत श्रद्धा, भक्ति पाहिली, शुकाचार्य महाराजांनाही, आनंद झाला. शुकाचार्य महाराज म्हणतात, राजा तुझी बुद्धी खरोखर निर्मळ आहे. वासुदेवाची कथा ऐकण्याबद्दल तुझ्या मनात अत्यंत दृढ श्रद्धा उत्पन्न झालेली आहे.

भूमिर्दृप्तनृपव्याजदैत्यानीकशतायुतैः ।<br>
आक्रान्ता भूरिभारेण ब्रह्माणं शरणं ययौ ।१०.१.१७।। श्री.भा.

कृष्णावतार होण्यापूर्वीची काय अवस्था होती ते सांगताहेत. भूमीवर राजांच्या रूपानी अनेक दैत्य जन्माला आलेले होते. त्यांचा भार झालेला आहे भूमीला. ब्रह्मदेवाकडे ती भूमी शरण गेलेली आहे. गायीचे रूप धारण करून ती गेली. आपल्यावर काय संकट आलेलं आहे हे तिने सांगितले. ब्रह्मदेवांनी भूमिला बरोबर घेतलं सर्व देवमंडळींना बरोबर घेतलं, शंकर परमात्माही आहेत बरोबर. क्षीरसमुद्राच्यातीरावर ते सर्व गेले. ब्रह्मदेवांनी त्या ठिकाणी भगवंतांची उपासना, प्रार्थना केलेली आहे. समाधी अवस्थेमध्ये ब्रह्मदेवांनी श्रीहरीचा जो आवेश झालेला आहे, तो त्यांनी सांगितला. ईश्वराची, श्रीहरींची आज्ञा मी सांगतो तुम्हाला आणि त्याप्रमाणे तुम्ही वागा म्हणजे तुमचे कल्याण होईल. हा भूमीला झालेला भार भगवंतांना समजलेला आहे म्हणाले. त्याकरता स्वतः भगवान अंशाने जन्म घेणार आहेत. तुम्हीही यदुकुलामध्ये सर्व देवांनी जन्म घ्यावा. भगवंताच्या सहाय्याकरता. वसुदेवाच्या गृहामध्ये देवकीपासून भगवान श्रीहरी उत्पन्न होणार आहेत.

सर्व देवस्त्रियांनीही त्यांची सेवा करण्याकरता जन्म घ्यावा. भगवान वासुदेवांची कला, सहस्त्रमुख जो शेष आहे हा प्रथम जन्म घेणार आहे. श्रीहरींची मायाशक्ती सर्व जगाला मोहामध्ये टाकणारी प्रभूच्या आदेशाप्रमाणे तीही जन्माला येणार आहे.

शुकाचार्य म्हणतात राजा, सर्व देवांना ब्रह्मदेवांना भगवंतांची आज्ञा झालेली आहे. आश्वासन दिलेलं आहे आणि पृथ्वीचे समाधान केले. आणि आपल्या लोकाला ते निघून गेलेले आहेत.

शूरसेनो यदुपतिः मथुरां आवसन् पुरीम् ।
माथुराञ्छूरसेनाश्च विषयान् बुभुजे पुरा ।। १०.१.२७ ।। श्री.भा.

यादवांचा राजा शूरसेन नावाचा होता. मथुरा राजधानी होती त्याची. त्याठिकाणी तो राज्य करत होता. एकेदिवशी त्याचा पुत्र वसुदेव याचा विवाह. देवकीबरोबर विवाह झाला आणि त्यांची मिरवणूक निघाली. उग्रसेनाचा पुत्र जो आहे कंस हा या देवकीचा चुलत बंधू आहे. बहिण आहे आपली, बहिणीवर प्रेम होते. रथामध्ये स्वतः रथ हाकण्याकरता हातामध्ये लगाम घेऊन बसलेला आहे. पाठीमागे वसुदेव-देवकी बसलेले आहेत. आणि लग्नाची मिरवणूक निघालेली आहे. देवकीच्या पित्याने देवकीला,ज्यांच्या गळ्यात सोन्याच्या माळा आहेत असे चारशे हत्ती दिले. पंधरा हजार अश्व दिलेले आहेत. अठराशे रथ दिलेले आहेत. दोनशे दासी तिच्याबरोबर दिलेल्या आहेत. केवढी संपत्ती होती भारतवर्षामध्ये. त्याला काय एकच मुलगी नव्हती. पण या मुलीबरोबर एवढी संपत्ती दिली. वाद्यं वाजताहेत. आनंदाने ती लग्नाची मिरवणूक निघालेली असताना एकदम आकाशवाणी झाली. कंसा, ज्या देवकीला तिच्या घरी पोचवायला तू निघालेला आहेस तिचा आठवा पुत्र तुला ठार मारणार आहे. आधी सूचना दिलेली आहे देवाने. सूचना न देता काही नाश केला नाही. इतर जीव निराळे आणि कंस निराळा असं म्हणायला पाहिजे. आम्हाला कुठंकाय मृत्यूची कल्पनादेखील येत नाही. सूचना मिळाली असती तर संसाराची आसक्ती बरीच कमी झाली असती. हे सगळं ठरलेलं आहे. ईश्वरेच्छा. एकदम त्या कंसाची वृत्ती बदलली. त्याने लगाम फेकून दिले. म्यानातून तलवार बाहेर काढली. देवकीचे केस धरून तिचा शिरच्छेद करायचा त्यानं ठरवलं. त्याने विचार केला, देवकीलाच शिल्लक ठेवलं नाही तर पुढं मुलगा होईल कसा आणि मला मारेल कसा. हा प्रयत्नवाद आहे. दैववादही मानायचा नाही आणि देववादही मानायचा नाही. केवळ प्रयत्न करून आपण अजरामर होऊ असं वाटतंय. बाकीचे दैत्य तपश्चर्या तरी करत होते. याने तर तपश्चर्याही केली नाही. अहंकारापायी, मला कुणीही काही करू शकणार नाही. कुठली अदृश्य शक्तीही मला

काही करू शकणार नाही. त्याकरता अगोदरच मी ही व्यवस्था करून टाकतो अशी बुद्धी आहे. देवकीवर मोठा कठीण प्रसंग आलेला आहे. केव्हा शिरच्छेद होईल याचा नियम नाहीये व वसुदेव सांगताहेत,

श्लाघनीयगुणः शूरैर्भवान् भोजयशस्करः ।।१०.१.३७।। श्री. भा.

कंसा, तू मोठा गुणवान म्हणून प्रसिद्ध आहेस. सर्व यादवांचं यश हे तुझ्यामुळे आहे. असा तू सर्वांना मान्य असलेला, विवाहासारख्या मंगल प्रसंगी आपल्या बहिणीला मारतो आहेस हे योग्य आहे का? तू विचारशील की हिच्या आठव्या पुत्रापासून माझा मृत्यू होणार आहे तर मग हिला जिवंत का ठेऊ ? पण ज्या दिवशी जीव जन्माला आला त्यादिवशी मृत्यूदेखील बरोबर आलेला आहे. आज नाही, उद्या नाही, शंभर वर्षांनी का होईना मृत्यू येणार आहे. मृत्यूचा प्रतिकार कोणालाही करता येणार नाही. बाकीच्या दुःखाचा प्रतिकार केला अशी समजूत करून घेऊन समाधान मानता येईल. म्हणून वसुदेवाने जीवात्मा कसा जातो, पुढच्या देहाचा संबंध घेऊन हा देह कसा सोडतो वगैरे सर्व काही कंसाला समजावून सांगितले. पुनर्जन्म वगैरे तो मानत होता की नाही कुणास ठाऊक? मृत्यू फक्त देहाला आहे आणि देह म्हणजेच मी आहे. वसुदेवाने हेही त्याला समजावून सांगितलं की, शरीराला तर मृत्यू आहेच परंतु जीवात्म्याला सुद्धा वेगवेगळे देह धारण करावे लागतात. चांगलं कर्म केलं तर चांगला देह मिळेल, वाईट कर्म केलं तर वाईट देह मिळेल. हा देह सोडून त्या जीवात्म्याला जावंच लागणार आहे. म्हणून कोणाचाही द्रोह केव्हाही करू नये. आपल्या कल्याणाकरता, स्वार्थाकरता कुणाचाही द्रोह करू नये. आत्ता तू हिला मारशील पण पुढच्या जन्मामध्ये तुला भय आहे. हा काही तुझा शेवटचा देह नाहीये. देवकीला मारून आपण अजरामर होऊ हा तुझा भ्रम आहे. तू आपल्या बहिणीकरता दया धारण कर आणि तिला मारू नकोस. पुष्कळ सांगितलं वसुदेवाने पण कंसावर काही परिणाम झाला नाही. मग वसुदेवाने वेगळा विचार केला. हा आत्ताचा प्रसंग टाळावा. देवकीचा मृत्यू चुकवावा. पुढे काय होईल ते पहाता येईल. वसुदेव म्हणाला,

प्रदाय मृत्यवे पुत्रान् मोचये कृपणामिमाम् ।।१०.१.४९।। श्री. भा.

देवकीला जी मुलं होतील ती याला द्यायचं कबूल करावं. आणि तिची सुटका करावी असं वसुदेवाने ठरवलं.

न हि अस्यास्ते भयं सौम्य यद् वागाहाशरीरिणी।
पुत्रान् समर्पयिष्येऽस्या यतस्ते भयमुत्थितम्।।१०.१.५४।। श्री. भा.

कंसा, आकाशवाणीनं सांगितलंय देवकीचा आठवा मुलगा तुला मारेल. म्हणजे देवकीपासून तुला धोका नाही ना ? देवकीला जीवदान दे. मी तुला वचन देतो की देवकीला झालेला प्रत्येक मुलगा मी तुला आणून देईन. तू त्याला जिवंत ठेव, मार काय वाटेल ते कर. वसुदेव सत्यवाणीकरता प्रसिद्ध होता. कंसाचा विश्वास त्याच्यावर बसला. तलवार म्यानामध्ये ठेऊन तो आपल्या वाड्यामध्ये निघून गेला. वसुदेव देवकीही आपल्या वाड्यामध्ये आलेले आहेत. पुढे देवकीला क्रमाने आठ मुलं आणि एक मुलगी झालेली आहे. पहिला मुलगा झाल्याबरोबर वसुदेवाने तो कंसाला नेऊन दिला. देवकीच्या समक्षच वचन दिल्यामुळे तिचीही मानसिक तयारी झाली होती. आपल्याला पराक्रमी मुलगा होणार आहे हे लक्षात असल्यामुळे तिची कंसाची भीती गेली होती. राजसभेमध्ये येऊन वसुदेवाने सांगितलं, राजेसाहेब, हा मुलगा आत्ताच मला झालेला आहे. कबूल केल्याप्रमाणे हा मी घेऊन आलेलो आहे. विवेक संपन्न महात्मे जे आहेत, त्यांना कोणतंही दुःख असह्य नाहीये. वसुदेवाची सत्यनिष्ठा पाहून कंसाच्या मनावरही परिणाम झालेला आहे. त्याने सांगितलं, वसुदेवा, हा मुलगा तू घेऊन जा. याच्यापासून काही मला भीती, नाही. त्यानंतर एके दिवशी नारदऋषी राजसभेत आले आणि त्यांनी सांगितलं, कंसा, गोकुळात राहाणारे सर्व गोपाल, वसुदेव, देवकीसह सर्व यादव हे सगळे देव जन्माला आलेले आहेत. तुम्ही दैत्य  सगळ्यांना जो त्रास देता त्याकरता ही सगळी व्यवस्था देवांनी केलेली आहे. भूमीला भार झालेला आहे तुमचा. आणि त्यामुळे देवांनी अशी व्यवस्था केलेली आहे. तुमचा नाश करायचा असा प्रयत्न  देवानी चालवलेला आहे. देव आलेले आहेत. अर्थात त्यांचा संरक्षक तो येणार आहे. हे सांगून नारद निघून गेले. नारदांनी त्याला थोडी कल्पनाही दिली की देवांचे अधिपती विष्णूही येणार आहेत.

कंसाने ते सगळं समजून घेतलं आणि तो प्रयत्नाला लागला. सर्व दैत्यांचा नाश होणार म्हणजे आता सर्वांनी संघटित राहिलं पाहिजे, असं त्याने ठरवलं. लगेच वसुदेव देवकीला त्याने बंदिखान्यात टाकलं. हातापायामध्ये बेड्या घातल्या. आणि जो मुलगा जन्माला येईल त्याचा नाश केलेला आहे कारण यादव कोणी जन्माला आला की तो देव आहे म्हणजे त्याचा नाश करायचा. स्वतःच्या बापाला, उग्रसेन राजालाही त्याने तुरुंगात टाकलं आणि सर्व सत्ता आपल्या हातामध्ये घेतली. शुकाचार्य सांगताहेत, राजा, अनेक दैत्य त्याला अनुकूल आहेत. कारण कसंही वागायला राजाची परवानगी आहे. अन्यायाने वागलं म्हणजे उलट, त्यांना प्रोत्साहन मिळतंय. अनेक दैत्य प्रलंबासुर, तृणावर्त इ., बाणासुर, भौमासुर, जरासंध इत्यादि राजेलोक या सर्वांचं सहाय्य आहे. एकाही यादवाला जिवंत ठेवायचं नाही कारण हे सगळे देव आहेत. सर्व यादवांना त्रास द्यायला

कंसाने सुरुवात केली. यादवांनी मथुरेतील घरंदारं सोडली आणि दुसऱ्या प्रान्तात ते रहायला गेले. काही यादव कंस सांगेल तसं राहून अनुकूल रितीने तिथेच राहिले. देवकीची सहा मुलं त्याने मारली. सातवा गर्भ म्हणजे भगवान शेष त्या देवकीच्या उदरामध्ये आलेले आहेत. यादवांना कंसाची भीती उत्तरोत्तर वाढत चाललेली आहे. भगवंतांनी योगमायेला आज्ञा केली, गोकुळामध्ये वसुदेवाची आणखी एक पत्नी रोहिणी राहातेय. देवकीच्या उदरातला गर्भ रोहिणीच्या उदरात नेऊन ठेव म्हणजे मी लवकरच देवकीच्या उदरात अवतीर्ण होईन. तू ही नंदपत्नी यशोदेच्या पोटी जन्म घे.अनेक नावं दुर्गा, भद्रकाली, वैष्णवी अशी तुला प्राप्त होतील. नारायणी, शारदा वगैरे नावांनी तू ओळखली जाशील. सर्व उपचार तुला अर्पण करतील. तो गर्भ आकर्षण तू करून नेल्यामुळे त्याला संकर्षण म्हणतील. सर्वांना आनंद देणारा तो असल्यामुळे त्याला राम म्हणतील अथवा बलराम असंही म्हणतील.

भगवंतांची आज्ञा झाल्याबरोबर मायेला काय अशक्य आहे. तिने इकडचा गर्भ तिकडे नेऊन ठेवला. देवकीचा गर्भपात झाला अशी सर्व लोकांची कल्पना झालेली आहे. भगवान श्रीहरींनी वसुदेवाच्या मनात प्रवेश केला, सूक्ष्मरूपाने. वसुदेवाचं सर्वांग तेजोमय दिसू लागलेलं आहे आणि त्याचे ते तेज देवकीच्या शरीरामध्ये प्रविष्ट झालं.

दधार सर्वात्मकमात्मभूतं।
काष्ठा यथाऽऽनन्दकरं मनस्तः ।।१०.२.१८।। श्री. भा.

शुक सांगतात, राजा, वसुदेव देवकी दोघेही मनाने भगवंताचं चिंतन करताहेत. मनानेच ते तेज देवकीने धारण केलं. ती गर्भिणी झालेली आहे. तो कंस सारखा चौकशीला येऊन जातोय. कारागृहाला कुलपं घातलेली आहेत. किल्ल्या आपल्याजवळ ठेवलेल्या आहेत. पहारेकऱ्यांवर विश्वास नाही. देव आता आलेले आहेत. काय करतील याचा नियम नाही. एके दिवशी त्या देवकीला पाहण्यासाठी कंस आलेला आहे. अत्यंत तेजस्वी ती दिसते आहे. माझा नाश करणारा हिच्या उदरात आलेला आहे हे कंसाला उमगलं. मी जिवंत राहिलं पाहिजे. माझे अनुयायी जिवंत राहिले पाहिजेत. त्याकरता या देवकीलाच आता मारून टाकलं म्हणजे काम झालं. वसुदेवाने केलेला सर्व उपदेश केला फुकट गेलेला आहे. देहाचा अभिमान इतका आहे की मीच मोठा आहे. माझा प्राण मी जाऊ देणार नाही. देवकीला मारून टाकल्यावर हा मुलगाही मरेल आणि माझा प्राण वाचेल. असा एक भयंकर विचार कंसाच्या मनात आला. पण हे जे नास्तिक किंवा

नीरीश्वरवादी लोक असतात त्यांना आपली कीर्ति व्हावी अशी इच्छा असते. लोकांनी आपल्याला चांगलं म्हटलं पाहिजे. त्यामुळे कंसाला वाटलं की मी जर या गर्भिणी स्त्रीला जी माझी बहिणही आहे, तिला मारलं तर माझी अपकीर्ति होईल. सर्व लोक माझी निंदा करतील. त्यामुळे त्याने वाट पहायची ठरवलं.

आस्ते प्रतीक्षंस्तज्जन्म हरेर्वैरानुबन्धकृत् ।।१०.२.२३ ।। श्री. भा.

पूर्वीपासूनच ते वैर आलेलं आहे. पूर्वी कालनेमी म्हणून राक्षस होता. त्याचा नाश भगवान विष्णूंनी केला. तोच हा कंस म्हणून जन्माला आलेला आहे.त्या कंसाला, आपला शत्रू म्हणून का होईना सारखा ध्यास लागलेला आहे. सभेमध्ये बसला असताना, जेवत असताना, फिरत असताना सर्वदा आपला वैरी श्रीहरीचंच चिंतन तो करतोय. जन्माला आला काय, मला मारणार आहे, अशी सारखी भीती आहे.

त्या कारागृहात देवकीच्या उदरात श्रीहरी आलेले पाहून, सर्व ब्रह्मादिक देव त्याठिकाणी आलेले आहेत. त्या सर्व देवांनी गर्भस्थ भगवान श्रीहरींची स्तुति केलेली आहे. सत्यमूर्ती परमात्मा आपण आहात. त्रिकालाबाधीत आपलं स्वरूप आहे. विकाररहित आहे. आपल्याला आम्ही शरण आलेलो आहोत.

बिभर्षि रूपाणि अवबोध आत्मा ।
क्षेमाय लोकस्य चराचरस्य ।
सत्वोपपन्नानि सुखावहानि ।
सतां अभद्राणि मुहुः खलानाम् ।।१०.२.२९ ।। श्री. भा.

भगवान आपली सत्वप्रधान सर्व रूपं, सर्व विश्वाचं कल्याण व्हावं, संरक्षण करावं याकरता आहेत. दुर्जनांचा नाश सुद्धा त्यांच्या कल्याणाकरताच आहे. दुर्जनांचा नाश केल्यामुळे जास्तीत जास्त दुर्विचार निर्माण होऊन पुढे होणारा अध:पात तरी टळतो. तेव्हा आपली ही सर्व सात्विक रूपं सज्जनांना अत्यंत आनंद देणारी आहेत. आणि दुर्जनांना मात्र ही अमंगलरूप वाटतात. ते आपल्याकडे शत्रूरुपाने पहातात. हा अवतारही आपण विश्वरक्षणाकरताच घेऊन आलेले आहात. आम्ही आपल्याला वंदन करतो. देवकीचंही समाधान केलं ब्रह्मदेवांनी, आई, हा प्रत्यक्ष वैकुंठपती परमात्मा तुझ्या उदरात आलेला आहे. तुला भिण्याचं काही कारण नाही. कंसाची भिती अजिबात बाळगू नकोस. त्याचं मरण जवळ आलेलं आहे. सर्व देवमंडळी नंतर आपापल्या स्थानाला निघून

गेली.

शुक सांगतात राजन,

अथ सर्वगुणोपेतः कालः परमशोभनः ।

यर्ह्येव अजनजन्मर्क्षं शान्तर्क्षग्रहतारकम् ।।१०.३.१।। श्री. भा.

गोपालकृष्णांचा जन्मसमय प्राप्त झालेला आहे. अष्टमीचा दिवस. मध्यरात्रीचा समय झालेला आहे. जन्म नक्षत्र रोहिणी आहे. आकाश निरभ्र आहे. सगळीकडे प्रसन्न, शांत वातावरण आहे. नद्यांचं जलही प्रशांत आहे. सुगंधी वायू मंद मंद वाहतो आहे. द्विजांच्या गृहामध्ये असणारे अग्नीसुद्धा शांत आहेत. सर्व साधूंची अंत:करणं प्रसन्न आहेत. असा तो काल आहे. भगवान येणार यामुळे जिकडेतिकडे आल्हाददायक वातावरण आहे. अशा रितीने मध्यरात्रीचा समय झालेला आहे.

देवक्यां देवरूपिण्यां विष्णुः सर्वगुहाशयः ।

आविरासीद् यथा प्राच्यां दिशीन्दुरिव पुष्कल: ।।१०.३.८।। श्री. भा.

भगवान गोपालकृष्ण हे त्या देवकीच्या उदरातून बाहेर प्रगट झालेले आहेत.

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव।

प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ ।

मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।।

तमद्भुतं बालकमम्बुजेक्षणं

चतुर्भुजं शङ्खगदार्युदायुधम्

श्रीवत्सलक्ष्मं गलशोभिकौस्तुभं

पीताम्बरं सान्द्रपयोदसौभगम् ।।१०.३.९।।श्री. भा.

आरंभाला भगवंताने चतुर्भुज रूप घेतलं. पीतांबर नेसलेलं आहे. शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेलं आहे. किरीट कुंडलं घातलेली आहेत. केशभार पाठीवर रूळतो आहे. अशा प्रकारचं ते दिव्य रूप पहायला मिळालं. किती पुण्य आहे, वसुदेव देवकीचं! तर संसारात असताना नुसतं पुत्ररूपाने नाही तर सगुण साक्षात्कार त्यांना झालेला आहे. कृष्णजन्म झाल्यामुळे अत्यंत आनंद झाला, वसुदेवांना आणि त्यांनी मनाने दहा हजार गाईंचं दान देण्याचा संकल्प केला, कारण तुरुंगामध्ये आहेत. प्रत्यक्ष दान करता येत नाही पण मनाने केव्हा आपण मोकळे झालो तर करू

म्हणाले. वसुदेवाने स्तुति केलेली आहे.

विदितोऽसि भवान् साक्षात् पुरुषः प्रकृतेः परः ।
केवलानुभवानन्दस्वरूपः सर्वबुद्धिदृक्।। १०.३.१३ ।। श्री. भा.

भगवंता, प्रकृतिचंही नियंत्रण करणारे आपण आहात. केवल सच्चिदानंदरूप आपण आहात. आणि सर्वांच्या बुद्धीचे द्रष्टे आहात. सर्वसाक्षी आपण आहात. आपल्या मायाशक्तीने हे सर्व त्रिगुणात्मक जगत आपण निर्माण केलंत. अप्रविष्ट आपण आहात कारण पूर्वीपासूनच आपण आहात. पण जगत निर्माण झाल्यावर आपण त्यात प्रविष्ट झालात. सर्वांना चेतना आली. सर्व सक्रीय झालेले आहेत. बुद्धि आणि इंद्रियं यांच्या कार्यावरून आपल्या प्रेरक शक्तीचं अनुमान करता येतं. आपल्याला कोणतंही आवरण नाहिये. सर्वात्मरूप आपण आहात. सर्व गुणांमधे सम्मिलीत असतानासुद्धा आपल्याला त्याची बाधा होता नाही. सर्व विश्व हे आपल्यापासून उत्पन्न होतं, आपणंच त्याचं संरक्षण करता आणि आपणच त्याचा उपसंहार करता.

वदन्ति अनीहात् अगुणात् अविक्रियात् ।।१०.३.१९ ।। श्री. भा.

असे आपण असताना उत्पत्ती, स्थिती, लय आपल्यापासून होतात असं लोक समजतात. वास्तविक आपण तटस्थ आहात. आपला कशाशीही संबंध नाही. परंतु जगाची उत्पत्ती, स्थिती, लय हे समजून येत असताना त्याच्या कर्त्यापर्यंत बुद्धि पोचण्याकरता शाखाचंद्रन्यायाने हे लक्षण उपयोगी पडेल. त्रैलोक्याच्या रक्षणाकरता आपण हे सत्वरूप धारण करता. रजोगुणयुक्त स्वरूप आपण उत्पत्तीकरता धारण करता. तमप्रधानरूप आपण संहाराकरता धारण करता. आपण माझ्या गृहात अवतार घेऊन आलात ते सर्व लोकांच्या रक्षणाकरता आला आहात. वेगवेगळ्या राजांच्या रूपाने हे जे असुर आलेले आहेत यांचा आपण नाश करा आणि भूमीभार हलका करा. या कंसाने आपल्या पूर्वीच्या बंधूंना ठार मारलेलं आहे. आपण जन्माला आला हे समजल्यावर तो शस्त्र घेऊन लगेच इकडं येईल. देवकीलाही मोठा आनंद झाला ते रूप पाहून. तीही मोठी विचारशील होती. त्याकाळी श्रवणभक्ति सगळ्यांनाच घडायची. नारदादिक मोठेमोठे ऋषी नेहमी यायचे आणि त्यांच्याबरोबर विचार विनिमय करून वेगवेगळे सिद्धांत ऐकायला मिळायचे आणि मुळातच सात्विक बुद्धी असल्यामुळे ते विचार दृढ व्हायचे. देवकीची स्तुतीसुद्धा वेदांतपूर्ण आहे.

रूपं यत् तत् प्राहुरव्यक्तमाद्यं
ब्रह्म ज्योतिर्निर्गुणं निर्विकारम् ।

सत्तामात्रं निर्विशेषं निरीहं।

स त्वं साक्षाद् विष्णुरध्यात्मदीपः ।।१०.३.२४।। श्री. भा.

निर्गुण निराळं, सगुण निराळं असं नाहीये. अव्यक्त रूप जे आहे. ब्रह्म ज्याला म्हणतात, निर्गुण, निराकार, निर्विकार, स्वयंप्रकाश जे रूप आहे. क्रिया नाही, गुण नाही. तेच रूप आत्मज्योतीरूप आपणच श्रीविष्णू आहात. दोन परार्ध इतकं ब्रह्मदेवांचं आयुष्य संपल्यानंतर सर्व महाभूतांचा विलय होतो आहे. सर्व त्रैलोक्याचा विलय होतो. पण आपण फक्त एकटे शिल्लक राहता म्हणून शेष म्हणतात, आपल्याला. हा जो सर्वांना अव्यक्ताकडे नेणारा काल आहे तो आपलंच रूप आहे. मृत्यूच्या भीतीने सर्व लोक हे कालापासून पळून जाण्याचा प्रयत्न करतात. ज्यावेळी ते लोक आपल्या चरणाजवळ आपल्याच इच्छेने येऊ शकतील तेव्हा ते मृत्यूच्या भीतीतून मुक्त होतील. देवा, या कंसापासून आम्हाला फार त्रास होतो आहे. आपलं हे चतुर्भुज रूप ध्यान करण्याला योग्य आहे. बघितल्याबरोबर अंतःकरण स्थिर झालंच पाहिजे. असं ध्यानाला योग्य असं रूप लोकांनी पाहू नये अशी माझी इच्छा आहे. आपण जन्माला आलो हे त्या कंसाला समजू नये. देवा, मला फार भीती वाटती आहे. तेव्हा हे आपलं दिव्य रूप आपण अदृश्य करा आणि सामान्य बालकाचं रूप धारण करा.

भगवान सांगतात, देवकी, स्वायंभुव मन्वंतरामध्ये पूर्वी तू पृश्नि म्हणून जन्माला आली होतीस आणि वसुदेव हा सुतपा नावाचा प्रजापती होता. ब्रह्मदेवांच्या आज्ञेप्रमाणे उत्तम संतती होण्याकरता सर्व इंद्रीयं, मन यांचा संयम करून तुम्ही पुष्कळ वर्ष तपश्चर्या केली. थंडी, वारा, ऊन वगैरे सगळं सहन केलंत. प्राणनिरोध करून मनाची शुद्धी केलेली आहे. काही दिवस झाडावरून खाली पडलेली पानं भक्षण केलीत. काही दिवस कुंभक करून प्राणनिरोध केला. माझी कृपा व्हावी, वर मिळावा म्हणून माझी आराधना तुम्ही केली. देवांची बारा हजार वर्षं इतकी तपश्चर्या तुम्ही केली. माणसांचं एक वर्ष म्हणजे देवांचा एक दिवस! संतुष्ट होऊन याच रूपाने मी तुम्हाला दर्शन दिले. तुम्ही माझ्यासारखा मुलगा व्हावा हा वर मागितला. विषय त्याग केलेला आहे, आणि संतती नाही त्यामुळे संसारात तुमची वासना पुष्कळ अडकली होती. म्हणून तुम्ही मोक्ष न मागता मुलगा मागितला. मी तो वर तुम्हाला दिला. त्या जन्मात मी तुमचा मुलगा झालो, पृश्निगर्भ नावाने. तुमचा दुसरा जन्म म्हणजे कश्यप आणि अदिती. त्यावेळीही मी तुमचा मुलगा उपेंद्र किंवा वामन नावाने झालो. आता हा तुमचा तिसरा जन्म आहे. ह्या जन्मामध्येसुद्धा मी तुमचा मुलगा झालो आहे. हे रूप तुम्हाला पूर्वजन्माचं स्मरण व्हावं म्हणून दाखविलंय.

युवां मां पुत्रभावेन ब्रह्मभावेन चासकृत् ।
चिन्तयन्तौ कृतस्नेहौ यास्येथे मद्गतिं पराम् ।।१०.३.४५ ।। श्री. भा.

मला मुलगा समजा किंवा परब्रह्म समजा, कोणत्याही भावनेनं माझ्याकडं पाहिलं असता तुम्हाला गती प्राप्त होईल. तुम्ही मुक्त व्हाल. याप्रमाणे भगवंतांनी सांगितलं आणि लगेच सामान्य बालकाप्रमाणे रूप धारण केलं आहे. वसुदेवाला काय सांगायचंय ते त्यांनी सांगितलेलं आहे.

भगवत्प्रचोदितः ।। १०.३.४७ ।।

त्या मुलाला वसुदेवाने आपल्याजवळ घेतलं. याला आता गोकुळात नेऊन ठेवायचं. भगवंतांनीच सांगितलं होतं. भगवंतांचा जन्म झाला त्याचवेळी गोकुळात यशोदेच्या पोटी योगमायेने जन्म घेतला. त्यामुळे सगळ्या लोकांना गाढ झोप लागलेली आहे. अव्यक्त रूपात असताना ती मायाशक्ति किती मोहात टाकते. आता तर व्यक्त रूपात आलेली आहे. सर्व पहारेकरीही गाढ झोपले. तुरुंगाचे सगळे दरवाजे उघडले गेले. मायेला नुसता जन्म घ्यायला सांगितला नव्हता. ही सगळी व्यवस्था त्या मायेमुळेच झाली आहे. जोराचा पाऊस सुरू झाला. शेष भगवानाने भगवंताच्या डोक्यावर फणा धरला आणि वसुदेव गोकुळात जायला निघाले. यमुनानदीला मोठा पूर आलेला आहे. वर्षा ऋतु होता. वसुदेव यमुनेजवळ आल्याबरोबर यमुनेचं पात्र दुभंगलं आणि त्या रस्त्याने वसुदेव पलिकडे आले. गोकुळामध्ये आले. तिथेही सर्व गाढ झोपलेले आहेत. नंदाच्या वाड्यामध्ये ते गेले. यशोदेच्या अंतगृहात ते गेले. तिलाही झोप लागलेली आहे. आणि नुकतीच जन्मलेली एक मुलगी त्या ठिकाणी पडलेली आहे. त्याचं काहीही भान यशोदेला नाहिये. आणलेला मुलगा वसुदेवाने यशोदेजवळ ठेवला आणि ती मुलगी घेऊन ते निघाले. परत त्या रस्त्याने यमुना पार करून तुरुंगात आले. पहारेकरी अजूनही झोपलेलेच होते. दरवाजेही उघडे होते. आणि देवकीच्या स्वाधीन ती मुलगी केली. इतकी व्यवस्था होऊन गेली. आठवा मुलगा जन्माला येणार हे देवकीच्या लग्नापासून कंसाला माहिती आहे. त्यावेळेपासून त्याचे प्रयत्न चालू आहेत. शेवटी मुलगा झाला, दुसरीकडे गेला. काहीही कंसाला कळलं नाही.

बहिरन्तः पुरद्वारः सर्वाः पूर्ववदावृताः ।।१०.४.१ ।। श्री. भा.

तुरुंगाचे दरवाजे पूर्वीप्रमाणे झाकले गेले. ती मुलगी रडायला लागली. पहारेकऱ्यांनी तातडीने ती बातमी कंसाला सांगितली. तो एकदम उठला आणि धावतच तिथं आला. हा माझा काल आहे म्हणाला. पहातो आहे, देवकीने आपल्या हृदयाजवळ त्या अपत्याला धरलं आहे.

स्नुषेयं तव कल्याण स्त्रियं मा हन्तुमर्हसि ।।१०.४.४ ।। श्री. भा.

देवकी म्हणतीयं, बाबा, ही एवढी शेवटची मुलगी तरी माझ्याजवळ राहू दे. बाकीची मुलं मारलीस तू. ही तुझी सून समज. मारू नकोस.

त्वया दैवनिसृष्टेन पुत्रिकैका प्रदीयताम् ।।१०.४.५ ।। श्री. भा.

कंसाला ते काही खरं वाटेना. हा मुलगाच असला पाहिजे. ही काहीतरी बतावणी करून मला फसवतेय अशीच त्याची समजूत आहे. त्याने त्या मुलीला हिसकावून घेतलं आणि तिला शिळेवर आपटून मारण्याकरता वरती उचललं तेव्हा त्याच्या हातातून निसटून ती मुलगी अवकाशात गेलेली आहे. देवीच्या रूपात ती प्रगट झाली. अष्टभुजा देवी आहे. भगवंताची बहीण आहे ती. दिव्य शस्त्रं धारण केलेली आहेत तिने. अनेक सिद्ध मुनी तिची स्तुती करताहेत. ती देवी कंसाला सांगतीय,

किं मया हतया मन्द जातः खलु तवान्तकृत् ।।१०.४.१२ ।। श्री. भा.

काय कंसा, मला मारून काय करणार आहेस तू? तुला ठार मारणारा हा जन्माला आलेला आहे हे लक्षात ठेव. व्यर्थ मुलांची हत्या करू नकोस.काय मिळालं तुला मुलं मारून ? देवकीला इतका त्रास दिलास, दुःख दिलंस. याप्रमाणे सांगून ती देवी आकाशमंडलात राहिलेली आहे.

देवीने मुलगा जन्माला आला ते सांगितलं पण कुठे आला ते काही सांगितलं नाही. खरं बोलायचं संदिग्ध पण ते खोटंही ठरता कामा नये. देवांची पद्धती आहे. त्या देवीचं भाषण कानावर पडल्यावर कंसाच्या मनावर परिणाम झाला. व्यर्थ म्हणाला मुलं मारली. लगेच वसुदेव देवकीच्या पायातील बेड्या काढल्या आणि त्यांच्या पायावर मस्तक ठेवलं. आकाशवाणीवर विश्वास ठेवून तुमची मुलं व्यर्थ मी मारली. देवकीला तर आठवी मुलगीच झाली. आकाशवाणीनं देवांनी सांगितलं ते मी खरं समजलो. देवसुद्धा काय खोटं बोलायला लागले काय ? माझ्याहातून फार मोठं पाप घडलेलं आहे. कोणत्या नरकाला मला जावं लागेल काही कल्पना नाही. पश्चाताप होऊन बोलतोय. वसुदेवाने त्याचं सांत्वन केलं. कंसा, आमचंही प्रारब्ध आहे. आम्हाला पुत्रशोक व्हायचा होता. तू फक्त निमित्त आहेस. देवकीच्याही मनातला राग निघून गेलेला आहे. सर्वजण आपापल्या वाड्यामध्ये निघून गेले.

सकाळ झाल्यानंतर प्रात:कालीन सभेमध्ये सर्व दैत्य जमले आणि कंसाने त्यांना रात्री घडलेली हकीकत सांगितली. तो सांगतोय माझ्या भीतीनं देवांनी आपला विचार बदललेला



दिसतोय. देवकीला आठवा मुलगा व्हायच्या ऐवजी मुलगीच झाली. अज्ञानामुळेसुद्धा अहंकार कायम रहातो. त्या मुलीनं सांगितलं की माझा शत्रू जन्माला आलेला आहे. आता तो कसा सापडायचा ? बाकीचे अनुयायी असुर म्हणाले, राजेसाहेब, देवांना किती प्रयत्न करायचा तो करू द्या. आम्ही असं ठरवलंय की गेल्या दहा दिवसात जितकी मुलं जन्माला आली असतील ती सगळी मारून टाकायची. त्यात तुमचा शत्रू मारला जाईल का नाही ? पण कोणत्या ठिकाणी जन्माला आलेला आहे तो मुलगा हे कसं कळणार ? पण एकच्छी विचार आहे. आम्ही मुलं मारून टाकणार आणि त्यात राजेसाहेबांचा शत्रूही मरणार. मग राजेसाहेब अमर होणार. कंसाला हे ऐकून आनंद झाला, त्याने असुरांना आज्ञा केली आणि साधूजनांना त्रास देण्यास सांगितलं.

सतां विद्वेषमाचेरुः आरात् आगतमृत्यवः ।।१०.४.४५।। श्री. भा.

आचार्य महाराज सांगताहेत. त्यांचा मृत्यू जवळ आल्यामुळे त्यांना अशी बुद्धी झाली.

गोकुळामध्ये सकाळ झाल्यानंतर नंदाला वार्ता समजली की यशोदेला मुलगा झाला. आनंद झाला. वेदज्ञ ब्राह्मणांना त्याने बोलावलं. स्नान करून अलंकृत झाला आणि स्वस्तिवाचन करून आपल्या मुलाचं जातकर्म त्याने केलं. देवांचं, पितरांचं अर्चनही झालेलं आहे. दोन लक्ष गाईंचं दान त्याने केलेलं आहे. किती गोधन होतं भारतवर्षामधे. सात पर्वतप्राय तिळाचे ढीग त्याने केले. उत्तम भरजरी वस्त्रं त्यावर टाकून त्यांचंही दान केलेलं आहे, पुत्रमंगल होण्याकरता. ब्राह्मणांनीही आशिर्वाद दिलेले आहेत. सर्वत्र ध्वज, पताका वगैरे लावलेल्या आहेत. गोकुळातल्या लोकांना आनंद झाला की आपल्या राजाला मुलगा झाला. सर्व गोपाल, गोपी हे यशोदेचा मुलाला पहाण्याकरता नंदाच्या वाड्याकडे निघाले आहेत. दही, दूध, लोणी वगैरे एकमेकांच्या अंगावर फेकताहेत. रस्त्यावर त्याचाच चिखल झालेला आहे. वैकुंठपति भूलोकावर अवतार घेऊन आल्यानंतर भगवती रमादेवी ही ही त्या गोकुळामध्ये येऊन राहिलेली आहे.

हरेर्निवासात्मगुणै रमाक्रीडमभून्नृप ।।१०.५.१८।। श्री. भा.

असे काही दिवस गेले. नंद कंसाचा मांडलिक राजा होता. त्याला वार्षिक कर द्यावा लागे. म्हणून काही गोपालांना गोकुळात संरक्षणासाठी ठेऊन नंद मथुरेत आला. राजवाड्यामध्ये जाऊन

नेहमीप्रमाणे खंडणी दिली. लोणी, तूप हेही दिलेलं आहे. वसुदेवाला आपला मित्र नंद आलेला आहे हे समजलं. वसुदेव त्याला भेटायला आले. दोघांची भेट झाली, आनंद झाला. वसुदेवाने सांगितलं, या वयामध्ये मुलाची आशा नव्हती. पण तुला मुलगा झाला ही चांगली गोष्ट झाली. आणि तुझी भेट झाल्यामुळे मला अतिशय आनंद झालेला आहे. प्रिय मित्रांची भेट होणं, एका जागी राहणं हे फार कठीण असतं. उद्योगाच्या निमित्ताने इकडे तिकडे जावं लागतं. तुझ्या गोकुळामध्ये सर्व स्त्री-पुरूष, गाई वगैरे सुखी आहेत ना? जनावरांना गवत वगैरे मिळतं का नाही? सर्व समृद्धी आहे ना? माझा एक मुलगा बलराम तुझ्या आश्रयाने राहतो आहे. नंद म्हणाला, वसुदेवा, तुमची सर्व मुलं कंसाने मारली. शेवटी एक मुलगी झाली ती ही आकाशात गेली. सर्व जीव हे अदृष्टाधीन आहेत. सुखदुःख हे अदृष्टाने त्यांना भोगावी लागतात. तू ही मोठा विवेकी आहेस. देवकीचंही समाधान तू कर आणि तूही स्वस्थचित्त रहा. वसुदेवाने सांगितलं नंदा, आता इथं फार काळ राहू नका. लवकरात लवकर गोकुळात पोहोचा. नंदाला कळेना वसुदेव असं का म्हणाला? असं कोणतं संकट गोकुळावर येणार आहे?

त्याचवेळी इकडे गोकुळामधे एक विलक्षण घटना घडली.

कंसेन प्रहिता घोरा पूतना बालघातिनी।
शिशूंश्चचार निघ्नन्ती पुरग्रामव्रजादिषु ।।१०.६.२।। श्री. भा.

त्या दैत्यांच्या सभेमध्ये ठरलं होतं की जन्माला आलेली सर्व मुलं मारायची. कंसानेही त्यांना अनुमती दिली. पापाचा घडा पूर्ण भरला पाहिजे. तशीच बुद्धी व्हायची आणि शेवटी नाश व्हायचा. देव काही आपल्यावर घेत नाहीत. तुमच्या पापाचं फळ तुम्हाला मिळतं. पूतना नावाची राक्षसी गावोगाव हिंडते आहे. तिने चौकशी करावी, कुठे कुठे नवीन मुलं जन्माला आलेली आहेत आणि त्यांचा नाश करावा. मुलं कशी मरायची हे कळायचं सुद्धा नाही. कारण राक्षस हे मोठे मायावी असतात. कुठलंही रूप ते घेऊ शकतात. अदृश्य रूपाने जाऊ शकतात. गोकुळामध्ये ती पूतना आली आणि यशोदेला मुलगा झाला असं तिला समजलं. भगवतकथा श्रवण, संकीर्तन चाललेलं असताना जिथे राक्षसींचं, दुर्जनांचं काही चालत नाही तिथे प्रत्यक्ष भगवान असताना राक्षसांचं बळ काय पुरं पडणार आहे? पूतना राक्षसीनं एका श्रीमंत बाईचं रूप घेतलं. यशोदेच्या वाड्यामध्ये ती आली. काही गोपी बसलेल्या आहेत. यशोदा मुलाला स्तनपान करवते आहे. ही आत आल्याबरोबर गोपींनी तिचं रूप पाहिलं. भरजरी वस्त्र आहे, दागदागिने आहेत आणि कुणी मोठ्या घरची बाई

असावी असं वाटून तिला अगदी आदराने बसायला आसन दिलं. एकदम त्या बाईनं यशोदेच्या मांडीवरचा मुलगा आपल्या मांडीवर घेतला. दिसायला जरा चमत्कारिक दिसलं. यशोदा रागावली नाही. बाई मोठी प्रेमळ दिसतीयं म्हणाली. घेऊ दे. पूतनेने आपला विषयुक्त स्तन श्रीहरींच्या मुखात दिला. आल्याबरोबर तिला एकदा पाहून घेतलं देवांनी. श्रीमन्महागणाधिपतये नमः । आरंभ आता हिच्यापासूनच करायचा म्हणाले. डोळे मिटून घेतले. विष शोषून घेतलं. दूध संपलं आणि रक्त शोषायला आरंभ झाला. मग मात्र ती पूतना कासावीस झाली. सोड सोड म्हणती आहे. आता कुठली सुटका. आजपर्यंत अनेक बालकांचा नाश तू केलेला आहेस. त्यापैकीच एक मला समजून तू आलीस. आता मी सोडणार नाही. तिला अत्यंत क्लेश होऊ लागले. ती रडू लागली. ओरडू लागली. तिचा तो भयंकर आवाज सगळीकडे पसरलेला आहे. आणि ती वाड्याच्या बाहेर आली आणि आपल्या मूळ रूपात येऊन गतप्राण होऊन पडलेली आहे.

पतामानोऽपि तद्देहस्त्रिगव्यूत्यन्तरद्रुमान् ।
चूर्णयामास राजेन्द्र महादासीत्तदद्भुतम् ।।१०.६.१४ ।। श्री. भा.

पूतना राक्षसीचा देह केवढा होता हे आचार्य महाराज सांगताहेत. तो देह खाली पडताना बरीच झाडं मोडून पडली. सहा कोस लांब इतका तिचा देह होता. केवढं सकटं आलेलं आहे गोकुळावर. त्या सर्व गोपी शोधताहेत. त्या राक्षसीच्या छातीवर तो बालक पडलेला आहे. त्याला उचलून घेऊन, घरात आणलं, गोमूत्राने स्नान घातलं. गाईच्या चरणाचे रजःकण अंगारा म्हणून त्याला लावलेले आहेत. आणि अंगन्यास, करन्यास करून कवचपठणाला त्यांनी सुरवात केली. भगवानच सर्वरक्षक आहेत ही भावना आहे. अदृष्ट हे कारण मानावं लागतं. पण सहकारी कारणांमधे जर अदृष्ट हे प्रधान कारण ठरलं तर सर्वही घटना अदृष्टाने घडतात असं लक्षात येईल. पण अदृष्टाकडे लक्षच जाईनासं झाल्यामुळे सर्व दृश्य उपाय तेवढे फलदायी आहेत अशीच वृत्ती होते. फल मिळालं नाही तरी पुन्हा दृष्ट उपाय करायचे आणि त्यानेच फळ मिळवायचं ही बुद्धी काही शेवटपर्यंत जात नाही. अनेक ऋषिमंडळींनी गोकुळात यावं. त्यांनी कवचादिसाधनं त्यांना सांगावी आणि त्यामुळे आपलं रक्षण होतं अशी श्रद्धा लोकांची होती.

अव्यादजोऽङ्घ्रि मणिमांस्तव जान्वथोरू
यज्ञोऽच्युतः कटितटं जठरं हयास्यः ।
हृत् केशवस्त्वदुर ईश इनस्तु कण्ठं
विष्णुर्भुजं मुखमुरुक्रम ईश्वरः कम् ।।१०.६.२२ ।। श्री. भा.

ईश्वराची अनेक रूपं आहेत आणि अनेक नावं आहेत. ही सगळी या कवचाच्या रूपाने त्यांना माहिती आहे. त्या त्या रूपाला धारण करणारा त्या त्या नावाचा जो परमात्मा आहे त्याने या बालकाच्या एकेक अवयवाचं रक्षण करावं. अज परमात्म्याने याच्या चरणाचं रक्षण करावं, मणिमान् जो आहे त्याने याच्या जानूचं आणि उरूचं रक्षण करावं, अच्युताने कटीचं रक्षण करावं, हयग्रीवांनी जठराचं रक्षण करावं, अशी प्रार्थना करावी. सर्व अवयवांचं रक्षण करायला औषधासारखाच हा शास्त्रीय प्रयत्न आहे.

प्राणान् नारायणोऽवतु ।।१०.६.२४ ।। श्री. भा.

नारायणाने ह्याच्या प्राणांचं रक्षण करावं. जमिनीवर असताना रक्षण करावं, उचलून घेतलं असताना रक्षण करावं. खेळत असताना गोविंदाने रक्षण करावं. निजलेला असताना माधवाने रक्षण करावं, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच्च ह्या सर्वांपासून आमच्या बालकाचं रक्षण परमेश्वराने करावं अशी प्रार्थना अत्यंत प्रेमाने, गोपींनी केली. यशोदेने त्याला स्तनपान केलेलं आहे आणि पाळण्यामध्ये निजवलं. तेवढ्यात नंदादिक गोपाल परत आले. आल्याबरोबर त्यांना तो सगळा प्रकार कळला. बाहेर पडलेला तो राक्षसीचा प्रचंड देह दिसला. नंद म्हणाला, वसुदेवाला हे समजलं म्हणजे मोठा योगी दिसतोय. गोपालांनी त्या राक्षसीच्या देहाचे तुकडे करून एक मोठा ढीग केला आणि त्याला अग्नी दिलेला आहे. त्याचा जो धूर निघालेला आहे त्याचा सुगंध सगळीकडेपसरलेला आहे. भगवान श्रीकृष्णांनी जिचं स्तनपान केलं त्या राक्षसीचं शरीरही पवित्र होऊन गेलेलं आहे. देवाच्या हातून मृत्यू आल्यामुळे त्या राक्षसीला सद्‌गती मिळालेली आहे. पुनर्जन्माला गेलीही असेल, पण चांगली बुद्धी घेऊन गेली असेल. जन्मभर चांगली बुद्धी होण्याचा प्रयत्न करावा, असं संतमहात्मे सांगतात. इथं देवाच्या स्पर्शाने तिची बुद्धी चांगली होऊन ती सद्‌गतीला गेली. कैवल्य देणारे श्रीहरी त्यांनी सर्व गोपींचही दुग्धपान करून त्यांना मुक्त केलेलं आहे. भगवान गोपालकृष्णांवर अत्यंत प्रेम करणारे गोकुळातले सर्व स्त्री, पुरुष यांचा अज्ञानामुळे होणारा सर्व संसार भगवंताच्या संगतीमुळे संपलेला आहे. सर्व लोकांना ही बातमी समजली पण त्या पूतना राक्षसीचा नाश कोणी केला हे काही कुणाला कळलं नाही. बालकापासून राक्षसीचा नाश झाला हे कदाचित त्या असुरांना समजलं असेल. मुलाच्या शक्तीची कल्पना नाहिये. मुलाचं स्वरूप पाहून ईश्वर भावना होऊ शकत नाही. हे मायेचं मोठं आवरण आहे.

शुकाचार्य पुढे चरित्र सांगताहेत. मुलगा एका अंगावर वळू लागला आहे. यशोदेनं जन्म नक्षत्र

पाहिलं, सगळ्या स्त्रियांना बोलावलं आहे. ब्राह्मणांना बोलावलं.स्वस्तिवाचन केलं. तिने ब्राह्मणांना अन्न, वस्त्रं, धेनू सगळी दानं केली आहेत. आलेल्या सर्व लोकांचा सत्कार करण्याकडे ती निमग्न झेलेली आहे. एका गाडीला पाळणा बांधला होता. त्याच्यात मुलाला झोपवून यशोदा आपल्या कामात गर्क झाली. भगवान जागे झाले. भूक लागलेली आहे. एकदम त्यांनी लाथ मारली आणि तो गाडा उलटलेला आहे. शकटासुर म्हणून कोणी आला होता म्हणतात. यात तो उल्लेख नाही. सगळे लोक घाबरले. त्या गाड्यातील भांडीकुंडी खाली पडली. सर्व मंडळी तिथे जमा झाली. तिथे काही लहान मुलं खेळत होती. त्यांनी सांगितलं हा मुलगा रडत होता, त्याने लाथ मारली म्हणून ही गाडी पडली. हे खरं कुणाला वाटेल. लहान मुलाने लाथ मारली आणि एवढं सामान भरलेली गाडी उलटली? सांगणाराही लहान आहे त्यामुळे त्यांचा विश्वास काही बसला नाही. आता सांगणारा लहान आहे का हे लहान आहेत?

अप्रमेयं बलं तस्य बालकस्य न ते विदुः ।।१०.७.१०।। श्री. भा.

याच्या बलाची कल्पनाच येणार नाही असं ते बल आहे. म्हणून ते जाणू शकले नाहीत. पुन्हा काही ग्रहबाधा, पिशाचबाधा झाली काय असं वाटून यशोदेने ब्राह्मणांकडून त्या बालकाला मंत्राभिषेक केलेला आहे. शुद्ध ज्यांचं अंतःकरण आहे. तपःतेज ज्यांचं आहे अशी शास्त्रोक्त कर्म विधिवत् करणारी ब्राह्मण मंडळी नेहमी गोकुळात यायची आणि पूजाविधी स्विकारून आशीर्वाद देऊन जायची.

एके दिवशी यशोदा मुलाला मांडीवर घेऊन बसलेली आहे. स्तनपान चाललेलं आहे. मुलाच्या मुखाकडे पहाती आहे. पुष्कळ वय झाल्यानंतर मुलगा झालेला आहे आणि तो मुलगाही पाहिल्याबरोबर अंतःकरण आकर्षण करून घेणारा आहे. एकदम तिला असं वाटायला लागलं की आपण काही याला मांडीवर घेऊ शकत नाही. जड वाटायला लागला. त्याचवेळी एक दैत्य गोकुळात आलेला आहे. दैत्यांची नजर आता गोकुळाकडे वळलेली आहे. या मुलाने पूतना राक्षसीला मारलं. त्यामुळे याचा नाश करायचा असं दैत्यांनी ठरवलं. ते काही भगवंताचा द्वेष करणारे नव्हते, कारण हा भगवंत आहे हे माहिती कुठे आहे? पण हा कोणीतरी सामर्थ्यसंपन्न आहे याची जाणीव त्यांना होती. तेव्हा आपण जिवंत रहावं. सुरक्षित आपण रहावं म्हणून या मुलाला मारायचं. तृणावर्त नावाचा राक्षस हा गोकुळात वाऱ्याचं रूप घेऊन शिरलेला आहे. भयंकर सोसाट्याचा वारा सुटला, वादळ झाल्यासारखं झालं. सर्वांनी डोळे मिटून घेतले. यशोदेनेही डोळे

मिटून घेतले. त्या मुलाला खाली ठेवलं. त्या वायुरूपी दैत्याने एकदम त्या मुलाला उचललं आणि आकाशामध्ये नेलेलं आहे. धुरळा असल्यामुळे यशोदा डोळे झाकून बसली. थोड्यावेळाने सर्व शांत झाल्यावर तिने डोळे उघडले आणि पहाते आहे तर मुलगा कुठेआहे? रडायला लागली. सर्वही गोपी धावत जवळ आल्या. त्याही रडूलागल्या. आचार्य सांगतात राजा,

तृणावर्त: शान्तरयो वात्यारूपधरो हरन्।
कृष्णं नभोगतो गन्तुं नाशःनोद् भूरिभारभृत् ।।१०.७.२६ ।। श्री. भा.

प्रेम करणाऱ्या यशोदेला भार झाला, आणि त्या असुराला होणार नाही काय? तो तृणावर्त राक्षस जो चक्रवाकाचं रूप घेऊन आला होता त्याला काही मुलाला नेता येईना. अत्यंत जडभार त्याला झालेला आहे. इतक्यात त्याचा गळा दाबला गेला. प्राण कंठाशी आले आणि तो राक्षस गतप्राण होऊन आकाशातून जमिनीवर धाडदिशी पडलेला आहे. गोपींनी पाहिलं की तो बालक राक्षसाच्या शरीरावर खेळतो आहे. त्यांनी त्याला उचलून घेतलेलं आहे. आनंदाने त्या बालकाला त्यांनी यशोदेला दिला. काय म्हणाल्या, या बालकाचा नाश करण्याकरता हे दैत्य येतात पण शेवटी त्यांचाच नाश होतो.

हिंस्रः स्वपापेन् विहिंसितः खलः
साधुः समत्वेन भयाद् विमुच्यते ।।१०.७.३१ ।। श्री. भा.

गोपींची वाणी आहे. हे जे दैत्य आहेत, त्यांच्याच पापाने, दुर्ष्कमाने त्यांचा नाश होतो. खरा शुद्ध बुद्धिचा साधू जो आहे तो आपल्या आचरणाने भीतीपासून मुक्त होतो. काय आमचं तप आहे, पुण्य आहे की आमचा, मृत्यूच्या मुखात गेलेला मुलगा आम्हाला मिळालेला आहे. गोपालांनाही आनंद झाला. कोण या मुलाचं संरक्षण करतो कुणास ठाऊक? असं त्यांना वाटलं. पण हा मुलगाच स्वत:चं रक्षण करतो आणि इतरांचंही करतो याची अद्यापी जाणीव नाहीये.

एकदा यशोदेच्या मांडीवर होते भगवान. सहज जांभई आली म्हणून तोंड उघडलं त्यांनी तर यशोदेला त्या मुखाच्या आत सर्व विश्व दिसू लागलं. घाबरली ती. याच्या मुखात डोंगर आहेत. नद्या आहेत. सर्व विश्व दिसतंय. कोण आहे हा मुलगा? डोळे झाकून घेतले तिने. मुलाची शक्ति काय आहे हे जाणून घ्यायची वेळ आली होती. पण अद्यापी तिलाही ती जाणीव झालेली नाही. शुक सांगतात. राजा,

गर्गः पुरोहितो राजन् यदूनां सुमहातपाः ।
व्रजं जगाम नन्दस्य वसुदेवप्रचोदितः ।।१०.८.१ ।।श्री. भा.

मुलांची नांव अजून ठेवायची होती. वसुदेवाने यादवांचे पुरोहीत गर्गाचार्यांची भेट घेतली आणि त्यांना सांगितलं, ही दोन मुलं आहेत. आपल्याला सर्व माहिती आहेच. आपण गोकुळात जाऊन त्यांचा नामकरण संस्कार करा. त्याप्रमाणे गर्गाचार्य गोकुळात आले. नंदाने त्यांचं स्वागत केलं. ईश्वरबुद्धीने त्यांची पूजा केली. त्यांना प्रणाम केला. नंदाने विचारलं महाराज, आपण ज्योतिषशास्त्रवेत्ते आहात, सर्व जीवांच जातक आपल्याला कळतं. माझी एक प्रार्थना आहे की आपल्या हातून या मुलांचा नामकरण संस्कार व्हावा. गर्गाचार्य म्हणाले, मी यादवांचा पुरोहित म्हणून प्रसिद्ध आहे. तुझ्या मुलांचा नामकरण संस्कार मी केला आणि हे जर कंसाला कळलं तर त्याला संशय येईल की ही मुलं तुझी नसून ती वसुदेवाची आहेत. आणि त्यामुळे या मुलांच्या जीवालाही धोका निर्माण होईल. वसुदेवाचा आठवा मुलगा हा मुलगी असणं कधीही शक्य नाही हे कंसाच्या मनात आहे. वसुदेवाने त्या मुलाला कुठेतरी लपवून ठेवलेलं आहे असं त्याला वाटतंय म्हणून तो सारखा त्याच्या शोधात आहे. नंद म्हणाला, एवढीच अडचण आहे ना महाराज? मग कुठेतरी एकांतात, डोंगराच्या गुहेमध्ये जाऊन हा संस्कार करू. कुणालाही बोलवायचं नाही, सांगायचं नाही. यशोदा फक्त बरोबर राहील. पुण्याहवाचनाला ती लागेलच. त्याप्रमाणे त्या मुलांचा नामकरण संस्कार गर्गाचार्यांनी गुप्तरितीने केलेला आहे. त्यांनी सांगितलं, हा रोहिणीचा मुलगा सर्वांना आनंद देणारा. म्हणून याला 'राम' म्हणतील. अत्यंत बलशाली म्हणून बल म्हणतील. सर्व यादवांची एकी राखणारा आकर्षण करणारा, म्हणून संकर्षण त्याला म्हणतील. हा दुसरा मुलगा प्रत्येक युगामध्ये भिन्न भिन्न रूपाचा, आत्ता कृष्णवर्णाचा झाल्यामुळे 'कृष्ण' असं याचं नांव होईल.

प्रागयं वसुदेवस्य क्वचिज्जातस्तवात्मजः ।
वासुदेव इति श्रीमान् अभिज्ञाः सम्प्रचक्षते ।।१०.८.१४ ।। श्री. भा.

गर्गाचार्य सांगताहेत, पण नंदाच्या लक्षात येत नाहीये. हा एकदा वसुदेवाचा मुलगा म्हणून झालेला आहे. म्हणून वासुदेव असं याचं नाव ठेवतो. याची म्हणाले पुष्कळ नावं आहेत. अनेक रूपं आहेत. ती सर्वांना कळणं शक्य नाही. तुमच्या सर्वांचं, गोकुळाचं संरक्षण करण्यास हा समर्थ आहे. तुम्ही याच्या कृपेनं सर्व संकटातून तरून जाल. अनेक राजे लोकांचं, साधूंचं रक्षण याने पूर्वी केलेलं आहे. याच्यावर प्रेम करणारे जे आहेत त्यांना कोणत्याही शत्रूची भीती बाळगण्याचं कारण

नाही. हा तुझा मुलगा साक्षात नारायणाप्रमाणे आहे. असं सांगून गर्गाचार्य निघून गेले. नंदालाही आनंद झालेला आहे.

थोड्याच काळात राम-कृष्ण रांगू लागले, चालू लागले. आणि मग घरामध्ये काही त्यांचा पाय ठरेना. या गोपीच्या घरी जा, कधी त्या गोपीच्या घरी जा. जाताना आपली मित्रमंडळी बरोबर घेऊन जावी. त्या ठिकाणी जे काही दूध, दही, लोणी मिळेल ते सर्व मुलांना वाटून द्यायचं असा कार्यक्रम चाललेला आहे. शिल्लक काही ठेवायचं नाही. बाकीचं सर्व जमिनीवर ओतून द्यायचं. राजपुत्र आहेत हे. यांना कोण बोलणार? गोपींना जरी त्रास झाला तरी प्रथम त्यांना बोलता येईना. पण हे प्रकार जेव्हा वाढत चालले तेव्हा त्या गोपींनी एकदा हा प्रकार यशोदेच्या कानावर घालायचा ठरवलं आणि दुपारी एकदा त्या वाड्यामध्ये आल्या. त्या गोपी राम-कृष्णांची गाऱ्हाणी सांगताहेत.

वत्सान् मुञ्चन् क्वचिदसमये क्रोशसंजातहासः।
स्तेयं स्वाद्वत्त्यथ दधि पयः कल्पितैः स्तेययोगैः।
मर्कान् भोक्ष्यन् विभजति स चेन्नात्ति भाण्डं भिनत्ति।
द्रव्यालाभे स गृहकुपितो यात्युपक्रोश्य तोकान् ॥१०.८.२९॥ श्री. भा.

बाई यशोदे, हा मुलगा इतका आम्हाला त्रास देतो आहे. आजपर्यंत सहन केलं. एकदम घरात येतो. सगळी वासरं सोडून देतो. ती वासरं लगेच गाईचं दूध प्यायला जातात. आम्ही घरातून बाहेर वासरं बांधायला बाहेर पडलो की यांची टोळी आत शिरते आणि सगळं दूध, दही, लोणी सर्वांना वाटून टाकतो. कुणी म्हणाले आमचं पोट भरलंय की हा सगळी मडकी फोडून टाकतो आणि सगळं ते जमिनीवर सांडून टाकतो. एखादेवेळी आम्ही शिंक्यावर दही दूध ठेवावं तेंव्हा हा पाळण्यातल्या मुलाला चिमटा काढतो त्याला रडवतो आणि वर आम्हालाच ताकीद देतो की आज रात्री तुमचं घर रहातं का बघा. मूत्र विसर्जन करतात. हा तुझा मुलगा त्यांचा पुढारी आहे आणि असं तो करतो. याला तू शिक्षा कर, सांग त्याला. पण भगवंतांची लीला अशी आहे की बाहेर सगळ्या गोपींच्या घरात जाऊन धुडगूस घालावा पण घरात एकदासुद्धा कुठल्या वस्तूला हात लावायचा नाही. घरात केवढी समृद्धी आहे. सगळ्या सवंगड्यांना पोटभर जरी खायला घातलं असतं तरी ती यशोदा काही रागावली नसती. पण घरामधे एकदम चिडीचूप. यशोदा म्हणाली, माझा मुलगा असा नाही बायांनो, काय सांगता तुम्ही?

न हि उपालब्धुमैच्छत् ॥१०.८.३१॥ श्री. भा.

त्याला काहीतरी शिक्षा करावी अशी तिला इच्छा नाहीये. त्याला काहीतरी सांगून गोपींना समजावून तिने पाठवून दिलं. परंतु एकदा प्रसंग आलेला आहे.

एकदा क्रीडमानास्ते रामाद्या गोपदारकाः ।
कृष्णो मृदं भक्षितवान् इति मात्रे न्यवेदयन् ।१०.८.३२ ।। श्री. भा.

काय व्यास महर्षींची प्रतिभा आहे! अगदी बारीकसारीक लीलासुद्धा त्यांनी वर्णन करून ठेवल्यात. आणि शुकाचार्य त्या आनंदाने सांगताहेत. खेळण्याकरता मुलं एकदा बाहेर गेलेली असताना धावत धावत यशोदेकडं आली आणि सांगताहेत, माई, आज कृष्णाने माती खाल्लेली आहे. तुम्ही काहीतरी सांगा. आली यशोदा कृष्णाजवळ, त्याचा हात धरला. बालकृष्ण भीतीग्रस्त झाले, काय आता आई काय करते आपल्याला या भीतीने डोळे भरून आले.

कस्मान् मृदमदान्तात्मन् भवान् भक्षितवान् रहः ।।१०.८.३४ ।। श्री. भा.

का रे, 'आज आणखी एका बाजूला जाऊन तू माती का खाल्लीस ? ही सगळी तुझी मित्र मंडळी, हा तुझा ज्येष्ठ बंधू सांगताहेत की तू माती खाल्लेली आहेस. बालकृष्ण म्हणाले, आई मी माती खाल्लेली नाही. हे सगळेही खोटं बोलताहेत. यशोदा म्हणाली, बरं, खरं बोलतोयस तू. मग मला तोंड उघडून दाखव. कृष्ण म्हणाले, पहा मी तोंड उघडतो. तोंड उघडल्याबरोबर त्या मुखामध्ये यशोदेला सर्व विश्व दिसायला लागलं. माती खायला कशाला पाहिजे. आतच सगळं आहे की. म्हणजे गोपालकृष्ण खोटे बोलले नाहीत. सूर्य, चंद्र, नद्या, समुद्र, पर्वत सगळं त्या मुखामध्ये दिसतंय. संपूर्ण विश्व त्या मुलाच्या शरीरामध्ये अंतर्गत आहे. ती विचार करतेय, कोण आहे हा मुलगा ? मी स्वप्न पहातीय का देवाची माया आहे? अथवा माझ्या बुद्धीला भ्रम झालेला आहे? हे असं काय दिसतंय ? अथवा या माझ्या बालकाचंच सामर्थ्य आहे.

अर्भकस्य यः कश्चनौत्पत्तिक आत्मयोगः ।।१०.८.४० ।। श्री. भा.

काही तिला कळेना. आणि परमेश्वराचं चिंतन ती करतीय. ज्या परमेश्वराच्या मायामोहामध्ये मी सापडलेली आहे. त्या परमेश्वरानेच माझा मोह दूर करावा. यशोदा तत्वविचार करू लागली. मुलगा, पती वगैरे कोणाकडेही लक्ष नाही. भगवान विचार करताहेत, ही जर तत्वविचार करू लागली तर माझं संरक्षण कोण करणार ? मी हिच्याकरता तर इथे आलो. मी बालक आहे हाच विचार हिच्या मनामधे राहिला पाहिजे. असा विचार करून भगवंताने आपल्या मायेचा पडदा तिच्यावर टाकला. तिच्या मनात पुत्रस्नेह उत्पन्न झाला. विश्वरूप दर्शनामुळे उत्पन्न झालेलं आश्चर्य,

आश्चर्यामुळे उत्पन्न झालेलं तत्वज्ञान, हे सगळंही नाहीसं झालं.

सा ऽऽरोप्यारोहमात्मजम् ।।१०.८.४४ ।। श्री. भा.

मुलाला मांडीवर घेतलं आणि स्तनपान चाललेलं आहे. आचार्य सांगतात राजा,

त्रय्या चोपनिषद्भिश्च सांख्ययोगैश्च सात्वतैः ।
उपगीयमानमाहात्म्यं हरिं सामन्यतात्मजम् ।।१०.८.४५ ।।श्री. भा.

हा आपला मुलगा आहे. बाळकृष्ण आहे. बालकृष्णाचीच उपासना ती करते आहे. नंतर गोपालकृष्ण झालेले आहेत. सर्व वेद, उपनिषद, सांख्ययोग वगैरे आणि ज्ञानी भक्त हे ज्या परमेश्वराचे गुणवर्णन करताहेत तो एवढा श्रेष्ठ, सर्वशक्तीसंपन्न हरी. त्याला आपला मुलगा समजतीय. राजाने विचारलं, महाराज. नंद यशोदेचं काय पुण्य आहे, सगळ्या बाळलीला श्रीकृष्णांनी त्यांच्या जवळ राहून केल्या आहेत. शुक सांगतात, अष्टवसूंपैकी द्रोण नावाचा वसू, आणि धरा ही त्याची स्त्री. दोघेही अत्यंत धर्मशील होते. त्यांनी ब्रह्मदेवांची उपासना केली आणि श्रीहरींची भक्ती आणि प्रेम प्राप्त व्हावी असा वर मागून घेतला. तो द्रोण वसू, नंद नावाने जन्माला आलेला आहे आणि त्याची स्त्री यशोदा झालेली आहे. त्यामुळे भगवान पुत्ररूपाने आले आणि त्या पुत्राबद्दल त्यांच्या अंत:करणामध्ये भक्ती, प्रेम निर्माण झालं. सर्व गोपगोपींनाही प्रेमभावना झाली. ब्रह्मदेवाचा वर खरा करण्याकरता भगवान गोकुळामध्ये जाऊन राहिले. नंदाने वर मागितल्यामुळे असेल, त्या ठिकाणी गेले गोपालकृष्ण. वस्तुत: खऱ्या भक्ताजवळ देव आपणहून जातात पण आम्हाला सामान्यतः देवाजवळ जायचा प्रयत्न करावा लागतो. पण इथे गोकुळात जन्माला आलेले जे भक्त त्यांच्याजवळ भगवान गेलेले आहेत.

एकदा गृहदासीषु यशोदा नन्दगेहिनी ।
कर्मान्तरनियुक्तासु निर्ममन्थ स्वयं दधि ।।१०.९.१ ।। श्री. भा.

यशोदेच्या वाड्यामध्ये पुष्कळ नोकर चाकर होते. एके दिवशी दासींना काही काम होतं. दही घुसळण्याचं काम राहिलं होतं. स्वत: यशोदा उठली, पदर बांधला आणि दही घुसळण्याचं काम तिने सुरू केलं. बाळकृष्णाचं चरित्र तर तिच्या साक्षीनच घडत होतं. अद्याप त्यांच्या सामर्थ्याची जाणीव झाली नव्हती. किंवा भगवंताने ती जाणीव होऊ दिली नाही. आईचं शुद्ध अंतःकरण आहे आणि दही घुसळताना प्रेमाने त्या चरित्राचं गायन चाललेलं आहे. भरजरी वस्त्रं नेसलेलं आहे, दही घुसळताना कानातली कुंडलं हालताहेत. मुखावर घाम आलेला आहे. इतक्यात गोपालकृष्ण

बाहेरून धावत धावत आले आणि त्यांनी ती रवी दोन्ही हातांनी घट्ट धरून ठेवली. काम बंद झालं. तिच्या लक्षात आलं याला भूक लागलेली आहे. तिने मांडीवर घेतलं आणि भगवान स्तनपान करू लागले. अत्यंत आनंदाने आपल्या मुलाच्या मुखाकडे पाहातीये.

।।गृहरत्नानि बालका: ।। (अभिज्ञान शाकुंतल)

यशोदा अत्यंत भाग्य संपन्न आहे. इतक्यात आतल्या बाजूला चुलीवर ठेवलेलं दूध उतू गेलं. दुधातुपामध्ये लक्ष असतं म्हणतात बायकांचं आणि असलं पाहिजे. पुरुषांना सवड कुठंय ? ते दूध उतू जाऊ लागल्यावर यशोदेने गोपालकृष्णांना तसंच खाली ठेवलं आणि आत गेली. देवाला राग आलेला आहे. या बाईकरता मी वैकुंठातून इथे आलो, आणि हिचं मात्र माझ्यापेक्षा दुधाकडे लक्ष आहे. आणि काय कमी आहे का म्हणाले, गेलं असतं थोड दूध वाया. त्यांनी ठरवलं आज या घरातही काही ठेवायचं नाही. जे भगवान पुत्रस्नेह उत्पन्न करतात, ते भगवान आता संसाराचा विध्वंस करायला निघालेत. संसारातून हिचं मन बाजूला काढायचं आहे. गोपी गाऱ्हाणी करायच्या पण गोपींना कळलं नाही हे. गोपालकृष्ण काय दही–दूध चोरी करायला जात होते काय ? का घरामधे त्यांना काही कमी होतं? संसारामध्येच गुंतलेल्या गोपींना बाहेर काढायचंय ना भगवंतांना! मी इथे आलेलो आहे आणि तरी तुम्ही संसारामधेच गुंतून रहाताय ? एक मोठा दगड आणला बाहेरून, आणि त्या दह्याच्या गाडग्यावर मारला. तो फुटून गेलेला आहे. सगळं दही सांडलेलं आहे. बाहेर जाऊन आपल्या सवंगड्यांना बोलावलं, दुसऱ्या दाराने आत जाऊन शिंक्यावर जे काही दूध, दही, लोणी ठेवलं होतं ते वाटायचं काम चाललेलं आहे. पुरे म्हणाले की ते मडकं फेकून द्यावं, सगळं सांडून द्यावं. यशोदा बाहेर आली आणि पहातीय ते मडकं फुटून गेलेलं आहे. हसली ती, या मुलाचंच काम आहे हे तिने ओळखलं. शोध करायला ती निघाली. ते चोरीचं काम चाललेलं आहे. शिंक्यावरचे लोणी हाताने घेताहेत, मुलांना वाटताहेत, इकडे तिकडे पहाताहेत आई आली काय ? यशोदा हातात काठी घेऊनच आली. एकदम गोपालकृष्णांनी खाली उडी मारली आणि पळत सुटले. यशोदाही त्यांच्या पाठीमागे धावतीयं पण सापडणार कसे ?

ज्यांनी आपलं मन इतकं समर्थ केलेलं आहे की त्रैलोक्यामध्ये घडणाऱ्या गोष्टी तत्काल जे मनाने समजून घेऊ शकतात. ते योग्याचं मनही भगवंतांपर्यंत पोहोचू शकत नाही. जाणू शकत नाही. त्या भगवंताला ही यशोदा धरणार कशी ? गोपालकृष्णांनी सापडल्यासारखं करावं, एकदम झोकांडी देऊन पळून जावं. ती यशोदा दमली. शेवटी भगवंताला दया आली. धर म्हणाले बाई,



काय करायचं ते कर. डोळ्यातून अश्रू चाललेले आहेत.

कृतागसं तं प्ररुदन्तमक्षिणी
कर्षन्तमञ्जन्मषिणी स्वपाणिना।
उद्वीक्षमाणं भयविव्हलेक्षणं
हस्ते गृहीत्वा भिषयक्त्यवागुरत् ।।१०.९.११।। श्री. भा.

मायेचा हा मोह आपल्यालाही झालेला आहे असं दाखवताहेत भगवान. काठी घेऊन आई आलेली आहे, त्यामुळे आईची भीती वाटती आहे. आणि आपण अपराध केलेला आहे. सगळी गाडगी मडकी फोडून टाकली. रडायला लागले भगवान. डोळे पुसताहेत. डोळ्यातलं काजळ सगळं अश्रूंमुळे गालावर ओघळलेलं आहे. यशोदेने त्याला धरलं आणि घाबरलेला आहे असं पाहून काठी टाकून दिली. आणि त्याला बांधून ठेवायचं ठरवलं. एक मोठं उखळ होतं. त्या उखळाला दावं बांधलं आणि दुसरी बाजू ती गोपाळकृष्णाच्या कमरेला बंधू लागली. आचार्य सांगतात राजा,

तद्दाम बध्यमानस्य स्वार्भकस्य कृतागसः ।।
द्व्यङ्गुलोनमभूत्तेन सन्दधेऽन्यच्च गोपिका ।।१०.९.१५।। श्री. भा.

कमरेला बांधलेलं दावं दोन बोटं कमी पडलेलं आहे. बांधता येईना. दासीकडून दुसरं दावं आणलं. आता हे पुरायला पाहिजे की नाही? आधीचं दोन अंगुलच कमी पडत होतं!

तदपि द्व्यङ्गुलं न्यूनंयद् यदादत्त बन्धनम् ।।१०.९.१६।। श्री. भा.

तेही दोन बोटं कमी पडायला लागलं. बांधता येईना. मारायचं नाही असं यशोदेने ठरवलेलं आहे. दया दाखवलेली आहे. पण काहीही शासन करायचं नाही, ही दया नाहीये. पण बांधून ठेवायचं हा हट्ट आहे. बाळकृष्ण आहे म्हणून प्रेमही आहे. दासी सारख्या दावी आणून देताहेत, एकमेकाला जोडताहेत पण पुरतच नाहीये. सगळ्या गोपीही तिथे जमलेल्या होत्या. त्या मोठ्या आश्चर्यचकीत झाल्या. दमली यशोदा. घाम आलेला आहे. तेव्हा भगवान कृष्णांनी स्वतःला बांधून घेतलं. आचार्य सांगतात राजा, जो परमात्मा सर्वव्यापी आहे. आत, बाहेर जो सर्वत्र आहे, त्याला गोपी बांधायचं म्हणतात ते कसं शक्य आहे? दृश्यरूप वेगळे आहे. पण त्या दृश्य रूपाच्या ठिकाणीही हा चमत्कार दिसतो आहे की ते सुद्धा बांधता येणार नाही. हे जे चरित्र भगवंताने दाखवलं आहे, शुक सांगताहेत,

एवं संदर्शिता हि अङ्ग हरिणा भृत्यवश्यता।

स्ववशेनापि कृष्णेन यस्येदं सेश्वरं वशे ।।१०.९.१९ ।। श्री. भा.

काय भगवंताची शक्ती आहे! परमात्मा स्वतंत्र आहे. परंतु आपल्या भक्तांच्या प्रेमाखातर तो भक्तांच्या आधीन आहे. हे दाखवलं गोपालकृष्णांनी. काय प्रसाद झालेला आहे यशोदेवर आणि गोपींवर! ब्रह्मदेवांना मिळाला नाही. शंकरांना मिळाला नाही. लक्ष्मी देवीला मिळाला नाही. सर्वांना मुक्तीदान करणारा परमात्मा स्वत: बंधनात पडलेला आहे. भक्ताची इच्छा आहे. यशोदेने बांधून टाकलं आणि आतमधे निघून गेली. ते उखळ ओढत ओढत गोपालकृष्ण निघालेले आहेत. कुबेराची दोन मुलं नारदांचा शाप झाल्यामुळे वृक्ष झाले होते. त्यांचा उद्धार करायचा होता. नंदाच्या वाड्याच्या बाहेर ते दोन अर्जुनवृक्ष होते. ते दोन्ही वृक्ष एकमेकांच्या जवळजवळ वाढले होते. त्या कुबेर पुत्रांचा वृत्तांत सांगताहेत आचार्यमहाराज. कुबेर आणि त्याचे पुत्र हे भगवान शंकराचे सेवक आहेत. कैलास पर्वतावर उपवनामध्ये कुबेरपुत्रांचं स्नान चाललेलं आहे. मद्यपान केलेलं आहे आणि सर्व स्त्रिया त्याठिकाणी जलक्रीडेला आलेल्या आहेत. ती जलक्रीडा चाललेली असताना नारद महर्षी तिकडून जात होते. त्यांना पाहिल्यावर त्या स्त्रिया सर्व लज्जित झाल्या. वस्त्रं नेसून नमस्कार करून उभ्या राहिल्या. परंतु ते दोघेही कुबेर पुत्र मद्यधुंद होऊन अतिशय उन्मत्त झालेले तसेच जलक्रीडा करत राहिलेले आहेत. नारदांनी विचार केला, यांना शासन केलं पाहिजे. हे फारच उन्मत्त झालेले आहेत. सामान्य जीवांना पुण्यक्षय झाल्यानंतर पुन्हा जन्माला यावं लागते. परंतु नारदांसारखे महात्मे दुराचारी लोकांना त्यांच्या पुण्याचा उपभोग घेत असतांना सुद्धा शासन करू शकतात.

क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ।

पुण्य संपल्यावरच मृत्यूलोकात येणं असं कशाला पाहिजे. आत्ताच शासन झालं पाहिजे. शासन म्हणजे यांची सर्व संपत्ती, ऐश्वर्य नाहीसं झालं पाहिजे. म्हणजे यांचे डोळे उघडतील. नारद म्हणताहेत, तुमच्या अंगावर वस्त्रंही नाही ह्याचं भान, तुम्हाला नाहीये. लोकपाल कुबेराचे पुत्र तुम्ही म्हणवता आणि निर्लज्जपणे जलक्रीडा करत बसता. तुम्ही वृक्ष जन्माला जा. अत्यंत पराधीन स्थितीत रहा. असा शाप नारदांनी दिला. शंभर वर्षानंतर भगवान श्रीहरींच्या कृपेनं तुम्ही मुक्त व्हाल हेही सांगून ठेवलं. नारदमहर्षींची ती वाणी सिद्ध करण्याकरता भगवानश्रीकृष्ण ते उखळ ओढीत चाललेले आहेत. त्या वृक्षांच्या मधून ते पुढे गेले. दोन्ही झाडं जवळ जवळ असल्यामुळे ते उखळ अडकलं. थोडासा धक्का दिल्याबरोबर ती दोन्ही झाडं उन्मळून पडली. मोठा आवाज झाल्याबरोबर

नंदादिक गोपाळ धावून आले. कृष्णांची मित्रमंडळी होती तिथे. त्यांनी सांगितलं, कृष्ण उखळ घेऊन आला, ते उखळ दोन झाडांमध्ये अडकल्याबरोबर त्याने थोडासा धक्का दिल्याबरोबर ही झाडे पडली. बालकांनी सांगितलं, पुन्हा विश्वास बसला नाही. त्याचवेळेला ते कुबेरपुत्र नलकुबर आणि मणिग्रीव यांना पूर्वीची शरीरं प्राप्त झाली. त्यांनी भगवान श्रीकृष्णांची स्तुती केली. आमच्या काया, वाचा, मनाने निरंतर आपली सेवा घडावी. म्हणजे आम्हाला असा मद होणार नाही. अशी प्रार्थना करून आकाशमार्गाने ते निघून गेले. गोपालांना ते दिसले असतील, काय बोलले ते कळलं नसेल. पण मुलांच्या बोलण्यावर मात्र विश्वास नाही. ह्या लहान कृष्णाने ही झाडं पाडली ? कसं शक्य आहे? त्या मुलांच्या मनामध्ये मात्र संशय नाही. आणि गोपालांनी जरी प्रत्यक्ष पाहिलं असतं तरी हे सामर्थ्य या मुलाचं आहे हे पटावे कसे ? हा ईश्वर नाहीये. आमच्यापेक्षा लहान मुलगा आहे हीच भावना आहे. नंदाने कृष्णांना उखळापासून सोडवून कडेवर घेतलं आणि वाड्यामधे आलेले आहेत.

गोकुळात उपनंद नावाचा एक वृद्ध गोप होता. त्याने सांगितलं की, आपण हे स्थान सोडून दुसरीकडे रहायला जाऊ या. या लहान बालकावर सारखी संकटं येताहेत. प्रत्येकवेळी देवाने याचं रक्षण केलं. पण आणखी काही संकटं येण्याच्या आधी आपण इथून दुसरीकडे जाऊ. इथून वृंदावन जवळ आहे. सर्वांना आनंददायक आहे. पाणी आहे चांगलं. मुलांना खेळायला चांगलं वाळवंट आहे. सर्वांना हा सल्ला पटला. पहिल्यांदा गाईंना पाठवून दिलं पाठीमागून गाड्या जुंपून सर्व मंडळी त्या वृंदावनात आलेली आहेत. सर्वांना ते स्थान पाहून मोठं समाधान झालेलं आहे. राम-कृष्णांनी रोज वासरांना घेऊन, आपल्या सवंगड्यांसह यमुनातीरावर जावं. असेच एकदा ते निघालेले असताना, त्यांच्या वासरांत एक दैत्य वासराचं रूप घेऊन शिरलेला आहे. भगवंतांनी रामाला दाखवलं. त्याच्यापाठीमागे गेले. एकदम त्याचे पाय धरून त्याला उचललं आणि खाली आपटलं. अशारितीने त्या दैत्याचा नाश झालेला आहे.

नदीतीरावर आले. नदीपर्यंत यायचं. वासरांना पाणी पाजायचं, बरोबर दिलेली शिदोरी खायची आणि परत जायचं. लहान वय होतं अजून. नदीतीरावर ते आले असताना बक नावाचा असुर एका मोठ्या बगळ्याचं रूप घेऊन आलेला आहे. त्याने एकदम कृष्णांना आपल्या चोचीमध्ये पकडून गिळून टाकलं. सगळी मित्रमंडळी अत्यंत दुःखी झाली. काय करावं असं ती विचार करू लागली. रामही पहाताहेत. इतक्यात त्या बगळ्याच्या कंठात दाह होऊ लागला. त्याने आपल्या

तोंडातून कृष्णांना बाहेर टाकून दिलं आणि चोचीनेच टोचून मारण्याकरता तो आला. तेव्हा त्या चोचीला धरलं कृष्णांनी आणि त्याचं शरीर फाडून टाकलेलं आहे. त्याचा नाश झालेला आहे. सर्व गोपाळ मित्रांना अतिशय आश्चर्य वाटलेलं आहे. कित्ती म्हणाले, याच्या नाशाकरता दैत्य येतात आणि मरून जातात.

एके दिवशी भगवान लवकर उठले. आपल्या मित्रांनाही उठविलं. वासरं बरोबर घेतली. हजारो वासरं आहेत. सगळी वासरं बाहेर काढली आणि त्यांना घेऊन निघाले. चालता चालता मित्रमंडळी थोडी दूर गेली. गोपालकृष्ण पाठीमागे राहिले. त्यावेळी तिथे अघासूर राक्षस आलेला आहे. बकासुर आणि पुतनेचा भाऊ. त्याने सूड घेण्याकरता कृष्ण आणि गोपालांना आज मारायचं ठरवलं. म्हणून तो एका मोठ्या अजगराचं रूप घेऊन रस्त्यात बसला. एक ओठ खाली आणि दुसरा ओठ मेघमंडलापर्यंत असं अजस्त्र रूप त्याने घेतलं. मोठी जीभ रस्त्यासारखी पसरलेली आहे. गोपालमंडळी पुढे आलेली आहेत. गोपालकृष्ण अजूनही पाठीमागेच आहेत. ते गोपाल त्या अजगरमुखाच्या समोर येऊन उभी राहिली आणि बोलू लागली, आपण इकडे आजपर्यंत कधी आलो नव्हतो. गोवर्धन पर्वताची ही एखादी गुहाच दिसते आहे. हा रस्ताही दिसतो आहे. जणु काही एखाद्या अजगराने तोंड उघडून ठेवलं आहे असंच दिसतं आहे. चला आपण आत जाऊन बघू या. सगळे निघाले. गोपालकृष्ण मागून ओरडताहेत, अरे थांबा, जाऊ नका. पण हे कुठले ऐकायला. सगळे गेले आत. अघासुराने अद्यापि आपलं मुख झाकलेलं नव्हतं. मुलं आणि वासरं आत गेली तरी, कृष्णांनी मुखात प्रवेश केला की मुख झाकायचं त्याने ठरवलं होतं. श्रीकृष्णांनीही विचार करून त्याच्या मुखात प्रवेश केला. सर्व दैत्यांना आनंद झाला, आपला शत्रू आता मेला म्हणाले. देवांना अत्यंत दुःख झालेलं आहे. तो अघासुर आपलं मुख हळूहळू मिटू लागला आणि कृष्ण आपलं शरीर हळू हळू वाढवू लागले. ते शरीर इतकं मोठं झालं की, त्या असुराला तोंड मिटता येईना. प्राणवायू कोंडला गेला आणि थोड्याच वेळात त्याचे प्राणोत्क्रमण झालेलं आहे. ती सगळी मुलं, वासरं, त्या असुराच्या विषारी श्वासोच्छ्वासाने मरून पडली होती. त्यांना जिवंत करून बाहेर घेऊन आले गोपालकृष्ण. अघासुराच्या शरीरातून तेज बाहेर पडलं आणि कृष्ण शरीरात प्रविष्ट झालं.

ती मुलं, वासरं नंतर नदीतीरावर गेली आणि एक वर्षानंतर घरी येऊन त्यांनी सांगितलं की आज कृष्णांनी एक असुर मारला. परीक्षित राजा विचारतोय, महाराज, एक वर्षानंतर घरी आले? तोपर्यंत होती कुठे? भगवंताच्या त्या दिव्य लीलेची आठवण झाली शुकाचार्यांना. आणि कंठ

दाटून आला. थोडा वेळ स्तब्ध बसले आणि त्यांनी ते चरित्र सांगायला आरंभ केला. अघासुराच्या मुखातून भगवंताने आपल्या सवंगड्यांना, वासरांना सुरक्षित आणलं आणि सर्व सर्व मंडळी नदीतीरावर आलेली आहेत. भगवान म्हणाले, मित्रहो, वासरांना पाणी प्यायला जाऊ दे. तुम्हालाही भूक लागली असेल. शिदोऱ्या सोडा आता जेवण करू या. भगवान कृष्ण बसलेले आहेत. सभोवती सर्व गोपाल बसलेले आहेत. आणि त्यांनी आपल्या मातांनी दिलेल्या शिदोऱ्या सोडल्या. प्रत्येक गोपालाने एकेक घास श्रीकृष्णांना द्यावा. असं ते, प्रेमाचं भोजन भगवान करताहेत. विनोद करताहेत. हसवताहेत. सर्व गोपाळ अतिशय आनंदात आहेत. त्यांचं जेवण चाललेलं असतांना ती वासरं बरीच दूर गेली. डोंगरामध्ये कुठे गेली काही पत्ता लागला नाही. ती मुलं घाबरली. देवाने सांगितलं, तुम्ही सावकाश जेवण करा. मी बघून येतो. म्हणून भगवान निघाले. त्यावेळी असं झालं, अघासुराचा नाश झाल्यावर सर्व देवांनी मोठा आनंदोत्सव केला. मोठमोठ्याने वाद्यं वाजवली. त्याचा आवाज ब्रह्मलोकापर्यंत गेला. ब्रह्मदेव विचार करताहेत, हा कोण गोपकुमार आहे? याने एका असुराला मारलं म्हणून देवांनी जयजयकार केला. काय याचं सामर्थ्य आहे पाहू या. अहंकार आहे. ब्रह्मदेवांनी ती वासरं आणि गोपालमंडळींना ब्रह्मलोकांत नेऊन ठेवलं. सर्वजण गाढ झोपेत आहेत. भगवंत पाहताहेत, वासरंही नाहीत आणि गोपालही नाहीत. नंतर लक्षात आलं, की हे ब्रह्मदेवांचं काम आहे. आता वृंदावनात घरी जायचं कसं? एकही गोपाल नाही आणि एकही वासरू नाही. सगळ्या गोपी विचारणार, आमची मुलं कुठे आहेत. गाईंनाही दुःख होणार वासरं न दिसल्यामुळे! मग भगवंतानेच सर्वांची रूपं धारण केली. सर्व गोपालरूप ते झाले. सर्व वत्सरूप ते झाले आणि त्या सर्वांसह ते वृंदावनात परतले. आपापल्या घरी जाऊन, त्या गोपालांनी आपली वासरं बांधली. आपल्या मातांना ते भेटले त्यांना आनंद झाला. गाईंनाही वासरं भेटल्याचा आनंद झाला. कोणालाही काहीही लक्षात आलेलं नाही. असा काल चाललेला आहे. रोज ती वासरं बाहेर काढायची नदीतीरावर जायचं, संध्याकाळी परत यायचं.

असा एक वर्षाचा काल गेलेला आहे. कुणालाही माहिती नाही. वेगवेगळ्या रूपात भगवान रहाताहेत. एके दिवशी ते नित्याप्रमाणे नदीतीरावर बसलेले असताना ब्रह्मदेव पहायला आले. ब्रह्मदेव पाहताहेत, ती वासरंही आहेत आणि ते गोपालही आहेत! ते विचार करताहेत, मी या सगळ्यांना ब्रह्मलोकात नेऊन ठेवलेलं आहे. ते सर्व योगनिद्रेत आहेत.मग हे कोण आहेत? आपण नेलेले गोपाल आणि वासरं खरी का ही खरी? आपल्या मायेने श्रीकृष्णांना मोहात टाकायचा प्रयत्न करणारे ब्रह्मदेव हे स्वतःच मोहात पडले. इतक्यात दृश्य बदललं. सर्व वासरं, गोपाल हे शंख,

चक्र, गदा, पद्मधारी विष्णुरूप आहेत! पुन्हा पहाताहेत ब्रह्मदेव तर एक वर्षापूर्वीचं दृश्य दिसतंय. अर्थात एक वर्ष माणसाचं. ब्रह्मदेवाचा एक क्षण देखील नसेल. भगवान वासरांचा आणि गोपालांचा शोध करताहेत. हातामध्ये गोपालांनी दिलेला दहीभात आहे, तो खात खात शोध करण्याचं काम चाललेलं आहे. ब्रह्मदेवांना हा साक्षात् परमात्मा आहे हे ज्ञान झालं. हंस वाहनावरून ते खाली उतरले आणि भगवान श्रीहरींना त्यांनी साष्टांग नमस्कार केलेला आहे. आणि पुष्कळ स्तुती केली.

नौमीड्य तेऽभ्रवपुषे तडिदम्बराय
गुञ्जावतंसपरिपिच्छलसन्मुखाय।
वन्यस्रजे कवलवेत्रविषाणवेणु
लक्ष्मश्रिये मृदुपदे पशुपाङ्गजाय ।।१०.१४.१ ।। श्री. भा.

आज जे स्वरूप दिसतंय त्याचंच वर्णन करताहेत. मेघःश्याम आपण आहात देवा. गुंजांच्या माळा गळ्यामध्ये घातलेल्या आहेत. वनामध्ये असलेल्या फुलांच्या माळा मित्रांनी करून आणलेल्या, त्या गळ्यात घातलेल्या आहेत. मयुरपिच्छाचा टोप करून मस्तकावर धारण केलेला आहे, हे आजचं आपलं रूप आहे. पण या स्वरूपाचं महत्त्वही आम्ही जाणू शकत नाही. काय करायच ज्ञान घेऊन? ज्ञानाकरता प्रयत्न करण्यापेक्षा भगवंताचं प्रेम, भक्ती प्राप्त होण्याकरता प्रयत्न करावा, प्रार्थना करावी. भक्ती सोडून देऊन केवल ज्ञानाकरता प्रयत्न करणाऱ्यांचं अंत:करण शुष्क, प्रेमरहित असल्यामुळे त्यांना समाधान प्राप्त होत नाही. आपण अनेक अवतार धारण केले आणि अनेकांचं रक्षण आपण केलंय. ब्रह्मदेवांनी स्तुती करत असतांना, मनुष्याचा उद्धार होण्याची तीन साधन सांगितली आहेत. मुक्ती कशाने प्राप्त होते?

तत्तेऽनुकम्पां सुसमीक्षमाणः
भुञ्जान एव आत्मकृतं विपाकम्।
हृद्वाग्वपुर्भिर्विदधन्नमस्ते
जीवेत यो मुक्तिपदे स दायभाक्।। १०.१४.८ ।। श्री. भा.

पहिलं साधन म्हणजे भगवंताची कृपा माझ्यावर केव्हा होईल? दर्शन केव्हा होईल? संसार वासना कधी नष्ट होतील? अशी अंत:करणात, अत्यंत तळमळ उत्पन्न झाली पाहिजे. कृपेची वाट पहातोय जीव. जन्म असेपर्यंत जे जे सुख दुःख असेल ते आपल्याच कर्माचं फल आहे असं समजून, ते भोगतो आहे. आणि काया, वाचा, मनाने अत्यंत विनीत होऊन प्रत्येक भोगामधे परमात्मभाव

ठेवून त्यांना वंदन करतो आहे. अत्यंत विनम्र जो रहातो, तो मुक्तीचा अधिकारी होतो. ब्रह्मदेव सांगताहेत, माझ्या हातून आज फार मोठा अपराध घडलेला आहे. खिडकीतून आलेल्या सूर्यकिरणांमध्ये असंख्य रज:कण दिसतात तसं आपल्या स्वरूपाच्या ठिकाणी अनेक ब्रह्मांड आहेत. त्यापैकी एका ब्रह्मांडाचा मी ब्रह्मदेव आपल्याच कृपेने झालो, आणि अनंत ब्रह्मांड स्वरूपामधे स्थित असलेले आपण! मी ब्रह्मदेव आहे. सृष्टीकर्ता आहे. अशा अभिमानामुळे माझ्या हातून आपला उपमर्द झालेला आहे. वर्ष संपायच्या वेळी बलरामांना हे समजलं. त्यांनी गोपालकृष्णांना विचारलं पूर्वी ही वासरं, गोपाल मला ऋषीरूपात, देवरूपात दिसायची, तुमच्या कार्यात मदत करण्याकरता आलेली परंतु आज मला हे सर्व तुझ्या रूपातच दिसताहेत! असं कसं झालं? तेव्हा गोपालकृष्णांनी सांगितलं, ब्रह्मदेव आमची परीक्षा पहाताहेत. त्यांनी सगळी वासरं, मुलं ब्रह्मलोकात नेऊन ठेवली. त्यांना वाटतंय की सृष्टी करण्याचं सामर्थ्य फक्त त्यांच्याजवळच आहे. आता त्या दिवशी आम्ही एकटे कसे जाणार? सर्व गोपींना, गाईंना दु:ख झालं असतं म्हणून ही रूपं धारण करावी लागली. ब्रह्मदेवांनी क्षमा मागून खरी वासरं, गोपाल आणून दिले आणि त्यांना घेऊन गोपालकृष्ण वृंदावनात आले. त्या मुलांनी आपल्या आईबापांना सांगितलं की, आज सकाळी कन्हैयाने एक मोठा साप मारला. खरं म्हणजे वर्षापूर्वी घडलेली हकीकत, पण ते आज सांगताहेत. वर्षभर आपण योगनिद्रेत होतो याचं भानही नाही. काही लक्षात नाही. भगवंताच्या मायेमुळे जीव सर्वही विसरून जाताहेत.

एकदा गोपालकृष्ण सर्वांसह नित्याप्रमाणे अरण्यात आले. गोपाल सांगताहेत, कृष्णा, इथून जवळच एक उपवन आहे. अत्यंत मधुर आणि रसाळ फळांनी भरलेले वृक्ष तिथे आहेत परंतु आम्हाला तिथे जाता येत नाही. कारण एक दैत्य त्याठिकाणी रहात असून तो आत जाणाऱ्यांचा नाश करतो. ती फळं आम्हाला पाहिजेत. राम म्हणाले, चला आत्ताच जाऊ या. आले त्या उपवनामध्ये. रामांनी एक झाड जोराने हलवलं. त्याची फळं खाली पडली. ती गोपालांना घ्यायला सांगितली. तो फळांचा पडण्याचा, माणसांचा आवाज ऐकून तो दैत्य 'धेनुकासूर' आपल्या सैन्यासह आलेला आहे. कंसानेच ते सैन्य ठेवलं होतं. गर्दभरूपात ते आले आणि लाथांनी बुकलून रामकृष्णांना मारण्याकरता ते धाऊन आले. त्यावेळी एकेकाला उचलून आपटून ठार मारलेलं आहे राम-कृष्णांनी, धेनुकासुराचाही नाश झालेला आहे. ते वन निर्भय झालेलं आहे.

भगवंताची लीला अशी अखंड चालू आहे. भगवान श्रीकृष्ण परमात्मा आता गाई घेऊन

जायला लागले. सहावं वर्ष लागलं. आपापल्या गाई घ्यावात आणि आता पुष्कळ दूरवर जायला लागले. वासरं न्यायचे तेव्हा जवळच नदीवर जाऊन यायचे. आता दूरपर्यंत जाऊ लागले. एकदा कृष्ण, रामांना न घेताच बाहेर पडले. बाकीच्या सवंगड्यांना घेतलं आणि नदीतीरावर आले. काही गोपाळ आणि गाई त्या यमुनेच्या एका डोहातलं पाणी प्याले आणि एकदम गतप्राण होऊन पडले. त्या डोहामध्ये कालिया नावाचा नाग आपल्या परिवारासह रहात होता. त्यामुळं तिथलं पाणी विषारी झालं होतं. पाण्यावरून जाणारा वारा जर वर उडणाऱ्या पक्ष्याच्या अंगावरून गेला तर तोही मरून पडायचा. सर्व गोपालांना, गाईंना भगवंताने आपल्या अमृतदृष्टीने जिवंत केलं आणि ते झाडावर चढून गेले. त्यांनी ठरवलं आज या नागाला इथून काढून त्याच्या स्थानामधे म्हणजे रमणकद्वीपामधे पाठवून द्यायचं. श्रीकृष्णांनी त्या डोहामध्ये उडी मारली. आणि तो नाग वर येण्याकरता हाताने पाण्यावर प्रहार करायला सुरुवात केली. तो नाग वर आलेला आहे. त्या कालिया नागाने कृष्णांना दंश केला आणि कृष्णशरीराला वेढा देऊन बांधून टाकलेलं आहे. श्रीकृष्णांची हालचाल बंद झाली. इकडे वृंदावनात अपशकून व्हायला लागले. लोक म्हणायला लागले, आज कृष्ण एकटाच गेलेला आहे. राम बरोबर नाहीत. त्याच्यावर नक्की काहीतरी संकट आज आलेलं आहे. चला आपण जाऊ या. शोध करत करत सर्वही मंडळी, नदीतीरावर त्या डोहापाशी आली. पहाताहेत की गोपाल आहेत, गाई आहेत आणि समोर त्या भयंकर नागाच्या विळख्यामधे कृष्ण सापडलेले आहेत. अतिशय दुःख झालं सर्वांना. आता म्हणाले आपला मुलगा काही परत मिळणार नाही. सगळे शोक करू लागले. बलरामजी अगदी स्तब्ध आहेत. कृष्णप्रभाव काय आहे, कृष्णशक्ती काय आहे याची पूर्ण जाणीव त्यांना आहे. हसले फक्त ते, पाहताहेत. याचा प्राण जाण्याच्या अगोदर आपणच आधी प्राणत्याग करावा अशा हेतूने नंद यशोदेसह सर्वजण नदीमधे उडी मारण्याकरता निघाले. बलरामांनी त्यांचं सांत्वन केलं. थांबा म्हणाले थोडं. काय होतंय पाहा. श्रीकृष्णांनी आपलं शरीर फुगवायला सुरवात केली. त्या नागाने, बांधून ठेवणं शक्य न झाल्यामुळे लगेच सोडून दिलं, आणि तो बाजूला झालेला आहे. श्रीकृष्ण सभोवती फिरताहेत, तो नागही फिरतो आहे. एकदम उसळी मारून त्या नागाच्या फण्यावर गोपालकृष्ण उभे राहिले. आणि त्यांनी नृत्य करायला आरंभ केला. गंधर्वमंडळी वाद्यं वाजवताहेत. ताल धरलेला आहे, आणि यांचं नृत्य चाललेलं आहे. त्या नागाला एकशेएक फणा होत्या. जी जी फणा त्याने बाहेर काढावी त्या फण्यावर कृष्णांनी उडी मारून नृत्य करावं असं चाललेलं आहे.

तो नाग आपल्या स्थानाहून, रमणकद्वीपाहून या डोहामधे यायचं कारण काय ते सांगताहेत शुक्राचार्य. सर्व नाग त्या रमणकद्वीपात राहात होते. काही मानवही होते तिथे. नागांनी आपल्याला त्रास देऊ नये म्हणून, त्या माणसांनी रोज पुष्कळ अन्न त्या नागांना द्यायचं ठरवलं. म्हणजे त्यांनी तो अन्नाचा बलि घ्यावा आणि आम्हाला त्रास देऊ नये असा विचार त्या माणसांनी केला. मानवाला जशी नागांची भीती आहे तशी नागांनाही गरुडाची भीती आहे. सर्वांना भीतीमध्ये ठेवलेलं आहे देवाने. भीतीशिवाय कार्य व्यवस्थित चालू राहात नाही. पंचमहाभूतांनासुद्धा भीती आहे. सूर्यनारायण रोज उगवतो आहे, वायू नित्य वाहातो आहे. वायू असं म्हणत नाही आता कंटाळा आला, किती दिवस काम करू! सगळ्यांना भीती आहे. कर्तव्यच्युत झालो तर शासन होईल ह्या भितीमुळे सृष्टीतले हे अधिकारी सदैव कर्तव्य करत रहातात. नागांनी सांगितलं, आम्हाला जे अन्न मिळतं, ते आम्ही तुम्हाला देऊ. आम्हाला त्रास देऊ नका. म्हणजे रोज गरुडाला अन्न मिळत होतं. गरुड यायचा, ते अन्न भक्षण करायचा आणि जायचा. ह्या कालिया नागाची पाळी एकदा आली. तो म्हणाला, मी काही गरुडाला अन्न देणार नाही. मला मिळालेलं अन्न मी खाणार. तो अन्न भक्षण करत असनांना गरुड आला. कालिया नाग त्याच्या अंगावर धावून गेला. गरुडाने आपल्या पंखाचा हलकासा तडाखा दिल्याबरोबर, तो नाग बाजूला झालेला आहे. गरुडापुढं आपलं काही चालणार नाही हे ओळखून तो कालिया नाग या यमुनेच्या डोहात येऊन राहिला. तो इथेच येऊन सुरक्षित कसा राहिला यालाही एक इतिहास आहे. एकदा गरुड या डोहापाशी आला आणि पाणी पिता पिता मस्त्यांनाही भक्षण करु लागला. एक मोठा मत्स्यराज त्याठिकाणी होता. त्यालाही गरूडाने भक्षण केलं. सर्व मत्स्य दुःखी झाले. त्या ठिकाणी, जलामधे तपश्चर्या करण्याकरता 'सौभरी' ऋषी रहात होते. त्यांनी गरूडाला सांगितलं, गरुडा, आजपासून केव्हाही याठिकाणी येऊन तू जर मत्स्य भक्षण करशील, तर तुझे प्राण जातील. गरूडाला ताकीद दिली. त्यालाही भीती आहे ना. कसंही वागायचं, कोणाचीही हिंसा करायची, कुणाचही सर्वस्व हरण करायचं याला आळा घालायला भीती पाहिजे. आपलं नियंत्रण करणारी कुणी शक्ती आहे अशी भीती असल्याशिवाय कार्य होत नाही. गरूडाने ते स्थान वर्ज्य केलं हे कालिया नागाला माहित होतं म्हणून तो इथे येऊन राहिला.

गोपालकृष्णांचं नृत्य चाललेलं आहे. त्या कालिया नागाची शक्ती क्षीण झाली. मुखातून रक्तस्राव सुरू झाला. प्राण जाण्याची वेळ आलेली आहे. सर्व नागस्त्रिया आपल्या मुलांसह आल्या

आणि श्रीकृष्णांची प्रार्थना करताहेत, देवा, यांना जीवदान द्या. आमचं सौभाग्य आम्हाला द्या. यांच्या अपराधांची क्षमा करा. गोपालकृष्णांनी लाथेने त्या नागाला ढकलून दिलं आणि पाण्यामध्येच थांबलेले आहेत. थोड्या वेळाने तो कालिया नाग सावध झाला आणि त्या नागाने स्तुती केलेली आहे. भगवन, आपली शक्ती अनंत आहे. मी काही ओळखू शकलो नाही. सर्व विश्व आपण उत्पन्न केलं. आम्हा नागांनाही आपणच उत्पन्न केलं. आम्ही रागीट आहोत. तो स्वभावही, आपणच बनवलेला आहे. तुमचंच आहे हे सगळं. आज माझ्याहातून आपला अपराध झालेला आहे. आपण मला क्षमा करा. अशी प्रार्थना त्या कालिया नागाने केल्यानंतर, भगवान श्रीहरी त्याला सांगताहेत, हे स्थान सोडून तू तुझ्या स्थानामधे रहायला जा. ही काही तुझी जागा नाहीये. सगळं पाणी विषारी झालेलं आहे. कुणाही पशू, पक्षी, मानवाने ते पाणी प्याल्यावर त्यांचा नाश होतो आहे.

गोनृभिर्भुज्यतां नदी ।।१०.१६.६०।। श्री. भा.

पाण्यावरती माणसांचा, गायींचा हक्क आहे, तुमचा नाही. तुम्ही इथून निघून जा. कालिया नागाने आपल्या परिवारासह श्रीकृष्णांची पूजा केली. उत्तम वस्त्रं, अलंकार दिलेले आहेत. आणि तो सहपरिवार आपल्या स्थानाला निघून गेला. भगवंताच्या कृपेमुळे त्या नदीचे जल निर्विष झालेलं आहे. भगवंतांनी कालियाला सांगितलं की आता त्याला गरुडाची भिती बाळगण्याचं कारण नाही. कारण, त्याच्या फण्यावर कृष्णांची पावलं उमटली होती. ती पाहिल्याबरोबर गरुड त्रास देणार नाही असं सांगितलं. याप्रमाणे शुकाचार्य महाराजांनी हे कालियामर्दनाचं चरित्र सांगितलं.

असंच एकदा राम-कृष्ण, गोपाल, अरण्यामध्ये गेले. त्यांचा खेळ सुरू झाला. दोन पक्ष केले. कृष्णपक्षाला काही गोपाळ. रामांच्या पक्षाला काही गोपाळ. आणि असं ठरलं की ज्या पक्षाचा पराभव होईल त्या पक्षातील मुलांनी दुसऱ्या पक्षातील लोकांना आपल्या खांद्यावर घेऊन, एक मोठा वटवृक्ष होता, त्याच्याजवळ जायचं. त्या वेळी कृष्णपक्षाचा पराभव झाला. कृष्णांनी आपल्या 'श्रीदामा' नावाच्या मित्राला खांद्यावर घेतलं. प्रलंब नावाचा दैत्य गोपालाचं रूप घेऊन त्यांच्यामधे मिसळलेला होता. तो कृष्णपक्षाला होता. प्रलंबाने बलरामांना खांद्यावर घेतलं आणि तो निघाला. प्रलंबासुर ठरलेल्या मर्यादेच्या पुढेच निघाला. आपलं मोठं रूप त्याने प्रगट केलं. बलरामांनी ते पाहिलं आणि रागाने त्याच्या मस्तकावर मूठ मारली. तो गतप्राण होऊन पडला.

अशा अनेक लीला झालेल्या आहेत. गोपालांचं संरक्षण, रामकृष्णांनीच सर्वदा केलेलं आहे. एकदा नदीतीरावर सर्व मंडळी बसलेली असताना चारी बाजूंनी मोठा अग्नी प्रगट झाला. सर्व मंडळी

घाबरली. भगवंतांनी सर्वांना डोळे मिटायला लावून तो दावाग्नि भक्षण केला म्हणतात, म्हणजे शांत केला.

असेच एकदा सर्व सवंगड्यांसह रामकृष्ण अरण्यामधे पुष्कळ दूर आलेले आहेत. त्या गाई घनदाट अरण्यामधे बऱ्याच दूर गेलेल्या आहेत आणि चारी बाजूला वणवा पेटलेला आहे. कृष्णांनी त्यांना डोळे झाकायला सांगितलं आणि एका क्षणाने उघडायला सांगितलं. तेव्हा अरण्याच्या बाहेर नेहमीच्या रस्त्यावर आपण आलो आहोत हे गोपालांना जाणवलं.

वर्षाऋतू आलेला आहे. वनात राहणारीच ती सर्व गोपाळ मंडळी. त्यांना सगळी सवय होती. पर्जन्य सुरू झाल्यावर काय करायचं याची. पुष्कळ पाऊस पडतो आहे. नदीचा प्रवाह मोठा झालेला आहे. त्यानंतर शरद ऋतू आलेला आहे. आश्विन– कार्तिक महिने. त्यावेळचंही वृंदावनाचं वर्णन आहे. शुद्ध पाणी आहे. धान्य आलेलं आहे. रोजचं कार्य चालू आहे. सकाळी गाईंना घेऊन वनामधे जावं, दिवसभर तिथे रहावं आणि संध्याकाळी परत यावं.

शुकाचार्य सांगताहेत राजा,

हेमन्ते प्रथमे मासि नन्दव्रजकुमारिकाः ।
चेरुर्हविष्यं भुञ्जानाः कात्यायन्यर्चनव्रतम् ।।१०.२२.१ ।। श्री. भा.

कालियामर्दन केल्यानंतर मात्र सर्व गोपालांची, गोपींची खात्री पटली की, हाच समर्थ आहे. याचंच सामर्थ्य आहे. ज्याच्यामुळे हा अनेक दैत्यांचा नाश करतो आहे. लहान असला तरी याचं सामर्थ्य मोठं आहे ही खात्री झाली.

हेमंत ऋतू, मार्गशीर्ष महिना आहे. पहाटे लवकर उठून गोपकन्या नदीतीरावर येत होत्या. एक महिना कात्यायनीची पूजा करण्याचं त्यांनी ठरवलं होतं. कालिंदी नदीमध्ये त्यांनी स्नान करावं. देवीची वाळूची मूर्ती करावी आणि तिची पूजा करावी. त्यांनी प्रार्थना करावी.

कात्यायनि महामाये महायोगिन्यधीश्वरि ।
नन्दगोपसुतं देवि पतिं मे कुरु ते नमः ।।१०.२२.४ ।। श्री. भा.

हे कात्यायनी देवी हा नंदकुमार श्रीकृष्ण आम्हाला पती म्हणून प्राप्त व्हावा असा आशीर्वाद तू दे. पहाटेअगदी अंधार असतानाच त्यांनी यावं. एके दिवशी त्या गोपकन्या तीरावरती वस्त्रं ठेवून

स्नानाकरता नदीत उतरल्या. तेवढ्यात गोपालकृष्ण आपल्या मित्रांसह तिथे आले. ती सगळी वस्त्रं गोळा केली. गाठोड बांधलं आणि झाडावर चढून बसले. त्या मुलींच्या  दृष्टीला पडलं हे. आता काय करायचं ? पाण्यामध्येच थांबलेल्या आहेत. थंडीचे दिवस आहेत. तिथूनच त्यांनी सांगितलं, गोपालकृष्णा, आमची वस्त्रं आम्हाला द्या. आपण जर वस्त्रं दिली नाहीत तर आम्ही नंदराजाला सांगू. थंडीचा त्रास होतो आहे. आम्ही आपल्या दासी आहोत. आपण सांगाल ते आम्ही ऐकू. गोपालकृष्ण म्हणाले, मी सांगेल ते ऐकण्याची तयारी आहे ना ? मग या इकडं ही वस्त्रे आहेत ती नेसा आणि चला. काय करणार ? थंडीचा त्रास होतो आहे. बाहेर आल्या. ती वस्त्रं नेसून तशाच उभ्या राहिल्या. गोपालकृष्ण म्हणाले, ही काय देवीची पूजा व्यवस्थित करता की नाही ? वस्त्रं तीरावर ठेवायची आणि नदीत असं स्नान करायचं शास्त्राला मान्य आहे का ? वस्त्राचा त्याग स्त्रियांनी केव्हाही करून उपयोग नाही. तुमचं हे स्नान फुकट गेलेलं आहे. आणि इतक्या पहाटे तुम्ही येता. कोण दैत्य कोणत्या वेळी येऊ शकेल याची तुम्हाला कल्पना पाहिजे. कोणालातरी बरोबर घेऊन यायचं. त्यांच्या मनामध्ये भगवान श्रीकृष्णांबरोबर रासक्रीडा करावी अशी पुष्कळ दिवसांची इच्छा होती. भगवंतांनी सांगितलं तुमचा संकल्प मान्य आहे. पुढे आपण रासक्रीडा करू म्हणाले.

न मय्यावेशितधियां कामः कामाय कल्पते ।
भर्जिता क्वथिता धाना प्रायो बीजाय नेष्यते ।।१०.२२.२६ ।। श्री. भा.

माझ्यावर प्रेम करणं याला काम म्हणत नाहीत. काम हा दोष आहे. पण माझ्याविषयी जर इच्छा उत्पन्न झाली, क्रीडा करण्याची, तर त्याला काही एक बंधन नाहीये. ज्वारी भाजल्यानंतर त्याची लाही होते. ती लाही पेरल्यानंतर काही अंकूर येत नाही. माझ्याकडे तुम्ही येता म्हणजे कर्म संपलेलं आहे. त्यातून पुन्हा कर्म निर्माण होणार नाही. असा एक उपदेश त्यांनी केलेला आहे. आगामी शरद ऋतूमध्ये आपण रासक्रीडा करू, असे आश्वासन त्यांनी दिलं. गोपी आपापल्या घरी निघून गेल्या.

त्या दिवशी तसेच पुढे गेले गोपालकृष्ण. बरेच दूरवर गेले. वृंदावन दूर राहिलेलं आहे. सर्वांना भूक लागलेली आहे. सर्व आले म्हणाले, रामा, कृष्णा आम्हाला भूक लागलेली आहे. तिथं जवळंच, ऋषींचे आश्रम होते. यज्ञयाग त्यांचे सारखे चालू असत. त्यांच्या स्त्रियाही मोठ्या भक्तिसंपन्न होत्या. त्या विप्रपत्नींवर कृपा करायची म्हणून भगवान आलेले आहेत. कृष्ण सांगताहेत, गोपालहो,

इथं जवळंच ऋषिंचे आश्रम आहेत. तिथे तुम्ही जा. माझं, रामाचं नाव सांगा आणि अन्न मागा. विचारून पहा. गोपालमंडळी यज्ञमंडपात आली. ऋषींना त्यांनी नमस्कार केला आणि विनंती केली, रामकृष्ण इथून जवळच आलेले आहेत. त्यांना भूक लागली आहे. तेव्हा त्यांना तुम्ही अन्न द्या. शास्त्राप्रमाणे यज्ञदीक्षा ज्यांनी घेतली आहे, त्याचं अन्न खाऊ नये असं आहे.

न दीक्षितस्य अन्नं अश्नीयात् ।।

पण त्यालाही अपवाद आहे. यज्ञामध्ये अशी काही कर्मं आहेत, ती कर्मं संपल्यानंतर अन्न घेतलं तर चालतं. हे सगळं गोपालांना माहिती आहे. ते ऋषि काहीही बोलले नाहीत. या गवळ्याबरोबर काय बोलायचं म्हणाले. हो म्हणाले नाहीत, नाही म्हणाले नाहीत. थांबाही म्हणाले नाहीत. निराश झाले गोपाळ आणि त्यांनी येऊन गोपालकृष्णांना सांगितलं की, ते ऋषी तर काही बोलायलाच तयार नाहीत. अन्न काही मिळत नाही. गोपालकृष्ण म्हणाले, तुम्हाला एक युक्ती सांगतो. पहिल्यांदाच  सांगायला पाहिजे होती परंतु ऋषिंची परीक्षा व्हायची होती.

मां ज्ञापयत पत्नीभ्यः ससंकर्षणमागतम् ।
दास्यन्ति कामं अन्नं वः स्निग्धा मय्युषिता धिया ।।१०.२३.१४ ।। श्री. भा.

सर्व बुद्धीसाक्षी परमात्मा आहे हा. म्हणून सर्वज्ञ आहे. कोणाची बुद्धी किती योग्यतेची आहे हे त्यांना सगळं माहिती आहे. ऋषीमंडळी खूप ज्ञानी आहेत. वेदशास्त्रांचा अभ्यास केलेला आहे. परंतु धर्माचं पूर्ण ज्ञान नाहीये. ज्याला भूक लागलेली आहे, त्याला अन्न देणं इकडे त्यांचं लक्ष नाहीये. भगवान म्हणाले, गोपालहो, यज्ञामधे ऋषिपत्नींकरता एक पत्नीशाला असते तिथे तुम्ही जा. माझं आणि रामाचं नावं सांगा. तुम्हाला निश्चित त्या ठिकाणी अन्न मिळेल. काही निराश होऊ नका. गोपाल आले पत्नीशालेमधे. त्या ऋषीपत्नींना साष्टांग नमस्कार त्यांनी केला. सांगताहेत, ऋषी पत्नींनो, आपल्याला आम्ही नमस्कार करतो. आम्ही, वृंदावनातून गोपाल आलेलो आहोत. आमच्याबरोबर गोपालकृष्ण आणि बलराम आलेले आहेत. त्यांना अत्यंत भूक लागलेली आहे म्हणून त्यांनी आम्हाला आपल्याकडे अन्न मागण्याकरता पाठवलं आहे.

गोपालकृष्ण आलेले आहेत, हे ऐकल्याबरोबर, ऋषिपत्नी उठल्या. तिथे काही अन्नाची कमी नव्हती.काही पात्रांमध्ये त्यांनी अन्न काढून घेतलं. गोपालकृष्णाच्या दर्शनाची तीव्र तळमळ आहे. मथुरेला जाताना गोपी इथे थांबत होत्या, दही-दूध द्यायला. त्या गोपींकडून गोपालकृष्णांच्या दिव्य लीलांच वर्णन त्यांनी ऐकावं. गोपी अत्यंत प्रेमभराने ते वर्णन करीत. ऋषीपत्नींना काही

घरदार सोडून वृंदावनात जाता येत नव्हतं. पण दर्शनाची उत्कंठा आहे. गोपालकृष्णांना कधीतरी पहावं अशी इच्छा आहे. आज योग आलेला आहे. अन्न घेऊन त्या निघाल्या. यज्ञ चालू आहे, केव्हा आपली गरज लागेल, सगळं विसरल्या. कर्म घेऊन काय करायचंय. यज्ञ करून ज्याचा प्रसाद संपादन करायचा आहे, तो प्रत्यक्ष इथे आलेला असताना, यज्ञ करून काय करायचंय ? कर्म सोडायचीही तयारी मनाची झाली पाहिजे. तोच आग्रह उपयोगी नाही. पति, बंधू, आईबाप यांनी पुष्कळ प्रतिबंध केला. थांबा, जाऊ नका. पण या ऋषिपत्नींनी काही ऐकलं नाही. प्रत्यक्ष परमात्मा इथे आला असताना कसली यज्ञकर्मं घेऊन बसलात म्हणाल्या. अन्न घेऊन त्या वेगाने आल्या गोपालकृष्णांकडे. ते मेघःश्याम रूप त्यांनी पाहिलं. गळ्यामध्ये वनमाला घातलेल्या आहेत. हातामध्ये एक कमल घेतलेलं आहे, मित्राच्या खांद्यावर हात ठेवलेला आहे आणि कमल फिरवायचं काम चाललेलं आहे. दर्शन झाल्याबरोबर, त्यांच्या चित्ताचं समाधान झालेलं आहे. किती दिवस कर्म, यज्ञ करत बसायचं म्हणाल्या. गोपींनाच शास्त्राचं खरं रहस्य समजलेलं आहे असं म्हणायला हरकत नाही. गोपालकृष्ण म्हणाले, या, या, विप्रपत्नींनो तुमचं स्वागत असो. आम्हाला पहाण्याकरता आपण आलात ! चांगलं आहे. सर्वही भक्त तुमच्यासारखे माझ्यावर प्रेम करतात. त्यांच्या अंतःकरणात शुद्ध भक्ती असते. झालं आता भेट झाली आम्ही हे अन्न घेतो. तुम्ही आता परत जा. तिकडे यज्ञ चाललेला आहे. सगळे ऋषी वाट पहात असतील. यज्ञकर्माला प्रतिबंध होऊ नये. त्या विप्रपत्नी म्हणाल्या, देवा याकरताच आम्ही आलो का ? असं कठोर तुम्ही बोलताय! आल्याबरोबर आम्हाला जायला सांगताय ? आपलं सान्निध्य घडावं, आपली सेवा घडावी म्हणून, सर्व घरदार सोडून आम्ही आलेलो आहोत आणि आम्हाला आता घरात घेणारही नाहीत. त्यांची आज्ञा उल्लंघन करून आम्ही आलो. त्यांना राग आलेला असेल. भगवान सांगताहेत,

पतयो नाभ्यसूयेरन् पितृभ्रातृसुतादयः ।।१०.२३.३१ ।। श्री. भा.

कोणीही तुमच्यावर रागावणार नाही. जगामध्ये कुणीही तुमच्यावर रागावणार नाही. परमात्मा अनुकूल झाल्यावर, परमेश्वराचा प्रसाद झाल्यावर रागावणार कोण ? तेव्हा केवळ माझ्याजवळ रहाणं याला काही खरं प्रेम म्हणत नाहीत.

तन् मनो मयि युञ्जाना अचिरान् मां अवाप्स्यथ ।।१०.२३.३२ ।। श्री. भा.

घरातंच रहा तुम्ही आणि मन माझ्याठिकाणी ठेवा म्हणजे लवकर तुम्हाला माझी प्राप्ती होईल. नंतर त्या ऋषीपत्नी भगवान श्रीकृष्णांचं दर्शन घेऊन अत्यंत समाधानाने घरी परत

आलेल्या आहेत. कुणीही रागावलं नाही. सर्व यज्ञकर्म पार पडलेलं आहे. रामकृष्णांनी गोपालांसह ऋषिपत्नींनी आणलेलं अन्न सेवन केलं आणि वृंदावनामध्ये निघून गेले. त्या ऋषींना पश्चात्ताप झालेला आहे. स्त्रियांच्या मनात केवढी भगवत्भक्ती आहे आणि आमच्या अंतःकरणात त्याचा लवलेशदेखील नाही. ब्राह्मणजन्म मिळाला. वेद-शास्त्रांचा अभ्यास झाला. कर्मानुष्ठान झालं पण आज हे सर्व फुकट गेलेलं आहे.

धिक् कुलं धिक् क्रियादाक्ष्यं विमुखा ये त्वधोक्षजे ।।१०.२३.३९ ।। श्री. भा.

अधोक्षजापासून आम्ही पराङ्मुख झालो, परमेश्वराकडेआमचं लक्ष नाही. त्यामुळे आजपर्यंतचं सर्व कर्म फुकट गेलेलं आहे. काय भगवंतांची माया आहे. सर्वांचे गुरू म्हणून ओळखले जाणारे आम्ही, आज देव जवळ आल्यानंतर त्यांच्याकडे पाठ फिरवली. आमच्या स्त्रियांच्या मनामध्ये जगत्गुरू श्रीकृष्णाबद्दल केवढी भक्ती आहे? यांना उपनयनादि संस्कार नाहीत. वेदशिक्षण नाही, यज्ञयाग ह्या वेगळेपणाने करू शकत नाहीत. पण तरीसुद्धा यांच्या अंत:करणामध्ये केवढी तीव्र भक्ती आहे जी आम्हाला एवढे संस्कार असूनसुद्धा प्राप्त झाली नाही. खरा स्वार्थसुद्धा आम्हाला साधत नाही. परमेश्वराला अन्न मागायचं काय कारण होतं? मुद्दाम आमची परीक्षा पहाण्याकरता त्यांनी गोपालांना पाठवलं. पण आम्ही काही ते जाणू शकलो नाही. आमच्या स्त्रियांच्यामुळे तरी आमचा उद्धार होईल म्हणाले. त्यांच्या भक्तीमुळे भगवान श्रीकृष्ण आमच्या अपराधाची क्षमा करतील. पुन्हा त्यांना वाटलं, आपण वृंदावनात जाऊन दर्शन घेऊ. पण त्यांना दर्शन मिळायचं नव्हतं.

दिदृक्षवो अपि अच्युतयोः कंसाद् भीता न चाचलन् ।।१०.२३.५२ ।।

पश्चाताप होऊन रामकृष्णांच्या दर्शनाची इच्छा झाली. पण कंसाची मूर्ती डोळ्यासमोर आली. कंसाला जर कळलं आम्ही वृंदावनात गेलो तर आमचे आश्रम रहाणार नाहीत. त्यांनी पाहायचं होतं परीक्षा घेऊन. आश्रम राहिला असता की नाही पण नाही. राम-कृष्णांचं सामर्थ्य समजलेलंच नाही. त्यांना दर्शन व्हायचंच नव्हतं हेच खरं.

एकेदिवशी प्रतिवर्षाप्रमाणे, गोपालांनी इंद्रयाग करण्याची तयारी सुरू केली. भगवंतांना हे माहिती आहे. पण त्यांनी जिज्ञासू बुद्धीने नंदाला विचारलं, पिताजी, ही गडबड कसली चालू आहे? कसली तयारी चालू आहे? कोणतं कर्म करणार आहात? त्याचं फल काय आहे? या यज्ञाची देवता कोण आहे? कशाकरता हा यज्ञ करायचा हे सांगा मला. काही लोक कर्माचं पूर्ण

ज्ञान करून घेऊन कर्म करतात तर काही लोक श्रद्धेनं करतात पण कर्माचं पूर्ण ज्ञान त्यांना नसतं. ज्ञानपूर्वक कर्म केलं की त्याचं उत्तम फल मिळतं. नंद सांगतात बाबा,

पर्जन्यो भगवान् इन्द्रो मेघास्तस्य आत्ममूर्तयः ।
तेऽभिवर्षन्ति भूतानां प्रीणनं जीवनं पयः ।।१०.२४.८।। श्री. भा.

इंद्र हा मेघांचा स्वामी आहे. त्या मेघापासून आम्हाला जल मिळतं. त्या पाण्यामुळे आम्हाला धान्य मिळतं. गाईंना गवत मिळतं. त्यामुळे आम्ही सुखी रहातो. तेव्हा हे इंद्राचे उपकार फेडण्याकरता ही पूजा आम्हाला करायला नको का? इंद्राकरता म्हणून आम्ही हा यज्ञ करतो. भगवंताला इंद्राची परीक्षा पहायचीय. नेमलेले सर्व अधिकारी हे अहंकाराने वागतात का दयेने वागतात हे पहायचंय. इंद्राला राग यावा आणि तो कसा वागतो ते पहावं, म्हणून इंद्राची पूजा बंद करायची भगवंताने ठरवलं. भगवंताने आरंभाला, कर्म हेच श्रेष्ठ आहे असा सिद्धांत सांगितला. देव वगैरे नाही म्हणाले. मिमांसा शास्त्राचा सिद्धांत.

कर्मणा जायते जन्तुः कर्मणैव विलीयते ।
सुखं दुःखं भयं क्षेमं कर्मणैव अभिपद्यते ।।१०.२४.१३ ।।श्री. भा.

कर्मानेच जीव जन्माला येतो आणि ते कर्म संपल्यानंतर शरीरपात होतो. सुख दुःख हे सर्व कर्मामुळेच मिळतं. ईश्वराचा काही संबंध नाही. त्याने केलेल्या कर्माचं त्याला फळ मिळतं. ईश्वर आहे असं जरी मानलं, तरी त्या त्या जीवांचं ते ते कर्म पाहून तो फल देतो. म्हणजे कर्म हे श्रेष्ठ झालं का नाही? चांगली कर्म करावीत म्हणजे चांगलं फल मिळतं. ईश्वराचा याच्यामध्ये काय संबंध येतो म्हणाले. इंद्राचा याच्यात काय संबंध आहे? आम्ही कर्तव्यकर्म यथास्थित करतो म्हणून पाऊस पडतो. पाऊस का पडतो हे सांगणार आहेत पुढं. आपल्या स्वभावाला अनुसरून ही कर्म आपल्या वाट्याला आली आहेत ती आपण करायची. सामान्य धर्म, विशेषधर्म याप्रमाणे वागायचंय. आमची कर्म म्हणजे गाईचं रक्षण करणं. कृषिकर्म करणं. आम्ही गाईचं पालनपोषण करतो, त्यांचं संरक्षण करतो. त्यांच्यापासून आम्हाला दूध प्राप्त होतं यात इंद्राचा संबंध कुठे आला? इंद्र आम्हाला काय देतो? इंद्र पाऊस पाडतो काय? सांख्य सिद्धांत सांगताहेत. सत्व, रज आणि तम हे तीन पदार्थ आहेत. सर्वव्यापी आहेत. पंचभूतात्मक सृष्टी जशी आहे तशी त्रिगुणात्मक सृष्टी आहे. त्रिगुणांमुळेच सृष्टीकार्य चालू आहे. 'प्रकृतिः कर्त्री' हा सिद्धांत त्यांनी मांडला नाही. त्रिगुणांच्या स्वाधीन सगळं आहे हे सांगायचं नाही. परंतु या त्रिगुणांपैकी जो रजोगुण आहे त्याचं कार्य म्हणजे

विश्वाची उत्पत्ती. सर्व जीव उत्पन्न होणं हे रजोगुणाचं कार्य आहे. रजोगुण म्हणजे क्रिया आहे. त्या क्रियेमुळे मेघ येतात. त्यातून पाऊस पडतो. म्हणजे हा क्रियेचा परिणाम आहे. आपोआप हे सर्व कार्य चाललेलं आहे. रूपांतर होणं. पर्जन्य पडल्यावर, बी पेरल्यावर त्याचं धान्यात रुपांतर होतं हे कार्य चाललेलं आहे. यात कुणी प्रवर्तक नाही म्हणाले. या रजोगुणामुळे सर्व चाललेलं आहे. इंद्राचा काहीही संबंध नाही. इंद्राला तुम्ही कधी पाहिलं आहे?

महेन्द्रः किं करिष्यति ।।१०.२४.२३ ।। श्री. भा.

हे विचारताहेत, आम्ही वनात रहाणारे, डोंगरावर रहाणारे हा गोवर्धन पर्वतच आमचा देव आहे. याच्यामुळे आमच्या गाईंना गवत मिळतं, फळं मिळतात. याची पूजा करायला पाहिजे. प्रत्यक्ष देव समोर असताना त्याची पूजा करायची सोडून इंद्राची पूजा कशाला करायची? इंद्राची परीक्षा पहाण्याकरता, हा निरीश्वरवाद मांडलेला आहे. सांख्यही निरीश्वरवादी आहेत. मिमांसकही निरीश्वरवादी आहेत. वेदावर त्यांची श्रद्धा आहे. नास्तिक नाही आहेत. पण प्रत्येकाने आपापलं कर्म केलं पाहिजे. तेव्हा गोवर्धनाची पूजा करा. गाईपासून आपल्याला दूध मिळतं. त्या दुधामुळे दही, तूप, लोणी मिळतं म्हणून त्या गाईंची पूजा करा. जे अत्यंत तपस्वी ब्राह्मण आहेत त्यांची पूजा केली पाहिजे. त्यांना सोडून तुम्ही इंद्राची पूजा करता हे आम्हाला पसंत नाही. सगळ्यांना पटलं ते. खरंय म्हणाले. प्रत्यक्ष दिसणाऱ्या देवाचीच पूजा करावी म्हणाले. श्रीकृष्णांनी सांगितलं, करा सगळी तयारी करा. ऋषींना अन्नदान करा. गाईंना चारा घाला. गोवर्धनाची पूजा करा. त्याला प्रदक्षिणा घाला, त्याला बलिदान करा. कालात्मा श्रीहरी आहे. कालरूपाने सर्वांवर त्याचं लक्ष आहे. तो कुठे नाही असं नाही. काल सगळीकडे आहे. सर्व नंदादिक गोपालांना समाधान झालं बरंय म्हणाले. आजपर्यंत समजलं नाही. ब्राह्मण मंडळी आली, स्वस्तिवाचन झालेलं आहे. आणि गोवर्धनाची पूजा केली, गाईंची पूजा केली, ब्राह्मणांचा आदरसत्कार केला. त्यांना अन्नदान केलं. सर्वांचं भोजन झालं. गोवर्धन पर्वताला बलिदान केलं आणि सर्व मंडळी गोवर्धनाला प्रदक्षिणा करण्याकरता निघाली. राम-कृष्ण गाडीमधे आपल्या मातांजवळ बसलेले होते. बाकीचे गोपाळ चालत निघाले. मधेच गोवर्धन पर्वताचं रूप धारण केलं भगवंताने. ते बोलायला लागले, म्हणजे हेच होते. तुम्ही माझी पूजा केलीत, मला समाधान झालं. असंच करत चला. तुमचं रक्षण मी करीन. इथं गाडीमधे गोपालकृष्ण बसलेले आहेत. तुमची पूजा तुमच्या देवाला मिळाली म्हणाले. हा गोवर्धन म्हणजे आमचा देव आहे. त्यांनी आपल्याला दर्शन दिलेलं आहे. नमस्कार करा म्हणाले. आपणही नमस्कार केला. इंद्र तुम्हाला येऊन असं कधी भेटला होता का? प्रदक्षिणा

करून सर्व मंडळी आपल्या स्थानात येऊन पोहोचलेली आहेत. इंद्राला मात्र राग आलेला आहे. या गोपालांनी आपला धर्म सोडून दिलेला आहे. कृष्णांनी धर्म परिवर्तन केलं नाही. देवताबुद्धी कायम आहे. ती बुद्धी कुठं ठेवायची एवढं फक्त सांगितलं. इंद्राने रागाने आपल्या प्रलयकालच्या मेघांना बंधनातून मुक्त केलं आणि गोकुळावर जलवर्षाव करून गोकुळाचा नाश करा अशी त्यांनी आज्ञा केली. मीही येतो म्हणाले. आणि पाऊस पडायला सुरुवात झाली. भयंकर पाऊस पडतो आहे. सूर्यदर्शन नाही. जिकडे-तिकडे पाणीच पाणी आहे. सगळे गोपाल, गाई, गोपी सर्व गोपालकृष्णांकडे आलेले आहेत, आणि सांगताहेत, बाबा, इंद्र रागावलेला आहे. त्याचा यज्ञ आम्ही केला नाही म्हणून ही पर्जन्यवृष्टी होते आहे. आपण आता जिवंत कसे रहाणार? गोपालकृष्णांनी पाहिलं, या म्हणाले. सगळ्यांना घेऊन बाहेर आले आणि तो गोवर्धन पर्वत उचलून हातावर धारण केला. त्याच्याखाली जाऊन रहा म्हणाले. पण पाणी आत जातंच होतं. शेष भगवान होतेच तिथे. त्यांनी चारी बाजूंनी प्रतिबंध केला. पाण्याचा एक थेंब आत जाईना. सर्व गोप-गोपी, गाई, वासरं सर्वजण सुरक्षित त्या गोवर्धन पर्वताच्या आश्रयाने रहाताहेत. पाऊस पडेना बाहेर. असे सात दिवस निघून गेले. परंतु

सप्ताहं नाचलत् पदात् ।।१०.२५.२३ ।।श्री. भा.

सात वर्षांचं वय होतं गोपालकृष्णांचे आणि गोवर्धन पर्वत धारण करून उभे राहिलेले आहेत. सात दिवस झाले तरी एक पाऊलदेखील मागेपुढे नाहीये. हे कृष्णांचं योगसामर्थ्य इंद्राच्या दृष्टीला पडलेलं आहे. सामर्थ्य दृष्टीला पडल्याशिवाय अहंकार दूर होत नाही. भीतीनेही अहंकार दूर होतो आणि ही भीतीच आहे. यापेक्षा जास्ती अविनय जर आपण दाखवला तर आपल्याला शासन होईल ही भीती आहे. पदावरून खाली जावं लागेल. लगेच इंद्राने आपले मेघ आवरले. पाऊस बंद झाला, सूर्यप्रकाश पडलेला आहे. सर्वांना श्रीकृष्णांनी बाहेर जायला सांगितलं आणि सर्वांसमक्ष तो गोवर्धन पर्वत जागच्या जागी ठेवून दिलेला आहे. गोप-गोपींना आनंद झाला. प्रेमाने त्यांनी गोपालकृष्णांना आलिंगन दिलेलं आहे. देव-गंधर्वांनी पुष्पवृष्टी केलेली आहे. वाद्यं वाजताहेत.

गोपाल मंडळी एकदा बोलत बसलेली असतांना त्यांनी नंदाला विचारलं की, हा तुझा मुलगा कोण आहे बाबा. काय विलक्षण सामर्थ्य याचं आहे! सात वर्षांचा मुलगा आणि त्याने एवढा मोठा पर्वत हातावर धारण करून आमचं रक्षण केलं. तेव्हा तुझा मुलगा आमच्यासारखा मानव नाहीये. कोणीतरी लोकोत्तर पुरूष आहे. परमेश्वराचा अंश आहे. नंदाने सांगितलं, तुमचं म्हणणं खरंय.



गर्गाचार्यांनी याचं नामकरण केल्यानंतर मला सांगितलं होतं की हा मुलगा अत्यंत सामर्थ्यवान आहे. वासुदेव याचं नाव आहे. अनेकांचं संरक्षण पूर्वी याने केलेलंय. तुम्हालाही सर्व संकटातून हा तारणार आहे. याच्यावर प्रेम करा म्हणजे सर्व संकटातून तुम्ही मुक्त व्हाल. हे गर्गाचार्यांचं सांगणं तुम्हाला मी आज सांगतो आहे. हा आमच्यापैकी मानव नाहीये हे खरं आहे.

गोवर्धन पर्वत धारण करून सर्वांचं रक्षण भगवंताने केलं आणि इंद्राचा अहंकार दूर झाला आणि तो क्षमा मागण्याकरता एकांतात आलेला आहे. गोपालकृष्णांच्या पायावर मस्तक ठेवलं आणि क्षमा मागतोय. भगवंता, आपलं सामर्थ्य मी विसरून गेलो. अहंकारामुळे माझ्या हातून हा अपराध घडलेला आहे. आपण मला क्षमा करा. भगवान श्रीहरी म्हणाले,

मया ते ऽकारि मघवन् मखभङ्गोऽनुगृण्हता ।<br>
मदनुस्मृतये नित्यं मत्तस्येन्द्र श्रिया भृशम् ।।१०.२७.१५।। श्री. भा.

स्पष्ट बोलले. इंद्रा तुझा यज्ञ मीच बंद करायला सांगितला. तुझ्यावर मला अनुग्रह करायचाय. कृपा करायची आहे. स्वर्गाचं राज्य आणि ऐश्वर्य मिळाल्यामुळे तू उन्मत्त झालास आणि या गरीब लोकांचा आणि प्राण्यांचा नाश करायचा तू प्रयत्न केलास. तुझ्यापुढे यांची काय शक्ती आहे? तुला असा सामर्थ्याचा अहंकार धारण करून चालणार नाही. ते स्थान तुला दिलंय ते असं

मारण्याकरता नाहीये. शक्तिचा उपयोग असा करून उपयोग नाही.

शक्तानां भूषणं क्षमा ।।

खरा शक्तिसंपन्न जो आहे त्याच्याजवळ क्षमा असली पाहिजे. ती तुझ्याजवळ नाहीये. ऐश्वर्याचा मद ज्याला झालाय त्याचं लक्ष माझ्याकडे जात नाही. तो आपल्या अहंकारामध्येच निमग्न असतो. जा आपला अधिकार सांभाळ. दयाबुद्धि धारण करून सर्वांचं रक्षण कर. त्रैलोक्याचं रक्षण करण्याचा तुला अधिकार दिलेला आहे हे लक्षात ठेव. गोलोकातून ती कामधेनू गोमाता आलेली आहे. ती म्हणाली, देवा आमचे इंद्र आपणच आहात. या इंद्राने आमचा नाश करण्याचा प्रयत्न केला पण आपल्यामुळे आमचं संरक्षण झालेलं आहे. गाईंचा इंद्र म्हणजे गोविंद, हे नाव त्यावेळेपासून पडलेलं आहे. त्या कामधेनूने आपल्या दुधाने भगवंताला अभिषेक केला. इंद्रानेही ऐरावताच्या सोंडेतून आकाशगंगेचा अभिषेक केला आणि दोघेही आपापल्या स्थानाला निघून गेलेले आहेत.

एकदा एकादशी होती. नंद रात्रीच उठला आणि स्नान करण्याकरता मध्यरात्रीच नदीवर गेला. वरुणाचा दूत त्यावेळी जलक्रीडा करत होता. तो नंदाला पाण्यात ओढून वरुणलोकात घेऊन गेला. नंद स्नानाला गेला आणि परत आला नाही. हे सगळ्यांना कळल्यावर सगळे घाबरले. त्यांना वाटलं हा काय बुडाला काय नदीमध्ये? भगवंतांच्या कानावर ही बातमी पोचली. श्रीकृष्ण परमात्मा लगेच वरुणलोकात जाऊन पोचले. भगवंताजवळ ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती अप्रतिहत आहेत कधीही या शक्ती कमी होत नाहीत. वरुणाने लगेच सिंहासनावर बसवून त्यांची पूजा केली. नंद होताच तिथे. माझ्या दूताने आपल्या पित्याला आणलं, त्याला काही माहित नव्हतं. आपण मला क्षमा करा आणि आपल्या पित्याला घेऊन चला. नंदाला घेऊन गोपालकृष्ण नदीतून वर आले. आणि नंदाने सांगितलं, काय विलक्षण आहे. वरुणासारखे लोकपाल कृष्णाच्या पायावर डोकं ठेवतात. याने मला वरुणलोकातून इकडे आणलं. सर्वही लोकांच्या लक्षात आलं की हा वैकुंठपती आहे. तेव्हा वैकुंठलोक आम्हाला कधीतरी पहायला मिळेल काय? भगवंताने विचार केला, हे सर्व जीव जन्म-मृत्यू चक्रात सारखे अडकलेले आहेत. यांना कधी वैकुंठ लोक दिसणार? म्हणून भगवंताने प्रथम त्यांना आपलं स्वरूपज्ञान दिलं आणि वैकुंठलोकही दाखवला. सर्वांना अत्यंत आनंद झालेला आहे.

शुकाचार्य आता रासक्रीडेचं चरित्र सांगताहेत. परमेश्वराजवळ स्त्री-पुरुष हा भेद नाही आहे.

सर्व सृष्टी ज्याने निर्माण केलेली आहे, सृष्टीचं कर्तृत्व ज्याच्याकडे आहे त्याला हा चांगला, हा वाईट असा किंवा कोणताच भेद नाहीये. गोपींची इच्छा आहे रासक्रीडा व्हावी म्हणून. त्यालाही संमती दिली भगवंताने. गोपालांच रक्षण करायचं. यांचही रक्षण केलं पाहिजे. रक्षण म्हणजे त्यांच्या बुद्धीप्रमाणे, मनाप्रमाणे जर घडून आलं तर त्यांचंही समाधान आहे. आश्विन महिन्यातल्या पौर्णिमेला रात्रीच्या वेळी भगवान यमुनातीरावर आलेले आहेत आणि त्यांनी गायन करायला आरंभ केला. पूर्ण चंद्र उदयाला आलेला आहे. त्या स्वर्गीय गायनाचा आवाज गावामध्ये गोपींच्या कानावर पडलेला आहे. तो आवाज कानावर पडल्याबरोबर तो काममोह जो आहे. अनंग जीवनं, अनंगवर्धनम् म्हणताहेत. तो अनंग वाढलेला आहे चित्तामध्ये. गोपालकृष्णांना भेटण्याकरता गेलं पाहिजे. या तीव्र भावनेने सर्वही गोपी घराबाहेर पडलेल्या आहेत. सगळी हातातली कामं टाकून दिली. काही गोपी धार काढायला बसल्या होत्या, त्या गोपी चरवी तिथेच ठेवून निघाल्या. दूध तापवताहेत, स्वयंपाक करताहेत, मुलांना जेवायला वाढताहेत पण सगळी कर्मं टाकून दिलेली आहेत. निघाल्या त्या सर्व गोपी. कुणाचीही आज्ञा मान्य नाही. पती, पुत्र, पिता, भ्राता सगळे स्वस्थ राहिलेले आहेत. परमात्मा श्रीहरी हा आपला प्रिय सखा आहे. तोच उपास्य आहे. त्याचंच ध्यान करायचंय. या प्रेमामुळे त्या गोपी मुक्त झालेल्या आहेत. राजाने विचारलं, महाराज! गोपीचं हे कृत्य धर्म म्हणायचं का ?

कृष्णं विदुः परं कान्तं न तु ब्रह्मतया मुने।
गुणप्रवाह उपरमस्तासां गुणधियां कथम् ।।१०.२९.१२।। श्री. भा.

गोपालकृष्ण म्हणजे एक सुंदर राजपुत्र आहे. एवढीच त्याची दृष्टी आहे. ह्या पांचभौतिक शरीरावर त्याचं प्रेम आहे. त्रिगुणात रहाणाऱ्या गोपी त्रिगुणातून बाहेर कशा पडल्या? संशय आहे. आधी गोपींबद्दल विचारतोय. कृष्णांना इतक्यात बोलला नाही राजा. पुढे बोलणार आहे. गोपींनी हे कर्म चांगले केलं नाही असं मला वाटतंय. शुकाचार्य म्हणाले, राजा तुला पूर्वी शिशुपालाची कथा सांगितली आहे ना? जन्मभर भगवंतांचा द्वेष करणारा शिशुपाल मुक्त झाला मग प्रेम करणाऱ्या गोपींना मुक्ती मिळणार नाही? त्यांनी जे प्रतीक डोळ्यासमोर ठेवलेलं आहे तो परमात्मा आहे. इतर कोणावर त्यांनी प्रेम केलं असतं तर तो अधर्म झाला असता. पण त्यांच्या डोळ्यासमोर त्यांच्या मनामध्ये सर्वदा परमात्म्याची मूर्ती आहे. त्याचा हा प्रभाव आहे. काम, क्रोध, द्वेष सगळं हरीबद्दल आहे. हरीबद्दल असताना हे विकार होत नाहीत. उलट अंत:करण तन्मय होऊन जातं.

योगेश्वर श्रीकृष्ण परमात्म्याची मूर्ती ज्यांनी मनामध्ये बाळगली, त्यांना मोक्ष कसा मिळाला हा संशय तू मनामध्ये बाळगू नकोस. सर्व गोपी आलेल्या आहेत. गोपालकृष्णांनी त्यांचं स्वागत केलं. 'या' कशाकरता आलात? एवढ्या रात्रीच्या वेळेला घरदार सोडून इथे आलात? तुमचे माता-पिता, पति सगळे तुमचा शोध करत असतील, कुठे गेलात म्हणून? वनाची शोभा पाहिली आता तुम्ही घरी जा. तुमची मुलं तुमची वाट पहात असतील. माझ्यावरच्या प्रेमाखातर तुम्ही इथे आलात. सर्व जीव माझ्यावर प्रेम करतात. तुमचं कर्तव्य असं आहे.

भर्तुः शुश्रूषणं स्त्रीणां परोधर्मो ह्यमायया ।
तद्बन्धूनां च कल्याण्यः प्रजानां चानुपोषणम् ।। १०.२९.२४ ।। श्री. भा.

स्त्रियांचं हे कर्तव्य आहे की अपल्या पतीची सेवा करणं. पतीच्या आप्तबांधवांची सेवा करणं. मुलांबाळाचं संगोपन करणं. हे तुमचं प्रथम कर्तव्य आहे. कसाही दोषी पती असला तरी त्याचा त्याग स्त्रियांना करता येणार नाही आणि माझ्या जवळ राहून काय करणार? जवळ राहून प्रेम रहात नाही. दूर राहिलं तर प्रेम रहातं. जा तुम्ही घरी जा. तुमचं प्रेम तिथं राहूनच चांगलं राहील.

शुकाचार्य महाराज सांगतात, राजा त्या गोपींनी हे ऐकल्याबरोबर त्यांना अत्यंत वाईट वाटलेलं आहे. अतिशय दुःख झालेल्या त्या गोपींच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहताहेत. त्या म्हणाल्या, देवा, केवढं कठोर भाषण आपण करता! आपल्या दर्शनाकरता आम्ही इथे आलो आणि आम्हांला घरी जायला सांगता? तुमच्या दर्शनाने संसारबंधनातून मुक्त होता येतं आणि तुम्ही आम्हाला संसारातच राहायला सांगता? कर्ममार्गच श्रेष्ठ आहे. शास्त्राची आज्ञाच श्रेष्ठ आहे. तुमचं दर्शन, सान्निध्य, चिंतन याचं काही फल नाही का? सामर्थ्य नाही का? कशाला या पती-पुत्र संसारामध्ये आम्हाला पाठवता! आजपर्यंत आम्ही संसारात होतो पण आता मात्र आम्ही संसारातून बाहेर पडलेलो आहे. आम्हाला कशाचीही काळजी नाही. संबंधच नाही. आपलं दर्शन जर आम्हाला घडतंय तर हे सोडून आम्ही कसं जायचं? आम्ही जाऊ शकत नाही. भगवती लक्ष्मीदेवीला चंचल म्हणतात पण ती आपल्या चरणाजवळ आलेली आहे. स्थिर आहे. तेव्हा आता आम्हाला घरी पाठवू नका. आपली सेवा घडावी एवढीच आमची इच्छा आहे. असं त्या सर्वही गोपींनी निक्षून सांगितल्यावर भगवान श्रीकृष्णांनी त्या गोपींबरोबर रासक्रीडेला सुरुवात केली. त्या शेकडो गोपी आहेत. तितकी रूपं भगवंताने घेतली आणि प्रभु रास रचताहेत. गोपींच्या मनामध्ये प्रेम आहेच. परंतु आता थोडा अभिमान उत्पन्न झाला की आम्ही सुंदर गोपी आहोत, आमच्या मोहजालात

गोपालकृष्ण आलेला आहे. आमच्या ताब्यात आला आहे. हा त्या गोपींचा अभिमान दूर करण्यासाठी आणि त्यांच्यावर प्रसाद करण्यासाठी भगवान एकदम अदृश्य झाले. त्या सर्व स्त्रिया घाबरल्या. इकडेतिकडे पहाताहेत. देहभान नाहिसं होऊन त्या शोध करीत निघाल्या. झाडाला विचारताहेत.

दृष्टो वः कच्चिदश्वत्थ प्लक्ष न्यग्रोध नो मनः ।

नन्दसूनुर्गतो हृत्वा प्रेमहासावलोकनैः ॥१०.३०.५॥ श्री. भा.

हे वटवृक्षा, आमचं मन हरण करून घेऊन गेला गोपालकृष्ण. तो तुम्हाला भेटला का? कुठंय सांगा

आता त्या झाडांनी काय उत्तर द्यावं? पण कृष्णप्रेमामध्ये निमग्न झालेल्या गोपी कृष्णाशिवाय दुसरा विचारही त्यांच्या मनात नाही. त्यांना कुणाला विचारावं आणि कुणाला नाही याचंही भान राहिलं नाही. योग्य-अयोग्य विचार करण्यासारखी मनाची स्थिती नाहीये. पुष्कळ दूर गेलेल्या आहेत. पुढे गाढ अंधार आहे, दाट अरण्य आहे परत आल्या. कृष्णलीलेचं संस्मरण करताहेत. आणि शेवटी कृष्णदर्शन झालं नाही म्हणून अत्यंत वियोगदुःख झालं आणि त्या दुःखावेशामध्ये त्यांनी भगवान कृष्णांची प्रार्थना करायला सुरुवात केली.

गोपी अत्यंत शोकाकुल झालेल्या आहेत. भगवंतांचं ते सगुण स्वरूप केव्हा आपल्याला दिसेल याची वाट पहाताहेत. ध्यानामध्ये आणताहेत आणि गोपालकृष्णांची प्रार्थना करताहेत. अत्यंत प्रेम त्या प्रार्थनेत आहे. ज्ञान ही आहे आणि प्रेमही आहे

न खलु गोपिकानन्दनो भवान् ।

अखिलदेहिनां अन्तरात्मदृक्॥ १०.३१.४॥ श्री. भा.

बाह्य रूपाच्या ठिकाणी ही आसक्ती आहे. मुख्य जे रुप आहे, अंतरात्मा परमात्मा आहे. ब्रह्मदेवाने प्रार्थना केल्यामुळे जगत्रक्षणाकरता आपण हे रूप घेऊन आलात. त्या स्वरूपाचीही जाणीव आहे त्यांना पण मनं तिथे टिकत नाही. मनाला हे रूप अत्यंत प्रिय आहे. आणि मन तिथे अत्यंत स्थिर आहे. भक्तिमार्गामध्ये समाधी लागण्याकरता प्रयत्न करावा लागत नाही. वैराग्य मिळवण्याकरता प्रयत्न करावा लागत नाही. इंद्रियनिग्रह करण्याकरता प्रयत्न करावा लागत नाही. अंतःकरणामध्ये प्रेम भरलेले आहे, गोपालकृष्णांचं. संसार एकदम टाकून दिला त्यांनी. अनंत जन्मांच्या वासना चित्तामधे होत्या त्या गेल्या. भगवंतांचं कथामृत हे संसारतृप्त झालेल्या जीवांचं जीवन आहे. हे सगळं जाणताहेत.आपण देवा वनामध्ये जाता, एकेक क्षण म्हणजे आम्हाला

एकएक युगासारखा वाटतोय. संध्याकाळपर्यंत आपल्या मार्गाकडे लक्ष लावून आम्ही बसतो. आपलं दर्शन झालं म्हणजे समाधान वाटतं. कोमल, मृदू आपले चरण आहेत. अरण्यात आपल्या पायाला काटे टोचतात, दगड लागतात आणि आमच्या मनाला अत्यंत व्यथा होतात कारण तिथंच मन आहे ना? शरीराची शुद्धच रहात नाही. आपल्याला काही दगड लागला, काटा टोचला, इकडे लक्ष नाहीये. त्या भगवंताचंच अखंड चिंतन चाललेलंआहे.गोपी म्हणताहेत, देवा, आपल्या गायनाचा मोह आम्हाला झाला. आणि आम्हाला एकदम टाकून देऊन तुम्ही गेलात असं रात्रीचं? हे योग्य आहे का? अशी पुष्कळ प्रार्थना केलेली आहे आणि त्या रडू लागल्या. भगवान प्रकट झालेले आहेत. एकदम सगळा शोक त्यांचा गेला, उत्साहाने त्या उठलेल्या आहेत. जगामधे इष्टवियोग आणि अनिष्ट संयोग चाललेलंच आहे. त्याच्याबद्दल सुख, दुःख नको. पण भगवंतांचं दर्शन झालं की आनंद झाला पाहिजे आणि भगवंतांचा वियोग झाला की शोक झाला पाहिजे. त्यामुळे भगवंताने गोपींना शोकही दिलेला आहे. भगवंताने गोपींसमवेत रासक्रीडा सुरू केली. गौरवर्णाच्या गोपी आणि मेघःश्याम कृष्ण. दोन गोपींमध्ये एक–एक गोपालकृष्ण दिसू लागले. इतकी रूपं धारण केली. त्या गोपी टिपऱ्या वाजवताहेत, नृत्य करताहेत. गायन चाललेलं आहे. असा तो बराच काळ त्यांचा खेळ चालला. सर्वांना घेऊन नदीतीरावर आले गोपालकृष्ण. सर्वांनी स्नान केलं आणि नदीकाठी वाळवंटात सर्व बसले. गोपींना थोडा राग आला होता. काय म्हणाल्या, सर्व घरदार सोडून आलो आणि याला आमची किंमत नाही? त्या बोलायला लागल्या

भजतोऽनुभजक्त्येक एक एतद्विपर्ययम्।
नोभयांश्च भजक्त्येक एतन्नो ब्रूहि साधु भोः ।।१०.३२.१६ ।। श्री. भा.

नाव घेतलं नाही. गोपालकृष्णा, जगामध्ये एक वर्ग असा आहे लोकांचा की ते आपल्यावर प्रेम करणाऱ्या लोकांवर प्रेम करतात. दुसरा एक वर्ग असा आहे लोकांचा की ते आपल्यावर कुणी प्रेम करो न करो ते सर्वांवर प्रेम करतात. आणि एक वर्ग असा आहे की आपल्यावर कुणी प्रेम करणारा असो, नसो तिकडं लक्षच द्यायचं नाही, उपेक्षाच करायची. अशी का आहे जगाची स्थिती? गोपालकृष्ण सांगताहेत.

मिथो भजन्ति ये सख्यः स्वार्थैकान्तोद्यमा हि ते ।।१०.३२.१७ ।।श्री. भा.

परस्पर एकमेकांवर प्रेम करणारे, एकमेकांच्या उपयोगी पडणारे दोघेही स्वार्थी आहेत. कुणाचंही प्रेम खरं नाही. त्याने केलं तर आपण करायचं. पण दुसरा वर्ग जो तुम्ही काढला की

दुसऱ्यांवर निरपेक्ष प्रेम करायचं, हे खरं प्रेम आहे. मात्यापित्यांचं प्रेम असं आहे. मुलाने कितीही अपराध केले, किंवा प्रेम केलं नाही तरी त्यांचं प्रेम काही कमी होत नाही. तिसरा वर्ग उपेक्षा करणारा तुम्ही काढलात त्याच्यामधे बरेच प्रकार आहेत.

आत्मारामा ह्याप्तकामाः अकृतज्ञा गुरुद्रुहः ।।१०.३२.१९ ।। श्री. भा.

त्यांच्यात चार वर्ग पडतात. आत्मारामात जे मग्न आहेत, त्यांचं जगाकडे लक्षच नाही. कोण प्रेम करतो कोण नाही, म्हणून त्यांची उपेक्षा आहे. 'आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्।।' आत्मलाभ व्हावा म्हणून जे प्रयत्न करतात त्यांचंही लक्ष नाहीये. कृतघ्न जे लोक आहेत ते उपेक्षा करतात आणि अत्यंत कठोर वृत्तीचे, तामसी वृत्तीचे लोक त्यांचंही लक्ष नसतं, तेही उपेक्षा करतात. यापैकी कोणच्या वर्गात तुम्ही मला घातलेलं आहे? मला तुम्ही आत्माराम म्हणता, आत्मकाम म्हणता, अकृतज्ञ म्हणता का तामसी म्हणता? मी असं वागतो कधीकधी की भक्तांनासुद्धा दर्शन देत नाही पण त्याला कारण आहे. त्यांचं प्रेम वाढावं म्हणून मी असं करतो. मी समोर दिसलो की तेवढ्यापुरतं प्रेम असणं हे काही खरं नाही. अदृश्य राहून, तुमच्या अंतःकरणात केवढं प्रेम आहे हे मला पहायला मिळालं. भगवान बोलून गेले,

न पारयेऽहं निरवद्यसंयुजां<br>
स्वसाधुकृत्यं विबुधायुषापि वः।<br>
या माभजन् दुर्जरगेहशृङ्खलाः<br>
संवृश्च्य तद् वः प्रतियातु साधुना ।।१०.३२.२२ ।। श्री. भा.

या गोपींनी माझ्यावर जे शुद्ध प्रेम केलंय त्या प्रेमाचा मी उतराई होऊ शकणार नाही. त्याची परतफेड मी करू शकणार नाही. यांनी संसार तोडून टाकला आणि माझ्या भजनाकडे लागलेल्या आहेत. माझ्याठिकाणी चित्त स्थिर केलं. पुन्हा त्यांच्यावर उपकार करायचीही मला इच्छा नाहीये. कारण उपकार करण्याची इच्छा होणं म्हणजे त्यांच्यावर संकट येण्याची इच्छा करण्यासारखं आहे.

हनुमानाला रामरायांनी हेच सांगितलं.

हनुमंता, केवढे उपकार माझ्यावर तू केलेले आहेस. सीतेचा शोध लावलास, सेतूबंधन झालं, आम्हाला सर्वांना घेऊन गेलास. अनेक राक्षस मारलेस, लक्ष्मणाला जीवदान दिलंस. हे तुझे उपकार माझ्याठिकाणी जिरून जाऊ दे. त्यांची परतफेड करण्याची पाळी मला येऊ नये कारण तशी इच्छा करणं म्हणजे तुझ्यावर संकट येण्याची इच्छा करण्यासारखं आहे. मारुतीवर संकट

कधीही येऊ नये तो नित्य सुखी रहावा ही रामांची इच्छा आहे.

तसं भगवान श्रीकृष्ण गोपींना सांगताहेत. समाधान झालं गोपीचं. पहाट झाली. भगवंतानी गोपींना घरी जायला सांगितलं. चंद्रास्त झाला आहे. सगळ्या गोपी आपापल्या घरी गेलेल्या आहेत. हे सगळं चरित्र ऐकलं परीक्षित राजाने आणि त्याने विचारलं, गुरुमहाराज,

संस्थापनाय धर्मस्य प्रशमायेतरस्य च।
अवतीर्णो हि भगवान् अंशेन जगदीश्वरः ।।१०.३३.२७।। श्री. भा.
स कथं धर्मसेतूनां वक्ता कर्ताभिरक्षिता।
प्रतीपं आचरद् ब्रह्मन् परदाराभिमर्शनम् ।।१०.३३.२८।। श्री. भा.

धर्माची स्थापना करावी, धर्माचं रक्षण करावं, अधर्माचा नाश करावा याकरता भगवान अवतार घेऊन आलेले आहेत. आणि परस्त्रियांबरोबर त्यांनी रासक्रिडा केली हा अधर्म झाला नाही का? धर्माच्या रक्षणाकरता अवतार घ्यायचा आणि आपण अधर्म करायचा हे बरोबर आहे का? आपण मला गोपालकृष्णांचं चरित्र सांगताहात परंतु या चरित्राबद्दल मला संशय निर्माण झाला आहे.

शुकाचार्य थोडे रागावले. किती सांगायचं म्हणाले याला. त्यांनी थोडं रागातच उत्तर दिलं

धर्मव्यतिक्रमो दृष्टः ईश्वराणां च साहसम्।
तेजीयसां न दोषाय वन्हेः सर्वभुजो यथा ।।१०.३३.३०।। श्री. भा.

कृष्णांनी अपराध केला असं तुला म्हणायचंय काय? काय वाटेल ते करतील. पाप–पुण्याच्या पलिकडे गेलेले श्रेष्ठ पुरूष आहेत ते. तुला कल्पना आहे का त्या परमेश्वराच्या सामर्थ्याची? पेटलेल्या अग्नीमध्ये ओलं लाकूड टाका, वाळलेलं लाकूड टाका. तो सगळं जाळून टाकतो आणि पुन्ही प्रदीप्त रहातो. तशी यांची स्थिती आहे. हे लक्षात आण तू आणि मग विचार असे प्रश्न. मनाने सुद्धा अशा लोकांच्या या कर्माचा असा विरुद्ध विचार करू नये. श्रीकृष्णांसारख्या श्रेष्ठ पुरूषाने रासक्रीडा केली म्हणून इतर जीव जर तसं करायला जातील तर त्यांचा नाश होईल. समर्थ पुरूषांचं तंतोतंत आचरण करण्यास आपण असमर्थ असतो. समुद्रातून उत्पन्न झालेलं विष भगवान शंकरांनी प्राशन केलं म्हणून दुसरा जर तसं करायला जाईल तर तो मरेल. श्रेष्ठ पुरुष जसं सांगतात तसं वागावं. त्यांच्या आचरणाप्रमाणे आचरण करू नये. त्यांच्या वागण्यातलं जे मनाला पटेल, जे

शास्त्राप्रमाणे असेल तेवढंच घ्यावं. विरूद्ध असलेलं घेऊ नये. ज्ञानी महात्म्यांना पुण्यापासून काही सुख मिळवायचं नसतं आणि पाप जरी घडलं किंवा तसं वाटलं तरी त्यापासून त्यांना काहीही नुकसान होत नाही. ही इतर ज्ञानी लोकांची अवस्था आहे. मग हा तर परमेश्वर आहे. सर्व जीवांचा अंतर्यामी परमात्मा आहे, सर्वांचा नियामक परमात्मा आहे. त्याला पापपुण्यांचा काहीही संसर्ग नाही. जीवात्म्यांचा उद्धार करण्याकरता हा परमात्मा अवतार घेतो. भगवंतांचं अखंड ध्यान, चिंतन करणारे ऋषी हे सुद्धा एखादे वेळेला वाटेल तसं वागतात. पण त्यांनाही त्या कर्माचा संबंध नाही. कर्मबंधन तुम्हाला आहे. जोपर्यंत जीव अहंकारी आहे तोपर्यंत कर्मबंधन आहे. ज्याला भेद दिसतो आहे. चांगलं-वाईट ज्याला दिसतंय त्याला कर्मबंधन आहे. सर्व गोपगोपींच्या अंतःकरणात रहाणारा जो परमात्मा आहे त्याची ही क्रीडा आहे. हा एक विचार मनामध्ये धारण कर. सर्व प्राणिमात्रांवर अनुग्रह करण्याकरता भगवान आलेले आहेत. ते क्रीडा करताहेत. त्या क्रीडा श्रवण करायच्या, त्यांचं चिंतन करायचं. गुण-दोष कुठल्याही दृष्टीने त्यांच्याकडे बघायचं नाही हे लक्षात ठेव. असं त्याला समजावून सांगितलं आणि विचारलं, काय रे राजा तुझ्या लक्षात हे कसं आलं नाही, सगळ्या स्त्रिया रात्रीच्या वेळी घराबाहेर होत्या. ते गोपाल शोध करत का आले नाहीत? शोध करत असताना नदीतीरावर येऊन का पाहिलं नाही? त्यांनी आपल्या बायकांबरोबर रासक्रीडा करतो म्हणून कृष्णाला शासन का केलं नाही? हे नाही विचारलंस तू? परीक्षित म्हणाला, काय झालं महाराज?

नासूयन् खलु कृष्णाय मोहितास्तस्य मायया।
मन्यमानाः स्वपार्श्वस्थान् स्वान् स्वान् दारान् व्रजौकसः ।।१०.३३.३८।। श्री. भा.

सगळ्या गोपी घरामधेच आहेत. हे घरच्यांना दिसतंय. राग यायचं कारण काय? गोपींच्या दिव्य भावाला प्रतिसाद देऊन भगवंतांनी अनुग्रह करण्याचं ठरवलं. त्यामुळे गोपी घरातही आहेत आणि वृंदावनातही आहेत.

संत सखुबाईला पांडुरंग दर्शनाची तळमळ लागलेली आहे. पण पतीने आणि सासूने कोंडून ठेवलेलं आहे. पांडुरंग आलेले आहेत, म्हणाले, जा बाई, संतमंडळी निघालेली आहेत. त्यांच्याबरोबर पंढरपूरला जा आणि पांडुरंगाचं दर्शन घेऊन ये. तिला पाठवलं आणि स्वतः पांडुरंग तिचं रूप घेऊन, स्वतःला बंदिवान करून त्या अंधारकोठडीत राहिलेले आहेत. अनंतजन्म, संसाराच्या वासनेत अडकलेल्या जीवाला, कुठल्यातरी जन्माच्या पुण्याईने किंवा संतांच्या कृपेमुळे जर अंतःकरणात

भगवद्प्रेम निर्माण झालं तर त्या प्रेमाप्रमाणे फल द्यायला भगवंताशिवाय दुसरा कोण समर्थ आहे? तिथे शास्त्र आड येणार नाही, व्यवहार आड येणार नाही.

गोपींचंही तसंच आहे. भगवंतांचं सानिध्य मिळावं, त्यांची सेवा घडावी, तन्मय व्हावं. नुसतं बाहेर राहून तन्मय होणं निराळं आणि सन्निध राहून तन्मय होणं निराळं. शृंगाररस जरी असला तरी त्या रसामधे चित्ताची उन्नत्ती होण्याचा मार्ग आहे. सर्वही प्रेम म्हणा, सुख म्हणा हे या विषयापासूनच मिळतं आहे. अशी जरी कल्पना झाली तरी ते सुख किंवा तो आनंदही आत्मानंद आहे असा एक सिद्धांत आहे. वस्तुतः विषयांपासून आनंद मिळतच नाहीये. विषयांपासून अंशभूत आनंद मिळतोय तर पूर्ण आनंदरूप असलेल्या परमात्म्यापासून केवढा आनंद मिळेल हा खरा आनंद आहे. गोपींनी सर्व संसार सोडलेला आहे. नरकाची भिती नाही, धर्म–शास्त्राची भिती नाही, स्वकीयांची भिती नाही.त्या म्हणतात, आमचं चित्त जर परमेश्वराकडे लागलेलं आहे सारखं तर ते दुसरीकडे वळवायचं कसं? असे विचार मनामध्ये आहेत आणि आमचा मार्ग निंद्य नाहीये. हा विश्वास आहे. भगवंतांची अनुमती आहे ना त्याला. राजाने बाह्यदृष्टीने विचार केलाय. पण त्यांची मनोवृत्ती कशी आहे. गोपींची मनोवृत्ती कशी आहे तर भगवान श्रीकृष्ण प्रत्यक्ष परमात्मा आहे आणि आपला अनंत जन्मांचा सखा आहे. भगवंतांची मनोवृत्ती कशी आहे, तर जीव हे माझंच प्रतिबिंब आहे. मीच सर्वत्र भरून राहिलेलो आहे. राजा, तुम्हाआम्हाला असं मनामध्ये वाटेल का? सर्वात्मभाव ज्यांचा झालेला आहे त्यांची बुद्धी निराळी आणि अज्ञानात, भेद बाळगणाऱ्यांची बुद्धी निराळी. ह्या गोपी भगवद्प्रेमामुळे सर्व बंधनांच्या पलिकडे गेलेल्या आहेत. त्या गोपींची योग्यता तुझ्या लक्षात आली नाही आणि भगवान कृष्णांची तर नाहीच नाही. उगीच आक्षेप घेतोस राजा.

गोपी पुन्हा घरी परत आल्या. म्हणजे होत्याच तिथे, त्या अदृष्य झाल्या आणि या आल्या. शुकाचार्य महाराज या रासक्रीडा चरित्राची फलश्रुती सांगताहेत.

विक्रीडितं व्रजवधूभिरिदं च विष्णोः।
श्रद्धान्वितोऽनुश्रृयाद् अथ वर्णयेद् यः।
भक्तिं परां भगवति प्रतिलभ्य कामं।
हृद्रोगमाश्वपहिनोत्यचिरेण धीरः ।।१०.३३.४० ।। श्री. भा.

गोपी ज्याप्रमाणे निष्ठा ठेऊन होत्या. त्यांच्या मनातलं ईश्वरप्रेम, ईश्वरभक्ति कोणालाही घालवता आलेली नाही. शुकाचार्यांसारखे ब्रह्मज्ञानी महात्मे त्रिगुणातीत झालेले, त्यांना गोपींचं

माहात्म्य सांगावसं वाटलं, सांगणारे ते आहेत हा ही विचार केला पाहिजे. या चरित्रावर आक्षेप घेणारे ज्यांना भगवान काय आहेत, भगवद्भक्त काय आहेत, त्यांची मन:स्थिती काय आहे. भक्तीमार्ग काय आहे. याबद्दल काहीही माहिती नाही. संस्कारही तसे नाहीत. त्यांनी नुसतं वरवर पाहून असे आक्षेप घेणं हे चांगलं नाही. परीक्षित राजालासुद्धा शुकाचार्यांनी गप्प बसायला सांगितलं. तुझा अधिकार नाही म्हणाले, ऐकून घे, श्रद्धा ठेव. हे चरित्र जे वर्णन करतात, श्रवण करतात त्यांचा काम नष्ट होतो हे याचं फल आहे. रासक्रीडाचरित्र रोज चिंतन करणारा निष्काम होऊन जातो.

शुकाचार्य सांगतात, राजा, एकदा काही देवीची यात्रा होती. सर्व गोपाळ मंडळी दर्शनाकरता गेली. रात्री तिथेच मुक्काम केला सर्वांनी. रात्री झोपलेले असताना एक अजगर आला आणि नंदाचा पाय धरून ओढून न्यायला लागला. नंद ओरडायला लागला. गोपाळ काठ्या मारताहेत, पेटती लाकडं टाकताहेत तरी त्याच्यावर काही परिणाम नाही. गोपालकृष्ण आले, त्याला नुसता पाय लावला. एकदम त्याच शरीर पडलेलं आहे आणि दिव्य शरीर त्याला प्राप्त झालं. सुदर्शन नावाचा विद्याधर होता तो. तो सांगायला लागला, मी सुंदर, सुस्वरूप होतो याचा मला अहंकार झाला. एकेदिवशी अंगीरा ऋषी माझ्या दृष्टीला पडले. त्यांचं वाकलेलं अंग आणि कुरुप शरीर पाहून मी हसलो, तेव्हा त्यांनी मला शाप देऊन सर्पयोनीत पाठवलं. आज आपल्या पदस्पर्शाने माझा उद्धार झालेला आहे. ही भगवंतांची शक्ती आहे.

या प्रमाणे अनेक लीला चाललेल्या आहेत भगवंतांच्या. दिवसभर गोपालकृष्ण अरण्यात असायचे. ह्या गोपी आपली कामंधामं आटोपून एकत्र जमायच्या आणि भगवंताच्या लीलांचं गुणवर्णन करायच्या.

पुढं एकदा कंसाच्या आज्ञेप्रमाणे अरिष्टासूर नावाचा राक्षस बैलाचं रूप धारण घेऊन गोकुळात आला. तो मोकळा आहे. नाकात वेसण नाही. मोठ्याने ओरडत फिरतो आहे. सगळे लोक घाबरले. श्रीकृष्णांना ते कळलं. ते बाहेर पडले. त्याला म्हणाले, यांना कशाला भिती दाखवतोस? माझ्या समोर ये. तुझं काय सामर्थ्य आहे दाखव. मित्राच्या खांद्यावर एक हात ठेवला आणि त्या राक्षसाला आव्हान दिलं. तो राक्षस शिंग पुढे करून मारायला आला. आल्याबरोबर त्याची दोन शिंगं पकडली आणि त्याला जोराने मागे ढकलून दिलेलं आहे. तो पडला. पुन्हा धावत धावत आला. त्याची शिंगं धरून त्याला खाली पाडलं भगवंतांनी आणि शरीर जसं एखादं वस्त्र पिळावं त्याप्रमाणे

त्याला पिळून टाकलं. त्याचा प्राण जायला किती वेळ लागणार?

अरिष्टासुराचा नाश झाल्याची वार्ता कंसाला समजली. एकेक दैत्य जातो म्हणाला गोकुळामध्ये आणि त्याचा नाशच होतो. कोण आहे हा? असा तो विचार करत असताना नारदमुनी आकाशामार्गाने त्या राजसभेत येऊन पोचले. कंसाने त्यांचं स्वागत केलं. पूजा केली. नारद म्हणाले, का रे कंसा, तुला हे राम-कृष्ण कोण आहेत अजून कळलं नाही? तुझं हेर खातं काय करतंय? अरे, देवकीचा आठवा मुलगा म्हणजेच कृष्ण आहे आणि रोहिणीचा मुलगा बलराम हा देवकीचा सातवा मुलगा आहे. आणि देवकीची आठवी मुलगी देवकीची तू समजलास. पण ती योगमाया होती. वसुदेवाने तुझ्या भितीने आपल्या दोन्ही मुलांना गोकुळात नंदाच्या घरी ठेवलं आहे. नंदाला सुद्धा हे माहित नाही. मग तुला कसं माहित असणार? कंस रागाने तलवार उपसून म्हणाला, आत्ताच्या आत्ता वसुदेवाला ठार मारतो. नारद म्हणतात, फार शहाणा आहेस. वसुदेवाला मारून काय होणार आहे? जे शत्रू आहेत त्यांच्याकडे लक्ष देशील का वसुदेवाकडे लक्ष देशील? लगेच वसुदेव देवकीची रवानगी तुरुंगात झाली. देवाचं पालक होणं फार कठीण आहे. देवाचं सान्निध्य पाहिजे असेल तर हे सगळं भोगण्याची तयारी पाहिजे. शेवटीही देव सोडूनच गेले. कुठं बरोबर नेलं. कंसाला आता खरी हकीकत समजल्यावर त्याचे प्रयत्न सुरू झाले. केशी नावाच्या दैत्याला त्याने आज्ञा केली की गोकुळात जाऊन त्या दोघांची हत्या कर.

सर्व मंत्रीमंडळाला बोलावून सांगितलं, वसुदेवाची दोन मुलं गोकुळात आहेत असं मला आत्ताच नारदांकडून समजलेलं आहे. त्यांच्यापासून माझा मृत्यू आहे असं देवांनी ठरवलं आहे. त्या दोघांना मथुरेत आणायचं आणि त्यांचा नाश करायचाय. सर्व मल्लांना बोलवून मल्लयुद्ध करायचं त्याने ठरवलं. त्यानिमित्ताने त्यांना बोलवायचं. कुवलयापीड नावाच्या हत्तीकडून दरवाजामधेच त्यांना मारण्याचा प्रयत्न करायचा अशी सगळी योजना कंसाने केली. धनुर्याग ठरवला. शिवधनुष्याची पूजा करायची ठरवलं. आणि अक्रूरजींना बोलावणं पाठवलं. कंस सांगतोय, अक्रूरजी तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तुम्ही माझे आत्मीय आहात. माझं एक काम करा. वसुदेवाने आपली दोन मुलं गोकुळात नंदाकडे ठेवलेली आहेत. त्या दोघांना मथुरेत घेऊन या. हा माझा रथ घेऊन जा. त्यांना सांगा धनुर्याग आहे, मल्लक्रीडा आहे आणि तुमच्या मामाला तुम्हाला पहाण्याची फार इच्छा आहे. त्याला आज समजलं की तुम्ही गोकुळात आहात नाहीतर मागेच बोलावलं असतं तुम्हाला. यानिमित्ताने मथुरा राजधानी पहायला मिळेल. असं सांगून घेऊन या. कंस मोठा

राजनीतीज्ञ होता. सगळं त्याने बोलून दाखवलं. आणि अक्रूरजींवर विश्वास आहे. मंत्री म्हणजे राजाशी झालेलं सर्व भाषण गुप्त ठेवणारा असा त्याचा अर्थ आहे. कंस पुढे सांगतोय, अक्रूरजी, त्या मुलांना इथे आणल्यानंतर कुवलयापीड हत्तीला दरवाज्यामध्ये उभं करणार आहे. ते आत येताना दरवाजामधेच हत्तीकडून त्यांना मारण्याचा पहिला प्रयत्न असणार आहे. त्यातून ते आत आले तर माझ्याकडे असणाऱ्या चाणूर, मुष्टिक वगैरे बलाढ्य मल्लांकडून त्यांचा नाश करायचा. नंतर माझा पिता उग्रसेन, वसुदेव, देवकी यांचा नाश मी करणार आहे त्यामुळे माझं राज्य निष्कंटक होऊन जाईल. मी अजरामर होईन. कुणाचीच भीती मला राहाणार नाही. अक्रूरजींनी हे ऐकून घेतलं. त्यांनी सांगितलं राजेसाहेब,

दैवंहि फलसाधनम् ।।१०.३६.३८।। श्री. भा.

दैवाने सर्व कार्य होतं आहे. आपण पुष्कळ मनोरथ करतो आणि दैव जर अनुकूल नसेल तर व्यर्थ हर्ष-शोकामध्ये पडावं लागतं. आपली आज्ञा आहे. मी त्यांना घेऊन येतो. पुढं तुमचं तुम्ही पहा. अक्रूरजी निघून गेले.

शुकाचार्य सांगतात, राजा,

केशी तु कंसप्रहितः खुरैर्महीं ।<br>
महाहयो निर्जरयन् मनोजवः ।।१०.३७.१।। श्री. भा.

केशी दैत्याने मोठ्या घोड्याचं रूप घेतलं आणि तो गोकुळात शिरलेला आहे. जोरजोरात ओरडतो आहे, फिरतो आहे. गोपाळकृष्ण त्याच्यासमोर आले आणि त्याला आव्हान केलं. तो एकदम धावत आला आणि त्याने कृष्णांना लाथ मारली. हे एकदम बाजूला झाले. तो प्रहार चुकला. आणि कृष्णांनी त्यालाच जोराने फेकून दिलं. तो लांब जाऊन पडला. पुन्हा सावध झाला तो दैत्य आणि मुख उघडून कृष्णांना चावण्याकरता तो आला असताना कृष्णांनी आपला हात त्याच्या मुखामधे घातला. तो हात एकदम मोठा केला कृष्णांनी त्यामुळे त्याचा श्वास बंद झाला आणि प्राण गेलेला आहे. काही विशेष प्रयत्नही कृष्णांना करायला लागला नाही.

देवर्षी नारद कृष्णांना भेटण्याकरता आले. म्हणाले, भगवंता, इथे राहून पुष्कळ दैत्य आपण मारले. आता अजूनही बरंच कार्य बाकी आहे. ते आम्हाला पहायला मिळेल. भूमीला भार झालेले अनेक दैत्य आहेत, त्यांचा नाश आपल्याला करायचाय. आपलं दिव्य चरित्र आम्ही पाहू. आणि दिव्य आनंद उपभोगू. आपण साक्षात परमेश्वर आहात. नियामक आहात. अशी प्रार्थना करून

आणि भगवंताला वंदन करून नारदमहर्षी निघून गेले.

दुसरे दिवशी अक्रूरजी राम-कृष्णांना मथुरेला नेण्याकरता गोकुळात येऊन पोचले. संध्याकाळच्या वेळी गोकुळात आले. मधे कुठेतरी स्नानसंध्या करण्याकरता थांबले असतील. आपल्या गाईंना घेऊन राम-कृष्ण नुकतेच रानातून परत आलेले होते. अक्रूरजींना कृष्णांची पावलं उमटलेली दिसली. वज्र, अंकुश, कमल ही चिन्हे त्या पावलांमधे उमटलेली होती. ती पावलं उठलेली पाहिल्याबरोबर अक्रूरजींचं देहभान हरपलं. त्यांनी खाली उडी मारली आणि त्या पावलांमध्ये ते लोळू लागले.

हरेः अमूनि अङ्घ्रिरजांसि अहो इति ||१०.३८.२६ || श्री. भा.

हरीचा चरणस्पर्श झालेले हे रजःकण आहेत. पवित्र करणारे आहेत. जन्मजन्मांतराचं पातक या स्पर्शाने नाश पावतं आहे. येणारेजाणारे लोक पहाताहेत. याला काय झालं म्हणाले. मातीमध्ये लोळतो आहे. त्यांना काय कल्पना असणार ? अक्रूरजींची मनोभूमिका कुणीकडं आणि गाई राखणाऱ्यांची मनोभूमिका कुणीकडं? नंदाच्या वाड्यामध्ये अक्रूरजी आले. राम-कृष्ण गाईंची धार काढायला बसले होते. पीतांबरधारी आहेत गोपालकृष्ण आणि नीलांबरधारी राम आहेत. राम-कृष्ण सामोरे आले. कृष्णांनी सांगितलं रामांना, अक्रूरजींची पूजा करायला. त्याप्रमाणे पूजा केली, पाय धुतले, सत्कार केला. त्यांना गोदान दिलं. मधुपर्क पूजा केली. भोजन झालेलं आहे आणि मंडळी बोलत बसली. भगवान श्रीहरींनी विचारलं, अक्रूरजी काय मथुरेत राहाणारे सर्व यादव, आमचे मातापिता सर्व कुशल आहेत ना ? आमचा हा मामा जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत कुणाच्याही सुखाची इच्छा नाही. आमच्यामुळे आमच्या माता पित्यांना संकटं भोगावं लागतात. अजूनही त्यांच्यामागचा तुरुंग सुटत नाही. काय करायचं? आमच्यामुळे त्यांची मुलं मारली गेली. त्यांना बंधनामध्ये पडावं लागलं. आज आपण कशाकरता आलात ते सांगा. अक्रूरजी सांगताहेत, कंसाच्या मनामध्ये यादवांबद्दल भयंकर द्वेष आहे. त्याने पुष्कळ यादवांना निर्वासित करून पाठवून दिलेलं आहे. त्यांची घरंदारं पाडलेली आहेत. आज तुम्हाला आणण्याकरता मला पाठवलेलं आहे. पण त्याच्या मनात तुम्हाला मारायचं आहे. हत्तीकडून, मल्लांकडून मारण्याची सर्व व्यवस्था झालेली आहे. असे त्याचे विचार आहेत. श्रीकृष्ण म्हणाले, असू दे. उद्या जायचं ना ? कंसाचं पाहून घेता येईल. गोपालकृष्ण नंदाला म्हणाले, पिताजी, राजाचं बोलावणं आलेलं आहे. अक्रूरजी रथ घेऊन आलेले आहेत. तेव्हा गेलं पाहिजे. आपण सर्वच जाऊया मथुरेला. आम्हालाही राजधानी पहायची

आहे. मल्लयुद्धही पहायला मिळेल. नंदानेही सर्व गोपालांना आज्ञा केली की दुसरे दिवशी राम-कृष्णांबरोबर मथुरेला जायचं आहे. राजाला द्यायला नजराणा घ्या. गाड्या जुंपून तयार रहा. गोपींच्या कानावर ही बातमी गेली.

गोप्यस्तास्तदुपश्रुत्य बभूवुर्व्यथिता भृशम्।
रामकृष्णौ पुरीं नेतुं अक्रूरं व्रजमागतम् ।।१०.३९.१३ ।। श्री. भा.

मथुरेहून राम-कृष्णांना न्यायला अक्रूर आलेला आहे, हे त्यांनी ऐकलं. काय करायचं? त्यांचं कुठेच लक्ष लागेना. अन्नाकडे लक्ष नाही, कामाकडे लक्ष नाही. आता काय होणार उद्या? सकाळी रानात जाणारे गोपालकृष्ण निदान संध्याकाळी तरी परत येत होते. मथुरेला गेल्यानंतर आता परत कशाला येतील? त्या सृष्टीकर्त्यालाच दोष देताहेत, काय ब्रह्मदेवा, का अशी सृष्टीमधे व्यवस्था तुम्ही करता की प्रेमळ जीवांना एकत्र आणता आणि पुन्हा त्यांचा वियोग घडवता? अक्रूर याचं नाव कुणी ठेवलं? किती क्रूर आहे हा. आमचे प्राणच हा घेऊन चाललेला आहे. हा नंदकुमार श्रीकृष्ण याचंही मन बरोबर नाही.

क्षणभङ्गसौहृदः ।।१०.३९.२२ ।। श्री. भा.

याचं प्रेम टिकावू नाहीये. दिखाऊ आहे. सर्व घरदार मुलं सर्व सोडून आम्ही याच्यावर प्रेम केलं आणि याला नगरात रहाण्याची इच्छा झाली काय? आमचा त्याग करून हा जातोय. आता काही भगवंताचं दर्शन होणार नाही. त्यांनी ठरवलं, आपण यांना जाऊ द्यायचं नाही. रथासमोर आडवं पडायचं आणि राम-कृष्णांना नेऊ द्यायचं नाही. सकाळ झाली. भगवंताच्या लीलांचं गायन गोपी करताहेत. इतक्यात नंदादिक गोपाल गाड्या जुंपून पुढे आले. अक्रूरजींचंही आन्हिक झालेलं आहे. त्यांचाही रथ नंदाच्या वाड्यासमोर येऊन उभा राहिला. गोपालांच्या गाड्या चालू लागल्या आणि राम-कृष्ण अक्रूरजींच्या रथात बसले. सगळ्या गोपी समोर येऊन उभ्या राहिल्या. काही बोलले नाहीत गोपालकृष्ण. कुणाला तरी सांगितलं की त्या गोपींना जाऊन सांग की राजाने बोलावलं म्हणून आम्ही जातोय. पुन्हा भेटायला आम्ही येऊ. आणि अक्रूरजींना सांगितलं, शक्य तितक्या लवकर घोड्यांना इशारा करा. रथ लवकर निघू द्या. थोडा वेळ जर तुम्ही थांबला तर पुढं काय होईल सांगता येत नाही. ह्या गोपी काय करतील याचा नेम नाही. अक्रूरजींनी लगेच घोड्यांना इशारा केल्याबरोबर रथ वेगाने चालू झालेला आहे. त्या गोपी पहाताहेत. रथ दिसेनासा

झाला. ध्वज दिसतोय. तोही दिसेनासा झाला. आता फक्त धुरळा दिसतोय. तोही दिसेनासा झाला. अत्यंत निराश झालेल्या गोपी आपल्या घरात परत आलेल्या आहेत. आणि भगवंतांच्या लीलांचं चिंतन करताहेत. मनानेच आता भगवंतांचं सानिध्य आहे. भगवान आता प्रत्यक्ष दिसणार नाहीत.

यमुना नदीच्या तीरावर अक्रूरजींचा रथ आलेला आहे. थांबवला त्यांनी. मी म्हणाले, स्नान करून येतो तुम्हीही पाणीबिणी पिऊन येऊन बसा. ते दोघेही बंधू रथामध्ये बोलत बसले. अक्रूरजींनी पाण्यामधे बुडी मारल्यावर पाण्यामध्ये त्यांना राम-कृष्ण दिसायला लागले. वर डोकं करून त्यांनी पाहिलं तर रथात दोघांच्या गोष्टी चाललेल्या आहेत. पुन्हा पाण्यात बुडी मारल्यावर

सहस्रशिरसं देवं सहस्रफणमौलिनम् ।
नीलाम्बरं बिसश्वेतं श्रृङ्गैः श्वेतमिवस्थितम् ।।१०.३९.४५।। श्री. भा.

एक सहस्त्रफणांचा शेषभगवान त्याठिकाणी दिसतो आहे. नीलांबरधारी आहे. आणि त्याच्या त्या शेषशय्येवर घनःश्याम पीतांबरधारी, चतुर्भुज असे भगवान पडलेले आहेत. स्वस्थ आहेत.

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।।

अशा प्रकारचं दिव्यरूप त्यांनी पाहिलेलं आहे. अत्यंत भक्तिभाव चित्तामधे प्रकट झालेला आहे आणि त्यांनी त्यावेळी नारायणाची पुष्कळ स्तुती केलेली आहे. अक्रूरजीही मोठे अधिकारी होते. अनेक अवतार धारण करून जगताचं रक्षण आपण केलं. आपल्याला नमस्कार असो. अशी प्रार्थना केली. एकदम ती माया बंद झाली. ते दृश्य दिसेनासे झालं. अक्रूरजी स्नान आटोपून रथाकडे आले. येण्याबरोबर गोपालकृष्णांनी विचारलं, काय अक्रूरजी, काही आश्चर्यकारक गोष्ट तुम्हाला बघायला मिळाली का? भूमीवर, आकाशामधे का पाण्यामध्ये? अक्रूरजी म्हणाले, काय देवा विचारताय? जगामध्ये सगळीच अद्भुत कृती आहे आपली. आपलंच दर्शन मला पाण्यामधे झालं. गोपालकृष्ण हसले फक्त. रथ पुन्हा निघालेला आहे. गोपालांच्या गाड्या अगोदरच येऊन मथुरेबाहेरच्या एका उद्यानात थांबल्या होत्या. सगळे गोपाल, कृष्णाची वाट पहात होते. अक्रूरजी तिथे येऊन पोचले. गोपालकृष्ण म्हणाले, अक्रूरजी, सांगा तुमच्या राजाला मी राम-कृष्णांना घेऊन आलो म्हणून. अक्रूरजी म्हणाले देवा आपण इथेच रहाणार. आमच्या वाड्यात चला. गोपालकृष्ण म्हणाले, तुमच्या वाड्यामध्ये जर मी उतरलो तर त्या कंसाचा विश्वास तुमच्यावर बसेल का? आज येता येणार नाही. यादवांचा द्वेष करणाऱ्या कंसाचा नाश झाल्यावर मी तुमच्याकडे

येईन. आज तुम्ही जा. अक्रूरजींनी येऊन कंसाला सांगितलं की राम–कृष्णांना आणलेलं आहे आणि ते नगराबाहेर उतरलेले आहेत.

राम–कृष्णांनी विश्रांती घेतली आणि संध्याकाळच्या सुमारास गोपालांसह मथुरानगरी पाहण्याकरता निघाले. यादवांची मोठी नगरी ती होती. हजारो मोठे मोठे वाडे आहेत. मोठे मार्ग आहेत. मधेमधे उपवनं आहेत. पहात चाललेले आहेत. राम–कृष्णांची कीर्ति अगोदरच मथुरेपर्यंत पसरली होती. आज ते नगरात आलेत हे कळल्याबरोबर सर्वही स्त्रीपुरुष घराच्या दरवाजामध्ये, गच्चीवर उभे राहून त्यांचं दर्शन घेताहेत. जाता जाता कंसाच्या परटाची गाठ पडली. राजवस्त्रं घेऊन तो राजवाड्यामध्ये निघाला होता. आता इथं हे गुंजांच्या माळा, खेड्यातली वस्त्रं कशी चालणार? राजवेष पाहिजे. त्याला हाक मारली, अरे इकडे ये. तुझी गाठोडी सोड आणि आमच्या अंगाला येणारी वस्त्रं आम्हाला दे. घेऊ काय? देणार काय? हा प्रश्नच नाही. तोही उद्धट होता. तुम्ही गवळी लोक ही वस्त्रं मागता? ही राजवस्त्रं मागता? मिळणार नाहीत. त्याच्या जोराने थोबाडीत मारली, तो मरूनच गेला. त्याचे नोकरचाकर पळून गेले. राम–कृष्णांनी आपल्या अंगाला साजेशी वस्त्रं निवडली. तिथे एक शिंपी आलेला आहे त्याने त्यांच्या अंगाला बसतील अशी ती पुन्हा शिवून दिली. बाकीची वस्त्रं आपल्या बरोबरच्या गोपालांना वाटून टाकली. उत्तम राजवस्त्रं मिळालेली आहेत. नगरामध्ये असंच राहिलं पाहिजे.

वैराग्य कुठं दाखवायचं, कुठं नाही हे कळलं पाहिजे. दाखवायचं वैराग्य निराळं. खरं वैराग्य अंतःकरणात पाहिजे. भगवान श्रीहरींचं वागणं निराळं आणि भगवान सदाशिवांचं वागणं निराळं. दाखवण्याकरता कोणतंच नाही. त्यांनी जरी पोशाख केला, अलंकार घातले तरी अंतःकरणात काही नाही. पण लोकांनी व्यवहार कसा पाळला पाहिजे हे शिकवताहेत. सदाशिवांचं इकडं लक्ष नाही. स्मशानातलं भस्म धारण करतील, सर्प धारण करतील, काहीही करतील. असंगता, ज्ञान, शक्ती दोन्ही ठिकाणची सारखीच आहे. बाहेरचं रूप वेगळं आहे.

एका माळ्याने राम–कृष्णांना उत्तम सुगंधित पुष्पमाळा घालायला दिल्या. पुष्पगुच्छ दिले. जाता जाता रस्त्यामधे कंसाची दासी कुब्जा राजवाड्यामधे चंदनाची उटी घेऊन निघाली होती. तिला उत्तम ज्ञान त्याचं होतं की त्याप्रमाणे काही औषधं मिसळून अंगाला लेप दिला की तापसुद्धा जायचा. पूर्वीचे प्रघात, आचरण यांच्यामध्ये काही कल्याणाचं साधन असायचं. भगवंतांनी विचारलं, बाई, आम्ही आत्ताच उन्हातून आलो, फार त्रास झाला. तुमची ही चंदनाची उटी आम्हाला अंगाला

लावायला देता का? तिलाही आनंद झाला. म्हणाली, घ्या घ्या देवा, आपल्याकरताच आहे. दोघांनीही ती उटी लावली. त्या कुब्जेचं शरीर तीन ठिकाणी वाकडं होतं. तिला काहीतरी फल द्यायला पाहिजे ना. तिच्या जवळ गेले गोपालकृष्ण, तिच्या दंडांना धरलं, तिच्या पायावर आपला पाय ठेवला आणि तिला सहज वर उचलल्यासारखं केलं. तिचं शरीर सारखं झालेलं आहे. सुंदर शरीर तिला मिळालं. कोण आहे सर्जन असं करणारा? आनंद झाला त्या स्त्रीला. तिने विनंती केली, देवा, आमच्या वाड्यामधे उतरा. गोपालकृष्ण म्हणाले, आम्ही प्रवासी आहोत. कुठेही उतरू शकतो पण आज नाही. पुन्हा केव्हातरी तुमच्या वाड्यात येऊन जाईन. निघाले पुढं. प्रत्येक दुकानामध्ये, व्यापाऱ्याने राम–कृष्णांचा सत्कार केलेला आहे. धनुष्याची जागा कुठंय याची चौकशी करताहेत. त्या धनुष्याच्या रक्षणाकरता कित्येक सैनिक कंसाने ठेवले होते. ते धनुष्य पहाण्याकरता गेले कृष्णभगवान. हातात घेतलं आणि थोडंसं वाकवल्याबरोबर ते मोडून गेलं. ते सैनिक अंगावर धावून आले. राम–कृष्णांनी त्या धनुष्याचे दोन तुकडे करून त्यांनीच सर्व सैनिक मारून टाकलेले आहेत. आणि गावाबाहेर उपवनामध्ये जिथे उतरले होते तिथे येऊन पोचले.

कंसाला रात्रभर झोप नाहीये. मृत्यू जवळ आलेला आहे. हे कळण्याकरता शास्त्राने काही चिन्हं सांगितली आहेत.

अदर्शनं स्वशिरसः प्रतिरूपे च सत्यपि ।।१०.४२.२८।। श्री. भा.

समोर आरसा ठेवलेला आहे. कंसाने पाहिलं, आपलं खालचं शरीर दिसतंय पण मुख मात्र दिसत नाही. मृत्यू जवळ आलेला आहे. हे कुणी करून बघायचं नाही हं. भीतीने तसं वाटण्याचा संभव आहे. आयुष्य असताना सुद्धा.

प्राणघोषानुपश्रुतिः ।१०.४२.२९ ।। श्री. भा.

कान झाकल्यानंतर प्राणवायू जो चालू आहे त्याचा आवाज ऐकायला येत असतो तो कंसाला ऐकू येईना.

स्वपदानां अदर्शनम् ।।१०.४२.२९ ।। श्री. भा.

स्वतःचे पाय त्याला दिसेनात. ही सगळी दुश्चिन्हं आहेत. सकाळी उठल्याबरोबर त्याने सगळी ठरलेली व्यवस्था करायला सांगितली. सर्व मंडळी येऊन बसली. मल्ल आलेले आहेत. कंसही भीतीग्रस्त मनाने सिंहासनावर येऊन बसलेला आहे. वाद्यं वाजताहेत. सगळे गोपाळ पुढे गेलेले

आहेत. दुध वगैरे पिऊन राम–कृष्ण निघाले. अक्रूरजींनी सांगितलंच होतं की दारामधे कुवलयापीड नावाचा हत्ती उभा करणार आहेत.

सहस्रद्विपसत्त्वभृत् ।। १०.४३.३९ ।।

त्या हत्तीमधे एक हजार हत्तींचं बळ होतं. आणि या हत्तींकडून राम–कृष्णांचा नाश करायचा अशी माहूताला आज्ञा आहे. मुद्दाम कंसाच्या आज्ञेनं तो उभा केलेला आहे आणखी याच्याकडून राम–कृष्णांचा नाश करायचा अशी त्याला आज्ञा आहे. दरवाज्यामधे आल्याबरोबर पाहिलं कृष्णांनी, सांगितलं माहूताला, हा तुझा हत्ती बाजूला कर म्हणाले, आम्हाला आत जायचंय आणि नाहीतर तू आणि तुझा हत्ती, दोघेही जिवंत राहणार नाहीत, लक्षात ठेव. पण तो कसा ऐकणार ? ही लहान मुलं आहेत, ही काय करणार आहेत ? ह्या अहंकारातच सगळे गेले. हत्तीला अंकुशाने प्रेरणा केल्याबरोबर, तो हत्ती राम–कृष्णांच्या अंगावर धावून गेलेला आहे. राम बाजूला उभे राहिले. कृष्ण भगवानांनी त्याचं शेपूट हातामधे घेतलं, त्याला ओढायला लागले, हत्तीला पुढे जाताही येईना. बरंच पाठीमागे ओढून आणलं. पुढे आले. त्याच्या पायाखालून गेले. तो हत्ती पाहातोय. सापडेना आणि समोर येऊन त्याच्यासमोर एकदम पडल्यासारखं दाखवायचं. पडले गोपालकृष्ण, हत्तीने एकदम आपला दात मारला. मोहरा केला. हे बाजूला झाले आणि लगेच त्याला धक्का देऊन खाली पाडलं. त्याच्या शरीरावर जाऊन त्याचा एक दात जोराने उपटून घेतला. आणि हत्तीला प्रहार केला. माहूतालाही मारलेलं आहे. दोघेही मरून गेलेले आहेत. तो दात खांद्यावर घेऊन गोपालकृष्ण निघाले. बलरामांनीही दुसरा दात उपटून घेतला. खांद्यावर, आणि दोघेही आत आलेले आहेत. कंसाच्या कानावर ही बातमी गेली. हत्ती मारला गेला. राम–कृष्ण हे सुरक्षित राहिले. अंगावर रक्त सांडलेलं आहे हत्तीचं. सर्व मंडळी, मल्लयुद्ध पाहायला आलेली, राम–कृष्णांचं दर्शन त्यांना झालेलं आहे. त्यांनाही इच्छा होती. आज दर्शन झालं. सर्वांनाही समाधान झालेलं आहे. इतक्यात तो चाणूर नावाचा जो मुख्य मल्ल होता, तो आलेला आहे ''रामा, कृष्णा, तुम्ही अरण्यात राहाणारे लोक ! आणि कुस्तीचं तुम्हाला उत्तम शिक्षण असलं पाहिजे. कुस्त्या तुम्ही करता असं ऐकलंय राजेसाहेबांनी, म्हणून तुम्हाला बोलावलंय म्हणाले. राजेसाहेबांना कुस्ती पाहाण्याची फार हौस आहे. राजाची इच्छा पूर्ण केली म्हणजे, प्रजाजनांचं कल्याण असतं म्हणाले तेव्हा आपण मल्लयुद्ध करावं, अशी राजेसाहेबांची इच्छा आहे. ''कृष्णभगवान म्हणाले, ''काही हरकत नाही, राजेसाहेबांची इच्छा आहे तर, आमच्याबरोबरीची जी लहान मुलं आहेत, त्यांच्याबरोबर आम्ही मल्लक्रीडा करू

म्हणाले. कुस्ती करू.'' चाणूर म्हणाला, ''तू काय लहान आहेस काय ? येताना आत्ता तू सहज त्या हत्तीला मारून आलास. आणि स्वत:ला लहान म्हणवितोस ? माझ्याबरोबर तुला मल्लयुद्ध करावं लागेल आणि बलरामांच्याबरोबर हा मुष्टिक जो आहे तो युद्ध करेल. भगवान श्रीहरी हे त्या आखाड्यामध्ये उतरलेले आहेत. चाणूर आणि श्रीकृष्ण यांची कुस्ती सुरू झाली. बलराम आणि मुष्टिक यांची कुस्ती सुरू झाली. कंस वरती बसलेला आहे सिंहासनावर. सर्व मंडळी पाहताहेत. ते दोघेही मोठे पराक्रमी आहेत. चाणूरही मोठा मल्ल आहे. विष्णु सहस्त्रनामामधे ''चाणूरांध्रनिषूदनाय'' असा एक पाठ आहे. म्हणजे हा आंध्रप्रांतातला मल्ल असला पाहिजे. एकमेकांना हातानी मारताहेत, पायानी मारताहेत, मस्तक मस्तकावर आपटताहेत, चाललेलं आहे ते मल्लयुद्ध. सर्वही मंडळी पाहताहेत, त्यांना चिंता उत्पन्न झाली, काय हे राजाने मल्लयुद्ध सुरू केलेलं आहे, एक लहान मुलगा आणि एक मोठा मल्ल. कसं व्हायचं ? ही जोडी बरोबर आहे का ? आणि त्यावेळचं मल्लयुद्ध म्हणजे, पराजय कुणाचा झाला – म्हणजे जो मरून गेला, मेला जो त्याचा पराजय झाला आणि जिवंत राहिला तो विजयी झाला, असं ते मल्लयुद्ध आहे. नुसती पाठ लागली जमिनीला म्हणजे त्याचा पराजय झाला, असं नाहीये. सर्व लोकांना चिंता उत्पन्न झाली. राजाला ते दोष देताहेत. असं बराच वेळ ते मल्लयुद्ध झालेलं आहे. आणि चाणूर दमला. कृष्णांच्या छातीवर त्याने मूठ मारली जोराने, यांनीही चाणूराच्या दोन दंडाना धरून वर उचंललं आणि खाली जोराने आपटलेलं आहे, चाणूराचा प्राण निघून गेला. बलरामांनीही मुष्टिकाला मारून टाकलेलं आहे. आणखी काही मल्ल आले पण बाकीचे सगळे पळून गेलेले आहेत भीतीने. आपल्याबरोबरीची गोपालमंडळी, त्यांना बोलावलं, राम–कृष्णांनी, त्यांच्याबरोबर आणखी मल्लयुद्ध चालू आहे. पुष्कळ मल्ल मारले. वाद्यं वाजायला लागली. सर्व लोक टाळ्या वाजवताहेत, प्रशंसा करताहेत, गोपालकृष्णांची, रामाची. कंस एकदम रागाने उठून उभा राहिला, वाद्यं बंद करा म्हणाला. हा जो वसुदेव आहे, आणि उग्रसेन आहे, या दोघांनाही ठार मारा. बडबड करायला लागला. प्राण जाण्याची वेळ आलेली आहे. एकदम रागाने गोपालकृष्णांनी त्याच्याकडे पाहिलं आणि त्या आखाड्यातून एकदम वर उडी मारली, कंसाच्या सिंहासनासमोर. तो ही उठलेला आहे, तलवार उपसलेली आहे. पण त्याला धरलं गोपालकृष्णांनी. त्याला धरून उचंललं, जोराने त्याला खाली टाकून दिलेलं आहे आणि त्याच्या अंगावर आपण उडी मारली. फक्त एवढंच केलं. त्यांच्या हातात काही शस्त्र नाहीये. पण तो कृष्णांचा भार त्याला सहन झाला नाही. कृष्णांनी एकदम जोराने टाकल्यामुळे त्या कंसाचे प्राण निघून गेलेले आहेत. कंसाचे आठ भाऊ एकदम धावून आले, कृष्णांना मारण्याकरता. बलरामजी

सावध होते. त्यांनी त्या आठ बंधूंना ठार मारून टाकलेलं आहे. संपला, विरोध संपलेला आहे. गोपालकृष्ण, बलराम वर आलेले आहेत. वसुदेव देवकींना तुरुंगातून मुक्त करून आणलेलं आहे. उग्रसेन राजालाही तुरुंगात टाकलं होतं कंसाने. त्यालाही मुक्त केलं, आणखी उग्रसेन राजाला सांगताहेत भगवान गोपालकृष्ण, ''राजेसाहेब, हे राज्य आपलं आहे. आपण राज्य करां, आम्ही तुमचे सेवक आहोत. साहाय्य आमचं होईलच. देवसुद्धा तुमच्या विरुद्ध वागणार नाहीत. मी तुमचं संरक्षण करीन.''याप्रमाणे उग्रसेनाला आश्वासन दिलं, राज्यभिषेक त्याला करवलेला आहे. पुढं त्या सगळ्या कंसाच्या स्त्रिया रडताहेत. त्यांचं समाधान केलेलं आहे, करवलेलं आहे. आणखी देवकी वसुदेवांना तुरुंगातून बाहेर आणलं. ते बसलेले आहेत. जन्मापासून आत्तापर्यंत कधी त्यांनी कृष्णाला, रामाला पाहिलेलं नाही. रामाला तर पाहिलंच नाही, गर्भातूनच तो बाहेर गेला. कृष्ण जन्माला येण्याबरोबर त्यांना गोकुळात नेऊन ठेवलं. अकरा वर्षे गेली. अकरा वर्षानंतर गोकुळातून हे परत आले. पाहताहेत. ही मुलं नाहीत, साक्षात परमेश्वर आहेत. त्यांच्या अनंत लीला त्यांनी ऐकल्या होत्या आणि कंसासारखा, दहा हजार हत्तीचं ज्याला सामर्थ्य आहे, अशा प्रकारचा कंस एका क्षणामधे मारला गेला म्हणाले, हे काही सामान्य माणसाचं काम नाही. हे काही सामान्य आमच्यासारखे जीव नाही आहेत, परमेश्वर आहेत. वसुदेव देवकींच्या मुखातून वाणी निघेना, दर्शन झालेलं आहे, आनंद झालेला आहे, वियोग संपलेला आहे; मुलं भेटलेली आहेत. पण काय बोलायचं? स्वस्थ बसून राहिले.

पितरावुपलब्धार्थौ विदित्वा पुरुषोत्तमः ।
मा भूदिति निजां मायां ततान जनमोहिनीम् ।। १०.४५.१ ।। श्री.भा.

ईश्वर समजताहेत आम्हाला ? ईश्वर असून ईश्वर समजणं काही दोष आहे का ? नाही म्हणाले, आम्ही आता ईश्वर म्हणून इथे काम करणार नाहीये. यांची मुलं म्हणून राहणार आहोत. पुण्याई आहे यांची. आपली माया त्यांनी टाकली. हात जोडलेले आहेत गोपालकृष्णांनी, ''आई, पिताजी, आमच्याकडून तुमची सेवा आत्तापर्यंत काहीही घडली नाही, बालपण आहे, किशोरवय आहे. इतकं वय आमचं गेलं पण आमचं दुर्दैव असं आड आलं की तुमची, मातापितरांची सेवा काही आम्हाला करता आली नाही. ज्यांच्यामुळे हा देह आम्हाला मिळाला, ज्यांनी आमचं पोषण केलं, त्या मात्यापित्यांच्या ऋणातून कुणीही मुलगा मुक्त होणार नाही. माता पिता, त्याचप्रमाणे आपली साध्वी भार्या, मुलगा यांचं संरक्षण करणं हे कर्तव्य आहे सर्वांचे. पण कंसाच्या भीतीने

आम्ही गोकुळात जाऊन बसलो म्हणाले. व्यर्थ आमचं आत्तापर्यंत आयुष्य गेलेलं आहे. आमच्या अपराधाची आपण क्षमा करा, आशीर्वाद द्या म्हणाले. मायेने मनुष्यरूप धारण करून आलेला परमात्मा, विश्वरूपी, त्याची ती वाणी ऐकलेली आहे. – लोकसंग्रहाकरता आहे. सर्वांनी मातापितरांबद्दल कशी वृत्ति ठेवली पाहिजे हे सांगण्याकरता आहे. – प्रेमाने जवळ घेतलं, दोघांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहताहेत. काही बोलण झालं, नाही मातापितरांचं समाधान केलं. उग्रसेन राजाला राज्याभिषेक केलेला आहे. कंसाच्या भीतीने घरदार सोडून गेलेल्या परप्रांतात गेलेल्या सगळ्या यादवांना बोलावून आणलेलं आहे. त्यांना जे जे साहाय्य पाहिजे ते ते सर्व केलेलं आहे. घरंदारं बांधून दिली, सगळी त्यांची व्यवस्था केली. संघटना ही पाहिजे ना ! आणि आता झालेली ही संघटना निश्चितच आहे. कंसाने त्रास दिल्यामुळे जावं लागलं, आज आपण पुन्हा परत आलो. हा पुढारी आपल्याला मिळालेला आहे. सर्वही यादव मंडळी अत्यंत संघटित अशी राहिलेली आहेत.

बाहेर आलेले आहेत. नंदराजाला भेटले राम–कृष्ण. भगवान सांगताहेत, ''पिताजी, आपण आमचं पालनपोषण आत्तापर्यंत केलेलं आहे. स्वतःच्या देहापेक्षा आपल्या मुलावरती मातापितरांचं प्रेम अधिक आहे म्हणाले. जा आपण आता गोकुळामधे चला. आम्हाला आता इथे राहिलं पाहिजे, कामं आहेत आता पुष्कळ. हे मोठे राज्य आहे. व्यवस्था लावली पाहिजे. सगळ्यांना भेटण्याकरता आम्ही सवडीने येऊन जाऊ म्हणाले. सांगा सर्वांना.'' त्यांचं सांत्वन केलं, आता काही मांडलिक राजा, सार्वभौम राजा असं काही नातं राहिलेलं नाही. त्याला पुष्कळ वस्त्रं, अलंकार सर्व दिलेलं आहे. सत्कार केला आणि त्याला जाण्याला सांगितलं. नंद आपल्या सगळ्या गोपालांना घेऊन निघालेले आहेत. डोळ्यातून अश्रुधारा वाहताहेत. पुन्हा केव्हा भेट होईल राम–कृष्णांची, काही नियम नाही.

वसुदेवाने आपल्या या दोन मुलांचं उपयन केलेलं आहे, गर्गाचार्यांना बोलावून आणून. गाईंचं दान केलं. कृष्णजन्माच्या वेळेला, मनाने ज्या दहा हजार गाई देण्याचं ठरवलं होतं, त्या दहा हजार गाई यावेळेला दिलेल्या आहेत. आता सगळं स्वातंत्र्य आहे. उपनयन झाल्यानंतर, राम–कृष्ण दोघेही विद्याभ्यास करण्याकरता उज्जयनी नगरीत आलेले आहेत. सांदिपनी गुरुमहाराजांच्या आश्रमात येऊन राहिले. विद्याभ्यास चाललेला आहे. सांदिपनी गुरुमहाराजही त्यांची शुद्ध भक्ति, त्यांची प्रज्ञाशक्ति पाहून अत्यंत संतुष्ट झालेले आहेत. सर्व वेद, सर्व उपनिषदं वगैरे सर्वही त्यांनी शिकवलेलं आहे. धनुर्वेद सर्व शिकवलेला आहे. राजनीती, सर्वही विद्या त्यांना दिलेली आहे. सर्व विद्या



ज्यांच्यापासून निघालेल्या आहेत, ते विद्याभ्यास करताहेत, त्यांना विद्याभ्यास करायला किती वेळ लागणार आहे ? चौदा विद्या आणि चौसष्ट कला. चौसष्ट दिवसामधे सगळ्या कला शिकले. कोणच्या कला आहेत, काय, कल्पनासुद्धा नाहिये. फुलाची माळ कशी करावी, ही सुद्धा एक कला आहे. द्रौपदीला ती माहिती होती, सगळं शिकलेली होती. विराट राजाच्या नगरामधे त्या राणीची ती दासी म्हणून राहिली होती. तिला उत्तम फुलांच्या माळा, गजरे वगैरे करून द्यायची ती. पाय तेवढे कुणाचे धुणार नाही म्हणाली. बाकीचं काम करीन, तिनं अगोदरच सांगितलं होतं. अशा सगळ्या कला – ह्या सर्व कलांचं, विद्यांचं शिक्षण पूर्ण झालेलं आहे. आणखी त्यांनी प्रार्थना केली, ''गुरुमहाराज, काय आता गुरुदक्षिणा काय द्यायची ?'' त्यावेळेला गुरुदक्षिणा नंतर द्यायची पद्धत होती. आत्ता अगोदरच डोनेशन मागतात, विद्याभ्यास करू दे विद्यार्थि नाहीतर सोडून जाऊ दे. सर्व विद्या विद्यार्थ्याला दिल्यानंतर, पूर्ण ज्ञानसंपन्न तो झाल्यानंतर, त्यांनी विचारायचयं. काय गुरुदक्षिणा पाहिजे विचारताहेत. काय त्यांची विलक्षण प्रज्ञा पाहिली. विद्या ग्रहण करण्याला त्यांना विलंबच नाही. सर्व विद्या त्यांना माहितीच आहेत असं वाटलं सांदिपनी गुरुमहाराजांना. 'अतीमानुषीं मतीं' म्हणतात, मनुष्याची अशी बुद्धि नाही. पत्नीचा विचार घेतला काय मागायचं यांच्याजवळ, वाटेल ती गुरुदक्षिणा देतील हे. तुझी काय इच्छा आहे. ती म्हणाली, आमचा एक मुलगा गेलेला आहे ना ? तो मुलगा आणून द्यायला सांगा. समुद्रात बुडून गेलेला आहे. सांगितलं सांदिपनी गुरुमहाराजांनी, असा असा एक मुलगा गेला आहे म्हणाले. आलेले आहेत राम–कृष्ण समुद्रकिनारी. समुद्रामधे शोध केला आणि तिथून यमलोकाला ते आलेले आहेत. यमलोकात आल्याबरोबर आपला तो पांचजन्य शंख वाजवला, समुद्रात मिळालेला. यमधर्म आलेले आहेत. त्यांनी दोघांचीही पूजा केलेली आहे. हात जोडून विचारलं, ''काय आज्ञा आहे महाराज ? '' भगवान म्हणाले, ''यमा, आमच्या गुरुजींचा मुलगा इथे आणलेला आहे ना ? त्याच्या कर्माचं फल आहे. नरकाला जाणं दुःख भोगणं, सुख भोगणं. ते प्रारब्धकर्माचं फल भोगण्याकरता इथे आणलेलं आहे. त्या

गुरुपुत्राला नेण्याकरता आम्ही आलेलो आहोत. तो आणून द्या म्हणाले.'' यमधर्म काय बोलणार ! तो नेमलेला अधिकारी होता, हे सर्वाधिकारीच आहेत, आणला त्या गुरुपुत्राला. त्याला घेऊन पुन्हा सांदिपनी गुरुमहाराजांच्याजवळ आले, ''महाराज, हाच तुमचा मुलगा ना ? घ्या म्हणाले. आणखी काही पाहिजे असेल तर सांगा.'' आनंद झालेला आहे. यमाच्या नगरात गेलेला पुत्र प्रारब्धकर्माच्या बंधनात पडलेला गुरुपुत्र, त्याला प्रारब्धकर्मबंधनातून मोकळं केलं, यमाच्या बंधनातून मुक्त केलं ही ईश्वराची शक्ती आहे. ही शक्ती ज्यांच्या मनामधे पक्की आहे. ईश्वरशक्तीबद्दल ज्यांचा पूर्ण विश्वास आहे त्यांना यमाची भीतीही काही बाळगण्याचं कारण नाही. आशीर्वाद दिलेला आहे सांदिपनी गुरुमहाराजांनी. ''तुमच्यासारख्यांचा जो गुरु झालेला आहे त्याची कोणतीही इच्छा शिल्लक राहात नाही. जा आपल्या घरी जा. तुमची पवित्र कीर्ति सर्वत्र पसरून राहिल. तुमचं ज्ञान हे तेजस्वी राहिल. चांगलं राहिल'' आशीर्वाद दिलेला आहे. रथामधे बसून, आपल्या नगरामधे, मथुरा राजधानीमधे सर्व आलेले आहेत. आनंद झालेला आहे सर्वांना ; राम–कृष्णांचं दर्शन झालेलं आहे.

यादवांचा एक श्रेष्ठ मंत्री म्हणजे उद्धवजी. राजमंत्री होते. बृहस्पतीचे शिष्य आहेत. राजनीतीचा अभ्यास त्यानी बृहस्पतीपासून केलेला आहे. उद्धवजी भगवंताचा एकनिष्ठ भक्त आहे. त्याच्याजवळ बोलत बसलेले आहेत भगवान. ''उद्धवजी, एक काम आहे म्हणाले. तुम्ही एकदा गोकुळामधे जाऊन या. त्या गोपींना भेटून या. त्यांच्या मनाचं समाधान करा. मी इकडे आल्यामुळे त्यांना अत्यंत दुःख झालेलं आहे. मन, प्राण सगळं त्यांनी मला अर्पण केलेलं आहे. देहाकडे लक्ष नाही. खाण्यापिण्याकडे लक्ष नाही सर्व व्यवहार धर्म सगळे त्यांनी सोडलेले आहेत. कशाची त्याला भीती नाही. त्या गोकुळवासी ज्या गोपी आहेत. अत्यंत दुःख भोगताहेत. त्यांचं समाधान करा, माझा एकंदर संदेश सांगा त्यांना, येणार आहे म्हणावं मी. मनाचं समाधान करून या.''

उद्धवजी भगवंतांच्या आज्ञेप्रमाणे गोकुळामधे आलेले आहेत. नंदाच्या वाड्यामधे गेलेले आहेत. नंदाची भेट झाली. नंदाने त्यांचा सत्कार केलेला आहे. भोजन झालेलं आहे आणि बोलत बसले. नंदजी विचारताहेत

कच्चिदङ्ग महाभाग सखा नः शूरनन्दनः ।
आस्ते कुशल्यपत्याद्यैर्युक्तो मुक्तः सुहृद्वृतः ।। १०.४६.१६ ।। श्री. भा.

''आमचा मित्र वसुदेव हा कुशल आहे ना ? त्याची मुलं बाळं, त्याची मित्रमंडळी सर्वांचं कुशल आहे ना ? कंसाचा नाश झाला ईश्वरेच्छेनं, त्याचे सगळे अनुयायीही मारले गेले. यादवांचं संरक्षण झालेलं आहे. गोपालकृष्णांना आमची आठवण होते का उद्धवजी ? त्याच्या आईची तरी त्याला आठवण होते का ? त्याची मित्रमंडळी आहेत. ह्या गाई आहेत. हे वृंदावन आहे. हा गोवर्धन पर्वत आहे. इथे त्याने लीला केलेल्या आहेत. त्याचं स्मरण त्याला आहे का ? तो गोविंद ह्या आपल्या लोकांना भेटण्याकरता येणार आहे का एकदा तरी. केव्हा आम्हाला त्याचं मुख पाहायला मिळेल. दावाग्निपासून आमचं रक्षण केलं. पर्जन्यवृष्टीपासून आमचं रक्षण केलं. कालिया नागापासून रक्षण केलं. अनेक संकटं आमच्यावर आली, श्रीकृष्णांनी आमचं रक्षण केलेलं आहे. त्याचं स्मरण झाल्याबरोबर सर्व आमची कामं थांबतात.''

सर्वा नः शिथिलाः क्रियाः ।।१०.४६.२१।। श्री.भा.

केवढं स्मरण आहे त्यांना देवाने दिलेलं. ज्या ज्या ठिकाणी आम्ही पाहावं तिकडं मुकुंदाचं स्मरण होतंय. असं नंदजी सांगताहेत. यशोदा नुसती ऐकतीय. डोळ्यातून अश्रुधारा वाहताहेत. उध्दवजी म्हणाले, ''नंदजी, यशोदामाई तुम्ही किती पुण्यवान आहात. मनुष्यदेह तुम्हाला मिळाला पण नारायण जो परमात्मा त्याची भक्ति, प्रेम तुमच्या अंतःकरणामधे मिळालेलं आहे, देवाने दिलेलं आहे. तुमचा जन्म धन्य झालेला आहे. राम–कृष्ण हे विश्वेश्वर आहेत. सर्व विश्वाला उत्पन्न करणं, पालन करणं, उपसंहार करणं हे त्यांचं कार्य अखंड चालू आहे. प्राणवियोगाच्या वेळेला या भगवंताचं स्मरण ज्याला होतंय तो या सर्व त्रिगुणात्मक संसारातून मुक्त होतो आहे. त्या नारायणाची प्रेम, भक्ति, भाव तुमच्या चित्तामधे उत्पन्न झालेला आहे, आणखी काय पुण्य पाहिजे म्हणाले ? हेच तुमचं पुण्य आहे. येणार आहेत कृष्ण, भगवंतांनीच सांगितलय तुम्हाला सांगायला. येऊ म्हणाले, लवकर आम्ही येऊ, भेटू असं सांगितलंय आणि भेटायचं म्हणजे, तो नाही कुठे ? सर्व ठिकाणीच आहे उध्दवजींचं जरासं ह्या ज्ञानमार्गाकडे लक्ष होतं. देवाचंही वर्णन केलं. तुमची भक्ति मोठी आहे, तुम्ही धन्य आहात असंही सांगितलं आणि पुन्हा ज्ञान सांगायला लागले. सर्व ठिकाणी आहे परमेश्वर ! वियोग कुठे आहे म्हणाले असही सांगीतलं. याप्रमाणे रात्रभर बोलत बसलेले आहेत.

प्रभातकाल झाला. त्या सगळ्या गोपी उठलेल्या आहेत. दही घुसळण्याचं काम चाललेलं आहे. भगवंताच्या लीलांचं गायन चाललेलं आहे. अंतःकरण भगवंताकडे आहे. वाणीनं त्याचं

वर्णन चाललेलं आहे ते लीलागायन त्या आवाजाने सर्व दशदिशांचं अमंगल नष्ट झालं असं शुकाचार्य सांगताहेत. काम झालेलं आहे. सूर्योदय होऊन गेलेला आहे. बाहेर आल्या गोपी आणि नंदाच्या दरवाजामधे एक रथ उभा आहे असं त्यांना दिसले. उध्दवजी संध्याकाळी आले होते त्यामुळे गोपींना काही कळलं नाही. त्या म्हणाल्या, हा रथ कुणाचा आलेला आहे ? काय पुन्हा अक्रूर आला काय म्हणाले, आणि आता अक्रूराचं काय काम आहे ? काय घ्यायचं ते, आमचे प्राण घेऊन गेला म्हणाले. गोपींना मुख्य भेटण्याचं कामं होतं, उध्दवजींना, सर्व आन्हिक आवरून उध्दवजी गोपींना भेटण्याकरता बाहेर पडले. गोपी उभ्याच होत्या. पीतांबरधारी, अगदी आजानुबाहू हा भगवंताचा भक्त आलेला आहे हे त्यांना समजलं. त्याही आल्या जवळ, नमस्कार केला उध्दवजींना त्यांनी आणि बोलण्याकरता त्या सर्व गोपी बसल्या. उध्दवजीही बसले. त्या गोपी बोलायला लागलेल्या आहेत. उद्धवजींना अवसरच मिळाला नाही.

जानीमस्त्वां यदुपतेः पार्षदं समुपागतम् ।
भर्त्रेह प्रेषितः पित्रोर्भवान् प्रियचिकीर्षया ।।१०.४७.४।। श्री. भा.

रागावलेल्या आहेत. सात्विक कोप आहे. देवाने आम्हाला सोडून जायला नको होतं असं त्यांना वाटणारंच ! आपल्या भक्तिवर, आपल्या प्रेमावर त्यांचा विश्वास आहे. अभिमान नाही हा. त्या म्हणतात, ''उध्दवजी, त्या यादवांच्या राजाने तुम्हाला इथे पाठवलं आहे ना ? त्याचं नावही घेतलं नाही कृष्णाचं. तुमच्या मार्गाने तुम्हाला इथे पाठवलं आहे. दुसरी एक गोपी म्हणाली, कशाकरता पाठवलं ? त्या गोपी सगळ्या चतुर होत्या. कशाकरता म्हणजे ? त्याचे आई बाप इथे आहेत की, आई बापांना भेटण्याकरता, सांगण्याकरता पाठवलं असेल'. ते उध्दवजी स्वस्थ ऐकताहेत काही बोलत नाही आहेत. कोण आहे याठिकाणी त्याचं ? आई बापांशिवाय त्याच्यावर प्रेम करणारं इथं कुणी नाही म्हणाले.

स्नेहानुबन्धो बन्धूनां मुनेरपि सुदुस्त्यजः ।।१०.४७.५।। श्री.भा.

मात्यापित्याचं प्रेम सोडता येत नाही म्हणाले. त्यामुळे त्याच्याकरता पाठवलं असेल. पुन्हा म्हणताहेत, उध्दवजी, भेटलात का त्याच्या आईबापांना ? झाली का भेट काम झालं का नाही ? केव्हा जाणार मथुरेला परत ? काय विचारायचं आता ! या गोपी काय कृष्णावरती प्रेम करतात का रागावलेल्या आहेत, उध्दवजींना काही समजेना. असं भाषण केलेलं आहे एक भ्रमर आलेला

आहे. त्याला उद्देशूनच एक गोपी बोलू लागली,

मधुप कितवबन्धो मा स्पृशाङ्घ्रिं सपत्न्याः
कुचविलुलितमालाकुंकुमश्मश्रुभिर्नः ।
वहतु मधुपतिस्तन्मानिनीनां प्रसादं
यदुसदसि विडम्ब्यं यस्य दूतस्त्वमीदृक् ।। १०.४७.१२ ।। श्री. भा.

भ्रमर म्हणजे, उध्दवजींना उद्देशूनच हे भाषण आहे. ती गोपी सांगती आहे. भ्रमर हा कृष्णाचा दूत आलेला आहे आणि त्याला ती उत्तर देती आहे, ''आमच्याजवळ येऊ नकोस, तू निघून जा. तो जो तुझा स्वामी आहे, मथुरेचा राजा झालेला आहे. त्याच्या स्त्रिया ज्या असतील त्याच्यावर प्रेम करणाऱ्या, त्यांच्याजवळ जाऊन तू त्यांचं वर्णन कर. आमच्याजवळ येऊ नकोस. कशाला आमच्याजवळ त्याच्या गुणांचं गायन करतोस. तो कपटी आहे. त्याने आमच्या प्रेमाचा धिःकार केलेला आहे. निघून गेलेला आहे. काय काय, कसा वागलांय, आम्हाला सगळं माहिती आहे. रामवतारात वालीला झाडाआड राहून बाण मारला, हाच तो कपटी. शूर्पणखेचे नाक कान कापायला यानीच लावले. बलिराजाच्या यज्ञामधे याचक म्हणून गेला आणि त्याचं सर्वस्व हरण करून त्यालाच शेवटी बंधनामधे टाकलं. काय करायचं ? हाच तुझा मालक आहे ना.'' उध्दवजींना उद्देशून हे भाषण आहे. ऐकताहेत उध्दवजी. ही काही निंदा नाहीये. देवाची निंदा नाहिये. ''तेव्हा काय करायचं त्याची आठवण करून, नको आता. त्या मथुरा राजधानीमधे तो राहतो आहे. आणि इथे आम्ही मात्र या शोकामधे निमग्न झालेलो आहोत. आपले सगळे बंधू, सगळे मित्र वगैरे सगळ्यांना सोडून निघून गेलेला आहे. आम्ही त्याच्या दासी आहोत, परंतु आमच्याकडं त्याचं लक्ष नाहीये आम्हाला विसरून गेलेला आहे तो; उध्दवा !'' उध्दवजींना त्यांचं ते अलौकिक दिव्य प्रेम दिसून आलेलं आहे. कृष्णदर्शनाची फक्त उत्कंठा आहे बाकी काही नाही. त्यांचं सांत्वन करताहेत.

अहो यूयं स्म पूर्णार्था भवत्यो लोकपूजिताः ।
वासुदेवे भगवति यासामित्यर्पितं मन : ।। १०.४७.२३ ।। श्री. भा.

गोपीहो तुमचं सर्व कृत्य संपलेलं आहे. पाप पुण्य तुम्हाला काही नाही. सर्व लोकांनी तुमचा आदर करावा अशी तुमची योग्यता आहे. भगवान वासुदेवाच्या ठिकाणी तुम्ही अंतःकरण समर्पण केलेलं आहे, इतकं प्रेम तुम्ही करता, यात सर्व आलेलं आहे. काहीही साधनाची तुम्हाला जरूर नाही. सर्व साधनांचं फल हे भगवत्प्रेम तुम्हाला मिळालेलं आहे.

दानव्रततपोहोमजपस्वाध्यायसंयमैः ।
श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः कृष्णे भक्तिर्हि साध्यते ।। १०.४७.२४ ।। श्री. भा.

भक्ति कशी मिळेल, उध्दवजी सांगताहेत अनेक जन्म सत्कर्मं केली पाहिजेत, दान केलं पाहिजे, व्रतं केली पाहिजेत; तप केलं पाहिजे, जप केला पाहिजे. इंद्रियांचा निग्रह केला पाहिजे. अशी अनेक पुण्यसाधनं करता करता आणि पापक्षय होऊन भगवंताची भक्ति चित्तामधे उत्पन्न होते. ती भक्ति मोठ्यामोठ्या मुनींना सुद्धा मिळत नाही ती तुम्हाला मिळालेली आहे. देवाची तुमच्यावर फार मोठी कृपा आहे. तुम्हाला मुलाची आठवण नाही, पत्नीची आठवण नही, घरादाराची आठवण नाही, वस्त्रालंकाराची आठवण नाही. कुणीकडेही तुमचं लक्ष नाही. अखंड भगवान श्रीहरी तुमच्या चित्तामधे राहिलेले आहेत. भगवंताने तुम्हाला सांगण्याकरता काही संदेश माझ्याजवळ दिलेला आहे. तो ऐका तुम्ही भगवान सांगताहेत, गोपीहो,

भवतीनां वियोगो मे न हि सर्वात्मना क्वचित् ।
यथा भूतानि भूतेषु खं वाय्वग्निर्जलं मही ।
तथाहं च मनःप्राणभूतेन्द्रियगुणाश्रयः ।। १०.४७.२९ ।। श्री. भा.

माझा वियोग झाला असं तुम्हाला का वाटतंय ? माझा वियोग कसा होईल ? सर्व ठिकाणी मी आहे ना ? ही पंचमहाभूतं पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही जशी सर्व ठिकाणी आहेत. कुठं नाहीत ? तसा मी सर्वत्र आहे. सर्वांच्या मनामधे आहे, इंद्रियांमधे आहे, शरीरामधे आहे. सर्वत्र मी आहे. तेव्हा सर्वात्मरूपी, सर्वस्वरूपी, सर्वव्यापी असा मी असताना, तुम्हाला दुःख होण्याचं कारण काय ? इंद्रियांचा निग्रह करून मन स्थिर झालं म्हणजे माझं हे स्वरूप समजून येतं. बरं बाह्य दृष्टीने तुम्ही म्हणत असाल ते हे रूप तुम्हाला कुठं दिसतंय, ते रूप आमच्यासमोर नाहीये, तुम्ही निघून गेला की काय ? त्याचं कारण आहे म्हणाले,

मनसः सन्निकर्षार्थं मदनुध्यानकाम्यया ।। १०.४७.३४ ।। श्री.भा.

हे बाह्य शरीर घेऊन मी इकडे आलो म्हणाले. इथे आहेच आहे, सर्वव्यापी. हे माझं रूप तुम्हाला दिसत नाहिये. ते मी घेऊन आलो, मथुरेमधे राहिलो, याचं कारण तुमचं मन माझ्याजवळ नेहमी राहिलं पाहिजे. माझं ध्यान तुम्हाला घडलं पाहिजे. आपला प्रिय मनुष्य हा दूर असताना, जितकं त्याच्याकडे लक्ष जातं, तितकं समोर असताना जात नाही. सन्निकर्ष म्हणजे अनादर होतो. म्हणून तुम्ही इथेच राहा. मन माझ्याकडं ठेवा. आणि मनाने माझं ध्यान, माझ्या गुणांचं चिंतन करा



म्हणजे लवकर माझी प्राप्ती होईल. याप्रमाणे भगवंतांचा तो संदेश त्या गोपींना सांगितला उध्दवजींनी.त्या बोलायला लागल्या. गोपी म्हणतात, कंसाला मारलं. सर्व यादवांना सुरक्षित ठेवलं, त्यांचं संरक्षण केलं. भगवान गोपालकृष्ण, बलरामजी हे सगळे सुखी आहेत ना ? आता त्यांना सगळ्या नगरातल्या स्त्रिया भेटलेल्या असणार ! त्यांच्या मनाचं समाधान ते करत असतील, हे खरं आहे ना उध्दवजी ? हे तत्वज्ञान वगैरे सगळं बाजूलाच ठेवलं. काय ऐकून घेतला संदेश आणि तिकडं लक्षंच नाही. काय त्या नगरातल्या राजकन्या त्यांना भेटतील, त्यांच्याबरोबर विवाह होईल. त्यांच्याचमधे श्रीकृष्णाचं मन आता गुंतून राहणार आहे. आमची आठवण कशाला होईल ? केव्हा येणार आहे आम्हाला भेटण्याकरता ? आम्हाला भेटण्याची काही आशा आहे का ? काही गोपी म्हणाल्या, कशाला येईल तो आता ? राजकन्यांबरोबर त्याचा विवाह होईल. सर्व राज्यकारभार त्याला पाहावा लागेल. आम्ही वनात राहणाऱ्या, खेड्यामधे राहणाऱ्या आमच्यासारख्या गोपी यांना भेटण्याकरता कशाला येईल तो म्हणाल्या. तो तर लक्ष्मीपती आहे. त्याला तर कुणाचीच इच्छा नाहीये. आता आमच्या नशिबाला एवढंच आहे.

परं सौख्यं हि नैराश्यं स्वैरिण्यप्याह पिङ्गला ।
तज्ञानतीनां न: कृष्णे तथापि आशा दुरत्यया ।। १०.४७.४७ ।। श्री. भा.

पिंगला वेश्येने जे सांगितलेलं आहे की निराश माणसाने आशा करू नये हेच आमच्या

नशिबात आहे. तसंच आम्ही वागलं पाहिजे. परंतु कृष्णदर्शनाची आशा आमच्या मनातून जात नाही. उध्दवजी काय करावं ? कसं विसरू आम्ही कृष्णांना ? डोळे झाकून बसायचं काय ? डोळे उघडून जिकडे पाहावं तिकडे कृष्णाचं स्मरण होतंय. नदीकडे आमची दृष्टी केली, इथे गोपालकृष्ण उभा राहिला होता. झाडाखाली उभा राहिला हरोता. इकडे उभा राहिला होता. पर्वतावर उभा राहिला होता. इथं त्याची अमुक लीला झाली. जास्ती जास्ती ते स्मरण आमच्या चित्तामधे येऊन व्याकुळ होतो म्हणाल्या आम्ही. कसं, विसरणार कसं सांगा ? तत्वज्ञानाने काय कृष्णाचं विस्मरण होतंय ? आणि अशा तत्वज्ञानाचा उपयोग काय आहे.

विस्मर्तुं नैव शक्नुमः ।।१०.४७.५० ।। श्री. भा.

आम्ही विसरू शकत नाही म्हणाल्या. अतिशय शोकाकुल झाल्या गोपी. हे रमानाथा, हे गोविंदा, आम्हाला या दुःखातून तुम्ही मुक्त करा, दर्शन द्या अशी प्रार्थना करताहेत. उध्दवजींना त्यांचं दुःख दूर करणं शक्य झालं नाही. त्यांची भूमिका फार मोठी आहे. कृष्णलीला वर्णन करताहेत, तत्वविचार मांडताहेत. बरेच दिवस उध्दवजी राहिले तिथे. गोपींची संगती असावी असं उध्दवांना वाटतंय ! केवढी योग्यता आहे गोपींची ! बरेच दिवस राहिलेले आहेत उध्दवजी आणि नंतर मथुरेला जाण्याकरता निघाले. आणि त्यांनी उद्गार काढलेले आहेत. ''काय या स्त्रियांची योग्यता आहे ! भगवान श्रीहरीच्या ठिकाणी केवढी भक्ति यांच्या चित्तामधे आहे. असे जे भक्त असतील त्यांच्याजवळ भगवान श्रीहरी नेहमीच राहतात. लक्ष्मीला असा प्रसाद मिळाला नाही, स्वर्गातल्या स्त्रियांना असा प्रसाद मिळाला नाही. जो प्रसाद रासक्रीडेच्या वेळी या गोपींना मिळालेला आहे. तुमचे उपकार मी विसरू शकणार नाही. तुमच्या उपकारांची फेड मला करता येणार नाही. असं भगवान यांच्याबद्दल म्हणालेले आहेत. सर्व धर्ममार्ग यांनी टाकून दिलेला आहे. कृष्ण निघून गेला तरी कृष्णाला विसरू शकत नाही आहेत. कोण यांना बोलणार कृष्णाची आठवण करायची नाही म्हणून ? त्या हिरण्यकशपूने आपल्या मुलाला ताकीद केली, श्रीहरीचं नाव घ्यायचं नाही म्हणून, त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला आणि स्वतःचाच नाश करून घेतलेला आहे. तसं यांना बोलणार कोण ? यांचं बुद्धिपरीवर्तन करायचं, यांच्या मनातली कृष्णभक्ति काढून टाकण्याला कोण समर्थ आहे.'' अशा रितीने वर्णन करून उध्दवजींनी शेवटी त्या गोपींना नमस्कार केलेला आहे.

वन्दे नन्दव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः ।

यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ।। १०.४७.६३ ।। श्री.भा.

अर्थात, या नंदाच्या गोकुलात राहणाऱ्या या कृष्णभक्त स्त्रिया ज्या आहेत यांच्या चरणांच्या रज:कणाकणाला मी नमस्कार करतो. पायाला सुद्धा नाही. ज्यांनी हरीकथा, हरीलीला गायन करण्याला सुरवात केल्याबरोबर संपूर्ण त्रिभुवन पवित्र होऊन जातंय. काही कशाची आवश्यकता नाही. राजशासन नको, काही नको, इतकं सामर्थ्य याच्यामधे आहे. निघाले उध्दवजी. नंद, यशोदा यांचीही संमती घेतली. रथामधे बसलेले आहेत. नंदाने सांगितलं, ''उध्दवजी,

मनसो वृत्तयो न: स्यु: कृष्णपादाम्बुजाश्रया: ।
वाचोऽभिधायिनीर्नाम्नां कायस्तत्प्रव्हणादिषु ।। १०.४७.६६ ।। श्री.भा.

गोपालकृष्णाला, परमेश्वराला आमची विनंती सांगा. आमच्या मनोवृत्ति भगवान श्रीकृष्णांच्या चरणाशीच नेहमी राहाव्यात. त्याच्या चरणांचं स्मरण नेहमी व्हावं. आमच्या वाणीनं भगवंताच्या नामाचं स्मरण नित्यं करावं, पठण करावं, नामस्मरण घडवं. आमच्या शरीराने त्याची सेवा व्हावी, पूजा व्हावी आमच्या कर्माने ज्या ज्या जन्माला आम्ही जाऊ त्या सर्वही जन्मामधे, 'रतिर्न: कृष्ण ईश्वरे', भगवान श्रीकृष्णाबद्दल प्रेम त्या जन्मामधे आम्हाला राहावं एवढीच आमची प्रार्थना भगवान गोपालकृष्णांना कळवा.''

उध्दवजी मथुरेमधे आलेले आहेत. सर्वांनी आदरसत्कार केलेला आहे. कृष्णांची भेट झाली आणि उध्दवजींनी सांगीतलं, व्रजवासी लोकांचं प्रेम अत्यंत श्रेष्ठ आहे. त्याचं वर्णन करणंही अशक्य आहे. हे आपल्या कृपेने मला पाहायला मिळालं.

नंतर ती जी दासी होती, चंदनाची उटी देणारी, तिच्या वाड्यामधे भगवान गेले, तिनेही पूजा अर्चा केली. तिथून नंतर अक्रूरजींच्या वाड्यामधे भगवान आलेले आहेत. त्यांनीही आदरसत्कार केला. श्रीकृष्णांनी अक्रूरजींचीही स्तुती केलेली आहे, आपण श्रेष्ठ आहात. आम्ही लहान मुलं आहोत. आपण आम्हाला मार्गदर्शन करा. पुढे भगवान सांगताहेत अक्रूरजींना, ''आपण एकदा हस्तिनापुराला जाऊन पांडवांची एकंदर परिस्थिती काय आहे ती पाहून या, कौरवांच्या ताब्यामधे सर्व राज्य आहे. आपल्या लहान मुलांना घेऊन ती कुंति त्याठिकाणी एकटी राहात आहे. काय संकटं त्यांच्यावर आलेली आहेत ! प्रजाजनांचं प्रेम पांडवांवर आहे का नाही हे सगळं पाहून या.''

अक्रूरजी हस्तिनापुरात आलेले आहेत. सर्वांनी त्यांचा सत्कार केला. कुंति त्यांना भेटली.

बंधूच होते हे. ''काय म्हणाली बाबा, तुम्हाला आमची आठवण तरी आहे ? आपली बहिण काय संकटात आहे, जिवंत आहे की मेली काही लक्ष तुमचं नाही ? मातापितरांच लक्ष नाही, बंधूचं लक्ष नाही. गोपालकृष्ण भगवान भक्तवत्सल आहेत. आमच्याकडं त्याचं लक्ष आहे असं आम्हाला वाटतं. आपल्याला त्यानी पाठवलेलं आहे. या शत्रूच्यामधे मी अत्यंत संकटात सापडलेली आहे. लांडग्याच्या कळपात एखादी हरीणी सापडावी तशी माझी स्थिती आहे. मुलांना बाप नाही, पितृछत्र नाही आणि इथे कशीतरी मी काळ कंठते आहे काय कोणत्या वेळेला होईल याचा नियम नाही. भगवान गोपालकृष्णांनीच आमचं संरक्षण करावं'' अशी प्रार्थना ती करती आहे. अक्रूरजींनी तिचं सांत्वन केलं. काही दिवस मुद्दाम अक्रूरजींनी मुक्काम केलेला आहे. नगरातल्या लोकांच्या गाठीभेटी घेतलेल्या आहेत. एकंदर नगरवासी लोकांची मनोवृत्ति सध्याच्या या राजशासनाबद्दल अनुकूल आहे की प्रतिकूल आहे हे सगळं समजून घेतलं. सर्व प्रजाजनांचं प्रेम पांडवांवर आहे हे त्यांच्या दृष्टोपत्तीस आलं. पांडव धर्मशील आहेत, भगवद्भक्त आहेत. कौरवांवर प्रजाजनांचं प्रेम नाहियें. राजसत्ता हातामधे असल्यामुळे अनुकूल वागावं लागतं इतकच. मनापासून प्रेम नाहियें. सर्व समजलेलं आहे त्यांना आणि निघाले मथुरेला जाण्याकरता. राजसभमधे आलेले आहेत. धृतराष्ट्राला त्यानी नमस्कार केलेला आहे. येतो म्हणाले, राजेसाहेब आणि थोडासा उपदेश केला. ''काय, राजेसाहेब, तुमचा ज्येष्ठ बंधू पांडुराजा मृत झालेला आहे. तुमच्या स्वाधीन राज्य सध्या मिळालेलं आहे. धर्माने तुम्ही राज्य करा. तुमची मुलं आणि पांडव या दोघांबद्दल समदृष्टीने वागा. सारखंच प्रेम दोघांवर करा. म्हणजे तुमची कीर्ति होईल. विषम बुद्धि जर तुम्ही ठेवली तर तुमचं कल्याण होणार नाही. समदृष्टीनं वागा. कोण याठिकाणी राहाणार आहे. संसारामधे कोणीही चिरंजीव नाही आहे. स्वतःचा देहसुद्धा इथे ठेऊन जावं लागतं मग स्त्री, पुत्र, राज्य वगैरे काय बरोबर घेऊन जाता येईल ? एकटा जीव जन्माला येतो आणि एकटाच मृत्यू पावतो. स्वतः केलेलं पाप पुण्यात्मक कर्म त्याचं फल, सुखदुःख एकट्यालाच त्याला भोगावं लागतं. अधर्माने पुष्कळ जरी द्रव्य मिळालं तरी दुसरेच कोणीतरी घेऊन जाताहेत. म्हणून तुम्ही हा सगळा विचार करा आणि पांडवांच्यावरही मुलाप्रमाणे प्रेम करा.'' धृतराष्ट्र म्हणाला ''अक्रूरजी, तुमची वाणी खरी चांगली आहे, हित करणारी आहे पण माझ्या मनामधे ती राहातच नाही. मुलगा जवळ आला की सर्व विसरून जातो मी. मुलगा जसं म्हणेल त्याप्रमाणे मला संमति द्यावी लागते. काय ईश्वराची इच्छा काय आहे, समजत नाही. भूभार हरण करण्याकरता परमात्म्याने अवतार धारण केलेला आहे.

त्याच्या इच्छेने काय घडेल ते घडेल एवढच मी बोलतो. मी स्वतंत्र नाही अक्रूरजी, तुम्हीही विचार करा.''

अक्रूरजी आले मथुरेमधे कौरवांची वृत्ति कशी आहे, प्रजाजनांची वृत्ति कशी आहे. पांडवांची स्थिती काय आहे. कुंति कोणत्या स्थितीमधे आहे हे सगळं त्यांनी भगवंताला सांगितलं. समजून घेतलं सगळं. पांडवांचं रक्षण कसं करायचंय हा सगळा विचार भगवंतानी केलेला आहे.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा। बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात् ।।
करोति यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेतं तत् ।।११.२.३६ ।। भा.
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।
।।गोपालकृष्ण भगवान् की जय ।।
।। श्रीमद्भागवत पाचवा दिवस समाप्त ।।

ट

# ।। श्रीमद्‌भागवत सहावा दिवस ।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात्।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे।।
विशुद्‌धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा। विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा।।
तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ।।

तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण। स्तवावे ते कवणे कवणालागी।।
यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम्।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो। मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम्। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम्।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्। संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन्। प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम्।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम्।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम्।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम्।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं। तत्र तत्र कृत मस्तकांजलिम्।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं। मारुतिं नमत राक्षसान्तकम्।।

पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम्।।

श्रीगणेशाय नमः

श्रीगुरुचरणारविन्दाभ्याम् नमः।

अस्तिः प्राप्तिश्च कंसस्य महिष्यौ भरतर्षभ ।
मृते भर्तरि दुःखार्ते ईयतुः स्म पितुर्गृहान् ।। १०.५०.१ ।। श्री. भा.
पित्रे मगधराजाय जरासन्धाय दुःखिते ।
वेदयाञ्चक्रतुः सर्वमात्मवैधव्यकारणम् ।। १०.५०.२ ।। श्री.भा.

शुकाचार्य म्हणतात, राजन, कंसाच्या दोन स्त्रिया अस्ति आणि प्राप्ती. कंसाचा नाश झाल्यानंतर दुःखाकुल झालेल्या त्या दोघीही आपल्या पित्याच्या घरी गेल्या. पिता जो मगधराज जरासंध याला आपलं सगळं दुःखं त्यांनी सांगितलं. आपला जावई मारला गेला हे अप्रिय ऐकल्याबरोबर वाईट वाटलं जरासंधाला आणि राग आलेला आहे. जेवढे यादव आहेत त्या यादवांचा संहार करायचा त्याने ठरवलं; आणि राजधानीला वेढा दिलेला आहे. समुद्रासारखं पसरलेलं ते सैन्य पाहिलं भगवंताने. आपल्या नगराला बाहेरून वेढा पडलेला आहे. जाणं येणं शक्यच नाही बाहेर. आणि आतली मंडळी सगळी भयाकुल झालेली आहेत. विचार करताहेत भगवान. हे सैन्य तर सगळं मारायचं म्हणाले, भूमीचा भार कमी करायचा. आणि जरासंधाला मारायचं नाही, त्याला सोडून द्यायचं. पुन्हा सैन्य घेऊन येईल. याकरताच आपण अवतार घेऊन आलो. धर्मरक्षण करणं आणि अधर्माची शांती करणं याकरता आपण आहोत. असा विचार भगवान करत असताना आकाशमंडलातून दोन रथ खाली आलेले आहेत. शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प, वराहक त्यांच्या घोड्याची नावं आहेत. सर्व अस्त्रं, शस्त्रास्त्रंही आलेली आहेत. कौमुदिकी गदा आहे, सुदर्शन चक्र आहे. सारथी आहे. बलरामजींना त्यांनी सांगितलं, ''आर्य, यादवांच्यावर आज मोठं संकट आलेलं आहे. हा आपला रथ आलेला आहे. आयुधं आलेली आहेत. आपण या रथामधे बसून या सगळ्या आपल्या लोकांचं संरक्षण करायचंय आज. तेवीस अक्षौहिणी सैन्य हा भूमिचा भार आज दूर करायचा आहे आणि रथामधे बसून राम-कृष्ण बाहेर पडले. थोडसं सैन्य बरोबर घेतलं. पांचजन्य शंख वाजवला, श्रीकृष्णांनी, शत्रुसैन्याच्या मनामधे धडकी भरलेली आहे. कोण आहे हा वीर ? जरासंध आलेला आहे तो म्हणाला, ''कृष्णा तुझ्याबरोबर मला युद्ध करायची इच्छा नाही. तू आपल्या प्रत्यक्ष मामाला मारलेलं आहेस.'' बलरामाला तो म्हणतो आहे, ''तुला जर धैर्य असेल तर माझ्यासमोर युद्धाला उभा राहा. माझा नाश कर किंवा मी तुझा नाश करीन.'' भगवान सांगताहेत.'' जरासंधा, शूर पुरुष अशी नुसती बडबड करत नसतात. काय पौरुष असेल ते दाखवतात. कोण तुझ्या भाषणाकडे लक्ष देतो. सैन्याला आज्ञा केली जरासंधाने आणि युद्धाला सुरवात झालेली आहे. गरुडध्वज भगवंतांच्या रथावर होता आणि तालध्वज बलरामांच्या रथावर होता. त्या सैन्याच्या गर्दीमधे दोघांचे रथ दिसेनात. मथुरेत असणाऱ्या स्त्रियांना अत्यंत शोक झालेला आहे. केवढं सैन्य आहे आणि हे दोघेच गेलेले आहेत. काय होतंय कुणास ठाऊक ! शारंग धनुष्य जे आहे ते सज्ज केलं भगवंतांनी आणि बाणवृष्टीला सुरवात झालेली आहे. भात्यातून बाण केव्हा काढतात. केव्हा जोडतात, केव्हा सोडतात काहीही कुणाला कळलं नाही इतक्या वेगाने कार्य चाललेलं आहे.

हजारो सैनिक मरून पडताहेत. घोडे मेले, सारथी मेले. त्याचप्रमाणे रथी मेले, पदाति मेले, सगळ्यांचा नाश झालेला आहे. संपूर्ण सैन्य नष्ट केलेलं आहे राम आणि कृष्णांनी. रामांनी जरासंधाला धरलं. बांधून घेऊन जायचं ठरवलेलं असताना श्रीकृष्ण म्हणाले त्याला सोडून द्या. जा रे म्हणाले तुला जीवदान दिलेलं आहे. फार बडबड करत होतास. सोडून दिलं त्याला. पराभव झाल्यामुळे आपण आता राजधानीमधे न जाता हिमालयात जावं, तपश्चर्या करावी म्हणून तो जरासंध निघाला. पण त्याची मित्रमंडळी राजे लोक होते पुष्कळ. त्यांनी सांगितलं पराभव झाला म्हणून मनाला इतकं लावून घ्यायचं काय काम आहे ? आपण आणखी सैन्य जमवू, पुन्हा युद्ध करू. इकडे मथुरेत विजय मिळाल्यामुळे वाद्यं वाजताहेत. द्रव्य वगैरे पुष्कळ मिळालं युद्धामधे. ते घेऊन राम–कृष्ण मथुरेमधे प्राप्त झाले. युद्धामधे मिळालेलं सर्व द्रव्य त्यानी यदुराजा जो उग्रसेन याला समर्पण केलेलं आहे. शुकाचार्य म्हणतात, राजा याप्रमाणे सतरा वेळा तो जरासंध, तेवीस अक्षौहिणी सैन्य प्रत्येक वेळेला घेऊन आलेला आहे. आणि प्रत्येक वेळेला तितकं सैन्य राम आणि कृष्णांनी मारलेलं आहे. जरासंधाला सोडून द्यायचं ! अठराव्या वेळेला पुन्हा त्याने सैन्याची जमवाजमव सुरू केली आणि पुन्हा मथुरेवर आक्रमण करायचं ठरवलं. इतक्यात नारदांनी, जवळच एक कालयवन नावाचा यवनाधिपती होता. त्याला जाऊन सांगितलं, कारण त्याचाही नाश करायचा होता ना ! धर्मविरोधी तो आहे. नारद सांगताहेत, ''अरे, हा यादवांचा जो सेनापती म्हणा, मुख्य पुढारी आहे कृष्ण, केवढा बलवान झालेला आहे. तुझ्याजवळ आहे मथुरा जरासंधासारख्याचा त्याने इतक्या वेळी पराभव केलेला आहे. हा तुझ्यापेक्षा आणखी वरचढ होईल. तू याच्याकडं लक्ष दे'' असं सांगून नारद गेले. त्यानीही पुष्कळ सैन्य जमा केलेलं आहे आणि आला मथुरा राजधानीला वेढा देऊन बसला. भगवान विचार करताहेत की यादवांच्यावर आता दोन्हीकडून संकट आलं म्हणाले. हा कालयवन नगराला वेढा देऊन बसलेला आहे. जरासंधही एक दोन दिवसामधे येणार, निघालेला आहे, अशी बातमी आलेली आहे. या कालयवनाबरोबर लढाई करण्यामधे आम्ही गुंतलेलो असताना, हा जरासंध एकदम नगरामधे निघून जाईल म्हणाले. आमच्या सगळ्या लोकांना मारेल. काय करावं ? यांच्या संरक्षणाची प्रथम योजना करायची. विश्वकर्म्याला आज्ञा केली आणि समुद्रामधे एक दिव्य नगर, द्वारका नगरी निर्माण केली आहे.

विश्वकर्म्याचं कौशल्य दिसतंय त्याठिकाणी किती मोठे मोठे रस्ते आहेत, त्याचप्रमाणे मोठे वाडे आहेत. उपवनं पुष्कळ आहेत. अशा प्रकारचं ते उत्तम नगर निर्माण झालं. सुधर्मा सभा जी आहे देवलोकामधे असणारी ती इंद्राने द्वारकेमधे पाठवून दिली. ज्या सभेमधे बसलेल्या लोकांना

क्षुधा, तृषाच लागत नाहीये. श्यामकर्ण अश्व जे आहेत, मनाप्रमाणे ज्यांचा वेग आहे ते वरुणाने पाठवून दिले. आठही निधीकोष हे कुबेराने पाठवून दिले हे सगळं देवानेच आम्हाला दिलेलं आहे, हा अधिकार आम्हाला दिलेला आहे, हे ऐश्वर्य देवाने दिलेलं आहे. देवच जर भूमीवर आलेले आहेत तर त्यांचं त्याना ऐश्वर्य द्यावं असा विचार करून सर्वही लोकपालांनी आपलं ऐश्वर्य पाठवलेलं आहे.

तत्र योगप्रभावेण नीत्व सर्वजनं हरिः ।
प्रजापालेन रामेण कृष्णः समनुमन्त्रितः ।
निर्जगाम पुरद्वारात् पद्ममाली निरायुधः ।। १०.५०.५८ ।। श्री.भा.

मथुरेमधे असणारी सर्वही मंडळी स्त्री, पुरुष, बाल, वृद्ध सगळी मंडळी आपल्या योगसामर्थ्याने आकाशमार्गाने द्वारकेमधे नेऊन ठेवली भगवंताने मथुरेमधे एकही मनुष्य नाही. काही उरलं नाही. पशु, पक्षी सगळी पाठवली. बलरामजींच्या बरोबर काही विचार केलेला आहे भगवंतांनी, मी आता पुढे जातो, कालयवनाला मारून येतो अस सांगून आणि बाहेर पडले. मथुरेचा दरवाजा उघडला आणि एकटे गोपालकृष्ण निःशस्त्र बाहेर पडले, पळायला लागले ! तो कालयवन होताच. घनःशाम, पीतांबरधारी हाच कृष्ण असला पाहिजे. नारदांनी सगळं त्याला वर्णन करून सांगितलं होतं; कृष्ण कसा दिसतो ? हाच कृष्ण आहे. हा पळायला लागलेला आहे, हातात शस्त्र नाही. आपण याला धरावं म्हणून तो यवन त्यांच्या पाठीमागे लागलेला आहे. त्यानेही हातात शस्त्र घेतलं नाही. जवळ जवळ सापडलो आपण असं दाखवावं भगवंतांनी आणि पुन्हा एकदम दूर निघून जावं. असं पुष्कळ लांबवर त्याला नेलं. डोंगरावरती एका गुहेमधे भगवान गेलेले आहेत. पाठीमागून कालयवन आला. तिथे कुणीतरी मनुष्य झोपलेला आहे. पांघरूण घेऊन. त्याला वाटलं हाच कृष्ण आहे. इतका वेळ मला दमविलंस आणि आता तू झोपेचं सोंग घेतोस काय ? म्हणून त्याने रागाने त्या निजलेल्या कृष्णाला लाथ मारली. तो झोपलेला मनुष्य एकदम जागा झाला. आणि त्याने त्या कालयवनाकडे पाहिल्याबरोबर त्याच्या शरीरातून अग्नि उत्पन्न झालेला आहे आणि कालयवनाचं शरीर नष्ट होऊन गेलेलं आहे. गोपालकृष्ण नंतर पुढे आलेले आहेत. आचार्य सांगतात, राजा, ईश्वाकू राजाच्या कुळात, मांधाताचा मुलगा, मुचकुंद नावाचा हा राजा होता. देवांनी त्याची प्रार्थना केली, आमचे सेनापती आपण व्हा, आमचं रक्षण करा, दैत्यांचा पराजय करा. पुष्कळ काळपर्यंत स्वर्गलोकामधे मुचकुंद राजा देवरक्षणाकरता राहिला. पुष्कळ दिवस गेले. देवांनी सांगितलं, ''राजेसाहेब, आता आमचं काम संपलं. पुष्कळ दिवस राज्यत्याग करून आपण

आमच्याकडे आलात. आता इतका काळ गेलेला आहे की पृथ्वीवर आपल्यापैकी कोणीही शिल्लक नाही जिवंत नाही. स्त्रिया नाहीत, पुत्र नाहीत. आमच्यावर फार उपकार तुम्ही केलेत तेव्हा काही वर तुम्ही मागून घ्या. फक्त मुक्ति मागू नका, ते सामर्थ्य त्या श्रीहरीचं आहे.'' हे देवांनी कबूल केलं. मग राजाने त्या सर्व देवांना सांगितलं.'' तुमचं कार्य झालं. संरक्षणाचं काम फार कठिण आहे, तेव्हा फार जागरण झाल्यामुळे, प्रथम मला विश्रांति घ्यायची आहे. मला आता झोप घ्यायची आहे.'' देवांनी मग त्याला ह्या गुहेमधे झोपायला सांगितलं आणि सांगून ठेवलं, ''तुझी झोप होण्यापूर्वी जो तुला जागं करेल, त्याच्यावर तुझी दृष्टी पडल्याबरोबर त्याचं शरीर दग्ध होऊन जाईल.'' ती स्थिती झाली. हे भगवंतांना माहिती आहे. कुठं कोण आहे, कोणाकडून कोणाचा नाश करायचा. हे सगळं त्यांना माहिती आहे. म्हणून भगवान श्रीकृष्ण त्या कालयवनाला इथे ह्या गुहेत घेऊन आले. कालयवनाला त्यांनी स्वत: मारलं नाही. त्या मुचकुंद राजाची दृष्टी त्याच्यावर पडल्याबरोबर तो जळून गेलेला आहे आणि मग मुचकुंदावर कृपा करण्याकरता भगवान पुढे आले. भगवंतांच्याकडं मुचकुंदानी पाहिलेलं आहे. घन:श्याम, पीतांबर धारी, श्रीवत्सचिन्ह आहे, चतुर्भुज रुप दिसतं आहे. तेज दिसतं आहे. विचार केला राजाने, साक्षात भगवान हे आहेत, नारायण आहेत. विचारलं, ''आपण कोण आहात महाराज'' काय सूर्यनारायण आहात, चंद्र आहात का इंद्र आहात ? मला असं वाटतं की सर्व देवांचे अधिपती आपण साक्षात महाविष्णू आहात. मी माझा परिचय करून देतो. ईश्वाकूच्या कुळात उत्पन्न झालेला मी मुचकुंद नावाचा राजा आहे. यौवनाश्वाचा पुत्र. पुष्कळ दिवस जागरण झाल्यामुळे इथे झोपलो होतो. आत्ता कुणीतरी येऊन मला उठवलं आणि त्याच्या पापाने त्याचा नाश झालेला आहे. आणि इतक्यात आपलं दर्शन मला घडलेलं आहे. कोण आहात आपण ?'' भगवान म्हणाले, ''राजा, माझा जन्म, माझी कर्मं, माझी नावं पुष्कळ आहेत. कोणतं सांगू. आज मी कुठं जन्माला आलो. आजचं माझं नाव काय हे तुला सांगतो.

विज्ञापितो विरिञ्चेन पुराहं धर्मगुप्तये ।
भूमेर्भारायमाणानामसुराणां क्षयाय च ।। १०.५१.४० ।। श्री.भा.

ब्रह्मदेवाने धर्मसंरक्षणाकरता आणि भूमिला भार झालेल्या असुरांचा नाश करण्याकरता मला प्रार्थना केली. म्हणून मी यदुकुलामधे वसुदेवाचा पुत्र म्हणून जन्माला आलो आहे. वसुदेवाचा मुलगा असल्यामुळे माझं नाव वासुदेव यावेळचं आहे. कालनेमी राक्षस कंसरूपाने जन्माला आलेला होता. त्याचा नाश केलेला आहे. त्याचे जे काही सहकारी होते प्रलंबादिक, चाणूर, मुष्टिक सगळे

राक्षस हे ही सज्जनांचा द्वेष करणारे यांचाही नाश केलेला आहे. हा यवनही त्यांच्याप्रमाणेच असुरवृत्तिचा होता. तुझ्या नेत्रतेजाने याचा नाश झालेला आहे. आता तुझ्यावर अनुग्रह करण्याकरता मी आलेलो आहे. तुला पाहिजे तो वर मागून घे असं भगवंताने सांगितल्यावर साक्षात भगवान नारायण हे आहेत ही खात्री झाली आणि साष्टांग नमस्कार मुचकुंदाने केलेला आहे. मुचकुंद म्हणतो, देवा

विमोहितोऽयं जन ईश मायया
त्वदीयया त्वां न भजत्यनर्थदृक् ।
सुखाय दु:खप्रभवेषु सज्जते ।
गृहेषु योषित् पुरुषश्च वञ्चित: ।। १०.५१.४६ ।। श्री. भा.

सर्वही जीव जन्माला आलेले आपल्या मायामोहामधे सापडलेले आहेत; आणि आपल्या भजनाकडं त्यांचं बिलकुल लक्ष नाहिये. विषयाच्या ठिकाणी मनाची इतकी आसक्ती त्यांची झालेली आहे, सुख मिळावं म्हणून विषयांकडे जातात पण त्याच्यातून दु:खंच निर्माण होतंय. दुर्लभ मनुष्य जन्म मिळालेला असताना आपल्या चरणाची सेवा जो करत नाहिये तो पशू आहे. मनुष्य जन्म त्याने फुकट घालवलेला आहे. माझंही आयुष्य आजपर्यंत फुकटं गेलेलं आहे. या राज्यमदामुळे मला काही कळलं नाही. स्त्री, पुत्र, राज्य यांच्यामधे आसक्त होऊन मी राहिलो. यामुळे असावधानी मी राहिलो आणि माझं आयुष्य काही सार्थ झालं नाही. तेव्हा या संसारातून फिरणारा जो आहे, जन्म मरण प्रवाहात सापडलेला हा जीवात्मा त्याला आपल्या कृपेनं आपल्या भक्तांची संगती जर घडेल तरच तो आपल्या जवळ येऊन पोचू शकतो. माझ्यावरही असाच अनुग्रह झाला आपला. राज्य माझं गेलं. संबंध सगळा संपला. आणि आज आपल्या दर्शनाचा योग आलेला आहे. मला कोणताही वर नको आहे. आपली सेवा घडावी याशिवाय दुसरा कोणताही वर नको आहे. सर्व आशा, सर्व वासना टाकून आणि आपल्याला मी शरण आलेलो आहे. माझ्यावर कृपा करा, अशी प्रार्थना त्याने केली असताना भगवान सांगतात राजा,

सार्वभौम महाराज मतिस्ते विमलोर्जिता ।
वरै: प्रलोभितस्यापि न कामैर्विहता यत: ।। १०.५१.५९ ।। श्री. भा.

तुझी बुद्धि अत्यंत निर्मल आहे म्हणाले. वर मागायला तुला सांगितलं. पाहू या काय मागतो हा. लोभ निर्माण करायचा प्रयत्न केला मी. परंतु तुला कोणताही मोह नाही. निष्काम प्रेम, भक्ति

तुझ्या चित्तामधे आहे. तू सावध आहेस की नाही हे पाहिलं म्हणाले, माझे एकनिष्ठ भक्त जे आहेत त्यांच्या बुद्धिमधे कोणतीही कामना राहात नाही. बुद्धिभेद त्यांचा होत नाही. मनाला आवरण्याकरता योगाभ्यासही सांगितलेला आहे. परंतु त्या योगाभ्यासाने मनाचा पूर्ण निग्रह होत नाही.

युञ्जानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।
अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् ।। १०.५१.६१ ।। श्री.भा.

मनाचा निग्रह करणं, प्राणवायूला स्थिर करून प्राण अडवून, मनालाही अडवायचं म्हणजे स्थिर करण्याचा प्रयत्न करणारे जे आहेत त्यांच्या अंतकरणामधे भक्ति नाही. केवळ योगाचा अभ्यास करताहेत. प्रयत्नानी आमचं मन आम्ही जिंकू. असा प्रयत्न करणारे जे आहेत त्यांच्या मनातून वासनाक्षय होत नाही. सूक्ष्म वासना त्यांच्या मनामधे राहातात आणि पुन्हा बाहेर ते मन जातं, संसारामधे पुन्हा अडकतं. जा म्हणाले आता, सर्व पृथ्वीवर संचार कर, माझी भावना धारण करून. क्षत्रियधर्माला अनुसरून आजपर्यंत तुझ्या हातून पुष्कळ हिंसा झालेली आहे. शिकारीमधे हिंसा झाली, युद्धामधे हिंसा झाली. ते सर्व जे पाप आहे ते पाप तपश्चर्येने तू दूर कर. पुढच्या जन्मामधे ब्राह्मण तू होशील. सर्वांच्या ठिकाणी सौहार्द भावना तुला उत्पन्न होईल. आणखी माझी प्राप्ती तुला होऊन तू मुक्त होशील. भगवंताने त्याला मार्गदर्शन केलं. प्रणाम करून तो मुचकुंद राजा गुहेच्या बाहेर पडलेला आहे. बाहेर आल्याबरोबर सगळी माणसं, पशू, झाडं वगैरे अगदी लहान लहान त्याला दिसायला लागली. पूर्वीच्या युगातला तो ! त्यावेळचा आकार आणि आत्ताचा आकार, त्याला विलक्षण अंतर वाटलेलं आहे. कलियुग आलेलं असावं, अशी त्याची कल्पना झाली. आणि उत्तर दिशेला गंधमादन पर्वतावर तो गेलेला आहे. श्रद्धेने तपश्चर्या तो करतो आहे. बदरिकाश्रमामधेही तो येऊन राहिलेला आहे शीतोष्ण, सुख दुःख सर्वही सहन करतो आहे. हरीची आराधना करतो आहे. कृतार्थ तो झालेला आहे.

श्रीकृष्णपरमात्मा त्या गुहेतून बाहेर पडले. मथुरेजवळ आलेले आहेत. राम तयार होतेच तिथे. दोघांनी एकदम त्या कालयवनाच्या सैन्यावर जोराचा हल्ला केला आणि सर्व सैन्य मारून टाकलं. पुष्कळ त्यांना संपत्ती मिळाली त्या यवनाच्या युद्धामधे. ते सगळं धन बैलावर, उंटावर घेऊन ते मथुरेला निघालेले आहेत. इतक्यात तो जरासंध येऊन पोचला. निरोप आलाच होता. तो अठराव्या वेळेला तेवीस अक्षौहिणी सैन्य घेऊन पुन्हा आलेला होता. इतकं सैन्य यांनी मारलं सतरा वेळेला, तरी पुन्हा तितकं सैन्य आणलं. त्याचा तो वेग पाहिला राम-कृष्णांनी ते सगळं धन टाकलं

आणि पळायला लागले. याच्याबरोबर आत्ता युद्ध करून उपयोग नाही म्हणाले. मनुष्यलीला आहे ती. भीती वाटली असं दाखवलं. तो जरासंध, अगदी आनंद झाला त्याला. आज तरी मी तुला जिंकलं की नाही म्हणतोय. तो ही त्यांचा पाठलाग करतोय. पुष्कळ दूर आलेले आहेत राम-कृष्ण. एका डोंगरावर चढून गेले. कुठे गेले काय गेले पत्ता नाही म्हणून त्याने आपल्या सैनिकांना सांगीतलं, चारी बाजूनी हा डोंगरच पेटवून द्या म्हणाले म्हणजे हे जळून जातील, आग लावली त्या सबंध डोंगराला आणि जरासंध सर्व सैन्य घेऊन आपल्या राजधानीला निघून गेलेला आहे. शत्रूला समजणार नाही अशा मार्गाने दोघेही खाली उतरलेले आहेत आणि द्वारकेमधे येऊन पोचलेले आहेत. पराजय काय आणि जय काय दोन्ही सारखं आहे. शुक सांगतात राजा, आनर्त देशाचा रैवत राजाने ब्रह्मदेवांच्या आदेशाप्रमाणे आपली कन्या रेवती बलरामांना दिली हे तुला पूर्वी सांगितलेलं आहे. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याने, भीष्मक राजाची कन्या जी आहे रूक्मिणी हिच्याबरोबर विवाह केला. त्यावेळेला आलेले अनेक राजे विरोधी होते. जरासंधही प्रमुख होता त्यात. ह्या सर्व राजांचा पराजय केला श्रीकृष्णांनी आणि सर्वांच्या समक्ष रूक्मिणीचं हरण करून ते द्वारकेला गेले आणि तिथे विवाह झालेला आहे. रूक्मिणीविवाहाची कथा सांगा महाराज, अशी राजाने प्रार्थना केल्यानंतर, शुक सांगतात राजा,

राजाऽऽसीद् भीष्मको नाम विदर्भाधिपतिर्महान् ।
तस्य पञ्चाभवन् पुत्राः कन्यैका च वरानना ।। १०.५२.२१ ।। श्री. भा.

विदर्भ देशाचा अधिपती भीष्मक नावाचा राजा होता. त्याला रूक्मी, रूक्मरथ, रूक्मबाहू, रूक्मकेश, आणि रूक्ममाली अशी पाच मुलं होती आणि रूक्मिणी नावाची एक कन्या. नारदादिक महर्षि वारंवार राजवाड्यामधे येत होते. आणि ती रूक्मिणी तिथे आईबापांच्या जवळ बसलेली असताना नारदानी मुद्दाम सांगायचं, अहो तुमच्या मुलीला एक वर मी पाहून आलेलो आहे, द्वारकेचा राजा आहे, पराक्रमी आहे. जरासंधाचा त्याने असंख्य वेळा पराभव केलेला आहे. कालयवनाला त्याने मारलेलं आहे. अत्यंत सुंदर आहे, पराक्रमी आहे. असं वर्णन करावं. तिकडे द्वारकेमधे जाऊन वसुदेव देवकीला म्हणावं, अहो आता तुमच्या कृष्णाचा विवाह तुम्हाला करायचा नाही का ? करायचाय म्हणाले पण मुलगी कुठाय ? आहे म्हणाले नारद, मी पाहून आलेलो आहे. विदर्भापति भीष्मक राजाची कन्या रूक्मिणी ही अत्यंत बुद्धिमान आहे. सुंदर आहे. शीलवती आहे, कृष्णाला योग्य भार्या आहे. त्यांना तिथे सांगावं. कृष्णांच्या कानावर ही बातमी आली. त्यांनाही वाटलं ही कन्या बरी आहे. तिकडे रूक्मिणीनेही कृष्णांचं वर्णन ऐकल्यामुळे

आपल्याला कृष्ण हेच पती प्राप्त व्हावेत अशी तिची भावना आहे.

भीष्मक राजा, त्याची पत्नी, भाऊ, इतर मंडळी यांचा निश्चय झाला की रूक्मिणीचा विवाह श्रीकृष्णांशी करायचा. पण रूक्मिणीचा ज्येष्ठ बंधू जो रूक्मी तो कृष्णाचा वैरी होता, द्वेष करत होता. शिशुपाल वगैरे जे होते, कृष्णद्वेष करणारे त्यांचा तो मित्र होता. नाही म्हणाला, कृष्णाला रूक्मिणी द्यायची नाही. त्याला काय राज्य आहे, काय आहे ? माझा मित्र शिशुपाल हा राजा आहे, त्यालाच रूक्मिणी द्यायची. प्रमुख होता तो. सगळा राज्यकारभार पहात होता, त्याला विरोध कसा करायचा ? बर बाबा, हो केलं सगळ्यांनी. रुक्मिणीला अत्यंत दुःख झालेलं आहे. कोणी आता तिच्या बाजूचं नाही आहे. तिने एक विश्वासू ब्राह्मण होता नेहमी वाड्यामधे येणारा त्याला प्रार्थना केली. स्वतः कृष्णांना पत्र लिहून दिलेलं आहे. आणि सांगितलं, ''भूदेवा, हे माझं पत्र एवढं गोपालकृष्णांना नेऊन द्या तुम्ही आणि माझी अवस्था तेवढी त्यांच्या कानावर अवश्य घाला तुम्ही.'' मला दुसऱ्या कोणाचाही आधार नाहीये.

ब्राह्मण आलेला आहे द्वारकेमधे. श्रीकृष्णांनी अशी ताकीद दिली होती द्वारपालांना की एखादा तपस्वी ब्राह्मण किंवा अशाच प्रकारचा कोणी श्रेष्ठ पुरुष आला तर त्याला प्रतिबंध करायचा नाही. आलेले आहेत हे ब्राह्मण आत. सुवर्ण सिंहासनावरती भगवान बसलेले होते. ब्राह्मणाला पाहिल्याबरोबर सिंहासनावरून उतरलेले आहेत. त्यांना आपल्या सिंहासनावर बसवलं आणि त्यांची यथाविधी पूजा केलेली आहे. भोजन झालेलं आहे, विश्रांती झाली आणि बोलत बसले. सिंहासनावर ब्राह्मण बसले आणि भगवान त्यांच्या पायाजवळ बसलेले आहेत. पाय दाबताहेत काय भूदेवा, तुम्ही कोणत्या राज्यातून आलेले आहात ? तुमच्या राज्यामधे धर्माचरण करतात की नाही सगळी मंडळी ? आपल्यासारखे ब्राह्मण संतुष्ट राहणारे जे आहेत त्यांना धर्माचरणाचं फल हे निश्चित मिळतं म्हणाले. असंतुष्ट राहणारा, धर्माचरण करून सुद्धा त्याला काही सुख लाभत नाहिये.

विप्रान् स्वलाभसंतुष्टान् साधून् भूतसुहृत्तमान् ।
निरहंकारिणः शान्तान् नमस्ये शिरसासकृत् ।। १०.५२.३३ ।। श्री. भा.

भगवान गोपालकृष्ण सांगताहेत जे असे विप्र आहेत जे काही दैवयोगाने मिळेल त्याच्यामधे संतुष्ट राहणारे. अत्यंत साधूवृत्तीचे, सर्व भूतांच्यावर प्रेम करणारे प्रेमाने वागणारे, निरंहकारी, अत्यंत शांत असे जे विप्र आहेत ; त्यांना मी शिरसावंदन करतो; निरंतर वंदन करतो म्हणाले !

गोब्राह्मण प्रतिपालक आहेत. हा जातीयवाद नाहियै. हा विचार केला पाहिजे. अशा रितीनं, कुठून आपण आला, काय कामाकरता आला, सगळं मला सांगा म्हणाले गोपालकृष्ण. ब्राह्मणाने सगळं सांगितलं. आमची राजकन्या रूक्मिणी अत्यंत दुःखी कष्टी झालेली आहे म्हणाले. आपल्याबरोबर विवाह व्हावा अशी तिची इच्छा आहे आणि तिच्या बंधूने हे लग्न मोडलं म्हणाले. तिने एक पत्र लिहून दिलेलं आहे. वाचा म्हणाले गोपालकृष्ण,

श्रुत्वा गुणान् भुवनसुन्दर श्रृण्वतां ते
निर्विश्य कर्णविवरैर्हरतोऽङ्गतापम् ।
रूपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं
त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ।। १०.५२.३७ ।। श्री. भा.

सर्वाधार भगवान आहेत. सर्वांचं आणखी मन संतुष्ट करणारा, सर्वांचं संरक्षण करणारा एक भगवानच आहे; ही खात्री मनामधे बाळगून रूक्मिणी लिहिती आहे. प्रथम तिने सांगीतलं, देवा आपण भुवनसुंदर आहात. त्रिभुवनात आपल्यासारखं सौंदर्य कुणाचही नाही. मी आपल्याला पाहिलं नाही अजून, पण ऐकलंय. आपले गुण ऐकलेले आहेत. ते ऐकूनच माझ्या चित्ताला शांती मिळालेली आहे. आपलं रूप कसं आहे ते मी ऐकलेलं आहे आणि माझ्या मनाचा निश्चय झाला आणि माझं मन आपल्याला अर्पण केलेलं आहे. कोणती कन्या आपलं रूप गुण ऐकून आपल्याला वरणार नाही. मी पूर्ण विचार करूनच आपल्याला मनाने वरलेलं आहे. हा माझा देह मी आपल्याला अर्पण केलेला आहे. आपण याठिकाणी या आणि माझा स्विकार करा. या शरीराला दुसऱ्या कोणीही स्पर्श करू नये. हा देह तुम्हाला दिलेला आहे. जर आजपर्यंत अनेक जन्मामधे माझ्या हातून पुण्यकर्म घडली असतील तर आपण येऊन माझं पाणीग्रहण करा. शिशुपालादिकांनी माझं पाणीग्रहण करू नये. कसं यायचं, काय करायचं सगळं तिने सुचविलेलं आहे. एक दोन दिवस अगोदर या आपण म्हणाली सैन्य मागाहून येऊ दे आपलं. आणि सगळे इथे आलेले आहेत. शिशुपाल काय, जरासंध काय, पुष्कळ राजे आलेले आहेत. त्या सर्वांचा पराजय करून मला घेऊन चला. राक्षसविधी म्हणजे हरण करून घेऊन जायचं. कन्याहरण. तरीपण रूक्मिणीच्या आप्तेष्टांनी प्रतिकार केला तर ? त्यावेळी रक्तपात करावा लागेल ना ? त्याचंही सांगीतलं रूक्मिणीने. नाही म्हणाली, आमचा असा एक नियम आहे, कुळाचार की जी नववधू आहे आहे तिने विवाहाच्या पूर्वी, आमची जी कुलदेवी आहे गावामधे, तिच्या मंदिरात राजवाड्यातून चालत जायचं, तिची पूजा करायची, प्रार्थना करायची आणि चालत वाड्यामधे यायचं असा नियम आहे. ही वेळ

तुम्हाला योग्य आहे मला घेऊन जाता येईल. त्यावेळेला रस्ता मोकळा असणार माझ्याकरता. आणखी काही युद्धाचा प्रसंग नाही. तुम्ही तिथे तयार राहा म्हणजे झालं. मला लगेच रथामधे घेऊन तुम्हाला जाता येईल. हे सगळं तिने सुचवलेलं आहे. गृहित धरलेलं आहे, गोपालकृष्ण येणार आणि मला घेऊन जाणार, अशा अगदी मोठ्या आशेने लिहीलेलं आहे. तरीसुद्धा शेवटी ती म्हणतीय.

यस्यांघ्रि पंकजरज:स्नपनं महान्तो
वाञ्छक्त्युमापतिरिवात्मतमोऽपहत्यै ।
यर्ह्यम्बुजाक्ष  न लभेय भवत्प्रसादं
जह्यामसून् व्रतकृशाञ्छतजन्मभि: स्यात ।। १०.५२.४३ ।। श्री. भा.

गोपालकृष्णा, आपल्या चरणांची सेवा घडावी. आपल्या चरणांचे रज:कण स्वत:च्या अंगावर पडावेत, म्हणजे अज्ञान, तम हे दूर होईल अशी इच्छा मोठे मोठे योगी करत असतात. असे आपण आहात. जर आपला प्रसाद माझ्यावर झाला नाही, आपण याठिकाणी आला नाहीत तर मी माझे प्राण ठेवणार नाही. पहा आपण. या जन्मात नाही, पुढं कोणत्या तरी जन्मात आपली प्राप्ती मला निश्चित होईल.

ब्राह्मणाने सांगितलं, हा संदेश आमच्या राजकन्येने आपल्याला लिहून दिला आहे आणि आपल्याला माझीही विनंती आहे, आपण निश्चय करा आणि रुक्मिणीला तेवढं घेऊन या. हसले भगवान गोपालकृष्ण. भूदेवा, मलासुद्धा रात्री झोप लागत नाही म्हणाले. आम्हाला तर आमंत्रणच नाही म्हणाले. त्या रूक्मिने सर्व पुढाकार घेतलाय. लग्नाचं काही आमंत्रण नाही काही नाही. मला माहिती आहे, त्या रूक्मिणीच्या ज्येष्ठ बंधूने माझ्या द्वेषामुळे हे लग्न मोडलेलं आहे. असू दे, काही हरकत नाही. रूक्मिणीचं मन मला समजलेलं आहे, तुम्हीही सांगितलेलं आहे. कोणी कितीही पराक्रमी असो सर्व राजांचा पराभव करून सर्वांसमक्ष मी रूक्मिणीला घेऊन यायची प्रतिज्ञा करतो आहे, चला, किती वेळ आहे अजून ! एक-दोन दिवस आहेत म्हणाला ब्राह्मण. कोणालाही सांगितलं नाही. त्या दारूक सारथ्याला रथ आणायला सांगितला. ब्राह्मणाला रथामधे घेतलं आणि निघाला रथ वेगाने. शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प, वराहक म्हणजे त्या अश्वाचा, मनाप्रमाणे वेग आहे. एका रात्रीमधे विदर्भ प्रांतात प्राप्त झाले. द्वारका कुणीकडं आणि अमरावती कुणीकडं अमरावतीला येऊन पोचले.

जे जे येणारे राजे आहेत त्यांचा आदरसत्कार तो भीष्मक राजा करतो आहे. नियुक्त जामात

जो शिशुपाल तो वऱ्हाडासह आलेला आहे. त्याचाही आदरसत्कार केला, त्याला राहण्याकरता उत्तम व्यवस्था केली. ध्वजपताका सगळ्या नगरामधे लावलेल्या आहेत. देवांचं, पितरांचं, विप्रांचं अर्चन वगैरे केलेलं आहे. सर्वांना भोजन घातलेलं आहे होमहवन झालेलं आहे, ग्रहहोमही झालेला आहे. ब्राह्मणांनी चारही वेदांच्या मंत्रांनी त्या कन्येला आशीर्वाद दिलेले आहेत. दानधर्म पुष्कळ केलेला आहे. अनेक राजे आलेले होते. शाल्व राजा आहे, जरासंध आहे, दंतवक्र आहे, पौंड्रक राजा आहे. शिशुपालाच्या पक्षाचे जेवढे राजेलोक होते ते नुसते नाही, पुष्कळ सैन्य बरोबर घेऊन आलेले आहेत. जरासंधानी सर्वांना सांगितलं, ''आज हे राम-कृष्ण जर याठिकाणी येतील, तो कृष्ण जर रूक्मिणीला हरण करायचा प्रयत्न करेल तर त्याचा प्रयत्न यशस्वी होऊ द्यायचा नाही. युद्ध करून त्याचा पराजय करायचा आणि ही रूक्मिणी शिशुपालालाच द्यायची याकरता आपण जमलेलो आहोत. युद्ध करायचं ठरवा.'' हे इकडे यांचं चाललेलं आहे. भगवान श्रीकृष्ण तर रथामधे बसून निघून आले पण लगेच बलरामजींना ते समजलं. कुणीतरी ऐकला होता दोघांचा संवाद. हे रथामधे बसून पुढे गेले आहेत अमरावतीला. एकटा गेला म्हणाले, राजे लोक इतके जमलेले आहेत आणि एकटा जाऊन काय करणार ? बंधू प्रेम आहे. लगेच यादवांचं सैन्य त्यानी जमा केलं. अत्यंत पराक्रमी यादव आहेत, अनेक युद्धामधे ज्यांनी विजय मिळवलेला आहे. हत्तीदळ, घोडदळ यासहित सर्वही सैन्य जमा केलं आणि बलरामजीही वेगाने निघाले आहेत. येऊन पोहोचलेले आहेत, अजून विवाहाला अवकाश होता. रूक्मिणी भगवंताची वाट पाहाती आहे, ब्राह्मणाची वाट पाहती आहे. अजून ब्राह्मण आला नाही.

अहो त्रियामान्तरित उद्वाहो मेऽल्पराधसः ।
नागच्छत्यरविन्दाक्षो नाहं वेद्म्यत्र कारणम् ।
सोऽपि नावर्ततेऽद्यापि मत्सन्देशहरो द्विजः ।। १०.५३.२३ ।। श्री. भा.

काय करायचं म्हणाली, माझं दैव मला अनुकूल नाही. एकरात्र आता फक्त शिल्लक राहिली, उद्या माझा विवाह होणार ! भगवान श्रीहरीही प्राप्त झाले नाहीत आणि तो ब्राह्मणही आला नाही ! काय माझ्याठिकाणी काहीतरी दोष त्यांना दिसला काय ? म्हणून भगवंत आले नाहीत काय ? गौरीमाता, भगवान शंकर कोणाचीही माझ्यावर कृपा नाही. त्यांचं मी अर्चन केलं आजपर्यंत. सगळं फुकट गेलेलं आहे. निराश झाली रूक्मिणी. डोळे झाकून घेतलेले आहेत तिने. काय करायचं आता ? कोणाला सांगायचं ? अश्रू नेत्रामधे आलेले आहेत. इतक्यात तिला शुभशकुन झालेले आहेत. डावा डोळा आणि डावा हात स्फुरण पावतो आहे. शुभशकुन झाल्याबराबेर तिने डोळे

उघडले आणि पाहती आहे समोर तो ब्राह्मण अत्यंत प्रसन्नमुखाने उभा आहे ! या या भूदेवा म्हणाली, तुमचीच वाट पाहती आहे. विचारलं आपण केव्हा आला. मी आत्ताच आलो म्हणाले, गोपालकृष्णांच्या रथातच बसून मी आलो. कृष्ण आले आहेत हे वेगळं सांगण्याची जरूरच नाही. ब्राह्मणानी सांगितलं, म्हणाले गोपालकृष्णांनी प्रतिज्ञा केली आहे, रूक्मिणीला मी घेऊन जाणार आहे. तुला आता कुणाचीही भीती बाळगण्याचं कारण नाही म्हणाले. इतका आनंद झाला रूक्मिणीला, लक्ष्मीदेवीच ती आहे. ब्राह्मणाला काय द्यावं ? केवढं काम केलं यानी माझं, भगवंताला आणून आणि माझी भेट करून देणार आहे. या ब्राह्मणाला याच्या योग्यतेचं द्यायला माझ्याजवळ नाहिये. असा विचार त्या महालक्ष्मीने केला आणि म्हणाली, ''भूदेवा, मी तुम्हला काहीही देऊ शकत नाही, फक्त नमस्कार करते.'' असं म्हणून त्याच्या पायावर मस्तक ठेवलेलं आहे.

न पश्यन्ती ब्राह्मणाय प्रियमन्यन्ननाम सा ।। १०.५३.३१ ।। श्री. भा.

इकडं बाहेर वार्ता पसरली, राम-कृष्ण आलेले आहेत. भीष्मक राजाला समजल्याबरोबर त्यांना सामोरा गेलेला आहे. मधुपर्क पूजा केली. वस्त्रं, अलंकार अर्पण केलेले आहेत त्यांना राहाण्याकरता उत्तम प्रकारचे वाडे वगैरे सगळी योजना केली. सैन्याची व्यवस्था केली, जनावरांच्या चारापाण्याची व्यवस्था केली. असे पुष्कळ राजेलोक आलेले आहेत. पृथ्वीवरचे जवळजवळ सगळे राजेलोक, कृष्णाच्या विरुद्ध जमलेले आहेत एकाठिकाणी, आणि गोपालकृष्ण त्याकरताच मुख्यत: आलेले आहेत. कोणाचा पराक्रम किती आहे, पाहायला मिळेल. रूक्मिणीची इच्छाही पूर्ण करायचीच आहे. पण मुख्य हे आहे. पराक्रमी कोण राजा आहे हे कळण्याकरताच जणु हे स्वयंवर म्हणा, युद्ध म्हणा रचलं होतं भगवंतांनी. गोपालकृष्ण आलेले आहेत ही वार्ता सगळ्या नगरामधे पसरली. सर्व नगरवासी लोक, स्त्री-पुरुष त्यांच्या दर्शनाकरता आलेले आहेत. पाहताहेत. त्यांचं ते रूप पाहून इतका आनंद झाला त्यांना आणि बोलायला लागलं

अस्यैव भार्या भवितुं रुक्मिण्यर्हति नापरा ।  
असावप्यनवद्यात्मा भैष्म्या: समुचित: पति: ।। १०.५३.३७ ।। श्री. भा.

आमची राजकन्या रूक्मिणी याचीच भार्या व्हायला योग्य आहे आणि हाच हिला योग्य पती आहे.

तो जो नियोजित वर होता त्याच्या वाड्यामधे कोणीही नगरातला मनुष्य गेला नाही.

त्याच्या वाड्यावरून जाताना, कृष्णांनाच रूक्मिणी मिळाली पाहिजे असं ओरडत जात होते.

ठरल्याप्रमाणे रुक्मिणी राजकन्या ही नववधू राजवाड्यातून बाहेर पडलेली आहे. मैत्रिणी बरोबर आहेत. देवीची पूजा, दर्शन करून यायचं आहे. आलेली आहे. मनामधे भगवंतांचं ध्यान करते आहे. ऐकलेलं आहे फक्त श्रीकृष्णांबद्दल. पाहिलेलं नाही अद्यापि. त्यांनीही हिला पाहिलेलं नाही. मौन धारण करून मैत्रिणींच्या बरोबर ती मंदिरामध्ये येऊन पोचली. अद्यापि हे देवीचं मंदिर अमरावतीला आहे. दाखवतात – रस्ता मोकळा आहे. आलेले राजे रस्त्याच्या कडेला आपल्या आपल्या वाहनांवर उभे आहेत. सर्वही सशस्त्र सैनिक रस्त्याच्या दोन्ही बाजूला, उभे आहेत. मधून मोकळा रस्ता आहे आणि रुक्मिणी त्या रस्त्याने जाती आहे. मंदिरामधे आल्याबरोबर देवीला वंदन केलं, सुवासिनी स्त्रियांनी तिच्याकडून देवीची पूजा करवलेली आहे. प्रार्थना करती आहे रुक्मिणी,

नमस्ये त्वाम्बिकेऽभीक्ष्णं स्वसन्तानयुतां शिवाम् ।
भूयात् पतिर्मे भगवान् कृष्णः तदनुमोदताम् ।।१०.५३.४६ ।। श्री. भा.

''हे भगवती, अंबिके, पार्वतीमाते, तुला तुझ्या मुलांना, तुझ्या सगळ्या परिवाराला मी नमस्कार करून प्रार्थना करते, भगवान गोपालकृष्ण मला पती प्राप्त व्हावेत असा आशीर्वाद आपण द्यावा.''. षोडशोपचारे पूजा झालेली आहे, आरती झालेली आहे. सर्व सुवासिनी स्त्रियांचीही तिनं पूजा केली. त्यांनाही वस्त्र, अलंकार सर्व दिलेले आहेत. आशीर्वाद सर्व स्त्रियांनी दिले. मौन सोडून राजवाड्यात जाण्याकरता ती रुक्मिणी मंदिरातून बाहेर पडलेली आहे. हातानी आपल्या सखीचा हात धरलेला आहे. कोणकोण राजे लोक आलेले आहेत हे ती पहातीये. कुणी रथात आहे, कुणी घोड्यावर आहे, कुणी हत्तीवर आहे. असे सगळे रुक्मिणीला पाहण्याकरता उभे आहेत. श्यामवर्ण होती रुक्मिणी. गौरवर्णाची नाही. श्रीकृष्णही श्यामवर्ण आहेत. उत्तम प्रकारचे अलंकार तिने घातलेले आहेत. हसतमुख आहे आणि अशाप्रकारे रूक्मिणी चालत निघालेली आहे. पत्रामधे तिने हीच वेळ सुचवलेली आहे. गोपालकृष्णही आपल्या रथामधे सज्ज आहेत, तयार आहेत. सारथ्याला दारूकाला सांगून ठेवलं होतं, 'रुक्मिणीचं पाऊल या रथामधे पडल्याबरोबर तुमचे घोडे निघाले पाहिजेत. रस्ता मोकळा आहे नं आता! हीच वेळ आहे. युद्ध–बिद्ध न करता मुलगी मिळाली पाहिजे. नंतर पाहता येईल. रूक्मिणी पाहती आहे, एकेक राजा कोणत्या प्रांताचा आहे ही माहिती घेत पाहात चाललेली आहे.

चालताना भगवान गोपालकृष्णांच्या रथाजवळ ती आलेली आहे. दोघांची दृष्टादृष्ट झाली

आणि तिथेच ती थांबलेली आहे. हेच गोपालकृष्ण आहेत. लगेच तिनं हात पुढे केलेला आहे. गोपालकृष्णांनी तिच्या हाताला धरून आपल्या रथामध्ये घेतलं. रुक्मिणीचं पाऊल रथामधे पडल्याबरोबर घोड्यांना इशारा मिळाला अन् घोडे निघाले वेगाने. रस्ता मोकळा आहे, अत्यंत वेगाने घोडे गेले आणि बाहेरचं जे त्यांचं, यादवांचं सैन्य होतं, त्या सैन्यामधे तो रथ येऊन पोहोचलेला आहे. 'आता या म्हणावं' म्हणाले, 'गोपालकृष्ण तयार आहेत'. तो जरासंध म्हणतोय, 'आमच्या डोळ्यादेखत नेलं याने रुक्मिणीला. चला, चला आणू या त्यांना, त्यांचा पराभव करून आणू या'. सगळे राजे लोक सैन्याची जमवाजमव करून युद्धाला तयार झालेले आहेत आणि ते भयंकर युद्ध सुरू झालं. रुक्मिणी श्रीकृष्णांच्या जवळ रथामधे आहे आणि भगवान गोपालकृष्णही युद्ध करतायत. बलराम आहेत. यादवांचे अनेक वीर आहेत. मोठेमोठे. तिला भीती वाटली. इतके राजे लोक आलेले आहेत. प्रतिस्पर्धी, विरोधी युद्ध करताहेत. आपलं कसं होईल? पाहिलं तिनं गोपालकृष्णांच्या मुखाकडे, भगवान हसले, 'रुक्मिणी, तुला काय भीती वाटतीय काय?' म्हणाले. 'शत्रुसैन्य इतकं आहे आणि आपलं सैन्य काय कमी पराक्रमी आहे काय?' पहा म्हणाले आता काय होतंय ते पहा. गद, संकर्षण वगैरे सगळे युद्ध करताहेत. सैन्याचा नाश होतो आहे. मस्तकं तुटून खाली पडताहेत. हत्ती मरताहेत, घोडे मरताहेत. रथी मरताहेत, सगळ्यांचा नाश चाललेला आहे. शेवटी सर्व सैन्य मारलं गेलं, जमलेल्या राजांचं. पराजय झाला. त्या शिशुपालाचं तोंड अगदी वाळून गेलेलं आहे. काय करायचं? त्याला तोपर्यंत आशा वाटत होती, रुक्मिणीला नेलं तरी परत आणता येईल म्हणाला. पण कुठलं आणता येईल. जरासंध आला त्याला भेटायला. म्हणाला, 'बाबा, तू काही निराश होऊ नकोस. पराजय आज झालाय आपला त्याला काय करायचं म्हणाला इतकं सैन्य आपण घेऊन आलो, तरीपण पराभव झाला. काल आम्हाला अनुकूल नाहीये. सुखदुःखाचा विचार माणसाने करू नये.जय मिळेल, पराजय मिळेल. अरे, मी या कृष्णाचा पराजय करण्याकरता सतरा वेळा गेलो म्हणाला. प्रत्येकवेळी तेवीस अक्षौहिणी सैन्य घेऊन. सतरावेळा याने माझा पराजय केला. पण शेवटी मी अठराव्या वेळेला याचा पराजय केला.' निर्लज्जपणे सांगतोय. याला काय अहंकार म्हणायचा, काय म्हणायचं? 'तेव्हा आपल्याला सध्या काल अनुकूल नाही. पुन्हा आपण यादवांच्याबरोबर युद्ध करू. जाईना रुक्मिणी, गेली म्हणून काय झालं?' असं समाधान केलं. शिल्लक राहिलेलं सैन्य घेऊन सर्व राजेलोक आपापल्या राजधानीमध्ये निघून गेलेले आहेत.

तो रुक्मिणीचा भाऊ रुक्मि हा सैन्य जमवून निघालेला आहे. नाही म्हणाला. मी रुक्मिणीला

जाऊ देणार नाही. पाठलाग करतो आहे. 'अरे थांब' म्हणाला, 'गवळ्याच्या मुला, माझ्या बहिणीला घेऊन जाता येणार नाही तुला.' भगवान सारथ्याला म्हणाले, 'हा एक शिल्लक राहिलाय' रथ थांबवला. युद्धाला सुरूवात झाली. रुक्मिही मोठा महारथी होता. श्रीकृष्णांनी रूक्मिचे चार घोडे मारले. एका बाणाने सारथी मारला. त्याचा ध्वज मोडून टाकलेला आहे. धनुष्य तोडून टाकलेलं आहे. पुन्हा रूक्मिने दुसरं धनुष्य घेतलं, तेही तोडून टाकलेलं. हातामधे जे जे शस्त्र त्या रुक्मिने घ्यावं ते सोडण्यापूर्वीच श्रीकृष्णांनी तोडून टाकावं. त्याला शस्त्र घेताच येईना. मग रागाने ढाल तलवार हातात घेऊन त्या रुक्मिने रथाखाली उडी मारली आणि श्रीकृष्णांना मारण्याकरता तो त्यांच्या रथाकडं धावत धावत निघालेला आहे. त्याच्या हातातली ढाल–तलवार श्रीकृष्णांनी तोडून टाकली. तो जवळ आल्याबरोबर त्याला ठार मारण्याकरता श्रीकृष्णांनी आपली तलवार म्यानातून उपसली. घाबरली रुक्मिणी! आपल्या डोळ्यादेखत आपला बंधू मरतोय. 'दयाया भगिनी मूर्तिः ।' शास्त्रकार सांगताहेत. भगिनी ही दयेची मूर्ती आहे. आपल्या भावाची दया तिला आली. पायावर मस्तक ठेवलं श्रीकृष्णांच्या. म्हणाली, ''देवा, माझ्या भावाला जीवदान द्यावं. मारू नका.'' रूक्मिचे सगळे केस श्रीकृष्णांनी कापून आपली तलवार म्यानात ठेऊन दिली आणि रथाच्या चाकाला त्याला बांधून ठेवलेलं आहे. मारायचं नाही पण त्याला सोडायचं नाही. बलरामजी सर्व सैन्य मारून श्रीकृष्णांपाशी आले. त्या बांधून ठेवलेल्या रुक्मिला मुक्त केलं बलरामांनी आणि रुक्मिणीला बरं वाटावं म्हणून ते बोलायला लागले. काय रुक्मिणी, ह्या कृष्णाला राग आवरत नाही म्हणाले, कृष्णा, हा आता आपला आप्त झालेला आहे ना? रुक्मिणीचा भाऊ आहे एवढंसुद्धा तुझ्या लक्षात आलं नाही? आणि ह्याला बांधून ठेवलंस म्हणाले. हा असंच करतो म्हणाले. रागाने वाटेल तसा वागतो हा कृष्ण. आणि असं पहा बाई, आम्ही क्षत्रिय आहोत. क्षत्रियांचा धर्म अत्यंत कठोर आहे. समोर आलेला सख्खा भाऊ जरी असला तरी त्याला आम्ही जिवंत सोडत नाही, मारावं लागतं. अशा वंशामधे आमचा जन्म झालेला आहे. तसा हा वागतो म्हणाले. त्यालाही थोडं बोलायचं थोडंसं रुक्मिणीचं समाधान करायचं, असं करून बलरामांनी संभाव्य प्रसंग टाळलेला आहे.

नंतर निघाली सगळी मंडळी. सर्व यादवांचं सैन्य घेऊन बलराम आणि कृष्ण द्वारकेमधे प्राप्त झालेले आहेत. आणि नंतर उत्तम मुहूर्तावर रुक्मिणी आणि भगवान गोपालकृष्णांचा विवाह झालेला आहे. अनेक राजे लोक निमंत्रित केलेले, आहेत या सोहळ्याकरता. सर्वही राजकन्यांनाही ही कृष्णलीला ऐकून अत्यंत आश्चर्य वाटलेलं आहे. काय रुक्मिणीनं पत्र काय पाठवलं, गोपालकृष्ण

आले काय, सर्व राजांचा पराजय काय केला. हे सगळं ऐकून त्या राजकन्यांनासुद्धा मोठं आश्चर्य वाटलेलं आहे.

शंकरांच्या तृतीय नेत्रातून अग्नी बाहेर पडला आणि त्यांना त्रास देणारा समोर असलेला मदन जळून गेलेला आहे. त्याला शरीर मिळायला पाहिजे. तो 'काम' रुक्मिणीच्या गर्भातून जन्माला आलेला आहे. मदनाला शरीर मिळालेलं आहे. प्रद्युम्न या नावाने तो प्रसिद्ध झाला. तो मुलगा जन्माला येण्याबरोबर नारदांनी शंबरासुराला सांगितलं, 'रुक्मिणीला झालेला मुलगा तुझा शत्रू आहे. तुला मारणारा आहे. तो शंबरासुर गुप्तवेषाने येऊन त्या मुलाला उचलून घेऊन गेला आणि समुद्रामधे त्याने त्या मुलाला टाकून दिलं. एक मत्स्य वर आलेला होता. त्याच्या मुखामधे तो मुलगा पडला. कोळ्याने मत्स्य पकडण्याकरता जाळी लावलेली होती. त्या जाळ्यामधे तो मत्स्य सापडला. मोठा मासा आहे. आपल्या स्वामींना हा मत्स्य देऊ या म्हणून त्या कोळ्याने राजेसाहेबांना तो मत्स्य नजराणा म्हणून दिला. त्याने, स्वयंपाकघराकडे तो मत्स्य पाठवला. पाक करण्याकरिता. शंबरासुराच्या पाकगृहाची सर्व व्यवस्था पाहण्याकरता मदनाची स्त्री रती ही राहिली होती. आपल्या पतीला शरीर केव्हा मिळतंय याची वाट पहातीय. त्या मत्स्याला चिरल्याबरोबर आतून तो सुंदर मुलगा बाहेर पडला. रतीने पाहिलेलं आहे. नारद ऋषी येऊन पोहोचले. नारदांनी सांगितलं, 'रती, हा तुझा पती आहे. मदन आहे. शंबरासुरानी याला समुद्रात टाकलं होतं. आता हा तुझ्याजवळ येऊन, पोचलेला आहे. त्या असुराला समजणार नाही अशा रीतीनं ह्याचं पालन-पोषण कर. मोठा झाल्याबरोबर याला सर्व युद्धविद्या शिकव आणि याच्याकडून शंबरासुराचा नाश करून ह्याला घेऊन तू द्वारकेमधे जा.

गुप्तपणानं त्या मुलाचं संरक्षण केलं रतीनं. तो मोठा झालेला आहे. तरुण वयामधे आलेला आहे. आणि त्या रतीनं, स्त्रीप्रमाणे प्रेमानं बोलणं चालणं सुरू केलं. तो म्हणतो आहे प्रद्युम्न, ''तू माझं रक्षण केलंस म्हणाला आणि स्त्रीप्रमाणे वागतीयेस. मातृस्थानी तू आहेस.'' रती म्हणाली, ''आपण साक्षात नारायणाचे पुत्र आहात. शंबरासुरानी आपल्याला समुद्रात टाकून दिलं होतं. माझ्याजवळ तुम्ही आलात. माझे पती आपण आहात. मी रती आहे, आपण मदन आहात. आता लवकर त्या शंबरासुराला युद्धाचं आव्हान द्या. त्याचा नाश करा म्हणजे आपण जाऊ या द्वारकेत. आपली माता अत्यंत शोकाकुल झालेली आहे.'' प्रद्युम्नाला, उत्तम विद्या तिने दिली. मोठं युद्ध त्या शंबरासुराचं आणि प्रद्युम्नाचं झालं आणि आपल्या गदेने प्रद्युम्नाने शंबरासुराचा नाश केलेला आहे. सर्व देवांनाही आनंद झाला.

रतीनं आपल्या पतीला बरोबर घेतलं आणि आकाशमार्गाने ती द्वारकेमधे येऊन पोचलेली आहे. श्रीकृष्णांप्रमाणे रूप त्या प्रद्युम्नाचं होतं. सर्व स्त्रियांनी पाहिलं त्याला आणि गोपालकृष्ण आले असं समजून त्या स्त्रिया लज्जेने बाजूला झालेल्या आहेत. थोडं निरीक्षण करून पाहिलं आणि रूप तसं आहे म्हणाल्या, परंतु हा गोपालकृष्ण नाहीये. रुक्मिणी पाहतीये. श्रीकृष्णांप्रमाणे ह्याचं रूप आहे. हा माझा मुलगा तर नसेल ? जन्मल्याबरोबर दहा दिवसांच्या आत हा नाहीसा झाला. श्रीकृष्णांचं साम्य ह्याला कसं आलं ? त्यांच्यासारखं रूप ह्याला कसं मिळालं ? हा निश्चित माझा मुलगा असला पाहिजे. सगळी मंडळी आली. वसुदेव देवकीही आले. सगळ्या बायका जमल्या. गोपालकृष्णही आले. ते काही बोलले नाहीत. उभे राहिले. नारदांची वाट पहात होते. नारद आले बरोबर. ''रुक्मिणी, हा तुझा मुलगा आहे बरं का. त्या शंबरासुराने नेला होता. ही तुझी सून आहे. हिनंच त्याचं रक्षण केलं.'' आता ती रती तरुण होती आणि हा लहान मुलगा. तिनं ह्याचं रक्षण केलं आणि याच्याबरोबरच विवाह म्हणजे कसं काय ? तर देव जे आहेत स्वर्गलोकातले, 'अमरा निर्जरा देवाः।' म्हणतात. त्यांना म्हातारपण नाही. नेहमी तरुण असतात ते देव. तशी ही रती, तिचं तारुण्य कायम होतं. प्रद्युम्न हा मनुष्य आहे. तेव्हा तो मोठा झाल्यावर ती मोठी आहेच आहे. कायमचीच आहे. म्हणून दोघांचा विवाह ह्या द्वारकेमधे होऊन गेलेला आहे. आणि सर्वही लोकांना गेलेला प्रद्युम्न परत मिळाला हे कळल्यामुळे आनंद झालेला आहे.

श्रीकृष्णांच्या दुसऱ्या विवाहाची कथा आता सांगताहेत.

सत्राजितः स्वतनयां कृष्णाय कृतकिल्विषः ।
स्यमन्तकेन मणिना स्वयं उद्यम्य दत्तवान् ।।१०.५६.१।। श्री. भा.

सत्राजित नावाचा यादव, द्वारकेमधे राहणारा. सूर्यनारायणांचा भक्त होता. सूर्यनारायणाने संतुष्ट होऊन सत्राजिताला स्यमंतक नावाचा एक दिव्यमणी दिलेला होता. कंठामधे बांधून तो राज्यसभेमधे गेला. ते तेज पाहून सर्व मंडळी श्रीकृष्णांना सांगू लागली. आपल्या दर्शनाला सूर्यनारायण आलेले आहेत म्हणाले. हसले भगवान. हा सत्राजित आहे म्हणाले. कंठातल्या स्यमंतक मण्याचा हा प्रकाश पडलेला आहे. तो स्यमंतक मणी आपल्या वाड्यामधे आणून देवगृहामधे त्याची स्थापना सत्राजिताने केली. आणि रोज पूजा करीत होता. आठ भार सुवर्ण रोज त्या मण्यापासून मिळत असे. ज्या ठिकाणी तो मणी आहे, त्या ठिकाणी कधी दुष्काळ पडायचा नाही, रोगराई नाही असं त्याचं सामर्थ्य होतं. एके दिवशी सत्राजिताला राजसभेमधे बोलावून

श्रीकृष्ण परमात्मा म्हणाले, 'बाबा, हा मणी तू राजेसाहेबांना दे म्हणजे तो सुरक्षित राहील. तुझ्या वाड्यामधे हा मणी राहणं, म्हणजे तुला भिती आहे. पण तो लोभी होता. सुवर्ण त्या मण्यापासून मिळत होतं. त्याने ऐकलं नाही. त्याचा बंधू प्रसेन नावाचा. एके दिवशी कंठामधे मणी बांधून घोड्यावर बसून शिकारीकरता अरण्यामधे गेला. एका सिंहानी त्याला ठार मारलं आणि मणी नेला. जांबवान जो आहे यक्षराज याने त्या सिंहाला ठार मारलं आणि तो मणी आपल्या मुलाच्या पाळण्यावरती बांधून ठेवला. दोन-तीन दिवस झाले प्रसेन आला नाही. सत्राजिताने आणखी विचार केला आणि सगळ्या गावामधे सांगायला सुरूवात केली, ''ह्या कृष्णाने माझ्या भावाला प्रसेनला मारून आणि तो मणी नेलेला आहे.'' गोकुळामधे असेपर्यंत कृष्णांच्या नशिबी होतंच की हे. त्या गोपींनी येऊन सांगत, आज माझ्या घरी चोरी केली. पण आता इथे लग्न झालं, द्वारका वसली आणि कृष्ण चोरी करतोय? सत्राजित सगळ्यांना सांगायला लागला आणि ते लोकांना खरं वाटलेलं आहे. ह्या ज्या खोट्या गोष्टी आहेत, ह्यांचाच जास्ती प्रसार होतोय. सगळी मंडळी बोलायला लागली. कृष्णाने असं करायला नको होतं म्हणाले. पण एकाही माणसाला नीट चौकशी करावीशी वाटली नाही.

श्रीकृष्णांच्या कानावर ही अपकीर्ती गेली. आपल्याबद्दल लोक बोलताहेत. काही मंडळींना बरोबर घेऊन अरण्यामधे गोपालकृष्ण निघाले चौकशी करता. तो प्रसेन आणि त्याचा घोडा मरून पडला होता. याला कोणीतरी मारून मणी नेला आहे म्हणाले. त्याच रस्त्याने पुढे गेले तो सिंह मरून पडला होता. म्हणजे सिंहानं याला मारलेलं आहे. तसेच पुढे गेले. तिथे पायऱ्या होत्या खाली जायला. गुहा आहे असं दिसलं. सर्व मंडळींना गुहेच्या तोंडाशी थांबवलं आणि चौकशी करून येतो असं सांगून भगवान आत गेले. तो मणी त्यांना तिथे पाळण्यावर बांधलेला दिसला. तो मणी घेण्याकरता ते गेले. तिथे असलेल्या दासीच्या दृष्टीला श्रीकृष्ण पडले. हा कोणीतरी नवीन मनुष्य आलेला आहे असं पाहून ती आरडाओरडा करायला लागली. तो जांबुवान धावून आलेला आहे. गोपालकृष्णांबरोबर त्याने द्वंद्वयुद्ध सुरू केलं. अठ्ठावीस दिवसपर्यंत युद्ध चाललेलं. जांबवान दमला. रामावतारापासून तो होता. आणि त्याच्या लक्षात आलं की हा मनुष्य नाहीये. साक्षात भगवान आहेत. आपले स्वामीच आहेत. शरण आलेला आहे. ''देवा, मला कळलं नाही म्हणाला. आपल्याबरोबर युद्ध केलं ही माझ्या हातून चूक झाली. काय काम आहे म्हणाला'' गोपालकृष्ण म्हणाले, ''अरे बाबा, हा मणी नेण्याकरता मी आलेलो आहे. मी मणी चोरला असं सगळे लोक म्हणताहेत. आईबाप काय, बंधू काय, सगळ्यांच्या मनात माझ्याबद्दल संशय आहे. त्या करता हा

मणी घेऊन जाण्याकरता मी आलो आहे.'' तो म्हणाला, ''सध्या मणी माझ्या ताब्यात आहे. मी मणी देतो पण माझी मुलगी एवढी तुम्ही करून घ्या म्हणजे मणी देऊन टाकतो. मला तुम्हाला काही स्वतंत्र नजराणा देण्याची जरूरी नाही''. त्याची मुलगी जांबवती हिच्याबरोबर मग श्रीकृष्णांनी विवाह केला आणि तो मणी घेऊन जांबवतीसह ते द्वारकेला आले आहेत. बाहेर उभे राहिलेल्या मंडळींनी १०-१२ दिवस वाट पाहिली. पण एकालाही असं वाटलं नाही की आत जाऊन पाहूयात. काय गोपालकृष्ण संकटात आहेत, कसे आहेत? एकालाही वाटलं नाही. आपण आपलं सुरक्षित राहिलो म्हणजे झालं. ही वृत्ती आहे. पहिल्यापासूनच माणसांची ही वृत्ती आहे. तो लोक आले द्वारकेमधे. सगळ्यांना सांगायला लागले. गोपालकृष्ण एका गुहेमधे गेले. दहा-बारा दिवस झाले, काय झालं आम्हाला माहित नाही. गोपालकृष्ण परत आले नाहीत. देवकी, रुक्मिणी सगळ्यांना दुःख झालेलं आहे. ब्राह्मणांच्या कडून चंडिपाठ सुरू केलेले आहेत. अठ्ठाविसाव्या दिवशी आपल्या नूतन पत्नीला घेऊन गोपालकृष्ण द्वारकेमधे आलेले आहेत.

सत्राजित यादवाला लगेच राजसभेमधे बोलावणं पाठवलेलं आहे. तो मणी त्या ठिकाणी ठेवला होता चौरंगावर. हा तुमचा मणी आहे. कसा मिळाला? कुठं मिळाला? तुम्हाला साक्षीदार पाहिजे असेल तर आहे म्हणाले. जांबवंती होतीच तिथे. मुकाट्याने तुमचा मणी घेऊन जा म्हणून श्रीकृष्णांनी सत्राजिताला बजावलेलं आहे. सर्व लोकांना समजली हकीकत. सत्राजितानेच उगीच निंदा केली असं सगळे लोक बोलायला लागले. श्रीकृष्णांनी सांगितलं, ''हा मणी आम्हाला नकोय.'' त्यांनी विचार केला, एकटी मुलगी याला. ही मुलगी आल्यानंतर हिच्या मुलांचाच अधिकार आहे त्याच्यावर. जाईल कुठं हा मणी? सध्यातरी कशाला पाहिजे? घेऊन जा म्हणाले. सत्राजितालाही अत्यंत पश्चात्ताप झालेला आहे. आणि त्याने आपली कन्या सत्यभामा की जिला अनेक लोकांनी मागणी घातली होती. ती कृष्णांना अर्पण केली. मणीही द्यायला लागला. मणी नको, तुमच्याजवळ ठेवा म्हणाले.

पांडवांचा लाक्षागृहामधे दाह झाला. पांडव जळून गेले ही बातमी जिकडं तिकडं पसरली. बलराम, कृष्ण कौरवांना भेटावं म्हणून आले. भीष्माचार्य, कृपाचार्य, गांधारी वगैरे सर्वांच्या भेटी झालेल्या आहेत. या वेळेला इकडे द्वारकेमधे अक्रूर आणि कृतवर्मा दोघांनीही शतधन्वा नावाच्या यादवाचा बुद्धीभेद केलेला आहे. त्याला म्हणाले, ''सत्राजिताने आपली मुलगी तुला द्यायचं कबूल केलं होतं. ती मुलगी त्याने कृष्णांनाच देऊन टाकली. निदान मणी तरी घे.'' हा यादव रात्रीच्या वेळेला वाड्यात गेला. सत्राजिताला याने ठार मारलेलं आहे आणि तो मणी घेऊन शतधन्वा गेलेला

आहे. कृष्णांनी अगोदर बजावलं होतं सत्राजिताला. पण लोभामुळे त्याचा प्राण गेला. सत्यभामेला अतिशय दुःख झालेलं आहे. ती लगेच हस्तिनापुरला गेली. राम–कृष्णांना सर्व वृत्तांत सांगितला. माझ्या बापाला मारलं म्हणाली कुणीतरी. त्यांनाही दुःख झालं. आलेले आहेत आणि शोध करू लागले. शतधन्वा यादवाला कळून चुकलं की आता जर आपण द्वारकेमधे राहिलो तर आपल्याला मारणार. तिथून तो बाहेर पडला. जाताना कृतवर्म्याकडे मणी ठेवायला गेला. कृतवर्मा म्हणाला, ‘माझ्याकडे हा मणी नको आहे. मी काही कृष्णाचा द्वेष करणारा नाही, द्रोह करणार नाही. तुझं तू बघ.’ अक्रूरजींकडे गेला. ते म्हणाले, ‘‘मला कशाला हा मणी पाहिजे? कृष्णाच्या विरूद्ध मला जायचं नाही. तू आणलेला आहेस, कुठेही टाकून दे.’’ त्याने अक्रूरांच्या अंगावर तो मणी टाकला. आणि तो घोड्यावर बसून निघून गेला. द्वारकेतून बाहेर पडलेला आहे. हे समजल्याबरोबर राम–कृष्ण रथामधे बसून त्याचा पाठलाग करू लागले. मिथिला नगरीच्या वेशीमधे त्याचा घोडा मरून पडला. तो पळायला लागला. श्रीकृष्णानी रथातून खाली उतरून सुदर्शन चक्राने त्याचा शिरच्छेद केला. त्याची वस्त्रं तपासून पाहिली. कुठेही मणी मिळालेला नाही. राम आपले रथात बसलेले आहेत. पहाताहेत. कृष्णांनी येऊन सांगितलं की शतधन्व्याचा वध उगीच केला म्हणाले. त्याच्याजवळ तर मणी काही सापडला नाही. पण बलरामांना विश्वास वाटला नाही. पण बोलले नाहीत. म्हणाले कृष्णा, द्वारकेत जाऊन त्याने आणखी कुणाजवळ मणी ठेवला असेल त्याचा शोध घे. मी आत्ताच काही द्वारकेमधे येणार नाही. हा मिथिलाधिपती आमचा मित्र आहे. त्याच्याजवळ मी राहणार आहे. एकटे गोपालकृष्ण परत आले. त्यावेळेला दुर्योधन मिथिलेला येऊन राहिलेला आहे आणि गदायुद्धाचं उत्तम शिक्षण त्याने बलरामजींकडून घेतलेलं आहे. भीमापेक्षा तो गदायुद्धामधे निष्णात झालेला आहे.

इकडे द्वारकेमधे येऊन गोपालकृष्णांनी चौकशी केलेली आहे. अक्रूरजींजवळ मणी आहे हे त्यांना समजलं. अक्रूरजींना राजसभेमधे बोलावलं. अक्रूरजींना कल्पना होती हाच प्रश्न निघणार म्हणून जाताना तो मणी घेऊनच ते गेले. आल्याआल्या श्रीकृष्ण म्हणताहेत, ‘‘या या अक्रूरजी, बरेच दिवसांत तुमची भेट नाही.’’ आणि विचारताहेत, मणी तुमच्याजवळ आहे का असं विचारलंच नाही तर

ननु दानपते न्यस्तस्त्वय्यास्ते शतधन्वना।
स्यमन्तको मणिः श्रीमान् विदितः पूर्वमेव नः ।।१०.५७.३६ ।। श्री. भा.

चातुर्य आहे. ‘‘अक्रूरजी पुष्कळ दानधर्म तुमच्याकडून होतोय, म्हणाले. तो कसा करता?

तुमच्याजवळ त्या शतधन्वाने मणी ठेवलेला आहे, हे आम्हाला पूर्वीच समजलेलं आहे म्हणाले. सत्राजिताला एकच मुलगी आहे. तिच्या मुलांचा ह्या मण्यावर अधिकार आहे की नाही ? त्या मुलांना मिळायला पाहिजे हा मणी. पण आम्हाला नको तो मणी. तो मणी बाळगणं म्हणजे फार कठीण आहे. तो प्रसेन मेला, सत्राजित मेला, शतधन्वा मेला या मण्यामुळे. तुमच्याजवळ तो मणी राहिलाय ते बरंय. कारण तुम्ही लोभी नाही. हा एक गुण आहे. अनेक ब्राह्मण मंडळी आमच्याकडे येतात आणि सांगतात की अक्रूरजींनी मोठा यज्ञ केला आणि कितीतरी सुवर्ण त्यांना तुम्ही दिलं. हे सुवर्ण मण्यापासूनच मिळतं ना तुम्हाला ?'' अक्रूरजींनी कबूल केलं. ''मी नको म्हणत होतो'' म्हणाले. ''माझ्या अंगावर टाकला त्याने आणि तो गेला.'' भगवान म्हणाले, ''असू दे, तुमच्याजवळ ठेवा, फक्त एकदा दाखवा म्हणाले, सगळ्या लोकांना. घरातली सगळी मंडळी बायका, पुरूष. हे आमचे बंधुराज तर तिकडे जाऊन बसले आहेत. मला काय कळत नाही का म्हणाले. माझा मित्र मिथिलाधिपती आहे. मला तिथं रहायचं आहे. मी मणी ठेवलेला आहे अशी सगळ्यांची समजूत झालेली आहे. तेंव्हा तो मणी एकदा दाखवा आणि माझी ही अपकीर्ती दूर करा.'' ''काय संसारात मी पडलो'' म्हणाले. सर्वांना तो मणी अक्रूरजींनी दाकवलेला आहे. भगवान सांगताहेत, ''अक्रूरजी, हा मणी तुमच्याजवळच ठेवा. यज्ञयाग करत चला. दानधर्म करा.'' अशारितीने भगवंताने आपली अपकीर्ती दूर केलेली. संसारामधे रहायचं म्हणजे असा प्रयत्नवाद पाहिजे. सगळं सहन करायचं असं नाहीये. आचार्य सांगताहेत हे स्यमंतक मण्याचं आख्यान . जो श्रवण करतो त्याची अपकीर्ती दूर होते. त्याच्यावर जर चोरीचा आळ आला असेल, तर तो दूर होईल. खरोखर चोरी केली असेल तर दूर होणार नाही.

दुष्कीर्तिं दुरितं अपोह्य याति शान्तिम् ।।१०.५७.४२ ।। श्री. भा.

शुकाचार्य सांगतात, राजन, पांडवांना भेटण्याकरता भगवान श्रीहरी, सात्यकी वगैरे यादवांना बरोबर घेऊन इंद्रप्रस्थ नगरामधे गेले. पांडवांना धृतराष्ट्राने इंद्रप्रस्थात रहायला सांगितलं होतं आणि आपण मुलांसह हस्तिनापुरात रहात होता. आनंद झाला पांडवांना. प्रेमाने सगळ्यांच्या भेटी झालेल्या आहेत. द्रौपदीचं नुकतंच लग्न झालेलं होतं. तिनंही येऊन भगवंताला नमस्कार केलेला आहे. सात्यकीचाही सत्कार पांडवांनी केलेला आहे. कुंतीच्या जवळ जाऊन भगवान श्रीहरींनी वंदन केलेलं आहे. कुशल प्रश्न वगैरे केले. सूनबाई वगैरे सगळ्या चांगल्या आहेत ना हे ही विचारलं. कुंतीच्या अंतःकरणामधे श्रीकृष्णप्रेम फार होतं. हा केवळ आपला भाचा आहे, बंधूचा मुलगा

अशी तिची दृष्टी नाहीये. त्याची दृष्टी आपल्यावर आहे. प्रत्यक्ष परमेश्वर तो आहे. प्रेम अंतःकरणामधे उत्पन्न झालेलं आहे. ती बोलून गेली, ''बाबा, पूर्वीच कंसाला मारल्याबरोबर तू आमच्या समाचाराकरता अक्रूराला पाठिवलं होतंस. त्यावेळेलाच माझ्या मनाचं पूर्ण समाधान झालेलं आहे की आम्हाला आधार आहे, जगामधे आमची विचारपूस करणारा कोणीतरी आहे. हे तुझं प्रेम असंच आम्हाला मिळावं. विश्वाचा तू मित्र आहेस. हा आपला आणि हा दुसऱ्याचा ही कल्पना तुझ्या मनामधे नाहीये. पण आपलं स्मरण करणारे जे आहेत, आमच्यासारखे, त्यांना सर्व क्लेशातून आपण मुक्त करता. अशीच कृपा आपली आमच्यावर असावी.'' बरेच दिवस म्हणजे दोन-चार महिने तिथे राहिले गोपालकृष्ण.

एकदा कृष्णार्जुन रथामधे बसून शिकारीला गेले आणि परत येताना नदीतीरावर त्यांनी रथ थांबवला. अर्जुन पाणी पिण्याकरता नदीतीरावर गेला. तिथं तीरावर एक कन्या बसलेली त्यानी पाहिली. चौकशी केली. कुणाची मुलगी तू आहेस, इथे कशाला आलीस? ती म्हणाली.

अहं देवस्य सवितुर्दुहिता पतिमिच्छती ।
विष्णुं वरेण्यं वरदं तपः परममास्थिता ।।१०.५८.२० ।। श्री. भा.

''सूर्यनारायणांची मी कन्या आहे. मला भगवान विष्णु पती प्राप्त व्हावेत अशी इच्छा आहे. तपश्चर्या मी करते आहे. देवाने कृपा करावी आणि माझा स्विकार करावा. अन्य पती मला नको आहे. कालिंदी माझं नाव आहे. यमुनाजलामधे माझ्या पित्याने माझी राहण्याची वगैरे सगळी व्यवस्था केली आहे. अच्युताचं, भगवंतांचं दर्शन होईपर्यंत मी या ठिकाणी तपश्चर्या करणार आहे.'' अर्जुनानं जाऊन सांगितलं श्रीकृष्णांना, अशी अशी सूर्यकन्या आहे. तुमच्याबरोबर विवाहाची इच्छा करते आहे. तिला बरोबर घेऊनच आले हे दोघेही. अग्निनारायणाला खांडववन पाहिजे होतं. कृष्णार्जुन रथामधे बसून त्या खांडववनाभोवती फिरताहेत. वनातून बाहेर कोणालाही जाऊ द्यायचं नाही. पक्षी काय, पशू काय बाण मारून त्याला पाठीमागे ढकलून द्यायचं. खांडववन अग्निला दिलेलं आहे. संतुष्ट झाले अग्निनारायण. त्यावेळेला मयासुर सापडला होता अग्निमधे. कृष्णांच्या सांगण्याप्रमाणे अर्जुनाने त्याला जीवदान दिलं. सोडून दिलं. अग्निमधे टाकलं नाही. त्या मयासुराने, पांडवांचे उपकार जाणून त्यांना एक मयसभा बांधून दिलेली आहे. मोठा शिल्पकार तो होता. अग्निनारायणानेही संतुष्ट होऊन त्या अर्जुनाला श्वेत अश्व दिलेले आहेत रथासाठी. अक्षय्य बाणांनी भरलेले भाते दिले. एक धनुष्य दिलेलं आहे. आणखी एक अभेद्य कवच दिलेलं आहे.

नंतर सात्यकी वगैरे यादवांसह भगवान द्वारकेला प्राप्त झाले. आणि उत्तम मुहूर्तावर सूर्यकन्या कालिंदीबरोबर त्यांचा विवाह झाला. रुक्मिणी, जांबवती, सत्यभामा आणि कालिंदी. चार स्त्रिया झालेल्या आहेत. अवंती देशाचे अधिपती दुर्योधनाच्या पक्षाचे होते. त्यांची जी बहीण आहे कृष्णांवर प्रेम करणारी, मित्रविंदा नावाची. तिचंही रुक्मिणीप्रमाणे श्रीकृष्णांनी हरण केलेलं आहे. सर्व राजांचा पराभव करून. कोसल देशाचा राजा सत्यजित नावाचा . त्याला सत्या नावाची कन्या होती. अनेक राजे स्वयंवराकरता जमले पण तिचा विवाह होऊ शकला नाही कारण त्याचा पण मोठा निराळा होता. सात मोठे बैल सोडले होते मोकळे. त्या सर्वांना बांधून ठेवणारा जो राजपुत्र असेल, त्याला ही राजकन्या द्यायची असं त्या राजानं ठरविलं होतं. गोपालकृष्ण त्या राजधानीमधे आलेले आहेत. त्या राजाने त्यांचा सत्कार केला. पूजा केली. ''काय आज्ञा आहे महाराज?'' असं त्या राजाने विचारलं. भगवान म्हणाले, ''राजा, क्षत्रियाने कोणाजवळ याचना करायची नाही. पराक्रमानी काय पाहिजे असेल ते मिळवायचं.'' ''हे आहे म्हणाले पण आपली मैत्री रहावी, म्हणून मी आपल्या कन्येला मागणी घालण्याकरता आलो आहे.'' राजा म्हणाला, ''तुमच्यापेक्षा श्रेष्ठ कोणता मला जावई मिळेल. पण माझा असा पण आहे, म्हणाला सात बैलांना जो बांधून ठेवेल त्याला मुलगी द्यायची माझं ठरलेलं आहे. पुष्कळ राजपुत्र आले पण ते बांधू शकले नाहीत. त्या बैलांनी पुष्कळांची डोकी फोडली, मारलं पुष्कळांना. असं झालेलं आहे.'' निघाले गोपालकृष्ण. सात रूपं कृष्णांनी धारण केली आणि सातही बैलांना वेसण घालून बांधून टाकलेलं आहे. आनंद झाला राजाला, राजपत्नीला. त्या कन्येला तर फार आनंद झाला. वाद्यं वाजताहेत. पुष्कळ मंडळी जमलेली आहेत. आणि त्या सत्या नावाच्या राजकन्येबरोबर गोपालकृष्णांचा विवाह झालेला आहे. मुलीच्याबरोबर राजाने किती देणगी दिली? हे शुकाचार्य मुद्दाम सांगतायत. आत्तापर्यंत ही इतकी लग्नं झाली, काय दिलं मुलीच्या बापाने काही सांगितलं नाही. इथं मात्र सांगताहेत संपत्ती किती होती–

दशधेनुसहस्त्राणि पारिबर्हं अदाद् विभुः।
युवतीनां त्रिसाहस्त्रं निष्कग्रीवसुवाससाम् ।।१०.५८.५०।। श्री. भा.

पहिल्याप्रथम दहा हजार गाई दिलेल्या आहेत. तीन हजार तरुण स्त्रिया मुलीची सेवा करण्याकरता दिल्या.

नवनागसहस्त्राणि नागाच्छतगुणान् रथान्।
रथाच्छतगुणान्श्वानश्वाच्छतगुणान् नरान् ।।१०.५८.५१।। श्री. भा.

नऊ हजार हत्ती दिलेले आहेत. गजान्तलक्ष्मी म्हणतात. एक हत्ती पोसायचा म्हणजे तो म्हणे अगोदर समोर टाकलेल्या, शे-सव्वाशे पेंड्या फेकूनच देतो. नंतर खात असेल आणि म्हणजे घरातले असलेले सगळे हत्ती दिले असं नाही. कितीतरी हत्ती असले पाहिजेत. जावयाला काही सर्व घर द्यायचं नाहीये. नऊ लाख रथ दिले. रथ दिल्यानंतर अश्व द्यायलाच पाहिजेत. नऊ कोटी अश्व दिलेले आहेत. अश्वांच्या शंभरपट माणसं दिलेली आहेत. म्हणजे नऊ अब्ज झाले. कामंधामं करायला नोकर-चाकर. म्हणजे त्यावेळी धान्य भारतवर्षामधे किती असेल? एक विवाह झाल्यानंतर तिच्या घरची इतकी माणसं, पशू वगैरे आणायचे म्हणजे द्वारकेमधे सुद्धा किती समृद्धी असेल. दोघे पती-पत्नी रथामधे बसून निघालेले आहेत. पुष्कळ सैन्य बरोबर आहे. ज्या राजपुत्रांना ही कन्या मिळाली नाही, कन्याही नाही आणि संपत्तीही नाही, ते सगळे लोक युद्ध करण्याकरता आलेले असताना तो अर्जुन त्या वेळेला कृष्णाच्या बरोबर होता. त्यानेच सर्व राजांचा पराभव केलेला आहे. सर्व देणगी घेऊन द्वारकेमधे भगवान प्राप्त झाले. श्रुतकीर्ति राजाची कन्या भद्रा हिच्याबरोबरही श्रीकृष्णांचा विवाह झालेला आहे. त्याचप्रमाणे कैकेयी नावाची स्त्री तिच्या बंधूने दिलेली, तिच्याबरोबरही विवाह झाला. आणि मद्रदेशाचा अधिपती, त्याची कन्या लक्ष्मणा तिच्या स्वयंवरामधे मत्स्यभेद करून तिचा स्विकार श्रीकृष्णांनी केलेला आहे. आणखीही अशा प्रकारच्या सोळा हजार राजकन्या श्रीकृष्णांच्या स्त्रिया झालेल्या आहेत. भौमासुराचा नाश करून त्याने आणलेल्या सर्वही राजकन्यांबरोबर गोपालकृष्णांनी विवाह केलेला आहे.

ती कथा राजाने ऐकण्याची इच्छा केल्यानंतर आचार्य सांगताहेत. भौमासुर नावाचा प्रागज्योतिषपुर प्रांताचा अधिपती होता. सध्याचा आसाम प्रांत. नरकासुर किंवा भौमासुर. स्वर्गलोकामधे जाऊन अदितीची कुंडलं त्यानं काढून आणली. देवमाता अदिती. इंद्राने जाऊन श्रीकृष्णांना प्रार्थना केली. हा असुर म्हणाले अत्यंत उन्मत्त झालेला आहे. केव्हाही स्वर्गात येतो. वाटेल ते घेऊन जातो. त्याला शासन करण्याकरता गोपालकृष्ण गरूडावर बसून निघाले. द्वारकेतून बाहेर पडले. मोठे मोठे आडवे डोंगर आहेत. कितीतरी संरक्षणाची व्यवस्था त्या नरकासुराने केली होती. त्याच्यापुढे शस्त्रास्त्रांची व्यवस्था केलेली आहे. गिरीदुर्ग आहेत, शस्त्रदुर्ग आहेत, जलदुर्ग आहेत, अग्निदुर्ग आहेत, अनिलदुर्ग आहेत. त्याच्या पलिकडे त्याची राजधानी आहे. सर्वही दुर्गांचा नाश चक्राने करून, अग्नि आणि जल हे सर्व नष्ट करून राजधानीजवळ भगवान येऊन पोहोचले. गरूडावर बसून आलेले आहेत. बरोबर सत्यभामा त्यावेळेला होती. पांचजन्य शंख वाजवल्याबरोबर तो जो मुरासुर होता तो पाण्यामधे निजलेला होता. पाच मस्तके त्याला होती. तो उठला

पाण्यातून आणि त्रिशूळ घेऊन युद्धाकरता बाहेर पडलेला आहे. गरुडाच्या अंगावर त्यांने त्रिशूल फेकला. तो येण्यापूर्वीच बाणाने त्याचे तुकडे केले. गदायुद्धही झालेलं आहे. सुदर्शन चक्राने त्याचे बाहू आणखी पाचही मस्तकं भगवंतांनी तोडून टाकली. गतप्राण होऊन तो खाली पडला. त्याची मुलं सेनापती पीठ याला पुढं करून युद्धाला आलेली आहेत. त्या सर्वांचाही नाश भगवंतांने केलेला आहे. आणि नंतर तो नरकासुर हत्तीवर बसून युद्ध करण्याकरता आला. दोघांचं युद्ध सुरू झालं. सर्व सैन्य मारलेलं आहे. अच्युताला मारण्याकरिता त्या नरकासुराने त्रिशुल हातामधे घेतला, पण तो टाकण्यापूर्वीच भगवंतांनी नरकासुराचा शिरच्छेद केलेला आहे. किरीटकुंडलंधारी त्याचं मस्तक धरणीवर पडलेलं आहे. भूदेवी श्रीकृष्णांजवळ आली आणि नरकासुराने आणलेली अदितीची कुंडलं तिनं भगवंतांना दिली. नरकासुराच्या मुलाला तिने पुढं केलं. आणि त्याला संरक्षण द्या, याला राज्य द्या म्हणून विनंती तिने केली. त्यावेळेला भूदेवीने भगवंतांची पुष्कळ स्तुती केलेली आहे.

त्या मुलाला राज्याभिषेक करून भगवान इंद्रलोकात गेले. नरकासुराने जमवलेली संपत्ती कृष्णांनी द्वारकेला पाठवून दिलेली आहे. सोळा हजार राजकन्या त्या नरकासुराने सर्व राजांचा पराभव करून आपल्या राजधानीमधे ठेवल्या होत्या. त्या सगळ्या राजकन्यांना द्वारकेला पाठवून दिलेलं आहे. ऐरावताच्या कुळातले चौसष्ठ पांढरेशुभ्र हत्ती, ज्यांना चार चार दात आहेत असे, तेही द्वारकेला पाठवून दिले आहेत. स्वर्गलोकामधे गेले भगवान. देवमाता अदितीला तिची कुंडलं अर्पण केली. इंद्रानेही पूजा केली. निघाले द्वारकेला जाण्याकरता. सत्यभामा म्हणाली, हा पारिजात वृक्ष माझ्या उद्यानामधे पाहिजे. पारिजात कल्पवृक्ष आहे. लगेच तो वृक्ष उपटून घेतला श्रीकृष्णांनी आणि निघाले. मग इंद्रादिक देव म्हणाले, ''हा वृक्ष, आमच्या स्वर्गातला आहे. तुम्हाला भूमीवर आम्ही नेऊ देणार नाही.'' नरकासुराला मारून निष्कंटक राज्य भगवंताने केलं आहे. त्याचा काही उपकार स्मरावा पण इंद्र म्हणतोय हा वृक्ष आमचा आहे. स्वर्गातच राहणार हा. त्यावेळेला भयंकर युद्ध झालेलं आहे. सर्व यादव हे द्वारकेतून तिथं आले होते म्हणतात. विष्णु पुराणामधे याचं वर्णन आलेलं आहे. देवांचं आणि यादवांचं भयंकर युद्ध झालेलं आहे. पराभव झाला देवांचा आणि तो पारिजात वृक्ष द्वारकेला आणून सत्यभामेच्या बागेमधे लावलेला आहे.

नंतर एकाच मुहूर्तावर सर्व सोळा हजार राजकन्यांबरोबर श्रीकृष्णांनी विवाह केलेला आहे. म्हणजे तेवढी रूपं धारण केली आणि तितके वाडे झालेले आहेत. तितके नोकरचाकर, सर्वांची

व्यवस्था झालेली आहे आणि हा एवढा मोठा गृहस्थाश्रम सुरू झालेला आहे. साक्षात लक्ष्मीपती ज्यांना पती मिळाले अशा त्या सर्व राजकन्या. परंतु भगवंतांची कृपा आपल्यावर अखंड रहावी त्यांचं प्रेम रहावं या उद्देशाने सर्व सेवा देवाची त्यांनी करावी. आल्याबरोबर उठून उभं रहावं, त्यांना बसायला आसन द्यावं, पाय धुवावेत. वारा घालावा. त्याचप्रमाणे जेवण झाल्यानंतर तांबूलदान करावं. अशी सर्वप्रकारची सेवा स्वतः त्या स्त्रियांनी करावी. शेकडो स्त्रिया त्यांच्याहाताखाली काम करताहेत. त्यांना काय पाहिजे ते घेऊन दे गं,असं दासीला सांगून या आपल्या बसलेल्या आहेत असं नाही. स्वतः त्यांनी सेवा करावी. हा एवढा गृहस्थाश्रम कसा चालला होता, हे ऐकण्याची इच्छा होती राजाला. एक गृहस्थाश्रम रुक्मिणीचा, त्याची कथा त्यांनी सांगितली त्यावरून बाकीचे समजून घे म्हणाले.

कर्हिचित् सुखमासीनं स्वतल्पस्थं जगद्गुरूम्।
पतिं पर्यचरद् भैष्मी व्यजनेन सखीजनैः ।।१०.६०.१।। श्री. भा.

दुपारचं भोजन झालेलं आहे. रुक्मिणीच्या वाड्यामधे भगवान आहेत. प्रत्येक वाड्यामधे आहेत. पलंगावरती विश्रांती घेण्याकरता पडलेले आहेत. रुक्मिणीने दासीच्या हातातून पंखा घेतला आणि वारा घालत उभी राहिली. सहज लीलेनं ज्याने हे संपूर्ण विश्व उत्पन्न केलं, पालन करतो, पुन्हा उपसंहार करतो तोच परमात्मा, या ठिकाणी जन्माला आलेला आहे. या बुद्धीने ती रुक्मिणी ती विचार करते आहे. काय झालं कुणाला ठाऊक, तिची परीक्षा पाहायची होती का तिचा गर्व दूर करायचा होता, पडल्या पडल्या श्रीकृष्णपरमात्म्याने बोलायला आरंभ केलेला आहे. साक्षात लक्ष्मीदेवी ती आहे.

राजपुत्रीप्सिता भूपैर्लोकपालविभूतिभिः ।।१०.६०.१०।। श्री. भा.

काय राजकन्ये, पडल्या पडल्या एकदम हाक मारली . ती दचकली, राजकन्ये म्हणताहेत? आता काय होणार आहे कुणाला ठाऊक? आता काय बोलणार. श्रीकृष्ण बोलताहेत. ''तुझ्या विवाहाच्या वेळेला कित्ती राजेलोक तुझ्या इच्छेने आले होते? तुझ्याबरोबर विवाह करावा म्हणून पुष्कळ श्रीमंत राजे लोक आलेले होते. तुझ्या बंधूंचीही संमती होती, आईबापांचीही संमती होती.

कस्मान्नो ववृषेऽसमान् ।।१०.६०.११।। श्री. भा.

सर्व राजे लोकांचा तिरस्कार करून तू आमच्याबरोबर विवाह का केलास? आता विवाह झाला, मुलं झाली आणि आज ह्यांनी हे काढलेलं आहे. का विवाह केला? ''आमची योग्यता

आणि तुझी योग्यता बरोबरीची नाही बाई. या सगळ्या राजांची भीती आम्हाला वाटते म्हणून आम्ही समुद्रात येऊन राहिलो म्हणाले. सगळे बलवान राजे आमचा द्वेष करताहेत. आम्हाला राज्य नाही. आम्ही जसं वागतो ते वागणंही लोकांना पसंत नाहीये. लोकमार्ग सोडून आम्ही वाटेल तसं वागतो. आमच्या नादाला लागलेल्या स्त्रिया कधीही सुखी होणार नाहीत हे तुला कळलं नाही का?''

निष्किञ्चना वयं शश्वन्निष्किञ्चनजनप्रियाः।

तस्मात् प्रायेण न हि आढ्या मां भजन्ति सुमध्यमे ।।१०.६०.१४ ।। श्री. भा.

''राजकन्ये, आम्ही अकिंचन आहोत. आमच्याजवळ काही संपत्ती नाही आणि असे अकिंचन लोक जे आहेत, त्यांनाच मी आवडतो. श्रीमंत लोक माझ्याकडे कधी येत नाहीत. वर आणि वधू यांचं समान ऐश्वर्य असेल तर दोघांचा विवाह हा योग्य ठरतो. तू काहीही विचार केला नाहीस. अविचाराने पत्र काय मला पाठवलं, त्या ब्राह्मणाला काय पाठवून दिलंस, आणि ज्याच्याजवळ काहीही गुण नाहीत, घरदार नाही, संपत्ती नाही, राज्य नाही अशा माझ्याबरोबर विवाह करून बसलीस?'' एवढं बोलून तरी थांबायचं की नाही?

पुढे आणखी बोलताहेत.

अथात्मनोऽनुरूपं वै भजस्व क्षत्रियर्षभम्।

येन त्वमाशिषः सत्या इहामुत्र च लप्स्यसे ।। १०.६०.१७ ।। श्री. भा.

''तुला जर इच्छा असेल, कोणत्यातरी राजावर जर तुझं प्रेम असेल, तर तू जा, माझी काही हरकत नाही. तुझ्या मनाला समाधान मिळेल. तू विचारशील मग मी आलो का तुला न्यायला. माझी योग्यता कमी असताना, त्यावेळेला का बोललो नाही? तर त्याचं असं आहे, हे सगळे राजे शिशुपाल, जरासंध, दन्तवक्र वगैरे माझा द्वेष करतात. ते सगळे एका ठिकाणी जमले होते. त्यांचा गर्व मला दूर करायचा होता. त्याकरता मी आलो त्यावेळी. त्यांच्यादेखत मी तुला हरण करून आणलं. याचा अर्थ त्यांच्या पराक्रमाचा भंग मला करायचा होता.''

उदासीना वयं नूनं न स्त्रपत्यार्थकामुकाः ।।१०.६०.२० ।। श्री. भा.

''आम्हाला या संसार सुखाची इच्छाच नाहीये. स्त्री, मुलं, द्रव्य कुणीकडेही आमचं लक्ष नाहीये. आत्मानंदामधे आम्ही निमग्न आहोत, तृप्त आहोत.'' शुकाचार्य सांगतात, राजा, हे इतकं विलक्षण भाषण केलं. आपणच श्रीकृष्णांच्या प्रेमाला खरोखर पात्र आहोत, आपल्यावरच त्यांचं जास्ती प्रेम आहे असा थोडासा अहंकार त्या रुक्मिणीला झालेला होता. तो दूर करायचाय म्हणून

असं भाषण केलं. आजपर्यंत कधीही असं भाषण त्या रुक्मिणीला ऐकायला मिळालं नव्हतं. इतकं प्रेम करणारे गोपालकृष्ण, आज नुसतं बोलत नाहीत, तर निघून जा म्हणताहेत. केव्हा मला घरातून बाहेर काढतील कुणाला ठाऊक? असं त्या रुक्मिणीला वाटलं. मनाने अत्यंत कोमल असलेली रुक्मिणीदेवी, घाबरलेली आहे. तिने लगेच काही उत्तर दिलं नाही. भीतीने तिच्या मनावर इतका परिणाम झालेला आहे. डोळ्यातून अश्रुधारा वहाताहेत. खाली मान घातलेली आहे आणि घाबरल्यामुळे तिच्या हातातून तो पंखा खाली पडला आणि ती रुक्मिणीसुद्धा धाडदिशी जमिनीवर मूर्च्छित होऊन पडलेली आहे. पत्नीचं ते विलक्षण प्रेम पाहिलं भगवंतांनी. हिला काय म्हणाले थट्टामस्करी कळत नाही? एकदम पलंगावरून उडी मारली. तिच्याजवळ गेले. वारा घालताहेत. केस सगळे सारखे केलेत. डोळ्याला पाणी लावताहेत आणि सांगताहेत.

मा मा वैदर्भ्यसूयेथा जाने त्वां मत्परायणाम्।
त्वद्वचः श्रोतुकामेन क्ष्वेल्याऽऽचरितमङ्गने ।।१०.६०.२९ ।। श्री. भा.

''रुक्मिणी, मी बोललो ते तुला काय खरं वाटलं काय म्हणाले. थट्टेने बोललो. तू अगदी माझ्यावर पूर्ण प्रेम करणारी आहेस. खरी पतिव्रता आहेस हे मला माहिती आहे. पण तुला राग आल्यानंतर तू कशी दिसतेस किंवा कशी बोलतीस ते मला एकदा पहायचं होतं. म्हणून मी असं बोललो म्हणाले. गृहस्थाश्रमी माणसाचं हे कामच आहे. थट्टामस्करी करायची, राग आला स्त्रीला ते पहायचं. कसा राग येतो, काय काय बोलते हे सगळं पहायचं. गृहस्थाश्रमी पुरूषाने हेच करायचं. खरा राग नसतो तो. ते भाषण खरं मानायचं नाही.'' समाधान केलं त्या रुक्मिणीचं. मग तिची भिती दूर झाली. दुसऱ्या राजाकडे निघून जा म्हणल्यानंतर, आजच्या आज जा म्हटलं तर काय करायचं? उठून उभी राहिलेली आहे. आनंद झालेला आहे. आणि तिनं उत्तर द्यायलाआरंभ केला.

ननु एवमेतद् अरविन्दविलोचनाह
यद् वै भवान् भगवतोऽसदृशी विभूम्नः।
क्व स्वे महिम्नयभिरतो भगवांस्त्र्यधीशः
क्वाहं गुणप्रकृतिरज्ञगृहीतपादा ।।१०.६०.३४ ।। श्री. भा.

''केवढा कमीपणा माझा आहे देवा, तुमची आणि माझी योग्यता सारखी नाही हे मला मान्य आहे. मी पूर्ण जाणूनच तुम्हाला विनंती केली. तुम्ही माझा स्वीकार केला. मी धन्य झाले. तुम्हाला साजेशी अशी मी नाही आहे. स्वयंप्रकाश, आनंदरुप आपण आहात. हा आपला महिमा आहे. कमीही होत नाही आणि जास्तीही होत नाही. त्या आनंदामधे मग्न असणारे आपण

कुणीकडं आणि त्रिगुणात्मक प्रकृती असलेली मी कुणीकडे?''

'अज्ञगृहीतपादा'

अज्ञानीलोक माझे पाय धरतात. ज्ञानी लोक माझ्याकडे कधीही येत नाहीत. ते आपल्याकडे येतात. तुमची आणि माझी योग्यता सारखी कशी होईल? देवाने आपल्याकडे कमीपणा घेतला. ही त्यांनाच मोठेपणा देऊन आपल्याकडे कमीपणा घेतेय. खरं सांगतेय. त्यात थट्टा नाहीये. सर्वांच्या भितीने समुद्रामधे जाऊन आपण राहिलात हे ही खरं आहे.

सत्यं भयादिव गुणेभ्य उरुक्रमान्तः।

शेते समुद्र उपलम्भनमात्र आत्मा ॥१०.६०.३५॥ श्री. भा.

''हे जे त्रिगुणात्मक विषय आहेत, या संसाराच्या भितीने आपण या जलामधे जाऊन रहिलात असं मी समजते. राजाची भीती नाही. ही जी इंद्रियं आहेत यांच्याबरोबर आपला निग्रह आहे. परंतु आपले जे सेवक आहेत, ते ही असेच करतात. त्यांनी आपलं राज्य सोडून दिलेलं असतं. आणि आपल्या ध्यानाकरता, भजनाकरता अरण्यात जाऊन राहतात. तेव्हा आपण कशाला राज्य स्विकाराल? निष्कांचन आपण आहात. म्हणजे काहीही जवळ नाही. परंतु बाह्य साधनांनी आपली योग्यता ठरवायची नाही. स्वयंयोग्यता आपली आहे. ब्रह्मादिक देव ज्यांना नजराणा देतात आणि ज्यांची आज्ञा पालन करतात ते आपण स्वतःला निष्कांचन समजता? सर्वही पुरूषार्थांचं पर्यवसित रूप आपलं आहे. चारी पुरुषार्थ मिळाले नाहीत तरी चालेल पण आपली प्राप्ती झाली की ते सर्व प्राप्त होतात एवढंच नव्हे तर मुक्ती पुरूषार्थही आपल्यामुळे प्राप्त झाला अशी माझी समजूत आहे. सर्वही भक्तांना आत्मदान करणारे, संरक्षण करणारे असे आपण आहात. राजांच्या भीतीने आपण समुद्रात जाऊन राहिला असं आपण म्हणता.काय हे कोणाला तरी खरं वाटेल का? युद्धाच्या वेळेला रथामधे तुमच्याजवळ राहून मी प्रत्यक्ष पाहिलेलं आहे ना? राजे पळून गेले की तुम्ही पळून गेलात? माझ्या नादाला कोणी लागला की त्याला त्रास होतो, हे ही तुमचं काही मला पसंत नाही म्हणाली. मोठे मोठे राजे राज्यत्याग करून आपली कृपा संपादन करण्याकरता वनामधे जाताहेत. त्यांना काय दुःख झालेलं आहे? आपल्या कृपेनं त्यांना किती आनंद मिळालेला आहे. आपला त्याग करून दुसरीकडं कोणती स्त्री जाईल?'' ''सर्व समृद्धी आपल्याजवळ आहे त्यामुळे आपला त्याग कोणालाही पसंत नाही. सर्व विचार करून ब्रह्मादिक देवांचा त्याग करून मी आपल्याजवळ आलेली आहे.'' लक्ष्मीनं महाविष्णूंना का स्विकारलं का त्याचा आश्रय घेतला

याचं हे उत्तर आहे. रुक्मिणी ही लक्ष्मीदेवीच आहे. आणि शेवटी म्हणाली, आपण जे बोललात, की निघून जा दुसऱ्या राजाकडे, हे बोलणं कसं आहे? कुणी ऐकलं तर काय म्हणेल? त्या दासी, सख्या होत्याच की तिथे. पण हेही बोलणं योग्यच आहे म्हणाली.

नैवालीकमहं मन्ये वचस्ते मधुसूदन ।
अम्बाया इव हि प्रायः कन्यायाः स्याद् रतिः क्वचित् ।।१०.६०.४७।। श्री. भा.
व्यूढायाश्चापि पुंश्चल्या मनोऽभ्येति नवं नवम् ।
बुधोऽसतीं न विभृयात् तां बिभ्रत् उभयच्युतः ।।१०.६०.४८।। श्री. भा.

''कोणावर प्रेम असेल तर त्याच्याकडे जायला हरकत नाही, हे ही आपलं बोलणं योग्य आहे. आईप्रमाणे आपली भाषा आहे. आम्ही राजकन्या म्हणाली, सर्वही सौख्य आहे. राजकन्यांचं मन हे असंच आहे. नवीन नवीन ठिकाणी जाणं, ही त्या मनाची सवय आहे. विवाह झाला तरी सुद्धा त्यांचं प्रेम एके ठिकाणी स्थिर रहात नाही. अशी जर राजकन्या असेल किंवा अशी जर वधू आपल्याला मिळाली असेल, तर तिचा स्विकार कोणीही करू नये. पण माझ्या अंतःकरणामधे मात्र दुसरं कोणीही नाहीये.

अस्त्वम्बुजाक्ष मम ते चरणानुरागः
आत्मन् रतस्य मयि च अनतिरिक्तदृष्टेः ।
यर्हि अस्य वृद्धय उपात्तरजोऽतिमात्रो
मामीक्षसे तदु ह नः परमानुकम्पा ।।१०.६०.४६ ।। श्री. भा.

आपला अनुराग, आपलं प्रेम माझ्या चित्तामधे निरंतर आहे. आपण केवळ आत्मानंदामधे निमग्न आहात. माझ्या अंतःकरणातला अनुराग वृद्धिंगत व्हावा याकरता तुमची कृपादृष्टी जर माझ्यावर झाली तर हीच मी आपली अनुकंपा, दया समजून आनंदाने राहीन. तुम्ही जे जे बोललेला आहात ते सगळं योग्य आहे.''

भगवान सांगतात,

साध्वी एतत् श्रोतुकामैस्त्वं राजपुत्रि प्रलम्भिता ।।१०.६०.४९ ।। श्री. भा.

''तुझ्या मुखातून मला हे सगळं ऐकायचं होतं म्हणाले. माझं सगळंच म्हणणं तू खोडून काढलंस. मी कमीपणा घेतला तो मोठेपणाच तू दाखवलास म्हणाले. मी शेवटी अत्यंत निंद्य बोललो. पण तेही योग्यच तू ठरवलेलं आहेस. स्वतःकडेच तू दोष घेतलेला आहेस. जी जी इच्छा

तुला आहे, ती ती सर्व पूर्ण होईल म्हणाले. अकाम भक्त तू आहेस. पतीचं प्रेम तू मिळवलेलं आहेस. इतका मी तुला टोचून बोललो, रागाने बोललो तरीसुद्धा माझ्याठिकाणचं तुझ्या अंतःकरणातलं प्रेम थोडंही कमी झालेलं नाही. माझ्याजवळ येऊन कोणत्याही ऐश्वर्याची, मोक्षाची सुद्धा इच्छा त्या भक्तांना होत नाहीये. माझ्याबद्दलचा अनुराग तुझ्या चित्तामधे दृढ आहे मला माहिती आहे. तुझ्यासारखी प्रेमशील गृहिणी मला दिसत नाही. माझ्या प्रेमामधे अंतराय येऊ नये म्हणून सर्व राजे लोकांचा तिरस्कार करून एका ब्राह्मणाबरोबर तू पत्र पाठवलंस. दुसरी गोष्ट तुझा भाऊ लढाईला आला असताना त्याचे केस कापून त्याला आम्ही रथाला बांधून ठेवलेलं आहे, त्याचा अपमान केलेला आहे. अनिरूद्धाच्या विवाहाच्या वेळेला बलरामांनी तुझ्या भावाला ठार मारलेलं आहे. पण

दुःखं समुत्थमसहः अस्मद्योगभीत्या ।
नैवाब्रवीः किमपि तेन वयं जितास्ते ।।१०.६०.५६ ।। श्री. भा.

रुक्मिणी, हे सर्व घडून सुद्धा एवढं दुःख तू सहन केलंस. आमचा वियोग होऊ नये, आमच्याजवळ रहायला मिळावं म्हणून आमच्याविरूद्ध एक चकार शब्द तू तोंडातून काढला नाहीस. या तुझ्या सहनशीलतेनं आम्हाला तू जिंकलेलं आहेस. देवाने अभिनंदन केलेलं आहे रुक्मिणीचं. शुकाचार्य सांगतात, राजा, प्रत्येक वाड्यामधे याप्रमाणे स्त्रियांच्याबरोबर बोलणं चालणं चालू आहे. एका वाड्यातला रूक्मिणीचा वृत्तांत शुकाचार्यांनी सांगितला. प्रत्येक वाड्यातला वृत्तांत देणं अशक्यच आहे. कृष्णचरित्र कितीतरी अद्यापि अज्ञात आहे. व्यासांनी किती लिहायचं? दुसऱ्या वाड्यामधे नारद दर्शन आहे. अवतार घेऊन नुसतं बाहेरच्या लोकांना वळण लावायचं असं नाहीये. घरातही वळण लावायचं आहे. रुक्मिणीला थोडासा अहंकार झालेला त्यांच्या दृष्टीला पडला आणि हे बोललेले आहेत. तरी रुक्मिणीला राग आलेला नाही. तिचं प्रेम, पातिव्रत्य हे दृढ ठरलेलं आहे आणि कबुली भगवंतांनी दिलेली आहे. याप्रमाणे पुढे संसार कसा कसा झाला, काय काय लीला झाल्या हे शुकाचार्यांनी सांगितलं.

एकैकशस्ताः कृष्णस्य पुत्रान् दश दशाबलाः ।
अजीजनन्ननवमान्पितुः सर्वात्मसम्पदा ।।१०.६१.१।। श्री. भा.

शुकाचार्य महाराज सांगतात राजा, सोळा हजार आठ स्त्रिया, भगवान कृष्णांच्या आहेत. प्रत्येक स्त्रीपासून त्यांना दहा मुलं झाली. पित्याप्रमाणे रूप, शौर्य, बुद्धी त्या मुलांना आहे. सर्वही त्या स्त्रिया भगवंतांची सेवा करताहेत. सर्व प्रकारची अनुकलता त्यांना आहे. आठ ज्या स्त्रिया

आहेत 'अष्टमहिषी', त्यांच्या मुलांची नावं सांगताहेत. मुख्य रुक्मिणीचा पुत्र जो प्रद्युम्न आहे हा पित्याप्रमाणे सर्वगुणसंपन्न आहे. त्यांची मुलं, नातू, पणतू वगैरे पुष्कळ आहेत. यादवांचा वंश फार वाढलेला आहे. प्रद्युम्नाचा मुलगा अनिरूद्ध याला त्या रुक्मिने आपली नात दिलेली आहे. राजा म्हणाला, तो तर कृष्णाचा द्वेष करणारा मग त्यांने आपली नात दिली कशी यादवांकडे? आचार्य सांगतात, पुढेत्याचा द्वेष दूर झाला बहिणीच्या प्रेमामुळे त्याने आपली नात दिली. भोजकट नावाचं नवीन नगर तयार करून तो तिथं राहिला होता. आपल्या मूळच्या नगरात तो गेला नाही. त्याने प्रतिज्ञा केली होती की कृष्णाचा पराभव करून मी माझी बहीण परत आणीन आणि जर शक्य झालं नाही तर नगरात पाऊल ठेवणार नाही.

अनिरूद्धाच्या विवाहाकरता सर्व यादव मंडळी त्या भोजकट नगरामधे आली. विवाहसमारंभ उत्तम झालेला आहे. आणि त्या रुक्मिला त्याच्या मित्रांनी सांगितलं, बलरामाला अक्षक्रीडा, म्हणजे फास्यांनी द्यूत खेळण्याचं ज्ञान याला नाहीये. तू याला बोलाव. दोघेही द्यूत खेळा. बलरामांपासून पुष्कळ द्रव्य तुला जिंकून मिळेल. दोघांचं द्यूत सुरू झालं. रुक्मिने पुष्कळ द्रव्य जिंकून घेतलेलं आहे. कलिंग देशाचा राजा, रुक्मिचा मित्र होता. बलरामजींचा पराभव झाला की त्यानं हसावं, उपहास करावा. बलरामजी हट्टाला पेटले आणि त्यांनी एकदा पुष्कळ द्रव्य पणाला लावलं. त्या खेळामधे बलराम विजयी झाले. पण रुक्मि आणि त्याचे मित्र यांनी आरडाओरडा केला की रुक्मिला हे द्रव्य मिळालं पाहिजे. बलरामांचा पराजय झालेला आहे. आकाशवाणी झाली की बलरामांचा जय झालेला आहे. पण त्या रुक्मिनं काही ऐकलं नाही. तो त्यांना बोलला, तुम्ही गवळी लोक. तुम्हाला या अक्षक्रीडेचं ज्ञान असणार कसं? आमच्यासारख्या राजांनीच अक्षक्रीडा करावी आणि युद्धही आम्हीच करावं. तुम्हाला काहीही ज्ञान नाही. बलराम रागावले आणि त्यांनी लगेच त्या रुक्मिला ठार मारलं. बाकीचे राजे पळून गेले. प्रत्यक्ष आपला मेव्हणा आणि आपल्या भावाने मारलं कुणाला बोलायचं? तो शत्रूच होता. मारलं, बरं झालं. असं म्हणावं तर रुक्मिणीला राग येणार. आणि माझ्या मेव्हण्याला का मारलं असं विचारावं तर बलरामांना राग येणार. हे उठले, कृष्ण भगवान. सारथ्याला रथ काढायला सांगितला आणि द्वारकेला निघून गेले. कुणालाही बोलायला नको म्हणाले. मागाहून सर्व मंडळी, वऱ्हाड द्वारकेला आलेलं आहे.

राजाने एक प्रश्न विचारला, ''महाराज, अनिरूद्धाचा विवाह बाणासुराची कन्या उषा हिच्याबरोबर झाला त्यावेळेला श्रीकृष्ण आणि शंकर भगवान यांचं मोठंयुद्ध झालं असं मी ऐकलंय.

ते चरित्र आपण सांगा.'' शुकाचार्य सांगतात,

बाणः पुत्रशतज्येष्ठो बलेरासीन्महात्मनः ।।१०.६२.२ ।। श्री. भा.

वामनांना ज्याने भूमीदान केलेलं आहे त्या बलिचा हा बाणासुर ज्येष्ठ पुत्रआहे. तो मोठा शिवभक्त होता. उदार होता. बुद्धिमान होता. सत्य बोलणारा होता. पुरामधे तो राज्य करतो आहे. शंकरांचा पूर्ण कृपा प्रसाद त्याच्यावर असल्यामुळे देवसुद्धा अतिशय नम्रपणे त्याच्याशी वागत असत. कोणच्याही वेळेला एक हजार हात त्याला उत्पन्न होत होते. शंकराच्या वरामुळे. शंकर भगवान तांडवनृत्य करत असताना त्याने उत्तम प्रकारे मृदंग वाजवून शंकरांना अत्यंत प्रसन्न केलं होतं. त्याची कला पाहून शंकरांनी वर दिला होता. एके दिवशी बाणासुर शंकरांच्या दर्शनाकरता आला. नमस्कार केला आणि प्रार्थना करतो आहे, ''देवा मला तुम्ही हजार हात कशाकरता दिले? भार झालाय मला. त्रैलोक्यामधे माझ्याबरोबर युद्ध करायला कोणीही तयार नाही. सगळ्यांना भीती वाटते. तुम्ही तेवढेसमर्थ दिसता. माझ्याबरोबर युद्ध करू शकाल''. म्हणजे आपल्या उपास्य देवालाच युद्धाचं आव्हान याने दिलं. रागावले शंकर. फार उन्मत्त झालास म्हणाले. लवकरच भेटेल तुला एक वीर पुरूष आणि तुझा गर्व दूर करील. परत आला बाणासुर. बाणासुराची एक कन्या होती उषा नावाची. एका मोठ्या राजवाड्यामधे ती उषा, तिच्या मैत्रिणींसह राहत होती. बाहेर कडक पहारा होता. आत कुठल्याही पुरूषाला जाऊ देत नव्हते. बाणासुराच्या एका मंत्र्याची मुलगी, चित्रलेखा नावाची ही उषेची मैत्रिण होती. ती चित्रकलेमधे अत्यंत निष्णात होती आणि मोठी योगिनी होती. योगाभ्यासही तिचा पुष्कळ झालेला होता. एका रात्री ती उषा एकदम झोपेतून जागी झाली आणि रडायला लागली. चित्रलेखा जवळ होतीच. तिने विचारलं, ''काय झालं? तू का रडते आहेस?'' ती म्हणाली, ''आत्ता मला स्वप्नामधे एका सुंदर पुरूषाचं दर्शन झालं आणि तो एकदम दिसेनासा झाला. म्हणून मी दुःख करते आहे. पीतांबरधारी, अत्यंत सुंदर तो होता. त्याला भेटण्याची माझी इच्छा आहे.'' चित्रलेखा म्हणाली, ''काही घाबरू नकोस. मी तुला त्या पुरूषाची भेट घालून देते.'' कोण आहे उषेला भेटलेला मनुष्य हे समजण्याकरता त्या चित्रलेखेनं चित्र काढायला सुरूवात केली. चित्रकला खरी ज्याला आणखी अवगत करायचीय त्याला मनाची एकाग्रता, स्थिरताही पाहिजे. मनामधे ते आणून त्याप्रमाणे चित्र काढायचंय. देवांची चित्र काढली. दैत्यांची, विद्याधरांची, गंधर्वांची मानवांची चित्रं काढायला लागली. मोठ्या मोठ्या राजांची चित्रे काढून दाखवतीय. यादवांची चित्रं ती काढायला लागली. वसुदेवाचं चित्रं काढलं. बलराम-कृष्णांची चित्र काढली. नंतर प्रद्युम्नाचं काढलं. आणि नंतर शेवटी अनिरूद्धाचं

चित्र तिनं काढलं. उषा म्हणाली, यांचच मला दर्शन झालं. चित्रलेखा म्हणाली आता पत्ता लागला. श्रीकृष्णांचा हा नातू आहे म्हणाली. मी घेऊन येते. मध्यरात्रीच्या सुमारास ती चित्रलेखा आकाशमार्गाने द्वारकेस येऊन पोहोचली आणि अनिरुद्धाला त्याच्या पलंगासह उषेच्या अंतःपुरात घेऊन आली. अत्यंत सुंदर तो अनिरुद्ध होता. साक्षात कामाचा म्हणजे मदनाचा तो मुलगा होता. तो तिथे राहिलेला आहे. बाहेरच्या पहारेकऱ्यांना काही संशय आला की आत कुणीतरी पुरूष असला पाहिजे. त्यांना काही आत जायला परवानगी नव्हती. मग त्यांनी जाऊन बाणासुराला सांगितलं की राजेसाहेब, आपल्या कन्येच्या अंतःपुरामधे कुणीतरी पुरूष गेलेला आहे असं आम्हाला वाटतं. आम्ही तर कुणालाही आत जाऊ देत नाही. कसा गेला आपणच शोध करा. अपकीर्ति होणार आता. कन्येनं आपल्या कुलाला कलंक लावला. रागाने एकदम तो बाणासुर त्या कन्येच्या अंतःपुरात स्वतः आलेला आहे. अचानक येऊन तो पाहातोय तर ती उषा आपल्या मैत्रिणींसह एका अत्यंत सुंदर अशा पुरुषाबरोबर सोंगट्या खेळतीय, हास्यविनोद चाललेत. लगेच त्याने आपल्या सैनिकांना त्याला पकडण्याची आज्ञा केली. अनिरूद्धही मोठा पराक्रमी होता. त्यानेही पुष्कळसे सैनिक मारले. पण बाणासुरासमोर त्याचं काही चाललं नाही. बाणासुराने त्याला नागपाशामधे बांधून तुरूंगात टाकलेलं आहे. ती उषा रडते आहे. तिच्याकडे लक्ष न देता तो बाणासुर रागाने निघून गेलेला आहे.

शुकाचार्य म्हणतात राजा, द्वारकेतून अनिरूद्ध नाहिसा झाला. चार महिने होऊन गेले तरी त्याचा पत्ता लागला नाही. सगळे लोक दुःखी झालेले आहेत. एकेदिवशी नारदांनी येऊन सांगितलं, तुमचा अनिरूद्ध त्या बाणासुराच्या तुरुंगात पडलेला आहे म्हणाले. लगेच सगळं यादवसैन्य निघालेलं आहे. प्रद्युम्न आहे, सात्यकी आहे, सांब आहे. मोठे मोठे पराक्रमी वीर होते. बलराम–कृष्ण होतेच. बारा अक्षौहिणी सैन्य घेऊन त्यांनी बाणाच्या नगराला वेढा घातलेला आहे. बाणासुर युद्धासाठी बाहेर आलेला आहे. आणि त्याला साहाय्य करण्याकरता भगवान शंकरही आपलं गणांचं सैन्य घेऊन आलेले आहेत. शंकर आणि कृष्ण यांचं युद्ध चाललेलं आहे. प्रद्युम्न आणि कार्तिकस्वामी यांचं युद्ध चाललेलं आहे. बाणासुराच्या दोन प्रधानांबरोबर बलराम युद्ध करताहेत. पुष्कळ कालपर्यंत ते युद्ध चालू आहे. शारंग धनुष्यातून श्रीकृष्ण बाण सोडताहेत. अनेक प्रकारची अस्त्रं कृष्णांनीही सोडली, शंकरांनीही सोडली. शेवटी शंकरांनी पाशुपतास्त्राचा प्रयोग केला. कृष्णांनी आपल्या नारायणास्त्राचा प्रयोग केला. श्रीकृष्णांनी शंकरांच्यावर जिंभणास्त्राचा प्रयोग केला. शंकरांना जांभया यायला लागल्या. शस्त्र काही हातात धरता येईना. ते रणांगणातून निघून गेले. प्रद्युम्नाने

कार्तिकस्वामीचाही पराजय केलेला आहे. मग बाणासुर आणि श्रीकृष्ण यांचं युद्ध सुरू झालं. त्या बाणासुराला हजार हात होते. पाचशे हातामधे पाचशे धनुष्यं आणि दुसऱ्या पाचशे हातामधे पाचशे बाण घेऊन तो बाणवर्षाव करतो आहे. श्रीकृष्णाला फक्त चार हात, चतुर्भुज होते ते. पण त्यांनी बाणासुरांच्या सर्व बाणांचं निवारण केलं. शेवटी बाणासुराला पळून जायची पाळी आली. त्याची माता रणांगणावर आली आणि तिने श्रीकृष्णांना प्रार्थना केली. तो बाणासुर नगरामधे निघून गेलेला आहे. पुन्हा तो युद्धाला आला. आणि त्यावेळेला श्रीकृष्णांनी बाणासुराचे हात तोडायला सुरूवात केली. चार हात शिल्लक ठेवून बाकी सगळे हात तोडून टाकलेले आहेत. शंकर परमात्मा श्रीकृष्णांची प्रार्थना करताहेत, म्हणाले हा माझा भक्त आहे. याला तुम्ही मारू नका. भगवान म्हणाले, मलाही ह्याला मारायचं नाहीये. हा प्रल्हादाच्या कुळातला आहे. प्रल्हादाचा पणतू आहे हा. मी प्रल्हादाला वर दिला होता. तेव्हा मला ह्याला मारायचं नाही. पण हा फार उन्मत्त झाला होता. तुम्हालाही युद्धाचं आव्हान दिलं होतं याने. तेव्हा याचे हात तोडून टाकायचे होते. बाणासुर त्या युद्धातून परावृत्त झालेला आहे. सर्व यादवांना बोलावलं त्याने. त्यांचा सत्कार केला. आपली कन्या उषा त्या अनिरूद्धाला दिलेली आहे. विवाह झालेला आहे. मग अनिरुद्धाला घेऊन सर्व यादव हे द्वारकेमधे आलेले आहेत.

एकदोपवनं राजन् जग्मुर्यदुकुमारकाः ।
विहर्तुं साम्बप्रद्युम्नचारुभानुगदादयः ।।१०.६४.१।। श्री. भा.

शुकाचार्य सांगतात राजा, यादवांची मुलं ही एकदा खेळण्याकरता बाहेर पडली. द्वारकेच्या जवळच एक चांगलं वन होतं. पुष्कळ वेळ त्यांचा खेळ झाला. आणि त्यांना तहान लागली. एक विहिर त्यांच्या दृष्टीला पडली. पाणी असेल, पिऊया म्हणून आली ती मुलं, विहिरीमधे एक अतिशय मोठा सरडा पडला होता. त्या मुलांनी दोऱ्या आणल्या, त्या सरड्याला बांधून वर ओढायचा प्रयत्न केला. पण तो काही वरती येऊ शकला नाही. मुलांना काही त्याला काढता येईना एवढा अजस्त्र तो होता. गोपालकृष्णांना सांगितल्यावर ते तिथं आले. सहज हाताने उचलून त्या सरड्याला वर ठेवलं. श्रीकृष्णांचा हस्तस्पर्श होण्याबरोबर त्याचा तो सरड्याचा देह गेला आणि देवाप्रमाणे रूप त्याला प्राप्त झालं. सर्वांना समजण्याकरता गोपालकृष्णांनी त्याला विचारलं, की तू कोण आहेस? सरड्याचा जन्म तुला का आला? तो नृग नावाचा राजा होता. तो बोलू लागला, ईश्वाकू राजाचा मुलगा नृग मला म्हणतात. दानशूर असे मोठे मोठे जे दाते होऊन गेले त्यामधे माझंही नाव कदाचित आपल्या कानावर आलं असेल. पुष्कळ गायींचं दान मी केलेलं आहे.

जितके वाळूचे कण असतील, जितक्या तारका असतील अथवा जितक्या पावसाच्या धारा पडत असतील तितक्या गाई मी दिलेल्या आहेत. आपण विचारलं म्हणून सांगतोय. पुष्कळ दूध देणाऱ्या, ज्यांचे खूर चांदीने मढवलेले आहेत. शिंगांना सोन्याचा पत्रा मारलेला आहे, न्यायाने मिळवलेल्या अशा गाईंचं दान मी केलेलं आहे. बाकीची दानंही मी केली, भूदान आहे, हिरण्यदान आहे, गृहदान आहे. अनेक यज्ञ केले. माझ्यावर एकदा धर्मसंकट आलं. एका ब्राह्मणाला मी एक गाय दिली. तो घरी घेऊन गेला. त्याची गाय त्याच्या घरातून निघून माझ्या वाड्यात आली आणि इतर गाईंबरोबर मिसळली. मला काही माहिती नाही. दुसऱ्या दिवशी तीच गाय मी दुसऱ्या ब्राह्मणाला दिली. आणि तो ब्राम्हण ती गाय घेऊन निघालेला असताना, आदले दिवशी ज्याला गाय दिली होती त्या ब्राह्मणाची गाठ रस्त्यामधे पडली. तो म्हणाला ही माझी गाय आहे. हा म्हणाला, मी आत्ताच राजवाड्यातून ही गाय घेऊन आलो आहे. दोघेही माझ्याकडे आले. काय राजेसाहेब, आज गाय दान करायची, संध्याकाळी परत आणायची दुसरे दिवशी तीच गाय दुसऱ्या ब्राह्मणाला द्यायची. कशाला करता हे दान ? कुणी सांगितले तुम्हाला ? मला काही बोध झाला नाही, समजलं नाही. त्या दोघांची समजूत करण्याचा मी प्रयत्न केला. त्या गायीकरता एक लाख गाई द्यायला मी तयार झालो आणि विनंती केली की या धर्मसंकटातून मला मुक्त करा. दोघांनाही तीच गाय पाहिजे होती. ती गाय तेथेच त्यांनी सोडून दिली आणि दोघेही ब्राम्हण घरी निघून गेले. यमदूतांनी मृत्युनंतर मला यमाकडे नेले. यमधर्माने मला विचारलं, राजा तुझं पुण्य पुष्कळ आहे. पण पापही थोडं आहे. तुला पापाचं फळ अगोदर भोगायचं आहे की पुण्याचं फळ आधी भोगायचं आहे; मी म्हणालो, पाप थोडं आहे ना, मग आधी पापफल भोगतो. लगेच यमधर्मांच्या आज्ञेप्रमाणे मला हा सरड्याचा देह प्राप्त झाला. इथे येऊन मी पडलो होतो. आज आपला हस्तस्पर्श होण्याबरोबर माझा उद्धार झालेला आहे. मी आता स्वर्गलोकाला जातो महाराज.'' असं सांगून, भगवान श्रीकृष्णांना प्रदक्षिणा, नमस्कार करून विमानात बसून तो नृगराजा स्वर्गलोकाला निघून गेलेला आहे.

बरीच मंडळी तिथं जमलेली. त्यांनी ते नृगराजाचं आख्यान त्याच्या तोंडूनच ऐकलं. भगवान सर्व लोकांना उद्देशून म्हणताहेत,'' ब्राह्मणाचं द्रव्य कुणीही घेऊ नका बरं! हलाहल विषापेक्षासुद्धा ते भयंकर आहे. विष हे ज्याने खाल्लं त्याचाच फक्त नाश करतं. परंतु हे जे ब्रह्मअपराधविष आहे हे संबंध कुळाचा नाश करतं. तुम्ही या नृगराजाची गोष्ट ऐकली ना ? त्याने काय चोरून आणलेली नाही गाय! पण दुसऱ्याची गाय याच्याकडे आली आणि याने दान केली. पण या धर्मसंकटाचा

काही निर्णय झाला नाही. म्हणजे संदिग्ध का होईना, दोष याच्याठिकाणी राहिला आणि त्या दोषामुळे याला हा जन्म घ्यावा लागला. तेव्हा हे लक्षात ठेवा, कुणीही ब्राह्मण कसाही वागला, रागावला तरी तुम्ही रागावत जाऊ नका. मी कसा वागतो बघा आणि तसं वर्तन ठेवा. नाहीतर, याच्याविरूद्ध वागलात तर तुम्हाला शिक्षा होईल म्हणाले.'' असं सर्वांना मार्गदर्शन भगवंतांनी केलेलं आहे.

बलरामजी एकदा एकटेच गोकुळामधे गेले. श्रीकृष्ण गेलेच नाहीत. गोकुळामधे सर्वांना आनंद झाला. सर्वांनी भेट घेतली. यशोदेला आनंद झाला. प्रेमाने बलरामांना जवळ घेतलं. डोळ्यातून अश्रुधारा वाहताहेत. सर्व वृद्ध गोपाळमंडळींना बलरामजींनी नमस्कार केला. लहान वयाच्या गोपालांनी बलरामांना नमस्कार केला. मित्रमंडळी भेटलेली आहेत. पूर्वीच्या गोष्टी निघालेल्या आहेत. प्रेमाने सर्व बोलत बसलेले आहेत. नंदजी विचारताहेत,'' कंसाचा नाश करून, सर्व यादवांना तुम्ही सुखी केले. अनेक मोठ्या मोठ्या शत्रूंना जिंकून आणि आता तुम्ही समुद्रामधे द्वारकानगर तयार करून तिथे राहिलात; असं आम्ही ऐकलं. बलरामांच्या दर्शनामुळे, गोपींना अत्यंत समाधान झालं. त्याही रामांच्याजवळ येऊन बोलू लागल्या,

कच्चिदास्ते सुखं कृष्णः पुरस्त्रीजनवल्लभः ।।१०.६५.९ ।। श्री. भा.

बलरामजी गोपालकृष्ण सुखी आहेत ना? पुष्कळ राजकन्यांबरोबर त्यांचा विवाह झाला आहे. आमची आठवण त्याला होते का? निदान आपल्या आईबापांची तरी आठवण त्याला आहे का? येणार आहे का कधी इथं? भगवंताचं दर्शन नसल्यामुळे त्या गोपी अतिशय दुःखात आहेत. बलरामजी त्यांचं समाधान करताहेत. कृष्णलीला सांगताहेत. चैत्र, वैशाख दोन महिने बलरामजी गोकुळात राहिलेले आहेत.

बलराम गोकुळाला गेलेले असताना, पौण्ड्रक नावाच्या राजाने आपला एक दूत श्रीकृष्णांकडे पाठविला. तो राजसभेमधे आला आणि त्याने आपल्या राजाचा निरोप सांगितला, ''पौण्ड्रकाने असा निरोप पाठविला आहे की वासुदेव हे नांव माझं आहे. ते तू घेतलं आहेस. ते मुकाट्याने नांव सोडून दे. शंख,चक्र, गदा, पद्म ही माझी चिन्हे आहेत. माझी आयुधे आहेत. ती मुकाट्याने सोडून दे. मला शरण ये. नाहीतर युद्धाची तयारी कर.'' सभेमधे बसलेले सगळे लोक हसायला लागले. नाव काय म्हणाले? वासुदेव सांगतोय? सुदर्शन चक्र काय याचं आहे? सुदर्शनचक्राबद्दल एक कथा व्यासांनी महाभारतात दिली आहे.भगवंतांचं दिव्य शस्त्र आहे हे सुदर्शन. ते अश्वत्थाम्याने आग्रहपूर्वक

मागून घेतलं. घेऊन जा म्हणाले, तिथे आहे. त्याला ते उचलेना. मग लढाई करणं तर दूरच. त्याची फजिती झाली. भगवंतांनी त्या दूताला सांगितले, ''तुझ्या राजाला जाऊन सांग, कोणाची शस्त्रं आहेत आणि कुणाचं काय याचा निर्णय युद्धातच होईल. तूच तयारी कर. आम्ही आलो लढायला.'' निघाले गोपालकृष्ण. पौण्ड्रकराजा हा दोन अक्षौहिणी सैन्य घेऊन बाहेर पडला. काशीराजा त्याचा मित्र होता. तोही तीन अक्षौहिणी सैन्य घेऊन त्याला सहाय्य करायला निघालेला आहे. गोपालकृष्ण पाहताहेत. शंख, चक्र, गदा, पद्म हातामध्ये घेतलेलं आहे. चंदन लावलेलं आहे. वनमाला गळ्यात घातलेली आहे. श्रीकृष्णांची हुबेहूब अगदी नक्कल केली होती. हसले भगवान. चार हात कुठले आणले कुणास ठाऊक? नवीन निर्माण करण्याचं काही सामर्थ्य त्याला नाही. कृत्रिम वेष घेऊन तो आलेला आहे. दोघांचं युद्ध झालं. भगवंतांनी त्याचा शिरच्छेद केला. तो मृत झाल्यावर दिव्य तेज त्याच्या शरीरातून बाहेर पडून ते कृष्णशरीरामधे प्रविष्ट झाले. मी वासुदेव आहे, शंख, चक्र, गदा, पद्म माझी आहेत असा एक ध्यास त्याला लागलेला होता. वेडेपणा नाही अहंकार का होईना. माझं नाव आहे, माझी शस्त्रे आहेत. हा ध्यास त्याला कृष्णांचा सारखा लागल्यामुळे तो मुक्त झालेला आहे. काशिराजाचंही सैन्या मारलं भगवंतानी आणि काशिराजाचं मस्तक बाणाने काशीनगरीच्या वेशीमधे नेऊन टाकलं. त्या काशीराजाचा मुलगा सुदक्षिण नावाचा त्याने आपल्या पित्याचा वधाचा सूड घ्यायचा ठरवून श्रीकृष्णांचा नाश करण्याचं ठरवलं. शंकरांची आराधना केली. शंकरांनी त्याला सांगितलं, ''ब्राह्मणमंडळींना बोलावून तू शत्रूचा नाश करण्याकरिता जे काही होमहवन करायचं असतं ते कर. तुझा शत्रू मात्र धार्मिक नसावा. तरच या मांत्रिक कर्माचा उपयोग होईल. 'अब्रह्मण्येत् प्रयोजिता' म्हणतात. ब्राह्मणांविषयी अत्यंत आदर बाळगणारा जर तुझा शत्रू असेल तर ते कर्म उलटून तुझा नाश होईल.'' त्या सुदक्षिणाने होमहवन केलं. त्या होमातून एक भयंकर अग्नि उत्पन्न झाला आणि द्वारकेकडे गेलेला आहे. सर्व द्वारका जाळून टाकण्याकरता. सभेमधे भगवान बसलेले होते. अक्षक्रीडा चाललेली आहे. सर्व लोक धावत धावत आले. आणि द्वारकेला चारी बाजूंनी आग लागल्याचं वर्तमान त्यानी सांगितलं. ओळखलं भगवंतांनी. महेश्वराचं हे काम आहे म्हणाले. चक्राला आज्ञा केली, बंदोबस्ताकरता. ते कोटीसूर्यासारखं तेजस्वी चक्र बाहेर पडलं. त्या आलेल्या अग्निला त्या चक्राने परत फिरवलं. काशीतून निघालेला अग्नि त्या चक्राच्या प्रतिघातामुळे पुन्हा काशीत आला आणि सबंध काशी त्याने जाळून टाकली. तो राजपुत्र सुदक्षिण, त्याच्याकरता यज्ञ करणारे ब्राह्मण सर्वांना त्या अग्निने दग्ध करून टाकलं. पाठोपाठ ते चक्रही आलं. त्यानेही सर्व जाळून टाकलं आणि ते द्वारकेला परत आलेलं आहे.

राजा विचारतो महाराज भगवान शेषावतार बलरामजी यांचं काही चरित्र मला सांगा. शुक सांगतात राजा, नरकासुराचा नाश भगवंताने केला. त्याचा मित्र द्विविद नावाचा वानर होता. रामावतारात सुग्रीवाचा तो मंत्री होता. असुराचा मित्र आहे. आता रामावतार होऊन बराच काल झालेला आहे. द्वापरयुग संपत आलेलं आहे. तो द्विविद वानर असुराचा मित्र असल्यामुळे त्याप्रमाणे वागू लागला. सगळ्यांना त्रास देऊ लागला. नगरामधे जावं, आश्रमामधे जावं, झाडं तोडावीत. स्त्रीपुरूषांना पकडून गुहेमधे टाकावं, गुहेचा दरवाजा बंद करावा. समुद्राचं पाणी तीरावर टाकून तीरावरील लोकांना त्रस्त करावं. असा त्याचा त्रास सर्व लोकांना होऊ लागला. एकदा रैवतक पर्वतावर बलरामजी आणि इतर यादव स्त्रिया बोलत बसलेले असताना द्विविद वानर तिथे आला. तो ओरडू लागला. विचार केला, हा सर्व देशाला उपद्रव देणारा वानर, याचा आता नाश केला पाहिजे. मुसळ आणि नांगर दोन शस्त्रं बलरामाची. त्यांनी नांगराने त्या वानराला ओढून घेतलं आणि मुसळाने त्याचं मस्तक तोडून टाकलेलं आहे. तो द्विविद वानर मरून पडलेला आहे. रामावतारापासून असलेला आणि बलरामजींच्या हातून त्याचा नाश झालेला आहे.

आणखी एक कथा सांगताहेत –

दुर्योधनासुतां राजन् लक्ष्मणां समितिञ्जयः ।।१०.६८.१ ।। श्री. भा.

दुर्योधनाची कन्या लक्ष्मणा हिचं स्वयंवर त्याने जाहीर केलं. अनेक राजपुत्र आलेले आहेत. जांबवतीचा मुलगा सांब जो होता त्याने सर्व राजांचा पराभव करून त्या लक्ष्मणेचं हरण केलेलं आहे. कौरव रागावले. हा यादवांचा मुलगा, आमच्या देखत आमच्या मुलीला घेऊन जातो? सगळे कौरव एकत्र आले. कर्ण आहे, दुर्योधन आहे. त्यांनी लढाई करून त्या सांबाचा पराजय केला आणि त्याला धरलं आणि तुरूंगात टाकलं. यादवांना ही बातमी कळल्यावर तेही रागावले. कृष्णही रागावले. पण बलरामजींना कौरवांबद्दल थोडा पक्षपात होता. दुर्योधनाबद्दल त्यांना प्रेम होते. त्यांचा प्रिय शिष्य होता तो. त्यांनी सांगितलं एकदम लढाई करू नका. मी जाऊन साममार्गाने समजावून आपल्या मुलाला घेऊन येतो. म्हणून बलरामजी उद्धवजी काही यादवांना घेऊन हस्तिपुराला आले. बाहेरच थांबलेले आहेत. उद्धवजींनी सांगितलं, बलरामजी आले आहेत भेटायला. सर्वांना आनंद झाला. सर्व मंडळी भेटण्याकरता बाहेर आलेली आहेत. त्यांनी बलरामजींचं स्वागत केलं. पूजा केली, नगरामधे येण्याकरता निमंत्रण दिलं. बलरामजी म्हणाले, ''लोकहो, उग्रसेन राजाची तुम्हाला आज्ञा आहे, ती सांगण्याकरिता मी आलेलो आहे. तुम्ही आमच्या

सांबाला अनेक जणांनी घेरून त्याला विरथ केलं. त्याचं धनुष्य तोडलं, त्याला बंदिवान केलं. पण उग्रसेन राजाने सांगितलंय की तुम्ही आमचेच आहात. तुमच्या अपराधांची मी क्षमा करतो. पण आमचा मुलगा आम्हाला आणून द्या.'' ते कौरव  सगळे उर्मट होते. ते रागावले. हा कोण नविन निघाला म्हणाले, उग्रसेन राजा. यादवांना काय राज्य करण्याची आज्ञा आहे का? ययाति राजाने यदुराजाला शाप दिलेला आहे. तुमच्या वंशात कोणीही राजा होणार नाही म्हणून. आणि हे म्हणाले आपणच राज्य करताहेत आणि पुन्हा आम्हालाच हुकूम करताहेत. पायातली वहाण डोक्यावर बसायची तिला इच्छा झाली वाटतं. असं अगदी उर्मटपणे बोलून रागाने कौरव निघून गेले. मग मात्र बलरामजींना अत्यंत राग आलेला आहे. काय यादवांना राज्याचा अधिकार नाही? काय उन्मत्तपणे बोलताहेत म्हणाले. श्रीकृष्णांची सुद्धा यांना भीति वाटत नाही म्हणाले. मी त्याची समजूत काढून त्याला थांबवलेलं आहे. साममार्गाने कार्य करावं म्हणून मी आलो. इंद्रादिक लोकपाल ज्याची आज्ञा पालन करतात त्या श्रीकृष्णाला हे लोक किंमत देत नाहीत. साक्षात लक्ष्मीदेवी ज्याची उपासना करतेय त्याला राज्याचा अधिकार नाही? आम्ही यादव म्हणजे पादत्राण आणि कौरव म्हणजे मस्तक काय?

अद्य निष्कौरवीं पृथ्वीं करिष्यामीत्यमर्षितः ।।१०.६८.४०।। श्री. भा.

बलरामजींना राग आला म्हणजे काय? उठलेले आहेत. आज एकही कौरव जिवंत ठेवायचा नाही. त्यांनी आपला नांगर घेतला आणि जमिनीमधे मारून ते सबंध नगर उचलून ते नदीमधे पालथं घालायचं असं त्यांनी ठरवलं. युद्ध कशाला पाहिजे? सबंध वाडे धडाधडा पडायला लागले. सगळे कौरव घाबरले. त्या सांब आणि लक्ष्मणेला घेऊन बलरामजींकडे आले. हा आपला मुलगा, ही सून ही घ्या पण थांबवा आता हे संहारक कार्य आणि आमचं रक्षण करा. सोडून दिलं बलरामजींनी. बलरामजींची पूजाअर्चा केली, नमस्कार केला, क्षमा मागितली. नंतर त्या दोघांना घेऊन बलरामजी द्वारकेला आलेले आहेत. दुर्योधनानेही आपल्या कन्येबरोबर अनेक हत्ती, अश्व, रथ वगैरे पुष्कळ संपत्ती दिलेली आहे. नगरात आल्यावर बलरामजींनी सांगितलं, ''आधी साममार्गाने समजूत घालण्याचा मी प्रयत्न केला. पण वाटेल तसं बोलायला लागले. त्यामुळे थोडसं चौदावं रत्न दाखवायला लागलं''. शुकाचार्य सांगतात, ''राजा, ते नगर अजून एका बाजूला उचललेलं दिसतं म्हणे. बलरामांचा तो प्रभाव आहे'.

शुकाचार्य सांगताहेत राजा–

नरकं निहतं श्रुत्वा तथोद्वाहं च योषिताम्।
कृष्णेनैकेन बह्वीनां तद् दिदृक्षुः स्म नारदः ।।१०.६९.१।। श्री. भा.

नरकासुराचा नाश करून त्याने धरून आणलेल्या सोळाहजार राजकन्यांबरोबर कृष्णांनी विवाह केला ही बातमी सगळीकडे पसरली. सोळा हजार वेगवेगळे वाडे आहेत. एकत्रही आहेत आणि भिन्नही आहेत. एकत्र म्हणजे सगळ्यांचे एक मत आहे. प्रत्येकाची चूल वेगळी पाहिजे असं नाही. सोयीकरिता वेगळं रहाणं निराळं आणि मनानं विरूद्ध होऊन वेगळं रहाणं निराळं. प्रत्येक स्त्रीचा वाडा वेगळा आहे. नोकरचाकर वेगळे आहेत. सगळी व्यवस्था आहे. त्या स्त्रीला जास्ती आणि मला कमी असे एकाही स्त्रीच्या मुखातून उद्‍गार निघणार नाहीत अशी व्यवस्था भगवंताने करून टाकली. नारदांनाही ही बातमी समजली. एकट्या गोपालकृष्णांनी सोळा हजार राजकन्यांबरोबर विवाह केला? आपण एकदा समक्ष हे कृष्णचरित्र पाहावं या हेतूने नारद महर्षिंनी ठरवलं की एक सबंध दिवस हा गृहस्थाश्रम पहायचा. गोपालकृष्ण एका ठिकाणी आहेत का सर्व ठिकाणी आहेत. देवर्षी नारद द्वारकेमधे आलेले आहेत. प्रथम त्यांनी रुक्मिणीच्या वाड्यामधे प्रवेश केला. भगवंताने पाहिलं, ''या या नारदा'' म्हणाले. उठले आपल्या आसनावरून. पायावर डोकं ठेवलेलं आहे. हात जोडून नमस्कार करून त्यांना आपल्या आसनावर बसवलं. पाय धुतले नारदांचे आणि ते तीर्थ मस्तकावर मार्जन केलेलं आहे. सर्व विश्वाचे गुरू भगवान हे सज्जनांच्याबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारे आहेत. पूजा केली नारदांची आणि विचारताहेत ''आपली काय आज्ञा आहे महाराज? काय कुठे संकट वगैरे आलेलं आहे काय?'' नारद म्हणाले ''काही नाही, उगीच आलो. वाटतं वारंवार द्वारकेला यावं, तुमची संगती घडावी. तुमच्याबरोबर बोलावं. रहावं. सहज आलो''. त्या वाड्यातून बाहेर पडले.

ततोऽन्यदाविशद्‍गेहं कृष्णपत्न्याः स नारदः ।।१०.६९.१९।। श्री. भा.

दुसऱ्या वाड्यामधे नारद गेले. रुक्मिणीच्या वाड्यामध्ये गोपालकृष्ण आहेत म्हणजे या वाड्यात ते असणार नाहीत. परंतु चमत्कार असा झाला, त्या दुसऱ्या वाड्यामध्ये गोपालकृष्ण आहेत, उद्धवजी आहेत, सत्यभामा आहे. सोंगट्याचा खेळ चाललेला आहे. तिथेही गोपालकृष्णांनी उभं राहून स्वागत केलं. पूजा केली. आणि विचारताहेत, 'केव्हा आला नारदा?' आता, आत्ताच रुक्मिणीच्या वाड्यात भेटले होते तेच गोपालकृष्ण विचारताहेत 'केव्हा आला?' म्हणजे गोपालकृष्णाचं रूप सारखं आहे पण बुद्धी वेगवेगळी आहे काय, असं नारदांना वाटलं. नारदांना ती सबंध चरित्रलीला पहायचीच होती. त्या वाड्यातून बाहेर पडताना भगवंत म्हणताहेत, 'वारंवार

येत चला नारदा. आम्ही गृहस्थाश्रमी लोक. आमचं पुण्य काही तुमच्यासारखं नाही. तेव्हा वारंवार येत चला आणि आमचा उद्धार करा'. नारद काही बोलले नाहीत. मुकाट्याने बाहेर पडले. तिसऱ्या वाड्यामधे गेले.

तत्राप्यचष्ट गोविंदं लालयन्तं सुताञ्छिशून् ।।१०.६९.२३ ।। श्री.भा.

बाहेरूनच पाहताहेत. आत गेले नाहीत. लहान लहान जे नातू, मुलं, मुली त्यांच्याबरोबर गोपालकृष्ण गोट्या खेळताहेत. चेंडूचा खेळ चाललेला आहे.इथंही आहेत गोपालकृष्ण! पुढच्या वाड्यात गेले. सर्व स्त्रिया जमलेल्या आहेत. स्नान करण्याचं कार्य चाललेलं आहे. एकेक वाड्यातून नारद महर्षी कृष्णाचं दर्शन करताहेत, पाहताहेत आत जात नाहीयेत. एका ठिकाणी अग्नीमधे हवन चाललेलं आहे. एका वाड्यामधे ब्राह्मणांना भोजन वाढायचं काम चाललेलं आहे. इतक्यात नारदांवर दृष्टी गेली. म्हणाले, ''या नारदा जेवायला बसा''. नारद म्हणाले, ''माझं भोजन झालेलं आहे मला वेळ नाही''. तिथून बाहेर पडले. कुठे संध्योपासना चालली आहे. कुठे डोळे झाकून जप करण्याचं काम चाललेलं आहे. एका वाड्यामधे सर्व शस्त्रास्त्रं तपासण्याचं काम चाललेलं आहे. चांगली धार लावली आहे की नाही? धनुष्यांची व्यवस्था काय, बाणांची व्यवस्था काय, ही चौकशी चालली आहे. एका वाड्यामधे नुकतेच भोजन झालेलं आहे, देव निजलेले आहेत. उठवायचं काय? नको म्हणाले. पाहिलं आणि बाहेर पडले. एका वाड्यामधे सगळं मंत्रीमंडळ जमलेलं आहे आणि काही विचार चालू आहे. एका वाड्यामधे ब्राह्मणांना गाईचं दान करण्याचं काम चालू आहे.

पाहत पाहत नारद चाललेले आहेत आणि दमले नाहीत. आज सर्व ठिकाणी जाऊन कृष्णांचं दर्शन घेऊन चौकशी करायची असं त्यांनी ठरवलेलं आहे. एका वाड्यात पुराणिकबुवा पुराण सांगताहेत आणि गोपालकृष्ण डोळे झाकून हात जोडून पुराण ऐकताहेत. हे सगळ्यांना मार्गदर्शन करण्याकरता आणि लोकसंग्रहाकरता आहे. कुठे ध्यान करताहेत. एका वाड्यामधे वसुदेव–देवकींना वारा घालायचं काम चाललेलं आहे. मातापित्यांची सेवा चाललेली आहे. एका वाड्यामधे कुणा उन्मत्त झालेल्या राजाबरोबर युद्धाच्या तयारीची चर्चा चालली आहे. दुसरीकडं एखाद्या राजाबरोबर संधी करायचा, युद्ध थांबवण्याचा विचार चाललेला आहे. एका वाड्यामधे बलरामजींबरोबर बोलत बसलेले आहेत. एका वाड्यामधे मुली, नाती माहेरी आलेल्या सासरी निघालेल्या आहेत. त्यांची पाठवणी करताना स्वतः गोपालकृष्ण चौकशी करताहेत की यांना काही दिलं की नाही, फराळाचं, वस्त्रं, दागदागिने वगैरे याची चौकशी चाललेली आहे. काही

मुलींची, नातींची लग्नं व्हायची होती. प्रत्येक स्त्रीपासून कृष्णांना दहा मुलं आणि एक मुलगी झाली. साम्यवाद आहे. मला कमी आणि तिला जास्त का, असं नाही. पण नाती बिती पुष्कळ होत्या. त्यांच्याकरता वरसंशोधन चाललेलं आहे. नारदांना पाहिल्याबरोबर, ''या नारदा, बसा आमच्या या नातीकरता वर बघायचांय. तुम्ही फिरता सगळीकडे. कुठलं योग्य स्थळ असेल तर सांगा''. नारद म्हणाले, ''आज मला वेळ नाही. सांगेन केव्हातरी. पुष्कळ स्थळं आहेत.'' कुठे देवपूजा चाललेली आहे. कुठं विहिरी खणणं, तलाव खणणं, हे काम चालू आहे. धर्माचरण आहे, अर्थशास्त्र आहे. कामशास्त्र आहे. असे प्रत्येक वाड्यामधे भगवान कोणत्या ना कोणत्या कार्यामधे निमग्न आहेत.

केवढा मोठा कर्मयोग आहे आणि केवढा मोठा गृहस्थाश्रम आहे. नारद आश्चर्यचकित झालेले आहेत. एका वाड्यात थांबून भगवान श्रीहरीला म्हणताहेत, ''देवा, काय आपल्याजवळ ही विलक्षण योगमाया शक्ती आहे. प्रत्येक वाड्यात आहातच आपण!. मी परीक्षा पाहण्याकरीता आज संबंध दिवस फिरतो आहे पण आपण कुठे नाही असे नाही''. समोरचं साकार रूपही सर्वव्यापी आहे, असू शकतं हे भगवंताने दाखवलेलं आहे. निर्गुण निराकार, आत्मस्वरूप तर सर्वव्यापी आहेच आहे पण हे सगुणरूप सुद्धा सर्वत्र आहे. भगवान म्हणाले, ''धर्म नुसता सांगण्याकरिता मी आलेलो नाही तर आचरण करून दाखवण्याकरिता मी आलेलो आहे. मला सगळं करावं लागतं. राजधर्म आहे, क्षत्रियधर्म आहे, सर्व स्नानसंध्यादिक शास्त्रीय कर्मही करायची. त्याचप्रमाणे क्षत्रियधर्माप्रमाणे साम, दाम, दंड, भेद सगळं आम्हाला करावं लागतं. सोडून कसं चालेल? आणि आश्चर्य सांगतात शुकाचार्य महाराज, प्रत्येक वाड्यामधे नारदांची पूजा केल्याशिवाय देवाने त्यांना सोडलं नाही. ऋषींना अत्यंत विस्मय निर्माण झालेला आहे. मनुष्यरूप धारण करून भगवान मृत्युलोकावर आलेले आहेत. सोळाहजार स्त्रियांच्याबरोबर त्यांचा गृहस्थाश्रम झालेला आहे. हे नारदांनी प्रत्यक्ष दिव्य कृष्णचरित्र पाहिलेलं आहे. त्यांच्या मनात श्रद्धा, आदर का राहणार नाही? ते तर मूळ भक्तच होते.पण हे प्रत्यक्ष चरित्र पाहूनही तो आदरभाव वाढलेला आहे. कृष्णांची दिनचर्या प्रसंगाने आचार्य सांगताहेत.

अथोषस्युपवृत्तायां कुक्कुटान् कूजतोऽशपन्।
गृहीतकण्ठयः पतिभिर्माधव्यो विरहातुराः ।।१०.७०.१।। श्री. भा.

पहाटेच्या वेळी कोंबडा ओरडल्याबरोबर श्रीकृष्णांनी उठावं लगेच.

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ।।६.१७।। भ.गी.

हा उपदेश करणारे जे आहेत. आहार, विहार, स्वप्न, झोप, जागरण सगळं नियमित पाहिजे. उठल्याबरोबर आचमन करून ब्राह्ममुहुर्तावर त्यांनी आत्मस्वरूपाचं ध्यान करावं. एक अद्वितीय अशाप्रकारचा आत्मा आहे. तोच मी आहे, आनंदरूप मी आहे. जग सगळं आत्मचिंतनात विसरून जायचं आहे. नंतर शौचमुखमार्जन करून स्नान करावं. वस्त्र धारण करून संध्यावंदन करून अग्निमधे हवन केलेलं आहे. कण्वशाखेचे होते म्हणतात भगवान.सूर्योदयापूर्वी हवन केलं जायचं असं सांगतात. देवाची पूजा करावी. देव, ऋषी, पितर यांचं तर्पण करावं. श्रीकृष्णांचं अग्निहोत्र होतं. प्रत्येकाचं अग्निहोत्र निराळं. वसुदेवाचं वेगळं, प्रद्युम्नाचं वेगळं. प्रत्येकाकडे अग्निची सेवा आहे. यादवांचं तेज कधीही कमी होत नव्हतं, याचं कारण अग्नि, सूर्य या देवतांची नित्य उपासना चालू असायची. त्याच्यानंतर निमंत्रित ब्राह्मणांना गाईंचं दान करावं. उत्तम वस्त्रं त्या गाईंच्या अंगावर घातलेली असायची. त्यानंतर वस्त्रं, अलंकार धारण करून राजसभेमधे जावं. राजसभेमधे जाण्यापूर्वी काही मंडळी जरूरीच्या कामाकरता यायची. राजसभेमधे निर्णयाला वेळ लागणार म्हणून या वेळेला भेटून लगेच निर्णय घ्यायला काही मंडळी यायची. सभेमधे उग्रसेन राजा मुख्य असायचा. त्याच्या बाजूलाच असलेल्या एका सिंहासनावर भगवान गोपालकृष्ण बसायचे. त्या सभेमधे गायन, वादन चाललेलं आहे. विदूषक लोकांचं मनोरंजन करताहेत. काही इतिहासज्ञ पूर्वीच्या राजांचा इतिहास सांगताहेत. मोठी सभा आहे ती.

त्याठिकाणी थोड्या वेळाने एक राजदूत आलेला आहे. त्याने द्वारपालाला सांगितलं, ''कृष्णांच्या भेटीकरता मी मुद्दाम लांबून आलो आहे. मगध देशातील पाटण्याहून आलो आहे.''. श्रीकृष्णांना नमस्कार करून त्याने बोलायला सुरवात केली, ''जरासंध हा सैन्य घेऊन दिग्विजयाकरता बाहेर पडला होता. सर्व राजांना त्याने जिंकलेलं आहे आणि त्यांना आपल्या कैदेमधे ठेवलेलं आहे. वीसहजार आठशे राजांना एका मोठ्या किल्ल्यामधे कैदेत ठेवलेलं आहे. जे नम्र न झालेले खंडणी न देणारे, युद्धाला उभे राहिलेले अशा सर्व राजांना जिंकलेलं आहे. त्या राजांनी मला आपल्याकडं पाठवलं आहे आणि विनंती केली आहे की ''भगवंता, आम्हाला या संकटातून आपण मुक्त करा. आपल्याशिवाय या जरासंधाच्या कारागृहातून आम्हाला सोडवणारा दुसरा कुणी नाही. जरासंधाने आम्हाला तुरूंगात टाकलं ही आपली कृपा आम्ही समजतो. सर्व ऐश्वर्य भोगत असताना आपलं

स्मरणसुद्धा आम्हाला झालं नाही. आज मात्र आम्ही आपल्याला शरण आलो आहोत. आपण या संकटातून आम्हाला मुक्त करा''. असा निरोप त्या दूताने सांगितला. ते ऐकून घेतलं भगवंताने. इतक्यात देवर्षी नारद आकाशमार्गाने त्या सभेमधे आले. अत्यंत तेजस्वी असे नारद महर्षी त्याठिकाणी आल्याबरोबर भगवान उठले, त्यांच्या पायावर मस्तक ठेवलं, त्यांची पूजा केली आणि एका मोठ्या आसनावर त्यांना बसवलं. भगवान विचारताहेत, ''काय नारदमहर्षी,

अपि स्विदद्य लोकानां त्रयाणां अकुतोभयम्।
ननु भूयान् भगवतो लोकान् पर्यटतो गुणः ।।१०.७०.३५।। श्री. भा.

ऋषीमहाराज, त्रैलोक्यामधे सर्व मंडळी सुखी आहेत ना? कुणी संकटांत पडलं नाही ना? आपण सर्व त्रैलोक्यामधे फिरत असता. एक आपल्याला विचारतो, पांडवांची भेट अलिकडे आपली झाली होती काय? त्यांची स्थिती काय आहे?'' नारद म्हणाले, ''पांडवाचा निरोप सांगायलाच मी आलो आहे. धर्मराजांना राजसूय यज्ञ करण्याची इच्छा आहे. यज्ञांचा हा राजा आहे. 'पारमेष्ठ्यकामः' ब्रह्मलोकामधे ब्रह्मदेवांच्याजवळ रहायला मिळावं या इच्छेने हा राजसूय यज्ञ आपल्याकडून व्हावा असं धर्मराजांना वाटतंय आणि आपण येऊन हे कार्य पार पाडावं. आपल्या नेतृत्वाखाली हा राजसूय यज्ञ व्यवस्थितपणे होईल अशी त्यांची खात्री आहे. म्हणून आपल्या कानावर घालण्याकरता मला त्याने पाठविलेलं आहे. त्याची इच्छा आपण पूर्ण करा. त्रैलोक्यातून सर्व देव, सर्व राजे सगळे त्या यज्ञामधे येतील. आपलं दर्शन सगळ्यांना होईल. धर्मराजाची इच्छाही पूर्ण होईल.

दोन कामं एकदम आलेली आहेत. राजसूय यज्ञाला येण्याचं धर्मराजाचा आमंत्रण घरचंच होतं. अत्यंत प्रिय तो धर्मराज होता. आणि दुसरा त्या राजांचा निरोपही तातडीचा होता. आता काय करायचं? त्यांना सगळं माहित होतं. पण उद्धवजी मोठे राजनितीज्ञ आहेत. त्यांनाही मान दिला पाहिजे. म्हणून भगवान श्रीहरी म्हणाले, ''उद्धवजी कोणतं काम आधी करावं सांगा. आपण मोठे राजनितीज्ञ आहात. तुमचा सल्ला आम्हाला यावेळेला पाहिजे''.उद्धवजी म्हणाले,

यदुक्तमृषिणा देव साचिव्यं यक्ष्यतस्त्वया।
कार्यं पैतृष्वसेयस्य रक्षा च शरणैषिणाम् ।।१०.७१.२।। श्री. भा.

''देवर्षी नारदांनी आपला जो आत्तेभाऊ आहे धर्मराज याची विनंती आपल्याला निवेदन केली. राजसूय यज्ञ करण्याकरता आपलं सहाय्य त्याला पाहिजे आहे. हेही काम श्रेष्ठ आहे.

तुरुंगात पडलेले राजे आपल्याला शरण आलेले आहेत. त्यांचं रक्षण करणं हेही आपलं कर्तव्य आहे. राजसूय यज्ञ करण्याचा अधिकार त्यालाच आहे जो सर्व भूमंडळ जिंकून सम्राट झालेला आहे. तेव्हा आपण तिथे चला. धर्मराजाला सांगून चारी दिशांना सैन्य पाठवा. त्यांच्या बंधूंना पाठवा आणि सर्व राजांना जिंकल्यानंतर मग राजसूय यज्ञाला आरंभ करा. त्या राजेलोकामध्ये जरासंध येणारच की. त्यालाही जिंकल्याशिवाय राजसूय यज्ञ करता येणार नाही. अशी दोन्ही कामं ह्या दृष्टीने करता येतील. परंतु जरासंध हा सहजासहजी पराभूत होणार नाही. अत्यंत पराक्रमी आणि सामर्थ्यवान तो आहे. दहा हजार हत्तींचं सामर्थ्य त्याला आहे असं म्हणतात. भीम त्याच्याबरोबर द्वंद्वयुद्ध करायला योग्य आहे. भीमाची शक्तीही मोठी आहे. तेव्हा असं करा आपण, भीम आणि अर्जुनाला घेऊन ब्राह्मणवेषामध्ये मध्यान्हकाली जरासंधाकडे जावं. तो जरासंध कसाही वागेना, पण त्याचा एक मोठा नियम आहे. मध्यान्हकाली जो ब्राह्मण अतिथी घरी येईल त्याची जी इच्छा असेल ती तो पूर्ण करतो. त्यावेळी त्याला गाठा आणि युद्ध भिक्षा मागून घ्या. भीम आणि जरासंधाचं युद्ध तुमच्या दृष्टीसमोर झालं म्हणजे जरासंधाचा नाश होईल''. सर्वांनाही हा सल्ला पसंत पडलेला आहे.

भगवान श्रीकृष्णांनी प्रथम आपल्या सर्व स्त्रियांना त्या इंद्रप्रस्थ नगराला पाठवून दिलं . हजारो रथ निघालेले आहेत. तिथे जाऊन प्राथमिक व्यवस्था बघायची. चारी बंधू चार दिशांना जाऊन दिग्विजय करून पुष्कळ धन घेऊन येतील. जरासंधाला त्यांनी जिंकलं असलं तर ठीक नाहीतर आम्ही तिघे जाऊन त्याचा नाश करून येऊ असं भगवंतांनी ठरवलं. त्या राजदूताला निरोप सांगितला की राजेहो लवकरच आम्ही येऊ आणि जरासंधाच्या कारागृहातून तुम्हाला मुक्त करू. काळजी करू नका. राजदूताने येऊन तो निरोप सांगितला. कृष्णदर्शनाची आस मनात धरून ते राजे लोक वाट पाहू लागले.

प्रवास करीत करीत श्रीकृष्ण परमात्मा त्या इंद्रप्रस्थनगराजवळ पोचलेले आहेत. उपाध्यायांना बरोबर घेऊन धर्मराज गावाबाहेर सामोरे आलेले आहेत. वाद्यांचा घोष चाललेला आहे. धर्मराजाला कृष्णदर्शनाने अत्यंत आनंद झाला. कितीतरी दिवसांनी भेट झाली होती. प्रेमाने भेटले एकमेक. नेत्रांतून अश्रूधारा वाहताहेत. शरीराचंही भान धर्मराजाला नाहीये. भीमानेही भेट घेतलेली आहे. अर्जुन, नकुल, सहदेव सगळ्यांनी भेट घेतली. प्रेमाश्रू सगळ्यांच्या नेत्रातून वाहताहेत. कृष्णदर्शन म्हणजे सगळं विसरून जायला व्हायचं, देहाचं भान नाही मग संसार कसला ? भगवंताने सर्व वृद्ध

मंडळींना नमस्कार केलेला आहे. सर्वजण स्तुती करताहेत. वाद्य वाजताहेत, पुष्पवर्षाव होतो आहे. पायघड्या घातलेल्या आहेत. आणि त्या मार्गाने धर्मराज भगवान श्रीकृष्णांना राजवाड्यात घेऊन आलेले आहेत. श्रीकृष्ण आपल्या नगरामधे आलेले आहेत हे कळल्याबरोबर सर्व स्त्रीपुरूष आपल्या वाड्याच्या दरवाज्यामधे, रस्त्यामधे उभे राहिलेले आहेत. सर्व मंडळींनी श्रीकृष्णांचा जयजयकार केला. कुंतीच्या जवळ आले भगवान. ''आत्याबाई आलो बरं''. तिला नमस्कार केला. तीही उठून उभी राहिली. ''ये बाबा कृष्णा बरं झालं तू आलास''. समाधान झालेलं आहे. नंतर त्या कुंतीने आपल्या सगळ्या सुनांना, द्रौपदी आणि सुभद्रेला सांगितलं. ''कृष्णपत्नी आपल्या यज्ञाकरता आलेल्या आहेत. त्यांची सगळी व्यवस्था ठेवा. खाण्यापिण्याची, राहण्याची. काही कमी पडू नये इकडं लक्ष द्या तुम्ही''. धर्मराजाने सगळ्यांची व्यवस्था उत्तम केलेली आहे. खांडववन अग्निला दिलेलं आहे, त्याचवेळेला. मयासुराला मुक्त केले. त्याने धर्मराजाच्या राजवाड्यात मयसभा बांधून दिली. काही महिने गोपालकृष्णांचा निवास झालेला आहे.

एके दिवशी राजसभेमधे गोपालकृष्ण बसलेले आहेत. सर्व मंडळी आहेत. आणि धर्मराज उठून उभे राहिले आणि त्यांनी हात जोडून प्रार्थना केली

क्रतुराजेन गोविन्द राजसूयेन पावनीः।
यक्ष्ये विभूतीर्भवतस्तत् सम्पादय नः प्रभो ।।१०.७२.३ ।। श्री. भा.

''हाच क्रतुराजा म्हणजे यज्ञांचा राजा राजसूय यज्ञ. हा यज्ञ करून आपल्या ज्या सगळ्या दिव्य विभूती आहेत, देव वगैरे त्यांना तृप्त करावं अशी माझी इच्छा आहे. तेवढी आपण पूर्ण करा. आपली सेवा निरंतर करणारे जे आहेत त्यांच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात, देवा आपल्या कृपेनं.

तद् देवदेव भवतश्चरणारविन्द
सेवानुभावमिह पश्यतु लोक एषः।
ये त्वां भजन्ति न भजक्त्युत वोभयेषां।
निष्ठां प्रदर्शय विभो कुरुसृञ्जयानाम् ।।१०.७२.५ ।। श्री. भा.

आपली सेवा करणारे जे भक्त आहेत, त्यांच्यावर आपली कृपा कशी होते. आपल्या कृपेचं सामर्थ्य काय आहे हे सर्व लोकांनी पहावं म्हणून माझी इच्छा आहे. माझा यज्ञ पार पाडा असं म्हणत नाही. आपल्या कृपेने भक्तांचं सर्व कार्य कसं सिद्ध होतं, फलद्रूप होतं हे सर्व लोकांना समजावं. आपलं भजन करणारे आणि न करणारे या लोकांना काय फळं मिळतात हेही लोकांनी

पहावं''. अशी प्रार्थना केली. भगवान सांगतात, ''राजा चांगली इच्छा आहे तुझी. यामुळे तुझी कीर्ति सर्वत्र पसरणार आहे. हा यज्ञ म्हणजे ऋषींना, पितरांना, देवतांना, मित्रमंडळींना सर्वांना आनंद देणारा आहे. पण अगोदर पृथ्वीवरच्या सर्व राजांना जिंकलं पाहिजे. आणि मग हा यज्ञ करता येईल. तुझे चार बंधू आहेत ना? त्यांना चारी दिशांना पाठवून दे. मोठे पराक्रमी आहेत. ते सर्व राजांना जिंकून तुला पुष्कळ द्रव्यही आणून देतील. सहदेवाला दक्षिण दिशेला पाठवलं. पश्चिमेला नकुलाला पाठविलं, पूर्वेला भीमाला पाठविलं आणि उत्तरेला सव्यसाची अर्जुनाला पाठवलेलं आहे.

थोड्याच दिवसात सर्वही राजांना जिंकून पुष्कळ द्रव्य बरोबर घेऊन ते चौघेही बंधू प्राप्त झाले. त्यांनी सांगितलं, जरासंधाला मात्र आम्ही जिंकू शकलो नाही. त्याचा पराजय करू शकलो नाही. हे समजलं. उद्धवजींनी सुचवल्याप्रमाणे श्रीकृष्ण, अर्जुन आणि भीम यांनी ब्राह्मण वेष घेतलेला आहे. रूद्राक्षाच्या माळा घातलेल्या आहेत. भस्म लावलेलं आहे. आणि मध्यान्हकाली जरासंधांच्या वाड्यामधे ते आलेले आहेत. जरासंध हा मोठा अतिथीभक्त होता. ''या, या महाराज, कुठून आला आपण?'' त्यांची पूजा केली. त्याने त्यांच्याकडे पाहिलं. वेष तर ब्राह्मणाचा आहे पण अंग पाहिलं तर शरीरावर मोठ्या मोठ्या जखमांचे वण आहेत. आणि धष्टपुष्ट शरीर आहे. हे क्षत्रिय असले पाहिजेत. पण दिसतात ब्राह्मण. कशाला आपण संशय घ्यायचा म्हणाला. त्याने विचारलं, ''काय इच्छा आहे आपली? आपण मध्यान्हकाली आलेले अतिथी साक्षात विष्णुस्वरूप आहात. तुम्हाला काय जेवायचं आहे का आणखी काही इच्छा आहे?'' वाटेल ते मागा.

ददामि आत्मशिरोऽपि वः ।।१०.७२.२७।। श्री. भा.

माझं मस्तक जरी तुम्ही तोडून मागितलं तरी आत्ता मी ते देतो. भगवान सांगतात –

युद्धं नो देहि राजेन्द्र द्वन्द्वशो यदि मन्यसे ।।१०.७२.२८।। श्री. भा.

युद्धाकरता आम्ही आलो म्हणाले. जेवण्याकरता नाही. परिचय करून दिला. हा कुंतीचा मुलगा भीमसेन आहे. त्याचा कनिष्ठ बंधू हा अर्जुन आहे. आणि यांचा मामेभाऊ कृष्ण मी आहे. ज्याला तू शत्रू समजतो आहेस. ऐकलं जरासंधाने. हसला तो मोठ्याने. तू आलास होय म्हणाला. हे पहा कृष्णा, युद्धातून पळून जाणाऱ्या तुझ्यासारख्या भित्र्याबरोबर मला युद्ध करायचं नाही. आमच्या भीतीनेच तू समुद्रात जाऊन राहिलास ना? हा अर्जुन माझ्या बरोबरीचा नाही. लहान मुलगा आहे. भीम मात्र माझ्या बरोबरीचा आहे. त्याच्याबरोबर द्वंद्वयुद्ध करायला मी तयार आहे



म्हणाला. भगवान तसंच ठरवून आले होते आणि जरासंधानेही तसंच कबूल केलं. भीमाला एक मोठी गदा दिली जरासंधाने, आपण एक घेतली आणि दोघे बाहेर मोकळ्या जागेमधे गदायुद्ध करण्याकरता आले. दोघांचंही कौशल्य आहे. गदा तुटून गेल्या. मग कुस्ती चाललेली आहे. द्वंद्वयुद्ध चाललेलं आहे. संध्याकाळपर्यंत रोज असं युद्ध चालायचं. संध्याकाळ झाली की युद्ध बंद होई. कृष्ण, अर्जुन, भीम ह्यांनी राजवाड्यामधे राहावं. जरासंधाने भीमाच्या अंगाला तेल लावावं, मालिश करावं, स्नान घालावं. सर्व मंडळींनी एकत्र जेवण करावं. संध्याकाळी वाड्यात आल्यावर शत्रुत्व वगैरे काही नाही. अगदी मित्राप्रमाणे बोलणं-चालणं, हास्य-विनोद सर्व करावं. दुसरे दिवशी सूर्योदय झाल्याबरोबर जरासंध एकाबाजूला, भीम एकाबाजूला आणि युद्ध सुरू होई. सत्तावीस दिवस झाले आणि भीम दमला. रात्री त्याने गोपालकृष्णांना सांगितलं, ''मी काही जरासंधाला जिंकू शकत नाही. माझी शक्ती सगळी संपलेली आहे. त्यावेळी श्रीकृष्णांनी सांगितलं, घाबरू नकोस त्याचा नाश कसा करायचा ते मी तुला उद्या सांगेन''.

पार्थमाप्याययन् स्वेन तेजसाचिन्तयद्धरिः ।।१०.७२.४२।। श्री. भा.

आपलं स्वतःचं तेज श्रीकृष्णांनी भीमाच्या शरीरात प्रविष्ट केलं. आपली शक्ती त्याला दिली. आणि आश्वासन दिलं. ''उद्या तुझ्याहातून जरासंध मारला जाईल. काही घाबरू नकोस''. दुसरे दिवशी युद्धाला सुरवात झाली. श्रीकृष्णांनी एक झाडाचं पान हातामधे घेतलं आणि फाडून दाखवलं. त्याला पाडायचं, त्याच्या शरीराचे दोन तुकडे करायचे आणि दोन्ही बाजूला फेकून द्यायचे. अशी सूचना त्याला केली. भीमाचं सामर्थ्य मोठं होतं. युद्धाचं कौशल्य त्याच्याकडे कमी होतं. एकदम भीमाने जरासंधाला खाली पाडलं, त्याच्या एका पायावर आपला पाय ठेवला आणि दुसरा पाय ओढून एखादं वस्त्र फाडावं तसं त्याचं शरीराचे दोन भाग केले आणि ते दोन बाजूला फेकून दिलेले आहेत. दोन तुकडेझाल्यामुळे तो जरासंध मृत झालेला आहे. जरासंधाच्या जन्माचाही

वृतांत असाच आहे. हा जरासंध ज्यावेळी जन्माला आला, गर्भातून बाहेर पडला, त्यावेळेला दोन तुकड्येच होते म्हणे. त्याच्या आईने घाबरून ते दोन तुकडे राजवाड्याबाहेर टाकून दिले. जरा नावाची एक यक्षिणी त्यावेळी तिथं होती. तिने ते दोन तुकडे जोडले. त्याला जिवंत केले आणि पुन्हा राजवाड्यात आणून दिलं. जरासंधाचा नाश झाल्याबरोबर कृष्णार्जुनांनी भीमाचं अभिनंदन केलं. त्याला आलिंगन दिलं. आज फार मोठं काम केलंस. मोठा पराक्रम केलास अशी शाबासकी त्याला दिली. नंतर गोपालकृष्णांनी जरासंधाच्या मुलाला सहदेवाला राज्याभिषेक केला आणि त्याला जरासंधाने बंदिवान केलेल्या राजांना मुक्त करायला सांगितलं. सर्व राजे मुक्त होऊन कृष्णदर्शनाकरता आलेले आहेत. आपण जे मनामधे ध्यान करत होतो. त्या भगवंतांचं आज प्रत्यक्ष दर्शन झालं. सर्व राजे लोकांनी भगवंताला साष्टांग नमस्कार केला. ते म्हणताहेत,

नमस्ते देवदेवेश प्रपन्नार्तिहराव्यय।
प्रपन्नान् पाहि नः कृष्ण निर्विण्णान् घोरसंसृतेः ।।१०.७३.८।। श्री. भा.

''आम्ही आपल्याला शरण आलेलो आहोत. आमचं रक्षण करा. या घोर संसार दुःखापासून आमचं रक्षण करा. जरासंधाबद्दल आम्हाला राग वाटत नाही. त्याच्यामुळे आम्हाला आपलं दर्शन झालं ना? हा त्याचा मोठा उपकार आमच्यावर झालेला आहे. पूर्वी राज्यमदामधे आमचं लक्ष गुंतून गेलेलं असताना, कुठेही दुसरीकडे आमचं लक्ष गेलं नाही. धर्माकडे नाही. धार्मिक श्रेष्ठ पुरूषाकडे नाही. आणि आपल्याकडे तर नाहीच नाही. जरासंधाने आम्हाला बंधनात टाकलं. मग मात्र आमचं लक्ष आपल्याकडे गेलं. आपलं स्मरण आम्हाला झालं.

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने।
प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः।

नम्र झालेल्या शरणागतभक्तांचे सगळे क्लेश दूर करणारे आपण आहात. आपल्याला आम्ही नमस्कार करतो''. त्यांची स्तुती भगवंताने ऐकली आणि सांगितलं, ''राजेहो, तुमच्या चित्तामधली माझी भक्ती दृढ राहिल. ऐश्वर्याचा मद होतो ह्याचा अनुभव तुम्ही घेतलेला आहे. पुष्कळ मोठे मोठे राजे झाले. रावण झाला, नरकासुर झाला, कंस झाला. या ऐश्वर्याच्या मदानेच त्यांचा नाश झालेला आहे. हा सगळा विचार तुम्ही करा. प्रजाजनांचं धर्माने रक्षण करा. यज्ञयाग वगैरे करा आणि निरंतर माझं चिंतन करा. म्हणजे तुमचा उद्धार होईल''. मग नोकरांना सांगून त्या सर्वही राजांना मंगलस्नान घातलेलं आहे. सहदेवाला सांगून त्यांचा आदरसत्कार केलेला आहे. वस्त्रं, अलंकार वगैरे

त्या सहदेवाने, जरासंधाच्या मुलाने सर्व राजांना दिलेले आहेत. भोजन झालेलं आहे आणि प्रत्येक राजाला दिव्य रथ देऊन त्यांची पाठवणी केलेली आहे.ही जी योजना भगवंताने केली त्याचं एक विशेष कारण आहे. ते सर्व राजे लोक भगवंताबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारे झाले. इतके राजे लोक हे श्रीकृष्णांचे भक्त झालेले आहेत आणि श्रीकृष्णांच्या सौजन्याबद्दल सतत जाणीव त्यांच्या मनामध्ये आहे. पुढे ज्या वेळेला कौरव पांडवांचं युद्ध निश्चित झालेलं आहे, त्यावेळेला धर्मराज तर बारा वर्षे वनातच होते. एकदम युद्धाची तयारी करायची कशी? सैन्य कुठून आणायचं, द्रव्य कुठून आणायचं? दुर्योधन तर तेरा वर्षांपर्यंत युद्धाची तयारी करतोय. राज्य ताब्यामध्ये आहे. कोष ताब्यामध्ये आहे. नाना प्रकाराने त्याने सैन्याची जमवाजमव केली होती. पण धर्मराजाला इतकं एकदम सैन्य मिळालं कसं? तर भगवंताने ही योजना अगोदरच करून ठेवली होती. वीसहजार आठशे लहानमोठे राजे कृष्णाचे इतके अंकीत झालेले आहेत की कृष्णभगवान पांडवांच्या बाजूला आहेत हे समजल्याबरोबर ते राजे सर्व सैन्य घेऊन पांडवांच्या गोटात दाखल झालेले आहेत. नंतर ते सर्व राजे लोक भगवंताला नमस्कार करून आपापल्या राजधानीमधे परत आले आणि श्रीकृष्णांच्या दयेचं वर्णन ते आपल्या प्रजाजनांना करू लागले.

कृष्णार्जुन आणि भीम जरासंधाचा नाश करून इंद्रप्रस्थाला परत आलेले आहेत. आता यज्ञ व्हायचा आहे. नगराबाहेर येण्याबरोबर तिघांनीही आपापले शंख वाजवलेले आहेत. तो आवाज ऐकल्याबरोबर धर्मराजाला समजलं की हे कृतकार्य करून म्हणजे जरासंधाचा नाश करून हे आलेले आहेत. भगवंतांची प्रार्थना धर्मराज करताहेत, ''परब्रह्म परमात्मा आपण आहात. कोणत्याही कर्माने आपलं तेज वाढत नाही किंवा कमी होत नाही. नित्यमहिमा आपला आहे. स्वाभाविक आहे. आपल्या भक्तांचं संरक्षण आपल्याकडून निरंतर चालू आहे''.

आता यज्ञाकरता तयारी सुरू झाली. ऋत्विज मंडळींना, सगळ्या ऋषींना निमंत्रणं गेली. मोठे मोठे ब्रह्मज्ञानी ऋषि आहेत. प्रतिसृष्टी करण्याचे सामर्थ्य असलेले विश्वामित्र आहेत. व्यास आहेत, भरद्वाज, सुमंतु, वसिष्ठ, गौतम, च्यवन, वामदेव, जैमिनी, पराशर, गर्गाचार्य सगळ्या मोठमोठ्या ऋषींना आमंत्रित केलेलं आहे. द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कृपाचार्य, धृतराष्ट्र, विदूर, दुर्योधनादि सगळी मंडळी हस्तिनापुराहून यज्ञाकरता आलेली आहेत. ब्राह्मणांनी सुवर्णाच्या नांगराने ती यज्ञभूमी नांगरली आहे. सर्व यज्ञकुंडवगैरे घातलेली आहेत. धर्मराजाला यज्ञदीक्षा त्यांनी दिली. यज्ञाला आरंभ झालेला आहे. त्या यज्ञामधे सगळी भांडी सोन्याची होती म्हणतात! हल्लीची पांढरी

भांडी तिथं नव्हती. अलोट संपत्ती भारतवर्षामधे होती. सुवर्णभूमी म्हणजे नुसती प्रशंसा नाहीये. किती नेलं तरी आणखी आहेच. सर्व राजांना सहकुटुंब, सहपरिवार येण्याचं आमंत्रण होतं. कृष्णभक्त असलेल्या धर्मराजाचा यज्ञ होणार आहे. आणि त्याठिकाणी भगवान गोपालकृष्ण प्रत्यक्ष असणार आहेत, त्यांचंही दर्शन होईल या अपेक्षेने सर्वही लोक तिथं आलेले आहेत. नंतर सोमरस काढायचा दिवस आलेला आहे. त्यादिवशी असा एक नियम आहे की यज्ञाकरता जी जी मोठी मोठी मंडळी आलेली आहेत, त्यांची पूजा यजमानाने करायची. आता योग्य आणि मान्यवर सगळेच आहेत. मोठे मोठे राजे आहेत, देव आहेत, ऋषी आहेत त्यांची पूजा करायची. पण अग्रपूजा कोणाची करायची? आरंभ पूजेचा कोणापासून करायचा? हा प्रश्न निर्माण झाला. त्याचाच विचार चाललेला आहे. लोकशाहीमधे निर्णय लवकर होणे म्हणजे फार कठीण आहे. जास्ती मतांनी झाला म्हणजे एकमताने झाला, सर्वांनी मिळून केला असं समजायचं. देवांची पूजा करा, ऋषींची पूजा करा, या अमक्या राजाची पूजा करा. चर्चा चाललेली आहे. थांबलं ते काम! यज्ञ थांबला ना! सहदेव उठून उभा राहिला आणि त्याने बोलायला सुरूवात केली.

अर्हति ह्यच्युतः श्रैष्ठ्यं भगवान् सात्वतां पतिः
एष वै देवताः सर्वा देशकालधनादयः ।।१०.७४.१९ ।। श्री. भा.

सहदेव सांगतो, ''मंडळी हो, कसला विचार तुम्ही करता आहात? पूजेला आरंभ कोणापासून करावयाचा? भगवान गोपालकृष्ण इथे आहेत. त्यांचीच अग्रपूजा तुम्ही करा. त्यांची पूजा करून तुम्ही सुरूवात करा. सर्व देवतारूपी, सर्व विश्वरूपी हे आहेत. ह्यांची पूजा केली म्हणजे सर्व विश्वाची पूजा केल्यासारखं आहे. मागाहून कोणाची पूजा करा अगर करू नका''. सहदेवाच्या या भाषणाने सर्वांना आनंद झाला. कुणीतरी असा बोलणारा पाहिजे असतो. सर्वांनी टाळ्या वाजवून श्रीकृष्णांचा जयजयकार केलेला आहे. सर्वांची संमती आहे हे समजून भगवान गोपालकृष्णांना आणून सभेमधे सिंहासनावर बसवलेलं आहे. सम्राट धर्मराज ज्याने सर्व पृथ्वी जिंकलेली आहे त्याने भगवंतांचे पाय धुतले. पीतांबर, अलंकार सर्व त्यांना अर्पण केलं. पूजा करताना धर्मराजाच्या नेत्रातून अश्रू ओघळताहेत. प्रेमाने कृष्णरूपाकडे पहातो आहे. पूजा समाप्त झाल्याबरोबर सर्व लोकांनी भगवंताला नमस्कार केलेला आहे. जयजयकार केलेला आहे. तेवढ्यात एक विघ्न निर्माण झालं. चेदिराज शिशुपाल तिथे होता. त्यालाही आमंत्रण होतं. कृष्णांची अग्रपूजा केली, सर्वजण कृष्ण गुणांचं वर्णन करताहेत हे पाहून त्याला अतिशय राग आलेला आहे. उठून उभा

राहिला आणि त्याने बोलायला आरंभ केला. ''ऐका माझं म्हणणं लोकहो. काल मोठा कठीण आलेला आहे. हा लहान मुलगा सहदेव काय बोलला, कृष्णाची पूजा करू आणि तुम्ही मोठी मोठी मंडळी, ज्ञानी मंडळी तुम्ही याला संमती दिली? किती श्रेष्ठ मंडळी इथे आलेली आहेत, किती ज्ञानी ऋषी आहेत. मोठे पराक्रमी राजे आहेत. भीष्माचार्य आहेत, द्रोणाचार्य आहेत. या सर्वांना सोडून आणि एका गवळ्याच्या मुलाची पूजा तुम्ही करता? तुम्हाला काही कळलं नाही? हा कसा आहे''.

वर्णाश्रमकुलापेतः सर्वधर्मबहिष्कृतः।
स्वैरवर्ती गुणैर्हीनः सपर्यां कथमर्हति ।।१०.७४.३५।। श्री. भा.

गोपालकृष्ण सिंहासनावर स्वस्थ बसलेले आहेत. कोल्ह्याने ओरडायला सुरूवात केली म्हणून सिंह काय त्याला उत्तर देतो काय? श्रीकृष्णांनी त्याच्या आईला वचन दिलं होतं, याचे शंभर अपराध मी क्षमा करीन. पुढं नाही. शिशुपाल म्हणतोय, ''काही धर्माचरण नाही, वर्णाश्रमधर्म नाही आणि याची पूजा तुम्ही करता? ययाती राजाने यांच्या कुळाला शाप दिलेला आहे की यांना राज्याभिषेक नाही, राज्य नाही. सर्व भूमीचा त्याग करून समुद्रामधे जाऊन हे राहिलेले आहेत''. वाटेल तसा बोलायला लागला, ''कशी पूजा केली तुम्ही? काय म्हणून याची पूजा केली?'' भगवंतांनी काहीही भाषण केलं नाही . भगवंतांची निंदा इतर लोकांना ऐकवली नाही. पांडवही रागावले. यज्ञामधे रक्तपात होण्याची वेळ आली. एकदम आपल्या सिंहासनावरून उठले गोपालकृष्ण, ''थांबा कोणीही गडबड करू नका. बसा जागच्या जागी''. श्रीकृष्णांनी आपलं सुदर्शनचक्र शिशुपालावर सोडलं. त्या चक्राने शिशुपालाचा शिरच्छेद केला. शिशुपाल मरून खाली पडला आणि त्याच्या शरीरातून दिव्य तेज निघून ते कृष्णशरीरात प्रविष्ट झालं. भगवंताचा तीन जन्म द्वेष करणारे जयविजय यावेळेला मुक्त झाले. पुन्हा वैकुंठलोकाला गेले. शिशुपालाचे अनुयायी मंडळी मात्र पळून गेलेली आहेत. यज्ञ समाप्त झालेला आहे.

अवभृथ स्नान झालं. सर्व श्रेष्ठ मंडळींची पूजा केली, सत्कार केला, दानधर्म केलेला आहे. सर्व मंडळी धर्मराजाच्या यज्ञाची, धर्मराजाची आणि कृष्णांची स्तुती करत आपापल्या स्थानाला निघून गेली.

दुर्योधनाला मात्र हे सहन झाले नाही. पांडवांचा उत्कर्ष काही त्याला बघवेना. त्याचं कारण काय म्हणून राजाने विचारलं. धर्मराजाच्या यज्ञामधे श्रीकृष्णांनी वेगवेगळ्या कामावर काही

ठराविक लोकांची नेमणूक केली होती. कोण व्यक्ति कोणतं काम करायला योग्य आहे हे श्रीकृष्णांना बरोबर माहीत होतं.

भीमो महानसाध्यक्षो धनाध्यक्षः सुयोधनः ।।१०.७५.४।। श्री. भा.

स्वयंपाकाच्या कामावर भीमाची नेमणूक केली. भीम या पाकशास्त्रामधे मोठा प्रविण होता. जरी राजा होता तरी या कला त्यांनी शिकलेल्या होत्या. किती अन्न पाहिजे. किती मंडळी आहेत, याचा अंदाज पाहिजे ना. लक्षावधी मंडळी जेवणार रोज. त्यावेळेला अन्न किती तयार करायचं. ते स्वादिष्ट आणि उत्तम प्रकारचं झालं पाहिजे. तो स्वतः स्वयंपाक करत होता असं नाही. हजारो आचारी असतील हाताखाली. पण देखरेख याची आहे. दुर्योधनाला खजिनदार नेमलं. कोषाध्यक्ष. सगळा कोष त्याच्या ताब्यात दिला आणि सांगितलं, ''सगळं द्रव्य तुझ्या ताब्यात आहे सगळा जमाखर्च तू ठेवायचास. यज्ञमंडपातून जेवढी मागणी येईल तितकं द्रव्य पाठवलं पाहिजेस''. ज्योतिषशास्त्रदृष्टीने त्याच्या हातावर काही मत्स्य होता म्हणे, हे यांना सगळं माहित होतं. जितकं द्रव्य तो खर्च करी त्याच्यापेक्षा दुप्पट द्रव्य येऊन पडायचं खजिन्यात. सर्वांचा सत्कार करणं, देखरेख करणं हे काम सहदेवाला दिलं. सर्व सामुग्री संपादन करणं हे काम नकुलाला दिलं. जमलेल्या श्रेष्ठ पुरूषांची पूजा-अर्चा करण्याचं काम अर्जुनाकडे दिलं. ज्ञानी, श्रेष्ठ ऋषिमंडळींचे पाय धुण्याचं काम श्रीकृष्णांनी आपल्याकडे घेतलेलं आहे.

गुरूशुश्रूषणे जिष्णुः कृष्णः पादावनेजने ।
परिवेषणे द्रुपदजा कर्णो दाने महामनाः ।।१०.७५.५।। श्री. भा.

वाढायच्या कामावर द्रौपदीची नेमणूक केली. द्रौपदी काही एकटी वाढत नव्हती एवढ्या लोकांना. पण जेवायला बसल्यानंतर एकदा फिरून यायची. बायका वाढणाऱ्या असल्या आणि पुरूष वाढायला असले म्हणजे फरक लगेच कळून येतो. नको म्हटलं की थांबले पुरूष. ती द्रौपदी इतकी चाणाक्ष होती, नको म्हटलं तरी त्यांना वाढ म्हणायची. लाडू वाढा, जिलबी वाढा, त्याला पाहिजे असायचं. अन्नदान करणारा जो आहे त्याला हे सगळं माहिती पाहिजे. तृप्ती होईपर्यंत अन्नदान झालं पाहिजे आणि कर्णाकडे दानाचं खातं दिलं होतं. मोठा उदार होता तो. यज्ञ करणारा धर्मराज आहे आणि दान करणारा कर्ण आहे. भगवान म्हणाले, ''धर्मराज, तुला हे दानाचं काम जमणार नाही. फार कठीण आहे. मनापासून झालं पाहिजे. दान करताना, माझा पैसा संपतो आहे, इतकं कशाला द्यायचं? हे मनात आलं की संपलं. गेलं ते दान फुकट गेलं. ते कर्णालाच

फक्त जमेल''. अशी मंडळी श्रीकृष्णांनी कामावर नेमली होती आणि यांचही लक्ष सर्वांवर होतंच. त्यामुळे तो मोठा यज्ञ अत्यंत व्यवस्थित आणि निर्विघ्न पार पडलेला आहे. समाप्ती झाली. यजमानाचं आणि बाकीच्या मंडळींचं नदीतीरावर स्नान झालेलं आहे.

उत्तम वस्त्र, अलंकार परिधान करून धर्मराज आपल्या बंधूसह मयसभेमधे सिंहासनावर येऊन बसलेले आहेत. द्रौपदी जवळ आहे. श्रीकृष्ण भगवानही बाजूच्या सिंहासनावर स्वस्थ बसलेले आहेत. धर्मराजाने कौरवांना मुद्दाम आग्रहाने ठेवून घेतलं. ते ही राहिले. एकेदिवशी सभेमधे सर्वजण बसलेले असताना दुर्योधनाला ती सभा पाहाण्याची इच्छा झाली. त्यांच्याकरताही शंभर आसनं ठेवली होती. आपल्या बंधूंना घेऊन त्या सभेमधे दुर्योधन आलेला आहे आणि आता पलिकडे आसनं आहेत त्यांच्यावर जाऊन बसायचं. निघाला तो. त्याला एकदम जमिनीवर पाणी दिसायला लागलं. जमीन असताना पाणी दिसतंय. पाण्यामधे आपली वस्त्रं भिजतील म्हणून त्याने आपली वस्त्रे उचलून घेतली आणि पुढे गेला तर तिथे पाणी नाहीये, जमीनच आहे. तसाच पुढे गेला. पुढे जमीन आहे. वस्तुतः तिथे पाणी होतं. पाण्यावर जमीनीचा आभास निर्माण केला आहे मयासुराने. पलिकडे आसन आहे म्हणून दुर्योधन वेगाने निघाला आणि धाडदिशी पाण्यामधे पडला. भीमसेन, द्रौपदी सगळे हसायला लागले. श्रीकृष्ण काही बोलले नाहीत. आता वैराला सुरूवात झालेली आहे. बरंय म्हणाले, भूमीचा भार दोघांमुळे नष्ट होणार आहे असा विचार करताहेत गोपालकृष्ण. धर्मराज सावरायचा प्रयत्न करताहेत पण भीमसेन, द्रौपदी वगैरे सर्व स्त्रिया हसताहेत. दुर्योधन पडला म्हणून त्याच्याजवळ जाणं त्याची समजूत घालणं, त्याला साहाय्य करणं हे काही नाही. ती वेळच आलेली आहे. अपमान झालेला आहे. सगळे कपडे भिजले. दुर्योधन उठला आणि रागाने लगेच हस्तिनापुराला निघून गेलेला आहे. धर्मराजाला फार खेद झालेला आहे. काय आता हा दुर्योधन करतो कोणास ठाऊक?

शुक सांगतात, राजा, आणखी एक भगवतांचं शौर्य कसं आहे ते तू ऐक. यज्ञामधे शिशुपालाचा वध झाल्यावर त्याची मित्रमंडळी सगळी पळून गेली. शाल्व नावाचा राजा रुक्मिणीस्वयंवराच्या वेळी पण आलेला होता. शिशुपालाचा मित्र होता. त्यावेळेलाही शिशुपालाला काही मिळालं नाही आणि आता तर प्राणच गेले. म्हणून त्याने सर्व राजांसमोर यादवांचा संहार करण्याची प्रतिज्ञा केली. त्यात कृष्णही आलेच. भगवान शंकरांची आराधना त्याने केली. अन्न नाही, पाणी नाही अशा अवस्थेत एक वर्ष तपश्चर्या केल्यावर शंकर भगवान प्रसन्न झाले. देव, असुर, मानव, गंधर्व या सगळ्यांनाही अभेद्य असं विमान त्याने शंकरांना मागितलं. शंकरांनी

मयासुराला असं एक अभेद्य विमान तयार करून शाल्वाला द्यायला सांगितलं. लोखंडाचं अत्यंत दृढ अशा प्रकारचं विमान त्या शाल्व राजाला मिळालं. विमानामधे बसून तो राजा द्वारकेला आला आणि वरून शस्त्रवृष्टी करतोय. गोपालकृष्ण इंद्रप्रस्थाहून अद्यापि परत आले नव्हते. प्रद्युम्न, सांब वगैरे मोठेमोठे यादव होते तिथे. त्यांनी खालून शस्त्रं वर टाकावीत आणि शाल्वाने वरून शस्त्रवृष्टी करावी असं युद्ध चाललेलं आहे. आकाशात असल्यामुळे शाल्व वरचढ ठरू लागला आणि मोठं संकट यादवांसमोर उभं राहिलं. घरंदारं पडायला लागली. प्रद्युम्नाने शाल्व राजाच्या द्युमान नावाच्या प्रधानाबरोबर युद्ध करून त्याचा नाश केला. सत्तावीस दिवस युद्ध चाललेलं आहे. यादवांचा प्रतिकार चालू आहे आणि त्यांनी शाल्व राजाला थोपवून धरलेलं आहे. इतक्यात भगवान कृष्ण तिथे येऊन पोहोचले. त्यांनी आपल्या सारथ्याला दारूकाला सांगितलं, ''हा मोठा मायावी दैत्य आहे. मोठ्या सावधगिरीने रथ चालव.'' शाल्व राजाने पाहिलं भगवान कृष्ण रणभूमीवर आलेले आहेत. त्याने शस्त्रवृष्टी करायला आरंभ केला आणि कृष्णांनीही त्याच्या विमानावर बाणवृष्टी करायला सुरवात केली. त्याचा एक बाण येऊन कृष्णांच्या हाताला लागला आणि त्यांच्या हातातून धनुष्य खाली पडलं. सगळे यादव घाबरले. त्या शाल्वाला तर अतिशय गर्व झाला. तो म्हणाला, ''तू माझ्या परममित्राची भार्या हरण केलीस आणि यज्ञसभेमधे त्याचा नाश केलेला आहेस. आज मी तुझा प्राण घेणार आहे.'' भगवान सांगतात, ''उगाच बडबड कशाला करतोस? काय तुझं पौरूष आहे पाहू या.'' एकदम कृष्णांनी एक गदा त्या विमानावर फेकली. त्या विमानाचे तुकडे झाले आणि ते विमान समुद्रामधे पडलं. शाल्व राजा जमिनीवर उतरलेला आहे. तो मायावी दैत्य होता. युद्ध सुरू असताना एक पुरूष द्वारकेतून आला कृष्णांना काही निरोप सांगायला. तो सांगतोय, ''देवकीने मला पाठवलेलं आहे. शाल्वराजाने तुमच्या पित्याला वसुदेवाला धरून नेलेलं आहे.'' भगवान विचार करताहेत, 'बलराम तिथे आहे आणि शाल्व वसुदेवांना धरून घेऊन गेला?' त्यांना खरं वाटेना. इतक्यात शाल्वाने त्या वसुदेवाला आणलं आणि कृष्णांना तो म्हणाला, ''हा तुझा पिता मी धरून आणलेला आहे. तुझ्यासमक्ष मी याचा आता शिरच्छेद करतो. तुझं सामर्थ्य असेल तर रक्षण कर.'' असं म्हणून त्याने वसुदेवाचा शिरच्छेद केलेला आहे. आणि तो निघून गेला. स्वस्थ बसले भगवान. पण लगेचच त्यांच्या लक्षात आलं की ही राक्षसाची माया आहे. तो दूत दिसेना, वसुदेवाचं शरीर दिसेना. आणि मग मात्र गदा घेऊन धावत येणाऱ्या शाल्वाचं मस्तक भगवंतांनी आपल्या सुदर्शन चक्राने तोडून टाकलेलं आहे. सर्व देवांनी दुंदुभि वाद्ये वाजवून आनंद व्यक्त केला. शिशुपालाचा नाश झाला. त्याचा मित्र शाल्वाचा नाश झाला. पौंड्रकाचा नाश

झाला. मग दंतवक्र जो होता तो हातामधे गदा घेऊन युद्धाला आला. श्रीकृष्णांनी पाहिलं, हा आपला अजून एक शत्रू आहे. श्रीकृष्णांनी आपल्या कौमुदकी गदेने त्याच्या छातीवर प्रहार केल्याबरोबर तो दंतवक्रगतप्राण होऊन पडलेला आहे. त्याच्याही शरीरातून दिव्य तेज बाहेर पडलं आणि कृष्णशरीरामधे प्रविष्ट झालं. जय-विजयांपैकी तो होता. तीन जन्मपर्यंत भगवंताचा द्वेष त्यांनी केला. आणि आता त्यांचा उद्धार झालेला आहे. असे भगवान श्रीहरी गोपालकृष्ण. सामान्य अज्ञानी लोकांना वाटतं, कृष्णांचा पराभव झाला, पळून गेले गोपालकृष्ण, त्यांची शक्ती कमी आहे, पण ते खरं नाही.

कौरव पांडवांचं युद्ध निश्चित झालेलं आहे. दोघांनी आपापलं सैन्य जमवलं. दुर्योधनानं येऊन कृष्णांना विनंती केली. कृष्ण म्हणाले, ''मी युद्धामधे शस्त्र हातात धरणार नाही. नुसता सल्लागार म्हणून येईन.'' दुर्योधन म्हणाला, ''मला सल्लागार पुष्कळ आहेत. तू मोठा पराक्रमी म्हणून तुझ्याजवळ आलो.'' श्रीकृष्णांनी दुर्योधनाला आपली नारायणी सेना दिली. त्याला आनंद झाला. नुसता कृष्ण येऊन काय करणार म्हणाला, सैन्य मिळालं, बरं झालं. अर्जुनही बोलावण्याकरता आला. ''आपण नुसतं माझ्याजवळ येऊन रहा. लढाई करू नका. तुम्ही असला म्हणजे मी विजयी होईन.'' कृष्णांनी कबूल केलेलं आहे. बलरामजींनी मात्र कोणत्याही पक्षात जायचं नाही असं ठरवलं. तीर्थयात्रेचं निमित्त करून ते बाहेर पडले. नैमिष्यारण्यात आले. सगळी तीर्थं पाहून दक्षिणेकडे रामेश्वर आहे, तिरूपती व्यंकटेश आहेत. त्यांचं दर्शन घेऊन ते परत आले. तो भारतीय युद्धाचा अठरावा दिवस होता. रणभूमीवर ते आले आणि पाहताहेत, भीम आणि दुर्योधन हातात गदा घेऊन रागाने एकमेकाकडे पाहताहेत. बलरामजी मधे आले, म्हणाले, ''दुर्योधना, भीमा, तुमचा युद्धामधे जय पराजय काही सांगता येणार नाही. भीमाची शक्ती जास्त आहे. पण दुर्योधनाजवळ गदायुद्धाचं कौशल्य जास्ती आहे. भीमाला काही तेवढं ज्ञान नाही. तेव्हा या युद्धाचा निर्णय होणार नाही तेव्हा कशाला हे युद्ध करता? थांबवा. झालं, सगळं सैन्य मारलं गेलं. सगळे सेनापती गेले. आता तरी समेट करा. प्रेमाने वागा.'' पण त्यांनी काही ऐकलं नाही. तेव्हा ते सोडून देऊन बलरामजी पुन्हा नैमिषारण्यात आलेले आहेत. ऋषिंनी बलरामजींकडून अनेक यज्ञ केलेले आहेत आणि बलरामजींनीही ऋषिंना ज्ञानोपदेश केलेला आहे.

भगवन् यानि चान्यानि मुकुन्दस्य महात्मनः ।।
वीर्याण्यनन्तवीर्यस्य श्रोतुमिच्छामहे प्रभो ।।१०.८०.१ ।।

परीक्षित राजा कृष्णलीला श्रवण करतो आहे. आनंद आहे. मधे काही विचार मनामधे आले तर त्याने शुकदेवांना विचारावं आणि निरसन करून घ्यावं. अश्रद्धा नाही. आणखी भगवंताच्या लीला मला सांगा अशी प्रार्थना परीक्षिताने केल्यानंतर एका मोठ्या भक्ताचं चरित्र शुकाचार्य सांगताहेत.

कृष्णस्यासीत् सखा कश्चिद् ब्राह्मणो ब्रह्मवित्तमः।
विरक्त इन्द्रियार्थेषु प्रशान्तात्मा जितेन्द्रियः ।। १०.८०.६ ।। श्री. भा.

भगवान गोपालकृष्णांचा परममित्र सुदामा हा मोठा ज्ञानसंपन्न आहे, विरक्त आहे, शांत आहे, जितेंद्रिय आहे. गृहस्थाश्रमी तो आहे आणि ईश्वरेच्छेने, याचना न करता जे मिळेल त्याच्यामधे संतोष आहे. श्रीकृष्णांचे अत्यंत प्रेम आहे. सांदिपनी गुरूमहाराजांच्या आश्रमात विद्या शिकण्याकरता बलराम, कृष्ण राहिलेले असताना, सुदामजी त्यांचे सहाध्यायी होते. त्यांची अनासक्त विरक्त वृत्ती प्रथमपासूनच आहे. ज्ञानानंतर जे फळ मिळायचं ते अगोदरच मिळालेलं आहे. गृहस्थाश्रमामधे द्रव्याची आवश्यकता आहे. सुदामजी पहिल्यापासूनच विरक्त आहेत. याचना करायची नाही. संतोष आहे ना. कमी असलं तरी संतोष आहे. नसलं तरी संतोष आहे. हाच अभ्यास आहे. आपल्याला संसारात काहीतरी कमी पडतं आहे ही वृत्ती म्हणजे असंतोषाचे काम आहे. समाधान नाही. केवढी भगवत्कृपा सुदामजींवर आहे. ज्ञानाचं खरं फल मिळालेलं आहे. पण सुदामजींच्या स्त्रीला हे कसं साधावं? यांचा एक अभ्यास झालेला आहे. श्रीकृष्णांची मैत्री आहे. कृष्णप्रेम मनामधे आहे. तेव्हा ज्ञान आहे. आणि सर्व साधनांचं स्वरूप काय आहे, फल काय हे सर्व जाणून त्यांनी तसं आचरण केलेलं आहे. म्हणून भगवंताने त्या रूक्मिणीकडून आलेल्या ब्राह्मणाजवळ बोलताना उद्‌गार काढलेले आहेत.

विप्रान् स्वलाभसंतुष्टान् साधून् भूतसुहत्तमान् ।।
निरहमारिणः शान्तान् नमस्ये शिरसा असकृत् ।।१०.५२.३३ ।। श्री.भा.

जे विप्र अयाचित वृत्तीने जो लाभ होईल त्याच्यामधे संतुष्ट आहेत. साधू आहेत. सर्वांच्या बरोबर सौहार्द भावना धारण करणारे आहेत. निरंहकारी असे जे शांत ब्राह्मण आहेत त्यांना मी शिरसावंदन करतो. वारंवार त्यांना मी वंदन करतो. तसे हे सुदामजी होते. एवढा आपला मित्र मोठा आहे. सर्व विश्वाचा तो अधिपती आहे. नियामक आहे, ईश्वर आहे. पण कधी त्याच्याकडे जावं आपली परिस्थिती सांगावी असं कधीही त्यांना वाटलं नाही. इच्छाच नाही. तो सर्वज्ञ आहे ना.



परमेश्वराजवळ मागण्याची इच्छा या भक्तांना का होत नाही? आणि प्रत्यक्ष असून तशी सोय असताना. तर मागणाऱ्या भक्तांकडे भगवंताचं खरं लक्ष जात नाही. तेवढ्यापुरतं देऊन टाकतो. नेहमी याच्यातच सापडणार तो भक्त. वासना मनामधे वाढत जाणार अधिकाधिक आणि त्यामुळे संसारातून मोकळं होण्याची त्याची योग्यताच राहात नाही. वासनाक्षय करण्याचा प्रयत्नही नाही आणि सारखे भोग भोगण्याचा त्याला खेदही वाटत नाही. आपली एकंदर परिस्थिती चांगली असावी म्हणजे देहाव्यतिरिक्त आत्मा आहे. क्षेत्र–क्षेत्रज्ञ विवेक झाला असं काही म्हणता येत नाही. पण सुदामजींच्या अंतःकरणात मात्र काहीही इच्छा नाही. मित्राची आठवण होत असेल पण त्याच्याकडे जाऊन आपली काही व्यवस्था करून घ्यावी अशी इच्छाच नाही. त्यांची जी पतिव्रता स्त्री आहे तीही त्यांच्या योग्यतेचीच आहे. परंतु आवश्यक जे आहे तेवढ्याकरता याचना करायला काय हरकत आहे. असं तिला वाटत होतं. याचना कुणाजवळ करायची हे ही तिला माहिती आहे. जो श्रेष्ठ उदार महात्मा आहे, त्याच्याजवळ याचना करायला हरकत नाही.

याञ्चा मोहा वर वरमभिगुणैर्नाघमेलब्धकामः ॥

हा ही अंतःकरणामधे निग्रह आहे. परंतु श्रेष्ठ पुरूषाजवळ आपली परिस्थिती सांगायला हरकत काय आहे? वासनाक्षय करायला पहिजे हे खरं आहे. पण देह कसा राहायचा? आवश्यक जे आहे, एकंदर आश्रमाची व्यवस्था काय, मुलाबाळांकरता व्यवस्था करायला पाहिजे. पण हे जे महात्मे आहेत, ते ईश्वराजवळ मागत नाहीत तर इतरांजवळ काय मागणार? न मागता पाठवून दिलं तरी घेत नाहीत. शिवाजीराजांनी तुकाराम महाराजांकडे रत्नांनी, मोहरांनी भरलेली ताटं पाठवली. त्यांनी लगेच परत पाठवली. नको म्हणाले, देवाकडचा प्रयत्न कमी करण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणजे खरं प्रेम तुमचं नाही. त्या पतिव्रता स्त्रीचे विचार वेगळे आहेत. देवासमोर आपलं सांगायला काय हरकत आहे? भक्ताने सकाम व्हायला काय हरकत आहे? निष्काम म्हणजे ज्ञानच झालेलं आहे. क्षेत्र–क्षेत्रज्ञ विवेक पूर्ण झालेला आहे. तोच खरा निष्काम आहे. तोपर्यंत काम अंतःकरणामधे आहे.

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।।२.५५।। श्री. भ.गीता

प्रल्हादजी, नरसिंहांनी वरदान मागायला सांगितलं असताना नको म्हणाले. पुन्हा म्हणाले द्यायचंच असेल

कामानां हृदि असंरोहं भवतस्तु वृणे वरम् ।।७.१०.७।।

ऋषिकेश आपल्याला म्हणतात. सर्व इंद्रियं, मन आपल्या ताब्यात आहे. त्याची सुधारणा तुम्हीच करायची. आमच्या प्रयत्नावर पण जर तुमची दृष्टी असेल तर ते फल मिळतं. तेव्हा कोणतीही इच्छा मनामधे येऊ नये. निष्काम अंतःकरण झालं पाहिजे. हेच मुक्तीचं स्वरूप आहे. सर्व दुःखनिवृत्ती याचाही अर्थ मुक्ति आहे. सर्व काम निवृत्ती यालाही मुक्ति म्हणतात. काही मनामधे वृत्तीच नाही. निवृत्तिक अंतःकरण झालेलं आहे. तेव्हा कामनिवृत्ती व्हावी, निष्काम अंतःकरण व्हावं असं प्रल्हादजींनी नरसिंहांना मागणं मागितलं आणि सांगताहेत की ज्याचं अंतःकरण निर्वासन झालेलं आहे, श्रमसिद्धी झाली.

तर्ह्येव पुण्डरीकाक्ष भगवत्त्वाय कल्पते ।। ७.१०.९ ।। श्री. भा.

जीवभाव संपला म्हणाले. तो भगवानच झालेला आहे. तसे सुदामजी होते. पण त्यांच्या स्त्रीने विचार केला की यांना एकदा गोपालकृष्णांकडे पाठवावं. यांनी काही मागो नाहीतर न मागो. समक्ष भेटल्यावर एकदा यांची परिस्थिती लक्षात आली की गोपालकृष्ण कृपा करतील. त्याप्रमाणे ती एकदा म्हणू लागली.

ननु ब्रह्मन् भगवतः सखा साक्षाच्छ्रियः पतिः ।
ब्रह्मण्यश्च शरण्यश्च भगवान् सात्वतर्षभः ।।१०.८०.९ ।। श्री. भा.

''लक्ष्मीपती भगवान श्रीकृष्ण आपले मित्र आहेत असं मी ऐकलं आहे. ब्राह्मणांबद्दल अत्यंत आदरभाव त्यांना आहे. दुःखीकष्टी मानवांबद्दल त्यांच्या मनात अत्यंत दया आहे. अशा भगवान कृष्णांना तुम्ही एकदा भेटून या. एकदा द्वारकेला जाऊन या.'' सुदामजी म्हणाले, ''कशाकरता?'' ती सांगतीये,

दास्यति द्रविणं भूरि सीदते ते कुटुम्बिने ।।१०.८०.१०।। श्री. भा.

आपण काही ब्रह्मचारी, संन्यासी नाही महाराज, गृहस्थाश्रमी आहोत. आणि आपण अत्यंत कष्टामधे आपला गृहस्थाश्रम चालवत आहोत हे श्रीकृष्णांच्या दृष्टीला पडल्याबरोबर पुष्कळ द्रव्य

आपल्याला मिळेल.'' हा अभिप्राय त्या स्त्रीने बोलून दाखवला. श्रीकृष्णांच्या दर्शनाला जायचं म्हणजे द्रव्य मिळेल. ते देतील, तुम्ही मागू नका म्हणाली. सुदामजींनी ऐकून घेतलं. पण तिकडे लक्ष दिलं नाही. भार्या पुन्हा पुन्हा सांगतीय, भगवान श्रीकृष्ण अत्यंत उदार आहेत पण तिकडं यांचं लक्ष नाहीये. ते आपल्या नित्यक्रमात मग्न आहेत. ज्ञानदानाचंही काम चालू आहे. अनेक शिष्यमंडळींना शिकवताहेत. पुष्कळवेळा त्या स्त्रीने प्रार्थना केली. सुदामजींनी एकदा ठरवलं, आपल्या स्त्रीची इच्छा आहे, आपण द्वारकेला जाऊन येऊ. पण जाताना मनोवृत्ती कशी आहे? त्यांना भेटायला गेला म्हणजे तुम्हाला पुष्कळ द्रव्य मिळेल, तुमचा संसार सुखाचा होईल. असं ती स्त्री म्हणतीये. सुदामजींच्या मनात काही नाही. दुःख असलं तर जायचं म्हणाले. दुःख नाहीच आहे. भगवंतांचं स्मरण ज्याअर्थी मला होतंय म्हणजे दुःख नाही अशी पूर्ण जाणीव त्यांना आहे.

अयं हि परमो लाभः उत्तमश्लोकदर्शनम् ।।१०.८०.१२ ।। श्री. भा.

परंतु म्हणाले जाऊ या, मोठा लाभ होईल. ज्यांची कीर्ति अत्त्युत्तम आहे. पवित्र आहे अशा त्या भगवान श्रीहरींचं दर्शन मला होईल ना? द्वारकेला जाऊन काही मागायचं नाही. परंतु दर्शन होईल. म्हणून त्यांनी स्त्रीला सांगितलं म्हणाले जाऊन येतो. परंतु मोकळ्या हाताने कसं जायचं? देवाच्या दर्शनाला असंच जाऊ म्हणाले? काही आहे का घरात? घरात काय असणार? चार घरात जाऊन तिने चार मूठ पोहे आणले आणि एका फडक्यात बांधून सुदामजींना दिले. हे द्या म्हणाली श्रीकृष्णांना. निघाले सुदामजी द्वारकेला.

कृष्णसंदर्शनं मह्यं कथं स्यात् इति चिन्तयन् ।।१०.८०.१५ ।।

कृष्णदर्शन व्हायला पाहिजे याशिवाय कुठलीही इच्छा नाही. पण ते होणार कसं? द्वारका काय लहान सहान गाव आहे. येऊन पोचले द्वारकेत, प्रवास करत करत. मोठे मोठे वाडे आहेत. कृष्णांचाच परिवार केवढा मोठा आहे. सोळाहजार स्त्रिया, त्यांचे नोकरचाकर, त्यांचे मोठेमोठे वाडे. एवढ्या मोठ्या द्वारकेमधे कृष्णदर्शन कसं व्हायचं? एका वाड्याच्या दरवाजामधे ते उभे राहिले. कृष्णदर्शन व्हावं अशी तळमळ आहे. आत गोपालकृष्ण बसलेले होते. त्यांची दृष्टी सुदामजींवर पडल्याबरोबर उठले आणि धावत येऊन त्यांनी सुदामजींना आलिंगन दिलेले आहे.

सख्युः प्रियस्य विप्रर्षेः अङ्गसङ्गातिनिर्वृतः ।
प्रीतो व्यमुञ्चत् अब्बिन्दून् नेत्राभ्यां पुष्करेक्षणः ।।१०.८०.१९ ।। श्री. भा.

भगवान मायावी आहेत. माया आसक्त नाहीयेत. परंतु जे जे उत्तम आहे व्यवहारदृष्टीने ते ते

सर्व भगवान करतात. मित्राला पाहिल्याबरोबर सर्व गोष्टींची आठवण झालेली आहे. देवाला वासनाक्षय आहे की नाही. संसाराची आसक्ती आहे की नाही याचं उत्तर देता येणार नाही. त्यांचं एकंदर लीलाचरित्र पाहिल्याबरोबर आमच्यासारखेच आहेत असं आम्हाला वाटतं. परममित्राची भेट झाली, दर्शन झालं, डोळ्यातून अश्रू वाहताहेत. भगवान अत्यंत प्रेमाने सुदामजींना वाड्यात घेऊन आलेले आहेत. सुदामजींची अत्यंत आदराने पूजा केलेली आहे. नुसता मित्र नाहीये. ज्ञानी भक्त आहे. ज्ञानाचं फल याने मिळवलेलं आहे. पूर्ण विरक्त आहे. ईश्वराची पूर्ण शक्ती विद्यमान आहे. असेन म्हणतात सुदामजी, आम्हाला काय करायचंय? ईश्वराची आमच्यावर जी कृपा झालेली आहे त्यामुळे व्यवहारातल्या कुठल्याही गोष्टीशी आमचा संबंध नाही. मनाचासुद्धा नाही. सर्व त्याग मनापासून झालेला आहे. गंध लावलेलं आहे श्रीकृष्णांनी. धूप–दीप ओवाळून देवाप्रमाणे सुदामजींची आरती केली. भोजन झालेलं आहे. दरिद्री ब्राह्मण सुदामजी अत्यंत कृश झालेले आहेत. हाडं दिसताहेत. अन्न नाही, पाणी नाही. श्रीकृष्णांची इतकी निष्ठा, इतकं प्रेम पाहून रूक्मिणीदेवीसुद्धा वारा घालत उभी राहिली. अंतःपुरातल्या सगळ्या लोकांनासुद्धा आश्चर्य वाटलं. हा कोण आहे म्हणाले अवधूत, दरिद्री ब्राह्मण आणि देवाने याची पूजा केली? प्रत्यक्ष लक्ष्मीपती आणि लक्ष्मीला सोडून भेटतोय, बोलतोय, डोळ्यातून अश्रुधारा वाहाताहेत. दोघेही मित्र बोलत बसलेले आहेत. गुरूंच्या आश्रमात राहात असताना त्यावेळची आठवण झाली. प्रेमाने त्याचे हात आपल्या हातात घेतले आणि भगवान तन्मय झालेले आहेत. खरी मैत्री आहे, प्रेम आहे. कशाकरता आला, तो दरिद्री आहे. यांनाही काही स्मरण नाही. आणि आपण दरिद्री आहोत, आपला मित्र आपल्याला काही पैसा देईल याचं सुदामजींनाही स्मरण नाही. शुद्ध प्रेम आहे.

अपि ब्रह्मन् गुरुकुलाद् भवता लब्धदक्षिणात्।
समावृत्तेन धर्मज्ञ भार्योढा सदृशी न वा ।।१०.८०.२८।। श्री. भा.

भगवान विचारताहेत, ''काय सुदामजी, गुरूजींकडून विद्या संपादन करून, गुरूदक्षिणा देऊन घरी गेल्यावर आपण विवाह केला आहे ना? आपल्याला स्त्री योग्य मिळालेली आहे ना? पहिल्यापासूनच तुमची वृत्ती विरक्त आहे. निर्वासन अंतःकरण तुमचं आहे. तुमचं चित्त हे वासनेच्या आधीन झालेलं नाही. धनाची इच्छा नाही, मानाची इच्छा नाही हे पूर्वीच आम्ही पाहिलं आहे. अशीही काही मंडळी असतात की ज्यांच्या मनामधे वासना नाही आणि ईश्वरार्पण बुद्धीने कर्माचरण मात्र त्यांचं चाललेलं आहे. या योगाने लोकसंग्रह होतो. आपण गुरूकुलात राहात होतो त्यावेळची आठवण तुम्हाला आहे का? गुरूजींच्या कृपेने जे काही जाणून घ्यायचं ते आपण घेतलेलं आहे.

अज्ञानाच्या पलिकडे आपण गेलेला आहात. आद्यआश्रम जो आहे तो गुरूची सेवा करण्याकरता, ज्ञान मिळवण्याकरता आहे. सद्‌गुरूंची सेवा आपल्याला घडलेली आहे. माझा संतोष यज्ञाने होणार नाही. संततीने होणार नाही. तपाने होणार नाही. शमाने नाही.

तुष्येयं सर्वभूतात्मा गुरुशुश्रूषया यथा ।।१०.८०.३४ ।। श्री. भा.

फक्त एक गुरूसेवा करणारा जो गुरूभक्त आहे त्याला पाहून मला आनंद वाटतो. काय सुदामजी, एके दिवशी आपल्याला गुरूजींच्या पत्नीने सांगितलं, गुरूमाईनं, की संध्याकाळच्या स्वयंपाकाला घरात लाकडं नाहीत.'' काय परिस्थिती आहे बघा. चतुर्दश विद्या, चौसष्ठ कला देणारे इतके ज्ञानसंपन्न सांदिपनी गुरूमहाराज, त्यांच्या घरात स्वयंपाकाला लाकडं नाहीत. परमेश्वराचे गुरू. श्रीकृष्ण पुढे सांगताहेत, ''गुरूमाईने सांगितल्यावर आपण तिथे अरण्यामधे लाकडं आणायला निघालो. लाकडं गोळा केली, मोळ्या बांधल्या, डोक्यावर घेतल्या. इतक्यात एकदम पाऊस पडायला लागला. वास्तविक वर्षाऋतु नव्हता. सूर्यास्तही झाला. जिकडे तिकडे अंधार पडला आणि आपण रस्ता चुकलो. तिथेच एका झाडाखाली थांबलो. सांदिपनी गुरूमहाराज सूर्योदय झाल्याबरोबर आमचा शोध करीत त्या अरण्यात आले. आणि आमची स्थिती पाहून त्यांना अतिशय वाईट वाटले. बाबांनो आमच्याकरता किती कष्ट तुम्ही घेतले असं ते म्हणाले. शरीर केवढं प्रिय आहे जीवाला पण शरीराची सुद्धा पर्वा न करता तुम्ही एवढे कष्ट सोसले असं गुरूमहाराज म्हणाले. सच्छिष्याचं हे कर्तव्य आहे की त्याने सद्‌गुरूंची यथाशक्ती सेवा करावी. सर्व अर्पण करावं. गुरूजींनी प्रसन्न होऊन 'तुमचे सर्व मनोरथ सत्य होतील' असा आशीर्वाद आपल्याला दिला. त्यांनी आपल्याला सांगितलं की आपण केलेलं वेदाध्ययन नेहमी तेजस्वी राहील. असं गुरूमहाराजांचं आपल्यावर प्रेम होतं, कृपा होती. त्यामुळेच आणि पूर्णता आपल्या जीवनाला आलेली आहे.''

सुदामजी म्हणाले, ''देवा, ही सगळी इच्छा आमची पूर्ण झालेली आहे. काय मिळालं नाही आम्हाला? राहायला मिळालं ना गुरूकुलामधे. तुमचा उपदेश, तुमचं मार्गदर्शन, एकंदर आचरण हे सगळं आम्ही पाहिलेलं आहे. वेदरूप आपणच आहात आणि सद्‌गुरूंची सेवा आपण करून दाखवली आहे.'' बोलणं चाललेलं आहे. भगवान म्हणाले,

किमुपायनमानीतं ब्रह्मन् मे भवता गृहात् ।।१०.८१.३ ।। श्री. भा.

सगळी परिस्थिती समजावून घेताहेत. सुदामजी काय बोलताहेत. गुरूसेवेबद्दल यांची तशीच निष्ठा आहे. यांनी तर सांगितलं की गुरूसेवेपेक्षा माझ्या सान्निध्याने त्यांना मोठा लाभ आहे.

सुदामजी, काय फराळाचं काही आणलं आहे का नाही? आमच्या वहिनीसाहेबांनी काही दिलं आहे का नाही?'' सुदामजी विचार करताहेत, काय हे मळकट गाठोडं काढायचं? पण भगवान सांगतात, ''भक्ताने मला थोडं दिलं तरी मला समाधान आहे. माझी तृप्ती होते. अभक्ताने काहीही दिलं तरी परिणाम नाही.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भःत्या प्रयच्छति ।
तदहं भःत्युपहृतं अश्नामि प्रयतात्मनः ।।१०.८१.४ ।। श्री. भा.

शुद्ध अंतःकरणाच्या भक्ताने मला तुलसीपत्र, फुलं, फल, किंवा जल दिलं तरी मला संतोष होतो. भक्तीने दिलेलं आहे की नाही एवढं मी तपासून घेतो. असं मोठ्या उदारपणाने भगवान बोलताहेत. ब्राह्मणाने खाली मान घातलेली आहे. हा साक्षात लक्ष्मीपती आहे आणि हा याचना करतो आहे? याचना मी करायची. जीव हा कर्मपरतंत्र आहे. त्याला अपमान सोसावा लागतो. संकटं सोसावी लागतात. त्याच्या कर्माचं फल त्याला भोगावं लागतं. याला याचना करण्याचं काय कारण आहे? नित्य तृप्त आहे परमात्मा. लक्ष्मी याच्या गुणांना पाहून याच्याजवळ राहाती आहे. लक्ष्मीची सुद्धा याला इच्छा नाही मग मागणार काय हा? सुदामजी, विचार करताहेत. भगवान सांगताहेत, ''मला इथं पुष्कळ ऐश्वर्य आहे. पुष्कळ स्त्रिया आहेत, नोकर चाकर आहेत. पंचपक्वानाचं ताट जरी समोर आलं तरी मला तुमची आठवण होते. कार्यभाग मोठा असल्यामुळे मी येऊ शकत नाही. आज तुम्ही भेटला, समाधान झालं.'' खाली मान घालून सुदामजी बसलेले आहेत. या लक्ष्मीपतीला हे पोहे द्यायचे कसे? लाज वाटली. भगवान विचार करताहेत.

नायं श्रीकामो माभजत्पुरा ।।१०.८१.६ ।। श्री. भा.
पत्क्याः पतिव्रतायास्तु सखा प्रियचिकीर्षया ।
प्राप्तो मां अस्य दास्यामि सम्पदो अमर्त्यदुर्लभाः ।।१०.८१.७ ।। श्री. भा.

भगवान श्रीहरींचा संकल्प होऊन गेला. हा ब्राह्मण काही सकाम नाहीये. लक्ष्मीकरता याने माझी सेवा कधीच केली नाही. शुद्ध याची भक्ती आहे. पण पतिव्रता पत्नी आहे. तिलाही दुःखी ठेवणं बरं नाहीये. तिच्याही मनाची इच्छा पूर्ण करायची म्हणून हा आलेला आहे माझ्याकडे. तिचंही प्रिय करावं. संपत्ति यांना द्यायची आहे असा संकल्प होऊन गेला भगवंताचा. देवांनासुद्धा जी संपत्ती मिळणार नाही ती संपत्ती याला द्यावी असा संकल्प झालेला आहे. ज्याच्याजवळ संकल्पाद्वारा पंचमहाभूतं तयार होतात, सृष्टी निर्माण होते त्याला संपत्ती द्यायला किती वेळ लागणार? पोहे

खाऊनच संपत्ती द्यायची असं नाही पण यालाही समाधान होईल म्हणून भगवान विचारताहेत, ''काय आणलयं सुदामजी? हे कसलं गाठोडं आहे बघू या बरं''. ते गाठोडं आपणच काढून घेतलं. भक्ताने देण्याचीही वाट पाहिली नाही. मागितलं भक्ताजवळ. सर्वांना दान करणारा, सर्वांचं संरक्षण करणारा परमात्मा मागतोय, आपणहून भक्ताचं घेतोय, या भक्ताची योग्यता काय असेल? सुदामजी आपले गप्प बसले. ते गाठोडं सोडलं आणि भगवान म्हणाले, ''वा, वा, सुदामजी हा मला आवडणारा पदार्थ तुम्ही आणलेला आहे. पोहे मला फार आवडतात. विचारा वाटलं तर आमच्या घरात.'' हे पोहे विश्वपरमात्म्याला तृप्त करणारे आहेत. त्या कोरड्या पोह्याची एक मूठ भगवंतांनी तोंडात टाकली.

द्वितीयां जग्धुमाददे ।।१०.८१.१० ।। श्री. भा.

सगळे पोहे मलाच खायचेत म्हणाले. दुसरी मूठ भरून घेतली.

तावच्छ्रीर्जगृहे हस्तं तत्परा परमेष्ठिनः ।।१०.८१.१० ।। श्री. भा.
एतावतालं विश्वात्मन् सर्वसम्पत्समृद्धये ।।१०.८१.११ ।। श्री. भा.

लक्ष्मीदेवीनं, रूक्मिणीनं हात धरला. म्हणाली, ''पुरे प्रभू, एक मूठ पोह्याने याला काय मिळालं, तिकडे दुसरी द्वारकानगरी निर्माण झाली ना. काय याला द्यायचं ते दिलं आपण. आपली तृप्ती नेहमीच आहे. सगळे पोहे खाऊन तृप्ती होणार असं थोडच आहे. आणि आम्हालाही राहू दे की थोडा प्रसाद. तुम्ही सगळं घेता काय? तुम्हाला ज्या ब्राह्मणाचे पोहे प्रिय आहे ते आम्हाला जर मिळाले तर आम्हीही तृप्त होऊ. भक्तवत्सलता ही तुमच्या एकट्याजवळच आहे.''

रात्रभर सुदामजी राहिले. अखंड गप्पागोष्टी चाललेल्या आहेत. जणु स्वर्गातच आपण आहोत असं त्यांना वाटलं. दुसरे दिवशी स्नान, संध्या, फराळ झाल्यावर सुदामजी आपल्या घराकडे जायला निघाले. शुकाचार्य सांगतात राजा

स चालब्ध्वा धनं कृष्णान्न तु याचितवान् स्वयम् ।
स्वगृहान् व्रीडितो अगच्छन्महद्दर्शननिर्वृतः ।।१०.८१.१४ ।। श्री. भा.

इतकं समाधान सुदामजींना झालं की देवाजवळ काही धन मागून घ्यावं अशी आठवणसुद्धा त्यांना झाली नाही. आपण दरिद्री आहोत, स्त्रीने आपल्याला याकरता पाठवलं आहे, काही आठवण नाही. श्रीकृष्णांनीही बरोबर काही दिलं नाही. सुदामजींना लज्जा वाटते आहे म्हणाले. मी

असा दरिद्री, कृश शरीर झालेलं आणि देवाने मला आपल्या आसनावर बसवलं, आलिंगन दिलं. कर्मपरतंत्र असलेला मी आणि तो भगवान ज्याला कर्मसंबंध नाही.

क्लेशकर्मविपाकायैः अपरामृष्टः पुरुषविशेषईश्वरः ।

पंचक्लेश ज्याला नाहीत, त्याला कारण असलेलं कर्म ज्याला नाही. कर्माचा विपाक, वासना ज्याला नाहीत. रागद्वेषादि विकार ज्याला नाहीत म्हणून जन्ममरण ज्याला नाही. असा सर्व स्वतंत्र असलेला परमात्मा, त्याने मला प्रेमाने आलिंगन दिलेलं आहे. त्याच्या पत्नीने मला वारा घातला. किती सेवा केली माझी? याची लाज वाटली सुदामजींना. अरे, अरे, मी आलो नसतो तर बरं झालं असतं म्हणाले. काय हे, देवाने माझ्याकरता इतके कष्ट सोसले.

स्वर्गापवर्गयोः पुंसां रसायां भुवि सम्पदाम् ।
सर्वासां अपि सिद्धीनां मूलं तच्चरणार्चनम् ।।१०.८१.१९ ।। श्री. भा.

सुदामजी सिद्धांत सांगताहेत. स्वर्ग किंवा मोक्ष याला मूल कारण म्हणजे भगवंतांची सेवा आहे. स्वर्गही मिळेल, पाहिजे असेल तर मोक्षही मिळेल. रसातलामधे, भूमीमधे ज्या संपत्ती आहेत त्या संपत्ती, सर्व सिद्धी ह्याला मूल कारण म्हणजे भगवंतांची सेवा ही आहे. हा सिद्धांत मनामधे पक्का आहे म्हणून याचना नाही, वासना नाही काही नाही. देवाने मला द्रव्य दिलं नाही हे चांगलंच आहे. त्यात देवाचा काही हेतू आहे, हाच विचार आहे, निघायच्या वेळीही!

अयं हि परमो लाभो उत्तमश्लोकदर्शनम् ।।१०.८०.१२ ।। श्री. भा.

हेच विचार करून सुदामजी निघालेले आहेत. भगवंतांचं श्रीहरीचं दर्शन मला होणार आहे हाच मोठा लाभ आहे. संपत्ती काय करायचीय? मला द्रव्य दिलं नाही गोपालकृष्णांनी याचं कारण आहे म्हणाले.

अधनोऽयं धनं प्राप्य माद्यन्उच्चै र्न मां स्मरेत् ।
इति कारुणिको नूनं धनं मेऽभूरि नाददात् ।।१०.८१.२० ।। श्री. भा.

हा जन्मदरिद्री ब्राह्मण, याला जर धन मिळालं तर हा उन्मत्त होईल. निर्वासन अंतःकरण ज्याचं झालेलं आहे त्याच्या मनामधे वासना निर्माण करावी लागेल. होईल म्हणाले, या धन देण्याने. याला वासना निर्माण होऊ नये असाच प्रयत्न करायला पाहिजे, याला दरिद्रीच ठेवला पाहिजे. सुदामजी याला देवाची दया समजताहेत. इतका मी मित्र जवळचा असून देवाने मला काही

दिलं नाही असं मनात सुद्धा आलं नाही. पण देव दयाळू आहे. माझी चित्तवृत्ती, मनोवृत्ती शुद्ध रहावी याकरता मला देवाने धन दिलं नाही. असेच विचार सुदामजींच्या मनात आहेत. भगवान श्रीहरीची अशीच कृपा माझ्यावर असावी. बायकोने ज्या कामाकरता पाठवलं होतं, म्हणाली, तुम्हाला धन मिळेल, मागायला नको. देव दयाळू आहे, उदार आहे. पण धन मिळालं नाही म्हणून बरं झालं, देवाची दया आहे असं समजूनच सुदामजी घरी आलेले आहेत. घरी गेल्यावर आता बायको मला बोलणार आणि त्या कृष्णालाही बोलणार म्हणाले. तुम्ही मागितलं नाही तरी त्याला द्यायला काय होतं? असं म्हणेल. तुकाराममहाराजांची पत्नी जिजाई म्हणायची, ''तुम्ही सगळा संसार टाकून दिलात आणि तुमच्या त्या विठेबाने माझा संसार उध्वस्त केला.'' पांडुरंगाचीही निंदा करायची. क्षणभर असं वाटायचं सुदामजींना परंतु पुन्हा आपल्याला श्रीहरींचं दर्शन झालेलं आहे. आपल्याला पुन्हा मोह होऊ नये याची योजना देवाने केली हीच मोठी कृपा त्याची आहे हाच विचार मनामधे स्थिर आहे. आपल्या गावाजवळ आले आणि पाहताहेत तर द्वारकेप्रमाणे मोठेमोठे वाडे आहेत, नोकरचाकर हिंडताहेत, सगळी समृद्धी आहे. कुणाची जागा आहे ही म्हणाले, कुठं आलो मी? का पुन्हा चुकून द्वारकेला आलो काय म्हणाले. त्यांच्या स्त्रीची नजर त्यांच्यावर गेली. सगळे नोकर चाकर वाद्य वाजवताहेत. सुदामजींना नेण्याकरता ते आले. ती पत्नी पतिव्रता स्त्री घरातून बाहेर आलेली आहे. साक्षात लक्ष्मीप्रमाणे रूप आहे तिचं. नेत्रातून प्रेमाश्रू वाहताहेत. आपल्या पतीला तिने नमस्कार केला. देवीप्रमाणे अनेक अलंकार तिने शरीरावर धारण केले आहेत, एवढंच नव्हे तर तिच्या अनेक दासींच्या अंगावरही अलंकार आहेत. सुदामजींनी पाहिलं आणि तिच्या आग्रहाने ते आपल्या वाड्यामधे येऊन पोहोचले.

मणिस्तम्भशतोपेतं महेन्द्रभवनं यथा ।।१०.८१.२८।। श्री. भा.

शेकडो रत्नखचित खांब ज्याठिकाणी आहेत. इंद्राचाच जणु महाल आहे. मोठेमोठे पलंग आहेत, शुभ्र आच्छादनं त्यावर घातलेली आहेत. सुवर्णाची आसनं आहेत. चामरं आहेत. असं ते सर्व सामर्थ्य त्यांच्या दृष्टीला पडलं. रत्नाचे दीप लावलेले आहेत. ही सर्व समृद्धी सुदामजींनी पाहिली. अहेतुक आहे. भक्ताच्या मनामधे कामना उत्पन्न व्हावी म्हणून देवाने हे दिलं असंही नाही. काहीच हेतू नाही. ही जी एकदम समृद्धी उत्पन्न झाली याचं कारण काय आहे असा सुदामजी विचार करताहेत.

नूनं बतैतन्मम दुर्भगस्य शश्वद्दरिद्रस्य समृद्धिहेतुः।
महाविभूतेः अवलोकतोऽन्यो नैवोपपद्येत यदूत्तमस्य ।।१०.८१.३३ ।।

तो जो महाविभूतीरूप असलेला परमात्मा त्याच्या कृपादृष्टीशिवाय दुसरं याचं काहीही कारण नाहीये. मी इतका दरिद्री आहे, दुर्दैवी आहे. असं असताना एकदम एवढी समृद्धी मिळण्याचं काय कारण आहे? सुदामजींचं आचरण जे चाललेलं आहे, ते ईश्वरार्पण बुद्धीने चाललेलं आहे. कर्तृत्व अभिमान नाही. केवळ ईश्वराज्ञा म्हणून धर्माचरण चाललेलं आहे. त्यामुळे धर्माचाही अभिमान नाही. धर्म नाही, अर्थ, काम तर नाहीच नाही. अकिंचन आहेत सुदामजी. कृष्णप्रेम तेवढं अंतःकरणामधे आहे. काही बोलला नाही म्हणाले तो यदुनाथ. न सांगता एकदम एवढं सगळं देऊन टाकलं.

ईश्वरस्तु पर्जन्यवत् द्रष्टव्यः ।।

आचार्यमहाराज सांगताहेत. पर्जन्य पडल्यानंतर ज्याप्रमाणे सगळीकडे धान्य समृद्धी होऊन जाते तशी ईश्वराची कृपा झाली की ती भरभरून होते. असा दाता आहे भगवान. भक्ताने थोडी जरी सेवा केली तरी पुष्कळ त्याला वाटते. मी नेलेले पोहे, एक मूठच त्याने स्वतः घेऊन खाल्ले म्हणाले. सुदामजी प्रार्थना करताहेत,

तस्यैव मे सौहृदसख्यमैत्री
दास्यं पुनर्जन्मनि जन्मनि स्यात्।
महानुभावेन गुणालयेन
विषज्जतः तत्पुरुषप्रसङ्गः ।।१०.८१.३६ ।। श्री. भा.

असा जो अत्यंत भक्तवत्सल परमात्मा आहे त्याचीच मैत्री, त्याचंच दास्य मला प्रत्येक जन्मामधे व्हावं. जन्ममरणातून मुक्त व्हावं असं नाहीये. 'तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी'. सुदामजी तसंच म्हणताहेत. येऊ दे गर्भवास येऊ दे, पुनर्जन्म येऊ दे. परंतु त्या जन्मामधे त्याचंच दास्य मला मिळावं. त्याची भक्ती मला मिळावी एवढीच इच्छा आहे. सर्व गुणांनी समृद्ध अशा प्रकारचा अनंत गुण संपन्न परमात्मा त्याची संगती मिळाली, त्याचं स्मरण झालं म्हणजे त्याच्या भक्तांची संगती होईल. भगवान आपल्या भक्ताला असं ऐश्वर्य देत नाही म्हणाले. भक्ताची बुद्धी बिघडण्याचा संभव आहे. धनिक लोकांचा मदामुळे अधःपात कसा होतो आहे हे पाहूनसुद्धा मला संपत्ती कशी देईल? भीती वाटली सुदामजींना आणि म्हणून हे दास्य मागितलेलं आहे. हे

मला मिळालेले दास्य कायम रहावं, अशी इच्छा आहे. मला मिळालेलं ऐश्वर्य कायम राहावं अशी इच्छा नाहीये, याच्यापेक्षा जास्त मिळण्यामधे देवाची कृपा नाहीये हे समजत नाही. भगवंताचं स्मरण अखंड राहिलं पाहिजे, पुन्हा जन्म आला तरी चालेल असा पूर्ण विचार सुदामजींचा आहे. मुक्तिची इच्छा नाही. कर्मक्षय व्हावा अशीही इच्छा नाही. तो समर्थ आहे आणि हाच सिद्धांत आहे. कोणत्याही तपाने, यज्ञयागाने, अध्ययनाने परमात्मा प्राप्त होत नाही.

यमेव एषः वृणुते स तेन लभ्यः ।।

भगवंताची कृपादृष्टी ज्याच्यावर पडली त्यालाच भगवंताची प्राप्ती होते, इतरांना प्रयत्नाने होत नाही. त्यानेच माझा अंगिकार केला. ज्यांचा भगवंताने अंगिकार केला त्यांचं पूर्ण कल्याण झालेलं आहे.

अंगिकार ज्यांचा केला नारायणे।
निंद्य तेही तेणे वंद्य केले।

तुकाराम महाराज सांगताहेत, अजामेळ काय, कान्होपात्रा गणिका काय, सगळ्यांचा अंगिकार देवाने केलेला आहे. ते वंद्य झालेले आहेत. हेच समाधान आहे. समृद्धी पुष्कळ आहे, पंचपक्वान्नाचं रोज जेवण मिळतं आहे. उत्तम प्रकारची वस्त्रं धारण करायला मिळताहेत. दागदागिने मिळताहेत. परंतु जाणीव पाहिजे

त्यक्तेन भुंजीथाः ।। ईशावास्योपनिषद्

हे सर्व ईश्वराचं आहे. सगळंच ईश्वररूप आहे. हा त्याग मनातून आहे, बाहेरून परेच्छा प्रारब्ध आहे. स्त्रीची इच्छा आहे. मुलांची इच्छा आहे. मित्रांची इच्छा आहे. जाऊन बसताहेत, पंक्तीमधे भोजन करताहेत. पण ही सर्व समृद्धी त्या यदुनाथाची आहे ही निरंतर जाणीव सुदामजींच्या चित्तामधे आहे. याप्रमाणे भगवान श्रीकृष्णांची परमभक्ती सुदामजींना मिळालेली आहे. आणि हेच त्यांचं परमभाग्य आहे आणि ईश्वराची कृपा आहे. ईश्वराचा परममित्र. परमात्मा अजित असूनसुद्धा सेवकाने त्याचा पराजय केला याचा भगवंताला आनंद वाटतो आहे. भक्ताने पराजय करावा असं वाटतं. त्या भगवंताचं अखंड ध्यान चाललेलं आहे. मिळालेल्या समृद्धीचा मनावर काहीही परिणाम नाही. अहंकारादिक दोष असलेले परमेश्वराच्या कृपेने दूर होतात. यांना तर पहिल्यापासून अहंकार नाहीच आहे. समृद्धी नव्हती तेव्हादेखील समचित्त होते आणि आता समृद्धी मिळाली तरी समचित्त आहेत. सुख मला मिळालं म्हणजे आनंद आहे असं समजणं म्हणजे सुद्धा तो विकार आहे.

दुःखेषु अनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।।२.५६ ।। भ.गीता

सुख मिळायला लागल्यानंतर जास्तीत जास्त वासना मनामध्ये उत्पन्न होतात.

सुखात् अनुर्विवधन्ते ।।

आचार्य सांगताहेत, अग्निमध्ये काष्ठ टाकल्यानंतर अग्नि प्रदीप्त होतो आहे. त्याप्रमाणे सुखाची प्राप्ती झाल्याबरोबर माणसाच्या वासना अधिकाधिक वाढताहेत, पण हा जो ज्ञानी महात्मा आहे, भक्त त्याला असं वाटत नाही की हे सुख जास्ती लाभावं, वाढावं. अशी वृत्ती सुदामजींना मिळालेली आहे ही ईश्वराची कृपा आहे. घरातल्या पतिव्रता स्त्रीच्या मनाप्रमाणे देवाने दिलं, तिच्याही मनाचं समाधान झालं, बरं झालं म्हणाले. तीही योग्य होती तिला तरी जन्मभर दुःख कशाकरता व्हायला पाहिजे. पण म्हणून ते काही घरदार सोडून गेले नाहीत.

शुकाचार्य सांगतात, राजन, सूर्यग्रहणाचा पर्वकाल एकदा आलेला आहे. समंतपंचक क्षेत्रामधे भारतातली बरीच मंडळी जमलेली आहेत. सूर्यग्रहण लागल्यानंतर सर्वांनी स्नान केलं, जपजाप्य केलं. ग्रहण सुटल्यावरही सर्वांनी स्नान, दान वगैरे केलं. सर्वांचं भोजन झालं. सगळ्यांच्या भेटी झाल्या. पांडवांची भेट झाली. सर्वांना घेऊन आले होते भगवान. तो अनिरूद्ध तेवढा राहिला होता द्वारकेच्या रक्षणाकरता. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, धृतराष्ट्र, गांधारी, दुर्योधनादिक कौरव सगळे तिथे जमलेले आहेत. श्रीकृष्णांच्या स्त्रिया बसलेल्या आहेत. द्रौपदी, सुभद्रा, कुंतीही बसलेल्या आहेत. त्यांचं बोलणं चाललेलं आहे. गोकुळातून नंद, यशोदा, गोपी सगळे तिथे आलेले होते. आणि भगवान श्रीकृष्णांचं दर्शन त्यांना झालेलं आहे. भगवंताने नंद यशोदेला अभिवादन केलं. नेत्रातून प्रेमाश्रू वाहताहेत. काही बोलले नाहीत. भगवान सांगताहेत, ''यशोदामाते, काय तुम्ही आमच्यावर प्रेम केलं. तुमचं प्रेम आम्ही विसरू शकत नाही. मातापित्यांना सोडून आम्हाला तुमच्यापाशी यावं लागलं. प्रसंगच तसा होता. परंतु तुम्ही आपल्या देहापेक्षा जास्ती प्रेम आमच्यावर केलं. आमचं संरक्षण केलं.'' त्या गोपींना जाऊन भेटले गोपालकृष्ण. गोकुळामधे आत्तापर्यंत एकदासुद्धा गेले नव्हते. संदेश पाठवताहेत, उद्धवजींना पाठवताहेत. त्याही तशाच राहिलेल्या आहेत. श्रीकृष्ण आलेले आहेत हे कळल्यानंतर अत्यंत आनंद झाला. कृष्णदर्शन झालं. अत्यंत सौंदर्यसंपन्न आहेत श्रीकृष्ण. डोळे सारखे उघडे रहावेत असं त्यांना वाटतंय. भगवंतांनी त्यांची भेट घेतली, कुशल प्रश्न विचारले आणि बोलायला लागले,

अपि स्मरथः नः सख्यः स्वानां अर्थचिकीर्षया।
गतांश्चिरायिताञ्छत्रुपक्षक्षपणचेतसः ।।१०.८२.४२ ।। श्री. भा.

गोपींनो आमची आठवण तुम्हाला होते का नाही ? आम्हाला आठवण नाही असं तुम्ही म्हणणं योग्य आहे. कारण काय आहे इतकी कार्यं उत्पन्न झाली आहेत. अनेक शत्रू निर्माण होताहेत. त्यांचा नाश करणं, सर्व व्यवस्था करणं यामुळे मला येणं झालं नाही. सर्व एकंदर प्रेमी मंडळींना परमेश्वरच एकत्र आणतो आणि पुन्हा त्यांचा वियोग करतो. ही परमेश्वराची शक्ती आहे. माझी भक्ती, प्रेम तुमच्या अंतःकरणामधे आहे हे मोक्षाचं साधन आहे.'' असं थोडसं तत्वज्ञानात्मक सांगितलं. ईश्वरेच्छेने सर्व चाललेलं आहे. गोपींच्या मनाचं समाधान झालं आणि त्यांनी शेवटी भगवंताला एवढीच प्रार्थना केली,

आहुश्च ते नलिननाभ पदारविन्दं
योगेश्वरैर्हृदि विचिन्त्यमगाधबोधैः।
संसारकूपपतितोत्तरणावलम्बं
गेहञ्जुषामपि मनस्युदियात् सदा नः ।।१०.८२.४९ ।। श्री. भा.

''भगवन, मोठे मोठे योगेश्वर ऋषि ज्यांच्याजवळ पुष्कळ ज्ञान आहे, योगशक्ती आहे तेही निरंतर आपलं ध्यान करताहेत. संसारकूपामधे पडलेल्या जीवांना वर काढणारे आपले चरण समर्थ आहेत. ते आपले चरण आमच्या चित्तामधे अखंड राहू दे. आम्हाला काही कुठं जाता येणार नाही. आपलं स्वरूप आमच्या चित्तामधे नेहमी राहू दे. एवढीच इच्छा आहे.''

सर्व स्त्रिया तेथे जमलेल्या आहेत. कौरवांच्या, पांडवांच्या, कृष्णपत्नी सगळ्या तिथं आहेत. द्रौपदी विचारतीये कृष्णपत्नींना, ''भगवान श्रीकृष्णांचा विवाह तुमच्याबरोबर कसा झाला ? तुमचं पाणीग्रहण श्रीकृष्णांनी कसं केले ते आम्हाला सांगा''. रूक्मिणी सांगतीये.

चैद्याय मार्पयितुमुद्यतकार्मुकेषु
राजस्वजेयभटशेखरिताङ्घ्रिरेणुः।
निन्ये मृगेन्द्र इव भागमजावियूथात्
तच्छ्रीनिकेतचरणो अस्तु ममार्चनाय ।।१०.८३.८ ।। श्री. भा.

शिशुपालाला मला द्यायचं ठरलं. ते सिद्ध होण्याकरता सर्व राजेलोक सैन्य घेऊन आले.

कृष्णांना नेऊ द्यायची नाही रूक्मिणी. मोठे मोठे अजिंक्य राजे होते. परंतु भगवान श्रीकृष्णांनी सिंहाने जशी कळपातून एखादी शेळी न्यावी तसं माझं हरण केलं. असा श्रीहरी परमात्मा, त्याच्या चरणाची पूजा, अर्चा, ध्यान निरंतर घडावं एवढी माझी इच्छा आहे. सत्यभामेने सांगितलं, जांबवतीने सांगितलं. शेवटी नरकासुराच्या कारागृहातून आणलेल्या राजकन्यांनी सांगितलं. ''देवी द्रौपदी, नरकासुराचा नाश करून निराधार असलेल्या आम्हाला घेऊन गोपालकृष्ण द्वारकेला आले. आणि आमच्याबरोबर विवाह करून त्यांनी आम्हाला आधार दिला. आता आमची काही इच्छा नाही. आम्हाला साम्राज्य नको, ब्रह्मलोक नको. वैकुंठलोकात जाण्याची सुद्धा आम्हाला इच्छा नाही.

कामयामह एतस्य श्रीमत्पादरजः श्रियः।
कुचकुमुमगन्धाढयं मूर्ध्ना वोढुं गदाभृतः ।।१०.८३.४२।। श्री. भा.

भगवान श्रीहरीचे चरणकमल ज्यांना चंदन लावलेले आहेत, ते आमच्या चित्तामधे नेहमी रहावेत. सुगंधित असे ते चरणाचे रजःकण आमच्या केसामधे पडावेत एवढीच आमची इच्छा आहे.

त्याठिकाणी वसिष्ठादि, परशुराम सर्व ऋषिमंडळीही आली होती. ती ऋषिमंडळी येताच भगवान उठून उभे राहिले. नमस्कार त्या सर्वांना केला. यथाविधी पूजा केली आणि बसलेली आहेत मंडळी सगळी. आणि भगवान बोलायला लागले.

अहो वयं जन्मभृतो लब्धं कात्स्न्र्येन तत्फलम्।
देवानामपि दुष्प्रापं यद् योगेश्वरदर्शनम् ।।१०.८४.९।। श्री. भा.

''आज आम्हाला मनुष्यजन्म मिळाल्याचं सार्थक झालं असं वाटतं. देवांनासुद्धा आपल्यासारख्या योगेश्वरांचं दर्शन दुर्लभ आहे ते आम्हाला मिळालं. काय मानवांचं पुण्य किती असणार? अल्प तप आहे, अल्प पुण्य आहे. जलरूप असलेली तीर्थ किंवा शीलारूप असलेले देव ते सुद्धा पूजा करणाऱ्याला, सेवा करणाऱ्याला पवित्र करतात पण त्याला फार काल लागतो.

दर्शनादेव साधवः ।।१०.८४.११।। श्री. भा.

आपल्यासारखे पुण्यशील महात्मे दर्शन होण्याबरोबर पवित्र करतात. अशी मोठी पुण्याई आमची म्हणून आपलं दर्शन झालं.'' गोपालकृष्णांची वाणी ऐकली सर्वऋषिमंडळींनी. ते विचार करू लागले. आम्ही यांच्या दर्शनाकरता आलो परमेश्वर म्हणून, आणि हे स्वतः आपल्याकडे

कमीपणा घेतात आणि आम्हालाच मोठेपणा देतात. हा सगळा लोकसंग्रह आहे. लोकांना मार्गदर्शन करण्याकरता आहे. ऋषिमंडळी सांगताहेत, ''देवा, आपल्या मायेच्या मोहामधे मोठेमोठे ज्ञानीसुद्धा पडतात. आपली मायाशक्ती फार मोठी आहे. आपल्या भक्तांच्या रक्षणाकरता आपण हे सात्विक शरीर धारण करून आलेला आहात. या सनातन वेदमार्गाचं, धर्ममार्गाचं संरक्षण करण्याकरता आपण आलेला आहात. आमचा सन्मान आपण करता हे लोकसंग्रहाच्या दृष्टीने आहे असं आम्ही मानतो. आज आमचाच जन्म सफल झाला, आमची विद्या सफल झालेली आहे.'' अशी ऋषिमंडळींनीही स्तुति केली आणि निघाले आपल्या आश्रमात जायला. वसुदेव हे ऋषिमंडळीसमोर आले, नमस्कार केला.

कर्मणा कर्मनिर्हारो यथा स्यान्नस्तदुच्यताम् ।।१०.८४.२९ ।। श्री. भा.

आणि विचारताहेत, ''ऋषिमहाराज, या कर्मबंधनातून मुक्त होण्याकरता मी कोणतं साधन करावं याचं मार्गदर्शन आपण करा.'' सगळी ऋषिमंडळी आश्चर्यचकीत झाली. ज्याचा पुत्र म्हणून साक्षात वैकुंठपती जवळ राहातो आहे आणि हा आम्हाला विचारतो आहे? संसारातून मुक्त होण्याचं साधन कोणतं? नारद म्हणाले सांगा त्याला काही.

कृष्णं मत्वा अर्भकं यन्नः पृच्छति श्रेय आत्मनः ।।१०.८४.३० ।। श्री. भा.

कृष्णाबद्दल याची काय भावना आहे? तुम्हाला विचारतोय कारण कृष्ण हा आपला मुलगा आहे. असं तो समजतोय, त्याला काय विचारायचंय. सन्निकर्ष आहे. गोपींना लांब ठेवलं भगवंताने याचं कारण हे आहे. वसुदेवाच्या मनामधे कृष्ण हा आपला मुलगा आहे ही भावना आहे, नारदांनी स्पष्टपणे सांगितलं. कृष्ण भगवान आहे, परमेश्वर आहे, सर्व काम पूर्ण करणारा आहे, भक्तवत्सल आहे, ही भावना गोपींच्या मनात आहे. नारद म्हणाले सांगा काहीतरी. त्याचं समाधान करा. ऋषिमंडळी म्हणाली, ''वसुदेवा, जन्माला आलेल्या माणसाला तीन ऋणं असतात. देवांचं ऋण, ऋषिंचं ऋण, आणि पितरांचं ऋण. या तीन ऋणातून मुक्त झाल्याशिवाय मोक्षमार्गाकडे जाता येत नाही. मधेच प्रतिबंध होतो. विप्र संन्यास घेऊन निघाला म्हणजे 'देवादारादिरूपिणः' विघ्नं येतात स्त्री-पुत्र रूपाने. अध्ययन केल्यामुळे ऋषिऋणातून तू मुक्त झालास. संतती झाल्यामुळे पितरांच्या ऋणातून तू मुक्त झालास. पण देव ऋण राहिलेलं आहे. यज्ञ केले पाहिजेत. हा मार्ग आहे. वास्तविक वसुदेवा, तुला कसलंच बंधन नाही. तुला कुठलं ऋण आहे? पूर्ण ऋणमुक्त तू आहेस. जगदीश्वर परमात्मा हा तुझा पुत्र झालेला आहे. कशाला कर्माकडे जातोस?'' वसुदेवाने

त्या ऋषिंना थांबायला सांगितलं आणि माझ्याकडून यज्ञ करवूनच जा असं म्हणाला. थांबले ऋषि. अनेक प्रकारचे यज्ञ उत्तमपणे ऋषिंनी त्याच्याकडून करविले. दानधर्म पुष्कळ झाला. अवभृथ स्नान करून सर्व ऋषिमंडळी आपापल्या आश्रमाकडे निघून गेली. इतर सर्व मंडळीही कौरव, पांडव आपापल्या नगराकडे निघून गेली. वसुदेवाच्या मनाचंही समाधान झालेलं आहे. सर्वांच्या भेटीही झाल्या आणि यज्ञही झाले.

अथैकदा आत्मजौ प्राप्तौ कृतपादाभिवन्दनौ ।
वसुदेवो अभिनन्द्याह प्रीत्या समर्षणाच्युतौ ॥१०.८५.१॥ श्री. भा.

रोज सभेमधे जाताना बलराम-कृष्णांनी वसुदेव-देवकीला वंदन करावं. एके दिवशी नित्याप्रमाणे बलराम आणि कृष्ण वसुदेव-देवकीच्या दर्शनाला आलेले असताना वसुदेवाला त्या ऋषिंच्या भाषणाची आठवण झाली. नारद म्हणाले होते, 'परब्रह्म परमात्मा त्याला हा आपला मुलगा समजतोय?' ते स्मरण झालं. आणि वसुदेव म्हणतोय,

कृष्ण कृष्ण महायोगिन् समर्षण सनातन ।
जाने वां अस्य यत् साक्षात् प्रधानपुरूषौ परौ ॥१०.८५.३॥ श्री.भा.

आपण साक्षात जगदीश्वर आहात हे मला ऋषिंच्याकडून समजलं आहे. सर्व विश्व आपणंच उत्पन्न केलं. आपणंच त्याचं संरक्षण करता आणि पुन्हा उपसंहार करता. जगामधे जेवढं दिव्य स्वरूप आहे ते आपलंच स्वरूप आहे. विभूतीरूप आहे. सर्व भूतांचे नियामक आपण आहात. ही दृष्टी मला निरंतर राहिली पाहिजे. मनुष्यजन्म आल्यानंतर पुन्हा जर या संसारात मन गुंतून राहिलं तर आपल्या स्वरूपाचं, शक्तीचं ज्ञान होणं कठीण आहे. अहंता आणि ममता या पाशामधे सर्व जगत बद्ध झालेलं आहे. तुम्ही माझे पुत्र नाही आहात. प्रधानपुरूषाचे आपण नियामक आहात. भूभार हरण करण्याकरता आपण याठिकाणी अवतार घेऊन आलेला आहात. मी आपल्याला शरण आलेलो आहे. संसाराची मला फार भिती वाटते आहे. यातून मला मुक्त करा. आपण माझे पुत्र आहात ही बुद्धी पुढे मला केव्हाही होऊ नये अशी कृपा करा. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, ''पिताजी, आपली विचारसरणी उत्तम आहे. आम्हाला मुलांना उद्देशून तुम्ही भाषण केलं की, तुम्ही ईश्वरच आहात.'' आमच्यापुरतीच एवढी बुद्धी ठेवू नका. संपूर्ण विश्व हे ईश्वराचं स्वरूप आहे. मी, तुम्ही, हे बलरामजी, हे सगळे द्वारकावासी सर्वही ईश्वररूप आहेत, ही दृष्टी ठेवा. म्हणजे हा 'नानात्मकभेदभ्रमर' जो आहे तो दूर होईल.'' भगवंताने वसुदेवाला मार्गदर्शन करून त्याचं

समाधान केलं.

देवकी एके दिवशी भगवंताला म्हणाली, ''देवा, सांदिपनी गुरूमहाराजांना त्यांचा मेलेला पुत्र तुम्ही आणून दिलाय असं मी ऐकलंय. माझी जी मुलं त्या कंसाने मारलेली त्यांना पहाण्याची माझी इच्छा आहे. तेवढी मला दाखवा.'' लगेच बलराम आणि कृष्ण सुतललोकामधे गेले. तिथं ती मुलं होती. त्याठिकाणची मुलं आणून त्यांनी देवकीला दिली. तिला अत्यंत आनंद झालेला आहे. पुन्ही ती मुलं सुतललोकात निघून गेली. ब्रह्मदेवांच्या शापामुळे त्यांना हा जन्म आलेला होता. अशारितीने भगवंतांच्या लीला अनंत झालेल्या आहेत.

राजाने विचारलं, ''महाराज, बलराम-कृष्णांची भगिनी सुभद्रा हिच्याबरोबर अर्जुनाचा विवाह झाला असं आम्ही ऐकलं. तो वृत्तांत आम्हाला सांगा.'' शुकाचार्य म्हणतात, ''राजा, अर्जुन हा काही प्रसंगाने तीर्थयात्रेला गेला होता. तीर्थयात्रा करता करता तो प्रभास क्षेत्रामधे आलेला आहे. त्याच्या कानावर बातमी आली की आपली मामेबहीण सुभद्रा ही आपल्याला द्यावी अशी कृष्णांची इच्छा आहे. वसुदेव देवकीचं मत तसंच आहे. प्रत्यक्ष सुभद्रेचीही तशीच इच्छा आहे. बलरामजींचा आग्रह आहे की दुर्योधनाला ही मुलगी द्यायची. त्या रूक्मिणीप्रमाणेच पेच निर्माण झाला. तिचा ज्येष्ठ बंधू एकटाच तिच्याविरूद्ध होता. इथंही तसंच आहे. संन्यासीवेष धारण करून तो अर्जुन द्वारकेमधल्या एका मंदिरात जाऊन राहिलेला आहे. सगळ्या लोकांना आदरभाव निर्माण झाला. दर्शनाकरता हजारो लोक येऊ लागले. बलरामजींच्या कानावर ही बातमी आली की कुणी एक सत्पुरूष आलेले आहेत. त्यांना राजवाड्यात येण्याचं निमंत्रण पाठवलं. हे स्वामीमहाराज भिक्षेला गेले. ती सुभद्राच वाढायला होती. तिनंही पाहिलेलं आहे. ओळखलंही असेल. त्याचं ते स्वरूप पाहून तिला मोह निर्माण झाला. एकदा मोठी देवाची यात्रा होती. सर्व लोक दर्शनाला जायला निघाले. सुभद्राही रथामधे बसून दर्शनाला निघाली. स्वामीमहाराज मंदिरात असताना एका दूताने येऊन सांगितलं की तुम्हाला एक निरोप आहे. कुणाचा वगैरे काही सांगितलं नाही. ''ही वेळ आहे. सुभद्रा रथामधे आहे. सर्व शस्त्रास्त्र सामग्री रथामधे आहे. पहा तुम्हाला सुभद्रेला यावेळेला नेता आलं तर शक्य आहे.'' अर्जुन लगेच गेला, रथामधे बसून धनुष्यबाण सज्ज करून त्याने सर्व सैनिकांचा पराजय केला आणि सुभद्रेला घेऊन तो गेला. बलरामजींना ही वार्ता समजली. हा खरा संन्यासी नव्हता, अर्जुन होता काय. कसा नेतो पाहू म्हणाले. रागावले बलरमजी आणि अर्जुनाबरोबर युद्ध करून सुभद्रेला परत आणायची प्रतिज्ञा त्यांनी केली. गोपालकृष्ण आले आणि त्यांनी

बलरामजींचे पाय धरले, ''दादासाहेब, कुठं निघालात?'' बलरामजी म्हणाले, ''मलाच विचारतोस कुठं निघाला म्हणून? हे सगळं कारस्थान तुझंच आहे ना?'' कृष्ण म्हणताहेत, ''कुणाचं का असेना, पण वाईट काय झालं? अर्जुनाने सुभद्रा नेली म्हणून काय बिघडलं? दादासाहेब काही विचार केला तुम्ही? ही मुलगी काय तुमची आहे वाटेल त्याला द्यायला? मुलीची इच्छा काय आहे, मुलीच्या आई–बापांची इच्छा कशी आहे. बाकीच्या आप्तबांधवांची इच्छा काय आहे याचा काहीही विचार केला नाहीत. आणि दुर्योधनाला द्यायचा आग्रह करता तुम्ही? काही विचार करा. हे काही योग्य नाही.'' बलरामजी म्हणताहेत, ''तुझी इच्छा पूर्ण झाली ना बाबा.'' कृष्ण म्हणताहेत, ''जा, मोठेपणा घ्या तुम्ही, त्याला बोलावून आणा. आदराने लग्न करून द्या.'' प्रसंगी कसं वागावं हे दाखवताहेत भगवंत. अगदी नम्र होऊन, शरण जाऊन, क्षमा मागून आपलं काम त्यांनी करून घेतलं. लग्न झालेलं आहे. सुभद्रेला घेऊन अर्जुन इंद्रप्रस्थाला परत आलेला आहे.

गोपालकृष्णांचा एक मोठा भक्त आहे. श्रुतदेव नावाचा ब्राह्मण.

कृष्णैकभःत्या पूर्णार्थः शान्तः कविरलम्पटः ।।१०.८६.१३।। श्री. भा.

मिथिलानगरीमधे रहातो आहे. कृष्णभक्ती अंतःकरणात असल्यामुळे काहीही कामना नाही. अनासक्त रितीने, अयाचित वृत्तीने गृहस्थाश्रम चाललेला आहे. काहीही संग्रह नाहीये. त्या राष्ट्राचा राजा बहुलाश्व नावाचा हा ही निरहंकार आहे. मोठा भगवद्भक्त आहे. एकदा सर्व ऋषिमंडळींना घेऊन भगवान श्रीकृष्ण मिथिला नगरीमधे प्राप्त झाले. सर्व ऋषि बरोबर होते. नारद, वामदेव, अत्रि, परशुराम, अरूणी. शुकाचार्यही होते. सर्व नगरवासीयांनी भगवान श्रीकृष्णांचा सत्कार केला. सर्व लोक दर्शनाला आलेले आहेत. राजा आणि श्रुतदेव ब्राह्मणही आलेले आहेत. आणि दोघांनीही निमंत्रण दिलं. राजाने सांगितलं की, ''भगवन् या सगळ्या ऋषिमंडळींना घेऊन आपण माझ्या राजवाड्यामधे या. माझं आतिथ्य आपण स्विकारा.'' श्रुतदेव ब्राह्मणानेही सांगितलं की माझ्या वाड्यामधे सगळ्या ऋषिमंडळींना घेऊन' आपण या. दोघांकडेही भगवान गेले. राजाने अत्यंत आदराने सर्वांची पूजा केली. भगवंतांची स्तुति केली. सर्वांचं भोजन वगैरे झालेलं आहे. इकडे श्रुतदेव ब्राह्मणाच्या घरीही भगवान सर्व ऋषिंना घेऊन आले. ऋषिंना आसनावर बसून त्यांची पूजा केली आणि काय घरात असेल फल, मूल, जल वगैरे त्यांना अर्पण केलं. तो म्हणतोय, महाराज,

नाद्य नो दर्शनं प्राप्तः परं परमपुरूषः ।

यर्हीदं शक्तिभिः सृष्ट्वा प्रविष्टो ह्यात्मसत्तया ।।१०.८६.४४ ।। श्री. भा.

''देवा, आपलं दर्शन आजच झालं असं नाहीये. ज्यावेळी आपण मायाशक्तीने सर्व विश्व निर्माण केलं ते विश्वरूप दर्शन मला पूर्वीच झालेलं आहे. आज या रूपामधेही दर्शन झालं. आपल्या लीला श्रवण करणारा, वर्णन करणारा, आपली नित्य सेवा करणारा, त्याच्यावर आपली पूर्ण कृपा असते. आपलं स्मरण सोडून नेहमी आणखी कर्मामधेच ज्याचं चित्त गुंतलेलं आहे, त्याच्या हृदयामधे आपण असूनही दूर असता. सर्वात्मा आपण आहात. आमचं संरक्षण आपण करावं. आम्हाला मार्गदर्शन करावं.'' याप्रमाणे त्या श्रुतदेव ब्राह्मणाने प्रार्थना केली असताना, भगवान बोलू लागले,

ब्रह्मंस्ते अनुग्रहार्थाय सम्प्राप्तान् विद्ध्यमून मुनीन् ।१०.८६.५१ ।। श्री. भा.

''भूदेवा, ही सगळी ऋषिमंडळी मोठी ज्ञानी, भक्त तुमच्या वाड्यामधे आज आलेली आहेत. तुमच्यावर अनुग्रह करण्याकरता आले आहेत. देव, तीर्थे पवित्र करतात पण त्याला वेळ लागतो.

ब्राह्मणः जन्मना श्रेयान् सर्वेषां प्राणिनामिह ।

तपसा विद्यया तुष्ट्या किमु मत्कलया युतः ।।१०.८६.५३ ।। श्री. भा.

जन्मतःच ब्राह्मण श्रेष्ठ आहे. मग ज्याने तपश्चर्या केली, ज्ञान मिळवलेलं आहे, संतोष वृत्तीने जो रहातो आहे. आणि ज्याच्या चित्तामधे माझा निरंतर निवास आहे, तो किती श्रेष्ठ असेल, ब्राह्मणांपेक्षा माझं हे चतुर्भुज रूपही मला प्रिय नाहीये. सर्व वेदरूप ब्राह्मण आहेत. हे कोणाला समजत नाही. संपूर्ण चराचर विश्व हे माझंच रूप आहे. तेव्हा श्रुतदेवा, हे ब्रह्मर्षि म्हणजे माझंच रूप आहे अशा श्रद्धेने त्यांची पूजा आपण करा म्हणजे माझी पूजा झाल्यासारखीच आहे. त्याप्रमाणे श्रुतदेवांने सर्वांची पूजा केली. भगवंताने श्रुतदेवाची आणि बहुलाश्व राजाची भक्ति जाणून, सर्व वेदांचं सार काय आहे, तात्पर्य काय आहे याचा उपदेश त्यांना केला. परब्रह्म, परमात्म्याचंच वर्णन सर्व वेदांनी केलेलं आहे.

वेदैश्च सर्वैः अहमेव वेद्यः ।।१५.१५ ।। भ. गीता

हा सिद्धान्त सांगितला.

शास्त्रमेव योनिः यस्य ।।

सर्व शास्त्रांनी हाच परमात्मा वर्णिलेला आहे. हे ऐकून घेतलं परीक्षित राजाने.

ब्रह्मन् ब्रह्मण्यनिर्देश्ये निर्गुणे गुणवृत्तयः ।
कथं चरन्ति श्रुतयः साक्षात् सदसतः परे ।। १०.८७.१ ।। श्री. भा.

मोठा जिज्ञासू राजा आहे. मनाने निर्मळ आहे. तो विचारतोय, ''वेदांनीच परमात्म्याचं ज्ञान होतं, सर्व वेदांचं पर्यवसान परब्रह्मामधेच आहे हे आपण कसं सांगितलंत महाराज?'' प्रत्यक्ष प्रमाणाला आकार लागतो. बाकीची सहयोगी कारणं तेज, संयोगादि ती लागतात. हा निराकार निर्गुण परमात्मा आहे त्याचं वर्णन करायला प्रत्यक्ष प्रमाण असमर्थ आहे. अनुमान प्रमाणाचंही तसंच आहे. अनुमान प्रमाणही ईश्वराचं वर्णन करायला असमर्थ आहे. फक्त वेदप्रमाणच आत्मरूपाचं ज्ञान करून देतं असं आपण म्हणालात. पण ते तरी निर्गुण निराकार परमात्म्याचं ज्ञान कसं करून देणार? परमात्मा कसा आहे? शब्दाने सांगता येत नाही.

ज्ञानेश्वरमहाराजांनी वर्णन केलेलं आहे.

ओम नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।

आद्य आहे म्हणून संबोधन केलेलं आहे, आद्या म्हणजे अनुमान प्रमाण सुचवलेलं असावं त्यांनी. सर्वांचं कारण आहे ना हा. म्हणजे कार्यावरून त्या कारणाचं ज्ञान होण्याकरता प्रयत्न करता येईल. पण समजणार नाही. दुसरं प्रमाण 'वेदप्रतिपाद्या' म्हणून ज्ञानेश्वरमहाराज म्हणताहेत. वेदांनीच त्याचं प्रतिपादन केलेलं आहे. त्याबद्दल राजाची शंका आहे. निर्गुण आणि शब्दांनी ज्याचं प्रतिपादन करता येत नाही असा परमात्मा आहे. प्रत्यक्ष प्रमाणापेक्षा शब्दप्रमाण हे अधिक व्यापक आहे, कबूल आहे. वर्तमानकालातला आपल्यासमोर असलेला पदार्थच फक्त इंद्रियांनी समजू शकतो. वर्तमानकालात सर्वही पदार्थांचे ज्ञान डोळ्याने होत नाही. शब्दप्रमाणाने वर्तमान, भूत आणि भविष्यकाळातील सर्वही पदार्थांचं ज्ञान होऊ शकतं परंतु ते शब्दप्रमाण मोठं आहे, परंतु,

संज्ञा याति गुणक्रिया ।।

कोणता तरी जातीवाचक शब्द असल्याशिवाय बोध होत नाही. हा ब्राह्मण आहे, हा क्षत्रिय आहे. कोणत्या तरी क्रियेप्रमाणे, हा पाचक आहे, हा गायक आहे. त्या त्या क्रियेच्या द्वाराने शब्दापासून बोध होतो. संज्ञा शब्द काही असतात. काही दुर्वाचक शब्द असतात, हा काळा आहे, हा गोरा आहे. अशा गुणाच्याद्वारा बोध करून देणारा शब्द आहे. ज्याच्याजवळ गुण नाहीत, क्रिया

नाही, जातीवाचक संज्ञा नाही अशा परमात्म्याचं ज्ञान शब्दाने कसं होतं हा राजाचा प्रश्न आहे. परमात्मा हा कार्यकारणाच्या पलिकडे आहे. शुकाचार्य सांगतात, ''राजा, शाखाचंद्रन्याय आहे बाबा, इंद्रिये आहेत, बुद्धि आहे. ही सगळी साधनं परमेश्वराने आपल्या स्वरूपाचं ज्ञान करून घेण्याकरताच दिलेली आहेत. सगुणाचंच ज्ञान अगोदर करून घ्यायचंय. अध्यारोप का असेना. आणि नंतर निर्गुणामधे बुद्धि जाऊ शकते. याबद्दल तुला पूर्वी घडलेला एक इतिहास सांगतो. नारद महर्षि एकदा नरनारायणांच्या दर्शनाकरता बद्रिकाश्रमात गेले होते. त्याठिकाणी नारदांनी हाच प्रश्न विचारला, 'निर्गुण, निराकार, निष्क्रिय अशा परमात्म्याचं ज्ञान शब्दाने कसं होतं !' आप्तवाक्य म्हणा, वेद अपौरुषेय आहेत, स्वयंभू आहेत परंतु प्रमाण श्रेष्ठ आहे ठीक आहे पण असमर्थ आहे ना ! वाचस्पतीमिश्रांनी परमात्म्याचं ज्ञान बुद्धिने होतं असं सांगितलं, उपनिषदांच्या संदर्भानेच सांगितलं.

अग्र्या बुद्ध्या दृश्यते।

असं सांगतात. श्रेष्ठ, निर्मळ बुद्धि झाल्यानंतर परमात्म्याचं ज्ञान होतं. पण इथे भगवंतानी उपदेश केला की सर्व वेदांचं पर्यवसान परमेश्वर स्वरूपाच्या ठिकाणी आहे. म्हणजे वेदांनीच परमात्मा समजतो. वेदव्यासही शास्त्रयोनित्वात् सावधारणं सांगताहेत. शास्त्रमेव योनिः प्रमाणं यस्य त्याबद्दल राजाचा प्रश्न आहे. नारदांनी विचारल्यानंतर भगवान नारायण म्हणाले, ''बाबा, पूर्वी एकदा जनलोकामधे सर्व ऋषिमंडळी एकत्र बसलेली होती. आणि त्यांचा ब्रह्मविचार चाललेला आहे. तुम्ही श्वेतद्वीपामधे अनिरुद्ध दर्शनाकरता गेला होतात म्हणून तुम्ही त्या सभेमधे नव्हता. श्रुतीनी ब्रह्माचं ज्ञान कसं होतं ? दुसरं कोणतंही प्रमाण नाहिये. सनंदनांना सर्वांनी वक्ता म्हणून बसवलं आणि बाकी सर्व श्रोता म्हणून ऐकताहेत. सनंदनांनी बोलायला सुरवात केली,

स्वसृष्टमिदमापीय शयानं सह शक्तिभिः।
तदन्ते बोधयाञ्चक्रुस्तल्लिङ्गैः श्रुतयः परम्।।१०.८७.१२।। श्री. भा.
यथा शयानं सम्राजं वन्दिनस्तत्पराक्रमैः।
प्रत्यूषेऽभ्येत्य सुश्लोकैर्बोधयक्त्यनुजीविनः।।१०.८७.१३।। श्री. भा.

श्रुतीने परमेश्वराचं प्रतिपादन कसं केलेलं आहे हे सांगताहेत. प्रलय झालेला आहे. सृष्टीचा उपसंहार केलेला आहे आणि भगवान योगनिद्रेमधे निमग्न आहेत. मन स्थिर करून राहिलेले आहेत. ईक्षण नाही, संकल्प नाही अशी स्थिती म्हणजे निद्रा आहे. प्रलयकाल संपला, सर्व श्रुती

त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न करतात. स्तुति करताहेत.

जय जय जहि अजां अजित दोषगृभीतगुणां
त्वमसि यदात्मना समवरुद्धसमस्तभगः ।
अगजगदोकसां अखिलशःत्यवबोधक ते
क्वचित् अजया आत्मना च चरतो अनुचरेन्निगमः ।।१०.८७.१४ ।। श्री. भा.

वेद स्तुति करताहेत, ''हे भगवंता, आपला जयजयकार असो आपला उत्कर्ष आपण प्रगट करा. ही जी अजा आहे. अविद्येला अनादि म्हणलंय. तिला जन्मही नाही आणि नाशही नाही.

अविद्यासहकार्येण नासीदस्ति भविष्यति ।
नाहीच आहे. अविद्या, माया नाहीच.
अगा जे झालेचि नाही । त्याची वार्ता पुससी काही ।

समर्थ म्हणताहेत. काहीच नाही. विश्वही नाही आणि ती मायाही नाही. पण आम्हाला तर अनुभव येतो आहे. सुख दुःख दिसताहेत. त्यामुळे असत म्हणता येणार नाही. प्रचिती आहे. त्यामुळे ही अजा जी कोणालाही दूर करता येत नाही, ती अजा नष्ट करा, अविद्या दूर करा हा आपला उत्कर्ष आहे. तिचे सगळे गुण दोषांनी आच्छादित आहेत. दोषा करताच तिच्या गुणांचा उपयोग होतो. आणि या अजेने आपल्या शक्तिलासुद्धा आवरण घातलेले आहे. सर्व स्थावरजंगमात्मक विश्वशक्तिला उद्बोध करणारे, जागृत करणारे आपण आहात. सृष्टीनिर्मितीच्या वेळेला आपण या अजेचा अंगिकार करता. इतरवेळी, प्रलयाच्यावेळी आपण स्वयं आपल्या महिम्यामधे स्थित असता; आत्मस्वरूपामधे स्थित असता. आणि हे सगळं आपलं वर्णन हा निगम म्हणजे वेद करतो आहे. वेद आपलंच वर्णन करतात हे त्यांना सांगायचंय. वेदांमधे पुष्कळ देवतावर्णन आहे. तरीसुद्धा आपल्याठिकाणी सर्वांचा समावेश आहे. या पृथ्वीचे एकंदर अनेक विकार उत्पन्न झालेले आहेत परंतु मृत्तिका हीच सत्य आहे. मृत्तिकेपासूनच जन्माला येतात आणि शेवटी मृत्तिकेमधेच विलीन होतात. म्हणून हे संपूर्ण विश्व जे आहे नाना प्रकारांनी दिसणारं ते शेवटी आपल्याठिकाणीच विलीन होणार आहे. म्हणून आपल्याठिकाणीच सर्व वेदांचं तात्पर्य आहे. आपलं स्वरूपच वेदांना सांगायचं आहे. जे काही विवर्तवादाप्रमाणे दिसणारं हे भौतिकरूप आपलंच आहे. हे मोठेमोठे ज्ञानी महात्मे आपल्या पापातून मुक्त होण्याकरता आपल्या चरित्रामृतात, कथामृत समुद्रात प्रवेश करतात आणि संतापातून मुक्त होतात. सगुण रूपाचं चिंतन करतात, स्मरण करतात, त्यानेसुद्धा

त्यांच्या तापांची निवृत्ति होते. मग आपलं हे जे नित्य आनंदरूप आहे याचं चिंतन जर ते करू लागले तर ते मुक्त होणार नाहीत का ? आपलं स्वरूप आरंभाला अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय अशा प्रकारचं कोषामधे आहे आणि त्याच्या शेवटी अधिष्ठानरूप असं आपलं शुद्ध रूप आहे. त्याचं ज्ञान करून घेण्याकरता भिन्न भिन्न उपासना ज्ञानी लोक करताहेत. हृदयस्थानामधे परमात्मा आहे, उदरस्थानामधे परमात्मा आहे म्हणजे परमात्म्याला काही विशिष्ट स्थान आहे का ? रूप आहे का ? हे जे शरीरामधे वेगवेगळ्या ठिकाणी स्थान दाखवलेलं आहे ते केवळ शाखाचंद्रन्यायाने आहे. कोषादिकामधे परमात्मा आहे. देहत्रयामधे परमात्मा आहे याचा अर्थ चंद्र हा शाखेपर्यंत आहे असं आधी दाखवलं जातं. शाखेपर्यंत दृष्टी केली की मग चंद्रमंडलापर्यंत दृष्टी जाते, याच न्यायाने त्या त्या स्थानामधे त्या त्या उपासना भगवत्स्वरूपाच्या करायच्या आणि मूळ ब्रह्मस्वरूपाचं ज्ञान करून घ्यायचं. हे आपलं जे नित्य आनंदरूप आहे, अनुभवरूप आहे ते कळण्याकरता अगोदर सगुणभक्ति करायला पाहिजे, असं सनंदन सांगताहेत. शुद्ध जे निर्गुण निराकार आत्मतत्व ते समजून घेण्याला अत्यंत कठीण आहे. पण ते समजून देण्याकरताच आपण सगुण साकार झालेले आहात. आपल्या लीला कथारूपी अमृताब्धीमधे ज्यांनी अवगाहन केलेल्या आहेत असे

आपले भक्त,

न परिलषन्ति केचिदपवर्गमपीश्वर ते ।।१०.८७.२१।। श्री. भा.

त्या भक्तिप्रेमामुळे त्यांना मोक्षाची सुद्धा इच्छा राहात नाही. आपल्या चरणाची सेवा करणारे जे भक्त आहेत त्यांची संगती, त्यांची सेवा हे भक्त करतात आणि त्यामुळे अनात्म पदार्थांपासून, सर्व सृष्टीपासून ते विरक्त होतात. आणि आपल्या भक्तांच्या संगतीने त्यांची भक्ति अनन्य होते आहे. तेव्हा आपली भक्ति जर उत्पन्न झाली तर आपलं ज्ञान होईल. प्रलयाच्या वेळी काहीही नाही, वेद नाही, शास्त्र नाही, गुरू नाही कोणी नाही. तेव्हा या भक्तिच्या प्रभावानेच आपल्या स्वरूपाचं ज्ञान होणं शक्य आहे. ती भक्ति उत्पन्न होण्याकरता आपलं ध्यान अखंड ज्ञान घडण्याकरता वैराग्य पाहिजे. अनात्म पदार्थांमधे जर मन गुंतून राहिलं तर ध्यान घडणार नाही, भक्ति येणार नाही आणि ज्ञान होणार नाही. आणि ही सगळी साधनं व्यवस्थित चालू राहाण्याकरता महापुरुषांचं मार्गदर्शन पाहिजे. सद्गुरुंची प्राप्ती झाली पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय साधनाभ्यास व्यवस्थित होणार नाही. म्हणून ईशभक्ति दृढ होण्याकरता गुरुभक्तिचीही आवश्यकता आहे.

विजितहृषीकवायुभिरदान्तमनस्तुरगं
य इह यतन्ति यन्तुमतिलोलमुपायखिदः ।
व्यसनशतान्विताः समवहाय गुरोश्चरणं
वणिज इवाज सक्त्यकृतकर्णधरा जलधौ ।।१०.८७.३३ ।। श्री. भा.

आपली इंद्रिय जिंकलेली आहेत. प्राणवायूला जिंकलेलं आहे. या मनालाही बांधून टाकू. या मनोरूपी अश्वाला आम्ही बांधून ठेवू म्हणून प्रयत्न करणारे जे आहेत त्यांना पुष्कळ संकटंमधे येतात. सद्गुरुचा त्याग करून, मार्गदर्शकाची आम्हाला जरूर नाही असं म्हणून जे स्वतःच्या स्वतः प्रयत्न करतात त्यांच्या ताब्यामधे मन राहात नाही. काही व्यापारी मंडळी समुद्रातून नौकेने निघाली. नावाडी आलेला नाही. नसेना का म्हणाले आम्हीच घेऊन जाऊ आणि समुद्राच्या मोठमोठ्या लाटा जेव्हा आदळू लागल्या तेव्हा ती नौका ताब्यात राहिना. नंतर तो नावाडी पोहोचला आणि त्याने ती नौका तीरावर आणलेली आहे. तशी स्थिती यांची होते. म्हणून सद्गुरुची अत्यंत आवश्यकता आहे.

सत इदमुत्थितं सदिति चेन्ननु तर्कहतं ।
व्यभिचरति क्व च क्व च मृषा न तथोभययुक्।। १०.८७.३६ ।। श्री. भा.

हे जगत सत्‌तत्त्वापासून उत्पन्न झालेलं आहे. तेव्हा ते सत्यच आहे. पण तर्काने ते जमत नाही ना. सततत्त्वापासून उत्पन्न झालं म्हणलं तरी दृष्टविरोध आहे. विनाशी आहे सगळं. अबाधित नाहिये. त्याच्यापासून पंचमहाभूत उत्पन्न झाली त्यांना सत मानायचं, त्यांच्यापासून उत्पन्न झाली आहे म्हणून ! उत्पन्न झालेलं आहे असं म्हणलं की ते सत राहातच नाही. पुष्पदंताने महिम्नस्तोत्रामधे भगवंताची स्तुती करताना एक श्लोक अगदी तर्कप्रचुर घातलेला आहे.

अजन्मानो लोकाः किं अवयववन्तोऽपि

आपल्याबद्दल लोकांच्या मनात संशय का येतो माहीत नाही. जग उत्पन्न झालंच नाही म्हणतात नित्य आहे अशी एक समजूत आहे. उत्पन्न झालं नाही ? सावयव दिसणारं जग हे कार्य आहे.

सावयवत्वात् कार्यत्वात् ।।

कार्य म्हणजे उत्पन्न झालेलं आहे म्हणजे याचा कर्ता कोणीतरी मानलाच पाहिजे.

किं अवयनवन्तोऽपि अजन्मानः ?

जगतां अधिष्नतारं किं भवविधिरनादृत्य भवति ?

कर्ता न मानता आपोआप कसं उत्पन्न होईल ? मग आहेत की पुष्कळ योगी आहेत, श्रेष्ठ पुरुष आहेत. कोणीतरी जीवाने उत्पन्न केलं आहे.

अनीशो वा कुर्याद् भुवनजनने कः परिकरम् ।

सगळे अनीश आहेत, असमर्थ आहेत. कुणीही जीव एवढी सृष्टी उत्पन्न करू शकणार नाही. हा सगळा विचार केल्यावर

यतो मन्दास्त्वां प्रति अमरवर संशेरत इमे ।

अज्ञानी लोक आपला संशय घेताहेत. तर्काने आपली सिद्धी होऊ शकत नाही. तर असे तर्कही आणखी बरोबर नाही आहेत. प्रत्यक्ष व्यभिचार आहे, वदतो व्याघात आहे. तेव्हा कोणत्याही प्रमाणाने आपली सिद्धी करता येत नाही. जगाला सत्य म्हणता येत नाही. ते सगळं आभासात्मक आहे. सत्यही नाही आणि असत्यही नाही. अनिर्वचनीयम् हाच विवर्तवाद आहे. तर असं जे आपलं स्वरूप आहे ते समजण्याकरता जर सर्व साधनं मिळाली, गुरुभक्ति झाली, वैराग्य उत्पन्न झालं, ध्यानाची प्राप्ती झाली, भगवद्प्रेम आनंद निर्माण झाला म्हणजे आपल्या स्वरूपाची प्राप्ती होते.

अस्मृतकण्ठमणिः ।।१०.८७.३९ ।। श्री. भा.

आपल्याच गळ्यात असलेला मणी शोधावा तशी स्थिती वासना ज्यांच्या मनात उत्पन्न झालेल्या आहेत त्यांची होते. जवळ असून त्यांना आपली प्राप्ती होत नाही.

असुतृपयोगिनां उभयतोऽपि असुखम् ।।१०.८७.३९ ।। श्री. भा.

वासनेमधे निमग्न झालेले लोक इहलोकातही सुखी होत नाहीत आणि परलोकातही सुखी होत नाहीत. वासनाक्षय झाला पाहिजे. असं पुष्कळ श्रुतींनी वर्णन केलेलं आहे. आणि क्रमाक्रमाने आत्मतत्वापर्यंत जाता येतं असा मार्ग सनंदनानी दाखवलेला आहे. याप्रमाणे नारायणांनी नारदांना सांगितलं सर्व एकंदर वेद, उपनिषदं, पुराणं याचं साररूप असं हे वेदस्तोत्र नारदांनी ऐकलेलं आहे. नारदांनाही आनंद झाला आणि त्यांनी व्यासांना हे सांगितलेलं आहे.

परीक्षित राजाने विचारलं, ''महाराज ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्यामधे श्रेष्ठ कोण आहे ? सांगा आपण धनिक लोकांचं लक्ष लक्ष्मीपतीकडे जात नाही म्हणतात. काय कारण आहे ?''

शुकाचार्य सांगतात, ''राजा, भगवान शंकरपरमात्मा ज्ञानमूर्तीच आहेत. विष्णूही असेच आहेत. मनामधे काही विकल्प निर्माण होतात, संदेह निर्माण होतात आणि त्यामुळे दोषदृष्टी उत्पन्न होते. तिघेही देव प्रसाद अनुग्रह करू शकतात. पूर्वीचा एक इतिहास तुला सांगतो. वृत्रासुर असुराने नारदांची भेट झाल्यावर विचारलं, 'तीन देवांमधे लवकर प्रसन्न होणारा देव कोणता ?' नारदांनी सांगितलं, 'शंकर लवकर प्रसन्न होतात. आशुतोष त्यांना म्हणतात. दोष दिसले की लगेच रागावतात आणि थोडेसे गुण दिसले की प्रसन्नही लगेच होतात. बाणासुरावर संतुष्ट झाले, रावणावर संतुष्ट झाले. त्यांना ऐश्वर्य दिलं आणि आपणच संकटात पडले.' वृत्रासुर ते ऐकून तपश्चर्येकरता केदार क्षेत्रामधे गेला आणि त्याने आपल्या शरीराचे तुकडे करून हवन करायला सुरवात केली. शेवटच्या सातव्या दिवशी आपलं मस्तक तोडून अर्पण करायला तो तयार झाला असता भगवान शंकर परमात्मा प्रसन्न झाले. त्याला हाताने वर काढलं आणि वर मागायला सांगीतला. त्याला पार्वतीचं हरण करायचं होतं. त्याने मागितलं,

यस्य यस्य करं शीर्ष्णि धास्ये स म्रियतामिति ।।१०.८८.२१।। श्री. भा.

ज्याच्या डोक्यावर मी हात ठेवीन त्याचा तत्काल नाश व्हावा. वर द्यायचा कबूल केल्यामुळे शंकरानी तो दिलेला आहे. आणि तो असुर शंकरांच्या डोक्यावरती हात ठेवायला निघाला. शंकर पळताहेत, मागे तो असुर आहे. वैकुंठलोकामधे भगवान शंकर प्राप्त झाले आणि सर्व वृत्तांत महाविष्णूंना समजला. शंकरांना तिथंच थांबवलं आणि आपण ब्रह्मचाऱ्याचं रूप घेऊन बाहेर आले. तेवढ्यात तो असुर आलाच. त्याला विचारताहेत, ''काय वृत्रासुरा, बैस जरा, दमलेला दिसतोस. कुठून आलास ? कशाकरता आलास ?'' त्याने सर्व सांगितलं, ''मला असा वर शंकरांनी दिलाय, त्याच्याच डोक्यावर हात ठेवायला मी आलोय.'' भगवान म्हणाले, ''असं काय ! शंकराचं बोलणं तुला खरं वाटलं ? काय शंकराच्या वचनावर विश्वास ठेवलास ! आम्ही तर कधीच विश्वास ठेवत नाही. कुठेही राहातो, कसाही वागतो. तू वाटलं तर आपल्या डोक्यावर हात ठेऊन पाहा, अनुभव घेऊन पाहा, काही तुला होणार नाही मी सांगतो. खोटं बोलतात शंकर.'' आणि मूर्ख तो असुर, भगवंतांच्या वचनावर विश्वास त्याने ठेवला आणि ठरवलं की हा अनुभव घ्यायचा आणि मग शंकरांबरोबर युद्ध करायचं. असा विचार करून त्याने आपल्या मस्तकावर हात ठेवला मात्र तो गतप्राण होऊन पडलेला आहे. आत आले भगवान म्हणाले, ''महाराज, त्या दैत्याचा नाश झालेला आहे. असा वर कशाला देता ? भगवान शंकर कैलास पर्वतावर निघून गेलेले आहेत.

दुसरा एक प्रसंग सांगताहेत. एकदा सरस्वती नदीच्या तीरावर ऋषिमंडळी यज्ञ करत असताना त्यांनी ब्रह्मकुमार भृगुऋषिंना कोणता देव श्रेष्ठ आहे हे पाहून यायला सांगीतलं. प्रथम ब्रह्मलोकामधे भृगु ऋषि गेले आणि तसेच उद्धटपणे उभे राहिले. बापाला नमस्कार सुद्धा केला नाही. ब्रह्मदेव रागावले. झालं, परीक्षा झाली. भृगु ऋषि तिथून निघाले आणि कैलास पर्वतावर आले. शंकर भगवान स्वागत करायला लागल्यावर भृगु ऋषि म्हणाले, ''लांब राहा, शिवू नकोस, स्मशानात राहातो, कसाही वागतो.'' हे ऐकून शंकरही रागावले. त्रिशूल येऊन अंगावर आले. तिथून भृगु ऋषि वैकुंठालोकात आलेले आहेत. भगवान महाविष्णू पर्यंकावर स्वस्थ पडलेले होते. एकदम जाऊन भृगु ऋषिंनी त्यांच्या छातीवर लाथ मारली. उठले भगवान, खाली उतरले. भृगु ऋषिंच्या चरणावर मस्तक ठेवलेलं आहे. ''या महाराज, मला कळलं नाही आपण आलात ते. माझा अपराध झाला. ऋषि महाराज आपले चरण किती कोमल आहेत. अनेक लढाया करून आणि शस्त्रप्रहार झाल्यामुळे आमची छाती फार बळकट झालेली आहे. तुमच्या पायाला काही लागलं नाही ना ?' वेदना झाल्या नाहीत ना ?'' असं विचारून भगवंत भृगु ऋषिंचे पाय चेपत बसले. हे वाक्य भगवंताचं ऐकलं भृगुऋषिंनी आणि त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहायला लागल्या. त्यांनी आपला अनुभव सांगितला. भगवान श्रीविष्णू हे सर्वश्रेष्ठ आहेत. सत्वगुण संपन्न आहेत. ज्ञान आहे, वैराग्य आहे, ऐश्वर्य आहे. त्यावेळी सर्व ऋषिंनी भगवान महाविष्णूंची स्तुति, प्रार्थना केलेली आहे.

एके दिवशी द्वारकेमधे एका ब्राह्मणाला मुलगा झाला आणि लगेच मरण पावला. ते मुलाचं प्रेत घेऊन तो ब्राह्मण राजसभेमधे आला आणि म्हणतोय,

ब्रह्मद्विषः शठधियो लुब्धस्य विषयात्मनः ।
क्षत्रबन्धोः कर्मदोषात् पञ्चत्वं मे गतोऽर्भकः ।।१०.८९.२४ ।। श्री. भा.

अत्यंत लोभी, विषयासक्त जो क्षत्रिय आहे याच्या दोषामुळे, पापामुळे माझ्या मुलाला मृत्यु आला. ते प्रेत त्याने तिथे टाकलं आणि घरी निघून गेला. दुसरा मुलगाही मेला, तेही प्रेत आणून टाकलं. तिसरही प्रेत आणून टाकलं. एकदा अर्जुन तिथं होता. त्या ब्राह्मणाचं भाषण श्रवण करून अर्जुनाने त्या ब्राह्मणाला विचारलं, ''इथे कुणी धनुर्धारी नाही का ? हे नुसते नामधारी क्षत्रिय दिसताहेत. तुमची मुलं मरताहेत, तुम्ही इथं आणून टाकता आहात आणि तुमच्याकडं कुणाचंही लक्ष नाही. मी तुमच्या मुलाचं रक्षण करतो. काही काळजी करू नका. आणि जर माझी प्रतिज्ञा

पूर्ण झाली नाही तर मी अग्निमधे प्रवेश करीन.'' ब्राह्मण म्हणाला, ''इथे बलराम आहेत, भगवान श्रीकृष्ण आहेत, प्रद्युम्न आहे, अनिरुद्ध आहे रक्षण करणारा ? तुझ्या भाषणावर काही आमचा विश्वास बसत नाही.'' अर्जुन म्हणाला, ''मला तुम्ही ओळखलं नाही ? मी राम नाही, कृष्ण नाही, प्रद्युम्न नाही. माझ्या पराक्रमाचा तुम्ही अवमान करू नका. मी अर्जुन आहे. शंकरांनासुद्धा युद्धात मी पराजित केलेलं आहे.'' ब्राह्मण म्हणाला, ''बरं बाबा, कर तू रक्षण.'' भार्येचा प्रसूतिकाल आला असताना त्याने येऊन अर्जुनाला सांगितलं, ''अर्जुना ही वेळ आहे, कर आता रक्षण.'' मोठा धनुर्धारी अर्जुन, सर्व शस्त्र, अस्त्रं याचं ज्ञान आहे. आचमन करून, दिव्य अस्त्रं सिद्ध करून तो त्या ब्राह्मणाच्या घरी आला आणि त्याने घराभोवती बाणाचा एक पिंजराच तयार केला. आत वारासुद्धा जाणार नाही. पण गंमत अशी झाली की तो मुलगा जन्माला आला आणि त्याचं शरीरही नाहिसं झालं. आत्तापर्यंत प्राण जात होता, शरीर तरी राहात होतं. इतका बंदोबस्त करून सुद्धा शरीरदेखील नाहिसं झालं आहे. ब्राह्मणाने येऊन त्याची निंदा केली, ''काय हा मूर्ख अर्जुन ! फार बढाई मारली. मी शंकरांना संतुष्ट केलं, मी राम नाही, कृष्ण नाही आणि मुलाचं शरीरही नाहिसं झालं ?'' अर्जुन आपल्या मंत्रबळाने यमाच्या नगरात जाऊन आला. मुलगा तिथे नाहिये. इंद्राच्या, वरूणाच्या, अग्निच्या सर्व लोकपालांच्या नगरात जाऊन आला, मुलगा काही मिळालेला नाही. ब्राह्मणाचा मुलगा काही मिळालेला नाही, आपली प्रतिज्ञा काही पूर्ण झाली नाही म्हणून अग्निप्रवेश करण्याकरता अर्जुन निघालेला असताना गोपालकृष्ण तिथे आले. त्याच्या खांद्यावर हात ठेवला, म्हणाले, ''काय अर्जुना काय चालवलंय ?'' तो रागावला म्हणाला, ''तुम्हाला काही माहितीच नाही असं विचारताय ?'' कृष्ण म्हणाले, ''माहिती नसायला काय झालंय. तू काय बोललास ते मला कळलंय. मी कृष्ण नाही, मी राम नाही, मी तुझ्या मुलाचं रक्षण करतो. मग कर रक्षण म्हणून आम्ही गप्प बसलो. तुला मुलं पाहिजेत ना ? मला का सांगितलं नाही ? सगळी मुलं तुला दाखवतो, एकच कशाला.'' रथामधे बसून कृष्णार्जुन निघालेले आहेत. पश्चिम दिशेला गेले. सप्तद्वीपं, सप्तसमुद्र, ओलांडून शेवटी लोकालोक पर्वतापर्यंत आलेले आहेत. पुढे अंधार आहे. घोडे अडखळायला लागले. सहस्त्रसूर्याचं तेज असलेलं आपलं सुदर्शनचक्र भगवंतानी पुढं पाठवलं, आणि नंतर पाण्यामधे त्यांनी प्रवेश केला. एक मोठा सहस्त्रफण्यांचा नाग आहे. आणि त्याच्यावरती भगवान श्रीहरी पडलेले आहेत. दोघांनीही साष्टांग नमस्कार श्रीहरींना केलेला आहे. अर्जुनाला तर भितीच वाटली, कुठं आलो आपण ? श्रीहरी सांगताहेत, ''बाबांनो, तुम्हाला पाहावं अशी इच्छा झाली म्हणून ब्राह्मणाचे पुत्र इथं आणलेले आहेत. तुम्ही अवतार घेतलेला आहे.

भूभार हलका करण्याकरता. लवकर इकडे परत या. सर्व ब्राह्मणाची सर्व मुलं बरोबर घेऊन कृष्णार्जुन द्वारकेला परत आले आहेत. त्यावेळी अर्जुनाची खात्री झाली.

यत्किञ्चित् पौरुषं लोके मेने कृष्णानुकम्पितम् ।।१०.८९.६३ ।। श्री. भा.

जगामधे जेवढं पौरूष आहे तेवढं कृष्णांचं पौरूष आहे. अशा रितीने भगवंताच्या अनेक लीला झालेल्या आहेत. सोळा हजार आठ राण्या आहेत, त्यांचे संसार आहेत. द्वारकेमधे किती यादव मंडळी राहात होती. एकशे एक पुरं त्यांची होती. सर्व यादवांना शास्त्राप्रमाणे मार्गदर्शन चाललेलं आहे. स्वत: भगवान आचरण करून दाखवताहेत. याप्रमाणे भगवंतानी भूतलावर अवतार धारण करून, धर्ममार्ग, वैदिक मार्ग सगळ्यांना शिकवलेला आहे. अनेक दुष्टांचा संहार केलेला आहे, अनेक लीला केलेल्या आहेत. सर्वांच्या दुरितांचा क्षय होण्याकरता या कथा नित्य श्रवण कराव्यात. कथाश्रवणाने, संकीर्तनाने परमेश्वराची भक्ति अंत:करणामधे उत्पन्न होते. असं हे संपूर्ण कृष्णचरित्र शुकाचार्य महाराजांनी परीक्षित राजाला सांगीतलेलं आहे.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा । बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात् ।।
करोति यद्यत् सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयेतं तत् ।।११.२.३६ ।। भा.
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।
।।गोपालकृष्ण भगवान् की जय ।।
।। श्रीमद्भागवत सहावा दिवस समाप्त ।।

# ।। श्रीमद्भागवत सातवा दिवस ।।



ॐ नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने ।
यस्यावस्त्यायतेनामविघ्नसागरशोषणे ।।
यस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात् ।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ।।
विशुद्धज्ञानदेहाय त्रिवेदीदिव्यचक्षुषे ।
श्रेयःप्राप्तिनिमित्ताय नमः सोमाऽर्धधारिणे ।।
यो देवः सवितास्माकम् धियोधर्मादिगोचरः ।
प्रेरयेत्तस्य त्वद्भर्गस्तद्वरेण्यम् उपास्महे ।।
सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते ।।
नमो आदिरूपा ॐकार स्वरूपा । विश्वाचिया रूपा पाण्डुरंगा ।।
तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्व काळ ।।

तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन। सर्व होणे जाणे तुझे हाती।।
तुका म्हणे जेथे नाही मी-तू-पण। स्तवावे ते कवणे कवणालागी।।
यत् कीर्तनं यत्स्मरणं यदीक्षणम् यद् वन्दनम् यद् श्रवणम् यदर्हणम्।
लोकस्य सद्यो विधुनोति कल्मषम् तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
विवेकिनो यच्चरणोपसादनात् संगं व्युदस्योभयतोऽन्तरात्मनः।।
विन्दन्ति हि ब्रह्मगतिं गतक्लमाः। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
तपस्विनो दानपरा यशस्विनो। मनस्विनो मन्त्रविदस्सुमङ्गलाः।।
क्षेमं न विन्दन्ति विना यदर्पणम्। तस्मै सुभद्रश्रवसे नमो नमः।।
माला पात्रे च डमरू शूले शंख सुदर्शने।
दधानम् भक्तवरदम् दत्तात्रेयम् नमाम्यहम्।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्ताम्। संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना।
अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन्। प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम्।।
मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम्।
यत् कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।
आपदामपहर्तारम् दातारम् सर्वसंपदाम्।
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम्।।
यत्र यत्र रघुनाथकीर्तनं। तत्र तत्र कृत मस्तकांजलिम्।
बाष्पवारिपरिपूर्णलोचनं। मारुतिं नमत राक्षसान्तकम्।।

पुस्तकजपवटहस्ते वरदाभयचिन्ह चारुबाहुलते।
कर्पूरामलदेहे वागीश्वरी चोदयाशु मम वाचम्।।

श्रीगणेशाय नमः

श्रीगुरुचरणारविन्दाभ्याम् नमः।

बलराम, यादव यांना बरोबर घेऊन गोपालकृष्णांनी भूमीचा भार हलका केला. कलिचं आगमनही आता लवकरच होणार होतं. पांडवांना कौरवांच्या कपटपणामुळे अत्यंत राग आलेला होता. त्यांना निमित्त करून भारतीय युद्ध भगवंताने घडवून आणलं आणि त्यानिमित्तानेही भूभार

बराच हलका केला आहे. इतकं करूनही त्यांचं समाधान झालं नाही. मग यादवांकडे त्यांची दृष्टी गेली. माझे असल्यामुळे या यादवांचा कुणीही पराजय करू शकणार नाही म्हणाले. तेव्हा यांच्यामधेच कलह निर्माण करावा आणि यांचा नाश झाल्यावर आपण स्वस्थानाला परत जावं असं भगवंताने ठरवलं. ईश्वराचा संकल्प झालेला आहे. विप्रशाप यादवांना झाला आणि त्या शापाचं निमित्त करून आपल्या कुळाचा उपसंहार भगवंताने केलेला आहे. अनेक लोकोत्तर लीला भगवंताने केल्या. सर्व ठिकाणी कीर्ति पसरलेली आहे. त्या लीलाश्रवणातून सर्वही भक्त अज्ञान अंधःकारातून उद्धरून जातील हा उद्देश आहे.

परीक्षित राजा विचारतोय, ''महाराज, ब्राह्मणांबद्दल अत्यंत आदर बाळगणारे यादव त्यांना विप्रशाप कसा झाला आणि त्यांच्यामधे भेद कसा झाला ? त्यांची संघटना प्रसिद्ध होती. शुकाचार्य सांगतात, ''राजन,

बिभ्रद् वपुः सकलसुन्दरसन्निवेशं
कर्माचरन् भुवि सुमङ्गलमाप्तकामः ।
आस्थाय धाम रममाण उदारकीर्तिः
संहर्तुमैच्छत कुलं स्थितकृत्यशेषः ।।११.१.१० ।। श्री. भा.

सौंदर्यसंपन्न स्वरूप भगवंताचं आहे. नामापेक्षा रूपाच्या ठिकाणी आसक्ती होण्याचा याठिकाणी संभव आहे. नाम श्रेष्ठ का रूप श्रेष्ठ असा एक विषय महात्म्यांनी मांडलेला आहे. रूप हे नंतर समजणारं आहे, साक्षात्कार कृपा झाल्यानंतर. प्रथम नामाचीच आवश्यकता आहे. असं अत्यंत सुंदर रूप धारण करून, सर्व लोकांना मार्गदर्शक असं कर्म भगवंताने केलेलं आहे. आपल्या कुलाचा उपसंहार करण्याचा भगवंताचा संकल्प झाला. द्वारकेमधे यज्ञयागादि कर्मे नेहमी व्हायची. त्यानिमित्ताने ऋषिमंडळी यायची. एकदा यदुराजाच्या राजवाड्यात पुण्यकर्म होतं म्हणून सगळे ऋषि आले होते. ते कर्म झाल्यानंतर मोठमोठे ब्रह्मार्षि विश्वमित्र, अंगिरा, नारद, असित, दुर्वास, अत्रि, भृगु आपापल्या आश्रमाला निघाले असताना एका उपवनामधे झाडाखाली विश्रांतीकरता थांबले होते. यादवांची तरूण मुलं, त्या दिवशी त्यांना काय दुर्बुद्धि झाली कुणास ठाऊक, सांब जो आहे जांबवतीचा मुलगा याला त्यांनी लुगडं नेसवलं, स्त्रीवेष दिला. ती गर्भिणी आहे असं दाखवलं. त्याला घेऊन ऋषिंच्या समोर गेले, नमस्कार केला आणि प्रार्थना करताहेत, ''ऋषिमहाराज ही गर्भिणी स्त्री आहे. प्रसूतिकाल आलेला आहे. मुलगा व्हावा अशी तिची इच्छा आहे तेव्हा मुलगा

होईल का नाही ते कृपाकरून सांगा.'' ऋषिंना राग आलेला आहे. परीक्षा पाहताहेत ऋषिंची ! रागाने त्यांनी लगेच सांगितलं म्हणजे शापच दिला.

जनयिष्यति वो मन्दाः मुसलं कुलनाशनम् ।।११.१.१६ ।। श्री. भा.

या स्त्रीपासून तुमच्या कुलाचा नाश करणारं एक मुसळ उत्पन्न होणार आहे. घाबरली ती मुलं. सांबाचा स्त्रीवेष काढून पाहिलं तर लोखंडाचं एक मुसळ त्याठिकाणी उत्पन्न झालेल आहे. काय करायचं आता. राजवाड्यामधे आले, सर्व वृत्तांत उग्रसेन राजाला सांगीतला आणि ते मुसळही त्याला दिलं. श्रीकृष्णांना काही सांगितलं नाही. त्यांनी आधीच ताकीद दिली होती की ब्राह्मणांचा अनादर कधीही करू नका. त्याच्या विरुद्ध झालं हे. ब्राह्मणांची अवकृपा आणि भगवंताचीही अवकृपा. यादवांची उन्मत्त वृत्ति अगोदरच श्रीकृष्णांना समजली होती म्हणून त्यांचा नाश करण्याचा संकल्प झाला. अमोघ विप्रशाप झाला आणि ते मुसळही पाहिलं सर्वांनी. सर्वांना अत्यंत भिती उत्पन्न झाली. उग्रसेन राजाने त्या मुसळाचं बारीक पीठ केलं आणि ते समुद्रामधे टाकून दिलेलं आहे. एक लोखंडाचा तुकडा राहिला. एका माश्याच्या पोटात तो तुकडा गेला. तो मासा कोळ्याने पकडला आणि त्याच्या पोटातल्या लोखंडाच्या तुकड्यापासून एका व्याधाने बाणाचा अग्रभाग केलेला आहे. आणि ते टाकलेलं चूर्ण वहात वहात तीरावर आलेलं आहे प्रभासक्षेत्राच्या आणि तिथं लव्हाळ्याची लहान लहान बेटं तयार झाली. भगवंताना हे समजलेलं आहे. कुणी सांगितलं नाही. पण ते ईश्वर आहेत. अन्यथाकर्तुम सामर्थ्यही आहे त्यांच्याजवळ पण त्यांनी ठरवलं. आता हा विप्रशाप फिरवायचा नाही. अनुमोदन दिलं.

कालरूपी अन्वमोदत ।।११.१.२४ ।। श्री. भा.

शुक सांगतात, राजन,

गोविन्दभुजगुप्तायां द्वारवत्यां कुरूद्वह ।<br>
अवात्सीन्नारदोऽभीक्ष्णं कृष्णोपासनलालसः ।।११.२.१ ।। श्री. भा.

नारदमहर्षि मोठे भक्त होते. ज्ञानापेक्षा भक्ति प्रधान होती. ज्ञानही होतंच त्यांच्याजवळ, ब्रह्मज्ञानीच ते होते. आत्मज्ञान झालं की सर्व ज्ञान होतं म्हणतात. छांदोग्य उपनिषदामधे वर्णन केल्याप्रमाणे सनत्कुमारांकडे जाऊन आपण काय काय शिकलो हे सर्व त्यांनी सांगितलं पण मला काही समाधान नाही म्हणाले, मला आत्मज्ञान द्या मग सनत्कुमारांनी त्यांना उपदेश केलेला आहे, म्हणजे ज्ञान मिळालेलं आहे पण भक्त आहेत. वैकुंठपति भगवान कृष्णांच्या रूपाने भूमीवर

आलेले आहेत ही पूर्ण जाणीव त्यांच्या चित्तामधे असल्यामुळे वारंवार नारदांनी द्वारकेला यावं. निमंत्रण दिल्यावर पुण्यकर्माला तर यायचेच परंतु एरवीसुद्धा त्यांनी द्वारकेला यावं आणि राहावं.

कृष्णोपासन लालसः म्हणताहेत शुकाचार्य

कृष्णांच्या जवळ राहावं, उपासना करावी, भक्ति करावी, त्यांचं भाषण ऐकावं, त्यांचं रूप पाहावं ही इच्छा आहे. भगवंताच्या चरणांची उपासना करावी असं कुणाला वाटणार नाही म्हणाले. वसुदेव देवकींनी एकदा घरी आलेल्या नारदांची पूजा केली. नमस्कार केला. नारदांपासून काही उपदेश प्राप्त व्हावा अशा उद्देशाने वसुदेवाने विचारलं, ''महाराज, आपला संचार हा सर्व जीवांच्या कल्याणाकरताच अखंड चालू आहे. त्यात आपला स्वार्थ काही नाही. देवांचं चरित्र हे सुखदायकही होतं, कधी दुःखदायकही होतं परंतु आपल्यासारखे जे भगवद्भक्त साधू आहेत त्यांच्यापासून नेहमी सुखच प्राप्त होतं. तेव्हा, भागवतधर्म म्हणजे काय हे मला आपण समजावून सांगा. हा पहिला प्रश्न आहे. या भागवतधर्माच्या श्रवणाने सुद्धा मनुष्य बंधनातून मुक्त होतो. भगवंताची पूजा पूर्वी माझ्या हातून घडली म्हणाला वसुदेव पण मोक्षाकरता काही माझी सेवा घडली नाही या मायामोहामुळे. या संसार संकटातून आपण मला मुक्त करा अशी प्रार्थना वसुदेवाने केल्यावर देवर्षि नारदांना भगवान नारायणांचं स्मरण झालेलं आहे. ते सांगताहेत, ''वसुदेवा तुझा प्रश्न चांगला आहे. विश्वद्रोह करणारासुद्धा या भागवतधर्माच्या आचरणाने पवित्र होऊन जातो. भगवान नारायणांचं स्मरण यावेळी मला झालेलं आहे तुला एक पूर्वीचा इतिहास सांगतो. मनुराजाचा पुत्र प्रियव्रत. त्याचा मुलगा आग्निध्र आणि त्याचा मुलगा नाभीराजा आणि नाभीचा पुत्र ऋषभदेव. वासुदेवच प्रत्यक्ष ऋषभरूपाने अवतीर्ण झाले. मोक्षधर्म आचरण करून दाखवणारे असे ते होते. त्यांना शतपुत्र झाले. त्यातील ज्येष्ठ पुत्राचंच नाव या देशाला भारतवर्ष असं पडलेलं आहे. त्याने अनेक वर्षं राज्य केले, यज्ञ करून, त्याग करून वनामधे गेला आणि तिसऱ्या जन्मामधे तो मुक्त झालेला आहे. ऋषभदेवांची एक्क्याऐंशी मुलं ही द्विजाती झाली असं म्हणतात. म्हणजे क्षत्रिय होतेच ते पण, कर्मयोगाचे आचरण करणारी, त्यांचं लक्ष यज्ञ-यागादि कर्मांकडे जास्ती होतं. नऊ मुलं ही मोठी भगवद्भक्त झालेले आहेत. पूर्ण ज्ञानसंपन्न असे ते झालेले आहेत. कवि, हरी, अंतरीक्ष, पिप्पलायन, आविर्होत्र, प्रबुद्ध, द्रुमिल, चमस आणि करभाजन. हे नऊ योगी झाले. संपूर्ण विश्व जे आहे कार्यकारणात्मक हे आत्म्यापेक्षा वेगळं नाहीच आहे. आत्मा-परमात्माच विश्वरूपाने भासतो आहे अशी दृढ भावना त्या योग्यांच्या चित्तात होती आणि त्यांचं भ्रमण सारखं चाललेलं आहे. देवलोकात, गंधर्वलोकात अनेक ठिकाणी त्यांचा संचार चालू असे. असे संचार करता करता

ते निमी राजाच्या यज्ञामधे प्राप्त झाले. सूर्यासारखे तेजस्वी ज्ञानी, भगवद्भक्त महात्मे आलेले पाहून सर्व ऋषिमंडळी उठून उभी राहिली. नारायणांचे हे भक्त आहेत हे समजून निमी राजाने त्या योगीद्रांची पूजा केली. आसनावर बसलेले आहेत आणि विदेह राजाने विचारायला सुरवात केली, ''महाराज आपण साक्षात भगवंताचे सेवक आहात. आपल्यासारखे विष्णुभक्त हे लोकांना पवित्र करण्याकरता सर्वत्र संचार करत असतात. मनुष्यदेह हा अतिशय अस्थिर आहे. केव्हा पडेल याचा नियम नाही. आणि या देहाची प्राप्ती झाली असताना आपल्यासारख्या भगवत्‌भक्तांचं दर्शन होणं ही अतिशय दुर्मिळ गोष्ट आहे. आज दैव योगाने दर्शन झालेलं आहे. थोडा वेळ का होईना संगती लाभलेली आहे. तेव्हा भागवतधर्म म्हणजे काय आपण मला सांगा म्हणजे भगवत्‌कृपा प्राप्त होईल. नारद सांगतात, वसुदेवा, याप्रमाणे निमिराजाने विचारल्यानंतर त्यापैकी जे कवी नावाचे योगींद्र होते. त्यांनी बोलायला आरंभ केला,

मन्येऽकुतश्चिद्भयमच्युतस्य
पादाम्बुजोपासनमत्र नित्यम्।
उद्विग्नबुद्धेः असदात्मभावाद्
विश्वात्मना यत्र निवर्तते भीः ।।११.२.३३ ।। श्री. भा.

सर्वही भिती दूर करणारं साधन म्हणजे श्रीहरीच्या चरणाची उपासना हे आहे. कोणीही जीव, अगदी ब्रह्मदेवांपर्यंत कोणीही जीवात्मा असला तरी उद्विग्न असतो. असत पदार्थालाच आत्मा समजून बसलेला आहे. प्रल्हादजींनीही आपल्या पित्याला प्रथम असंच उत्तर दिलेलं आहे. असदात्म भाव जो मनामधे आहे अज्ञानी जीवांच्या ते खोटंअसून खरं समजून बसलेले आहेत. त्यामुळे त्यांना उद्वेग भोगावा लागतो. त्या उद्वेगातून बाहेर येण्यासाठी भगवंतांच्या चरणांची उपासना, भजन हेच एकमेव निर्भय करणारं साधन आहे. स्वत: भगवंतांनी आपली प्राप्ती होण्याकरता जे धर्म सांगितले आहेत त्यांनाच भागवतधर्म असं म्हणतात. भागवतधर्म म्हणजे राजमार्ग आहे. कधीही तो स्खलित होत नाही, एका श्लोकामधे भागवतधर्माची कल्पना केलेली आहे.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा
बुद्ध्यात्मना वा अनुसृतस्वभावात्।
करोति यद् यत् सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयेत्तत् ।।११.२.३६ ।। भा.

शरीराने कर्मं होतात, वाणीने होतात. त्याचप्रमाणे बुद्धिने, मनाने, इंद्रियांनी, पूर्ववासना संस्कार जे असतील त्याला अनुसरूनही कर्मं होतात. अशी जी जी कर्मे या साधनांच्या द्वारा घडतील ती सर्व कर्मे नारायणाला समर्पण करावीत. कर्ता मी नसून नारायण आहे. ह्या सगळ्यांना तो प्रवर्तक आहे ना ! त्याच्याचमुळे या सर्व जडपदार्थांची प्रवृत्ति होते आहे. तेव्हा या जड पदार्थांचच कर्तृत्व मानण्यापेक्षा त्या नारायणाचंच कर्तृत्व माना. जडपदार्थांमधेसुद्धा आत्मभाव निर्माण झाल्यामुळे आपलं कर्तृत्व आपण मानतो तेही योग्य नाही. फक्त नारायणच कर्ता आहे. त्याला सर्व कर्म समर्पण करा. ही जर भावना प्रत्येक कर्म करताना होत असेल तर सर्वही कर्मं ही भागवतधर्म होतात.

यत्करोषि यद् अश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।९.२७।। श्री.भ.गीता

मनामधे जोपर्यंत द्वैताचा अभिनिवेश आहे तोपर्यंत भिती आहे. द्वैताभिनिवेशामुळे जीव हा ईश्वरापासून पराङमुख होतो आहे. आणि संकल्प विकल्पात्मक मनाने, केलेलं कर्म मीच केलेलं आहे अशा अहंकारात तो सापडतो आणि त्या कर्मबंधनात पडतो आहे. त्या मनाचा प्रथम निरोध केला पाहिजे. भगवान श्रीहरींनी केलेली जी दिव्य कर्मं आहेत ती श्रवण करणं, सर्व एकंदर लज्जा सोडून त्या लीलाचं वर्णन, गायन करणं, हा जर अभ्यास सुरू झाला तर अंत:करणामधे ईश्वराबद्दल अनुराग उत्पन्न होतो. त्याचं भान सगळं नाहिसं होतं, चित्त द्रुत होतं आणि सर्व अध्यास सगळे शिथील होऊन जातात. संपूर्ण जे पांचभौतिक विश्व आहे हे भगवंताचं शरीर आहे. म्हणून सर्वही भूतांना वंदन करावं. शेवटी उद्धवजींना भगवंतानी ही वंदन भक्तिच सांगितली. असा भक्तिचा अभ्यास सुरू झाला असताना, परमात्मस्वरूपाचा अनुभव येतो, वैराग्य उत्पन्न होतं आणि पराभक्तिही उत्पन्न होते आहे. पूर्ण शांती त्या जीवाला प्राप्त होते. हे सगळे भागवतधर्म या रूपाने त्यांनी शिकवलेले आहेत. निमिराजाने विचारलं, ''महाराज, भगवद्भक्त कसा असतो, त्याचं लक्षण काय आहे ?'' हरी नावाचे दुसरे योगींद्र या प्रश्नाचं उत्तर देताहेत. ''उत्तम भक्त, मध्यम भक्त आणि प्राथमिक भक्त असे तीन प्रकार आहेत.

सर्वभूतेषु यः पश्येद् भगवद्भावमात्मनः ।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ।।११.२.४५।। श्री. भा.

उत्तम भक्त म्हणजे जो सर्व भूतांच्या ठिकाणी भगवान पाहातो आहे. भूतस्वरूपाच्या

ठिकाणी वृत्ति ठेवून त्यांनाच भगवान म्हणणं. किंवा भूतस्वरूपाचा अपलाप करून, भगवानच याठिकाणी आहेत असं समजणे उपासनेमधे दोन्ही अंगं आहेत. मूर्तीलाच भगवान समजणं किंवा मूर्ती नसून तिथे प्रत्यक्ष भगवानच आहेत असं समजणं; दोन्हीही प्रकार आहेत. उत्तम भक्ताला अभेद आहे. भूतं असली तरी ती भगवंतस्वरूप आहेत आणि नसली तरी भगवंत आहेच. अधिष्ठान प्रधान दृष्टी आणि प्रतीकप्रधान दृष्टी.

आता मध्यम भक्त. ईश्वराबद्दल अत्यंत प्रेम मनामधे आहे. ईश्वरभक्तांबद्दल मैत्रीभावना आहे. अज्ञानी लोकांबद्दल दया आहे आणि जे काही ईश्वर द्वेषी असतील, नास्तिक त्यांची उपेक्षा आहे. त्यांना समजावण्याचा प्रयत्न करायचा नाही. असं ज्याचं वर्तन आहे तो मध्यम भक्त आहे. लोकसंग्रह या भूमिकेवर आहे. उपेक्षाही लोकसंग्रहाकरताच आहे. त्याशिवाय यांचं चित्त प्रसन्न राहाणार नाही.

आणि प्राथमिक भक्त म्हणजे,

अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धयेहते।
न तद्भक्तेषु चान्येषु स भक्तः प्राकृतः स्मृतः ।।११.२.४७।। श्री. भा.

समोर जी मूर्ती आहे त्या मूर्तीच्या ठिकाणीच श्रद्धा आहे. पूजा अर्चा मूर्तिची चाललेली आहे. हाच तेवढा ईश्वर आहे. बाकीच्या ईश्वरभक्तांकडेही लक्ष नाही आणि इतराकडेही नाही. हा सामान्य, प्राथमिक भक्त आहे. हे तीन प्रकार सांगीतले योगींद्रानी राजाला आणि आता शेवटपर्यंत उत्तम भक्तांचच वर्णन करताहेत.

सर्व विषयांचं सेवन करतासुद्धा ज्याला राग, द्वेष नाही. हर्ष नाही, विषाद नाही. ही सगळी विष्णूंची माया आहे असं उत्तम भक्त समजतो आहे. कोणताही मोह त्याच्या चित्ताला नाहिये.

न कामकर्मबीजानां यस्य चेतसि सम्भवः।
वासुदेवैकनिलयः स वै भागवतोत्तमः ।।११.२.५०।। श्री. भा.

चित्त फक्त वासुदेवाच्या ठिकाणी स्थिर आहे. त्यामुळे ज्याच्या चित्तामधे काम नाही. त्यामुळे त्यापासून निर्माण होणारं कर्म नाही आणि त्यालाही कारण असलेलं अज्ञान बीजही नाहिये. सर्वातून तो मोकळा आहे. आपण अमुक वर्णाचे, अमुक जातीचे, अमुक आश्रमाचे आहोत असा अभिमान ज्याच्या चित्तामधे नाही तो भगवद्प्रिय आहे. त्रिभुवनाचं ऐश्वर्य मिळण्याची वेळ आली

तरीसुद्धा याच्या चित्तातलं भगवद्स्मरण कधीही खंडित होत नाही. देवाला जो विसरत नाही, देवाला जो सोडत नाही तो मोठा भक्त खराच परंतु देव ज्याच्या हृदयातून जाऊ शकत नाही असा भक्त देवाहूनही मोठा झाला.

विसृजति हृदयं न यस्य साक्षात्
हरिः अवशाभिहितोऽपि अघौघनाशः ।
प्रणयरशनया धृताङ्घ्रिपद्मः
स भवति भागवतप्रधान उक्तः ।।११.२.५५।। श्री. भा.

ज्याने भगवंताला हृदयामधे अत्यंत दृढपणे धारण केलेलं आहे त्याच्या हृदयातून हरी बाहेर जाऊ शकत नाही. सूरदासांनी श्रीकृष्णांना सांगीतलं,

हृदयात् यदि जातोसि पौरुषं गणयामि ते ।।

भगवंता, मी म्हातारा आहे, दिसत नाही मला. मला हाताला धरून नेत असता एकदम बाजूला होतोस, माझा हात सोडून देतोस, याला मी पौरुष समजत नाही. माझ्या हृदयातून तू जाऊन दाखव, कसा जातोस ते पाहतो. ईश्वराला सुद्धा आव्हान देण्याची ज्यांची भूमिका आहे ते श्रेष्ठ भक्त आहेत. ईश्वराच्या कृपेनेच त्यांनी ती भूमिका मिळवली म्हणून त्यांना अहंकार नाही. माझ्या हृदयात भगवंत आहे, मी त्याला बंदिस्त करून ठेवला आहे असं काही या भक्तांना वाटत नाही पण ते योगींद्र वर्णन करताहेत. हा प्रधान भगवद्भक्त आहे.

परस्य विष्णोरीशस्य मायिनामपि मोहिनीम् ।
मायां वेदितुमिच्छामो भगवन्तो ब्रुवन्तु नः ।।११.३.१।। श्री. भा.

ज्ञानसंपन्न महात्मे ईश्वराच्या कृपेने आलेले आहेत. काहीही विचारलं तरी 'छिद्यन्ते सर्वसंशयः' असं करण्याची, फल देण्याची यांची योग्यता आहे. त्यांचं मार्गदर्शन आपण घ्यावं अशी इच्छा राजाला झाली.

राजाचा तिसरा प्रश्न आहे. ''सर्व लोकांना मोहात टाकणारी भगवान विष्णूंची माया म्हणजे काय आहे ?'' भगवद्स्वरूपही अनिर्वचनीय आहे. शब्दांनी यथार्थ वर्णन होत नाही. आणि त्यांची शक्तिही अनिर्वचनीय आहे. मायेचं वर्णनही करता येत नाही. तटस्थ लक्षणच सांगितलेलं आहे मायेचं. साक्षात मायाशक्ति काय आहे हे सांगता येत नाही. किंवा कार्यद्वारा मायेचं ज्ञान करून द्यावं लागतं. मायेचा आणि कार्याचा संबंध आहे. योगींद्र अंतरीक्ष सांगताहेत, ''राजा, माया

म्हणजे काय सांगता येत नाही. मायेचं कार्य काय काय चालू आहे हे तुला सांगतो.

एभिर्भूतानि भूतात्मा महाभूतैर्महाभुज।
ससर्ज उच्चावचानि आद्यः स्वमात्रात्मप्रसिद्धये ।।११.३.३ ।। श्री. भा.

भगवंतानी या पंचभूतांपासून सर्वही ब्रह्मांड, ही भौतिक सृष्टी निर्माण केली. त्या पंचभूतांच्यामधे आपण प्रवेश केला, जीवरुपाने आणि सर्व विषयांचं ग्रहणही तो करू लागला. तो जीवरूपी परमात्मा त्या कर्माच्या ठिकाणी आसक्त झाला. कर्म करतो आहे, पुन्हा देह धारण करतो आहे, पुन्हा कर्म करतो आहे. कर्मफलाचा भोग घेतो आहे आणखी फिरतो आहे सारखा. अशा रितीने अनेक कर्मानुसार अनेक जन्म प्राप्त होतात. महाप्रलयापर्यंत हे सर्व चालू राहातं. काल जो आहे तो या विश्वाला अव्यक्ताकडे न्यायला लागतो. प्रलयाच्यापूर्वी शंभर वर्षं अनावृष्टी होते. सूर्याचे किरण अत्यंत तापतात. सगळं त्रैलोक्य तप्त होऊन जातंय. संकर्षण भगवानांच्या मुखातूनही अग्नि उत्पन्न होतो पातालातून आणि त्याच्या ज्वाला वर येतात. यामुळे सर्व ब्रह्मांड हे दग्ध होऊन जातंय. आणि मग पाऊस पडायला सुरवात होते. हत्तीच्या सोंडेप्रमाणे धारा असलेला पाऊस पडतो. आणि हे संपूर्ण विराट स्वरूप जे आहे ते विलीन होऊन जातंय. अव्यक्तामधे त्याचा विलय होतो. भूमी, जल, तेज, वायू, आकाश, महतत्त्व, प्रकृति, परब्रह्म अशा क्रमाने सगळं अव्यक्त होत जातं. सृष्टीही अशी होते आणि प्रलयही होऊन जातो. या कार्यालाच माया असं म्हणायचं. हे सगळं सतत चालू आहे. कुणीही थांबवू शकत नाही.

पुढचा प्रश्न राजाने केला,

यथैतां ऐश्वरीं मायां दुस्तरां अकृतात्मभिः।
तरन्ति अञ्जः स्थूलधियः महर्ष इदमुच्यताम् ।।११.३.१७।। श्री. भा.

यातून जीवाला बाजूला होता येत का नाही? सृष्टी-प्रलय सारखं चाललेलं आहे. आणि हा जीवात्मा त्यात सापडलेला आहे, आपण ईश्वर आहे याचं त्याला भानही नाही. संसारी आहे, कर्ता भोक्ता मी आहे असं तो समजतोय. प्रलयाच्यावेळीही याचा प्रलय होत नाही. सूक्ष्मरूपाने, संस्काररूपाने हा राहातो आणि सृष्टी पुन्हा निर्माण झाली की पुन्हा जन्म घेतो. सर्व जीवात्मे त्यावेळी पुन्हा व्यक्त होतात. योगींद्र प्रबुद्ध सांगताहेत, ''राजा सर्वही जीव नित्य कर्म करण्यात गुंतलेले आहेत. आपली दुःखं दूर व्हावीत आणि सुख आपल्याला मिळावं याकरता त्यांचा प्रयत्न चालू असतो. सगळ्यांची कर्मं चालू आहेत परंतु ज्याच्या मनामधे विवेक उदयाला आलेला आहे

त्याने विचार करावा की कर्माचं फल आपल्या इच्छेप्रमाणे मिळवू शकतात का हे जीव ? एखाद्या जीवालाच असा विवेक उत्पन्न होतो. दुःखनाश आणि सुखप्राप्ती पाहिजे आहे पण उलटंच घडते. दुःखाचीच प्राप्ती होते आणि सुख नाहिसं होतं. हे कर्माचं फल जे आहे, कर्म परिपाक हा असा दिसतो. जास्तीत जास्त जीवांच्या बाबतीत असंच घडतं आणि त्यामुळे कर्म हे दुःखनाश करण्याचं किंवा सुख मिळवण्याचं साधन आहे हा कार्यकारणभाव व्यभिचारी ठरतो. कार्यकारणभाव आहे असं समजून प्रवृत्ति होते ना ! विवेक उत्पन्न झाल्याबरोबर कार्यकारणभाव नाहिये हे कळतं. शिवाय इतर पोषक असे पुष्कळ विवेक आहेत.

नित्यआर्तिदेन वित्तेन ।।११.३.१९ ।। श्री. भा.

द्रव्याच्या योगाने नेहमी क्लेश आहेत. गृह आहे, अपत्य आहे, आप्त आहेत, पशु वगैरे आहेत, क्षेत्र आहे, सगळं जरी आपण प्रयत्नाने मिळवलं

का प्रीतिः साधितैश्चलैः ।।११.३.१९ ।। श्री. भा.

हे टिकणारं काहीच नाही ना ? स्थिर नाही. तेव्हा हे मिळवून समाधान काय मिळणार आहे ? हे झालं इहलोकातलं. याप्रमाणे कर्माने प्राप्त करून घेतलेले स्वर्गादि लोक वगैरे जे आहेत तेही नश्वर आहेत. ते सुख शेवटपर्यंत मिळत नाही, मर्यादित आहे. त्याठिकाणीसुद्धा आपल्या बरोबरीचे, आपल्यापेक्षा अधिक सुख भोगणारे आणि शेवटी नष्ट होणारे असे दोष आहेतच. हा विवेक मनामधे उत्पन्न झाल्यानंतर जिज्ञासू होऊन आपलं खरं कल्याण कसं प्राप्त होईल याचा विचार करून त्याने सद्गुरूंना शरण जावं. 'शाब्दे परेच निष्णातम्' असे गुरू भेटणं फार कठीण आहे आणि त्यांच्याजवळ राहून भागवतधर्माचं शिक्षण घ्यावं.

सर्वतो मनसोऽसङ्गम् ।।११.३.२३ ।।श्री. भा.

कोणतं कोणतं शिक्षण घ्यावं ते सांगताहेत. अगोदर असंग मन करायचा प्रयत्न करावा. त्याकरता साधूंचा संग ठेवावा. आपल्यापेक्षा कमी असलेले अज्ञानी, त्यांच्याबद्दल दया, बरोबरीचे असतील त्यांच्याशी मैत्री आणि श्रेष्ठ जे असतील त्यांच्यासमोर विनय याचाही अभ्यास करावा. पावित्र्य पाहिजे आहे. काया, वाचा, मन या तिघांचीही पवित्रता, शुचिता पाहिजे. स्वच्छता निराळी आणि शुचिता निराळी आहे. तितिक्षा पाहिजे. इंद्रियांचा निग्रह पाहिजे, मंत्रजप पाहिजे. अहिंसेचाही अभ्यास पाहिजे. सर्वत्र परमात्मभावनेचाही अभ्यास झाला पाहिजे. संतोषवृत्तिचा अभ्यास झाला पाहिजे. मन, वाणी वगैरे यांचा निग्रह केला गेला पाहिजे. भगवंतांच्या गुणांचं

श्रवण, कीर्तन, ध्यान हे सगळं घडलं पाहिजे. जे जे आपल्याकडून धर्मकार्य होईल, पुण्यकर्म होईल किंवा ज्या ज्या ठिकाणी आपली ममता आहे. स्त्री आहे, पुत्र आहे, घरदार आहे, इंद्रिय वगैरे हे सगळं ईश्वराचं आहे, हे लक्षात ठेवावं. भगवद्भक्तांची यथाशक्ति सेवा करावी. एकमेकांनी भगवंताच्या लीला वर्णन कराव्यात आणि तो आनंद प्राप्त करून घ्यावा. असा अभ्यास करणारे जे आहेत त्यांच्या अंत:करणात भक्ति उत्पन्न होते. प्रेम निर्माण होतं. आणि त्या भक्तिचे सात्विक भाव उत्पन्न होतात. अंगावर रोमांच येतात, डोळ्यातून प्रेमाश्रू वाहताहेत, देहभान नाहिसं होतं आणि पूर्ण शांती त्यांच्या चित्ताला प्राप्त होते. असा जीव

नारायणपरो मायां अञ्जस्तरति दुस्तराम् ।।११.३.३३।। श्री. भा.

त्या सृष्टी प्रलयात्मक मायेतून तरून जातो. त्याला जन्म मरण राहात नाही.

निमी राजा विचारतोय, ''नारायण कोण आहे महाराज. परब्रह्म परमात्मा ज्याला म्हणतात त्याचं स्वरूप मला समजावून सांगा.'' पिप्पलायन योगींद्र सांगताहेत,

स्थित्युद्भवप्रलयहेतुरहेतुरस्य<br>
यत् स्वप्नजागरसुषुप्तिषु सद् बहिश्च।<br>
देहेन्द्रियासुहृदयानि चरन्ति येन<br>
सञ्जीवितानि तदवेहि परं नरेन्द्र ।।११.३.३५।। श्री. भा.

विश्वाची उत्पत्ति, स्थिती आणि प्रलय याला जो कारण आहे, त्याला कुणी कारण नाही, तो नित्य आहे. त्याचप्रमाणे जागृती, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थांमधे आहे आणि या अवस्था नसताना देखील आहे म्हणजे समाधि अवस्थेत आहे. देह, इंद्रिय, प्राण, मन वगैरे ही ज्यानी संजिवित होऊन कार्य प्रवण होताहेत तेच परब्रह्म आहे. नारायण त्यालाच म्हणतात. शब्दांनीही सांगितलं वर्णन करून. पण शब्द काही साक्षात त्या स्वरूपापर्यंत मनाला नेऊ शकत नाहीत. फक्त कल्पना आहे परोक्षज्ञान झालेलं आहे. मनाने तरी ध्यान केल्यावर होईल का नाही ?

नैतन्मनो विशति वाग् उत चक्षुरात्मा।<br>
प्राणेन्द्रियाणि च यथानलमर्चिषः स्वाः ।।११.३.३६।। श्री. भा.

मन या परमात्मस्वरूपापर्यंत जाऊ शकत नाही. वाणीही असमर्थ आहे. चक्षु वगैरे इंद्रियंही असमर्थ आहेत. आत्मप्रमाण जो शब्द आहे तो जी जी बोधकप्रमाणं आहेत त्या सर्वांचा निषेध करतो. कोणत्याही प्रमाणाने हा समजू शकत नाही. वाणी जात नाही, मन जात नाही. सगळ्या

प्रमाणांचा निषेध केला. साक्षात आणि निषेधरूपाने सांगताना हा शब्द नेऊन सोडतो. अध्यारोप, अपवाद यातही निषेध आहेच आहे. मनन भूमिकेमधे अध्यारोप आहे, अपवादही आहे. यातही सर्व प्रमाणांचा निषेध करून आत्मतत्वाचा बोध मनाने विचार केला असता होत आहे. पण साक्षात नाही. त्रिगुणात्मक जे आहे अव्यक्त स्वरूप तेच महतत्त्व झालं, तेच अहंकाररूप झालं आणि तेच पुढं जीव झालं अध्यासाने. आत्मअध्यास झाल्यामुळे त्याला जीव म्हणतात. हा जो आत्मा आहे याला उत्पत्ति नाही, नाश नाही, वृद्धि नाही, क्षय नाही कोणताही विकार नाही. सर्व ठिकाणी

केवलउपलब्धिमात्रम्।

प्रकाशरूप आहे परमात्मा. ज्ञानस्वरूप आहे. बाकी सर्वही मनाचे विकल्प आहेत.

यर्हि अब्जनाभचरणैषणयोरुभःत्या
चेतोमलानि विधमेद् गुणकर्मजानि।
तस्मिन् विशुद्ध उपलभ्यत आत्मतत्त्वं
साक्षात् यथामलदृशोः सवितृप्रकाशः ।।११.३.४०।। श्री. भा.

मनही जाणार नाही, शब्दही जाणार नाही, इंद्रियही जाणार नाहीत, कोणतंही प्रमाण जाऊ शकत नाही मग समजायचं कसं ? ज्ञान कसं व्हायचं ? मनाने तरी ज्ञान झालं पाहिजे नाहीतर शब्दाने तरी ज्ञान झालं पाहिजे. पण इथे दोन्हीही पक्ष संभवत नाहीत. त्याकरता एक मुख्य कारण सांगताहेत. बुद्धिने ते आत्मतत्व समजू शकतं. अंत:करणाने कळू शकतं. पण त्याच्याकरता भगवंतांच्या चरणांची तीव्र भक्ति घडली पाहिजे. अनन्य भक्ति. म्हणजे विरक्ति पाहिजे त्याशिवाय अनन्यता येणार नाही. आणि त्या भक्तिच्या योगाने अंत:करणात असणारे सर्व मल हे दग्ध होऊन जातात. कर्मांचा नाश होतो. आणि असं शुद्ध अंत:करण ज्यावेळी होतं तेव्हा तिथे आत्मतत्व प्रकाशित होतंय. आतमधे आहेच ते ! डोळ्यावर काही पडदा आला तर नेत्र काही पाहू शकत नाहीत. सूर्यप्रकाशही पाहू शकत नाहीत. ज्या सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने नेत्र हे बाकीच्या सर्व पदार्थांना पाहू शकतात तो सूर्यप्रकाशच याला दिसेनासा झाला. आपलीही नेत्राची शक्ति कमी झाली आणि सहकारी सूर्यप्रकाशाचंही अदर्शन झालं. पण तीच दृष्टी, आवरण दूर झाल्यावर शुद्ध झाली आणि सूर्यप्रकाश दिसायला लागला जो कधी नाहिसा झालाच नव्हता. तसं परमात्मा आहेच, केव्हाही. अनेक जन्म झाले तरी चित्ताच्या जवळ परमात्मा आहे. चित्तसाक्षी तो आहे. पण चित्त हे अज्ञानामुळे आवृत्त झाल्यामुळे परमात्मा दिसत नाही. परमात्मा आवृत्त झालेला नाही तर

आपलं चित्त आवृत्त झालेलं आहे.

घनच्छन्न वृष्टिर्घनच्छन्नमलकम्।
यथा मन्यते निस्पृहं चातिमूढः।।

सूर्यापर्यंत आपली दृष्टी जाऊ शकत नाही. मधे मेघ आलेले आहेत. आणि आम्ही म्हणायला लागलो, मेघांनी सूर्य झाकला गेला. सूर्य कसा झाकला जाईल ? आमची दृष्टीच आवृत्त झाली आहे. तसं आमचं अंत:करण हे आवृत्त झालेलं आहे. अज्ञानापासून उत्पन्न झालं आणि अनेक जन्माच्या संस्कारांनी त्या अज्ञानात भरच पडलेली आहे. भगवत्‌भक्तिच्या योगानेच ते शुद्ध होतं. सगळे मल निघून जातात. आणि मग त्याच्यामधे असलेल्या परमात्मरूपाचा प्रकाश पसरतो आहे. त्यामुळे त्या मायाशक्तिचाही तिरोभाव होतो. निमीराजा विचारतोय,

कर्मयोगं वदत नः पुरुषो येन संस्कृतः।
विधूयेहाशु कर्माणि नैष्कर्म्यं विन्दते परम्।।११.३.४१।। श्री. भा.

आतापर्यंत या योगींद्रांनी भक्तिचच महत्त्व दाखवलेलं आहे. भागवतधर्म म्हणजे भक्तिच आहे म्हणाले. ती भक्ति अंत:करणात उत्पन्न झाल्यामुळे ईश्वराच्या शक्तिची जाणीव झाली आणि त्यामुळे स्वत:चं कर्तृत्व तो विसरून गेलेला आहे. कुणालाही कर्तृत्व नाही आणि कुणालाही क्रिया नाही. त्रिगुणात्मक सर्व इंद्रिय आहेत. रजोगुण आहे म्हणजे क्रिया असलीच पाहिजे. नाही म्हणाले. त्याच्या प्रेरणेमुळे, त्याच्या सान्निध्यामुळे क्रिया होते आहे म्हणजे त्रिगुण असूनसुद्धा ते कार्यकारी होऊ शकत नाहीत हेच त्यांनी सांगितलं, विलक्षण आहे. आपोआप कार्य होताहेत हा सिद्धांत थांबवलेला आहे, भक्तिमार्गाने. क्रिया होईल पण याच्या सान्निध्यामुळे होईल. तर ही भक्तिची महती सांगितली आत्तापर्यंत. भागवतधर्मामधेसुद्धा भक्तिच्या योगानेच त्या सर्व साधनांचं, धर्मांचं अनुष्ठान होईल. ती भक्ति अधिकाधिक वाढत जाईल आणि सर्व अध्यास शिथील होत गेल्यामुळे आत्मप्रकाश होईल.

राजाने आता कर्मयोग म्हणजे काय सांगा असं विचारलं. कारण ती भक्तिसुद्धा ऐकायला सोपी आहे पण कठिण आहे. आत्मरूप प्रकाशित करणारी भक्ति म्हणजे केवढी मोठी भूमिका आहे. तसे संस्कार झाले पाहिजेत त्याकरता कर्म झाली पाहिजेत. कर्मयोग सांगा म्हणून राजा म्हणतोय म्हणजे त्या कर्मयोगामुळे संस्कृत झालेल्याची दोषनिवृत्ति होईल आणि आत्मज्ञान त्याला प्राप्त होईल. राजा म्हणाला हा प्रश्न पूर्वी मी ऋषिंना विचारला, त्यांनी काही उत्तर दिलं नाही

मला. आविर्होत्र योगींद्र सांगाताहेत,

कर्म अकर्म विकर्मेति वेदवादः न लौकिकः।
वेदस्य च ईश्वरात्मत्वात् तत्र मुह्यन्ति सूरयः ॥११.३.४३॥ श्री. भा.

फक्त वेदांनीच हे सांगितलेलं आहे कर्म कशाला म्हणायचं, विकर्म कशाला म्हणायचं, अकर्म कशाला म्हणायचं. हे लौकिक बुद्धिने कळून येणारं नाहिये. वेद हे ईश्वररूप आहेत. ज्याच्या अर्थज्ञानाबद्दल मोठेमोठे ज्ञानसंपन्न महर्षि मोहामधे पडताहेत. म्हणून अनेक आणखी मार्ग दाखवले गेले. सांख्यमार्ग आहे, योगमार्ग आहे, कर्ममार्ग आहे अनेक मार्ग आहेत. त्याचं प्रतिपादन त्या त्या ऋषिंनी केलेलं आहे. आविर्होत्र सांगताहेत.

तत्र मुह्यन्ति सूरयः ॥ श्री. भा.

त्यानांच मोह झालेला आहे. वेदाचा खरा अर्थ सांगायला ते असमर्थ आहेत. काही कारणसंशोधन करणं वेगळं पण ईश्वराची इच्छा असेल तरच वेदांचा खरा अर्थ आकलन होईल. वेद हे परोक्षरूपाने सांगणारे आहेत, प्रत्यक्ष काही सांगत नाहीत. सूचक आहे. अज्ञानी जीवांना मार्गदर्शक आहे. कर्म करावी म्हणून कर्म केली पाहिजेत. ह्याचा अभिप्राय काय ? अज्ञान्यांकरता आहे म्हणाले,

कर्ममोक्षाय कर्माणि विधत्ते हि अगदं यथा ॥११.३.४४॥ श्री. भा.

कर्मातून मुक्त होण्याकरताच कर्मं करायची ! कर्मं करायची आणि कर्मातून मुक्त व्हायचं म्हणजे फल हे विरुद्ध दिसतंय. पण ते विरुद्ध नाहिये. विरुद्ध दिसणारं फल कर्मामुळे मिळतं म्हणाले. वेदोक्त कर्माचा ज्यांनी त्याग केलेला आहे ते विकर्म झाले. तो अधर्म झालेला आहे. त्यामुळे त्याला जन्ममृत्यूमधे अखंड पडावं लागतं. निरभिमान होऊन, ईश्वरार्पण बुद्धिने, वेदोक्त कर्मं श्रद्धेने करणारा जो आहे त्याला नैष्कर्म्यसिद्धी, ज्ञानसिद्धी प्राप्त होते. अनेक फलं सांगितलेली आहेत.

स्वर्गकामः यजेत।
इंद्रियकामः, पारमेष्ठ्यकामः पुत्रकामः ...
रोचनार्था फलश्रुतिः।

कर्माबद्दल आवड निर्माण व्हावी, तिकडे प्रवृत्ति वाढावी याकरता वेदांनी फलश्रुतीही सांगितलेली आहे. ते प्राधान्य नाहिये. ज्याप्रमाणे फलबोधक अशी वाक्यं आहेत तशीच

आत्मज्ञानरूपी फल सांगणारीही वाक्यं आहेत.

तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन, दानेन, तपसा अनाशनेन।

स्वर्गादिफलजनकही यज्ञादिकर्म आहे त्याचप्रमाणे आत्मज्ञानजनकही आहे हे स्वतंत्र, वेदांनी सांगितलेलं आहे. आणि तशी ज्याला तीव्र इच्छा झाली त्याला मात्र

रोचनार्था फलश्रुतिः

हे पटतंय. कारण त्याला फलाची इच्छाच नाहियेे. अशा रितीने जर फलाची इच्छा सोडून कर्म घडलं तर त्या कर्माचं फल आत्मज्ञान हे आहे. आपला हृदयग्रंथी तुटावा अशी ज्याला इच्छा आहे त्याने यथाविधी भगवंताचं अर्चन करावं. वेदद्वारा असो, तंत्रद्वारा असो, आचार्यांकडून सर्व मार्गदर्शन मिळवून आपल्याला जी इष्टमूर्ती असेल त्याठिकाणी भगवंताची पूजा करावी. पूजा करताना मूर्तीसमोर बसावं. प्राणायामादिकांनी इंद्रियशुद्धी, शरीरशुद्धी करून घ्यावी. मूर्तीच्या ठिकाणी आणि आपल्या हृदयाच्या ठिकाणी न्यास करून, जेवढे उपचार मिळाले असतील त्यानी पूजा करावी. पाद्य आहे, अर्घ्य आहे, आचमन आहे, स्नान आहे अनेक उपचार आहेत. पंचोपचार आहेत, षोडपोचार आहेत. चतुःषष्ठी उपचारही आहे म्हणतात. वस्त्रं, अलंकार, गंध, पुष्पं, धूप, दीप, नैवेद्य हे सगळेही भगवंताला मूर्तीच्या ठिकाणी कल्पून अर्पण करावेत. प्रार्थना करावी, स्तुती करावी आणि प्रणाम करावा. पूजा करताना आपण तन्मय झालं पाहिजे. म्हणजे अर्चनभक्तिच्यावेळेलासुद्धा हा ग्रंथी कमी झालेला असला पाहिजे. त्याशिवाय खरं अर्चन होणार नाही. पूर्ण ग्रंथीभेद होणं हे पुढचं कार्य आहे.

आत्मानं तन्मयं ध्यायन् मूर्तिं सम्पूजयेद्धरिः ।।११.३.५४।। श्री. भा.

थोडा जरी अहंकारग्रंथीचा तिरोभाव झाला तर ते अर्चन होतं. याचप्रमाणे अग्निमधे, सूर्यमंडलामधे, जलामधे, अतिथीच्या ठिकाणी किंवा मनामधे भगवंताचं अर्चन करणारा जो आहे तो मुक्त होतो.

अचिरान्मुच्यते हि सः ।।११.३.५५।। श्री. भा.

भगवान श्रीहरींनी कोणती कोणती कर्मं केली हे मला सांगा म्हणून राजा विचारतोय. कोणती रूपं धारण केली, कोणते अवतार धारण केले आणि कोणती कर्मं केली हे सांगा. द्रुमिल ऋषि सांगताहेत, ''देवाची कर्मं, देवाचे अवतार सगळे सांगणं हे शक्य आहे का बाबा. अनंत गुण त्याचे आहेत. अनंत गुण प्रतिपादन करायला प्रवृत्त होणं म्हणजे तो बालबुद्धीचा असला पाहिजे,



शक्य नाहीये ते. कळून घेऊन प्रवृत्त झालं पाहिजे. यथामती शुकाचार्य महाराजांनीसुद्धा परीक्षित राजाने भागवत श्रवणाची इच्छा व्यक्त केल्यानंतर, 'माझ्या वाणीला भगवंताने प्रेरणा करावी आणि माझ्याकडून त्याचं हे दिव्य चरित्र वदवून घ्यावं' अशी प्रार्थना करूनच सुरूवात केली. भूमीवर असलेले रजःकण एकवेळ मोजता येईल. कुणाला मोजण्याची इच्छा झाली तर, कारण जिज्ञासा कोणती होईल हे सांगता येत नाही. सध्या प्रसिद्धी पुष्कळ आहे. कर्म उत्तम करतात.

भूतैर्यदा पञ्चभिरात्मसृष्टैः
पुरं विराजं विरचय्य तस्मिन्।
स्वांशेन विष्टः पुरुषाभिधानं
अवाप नारायण आदिदेवः ।।११.४.३ ।। श्री. भा.

पंचभूतांच्या द्वाराने हे विराट विश्व भगवंताने निर्माण केलं आणि त्याच्यामधे प्रवेश केला. त्या नारायणालाच 'पुरी षेते' पुरूष हे नाव उत्पन्न झालं. त्यालाच विराट, वैश्वानर असंही म्हणतात. संपूर्ण त्रिभुवन हे ज्याचं शरीर आहे. ज्याची इंद्रियं म्हणजेच सर्वांची इंद्रियं आहेत. ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रियं ही त्याचीच इंद्रियं आहेत. हा सृष्टी, स्थिती, प्रलय करणारा आदिकर्ता नारायण आहे. अगोदर त्यांच्याच संकल्पाने ब्रह्मदेव उत्पन्न झाले, उत्पत्ती करण्याकरता. संरक्षणाकरता विष्णुरूप धारण केलं आणि संहाराकरता तमःप्रधान असं रूद्ररूप धारण केलं. त्यामुळे उत्पत्ती, स्थिती, लय हे अखंड चालू आहे. दक्षकन्या मूर्तिच्या ठिकाणी धर्मापासून नर, नारायण ही दोन रूपं भगवंताने धारण केली. नरनारायणांनी नैष्कर्म्यसिद्धीचा उपदेश केलेला आहे. अनेक ऋषिमंडळी त्यांची सेवा करताहेत. अद्यापि बद्रिकाश्रमात ते आहेत. त्यांची तपश्चर्या चालू असताना स्वर्गाचा राजा इंद्र याच्या मनात भीती उत्पन्न झाली.

मम धाम जिघृक्षतीति ।।११.४.७ ।। श्री. भा.

इंद्राला वाटलं हे ऋषि तपश्चर्येने माझं स्थान घेण्याची इच्छा करताहेत काय? हे विश्व नाहीच आहे अशी ज्यांची धारणा आहे, आत्मानंदात जे मग्न आहेत त्यांना काय इच्छा असणार? पण या देवराजाला आपल्या संस्काराप्रमाणे त्यांचीही बुद्धि तशीच असेल असं वाटलं. मग काय करायचं? त्यांची तपश्चर्या बंद पाडायची. मदनाला त्याच्या परिवारासह बद्रिकाश्रमात जाऊन नरनारायणांची तपश्चर्या बंद पाडायला सांगितली. तो मदन सगळ्या अप्सरांना घेऊन आलेला आहे. सर्व अप्सरांचं नृत्यगायन चाललेलं आहे. पण नरनारायणांच्या मनावर काहीही परिणाम नाही. देवेंद्राने हे विघ्न उत्पन्न केलेलं आहे त्याचंही काही नाही. भगवान शंकर असते म्हणजे समजलं असतं, लगेच त्यांनी तृतीय नेत्र उघडून त्या मदनाला जाळूनच टाकलं असतं. इथं ते नाही.

प्राह प्रहस्य गतविस्मय एजमानान् ।।११.४.८।। श्री. भा.

आपल्या शक्तिने हा तपोभंग करायचा असं इंद्राने ठरवलं पण त्याची शक्ती आहे किती? असे अनेक इंद्र ज्यांनी नेमलेले आहेत त्यांना हा इंद्र काय करणार? त्यामुळे क्रोध नाहीये. मदनालाच भीती वाटायला लागली. नारायण म्हणाले, ''भिऊ नका. तुम्ही आमचे अतिथी आहात. तुमचा सत्कार करायला पाहिजे.'' अभय दिलं. मदनालाच लज्जा उत्पन्न झाली, तो प्रार्थना करतोय,

त्वां सेवतां सुरकृता बहवोन्तरायाः
स्वौको विलङ्घ्य परमं व्रजतां पदं ते।
नान्यस्य बर्हिषि बलीन् ददतः स्वभागान्
धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ।।११.४.१०।। श्री. भा.

कबूल केलं. नारायणा, आपली सेवा करणारे, आपले भक्त जे आहेत त्यांना आम्ही देव विघ्न उत्पन्न करतो. कारण आम्हाला असं वाटतं, की आमच्याही वरती हे जाणार. आमच्यापेक्षा उच्च गतीला ते जाणार, तसं त्यांना जाऊ द्यायचं नाही म्हणून आम्ही त्यांना विघ्नं उत्पन्न करतो. यज्ञ करून आमची पूजा करणारे, आम्हाला हविर्भाग देणारे जे कर्मनिष्ठ लोक आहेत त्यांना आम्ही त्रास देत नाही. पण तुमचे भक्त असे असतात की या विघ्नांच्या डोक्यावर पाउल ठेऊन आपल्याजवळ येऊन ते पोचतात. 'त्वमविता यदि' आपली कृपादृष्टी त्यांच्यावर असते. तपश्चर्या पुष्कळ मंडळी करतात. क्षुधा नाही, तृषा नाही, वारा, थंडी सगळं सहन करतात. हे सगळं करून कोणी मनाविरूद्ध वागल्यावर,

क्रोधस्य यान्ति विफलस्य वशं पदे गोः

मज्जन्ति दुश्चरतपश्च वृथोत्सृजन्ति ।। ११.४.११ ।। श्री. भा.

एकदम राग निर्माण होतो त्यांना. अनेक तपस्वी पुष्कळ तपश्चर्या करूनसुद्धा क्रोधाच्या आधीन झाल्यामुळे त्या तपाचा नाश होतो. पण आज आपल्याला आम्ही शरण आलेलो आहोत. आपल्याला क्रोध नाही, कोणताही विकार नाही. ज्ञानी महात्म्यांचं दर्शन झालं की निर्विकार आत्मस्वरूप कसं असतं हे पाहायला मिळतं. दिसणारे सर्वही भावपदार्थ जायते, अस्ति, विपरणमते, अपक्षीयते, विनश्यती या सगळ्या विकारांनी व्याप्त आहेत आणि निर्विकार आत्मस्वरूप आहे हे कसं शक्य आहे? आत्मस्वरूप आहे हे देखील वाटत नाही, या सर्व भावविकारांकडे पाहून पण अशा ज्ञानी महात्म्यांचं दर्शन झालं की ते पटतंय.

तस्मिंस्तज्जने भेदाभावात् ।। नारदभक्तिसूत्र

हाही सिद्धांत सांगितला आहे भक्तिशास्त्रकारांनी. भेद नाहीच आहे. असा निर्विकार ज्ञानी महात्मा तोच परमात्मा आहे. मदनादिकांना अत्यंत लाज वाटलेली आहे. आम्ही यांच्याजवळ जाऊ शकत नाही. यांच्याजवळ जाऊ इच्छिणाऱ्यांचे पाय ओढायचे एवढंच आम्ही करतो म्हणाले. नारायणांनी हे सर्व ऐकून घेतले.

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित् ।।१२.१९ ।। भ. गी.

हे सगळेही परमात्मस्वरूपाचे गुण आहेत. स्थितप्रज्ञाचे गुण, भगवद्भक्ताचे गुण, गुणातीताचे गुण हे सगळेही परमात्मस्वरूपच प्रदर्शन करणारे आहेत. नारायणांच्या संकल्पाने दिव्य अप्सरा निर्माण झालेल्या आहेत. स्वर्गातून मदनाबरोबर आलेल्या अप्सरांपेक्षा दिव्य अशा अप्सरा तिथे निर्माण झाल्या. मदनादिक सर्व अप्सरा तो चमत्कार पाहून मोहित झालेले आहेत. हसले भगवान नारायण. म्हणाले, ''तुम्ही आमचे अतिथी आहात.

'आसां एकतमां वृङ्ध्वम् ।।११.४.१४ ।। श्री. भा.

यापैकी एखादी अप्सरा तुम्हाला स्वर्गात घेऊन जायची असेल तर न्या.'' त्याप्रमाणे उर्वशी नावाच्या श्रेष्ठ अप्सरेला घेऊन मदनादिक लोक स्वर्गलोकात निघून गेलेले आहेत. मोहात टाकणाऱ्या अनेक अप्सरा जे निर्माण करू शकतात किंवा जे तपःस्वरूप होऊ शकतात त्यांना त्या अप्सरांचा मोह कसा पडेल?

अग्निच्या ज्वाला अग्निला काही करू शकत नाहीत, दुसऱ्याचा दाह करतील. स्वर्गलोकामधे

येउन मदन इंद्राला सांगतोय,

ऊचुर्नारायणबलं शक्रस्तत्रास विस्मितः ।।११.४.१६ ।। श्री. भा.

नारायणांना मोह उत्पन्न होणं शक्य नाही, देवराज. इंद्रालाही विस्मय वाटला. नारायण अवताराचं थोडक्यात चरित्र सांगितलं योगींद्रांनी.

हंसरूप भगवंताने धारण केलेलं आहे आणि आत्मयोग त्यांनी सांगितला. दत्तात्रेयरूप आहे, कुमार आहे, ऋषभदेव आहे. ही सगळी त्या भगवंताचीच स्वरूपं आहेत. प्रलयाच्यावेळेला मनुराजाचं रक्षण करण्याकरता भगवान मत्स्यरूप झालेले आहेत. हिरण्याक्षाचा वध करण्याकरता, पृथ्वीचा उद्धार करण्याकरता भगवान वराहरूप झाले. कूर्मावतार धारण केला. मंद्राद्री पर्वत धारण केलेला आहे. गजेंद्राला मगरापासून श्रीहरींनी मुक्त केलेलं आहे. समुद्रात पडलेले जे सर्व ऋषि आहेत वालखिल्य ऋषि, यांचाही उद्धार केलेला आहे. वृत्रासुराचा वध केल्यामुळे ब्रह्महत्येच्या दोषात सापडलेल्या देवेंद्रालाही मुक्त केलेलं आहे. देवस्त्रिया असुरांच्या कारागृहात नेल्या होत्या. अनाथ झाल्या, त्या दैत्याचा नाश करून देवस्त्रियांचं संरक्षणही भगवंताने केलं आहे. अशी अनेक रूपं भगवंतानी धारण केली. परशुराम रूप घेऊन एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली. रामावतार घेऊन रावण–कुंभकर्णांचा नाश करून देवांना सुखी केलेलं आहे. आणि पुढं ते भगवान यदुकुलामधे जन्म घेणार आहेत आणि अलौकिक कर्म करणार आहेत. पुढचं सांगताहेत. त्यावेळी अजून कृष्णावतार व्हायचा होता. वादविवादाने यज्ञकर्माकडे प्रवृत्त झालेल्यांचा बुद्धिभेद करणार आहेत. मोहामधे टाकणार आहेत.

सम्मोहाय सुरद्विषाम् ।।

हा हेतू आहे बुद्धावताराचा आणि कलियुगाच्या शेवटी कल्किस्वरूप धारण करून दुष्ट राजांचा संहार ते करणार आहेत आणि पुन्हा धर्माची प्रवृत्ति करणार आहेत. असे भगवंताचे अनेक अवतार आहेत राजा, आणि कर्मही अनेक आहेत. राजाने प्रश्न केला, महाराज,

भगवन्तं हरिं प्रायो न भजन्ति आत्मवित्तमाः ।
तेषां अशान्तकामानां का निष्ठा अविजितात्मनाम् ।। ११.५.१ ।। श्री. भा.

भगवंताच्या भजनापासून बहुतेक जे दूर राहिलेले आहेत. त्यामुळे इंद्रियांवर ताबा नाही, वासनाक्षय नाही अशा लोकांना काय फल मिळतं? चमस ऋषि सांगातहेत, भगवंताच्या मुखापासून,

बाहूपासून, उरूपासून, पायापासून चार वर्ण निर्माण झाले, चार आश्रमही निर्माण झाले. म्हणजे सर्वांचा जनक परमात्मा आहे. आपल्या सर्वांना ज्याने निर्माण केलं त्यालाच विसरून जाणं म्हणजे केवढी कृतघ्नता आहे. आणि त्या दोषामुळे त्यांचा अधःपात होतो. हरीकथाश्रवणाकडे लक्ष नाही. भगवंताचं संकीर्तन नाही. त्यांच्याकडे लक्ष दिलं पाहिजे. त्यांना बोध करून इकडं वळवलं पाहिजे. मोहामधे ते पडलेले आहेत. रजोगुण त्यांचा वाढलेला आहे. ते दांभिक बनलेले आहेत. भगवद्भक्तांचा उपहास ते करतात. विषयाच्या ठिकाणी त्यांचं चित्त आसक्त झालेलं आहे. श्रेष्ठ भक्तांचा अवमान ते करतात. सर्वठिकाणी परमात्मस्वरूप आहे असं वेद सांगताहेत पण तिकडं यांचं लक्ष जात नाही. यज्ञकर्मं करायची, स्वर्गादि सुख मिळवायचं, तिथे दिव्य विषयभोग घ्यायचे हीच त्यांची विचारसरणी आहे. स्त्रीसंभोग, मद्यसेवन, मांससेवन हे वेदामधे आहे परंतु तो परिसंख्या विधी आहे. हा अपूर्व विधी नाही म्हणतात.

म्हणजे इतरवेळी संभोग नकोय. हेच तात्पर्य आहे. मद्यमांस वगैरे जे यज्ञामधे असेल ते सुद्धा निवृत्तीकरता आहे. यज्ञ करणारे लोक मद्य, मांस घेतात असा एक आक्षेप आहे. हरीरामशास्त्री एकदा म्हणाले होते, ‘आमचे लोक मद्यमांस सोडून जेवढे राहातात तितके तुमचे लोक कुठे राहातात? यज्ञात जेवढे विधीला आवश्यक असेल तेवढेच ते घेतात, इतर वेळी ते निवृत्त असतात.’ तेव्हा तो अपूर्व विधी नाहीये. वेदांनाही निवृत्ती हीच इष्ट आहे.

धनं च धर्मैकफलं यतो वै
ज्ञानं सविज्ञानमनुप्रशान्ति।
गृहेषु युञ्जन्ति कलेवरस्य
मृत्युं न पश्यन्ति दुरन्तवीर्यम्।। ११.५.१२।। श्री. भा.

धर्माचं फल हे धन आहे असं समजतात. वस्तुतः धर्मामुळे ज्ञान विज्ञान प्राप्त होत असताना धर्माचं फल धन आहे अशी यांची दृष्टी आहे. ऐश्वर्य मिळालं पाहिजे. त्याकरता पुण्यकर्म करायला पाहिजे. त्यामुळे या संसारामधे आसक्त होऊन राहातात. मृत्यू जवळ आलेला आहे, त्याचा प्रतिकार कधीही करता येत नाही. इकडे त्यांचं लक्ष नाहीये. अशाप्रकारे अभिमान धारण करणारे जे आहेत त्यांना हरी हा सर्वत्र आहे ही भावना नाहीये. दुसऱ्यांचा द्वेष म्हणजे हरीचाच द्वेष ते करताहेत. असे जे आहेत, आसक्त चित्त झालेले, त्यांचा अधःपात होतो. कैवल्य तर मिळतंच नाही त्यांना. वेदांनी सांगितलेल्या त्रिगुणात्मक कर्माचंच आचरण ते करताहेत. आयास सारखा चालू

आहे. स्वर्गलोकात जातात, ते पुण्य संपलं की पुन्हा मृत्यूलोकात येतात. पुन्हा कर्म करतात असं सारखं चाललेलं आहे. वासुदेवाला पराङमुख झालेल्या लोकांना हे फळ मिळतं. म्हणजे शास्त्रश्रद्धा आहे पण अभिनिवेशही आहे, जास्तीत जास्त कर्मं केली की जास्तीत जास्त विषयभोग मिळेल, ऐश्वर्य मिळेल. म्हणजे खरी शास्त्रश्रद्धा नाहीये. वासुदेवांच्या भक्तिकडे प्रवृत्ती नाही. धर्मराजानेही अनेक यज्ञ केले पण ते सर्व ईश्वरार्पण बुद्धीने केले.

निमीराजाने पुढचा प्रश्न विचारला, ''चारी युगामधे भगवंतांनी कोणती कोणती रूपं धारण केली ? करभाजन ऋषि सांगताहेत, 'कृत्युगामधे शुक्लवर्ण, चतुर्बाहू, जटाधारी, वल्कलं धारण करणारे भगवान आहेत. आणि त्या युगामधले जीव हे शांत आहेत, निर्वैर आहेत. तपश्चर्या हेच त्यांचं यजन आहे.

यजन्ति तपसा देवं शमेन च दमेन च ।। ११.५.२२ ।। श्री. भा.

तप म्हणजे आलोचन करणं. चिंतन करणं आत्मस्वरूपाचं. हीच त्यांची तपश्चर्या आहे. हंस, सुपर्ण, वैकुंठ, योगेश्वर अशी अनेक नावं त्यावेळेला भगवंताने घेतली. त्रेतायुगामधे रक्तवर्ण परमात्मा चतुर्बाहू, हिरण्याप्रमाणे ज्याचे केस आहेत. त्यावेळची सर्वही मंडळी वेदांनी सांगितलेली यज्ञयागादिक कर्म करीत असत. विष्णु, यज्ञ, पृश्निगर्भ अशी नावं भगवंताची त्यावेळी झालेली आहेत. भगवान रामचंद्रांचा अवतार याच युगात झालेला आहे. द्वापर युगामधे भगवान शामवर्ण आहेत. पीतांबरधारी आहेत. आणि सर्वही मंडळींचं वेद आणि तंत्र असं संमिश्र यजन त्यांचं चाललेलं आहे. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरूद्ध अनेक नावांनी भगवान प्रसिद्ध आहेत. कलियुगामधे भगवान कृष्णवर्ण असणार आहेत.

यज्ञैः समीर्तनप्रायैर्यजन्ति हि सुमेधसः ।। ११.५.३२ ।। श्री. भा.

या युगातली मंडळी प्रायः नामसंकीर्तन, गुणसंकीर्तन करण्यामधेच निमग्न आहेत. भगवान रामचंद्रांचं स्मरण करताहेत.

ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं<br>
तीर्थास्पदं शिवविरिञ्चिनुतं शरण्यम्।<br>
भृत्यार्तिहं प्रणतपाल भवाब्धिपोतं<br>
वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ।।११.५.३३ ।। श्री. भा.

सर्वही अंतराय दूर करणारे आपले चरण आहेत. अभिष्ट देणारे आहेत. तीर्थस्वरूप आहेत. शिवजी ज्यांना नमन करताहेत. सर्व भक्तांच्या पीडा दूर करणारे आहेत. भवाब्धीच्या नौकारूप आहेत. अशा आपल्या चरणारविंदांना आम्ही नमस्कार करतो.

त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराज्यलक्ष्मीं
धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम्।
मायामृगं दयितयेप्सितमन्वधावद्
वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ।।११.५.३४।। श्री. भा.

लौकिक व्यवहारासारख्या दिसतात भगवंताच्या काही लीला. परंतु त्याच्यामधेही काही हेतू आहे. आपल्या पित्याची आज्ञा म्हणून, त्याची इच्छा जाणून भगवान रामचंद्र अरण्यामधे गेले. सीतेला सुवर्णमृगाची इच्छा झाली. 'दयितया ईप्सितम्' ।।

म्हणताहेत योगींद्र. केवढी प्रिय आहे सीतादेवी. रामचंद्र अरण्यात निघालेले असताना तिने निक्षून सांगितलं की माहेरीही जाणार नाही आणि सासरीही राहाणार नाही. कोणत्याही सुखाची इच्छा न धरता अरण्यात आलेली सीता अत्यंत प्रिय आहे. तिला इच्छा झाली ती पूर्ण केली पाहिजे. म्हणून सुवर्णमृगाच्या पाठीमागे राम गेले. असा महापुरूष त्याच्या चरणांना आम्ही वंदन करतो.

असं ध्यान करतात कलियुगातली मंडळी आणि भगवंताचं ध्यान, पूजन करून ते मुक्त होताहेत.

खरे जे गुणज्ञ आहेत ते कलियुग चांगलं म्हणतात.

यत्र समीर्तनेनैव सर्वः स्वार्थोभिलभ्यते ।।११.५.३६।। श्री. भा.

नामसंकीर्तनाने, गुणसंकीर्तनानेच सर्व इच्छा पूर्ण होताहेत. यासारखा लाभ नाही. भगवद्प्रेम अंतःकरणात निर्माण होणं हा मोठा लाभ आहे. त्यामुळे परमशांती प्राप्त होते. कृतयुगामधे जन्माला आलेल्या जीवांना वाटतं आपण कलियुगामधे जन्म घ्यावा म्हणजे नारायणाची भक्ति आपल्याला मिळेल. ताम्रपर्णी नदी आहे, कृतमाला, पयस्विनी, कावेरी अशा नद्यांच्या तीरावर राहून त्यांचं जलपान करणाऱ्यांच्या अंतःकरणात भक्ति निर्माण होते आहे. भगवद्भक्ताला देव, ऋषि, पितर, भूत, आप्त कुणाचंही ऋण नसतं. अनन्य भावाने भगवंताला जो शरण जातो तो सर्व ऋणातून मुक्त होतो. आपलं अनन्य भावाने भजन करणाऱ्याच्या चित्तात श्रीहरी प्रविष्ट होतात

आणि सर्व दोष स्वच्छ धुऊन टाकतात.

नारद सांगतात, वसुदेवा, याप्रमाणे त्या मिथिलाधिपती निमीराजाने त्या जयंतीपुत्र योगींद्राकडून सर्व समजाऊन घेतलं. आनंद झाला. त्यांची पूजा केलेली आहे. आणि त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे धर्माचरण करून उत्तम गती प्राप्त करून घेतली. तू ही वसुदेवा हे सर्व ऐकलंस. याप्रमाणे आचरण कर. संगत्याग कर म्हणजे तुला आत्मज्ञान प्राप्त होईल. वसुदेव-देवकी तुमच्या दोघांचं यश सर्व त्रैलोक्यात पसरलेलं आहे. भगवान वैकुंठपती तुमचे पुत्र होऊन तुमच्याजवळ राहाताहेत. रोज त्यांचं दर्शन होतं. प्रेमाने जवळ घेता, जेवण करता, भाषण करता, नेहेमी जवळ आहे. त्या भगवंताच्या सान्निध्याने तुम्ही पवित्र झालेला आहात. पुत्रस्नेह जरी असला तरी तुम्ही पवित्र झालेला आहात. शिशुपाल, कंस, शाल्व वगैरे राजे विरोधी बुद्धि असताना भगवंताच्या ध्यानाने मुक्त झाले. मग तुमची तर बुद्धि अनुरक्त आहे. पण वसुदेवा हे लक्षात ठेव,

मा अपत्यबुद्धिमकृथाः कृष्णे सर्वात्मनीश्वरे।
मायामनुष्यभावेन गूढैश्वर्ये परेऽव्यये ।।११.५.४९ ।। श्री. भा.

भगवान श्रीकृष्ण म्हणजे आपला मुलगा आहे ही बुद्धि तू सोडून दे. फार अपराध होतो आहे. आपल्यासारखंच पांचभौतिक शरीर आहे म्हणून हा आपला मुलगा आहे, ही बुद्धि तू सोडून दे. भूभार झालेल्या अनेक दैत्यांचा नाश करावा आणि सुष्टांचं रक्षण करावं या हेतूने भगवान अवतार घेऊन आलेले आहेत. आणि आपलं यश त्यांनी सर्वत्र पसरलेलं आहे. हे वसुदेवाला बजावलं नारदांनी. वसुदेव देवकी दोघांनाही आनंद झालेला आहे. अशारितीने हा संवाद जे ऐकतील, चिंतन करतील त्यांनासुद्धा आत्मज्ञानाची योग्यता प्राप्त होईल.

अथ ब्रह्मा आत्मजैर्देवैः प्रजेशैरावृतो अभ्यगात्।
भवश्च भूतभव्येशो ययौ भूतगणैर्वृतः ।।११.६.१ ।। श्री. भा.

शुकाचार्य सांगतात राजा, एके दिवशी द्वारकेमधे ब्रह्मादिक देव प्राप्त झाले भगवान श्रीकृष्णांना भेटण्याकरता. शंकरभगवान आहेत, इंद्रादिक देव आहेत. देवांनी स्तुति केली.

नताः स्म ते नाथ पदारविन्दं
बुद्धीन्द्रियप्राणमनोवचोभिः।
यच्चिन्त्यते अन्तर्हृदि भावयुक्तैः
मुमुक्षुभिः कर्ममयोरुपाशात् ।।११.६.७ ।। श्री. भा.

आपल्या चरणाला आम्ही नमस्कार करीत आहोत. कर्मपाशातून मुक्त होण्याची इच्छा करणारे भगवद्भक्त ज्याचं चिंतन करतात. त्रिगुणात्मक मायाशक्तीने आपण हे जगत उत्पन्न करता, पालन करता पुन्हा त्याचा उपसंहार करता. असे पूर्ण शक्तिसंपन्न आपण आहात. आपल्या कृपेनंच सर्व भक्तांच्या कामना पूर्ण होतात. भक्त निष्काम होतात, मुक्त होतात. ब्रह्मदेव शेवटी म्हणताहेत, ''भूमीचा भार हलका करायला आपल्याला पूर्वी प्रार्थना केली होती. आपण त्याप्रमाणे अवतार धारण करून आला आणि सर्व कार्य केलेलं आहे. सज्जनांच्या द्वाराने धर्मस्थापना केली. सर्व लोकांना शुद्ध करणारी आपली कीर्ति आपण प्रसृत केली. जी जी आपली चरित्रं याठिकाणी घडली, त्यांचं श्रवण करणारे, कथन करणारे कलियुगात तरून जातील. यदुवंशात अवतार धारण करून आपल्याला एकशे पंचवीस वर्षे झाली आहेत. देवांचं कार्यही झालेलं आहे. विप्रशापामुळे हे यदुकुळही नष्ट होईल. आपली इच्छा असेल तर आपण वैकुंठलोकामधे प्राप्त व्हा. आमच्याही लोकामधे जाताना येऊन चला.'' भगवान सांगताहेत, ''माझाही तसाच विचार आहे. हे यादवांचं कुल अद्यापि शिल्लक आहे. उगीच लोकांना त्रास होईल. त्याचा संहार करूनच यायला पाहिजे. ते कार्य झाल्यावर वैकुंठलोकाला जाताना मी आपल्या लोकामधेही येऊन जाईन.'' ब्रह्मादिक देवांनी प्रणाम केला आणि ते आपापल्या स्थानाला निघून गेले.

द्वारकेमधे भयंकर अपशकून व्हायला लागले. वृद्ध मंडळी सगळी देवाकडे आली आणि विचारताहेत, ''काय आहे देवा हे? काय होणार आहे?'' भगवान सांगताहेत, ''ब्राह्मणांचा शाप आपल्या कुळाला झालेला आहे. आता इथे थांबून उपयोग नाही. द्वारका सोडून आपण सर्वजण प्रभासक्षेत्रामधे जाऊ या. तिथे आपण स्नान, दान, होम–हवन असं काही पुण्यकर्म करू. काहीतरी उपाय आपण केला पाहिजे.'' भगवंतांचा आदेश झाल्यावर सर्व यादवांनी निघण्याची तयारी सुरू केली. श्रीकृष्णभगवंतांना भेटण्याकरता उद्धवजी मुद्दाम एकांतात आलेले आहेत. प्रणाम केला. उद्धवजी बोलू लागले. ''भगवन्, आपण या कुलाचा त्याग करून निघाला असं दिसतंय. विप्रशापाचा आपण काहीही प्रतिकार केला नाही. मी मात्र आपल्या चरणांना सोडून इथे राहणार नाही. मला आपल्याबरोबर घेऊन चला. आजपर्यंत आपल्या अनेक लीला मी पाहिलेल्या आहेत. आपलं सान्निध्य नेहमी मला मिळालं. आपला प्रसाद नेहमी मला मिळालेला आहे.''

अशी प्रार्थना उद्धवजींनी केल्यानंतर भगवंताने उद्धवजींना उपदेश करायला आरंभ केला.

यदात्थ मां महाभाग तच्चिकीर्षितमेव मे।
ब्रह्मा भवो लोकपालाः स्वर्वासं मे अभिकाङ्क्षिणः ।।११.७.१।। श्री. भा.

होय बाबा, मला आता निजधामाला जायची इच्छा आहे. हे सगळे ब्रह्मादिक देव मला भेटून गेले आणि लवकर परत या अशी विनंती त्यांनी केली. माझं इथलं कार्य आता आटोपलेलं आहे. आता कशाला इथे रहायचं? या कुलाचा नाश होणार, ही द्वारका नगरी सातव्या दिवशी समुद्रात बुडून जाणार. आणि या कलिचा अधिकार याठिकाणी सुरू होणार आहे. तू आता इथे राहू नकोस. कलियुगामधे सर्वांची वृत्ती अधार्मिक होणार आहे. सर्व स्वजनांबद्दलची ममता, स्नेह ही टाकून देऊन माझं चिंतन करीत तू सर्वत्र संचार कर. जे जे दिसणारं आहे ते नश्वर आहे. मायिक आहे. मनोनिग्रह ज्यांचा झालेला नाही, त्यांना हा द्वैतभ्रम होतो. गुणदोष दृष्टी उत्पन्न होते. आत्मानुभव झाल्यामुळे अत्यंत संतुष्ट ज्याची वृत्ती आहे त्याला कोणताही प्रतिबंध नाही. सर्व भूतमात्रांबद्दल प्रेम धारण करणारा, सर्व विश्व हे माझंच स्वरूप आहे असं चिंतन करणारा जो आहे त्याला कोणतंही दुःख होत नाही. जा आता इथून निघून जा.'' मोठे भगवद्भक्त उद्धवजी, तत्वजिज्ञासू आहेत. काहीतरी मार्गदर्शन आपल्याला व्हावं अशी इच्छा त्यांना आहे. ते म्हणताहेत, ''भगवन् सगळ्यांना सोडून जायचं म्हणजे कठीण आहे. हा त्याग कसा करता येईल? विषयी लोकांच्या मनात अनेक जन्माच्या संस्कारांनी विषय घट्ट बसलेले आहेत त्याचा त्याग कसा करायचा? अहंता आणि ममता हे दोन दोष चित्तामधे आहेत. यातून मुक्त कसं व्हायचं याचा आपण उपदेश करा.

भगवंताने उपदेश करायला सुरवात केली.

उद्धवा, दुसऱ्याने उपदेश करण्याचं काय कारण आहे? खरे जे विवेकसंपन्न महात्मे आहेत ते आपला उद्धार आपणच करून घेतात. आपला गुरू आपण आहे. मनुष्याला जी बुद्धि मिळालेली आहे, प्रत्यक्ष आहे अनुमान आहे. या सगळ्या प्रमाणांच्या द्वाराने जे काही समजून घ्यायचं ते समजून घेतात हे महात्मे. मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतर मी सर्वत्र कसा व्यापून राहिलेलो आहे हे ते पाहू शकतात. अनेक प्रकारची शरीरं आहेत. त्यापैकी मानव शरीर हे मला प्रिय आहे. या मानव शरीरामधेच माझा शोध करायला अवसर आहे. जगातलं काय घ्यावं आणि काय सोडावं हे समजलं पाहिजे. हेयोपादेय विवेक जो आहे तो भगवान सांगताहेत. अवधूत आणि यदुराजा यांचा एक पूर्वी संवाद झालेला आहे तो तुला सांगतो.

अवधूत दत्तात्रेय हे कावेरी नदीच्या तीरावर झाडाखाली स्वस्थ पडून राहिलेले आहेत. यदुराजा पृथ्वीवर संचार करत निघाला होता. आपल्या कनिष्ठ बंधूला सार्वभौम केलं आपल्या बापाने आणि मला त्याच्या हाताखाली ठेवलं, हे त्याच्या मनाला मोठं दुःख होतं. अवधूतांचं दर्शन झाल्यावर त्याला वाटलं की हा मोठा महात्मा आहे. त्याने विचारलं, ''महाराज,

कुतो बुद्धिरियं ब्रह्मन् अकर्तुः सुविशारदा।
यां आसाद्य भवांल्लोकं विद्वांश्चरति बालवत् ।।११.७.२६ ।। श्री. भा.

ही आपली बुद्धि इतकी शांत, स्थिर कशी झाली? काहीही आपण करत नाही आहात. व्यावहारिक प्रयत्न नाही, पारमार्थिक प्रयत्न नाही. लहान मुलाप्रमाणे निर्विकार वृत्तीने आपण संचार करता. धर्म, अर्थ, काम याच्याकरता सर्व मानव प्रयत्न करतात. आयुष्य पाहिजे, संपत्ती पाहिजे, कीर्ति पाहिजे. सर्व लोक असे प्रयत्नात असताना आपण काहीही करत नाही याचं कारण काय? सर्व लोक या कामक्रोधरूपी अग्निमधे दग्ध होताहेत. त्यांच्या मनाला समाधान, शांतता लाभत नाही. पण आपल्याला कोणताही विकार नाहीये. इतका पूर्ण आनंद आपल्याला कसा मिळाला? हे मला सांगा.

ब्रूहि स्पर्शविहीनस्य भवतः केवलात्मनः ।।११.७.३० ।। श्री. भा.

सुखसाधन समजलेले कोणतेही विषय आपल्यापाशी नाहीत. राहायला जागा नाही, वस्त्र नाही, अन्न नाही, मानसन्मान नाही. असं असताना आपण आनंदी कसे आहात? हा आनंद कुठून मिळवला आपण?'' अवधूत म्हणताहेत, ''राजा, तू चांगले प्रश्न विचारलेस. हा आनंद मिळवण्याकरता मी अनेक गुरू केलेले आहेत. दोष टाकण्याकरताही गुरू आणि गुण ग्रहणाकरताही गुरू केले. त्याप्रमाणे मी शिकलेलो आहे.

पहिला गुरू म्हणजे ही पृथ्वी आहे.

भूतैः आक्रम्यमाणो अपि धीरो दैववशानुगैः ।।
तद् विद्वान्न चलेन्मार्गात् अन्वशिक्षं क्षितेर्व्रतम् ।।११.७.३७ ।। श्री. भा.

भूमीपासून मी तितिक्षा शिकलो. 'सर्वंसहा' तिला म्हणतात. ती शांत आहे. लोक तिला खणतात, अग्निनं जाळतात, मल-मूत्र विसर्जन करतात तरी ती क्षमाशील आहे. सर्व सहन करते. ज्याला आपली उन्नती करून घ्यायची आहे त्याने या भूमीप्रमाणे तितिक्षु झालं पाहिजे. भूमीचाच

भाग म्हणजे पर्वत, वृक्ष. यांच्याजवळ किती फलं, पुष्पं आहेत परंतु हे सर्व दुसऱ्याकरता आहे. स्वतः काही त्याचा भोग ते घेत नाहीत. हे मी या पृथ्वीपासून शिकलेलो आहे.

दुसरा गुरू वायू आहे. प्राणवृत्ति संपादन केली पाहिजे. प्राणवायू कसा आहे. सर्व इंद्रियापेक्षा, ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रिय यांच्यापेक्षा प्राणवायू श्रेष्ठ आहे. डोळे, कान, नाक वगैरे इंद्रिये चोवीस तास काम करू शकत नाहीत. त्यांना विश्रांती पाहिजे. प्राणवायूचं काम चोवीस तास चाललेलं आहे. तो कधीही थांबत नाही. हा एक मोठेपणा आहे. आणि दुसरा म्हणजे त्याला आहार काहीही चालतो. जेवण मिळालं तर ठीक, दूध मिळालं तरी ठीक, लिंबाचा रस मिळो अथवा पाणी मिळो प्राणवायू राहू शकतो. सर्व इंद्रियं ही ज्याच्या आधाराने राहातात त्याला आहाराबद्दल कसलीही आसक्ती नाही. जे मिळेल त्याच्यावर तो काम करतो आहे. ही वृत्ती प्राप्त झाली पाहिजे. मी मोठा आहे, सर्व माझ्यावर अवलंबून आहे ही भावना झाली की संपलं, उन्नती थांबली. हे मी प्राणवायूपासून शिकलो. बाह्यवायू हा सर्व ठिकाणी वाहातो आहे. फुलाच्या बागेतून जाईल, स्मशानातून जाईल पण काहीही संबंध नाहीये. असंग तो असतो. ही वृत्ती बाह्य वायूपासून मी शिकलेलो आहे.

तिसरा गुरू आकाश आहे. आकाश जसं सर्वव्यापी आहे तसा मीसुद्धा सर्वव्यापी आहे. आकाश सर्वत्र असून असंग आहे. पाऊस पुष्कळ पडला तरी आकाश भिजत नाही किंवा ते वाळण्याची वाट पहावी लागत नाही. हे शिक्षण मी आकाशापासून घेतलं.

चौथा गुरू जल आहे. जल हे सर्वांना समाधान करणारं आहे. मधुर आहे. तीर्थजल तर पवित्र करणारं आहे. पापक्षय करणारं आहे. त्याप्रमाणे आपल्या सान्निध्याने सर्वांची पापं दूर करण्याची शक्ति मिळवली पाहिजे. हे जलापासून मी शिकलो.

पाचवा गुरू अग्नि म्हणजे तेज आहे. अग्निमधे काहीही टाकलं ओलं, वाळलेलं, चांगलं, वाईट ते सगळं तो दग्ध करतो आणि पुन्हा तेजस्वी राहातो. तसं पापपुण्याचा कुठलाही प्रसंग आला तरी साधकाने आपल्या तपःस्तेजाने तेजस्वी राहिलं पाहिजे.

सहावा गुरू चंद्र आहे. चंद्राच्या एक एक कला कमी होत जातात, पुन्हा वाढतात पण मूळ चंद्रस्वरूप तसंच राहातं. तसं देह हा विकारी आहे. पण मूळस्वरूप जो आत्मा तो कायम आहे, अविकारी आहे.

सातवा गुरू सूर्य आहे. सूर्य आपल्या सूर्यकिरणांनी उन्हाळ्यात नद्यांचं पाणी शोषून घेतो.

आणि पावसाळ्यात मेघांच्या रूपाने ते जल परत देतो. हा जो त्याग आहे तो सूर्यापासून मी शिकलो. संग्रह केला तरी तो त्यागाकरता आहे. संग्रह करू नये असा सध्या वाद निर्माण झालेला आहे. तोही आता बरोबर नाही असं आता वाटायला लागलंय. दुसरा एक गुरू संग्रहउदाहरणाकरता एक पक्षी आहे. त्या पक्षाला मांसाचा गोळा मिळाला आणि तो चोचीमधे धरून तो आकाशातून निघालेला असताना ज्यांना मांस मिळालं नाही ते पाच पन्नास पक्षी त्याच्या अंगावर धाऊन गेले. सगळे त्याला त्रास देऊ लागल्यावर त्याने तो मांसाचा गोळा टाकून दिला. त्याबरोबर सगळे पक्षी तिकडं गेले आणि हा वाचला. याचा अर्थ असा आहे की त्या पक्षाने संग्रह केला पण तो फक्त स्वतःकरता केला. संग्रह हा दोष नाही. अर्थसंग्रह अवश्य झाला पाहिजे. वैश्यांचा गुणधर्म सांगताना शास्त्रकार सांगताहेत की कितीही द्रव्य मिळवलं तरी ज्यांच्या मनाचं समाधान होत नाही तो खरा वैश्य आहे. त्याशिवाय अर्थार्जन कसं होणार ? त्याला, समाजाला, राष्ट्राला त्याचा उपयोग व्हायला पाहिजे ना. पण संग्रह करताना जर हे फक्त माझं आहे. मी प्रयत्न केलेला आहे यात कुणाचाही संबंध नाही अशी जर बुद्धि असेल तर ती वाईट आहे. एकएकवेळा तर स्वतःही भोग घ्यायचा नाही, दुसऱ्यालाही द्यायचं नाही, फक्त संग्रह करायचा. अशी बुद्धि असेल तर असा संग्रह हा दोष आहे.

संसारामधे आसक्ती, ममता वाढली असेल तर काय दोष होतो ते सांगतो.

नातिस्नेहः प्रसङ्गो वा कर्तव्यः क्वापि केनचित् ।।११.७.५२।। श्री. भा.

अतिशय ममता, हे माझं आहे ही आसक्ती माणसाने ठेऊ नये म्हणून एक गोष्ट सांगतो. एक कपोत पक्षी आणि त्याची स्त्री दोघेही अरण्यामधे झाडावर राहात होते. दोघांचं प्रेम होतं. अरण्यामधे विहार करावा, परत आपल्या स्थानात यावं असा त्यांचा काल चाललेला आहे. त्या पक्षिणीला मुलं झाली. त्या मुलांना घरट्यात ठेऊन एके दिवशी ते दोघे धान्य वगैरे आणायला बाहेर पडले. इकडे एका पारध्याने जाळं लावलं त्या झाडाखाली. ती पक्ष्याची पिल्लं धान्याच्या लोभाने खाली उतरली आणि त्या जाळ्यात सापडली. हे दोघे आले परत आणि ती पक्षिणी त्या पिलांना जाळ्यात अडकलेलं पाहिल्याबरोबर दुःखित झाली. प्रेम आहे. परमेश्वराच्या मायेचा मोह आहे. माझी मुलं म्हणून ती त्यांना सोडवायला गेली आणि ती ही त्या जाळ्यात अडकलेली आहे. हा कपोत पक्षी झाडावर बसून दुःख करतो आहे. माझी स्त्रीही गेली आणि मुलंही गेली. माझी मुलं, माझी स्त्री या ममतेने तो त्यांना सोडवायला गेला आणि तोही त्या जाळ्यात सापडलेला आहे. त्या पारध्याचं

काम सोपं झालं. एकदम सगळे पक्षी त्याला मिळाले. याप्रमाणे गृहस्थाश्रमी मनुष्य जो आहे त्याची त्या पक्ष्याप्रमाणे अवस्था होते. ममतेमधे अडकून त्याचा विनाश होतो.

अवधूत सांगतात, राजा, अजगराला मी गुरू केलेलं आहे. विषयेंद्रिय संयोगामुळे प्राप्त होणारं सुख जे आहे ते स्वर्गामधे, नरकामधे, पृथ्वीवर सारखंच आहे. सुखाची इच्छा करून जो प्रयत्न माणसाचा चाललेला आहे, तो बरोबर नाही. म्हणजे प्रयत्नाशिवाय सुख मिळेल? हो, असा सिद्धांत आहे. त्याला त्यांनी तर्क दिलेला आहे. दुःखाकरता कोणी प्रयत्न करतं का? दवाखान्यात जाऊन डॉक्टर मला उद्या ताप येण्याचं औषध द्या असं म्हणतो का आपण? पण येतो ना ताप? डॉक्टर जर ताप येण्याचं औषध द्यायला लागला तर त्याचा दवाखाना बंद होईल. तेव्हा दुःख हे प्रयत्न न करता का मिळतं हा त्यांचा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे सुखही मिळणं शक्य आहे. पूर्वीचं जे काही कर्म असेल त्यायोगाने सुख मिळू शकेल. दुःख मिळतं ना काही प्रयत्न न करता? पूर्वकर्माचं ते फल आहे. त्याचप्रमाणे पूर्वकर्मांचं फल म्हणून सुखही मिळणं शक्य आहे. पण तेवढं धैर्य पाहिजे. ते धैर्य असत नाही. बसून राहिलं तर कसं होईल? प्रयत्न नाही केला तर कसं होईल? हा एक विषय सांगितला. आणि जो मिळेल आपल्याला ते घेऊन त्यामधे संतोषाने राहाणे. हा सगळा उपदेश साधकाकरता आहे. अजगर हा एका जागी पडून राहातो नुसता. जवळ कुणी आलं पशू, पक्षी, मनुष्य तर भक्षण करतो नाहीतर निराहार पडून राहातो. ही अजगरवृत्ती म्हणजे दैववृत्ती आहे. पूर्वीचं माझं कर्म जर चांगलं झालेलं असेल तर मला सुख बसल्याजागी मिळालं पाहिजे. फार उच्चवृत्ती आहे ही. इतकं धैर्य सामान्य माणसांना असणं शक्य नाही. ह्या महात्म्यांनाच ते शक्य आहे.

त्याप्रमाणे गांभीर्य पाहिजे. एकदम उतावीळपण नको. समुद्रापासून मी गांभीर्य शिकलो. पावसाळ्यात नद्या भरून येतात, समुद्राला पुष्कळ पाणी मिळतं पण समुद्र आपली मर्यादा सहसा कधी सोडत नाही. उन्हाळ्यामधे नद्या आटल्या, पाणी कमी आलं म्हणून समुद्र आटला, लांब गेला असंही होत नाही. समृद्धी आली तरी अहंकार नाही, गांभीर्य आहे आणि समृद्धी गेली तरी विषाद नाही, गांभीर्य आहे. हे भगवद्भक्तांनाच शक्य आहे.

रूपासक्ति आहे. स्त्रीचं सौंदर्य पाहून मनुष्याच्या मनामध्ये आसक्ती उत्पन्न होते. पण ती उपयोगाची नाही. पतंग हा दिवा लागलेला पाहातो आणि त्याच्यावर झडप घालून नष्ट होतो. हे दोषत्यागाकरता पतंगाला गुरू केलेलं आहे. आसक्ती सोडण्यासाठी.

जे काही आपल्याला दिसतं आहे त्यातलं गुणग्रहण करण्याची वृत्ती पाहिजे. माधुकरी वृत्ती. मधुकर जो आहे तो प्रत्येक फुलापाशी जातो आणि त्याचा रस किंवा सार ग्रहण करतो. तसं अनेक शास्त्रं आहेत, अनेक विचार आहेत. त्यातील सार, प्रधानतत्व जे आहे ते त्या षट्पदाप्रमाणे, भ्रमराप्रमाणे कुठेही आसक्त न होता ग्रहण करण्याची वृत्ती पाहिजे.

संग्रहाची आसक्ती निर्माण झाली की दोष होतो. मधमाशी, हा एक गुरू केला. संध्याकाळी पुरलं पाहिजे, उद्याला पुरलं पाहिजे, महिनाभर पुरलं पाहिजे, जन्मभर पुरलं पाहिजे, संग्रह सुरू आहे. मधमाश्या सगळीकडे जाऊन मध आणतात आणि संग्रह करून ठेवतात. मधाने पोळं भरलेलं आहे. आपणही घेत नाहीत आणि दुसऱ्यालाही देत नाहीत. पण कोणीतरी येतो, त्यांना जाळून टाकतो आणि तो साठवलेला मध घेऊन जातो. अशी स्थिती होते नुसता संग्रह करण्याने, हा एक दोष सांगितला.

रसासक्ति ही ही मोठी भयंकर आहे. शब्दश्रवण करण्याची, गायन, वादन ऐकण्याची काहींना आवड असते. हरिण जो आहे तो गायन ऐकतो, श्रवण करतो आणि त्या व्याधाच्या आधीन होतो आहे. आपल्याला चांगलं चांगलं खायला मिळालं पाहिजे. ही ही रसासक्ति आहे. याकरता मीन म्हणजे माशाचं उदाहरण त्यांनी दिलंय. कोळ्याने जाळं टाकलेलं आहे आणि त्याच्यामधे काही खाण्याचा पदार्थ ठेवलेला आहे. तो मासा ते खाण्याकरता म्हणून जातो आणि गळात सापडतो. रसाची आसक्ति जास्ती उत्पन्न झाली की अशी स्थिती होते. आहारत्याग केला की इंद्रियं ताब्यात येतात पण रसनेंद्रिय ताब्यात येत नाही. ताप आल्यानंतर काही खाऊ नये असं वाटतं. ताप गेल्यानंतर हे खावं, ते खावं असं वाटतं. त्यावेळीच जपा म्हणतात. रसनेंद्रिय आवरलं जाणं फार कठीण आहे. 'जितं सर्वं जितो रसेण' ज्याने रसनेंद्रिय जिंकलं त्यालाच जितेंद्रिय म्हणतात.

मनामधे ज्या अनेक वासना आहेत, त्यामुळे काय दुःख होतं त्याबद्दल पिंगला वेश्येची कथा अवधूत सांगताहेत. हे फिरत असले पाहिजेत. जगाचं निरीक्षण करून आपला उद्धार आपल्याला करता येतो हे अवधूतांनी दाखवलेलं आहे. असा विचार जो करतो आहे त्याचा गुणग्रहण करणं. दोषत्याग करणं हा हेयोपादेय विवेक पूर्ण होतो आहे. ती पिंगला वेश्या रात्रीच्या वेळी आपल्या वाड्यामधे बसलेली आहे. कोणीतरी श्रीमंत मनुष्य येईल आणि आपल्याला द्रव्य मिळेल या आशेने ती वाट पाहती आहे. मध्यरात्र होऊन गेली तरी कुणी आलेलं नाही. झोप नाही. मग तिच्या

मनामधे हा विचार उत्पन्न झाला.

न हि अङ्ग अजातनिर्वेदो देहबन्धं निहासति ।।११.८.२९ ।। श्री. भा.

काय मला मोह झाला म्हणाली. मला द्रव्य मिळेल या आशेने मी थांबले, झोप नाही आणि द्रव्यही नाही. हृदयस्थ जो आनंदरूप आत्माराम आहे त्याचा मी विचारही केला नाही. त्याला सोडून देऊन या बाह्यमोहामधेच मी पडलेली आहे. त्या आशेमुळेच मी या दुःखामधे सापडलेली आहे. आत्मानंदाकडे आता माझं लक्ष गेलं तर बरं होईल. मला आता विरक्ती उत्पन्न झाली आहे ही ईश्वराची कृपा आहे. आत्मनिरीक्षण करून तो आत्मानंदच प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करीन.

आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ।<br>
यथा सञ्छिद्य कान्ताशां सुखं सुष्वाप पिङ्गला ।।११.८.४४ ।। श्री. भा.

अवधूत सांगतात राजा, जितक्या आशा, वासना मनामधे उत्पन्न होतील तितकं जास्ती दुःख आहे. आशा कमी होणं, पूर्ण निर्वासन अंतःकरण होणं हे खरं सुख आहे. त्या पिंगला वेश्येनं मनातली आशा टाकून दिल्यावर तिला गाढ झोप लागलेली आहे.

परिग्रहो हि दुःखाय ।।११.९.१ ।। श्री. भा.

जास्ती संग्रह करणं, आसक्ती ठेऊन संग्रह करणं यामुळे दुःख होतं. त्या पक्षाचं उदाहरण दिलंच आहे. साम्यवाद हा निर्माण करायला नकोय. ज्याच्याजवळ जास्ती संग्रह आहे त्याच्याजवळ बाकीचे जाणारच, त्याला त्रास देणार कायदा नकोय. संग्रह हा दुःखदायक आहे हे मनाला विचाराने पटलं पाहिजे. त्यागाकरता संग्रह आहे, हे पटलं पाहिजे.

त्यानंतर मानापमानातून कसं मुक्त व्हावं हे सांगताहेत अवधूत,

न मे मानावमानौ स्तो न चिन्ता गेहपुत्रिणाम् ।<br>
आत्मक्रीड आत्मरतिर्विचरामीह बालवत् ।।११.९.३ ।। श्री. भा.

मला कुणाचीही चिंता नाही. घरादाराची नाही. मुलाबाळांची नाही. मी आत्मानंदामधे निमग्न आहे. जगामधे चिंता केव्हाही नाही असे दोन पुरूष आहेत. आनंदी आहेत. लहान जो बालक आहे तो अज्ञानी आहे पण त्यालाही चिंता नाही आणि गुणातीत झालेला पूर्ण ज्ञानी महात्मा तो एक चिंतामुक्त आहे. त्या बालकाची वृत्ती मी लक्षात घेतली म्हणतात अवधूत. भूक

लागली की तेवढ्यापुरतं रडायचं, आईने दूध घातलं की पुन्हा खेळायला लागायचं. आई जेवली आहे का उपाशी आहे, भाऊ काय करतोय इकडे कुठे लक्षच नाही. आत्मानंदात तो निमग्न आहे. तो आत्मानंद सापडला मात्र पाहिजे.

त्यानंतर साधकाने कोणाची संगती करावी का नाही याबद्दल सांगताहेत. साधनाभ्यास हा एकट्याने करावा का सर्वांबरोबर करावा याबद्दल एक उदाहरण सांगताहेत. एक कन्या उपवर झाली आणि तिला पहाण्याकरता वरपक्षाची मंडळी घरी आली. घरातली वडील मंडळी कुठे बाहेर गेली होती. त्या मुलीनेच सगळ्यांचा आदरसत्कार केला. मंडळी बाहेर बसलेली आहेत. आणि आत जाऊन ती साळी कांडत बसली. त्यावेळेला सणावारी भात व्हायचा. शेतामधे जे होईल तेवढंच ग्रहण करायचं. धान्यसंग्रह करायचा, नसेल तर दुसरीकडून आणायचं, कर्ज काढायचं. पुन्हा लोकसंख्या अधिक आहे, धान्य कमी आहे म्हणूनही सांगायचं. असं सध्या चाललेलं आहे. ती कन्या धान्य कांडायला बसल्यावर तिच्या हातातल्या बांगड्या वाजायला लागल्या. बाहेर पाहुणे आलेले आहेत. बांगड्यांचा आवाज होणं योग्य नाही म्हणून तिने एकेक बांगड्या काढायला सुरूवात केली. दोन दोनच बांगड्या ठेवल्या. त्याही वाजायला लागल्या. मग एकेकच बांगडी ठेवली तेव्हा आवाज बंद झाला. पुढं तिच्या घरची मंडळी आली. कार्य झालेलं आहे. अवधूत सांगताहेत,

वासे बहूनां कलहो भवेद् वार्ता द्वयोरपि ।
एक एव चरेत्तस्मात् कुमार्या इव कमणः ।। ११.९.१० ।। श्री. भा.

जास्ती मंडळी एकाठिकाणी बसून साधन करू लागली म्हणजे मतभेद आहेत. कलह आहे. जास्ती मंडळींनी साधनाभ्यास करू नये. मग दोघांनीच करावा, मित्रा–मित्रांनी. नाही, मग गोष्टी बोलण्यातच वेळ जातो. मला असा अनुभव आला, असं झालं, म्हणजे साधन राहिलं बाजूला. जेव्हा त्या कुमारीची एकेकच बांगडी राहिली तेव्हा आवाज बंद झाला. यावर संशोधन करणारी बुद्धिवादी मंडळी म्हणतील, कुमारीने एकेकच बांगडी घालावी, असं अवधूतांचं म्हणणं आहे. असा अभिप्राय नाहीये. साधकाने साधनाभ्यास एकट्याने करावा तर मन हे स्थिर होणार. मनाची एकाग्रता अधिकाधिक वाढली पाहिजे म्हणजे मनातले सगळे दोष जातात. मन स्थिर झाल्यानंतर पूर्ण शांती प्राप्त होते.

एक बाण तयार करणारा कारागीर आपल्या दुकानामधे बसून बाण तयार करतो आहे, घासतो आहे. दुकानावरून राजाची स्वारी वाजत गाजत गेली तरी त्या कारागिराचं लक्ष त्या

बाणाकडेच आहे. एकाग्र झालेला आहे. राजकुमारांची परीक्षा घेण्याकरता द्रोणाचार्य सर्वांना घेऊन बाहेर पडले. वृक्षावर एक पक्षी तयार करून ठेवला होता. आणि त्यांनी आज्ञा केली, या पक्ष्याचं मस्तक तोडून खाली पाडायचं. त्याच्या अगोदर प्रत्येकाला विचारायचे, ''तुला काय काय दिसतंय ?'' मला झाड दिसतंय, पक्षी दिसतोय. असे वेगवेगळं सांगणाऱ्यांना त्यांनी म्हणावं, ''बाण सोडू नकोस, तुझी परीक्षा झाली.'' शेवटी अर्जुनाला विचारलं. तेव्हा तो म्हणाला, ''मला फक्त मस्तक दिसतंय''. त्यालाच बाण सोडायला सांगितला आणि मस्तक पडलं. द्रोणाचार्य सांगताहेत, ''तूच केवळ श्रेष्ठ धनुर्धर आहेस.'' मनाची योग्यता जितकी वाढेल तितकी जास्त श्रेष्ठता प्राप्त होते. मनोजयाने सत्वगुण विकसित होतो आणि प्राणजय होतो.

असे अनेक गुरू अवधूतांनी सांगितले आणि म्हणाले, ''राजा, अनात्म पदार्थ मनातून बाजूला करून आनंदरूपी परमात्म्याचं जर चिंतन करायला सुरवात केली. आणि मन जर तिथं स्थिर झालं तर त्याचा साक्षात्कार होतो. जीवभाव नाहीसा होऊन, ईश्वरभाव त्याला प्राप्त होतो. एका पेचस्काराने एका अळीला आपल्या घरट्यामध्ये आणून ठेवलेलं आहे. ती अळी त्या भ्रमराचं चिंतन करते आहे, हा भ्रमर आता येईल मला मारेल, मला खाईल असं चिंतन करता करता ती स्वतःच भ्रमररूप होऊन गेलेली आहे. ध्यानाचा प्रभाव आहे. जो ध्यास आपण घेऊ तसा अनुभव आपल्याला येतो. तेव्हा तो आत्मानंद मिळवण्याकडं लक्ष लागलं पाहिजे. अनेक गुरू आहेत. त्यांनी नमुन्यादाखल चोवीस गुरू सांगितलेत. 'जो जो जयाचा घेतला गुण, तो तो गुरू म्या केला.' नाथमहाराजांनी याच्यावर पुष्कळ लिहिलेलं आहे. तीन चार अध्याय याच्यावरच आहेत. सुंदर विवेचन केलेलं आहे. संतमहात्म्यांनी मराठीमधे पुष्कळ स्पष्टीकरण करून ठेवलेलं आहे.

भगवान म्हणतात, 'उद्धवा याप्रमाणे अवधूत दत्तात्रेयांनी यदुराजाला उपदेश केला. त्यामुळे त्याचं मन स्थिर झालेलं आहे. शांती मिळाली. उद्धवा सर्वही वर्णांना, आश्रमांना त्यांचे धर्म निरनिराळी कर्तव्य मी सांगितलेले आहेत. वर्णधर्म आहेत. आश्रमधर्म आहेत, लिंगधर्म आहेत. त्या सर्व धर्मांचं आचरण निष्काम बुद्धिने, ईश्वरार्पण बुद्धिने जो करतो आहे त्याचं चित्त शुद्ध होतं आहे. द्वैतबुद्धी जी आहे, भेदबुद्धी ही कमी कमी झाली पाहिजे. सर्वत्र एक परमात्मा श्रीहरी आहे अशी अभेद बुद्धी झाली पाहिजे. प्रवृत्ती कमीकमी झाली पाहिजे. यमांचं सेवन, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, दोषत्याग हे यम आहेत. नियम आहेत. सद्‌गुरूकडे जाऊन त्याचं मार्गदर्शन मिळवावं. ह्या शिष्याचे गुण सांगताहेत भगवान,

अमानी अमत्सरो दक्षो निर्ममो दृढसौहृदः ।
असत्वरः अर्थजिज्ञासुः अनसूयुरमोघवाक्।। ११.१०.६ ।। श्री. भा.

ज्ञान प्राप्त करून घेणाऱ्या शिष्याजवळ हे गुण पाहिजेत. पहिल्याप्रथम अमानित्व पाहिजे, अभिमान उपयोग नाही. मत्सर उपयोग नाही. कर्तव्यदक्ष पाहिजे. ममता उपयोग नाही. दृढ मैत्री पाहिजे. जास्ती गडबड उपयोगी नाही. कोणतंही काम करताना शांत चित्ताने तिकडे लक्ष दिलं पाहिजे. जिज्ञासू पाहिजे आणि सत्य बोलणारा पाहिजे. हे सगळे गुण संपादन करून त्याने सद्गुरूंकडून मार्गदर्शन घ्यावं. स्थूल–सूक्ष्म देहापासून स्वतंत्र असलेला जो आत्मा आहे तो स्वयंप्रकाश आहे. लाकडाला जाळणारा अग्नि म्हणजे काही लाकूड होत नाही. त्याच्यापेक्षा अग्नि वेगळाच आहे. तसं सर्व देहामधे राहाणारा, प्रकाश देणारा आत्मा देहापेक्षा वेगळा आहे. आचार्यांपासून जर हे ज्ञान झालं तर वैराग्य उत्पन्न होते. उद्धवजी विचारताहेत, ''बद्ध कुणाला म्हणायचं आणि मुक्त कुणाला म्हणायचं? हे ओळखायचं कसं? मुक्त झालेलाही शरीरधारीच असतो. तोही सर्वांच्याप्रमाणे व्यवहार करतो, मग ओळखायचं कसं?'' भगवान सांगताहेत, ''वस्तुतः बद्ध आणि मुक्त हे व्यवहार नाहीच आहेत. एक आत्मा जिथे आहे तिथे बद्ध कोण आणि मुक्त कोण? मायामोहामुळे बद्ध आणि मुक्त, मोक्ष आणि बंधन हा भेद उत्पन्न झालेला आहे. शोक, मोह, सुख, दुःख हे त्यामुळे उत्पन्न होतं. संसार हा वासनेमुळे आणि अविवेकामुळे उत्पन्न झालेला आहे. ज्ञान हे मोक्ष देणारं आहे, अज्ञान हे बंधनात टाकणारं आहे. जीव हा वास्तविक माझा अंश आहे. एकच आहे तो, वेगळा नाहीये. तरी अविद्येमुळे, अज्ञानामुळे तो बंधनात पडतो आहे. सुखी दुःखी, संसारी होतो आहे. विद्या ज्याने मिळवली तो मुक्त होतो आहे. या शरीररूपी वृक्षावर दोन पक्षी राहातात. जीव आणि ईश्वर नावाचे. हा जीव त्या वृक्षाची फळं जी उत्पन्न होतील ती भक्षण करतो. दुसरा जो आहे ईश्वर पक्षी तो फक्त पहातो आहे. हा जीव फल भक्षण करतोय. त्याला काय सुख होतंय, दुःख होतंय याचं निरीक्षण करणारा दुसरा पक्षी म्हणजे ईश्वर आहे. तो तटस्थ आहे. नित्य मुक्त आहे. ज्ञानसंपन्न जो आहे तो मुक्त आहे आणि अज्ञानामधे सापडलेला तो बद्ध आहे.

त्यानंतर उद्धवजी विचारताहेत, ''साधू, भगवद्भक्त कसा असतो? आपली भक्ति कशी आहे याचंही स्वरूप मला सांगा.'' भगवंत सांगताहेत.

कृपालुः अकृतद्रोहः तितिक्षुः सर्वदेहिनाम् ।
सत्यसारः अनवद्यात्मा समः सर्वोपकारकः ।।११.११.२९ ।। श्री. भा.

ही साधूंची लक्षणं आहेत. पहिला गुण म्हणजे दया. दुःखी जीवाला पाहून दया आहे. सर्वही अज्ञानामधे सापडलेले जीव, सुखदुःखामधे पडलेले आहेत. त्यांना या दुःखापासून सोडवावं अशी निर्हेतुक दया आहे. त्यामुळे स्वतःचं अमानित्व हे नैसर्गिक आलेलं आहे. त्यांना सुख-दुःखातून मुक्त करायचं आहे ही वृत्ती असल्यामुळे मी मोठा आहे असं वाटेल कशाला? निरहंकार, कुणाचाही द्रोह नाही. सर्व सहन करणं. अंतःकरणामधे कोणतीही इच्छा नाही. इंद्रियांचा निग्रह आहे. पावित्र्य आहे. मिताहार आहे. असे अनेक गुण ज्यांच्या ठिकाणी आहेत ते श्रेष्ठ साधू आहेत. भक्त आहेत. माझ्या स्वरूपाचं दर्शन ज्यांना झालेलं आहे. पूजा करणारे, ध्यान करणारे, कथाश्रवण करणारे. आत्मनिवेदन करणारे, त्याचप्रमाणे माझ्या सर्व लीलांचं वर्णन करणारे, पर्वकाली सर्व उपचार करून उत्सव करणारे, माझी मूर्ती स्थापन करणारे. एखादं मोठं उद्यान करणं, मंदिर बांधणं, एखादं मोठं स्थान करणं, त्याच्या पूजा इत्यादिकांची व्यवस्था करणं हे सर्वही भक्तिचं स्वरूप आहे. याप्रमाणे भक्ति करणारा जो आहे तो दुःखापासून मुक्त होतो. मूर्तीच्या ठिकाणी पूजा करतात. किंवा सूर्यमंडलात माझंच स्थान कल्पून त्याचीही पूजा करतात. भूमीच्या ठिकाणी पूजा आहे. जलाच्या ठिकाणी आहे. सर्व भूतांच्या ठिकाणी आहे. अतिथी माझेच रूप आहेत. याठिकाणी माझ्या स्वरूपाचं चिंतन करून पूजा करणारा जो आहे तो ही या बंधनातून मुक्त होतो. पूजा करणारा जो आहे तो ही या बंधनातून मुक्त होतो.

भक्ति ही किती श्रेष्ठ आहे हे भगवान सांगताहेत.

केवलेन हि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः।
ये अन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरञ्जसा ॥११.१२.८॥ श्री. भा.

गोकुलात राहाणाऱ्या गोपींचं केवल प्रेम आहे. भक्ति आहे. इतकं निस्सीम प्रेम त्यांच्या मनामधे आहे की बाह्य व्यवहार सगळा त्या विसरून गेल्या. कोणतं चांगलं, कोणतं वाईट, लोक आमची निंदा करतात का स्तुति करतात काही तिकडं लक्ष नाही. भगवान गोपालकृष्णांची भक्ति करायची, त्यांच्याकरता सर्व कार्यं करायची त्यामुळे त्या केवल भक्तिने मुक्त झाल्या. त्याकरता योगाभ्यास नको, ज्ञानाभ्यास नको, दानधर्म नको काही नको. म्हणून उद्धवा, हा जो विधीनिषेधात्मक भाव आहे इकडे तू लक्ष देऊ नकोस.

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥१८.६६॥ भ. गी.

हा अर्जुनाला केलेला उपदेशच भगवान इथे उद्धवजींना करताहेत. अनन्य भावाने माझी भक्ति कर म्हणजे माझी प्राप्ती होईल.

उद्धवजी म्हणताहेत, ''सर्व सोडून द्यायचं? काय तुमच्या वाणीबद्दल मला संशय यायला लागलाय. हे करा, हे करू नका असं विधिनिषेधात्मक तुम्हीच सांगीतलं शास्त्ररूपाने आणि आता सांगताय सर्व सोडून मला शरण ये.'' भगवान म्हणाले, ''जीवाच्या कल्याणाकरता वेदरूपाने मी सर्व सांगितलं. संसारवृक्षाची सुख-दुःखात्मक फल घेणारे जीव आहेत आणि ज्ञानी लोक मात्र आसक्त न होता संसार करताहेत. त्याकरता सद्गुरूंची सेवा करून ईश्वरभक्ति करून ज्ञानरूपी शस्त्र मिळवून या संसारवृक्षाचा छेद करायला हवा. उद्धवा ब्रह्मदेवांचे मानसपुत्र सनकादिक त्यांनी एकदा आपल्या पित्याला एक महत्वाचा प्रश्न विचारला.

गुणेषु आविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रभो।
कथं अन्योन्यसंत्यागः मुमुक्षोः अतितितीर्षोः ।।११.१३.१७।। श्री. भा.

पिताजी आमचं लक्ष एकंदर बाह्यविषयांकडेच आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाचामधे सर्व विषयांचा अंतर्भाव आहे. त्या विषयांकडून काही सुखाचा आस्वाद मिळाला की ते विषय मनामधे येऊन राहातात. संस्काररूपाने. त्यामुळे पुन्हा आपलं मन बाहेर जातं आणि पुन्हा पुन्हा विषय भोगण्याकडेच आपली प्रवृत्ती होते. मन विषयाकडे जाते आणि विषय मनामधे येतात. मग मन आणि विषयांचा संबंध सुटायचा कसा? मनाने विषय सोडायचे का विषयांनी मनाला सोडायचं? काय करायचं सांगा. ब्रह्मदेवांना काय उत्तर द्यावं असा प्रश्न पडला. त्यांनी माझं स्मरण केलं. मी हंसरूप धारण करून त्यांच्याजवळ गेलो. त्या ऋषिंनी मला विचारलं, ''आपण कोण आहात?'' मी त्यांना विचारलं, ''माझं हे बाहेरचं भौतिक रूप आहे. याला पाहून तुम्ही विचारलं का आतल्या रूपाने कोण आहे विचारलं? बाह्यरूपाने तुमचं शरीर, माझं शरीर पंचमहाभूतांचच बनलेलं आहे. आणि आत्मरूपाने हा प्रश्न अयोग्य आहे कारण आत्मा एकच आहे. तीन चार वेगवेगळे आत्मे असतील तर तुम्ही कोण आहात हे विचारणं ठीक आहे. तुम्हाला मार्गदर्शन करण्याकरता मी आलेलो आहे. तुम्ही जे विचारलं, ''चित्त विषयांकडे जातं आणि विषय पुन्हा चित्तामधे येतात, वासनारूपाने राहातात. याकरता एक मार्ग आहे. बाह्यविषय आणि अंतःकरण हे ज्या अधिष्ठानावर आहे ते मुख्य अधिष्ठान म्हणजे माझं रूप आहे. माझ्याच सद्रूपाच्या ठिकाणी बाह्यविषयही भासतात आणि अंतरंगही भासतंय. त्या अधिष्ठानाकडे जर चित्ताला जाता आलं

आणि माझ्या स्वरूपाचं अनुसंधान जर ते चित्त करू लागलं तर या दोघांचा संबंध सुटून जातो. ध्यान सांगितलेलं आहे. स्वरूपानुसंधान मुख्य आहे. आत्मस्वरूपाचं अनुसंधान ज्यावेळेला घडायला लागेल त्यावेळी विषयांचा आणि चित्ताचा संबंध सुटून जाईल.

चित्त त्यामधेच आनंदामधे निमग्न होतं. ध्यानाचं हे फल आहे. सर्व संसार हा अहंकाराचा आहे. बुद्धिचा आहे. आपण त्याच्यापेक्षा वेगळे आहोत हे ध्यानाने त्याला समजतं. त्या ध्यानाचा अभ्यास जितका जितका जास्ती होईल ; बाहेरचं मन ज्यावेळेला आत्मनिरीक्षण करायला लागेल, आत्मचिंतन करायला लागेल तितकं तितकं त्या प्रकृतिपेक्षा, या बाह्य जगापेक्षा आपण वेगळे आहोत हे लक्षात यायला लागतं. ही बुद्धि जी आहे, अहंकार जो आहे, चित्त आहे त्याच्यापेक्षा आपण वेगळे आहोत. हे समजल्याबरोबर संबंध सुटलेला आहे. मद्यपान केलेल्या मनुष्याला जसं भान राहात नाही, अंगावरचं वस्त्र पडलं का आहे काही त्याचं लक्ष नसतं तशी स्थिती समाधीपर्यंत पोचलेल्या माणसाची होते. मी साक्षात तुम्हाला हा मुख्य धर्म काय आहे, चित्ताने काय केलं पाहिजे हे सांगण्याकरता आलेलो आहे.

याप्रमाणे भगवंतांनी उद्धवजींना अनेक मार्ग दाखवलेले आहेत. प्रसंगाने असा योगाभ्यास ज्याचा चालू आहे, ध्यानयोग, सगुणरूपाचं ध्यान असो, निर्गुण स्वरूपाचं ध्यान असो. इतकंच नव्हे अणूचं संशोधन करणारे वैज्ञानिक त्यांना अणूची शक्ति दिसलेली आहे. ध्यानाने सर्व समजतं. ज्या वस्तूच्या ठिकाणी अंत:करण स्थिर झालेलं आहे त्या वस्तूचं सगळं स्वरूप ध्यानाने कळून येतं. सूक्ष्म वस्तू जी डोळ्याने दिसत नाही तिचं स्वरूपसुद्धा ध्यानाने कळतंय. बुद्धिचं सामर्थ्य आहे. ती बुद्धि बाह्यस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर करायची का आत्मानंदात स्थिर करायची हे समजलं पाहिजे. याप्रमाणे अभ्यास करणारा जो आहे त्याचा संसारभ्रम निघून जातो. जितेंद्रिय पुरुषाला त्या ध्यानाच्या योगाने सर्व सिद्धी प्राप्त होतात. म्हणजे त्याची मानसिक शक्ति वाढते. सिद्धी म्हणजे बाहेरून येतात असं नाही. मानसिक शक्तिचा विकास म्हणजे सिद्धी आहे. त्या सिद्धींचं वर्णन भगवंताने केलेलं आहे. काही शारीरीक सिद्धी आहेत. काही मानसिक सिद्धी आहेत. अणु होणं म्हणजे लहान होणं. मारुतीराय सीताशोधाकरता समुद्र उल्लंघून गेले तेव्हा केवढं धिप्पाड रूप घेऊन गेले. संध्याकाळच्या वेळेला तीरावर उतरल्यावर लगेच लहान झाले कारण तिथे प्रगट होऊन उपयोगाचं नव्हतं. सूक्ष्म रूप धारण करूनच राक्षसांच्या राजधानीचा तपास केला पाहिजे. मोठं होणं, लहान होणं या देहाच्या सिद्धी आहेत. हलकं होणं, जड होणं. प्राकाम्य सिद्धी असते, म्हणजे

संकल्प झाल्याबरोबर त्याप्रमाणे कार्य घडून येतं. त्याचप्रमाणे कोणत्याही ठिकाणी मन आसक्त न होणं ही एक सिद्धीच आहे.

गुणेषु असङ्गः वशिता ।।११.१५.५।। श्री.भा.

आणखी पुष्कळ सिद्धी आहेत. मनाप्रमाणे वेग असणं, इच्छेप्रमाणे रूप धारण करणं, परकाया प्रवेश करणं, इच्छामरणी होणं, त्रिकालज्ञान असणं, परचित्तज्ञान असणं, अग्निने, विषाने काहीही बाधा न होणं अशा अनेक प्रकारच्या सिद्धी आहेत. कोणत्या स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर केलं असता कोणती सिद्धी प्राप्त होते, कोणत्या शक्तिचा विकास होतो हे ही भगवंताने सांगितलं. या शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश करता येतो. शंकराचार्यांनी राजाच्या शरीरात प्रवेश करून, सर्व संसार कसा आहे हे समजून घेतलं आणि मग त्या सरस्वतीला उत्तर दिलं. अग्निमधे टाकलं असतानासुद्धा शरीराला त्या अग्निची बाधा होत नाही. असा मानसिक शक्तिचा विकास पुष्कळ प्रकारांनी करता येतो. मन आणि बुद्धिचा विकास वाटेल तेवढा होऊ शकतो. पण अशा सिद्धींच्या मागे लागणं म्हणजे माझ्याजवळ येणं शक्य नाही. माझ्याजवळ ज्याला यायचं आहे. माझी प्राप्ती ज्याला करून घ्यायची आहे त्याला या सिद्धी म्हणजे विघ्नं आहेत. मला अशी सिद्धी मिळाली पाहिजे, मला असं सामर्थ्य मिळालं पाहिजे अशा हेतूने जर कोणी साधना करेल तर माझी प्राप्ती होणार नाही.

कालक्षपणहेतवः ।।११.१५.३३।। श्री.भा.

जन्मतःच काही सिद्ध पुरुष असतात. वनस्पतींच्या योगाने सिद्धी प्राप्त करून घेणारे असतात. तपाने सिद्धी आहे. मंत्राने सिद्धी आहे. अनेक प्रकारच्या सिद्धी केवळ माझ्या कृपेने प्राप्त होतात.

नंतर उद्धवजींनी विचारलं, ''आपल्या विभूती कोणत्या कोणत्या आहेत ?'' हे विश्व सगळं आपलंच रूप आहे हे खरं आहे. पण या जगात विशेष रूपाने आपण कुठेकुठे असता ते मला सांगा.'' भगवान म्हणाले, ''असाच प्रश्न अर्जुनाने संग्रामाच्या पूर्वी केला होता. त्याला मी हा विभूतीयोग सांगीतला.

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।।१०.२०।। भ.गी.

सर्वांचा जीवात्मा हे माझं रूप आहे. काल हे माझं रूप आहे. त्याचप्रमाणे महतत्त्व आहे.

दुर्जयानामहं मन: ।।११.१६.११।। श्री.भा.

मन ही माझी विभूती आहे. अजिंक्य म्हणून जे आहे त्याच्यामधे मन हे माझं रूप आहे. मंत्रामधे प्रणव मी आहे. अक्षरामधे अकार मी आहे, सर्व देवांमधे इंद्र मी आहे. अशा पुष्कळ विभूती त्यांनी सांगीतल्या

मासानां मार्गशीर्षोऽहं नक्षत्राणां तथाभिजित् ।।११.१६.२७।। श्री.भा.

अहं युगानां च कृतम् ।।११.१६.२८।। श्री.भा.

युगामधे कृत्तयुग मी आहे, महिन्यांमधे मार्गशीर्ष महिना मी आहे, व्यासांच्यामधे द्वैपायनव्यास मी आहे. विशेष लोकोत्तर तेज ज्याठिकाणी असेल, पूर्ण कीर्ति ज्या ठिकाणी असेल; नियामक शक्ति ज्याठिकाणी असेल, त्याग ज्याठिकाणी आहे, शौर्य आहे त्या सगळ्या माझ्या विभूती आहेत. त्या विभूतीमधे कुठेतरी मन ठेवायला पाहिजे, अभ्यास करायला पाहिजे. माझं सूक्ष्म रूप काही दिसत नाही मग विभूतीचंच ध्यान करून पुढे जायचंय याकरता हे सांगितलं. वस्तुत: सर्वांचा निग्रह केला पाहिजे. ध्यान तरी कुठं पाहिजे. वाणीचा, मनाचा, प्राणाचा, इंद्रियांचा निग्रह केला पाहिजे. निग्रहातून हे सगळं समजून येतं.

त्यानंतर वर्णाश्रमांचा आचारधर्म कोणता आहे हे उद्धवजींनी विचारलं, भगवंतानी योगमार्ग सांगितला, सांख्यमार्ग सांगितला. सर्व विभूतींचं वर्णन केलं. कोणत्या कोणत्या धारणेनं कोणती सिद्धी मिळते हेही सांगितलं आणि आता चार वर्ण आणि चार आश्रम यांचे धर्मही त्यांनी सांगितलेले आहेत. ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी असे चार आश्रम आहेत. त्यातही ब्रह्मचर्यांमधे चार भेद आहेत, वानप्रस्थात, संन्यासाश्रमात चार भेद आहेत. या चार वर्णांचे, आश्रमांचे जे आचारधर्म सांगितलेले आहेत त्याच्या आचरणाने अंत:करणाची शुद्धी होते आणि मग भगवद्भक्तिच्या योगाने ज्ञान प्राप्त होतं. भक्तिनेही अंत:करण स्थिर होतं; शुद्ध होतं म्हणजे हे आचरण करणे हा शास्त्रीय प्रयत्नवाद आहे. श्रुती हे मुख्य प्रमाण आहे आणि त्या प्रमाणाने वागणं हे मुख्य आहे.

उद्धवा माझ्या भक्तिचं कारण काय आहे ? भक्ति कशी उत्पन्न होईल ते ही सांगतो.

श्रद्धा अमृतकथायां मे शश्वन्मदनुकीर्तनम् ।

परिनिष्ठा च पूजायां स्तुतिभिः स्तवनं मम ।। ११.१९.२० ।। श्री.भा.

ही भक्तिची साधनं आहेत. माझ्या अमृतमय कथा ऐकण्यासाठी श्रद्धा पाहिजे. त्या कथा श्रवण केल्यानंतर मुखाने त्यांचं संकीर्तन केलं पाहिजे. पूजा करण्याविषयी चित्त अत्यंत आस्थासंपन्न पाहिजे. वाणीने माझी स्तुती केली पाहिजे. गुणज्ञान असल्याशिवाय स्तुती होत नाही म्हणून श्रवण–कीर्तन पाहिजे. वंदन करणं, माझ्या भक्तांची पूजा करणं, सर्व ठिकाणी माझी भावना करणं. सर्व कामनांचा त्याग करणं, भोग, सुख सर्वही माझ्याकरता सोडून देण्याची तयारी पाहिजे. जे जे कर्म केले असेल, यज्ञ याग, जप जाप्य, दान धर्म हे सर्वही मला निवेदन करणं. अशा या साधनांनी,

मयि सञ्जायते भक्तिः ।।११.१९.२४ ।। भ.गी.

खरी भक्ति उत्पन्न होते. द्वंद्वमोह गेल्याशिवाय भक्ति उत्पन्न झाली असं समजता येत नाही.

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ।।७.२८ ।। भ.गी.

भगवद्गीतेतही भगवतांने अर्जुनाला हेच सांगितलं. पापक्षय झाल्यानंतर हा द्वंद्वमोह दूर होतो आहे. अविवेक दूर झाला म्हणजे मग भजनाला, भक्तिला सुरवात होते आहे. मग त्याला काहीही कमी राहात नाही. काही प्रश्न उद्धवजींनी केलेले आहेत. दान कशाला म्हणावं, तप कशाला म्हणावं, त्याग म्हणजे काय, सत्य म्हणजे काय, शम, दम म्हणजे काय. त्याची उत्तरं भगवंताने थोडक्यात दिली. भगवान सांगतात.

शमो मन्निष्ठता बुद्धेर्दम इन्द्रियसंयमः ।।११.१९.३६ ।।श्री.भा.

शम म्हणजे बुद्धि माझ्या ठिकाणी स्थिर होणं. इंद्रियांचा निग्रह म्हणजे दम आहे. सर्व दुःख सहन करणं म्हणजे तितिक्षा आहे. जिव्हा आणि उपस्थ यांना जिंकणं म्हणजे धैर्य आहे.

दण्डन्यासः परं दानं ।।११.१९.३७ ।। श्री.भा.

दंडन्यास करणं. 'दंडः भूतद्रोहः' श्रीधरस्वामींनी व्याख्या केली. भूतद्रोह टाकून देणे. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे' तुकाराम महाराज जे सांगतात यालाच दान म्हणतात. हे खरं दान आहे. कोणाचाही द्रोह करायचा नाही हे दान करायला पैसा लागत नाही.

कामत्यागस्तपः स्मृतम् ।।११.१९.३७ ।। श्री.भा.

मनातल्या सर्व वासना सोडणं हे तप आहे. कोणत्या वासनेनं कोणतं कर्म आपल्या किंवा इतरांच्या हातून घडतं आणि त्याचं फल काय मिळतं हे पाहून त्याचा त्याग करणं. निष्काम अंतःकरण करणं याचं नाव तप आहे.

विद्या आत्मनि भिदाबाधः ।।११.१९.४०।। श्री.भा.

आत्मे अनेक आहेत असं नाही. एक आत्मा आहे सर्वव्यापी ही विद्या आहे. ज्ञान आहे. निरपेक्ष राहाणं, संतुष्ट राहाणं हे गुण म्हणजेच श्री आहे; ऐश्वर्य आहे.

मूर्खो देहाद्यहंबुद्धिः ।।११.१९.४२।। श्री.भा.

पण्डितो बन्धमोक्षवित् ।।११.१९.४१।। श्री.भा.

देहाच्या ठिकाणीच अहंकार धारण करणारा हा मूर्ख आहे. अज्ञानी आहे. आणि बंध, मोक्ष हे सगळं ज्याला बरोबर समजतं तो पंडित आहे. चित्त विक्षेप होणं, नेहेमी विक्षिप्त अवस्थेत राहाणं हा वाईट मार्ग आहे.

दरिद्रो यस्त्वसन्तुष्टः कृपणो यो अजितेन्द्रियः ।

गुणेषु असक्तधीः ईशः ।।११.१९.४४।। श्री.भा.

नेहमी असंतुष्ट असणारा दरिद्री आहे. बाहेर संपत्ती असेल पण मनामधे संतोष नाही. आपल्या इंद्रियांच्या आधीन होणाऱ्याला कृपण म्हणतात. पण या विषयाच्या ठिकाणी कधीही ज्याचं चित्त आसक्त होत नाही तो श्रेष्ठ आहे, समर्थ आहे.

गुणदोषदृशिर्दोषः गुणस्तु उभयवर्जितः ।।११.१९.४५।। श्री.भा.

हा गुण आहे हा ग्रहण करावा, हा दोष आहे याचा त्याग करावा ही बुद्धिच दोष आहे. हे कशाला पाहिजे ? निवृत्ति जितकी होईल आणि जितकं मन स्थिर होऊन परमेश्वराच्या ध्यानात निमग्न होईल तो खरा गुण आहे.

याप्रमाणे भगवंताने सर्व काही सांगितलं. भक्ति, ज्ञान, कर्म यापैकी आपला अधिकार जिथे असेल त्याचं आचरण त्याने करावं. शुद्धी, अशुद्धी सगळी शास्त्राने दाखवलेली आहे. पण कर्म करण्याचा अधिकार ज्याला आहे त्याच्याकरता ते आहे. कालशुद्धी कोणती, देशशुद्धी कोणती, अन्नशुद्धी कोणती हे सगळं सांगितलेलं आहे. शुद्ध असलेलं सुद्धा काही ठिकाणी अशुद्ध होतं. हे सांगताहेत भगवान. पुष्पाची शुद्धी फक्त प्रोक्षणाने होते पण त्यानंतर जर त्या फुलाचा वास घेतला

तर ते अशुद्ध झालं ! शास्त्रानेच समजायचंय बाहेरून काय दिसणार आम्हाला ? त्याचप्रमाणे अन्न शिळं झालं तर ते अशुद्ध आहे. अशौच, सुतक असताना त्यातलं अन्न ग्रहण करणं हे अशुद्ध आहे. जो श्रीमंत आहे त्याला नवीन अन्न परवडू शकतं. पण जो दरिद्री आहे त्याने सुतकी अन्न खाल्लं तर ते अशुद्ध नाहिये; तो असमर्थ आहे ना ! मुलगा झाल्यानंतर दहा दिवसानंतर कळलं तर शुद्धी आहे; आज कळलं तर अशुद्धी आहे. श्रीमंत माणसाने फाटलेलं वस्त्र धारण करणं म्हणजे अशुद्ध आहे, दरिद्री माणसाला ते शुद्ध आहे. हे सगळेही विचार त्यांनी मुद्दाम सांगितले. धान्याची शुद्धी, काष्ठाची शुद्धी, सुवर्णाची शुद्धी. त्या त्या कालाने शुद्ध होताहेत. धान्य हे कालाने शुद्ध होतं. काष्ठ हे वायूने शुद्ध होतं. गजदंत अग्निने शुद्ध होतात. मृत्तिकेने शुद्ध होणारी पात्रं आहेत. हे सगळं कर्ममार्ग आचरण करणाऱ्याला सांगितलेलं आहे. त्याचं आचरण करून, सर्व कर्म ईश्वरार्पण बुद्धिने करणारा मुक्त होतो असा उपदेश भगवंतांनी उद्धवजींना केलेला आहे.

आता ज्ञान प्राप्त करून घेण्याकरता तितिक्षा पाहिजे आहे. परमार्थामधे सहनशीलता पाहिजे. त्याशिवाय ज्ञान उत्पन्न होणार नाही, उत्पन्न झालं तरी ते दृढ राहाणार नाही. म्हणून उद्धवा ह्या दुर्जन लोकांनी तुला त्रास दिला, मारलं, बांधून ठेवलं तरी सुद्धा खरं कल्याण जर तुला करून घ्यायचं असेल तर तुला हे सर्व सहन करावं लागेल. आत्मानुसंधान करायचं आहे ना ! आत्मानुसंधान करायला बुद्धि ही विवेकसंपन्न पाहिजे, स्थिर पाहिजे. या मानापमानाकडे तुझं लक्ष गेलं की तितिक्षा गेली. त्याने मला त्रास दिला, मी त्याला त्रास देणार हे संपत नाही कधी. तितिक्षा असली म्हणजे संपलं, सगळं सोडून दिलेलं आहे. उद्धवजी म्हणाले, ''देवा हे कित्ती कठीण आहे. दुसऱ्याने त्रास दिला असताना सर्व सहन करणं हे अत्यंत कठीण आहे.'' भगवंताने एक कथा सांगितली.

दुरुक्तैर्भिन्नमात्मानं यः समाधातुमीश्वरः ।।११.२३.२ ।। श्री.भा.

दुर्जनाने कित्तीही निंदा केली तरी ज्याच्या चित्तावर काहीही परिणाम होत नाही, जो शांत राहातो तो साधू आहे. नाथमहाराजांचही उदाहरण प्रसिद्ध आहे. हे जे दुर्जन आहेत, त्यांचा स्वभावच त्रास देण्याचा आहे. सहन करणं हा सज्जनांचा स्वभाव आहे. त्याकरता एका भिक्षूची गोष्ट तुला सांगतो. दुर्जनांनी त्याला कित्तीही त्रास दिला तरी त्याची तितिक्षा इतकी आहे की त्यामुळे त्याचं ज्ञान दृढ राहिलेलं आहे. तो संन्यासी प्रथमतः मोठा श्रीमंत होता. खूप पैसा त्याने मिळवला. पण अत्यंत रागीट आणि लोभी होता तो. त्या पैशाचा उपयोग आपल्या लोकांसाठीही त्याने केला नाही आणि दानधर्मही केला नाही. धर्मही नाही आणि उपभोगही नाही. दानधर्म नाही, कशाकरताही

द्रव्याचा उपभोग न केल्यामुळे देवतांचा कोप झाला आणि त्याचं द्रव्य नष्ट झालं. आप्तेष्टांनी काही द्रव्य नेलं, काही चोरांनी नेलं. घराला आग लागली त्यात सगळं नुकसान झालं. धर्म नाही, अर्थ नाही, काम नाही, सर्व आप्तेष्टांनी त्याला सोडून दिलं, याची संगत नको म्हणाले. एकटा पडला. तो विचार करतोय आणि त्याच्या मनात एकदम वैराग्य उत्पन्न झालं. पश्चाताप झालेला आहे. आजपर्यंत माझं आयुष्य फुकट गेलं म्हणाला. व्यर्थ परिश्रम केले. धर्माकरता उपयोग नाही, भोगाकरता उपयोग नाही. थोडा जरी लोभ मनामधे उत्पन्न झाला तरी बाकीच्या गुणांची हानी होते.

अर्थस्य साधने सिध्दे उत्कर्षे रक्षणे व्यये ।
नाशोपभोग आयास: ।।११.२३.१७।। श्री.भा.

सगळे श्रम आहेत. मिळवायचे श्रम आहेत. वाढवायचे श्रम आहेत. रक्षण करण्याचे श्रम आहेत. नाश झाला म्हणून दु:ख आहे. नेहमीच दु:ख आहे. चोरीची भिती आहे. कोणीतरी हिंसा करण्याची, त्रास देण्याची भिती आहे. काम, क्रोध, लोभ अनेक विकार यामुळे उत्पन्न होतात. अविश्वास उत्पन्न होतो. पंधरा अनर्थ सांगीतलेले आहेत अर्थामुळे उत्पन्न होणारे. ज्याला आत्मकल्याण करून घ्यायचंय त्याने अर्थापासून दूर राहायचंय. बंधूंची बुद्धि भिन्न होते, स्त्री; पुत्र, मित्र इत्यादि निघून जातात. सर्वांच्या मनात अविश्वास उत्पन्न होतो. त्या भिक्षूने ठरवलं. यापुढं कुठेही मन न गुंतवता, परमेश्वरचिंतन करून सर्वठिकाणी फिरायचं. आपल्याला सगळे सोडून गेलेले असल्यामुळे काही जबाबदारीही नाही. म्हणून संन्यासदीक्षा धारण करून तो भिक्षू फिरतो आहे. मिळेल ती भिक्षा घ्यायची आणि त्याच्यावर निर्वाह करायचा. पण दुर्जनांनी त्याला त्रास द्यायला सुरवात केली. कुणी त्याचा दंड घेतला, कुणी कमंडलू घेतला, कुणी माळ घेतली. लोक म्हणायला लागले, 'काय ढोंगी संन्यासी आहे. आधी नुसता पैसा, पैसा करून अत्यंत कृपण होता, आता पैसा गेल्यामुळे संन्यास घेऊन सगळ्यांना फसवतोय.' असा लोकांनी त्याचा अपमान करावा, चेष्टा करावी, त्याला बांधून ठेवावं, मारावं, पण त्याला जे धैर्य मिळालेलं आहे. आत्मचिंतनाने, त्याने त्याचा विवेक जागृत आहे. तो विचार करतोय, आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक ताप जे होताहेत हे आपलं दैव आहे.

आत्मनो दिष्टं प्राप्तं प्राप्तं अबुध्यत ।।११.२३.४१ ।। श्री.भा.
नायं जनो मे सुखदु:खहेतु:

न देवताऽत्मा ग्रहकर्मकाला: ।
मन: परं कारणमामनन्ति
संसारचक्रं परिवर्तयेद् यत् ।।११.२३.४३ ।। श्री.भा.

लोकांनी किती जरी त्रास दिला तरी याच्या मनामधे जे विचार येताहेत त्याच्यामुळे बाहेरच्या जगाकडे लक्षच नाहिये. हे लोक मला त्रास देणारे नाहीत. खरा त्रास कुणापासून होतो तो विचार करतो आहे. देवतांमुळे त्रास नाही, ग्रहांचा त्रास नाही, कर्मामुळे त्रास नाही. सगळे कार्यकारण भाव त्याने काढून टाकले आणि सांगतोय की हे मनच सर्व त्रासाला कारण आहे. हर्ष, विषाद मनामुळे उत्पन्न होतात आणि त्याला निमित्त झालेले, शत्रू, मित्र होतात. मनच संसार चक्र चालवतंय. मनामधे वासना उत्पन्न होतात. चांगली, वाईट कर्म होताहेत. आणि त्याप्रमाणे जन्माला जावं लागतं. आत्मस्वरूपाला काही कर्माचा संबंध नाही, हे मनामधे येतच नाही. आत्मा निष्क्रिय आहे. दान केलं पाहिजे, धर्माचं पालन केलं पाहिजे, यम नियमांचं आचरण केलं पाहिजे ही सगळी मनोनिग्रह करण्याकरता साधनं सांगितलेली आहेत. ज्याने विचाराने आपल्या मनाचं समाधान केलेलं आहे, स्थिर मन केलेलं आहे त्याला काहीही करण्याचं कारण नाही. ज्याचं मन शांत आहे त्याने दानधर्म वगैरे करायचं काहीही कारण नाही ! त्याला काय पुण्य मिळवायचंय ? पुण्यपापाच्या पलिकडे तो गेलेला आहे. आणि ज्याच्या ताब्यात मन नाही त्यानेही दानधर्म करून उपयोग नाही कारण मन त्याच्या ताब्यात नाहिच आहे; नुसतं बाहेरून करून काय उपयोग ? मनाच्या स्वाधीन सर्व आहे. जिंकता न येणारा शत्रू म्हणजे मन आहे. ज्याने मनाला जिंकलेलं आहे. त्याला सुख नाही, दुःख नाही, तो तरून गेलेला आहे. लोकांनी दुःख दिलं असं जरी मानलं तरी कुणाला दुःख दिलं ? बांधून कुणाला ठेवलं ? मारलं कुणाला ? देहाला मारलं. देह म्हणजे मी आहे असं ठरविणारं मन आहे. खरा विवेक जर मनामधे उत्पन्न झाला तर देह वेगळा आहे, आत्मा वेगळा आहे असं लक्षात येतं. मग आत्म्याला कुठं मारलं ? आत्म्याला कुठं त्रास झाला ? असं अंतर्निरीक्षण करतो आहे तो भिक्षू ! कर्माने दुःख झालं, ग्रहांनी दुःख झालं तरी देहाला दुःख होतंय. आत्मस्वरूपाला सुख नाही, दुःख नाही, काही नाही, पुण्य नाही, पाप नाही.

सुखदुःखप्रदो नान्य: पुरुषस्यआत्मविभ्रम: ।
मित्रोदासीनरिपव: संसारस्तमस: कृत: ।।११.२३.६० ।। श्री.भा.

उद्धवजी, तो भिक्षू अत्यंत विवेकसंपन्न झाल्यामुळे सर्व दुःखातून मुक्त झालेला आहे.

कुणीही सुख दुःख देणारा नाहिये. आपलाच भ्रम आहे. संसार हा अज्ञानाने, अविवेकाने झालेला आहे. म्हणून या मनाचा निग्रह ज्याला साध्य झालेला आहे आणि ते मन माझ्याठिकाणी स्थिर करता आलं तोच मुक्त होतो आहे हे सगळ्याही साधनांचं सार आहे.

असे सर्व मार्ग भगवंताने सांगितलेले आहेत. भगवद्भक्तिचं महत्व सांगितलं. अशी सर्व साधनं भगवंताने उद्धवजींना समजावून सांगितली. शेवटी भगवंताचं अर्चन कसं करावं हेही सविस्तर सांगितलं. पूजा कशी करावी. आरंभीला न्यास, ध्यान हे सगळं त्यांना समजावून सांगितलेलं आहे. शेवटी भगवान म्हणताहेत.

एष ते अभिहितः कृत्स्नो ब्रह्मवादस्य सङ्ग्रहः ।
समासव्यासविधिना देवानामपि दुर्गमः ।।११.२९.२३ ।। श्री.भा.

काही संक्षिप्त सांगितलं, काही सविस्तर सांगितलं. देवांनासुद्धा हे सगळं माहिती नाहिये. प्रत्यक्ष भगवान सद्गुरू म्हणून ज्यांना मिळाले असे उद्धवजी भाग्यवान आहेत. भगवान सांगताहेत, ''मी सांगितलेल्या गोष्टीचा तू विचार कर आणि ब्रह्मप्राप्ती करून घे. भक्तांना हे ज्ञान तू दे, त्यांना उपदेश कर.'' उद्धवजींना आनंद झाला. कंठ दाटून आलेला आहे. आता भगवंतांना सोडून राहायचंय. ''भगवन, माझ्या मनातील मोहरूपी अंधःकार दूर झालेला आहे. अर्जुनाचं अंतःकरण भगवंताने निर्मोह केलं ते कर्माकडे त्याची प्रवृत्ति जावी म्हणून.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा ।।१८.७३ ।। श्री.भ.गीता

असं अर्जुनाने कबूल केलं. इथं उद्धवजींना तर मुक्तंच केलेलं आहे. आपल्या जवळचं आत्मज्ञान त्यांना देऊन टाकलेलं आहे. हाच एक अधिकारी महात्मा आहे म्हणाले.

नोध्दवोऽण्वपि मन्न्यूनो यद्गुणैर्नार्दितः प्रभुः ।।३.४.३१ ।। श्री.भा.

भगवान सांगताहेत, ''जा उद्धवा, बदरिकाश्रमात जा, अलकनंदेमधे स्नान कर. तू पवित्र होशील. वल्कलं धारण कर. वनामधे मिळणारी फळं भक्षण कर. सुखाची इच्छा मनामधे ठेऊ नकोस. सर्व द्वंद्व सहन कर. आणि माझं अखंड चिंतन कर म्हणजे या त्रिगुणात्मक गतीच्या पलिकडं तू जाशील. उद्धवजींनी प्रदक्षिणा केली. चरणावर मस्तक ठेवलेलं आहे. नेत्रातून अश्रुधारा वाहताहेत. ज्ञान प्राप्त झालं तरी भगवत्प्रेम अखंड आहे कारण लहानपणापासून तसा अभ्यास आहे. भगवंताच्या पादुका मस्तकावर धारण करून उद्धवजी निघून गेलेले आहेत. भगवंताच्या

आशिर्वादामुळे, कृपेमुळे ते कृतार्थ झाले आणि उत्तम गती त्यांना प्राप्त झालेली आहे.

परीक्षित राजा विचारतोय, ''पुढं काय झालं?'' शुक सांगताहेत, ''राजा अत्यंत भयंकर अपशकुन व्हायला लागले. भगवंतानी सांगितलं. आता द्वारकेमधे कुणी राहू नका. सर्व स्त्रिया, बाल, वृद्ध यांना शंखोद्धार तीर्थाकडे जाऊ दे. आपण प्रभास क्षेत्रात जाऊ या. स्नान करू, देवतांची पूजा करू. ब्राह्मणांना दानधर्म करू. सर्व यादव मंडळी नौकेतून पलिकडे प्रभास क्षेत्रात येऊन पोहोचलेली आहेत. सगळी पुण्यकर्म त्यांनी केली. मध्येच कशी दुर्वासना उत्पन्न झाली कळत नाही. पुण्यवासना नव्हती अशी नाही. भगवंताच्या संकल्पामुळे झालं म्हणावं तर मग व्हायचं कसं ? उद्धवजींना ज्ञानमार्ग अबाधित ठेवण्याकरता भगवंताने विप्रशापातून मुक्त केलं. मग हा कर्मयोग नको राहायला का ? यादव हे काही नास्तिक नाही आहेत. परंतु ईश्वराच्या आज्ञेचं पालन करत असताना मधेच असा लोकांचा अपमान होतो आहे आणि त्याचं फल भोगावं लागतंय. सर्वांचं भोजन झालं आणि सर्वांनी मद्यपान केलेलं आहे. बुद्धि भ्रष्ट झाली आणि त्यांच्यात बोलाचाली सुरू झाली. एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढू लागले. रागावलेले आहेत आणि युद्धाला सुरवात झाली. घोड्यावर बसलेले आहेत, हत्तीवर बसलेले आहेत. निरनिराळ्या वाहनांमधे बसून एकमेकांचा नाश करताहेत. प्रद्युम्न, अनिरुद्ध, सांब, अक्रूर, सात्यकि सगळे मोठे मोठे यादव वीर, कृष्णभक्त असलेले, आज्ञापालन करणारे पण यावेळेला सगळं गेलं. मनातल्या सगळ्या दुर्वासना, तमोगुण सगळा उफाळून आला. आता हे सगळे देवच आलेले होते, भगवंताला साहाय्य करायला. त्यांच्या त्यांच्या स्थानाला परत पाठवायचं होत की काय कुणास ठाऊक. आणि यांच्या वृत्तिमुळे हा धर्ममार्ग पुढे शुद्धरितीने राहील की नाही असंही वाटलं की काय कुणास ठाऊक. पिता-पुत्र, मित्र-मित्र, भाऊ-भाऊ अशी लढाई सुरू झाली, बाण संपले, मग त्या लव्हाळ्याच्या बेटातली ती लव्हाळीच उपटून घेतली आणि त्यानेच एकमेकांना मारू लागले. बलराम, कृष्ण मधे पडले असता त्यांच्याच अंगावर धावून गेले, इतका विलक्षण परिणाम मनावर झालेला होता. मग राम-कृष्णही रागावलेले आहेत आणि त्यांनी त्या यादवांचा नाश केलेला आहे. वाऱ्याने एकमेकावर वेळू घासून अग्नि उत्पन्न झाला आणि ते संबंध वन जळून गेलेलं आहे. भूमीचा भार संपला म्हणाले भगवान. बलरामजी समुद्रतीरावर गेले आणि योगमार्गाने आपल्या शरीराचा त्यांनी त्याग केलेला आहे. एका अश्वत्थ वृक्षाखाली भगवान बसून राहिलेले आहेत. आपल्या

एका मांडीवर, दुसरा पाय ठेवला आणि टेकून बसले. मुसळातल्या राहिलेल्या तुकड्याचा त्या जरा व्याधाने बाण तयार केला होता. तो शिकारीला आलेला होता आणि लांबून पाहातोय तर भगवान श्रीकृष्णांचा पाय म्हणजे त्याला हरिणाचं मुख वाटलं. आणि त्याने तो बाण बरोबर त्या पायावर मारलेला आहे. मर्मस्थली तो बाण लागला. तो व्याध आला जवळ आणि त्याच्या लक्षात आलं की आपण हरिणाला नव्हे, देवाला बाण मारलेला आहे. पायावर डोकं ठेवलं त्या व्याधाने आणि म्हणाला, 'मला मारा, माझ्या हातून चूक झालेली आहे.' भगवान सांगताहेत, 'जा, स्वर्गलोकाला जा. तुझ्या इच्छेने हे झालेलं नाहिये.' विमानामधे बसून तो जरा व्याध स्वर्गलोकाला गेलेला आहे. भगवंतांचा सारथी दारूक शोध करीत त्याठिकाणी आलेला आहे. दारूकाने भगवंताला साष्टांग नमस्कार केलेला आहे. तेवढ्यात तो दिव्य रथ, घोडे, अस्त्रं सगळी आकाशात निघून गेलेली आहेत. तिथूनच आली होती. भगवंतांची शंख, चक्र, गदा, पद्म ही आयुधंही गेलेली आहेत. सारथ्याला भगवान सांगताहेत,

गच्छ द्वारवतीं सूत ज्ञातीनां निधनं मिथः ।
समर्षणस्य निर्याणं बन्धुभ्यो ब्रूहि मद्दशाम् ।।११.३०.४६ ।। श्री.भा.

सगळे यादव गेले म्हणून निरोप दे. बलरामांचही निर्याण झालंय. माझी आता अशी दशा आहे, मी काही येऊ शकत नाही. सगळ्यांना जाऊन सांग. द्वारकेत कुणीही राहू नका. ही द्वारका आता समुद्रामधे बुडून जाणार आहे. सर्वांनी आपापला परिवार घेऊन अर्जुनाबरोबर इंद्रप्रस्थाला जावं. तू ही माझं चिंतन करून, ही विश्वरचना म्हणजे माझी माया आहे असं समजून शांत रहा. असा उपदेश भगवंतानी दारूकाला केलेला आहे.

ब्रह्मादिक देव आकाशमंडलात आलेले आहेत, भगवंतांचं निर्याण कसं होतं ते पाहायला. सर्वांकडे एकदा भगवंताने पाहिलं आणि आपले डोळे झाकून घेतलेले आहेत. भगवंताने आपलं शरीर दग्ध केलं नाही. भगवान श्रीकृष्णांचं ते दिव्य, पवित्र आणि सुंदर शरीर हे एकदम अंतर्धान पावलेलं आहे ! त्यांच्याबरोबर सत्य, धर्म, धृति, कीर्ति हेही निघून गेलेलं आहे. ब्रह्मादिक देवांना, भगवान वैकुंठलोकामधे केव्हा आले हे कळलं देखील नाही. त्यांची ती योगगती पाहून सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटलेलं आहे.

शुकाचार्य सांगताहेत, ''परीक्षित राजा, सर्वही जीवांचे क्लेश दूर व्हावेत, म्हणून भगवान आले होते. अनंत लीला करून पुन्हा निजधामाला ते गेले. सांदिपनी गुरुमहाराजांचा यमलोकामधे

गेलेला मुलगा ज्यांनी परत आणून दिला. तुझंच उदाहरण पाहा ना. आईच्या गर्भामधे ब्रह्मास्त्रामुळे तू दग्ध होणार होतास पण तुझं संरक्षण भगवंताने केलेलं आहे. बाण मारणाऱ्या व्याधाला ज्याने स्वर्गलोकाला पाठवलं, त्याला स्वत:चं रक्षण करण्याचं सामर्थ्य नव्हतं काय ?

नैच्छत् प्रणेतुं वपुरत्र शेषितं ।
मर्त्येन किं स्वस्थगतिं प्रदर्शयन् ।। ११.३१.१३।। श्री. भा.

इथं आता राहायचं नाही असं आता भगवंतानी ठरवलं. दारूकाने द्वारकेत येऊन वसुदेव, देवकी, उग्रसेन वगैरे वडिल मंडळींना सर्व वृत्त त्याने सांगितलं. सर्व यादव गेले, राम–कृष्णही गेलेले आहेत. हे कानावर पडल्यावरच कित्येकजण गतप्राण होऊन पडलेले आहेत. सर्व मंडळी प्रभास क्षेत्रात आली, पाहताहेत सर्वजण मरून पडलेले आहेत. राम–कृष्ण दिसत नाहीत. वसुदेव, देवकी, रोहिणी यांचंही प्राणोत्क्रमण झालेलं आहे. भगवद्विरह सहन झाला नाही. सर्व यादवस्त्रियांनी आपापल्या पतीचं शरीर घेऊन सहगमन केलेलं आहे. रामपत्नी, वसुदेवपत्नी, रुक्मिण्यादिक सर्व स्त्रियांनी सहगमन केलेलं आहे. अर्जुनाला भगवंताच्या वियोगामुळे अतिशय दुःख झालेलं आहे. कसंतरी मनाचं समाधान करून घेऊन बाकी राहिलेल्या वृद्ध मंडळींना, लहान मुलांना घेऊन अर्जुन इंद्रप्रस्थ नगरात आलेला आहे. अनिरुद्धाचा पुत्र वज्र याला त्यांनी अभिषेक केला. कृष्णनिर्याण झाल्याचं ऐकून तुझे पितामह धर्मराज, भीम वगैरेंनी उत्तरेकडे प्रयाण केलं आणि त्यांचही निर्याण झालेलं आहे. असं हे भगवंतांचं दिव्य चरित्र राजा तुला निवेदन केलेलं आहे.

।। भगवान् श्रीकृष्ण चरित्र समाप्त ।।

पुढे शुकाचार्यांनी, भगवान श्रीकृष्ण निजधामाला निघून गेल्यानंतर कोणाकोणाचे वंश झाले याबद्दल थोडक्यात परीक्षित राजाला सांगीतलं. कलिचे काय काय दोष आहेत, कलियुगामधे काय काय होणार आहे हे सगळं त्यांनी सांगीतलं. भगवंतांचं नामस्मरण करणारा जो आहे तोच या कलिदोषातून मुक्त होतो. कालाचं वर्णन करताना प्रलयाबद्दल सांगताहेत. नित्य प्रलय, नैमित्तिक प्रलय, आत्यंतिक प्रलय, महाप्रलय वगैरे सांगताहेत. ब्रह्मदेव निद्रिस्त झाले असताना त्यावेळी त्रैलोक्याचा प्रलय होतो. हा नैमित्तिक प्रलय आहे. ब्रह्मदेवांची निद्रा ही त्याला निमित्त आहे. ब्रह्मदेवांचं आयुष्य संपल्यानंतर ब्रह्मदेवही मुक्त होतात. त्यावेळी सप्तप्रकृतीचा प्रलय होतो, हा महाप्रलय आहे; प्राकृतिक प्रलय असंही याला म्हणतात. सबंध ब्रह्मांडाचा विनाश होतो आहे. आत्मज्ञान झाल्यानंतर सर्व विश्वाभास मावळून जाणं याला आत्यंतिक प्रलय म्हणतात. मोक्ष

ज्याला म्हणतात. कालज्ञांच्या दृष्टीने नित्य प्रलयही आहे असं म्हणतात. 'सर्व क्षणिकं, क्षणिकं' हे आहे का आणखीन काहीतरी आहे सांगता येत नाही. प्रवाहनित्यता काही मानतात म्हणजे तो नित्यप्रलयंच आहे. प्रत्येकाचं रूपांतर होतो आहे. असं हे प्रलयासंबंधीचं विवेचन शुकाचार्यांनी केलेलं आहे. आणि शेवटी त्याला विचारताहेत, राजा आज मला मृत्यू येणार आहे अशी तुला भीती वाटत नाही ना ? अशी भीती वाटणं ही पशुवृत्ति आहे. तू जन्मालाही आलेला नाहीस आणि तुला मृत्यूही नाही. हे सगळे देहाचे धर्म आहेत. देह जन्माला आलेला आहे. देहाचा नाश होणार आहे. आणि परंपरेने मुलगा, नातू, पणतू या रूपाने तू राहाणारच आहेस. अजरामर आत्मस्वरूप जे आहे तिकडं तू लक्ष दे. परमात्म्याच्या लीला तू ऐकलेल्या आहेस त्याचं चिंतन कर. समाधीमधे तू निमग्न राहा; म्हणजे तक्षक आला, तुला दंश केला याचं भानही तुला राहाणार नाही.

यात्रमाणे परीक्षित राजाने सर्व श्रवण केलं. शुकाचार्य महाराजांच्या पायावर मस्तक ठेवलं. तो म्हणाला, ''महाराज, आपण दयाळू होऊन हा मार्ग मला दाखवला. हरीच्या सर्व लीला मला सांगितल्या. आपल्या मुखातून भागवत पुराण मला ऐकायला मिळालं. आता मला मृत्यूची भीती वाटत नाही. निर्भय अशा श्रीहरीच्या चरणाजवळ मी प्राप्त झालो आहे. आता त्याचं चिंतन करून, वाणीचा निग्रह करून, भगवद्ध्यानामधे मी निमग्न होतो. चित्तातल्या सर्व वासना नष्ट झालेल्या आहेत. देहत्यागाला मी तयार आहे. आपल्या कृपेने माझं अज्ञान दूर झालेलं आहे. ''आचार्यांची पूजा राजाने केली आणि शुकाचार्य महाराज नंतर त्या स्थानातून निघून गेले. भगवत्‌चिंतन करत राजा बसलेला आहे. समाधी अवस्थेपर्यंत तो पोचलेला आहे. त्याचं देहभान नाहिसं झालं. विप्रपुत्राच्या आदेशाप्रमाणे नागराज तक्षक हा परीक्षित राजाला दंश करायला निघालेला आहे. मार्गामधे नदीतीरावर एका मांत्रिक ब्राह्मणाची भेट झाली. तो मांत्रिक मोठा सामर्थ्यवान होता आणि परीक्षित राजाला वाचवायला तो चाललेला होता. त्याची शक्ति लक्षात घेऊन, त्या ब्राह्मणाला भरपूर द्रव्य देऊन तक्षकाने परत पाठवलं. राजा समाधीमधे मग्न आहे. गर्दी बरीच जमलेली आहे. त्यावेळी तो तक्षक कुठून, कसा आला आणि केव्हा त्याने राजाला दंश केला. कळलं देखील नाही. त्या विषाग्निमधे परीक्षित राजाचं शरीर दग्ध होऊन गेलेलं आहे. आपल्या पित्याचा नाश तक्षकाने केला हे जनमेजय राजाला समजल्यावर त्याला अत्यंत राग आलेला आहे. मंत्रज्ञ ब्राह्मणांना बोलावून त्याने सर्पयाग सुरू केलेला आहे. कुंडामधे हजारो सर्प येऊन पडताहेत,

नष्ट होताहेत. जनमेजयाने विचारलं ऋत्विजांना, 'तो तक्षक अजून का कुंडामधे येऊन पडला नाही ?' तक्षक इंद्राला शरण जाऊन त्याच्या आश्रयाला गेला होता. राजा म्हणाला त्या इंद्रालाही अग्निकुंडामधे आणून टाका. त्याप्रमाणे त्या ऋत्विजांनी आपल्या मंत्रप्रभावाने इंद्र, आणि तक्षक दोघांनाही आकर्षण करून यज्ञकुंडामधे दग्ध करण्याचं ठरवलं. बृहस्पतिंनी येऊन जनमेजयाला सांगितलं, 'हा देवराजा, आणि हा सर्पराजा या दोघांनीही अमृतपान केलेलं आहे. यांचा नाश करणं बरोबर नाही. तुझा पिता गेला. तक्षक हा निमित्तमात्र आहे. जीवन-मरण हे आपल्या कर्माने आहे. मृत्यूकरता काहीतरी निमित्त होतं आणि मृत्यू येतो, तो ठरलेला असतो. सर्पदंश, अग्नि, वीज, रोगराई असं काहीतरी निमित्त होतं आणि ते शरीर पडतं. आता हे सर्पसत्र तू बंद कर. कित्ती सर्प गेले, त्यांचंही नशीब होतं.' बृहस्पतीचं वचन मान्य करून, जनमेजयाने तो सर्पयज्ञ बंद केलेला आहे.

सूतजी सांगताहेत ऋषिंना, ''व्यास महर्षिंनी वेदाचे चार विभाग केले. त्यानंतर सगळी पुराणं रचली. पैल, वैशंपायन इत्यादिकांनी त्या वेदांचं अध्ययन केलेलं आहे. आमचे पिताजी जे आहेत, रोमहर्षण यांनी सर्व पुराणांचा अभ्यास केलेला आहे. आणि त्यांच्यापासून मी याचा अभ्यास केला,'' ऋषि म्हणाले, ''आमच्या कुळामधे जन्माला आलेले मार्कंडेय ऋषि यांचं चरित्र आम्हाला सांगा. ते चिरंजीव आहेत. त्यांना वटपत्रावर बालमुकुंदांचं दर्शन झालं असं आम्ही ऐकलेलं आहे. सूत सांगताहेत,

प्राप्तद्विजातिसंस्कारो मार्कण्डेयः पितुः क्रमात् ।।
छंदास्यधीत्य धर्मेण तपःस्वाध्यायसंयुतः ।।१२.८.७।। श्री.भा.

मार्कंडेय ऋषि उपनयन झाल्यानंतर वेदाध्ययनाकरता गुरूगृही राहिलेले आहेत. आजन्म ब्रह्मचारी राहाण्याचं त्यांनी ठरवलेलं आहे. अध्ययन झालं, तपश्चर्या सुरू झालेली आहे. अखंड तपामधे ते निमग्न आहेत. कित्तीतरी काळ गेलेला आहे.

कालो महान् व्यतीयाय मन्वन्तरषडात्मकः ।।१२.८.१४।। श्री.भा.

सहा मन्वंतरं इतकी त्यांची तपश्चर्या झालेली आहे. भगवंताचं ध्यान अखंड चाललेलं आहे. योगाभ्यासामुळे चित्त स्थिर झालेलं आहे. इंद्राला भीती उत्पन्न झाली. त्यांचा तपोभंग करण्याकरता त्याने गंधर्व, अप्सरा पाठवल्या. त्यांनी नृत्यगायन केलं, परंतु मार्कंडेयांच्या मनावरती काहीही

परिणाम झाला नाही. त्यानंतर भगवान श्रीहरी नारायण हे प्रसन्न झाले आणि अनुग्रह करण्याकरता काय वर पाहिजे असं त्यांनी विचारलं. मार्कंडेयांनीही भगवंताची पुष्कळ स्तुती केलेली आहे, आणि मागितलं भगवंताला की 'आपली माया मला पाहायची आहे.' 'बरंय, पाहा म्हणाले', असं म्हणून नारायण अदृश्य झाले. पुढे एकदा मार्कंडेय ऋषि आश्रमात असताना, संध्याकाळच्या वेळी जोरात पाऊस पडायला लागला. तो संपूर्ण आश्रम त्या पावसामुळे जलमय झाला. समुद्राची मर्यादा संपलेली आहे. आणि त्या जलामधे मार्कंडेय ऋषि वाहात चाललेले आहेत. नाकातोंडात पाणी जातंय. क्षुधा तृषा यांचा प्रतिकार करता येत नाही. जिकडे तिकडे अंधार पडलेला आहे. अशा रितीने पुष्कळ काळ गेला आणि शेवटी एका तीरावर येऊन ते पोहोचले. भूमीवर आले तिथे पाहताहेत, एक मोठा वटवृक्ष आहे. त्या वटवृक्षाच्या एका पानावर एक दिव्य बालक निजलेलं आहे. आपल्या पायाचा अंगठा हातात धरून तो चोखायचं काम चाललेलं आहे.

करारविन्देन पदारविन्दं मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।।
वटस्य पत्रस्य पुटे शयानं बाल मुकुंदं मनसा स्मरामि ।।

त्या मुलाला पाहिल्याबरोबर ऋषिंचे सगळे श्रम दूर झाले. मुलाला जवळ घ्यावं म्हणून मार्कंडेय ऋषि जवळ गेलेले असताना, त्याच्या श्वासाबरोबर उदरामधे गेले. तिथे पाहताहेत तर सर्व विश्व त्याठिकाणी आहे, आपला आश्रमही आहे. पुन्हा बाहेर पडले, पाहताहेत ते जल आहे. एकाएकी ते सगळं दृश्य नाहिसं झालं आणि मार्कंडेय ऋषि पुन्हा आपल्या आश्रमात आहेत. पाऊस नाही आणि जल नाही हे असं मायादर्शन त्यांना झालेलं आहे. शरण गेले भगवान श्रीहरींना आणि त्यांचं अखंड चिंतन करू लागले. एकदा भगवान शंकर हे पार्वतीमातेसह जात असताना मार्कंडेय ऋषिंच्या आश्रमाजवळ आले. त्यांनी पार्वतीला सांगीतलं, हा मोठा ऋषि आहे, नारायण भक्त आहे. याला आपण भेटून जाऊ या. आले आश्रमात. ऋषि डोळे झाकून समाधिस्थ आहेत. शंकर परमात्मा त्यांच्या चित्तामधे गेले. एकदम त्यांनी डोळे उघडले, नमस्कार केला. शंकरांची, पार्वतीची पूजा केलेली आहे. भगवान शंकरांनी त्यांना वर प्रदान केला आणि त्यांची स्तुतिही केली, 'तुमच्यासारखे साधू हे सर्वोपकारक आहेत.

आकल्पान्ताद् यशः पुण्यं अजरामरता तथा ।।१२.१०.३६।। श्री.भा.
ज्ञानं त्रैकालिकं ब्रह्मन् विज्ञानं च विरक्तिमत् ।
ब्रह्मवर्चस्विनो भूयात् पुराणाचार्यतास्तु ते ।।१२.१०.३७।। श्री.भा.

हे मार्कंडेय ऋषे, तुझी कीर्ति कल्पपर्यंत राहिल. अजरामर तुम्ही व्हाल. सर्व ज्ञान विज्ञान तुम्हाला प्राप्त होईल. ब्राह्मतेज प्राप्त होईल आणि पुराणाचार्य तुम्ही व्हाल. 'सर्व पुराणातील निर्माण होणारे संदेह दूर करण्याचं कार्य हे मार्कंडेय ऋषिंकडे आहे. पुराणं हे पौरुषेय वाङ्मय आहे. बुद्धिमधे काही संदेह निर्माण होतात. आणि त्यामुळे शांती राहात नाही. तो संदेह दूर करून, त्याचं रहस्य समजावून सांगणारे म्हणजे मार्कंडेय ऋषि आहेत. तो वर देऊन भगवान शंकर निघून गेले.

यापुढं सूतजींनी, तांत्रिक मार्गाने कशी कशी पूजा करतात तेही सांगितलेलं आहे. भगवंताची आयुधं म्हणजे काय काय आहे याबद्दलचं रहस्यही त्यांनी सांगितलेलं आहे.

बिभर्ति सांख्यं योगं च देवो मकरकुण्डले ।।१२.११.१२।। श्री.भा.

सांख्य आणि योगही देवाची मकर कुंडलं आहेत. त्यांच्या कंठात असलेली वरमाला म्हणजे त्यांची माया आहे. पीतांबर म्हणजे छंदोमय वस्त्र आहे. आध्यात्मिक रीतीने त्याच विवरण केलेलं आहे. आणि अशा भगवंताची सेवा तंत्रमार्गाला अनुसरून भक्त करत असतात.

भगवान सूर्यनारायणांची प्रत्येक महिन्यात कोणकोणती रूपं आहेत, त्यांचा परिवार काय आहे हेही सूतजींनी सांगीतलं.

नंतर सूतजींनी भागवतामधे कोणते कोणते विषय आलेले आहेत ते सांगायला सुरवात केली. अवतरणिका, ऐकलेलं आहे त्यांना पुन्हा लक्षात यावं म्हणून सूत सांगताहेत.

एतद् वः कथितं विप्रा विष्णोश्चरितमद्भुतम् ।
भवद्भिर्यदहं पृष्टो नराणां पुरुषोचितम् ।।१२.१२.२।। श्री.भा.

तुम्ही विचारल्याप्रमाणे हे भगवंताचं चरित्र सांगितलेलं आहे. पापक्षय करणाऱ्या भगवान श्रीहरीचं यामधे पूर्ण वर्णन आलेलं आहे. भक्तियोग आहे, वैराग्य आहे. परीक्षित राजाचं आख्यान आहे. नारदांचं आख्यान आहे. राजर्षि परीक्षित राजा प्रायोपवेशन करून नदीतीरावर बसलेला आहे आणि शुकाचार्य महाराज त्याला उपदेश करायला आलेले आहेत. इतके विषय पहिल्या स्कंधामधे आलेले आहेत.

विराट स्थूल रूपाच्या ठिकाणी चित्त धारणा करणं, सूक्ष्म स्वरूपाच्या ठिकाणी चित्त धारणा करणं, शरीरातून उत्क्रांति कशी करता येते, नारद ब्रह्मदेव संवाद, ब्रह्मदेवांकडून अनेक अवतारांचं कथन हे विषय दुसऱ्या स्कंधामधे आलेले आहेत.

उद्धवजी–विदुर संवाद, विदुर–मैत्रेय संवाद, प्राकृतिक सर्ग, वैकृतिक सर्ग, ब्रह्मांड संभूति, स्थूल–सूक्ष्म कालाचं वर्णन, ब्रह्मदेवांची उत्पत्ति, सर्व प्रकारची सृष्टी उत्पत्ति, स्वायंभुव मनूची उत्पत्ति, त्यांची संतती, कर्दम–देवहूती चरित्र, कपिलावतार, कपिल महामुनींचा देवहूतीला उपदेश, हिरण्याक्ष वध हे सर्वही विषय तिसऱ्या स्कंधामधे आलेले आहेत.

सतिचं चरित्र, दक्षयज्ञ विध्वंस, ध्रुवचरित्र, पृथूराजाचं चरित्र, प्राचीनबर्हि राजाचं चरित्र हे सगळे विषय चौथ्या स्कंधामधे आलेले आहेत.

प्रियव्रत, नाभी राजा, आग्नीध्र, राजांची चरित्रं, ऋषभदेवांचं चरित्र. भरत राजाचं चरित्र, सप्तसमुद्र, सप्तद्वीपं, नद्या, पर्वत यांचं वर्णन, द्युलोकातल्या ज्योतिष्चक्राचं वर्णन, सप्तपातालांचं वर्णन, नरकांचं वर्णन हे सगळे विषय पाचव्या स्कंधामधे आलेले आहेत.

दक्ष प्रजापतिच्या कन्या, त्यांच्यापासून झालेली संतती देव, असुर, मानव, प्राणी, पक्षी इ. अजामेळ चरित्र, वृत्रासुर नाश, हे सगळे विषय सहाव्या स्कंधामधे आलेले आहेत.

प्रल्हाद चरित्र, नरसिंह अवतार, नारदांकडून धर्मराजाला सर्व वर्ण आश्रमांचे धर्म प्रतिपादन, हे विषय सातव्या स्कंधामधे आलेले आहेत.

चतुर्दश मन्वंतरांचं वर्णन, गजेंद्र मोक्ष आख्यान, प्रत्येक मन्वंतरात झालेल्या भगवंताच्या अवतारांचं वर्णन, कूर्मावतार, धन्वंतरी अवतार, मोहिनी अवतार, मत्स्यावतार, वामनचरित्र हे सगळे विषय आठव्या स्कंधामधे आलेले आहेत.

सूर्यवंश आणि चंद्रवश यातील राजांचं चरित्रं, शशाद, नृग, शर्याति, खट्वांग, मांधाता, इत्यादि राजांची चरित्रं, भगवान रामचंद्रांचं चरित्र, भार्गवरामांचं चरित्र, पुरुरवा, ययाति, दुष्यंत, भरत, यदुराजा इत्यादि सर्व राजांची चरित्रं नवव्या स्कंधामधे आलेली आहेत.

भगवान गोपालकृष्ण जन्म, गोकुळातल्या लीला, शरदऋतूमधे भगवंताने गोपींबरोबर केलेली रासक्रीडा, अनेक दैत्यांचा केलेला नाश, कंसाचा नाश, सांदिपनी गुरुमहाराजांचा मुलगा यमलोकातून परत आणून देणे, कालयवन वध, द्वारकानगरी निर्मिती, जरासंधाचा पराजय, रुक्मिणीहरण व विवाह, शंकरांशी युद्ध, शिशुपाल, शाल्य, पौण्ड्रक इ. राजांचा नाश, भारतीय युद्धात पांडवांचं निमित्त करून अगणित सैन्याचा नाश करून भूमीभार हलका केला, इत्यादी दिव्य कृष्णचरित्र दहाव्या स्कंधामधे आलेलं आहे.

विप्रशापाच्या निमित्ताने यादवकुलाचा नाश, उद्धवजींना परमार्थ मार्ग निवेदन, अवतार समाप्ति इत्यादि विषय अकराव्या स्कंधामधे आलेले आहेत.

चतुर्विध प्रलय, राजर्षि परीक्षिताचा देहत्याग, मार्कंडेयांचं चरित्र, तंत्रपूजाविधी, सूर्यनारायणांबद्दल माहिती हे सगळे विषय बाराव्या स्कंधामधे आलेले आहेत.

कोणत्याही परिस्थितीत माणूस सापडलेला असला. धर्म भ्रष्ट झालेला आहे, संकटग्रस्त झालेला आहे, अशावेळी 'हरये नमः' असे शब्द जर त्याच्या मुखातून बाहेर पडले तर सर्व पातकांपासून तो मुक्त होतो. भगवंताच्या लीला श्रवण करणं, भगवंताचं अखंड स्मरण राहाणं यारूपाने सर्व पातकांचा क्षय होतो. वासनानाश होतो आहे. सत्व शुद्ध होतं आहे. भगवद्भक्ति उत्पन्न होते, वैराग्य उत्पन्न होतं, ज्ञानविज्ञान सर्वही प्राप्त होतं. ऋषिमहाराज आपण खरोखर भाग्यवान आहात. भगवंताचं अखंड स्मरण आपल्याला आहे. सर्व कर्म ईश्वरार्पण बुद्धिने आपली चालू आहेत. आपण विचारल्यामुळे मला या चरित्राचं स्मरण झालं आणि मी आपल्याला सांगितलं. कलिचे दोष दूर करण्याकरता भगवान श्रीहरीची कथा श्रवण करावी, गायन करावी, चिंतन त्याचं करावं, सर्व ब्रह्मांडातले देव ज्याचं चिंतन करताहेत त्या सर्वात्मा श्रीहरीला मी प्रणाम करतो आहे. नेहेमी समाधि अवस्थेत मग्न असतानासुद्धा शुकाचार्यांनी आपल्या पिताजींनी रचलेल्या या भागवतपुराणाचा प्रसार सर्वांच्या कल्याणाकरता, सर्वांच्या दुरितक्षयाकरता केला हे मोठे उपकार त्यांचे मानव समाजावर आहेत. त्या शुकाचार्यांनाही माझा नमस्कार असो अशी प्रार्थना शेवटी सूतमहर्षिंनी केलेली आहे.

पुढं अष्टादश पुराणांचं वर्णन केलेलं आहे. त्यांची संख्या वगैरे सांगितलेली आहे. नारदांच्यां आदेशाप्रमाणे व्यासमहर्षिंनी या भागवतपुराणाची रचना केलेली आहे हे नवीन केलं असं नाही. ब्रह्मदेवानी नारदांना सांगितलं, नारदांनी व्यासांना सांगितलं आणि व्यासांनी त्यापासून विस्तार केलेला आहे. या दिव्य भागवतपुराणामधे वैराग्यपूर्ण, भक्तिपूर्ण आख्यानं आहेत. सर्व वेदांताचं हे सार आहे. कैवल्यफल देणारं आहे. अद्वितीय जी आत्मवस्तू याचं प्रतिपादन यात केलेलं आहे.

कस्मै येन विभासितोऽयमतुलो ज्ञानप्रदीपः पुरा
तद्रूपेण च नारदाय मुनये कृष्णाय तद्रूपिणा ।
योगीन्द्राय तदात्मनाथ भगवद्राताय कारुण्यतः
तच्छुध्दं विमलं विशोकममृतं सत्यं परं धीमहि ।। १२.१३.१९ ।। श्री.भा.

शेवटी उपसंहार करताहेत, वेदव्यास महर्षि. आरंभालाही 'सत्यं परं धीमही' त्या भगवंताचं ध्यान केलं, शेवटीही केलं. हा जो ज्ञानदीप आहे हा भगवंतानेच ब्रह्मदेवांकडे दिला. ब्रह्मदेव हे देखील भगवद्स्वरूपच आहेत. त्यांच्याकडून हा ज्ञानदीप नारदांकडे आला. त्यांच्याकडून व्यासांना आणि व्यासांकडून शुकाचार्यांकडे हा ज्ञानदीप आलेला आहे. परीक्षित राजाच्या निमित्ताने तो सर्व समाजाला मिळालेला आहे. परंपराही अशी आहे. भगवंताची आहे. तेच श्रोते आणि तेच वक्ते. गुरुशिष्य रूप तेच भगवन आहेत. असं जे काही सत्यस्वरूप अबाधित आहे. त्याचं आम्ही चिंतन करतो. असं ध्यान भगवंताचं केलं आणि शेवटी व्यासमहर्षींनी भगवंताजवळ प्रार्थना केलेली आहे.

भवे भवे यथा भक्तिः पादयोस्तव जायते ।
तथा कुरुष्व देवेश नाथस्त्वं नो यतः प्रभो ।।१२.१३.२२।। श्री.भा.

प्रत्येक जन्मामधे आमच्या अंतःकरणामधे आपली भक्ति असो. म्हणजे सगळं आम्हाला मिळेल.

नामसमीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् ।
प्रणामो दुःखशमनः तं नमामि हरि पदम् ।।१२.१३.२३।। श्री.भा.

ज्या भगवंताचं नामसंकीर्तन श्रद्धेने घडलं असता सर्वही पातकांचा नाश होतो. ज्याला प्रणाम केलेला असताना सर्व दुःखांची निवृत्ति होते. त्या भगवान श्रीहरी सर्वेश्वर याला आमचा नमस्कार असो. अशी प्रार्थना करून श्रीमद्भागवत ग्रंथाची समाप्ति वेदव्यासांनी केलेली आहे.

भवे भवे यथा भक्तिः पादयोस्तव जायते ।
तथा कुरुष्वदेवेश नाथस्त्वंनो यतः प्रभो ।।१२.१३.२२।। श्री.भा.
नामसमीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् ।
प्रणामो दुःखशमनः तं नमामि हरि पदम् ।।१२.१३.२३।। श्री.भा.
हरये नमः हरये नमः हरये नमः
कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा। बुद्ध्याऽऽत्मना वा अनुसृतस्वभावात्।।
करोति यद्यत् सकलं परस्मै। नारायणायेति समर्पयेत् तत्।।११.२.३६।। भा.

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन् नमस्ते ।।
।।गोपालकृष्ण भगवान् की जय।।
।। श्रीमद्‌भागवत सातवा दिवस समाप्त ।।
।।महर्षि श्रीवेदव्यासरचित श्रीमद् भागवतग्रंथ निरूपण समाप्त ।।

ट



# गोपीगीत

# गोपीगीत

जयति तेऽधिकं जन्मना व्रज: श्रयत इन्दिरा शश्वदत्र हि ।
दयित दृश्यतां दिक्षु तावका – स्त्वयि धृतासवस्त्वां विचिन्वते ।।१।।
शरदुदाशये साधुजातसत् सरसिजोदरश्रीमुषा दृशा ।
सुरतनाथ तेऽशुल्कदासिकावरद निघ्नतो नेह किं वध: ।।२।।
विषजलाप्ययाद् व्यालराक्षसाद् वर्षमारुताद् वैद्युतानलात् ।
वृषमयात्मजाद् विश्वतोभयादृषभ ते वयं रक्षिता मुहु: ।।३।।
न खलु गोपिकानन्दनो भवानखिलदेहिनामन्तरात्मदृक् ।
विखनसार्थितो विश्वगुप्तये सख उदेयिवान् सात्वतां कुले ।।४।।
विरचिताभयं वृष्णिधुर्य ते चरणमीयुषां संसृतेर्भयात् ।
करसरोरुहं कान्त कामदं शिरसि धेहि न: श्रीकरग्रहम् ।।५।।
व्रजजनार्तिहन् वीर योषितां निजजनस्मयध्वंसनस्मित ।
भज सखे भवत्किंकरी: स्म नो जलरुहाननं चारु दर्शय ।।६।।
प्रणतदेहिनां पापकर्शनं तृणचरानुगं श्रीनिकेतनम् ।
फणिफणार्पितं ते पदाम्बुजं कृणु कुचेषु न: कृन्धि हृच्छयम् ।।७।।
मधुरया गिरा वल्गुवाक्यया बुधमनोज्ञया पुष्करेक्षण ।
विधिकरीरिमा वीर मुह्यतीरधरसीधुनाऽऽप्याययस्व न: ।।८।।
तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।

श्रवणमङ्गलं श्रीमदाततं भुविगृणन्ति ते भूरिदा जनाः ।।९।।
प्रहसितं प्रिय प्रेमवीक्षणं विहरणं च ते ध्यानमङ्गलम् ।
रहसि संविदो या हृदिस्पृशः कुहक ना मनः क्षोभयन्ति हि ।।१०।।
चलसि यद् व्रजाच्चारयन् पशून् नलिनसुन्दरं नाथ ते पदम् ।
शिलतृणाङ्कुरै सीदतीति नः कलिलतां मनः कान्त गच्छति ।।११।।
दिनपरिक्षये नीलकुन्तलैर्वनरुहाननं बिभ्रदावृतम् ।
घनरजस्वलं दर्शयम् मुहुर्मनसि नः स्मरं वीर यच्छसि ।।१२।।
प्रणतकामदं पद्मजार्चितं धरणिमण्डनं ध्येयमापदि ।
चरणपमजं शन्तमं च ते रमण नः स्तनेष्वर्पयाधिहन् ।।१३।।
सुरतवर्धनं शोकनाशनं स्वरितवेणुना सुष्ठु चुम्बितम् ।
इतररागविस्मारण नृणां वितर वीर नस्तेऽधरामृतम् ।।१४।।
अटिति यद् भवानह्नि काननं त्रुटिर्युगायते त्वामपश्यताम् ।
कुटिलकुन्तलं श्रीमुखं च ते जड उदीक्षतां पक्ष्मकृद् दृशाम् ।।१५।।
पतिसुतान्वयभ्रातृबान्धवानतिविलङ्घ्य तेऽन्त्यच्युतागताः ।
गतिविदस्तवोद्गीतमोहिताः कितव योषितः कस्त्यजेन्निशि ।।१६।।
रहसि संविदं हृच्छयोदयं प्रहसिताननं प्रेमवीक्षणम् ।
बृहदुरः श्रियो विक्ष्य धाम ते मुहुरतिस्पृहा मुह्यते मनः ।।१७।।
व्रजवनौकसां व्यक्तिरङ्ग ते वृजिनहन्त्र्यलं विश्वमङ्गलम ।
त्यज मनाक्च नस्त्वत्स्पृहात्मनां स्वजनहृद्रुजां यन्निषूदनम् ।।१८।।
यत्ते सुजातचरणाम्बुरुहं स्तनेषु भीताः शनैः प्रिय दधीमहि कर्कशेषु ।
तेनाटवीमटसि तद् व्यथते न किंस्वित् कूर्पादिभिर्भ्रमति भिर्भवदायुषां नः ।।१९।।
इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहंस्यां संहितायां
दशमस्कन्धे पूर्वार्धे रासक्रीडायां गोपीगीतं नामैकत्रिंशोऽध्यायः ।।३१।।

ट

# ।। श्रीमद्भागवताची आरती ।।

आरती निगम वृक्ष सारा । भागवत संज्ञा भव पारा ।।धृ.।।
नारद कथा साधु श्रवणी, परिक्षिती लवला शुकचरणी ।
विरागे तनुत्यागे करूनि, कथी अवतार कथा भरणी ।
चाल :- विदुर मैत्रेय संग घडला । विधी अति कष्टी ।
निपजवी सृष्टी । सुखाची वृष्टी । कपिलमुनी देवहुतीदारा ।।

दुरातन सूकर अवतारा ।।१।। आरती निगम ....
ब्रह्मसुत दक्षवंश यागी । आला ध्रुव तपे अचल भागी ।
पृथु प्राचीन बर्हिरागी । प्रियवत वनवासा त्यागी ।
चाल :- मही आकाश गोल वदला । नरक भय हरुनि ।
अजामिल तरूनि । बोध बहु करूनि । चित्रकेतू नेई पैलपारा । काश्यप संति सुखधारा ।।२।।
आरती निगम ....

भक्त प्रह्लादभये तरला । हरी नरहरी रूप नटला ।
नक्रापासुनि करी सुटला । समुद्र मंथुनि बळी पिटला ।

चाल :– कूर्ममोहिनी भिषगराया । रविशशी गोत्र ।
अजित नृप पात्र । अमित युग पात्र । कृष्ण भक्तिने अकूपारा ।
नवम हा संपविला सारा ।।३।। आरती निगम ....

कंस चाणूर मुख्य वीरा । दमाया अवतरला वीरा ।
गोकुळी लीला करू शकला । साहाय झाला अर्जुनाला ।
चाल :– उद्धवा ज्ञान कथा बोधी । प्रलय युग विलय ।
परिक्षिती सुनय । मृकंडु तनया पावला हरिचरणी थारा ।
विठ्ठल वेद स्कंद बारा ।।४।। आरती निगम वृक्ष सारा । भागवत संज्ञा भवपारा ।।

।। गोपाल कृष्ण भगवान की जय ।।

ट

# आरती सद्गुरु दत्तमहाराजांची ...

आरती दत्तराजयाची । धुंडीराजसुपुत्राची ।।धृ०।।
पुण्यग्रामीं तूं वससी । भक्तां पावन तूं करिशी ।
भजती त्यातें उद्धरिसी । न भजती त्यांहि कृपा करिसी ।
(चाल) पुरुषोत्तमा तूं अवतारा ।
शरण येऊन, विनीत होऊन, धूली घेईन ।
श्रीगुरु आपुल्या चरणांची । किमया पावन करण्याची ।
आरती दत्तराजयाची । धुंडीराजसुपुत्राची ।।१।।

भागवतावरी तव प्रीति । स्वकुळीं गणेशदत्तभक्ती ।
ज्ञानीं विद्यावाचस्पती । अंकित कुंडलिनी शक्ती ।
(चाल) कवीश्वरा तूं ईश्वरा ।
जगतीं प्रगटून, लीला दावून, तरीही लपवून ।
ठेविली ओळख स्वरूपाची । गाइन लीला किर्तीची ।
आरती दत्तराजयाची । धुंडीराजसुपुत्राची ।।२।।

शुभ्र वस्त्रे शुचिचें ल्यालें । वात्सल्या मूर्त रूप आलें ।
ज्ञाना विनयें शोभविलें । ब्रह्म साकारूनि आलें ।
(चाल) भक्तवत्सला दयाघना ।
दृष्टीनें करूण, मजला बघून, जवळी घेऊन ।
वर्षा करी बा ममतेची । मागिन भिक्षा भक्तीची ।
आरती दत्तराजयाची । धुंडीराजसुपुत्राची ।।३।।

ट



ब्रह्मर्षि प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

* प्रकांड पंडित, विद्यावाचस्पती
* चारही आचार्यपीठांकडून सन्मान
* भारतांच्या तीन राष्ट्रपतींकडून गौरव
* प. पू. योगीराज गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी
* असंख्य श्रीमद्‌भागवत सप्ताहांद्वारा व प्रवचनांद्वारा, धर्मप्रसार व लोकजागृती.
* अत्यंत ऋजुता, विनय आणि हरिभक्तीची तीव्र तळमळ यामुळे एक विलोभनीय दर्शनीय व्यक्तिमत्त्व
* स्वतः प्रेमस्वरूप असलेला व सतत प्रेम प्रसारित करणारा श्रेष्ठ महात्मा !
* १९९९ साली ब्रह्मलीन !



प. पू. ताईमहाराज चाटुपळे

* प. पू. दत्तमहाराजांच्या अंतरंग शिष्या आणि आध्यात्मिक उत्तराधिकारी
* अखंड नामस्मरण, 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' महामंत्राची अखंड धून आणि हजारो लोकांना अन्नदान ही कलियुगाची वैशिष्ट्ये प्रत्यक्ष सादर होणारे स्थान म्हणजे श्रीदत्ताश्रम आणि या सर्व कार्याच्या अध्वर्यु आहेत प. पू. ताईमहाराज !
* अत्यंत प्रेम, करुणा, निर्भीडपणा, संपूर्णपणे सद्‌गुरुशरण वृत्ति, भारतीय संस्कृतिचं मर्म जाणून बहुजनसमाज जवळ करणे ही सर्व संतलक्षणे जिथे एकवटली आहेत, अशा प. पू. ताईमहाराज !
* श्रीदत्ताश्रम जालना, हे जणु मराठवाड्यातील गोंदवलंच आहे !

पत्ता :
**श्रीदत्ताश्रम (संस्थान)**, सद्‌गुरुनगर, नाव्हा रोड,
जालना - ४३१ २०३ (महाराष्ट्र)
फोन - ०२४८२ - २३६८०५

**श्री भगवती प्रकाशन, पुणे**